


खानदेश – वऱ्हाडातील
लेवा पाटीदार समाज :
एक अन्वयार्थ
डॉ. नि. रा. पाटील


realpatidar.com
खानदेश – वऱ्हाडातील
लेवा पाटीदार समाज :
एक अन्वयार्थ
डॉ. नि. रा. पाटील

realpatidar.com

realpatidar.com

realpatidar.com

खानदेश – वऱ्हाडातील

लेवा पाटीदार समाज

एक अन्वयार्थ

✻

लेखक
डॉ. नि. रा. पाटील – पिळोदेकर
सहलेखिका
सौ. ऊर्मिला पाटील – पिळोदेकर

✻

प्रकाशक :
मुंबई व परिसर लेवा मंडळ (रजि.)
मुंबई

खानदेश – वऱ्हाडातील

लेवा पाटीदार समाज

एक अन्वयार्थ

*

लेखक
डॉ. नि. रा. पाटील – पिळोदेकर
सहलेखिका
सौ. ऊर्मिला पाटील – पिळोदेकर
१०३, लता को–ऑप. हाऊसिंग सोसा. लि.
ठाकुरवाडी क्रॉस लेन, पं. दीनदयाळ मार्ग,
डोंबिवली (पश्चिम) – ४२१२०२, जि. ठाणे.
फोन : ०२५१–२४८७५९५, मो. ९३२४१ ७६८८०

*

तिसरी आवृत्ती : नोव्हेंबर २०१५

*

प्रकाशक व वितरक
मुंबई व परिसर लेवा मंडळ (रजि.)
मुंबई

*

*

अक्षरजुळणी व मुखपृष्ठ
डिझाइन ॲण्ड प्रिंट, ठाणे
भ्रमणध्वनी : ९९२०४८५४३९

*

मुद्रक
सायली प्रिंटर्स
डी–६, राजहंस सोसायटी,
टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.
दूरध्वनी : (०२५१) २४३५९६८
भ्रमणध्वनी : ९७६९१३४००३

*

देणगी मूल्य : रु. ३९०/–

(ग्रंथातील मजकुराशी प्रकाशक सहमत असतीलच, असे नाही. ती लेखकांची मते आहेत.)

ऋण व आशीर्वाद!

माझे आई–वडील



कै. रामदास उदाजी पाटील
कै. गोदावरी रामदास पाटील


लेवारत्न



निसर्गकन्या
कवयित्री बहिणाबाई चौधरी

यांना विनम्र अभिवादन!

लेवा पाटीदार समाजाचे मानबिंदू



लोहपुरूष
सरदार वल्लभभाई पटेल

यांना विनम्र अभिवादन!

लेवारत्न



समाजरत्न

माननीय मंत्री महोदय एकनाथरावजी खडसे

महसूल, कृषी व अन्य खाती, महाराष्ट्र शासन

यांना विनम्र अभिवादन !

प्रस्तावना (पहिली आवृत्ती)

लेवा पाटीदार समाज - एक अन्वयार्थ

लेवा पाटीदार समाज - एक अन्वयार्थ हा श्री. नि.रा. पाटील लिखित ग्रंथ समाजासमोर येत असता मी त्याला प्रस्तावना लिहावी, असा लेखकाकडून खूप आग्रह झाला. मी काही साहित्यकार अथवा इतिहास संशोधक नाही. त्यामुळे ऐतिहासिक संदर्भांनी भरलेल्या या पुस्तकाला प्रस्तावना देण्याचा मला खूप संकोच वाटला. माझा अधिकार काय, असे मला वाटले. परंतु, मी एक सामाजिक कार्यकर्ता आहे. काही सामाजिक मूल्ये उराशी बाळगून जीवन जगत आहे आणि समाजजीवन सुखी, आनंदी व मंगलमय कसे बनेल, याचा ध्यास घेऊन हे कार्य करीत आहे. वर्णाश्रम, जाती, पंथ, धर्म यांच्यात विभागलेला, दुभंगलेला भारतीय समाज काही समान सूत्र स्वीकारून एकात्म कसा बनेल, याचा सतत विचार मनात असतो.

या सहस्रकातील दोन द्रष्ट्या पुरुषांनी म्हणजे कार्ल मार्क्स आणि महात्मा गांधी यांनी मानवी जीवन आचार-विचारांनी सुखी समृद्ध व्हायचे असेल तर वर्गविहीन व शोषणविहीन समाजरचना निर्माण झाली पाहिजे, असा विचार मांडला. त्यांचे मार्ग भिन्न असले तरी उद्दिष्ट मात्र एक होते आणि तेच मानव समाजासाठी कल्याणकारी आहे, असे मला वाटते. असे असता भारतातील अनेक जातींपैकी एका जातीच्या इतिहासाला मी प्रस्तावना लिहिण्याचे प्रयोजन काय, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

हिंदू धर्मात जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती जन्मतः कुठल्या ना कुठल्या जातीत जन्माला येत असते. त्यानुसार, मी लेवा पाटीदार समाजात जन्माला आलो.

त्यामुळे या समाजातील चालीरीती, कार्यपद्धती, गुण आणि दोष यांची मला चांगली कल्पना आहे. म्हणून, आपल्या अवतीभवतीच्या वास्तवाबद्दल जाणीवपूर्वक विचार करावा, वास्तवातून आदर्शाकडे जाण्याच्या दृष्टीने तो समाजासमोर मांडावा, या भावनेनेच ही प्रस्तावना लेखनाची जबाबदारी मी स्वीकारली.

मी लेवा पाटीदार समाजात जन्मलो याचा मला अहंकार नाही; परंतु दुःखही नाही. कारण, अनेक चांगल्या मानवी गुणांचा स्वीकार करणारा आणि वैयक्तिक व सामाजिक जीवनात ते उतरविण्यासाठी धडपड करणारा हा एक समूह आहे. या समाजातील काही समूह गुजरात राज्याव्यतिरिक्त महाराष्ट्राच्या जळगाव व बुलडाणा जिल्ह्यांत तसेच मध्य प्रदेशच्या बऱ्हाणपूर, खंडवा व खरगोन या भागांत वसलेले दिसतात. महाराष्ट्रात काही लाखांत संख्या असलेला हा समाज गुजरातेतून आला आहे. एका अर्थाने एक अल्पसंख्याक असलेले; परंतु परंपरेने विशाल शेतकरीवर्गात मोडणारे, दिवसभर काबाडकष्ट करून संध्याकाळी ईश्वरभक्तीत तल्लीन होणारे हे लोक आहेत. वारकरी संप्रदाय, स्वामिनारायण पंथ, महानुभाव पंथ आणि सत्पंथ या संप्रदायांवर श्रद्धा असलेला असा हा पापभीरू समाज आहे. जातीपंचायतीच्या प्रभावामुळे परमेश्वरी अधिष्ठान लाभलेला; त्यामुळेच मांसाहार, व्यसने, व्यभिचार यापासून बराच काळ अलिप्त राहिलेला आणि शिक्षणाद्वारे आत्मोन्नतीसाठी धडपड करणारा असा हा समूह अनेक वैशिष्ट्यांनी उठून दिसतो. सामान्यपणे एक प्रदेश सोडून दुसऱ्या प्रदेशात आलेला समूह बराच काळ पूर्वापार चालत आलेल्या आपल्या वेशभूषा, भाषा, चालीरीती, दैवते यांना घट्ट धरून असलेला दिसतो. परंतु, लेवा पाटीदार समाजाचे वैशिष्ट्य असे दिसते की, हा परिवर्तनशील समाज आहे. महाराष्ट्रात आल्यानंतर त्याने मराठी वेशभूषा, भाषा आणि दैवते स्वीकारलीत आणि उपरा न राहता सर्वार्थाने या भूमीचे भूमिपुत्र होण्याचा प्रयत्न केला आहे.

पूर्वेतिहास पाहता या समाजाची पाळेमुळे मध्यपूर्वेतील देशांमध्ये आहेत, असे संशोधक म्हणतात. भ्रमण करीत-करीत भारताच्या पंजाब प्रांतात त्यांचे आगमन झाले. तिथून राजस्थान, गुजरात या प्रदेशांमध्ये स्थायिक होत त्यांच्यापैकी काही तापी नदीच्या खोऱ्यातून खानदेशात येऊन स्थिरावले. गुजरातमधून स्थलांतरित होण्याचा मार्ग गुजरातमधील पावागडपासून तापी खोऱ्याने पूर्व दिशेकडे जाण्याचा असावा, असे आजपर्यंत मानले जात असे. परंतु, श्री. निळकंठ पाटील यांनी तो मार्ग मध्य प्रदेशातून बऱ्हाणपूरमार्गे होता, असे दाखवून त्या पुष्ट्यर्थ काही पुरावेही दिले आहेत. मध्य प्रदेशातील माळवा, निमाड या भागांत अनेक पाटीदार लोक आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रतिपादनाला काही पुष्टी मिळते. परंतु, मी इतिहास संशोधक नाही; त्यामुळे याबद्दल निश्चित मतप्रदर्शन योग्य ठरणार नाही.

मुघल साम्राज्याच्या काळात तसेच ब्रिटिश राजवटीतही लेवा पाटीदार समाज

अतिशय कष्टाळू, सहनशील, समृद्ध म्हणून प्रसिद्ध होता. ब्रिटिश सरकारच्या गॅझेटिअरमधील यासंबंधीची माहिती उल्लेखनीय आहे. **खानदेश गॅझेटिअर**मध्ये जेम्स एम. कॅम्बेल याने लेवा पाटीदार समाजाबद्दल पुढीलप्रमाणे लिहिले आहे.

"Truthful, orderly & frugal almost to nigardliness, they are the most hardworking, industrious and simpleminded of the Khandesh agricultural population. Since the great dispute which broke up their caste, they have been remarkable for the apparent absense of jealousies and treacheries..." ही मंडळी स्वतःला प्रभू रामचंद्राचा पुत्र लव यांचे वंशज समजतात आणि तसेच लिखाणही झालेले दिसते.

प्रत्येक व्यक्तीला अथवा समाजाला आपली ओळख हवी असते आणि निरनिराळ्या पद्धतीने ती शोधण्याचा, देण्याचा प्रयत्न होत असतो. काही समाज आपली ओळख, आपले मूळ शोधण्याचा प्रयत्न करीत प्रभू रामचंद्र व भगवान कृष्णापर्यंत जाऊन पोहोचतात. कुणी स्वतःला सूर्यवंशी, तर कुणी चंद्रवंशी म्हणत असतो. आपण कमी नाही आहोत, हे दाखवत असतो. इथवर हे ठीक आहे. परंतु आपल्याला श्रेष्ठ ठरवीत असताना इतरांना कनिष्ठ अथवा तुच्छ ठरविण्याचा प्रयत्न होत असतो. ही चिंतेची व हानिकारक बाब ठरते. आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी वाटेल त्या प्रकारांनी प्रयत्न करण्यापेक्षा अथवा हीन लेखण्यापेक्षा स्वतःची पात्रता, योग्यता वाढविणे म्हणजेच एकूणच गुणसमुच्चयांची उंची वाढविणे मानवी समाज उन्नत करण्यासाठी अधिक श्रेयस्कर आहे, असे मला वाटते. वर्गात एखाद्या सुजाण गुरुजींकडून एक प्रश्न विचारला जातो. फळ्यावर एक सरळ रेषा ओढली जाते आणि मग गुरुजी प्रश्न विचारतात की, ''ही रेषा न पुसता ती कोण लहान करून दाखवील?'' विद्यार्थी कोड्यात पडतात, 'न पुसता ही रेषा लहान कशी करणार'? इतक्यात, एक विलक्षण बुद्धी असलेला विद्यार्थी उठतो आणि खडूने त्या फळ्यावर असलेल्या रेषेच्या खाली तिच्यापेक्षा लांब रेषा काढतो आणि गुरुजींना सांगतो, ''बघा गुरुजी, ती आधीची रेषा लहान झाली आहे.''

व्यक्तिव्यक्तींत, समाजासमाजांत इतरांपेक्षा मोठे ठरण्यासाठी अशा रीतीने आपलीच उंची वाढविण्याचा प्रयत्न झाला, उच्चनीचतेचे संघर्ष संपून निरोगी स्पर्धा सुरू झाली तर एकूण समाजजीवनाची उंची सातत्याने वाढत राहील. मला असे वाटते की, आपल्या देशात जातीपाती संपत नाहीत तोवर निरोगी स्पर्धा सुरू झाली तर जातीपाती एकमेकांना छेद देणाऱ्या न ठरता समाजस्वास्थ्याला, प्रगतीला पूरक ठरतील.

लेवा पाटीदार समाजातील धुरिणांनी भोरगाव पंचायत (पाडळसे) या संस्थेच्या व कै. भिकाजी कोलते यांनी दाताळा ठाया या माध्यमातून या समाज समूहातील

अनेक दोष घालविण्याचा, अनिष्ट चालीरीती बदलण्याचा प्रयत्न बराच काळपर्यंत यशस्वीपणे केला. विवाहविषयक अनेक प्रश्नांची न्यायोचित सोडवणूक करण्याचा, समाजात धर्मभावना, सहकार्य भावना वाढविण्याचा प्रयत्न केला. व्यक्तिविकास आणि समाजविकासाचे नव्या युगातील महत्त्वाचे साधन शिक्षण आहे, हे ओळखून शैक्षणिक कार्याला खूप प्रोत्साहन दिले. त्यामुळे ग्रामीण भागातील शेती व्यवसाय करणाऱ्या अनेक समाज गटांपैकी या समाजातील शिक्षणाचे प्रमाण तुलनात्मकदृष्ट्या खूप वाढले. विसाव्या शतकातील पूर्वार्धाच्या त्या काळातील समाजाचे एक धुरीण नाना रावजी चौधरी यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी जो पुढाकार घेतला; त्याचा दृश्य परिणाम म्हणजे खानदेश विभागाच्या (आजच्या जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांच्या) ग्रामीण परिसरातून त्यांचे ज्येष्ठ पुत्र दामोदर नाना चौधरी हे पहिले पदवीधर आणि सरकारी नोकरीत नेमले गेलेले पहिले मामलेदारही ठरले.

लहान-मोठ्या खेड्यांतून प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा काढल्या गेल्या. मुला मुलींना शिक्षण देण्यावर खूप भर दिला गेला. काही समाजधुरिणांनी उच्च शिक्षण घेण्याची सुविधा असलेल्या जळगाव या जिल्ह्याच्या गावी फकिरा हरी लेवा बोर्डिंगसारखी संस्था काढली. सावदा येथील समाजातील शिक्षणप्रेमी नानासाहेब विष्णू हरी पाटील यांनी आपले वडील भाऊ फकिरा हरी पाटील यांच्या स्मरणार्थ मोठी देणगी देऊन बोर्डिंगच्या कामात हातभार लावला. त्यामुळे उच्च शिक्षणास गती मिळाली. कष्ट करू, घाम गाळू, चटणी-भाकरी खाऊ; परंतु मुलांना शिक्षण देऊ, या विचारांनी भारावलेल्या असंख्य परिवारांतील मुले कला, अर्थ, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रांतील तज्ज्ञ, गणिततज्ज्ञ, विधितज्ज्ञ, बॅरिस्टर, रँगलर, डॉक्टर झाले आणि शिक्षण क्षेत्र, समाजकार्यात व सरकारी नोकऱ्यांत दिसू लागले.

हा समाज शांत, विनम्र आणि शेती व्यवसाय करणारा असला तरी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्याने फार मोठे योगदान दिले. या समाजातील कै. धनाजी नाना चौधरी ब्रिटिश राजवटीत फौजदारपदावर होते. त्यांनी देशबांधवांवर आणि स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सैनिकांवर होणारे अन्याय, अत्याचार बघून ब्रिटिश साम्राज्याचा निषेध केला आणि आपल्या फौजदारकीचा त्याग करून महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले. त्याच काळात आसोद्याचे सुकाभाऊ चौधरी, सखारामभाऊ चौधरी, ममुराबादचे सीतारामभाऊ चौधरी, भादलीचे डॉ. सुभान पाटील, सावद्याचे सोना मास्तर, खिरोद्याचे मोतीराम गुरुजी आणि बोंडे गुरुजी, रोझोद्याचे लोढुभाऊ फेगडे आदी अनेक प्रमुख व्यक्तींनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होऊन खानदेशात मोठेच कार्य केले. स्वातंत्र्यासाठी तळहातावर शिर घेऊन लढणाऱ्यांमध्ये सुभान पाटील, जी.बी. महाजन, एल.जी. चौधरी यांचा जरूर उल्लेख करावा लागेल.

ग्रामीण भागातील ही अलौकिक जागृती बघूनच अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ग्रामीण भागातील पहिले अधिवेशन महात्मा गांधींच्या आदेशानुसार खिरोद्याजवळच्या फैजपूर येथे भरविण्यात आले. ते अत्यंत यशस्वी करण्याचा पराक्रम या विभागाने केला आणि स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात फैजपूर काँग्रेसचे अधिवेशन एक मानबिंदू ठरला. श्री. पाटील यांनी या पुस्तकात ३७५ स्वातंत्र्यसैनिकांची यादी दिली आहे. माझ्या माहितीनुसार स्वातंत्र्यसैनिक असूनही कुठल्याही प्रकारची प्रसिद्धी अथवा सरकारी मदतीची अपेक्षा न करणाऱ्या अनेक निःस्पृह लोकांची नावे सरकारी यादीत नसल्याने येथे आलेली नाहीत.

साहित्य व कला क्षेत्रातही या समाजातील अनेकांनी गौरवास्पद कार्य केले आहे. आधुनिक काळातील कविकुलभूषण बहिणाबाई चौधरी व बुलडाण्याचे बॅ. टी.एस. पाटील यांची पत्नी कवयित्री रुक्मिणीबाई पाटील या लेवा पाटील समाजातील आहेत. बहिणाबाईंचे पुत्र कविवर्य सोपानदेव चौधरी, थोर संशोधक व साहित्यकार पद्मश्री वि.भि. कोलते, मराठी साहित्य क्षेत्रात नव्या वाटा चोखाळणारे नेमाडपंथी डॉ. भालचंद्र नेमाडे, सिनेसृष्टीतील एक निर्माते वि.गो. नेमाडे, के. नारखेडे, तु.बा. बेंडाळे, गणेश चौधरी, एक थोर विचारवंत भा.ल. भोळे, श्रीराम अत्तरदे, महाराष्ट्र गॅझेटिअरचे माजी कार्यकारी संपादक डॉ. के.के. चौधरी, प्रा.डॉ. स्नेहलता चौधरी, प्रा.डॉ. प्रमिला भिरूड आदी या समाजातील कितीतरी लेखकांनी विविध प्रकारची दर्जेदार साहित्यनिर्मिती करून साहित्य क्षेत्रात मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

आज जगातील बऱ्याच विद्यापीठांत, उद्योग-व्यवसायात आणि अन्यत्रदेखील या समाजातील तरुण मोठमोठ्या हुद्यांवर तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, डॉक्टर, प्राध्यापक म्हणून काम करीत असलेले दिसतात. संगणकाच्या क्षेत्रात खूप मोठी कामगिरी हे तरुण करत आहेत. सिलिकॉन व्हॅलीमधील सर्वोत्कृष्ट ठरलेला भारतीय संगणक उद्योगपती श्री. किशोर पाटील हा आणि अमेरिकेचे माजी राष्ट्रपती बिल क्लिंटन यांच्या क्लिन कार या प्रतिष्ठित प्रकल्पाचा मुख्य संचालक डॉ. पी.जी. पाटील, पेनस्टेट विद्यापीठातील इकॉलॉजिकल सायन्स या विभागात काम करणारे जागतिक कीर्तीचे डॉ. जी.पी. पाटील या लहानशा समूहात जन्मले आहेत.

या पुस्तकातील 'समाजरत्ने'

या प्रकरणातून (प्रकरण ९) या समाजातील वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या अनेक कर्तृत्ववान व प्रतिभावानांचा परिचय लेखकाने करून दिला आहे. सामाजिक, आर्थिक, सहकार क्षेत्रातही तसेच राजकारणातही मोठे तोलामोलाचे योगदान या समूहातील अनेकांनी दिले आहे. ही यादी आणखी बरीच वाढू शकेल. उल्लेखनीय बाब आहे की, या सर्वांनी आपापल्या परीने समाजापुढे काही आदर्श निर्माण केले आहेत.

जीवनाच्या विविध क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण व लक्षणीय कामगिरी करणाऱ्या इतक्या व्यक्ती एवढ्या छोट्याशा लोकसमुदायामधून येणे, हे देशाच्या कृषिबल समाजातील एक आगळेच उदाहरण असू शकेल. त्यामुळेच या समाजाकडे एक प्रगत समाज म्हणून सर्वांचेच लक्ष वेधले गेले. मा. यशवंतराव चव्हाण आपल्या भाषणातून अनेकदा याचा आवर्जून उल्लेख करीत असत.

जीवनाच्या अनेक क्षेत्रांत स्पृहणीय कार्य केलेल्या व करीत असलेल्या या समाजातील आजचे वास्तव मात्र काही बाबतीत चिंता निर्माण करणारे आहे. भौतिकवादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या विशाल भारतीय समाजासारखाच हा समूहदेखील मोठ्या प्रमाणात सहकार्य भावना विसरून पैशांच्या व स्वार्थाच्या आहारी जात असताना दिसत आहे. पूर्वापार चालत आलेल्या अथाराच्या प्रथेचा म्हणजे परस्पर सहकार्याने एकमेकांना मदतीचा आधार देणारा हा समाज सहकार्य भावना विसरत आहे. लोभापायी माणुसकीचा विसर पडणारी हुंड्यासारखी दुष्ट प्रथा प्रतिष्ठेचा विषय मानली जाऊ लागली आहे. विवाहविधीमधील मांगल्य व संस्कार कमी होऊन साखरपुडे (वाङ्निश्चय) आणि विवाह प्रसंगातील श्रीमंतीचे अतिरेकी आणि ओंगाळवाणे प्रदर्शन, जेवणावळीतील गर्दी आणि स्वच्छतेचा अभाव आदी गोष्टी चिंताजनक आहेत. समाजातील गरीब माणसांचे काय, याचा कोणी विचार करू नये, याचे दुःख वाटते.

'पूर्व दिव्य ज्यांचे रम्य भावी काळ' हे सुभाषित लक्षात घेऊन समाजधुरिणांनी, खासकरून तरुण व सुविद्य घटकांनी सामूहिक चिंतन व प्रयत्न करून यातून मार्ग काढणे आवश्यक आहे.

आजच्या प्रगत समाजात जातीसंस्थांना काय स्थान असावे, किती महत्त्व दिले जावे, या प्रश्नांची चर्चा नेहमीच होत असते. वर्गविहीन व शोषणविहीन, पुरोगामी आणि उज्जीवित मानवी समाज निर्माण व्हावा, ही संकल्पनाच त्यादृष्टीने आदर्श आहे. परंतु, जोवर जाती जात नाहीत; तोवर त्यांच्या कार्याचे स्वरूप कसे असावे, याबद्दल एक विचार मांडावासा वाटतो. तो असा की, जातीपातींच्या पंचायतींचे कार्य एखाद्या बागायती पिके घेणाऱ्या शेतकऱ्यासारखे असावे. तो शेतकरी आपल्या शेतात केळी, संत्री, मोसंबी अथवा इतर ओलिताची शेती करताना साऱ्या शेतीमध्ये पाणी सोडून न देता आधी लहान-लहान आळ्यां (वयी) करतो. त्यात रोपे लावतो. विहिरीतील अथवा पाटातील पाणी दांडाने त्या आळ्यांमध्ये सोडतो. अशारीतीने प्रत्येक आळे भरतो. त्यामुळे त्या आळ्यांतील प्रत्येक रोपट्याच्या मुळापर्यंत पाणी मुरते व रोपे टरारून वाढत जातात. पूर्ण वाढ झाली की, फळे लागतात. सर्वत्र आबादीआबाद होते. त्या शेतकऱ्याने आळी न करता सबंध शेतात पाणी सोडून दिले असते, तर उताराच्या दिशेने पाणी वाहत गेले असते. उंचवट्यावर पाणी न

गेल्यामुळे सर्व रोपांना ते मिळाले नसते व ती खुरटून गेली असती. परंतु, तो शेतकरी अनुभवाने शहाणा झालेला असतो. त्यामुळे हे तंत्र स्वीकारतो.

सागरासारख्या विशाल भारतीय समाजातील जातीपातींनी आपापल्या संकुचित भिंती अधिकाधिक घट्ट करीत बसण्यापेक्षा शेतकऱ्याच्या त्या आळ्यांसारखी भूमिका घेऊन आपल्या प्रत्येक घटकापर्यंत सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या मानवाच्या आणि विकासाच्या विचारांचे पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न केला तर सर्वत्र विकसित व्यक्तींचे मळे फुललेले दिसतील.

या पुस्तकाचा अभ्यास अभ्यासकांना संदर्भग्रंथ म्हणून निश्चितच मोलाचा वाटेल.

श्री. निळकंठ पाटील यांनी अतिशय कष्टपूर्वक हा ग्रंथ तयार केला आहे, असे तो वाचताना सहज जाणवते. ते शासनाच्या गॅझेटिअर विभागात कार्यरत आहेत. त्यामुळे ऐतिहासिक दस्तऐवज, संदर्भ यांचा अभ्यास करून त्यांनी हे संशोधनात्मक लेखन केले आहे, हे जाणवते. इतिहासाचे लेखक म्हणून मान्यता मिळवून देण्याइतके त्यांचे हे लेखन दर्जेदार आहे. त्यांच्या हातून भविष्यातही सातत्याने असे लेखन होत राहो, हीच शुभेच्छा!

लोकसेवक माननीय श्री. मधुकरराव चौधरी,
माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा

✧✦✧

PROLOGUE (Second Edition)

When I was working as Executive Editor and Secretary in the Gazetteers Department, Government of Maharashtra Mr. N. R. Patil was my colleague. He had a flair for research, investigative ability and controlled imagination. Entrust any work to Patil and he would not rest till the work was completed. Perhaps the compendium Lewa Patidar Samaj is witness to what Patil can do. I was reminded of late Setu Madhava Rao Pagdi who complied a grammar for the tribals when he was Commissioner in Hyderabad for tribals. Only persons of that caliber could design and cmplete a work of that kind. Or for that matter, the chapter on people in the Gazetteers where every community is discussed in detail by the British composers giving details not know even to that community. I regard Patil's work as belonging to the same category in regard to the research, investigation, scrutiny, exploration and analysis.

The book places before us not a people scattered over Khandesh and the neighbouring areas owning lands but a vibrant community, institutionalized, with a history behind it and comprising scholars, scientists, intellectuals, educationalists, who have contributed tremendously to the culture and civilization of the country as such. Patil's work on the Lewa Patidars is an investigative research work bringing to the forefront a community till now not known as it should have been. Every chapter of the book is innovative in the sense that it tells something new about the people. Personally so far as I was concerned every chapter was a revelation to me. To being with Patil has given some less known facts dealing with the origin of the term Lewa Patidars. Patil's knowledge of his-

tory is amazing–ancient, mediaeval and modern and he had made excellent use of the sources. To my knowledge no one has made such an indepth study. His inference that the origin of Lewa Patidars could be traced to Prabhu Ramchandra's son Lava and Kush is worth further study and analysis. Then follows some observations akin to the Darwinian theory of the origin of species very rarely done and which even the Britiesh looked upon as cumbersome. The historical background beginning from ancient day till todate where hundreds of references have been given is witness to the ability of Patil to go through the vast material available, sift it, and then collate it as something that every student of history should emulate. The books referred to run in hundred both Sanskrit, vernacular alongwith the languages in which books were available. I really wonder at the capacity of Patil to do so and doing it as and when time permitted him to do so. Every statement made has corroborative evidence and Patil has followed in the steps of great authors from ancient times to modern and he does not fall much short of the authors of Cambridge history, the other great Hindu and Muslium authors and biographers.

However, what impressed me most was Patil's analysis of language and areas of the location of this great community of people and every other aspect of there life such as their language and location of their residence, their deities, their holiday and festivals, their rites and ceremonies, their involvement in *Varkari Sampradaya* and others of a kind, problems like dowry faced by the social organization, men of distinction in the community and their contribution, the people and their culture and their places of pilgrimage. Patil is at his best in collecting the information, collating it magnificently and raising before us a picture of a people who were and are far advanced in every aspect of culture and civilization. Nowhere Patil has allowed his imagination to run riot but there is everywhere a controlled insistence. The basis of the whole thesis Patil has placed before us visualizes a society bereft of classes and castes and Patil wants the whole of the Lewa Patidar society to be a part and parcel of such times to come. In the midst of the confusion and chaos that prevails today, the Lewa Patidars have created something unusual emitting rays of hope that is sure to make the future like a blue cloudless sky where one moon also alone shines, the community being an integral part of the panorama. The thesis abounds in facts and figures which I doubt whether the majority of the Lewas are aware of. Patil

has studied the development of language spoken by the people and shown how in many respects it differs from the language spoken by the masses. Grammer gets a prominent place. It reveals the knowledge of the science of phraselogy as aslo usage, diction, wording, vocabulary, idiom and terminology on the part to Patil. There is also a careful study of census and Patil has put his knowledge of statistics to the best possible use while giving the regional distribution of the Lewas. The information about family names and family deities is also very interesting. Equally illustrative is the information about festivals and ceremonies, which shows the community as part of the whole spectrum of Maharashtra. That oneness with the mainstream becomes most visible when Patil discusses the *Vidhis* and *Sanskaras*, which are a part and parcel of the social life of the people. It shows that these traditions have a long history of their own and the community grew and developed along the same lines as the social organization itself but with a stamp of it own. The credit all goes to Patil in avoiding flamboyant imagination and sticking to facts and figures.

When we come to the cultural aspect, the Lewas are equally if not better informed about the development of language and literature, the *Sampradayas* dealing with *Bhakti, Yoga* and *Dnyan*. The names of the greatest saints of Maharashtra were well known including the *Mahanubhavs* though it is possible that the detailed study of the philosophy of these saints was limited. Patil has shown the courage of dealing with a touchy problem of dowry and has rightly offered his comments.

Patil's thesis is so valuable that is should be in every household as a master piece of record, register, inventory, a file, a calendar, a fine research work. It shows Patil as scholar, interpreter, investigator and the one who has the capacity to scrutinize, analyse, question, study, examine and inspect. Language and expressions are his prime assets. I am proud of that Patil give me the privilege of writing this introduction to a magnificent work. I wish him success in all his future ventures and thanks to the publishers for publishing this scholarly monumental work.

Capt. Dr. B. G. Kunte
Ex. Executive Editor and Secretary
Gazetteers Dept; Govt. of Maharashtra

✧✦✧

प्रस्तावना
तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

श्री. नि.रा. पाटील यांचा व माझा स्नेह जुळला व वाढीस लागला; तो त्यांच्या **'खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाज-एक अन्वयार्थ'** या ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्ताने! मुंबई व परिसर लेवा मंडळ, मुंबई या संस्थेने प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन करावे, यासाठी मंडळाचे सन्माननीय पदाधिकारी व गत पाच दशकांहून अधिक काळ समाजसेवा व समाजप्रबोधनाचे कार्य करण्यात मग्न असलेले श्री. माधवराव चौधरी यांना विनंती करण्यात आली. त्यांनी मंडळाच्या संमतीने प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारून ग्रंथ उत्तम रीतीने प्रकाशित केला. योगायोग असा की, या ग्रंथाची सुधारित तिसरी आवृत्ती प्रकाशित करण्याची जबाबदारी पुन्हा एकदा मुंबई व परिसर लेवा मंडळावर टाकण्यात आली. या वेळीही श्री. माधवराव चौधरी यांनी पुढाकार घेऊन ग्रंथ प्रकाशनाची धुरा सांभाळली. या तिसऱ्या आवृत्तीसाठी मी प्रस्तावना द्यावी, असा आग्रह श्री. नि.रा. पाटील व श्री. माधवराव चौधरी यांनी धरला. पहिल्या आवृत्तीपासून मी या ग्रंथाच्या संपर्कात असल्याने व विषय विवेचन व शुद्धता या दृष्टीने ग्रंथ नजरेखालून गेलेला असल्याने मीही होकार दिला.

श्री. नि.रा. पाटील यांनी एकूण ११ प्रकरणांत ग्रंथाची क्रमवार व सुस्पष्ट अशी विभागणी करून प्रत्येक प्रकरणांच्या शेवटी संदर्भाच्या तळटीपाही दिल्या आहेत. **'लेवा पाटीदार व्युत्पत्ती'** या पहिल्या प्रकरणात श्री. पाटील यांनी खानदेश व बडोदा गॅझेटिअर्सचे संदर्भ देऊन लेवा पाटीदार कष्टाळू, उद्योगप्रिय, बुद्धिमान, शांतताप्रिय, आतिथ्यप्रधान, साधी राहणी असलेले व सणवार, विवाहादींच्या निमित्ताने मुक्तहस्ते खर्च करणारे असल्याचा निर्वाळा देण्यात आला आहे. लेवा पाटीदार हे प्रतिहारांपासून व्युत्पादित असून ते गुजरात - पावागडमार्गे खानदेश - वऱ्हाडात आले असल्याचे लेखकाने नमूद केले आहे. गुजरातमध्ये नर्मदा नदीस रेवा असे नाव आहे. रेवा नदीकाठी स्थायिक झालेल्या प्रतिहारांना रेवा प्रतिहार व अपभ्रंशाने लेवा

पाटीदार असे नाव प्राप्त होणे शक्य आहे, असेही लेखकाने नमूद केले आहे. भगवान रामचंद्र यांची दोन मुले लव व कुश यांच्यापासून अनुक्रमे लेवा व कुशवाह (कडवा) वंशांची निर्मिती झाली, असे मानले तरी रेवा परिसरातील लेवा आणि कडी परगण्यातील कडवा पाटीदार असे मानणे अधिक संयुक्तिक वाटते. या प्रकरणात लेवा पाटीदार शब्दाची यथार्थता पटविण्यासाठी अनेकानेक संदर्भ व दाखले दिले आहेत. आतापर्यंत इतका सखोल अभ्यास झाला असल्याचे दृष्टिपथात नाही. श्री. पाटील यांनी आधीच्या लेखकांच्या विचारांचा मान राखून इतिहास व अन्य ग्रंथांचा आधार घेऊन आपले विचार ठामपणे मांडले आहेत. मानवजातीचा इतिहास नदीच्या प्रवाहासारखा असतो. अनेक ठिकाणी तो मंदावतो, काही ठिकाणी वळणे घेतो, अनेक अडथळे पार करीत पुढे जातो. लेखकाने अनेक पुरावे देऊन लेवा पाटीदारांच्या इतिहासाला अधिक पारदर्शक बनविले आहे.

प्रकरण २ मध्ये **'लेवा पाटीदारांच्या पूर्वजांचा इतिहास'** विशद करून सांगितला आहे. लेवा पाटीदारांचे मूळ पूर्वज आर्य असून त्यांच्या इतिहासाचा प्रारंभ आर्य अयोयुगापासून मानला गेला आहे. आपले पूर्वज इराणमार्गे प्रथम पंजाबात व तेथून राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश व उत्तर भारतात आले. पुढे त्यांच्यातील काही स्थलांतर करीत खानदेश-वऱ्हाडात येऊन स्थायिक झाले असल्याचे लेखकाने म्हटले आहे. पौराणिक कथा व वास्तव इतिहास दोहोंचा लेखकाने सखोल अभ्यास करून लेवा पाटीदारांच्या इतिहासाला बळकटी दिली आहे. वेगवेगळ्या वंशावळीही नामोल्लेखासह सादर केल्या आहेत. याच प्रकरणात लेखकाने रामायण, महाभारत, भागवत आदी पुराणांचा सविस्तर मागोवा घेतला आहे. समाजशास्त्राचा अभ्यास असलेल्या नामवंत विद्वान लेखकांच्या विचारांचा परामर्श घेऊन अत्यंत विस्ताराने आपल्या मूळ पूर्वजांच्या स्थलांतरणाचा रोचक इतिहासही दिला आहे. प्रस्तुत ग्रंथातील हे प्रकरण विस्तृत व तथ्यान्वेषी असून अत्यंत महत्त्वाचे आहे. अभ्यासकांनी या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करावा. लेवा पाटीदारांचा लव-कुशाशी संबंध जोडला जात असला तरी मानववंशशास्त्रानुसार तो प्रतिहारांच्या इतिहासाशी जोडणे लेखकाला अधिक सयुक्तिक वाटते. याच प्रकरणात अंतर्विवाहीपणा दाखवून देताना तत्कालीन परिस्थितीनुसार समाजाचे झालेले विघटन व बेटी-रोटी व्यवहाराविषयी प्रतिपादन केले आहे. काळानुरूप यात बदल घडत आहेत. समाजातील हे भेदाभेद दूर सारून सर्वांनी एकत्र आले पाहिजे, अशी इच्छा लेखकाने व्यक्त केली आहे. खरेतर, ती काळाची गरज असून समाजहिताची गोष्ट आहे.

'लेवा गणबोली व लेवा गणप्रदेश' हे तिसरे प्रकरणही महत्त्वाचे आहे. लेवा समाजाची भाषा ही अहिराणी व वऱ्हाडी या दोन भाषांच्या मिश्रणातून तयार झालेली लेवा गणबोली आहे. घाटोळी-वऱ्हाडी आणि खानदेशी-अहिराणी या

बोलीभाषांचा मोठा पगडा असलेली वऱ्हाडी-खानदेशी वा लेवा गणबोली निर्माण झाली. या भाषेतून विपुल साहित्यनिर्मिती झाली आहे. बहिणाबाईंपासून ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्यापर्यंत साहित्यिकांची मांदियाळी लेवा पाटीदार समाजात दिसून येते. याच प्रकरणात लेखकाने भाषेतील उच्चारविशेष (वर्णप्रक्रिया) देऊन लेवा गणबोलीचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले आहे. लेवा गणबोलीचे व्याकरण सोदाहरण स्पष्ट करून या भाषेचे वेगळेपण दाखवून दिले आहे. मराठी, वऱ्हाडी व लेवा गणबोली यांच्यातील अनेक क्रियावाचक शब्दांची तुलनात्मक यादीही दिली आहे. दैनंदिन व्यवहारात वापरले जाणारे शब्द व अन्य भाषांत आलेले पर्यायी शब्दही देण्यात आले आहेत लेवा गणबोलीतील प्रचलित शब्द वस्तू, कृषी, घर-संसार, आहार अशी विभागणी करून देण्यात आले आहेत. लेवा गणप्रदेशाची व्याप्ती व विस्तार सांगून अक्षांश-रेखांश आणि क्षेत्रफळासह लेवा गणप्रदेशातील गावांची नामावली दिली आहे.

चौथे प्रकरण **'कुळे, कुलदेवता व गोत्रे'** यासंदर्भात लिहिले आहे. धार्मिक विधी करतानाही गोत्रोच्चार केला जातो. सगोत्र विवाह निषिद्ध मानला गेला आहे. गोत्रासंबंधी मतमतांतरे असल्याचे लेखकानेही मान्य केले आहे. पिंड, कूळ, कुळे याविषयी माहिती देऊन लेवा पाटीदारांत प्रचलित आडनावांची रचना कशी झाली आहे, याचे विवरण सोदाहरण दिले आहे. आडनावांनुसार काही कुलदेवतांचाही उल्लेख केला आहे. लेवा पाटीदार हे खंडोबा-म्हाळसा या कुलदैवतांना मानतात. म्हाळसेला भवानी मानल्याने भवानीची विविध रूपेही पूजनीय मानली आहेत. विशेषतः मनुदेवी, निंबादेवी, रेणुकादेवी आदींचा सन्मानपूर्वक उल्लेख केला आहे. प्रत्येक गोत्राची माहिती ससंदर्भ दिली आहे. हे करीत असताना लेखकाने वेद, पुराणांचा हवाला दिला आहे.

प्रकरण ५ मध्ये **लेवा पाटीदार साजरे करीत असलेल्या सण-उत्सवांचा** सविस्तर आढावा घेतला आहे. त्यात मुंजे, रोटाचा सण, भुलाबाई, भालदेव, देवाचा दिवस याविषयी प्रामाणिक माहिती दिली आहे. शिवाय, सर्वसमावेशक असा दसरा, संक्रांत, होळी, अक्षयतृतीया आदींचे विस्तारपूर्वक वर्णन केले आहे.

'विधी आणि संस्कार' या नावाने सहावे प्रकरण आले आहे. लेवा पाटीदारांचे धार्मिक जीवन, संस्कारनामक विविध धार्मिक विधी आदी परंपरांभोवती गुंफलेले असल्याचे नमूद करून १६ संस्कार ग्राह्य धरले आहेत. त्यातील पाचवी, जावळ, कान टोचणे, उपनयन (मुंज) यांना प्राधान्य देण्यात आले आहे. विवाह संस्काराविषयी विस्ताराने लिहिले असून त्यानिमित्ताने लालगंध, बस्ता, दागदागिने, वानं, मांडव, तोरणताटी, हळद, लग्नचिठ्ठी, शेवंती, वरप्रस्थान अशा विविध विधींचे वर्णन आले आहे. त्यानुषंगाने मंगलाष्टके, कन्यादान, सप्तपदी इ.चाही उल्लेख केला आहे.

प्रकरण ७ मध्ये **'उपासना पंथ'** शीर्षकांतर्गत लेवा पाटीदार समाजात प्रचलित वारकरी, महानुभाव, सत्पंथी व स्वामिनारायण या चार पंथांचा विस्तारपूर्वक ऊहापोह केला आहे. वारकरी संप्रदायाचे भक्तिसंप्रदायातील मध्यवर्ती स्थान मान्य करून या संप्रदायाचा प्रारंभ पुंडलिकापासून झाल्याचे नमूद केले आहे. ज्ञानदेवांनी पाया रचून नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी भक्तिसंप्रदायाचे मंदिर पूर्णात्वास नेल्याचे संत बहिणाबाईंनी आपल्या अभंगात म्हटले आहे. ज्ञानदेव व नामदेव यांचा एक कालखंड मानला आहे. नंतर, भानुदास व एकनाथ यांचा कालखंड विचारात घेतला आहे. पुढे तुकारामाचा काळ व तुकारामानंतरचा काळ अशी विभागणी करण्यात आली आहे. लेवा पाटीदारांनी अंगभूत केलेल्या वारकरी संप्रदायात लेवा पाटीदार ह.भ.प. महाराजांचे नामनिर्देश करून त्यांच्या योगदानाची माहिती दिली आहे. नंतर, महानुभाव संप्रदायाचा व त्यातील तत्त्वज्ञानाविषयी उल्लेख करण्यात आला आहे. चक्रधरस्वामी व संप्रदायातील अन्य प्रतिष्ठित आचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचाही नामोल्लेख केला आहे. स्वामिनारायण संप्रदाय हा एक वैष्णव भक्तिपंथ आहे. या पंथात संयमावर अधिक भर देण्यात येतो. स्वामिनारायण हेच या संप्रदायाचे आराध्यदैवत आहे. या संप्रदायाचे तत्त्वज्ञान, पंथाचे वाङ्मय व मंदिरे याविषयी आवश्यक ते विवरण दिले आहे. सत्पंथ संप्रदाय हा गुजराती मधील उपासना पंथ महाराष्ट्रातील काही भागांत आढळतो. काही लेवा पाटीदारांनी या संप्रदायाचे अनुयायित्व स्वीकारले आहे. फैजपूर येथे सत्पंथी, लोकांचे मंदिर आहे. भगवद्गीता, भागवत, रामायण या ग्रंथांना सत्पंथी लोक पवित्र मानतात. सत्य बोलणारे म्हणून सत्पंथी, असा अर्थ लावण्यात आला आहे. शेवटी चांगदेव, मुक्ताबाईंचा नाथसंप्रदायी उपासना मार्ग याचीही माहिती दिली आहे.

प्रकरण ८ मध्ये **'सामाजिक संघटन व हुंडा समस्या'** याविषयी माहिती देण्यात आली आहे. त्या निमित्ताने भोरगाव पंचायत या संस्थेच्या जडणघडणीचा व कार्यप्रणालीचा आढावा घेण्यात आला आहे. सध्या दरवर्षी वधू-वर परिचय मेळावे भरविले जातात. विवाहोत्सुक तरुण-तरुणींना एक-दोन मिनिटे बोलण्याची संधी मिळते. त्यातही कमी शिक्षितांना वाव मिळत नाही. भाषणबाजी व सत्कारांना मात्र तास-दोन तास दिले जातात. लेखकाला हा प्रकार योग्य वाटत नाही. हुंडा ही लेवा पाटीदार समाजाला लागलेली कीड आहे. त्याचबरोबर हल्लीच्या मुलामुलींना घरातील वृद्ध मंडळींबद्दल वाटणारी अनास्थाही चिंतेची बाब आहे. शेतकरी व व्यावसायिकांना मुली नाकारल्या जातात व नाइलाजाने जातकुळाची काहीही माहिती नसलेल्या अन्य समाजातील मुली घरात आणाव्या लागतात, हे चित्र भयावह आहे.

'समाजरत्ने' या नवव्या प्रकरणात समाजातील विविध क्षेत्रांत ज्यांनी आपल्या स्वकर्तृत्वाने विकास साधून समाजोन्नतीला हातभार लावला आहे; त्या व्यक्तींचा

थोडक्यात परिचय देण्यात आला आहे. यात सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, साहित्यिक व कला-क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा आणि त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. समाजात हजारोंच्या संख्येने आपापल्या क्षेत्रात लेवा पाटीदार स्त्री-पुरुष गौरवास पात्र आहेत. असे असले तरी इतिहाससदृश या ग्रंथात सर्वांचा परिचय देणे केवळ अशक्य आहे. ज्यांची नावे यात आली आहेत, तेच फक्त लेवारत्ने व तत्सम योग्यतेचे लेवाबांधव लेवारत्ने नाहीत काय, असा युक्तिवाद होणे संभव आहे. तरीपण, ग्रंथमर्यादा व लेखकाच्याही मर्यादा समजून घेतल्या पाहिजेत. लेखकाच्या समजुतीनुसार व त्यांना मिळालेल्या माहितीनुसार प्रस्तुत प्रकरणात १२५ लेवारत्नांची नावे व परिचय आला आहे. पुढील आवृत्तीत आणखी काहींचा समावेश होऊ शकेल, असा आशावाद बाळगायला हवा. या प्रकरणाच्या शेवटी उपलब्ध झालेल्या ३७२ लेवा पाटीदार स्वातंत्र्यसैनिकांची प्रतीकात्मक यादीही देण्यात आली आहे.

'लेवा जनजीवन' नावाने लिहिलेल्या प्रकरण १० मध्ये लेवा गणप्रदेशातील लेवा पाटीदारांचा मुख्य व्यवसाय शेती असल्याचे नमूद करून इ.स. १३०० पूर्वी व नंतर या समाजाची झालेली वाटचाल देण्यात आली आहे. ही माहिती रोचक व वाचनीय आहे. त्यातून लेवा पाटीदारांनी कोठेकोठे व कसाकसा जम बसविला, त्यातून त्यांचे राजकीय, सामाजिक व साहित्य क्षेत्रातील योगदानही पाहावयास मिळते. एखाद्या जातीचा इतिहास हा समकालीन इतिहासाहून फारसा वेगळा असत नाही. किंबहुना, समकालीन इतिहासाचे पडसाद जातीच्या इतिहासावर पडतातच. त्यामुळे मुघल राजे, पेशवाईचा काळ, ब्रिटिश राजवट यांचा भला-बुरा प्रभाव आपल्या समाजावर पडणे क्रमप्राप्तच म्हणावे लागेल. वेगवेगळ्या राजकीय स्थित्यंतरानंतरही लेवा पाटीदार समाजाने केवळ आपले अस्तित्वच राखले नाही तर आपली गुणवत्ता सिद्ध करून नावलौकिकही मिळविला, ही बाब भूषणावह आहे.

प्रकरण ११ मध्ये **'लेवा पाटीदारांची तीर्थस्थाने व पर्यटन केंद्रे'** यांची सविस्तर माहिती दिली आहे. तीर्थस्थान चांगदेव-मुक्ताबाई याविषयी लिहिताना लेखकाने स्थळ वैशिष्ट्याबरोबरच चांगदेव व मुक्ताबाई यांच्या कार्याचा, तत्त्वज्ञानाचा ससंदर्भ इतिहास दिला आहे. त्यासाठी वेगवेगळ्या ग्रंथांचे संदर्भ देऊन या दोन्ही व्यक्तिमत्त्वांचा परिचय घडविला आहे. त्यामुळे समज-गैरसमजांचे निराकरण झाले आहे. चांगदेव हे ठिकाण मुक्ताबाईंचे शिष्य हठयोगी चांगदेव यांची तपोभूमी व कर्मभूमी असून ते एक तीर्थस्थान म्हणून नावारूपाला आले. मेहूण या गावी मुक्ताबाईचे मंदिर आहे. याच ठिकाणी मुक्ताबाईंनी आपली इहलोकीची यात्रा संपविली; त्यामुळे या स्थळालाही तीर्थक्षेत्राचा मान मिळाला आहे.

पर्यटन केंद्रांत पालचे स्थान महत्त्वाचे मानावे लागेल. सातपुड्यातील एका पठारावर समुद्रसपाटीपासून २,७०० फूट उंचीवर वसलेले असल्यामुळे ते एक थंड

हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणाशी लेवा पाटीदारांचा घनिष्ठ संबंध असल्याचे लेखकाने दाखवून दिले आहे. दुसरे केंद्र वाघळी हे गाव होय. हे गाव अतिप्राचीन तर आहेच; पण या ठिकाणी लेवा पाटीदारांची खूप मोठी वस्तीही आहे. मुघईदेवीचे मंदिर व महानुभावांचे कृष्ण मंदिर यामुळे या गावांना तीर्थस्थानाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. श्री. नि.रा. पाटील यांनी प्रस्तुत ग्रंथनिर्मितीसाठी केलेले कठोर परिश्रम व संदर्भग्रंथांचे सखोल अध्ययन करून या ग्रंथाला प्रदान केलेली गुणवत्ता वाखाणण्याजोगी आहे. यापूर्वी श्री. वा.ह. पाटील (तळवेलकर) व श्री. शं.वि. पाटील (दुधलगावकर) यांनी लेवा पाटीदारांचा इतिहास लिहिण्याचा श्रीगणेशा केला. तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात या दोघांचे कार्य फारच मोलाचे ठरते. त्यांच्या कार्याचा मागोवा घेत श्री. नि.रा. पाटलांनी स्वतःच्या संशोधक वृत्तीतून वेद, पुराणे, धर्मग्रंथ यांच्या जोडीला अन्य लेखकांचे संशोधनात्मक लेख, शब्दकोश व गॅझेटिअर्सचे संदर्भ घेऊन आपला ग्रंथ अधिकाधिक तथ्याधिष्ठित बनविण्याचा प्रयत्न केला आहे. आजमितीला तरी हा ग्रंथ अजोड म्हणावा लागेल. हा समाजापुरता मर्यादित न राहता समाजशास्त्राच्या सर्व अभ्यासकांना संदर्भग्रंथ म्हणून वाचता येईल.

श्री. नि.रा. पाटील यांची लेखणी बहुमुखी आहे. त्यांनी लिहिलेला **'लेवा गणबोली कोश'** त्यांची अक्षय कलाकृती आहे. **लेवा बोलीतील बहिणाबाईची गाणी-रसास्वाद** हे पुस्तक त्यांच्या भाषासौंदर्याचा व रसिकतेचा उत्तम नमुना आहे. महाराष्ट्रातील किल्ले, हेमाडपंती मंदिरे यावरील संशोधनात्मक पुस्तके त्यांच्या अभ्यासक व संशोधक मनोवृत्तीची साक्ष पटवितात. वाचताना, लिहिताना डोळ्यांना होणारा त्रास, रक्तदाब व रक्तशर्करेचा वाढता आलेख या सर्वांकडे दुर्लक्ष करून ते दिवसरात्र लेखनात गर्क असतात. या कार्यात त्यांची सौभाग्यवती सौ. ऊर्मिलाताईंचा सहलेखिका म्हणून सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या हातून अशीच साहित्यनिर्मिती होत राहावी म्हणून त्यांना दीर्घायुष्य प्राप्त व्हावे, ही ईश्वरचरणी प्रार्थना! श्री. नि.रा. पाटील यांचा हा ग्रंथ घराघरांत व शाळा-कॉलेजांत जाऊन पोहोचावा, ही सदिच्छा! येथे आवर्जुन उल्लेख करावा लागेल तो महाराष्ट्राचे महसूल व कृषी मंत्री आणि लेवा समाजाचे मानबिंदू, लेवारत्न, मा. एकनाथराव खडसे यांचा! प्रस्तुत ग्रंथ समाजातील बंधूभगिनीपर्यंत पोहचावा यासाठी उत्स्फूर्तपणे भरघोस आर्थिक साहय्य देऊन त्यांनी सहकार्य केले त्याबद्दल विनम्र अभिवादन! शेवटी, ज्यांनी या ग्रंथाला मूर्त स्वरूप दिले. त्या मुंबई व परिसर लेवा मंडळाचे, श्री. माधवराव चौधरींचे व सायली प्रिंटर्सचे श्री. राजाभाऊ अन्नदाते यांचे मनःपूर्वक आभार!

शुभंभवतु!

रामनवमी चैत्र शके १९३७ — **- प्रा. राम सोनाजी नेमाडे**

दिनांक : २८ मार्च २०१५ — **भ्रमणध्वनी : ८७६७८०३५३५**

लेखकाचे मनोगत

'खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाज - एक अन्वयार्थ' या ग्रंथाची सुधारित आवृत्ती वाचकांसमोर आणताना मला मनस्वी आनंद होत आहे. उमविचे कुलसचिव डॉ. आर.एच. गुप्ता म्हणतात, ''इतिहास हा केवळ विषय नाही. त्याच्याशी संस्कृती आणि कार्यपद्धती निगडित असते.'' तसेच लेवा पाटीदारांच्या इतिहासाशी त्यांची संस्कृती व कार्यपद्धती निगडित आहे. लेवा पाटीदार समाज पूर्व खानदेशातील मध्य-पूर्व भागात व बुलडाणा जिल्ह्यातील पश्चिमेकडील काही भागांतच का आहे, हा समाज कोठून आला, लेवा पाटीदार हे कोण... इत्यादी प्रश्न महाविद्यालयात प्रवेश केल्यावर भेडसावू लागले. महाविद्यालयात नवीन मित्र लाभले. जिज्ञासा म्हणून मित्र कोण कोठून आला, त्या भागातील रहिवासी कोण... इत्यादी प्रश्न विचारतातच. मी वर्धा-नागपूरला शिकत असताना अज्ञानामुळे काही मित्र तर म्हणू लागले की, लेवा पाटीदारनामक जातजमातच नाही. तेव्हापासून उत्सुकता वाढली. तशातच, साळवे-निशानचा पारधी हत्याकांड खटला वर्तमानपत्रांमध्ये गाजू लागला व देवरामभाऊ नारखेडे या पापभीरू लेवा पाटीदाराचे नाव परिचित झाले. त्यानिमित्ताने माननीय आचार्य काकासाहेब कालेलकरांच्या **लोकसत्ता**मधील प्रदीर्घ लेखात लेवा पाटीदार समाजाविषयी बरीच चांगली माहिती छापून आली. तो लेख मी सांभाळून ठेवू शकलो नाही. परंतु, त्यावरून लोहपुरुष वल्लभभाई पटेल व त्यांचे बंधू थोर स्वातंत्र्यसेनानी विठ्ठलभाई पटेल हे लेवा पाटीदारच असल्याचे समजले आणि खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार सुमारे पाच-सहाशे वर्षांपूर्वी गुजरातमधून स्थलांतरित झाले आहेत, हेही समजले. सुदैवाने गॅझेटिअर विभागात नोकरी लागली. तरीही, उपरोक्त प्रश्नांची उत्तरे सापडत नव्हती. **जळगाव गॅझेटिअर**चे काम १९८४-

८५ मध्ये हाती घेण्यात आले आणि 'लोक' या प्रकरणाचे काम डॉ. न.ब. पाटील यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यासाठी जिल्ह्यातील जाती-जमातींच्या सर्वेक्षणाचे काम माझ्याकडे सोपविण्यात आले. त्यानिमित्ताने गॅझेटिअरचे तत्कालीन कार्यकारी संपादक व सचिव डॉ. कि.का. चौधरी व डॉ. न.ब. पाटील यांच्याबरोबर जळगाव जिल्ह्यातील संपूर्ण जाती-जमातींचे सर्वेक्षण करण्याचा योग आला. इतर समाजांविषयी बरेच साहित्य प्रकाशित आहे. परंतु, लेवा पाटीदार समाजाविषयी विशेष असे काहीच साहित्य वा ग्रंथ प्रकाशित नव्हता. श्री. रा.वा. पाटील यांनी दोन-चार लहान अंक प्रकाशित केले होते. परंतु, त्यातून समाधान होत नव्हते. लेवा पाटीदारांची माहिती घेण्यासाठी चोपड्याच्या भाटांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्याकडे बहुतांश लेवा पाटीदार वंशांच्या वंशावळी जतन करून ठेवल्या आहेत. त्यातील काही वंशांचा १४८४ पर्यंत माग काढता येणे शक्य झाले. म्हणजे, मेहमूद बेगडाच्या चांपानेर - पावागड चढाईपर्यंतचा मागोवा घेता आला. परंतु, त्याआधीच्या वंशांचा इतिहास हा पौराणिक कथांवर आधारित सांगण्यात आला व लेवा पाटीदारांचे मूळ भगवान रामचंद्र यांचा महापराक्रमी पुत्र 'लव' (मूळपुरुष म्हणून) याच्याशी जोडण्यात आले. भाटांद्वारे लेवा पाटीदारांचा जसा लवाशी संबंध जोडण्यात येतो; तसाच लेवा गुजरांचाही जोडण्यात येतो. राजपुतांचा संबंधही रामायण-महाभारतकालीन व्यक्तींशी जोडण्यात येतो. म्हणजे, या सर्वांचे पूर्वज एकच असले पाहिजेत, हा विचार मनात मूळ धरू लागला. **जळगाव गॅझेटिअर**च्या संकलनाचे काम सुरू असतानाच एके दिवशी थोर इतिहासकार देवीसिंह चौहान हे गॅझेटिअर विभागात आले आणि त्यांनी डॉ. चौधरींना (मीही त्यावेळी उपस्थित होतो) छातीठोकपणे सांगितले की, लेवा पाटीदार हे गुर्जरच असून ते इराणमार्गे हिंदुस्थानात आले आहेत. तेव्हापासून लेवा पाटीदारांबाबत लिहावे असे विचार मनात घर करू लागले. सन १९९९ मध्ये लेवा पाटीदारांमधील जिज्ञासू व कष्टाळू इतिहासकार (दुधलगाव बुा, मलकापूर तहसील) श्री. शंकर विठोबा पाटील यांचे **लेवा पाटीदारांचा इतिहास** हे पुस्तक हाती लागले नि खूप आनंद झाला. श्री. शंकरकाकांनी घेतलेल्या परिश्रमाबाबत त्यांचे कौतुकही वाटले. तरीही, त्यांनी परिश्रमपूर्वक संकलित केलेली माहिती केवळ मांडणीचे संपादनतंत्र न जमल्याने आणि मानववंशशास्त्रीयदृष्ट्या इतिहासाच्या अभावाने वाचकांच्या मनाची घट्ट पकड घेऊ शकत नाही, हे काकांनीही मान्य केले आहे. त्याशिवाय, त्यांच्या संशोधनात व माझ्या संशोधनात मूलभूत स्वरूपाचा फरक आहे. मी मानववंशशास्त्रज्ञांच्या संशोधनाचा आधार घेण्याचा खटाटोप केला आहे. काही मतभेद असूनही मी प्रांजळपणे कबूल करतो की, या पुस्तकलेखनाची प्रेरणा मी शंकरकाकांकडून आणि मला गुरुस्थानी असलेल्या डॉ. के.के. चौधरी यांच्याकडून घेतली आहे.

डॉ. देवीसिंह चौहान यांच्याव्यतिरिक्त ए.ई. नेल्सन (संपा. **बुलढाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**, १९१०), टी.व्ही. पर्वते (**बुलडाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**च्या १९७४ च्या सुधारित इंग्रजी आवृत्तीमधील योगदान) यांनीही लेवा पाटीदार गुर्जर वंशाचे असल्याचे नमूद केले आहे. डॉ. इरावती कर्वेही त्यास दुजोरा देतात. गुर्जर लोक हिंदुस्थानात प्रथम सप्तसिंधू देशात (पंजाब) आलेत. तेथून ते राजस्थान, गुजरात, पावागडमार्गे नर्मदा खोऱ्यातून व पुढे असिर खिंडीतून खानदेशात उतरले, याबाबतचे विवेचन या पुस्तकात केलेले आहे. हे लोक जर दुसऱ्या ते पाचव्या शतकांत इराणमधून (पार्थिया = पार्शिया) हिंदुस्थानात आले; तर ते पूर्वी कोण होते, कोणाबरोबर आले, कसे व का, याबाबतचे विवेचन या पुस्तकात देण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहासाचा विद्यार्थी नसल्यामुळे हे लेखन लेवा पाटीदारांच्या इतिहासाच्या पूर्णत्वाकडे नेऊ शकलो नाही. तसा माझा दावाही नाही. त्यात ऐतिहासिक कालक्रम, घटना, त्रुटी संभवनीय आहेत. तरीही, समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना ज्यांना लेवा पाटीदार समाजाबाबत अभ्यास करावयाचा आहे, त्यांना दिशा मिळू शकेल; असा विश्‍वास वाटतो, तसा प्रयत्न कोणी केल्यास तो समाजेतिहासावर नवीन प्रकाश टाकू शकेल.

या पुस्तकात लेवा पाटीदार व्युत्पत्ती, लेवा पाटीदारांचा इतिहास, लेवा पाटीदारांची बोलीभाषा व लेवा पाटीदार राहत असलेला प्रदेश, त्यातील गावे, त्यांचे अक्षांश-रेखांश व क्षेत्रफळ, कुळे व कुलदेवता, लेवा पाटीदारांचे सण व उत्सव, लेवा पाटीदारांचे विधी व संस्कार, उपासना पंथ, सामाजिक संघटन, साहित्य क्षेत्र व स्वातंत्र्यसंग्रामात योगदान असलेल्या व समाजसेवा करणाऱ्या समाजमान्य व्यक्ती, जनजीवन आणि लेवा पाटीदार राहत असलेल्या प्रदेशातील तीर्थस्थान (चांगदेव-मुक्ताबाई) व पर्यटनस्थळ (पाल) याबाबत माहिती दिली आहे.

आधी पाटीदार मग लेवा यावरून व्युत्पत्ती झालेली ही जात! क्षत्रप किंवा सामंत याअर्थी प्रतिहार म्हणजे एक प्रकारे Revenue Officer यावरून पाटीदार होत. प्रतिहाराचा अपभ्रंश पाटीदार हे सूत्र पकडल्यास गुर्जर प्रतिहारांनी प्रथम सामंत (मंत्री) म्हणून राज्यकारभार पाहिला. मराठा काळातील पेशव्यांप्रमाणेच त्यांनी सत्ता स्थापन केली. सातव्या, आठव्या व नवव्या शतकांत तर ते सामर्थ्यशाली होते. त्यांच्यात नवव्या शतकाच्या उत्तरार्धात पराक्रमी भोज राजा व दहाव्या शतकाच्या पूर्वार्धात त्याचा मुलगा महापराक्रमी महिंद्रपाल हे होऊन गेलेत. त्यांच्या काळात प्रतिहारांचा राज्यविस्तार गुजरातच्या अरबी समुद्रापासून वंगच्या उपसागरापर्यंत व सातपुड्याच्या वरील माळव्यापासून हिमाचलपर्यंत होता. असे हे प्रतिहार वा पाटीदार माळव्यात व नंतर गुजरातमध्ये रेवा नदीकाठी (नर्मदा नदी) राहिल्याने रेवा नदीकाठचे पाटीदार म्हणून लेवा पाटीदार झाले. हिंदुस्थानवरील मुसलमानांचे आक्रमण आणि गुजरात सुलतानांचा अत्याचार यामुळे हे लोक पावागडमार्गे नर्मदा खोऱ्यातून व पुढे

बऱ्हाणपूरजवळील असिर खिंडीतून खानदेशात आले. खानदेशात फारुकी हे मुस्लिम राजे असूनही त्यांच्या राजवटीत शांतता व स्थैर्य लाभले. मुघल काळातही स्थैर्य लाभले. पेशवा राजवटीत मात्र या समाजास चौथाई व पेंढाऱ्यापासून खूप त्रास झाला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत गुण्यागोविंदाने राहणाऱ्या या जातीत काही मतभेद व ब्रिटिशनीतीमुळे पोटभेद निर्माण झालेत. त्याबाबतचे सविस्तर विवेचन या पुस्तकात आणले आहे.

खानदेश-वऱ्हाडात आल्यावर इकडची भाषा स्वीकृत करताना वऱ्हाडी अहिराणीच्या मिश्रणाने स्वयंस्फूर्त निर्माण झालेली लेवा गणबोली; जिची भाषाशास्त्रज्ञ ग्रिअरसन याने दखल घेतलेली नाही, तिच्याबाबत थोडक्यात विवेचन या पुस्तकात दिलेले आहे. बहिणाबाई, भानूसर तद्वतच विदर्भाची बहिणाबाई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रुक्मिणीबाईंनी या लेवा गणबोलीस मराठी साहित्यात मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. लेवा पाटीदार स्थित असलेल्या लेवा गणप्रदेशातील गावांचे अक्षांश-रेखांश दिल्याने कुंडलीवर विश्वास असणाऱ्यांना अचूक कुंडली काढण्यासाठी मदत होईल.

सदरहू ग्रंथाच्या हस्तलिखिताच्या वाचनासाठी सन्माननीय श्री. मधुकररावजी चौधरी, समाजातील ज्येष्ठ साहित्यिक, पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे, डॉ. के.के. चौधरी, प्रा. भानूसर, भाषाप्रभू प्रा. राम नेमाडे, प्रा. एल.एस. भोळे, प्रा. के.जी. भोळे, श्री. एच.के. नेमाडे, कै. लि.ध. चौधरी (खिरोदा) यांनी आपला बहुमोल वेळ काढून मौलिक सूचना केल्यात. त्या सर्वांचा ऋणनिर्देश केल्याशिवाय या ग्रंथास पूर्णत्व येणार नाही. महाराष्ट्र गॅझेटिअर प्रणालीस अथक संशोधन, परिश्रमांनी ज्यांनी आधुनिक रूप दिले; त्या चिकित्सक, व्यासंगी व अभ्यासू डॉ. के.के. चौधरी यांच्या हाताखाली मी २६ वर्षे काम केले असून त्यांच्या कार्यपद्धतीचा जवळून अभ्यास झाल्याने पुस्तकलेखनात मला फायदा झाला आहे.

सन्माननीय लोकसेवक श्री. मधुकररावजी चौधरी यांचा अभ्यास व विद्वत्ता सर्वश्रुतच आहे. अशा थोर व्यक्तीची पुस्तकास प्रस्तावना लाभल्याने पुस्तकाचे मूल्य सर्वार्थाने वाढले आहे. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्यांचा मी खूप-खूप आभारी असून हे ऋण कसे व्यक्त करावे-फेडावे, हा मोठा प्रश्नच आहे. पुस्तकाचे सखोल वाचन करून, आवश्यक ठिकाणी मौलिक सूचना देऊन त्यांनी या पुस्तकाची गुणवत्ताही वाढविली आहे. या आकाशाएवढे उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या थोर संताची माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या पुस्तकास प्रस्तावना लाभेल काय, ही भीती होतीच. परंतु, या समाजकर्तुमकर्ता थोराने ती निरर्थक ठरवून हृदयविकाराचा त्रास असतानाही आस्थेने चौकशी केली. मी धन्य झालो. सदर पुस्तकाची प्रस्तावना मिळवून देण्यासाठी श्री. प्रभात चौधरी यांनी अथक प्रयत्न केलेत. त्यांचाही मी खूप

आभारी आहे. तिसऱ्या आवृत्तीला प्रा. राम नेमाडे यांनी प्रस्तावना द्यावी अशी त्यांना विनंती करताच त्यांनी ग्रंथातील सर्व प्रकरणांचा क्रमवार आढावा घेत दीर्घ प्रस्तावना लिहून दिली. पहिल्या आवृत्तीच्या निर्मीतीपासूनच त्यांचा या ग्रंथाशी संबंध आल्याने त्यांनी लिहिलेली प्रस्तावना अधिक मोलाची वाटते. त्यांचाही मी ऋणी आहे.

प्रथमावृत्तीच्या प्रकाशनानंतर सदर ग्रंथाची मानार्थ प्रत मी डॉ. के.के. चौधरी यांच्या आधीचे गॅझेटिअर विभागाचे संपादक कॅप्टन डॉ. भ.ग. कुंटे यांना भेट दिली. त्यांनी संपूर्ण पुस्तक वाचून काढले. त्यांना माझे विचार व लेखन आवडल्याने द्वितीयावृत्तीसाठी अतिशय प्रभावी असे Prologue लिहून दिले. डॉ. कुंटे हेसुद्धा मला गुरुस्थानी असून गॅझेटिअरमध्ये संशोधन व लेखनाचा पाया त्यांनी घालून दिला आहे. डॉ. कुंटेंसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या विद्वान लेखकाकडून माझ्या या पुस्तकास उत्कृष्ट Prologue मिळाला. हा त्यांनी माझ्या कामाचा केलेला गौरव मानतो. डॉ. कुंटे यांचे ऋणनिर्देशन न करणे कृतघ्नपणाचे ठरेल.

सदर ग्रंथासाठी सक्रिय मदत व सहकार्य केले ते माझे मित्र व माझे वरिष्ठ श्री. प्र.नि. नारखेडे, गॅझेटिअरचे सहसंपादक यांनी! जीवनात बऱ्याचदा अति नैराश्य येते. माझेही असेच काही झाले होते. यातून बाहेर पडण्याचा उत्तम उपाय म्हणून प्रस्तुत ग्रंथलेखन व त्यासाठी वाचनात वेळ घालवावा, असा अगदी योग्य सल्ला व मदत त्यांनी केली. त्यांचाही मी खूप आभारी आहे. या ग्रंथातील प्रकरण - ४, ५, ६ आणि ७ च्या लेखनात माझी पत्नी सौ. ऊर्मिला पाटील हिची सहयोगी लेखिका म्हणून मोलाची मदत झाली आहे. माझी पत्नी सौ. ऊर्मिला पाटील, मुली सौ. स्वाती विवेक चौधरी, सौ. कीर्ती सुनील बेंडाळे, सौ. प्रीती राकेश बेंडाळे आणि सौ. तृप्ती सचिन चौधरी यांनी माझे मनोधैर्य वाढवून ग्रंथलेखनासाठी प्रोत्साहन दिले. त्यांचाही मी खूप आभारी आहे. या ग्रंथातील लेवा गणबोली, सण व उत्सव आणि विधी व संस्कार प्रकरणलेखनात माझी पत्नी सौ. ऊर्मिला पाटील हिचे मोठे योगदान प्राप्त झाले आहे.

या ग्रंथ प्रकाशनास खरा नैतिक पाठिंबा दिला तो प्रा. राम नेमाडे यांनी! हा ग्रंथ एखाद्या मंडळाने प्रकाशित करावा, असे प्रा. राम नेमाडे यांनी अनेक जणांजवळ बोलून दाखविले आणि कोणत्याही मंडळाने तो प्रकाशित केला नाही तर त्यांनी स्वतः प्रकाशित करण्याची तयारी ठेवली होती. प्रा. राम नेमाडे यांचे कितीही आभार मानले तरी ते कमी ठरतील. या पुस्तकाच्या प्रथम प्रकाशनासाठी विकास मंडळ-मुलुंड, विशेषतः श्री. व्ही.एम. वारके व श्री. एम.बी. चौधरी यांनी खूप प्रयत्न केलेत. तथापि, काही अडचणींमुळे विकास मंडळास हे पुस्तक प्रकाशित करणे शक्य झाले नाही. मी विकास मंडळ-मुलुंड, विशेषतः श्री. व्ही.एम. वारके

व श्री. एम.बी. चौधरी यांचाही आभारी आहे. श्री. श्यामकांत मोरे, संशोधन अधिकारी, गॅझेटिअर्स विभाग यांनी तिसऱ्या आवृत्तीचे प्रूफ करेक्शन करून मोलाची मदत केली. त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

अखेरीस, मुंबई व परिसर लेवा मंडळाने विशेषकरून श्री. माधवराव चौधरी यांनी या ग्रंथाच्या प्रथमावृत्तीची जबाबदारी स्वीकारली व अल्पावधीत ग्रंथ प्रकाशित केला, त्याबद्दल मी मुंबई व परिसर लेवा मंडळाचा खूप आभारी आहे.

या ग्रंथाच्या प्रथमावृत्तीच्या प्रती अल्पावधीतच संपल्या. जळगाव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ विशेषकरून या मंडळाचे अध्यक्ष श्री. अनिल श्रीधर बोरोले यांनी या ग्रंथाच्या सुधारित दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली. दुसरी आवृत्ती काढताना काही नवीन माहितीही समाविष्ट करण्यात आली आहे. काही समाजरत्नांचीही माहिती आणखी समाविष्ट करण्यात आली. याकामी जळगाव मंडळाचेही सहकार्य लाभले. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

दुसऱ्या आवृत्तीच्या प्रतीही अल्पावधीत संपल्या आणि लेवा पाटीदारच नव्हे, तर इतर समाजांतील अभ्यासकांकडूनही या पुस्तकाची विचारणा झाल्याने प्रा. राम नेमाडेंच्या आग्रहानुसार लेवा पाटीदार समाजावर निरातिशय प्रेम करणारे श्री. माधव चौधरी यांनी तिसरी आवृत्ती अभ्यासक वाचकांना उपलब्ध करून दिली. त्याबद्दल, त्या दोघांचे कितीही आभार मानले तरी कमी ठरतील. ही आणखी सुधारित तिसरी आवृत्ती अभ्यासकांच्या हाती देत आहे. अभ्यासकांना हा ग्रंथ उपयुक्त वाटेल, अशी आशा व्यक्त करतो.

ऑक्टोबर २०१५ **- डॉ. नि.रा. पाटील - पिळोदेकर**

✧✦✧

अभिप्राय (पहिली आवृत्ती)

लेवा पाटीदार समाज मूलतः कृषी व्यवसायाशी निगडित असला तरी बदलत्या काळाची पावले ओळखून शिक्षणाच्या विविध शाखांत तो अग्रेसर बनला आहे. काळाची गरज म्हणून तो व्यवसायाभिमुख बनत चालला आहे. कालवैशिष्ट्याची दखल या समाजाने घेतली आहे. विकसनशील असलेल्या लेवा पाटीदार समाजाने आपली अविरत कष्ट करण्याची वृत्ती व बौद्धिक क्षमता यांच्या आधारे आपला विशिष्ट ठसा राष्ट्रपातळीवर उमटवला आहे. प्रगत शेतकरी, कुशल कारागीर, स्वातंत्र्यप्रेमी, कलावंत, कवी, साहित्यिक, विज्ञाननिष्ठ, उद्योगपती, सेवाभावी समाज कार्यकर्ते असा विविधांगी व्यक्तिमत्त्व विकास दृष्टिपथात आहे.

साहित्य क्षेत्रात पद्मश्री डॉ. वि.भि. कोलते यांचे कार्य अनन्यसाधारण आहे. महानुभाव पंथाच्या साहित्य संशोधनात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. खऱ्या अर्थाने लेवा पाटीदार समाजाला आपल्याच इतिहासाची ओळख **लेवा पाटीदारांचा इतिहास** या ग्रंथामुळे झाली. या ग्रंथाचे संशोधक-लेखक श्री. शंकर विठोबा पाटील यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाज - एक अन्वयार्थ हा श्री. नि.रा. पाटील यांनी लिहिलेला ग्रंथ लेवा पाटीदार समाजाच्या व्युत्पत्तीपासून अद्ययावत विकासापर्यंत आढावा घेणारा, पुराव्यांच्या आधारे लिहिला गेलेला अत्यंत शास्त्रशुद्ध ग्रंथ आहे. ज्या स्वरूपात हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे; ते स्वरूप अत्यंत देखणे असून समाजबांधवांना आपल्या अस्मितेची ओळख करून देणारे आहे. श्री. नि.रा. पाटील यांनी ग्रंथाची पांडुलिपी मला वाचावयास दिली आणि जेव्हा मी ती पूर्ण वाचून काढली तेव्हाच कोणत्याही परिस्थितीत हा ग्रंथ मार्गी लागावा, अशी इच्छा

माझ्या मनात उदित झाली. मुलुंड येथील विकास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आदरपूर्वक या ग्रंथाचे वाचन केले व मंडळातर्फे तो प्रसिद्ध करावा, असे ठरविले. परंतु, आर्थिक अथवा तत्सम काहीतरी अडचण जाणवल्याने त्यांची इच्छा असूनही हा ग्रंथ प्रकाशित करणे जमले नाही. प्रथमावृत्तीची धुरा मुंबई परिसर व लेवा मंडळ आणि सुधारित द्वितीयावृत्तीची धुरा जळगाव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ यांनी उचलून व ग्रंथ प्रकाशित करून फार मोठे समाजकार्य केले आहे, असे मला वाटते. श्री. माधव चौधरी व श्री. अनिल बोरोले यांचा याकामी पुढाकार कौतुकास्पद आहे.

श्री. नि.रा. पाटील हे संशोधक वृत्तीचे असून अथक परिश्रम करणारे व भाषेवर उत्तम पकड असलेले थोर साहित्यिक आहेत. लेवा गणबोली (वऱ्हाडी-खानदेश बोलीभाषा) या नावाने लेवा समाजात ग्रामीण भाषेत वापरली जाणारी भाषा, शब्द, व्याकरण यांचा संशोधनात्मक अभ्यास व्यक्त करणारा कोश त्यांनी लिहिला आहे. हा ग्रंथही भाषाभ्यासकांसाठी एक पर्वणी ठरेल. महाराष्ट्रातील किल्ल्यांवर तसेच बुलडाणा व जळगाव जिल्ह्यांतील हेमाडपंती मंदिरांवर त्यांनी संशोधनात्मक लिखाण केले असून तेही प्रकाशित होण्याची गरज आहे. आमच्या नेते मंडळींनी व समाजाचे नेतृत्त्व करणाऱ्या श्रेष्ठ समाजबांधवांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

महाराष्ट्रात अनेक लेवा पाटीदार समाज मंडळे व भ्रातृ मंडळे समाजाचे प्रतिनिधित्व करून आपापल्या परीने समाजकार्य करीत आहेत. त्या सर्वांनी समाजाशी निगडित पुस्तक प्रकाशनाकडे लक्ष दिल्यास लेवा पाटीदार समाज अन्य समाजांत आदराचे व प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करू शकेल. ज्या समाजाचे साहित्य उच्च दर्जाचे असते तो समाज ऊर्जितावस्थेला येऊन राष्ट्रीय पातळीवर आपले स्वतंत्र व समर्थ अस्तित्व निर्माण करू शकतो. यासंदर्भातील श्री. नि.रा. पाटील यांचे कार्य समाजाला भूषणावह व मार्गदर्शक ठरणार आहे. बहुतेक लेवा पाटीदार समाज मंडळांचे उद्दिष्ट आपल्या विभागात वास्तू निर्माण करावी, हे आहे. अशा वास्तू निर्माण होणे, ही काळाची गरज आहे. मात्र, या सर्व ज्ञातीबांधवांनी साहित्यनिर्मिती व प्रकाशन याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. कारण, हे कार्य संपूर्ण समाजाला प्रकाशात आणणारे व समाजाची प्रतिष्ठा वाढविणारे आहे.

प्रस्तुत ग्रंथ शाळा, कॉलेज, सार्वजनिक ग्रंथालये इ.मध्ये वितरीत व्हावा, एवढी या ग्रंथाची गुणवत्ता व उपयोगिता मोठी आहे. ग्रंथलेखनाने श्री. नि.रा. पाटील विद्वज्जनसमुदायात मानाचे स्थान प्राप्त करते झाले आहेत. ग्रंथलेखकास व प्रकाशकास यामुळेच धन्यवाद द्यावेसे वाटतात.

भाषाप्रभू, प्रा. राम नेमाडे, डोंबिवली

✧✦✧

अभिप्राय (दुसरी आवृत्ती)

आपला प्रबंध मी संपूर्ण वाचला. गॅझेटिअर तयार करण्याचा आपला अनुभव पानापानांतून प्रत्ययास आला. अशा कामासाठी लागणारी शिस्त, कष्ट करण्याची तयारी, व्यासंग, शोधकवृत्ती व तटस्थता आपण अंगी बाणवली आहे. याची साक्ष हा ग्रंथ देतो. संबंधित मुद्यावरील सर्व मतांतरे मांडून त्यातील योग्य कोणते, हे सप्रमाण ठरवण्यातील आपला सापेक्षही वाखाणण्याजोगा आहे. लेवा पाटीदार या समाजाचा इतिहास-भूगोल, त्याची सामाजिक-सांस्कृतिक वाटचाल, श्रद्धास्थाने-संस्कारविधी, पंथ-संप्रदाय, सणवार-रूढी-परंपरा, भाषिक वैशिष्ट्ये, स्वाभाविक लक्षणे, कर्तृत्व आणि मर्यादा या सर्व बाबीना आपण सविस्तर व साधार मांडल्या आहेत. एका परीने आपल्या या ग्रंथामुळे या समाजाविषयी आणखी सखोल अध्ययन करण्याच्या अनेक दिशा प्रकाशात आल्या आहेत. त्यापैकी काही विषय तर आपल्या आगामी ग्रंथातून आपणच हाताळणार असल्याचे समजले. या समाजाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, त्याचा लोकसंख्याशास्त्रीय विकास, त्याच्या सामाजिक-सांस्कृतिक-भाषिक वैशिष्ट्यांची व वैगुण्यांची कारणमीमांसा अशा अनेक अंगांनी अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना तुमच्या ग्रंथाचा आधार घेऊनच पुढे जावे लागणार आहे.

'रामपुत्र लवाचा हा समाज वंशज आहे' या उपपत्तीपेक्षा प्रांताधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या गुर्जर प्रतिहारांमधून तो विकसित झाला असावा, हे आपले प्रतिपादन मला व्यक्तिशः पटते. लेवा पाटीदारांच्या देवदेवता व तीर्थस्थाने, सणवार व भजनकीर्तने, संस्कारविधी आणि प्रथा वगैरेंसंबंधी वाचताना लहानपणापासूनचा स्मरणपट अंतःचक्षूसमोर तरळून गेला. विशेषतः लग्नकार्यातून पूर्वी दिसणारा समूहभाव

आणि सहकार्य भावना तसेच साधेपणाचे या समाजाने दीर्घकाळ जपलेले आदर्श आज विस्मृतीत जात आहेत, याची खेदकारी टोचणी मनात सलत राहिली. अनेक प्रश्न उभे राहिले. आर्थिक - शैक्षणिक भरभराट वेगाने झालेल्या या समाजाच्या सांस्कृतिक उन्मयनाची पातळी उंचावण्याऐवजी खालावण्याची कोणती कारणे असावीत? साहित्य, नाट्य, चित्र, शिल्प, संगीत, सिनेमा इ. सृजनशील क्षेत्रांतील अव्वल प्रतिभावंतांची या समाजातून मोजणी करताना एकाही हाताची बोटे का संपू नयेत? पिढीजात दारिद्र्यामुळे स्वभावात पक्की बसलेली कृपणता परिस्थिती पालटल्यावर ज्या खर्चीकतेचे रूप धारण करते; त्या अभिरुचीची साक्ष किती मिळते? पैशांखेरीज आणि पैशांपेक्षाही अधिक मोलाच्या अनेक गोष्टी जीवनात असतात, हे या समाजाच्या लक्षात का येत नसावे? तुम्ही किती पैसे घेतले? असे तुम्हाला विचारून तुमच्या समाजनिष्ठ परिश्रमांचा अधिक्षेप करणारी व्यक्ती या समाजाची प्रातिनिधिक असते - यामागील मानसिकतेची कशी उकल करणार? हुंडा, श्रीमंतीचे बटबटीत प्रदर्शन, लग्नातील बीभत्स प्रकार वगैरे त्या मानसिक व्याधीची मला लक्षणे वाटतात. भोरगाव पंचायत वगैरे प्रयत्न तिथे थिटे पडणे अटळ असते.

असो. लेवागणातील भाषेवरचा आपला ग्रंथ लवकर प्रकाशात यावा. आपण आपल्या याही ग्रंथात त्या भाषेची जी वैशिष्ट्ये नमूद केली आहेत; ती मार्मिक आहेत. त्या भाषेच्या समृद्धीचे आपण कथन केलेले मूलस्रोत मला विशेष महत्त्वाचे वाटले.

मी आपले पुनश्च अभिनंदन करतो. व्यक्तिशः माझा आपण ग्रंथात गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. याबद्दल आपले आभार मानतो आणि आपल्या भावी लेखनाला शुभेच्छा देतो.

- डॉ. भा.ल. भोळे,
एम.ए.पीएच.डी.
माजी विभागप्रमुख
राज्यशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ

✧✦✧

प्रकाशकीय

'लेवा पाटीदार समाज : एक अन्वयार्थ', हे श्री. नि.रा. पाटील यांनी संशोधनपूर्वक लिहिलेले पुस्तक 'मुंबई व परिसर लेवा मंडळा'तर्फे सन २००३ मध्ये प्रकाशित करण्यात आले होते. त्यानंतर, या पुस्तकाची दुसरी आवृत्ती 'जळगाव जिल्हा लेवा पाटीदार' यांच्यातर्फे प्रकाशित करण्यात आली. या पुस्तकाची प्रथम आवृत्ती प्रकाशित करण्याबाबत माझे प्रिय स्नेही व समाजप्रेमी प्रा. राम नेमाडे यांनी 'हा समाज इतिहासाचा ग्रंथ प्रकाशित करण्यास तुम्ही पुढाकार घेतला तर निश्चितच ते चांगले काम होईल व श्री. पाटील यांनी या पुस्तकामध्ये समाजाचे संशोधनात्मकदृष्ट्या जे वास्तव चित्रण केले आहे, ते समाजापर्यंत पोहोचू शकेल', या माझ्यावर दाखविलेल्या दृढविश्वासाने मी मुंबई व परिसर लेवा मंडळाच्या वतीने हे पुस्तक प्रकाशित करण्याची फार मोठी अवघड जबाबदारी स्वीकारली. कारण, पुस्तक प्रकाशित करण्यासाठी छपाईचा फार मोठा खर्च व त्यामानाने पुस्तक विक्रीतून मिळणारी अल्प मिळकत याचे गणित न जमण्यासारखे आहे. तसेच लेवा पाटीदार समाजाच्या इतिहासाचे पुस्तक प्रत्येक लेवा समाज बांधवाने विकत घेण्याबाबतची उदासीनता लक्षात घेता सदरहू पुस्तकाच्या प्रकाशनासाठी होणारा खर्च मंडळाला आर्थिकदृष्ट्या लाभदायक नाही, असा विचार करून त्या वेळी मुंबई व परिसर लेवा मंडळाच्या कार्यकारिणीने या पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी घेऊ नये, असे ठरविले होते. त्या वेळी ही आर्थिक जबाबदारी घेतल्यास कोणताही आर्थिक तोटा होणार नाही, इतकेच नव्हे, तर थोडाफार आर्थिक लाभ निश्चितच होईल तसेच सामाजिक बांधिलकी म्हणून मुंबई लेवा परिसर मंडळाचे कर्तव्यही असेल, असे मी सर्व मंडळाच्या कार्यकारिणी सदस्यांना आश्वासन देऊन प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली आणि त्याअनुषंगाने समाजातील दानशूर समाजबांधवाना या कामासाठी देणगी देऊन आर्थिक साहाय्य करण्याचे लेखी आवाहन केले. माझ्या

आवाहनाला समाजबांधवांनी भरघोस प्रतिसाद दिला. मंडळाच्या निधीतून एकही पैसा खर्च करावा लागला नाही. ज्या दानशूर समाजबांधवांनी यासाठी आर्थिक साहाय्य केले; त्यांची नावे या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीमध्ये छापण्यात आली आहेत. त्याबद्दल त्या समाजबांधवांचा मी अत्यंत ऋणी आहे.

श्री. नि.रा. पाटील यांनी लिहिलेल्या पुस्तकाची प्रथम आवृत्ती फक्त २३२ पानांची आहे. आता, श्री नि.रा. पाटील यांनी लेवा पाटीदार समाजाबद्दल आणखी सखोल संशोधन करून व अधिकाधिक महत्त्वपूर्ण माहिती मिळवून सुमारे ४८० पृष्ठांची आवृत्ती तयार केली आहे आणि या तृतीय आवृत्तीच्या प्रकाशनाची जबाबदारीही मुंबई व परिसर मंडळाने स्वीकारावी, अशी विनंती मला नि.रा. पाटील व प्रा. राम नेमाडे यांनी केली. तेव्हा, यासंबंधात मुंबई व परिसर लेवा मंडळाचे विद्यमान सचिव श्री. सुहास बोरोले यांच्याबरोबर मी सविस्तर चर्चा केली. त्यांनी हे पुस्तक मुंबई व परिसर लेवा मंडळाने प्रकाशित करण्यास संमती दर्शविली. अर्थात, यासाठी फार मोठा खर्च येईल, असे मी त्यांना सांगितले आणि हा खर्च भागविण्यास समाजबांधवांना पुन्हा एकदा आर्थिक साहाय्य करण्यासाठी आवाहन करण्यात येईल नि त्याद्वारे हा खर्च भागविण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे ठरले.

श्री. पाटील यांनी लेवा पाटीदार समाजाबाबत अधिकाधिक नवीन माहिती मिळवून समाजाच्या इतिहासामध्ये जास्तीतजास्त भर घालून ती समाजासमोर आणण्याचा फार मोठा प्रयत्न केला आहे. समाजस्तरावरील व समाजाचे एक अंग असलेला लेवा पाटीदार समाजावरील हा ग्रंथ लिहिण्यासाठी श्री. नि.रा. पाटील यांनी शब्दोत्पत्तीशास्त्र (Etymology) नुसार लेवा पाटीदारांची व्युत्पत्ती तसेच इतिहासाबाबत पौराणिक कथांवर आधारित इतिहासावर अधिक भर न देता वास्तव इतिहास मिळविण्यासाठी बऱ्याच संदर्भग्रंथांचे सखोल वाचन केल्याचे दिसून येते. या ग्रंथामध्ये लेवा पाटीदार व्युत्पत्ती, इतिहास, लेवा पाटीदारांची बोलीभाषा, ते राहत असलेला प्रदेश, त्यातील गावे, क्षेत्रफळ, लोकसंस्कार, कुळे, कुलदेवता, उपासना पंथ, सामाजिक संघटन, समाजातील साहित्य क्षेत्र व स्वातंत्र्यसंग्रामात योगदान दिलेल्या व्यक्ती, समाजजीवन आणि लेवा पाटीदार राहत असलेल्या प्रदेशातील तीर्थस्थाने व प्रेक्षणीय स्थाने इत्यादींबाबत सखोल आणि सविस्तर माहिती दिली आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या समाजाचा पूर्ण इतिहास समजून घेण्यासाठी या ग्रंथाचा निश्चितच लाभ होईल, यात शंका नाही. त्याचप्रमाणे लेवा पाटीदार समाजातील विचारवंत, जिज्ञासू आणि प्रतिभासंपन्न समाजप्रेमींच्या मनात या समाजाच्या प्रतिष्ठित, अर्वाचीन घडामोडींसंबंधी जिज्ञासा निर्माण होऊन समाजासंबंधी नवनवीन विचारधारा पुस्तकरूपाने समाजापुढे आणण्यासाठी प्रेरणा मिळेल, अशी मला खात्री वाटते. श्री. नि.रा. पाटील हे लेखनात सतत व्यस्त असतात, हे मी पाहिलेल्या लेवा गणबोली भाषाकोश इ.वरून दिसून आले. त्यांच्या

लेखनीतून सातत्याने दर्जेदार लेखन होत राहो आणि त्यासाठी त्यांना दिर्घायुरोग्य लाभो, ही शुभेच्छा!

समाजातील बांधवांना आर्थिक मदतीसाठी केलेल्या लेखी निवेदनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पन्नासहून अधिक दात्यांनी उदारहस्ते केलेल्या मदतीमुळे ग्रंथाचे प्रकाशन सुकर झाले. या सर्व दानशूरांचे फोटो व अल्पपरिचय आदरपूर्वक यामध्ये छापला आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या ग्रंथाच्या अधिकाधिक प्रति काढून त्या समाजबांधवापर्यंत जाव्यात अशी लेवा पाटीदार समाजाचे लाडके व्यक्तिमत्त्व मा. एकनाथराव खडसे (महसूल व कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांची इच्छा असल्यामुळे त्यांनाही आर्थिक सहकार्यासाठी नम्र निवेदन करण्यात आले. आदरणीय नाथाभाऊंनी त्वरित भरीव अर्थ साहाय्य केल्यामुळेच हा ग्रंथ सर्वांगसुंदर स्वरुपात आपल्या हाती देता आला. या बद्दल मुंबई व परिसर लेवा मंडळ, त्यांचे शतशा: ऋणी आहे.

या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रतींची संख्या, खर्च, वितरण, विक्री, उत्पन्न लाभांश इत्यादी सर्व अधिकार मुंबई व परिसर लेवा मंडळ, मुंबई यांच्याकडे राहतील. या पुस्तकाची आखणी, छपाई व बांधणी ही जास्तीतजास्त आकर्षक करण्याचा प्रयत्न केला असून त्यासाठी प्रा. राम नेमाडे यांनी खूप मेहनत घेतली आहे. त्याबद्दल, त्यांचे मुंबई व परिसर मंडळ आभारी आहे. उत्कृष्ट ग्रंथ छपाईकरिता मेहनत घेणारे सायली प्रिंटर्सचे राजाभाऊ अन्नदाते यांचेही मनापासून आभार! तसेच ग्रंथाचे देणगीमूल्य समाजाच्या सर्व स्तरांवरील व्यक्तींना परवडेल, असे माफक ठेवले असून प्रत्येक समाजबांधवाने हे पुस्तक आपल्या संग्रही ठेवावे, अशी आग्रहवजा विनंती! या ग्रंथातील सर्व मते ही सर्वस्वी लेखकाची असून लेखकाच्या प्रत्येक मताशी मुंबई व परिसर लेवा मंडळ सहमत आहे, असे गृहीत धरण्यात येऊ नये.

दिनांक : १५ सप्टेंबर २०१५

मुंबई व परिसर मंडळाच्या वतीने,
- माधव सीताराम चौधरी

सीडी/५९/सी-२३,
श्रीरंग सोसायटी, ठाणे (प.)-४०० ६०१
दूरध्वनी : २५३६७८७४ / ९८००७६६०६०

✧✦✧

अनुक्रमणिका

प्रकरण - १

लेवा पाटीदार - व्युत्पत्ती

खानदेश - वऱ्हाडातील लेवा पाटीदारांची गणना ब्रिटिशांनी कुणब्यांमध्ये केल्यामुळे जळगाव व बुलडाणा जिल्ह्यांमधील लेवा पाटीदारांची १९११ नंतरची स्वतंत्र आकडेवारी उपलब्ध नाही. सन १८७२ च्या जनगणनेनुसार संयुक्त खानदेशात यांची संख्या २५,५३५ तर, बुलडाणा जिल्ह्यात २,००० होती. तथापि, ही आकडेवारी विश्वसनीय वाटत नाही. खानदेश-वऱ्हाडात यांना लेवा पाटीदार या संज्ञेबरोबरच कुणबी, रेवे, लेवा कुणबी, पांजणा कुणबी असेही म्हणतात. तसेच ते ज्या मूळ भागांमधून म्हणजे गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान व पंजाब या भागांमधून स्थलांतरित झालेले आहेत; त्या भागांत त्यांना पाटीदार, लेवा कणबी, आंजणा कणबी, मतिया कणबी, मोन्मा कणबी, कुरमी असेही संबोधतात. कडबा कणबी हेसुद्धा पाटीदारच आहेत. लेवा पाटीदार शब्दाची व्युत्पत्ती (Etymology) खालीलप्रमाणे झाली असावी. शब्दोत्पत्ती (Etymology = Derivation of words) हे एक स्वतंत्र शास्त्र असून त्यात शब्दोत्पत्तीच्या सर्व संभावनांच्या संशोधन बाबींनुसार विचार केलेला असतो. तसाच लेवा आणि पाटीदार या दोन शब्दांचा प्रस्तुत प्रकरणात विचार केलेला आहे.

गुजरातीत पाटीदार म्हणजे पाटील किंवा शेतकरी असा अर्थ होतो. विशेषतः बडोदे भागात तो रूढ आहे.[१] पट म्हणजे मोठे शेत आणि पट्टी म्हणजे शेतीचा लांब पट्टा व तो धारण करणारा तो पाटीदार असा अर्थ निघतो. पट्टा किंवा पटा याचा अर्थ कौल म्हणजे कबुलायत पत्र, लेखी पत्र (शेतीचे वगैरे खेडपत्र), गावच्या जमाबंदीचे ताळेबंदपत्रक, कराराचा कागद, भाडेपट्टा असाही होतो. संस्कृतमधील

'पट्ट'चा अर्थ ताम्रपट किंवा राजशासनपत्र असा होत असल्याने ते करून देणारा तो पट्टीदार अथवा पाटीदार होय. कुशाण काळात क्षत्रप (म्हणजे प्रांताधिकारी = प्रतिहार = सामंत = संस्कृतमधील पट्टीदार) नेमण्याची प्रथा सुरू झाली होती.[२] पूर्वी त्यांना क्षत्रप असेही म्हणत. संस्कृतमध्ये 'पाटी'चा गणित किंवा अंकगणित असा अर्थ होतो. आकडेमोड करणारा म्हणजे हिशेबनीस याअर्थी पाटीदाराचा अर्थ निघू शकतो. हा पाटीदार पुढे शेती करू लागल्याने पट्टी = शेती धारण करणारा तो पाटीदार असा अर्थ सयुक्तिक वाटतो आणि ब्रिटिश राजवटीपूर्वी प्रमुख पाटीदार शासन व कुळांमधील मध्यस्थींचे काम करीत व कौशल्याने सारा वसूल करून शासनास देत.[३] म्हणजेच ब्रिटिश राजवटीपूर्वी पाटीदारांमधील प्रमुख हे एक प्रकारे महसूल अधिकाऱ्याचे काम करीत. त्यावरून त्यांचा सामाजिक दर्जा स्पष्ट होतो. 'पट्टी'चा एक अर्थ पश्चिम दिशा असाही होतो.[४] पश्चिमेकडून आलेले आर्य ते पाटीदार असाही अर्थ निघू शकतो. याविषयी तपशीलवार माहिती **पूर्वजांचा इतिहास** या प्रकरणात आलेली आहे. पत म्हणजे नावलौकिक, इमानीपणा, विश्वासूपणा, कीर्ती, अब्रू - सचोटीबाबत दुसऱ्यांचा विश्वास आणि पाती म्हणजे घराणे, घराण्याची शाखा[५] असा अर्थ निघत असल्याने 'पातीदार'चा अपभ्रंश पाटीदार होणे स्वाभाविक आहे. यांच्या सचोटीबाबत व उद्योगप्रियतेबाबत ब्रिटिशांनी त्यांची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. इ.स. १८८० मध्ये प्रकाशित **खानदेश गॅझेटिअर**मध्ये जेम्स एम. कॅम्बेलने यांच्या गुणांबाबत पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे. "Truthful, orderly & frugal almost to nigardliness, they are the most hardworking, industrious and simple-minded of the Khandesh agricultural population. Since the great dispute which broke up their caste, they have been remarkable for the apparent absene of jealousies and treacheries which distinguish the gujar kunbis."[६] ज्या गुजरातमधून हा समाज आला आहे, तेथील इ.स. १८७९ च्या **बडोदा गॅझेटिअर**नुसार पाटीदारांबाबत पुढीलप्रमाणे विधान केलेले आहे. "Ambitious, intelligent, calm, independent, hardworking, strong and hospitable, thrifty in normal times, but excessive spenders on occasion, free from the vices of the lower castes and more progressive than other farmers"[६अ] यावरून पातीदार घराण्याचा आणि अपभ्रंशाने पाटीदार असा शब्द निघू शकतो. वरील great dispute बाबत माहिती 'इतिहास' प्रकरणात दिली आहे.

ज्या खेडा जिल्ह्यातून हे लोक आले आहेत; त्या जिल्ह्याच्या १८८२ च्या गॅझेटिअरमध्ये यांच्याविषयी पुढील माहिती दिली आहे. - "..... of the different classes the most important are the Lewa and Kadwa Kanbis. The best

farmers in the district, sobar, quiet, industrious and except on such special occassions as marriage, thrifty they...."[७] इ.स. १४८४ मध्ये महमूद बेगडा या गुजरात सुलतानाने चांपानेर व पावागड किल्ल्यांवर चढाई करून ते राज्य हस्तगत केले. त्या वेळी चांपानेरचा (पावागडचा) राजा पाटाई रावळ हा होता.[८] महमूद बेगडाच्या स्वारीनंतर बहुतांश चांपानेरवासी व पावागडवासी लोक खानदेश-वऱ्हाडात आलेले आहेत. या पाटाईची प्रजा पाटाईदार व त्यावरून पाटीदार हा शब्द रूढ झाला असावा, असेही अनुमान काढता येते.

शतकानुशतके उलटतात तेव्हा बऱ्याच शब्दांचे उच्चारही बदलतात. अशी शक्यता असून प्रतिहार वरून पाटीदार होणे खूपच संभवनीय वाटते. प्रतिहार राजघराणे हे गुर्जर प्रतिहार म्हणून ओळखले जाते. या प्रतिहारांचे साम्राज्य ज्या आनर्त, मालव, किरात, तुरूष्क, वत्स आणि मत्स्य म्हणजेच लाट किंवा गुजरात, राजस्थान, माळवा व निमाड भागात दीर्घकाळ होते; तेथे मोठ्या संख्येने पाटीदार समाज वसला आहे. या भागात सहाव्या ते दहाव्या शतकात प्रतिहारांचे साम्राज्य बहरलेले होते. प्रतिहार राजघराण्यावरून व त्या राजघराण्यात सेवेत असणारे सरदार, अधिकारी; ज्यांनाही प्रतिहार म्हणूनच ओळखले जाई, त्या प्रतिहारांवरून अपभ्रंशाने पाटीदार होणे सहज शक्य आहे. ते अधिक सयुक्तिक वाटते. याविषयी अधिक माहिती **इतिहास** प्रकरणात दिली आहे. येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, प्रतिहारांचे साम्राज्य ज्या भूप्रदेशावर होते; त्या भूप्रदेशातील शेतकऱ्यांना पाटीदार असे संबोधले जाते. अमृत व्ही. पंड्या हे सुप्रसिद्ध इतिहासकार यास स्पष्ट दुजोरा देतात. ते आपल्या **न्यू डायनेस्टिज ऑफ मेडिव्हल गुजरात** या ग्रंथात स्पष्टच लिहितात (पृ. ३९) - "According to the theory propounded by the western scholars the Kanabis (Patidars) of Gujrat belong to the race of the great conqeering White Huns, a tribe of Gujar's, who during the second half of the 6th century A.D. passed south through the Punjab and settled in Malwa and Gujrat (Enthoven, Gaz. Bomb. pres IX, pt 1, p 160 - 1: **The Tribes and castes of Bombay**, II. P. 136)" यावरून हुणांबरोबर आलेल्या गुर्जर टोळ्या म्हणजे पाटीदारांचे पूर्वज या माझ्या विधानास पुष्टी मिळते.

ज्या परिहार किंवा पडिहार गुर्जर वंशात प्रतिहार होऊन गेलेत; त्या परिहार किंवा पडिहारांची वस्ती राजस्थानातील मारवाड आणि अवध प्रदेशात आहे. मात्र, सांप्रत यांची लोकसंख्या अल्प उरली असल्याचे **राजस्थान की जातिया** ग्रंथात नमूद केले आहे.[९] हे लोक अग्निकुळातील वैष्णव असले तरी चामुंडा ही त्यांची कुलदेवता आहे. हे लोक वड, पिंपळ व रोहिडा (बहुधा उंबर) या वृक्षांना पवित्र मानतात आणि ते वृक्ष कधी तोडत नाहीत. प्रस्तुत लेखकाच्या मते हे परिहार

गुजरात, पावागडमार्गे खानदेश-वऱ्हाडात आले असावेत. कारण आस्थलांतरी लेवा पाटीदार वैष्णव असून ते आता वारकरी झालेले आहेत. त्यांनी चामुंडाऐवजी भवानी ही कुलदेवता स्वीकारली आहे. इकडील लेवा पाटीदार लोकही वड, पिंपळ व उंबरास पवित्र मानून तोडत नाहीत.

गुजरातमधील पाटीदारांना लेवा पाटीदार अशी संज्ञा प्राप्त झाली ती नर्मदा नदीमुळे! नर्मदा नदीस गुजरातमध्ये रेवा असे नाव आहे. नर्मदा नदीचे रेवा हे नाव तिच्या मार्गात अनेक छोटे-छोटे धबधबे व द्रुतवाह आहेत त्यामुळे आणि 'उड्या मारत जाणारी' या अर्थाने रेवा म्हणून सार्थ ठरते.[१०] इतर नद्यांप्रमाणे ती प्रौढ किंवा वृद्ध झालेली नसून चिरतरुण आहे. गुजरात व मध्य प्रदेशात तिच्या उत्तर तसेच दक्षिण भागात म्हणजे ज्या भागावर प्रतिहारांची सत्ता होती; तेथे पाटीदारांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे. त्यावरून रेवा नदीकाठी स्थायिक झालेल्या प्रतिहारांना रेवा प्रतिहार व अपभ्रंशाने लेवा पाटीदार असे नाव प्राप्त होणे शक्य आहे. गुजरातमध्ये सर्व कणब्यांमध्ये रेवा अथवा लेवा पाटीदार संख्या सर्वाधिक आहे. त्यांच्या मूळ वस्तीची मुख्य ठिकाणे खेडा जिल्ह्यातील आणंद, बोर्साद, सोजित्रा आणि नडियाद या चरोतरमध्ये,[११] बडोदा व भडोच भागात, सौराष्ट्र तद्वतच कच्छमध्येही आहेत. या चरोतरला लागूनच मध्य प्रदेशात रेवा नदीकाठी रेवा काठा जिल्हा आहे. हा जिल्हा महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तरेस आहे. त्यातही पाटीदारांची संख्या लक्षणीय आहे. थोडक्यात, नर्मदा म्हणजे रेवा नदीवरून लेवा पाटीदार हे नाव प्राप्त झाले आहे. काही ठिकाणी यांना फक्त रेवे किंवा लेवे असे संबोधतात, तेही रेवा नदीमुळेच. रेवा शब्दावरून जर लेवा पाटीदार या व्युत्पत्तीशी काही संबंध असेल तर रेवाशिवाय इतर संबंधित शब्दांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण, लेवा पाटीदार समाज हा आर्य समाजाचा एक घटक असून ते सप्तसिंधू म्हणजे पंजाब प्रदेशातून दक्षिणेकडे सरकले असे गृहीत धरले तर पंजाबातील रेवानामक सरोवर भागात ते प्रथम स्थित झाले असावेत व तेथून दक्षिणेकडे स्थलांतरित झाले असावेत. पंजाबमधील रेवा सरोवर हे पवित्र स्थान असून तेथे लोमश ऋषींचे वास्तव्य होते. (तपःस्थान होते).[१२] हे लोमश ऋषी पाटीदारांमधील काही जणांचे (कुळांचे) गोत्रही आहेत. रेवा सरोवर भागाला रिवालसर असेही म्हणतात.[१३] आणखी एका रेवा शब्दावरून व्युत्पत्तीशी संबंध जोडता येईल. माळव्यातही पाटीदारांची संख्या मोठी आहे. माळव्यातील धार जिल्ह्यातील मांडू या ऐतिहासिक स्थळी रेवानामक कुंड (सरोवर) आहे. हे कुंड रूपमतीने (बाझ बहादूरची प्रेयसी व पत्नी) बांधलेले आहे. या कुंडातून नर्मदा नदी गुप्तरूपाने वाहते, असे म्हणतात. नर्मदा परिक्रमा करणाऱ्यांची अशी समजूत आहे की, या रेवा कुंडात स्नान केल्यावाचून परिक्रमा सफल होत नाही.[१४] अर्थात, हे मत ग्राह्य धरता येणार नाही.

वंशावळी ठेवणारे चोपड्याचे भाट हे रामपुत्र लव यांचे वंशज लेवा पाटीदार आहेत, असे सांगतात. तथापि, त्यांच्या वंशावळी जास्तीतजास्त पावागडपर्यंत म्हणजे १४८४ पर्यंत मागे जातात. एवढेच सत्य की, पावागडहून लेवा पाटीदार लोक आलेले आहेत. रेव्ह. शेरिंग्जनुसार आणि **गॅझेटिअर ऑफ गुजरात पॉप्युलेशन**नुसार[१५] भगवान रामचंद्र यांची दोन मुले लव व कुश यांच्यापासून अनुक्रमे लेवा व कुशवाह (कडवा) वंशाची निर्मिती झालेली आहे. अर्थात, हे केवळ अनुमान आहे. खरे तर रेवा (लेवा) आणि कडवा हे पाटीदारांचे प्रदेशवाचक दोन उपभेद आहेत. रेवा नदी (म्हणजेच नर्मदा नदी) काठाच्या प्रदेशातील पाटीदार ते रेवा (लेवा) पाटीदार आणि कडी परगण्यातील पाटीदार ते कडवा पाटीदार (आर.ई. एन्थोवेन, **कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** १९२२, व्हा - २, पृ. १३९) अशी व्याख्या आहे. रेवा पाटीदार हे रेवा नदीच्या उत्तरेकडे लागून असलेल्या चरोतरमध्ये वसले आहेत; तर कडवा पाटीदार हे अहमदाबादच्या उत्तरेस असलेल्या विरमगाम-मेहसाणामधील कडी भागात वसले आहेत. पुढे रेवाचा अपभ्रंश लेवा असा झाल्याने काही विद्वान व भाट हे रामपुत्र लवापासून लेवांची आणि कुशापासून कडवांची उत्पत्ती झाल्याचे गॅझेटिअरमधील आख्यायिकांचा आधार घेऊन सांगू लागले. एका गॅझेटिअर ग्रंथात लेवा स्वतःस लवाचे व कडवा कुशाचे वंश समजतात, असे ब्रिटिशांनी लिहिले; त्याचा आधार घेतला गेला. प्रत्यक्षात असणे व समजणे किंवा मानणे यात फरक आहे आणि मानण्याने वास्तव नाकारले जात आहे. लेवा हे रामपुत्र लवाचे वंशज क्षणभर मानले तरी लवाची राजधानी श्रावस्तीनगरी जी उत्तर कोसलमध्ये म्हणजे नेपाळ सीमेनजीक आहे तेथे लेवांची थोडीतरी वस्ती असावयास पाहिजे. परंतु, तेथे तर लेवांचा मागमूसही नाही. अयोध्येला कुश हा मोठा युवराज असल्याने राज्याभिषेक झाल्याने अयोध्या ही कुशाची राजधानी झाली. मध्य कोसलमध्ये असलेल्या अयोध्या भागातही कडवांची वस्ती अजिबात नाही. याचा अर्थ काय? याला असे उत्तर देता येईल की, कऱ्हाडला इतर समाजाची वस्ती असूनही तेथील फक्त ब्राह्मणांनाच कऱ्हाडे म्हणतात; तद्वतच देवरूखे, कनोजे अशी कितीतरी उदाहरणे देता येतील आणि लेवा पाटीदारांमधील थोरगव्हाणे हे फक्त थोरगव्हाणलाच नसून लेवा गणप्रदेशात सर्वत्र आढळतात.

मालवगण हा प्राचीन काळातला सप्तसिंधू प्रदेशातील लोकसंघ होता. इ.स.च्या चौथ्या शतकात समुद्रगुप्तने दिग्विजय करण्याआधी सप्तसिंधूमधील मालवगण लोकसंघ शकांच्या साम्राज्यात मेवाडमध्ये टोंक प्रदेशात येऊन वसला. त्यांनी तिथे प्रजातंत्र गणराज्य स्थापन केले. समुद्रगुप्तच्या दिग्विजयावेळी मालवगण साऱ्या माळवा पठारी प्रदेशात पसरले. त्यावरूनच माळवा हे नाव प्राप्त झाले आहे. माळव्यात पाटीदारांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे. या मालवगणमधील पहिले अक्षर जे 'मा' आहे;

त्याचा अर्थ आई किंवा भूमी असा असून लवगणाची 'मा' म्हणजे लवगणाची भूमी (= प्रदेश) असा अर्थ निघू शकतो व मालवगण यावरूनसुद्धा, म्हणजे रामपुत्र लवापासून उत्पन्न गणाची भूमी यावरून मालवगण शब्द रूढ झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. दंतकथेनुसार लवाने वसविलेले लवपूर (लाहोर) सप्तसिंधूच्या मालवगणाच्या प्रदेशातीलच आहे. तथापि, हे विधानही सत्य वाटत नाही. कारण, एकतर लवाची राजधानी श्रावस्ती सप्तसिंधू प्रदेशापासून खूपच लांब असल्याने व सप्तसिंधूवर लवाचे अधिराज्य असल्याचे पुराणग्रंथांमध्येही कुठे उल्लेख आढळत नसल्याने लाहोर (लवपूर) लवाने वसविले असण्यास कोठेही आधार नाही.

सुप्रसिद्ध इतिहासकार म.म.वा.वि. मिराशी व ग.ह. खरे हे भारतात आलेल्या पहलवांना (पल्लवांना) इराणमधून आलेल्या पर्थियन वंशाचे मानतात. इराणमध्ये त्यांना पहलव म्हणत आणि क्षत्रप रूद्रदामनच्या गिरनार येथील शिलालेखात पर्थियन अधिकाऱ्याला पहलव म्हटले आहे.[१७] यातील दोन अक्षरांचा म्हणजे 'पह'चा लोप पावला तर राहतो फक्त लव आणि 'पा'पासूनही लेवा वंश निर्माण झाला असण्याची एक संभावना आहे.

संस्कृतमध्ये लवः = कापणी, शेताची कापणी; आणि लवनं = शेताची कापणी, विळा, कोयता असा अर्थ होतो.[१८] म्हणजे शेताची कापणी करणारा व हाती विळा बाळगणारा याअर्थी लवाची उत्पत्ती झाली असावी आणि पाटीदार = शेतकरी, म्हणजेच लेवा पाटीदारांचा अर्थ प्रत्यक्ष हंगाम काढणारा शेतकरी, असा निघू शकतो. तद्वतच लवनंवरून लेवा गणबोलीत 'लानी करणे' रूढ झाले असावे. लेवा पाटीदारांमध्ये ज्वारीच्या लानीस अनन्यसाधारण महत्त्व असते.

ग्रीसमध्ये लेवादीअ व लेमीअ प्रदेशांची सपाट भूमी आहे. तसेच तुर्कस्तानच्या बाजूस भूमध्य समुद्रात लेवांटनामक बेटसमूह आहे.[१९] या लेवांटमार्गे ग्रीसचा सिंधशी व्यापारी संबंध होत असे.[२०] तद्वतच अलेक्झांडरने हिंदुस्थानवर इ.स.पू.च्या तिसऱ्या शतकात स्वारी केली; त्या वेळी उपरोक्त लेवादीअ प्रदेशातून ग्रीक लोक हिंदुस्थानात आले असणे शक्य आहे व लेवादीअ प्रदेशातील लोकांना लेवा असे संबोधण्यास वाव आहे, हे खरे वाटत नाही. तथापि, संशोधनास वाव आहे. बरीगझाच्या (भडोच) बौद्ध भिक्षूंचाही लेवांटशी संबंध जोडला जातो.[२१] आणि तसे मानल्यास इ.स.च्या ४८५ सालाऐवजी इ.स.पू.च्या तिसऱ्या शतकाला लेवा पाटीदारांच्या भारतातील आगमनाचा क्रम द्यावा लागेल. म्हणून हे खरे वाटत नाही.

रेवा शब्दाशी संबंधच जोडायचा तर बलरामपत्नी रेवती व तिचे वंशज, रैवतक पर्वत (गुजरात-राजस्थान सीमेवरील पर्वत), माळव्यातील रेवा जिल्हा (पूर्वीचे संस्थान ज्यात अजूनही पाटीदारांची वस्ती आहे) यांच्याशीही जोडता येईल. नांगरधारी बलरामाची पत्नी रेवतीस झालेला वंश, जो बळीराजा म्हणजे शेतकरी (गुजराती व

हिंदीत पाटीदार) म्हणूनही रेवतीपासून रेवा आणि शेतकरी म्हणजे पाटीदार या अर्थानेही रेवा पाटीदार शब्द रूढ झाला असावा व तशी शक्यता असल्यास रेवा (लेवा) पाटीदारांचा वंश जो ईक्ष्वाकूचा सूर्यवंश मानतात; तो न मानता बलरामाचा यादववंश मानावा लागेल. मात्र, याला पुराणातही आधार नाही. यासाठी अधिक संशोधनाची आवश्यकता आहे.

पाटीदार हे मूळ आर्य क्षत्रिय असून त्यांना कणबी अथवा कुणबी मानले जाऊ लागले; ते त्यांच्या शेती करण्याच्या व्यवसायावरून. कुणबी हे जातिवाचक नाव नसून कुणबिकी म्हणजे शेती करणाऱ्या लोकांचा समूह! तरीदेखील, कालांतराने कुणबी अथवा कणबी व पाटीदार (शेतकरी) या स्वतंत्र जाती निर्माण झाल्या. कुणबी शब्द कुळंबी अथवा कौटुंबिक या शब्दावरून आला आहे. पंडित भगवानलाल इंद्रजी यांच्या मते या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत शब्द 'कुंटुंबिन्'पासून झाली असावी. त्यांच्या मते प्राचीन काळापासून कुंटुंबिन् हे उपपद शेतकऱ्यांच्या नावामागे लावण्याचा प्रघात आहे.[२२] फोर्बसच्या मते अकराव्या शतकामध्ये खेड्यात कुटुंबिक किंवा शेतकरी राहत असत.[२३] उत्तरेकडून आलेल्या गुर्जर लोकांचा गुरांची पैदास करणे व दूधदुभत्याचा व्यवसाय होता. परंतु, जे गुर्जर शेती करू लागले, त्यांना लोक कुणबी म्हणू लागले. काहींच्या मते खानदेश - वऱ्हाडातील गुजर हे उत्तरेकडून आले असून त्यांच्याबरोबरच पाटीदार लोकही या भागात आलेले आहेत.[२४] गुजर व पाटीदारांचा सामाजिक दर्जाही समान आहे. गुजरातमधील लेवा कणबी उत्तरेकडील गुर्जर वंशाचेच आहेत.[२५] कुणब्यांना मराठीत कुणबी, गुजरातीत कणबी व हिंदीत कुरमी असे संबोधतात.

पाटीदारांप्रमाणेच पाठारे प्रभू ही जातदेखील प्रतिहारांपासून उत्पन्न झालेली प्रशाखा (Offshoot) आहे. पी.बी. जोशींच्या मते पाठारे हे कनौज व राजस्थानातील प्रतिहारांचे वंशज होते. इ.स. १०१८मध्ये गझनीच्या महमूदाने कनौजवर स्वारी करून प्रतिहार घराण्यातील शेवटचा राजा राजपाल याचा पराभव केल्यानंतर बरेच प्रतिहार किंवा पाठारे प्रभू यांचे पूर्वज पैठणला राजाश्रयार्थ आलेत.[२६] म्हणजेच, असिर खिंडीतून अकराव्या शतकाच्या प्रारंभी दक्षिणापथाने हे लोक खानदेशात आलेत व त्यांच्यातील काही एदलाबादहून पुढे रोहिनखेड घाटातून पैठणला गेले असावेत. त्यांना पाताणे असेही म्हणतात. लेवा पाटीदारांना पाजणे असे म्हणतात. यात काहीतरी साम्य नक्कीच असावे.

पाठारे प्रभू लोक स्वतःला क्षत्रिय समजतात. त्यांचे क्षत्रियत्व शृंगेरी मठाच्या शंकराचार्यांनी मान्य केले आहे. **सह्याद्री** खंडाच्या २८व्या अध्यायानुसार पाठारे प्रभूंच्या आद्यपुरुषाने भृगू ऋषींचा अपमान केल्यामुळे भृगूने त्याला ''तुझे राज्य जाईल'' असा शाप दिला. त्यावर राजाने क्षमा मागितली तेव्हा भृगूने ''तू

कारखानविसी (accountancy) अथवा कारकुनी (economizing) करून ऊर्जितावस्थेत येशील''[२७] असा उःशाप दिला. यामुळे पाठारे प्रभू लेखनिक झालेत. हीच कथा लेवा पाटीदारांनाही लागू झाली असावी व म्हणून ते सारा वसूल करणारे पट्टीदार (revenue officer) झाले असावेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लेवा पाटीदारांमध्ये भृगू अथवा भार्गव गोत्री बरीच कुळे आहेत. उदा. सरोदे, झांबरे, भंगाळे, वाळके, खाचणे, भोळे, भारंबे इत्यादी.

खानदेश-वऱ्हाडात लेवा पाटीदारांना कुणबी असेही म्हणतात. पांजणे शब्द पावाखंड (पावागड) शी जोडला जात असून पूर्वी पावागड गुजरातचा भाग मानत.[२८] गुजरातवर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊ लागल्यावर खेडा जिल्ह्यातील लेवा पाटीदारांमधील काही लोक पावागड येथे स्थलांतरित झाले. तेथे ते काही पिढ्या राहिले. पावागडही मुसलमानांनी ताब्यात घेतल्यावर तेथून ते खानदेशात आले. इकडे आल्यावर साळी कारागिरांबरोबर (विणकर) सुतास ब्रशासारख्या फणग्याने पांजण्याचे[२९] काम करू लागल्याने त्यांना पांजणा नाव प्राप्त झाले.[३०] पुढे शेती करू लागल्याने त्यांना पांजणा कुणबी नाव प्राप्त झाले. पांजणा कुणबी म्हणजे खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार होत. पांजणाबाबत दुसरी व्युत्पत्ती आंजणा कुणब्यांवरूनही निघू शकते. राजपुतांसारखी चेहरेपट्टी असलेले व नावामागे सिंग लावणारे नवसारी प्रांतातल्या वन्यधर्मी ३३ गोत्री चोधा वंशाचे कुणबी जे रामानुज, शैव व स्वामिनारायण पंथीय आहेत; ते एकतर पावागडला पाटीदारांसोबत आले असावेत व त्यांच्या साहचर्यामुळे आंजणाचा अपभ्रंश होऊन पांजणा हे नाव प्राप्त झाले असावे. पांजणाबाबत आणखी एक शक्यता असू शकते आणि ती म्हणजे लेवा पाटीदार नंदुरबारमार्गे खानदेशात आलेत ते धुळे जिल्ह्यातील साक्री, धुळे व सिंदखेड तालुक्यांमध्ये वाहणाऱ्या पांझरामार्गे आले असावेत म्हणून त्यांना पांजणा नाव मिळाले असावे. हे अनुमान खरे वाटत नाही. वऱ्हाडातील काही जुन्या जाणकारांच्या मते लेवा पाटीदारांची पाच (पंच) जण (कुटुंबे) खानदेशातून वऱ्हाडात आलीत. या पाच कुटुंबांचा पुढे विस्तार वाढला. त्यांच्या मते पाच जण यावरून या लोकांना पांजणा हे नाव प्राप्त झाले आहे.

पूर्वी खानदेशी कुणब्यांच्या सात शाखा मानल्या जात. १) घाटोळे - हे अजिंठा घाटावरून आले, २) लोणी - गिरणा व तापी नदीच्या काठचे, ३) कुंभार - व्यवसायाने शेतकरी, ४) वंजारी - व्यवसायाने शेतकरी, ५) पांजणे - शेतकरी (लेवा पाटीदार हे पांजणे होय), ६) तिडोले किंवा तिरोळे - हे उत्तर हिंदुस्थानातून आले आहेत व ७) मदराज - शेतकरी (आता कोणी मदराज कुणबी असल्याचे सांगत नाही.) यातील सर्वच जण आपली शाखा श्रेष्ठ असल्याचे मानत. त्यांच्यात रोटीव्यवहार होतात; परंतु बेटीव्यवहार होत नाहीत.

गुजरातमध्ये सत्पंथाचा स्वीकार करणारे मतिया कणबी आणि स्वामिनारायण पंथी मोम्ना कणबी बहुतांश पाटीदार आहेत आणि खानदेशातील फैजपूर परिसरात सत्पंथी लेवा पाटीदारांची संख्या बरीच मोठी आहे. तसेच रावेर व यावल तालुक्यांमध्ये सावदे, सातोद, कोळवद, सांगवी, न्हावी, कठोरे भागात स्वामिनारायण पंथी लेवा पाटीदारांची वस्ती आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत खानदेश - वऱ्हाडात गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या लेवा पाटीदारांमध्ये काही क्षुल्लक कारणांवरून मतभेद झाल्याने रेवे किंवा सावदेकर, नवघरे किंवा गाडेगावकर, कंडारकर आणि थोरगव्हाणे या ग्रामनामांवरून पोटशाखा निर्माण झाल्या. या पोटशाखांना अंतर्विवाही गटांचे (Endogamous groups) स्वरूप प्राप्त झाले. याविषयी अधिक माहिती **इतिहास** प्रकरणात दिली आहे.

निष्कर्ष :-

१) 'पाटीदार' हा शब्द 'प्रतिहार'चा अपभ्रंश असणे अधिक संभवनीय आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते 'प्रतिहार'वरून 'पाटीदार' शब्दाची व्युत्पत्ती झाली असावी. प्राचीन काळी म्हणजे सुमारे १७०० - १८०० वर्षांपूर्वी अगदी कुशाण काळापासून प्रांताधिकारी नेमण्याची प्रथा सुरू झाली होती. या प्रांताधिकाऱ्यांना क्षत्रप किंवा प्रतिहार किंवा सामंत (मंत्री) असेही म्हणत. संस्कृतमध्ये त्यांना 'पाटीदार' (पट्टीदार) असे म्हणत. तद्वतच संस्कृतमधील पाटीचा अर्थ अंकगणित असा असून आकडेमोड करणारा हिशेबनीस किंवा महसूल अधिकारी (revenue officer) यावरून 'पाटीदार' शब्द रूढ झाला.

२) पुढे या पाटीदारांनी शेतीचे पट धारण केले म्हणून 'पट धारण करणारा शेतकरी' हा शब्द मध्ययुगीन काळात रूढ झाला.

३) लेवा हा शब्द रामपुत्र लव यापासून निर्माण झाला, असे मानण्यापेक्षा ज्या रेवा नदीच्या खोऱ्यात उपरोक्त (२) मधील शेतकरी स्थिरावरले; त्या रेवा नदीवरून रेवा पाटीदार व अपभ्रंशाने लेवा पाटीदार अशी व्युत्पत्ती झाली. गुजरात व मध्य प्रदेशाच्या पश्चिम भागात नर्मदा नदीस 'रेवा' असे संबोधतात.

४) 'लेवा'ची दुसरी व्युत्पत्ती 'मालव' शब्दावरूनही संभवनीय वाटते. मल्लोई लोक प्रथम सप्तसिंधूमधील मालव प्रदेशात आलेत. त्यावरून त्यांना मालवगण हे नाव प्राप्त झाले व हे लोक नंतर मध्य प्रदेशाच्या पश्चिम भागात येऊन स्थिरावले. त्यांच्या वास्तव्यामुळेच त्या प्रदेशास 'मालवा' किंवा 'माळवा' हे नाव प्राप्त झाले आहे. पूर्वी यांना लवगण म्हणजे लवलोक म्हणत व मा म्हणजे भूमी आणि लव लोकांची भूमी यावरून त्या प्रदेशास मालव हे नाव पडले. 'लव'चा पुढे 'लेवा' होणेही संभवनीय आहे. येथे रामपुत्र लवापासून उत्पन्न झालेली 'प्रजा' म्हणजे

लवगण हा अर्थ मात्र पुराणाशी जोडलेला दिसतो. रामपुत्र लवाची राजधानी श्रावस्ती ही होती. श्रावस्ती हे गाव उत्तर प्रदेशात अयोध्येच्या उत्तरेस नेपाळ सीमेलगत आहे आणि लेवा पाटीदारांचे पूर्वज (गुर्जर) दुसऱ्या ते पाचव्या शतकात हिंदुस्थानात आले असल्याने त्यांचा संबंध **रामायणाशी** जोडणे उचित वाटत नाही. तद्वतच श्रावस्ती गाव हूण, गुर्जर, शक, कुशाण, पल्लव यांच्या येण्याच्या मार्गावरही नाही. तथापि, मालवपासून लेवा अशी व्युत्पत्ती मानल्यास लेवा पाटीदारांचे पूर्वज; जे गुर्जर टोळ्यांपैकी आहेत; त्यापैकी 'मल्लोई' हे मानावे लागेल व त्यांचा हिंदुस्थानात येण्याचा क्रम ६०० ते ७०० वर्षे आधी जाईल. यासाठी अधिक संशोधनाची गरज आहे. कारण, हे लोक हिंदुस्थानात इ.स.पू.च्या तिसऱ्या व दुसऱ्या शतकात आलेले आहेत. म्हणून, तूर्त मालववरून लेवांची व्युत्पत्ती ग्राह्य धरलेली नाही.

तळटीपा

१. य.रा. दाते, चिं.ग. कर्वे (संपा.) **महाराष्ट्र शब्दकोश;** खंड ५, पृ. १९८२, १९१४.
२. आर.के. मुखर्जी, **एन्शंट इंडिया,** १९५६; **भारतीय संस्कृतिकोश,** खंड २, पृ. ४३९.
३. **गॅझेटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडन्सी;** खंड ९, भाग १, १९०१ ,पृ. १६६.
४. य.रा. दाते, चिं.ग. कर्वे, पूर्वोक्त, पृ. १९१४.
५. कित्ता.
६. **खानदेश गॅझेटिअर,** १९८०, पृ. ६८.
६ अ. **बरोडा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७९, (हे विधान दि. १६ जून २००६ च्या **टाइम्स ऑफ इंडिया**मधून घेतले असून त्यात **बरोडा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर**ऐवजी **बॉम्बे गॅझेटिअर** असा उल्लेख केला आहे.)
७. **कैरा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १८८२, पृ. ३१.
८. वुल्स्ली हेग (संपा. व लेखक), 'गुजरात अॅण्ड खानदेश', **केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया** खंड ३, १९३८, पृ. ३०९.
९. **राजस्थान की जातिया,** १९५४ (श्री. शं.वि. पाटील, **लेवा पाटीदारांचा इतिहास,** १९९९); **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ५.
१०. रेव म्हणजे उडी मारणे, यावरून रेवा म्हणजे उड्या मारत जाणारी म्हणजेच अवखळ या अर्थाने हे नाव पडले आहे.
११. चरोतर भाग मही नदीच्या दोन्ही बाजूस नर्मदेच्या उत्तरेस लागूनच व साबरमतीच्या पूर्वेस वत्रक नदीच्या पश्चिमेस असलेला भाग आहे. यात खेडा जिल्हा व भडोच उत्तरेकडील भाग आणि बडोद्याच्या पश्चिमेकडील भाग मोडतो.
१२. मनसाराम शर्मा, **पंजाब : जीवन और साहित्य,** १९६१; श्री. शं.वि. पाटील, **लेवा पाटीदारांचा इतिहास,** १९९९.
१३. सी.व्ही. चित्राव, **प्राचीन चरित्रकोश,** १९६१; **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ४४३-४४.

१४. **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. २७३.
१५. रेव्ह. शेरिंग्ज, **हिंदू ट्राइब्ज ॲण्ड कास्ट्स,** व्हा ३, पृष्ठ २५८.
१६. कॅम्बेल, जेम्स एम., **गॅझेटिअर ऑफ गुजरात पॉप्युलेशन**, व्हा ९, भाग १ मुंबई, १९०१.
१७. वा.वि. मिराशी, ग.ह. खरे. 'पल्लव वेश', **मराठी विश्वकोश,** खंड ९, पृ. ३०५.
१८. ज.वि. ओक, **गीर्वाणलघुकोश,** द्वारकाबाई ओक तथा सरस्वतीबाई आपटे, जमशेदपूर, १९६०, पृ. ४११.
१९. **मराठी विश्वकोश,** खंड ५, पृ. ४३४ व नकाशा.
२०. ए.एल. बशम, **कल्चरल हिस्टरी ऑफ इंडिया,** ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, कलकत्ता, चेन्नई, १७७५, पृ. ४३५.
२१. कित्ता, पृ. ४२५ व ३४०.
२२. आर.ई. एन्थोवेन, **कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** खंड २, १९२२, पृ. २८४.
२३. आर.व्ही. रसेल, हिरालाल, **ट्राइब्ज ॲण्ड कास्ट्स इन दी सेंट्रल प्रोव्हिन्सेस ऑफ इंडिया,** खंड ४, पुनर्मुद्रित, १९९३, पृ. १७.
२४. **बुलडाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९९०, पृ. १२४.
२५. कित्ता पृ. १२४.
२६. त्रि.ना. वाळुंजकर, 'महाराष्ट्रातील लोक', **महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर - महाराष्ट्र : भूमी व लोक,** (संपा. डॉ. कि.का. चौधरी), १९९६, पृ. ६५-६६.
२७. त्रि.ना. वाळुंजकर, पूर्वोक्त, पृ. ६६.
२८. **बुलडाणा गॅझेटिअर,** १९१०, पृ. १२५.
२९. **जळगाव गॅझेटिअर,** १९९४, पृ. १८३, पांजणा म्हणजे वस्त्र विणण्याआधी सुतास लावायची खळ व पांजणे म्हणजे विणकराचे सूत खळीने युक्त करणे - दाते, बर्वे (संपा), पूर्वोक्त, खंड ५, पृ. १९७७.
३०. लेवा पाटीदारांच्या वंशावळी ठेवणाऱ्या भाटांच्या मुलाखतींवरून - **जळगाव गॅझेटिअर,** १९९४, पृ. १८३.

✧✦✧

प्रकरण - २

पूर्वजांचा इतिहास

पाटीदारांचे मूळ पूर्वज आर्य असून आर्य हे कृषिकर्माचा व्यवसाय करणारे होते व ते आर्य अयोयुगात (कृषितंत्रादी युग = इ.स.पू. १५०० ते इ.स.पर्यंत) इराणमध्ये व त्यानंतर चौथ्या, पाचव्या शतकांपर्यंत (मुस्लिमवगळता आधी आलेले सर्व) इराणमार्गे सप्तसिंधू प्रदेशात म्हणजे पंजाबात आलेत आणि तेथून ते राजस्थान, गुजरात व मध्य प्रदेशमार्गे खानदेश - वऱ्हाडात आले. मानववंशशास्त्रज्ञांनुसार लेवा पाटीदार लोक **लंब कपाल** (Dolichocephalic) गटातील **मध्यम नासिका** (Mesorrhine) **व बृहत् परिघ मस्तकाचे** (Large Circumference Head) आहेत. या गुणधर्मामुळे ते ऑस्ट्रलाइड - युरोपीय वांशिक गटातील म्हणजेच आर्यांपासून उत्पन्न गटातील आहेत.[१] लेवा पाटीदार हे लंब कपाल (कपालांक ७७), मध्यम नाक (नासिकांक ७० - ८५) आणि मोठ्या परिघाचे डोके (५३२ +) या वांशिक गटात मोडत असल्याचे सूत्र खाली दिले आहे.

अ) **कपालांक (कपाल निर्देशांक)**

$$= \frac{\text{कपालाची अधिकाधिक रुंदी (मि.मी.)}}{\text{कपालाची अधिकाधिक लांबी (मि.मी.)}} \times १००$$

(यानुसार लंब कपाल ७७, मध्यम कपाल ७० व पृथू कपाल ८२ + असे कपालांक आहेत.)

ब) **नासिकांक (नाक निर्देशांक)**

$$= \frac{\text{नासिकेची अधिकाधिक रुंदी (मि.मी.)}}{\text{नासिकेची अधिकाधिक लांबी (मि.मी.)}} \times १००$$

(यानुसार अरुंद नाक ५९-७०, मध्यम नाक ७० - ८५ व पसरट नाक ८५-१०० असे नासिकांक आहेत.)

क) **मस्तकांक** (= डोके परिघ हा ५१८.७२ मि.मी. ते ५४६.२० मि.मी. असतो. त्यावरून

लघू परिघ मस्तक = ५१८ ते ५३२ मि.मी. आणि

दीर्घ परिघ मस्तक = ५३२ मि.मी. चे वर असते.

इरावती कर्वे यांनी लेवा पाटीदारांचा पिंड (Basic trait) खालीलप्रमाणे दाखविला आहे.

१)	डोक्याचा घेर (मि.मी.)	५३७.४३
२)	डोक्याचे सापेक्ष प्रमाण	७४.५०
३)	नाकाच्या उंचीचे प्रमाण	११९.२३
४)	नाकाच्या लांबी-रुंदीचे सापेक्ष प्रमाण	७६.९८
५)	वरच्या जबड्याच्या लांबीचे प्रमाण	४७.२५
६)	चेहरा व डोके यांच्या रुंदीचे प्रमाण	९६.२२

आणि हाच निर्देशांक म्हणजे कपालांक (सिफॅलिक इंडेक्स) गुजर व पवार (परमार) समाजाचाही असून त्या गुर्जरांपासून उत्पन्न झालेल्या जाती आहेत.

लेवा पाटीदारांच्या पूर्वजांच्या इतिहासाचे १) **पौराणिक कथांवर आधारित इतिहास,** म्हणजे पुराणानुसार अंदाज केलेला आणि २) **वास्तव इतिहास** म्हणजे उपलब्ध साधनसामग्रीनुसार संकलित केलेला इतिहास असे दोन भाग पाडता येतील. पौराणिक इतिहास सत्य मानण्यास काहीही आधार नाही. पौराणिक कथांचे काही जाणकार व भाटांनी सूर्यवंशी, ईक्ष्वाकू, रामपुत्र लव तसेच पृथूराजाशी संबंध जोडला असल्याने अथवा तसा प्रयत्न केला असल्याने येथे पौराणिक इतिहासाचा आढावा दिला आहे. याचा अर्थ असा नव्हे की, प्रस्तुत लेखक त्यांच्याशी सहमत आहे. लेवा पाटीदार हे हुणांबरोबर दुसऱ्या ते पाचव्या शतकात आलेल्या टोळ्यांपैकी आहेत, असे गृहीत धरल्यास वास्तव इतिहासाचा अंदाज बांधता येतो.

उरल पर्वताच्या दक्षिणेस असलेल्या गवताळ प्रदेशातून नॉर्डिक वंशाचे लोक प्रथम इराण व इराक प्रदेशात येऊन वसले होते. इराक व आशिया मायनर या भागात वसलेल्या वन्य जातींच्या मानवांशी त्यांचा मिलाफ सुरू झाला. त्यामुळे

तिथून आलेल्या आर्य लोकांमध्ये नॉर्डिक व अल्पाईन अशी दोन प्रकारची माणसे होती. नॉर्डिक हे लंबशीर्ष, उंच, गोरे व सरळ नाकाचे असून यांनाच आर्य म्हणतात. त्यांचे डोळे निळे व केस पिवळे असल्याने प्राचीन वाङ्मयीन साहित्यात आर्यांचे वर्णन असेच आहे. वायव्य सीमा भागात त्यांचे मूळ रूप तसेच आढळते. पंजाब, राजस्थान व गंगेचे खोरे या प्रदेशात उच्च वर्गातील माणसांत या वंशाचा अंश पुष्कळ आढळतो. हवामान आणि वंशसंकर यामुळे आर्यांच्या त्वचेचा, डोळ्यांचा व केसांचा रंग पुष्कळ बदलला आहे. अल्पाईन हे लोक भारतात सर्वत्र आढळतात. हे पृथुशीर्ष, मध्यम उंचीचे, गव्हाळ - गौर रंगाचे असून त्यांचे नाक उंच व सरळ असते.[२]

मूळ आर्य लोक शेती व पशुपालन करून राहणारे होते. त्यांना तांबे व कथिल हे धातू माहीत होते; त्याचप्रमाणे रजत (चांदी) हा धातूही परिचित होता. कुऱ्हाड, धनुष्यबाण, भाला व गोफण ही त्यांची आयुधे होती. ते लोखंडी शस्त्रांप्रमाणे युद्धाला उपयोगी असे रथही वापरित होते. त्यामुळेच ते भारतातील पूरवासी (मूळ ग्रामे वसवून वस्ती करून असलेले) द्रविड लोकांना जिंकू शकले. त्यांना वस्त्र विणण्याची कलाही माहीत होती. आर्य लोक भारतात प्रथम वायव्य सरहद्द व पंजाब प्रांतात आलेत. वायव्य सरहद्द व पंजाब ही नावे मिळण्यापूर्वी **ऋग्वेद** काळात या प्रदेशास सप्तसिंधू असे नाव होते व त्यास आर्यावर्त असेही म्हणत. **ऋग्वेदातील नदी सूक्तात** (१०.७५) सप्तसिंधूच्या प्रदेशात कुभा (काबूल नदी), क्रुमू (कुर्रम), गोमती (गोमल), सिंधू, परुष्णी (रावी), शुतुद्री (सतलज), वितस्ता (झेलम), सरस्वती, यमुना व गंगा या प्रमुख नद्या वाहत होत्या. पुढे हळूहळू आर्य सप्तसिंधूच्या प्रदेशातून पूर्वेकडे सरकू लागले. नंतरच्या काळात कुरुपांचाल व कोसलविदेह हे दोन देश आर्यांचे संस्कृतीस्थान बनले.[३]

पौराणिक इतिहास

रामायण काळात लवाने लाहोर (लवपूर) वसविल्याच्या दंतकथा आहेत. **रामायण काळा**नंतर होऊन गेलेल्या **महाभारत** काळात सप्तसिंधूमधील (पंजाब) कुरुक्षेत्र ही कौरव-पांडवांची युद्धभूमी. इ.स.पू. ५२१ ते इ.स.पू. ४८५ या काळात डरायसच्या नेतृत्वाखाली इराण्यांनी पंजाबचा पश्चिम भाग ताब्यात घेतला होता. पुढे कित्येक वर्षे त्यांचे अधिकारी वंशज पेशावर, तक्षशिला व रावळपिंडी येथे राज्य करीत होते. पुराणकाळातील (इ.स.पू. सहाव्या शतकाच्या आरंभी) म्हणजे प्राचीन भारत काळात बौद्ध व जैन वाङ्मयात आर्यवंश असलेल्या अंग, मगध, काशी, कोसल, वृब्जी, मल्ल, चेदी, वत्स्य, कुरू, पंचाल, मत्स्य, शूरसेन, अश्मक, अवंती, गंधार आणि कंबोज या १६ महाजनपदांमधील शेवटच्या १० महाजनपदांमध्ये पाटीदार क्षत्रियांचे पूर्वज स्थित झाले असावेत. यात चेदी हे सध्याचे वघेलखंड असून राजधानी

शुक्तिपती व रेवा होती आणि विस्तार दक्षिणेस नर्मदेपर्यंत होता. वत्स हा यमुनेकाठचा प्रदेश असून राजधानी यमुनेच्या दक्षिण तीरावरील कौशाम्बी होती. कुरूची राजधानी इंद्रप्रस्थ होती. पंचालमध्ये हिमालय ते चंबळपर्यंत भाग मोडत होता. मत्स्यमध्ये चंबळ ते सरस्वती या नद्यांमधील भाग समाविष्ट होता. शूरसेनची राजधानी मथुरा होती. गोदावरीच्या दक्षिणेकडील भाग (काही विद्वानांच्या मते सध्याचा खानदेश भाग) अश्मक होता. पेशावर - रावळपिंडी भाग गंधारमध्ये मोडत होता व कंबोजमध्ये वायव्य सरहद्द प्रांतातील हजारा जिल्ह्याचा समावेश होता.[४]

या आधीच्या कृषिकर्म करणाऱ्या क्षत्रिय अथवा क्षत्रियांच्या पुराणकथांनुसार इतिहासाच्या मुळापर्यंत जावयाचे झाल्यास सहावा मनू चाक्षुषचा पणतू पृथुवैन किंवा सातवा मनू वैवस्वतपुत्र ईक्ष्वाकूपर्यंत थोडक्यात इतिहास पाहावा लागेल. मात्र, पुराणकथांनुसारचा इतिहास आणि वास्तव इतिहास यात खूप अंतर असून वास्तव इतिहासात विश्वसनीय पुराव्याशिवाय मागे जाता येत नाही. पुराणांनुसार मनुष्यजातीचा पहिला पूर्वज किंवा पहिला मनुष्य म्हणजे मनू होय, असे **ऋग्वेदात** म्हटले आहे, आणि मनूवरूनच मानव, मनुष्य, मनुज हे मनुष्यवाचक शब्द रूढ झाले. मनूच्या आणि **मनुस्मृतीच्या** इतिहासाच्या खोलात शिरण्याचे येथे प्रयोजन नाही. पुराणांमध्ये समाजाच्या प्राचीन प्रशासकाचे अधिकारपद असणारास मनू अशी संज्ञा होती. हा प्रशासक युग बदलल्यानंतर युगानुरूप धर्मव्यवस्था निर्माण करतो. त्याला सप्तर्षींचे साहाय्य असते. लोकांनी विवस्वानाचा मुलगा मनू यास राजा केले. धान्याचा षष्ठांश आणि धनाचा दहावा अंश या राजास द्यावा लागे. **भगवद्गीतेत** चार मनू परमेश्वरापासून निर्माण झाले, असे म्हटले आहे. हल्ली प्रचलित असलेल्या **मनुस्मृतीत** स्वायंभुव मनूच्या वंशात स्वायंभुवसह स्वारोचिप, उत्तम, तामस, रैवत, चाक्षुष, वैवस्वत हे झालेले सात मनू आणि सावर्णी (अर्कसावर्णी), दक्षसावर्णी, ब्रह्मसावर्णी (मेरू सावर्णी), धर्मसावर्णी, रूद्रसावर्णी (ऋतसावर्णी किंवा ऋथू), रौच्य (देवसावर्णी ऋतधामन्), मौत्य (विश्वकसेन, इंद्रासावर्णी, चंद्रसावर्णी) हे होणारे सात मनू असे एकूण १४ मनू आहेत. पौराणिक कालगणनेप्रमाणे सृष्टीनिर्मितीपासून सृष्टीच्या अंतापर्यंतच्या कालाचे १४ विभाग मानले असून त्यांना मन्वंतर अशी संज्ञा आहे. प्रत्येक मन्वंतराची कालमर्यादा ४३ लाख २० हजार वर्षे मानली आहे. हल्लीचे मन्वंतर सातवे असून वैवस्वत मनू हा मन्वंतराचा अधिपती आहे. याचा उल्लेख **भगवद्गीतेमध्ये** आला आहे. भगवंतांनी कर्मयोगाचा प्रथम उपदेश विवस्वानाला केला, विवस्वानाने स्वतःचा पुत्र मनू यास केला, मनूने आपला पुत्र ईक्ष्वाकू याला केला, असे तेथे म्हटले आहे.[५]

लेवा पाटीदारांच्या व्युत्पत्तीचा संबंध रामपुत्र लवाशी लावला जातो. लेवा पाटीदारांची व्युत्पत्ती लवापासून झाल्याचे मानल्यास रघुवंशातील सूर्यवंशातील ईक्ष्वाकूची

वंशावळ पाहणे उचित ठरेल. मात्र, काही भाट लेवा पाटीदारांचे मूळ पृथूपर्यंत नेतात. अर्थात, हा काही भाटांचा कल्पनाविलास आहे. तरीसुद्धा, ईक्ष्वाकूचा वंश पाहण्याआधी सहाव्या म्हणजे चाक्षुष मन्वंतरामध्ये झालेल्या पृथूची थोडक्यात माहिती पाहू. - पृथुवैन्य अथवा पृथू (क्वचित पृथि किंवा पृथी) याचे नाव वैदिक वाङ्मयात अनेक ठिकाणी येते. **(ऋग्वेद, अथर्ववेद, पंचविंशब्राह्मण, जैमिनीय उपनिषद ब्राह्मण.)** तो कृषिविद्येचा संशोधक होता, असे **अथर्ववेदात** म्हटले आहे. (लेवा पाटीदार कृषिकर्म करणारे असल्याने भाटांनी यांच्याशी संबंध जोडला असावा). **पंचविंशब्राह्मणात** त्याला दोन्ही लोकांचा तसेच मनुष्य आणि पशू यांचा अधिपती म्हटले आहे. अनेक ठिकाणी त्याच्या नावाला वैन्य (वेनाचा पुत्र) हे उपपद लावले जाते. तो पृथ्वीचा पहिला राजा होता. पृथूविषयी जास्त माहिती **महाभारत, रामायण** व पुराणे यात मिळते. (**महाभारत, श्रीमद्‌भागवत, वायुपुराण, अग्निपुराण, वाल्मीकीरामायण, ब्रह्मांडपुराण** इ.) सहावा मनू चाक्षुष याचा नातू वेन हा मोठा दुष्ट व प्रजेचा छळ करणारा निघाला. त्याच्याविरुद्ध बंड करून प्रजेने त्याला ठार केले. त्यानंतर, देशात अराजक माजले तेव्हा ऋषींनी त्याचा पुत्र पृथू याला गादीवर बसविले. त्याने राज्याभिषेकाच्या वेळी 'मी निःपक्षपाताने राज्य करीन, जो कोणी अधर्म वर्तन करील त्याला शासन करीन आणि प्रजाजनांना पृथ्वीवरील ब्रह्म समजून त्यांचे पालन करीन.' अशी शपथ घेतली. नंतर, त्याने पृथ्वीवरील उंचसखल प्रदेश सपाट करून कृषीयोग्य केला. कृषी, पशुपालन, व्यापार यांना उत्तेजन दिले आणि नगरे व ग्रामे वसविली. पहिला अभिषिक्त राजा म्हणून त्याचे नाव अजरामर झाले. त्याच्या नावावरून भूमीला पृथ्वी हे नाव पडले, असे मानतात.[६] या पृथूची वंशावळ उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही. कारण, सहाव्या मन्वंतरातील वंश व कुळांची माहिती पुराणांमध्ये उपलब्ध आहे किंवा नाही, हे अजून लेखकास समजू शकले नाही.

सध्या सुरू असलेल्या सातव्या मन्वंतरात ईक्ष्वाकू वंश येतो. प्रमुख वंश दोन आहेत. एक सूर्यवंश व दुसरा चंद्र किंवा सोमवंश. काही तिसरा अग्निवंश मानतात. काही अग्निवंश हा सूर्यवंशच मानतात. ईक्ष्वाकू हा सूर्यवंशात मोडतो. वैवस्वत मनूच्या १० पुत्रांपैकी ईक्ष्वाकू हा सर्वात मोठा पुत्र होय (**भविष्यपुराण**, ब्राह्म ७९). याच्या उत्पत्तीची कथा अशी - एकदा मनूला शिंक आली व त्या शिंकेतून एक पुत्र उत्पन्न झाला. म्हणून मनूने त्याला ईक्ष्वाकू असे नाव ठेवले.[७] **(देवीभागवत व ब्रह्मपुराण).** नंतर मनूने त्याला राजवंश निर्माण करण्यास सांगितले व त्याच्या कार्याची रूपरेषा आखून दिली. ईक्ष्वाकू हा अयोध्येचा पहिला राजा होता. वसिष्ठ हा त्याचा कुलगुरू होय. ईक्ष्वाकूला मध्य प्रदेशाचे राज्य मिळाले होते. (**हरिवंश** १ - १०, **मत्स्यपुराण** १२ - १५). त्याने वसिष्ठांपासून अध्यात्मविद्या संपादून

परमपद प्राप्त करून घेतले.

ईक्ष्वाकूला १०० पुत्र होते व ज्येष्ठ पुत्राचे नाव विकुक्षी होते. ईक्ष्वाकूनंतर हाच अयोध्येचा राजा झाला. विकुक्षीपासूनच पुढे निमिवंश निर्माण झाला. ईक्ष्वाकूला दंडक नावाचा एक पुत्र होता. त्याच्याच नावावरून एका अरण्यास दंडकारण्य नाव पडले (**भागवतपुराण** ९.६, **विष्णूपुराण** ४.२). याच्या दहाव्या मुलाचे नाव दशाश्‍व असून तो माहिष्मतीचा राजा होता (**महाभारत** अनु. २.६). ईक्ष्वाकूने १०० पुत्रांना आपले राज्य वाटून दिले. शकुनिप्रभूती पुत्रांना उत्तर भारताचे आणि शांतिप्रभूती पुत्रांना दक्षिण भारताचे राज्य मिळाले. अयोध्येला ईक्ष्वाकूचे राज्य बराच काळपर्यंत नांदले. या वंशात अनेक थोर पुरुष होऊन गेले. पुराणांनुसार पुढीलप्रमाणे त्यांची वंशावळ निश्‍चित करता येईल. १) ईक्ष्वाकू, २) विकुक्षी (= देवराष्ट्र, शशाक), ३) पुरंजय (= ककुत्स्य इंद्रवाह), ४) अनेता (= सुयोधन, अयोधन), ५) पृथू,८ ६) दृषदश्‍व (= विश्‍वगव्य, विष्टराव्य), ७) आर्द्र (= आद्र, आंध्र, चांद्र), ८) युवनाश्‍व १, ९) श्रावत्स, १०) वत्सक (= वंशक, वत्सुक), ११) बृहदश्‍व, १२) कुवलाश्‍व (धुन्धुमार), १३) दृढाश्‍व, १४) प्रमोद, १५) हर्यश्‍व (प्रमोद व हर्यश्‍व हे दृढाश्‍वाचे भाऊ होते.), १६) निकुंभ, १७) संहताश्‍व, १८) कृशाश्‍व, १९) प्रसेनजित, २०) युवनाशुव

२१) मांधाता,

२२) अंबरीय, — २४) पुरुकुत्स,

२३) युवनाश्‍व ३,

२५) त्रसुदस्यू, २६) सम्मूत, २७) अनरण्य, २८) त्रसदश्‍व, २९) हर्यश्‍व, ३०) वसुमना (= वसुमान, सुमत, सुमती, सुधन्वा), ३१) त्रिधन्वा, ३२) त्रयारुण, ३३) सत्यव्रत (= त्रिशंकू), ३४) हरिश्‍चंद्र, ३५) रोहित, ३६) हरित, ३७) चंचू (= चंप, धन्धू), ३८) विजय, ३९) रूरूक (= भिरूक, कारूक, अर्लक), ४०) वृक, ४१) बाह (= असित), ४२) सगर, ४३) असंमजस (= पंचजन), ४४) अंशुमान, ४५) दिलीप १, ४६) भगीरथ, ४७) श्रुत (= विश्रुत, श्रुतवान), ४८) नाभाग, ४९) अंबरीश, ५०) सिंधुद्वीप, ५१) अयुतायू (= अयुसाजित), ५२) ऋतुपर्व, ५३) सर्वकाम, ५४) सुदास (= इंद्रसारव, हंसमुख), ५५) मित्रसह (= कल्याणपाद), ५६) सर्वकर्मा, ५७) अवरण्य, ५८) निघ्न, ५९) अनमित्र, ६०) रघू (या रघूवरूनच अयोध्येच्या सूर्यवंशी राजांना रघुवंश किंवा रघुकुल संज्ञा प्राप्त झाली. याच कुळात पुढे राम व लव निर्माण झालेत.), ६१) दलिदहू, ६२) दिलीप (= खटवाङ्ग) (दुसरी शाखा - कल्माषपाद - अश्मक - उरकाम - मूलक - शतरथ - इडविड

- वृद्धशर्मा - विश्वसह - दिलीप (खटवाङ्ग), ६३) रघू (= दीर्घबाहू), ६४) अज, ६५) दशरथ, ६६) राम, ६७) कुश (येथे लक्षात घेणे आवश्यक आहे की, कुश व लव यापैकी अयोध्येच्या गादीवर कुश बसला होता.), ६८) अतिथी, ६९) निषध, ७०) नल, ७१) नभ, ७२) पुण्यरिकाक्ष, ७३) क्षेमधन्वा, ७४) देवानीक, ७५) अहीनगू, ७६) सुधन्वा (= रूरू), ७७) पारिपात्र, ७८) शिल (= शल, दल, देवल), ७९) दल (= बल, बच्चल, अनल), ८०) उन्नाभ (= औंक, अलूक, उत्क, उक्थ), ८१) वज्रनाम, ८२) शंखन्, ८३) व्युशिताश्व (= युषिताश्व), ८४) विश्वसह, ८५) हिरण्यनाभ, ८६) परकौसल्य (हैरण्यनाम), ८७) ब्रह्मनिष्ठ (= वसिष्ठ, वरिष्ठ), ८८) पुश्य (= पुष्प), ८९) धृवसंधी (= अर्थसिद्धी), ९०) सुदर्शन, ९१) अग्निवर्ण, ९२) शिघ्र (= शिघत्त्ण), ९३) मरू (= मनू), ९४) प्रसुश्रुत, ९५) सुसंधी, ९६) अमर्षण (= अमर्ष), ९७) सहस्बान (= महस्बान), ९८) विश्रुतवान- (= विश्वभव), ९९) बृहद्‌बल. बृहद्‌बल हा महाभारत युद्धात कौरवांच्या बाजूने लढला व अभिमन्यूद्वारे मारला गेला.

कुशापासून बृहद्‌बलपर्यंतची वंशावळ ही कुशापासूनची आहे. श्री. पुरुषोत्तम भाई लच्छुभाई परीख (कडवा पाटीदार) यांनी त्यापुढेही सूर्यवंशाची वंशावळ शोधून काढली आहे. **क्षत्रिय शाखाओं का इतिहास, (क्षत्रिय शाखाओं की वंशावली,** १९१२, पृ. ३३१ च्या पुढे) व १९१२ च्या पुढे त्यात श्री. वासुदेव हरी पाटील (**लेवा पाटीदार दर्पण**, २००१, पृ. ८२-८४) यांनी भर टाकून इ. स. २००० पर्यंतची वंशावळ दिली आहे. ती पुढीलप्रमाणे - बृहद्‌बलाचा क्रम त्यांनी ९६ दिला असल्याने त्यापुढे क्रमांक दिले आहेत. ९७) उसक्षय, ९८) वतसव्यूह, ९९) प्रतिव्योमा, १००) दिवाकर, १०१) सहदेव, १०२) बृहद्‌श्व, १०३) भानुरथ, १०४) प्रतिताश्व, १०५) सुप्रतीक, १०६) मरुदेव, १०७) सनक्षय, १०८) किंभर, १०९) अंतरिक्ष, ११०) सुपर्ण, १११) अभियजित, ११२) बृहद्‌भाज, ११३) धर्मी, ११४) कृतंज्य, ११५) रणंजय, ११६) संजय, ११७) शाक्य, ११८) शुद्धोदन, ११९) राहुल, १२०) प्रसेनजित, १२१) क्षुद्रकः, १२२) कुण्डक, १२३) सुरथ, १२४) सुमिय, १२५) कूर्म, १२६) कच्छव, १२७) बुद्धिसेन, १२८) धर्मसेन, १२९) ध्वजसेन, १३०) लोकसेन, १३१) लक्ष्मोसेन, १३२) राजसेन, १३३) कामसेन, १३४) रविसेन, १३५) जसवंतसेन, १३६) महासेन, १३७) महावीर, १३८) रत्नाश्व, १३९) महारथी, १४०) धर्मागंद, १४१) अमरसेन, १४२) चंद्रसेन, १४३) अजय, १४४) अपरबाहू, १४५) इंद्रसेन, १४६) महीध्वज, १४७) अजयमहिप, १४८) बुजराजदेव, १४९) शिवा, १५०) देवपाल, १५१) रुक्षपाल, १५२) रविमहिप, १५३) सिद्धपाल, १५४) देवपाल, १५५) रुक्षापाल, १५६) रविसेन-२, १५७) सिद्धिमाईप, १५८) सिंधू, १५९) भिशंकू-२, १६०) श्याममहिण, १६१) धर्मदेव, १६२) कर्मवीर, १६३)

महीपाल, १६४) रक्षपाल, १६५) सुरथ, १६६) शील, १६७) शंभू, १६८) भीमदेव, १६९) शूरसेन, १७०) संजय, १७१) शंकरदेव, १७२) कृष्णदेव, १७३) कुश द्वितीय, १७४) यथोदव, १७५) राजभानू, १७६) कर्ममहिप, १७७) राममहिप, १७८) सुकीर्ती, १७९) अंजमहिप, १८०) श्याममहिप, १८१) अभियजित, १८२) कर्मराज, १८३) पुरुषोत्तम, १८४) वर्धमान, १८५) मरुदेव, १८६) भानुदेव, १८७) दिवाकरदेव, १८८) कीर्तिराय, १८९) प्रसेनजित, १९०) अजित, १९१) मंगल, १९२) ब्रह्मसेन, १९३) विक्रम, १९४) मूलदेव, १९५) अनंगपाल, १९६) सूर्यसेन, १९७) पालणदेव, १९८) रानपाल, १९९) पद्मपाल, २००) भीमपाल, २०१) नंदपाल, २०२) विजपाल, २०३) विष्णुपाल, २०४) धुंधपाल, २०५) कृष्णपाल, २०६) ज्ञानपाल, २०७) संग्रामपाल, २०८) पद्मपाल, २०९) धर्मपाल, २१०) रामपाल, २११) तुरतपाल, २१२) शूरपाल, २१३) शंकरपाल, २१४) किशनपाल, २१५) गौतमपाल, २१६) नल-२, २१७) दौला, २१८) लक्ष्मण, २१९) वज्रदामन, २२०) मंगलगज, २२१) सुमित्र-२, २२२) मधुह्म, २२३) कान्हीक, २२४) देवानीक, २२५) इशेसिंह, २२६) सोडदेव ढुंढाग राजा, २२७) दुल्हेराय, २२८) काकिलजी, २२९) हणूसजी, २३०) मल्हणजी, २३१) पंजवनजी, २३२) मलेसी, २३३) बिजलदेव, २३४) राजदेव, २३५) किल्हण, २३६) कुंतल, २३७) जुरसो, २३८) उदयकरण, २३९) नरसिंहदेव, २४०) वणवीरजी, २४१) उद्धरणजी, २४२) चंद्रसेनजी, २४३) पृथ्वीरावजी, २४४) भारमल, २४५) भगवानदास, २४६) मानसिंह, २४७) जगतसिंह, २४८) सवाई जयसिंह, २४९) माधोसिंह, २५०) प्रतापसिंह, २५१) जगतसिंह, २५२) जयसिंह-३, २५३) रामसिंह-२, २५४) माधोसिंह-२, २५५) मानसिंह, २५६) कर्नलभवानी सिंह, २५७) गजसिंह - (इ. स. २०००) ही झाली कुशाची वंशावळ!

उपरोक्त ग्रंथांमध्येच लवाची वंशावळही दिली आहे. त्यांना लवानंतर ५४ पिढ्यांची वंशावळी कुठेही मिळाली नाही. लवाच्या ५५ व्या पिढीपासूनची वंशावळ मात्र मिळाली आहे. ती पुढीलप्रमाणे - ५५) सुमित्रायू (वीर्यनाम), ५६) महारथ (महारथी), ५७) अंतरिक्ष, ५८) अचलन, ५९) कनकसेन (हाच कनकसेन विक्रमादित्याचा समकालीन मानला जात असल्याने इ.स.पू. ५६ मध्ये तो लाहोर येथे राज्य करीत असल्याचे मानले जाते), ६०) महामदसेन, ६१) शोणादित्य, ६२) विजयसेन विजयभूप, ६३) पद्मादित्य, ६४) शिवादित्य, ६५) घरादित्य हरादित्य, ६६) सुयशादित्य, ६७) सोमादित्य, ६८) शिलादित्य (कनकसेनाच्या आठ पिढ्यांनंतर या वंशातील वंशांनी सौराष्ट्र-गुजरातमध्ये राज्य स्थापन केले. संवत २०१ म्हणजे इ.स. १४५ च्या सुमारास वलभीस राज्य स्थापन करणारा हाच असावा.) ६९) ग्रहादित्य (गुहिक) ७०) भोज, ७१) महेंद्र, ७२) नागादित्य, ७३) शिलादित्य,

७४) अपराजित, ७५) महेंद्र-२, ७६) कालभोज (बापा), ७७) खूमाण, ७८) मतट, ७९) धनुक ८०) भर्तुभट, ८१) सिंह, ८२) खुमाण-२, ८३) सहायक, ८४) खुमाण-३, ८५) भर्तुभट-२, ८६) सिंह, ८७) खुमाण-२, ८८) सहायक, ८९) खुमाण-३, ९०) भर्तुभट-२ (पाचव्या शतकात इ.स. ४७५ चे सुमारास खुमाण-३ वा भर्तुभट-२ यांच्या वेळेस वलभीपूर शहर राष्ट्रकुटांचा सेनापती पुढे स्वतंत्र राजा भट्टारक हा असताना त्याने वलभीपूर जिंकल्याने खुमाण-३ रा भर्तुभट-२ वलभीपुराहून उदेपूर-जोधपूरकडे स्थलांतरित झाले.) ९१) अल्लट, ९२) नरवाहन, ९३) शालिवाहन, ९४) शक्तिकुमार, ९५) अंबाप्रसाद, ९६) शुचिवर्मा, ९७) नरवर्मा, ९८) कीर्तिवर्मा, ९९) योगराज, १००) वैरट, १०१) हंसपाल, १०२) वैरिसिंह, १०३) विजयसिंह, १०४) अरिसिंह, १०५) चोडसिंह, १०६) विक्रमसिंह, १०७) कर्णसिंह, १०८) राहप सिसोदिया, १०९) नरपती, ११०) दिनकर, १११) जसकरण, ११२) नागपाल, ११३) पूर्णपाल, ११४) पृथ्वीमल, ११५) भुवनसिंह, ११६) जयसिंह, ११७) लक्ष्मणसिंह - लक्ष्मणसिंहास दोन मुले अरिसिंह व अजयसिंह. अरिसिंहापासून राणाचा वंश व अजयसिंहापासून भोसला वंश सुरू झाला. ११८) अरिसिंह, ११९) महाराणा हमीर, १२०) क्षेत्र, १२१) लाखा, १२२) मोकल, १२३) महाराणा कुंभा, १२४) रायमल, १२५) महाराणा सांगा, १२६) उदयसिंह १२७) महाराणा प्रताप, १२८) जसराज - याच शाखेत अंबरचे राजसिंह, जयसिंह, रामसिंह (औरंगजेबाचे सरदार) यांचा उदय झाला. भोसला वंश पुढीलप्रमाणे - ११३) अजयसिंह, ११४) सज्जनसिंह, ११५) दिलीपसिंह, ११६) सिंहा, ११७) ११८) भैरवसिंह भोसला, ११९) देवराज, १२०) उग्रसेन, १२१) शुभकरण, १२२) रूपसिंह, १२३) भूमिंद्रजी, १२४) रापाजी, १२५) बरहटजी, १२६) खेलोजी, १२७) कर्णसिंह, १२८) संभाजी, १२९) बाबाजी, १३०) मालोजी, १३१) शहाजी, १३२) शिवाजी/व्यंकोजी, १३३) संभाजी/राजाराम, १३४) शाहू - पुढे सातारा व कोल्हापूर गादीचे वंशज सर्व महाराष्ट्रास परिचित आहेतच. त्यामुळे येथे देत नाही. माझ्या मते कनकसेनाची एखादी शाखा पर्शियात गेली असावी व गुर्जर म्हणून हिंदुस्थानात आली असावी. तेच पाटीदारांचे पूर्वज होत. म्हणजे पाटीदार हे लवाचे वंशज आहेत, असे मानता येईल व या गुर्जरांची प्रतिहार, चौहान, परमार व चौलुक्य वंशांशी सांगड घालता येते. येथे मुद्दाम नमूद करण्याची महत्त्वाची गोष्ट ही की, लवानंतरच्या ५४ पिढ्यांची यादी ना भाटांना माहीत ना इतिहासकारांना! लवानंतर ५५ व्या पिढीत सुमित्रायू झाला व त्याच्या चौथ्या पिढीतील कनकसेन हा होता; जो लाहोरला राज्य करीत असल्याचे मानले जाते. हा कनकसेन विक्रमादित्याचा समकालीन मानला जातो. म्हणजे तो इ.स.पू. ५६ च्या सुमारास लाहोराला राज्य करीत होता. एका शतकात चार पिढ्या होतात, असे मानले जाते. म्हणजे, रामायण इ.स.पू. १४५०-१५००

च्या सुमारास झाले असावे, असा निष्कर्ष काढावा लागेल. तो पटणारा नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की, या वंशावळीची नावे देताना प्रत्येक पिढीत एकाचेच नाव दिलेले आहे. एकास एकच मुलगा झाला, असे मानता येणे शक्य नाही. ही बहुधा राजे वा तत्सम अधिकाऱ्यांची नावे असावी. मग, त्यांचे भाऊबंद असल्यास त्यांची वंशावळ सांगता येणे कठीण आहे. लाहोरला पार्थिया जवळ असल्याने लवाच्या काही पिढ्या (सुमित्रायूपर्यंतच्या) पार्थियात गेल्या असल्या पाहिजेत व त्याच गुर्जर टोळ्या म्हणून प्रसिद्धीस आल्या असाव्यात.

भगवान रामचंद्र यांचा पुत्र लव याच्यापर्यंत काही प्रसिद्ध राजांची माहिती पुढीलप्रमाणे - ब्रह्मदेवाचे मानसपुत्र मरिची, पुलस्य हे होत. मरिचीचा पुत्र कश्यप, कश्यपाचा विवस्वान म्हणजे सूर्य असून त्यावरून या वंशास सूर्यवंश असे म्हणतात. या वंशातील सत्यव्रत (म्हणजे मनू = वैवस्वत मनू) हा **मनुस्मृती**चा रचेता, पहिला राजा, त्यागी, परहितदक्ष, न्यायी, कर्मठ, सर्वांचे कल्याण करणारा. यास विष्णूने मत्स्यावतारात वाचविले होते. मनूची बहीण मया हीस राक्षसकुलात दिले होते. तिची कन्या केकसी हिचा विवाह पुलस्य ऋषीशी झाला होता. तिला विश्रवा हा ऋषितुल्य पुत्र झाला. रावण हा विश्रव्याचा मुलगा होता.

सत्यव्रताचा मुलगा ईक्ष्वाकू हा असून त्यावरूनही सूर्यवंशास ईक्ष्वाकूवंश असे संबोधतात. हा उत्तम प्रशासक, लोकप्रिय राजा होता हजारो वर्षांपर्यंत वंशज अभिमान करतील असे रचनात्मक कर्तृत्व त्याचे होते. त्याने आपल्या १०० पुत्रांपैकी ५० जणांना उत्तरापथ आणि ५० पुत्रांना दक्षिणापथरूपाने भारताचे शासन वाटून दिले. त्याच्यानंतर धर्मानुसार राज्य चालविणारा विकुक्षी हा त्याचा पुत्र राजा झाला. विकुक्षीनंतर त्याचा पराक्रमी पुत्र पुरंजन याने देवासुर संग्रामात बैलाच्या खांद्यावर (ककुथ = खांदा) बसून दैत्याचा पराभव केल्याने त्यास ककुस्थ असेही म्हणत. पुरंजनानंतर पृथू याने शेतीशास्त्राला आधार दिल्याने सर्वच कृषक समाज त्यास आपला पूर्वज मानतात. लेवा पाटीदारही त्यास अपवाद नाहीत. पृथूने स्वतः कृषिशास्त्राचे, वनस्पतिशास्त्राचे अध्ययन, संशोधन व प्रात्यक्षिके केली. त्याने नांगर व कृषी अवजारे कशी चालवावीत, हे शिकविले. खतांचा वापर करण्यास शिकविले. शेतीची (पृथ्वीची) अशी सेवा केल्याने, उत्पादन वाढविल्याने त्याच्या नावावरून अवनीस पृथ्वी असे नाव पडले. पृथ्वीस त्याची मुलगी मानली जाते. हा प्रजेवर प्रेम करणारा, प्रजेचा स्नेहपात्र होता. त्याचा मुलगा विजिताश्व हा जाणता झाल्यावर त्याच्याकडे राज्यभार सोपवून तो वानप्रस्थानास गेला. विजिताश्वचा मुलगा कुवलयाश्व हा राजा तपस्वी असून श्रावस्तपुरीचा संस्थापक होता. त्याने ऋषीमुनींना कष्ट देणाऱ्या धुंधू दैत्याचा वध केला; पण या युद्धात त्याचे तीन पुत्रवगळता अनेक पुत्र मारले गेले म्हणून त्यास धुंधुकार असेही म्हणत. त्याच्यानंतर त्याचा मुलगा दृढाश्व

गादीवर आला. दृढाश्वाच्या पाचव्या पिढीत यौवनाश्व आला.

यौवनाश्वास मुलगा नसल्याने त्याने केलेल्या पुत्रकामेष्टी यज्ञात चूक झाल्याने मुलगा तर झाला; परंतु तत्क्षणी यौवनाश्वाची पत्नी वारल्यामुळे मुलाच्या दाईचे काम इंद्राने केल्याने (मामयं धास्यतेति = मी दाईचे काम करीन) या पुत्राचे नाव मांधाता ठेवले. हा सप्तद्वीपा पृथ्वीचा चक्रवर्ती राजा होता. तो खूप पराक्रमी होता. त्याने रावणाचा पराभव केला होता. मांधात्याला पुरुकुत्स नावाचा पराक्रमी पुत्र होता. अनरण्य हा पुरुकुत्स्याचा नातू असून त्याने गंधर्वांचा नाश करून नागवंशाबरोबर मैत्री संपादन केली. नागांनी नागकन्या अनरण्यास देऊन विषबाधा करण्याची - उतरविण्याची कला शिकविली. त्याने अनावश्यक अरण्ये समाप्त करून उपजाऊ जमिनीचे क्षेत्र वाढविले, अन्नधान्य वाढविल्याने प्रजा सुखी झाली. एकदा तो एकटा आहे, हे पाहून रावणाने त्याच्यावर हल्ला केला. तो असहायक असला तरी त्याने युद्धभूमी सोडली नाही व तो रावणाशी अखेरपर्यंत लढला व रावणाला सुचविले की, 'माझ्याच वंशातील वंशज तुझा व तुझ्या संपूर्ण कुळाचा व राक्षसांचा संहार करील.' अनरण्याच्या कित्येक पिढ्यांनंतर ययारुण हा गादीवर आला. ययारुणाचा मुलगा सत्यव्रत (त्रिशंकू) हा मंदबुद्धी, पण अतिशय जिद्दी होता. शंकू = शिंग = पाप असा अर्थ असून त्रिशंकूची तीन पापे मानली गेली होती. कन्या पळवणे, पित्याचा अपमान करणे व गोवध करणे. त्यास पुढे पापाचा पश्चात्ताप झाल्याने गुरू वसिष्ठाने त्याच्याकडे अयोध्येचा राज्यभार सोपविला. तो चांगला वागू लागला. त्यास यज्ञ व तपाच्या योगावर स्वर्गात सदेह जाण्याची इच्छा झाल्याने गुरू वसिष्ठांचा सल्ला धुडकावून लावल्याने वसिष्ठांचे प्रतिस्पर्धी विश्वामित्रांनी त्यास साहाय्य केले. पण, पुण्याचा संचय कमी पडल्याने व देवांनी स्वर्गातून ढकलल्याने तो आकाशात अधांतरी लटकत राहिला. तो पुन्हा पृथ्वीवर आला व वसिष्ठास शरण गेला. पुढे त्यास आत्मज्ञान झाल्याने तो पवित्र व श्रेष्ठ बनून **तैतिरीय उपनिषदां**च्या दोन मंत्रांचा उद्‌गाता मानला गेला. त्रिशंकूचा पुत्र सत्यवचनी हरिश्चंद्र हा असून आपले वचन पाळण्यासाठी त्याने राज्य व धनाचा त्याग केला आणि पत्नी तारामती, मुलगा रोहित व स्वतःसही विकले. शेनःशुपा या ब्राह्मण पुत्राला वरुणास देणारा हा हरिश्चंद्र होता.

रोहितनंतर वासक ऊर्फ असित हा गादीवर आला. हा वृत्तीने अति सात्त्विक होता. त्याच्या दोन पत्नींपैकी कालिंदी ही गर्भवती राहिली असता सवतीने मत्सराने तिला विष देऊन जिवंतपणे पुत्राला जन्माला येऊ दिले नाही. असित दोन्ही पत्नींसह वनात ओर्व मुनींच्या आश्रमाजवळ होता. ओर्व मुनींचे आयुर्वेदात संशोधन होते. त्यांनी कालिंदीला दिले गेलेले विष मुलाच्या पोटात एका जागी स्थानबद्ध करून ठेवले. त्यामुळे तिच्या मुलाचे नाव सगर ठेवण्यात आले. सगरास ओर्व मुनींनी वनातच वेद, शास्त्र व भार्गव आग्नेयास्त्राचे शिक्षण दिले. हैहय व तालजंघ वंशी

यांच्या त्रासामुळे असिताने प्राणत्याग केल्यावर सगर गादीवर आला. त्याने हैहय व तालजंघावर आक्रमण करून त्यांचा नाश केला. त्यामुळे यवन, कंबोज, पारद व पल्लवगण हतोत्साह होऊन ते सगराचे गुरू वसिष्ठास शरण आले. सगराने सप्तद्वीपा पृथ्वीवर नियंत्रण मिळविले. सर्वत्र धाक प्रस्थापित केल्यावर अश्वमेध यज्ञाचे आयोजन केले. त्यामुळे इंद्रास भीती वाटून त्याने सगराचा अजेय घोडा चोरून पाताळात कपिल मुनींच्या आश्रमापाशी नेऊन ठेवला. सगराची पत्नी सुमती ही गरुडाची बहीण होती. तिला असमंजस याच्यासह १०० हून अधिक पुत्र होते. असमंजस हा प्रजाहितदक्ष नव्हता. १०० सगरपुत्र अश्वमेधाच्या अश्वाचा माग घेत पृथ्वी खोदत सांख्यदर्शनाचे प्रणेते कपिल मुनी तपस्येत असता त्यांनीच घोडा चोरला, असे समजून कोलाहल केला. कपिल मुनींची तपस्या भंग पावल्याने त्यांनी १०० सगरपुत्रांना शापाने जाळून टाकले. सगरास हे समजले तेव्हा त्याने असमंजसाचा पुत्र अंशुमान याला अश्व आणण्यासाठी पाठविले. त्यास कपिल मुनी आश्रमाजवळ चुलत्यांच्या राखेचा ढीग दिसला. गरुडाने काकांच्या व जगाच्या उद्धारासाठी सूरलोकगामिनी गंगा हिला पृथ्वीवर आणावे लागेल, असा सल्ला दिला. अंशुमान अश्वासह अयोध्येस आला तेव्हापासून गंगा पृथ्वीवर कशी येईल, याचे चिंतन चालू झाले. सगराने अयोध्येच्या गादीवर असमंजस यास न बसविता त्याचा मुलगा अंशुमान यास बसविले. अंशुमान हा पराक्रमी व उत्कृष्ट शासक होता. त्यासही राज्याचा हव्यास नव्हता. त्या वेळी कच्छ ते वंग प्रदेश वालुकामय झाला होता. प्रजाहितासाठी तो सुजलाम् सुफलाम् करायचा तर गंगा पृथ्वीवर आणणे आवश्यक होते. पण, अंशुमानाला ते जमले नाही. त्याच्यानंतर त्याचा पुत्र दिलीप हा अयोध्येच्या गादीवर आला. हासुद्धा रघुकुलनाम सार्थक करणारा होता. तोही अतिपराक्रमी होता. त्यालाही राज्याचा हव्यास नव्हता. तो प्रजाहितदक्ष होता. हिंदू धर्मात गायीच्या ठिकाणी सर्व देवांचा वास दाखविला आहे. पुत्र नसल्याने पुत्रप्राप्तीसाठी त्याने गोव्रत प्रारंभ करून कठोरतापूर्वक निभविले. सुरभीची मुलगी नंदिनी हिला दिलीपने सेवेसाठी आराध्य बनविले. ईश्वराने त्याची परीक्षा पाहण्यासाठी सिंहाचे रूप घेऊन नंदिनीवर हल्ला केला व तिला पकडले तेव्हा सिंहाने दिलीपला खावे व नंदिनीला सोडून द्यावे, असे सुचविल्याने प्रसन्न झालेल्या ईश्वराने त्यास वंशाचे नाव वाढविणारा, गोभक्तीस प्राधान्य देणारा व भस्मिभूत पितरे आणि पृथ्वीवरील मानवासह सर्व प्राणिमात्रांचा उद्धार करणारा पुत्र होवो, असा आशीर्वाद दिला. कालिदासाने याचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे -

''आकारसदृशी प्रज्ञा प्रज्ञया सदृशागमः ।
आगमैस्सदृशारंभः आरंभः सदृशोदयः ।।''

(आकाशासारखी बुद्धी, बुद्धीसारखे शास्त्रज्ञान, ज्ञानासारखा उद्योग आणि

उद्योगानुसार उत्कर्ष) हे दिलीपचे यथार्थ वर्णन केले आहे.

महान राजा भगीरथ हा दिलीपचा पुत्र होय. सगराच्या वेळी भस्मिभूत झालेल्या आणि नंतर प्रतिवर्षी ग्रीष्मकाळात होरपळणाऱ्या लाखो-करोडो भारतीयांचा उद्धार कसा होईल, या उद्देशाने गंगेला पृथ्वीवर अवतरण्याचा याने संकल्प केला. त्याने त्यासाठी उग्र तपस्या करून ब्रह्मा व शिवाची उपासना केली आणि भगीरथ प्रयत्न करून गंगेला पृथ्वीवर अवतरविले. त्याच्या नावामुळेच गंगेला भागीरथी हे नाव पडले.

भगीरथानंतर श्रुत हा अयोध्येच्या गादीवर आला. श्रुतास बरीच मुले होती. त्यात नाभाग सर्वात लहान. तो गुरुगृहातून परतला तेव्हा मोठ्या भावांनी सर्व राज्यसंपत्ती वाटून घेतली व पित्याची जबाबदारी नाभागावर टाकून दिली. पित्यानेही 'धर्म तुझे रक्षण करील' असा आशीर्वाद दिला व ''तू ऋषीमुनींच्या यज्ञात जाऊन साक्षी राहा व दोन मंत्रांचा उच्चार कर. असे केल्याने ऋषी तुला यज्ञावशेष संपत्ती देतील''असे सांगितले. ऋषींनी अवशिष्ट राहिलेले धन नागाभास दिले. परंतु, धर्मानुसार हा भाग रुद्राचा मानला जाई. पित्यानेही तसाच निवाडा दिला. त्यामुळे नाभागाने मिळालेले सर्व धन रुद्रास दिले. संतुष्ट रुद्राने नाभागास ते परत केले. नाभागानंतर राज्यभार स्वीकारलेल्या अंबरीश याच्या राज्यात प्रजा खूप सुखी होती. तो एकादशीचे व्रत करी. एकादशीच्या व्रताच्या समाप्तीच्या वेळी यज्ञात दुर्वासाने विघ्न आणल्याने दुर्वासाने क्रोधित कृत्या केली. परंतु, विष्णूचक्राने दुर्वासकृत्याचा नाश केला व चक्र दुर्वासांच्या मागे लागले. तेव्हा ब्रह्मा, विष्णू व महेशाच्या सल्ल्यानुसार दुर्वासांना अंबरिशास शरण जावे लागले. अंबरीष हा राजा असूनही नावाप्रमाणेच ऋषी होता.

अंबरिशानंतर बाराव्या पिढीत झालेल्या खटवांगचा पौत्र व दीर्घबाहूचा पुत्र रघू हा होय. त्याच्या नावावरूनच सूर्यकुलास त्यापुढे रघुकुल असे ओळखले जाऊ लागले. राही म्हणजे चालणे, पार करणे म्हणून त्याचे नाव रघू ठेवण्यात आले. लहानपणीच त्याने आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता, दंडनीती आदी चारही विद्या आत्मसात केल्या. दीर्घबाहूने त्यास युवराज घोषित करून अश्वमेध यज्ञ केला. त्याचा घोडाही इंद्राने चोरला. त्या वेळी रघू इंद्राशी लढायला सिद्ध झाल्याने इंद्र रघूवर प्रसन्न होऊन त्याने त्याला अश्व सोडून कोणताही वर मागण्यास सांगितले. तेव्हा 'अश्व सोडू नकोस; पण पिता दीर्घबाहूस अश्वमेधपूर्तीचे फळ दे' असे रघूने मागितले. रघूने त्यानंतर चारही दिशांना दिग्विजय केला व राज्यावर आल्यावर संपूर्ण भारतभर एकछत्री साम्राज्य निर्माण केले. त्याने विश्वजितनामक दक्षिणावाला यज्ञात आपली सर्व संपत्ती याचकांना दान करून टाकली. निष्कांचन अवस्थेत वरतंतू ऋषींचा शिष्य कौत्स्य याचक बनून त्याने १४ विद्यांच्या संख्येइतक्या करोड धनाची अशक्यप्राय मागणी रघूकडे केली. रघूने दोन दिवसांची मुदत मागून कुबेरावर स्वारी

करून कौत्स्यास दक्षिणा दिली.

रघुपुत्र अज हा सुद्धा सर्वगुणसंपन्न होता. रघू वानप्रस्थास जाण्याआधी अज विदर्भ राजकुमारी इंदुमती हिच्या स्वयंवरात सेनेसह गेला. वाटेत सरोवराकाठी एका मदमत्त हत्तीने सैन्यावर हल्ला करून पांगविले. पण, अजाने एकाच बाणात हत्तीस यमसदनास पाठविले. त्याचे धैर्य, शौर्य व साहस पाहून गंधर्व त्याच्यावर प्रसन्न होऊन त्यास संमोहनास्त्र विद्या प्रदान केली. इंदुमतीने अजास वरल्यामुळे कामरूप, अंग, कलिंग, अवंतिका इ. देशांच्या राजांनी त्याच्यावर हल्ला केला असता इंदुमतीस सेनेचे संरक्षण देऊन अयोध्येस पाठवून एकट्याने या सर्व राजांना संमोहनास्त्राने पराजित केले. अजाने राज्यभार स्वीकारल्यावर पृथ्वी बहुरत्नप्रसविनी झाली. इंदुमतीने दशरथ या वीरपुरुषास जन्म दिला. तो दाही दिशांना सूर्यासारखा कांतिमान असल्याने त्याचे नाव दशरथ असे ठेवले. दशरथ सत्यसंघता, पौरुष, पराक्रम, उदारता, लोकव्यवहार आदी सर्वच गुणांत कुलनाम राखणारा होता. तो न्यायी होता. केकय देशापासून कामरूप (आसाम) पर्यंत सर्वांवर त्याने नियंत्रण मिळविले. त्याने अनेक राजकन्यांबरोबर विवाह केले. तथापि, राण्यांचा मान कौसल्या, सुमित्रा व कैकयीस दिला. अयोध्येजवळील कोसल संज्ञक राजाची कन्या कौसल्या ही मोठी राणी. कौसल्येचा पुत्र वध करेल, असे ब्रह्मदेवाने रावणास सांगितल्याने दशरथ-कौसल्याच्या विवाहात त्याने नाना अडथळे आणले. तरीही, विवाह झालाच. त्यानंतर, मगधिपती शूरसेन याची कन्या सुमित्रा हिच्याशी त्याचा विवाह झाला. सुमित्रेचा भाऊ सुधन्वा होता. सर्वात शेवटी कैकय राजकन्या कैकयी हिच्याशी त्याचा विवाह झाला. ती खूप सुंदर व चतुर असल्याने दशरथाचा तिच्यावर लोभ होता. दरशथास पुत्र नव्हता म्हणून पुत्रकामेष्टी यज्ञ केला. दशरथ शब्दवेधी होता. मृगयेसाठी गेला असता अंधारात श्रावणबाळ वध, शाप वगैरे येथे लिहिण्याचे प्रयोजन नाही. दशरथास कौसल्येपासून राम, कैकयीपासून भरत आणि सुमित्रेपासून लक्ष्मण व शत्रुघ्न असे चार पराक्रमी मानवातारी पुत्र झालेत. रामाने रावण व संपूर्ण राक्षसजातीचा नाश करून पृथ्वीचा उद्धार केला. राम हे भगवान असून विष्णूचा सातवा अवतार होय. मानवावतारात झाल्याने ते मर्यादापुरुषोत्तम ठरले. रामराज्य सर्वार्थाने अमलात आणले. रामाच्या कुश व लव या दोन पुत्रांपैकी कुशास अयोध्येचे व लवास श्रावस्तीचे राज्य मिळाले. महाभारत काळात कुशाच्या वंशात बृहदबल व लवाच्या वंशात प्रसेनजित हे राजे होऊन गेले. मात्र, भाटांच्या आख्यायिकांनुसार मानली गेलेली कुशोद्भव कडवा पाटीदारांची वसाहत अयोध्या भागात व लवोप्रण्य लेवा पाटीदारांची वसाहत श्रावस्ती (नेमाळ सीमा) भागात अजिबात नाही. एवढेच नाही तर तेथे आजमितीस एकही कडवा पाटीदार वा लेवा पाटीदार आढळत नाही. याचा अर्थ काय? या भागात क्षत्रिय कूर्मी समाजाची वसाहत मोठ्या प्रमाणावर असून ते स्वतःस सूर्यवंशी म्हणवून

घेतात. म्हणजे लेवा वा कडवा पाटीदार हे कूर्मीवंशियांचे बांधव असण्याची शक्यता अधिक आहे. श्रावस्तीजवळील नेपाळचे राजे स्वतःस सूर्यवंशी परंतु लक्ष्मणाचे वंशज मानतात, ही बाबसुद्धा लक्षात घेण्यासारखी आहे व वास्तव इतिहासानुसार ते गुर्जर प्रतिहारांचे वंशज मानले जातात.

लवापासून लेवा पाटीदारांची उत्पत्ती झाली आहे, असे सांगितले जाते. सूर्यवंशातील भरताचे पुत्र पुष्कर व तक्षाला गंधर्वदेशातील अनुक्रमे पुष्कराला व तक्षशिला येथे, लक्ष्मणाचे पुत्र अंगद व चित्रकेतू यांच्यापैकी अंगदास कारूथ देशातील अंगदीया येथे; व चित्रकेतूस मल्ल देशातील चंद्रकांता तर शत्रुघ्नपुत्र सुबाहूस मथुरा येथे व यूपकेतूचा विदिशा येथे राज्याभिषेक करविला गेला. अशा प्रकारे भारतभर सूर्यवंशाचा प्रसार झाला.

महाभारत, रामायण, भागवत इत्यादी अनेक पुराणे ही ईक्ष्वाकू वंशाच्या इतिहासाची साधने होत. काल्पनिक परंपरा खरी मानून अर्वाचीन काळापर्यंत यायचे असेल तर सांप्रतच्या उदेपूरच्या राणांची वंशावळ पाहावी. ते थेट ईक्ष्वाकूपासून आपली परंपरा सांगतात.[९] अशा प्रकारे लेवा पाटीदारांचा ईक्ष्वाकू वंशाशी संबंध जोडता येत असेल तर लेवा पाटीदार हे क्षत्रिय असून त्यांचे आणि राजपूत आणि गुर्जर यांचे पूर्वज एकच असले पाहिजेत आणि ही सत्यता पटली तर सुप्रसिद्ध मानववंश व समाजशास्त्रज्ञ आर.ई. एन्थोवेन यांच्या मते रेवे लोक गुजरांबरोबर उत्तर हिंदुस्थानातून खानदेश-वऱ्हाडात आले असावेत[१०] या विधानाचीही सत्यता पटते. ब्रह्मभूषण परमपूज्य मोरेदादा महाराज यांनी पूर्वपरंपरेसह प्रचलित असलेल्या क्षात्रवंशात लेवांची (लेवा पाटीदारांची) लेवे क्षत्रिय अशी गणना केली आहे.[११] आपण सूर्यवंशी आहोत, असे मनी धरल्यास याच वंशातील मनमानी करून प्रजेस छळणारा त्रिशंकू, सगराचा क्रूर पुत्र असमंजस आणि महाभारतातील धर्मयुद्धात अधर्माच्या बाजूकडून लढणारा बृहद्‌बल यांचेही आपण वंशज ठरतो, याचेही भान ठेवावे. कोणताच वंश वाईट नसतो. त्यातील माणसांच्या गुणदोषांनुसार त्याचा दर्जा ठरत जातो. राक्षसकुळातही प्रल्हाद, बिभीषण, बळीराजा इत्यादी गुणसंपन्न व्यक्ती होऊन गेल्या. म्हणून लेवा पाटीदारांनी रघुवंशी असल्याचे खुशाल मानावे हवे तर, परंतु त्या वंशातील आदर्श समोर ठेवावेत आणि इतर समाजाचे लोक कोणत्याही वंशाचे असोत; त्यांना कमी मानू नये. त्यांना समान साहचर्य दिल्यास या भागातील सारेच समाज गुण्यागोविंदाने नांदतील.

सप्तसिंधूमधील कुरुक्षेत्र ही कौरव-पांडवांची युद्धभूमी आणि या युद्धात सूर्यवंशी ईक्ष्वाकूवंशी शेवटचा राजा बृहद्‌बल कौरवांच्या बाजूने लढताना अभिमन्यूकडून मारला गेला. आर्थर कीथ या पंडिताच्या मते मनू, इला, पुरुरवा यांसारख्या पुराणातील अनेक व्यक्ती खऱ्या नसून कल्पित आहेत. याकडे दुर्लक्ष करूनही काही पंडितांनी

वैवस्वत मनूचा काळ हा इ.स.पू. ३१०० ठरविला आहे. हा काळ व त्यानंतरचा इ.स.पू. ४०० पर्यंतचा काळ वेदकाळ होय. रामायणाचा काळ इ.स.पू. २५०० च्या सुमाराचा तर महाभारताचा काळ इ.स.पू. १४०० ते १३०० मानला जातो. पंडितांनी ठरविलेली पौराणिक राजवंशावळी व तिचा काळ खरा मानल्यास सिंधू संस्कृतीच्या प्रारंभापर्यंत वैदिक आर्यांच्या आगमनाचे वृत्त नेऊन पोचविता येते. नॉर्डिक जन म्हणजे वैदिक आर्य! हे संस्कृत भाषिक होते. संघटनाचातुर्य, कल्पनाशक्ती व इतर मानववंशांशी एकरूप होण्याची प्रवृत्ती या गुणांमुळे येथील आर्यपूर्व संस्कृतीशी एकरूप झालेली संस्कृती त्यांनी निर्माण केली. येथे आलेल्या नॉर्डिक जनांमध्ये भूमध्यसमुद्रीय व प्राच्य या मानववंशाचे मिश्रण अगोदरच झाले होते. सिंधू खोऱ्याच्या वरच्या प्रदेशात प्रथम ते राहिले. पंजाब, राजस्थान, गंगेचा वरचा भाग यातही नॉर्डिक वंशाचे मिश्रण झालेले लोक आहेत. **ऋग्वेदा**तील आर्यांनी वारंवार हल्ले करून मूळ दस्यू, दास व पणि या आर्येतरांचे पशुधन, अन्न, सुवर्ण, क्षेत्र, स्त्रिया, मुले व माणसे लुटण्याचा अनेक शतके उद्योग केला. आर्यांनी शांतताप्रिय आर्येतरांवर सैनिकी संघटनेच्या चातुर्याने मात केली. ते अत्यंत अश्वप्रेमी होते. वैदिक काळापासून ते यादवांच्या राजवटीच्या अंतापर्यंत भारतीय राजवटीच्या पराभवास वेगवान, सुसंघटित, असंतुष्ट, निर्दय, शूर अशा परकीय मानवी गणांचे आक्रमण हेच कारण होय.[१२]

आख्यायिकांनुसार उपरोक्त वर्णन केलेल्या सप्तसिंधू प्रदेशात प्रभू रामचंद्राचा पुत्र लव याने रावी नदीतीरी लवपूर (लाहोर) वसविले.[१३] डॉ. रामसिया सिंह यांच्या मतेही लवाने लवपूर (लाहोर) वसविले आणि लव आणि कुशाचे वंशज आजही अपभ्रंशाने लेवा आणि कडवा नावाचे पाटीदार तसेच गुजर हे गुजरात आणि मध्य प्रदेशाच्या पश्चिम भागात विशेषतः मंदसोर, धार, खरगोन, निमार, उज्जैन, रेवाकाठा भागात आढळतात.[१४] रामपुत्र कुश व लव यांच्यात कोसल देशाचे राज्य वाटून दिल्याचे **वायुपुराणात** म्हटले आहे. कुशास कुशस्थलिनगरी राजधानी असलेल्या दक्षिण कोसलचे राज्य मिळाले, तर लवाला उत्तर कोसलचे राज्य मिळाले. त्याची राजधानी श्रावस्ती येथे होती. उत्तर कोसल हे लवाचे राज्य मानल्यास सप्तसिंधूमधील लवपूर (लाहोर) गावाशी लवाचा संबंध जोडता येणार नाही. कारण, उत्तर कोसल म्हणजे सध्याचा नेपाळ व त्याचा दक्षिणेकडील प्रदेश होय. कुश याच्या ३० वंशजांची नामावली वायुपुराणात आहे. बृहद्‌बल या शेवटच्या राजानंतरची २६ नावे अन्य पुराणात आढळतात. अयोध्येच्या सूर्यवंशी इक्ष्वाकू वंशातील शेवटचा राजा क्षेमक हा मगध सम्राट महापद्मनंदचा समकालीन मानतात. रामानंतर अयोध्येचे महत्त्व कमी झाले. तेथे राज्य करणारा रघुवंशातील प्रसेनजित हा गौतम बुद्धाचा समकालीन होता.[१५] तेव्हापासून चालत आलेल्या सूर्यवंशात सध्याचे नेपाळचे राजे असून ते आपणास लक्ष्मणापासून निर्माण झालेले रघुवंशी मानतात.[१६] लववंशी म्हणविणारे

कूर्मीक्षत्रिय म्हणजे शेती करणारे लेवा पाटीदार गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतात. गुजरातमध्ये त्यांना लव्वा अथवा लेवा कणबी असे म्हणतात. त्यांच्याबाबत परंपरागत प्रथा प्रचलित आहे की, जेव्हा अंतर्वेद (गंगा आणि यमुना नद्यांमधील प्रदेश) भागात राजपुतांनी अधिपत्य स्थापित केले होते, तेव्हा त्यांच्यातील काही लोक लाहोर व काही गुजरात (आनर्त) भागात आले होते.[१७] **गॅझेटिअर**मधील आख्यायिकांनुसार गुजराती कूर्मी (शेतकरी) अयोध्येहून बहिष्कृत होऊन मथुरेस येऊन राहिले आणि तेथूनही मारवाडमार्गे गुजरातमध्ये यावे लागले. डॉ. रामसिया सिंहनुसार सुमारे २००० वर्षांपूर्वी ते गुजरातमध्ये येऊन वसले.[१८] या विधानासही आधार वाटत नाही. कारण, अंतर्वेद भागात गुर्जराच्या प्रतिहार घराण्याने (नागभट प्रतिहाराने) कनौजच्या मौखरींचा पाडाव करून ते राज्य जिंकून आपली राजधानी उज्जैन (अवंती) येथून कनौज येथे नेली होती.

कुरमी ही एक शेतकरी जात असून महाराष्ट्र सोडून भारतातील सर्व प्रांतांत हे लोक विखुरलेले आहेत. त्यांची वस्ती मुख्यतः उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा व छोटा नागपूर या प्रदेशात आहे. बिहार कुरमी दिसण्याने आर्यवंशी असावे, असे डाल्टन म्हणतो. ओरिसा व छोटा नागपूरमधील कुरमी द्रविड असावे, असे रिस्लेचे मत आहे. कुरमी या नावाने ओळखले जाणारे सर्व लोक मूळ आर्यवंशी होते आणि भिन्न कर्म आणि संकर यामुळे त्यांच्यात बदल झाला, असे मानणारा एक पक्ष आहे; तर दुसऱ्या पक्षाच्या मते हे लोक मुळात द्रविड वंशाचे असून त्यातले काही आर्यांशी संबंध आल्यामुळे सुधारले व बाकीचे रानटी अवस्थेला राहिले. कोईरी, कच्छी, साहणी व माळी या जाती कुणबी जातीपासूनच उगम पावल्या आहेत. कुरमी लोकांचे ११ मुख्य वर्ग आहेत. वाईश्वर, वाडिया, गंगापारी, गुजराती, जईश्वर, कनौजिया, खरेविंध, प्रहारिया, राह, सेंटवार व सिंगदार.

सप्टेंबर १९८४ च्या **संशोधक** अंकात प्रा. विश्वास पाटील यांच्या (लेवा पुराण : पाटीदार ज्ञातियांचा प्राचीन इतिहास) या प्रदीर्घ लेखात लेवा पाटीदारांबाबतचे बरेच चांगले संदर्भ आहेत, तर काही संदर्भ संशोधकांमध्ये गैरसमज पसरविणारे आहेत.[१९] केवळ ब्रिटिशांनी त्यांना अर्ध हिंदू, अर्ध-मुस्लिम म्हटले असले तरी ते १०० टक्के हिंदू आहेत. ब्रिटिशांनी (आर.ई. एन्थोवेन या लेखकाने व **गॅझेटिअर**च्या ब्रिटिश संपादकांनी) मतिया कुणबी विशेषतः पिराणा, मतिया, मोम्ना कुणबी या हिंदू लेवा पाटीदारांमधील पोटजातींना अर्ध मुस्लिम ठरविले. तथापि, क्रूर गुजरात सुलतानांच्या कारकिर्दीत आपला प्रिय हिंदू धर्म व शीलरक्षणासाठी विशिष्ट परिस्थितीत कृष्णभक्त इमामशहाचे अनुयायित्व पत्करावे लागले व सत्पंथ स्वीकारावा लागला. सक्तीच्या धर्मांतरापेक्षा काही मुसलमानसदृश विधी त्यांना स्वीकृत करावे लागले. एवढ्यामुळे त्यांना अर्ध-हिंदू, अर्ध-मुस्लिम म्हणणे द्वेषमूलक आहे. वास्तविकतः हे

लोक संपूर्ण शाकाहारी आहेत. तद्वतच मद्यपान त्यांना निषिद्ध असते. ते स्वतःस द्विज म्हणवितात व उपनयन संस्कारही करतात. यातच त्यांचे शुद्धत्व निष्पन्न होते. सदर लेख **लेहकपुराण**नामक ग्रंथातील माहितीवर आधारित आहे.[२०] या ग्रंथात फक्त लेवा गुजरांची माहिती दिलेली असून पाटीदारांची नाही. या ग्रंथातील माहितीनुसार बळीचा मुलगा लेहकपासून लेवा व भद्रचा मुलगा कँटभपासून कडवा या पोटजाती निर्माण झाल्यात. सदर ग्रंथात लेवा गुजर हे चांद्रवंशी मानले आहे. तथापि, हे खरे नसून गुर्जर हे एकतर सूर्यवंशी किंवा अग्निवंशी मानले जातात. विश्वास पाटलांचे एक विधान मात्र अर्धसत्य वाटते. ते म्हणतात, ''पूर्व खानदेशात व वऱ्हाडातही लेवा लोक आहेत. पण, हे लेवा गुजरातच्या लेवा पाटीदार लोकांपैकी असून उत्तरेकडील गुर्जरांपैकीच असावेत, असे वाटते.'' उत्तरेकडील गुर्जरांपैकी आहेत, हे खरे असले तरी उत्तरेकडील गुर्जरांचीच गुजरातमधील लेवा पाटीदार ही एक पोटजात निर्माण झालेली आहे आणि गुजरातमधील हे लोक पावागडमार्गे खानदेशात आले आहेत.

लेहकपुराणानुसार लेवा लोक चांद्रवंशी आहेत. हा मूळ ग्रंथ भीम नावाच्या कवीने लिहिला आहे. त्याचे नंतर गुजराती व मराठीत **लेवापुराण** नावाने अनुवाद करण्यात आलेत. त्यात नंतर काही संस्कारही करण्यात आले आहेत. मराठीतील ग्रंथ विठ्ठल केशव कान्हवे महाराज उत्राणकर यांनी केला आहे. सदर ग्रंथ विश्वास पाटलांनी अभ्यासला आहे. हा ग्रंथ माझ्या वाचनात आला नाही. तथापि, विश्वास पाटलांच्या लेखानुसार असे दिसते की, या पुराणकाव्यावर फारसे विसंबून चालणार नाही. कारण म्हणतात ना, ''पुराणातील वांगी पुराणात'', त्यात बराच भाग कल्पित असतो. तरीही त्यातील माहिती असणे आवश्यक असते म्हणून विश्वास पाटलांच्या लेखातील काही माहिती येथे देत आहे.

पुराणकाळात द्वापारयुगात गर्गाचार्यांचा आश्रम नैमिषारण्यात होता. गर्गाचार्य आपला आश्रम सोडताना शिष्यांस म्हणाले की, आश्रमात कलियुगाचा प्रवेश होणार आहे. त्याच्या आगमनाने तमाम धर्मकर्माचा लोप होईल, पापाचरण वाढेल, दुष्प्रवृत्ती डोके वर काढतील तेव्हा लेवा जातीचे लोक सनातन धर्माचे रक्षण पूर्णपणे करतील, प्राणपणाने करतील.[२१]

लेवापुराण ग्रंथात बऱ्याच असंबद्ध पौराणिक कथा आहेत. त्या देणे येथे उचित वाटत नाही. त्यात सूर्यवंशाचीही माहिती आहे. सूर्यवंशाची (ईक्ष्वाकू वंश) माहिती वर आलेलीच आहे. खाली विश्वास पाटील यांच्या लेखातील काही उतारे उद्‌धृत करीत आहे.

''**अजय राजाच्या वंशाचा इतिहास :** मथुरेपासून पश्चिमेकडे पूर्वी लेहकपूर नावाचे उत्तम शहर स्थापून तेथे लेहक व कँटभ आणि त्यांचे वंशज पुष्कळ वर्षांपर्यंत वसाहत करून राहत होते. पुढे ते शहर यमुनेच्या पुरात वाहून गेले. त्यामुळे त्यांचे

वंशज इतरत्र वस्तीसाठी निघून गेले. लेहक राजापासून पुढे सत्ताविसाव्या पिढीत अजय नावाचा पुरुष उत्पन्न झाला. तो कृषी व वाणिज्य कर्म करीत असायचा. द्वारकेला तीर्थयात्रेच्या मिषाने कुटुंबातील सर्व मंडळी सोबत घेऊन तो गुजरातेत आला.''

हा वृत्तान्त बऱ्याच अंशी खरा असावा, असे दिसते. अजय किंवा या नावाचा कोणी पुरुष अंतर्वेदीतून म्हणजे गंगा-यमुना मध्यवर्ती देशातून यात्रा अथवा वसाहतीकरिता गुजरातेत आला. त्या वेळेत त्याचे सोयरेधायरे मिळून सुमारे ३०० लोक होते आणि त्या वेळेस यमुनातीरी असलेल्या लेहकपुरात त्यांची वस्ती अदमासे साडेबाराशे घरांची होती. ते शेती अथवा व्यापारधंदा करून कालक्रमणा करीत होते. ते युद्धकर्मातही कुशल होते. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, अजय राजा गुजरातेत आला. त्याच्या पूर्वी अर्थात् विक्रम संवताच्या सुमारे २०० वर्षांपूर्वी सिकंदराने पंजाबवर स्वारी केली. त्या वेळेस तेथील राजाच्या मदतीकरिता मथुरेहून सैन्य गेले होते. त्या सैन्यातच लेहकापुरातील लेवावंशाचे कित्येक योद्धे होते; ज्यांनी विजयश्री संपादन केली. आजदेखील हारित गोत्राचे लेवा पाटीदार तेथे राहत आहेत. कित्येक विद्वानांचे असे म्हणणे आहे की, तेथूनच ते गुजरातेत आले. पण, याविषयी लेखी प्रमाण उपलब्ध नाहीत. अंतर्वेदीतून आले असल्याबद्दल मात्र भरपूर प्रमाणे आढळतात. कारण, अजयच्या पुत्राने माळव्यात प्रधानकी मिळवली. **लेऊवापुराण,** डाकोर प्रतीच्या १४६ व्या पृष्ठान्वये असे सांगता येते की, सिंधियाच्या गादीचा मूळ संस्थापक ठाकोर दक्षिणेत आलेला बटाली या परगण्यातील मेगन गावचा कुणबी होता. वीरसद वंशाचे मूळ पुरुष रेंडा आणि गेंडा यांनी अलाउद्दीनच्या अबूल फजल सरदाराशी तुंबळ युद्ध करून देशरक्षण केले होते.

''राजस्थान आणि मेवाडचा इतिहास काळजीपूर्वक वाचल्यास अजय राजाची ही कथा थोडी संशयास्पद असावी, असे वाटते. कारण, ऐतिहासिक ग्रंथांवरून हा काळ सुमारे संवतच्या तिसऱ्या शतकातील असावा आणि त्या वेळेस असलेल्या सौराष्ट्रात (सौरठ - आजचे काठियावाड - काठेवाड) वल्लभपुरीचे राज्य होते. त्यापूर्वी त्यांची राजधानी द्वारका होती. पण, त्या काळी त्या देशाला आनर्त असे नाव होते आणि त्यानंतर म्हणजे सहाव्या-सातव्या शतकात त्याला सोरठ हे नामाभिमान प्राप्त झाले. बरे, राजा अजय आला त्या वेळी अथवा त्याच्यापूर्वी प्रभासपाटण अथवा प्रभासपट्टण येथे कोणतेही राज्य स्थापन झाले नव्हते, तर मग अजयला तेथील प्रधानपद मिळण्याची शक्यताच संभवत नाही. परंतु असे वाटते की, वल्लभी राज्याचा कोणी एक सुभा तिथे राहत असेल आणि त्याने त्याला प्रधानपत्र अर्थात मोठा हुद्दा काही कारणाने दिला असेल. अजय राजा प्रभासपाटणला आला. त्याच्यायोगे लेवावंशाची भरभराट झाली. तो सौराष्ट्र देशाच्या कनकनामक राजाचा मुख्य प्रधान

झाला. कनक - कनकसेन हा वल्लभीपूरचा राजा! पूर्वी राजाच्या नावाने सुभ्याचे नाव पडत असे, म्हणून अजयला कनकराजाचा प्रधान लिहिले जाणे संभवते.''

लेऊआ पुराणातील एका कथेनुसार भगवान श्रीराम यांचा पुत्र लव याचे वंशज लेऊआ तथा लेवा पाटीदार व कुशाचे वंशज कडवा तथा करडवा (कठोर, कडक या अर्थाने) पाटीदार आहेत. याच पुराणातील दुसऱ्या एका कथेनुसार लव व कुशाने पंजाबच्या (सप्तसिंधू) राजाचा पराभव केल्यानंतर लवाने 'लवकुटी' नामक शहर वसविले. हे लवकुटी म्हणजेच सध्याच्या पाकिस्तानातील लाहोर होय. लवाने वसविलेल्या नगरांना लेह व कुशाने वसविलेल्या नगरांना करड ही संज्ञा प्राप्त झाली. त्यावरून लेह व करड ही मूलस्थाने असलेल्या कुरमींना अनुक्रमे लेऊआ कणबी आणि करडवा तथा कडवा कणबी अशा संज्ञा प्राप्त झाल्या.[२१अ]

मूळ पूर्वज व स्थलांतरणाचा इतिहास -

पौराणिक इतिहासकाल आणि ज्ञात इतिहासकाल यामधील काल म्हणजे इतिहास पूर्वकाल (Pre and proto historic period) हा संक्रमणावस्थेचा काल (Transit period) मानता येईल. पौराणिक काळात महाभारत काळातील भारतीय युद्धात सूर्यवंशातील राजे कौरवांच्या बाजूने लढले होते. सूर्यवंशातील शेवटचा राजा बृहद्बल हा अभिमन्यूद्वारे मारला गेला. नेताच मारला गेल्यामुळे त्याचे सैनिक व लोक देश सोडून पश्चिमेकडे गेले असावेत. इतिहासपूर्व काळात आर्य पुन्हा पश्चिमेकडे गेले, असाही एक समज आहे. महाभारत इ.स.पू. १५००च्या सुमारास घडले असावे, असे प्राचीन इतिहासशास्त्रज्ञांचे एक मत आहे. म्हणजे हे लोक इ.स.पू. १५०० नंतर केव्हातरी पश्चिमी देशात गेले असावे. सूर्यवंशी लोक सूर्याची पूजा करणारे होते. इ.स.पू. सातव्या शतकात इराणमध्ये उदयास आलेल्या जरथुस्ती (झरतुष्टी = पारशी) धर्माचे लोक पंचमहाभुते व विशेषकरून अग्नीची पूजा करणारे होते. त्याशिवाय, ते लोक गायीचीही पूजा करीत. यावरून, असाही एक निष्कर्ष काढता येईल की, भारतातून इतिहासपूर्व काळात इराणमध्ये गेलेल्या सूर्यवंशी लोकांनीच इ.स.पू. सातव्या शतकात जरथुस्ती धर्म स्वीकारला असणे नाकारता येत नाही. इराणमधील गुर्जरवंशी लोक हे तेच असले पाहिजेत. तेच पुन्हा भारतात आले व त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला. त्यांचा इतिहास पुढे दिलेलाच आहे. अशा प्रकारे पौराणिक काळ व इतिहासपूर्वकाळ यांची सांगड घालता येईल.

कुणबी वा पाटीदारांना वेगवेगळ्या प्रांतांमध्ये वेगवेगळ्या संज्ञांनी ओळखले जाते. उत्तर प्रदेश व बिहारमध्ये त्यांना कुर्मी आणि कुशवाह; गुजरातमध्ये पटेल, पाटीदार किंवा कणबी; महाराष्ट्रात मराठा किंवा कुणबी, कर्नाटकात वक्लिंगेर, कापू, कांपा, कुलंबी; आंध्र प्रदेशात रेड्डी, कापू, कुरमी, कुंबी; तामिळनाडूत कापूओ, कुलमी, कुलबी; कोचीनमध्ये कुलांबी; मध्य प्रदेशात सिंध्या कुरमी; पश्चिम बंगालमध्ये

महंतो, झारखंडमध्ये कुलमी, कुडबी; ओरिसात कुरमा; माळव्यात मालवीय आणि कुरमी; आसाममध्ये कुरमी चौधरी आणि महंतो आणि पंजाबमध्ये कुरमी या संज्ञांनी ओळखले जाते. त्याशिवाय उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि बिहार प्रांतांच्या काही भागांमध्ये त्यांना 'लोर कुरमी' आणि 'खेरी कुरमी' या संज्ञांनी ओळखले जाते.[२१ब] लोर कुरमी म्हणजे लेवा कुणबी व खेरी कुणबी म्हणजे खैरे किंवा कडबा कुणबी असले पाहिजे व त्यांचा लेवा कणबी व कडबा कणबींशी नक्कीच संबंध असला पाहिजे. कृषी व्यवसाय करणारा तो कुणबी किंवा पाटीदार मानून विवाहादी संबंध जोडलेत तर भारतातील जातीभेदांच्या भिंती कोसळून पडण्यात व एकसंध भारतीय कृषक समाज निर्माण होण्यास मोठी मदत होईल. तूर्तास येथे फक्त खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदारांचाच विषय घेतला असल्याने यावर अधिक लिहिणे नको. तो एक वेगळा सामाजिक विषय होऊ शकेल.

इ.स.पू. ६०० ते इ.स.पू. २०० या कालखंडात इराणच्या सायरसवंशी राजांनी सप्तसिंधू (पंजाब) वर हल्ले केलेत. त्यानंतर, त्यावर ग्रीकचा राजा अलेक्झांडर (सिकंदर), हूण होळ्या व इतर घराण्यांनीही हल्ले केलेत. त्यामुळे पंजाबमधील गुर्जर कुरमी पंजाबातून राजस्थान व मारवाडात स्थलांतरित झालेत आणि शेवटी ते सौराष्ट्र, कच्छ आणि उत्तर गुजरातमध्ये स्थायिक झाले, यास पुष्टी मिळते (अर्थात हे विधान अर्धसत्य वाटते) आणि गुजरातमधील लेवा हे लाहोर भागातून व कडवा अथवा करडवा हे करड (बहुधा काराकोरम) भागातून स्थलांतरित झाले आहेत, यास पुष्टी मिळते. परंतु, गुजरातमधील एक प्रसिद्ध इतिहासकार व पाटीदार संस्कृतीचे विश्लेषक डॉ. अमृत पटेल यांच्या मते पाटीदार मुळात उत्तर गुजरातमधील सरस्वती नदीकाठच्या प्रदेशातील सुसंस्कृत नागरिक होते. येथून ते मध्य प्रदेश, राजस्थान आणि उत्तर भारतात पसरले. त्यास आधार म्हणून ते मध्य प्रदेश, राजस्थान व उत्तर भारतातील पाटीदारांना असलेली आडनावे ही गुजरात खेड्यांवरून पडलेली आहेत, याचा आधार देतात.[२१क] इ.स.पू. ६०० पासून लेवा व कडवा कणब्यांमध्ये विवाहसंबंध होत असत; परंतु चावडा व सोळंकी राजघराण्यांच्या काळात त्यांनी बदल स्वीकृत करून आंतरविवाह करणे थांबविले आणि तेव्हापासून खऱ्या अर्थाने लेवा व कडवा हे दोन पोटभेद अस्तित्वात आलेत.[२१ड]

वास्तव इतिहास

डॉ. इरावती कर्वे यांच्या मते खानदेशाच्या काही भागात व विदर्भात लेवा किंवा लेवा कुणबी (पाटीदार) या नावाचे लोक महाराष्ट्रातील ब्राह्मण, मराठा व कुणबी आदी समूहांपेक्षा पोशाख, बोली व रूप यामध्ये वेगळे आहेत. बऱ्हाणपूर खिंडीच्या दोन्ही बाजूंना लेवांची वस्ती असल्यामुळे ते अलीकडच्या काळात आलेले असावे, असे वाटते. त्यांच्या नावांवरून गुजरातेतील लेवा कुणब्यांशी त्यांचा संबंध

असण्याची शक्यता आहे; पण या दोन समूहांच्या समाजरचनेत काही महत्त्वाच्या बाबतीत फरक आहेत. खानदेशातील लेवा कुणबी मामेबहिणीशी लग्न करीतच नाही असे नाही; त्यांच्यातील युद्धाची परंपरा आता लोप पावलेली दिसून येते. ते अतिशय कष्टाळू असतात. त्यांच्या बायका दुधाचा व्यवसाय करतात, म्हशी बाळगतात व दूध व तद्भव पदार्थ विकतात. त्याही बाबतीत त्यांचे उत्तर भारताशी साम्य वाटते.[२२] यावरून, लेवा पाटीदार हे गुर्जर वंशाचे (चरवाह = Pastoral = दूधदुभत्याचा व्यवसाय करणारे, गुरेढोरे बाळगणारे) आहेत, यास दुजोरा मिळतो. मात्र, ते अलीकडे आले आहेत, हे विधान चुकीचे वाटते. कारण, लेवा पाटीदारांची खानदेश-वऱ्हाडातील स्थलांतरणाची प्रक्रिया इ.स.च्या अकराव्या शतकापासून ते पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत अशी ४५० ते ५०० वर्षे सुरू होती. इकडे आल्यावर कृषिकर्म करू लागल्याने साहजिकच त्यांची क्षात्र परंपरा लोप पावली. प्राचीन काळी महाराष्ट्रात उत्तरेकडून येणाऱ्या दक्षिणपथाच्या मध्य प्रदेशातील नर्मदेवरील हंडिआ या उतारापासून तापीवरील बऱ्हाणपूर खिंडीतील उतारापर्यंतच्या मार्गे लेवा लोक खानदेश-वऱ्हाडात आले असावेत. **लोकसत्ताचे** माजी संपादक व प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ टी.व्ही. पर्वते यांच्या मतेही गुजरातेतील लेवा कणबी हे गुर्जर वंशाचेच आहेत.[२३] प्रस्तुत लेखकाच्या मते लेवा पाटीदारांचे शेवटचे व मोठे स्थलांतर क्रूरकर्मा मेहमूद बेगडा याने १४८४ मध्ये चांपानेर-पावागडावर आक्रमण करून जिंकले, त्या वेळी जी अमानुष कत्तल केली; त्या वेळी झाले असून त्या वेळी हे लोक पावागड-चांपानेर येथून नर्मदा खोऱ्यातील गोध्रा-छोटा उदेपूर-चिकलदा-महेश्वर-बोरवानी-सेंधवा-खरगोन-असिरगडमार्गे खानदेशात आले असावेत आणि म्हणूनच खरगोन खंडवा भागातील तत्कालीन घाटोळी-वऱ्हाडी ही बोलीभाषा त्यांनी स्वीकृत केली असावी. म्हणून, आतापर्यंत हे लोक पावागडहून दक्षिणेस राजपिपला (नांदोद) - सुरत - नंदुरबार - अमळनेरमार्गे आल्याचा जो समज होता; तो खोटा वाटतो. कारण, पावागडहून पुन्हा सुलतानी अमलातील भागातून राजपिपलाकडे जाणे म्हणजे सिंहाच्या गुहेत जाण्यासारखे होते व राजपिपला ते नंदुरबार-अमळनेरपर्यंतच्या भागात कोठेही लेवा पाटीदारांची वस्ती नाही, जशी खरगोन भागात आहे. शिवाय, ते नंदुरबार भागातून आले असते तर त्यांची बोलीभाषा अहिराणी राहिली असती. परंतु, यांची बोली अहिराणी नसून खरगोन-असिरगड-खंडवा भागातील घाटोळी-वऱ्हाडीसदृश मराठी आहे. यांच्या बोलीभाषेत नेमाडी - मराठीतील शब्दही आहेत.

मुसलमानी आक्रमणापूर्वीच्या काळात पाटीदारांच्या पूर्वजांची वस्ती ज्या पंजाब, माळवा व गुजरातमध्ये स्थिरावली होती; त्या प्रदेशांचा पाटीदारांच्या स्थलांतराच्या आधीच्या इतिहासाचा आढावा घेणे उचित राहील. या आढाव्यावरून पाटीदारांच्या इतिहासाशी संबंध जोडणे मोठे धाष्टर्याचे ठरेल. तरीदेखील, पहिल्या सहस्रकातील

पहिली पाच-सहा शतके पाटीदारांच्या पूर्वजांचा इतिहास ज्ञात नसल्यामुळे केवळ तर्कसंगत अनुमान काढणे उचित ठरेल.

ऋग्वेद काळात पंजाब सप्तसिंधू म्हणून ओळखला जात असे, हे वर नमूद झालेलेच आहे. इ.स.पू. ५२१ ते इ.स.पू. ४८५ च्या काळात डरायसच्या नेतृत्वाखाली इराण्यांनी पंजाबचा बराच भाग पादाक्रांत केला होता. पुढे कित्येक वर्षे त्यांचे अधिकारी वंशज पेशावर, तक्षशिला, रावळपिंडी येथे राज्य करीत होते. त्यांच्या मधल्या काळात प्रथमच हैदव सैन्य भारताबाहेर युरोपात लढण्यासाठी गेले होते. इ.स.पू. ३२६ मध्ये अलेक्झांडरच्या नेतृत्वाखाली ग्रीकांनी पंजाबवर स्वारी केली. त्याच्या मृत्यूनंतर मौर्यांनी ग्रीकांकडून सत्ता आपल्या हाती घेतली. पण, ग्रीकांचा प्रभाव तेथे अनेक वर्षे टिकलेला दिसतो. अशोकाच्या वेळी इ.स.पू. २७३ ते इ.स.पू. २३२ या काळात मौर्यांच्या राज्यात पंजाब समाविष्ट होता. त्याने बौद्ध धर्माचा प्रसार केला. इ.स.च्या पहिल्या शतकापासून ते पाचव्या शतकापर्यंत शक, हूण इत्यादींनी स्वाऱ्या करून तेथे सत्ता प्रस्थापित केली होती. सुरुवातीच्या काळात गुर्जर टोळ्याही त्यांच्यासोबत आल्यात. शक, हूण, गुर्जर या पर्थियन वंशीय टोळ्या असून त्या इराणवर जेव्हा सेसॅनिडी वंशीय राजाचे[२४] (इ.स. २२६ ते इ.स. ६४१) राज्य होते; तेव्हा भारतात आल्या असाव्यात. त्या वेळी इराणमध्ये पर्थिया (आताचा जॉर्जिया), अझरबैजन, आर्मेनिया यांचाही समावेश होता. या कालखंडात सेसॅनिडी वंशात शापूर (पहिला व दुसरा), बाराम (पहिला, दुसरा, तिसरा व चौथा), यॅझदेगेर्द, हार्मिश्द असे अनेक कर्तबगार सम्राट होऊन गेलेत. या राजांना उत्तर-मध्य आशियातील अर्धरानटी जमातींच्या (उपरोक्त हूण, शक, गुर्जर) टोळ्यांचा फार मोठा धोका अस्वस्थ करीत राहिला. बाराम, यॅझदेगेर्द, हार्मिश्द या सम्राटांना या टोळ्यांशी तोंड द्यावे लागले. त्यांना सरहद्दीपलीकडे पिटाळण्यात येत असे.[२५] अशाच कार्यवाहीत या टोळ्या भारतात शिरल्या. त्या वेळी इराणमध्ये अद्यापपावेतो इस्लाम धर्म आलेला नव्हता व इराणमधील लोक जरथुस्त्री एकेश्वरवादी (पारशी) होते. ते अहुर मज्द या मुख्य देवतेशिवाय सूर्य, चंद्र, जल, भू व वायू या पंचमहाभुताची पूजा करीत.[२६] इ.स. ६४१ मध्ये इराणवर इस्लामी आक्रमण झाले. जरथुस्त्राचा अर्थ गायी-बैलांचा वृद्ध त्राता असा आहे.[२७] जरथुस्त्राच्या शिकवणीनुसार त्या वेळच्या पर्थियन टोळ्यांतील लोकांनी भटक्या जीवनाचा त्याग करावा, अहुर मज्दाची मानवाला मिळालेली गाय ही श्रेष्ठ देणगी असल्यामुळे तिचा वध न करता पशुपालन करावे आणि शेतीभाती करावी. या गोष्टींना जरथुस्त्राने सर्वोत्तम मानल्याने त्यांच्या शिकवणीनुसार पर्थियामधील गुर्जांनी अथवा गुर्जीस्तानामधील गुर्जर टोळ्यांनी पशुपालन व शेतीव्यवसाय स्वीकारला असावा. तेव्हापासून ते चरवाह (Pastoral) झाले असावेत. पर्थियन लोकांच्या मूलस्थानाविषयी निश्चित माहिती मिळत नाही. फक्त प्राचीन

इराणमधील ते अर्धरानटी भटक्या टोळ्यांपैकी होत आणि गुर्जर हे त्यांच्यापैकीच होत. (आणि म्हणूनच राजस्थानातील गुर्जरोद्‌भवित जमातींनी भटक्या जमातींच्या सवलती मिळण्याबाबतचे रास्त आंदोलन केलेले दिसते.) येथे पर्थिया आणि पर्थियनांचा इतिहास देणे इष्ट वाटत नाही. हूण, शक व गुर्जर टोळ्यांमधील लोकांनी हिंदुस्थानात आल्यावरच हिंदू धर्म स्वीकारला असावा. स्वीकारला असे म्हणण्यापेक्षा म्होरक्यांनी हिंदू धर्म स्वीकारल्यामुळे टोळ्यांमधील लोक आपोआपच हिंदू गणले जाऊ लागले असावेत. पूर्वी सरदार वा टोळीप्रमुखाच्या धर्म-जातीनुसार त्याच्या अनुयायांची धर्म-जात ठरत असे.

अनेक इतिहासवेत्त्यांच्या संशोधक अध्ययनाचा शोध घेऊ जाता असे निदर्शनास येते की, सर्वसाधारणतः इसवी सनाच्या पाचव्या शतकाच्या अखेरीस भारतावर हुणांनी आक्रमण केल्याचे उल्लेख सापडतात, त्या वेळेला त्यांच्यासोबत ज्या अनेक परकीय टोळ्या भारतात जोधपूरपर्यंत आल्या; त्यात गुर्जर लोकांचीही एक टोळी होती. यांनी पंजाबपासून थेट राजस्थानातील अनेक ठिकाणी वसाहती स्थापन केल्या. पंजाबात गुजरात, गुजराणवाला, गुर्जरखान इत्यादी त्यांची अनेक ठिकाणे सुपरिचित आहेत. पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थानातील एका जिल्ह्याचे नावही गुर्जरगढ असे आढळते. अरवली पर्वताच्या पश्चिमेला त्यांची प्रमुख वसाहत असल्याचे सांगता येते.

प्राचीन काळी युरोप व आशिया यांच्या सरहद्दीवर खर्गर लोक राहत होते. तेच श्वेत व हुणांच्या बरोबर भारतात आले. ते खर्गर म्हणजेच गुर्जर होत असे भांडारकर, स्मिथ आदी इतिहासवेत्त्यांचे मत आहे. मात्र सर्वश्री चि.वि. वैद्य, मुन्शी, ओझा यांच्या मते गुर्जर आर्य वंशाशी संबद्ध आहेत. पूर्वीच्या चंदानामक संस्थानातील ब्रह्मपूर राज्यात राठी, राणा व ठाकूर नावाचे आढळणारे लोक गुर्जरांचेच वंशज असले पाहिजेत, असे श्री. गोएट्झ यांचे मत आहे. जाट, गुर्जर व अहीर या जाती एकाच वंशापासून झाल्या असाव्यात, असे इबेटसन सांगतो.[२९] देवीसिंह चौहानांच्या मते या गुर्जर टोळ्यांमध्येच भारतातील गुर्जर व लेवा पाटीदारांचे पूर्वज होते.[३०] एम.एस. कोम्मिस्सरीएट यांच्या मते प्राचीन काळातील भारतातील सर्वात शेवटचे आक्रमण करणारे हूण आहेत. इ.स. ४८० च्या सुमारास स्कंदगुप्ताच्या मृत्यूनंतर पश्चिम भारतातील गुप्त साम्राज्य खिळखिळे झाले. पाचव्या शतकाच्या अखेरीस या बलाढ्य साम्राज्यावर एप्थॅलाईट्स अथवा श्वेत (गौरवर्ण) हुणांनी स्वाऱ्या केल्या. या हुणांचा उल्लेख प्राचीन संस्कृत साहित्य आणि शिलालेखांमध्ये आला आहे. हे रानटी लोक तोरमनच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानच्या वायव्य भागातील खिंडीतून उत्तर भारतातील सपाट प्रदेशात झुंडीच्या झुंडींनी आलेत. त्यांनी येथे दहशत निर्माण केली. सप्तसिंधू प्रदेश व माळव्यातील सत्ता तोरमनचा पुत्र मिहिरकुल व इतर हुणांच्या ताब्यात गेली. हुणांच्या क्रौयामुळे प्रजेत बेदिली माजली. तेव्हा मंदसोरचा पराक्रमी

राजा यशोवर्मन याने मगध राजा नरसिंहगुप्त बालादित्य याच्या साहाय्याने हुणांना माळव्यातून हुसकून लावले. हे हूण भारतात आले होते तेव्हा सुरुवातीस त्यांच्याबरोबर गुर्जर, अहीर, जाट इत्यादी टोळ्याही भारतात आल्या व येथे स्थायिक झाल्या. गुप्त साम्राज्याचा सेनापती भट्टारक हा पराक्रमी गुर्जरांपैकीच मैत्रक वंशातील होता. गुर्जरांचे मूळ स्थान पर्थियामधील (आताचे जार्जिया) गुर्जीस्तान हे होते. हे वर आलेच आहे. अशा प्रकारे ते इराणी वंशाचे आहेत.[३१] आणि देवीसिंह चौहानांच्या याच मतास दुजोरा मिळतो. मात्र, पैकुली शिलालेखानुसार अहीर तिसऱ्या शतकाच्या अखेरीस भारतात स्थित असल्याचा पुरावा मिळतो. संशोधनानुसार हे सिद्ध झाले आहे की, उत्तर प्राचीन युगीन भारतीय इतिहासात प्रसिद्धीस आलेल्या परिहार (प्रतिहार), परमार, चाहमान (चौहान) व चौलुक्य राजवंशाचे पूर्वज म्हणजेच गुर्जर हे हुणांबरोबर पाचव्या शतकात मोठ्या संख्येने आलेत. या पूर्वजांच्या टोळ्या भारतात स्थायिक झाल्यात.[३२] लेवा पाटीदारांचे पूर्वजही गुर्जर असल्याने त्यांचे मूलस्थान पर्थियामधील गुर्जीस्तान हेच असल्याचे अनुमान करता येते आणि खऱ्या अर्थाने लेवा पाटीदारांचा वास्तव इतिहास येथूनच सुरू होतो.

माळवा व गुजरातमध्ये पट्टीदार याचा अर्थ पट्टी म्हणजे सारा वसूल करून शासनात भरणा करणारा महसूल अधिकारी असा अर्थ रूढ होता, हे आपण आधी पाहिलेच आहे. थोडक्यात, मराठीत त्यांना सामंत असे म्हणतात. प्राचीन काळी 'क्षत्रप' हा शब्द प्रांताधिकारी किंवा सुभेदार याअर्थी वापरला जात असे. इराण सम्राटांनी निरनिराळ्या प्रांतांवर 'क्षत्रपावन' (क्षत्रप) नेमलेले होते. डॉ. भांडारकर यांनी या शब्दाचा अर्थ 'देशाचा संरक्षक' असा लावला आहे; तर ग्रीक लेखकांनी याचा अर्थ 'उपशासक' असा लावला आहे. सिकंदरानेही इ.स.पू.च्या चौथ्या शतकात जिंकलेल्या प्रदेशांवर पाच क्षत्रप नेमले होते. अंभी, पोरस या राजांना त्याने भारतात क्षत्रप नेमले होते. भारताच्या इतिहासात शक-क्षत्रपांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. हे शक-क्षत्रप जरी इराणमधून आलेले असले तरी त्यांचा लेवा पाटीदारांच्या पूर्वजांशी संबंध जोडणे उचित ठरणार नाही. मात्र, इराण पूर्वमधील पल्लवांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला होता. त्यातूनच पहलव या आर्यवंशाचा व क्षत्रप यांचा संकर होऊन नवीन जाती किंवा वंश निर्माण झाला असावा. क्षत्रप बोलन खिंडीमार्गे सिंधमध्ये आले. पुढे त्यांनी भारतावर आक्रमण करून पंजाब, मथुरा, माळवा व कोकणावर आपले राज्य स्थापन केले. पुढे चंद्रगुप्त मौर्याने शक-क्षत्रपांची सत्ता समूळ नष्ट केली. या क्षत्रपांमध्ये अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. रुद्रसेन (प्रथम) या क्षत्रपाच्या कालावधीत (इ.स. २०० ते २२२) शकांनी हिंदू धर्माचा स्वीकार केला व पुढे ते हिंदू धर्मरक्षक व संस्कृत भाषारक्षक म्हणून प्रसिद्धीस पावले होते.

पंजाबात मनसानामक जिल्हा आहे. या मनसावरून मन्साराम हे व्यक्तिनाम

पडले आहे. लेवा पाटीदारांमध्ये मन्साराम नावाच्या व्यक्ती आढळतात. यावरूनच पंजाबचा संबंध जोडता येतो. म्हणजे लेवा पाटीदारांचे पूर्वज पंजाब प्रांतात प्रथम आले असावेत.

हुणांच्या टोळ्यांनी इ.स.च्या पहिल्या ते पाचव्या शतकांपर्यंत हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या. त्यांच्याबरोबर प्रथम अहीर व नंतर गुर्जर, जाट इत्यादी टोळ्याही आल्यात. हुणांच्या मिहिरकुल याने तर पंजाब, गुजरात, माळवा प्रांतावर आपली सत्ता स्थापन केली होती, हे वर पाहिलेच आहे. हुणांची माहिती द्यायचे येथे प्रयोजन नाही. अहीर सिथीयन वंशाचे नसून आर्यच आहेत, हे संशोधनाअंती सिद्ध झाले आहे. हे अहीर इराणमधून हूण टोळ्यांबरोबरच भारतात आलेले आहेत. लेवा पाटीदारांमध्ये हुना हे पुरुषवाचक व्यक्तिनाम या हुणांवरूनच आले असावे. गुर्जर, जाट व अहिरांचा परस्पर रोटीव्यवहार पूर्वापार चालत आलेला आहे. बॅक्ट्रीयन ग्रीकांनी टॉलेमी इंडोसिबियातील ज्या प्रदेशाला अरेबिया म्हणतो (आभीरांचा प्रदेश) ते जिंकल्यामुळे आभीर (अहीर) भारतात हुणांबरोबर आलेत, हे मानता येते. इ.स. १८० च्या सुमारास त्यांनी भारतात सत्ता स्थापन केली. क्षत्रप सेनापती रुद्रभूती आभीरचा लेख इ.स. १८१ चा आहे. सिंध प्रांताच्या सीमेवरील राजस्थानातील प्रथम राज्य क्षत्रापांमध्ये विलीन झाल्यावर आभीर क्षत्रपांच्या सत्तेत उच्चाधिकार मिळवू लागले. ईश्वरसेन आभीराची सत्ता खानदेशवर सन ४१९ च्या सुमारास होती (नाशिक शिलालेख - लेणे क्रमांक १०). तिसऱ्या, चौथ्या शतकांत त्यांनी क्षत्रपांच्या सर्व प्रदेशावर सत्ताग्रहण केले. शालिवाहनानंतर आभीर राजे खानदेश, नाशिक, काठेवाड, पालनपूर व कच्छ (म्हणजे महाराष्ट्राचा उत्तर भाग व गुजरात) प्रदेशावर राज्य करीत होते.

प्राचीन काळी पर्थियनवंशी पहलवांनी भारतावर आक्रमण केले होते. त्यांनी पर्थियात कास्पियन समुद्राच्या खुरासनाच्या भोवताली राज्य स्थापले होते. इ.स.पू दुसऱ्या शतकात पहलव राजा मिश्रदात (प्रथम) ने हेरात व कंदाहार जिंकले. त्यानंतर, शकांशी झालेल्या संघर्षामुळे शक व पहलवांची वेगळी राज्ये झालीत. इ.स.च्या पहिल्या शतकात दक्षिण अफगाणिस्तानावर राज्य करणाऱ्या पहलव राजा गोंडो फरनेज याने भारताच्या वायव्य भागातील बराच प्रदेश शकांकडून जिंकून काबूल, कंदाहारवर सत्ता प्रस्थापित केली.[३३] येथे पहलवांशी लेवांचा संबंध जोडणे उचित ठरणार नाही. केवळ पहलवांमधील शेवटची दोन अक्षरे लव असल्याने आणि पहलव हे इराणमधील पर्थियन असल्याने ही माहिती दिली आहे.

कुशाण हेसुद्धा परकीय वंशाचे म्हणजे मध्य आशियातील यूएची वंशाचे लोक भ्रमंती करीत वल्खच्या आसपास स्थायिक झालेत. कुशाण ही त्यांची एक शाखा! त्यांचा प्रमुख कुजुल कदफिसेस याने काबूल-कंदाहार जिंकून सिंधू नदीपर्यंत मजल

मारली. त्यालाच कुशाण म्हणत. त्याचा पुत्र बेमा याने पंजाब जिंकून गंगेच्या किनाऱ्यावरील वाराणसीपर्यंतचा प्रदेश पादाक्रांत केला होता. तो स्वतःला सर्वलोकेश्वर, महीश्वर (शैवपंथी महेश्वर हे मूळचे गुर्जर व नंतर मारवाडी! हा वंश या पराक्रमी राजापासून निर्माण झाला असण्याची शक्यता आहे). देवपुत्र म्हणवित असे. कुशाणाने जरी बौद्ध धर्म स्वीकारला तरी बेमाने हिंदू धर्म स्वीकारला होता. तो शिवभक्त होता. त्याचे साम्राज्य कच्छ, काठेवाड आणि नर्मदेपर्यंत होते. तो इ.स. ६५ मध्ये वारला. सुप्रसिद्ध कनिष्क राजा याच वंशातील! त्याने बौद्ध धर्म स्वीकारला होता. त्याने पर्थिया, कापिश, गंधार, काश्मीर, सिंध, माळवा तसेच चीनमधील काइघर, खोतान व याश्कंद हे भाग आपल्या राज्यात समाविष्ट केले होते. कनिष्कानंतर सहा-सात कुशाणवंशी सम्राट होऊन गेले. पाचव्या शतकात हुणांनी ते साम्राज्य नष्ट केले. यांच्या काळात शांतता नांदून भरभराट झाली होती. त्यांची राज्यपद्धती राजधिष्ठित होती. साम्राज्याचे १) राष्ट्र, २) आहार, ३) जनपद, ४) देश वा वैश्य असे भाग पाडले गेले. प्रत्येक प्रांतावर क्षत्रप म्हणजे प्रांताधिकारी (संस्कृतमध्ये पट्टीदार) नेमण्याची प्रथा याच काळात सुरू झाली.

सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात ठाणेश्वराच्या प्रभाकरवर्मनने हुणांना पंजाबमधून हुसकले. त्याचा मुलगा हर्षवर्धन हा पंजाबचा राजा झाला. हर्षाच्या मृत्यूनंतर (इ.स. ६४७) वर्धन राज्याची छकले झाली. सातव्या शतकाच्या मध्यात चिनी प्रवासी हुएनत्संग हा उत्तर हिंदुस्थानात आला होता. त्याला तक्षशिला, सिंधुपूर यांच्या भोवतालचा प्रदेश काश्मीरच्या प्रभुत्वाखाली आणि सिंधूपासून बिआसपर्यंतचा मध्य पंजाब टक्क राज्यात मोडत असल्याचे आढळून आले. हुएनत्संगने पंजाबच्या भूमीला सुखभूमी नावाने संबोधले आहे. आठव्या शतकाच्या सुरुवातीस ठाणेश्वराचे राज्य नष्ट झाले. आग्नेय पंजाबमध्ये कनौजच्या तौमर घराण्याची सत्ता तेथे प्रस्थापित झाली होती. त्यानंतर, अजमीरच्या चाहमानांनी (चौहान किंवा चव्हाणांनी) तोमर राजांना तेथून हुसकले.

इराकचा सुभेदार हज्जाज याने मुहमद बिन कासिमच्या नेतृत्वाखाली अरबांचे सैन्य सिंधच्या दाहिरवर इ.स. ७१२ मध्ये रवाना केले. त्याने सिंध व मुलतान जिंकले आणि तेथे अरबांची सत्ता प्रस्थापित केली. पण, सिंधू व झेलममधील प्रदेश ओहिंदच्या ब्राह्मण घराण्याच्या सत्तेखाली होता. इ.स. ८०४ च्या सुमारास जलंदरचे राज्य अस्तित्वात होते. इ.स. ९७९ मध्ये लाहोरचा राजा जयपाल हा गझनीचा अमीर सबक्तगीर यावर चालून गेला. पण, तह करून त्याला परत यावे लागले. इ.स. ९८८ मध्ये सबक्तगीर याने जयपालचा पराभव केला. इ.स. १००१ मध्ये गझनीने स्वारी करून पेशावर येथेही जयपालचा पराभव केला. इ.स. १००९ मध्ये जयपालचा मुलगा आनंदपाल याने उज्जैनी, ग्वाल्हेर व इतर हिंदू राजांचा संघ

निर्माण करून गझनीच्या मुहम्मदाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. १०२१ पर्यंत पंजाबचा बराचसा भाग मुहम्मदाने जिंकून घेतला होता. ११७५ ते ११९१ या काळात मुहम्मद घोरीने स्वाऱ्या करून पेशावर व सरहिंद हस्तगत केले. यानंतर, कुतुबुद्दीन ऐवक हा लाहोर येथे स्वतंत्र राजा म्हणून राज्य करू लागला. १२४६ ते १२८५ पर्यंत बल्बन आणि ककुवाद या सुलतानांनी पंजाबवर झालेल्या मंगोलांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार केला. १२९६ ते १३०५ पर्यंत मंगोलाच्या ताब्यात पंजाब होता. १३५१ मध्ये तिसरा फिरूझशाह तुघलक गादीवर आल्यापासून आधुनिक (मध्ययुगीन) पंजाबच्या इतिहासाला सुरुवात झाली.[३४]

प्रस्तुत लेखकाच्या मते आठव्या ते अकराव्या शतकात अरब व मुसलमानांचे सप्तसिंधू म्हणजे सिंध व पंजाबवर जे हल्ले व आक्रमण झाले; त्यात पाटीदारांच्या पूर्वजांचा मारवाड, राजस्थान, गुजरात व माळवा भागात झालेल्या स्थलांतराचा इतिहास जोडता येईल. म्हणजेच मुस्लिम हल्ले व आक्रमणामुळे हे लोक दक्षिण भागात सुरक्षित ठिकाणी सरकत गेले.

पंजाबात पुराणकाळी झेलम (वितस्ता) नदीच्या पूर्वेला चिनाब (असिक्नी) व रावी (इरावती) या नद्यांच्या मधल्या प्रदेशात मालवगणनामक आयुधजीवी लोकसंघाचे राज्य होते. ते कौरवांच्या बाजूने लढले होते. हे लोक आर्य असून फार पुराण-प्राचीन काळापासून पंजाबात आले होते. इ.स.पू. ३२६ च्या सुमारास सिकंदराने केलेल्या आक्रमणावेळी शुद्रकांचे वैर विसरून या दोन्ही गणांनी सिकंदराचा निकराने प्रतिकार केला. ग्रीक इतिहासकारांनी मालवांना मल्लोई म्हटले आहे. ते स्वाभिमानी व युद्धविद्या जाणणारे होते. मालवांना सिकंदराचे सैन्यही भीत होते. सिकंदराचा जय झाला खरा; परंतु मालवांचे धैर्य व शौर्य पाहून तो स्तिमित झाला. त्यानंतर, मालव दोन-तीन शतके सतलजच्या दक्षिणेस फिरोजपूर, लुधियाना, भटिंडा भागात स्थलांतरित झाले असावे. या प्रदेशाला अजूनही मालवा हे नाव रूढ आहे. पुढे त्यांनी मेवाडात स्वतंत्र गणराज्य स्थापले. त्यांची मालवनगर नावाची राजधानी जयपूर राज्यात बुंदीपासून ४५ मैलांवरील कोटीनगर असावे. येथे मालवांची नाणी सापडली आहेत. इ.स.पू.च्या पहिल्या शतकातच जयपूरच्या मालवांपैकी काही लोक मध्य प्रदेशात गेले. तिथे शकांचे राज्य होते. त्यांनी इ.स.पू.च्या सुमारास शकांचा पराभव करून पुन्हा अवंतीवर सत्ता स्थापली. पण, इ.स.च्या तिसऱ्या शतकाच्या प्रारंभी मालवांनी अवंतीचे राज्य परत मिळविले. गौतमीपुत्र सातकर्णी याने मालवांच्या मदतीने शकांचा पूर्ण पराभव केला. त्यानंतर, मध्य प्रदेशात राज्य स्थापलेल्या शक-क्षत्रपांशी मालवांचा २०० वर्षे संघर्ष चालू होता. त्या काळात मालवांनी मेवाडच्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील प्रदेशात जाऊन नवीन वसाहती केल्या असाव्या. त्यांच्या प्रभावामुळेच या सर्व भूभागाला माळवा हे नाव प्राप्त झाले. त्या प्रदेशात मालवांनी गणराज्ये

स्थापन केली असावी. इ.स.च्या चौथ्या शतकात सम्राट समुद्रगुप्ताने केलेल्या दिग्विजयात मालवांनी त्याची सार्वभौम सत्ता मान्य केली. मालव लोक गुप्त साम्राज्यात सामंत म्हणून नांदू लागले. दशपूर (मंदसोर) येथे मालवांचे औलिकरनामक घराणे राज्य करीत होते. त्याच घराण्यातील यशोवर्मा याने इ.स.च्या सहाव्या शतकात हूण सरदार मिहिरकूल याचा पराभव केला आणि गुप्त साम्राज्यातील बराच प्रदेश जिंकून आपले साम्राज्य स्थापले.[३५]

माळवा हा मध्य भारतातील एक प्राचीन देश असून त्यात मध्य प्रदेशातील शिवपुरी, गुणा, विदिशा, भेळसा, राजगढ, शाजापूर, देवास, इंदूर, उज्जैन, मंदसोर, रतलाम, धार व झाबुआ हे जिल्हे माळव्याच्या पठारावर आहेत. भोपाळ विभागातील सिहोर, रायसेन व होशंगाबाद जिल्हेही माळव्यातच येतात. नर्मदा नदीच्या खोऱ्यातील निमाड प्रदेशाचा अंतर्भाव माळव्यातच होतो. राजस्थानातील सिरोंज पिडवा व छबडा हे भाग, त्याचप्रमाणे झालाबाद व कोटा प्रदेशांचाही अंतर्भाव माळव्यात होतो. बेतवा नदी माळव्याची पूर्व सीमा; चंबळ व मही नद्या माळव्याची वायव्य सीमा दर्शवितात. माळव्याची पश्चिम सीमा गुजरातला भिडली आहे आणि सातपुडा पर्वतश्रेणी दक्षिण सीमा होय. मालव लोक या पठारी प्रदेशामध्ये सर्वत्र पसरल्यामुळे कालांतराने या प्रदेशाला मालवदेश असे नाव प्राप्त झाले आहे. वाकाटक राजा पृथ्वीषेण (द्वितीय) (इ.स. सहाव्या शतकाचा उत्तरार्ध) याच्या बालाघाट शिलालेखात अवंती प्रदेशाच्या राजाला मालवाधिपती ही पदवी दिलेली आढळते. बाणभट्टानेही मालवाधिपती हा शब्द वापरला आहे. यशोवर्माने (मालवगणातील) साम्राज्य स्थापल्याचे आपण वर पाहिले आहे. मध्यंतरी काही काळ वाकाटक राजा हरिषेण यानेही अवंतीवर राज्य केले. पुढे प्रभाकरवर्मन याने माळव्यावर सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट व प्रतिहार या राजवंशाची सत्तास्पर्धा दीर्घकाळ चालू होती. प्रतिहारांची माहिती स्वतंत्र दिलेली आहेच. इ.स.च्या नवव्या शतकात परमार वंशातील मुंज व भोज हे राजे अत्यंत शूर व विद्वान होऊन गेले. त्यांच्या शासनकाळात माळवा हे साहित्य व संस्कृतीचे प्रमुख केंद्र बनले. धारानगरी ही त्या विशाल राज्याची राजधानी होती.

प्रतिहार हे स्वतःस सूर्यवंशी म्हणवून घेत. नागभट या प्रतिहार राजाने तौमरांनंतर आलेल्या मौखरी घराण्याकडून कनौजचे साम्राज्य जिंकून प्रतिहारांची राजधानी कनौजला हलविली.[३६] नंतरच्या प्रतिहार राजांच्या काळात अयोध्या शहर प्रतिहार साम्राज्यात आले. रामभूमीवर राज्य केल्यामुळे त्यांनी स्वतःस सूर्यवंशी म्हणवून घेतले व त्यातून काहींनी आपण रामपुत्र लवाचे वंशज असल्याचे म्हणवून घेतले असावे. समाजाच्या भावनांना हात घालून भोळ्याभाबड्या समाजाला सांगितले जाते की, तुम्ही अमुक-अमुक भगवान कुळातील वंशज आहात तर श्रद्धेमुळे समाजाचा त्यावर चटकन

विश्वास बसतो व हे मत एकदा का मनात घर करून राहिले की, पिढ्यान्‌पिढ्या उलटून गेल्या तरीही ते मनातून निघत नाही. असेच माझ्या मते भगवान रामचंद्र यांच्या लव या पुत्रापासून लेवाची व कुश या पुत्रापासून कडवाची उत्पत्ती झाली असावी असे विधान काही विद्वानांनी केले. शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंगजी (१६६६-१७०८) यांनी **स्वतः लिहिलेले नाटक** व शिखांच्या वाङ्‌मयातील **रामावतार** या ग्रंथांमध्ये लिहिले आहे की, ते स्वतः लवाच्या वंशात व गुरु नानकदेवजी कुश वंशातले आहेत. त्यांनी असेही लिहिले आहे की, लवाच्या वंशजांनी लाहोर व कुशाच्या वंशजांनी कसूर येथे शेकडो वर्षे राज्य केले. पंजाबातील सर्व वंश सूर्यवंशी असून लव व कुश यांनी मद्र देशाच्या राजकन्यांशी विवाह केलेत. कुशाने कसूर आणि लवाने लाहोर वसविले. हेच विधान जनमानसात रुजले. त्यासाठी **गॅझेटिअर**चाही आधार घेण्यात आला. परंतु, **गॅझेटिअर**कार आणि तसे मोघम विधान करणारे इतिहासकार हे असे लिहितात की, ''लेवा पाटीदार हे लोक स्वतःस रामपुत्र लवाचे वंशज मानतात.'' प्रत्यक्षात असणे आणि मानणे यात फरक आहे. ते प्रत्यक्षात असे रोखठोक सांगत नाही की, लेवा पाटीदार हे लवाचे वंशज आहेत. म्हणजेच येथेही दंतकथा व आख्यायिकांचाच आधार घेतला जातो. परंतु, मानवशास्त्रज्ञ (Anthropologists) हे आख्यायिकांवर विश्वास न ठेवता शब्दोत्पत्तीशास्त्रा (Etymology) नुसार आणि मानववंशशास्त्राच्या (Anthropology) मूल मानवी पिंडा (Basic trait) नुसार स्पष्टपणे सांगतात की, गुजरातेत नर्मदा नदीला रेवा असे म्हणतात व रेवा नदीकाठचे पाटीदार (शेतकरी) ते रेवा पाटीदार म्हणजेच लेवा पाटीदार होत. तसेच दीर्घकाळ ज्या भागावर प्रतिहारांची सत्ता होती; त्या-त्या भागांचे सेन्सस अहवाल पाहिल्यास असे दिसून येते की, त्याच भागात पाटीदारांचे वसाहतीकरण (Colonization) झालेले आहे. म्हणून, प्रतिहारांपासून पाटीदार व रेवाकाठचे पाटीदार ते लेवा पाटीदार या मताशी ठाम आहेत. इ.स.पू. काही शतके आधी हिंदुस्थानातून पर्थिया, सिथिया देशांत लवाच्या वंशजांनी राज्य केले असावे व तेच नंतर गुर्जर टोळ्या म्हणून हिंदुस्थानात आले असावे. या प्रवासी (Immigrants) गुर्जर वंशातील ज्यांनी क्षत्रियत्व गाजविले; त्यांचे हिंदू धर्मात शुद्धीकरण करण्यात आले तेव्हा त्यांना अग्नीवंशाचे समजण्यात आले व प्रतिहारांनी मौखरी साम्राज्य जिंकून कनौजला राजधानी नेली. अशा प्रकारे रामभूमीवर राज्य केल्याने ते स्वतःस रघुवंशी समजू लागले आणि यातूनच लेवाचा संबंध लव यांच्याशी जोडण्यात आला असावा. मग, हे लोक रेवा नदीकाठीच का वसले, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. म्हणून लेवा पाटीदार व कडवा पाटीदार हे पाटीदारांचे प्रादेशिक भेद आहेत. कारण, **प्रकरण १; लेवा पाटीदार व्युत्पत्ती** यात दिलेलेच आहे की, रेवा नदी म्हणजे नर्मदा नदीकाठच्या प्रदेशातील पाटीदार ते रेवा तथा लेवा पाटीदार आणि पूर्वीच्या बडोदे

संस्थानातील उत्तर भागातील कडी परगण्यातील पाटीदार ते कडवा पाटीदार (आर.ई. एन्थोवेन, **कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** व्हा २, १९२२, पृ.१३९) अशी व्याख्या आहे. रेवा पाटीदार हे रेवा नदीच्या उत्तरेकडे लागून असलेल्या चरोतरमध्ये वसले आहेत; तर कडवा पाटीदार हे अहमदाबादच्या उत्तरेस असलेल्या विरमगाव - मेहसाणामधील कडी भागात वसले आहेत. पुढे रेवाचा अपभ्रंश लेवा असा झाल्याने काही विद्वान व भाट रामपुत्र लवापासून लेवा व कुशापासून कडवा अशी उत्पत्ती मानू लागले.

१३०५ मध्ये अल्लाउद्दीन खलजीचा सेनापती ऐन-उल-मुल्कने परमारांचा पूर्ण पराभव करून माळवा जिंकला व माळवा दिल्ली सुलतानशाहीचा सुभा बनला. १४०१ मध्ये मुहम्मद घोरीच्या वंशातील दिलावर खाँ सुभेदाराने स्वातंत्र्य पुकारून मांडू राजधानी केली. त्याचा पुत्र अलफखाँ (हांशेगशहा, १४०५-१४३४) याने मांडवगडावर सुंदर वास्तू बांधल्या. त्यानंतर, तख्तावर आलेला महमूद खाँ खलजी (१४३६ ते १४६९) यास फेरिश्ता सच्चा, न्यायी व उदार म्हणतो. त्याने राज्यविस्तार करून सामर्थ्य वाढवले. त्यानंतरचे सुलतान विलासी निघाले. त्यांनी १५१० पर्यंत राज्य केले. या काळात मांडू जैनांचे तीर्थस्थान व विद्याकेंद्र बनले. त्यानंतर, गादीवर आलेल्या महमूद खलजी (दुसरा) याने मेदिनीराम पूरविया या राजपुतास वजीर नेमल्याने राजपुतांचे महत्त्व वाढले. महमूद खलजीला ते सहन न झाल्याने त्याने गुजरात सुलतानांची मदत घेतली तर मेदिनीरामने मेवाड राणा संगाची मदत घेतली. राणा संगाने चंदेरी, विदिशा व गागरौन जिंकून महमुदास कैद केले; पण उदारपणे सोडून दिले. इ.स. १५३१ मध्ये गुजरात सुलतानाने माळवा जिंकून महमुदास ठार केले. इ.स. १५३५ मध्ये हुमायूनने माळवा जिंकला. शेरशहा दिल्ली तख्तावर बसल्याने त्याने शुजाअतखाँ याला माळव्याच्या तख्तावर नेमले. त्याचा मुलगा बाजबहादूर याने १५५५ मध्ये माळव्याचे स्वातंत्र्य पुकारले. तो व राणी रूपमती संगीत क्षेत्रात नावाजले. १५३२ मध्ये अकबराने बाजबहादूरचा पराभव केल्यावर माळवा मुघल साम्राज्याचा भाग बनला व माळव्याची राजधानी उज्जैनला आणण्यात आली. त्या काळी माळव्यात उज्जैन, रायसेन, चंदेरी, मांडू, सारंगपूर, हंडिया, गागरौन, कोटडी, पिंडवा, बीजागड, नंदुरबार, गढा, मंदसोर व मांडू या १४ जिल्ह्यांचा समावेश होता. मुघल राजवटीत माळव्याची खूप भरभराट झाली.

येथे हा इतिहास देण्याचे प्रयोजन एवढेच की, माळवा भागात पाटीदारांची संख्या बरीच मोठी आहे. मालवगणातील लोकांनी गुप्त साम्राज्याची सत्ता सार्वभौम म्हणून मान्य केल्यावर ते या राज्यात सामंत म्हणून म्हणजे महसूल वसूल करून शासन भरणा करणारे अधिकारी म्हणून नांदू लागले. माळवा आणि गुजरात भागात पट्टी (सारा) वसुली करणारे या अर्थाने हे पाटीदार रूढ झाल्याने मालव हे पाटीदार

असू शकतात. पुढे परमार, मुघल व मराठा सरदारांच्या काळातही पाटीदारांचे हे काम अव्याहतपणे सुरूच होते. ते ब्रिटिश काळात सर्व्हे सेटलमेंटमुळे बंद पडले.

आपण पंजाब व माळव्यामधील आर्य वसाहतीचा आढावा पाहिला. त्याबरोबर गुजरातचा पाहणे उचित राहील. पुराण काळातील या भागात सहस्रार्जुननामक हैहय वंशातील महापराक्रमी राजा होता. हैहय लोक शूर व उत्साही असले तरी अनगड व आडदांडच होते. त्यांच्या शाखेचे राज्य महिष्मती (महेश्वर) येथे होते. त्यांनीच पुढे गुजरात देश जिंकून त्याला अनुपदेश हे नाव दिले. सहस्रार्जुनाने त्या राज्याचे साम्राज्य बनवले. त्याने सौराष्ट्र आपल्या सत्तेखाली आणून पश्चिम सागरावर प्रभुत्व मिळविले. त्याचा पंजाबपासून लंकेपर्यंत दरारा बसला. सत्तामदाने उन्मत्त झालेल्या सहस्रार्जुनाने भृगुकुलातील तपोधन जमदग्नीचा शिरच्छेद केला. परशुरामाने महिष्मतीनगरीचा विध्वंस करून अनुपदेशही पादाक्रांत केला. भृगुकुल हे एक प्राचीन ऋषीकुल. विद्या व सत्तेत त्यांनी आपले नाव गाजविले. परशुरामाने अनुपदेश पादाक्रांत करून गुजरातमध्ये आर्य संस्कृतीचे केंद्र स्थापले. भृगुकुलातील मार्कंडेयाने अनुपदेशात आपला आश्रम उभारला. भृगुकुल आश्रमामुळेच भडोचला भृगुकच्छ असे नाव प्राप्त झाले होते. श्रीकृष्णाने द्वारकेला राज्य स्थापले व अनुपदेश आर्यावर्ताचा भाग बनला.

यानंतरच्या अनुपदेशाचा अनेक शतकांचा इतिहास ज्ञात नाही. सनपूर्व ५०० च्या म्हणजे पाणिनीच्या काळात या प्रदेशात यौधेयांची अनेक गणराज्ये निर्माण झाली. हे लोक प्रथम पूर्व पंजाबात सतलजतिरी वसलेले होते. तिथून ते मुलतानमार्गे सिंध व सौराष्ट्र या प्रदेशात आले. या गणाला पाणिनीने आयुधजीवी (शस्त्रसहाय्याने उपजीविका करणारे) संघ म्हटले आहे. **हरिवंशपुराणा**नुसार हे यौधेय म्हणजे उशीनगर राजाचे वंशज होते. ते बुद्धिमान, साहसी, व्यापारी व युद्धकुशल होते. पुढे शक-महाक्षत्रप रुद्रदामन याच्यापुढे मात्र त्यांना हार खावी लागली. इसवी सनपूर्व चौथ्या व तिसऱ्या शतकांत मौर्यांची सत्ता या प्रदेशावर होती आणि गिरनार हे त्यांचे मुख्य ठिकाण होते. (गिरनार शिलालेख). संप्रती या सम्राटानंतर मौर्यांची सत्ता तिथून लुप्त झाली आणि बॅक्ट्रियन ग्रीकांची सत्ता सुरू झाली. त्यांची नाणीही येथे सापडली आहेत. त्यानंतरचा सुमारे एक शतकाचा इतिहास ज्ञात नाही.

इ.स.च्या पहिल्या शतकात शक क्षत्रप नहपान याने डांगपासून सौराष्ट्रपर्यंतचा प्रदेश पादाक्रांत केला होता. त्या वंशातला रुद्रदामन हा महापराक्रमी होता. त्याने अपरांत व सौराष्ट्र यावर सत्ता स्थापिली होती. गिरनारवर त्याचे शिलालेख आहेत. आनर्त व सौराष्ट्रवर त्याचे सुभेदार होते. त्यानंतर, १००-१५० वर्षे दक्षिण गुजरातवर आभीरांनी राज्य केले. ते इ.स.च्या पहिल्या शतकापासून सौराष्ट्राचे रहिवासी होते.

इ.स.च्या पाचव्या शतकात गुजरात गुप्त साम्राज्याचा एक भाग होता. स्कंदगुप्ताचा राजप्रतिनिधी पर्णदत्त हा गिरीनगर येथून सौराष्ट्राचा कारभार करीत होता. स्कंदगुप्ताच्या

मृत्यूनंतर पर्णदत्ताचा सेनाधिकारी भट्टार्क (भट्टारक) मैत्रक याने वलभी (सौराष्ट्र) येथे स्वतंत्र राज्य स्थापले. मात्र, तो गुप्तांचा मांडलिकच राहिला (इ.स. ५५९-६७). मैत्रक वंशातील सहावा राजा गृहसेन संपूर्णपणे स्वतंत्र राज्य करू लागला होता. सातव्या शतकाच्या प्रारंभी माळव्यावरही मैत्रकांनी सत्ता प्रस्थापित केली होती आणि पूर्वेकडे विंध्य आणि दक्षिणेकडे सह्यपर्वतापर्यंत त्यांच्या राज्याचा विस्तार झाला होता. त्यांचे राज्य ७६६ वर्षे चालू होते.

गुप्त साम्राज्याच्या अस्तानंतर भारताबाहेरून आलेल्या गुर्जर टोळ्यांमधील भारतात स्थायी झालेला व गुप्त साम्राज्याचा सेनापती असलेल्या भट्टारकाने (मैत्रक) गुजरात भागावर राज्य स्थापन केले, हे आपण वर पाहिलेच आहे. अशा प्रकारे सहाव्या ते आठव्या शतकांच्या अखेरपर्यंत राज्य करणाऱ्या वलभींचा वंश गुर्जर असल्याने[३७] व गुर्जर राजांची राजधानी इ.स. ५८५ ते ७३४ पर्यंत भडोचजवळ नांदोद येथे असल्याने आठव्या ते तेराव्या शतकापर्यंत अनहिलवाड पाटण येथे राजधानी स्थापलेले चावडा व चालुक्य सम्राट गुर्जर असल्याने आणि त्याच्याही पुढे उत्तरेस दक्षिण राजपुतान्यात भिन्नमाळ किंवा श्रीमाळ राजधानी असलेल्या ठिकाणी शक्तिशाली गुर्जरांचे राज्य स्थापन झाल्याने हे स्पष्ट होते की, पश्चिम भारताच्या या भूभागास प्रामुख्याने गुर्जरत्ता म्हणजेच गुजरांची जमीन म्हणजेच गुजरात हे नाव पडले आहे. काही संशोधकांच्या मते प्राचीन काळी अरवली पर्वताच्या पश्चिमेस, जोधपूरच्या आसपास या आस्थलांतरींनी म्हणजे इराणमधून (त्यापेक्षा इराणमार्गे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल) आलेल्या गुर्जर लोकांनी मोठी वसाहत केली होती. या प्रदेशात गुर्जरांची मोठी वस्ती झाल्याने त्या प्रदेशाला गुर्जरत्ता असे नाव पडले. यालाच पुढे राजापुतांच्या राज्यांमुळे राजपुताना हे नाव मिळाले. सुप्रसिद्ध इतिहासकार कोम्मिस्सरीएट यांनी **हिस्टरी ऑफ गुजरात** (खंड १) मध्ये सप्रमाण म्हटले आहे की, भट्टारक हा एक तर मिहीरकुलातील म्हणजे हुणांपैकी असावा किंवा परदेशामधून आलेल्या गुर्जरांपैकी असावा व दुसरे विधान अधिक सयुक्तिक वाटते. काही पंडित मात्र वलभीच्या भट्टारकांचे मैत्रक घराणे हे यादववंशी क्षत्रिय घराणे मानतात.[३८] गुप्त साम्राज्यात हा भट्टारक वलभीचा सुभेदार होता. गुप्त साम्राज्य बुधगुप्तच्या काळात (इ.स. ४७७ -५००) क्षीण झाल्यावर भट्टारकाची सौराष्ट्रवर सत्ता आली. मात्र, त्याने स्वतःस राजा घोषित न करता सेनापती म्हणूनच राज्यकारभार पाहिला. भट्टारकानंतर धरसेन प्रथम (इ.स. ४९३-४९९), द्रोणासिंह (४९९-५१९), ध्रुवसेन प्रथम (५१९-५४९), धरपट्ट (५४९-५५३), गृहसेन ५५३-५६९), धरसेन द्वितीय (५६९-५८९), शिलादित्य प्रथम (५९०-६१५), खरग्रह (६१५-६२१), धरसेन तृतीय (६२१-६२७), धृवसेन द्वितीय (६२७-६४१), धरसेन चतुर्थ (६४१-६५०), धृवसेन तृतीय (६५०-६५५), खरग्रह द्वितीय (६५५-६५८), शिलादित्य द्वितीय

(६५८-६८५), शिलादित्य तृतीय (६८५-७१०), शिलादित्य चतुर्थ (७१०-७४०), शिलादित्य पंचम (७४०-७६२) व शिलादित्य षष्ठम् (७६२-७७६) हे राजे होऊन गेले. यानंतरचा राजा कोण झाला, हे ज्ञात नाही आणि ७८३ च्या सुमारास वलभीच्या मैत्रकांचे राज्य लयास गेले.

मैत्रकांनी सुमारे ३०० वर्षे सौराष्ट्रात राज्य केले. दीर्घकाळ त्यांची सार्वभौम सत्ता नांदत होती, असे त्यांच्या ताम्रपटावरून ध्यानात येते. धरसेन चौथा पराक्रमी दानशूर विद्वान व विद्वानांचा आश्रयदाता होता. प्रसिद्ध कवी भट्टी यांच्याच आश्रयाला होता. या राजांनी वलभी राज्याचे निरनिराळे भाग पाडले. त्यावर भिन्न श्रेणीचे अधिकारी (पट्टीदार) नेमलेले होते. राज्याच्या साहाय्याला नेमलेले मंत्रिमंडळ व सचिवालय होते. गुप्त साम्राज्यातील शासनव्यवस्थेप्रमाणेच ही सर्व व्यवस्था दिसून येते. युआनच्यांग याने या राज्याचे वर्णन 'अत्यंत समृद्ध' असे केलेले आहे. यांनी जे भिन्न श्रेणीचे अधिकारी नेमले, त्यात पट्टी वसूल करणारे (महसूल अधिकारी) पाटीदार यांचाही समावेश निश्चितच असणार!

लेवापुराणानुसार अजय राजाने गुजरातेत लेवाकूळ बसविले. त्याचा पुत्र महीदास मोठा पराक्रमी व प्रजावत्सल राजा होता. माळव्यात आजदेखील गोरगरीब जनता महीदासाचा रासडा (पोवाडा) गातात. महीदासाच्या दरबारात अनेक कविजन, गुणिजन नांदत होते, आश्रयाला होते. त्याने अनेकांची उपजीविका चालवली. उदार मनाने देणग्या दिल्या. तो माळव्यातील चंद्रगुप्त राजाचा मुख्य प्रधान झाला. त्याचा पुत्र भाण-भान-भानू नावाचा होता.

जेम्स टॉड आणि विल्यम क्रूक यांच्या **अनल्स ऑफ मेवार** (पृ. २४०-५६) नुसार मेवाडातील सुप्रसिद्ध अंबरचा राणा जयसिंग याच्या घराण्याचा संबंध सूर्यवंश म्हणजे राजपुत्र लवाशी जोडला आहे. त्यासाठी त्यांनी जयसिंगाचा पिता राजसिंग याच्या दरबारातील मन कबेश्वराच्या **व्रज भाका**मधील **राजविलास**, सदाशिव भाटाचा **राजरत्नाकर** तसेच जयसिंगाच्या दरबारातील सदाशिव भाटाच्याच **जलविलास** ग्रंथांचा आधार घेतला आहे. उदेपूरच्या राणांच्या वंशावळीसंबंधीची कच्ची रूपरेषा त्यांच्याच भाटाकडून मिळविण्यात आली. या रूपरेषेस जयसिंगाने जमविलेल्या कालगणना चित्राची जोड देऊन त्यांच्या वंशावळीबाबतचा पाया रचला गेला. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे **खूमन रईसा** हे प्राचीन सामग्रीवर रामाची वंशावळ शोधण्यासाठी स्पष्टपणे रचलेले आधुनिक वाङ्मय दस्तावेज सांगता येईल. कुंभब्रेत (खंबायत) येथील उद्ध्वस्त जगन्माता (देवांची माता) मंदिरातील शिलालेखांवर आधारित **ममदेवी प्रसिष्ठा** ग्रंथाची हस्तलिखित प्रत एका भाटाच्या विधवेकडे मिळाली होती. पाचव्या शतकात हा असताना राणाचे पूर्वज वलभीपूरहून उदेपूर-जोधपूरकडे स्थलांतरित झाले. यास संस्कृत व फार्सी साहित्यात तसेच जैन व बौद्ध वाङ्मयातही पुरावे आढळतात.

प्राप्त माहितीनुसार राणा जयसिंगाचा पूर्वज उत्तरेकडून द्वारका व वलभीस संवत २०१ इ.स. १४५ च्या सुमारास येऊन राहिला. तो कनकसेनाचा वंशज मानला जातो आणि म्हणून कनकसेन हा राणा जयसिंगाच्या घराण्याचा पूर्वज मानला जातो. भगवान रामचंद्रानंतर लवाच्या छप्पन्नाव्या पिढीत त्याचा एक वंशज सुमित्र हा होऊन गेला, असे भाटांच्या नोंदीवरून दिसते. सुमित्राचा वंशज कनकसेन हा विक्रमादित्याचा इ.स.पू. ५६ समकालीन मानला जातो. अर्थात, रामायणानंतरच्या कालगणनेशी हे तेवढेसे सुसंगत वाटत नाही. भट्टारक या मैत्रकाने वलभीपुरावर वर्चस्व प्रस्थापित केल्यावर कनकसेनाचे वंशज अंबर वा जोधपूर भागात राज्यस्थापनेसाठी स्थलांतरित झाले. कनकसेन हा लाहोरला राजा होता. हिंदू दंतकथेनुसार लाहोर गाव रामपुत्र लव याने वसविलेले लवपूर-लोहकोट-लोहावर हेच असल्याचे मानले जाते. काही तज्ज्ञांच्या मते संस्कृत व्याकरणकार पाणिनी याचे जन्मस्थान असलेले शलातूर लहारूर म्हणजेच लाहोर असावे. परंतु, स्ट्रॅबो अथवा प्लिनी यांच्या वृत्तान्तात लाहोरचा उल्लेख आढळत नाही. म्हणून तज्ज्ञांच्या मते इ.स.च्या पहिल्या शतकापूर्वी लाहोरची स्थापना नसावी. लाहोरचा पहिला लिखित उल्लेख चिनी प्रवासी ह्यूएनत्संग याच्या इ.स. ६३० च्या प्रवासवर्णनात मिळतो. भाटांच्या दंतकथांनुसार लवाचा एक वंशज सुमित्र हा लाहोर येथे राज्य करीत होता आणि भाटांच्या दंतकथा व नोंदीनुसार पाटीदारही लवाचेच वंशज आहेत. जर इ.स.पूर्वी लाहोर शहर अस्तित्वात असेल व पाटीदार हे लवाचे वंशज असतील तर या सुमित्राची एक शाखा पर्थिया (उत्तर इराण) मधील गुर्जानी भागात गेली असली पाहिजे व दुसऱ्या ते चौथ्या शतकात हूण व जाट टोळ्यांबरोबर गुर्जर टोळी म्हणून पुन्हा भारतात आली असली पाहिजे. यात बरेच तथ्य वाटते. देवीसिंह चौहानसारखे सुप्रसिद्ध इतिहासकारही हेच मानतात. त्यापुढील क्षत्रिय प्रतिहार वा पाटीदारांच्या इतिहासाची सांगड घालता येते. काही इतिहासकारांच्या मते गुर्जर भारतात आले तेव्हा जे गुर्जर राष्ट्रकुटांचे रक्षक वा सेनापती म्हणून कामगिरी करू लागले म्हणून त्यांना रक्षक याअर्थी प्रतिहार असे संबोधण्यात येऊ लागले. त्यातूनच राष्ट्रकूट आणि प्रतिहार या दोन्ही राजघराण्यांमध्ये वैर उत्पन्न झाले; तर काही इतिहासकारांच्या मते हे स्वतःस सूर्यवंशी समजू लागल्याने लवापेक्षा रामाचा रक्षक (प्रतिहार) जो लक्ष्मण याचे वंशज मानू लागले. नेपाळचे राजे स्वतःस लक्ष्मणाचेच वंशज समजतात. लव हासुद्धा कुशाच्या सार्वभौम सूर्यवंशी राजसत्तेचा रक्षक सेनापती म्हणून काम पाहू लागल्याने तो कुशाचा प्रतिहार ठरतो. गुजरातमधील गुर्जरांपैकी काही शाखा स्वतःस लवाचे वंशज मानतात. विशेषकरून रेवा चरोतरमध्ये राहणारे गुर्जरवंशी प्रतिहार (पाटीदार) हे स्वतःस लवाचे वंशज मानतात. यांच्यातील काही कुळे गुजरात सुलतानांच्या जुलमी राजवटीत चौदाव्या-पंधराव्या शतकांत खानदेश-वऱ्हाडात स्थलांतरित झाली आहेत. म्हणूनच प्रतिहारांचा

सुसंगत इतिहास पाहणे आवश्यक आहे.

चाणक्याच्या काळापर्यंत सप्तसिंधू म्हणजे पूर्वीच्या पंजाब प्रदेशात कठ म्हणजे करड वा कठवा वा कडवा वा कडी आणि मालवा म्हणजे महालेवा वा लेवा अशा नावांची जनपदे होती. लेवा जनपदाचे मुख्यालय लवपूर म्हणजे लाहोर होते, असे मानले जाते. आजही पंजाबात मेहरा, कपूर, सेठ कुलनामाचे लोक स्वतःस लववंशी मानतात तर वेदी, बेदी, खत्री कुलनामाचे लोक स्वतःस कुशवंशी मानतात. ते स्वतःस क्षत्रिय समजतात. यावरून भारतातील सुप्रसिद्ध कपूर घराणे हेसुद्धा लेवा असून लववंशी आहेत, हे सिद्ध होते. यावरून, पंजाब-हरियाणात लेवा व कडवा हे लोक पूर्वीपासून आहेत, हे सिद्ध होते. मात्र, ते पाटीदार समजत नाहीत. श्री.डी.व्ही. ताम्हनकरांच्या **सरदार पटेल**नामक ग्रंथात (प्रकाशक - जॉर्ज एलन अलविन लि.) लेवा पटेल ही लढाऊ जात आहे. मुघल गुजरातवर आक्रमण करीत असताना त्यांचा लेवा पटेल लोक सामना करीत होते. बडोदा संस्थानिक पिलाजीराव गायकवाड यास गुजरातमधील लेवा व कडवा पटेलांनी सैनिक बळ, रसद व आर्थिक बळाची मोठ्या प्रमाणावर मदत केल्याने मुघल सुभेदार हुसेन दीन बाबी यास गुजरात सोडून पळून जावे लागले होते, असे **बडोदा स्टेट गॅझेटिअर**मध्ये ब्रिटिश संपादक जेम्स एम. कॅम्बेलने नमूद केले आहे. तसेच मत मंगूभाई पटेल यांनी व्यक्त केले आहे.

पूर्वीपासून आनर्त म्हणजे सौराष्ट्रातही लेवा लोक राहत आहेत. तसे दोन शिलालेखही प्राप्त झाले आहेत.

१. आनर्तपूर सध्याच्या सौराष्ट्रातील बडनगर येथील धनाजी वर्मानामक लेवा इसमाने तीन वर्षांत सहा विष्णुयाग, तीन महारुद्र व तीन गायत्री पुरश्चरण केले. तो वारल्यावर त्याच्या तीन पत्नी सती गेल्या. धनाजीस कुशल वर्माच्या उपनयन संस्काराच्या वेळी महारुद्र केला होता. कुशल वर्माने दाता राज्याच्या डोंगराच्या पायथ्याशी अंबा भवानीस जाण्याच्या मार्गावर आसरा (विहीर) बांधून तेथे खालील कोरीव शिलालेख लावला आहे -

ॐ स्वस्ति श्री संवत ७८१ विक्रमार्ग चंद्रसुत धनर्वसुत
कुशल वर्मत्यनेन इयं वापी धर्मार्थ परोपकारार्थ त्वकारित।।

हा शिलालेख विक्रम संवत्सर ७८१ म्हणजे शके ६४६ वा इ.स. ७२४ चा आहे.

२. दुसरा शिलालेख विक्रम संवत्सर ११४४, शालिवाहन शके १००९ (इ.स. १०८७) चा असून लेवा कणबी पनीरचा मुलगा बीजी रजी त्यांचा मुलगा आनंद व त्यांचा मुलगा बनवीर यांनी आनंदपुरी (आनर्तपूर ऊर्फ बडनगर) मध्ये सूर्य-चंद्रास साक्षी ठेवून आपली चतुष्कोनी चार हजार पावलांची सीमेवरची जमीन नटवर शर्मा या ब्राह्मणास विक्रम संवत ११४४, शालिवाहन शके १००९, उत्तरायण (पौष) महिन्याच्या

शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला धर्मार्थ दान दिली, असा त्याचा आशय आहे.

गुर्जर राजवंश

राजतरंगिणी व **पृथ्वीराजरासो** ग्रंथानुसार सूर्य व चंद्र यांच्यापासून सुरू झालेल्या राजवंशाप्रमाणे अग्नीपासून सुरू झालेल्या वंशाला अग्निकुले असे म्हणतात. यात चौहान, चालुक्य, परमार व पडिहार (परिहार किंवा प्रतिहार) या चार गुर्जर राजपूत कुळांचा समावेश होतो. क्षत्रियांच्या छळवादामुळे परशुरामाने क्षत्रियांचा निप्पात केल्यावर अर्बूद (अबू) पर्वतावर निवास करणाऱ्या ऋषींनी दैत्यांचा अत्याचार असह्य होऊन इंद्राच्या पुढाकाराने ब्राह्मण तसेच ब्रह्मा, रुद्र व विष्णू या देवतांच्या सहकार्याने क्षत्रियनिर्मितीसाठी केलेल्या यज्ञात इंद्राने दर्भाकृती अग्नीत टाकल्यावर अग्निकुलोत्पन्न अनुक्रमे परमार, चालुक्य, परिहार व चौहान यांची उत्पत्ती झाली. त्यांनी दैत्यांचा पराभव केला. परमारला अबू, धार व उज्जैन प्रदेशाचे स्वामित्व देण्यात आले. चालुक्य अनहिलपूर पाटणचा राजा झाला. परिहार (प्रतिहार) मरुस्थलीचा (कच्छचे रण) स्वामी बनला. चौहान मकावती प्रदेशाचा राजा झाला, असे चंदभाटाने प्रतिपादित केले आहे. तो म्हणतो ३६ राजकुळांत अग्निकुल श्रेष्ठ आहे.

गुर्जर प्रतिहार राजवंश

या ग्रंथातील पहिले प्रकरण : **लेवा पाटीदार - व्युत्पत्ती** यात प्रतिहार या शब्दावरून शब्दोत्पत्तीशास्त्राचा आधार घेतल्यास पाटीदार हा शब्द निघणे अधिक संभवनीय आहे. हे आलेलेच आहे. हा राजवंश प्रतिहार नावानेही प्रसिद्ध आहे. राजपुतांच्या चार अग्निकुलांपैकी परिहार या कुलापासून प्रतिहार हा राजवंश उगम पावला, असे काही पंडितांचे मत आहे.[३९] पण, या राजांच्या प्रशस्तीमध्ये तसेच प्रतिहार सम्राट महिंद्रपाल आणि त्याचा मुलगा महिपाल यांच्या दरबारी आश्रयास असलेला सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक राजशेखर याने आपल्या **विद्धशाल भंजिका** या ग्रंथात प्रतिहार घराणे आर्यावर्तातील सर्वश्रेष्ठ सार्वभौम घराणे असे नमूद करून त्याची रघुकुलतिलक अशी पदवी (बिरुद) लावलेली आहे, तसेच त्याच्याच **बालभारत** या संस्कृत नाटकात रघुवंशमुक्तामणी असे बिरुद लावले आहे.[४०] यावरून हे राजे स्वतःस सूर्यवंशी मानत, असे दिसते आणि यावरून लेवा पाटीदारांच्या वंशावळी ठेवणारे खानदेश-भाट (मांगटे) यांनी पाटीदारांची सूर्यवंशी अशी नोंद केलेली दिसते. प्रतिहार वंशाने प्रारंभी मालव तथा अवंती या देशावर राज्य केले. अवंतीनगरी तथा उज्जैनी ही त्यांची प्रारंभिक राजधानी, दुसऱ्या नागभटाने मौखरींचे कनोज जिंकल्यावर तेथे हलविली. त्यानंतर बंगालचे पाल, दक्षिणेचे राष्ट्रकूट यांच्याशी कनोजच्या प्रतिहारांची साम्राज्यस्पर्धा दीर्घकाळ चालू होती. त्यात प्रतिहार विजयी होऊन त्यांनी उत्तर भारतात विशाल साम्राज्य स्थापन केले.

ज्या गुर्जर लोकांवरून गुजरात व दक्षिण राजस्थानास गुर्जरत्ता हे नाव पडले;

त्यांच्यातील प्रतिहारांच्या पूर्वजांनी या भागावर राज्य स्थापन केले होते. प्राचीन काळी अरवली पर्वताच्या पश्चिमेस, जोधपूरच्या आसपास गुर्जर लोकांची मुख्य वसाहत होती म्हणून त्या प्रदेशाला गुर्जरत्ता असे म्हणत असत. यालाच पुढे राजपुताना हे नाव मिळाले. या गुर्जर लोकांपैकी हरिश्चंद्र रोहिल्लानामक पुरुषाने त्या प्रदेशात एक लहानसे राज्य इ.स.च्या सहाव्या शतकात स्थापन केले. हाच गुर्जर प्रतिहारांचा प्रथम राजा मानला जातो. त्यास दोन राण्या होत्या. त्यातील एक ब्राह्मण वंशातील होती. तिचे नाव इतिहासकारांना समजू शकले नाही. तिच्यापासून उत्पन्न झालेल्या वंशास ब्राह्मण प्रतिहार समजले जाऊ लागले. गुजरातमधील पलिवाल ब्राह्मण या वंशाचे असल्याचे समजले जाते. हरिश्चंद्राची दुसरी राणी क्षत्रिय होती. तिचे नाव होते रजनीभद्रा! हरिश्चंद्रास तिच्यापासून भोगभट, कक्का (कक्कूक), रज्जिल आणि दद्द असे चार पुत्र होते. हिची मुलेही स्वतःला प्रतिहार म्हणवीत. म्हणून हा वंश पुढे गुर्जर-प्रतिहार नावाने प्रसिद्ध झाला. भद्राच्या उपरोक्त चार मुलांपैकी रज्जिलाची राजधानी मांडव्यपूर (जोधपूरजवळचे मंडोर) येथे होती.[४१] इ.स.च्या सातव्या शतकात ती भिन्नमाळ येथे होती, असे युआनच्यांग सांगतो. या वंशातील राजांनी ११-१२ पिढ्यांपर्यंत (सुमारे ३५० वर्षे) या प्रदेशावर राज्य केले.

याच वंशाच्या (हरिश्चंद्राच्या) एका शाखेने लाट देशात (गुजरातमध्ये) राज्य स्थापले होते. हरिश्चंद्राचा पुत्र दद्द हा त्यांचा संस्थापक होता. त्याची राजधानी भरूचजवळ नांदीपुरी (नंदवाळ) अथवा नांदोद येथे होती. या राजघराण्यातील आठ राजांनी इ.स. ५८० ते इ.स. ७३५ पर्यंत तिथे राज्य केले. त्यांचे राज्य गुजरातमध्ये उत्तरेस मही नदीपासून तापी नदीच्या दक्षिण तीरापर्यंत आणि पूर्वेस संगमखोत (संखेडा) पासून खंबायतच्या आखातापर्यंत पसरलेले असावे. यांचे राज्य थेट नाशिक-त्र्यंबकेश्वरपर्यंत असावे, असे अंजनेरीला सापडलेल्या दोन ताम्रपटांवरून मानता येईल. एक ताम्रपट गुर्जरवंशीय जयभट तृतीय याच्या कालावधीतील इ.स. ७१० चा आहे. हा राजा गुर्जर प्रतिहार हरिश्चंद्र याचा पुत्र दद्द याने भडोचजवळ नांदोद येथे राजधानी करून राज्य स्थापले होते, त्याचा असून त्यात त्याच्या वंशजांची कर्ण, दद्द (द्वितीय), जयभट (द्वितीय), दद्द (तृतीय), जयभट (तृतीय- दान देणारा राजा) यांचा उल्लेख आहे. दुसरा ताम्रपट दोन संचांचा असून पहिला संचही हरिश्चंद्र प्रतिहाराचा मुलगा राजा भोगशक्ती (भोग भट) याचा इ.स. ७१० च्या सुमाराचा आहे. यात त्याच्याशिवाय गुर्जरवंशीय सिंहवर्मराज, स्वामिचंद्र यांचा व चालुक्य नृपती विक्रमादित्य याचा उल्लेख आहे. त्यात अंजनेरीच्या हिंदू व जैन मंदिरांना देणग्या दिल्याचा उल्लेख आहे. यावरून ही गुर्जरवंशीय शाखा चालुक्यांची मांडलिक होती, हेही अनुमान काढता येते.[४१अ]

काही इतिहासकार (चंदभाटाच्या **पृथ्वीराजरासो** ग्रंथाचा आधार घेऊन) यांना

लवाचे वंशज मानतात. हे जर खरे असेल तर ते इ.स.पू. ५६ च्या सुमारास लाहोरला राजधानी करून असलेल्या कनकसेनाच्या वंशजाच्या एका शाखेतील असले पाहिजेत. कनकसेनाच्या वंशजांची एक शाखा वलभीपूरला राज्य करीत होती. या शाखेची वंशावळ **पृथ्वीराजरासो** मध्ये दिली आहे. तशी नांदोद शाखेची वंशावळ उपलब्ध असून तेच प्रतिहार घराणे म्हणून ओळखले जाते. प्रतिहार हे लक्ष्मणाचे वंशज असोत वा लवाचे, ते सूर्यवंशी आहेत, हे निर्विवाद!

हरिश्चंद्राचा पुत्र रज्जिल याच्या वंशातील काही लोक माळव्यात जाऊन स्थायिक झालेत आणि त्यांनी अवंती (उज्जैन) येथे आपली सत्ता स्थापन केली. प्रतिहारांच्या या दोन्ही शाखा आपली उत्पत्ती ईक्ष्वाकुवंशातील म्हणजे सूर्यवंशातील भगवान राम यांचा धाकटा बंधू लक्ष्मण याच्यापासून झाली, असे मानतात.[४२] जोधपूरच्या बऊका शिलालेखानुसार त्यांच्या घराण्याचा संबंध इंद्राचे गर्वहरण करणाऱ्या रावणपुत्र मेघनाद यावर विजय मिळविणाऱ्या व रामाचा द्वारपाल (प्रतिहार) म्हणून मानल्या गेलेल्या लक्ष्मणाशी जोडला गेला आहे. जोधपूरच्या (मंडोरच्या) रज्जिलाचा वंश पुढीलप्रमाणे आहे.

रज्जिल
↓
नागभट (याला पेल्लापेल्ली असेही म्हटले जाते)
↓
नागभट (बहुधा हे बिरूद असावे. याची पत्नी जाज्जिकादेवी होती)
↓ ↓
तात भोज
↓
यशोवर्धन
↓
चंदूक
↓
शिलूक
↓
झोटा
↓
भिल्लादिव्य
(यास दुर्लभादेवी व भट्टी वंशातील पद्मिनीदेवी या दोन राण्या होत्या.)
↓ ↓

कक्कुक हा घाटियाळाच्या राज्यावर आला.	बउका हा जोधपूरच्या राज्यावर आला.

बऊकाचा पुत्र नागभट पहिला (७३०-७६०) याने अवंती (उज्जैन) येथे राजधानी स्थापून माळव्यावर सत्ता प्रस्थापित केली. सागरतळ (ग्वाल्हेर) येथील मिहिरभोज याच्या प्रशस्ती (शिला) लेखानुसार नागभट पहिला ते मिहिरभोज (८३६-८८५) पर्यंतचा प्रतिहारांचा राजवंश आणि सविस्तर राजकीय घटनाक्रम दिलेला आहे.[४३] तसे पाहिले तर अवंती देशावर (माळवा) अवंतीनगरी (उज्जैन) येथे राज्य स्थापणाऱ्या या घराण्यातील नागभट पहिला हा प्रतिहार साम्राज्याचा संस्थापक राजा मानला जातो. जोधपूरच्या बऊकाच्या शिलालेखानुसार सूर्यवंशी लक्ष्मणाशी जोडला गेला आहे. लक्ष्मणापासून उत्पन्न झालेल्या वंशात नागभट पहिला याचा जन्म झाला आहे, अशी नोंद या शिलालेखात असून हा वंश उच्च कुलोत्पन्न मानला जात असून त्याचा संबंध थेट रामाच्या कुटुंबाशी जोडला गेला आहे.[४४] शिलालेख - ताम्रपटांनुसार काही इतिहासकार नागभट पहिला याचा काळ इ.स. ७३० ते इ.स. ७६० असा मानतात. अवंतीचे प्रतिहार घराणे इ.स.च्या आठव्या शतकाच्या मध्यात ख्यातनाम झाले. त्या वेळी भारतावर अरबांचे जे उत्पाती आक्रमण झाले होते; ते या घराण्यातील नागभट राजाने मोडून काढून उत्तर भारताचे संरक्षण केले. अरब इतिहासकारांनुसार उज्जैनच्या या प्रतिहार राजाने अरबांच्या आक्रमणास तोंड देऊन भारतातील इतर भागातील अरबांना हुसकून लावले होते, अशी नोंद करण्यात आली आहे.[४५] त्याने भडोचवरही वर्चस्व प्रस्थापित केले. अरबांनी जिंकलेली अनेक लहान राज्ये त्याने परत जिंकून घेतली आणि नांदीपूर व जोधपूर येथील गुर्जर प्रतिहारांच्या राज्यांवर प्रभुत्व मिळविले. लाट देशात (गुजरातमध्ये) चाहमान (चौहान) राजे नागभटाचे सामंत म्हणून राज्य करू लागले. जोधपूरचे राज्य मात्र त्याने हरिश्चंद्राच्या वंशजांकडेच ठेवले. त्या घराण्यातील शिलूक हा बहुधा शेवटचाच स्वतंत्र राजा असावा. इ.स. आठव्या शतकाच्या उत्तरार्धात जोधपूरचे राज्य निष्प्रभ झाले, असे दिसते. नागभट या प्रतापी राजाने आपली सत्ता राजपुताना व गुजरात या प्रदेशात वाढविली. राष्ट्रकुटांशीही त्याला दोन हात करावे लागले. तो राष्ट्रकुटांवर वर्चस्व गाजवू शकला नाही. तथापि, आपले राज्य त्याने राष्ट्रकुटांच्या ताब्यात जाऊ दिले नाही.

नागभट (प्रथम) नंतर त्याच्या भावाचे पुत्र कक्कूक आणि देवराज यांनी मिळून १८ ते २० वर्षे राज्य केले. त्यांचा कालावधी साधारणतः इ.स. ७६० ते ७७८ असा मानला जातो. ते दोघेही दुर्बल होते. प्रतिहार साम्राज्य कसेबसे टिकवून ठेवले, हेच त्यांचे कार्य सांगता येईल.

देवराजनंतर त्याची राणी भुयिकादेवी (भूमिकादेवी) पासून झालेला पुत्र वत्स राजा इ.स. ७८०च्या सुमारास अवंतीच्या गादीवर सत्तारूढ झाला. जैनांच्या **हरिवंश** ग्रंथानुसार अवंतीचा वत्सराज हा तत्कालीन भारतातील चार प्रमुख राजांपैकी एक होता.[४६] त्याच्या कारकिर्दीत त्याने जोधपूरच्या बऱ्याच मोठ्या भागांवर नियंत्रण प्राप्त

केले होते. हा अतिशय शौर्यशाली राजा होता. त्याने इ.स. ८०२ पर्यंत राज्य केले. वत्स राजाने राजपुताना येथील भट्टी वंशाचे राज्य काबीज केले व पश्चिम भागातील आपली सत्ता बळकट केली आणि उत्तर भारताचाही बराच प्रदेश जिंकून प्रतिहार साम्राज्याचा पाया घातला व त्याने कनौज मिळविण्याचे प्रयत्न केले. पण, राष्ट्रकूट राजा ध्रुव याच्याकडून त्याचा पराभव झाला आणि कनौजचा राजा इंद्रायुध याचा त्याने पराभव करून त्यास आपला मांडलिक बनविले. कनौजनंतर गौडचा (बंगालचा) पालवंशी राजा धर्मपाल याने प्रभुत्व मिळविले. अशा प्रकारे उत्तर भारताचे स्वामित्व व कनौजचे सिंहासन मिळविण्यासाठी गुर्जर - प्रतिहार, राष्ट्रकूट, बंगालचे पाल यांच्यात सत्तासंघर्ष व लढाया सुरू झाल्या. त्यात पुढे गुर्जर प्रतिहारांचा विजय झाला, हे पुढे आलेले आहे.

वत्स राजानंतर राणी सुंदरादेवीपासून झालेला त्याचा पुत्र नागभट (दुसरा) हा गादीवर आला.[४७] त्याची कारकीर्द इ.स. ८०२ ते इ.स. ८३३ पर्यंत असावी. त्यानेच बंगालचा धर्मपालचा मांडलिक असलेल्या कनौजच्या चक्रायुधाचा व त्यानंतर चक्रायुधाचा स्वामी बंगाल नृपती धर्मपाल याचाही पराभव करून आपली राजधानी उज्जैनहून कनौजला हलविली व आपली सीमा बंगालच्या पूर्वेपर्यंत वाढविली. अशा प्रकारे कनौजचे सिंहासन गुर्जर-प्रतिहारांकडे आले. त्याने आपल्या पराक्रमाने आंध्र, कलिंग, विदर्भ, सिंध या राजांनाही पराभूत करून त्यांच्यावर प्रभुत्व स्थापित केले. त्याने आनर्त (काठेवाड), माळवा, किरात (नेपाळ), तुरुष्क, (सिंध), वत्स (मध्य भारताचा कौसंबी मुख्यालय असलेला आग्नेय भाग), आणि मत्स्य (अलवार = जयपूर आणि भरतपूरचे भाग) या राजांचे डोंगरी किल्लेसुद्धा काबीज केले. म्हणजेच त्याच्या राज्यात आताचा मथुरा आणि अलाहाबादसहित संपूर्ण उत्तर प्रदेश (उत्तर प्रदेशाचा नेपाळचा बनलेला मोठा ईशान्य भाग, माळवा, गुजरात आणि सिंध या प्रदेशांचा समावेश झाला होता.) त्याने राष्ट्रकूट राजा गोविंद (तिसरा) (इ.स. ७९४-८१४) याच्याशी लढाई केली. परंतु, गोविंद तिसरा याने नागभट (दुसरा) याचा पराभव करून कनौजवर वर्चस्व प्रस्थापित केले. त्यानंतर, कनौज पुन्हा प्रतिहारांच्या ताब्यात आलेले दिसते. यानंतर तो साम्राज्यविस्तार करू शकला नाही, तरी त्याची सत्ता कोणत्याही प्रकारे क्षीण झाली नाही. त्याने इ.स. ८३३ पर्यंत राजस्थान व गुर्जर देश (गुजरात) या भागावर राज्य केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. याच वेळी गुजरातमध्ये पाटीदारांची वसाहत झाली असावी; जे खानदेश लेवा पाटीदारांचे पूर्वज आहेत. नागभट दुसरा हा वैदिक धर्माचा अभिमानी होता. त्याचा जैन धर्माकडेही ओढा होता. **बाप्पा भट्टीचरित**नुसार बाप्पा भट्टीने त्यास जैन धर्माची दीक्षा दिली होती. पण हे खरे वाटत नाही. त्याने गंगेत जलसमाधी घेतली, असे **प्रभावकचरित** या जैन ग्रंथात म्हटले आहे. वत्स राजाप्रमाणेच नागभट दुसरा याचे व्यक्तिमत्त्व

प्रभावी होते. दोघेही कुशल सेनानायक होते. त्यांनी प्रतिहार साम्राज्याचा मजबूत पाया घातला, यात संशय नाही. नागभट दुसरा याचे उत्तर व मध्य भारतात अनेक शिलालेख व ताम्रशासन उपलब्ध आहेत.

नागभट (दुसरा) याच्यानंतर त्याचा राणी इशात्तादेवीपासून झालेला पुत्र रामभद्र हा कनौजच्या गादीवर आला. तो जरी सूर्योपासक असला तरी नीतिभ्रष्ट व कुकर्मी होता. त्याची कारकीर्द फक्त तीन वर्षांपुरती होती. (इ.स. ८३३-८३६) त्याच्या काळात प्रतिहारांची सत्ता क्षीण झाली.

रामभद्रानंतर त्याची राणी आप्पादेवीपासून झालेला भोजदेव ऊर्फ मिहीरभोज हा इ.स. ८३६ मध्ये कनौजच्या गादीवर आला. यालाच भोज प्रथम अथवा पहिला प्रतिहार भोज असेही म्हणतात. हा तत्कालीन उत्तर भारतातील सर्वात शक्तिशाली सम्राट गणला जात होता. त्यास अनेक बिरुदांनी ओळखले जात होते. त्याचे उत्तर व मध्य भारतात अनेक शिलालेख व ताम्रशासन उपलब्ध आहेत. दौलतपूर शिलालेखात त्याचा महाराजा श्रीभोजदेव असा पूर्ण उल्लेख असून त्यास प्रभास (प्रभासेन) हे बिरूद लावलेले आहे.[४८] इ.स.८७५ व ८७६ च्या ग्वाल्हेरच्या वैल्लभट्टस्वामीन मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख 'परमेश्वर श्रीभोज देव' असा केला आहे.[४९] ग्वाल्हेरच्या ताम्रशासनात त्याचा उल्लेख आदिवराह व मिहीर या भगवान विष्णूच्या बिरुदांनी केला आहे.[५०] यावरून तो सूर्य व विष्णूचा उपासक होता, हे सिद्ध होते. सागरतल ताम्रशासनातही त्याचे असेच उल्लेख केलेले आढळून येतात. तो शाक्त पंथाच्या म्हणजेच भगवतीचा भक्त म्हणून 'परमभगवतीभक्त' या नावाने ओळखला जातो. रामभद्राच्या अल्पावधीच्या काळात प्रतिहार घराण्याची प्रतिष्ठा लोप पावली होती; तेव्हा मिहीरभोजच्या ताब्यात सत्ता आली. त्याने आपली सर्व शक्ती पणाला लावून आपल्या राज्यास पुनःवैभव प्राप्त करून दिले. मिहीरभोज हा अतिशय प्रतापशाली शासक होता. त्याने हिमालयापासून नर्मदेपर्यंत आपला साम्राज्यविस्तार केला. त्याने बुंदेलखंड, मारवाड, माळवा, राजपुताना, गुजरात या राज्यांना आपल्या साम्राज्यात सामील केले. बंगाल नृपती धर्मपाल व त्याचा मुलगा देवपाल यांनी गुर्जर प्रतिहारांशी सतत संघर्ष केले. देवपालाने गुर्जर प्रतिहारांचा बराच माळवा जिंकला होता. देवपालाच्या मृत्यूनंतर (इ.स. ८५५) भोजाने संपूर्ण माळवा जिंकून आपल्या साम्राज्यात सामील केला. एवढेच नाही तर बंगालच्या पालांचा संपूर्ण बीमोड करून पश्चिम बंगालपर्यंत आपल्या राज्याची सीमा वाढविली. गुहील आणि चेदी राजांनी त्याच्याशी मैत्री जमवून चांगले संबंध ठेवले. राष्ट्रकुटांशी झालेल्या लढाईत त्याला यश आले नाही. त्यामुळे इ.स. ८६७ च्या सुमारास प्रतिहार साम्राज्यास अपयशाचा फार मोठा धक्का बसला. तरीही, या पराजयाने न खचता काठेवाडामधील राष्ट्रकुटांचा (राष्ट्रकूट नृपती कृष्ण द्वितीय याचाही) पराभव करून गुजरात व सौराष्ट्रावर सत्ता

स्थापन केली. कलचुरी व बुंदेलखंडाचे चंडोल यांनीही त्याचे प्रभुत्व मान्य करून मांडलिकत्व स्वीकारले होते. त्याने प्रतिहारांचे विशाल साम्राज्य प्रस्थापित केले. कल्हणच्या **'राजतरंगिणी'** या ग्रंथात त्याच्या गुणांचा उल्लेख करण्यात आला आहे.[५१] तो पराक्रमी योद्धा, समर्थ व कुशल शासक तसेच कला व विद्वानांचा आदर करणारा होता. सुलेमान या अरब लेखकाने (इतिहासकाराने) राजा भोजाच्या प्रचंड फौजेची व राज्यातील शांतता व सुव्यवस्था याबाबत त्याची तारीफ केली आहे.[५२] त्याच्या दरबारी विद्वान साहित्यिक आश्रयाला होते. त्यात क्षेमीश्वर याचा उल्लेख करता येईल. प्रतिहार भोज राजाने अरबांच्या मुलतान या राज्यावर अनेकदा स्वाऱ्या करून ते ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पण, तेथील सूर्यमंदिरामधील सूर्य मूर्तींच्या भंजनाचा व नाशाचा धाक अरबांनी घातल्यामुळे हिंदू पुजाऱ्यांच्या विनवणीवरून त्याला परत फिरावे लागले. मुसलमानांच्या छळापासून हिंदुस्थानास मुक्त केल्याची द्योतक अशी आदिवराह पदवी त्याने धारण करून त्या छापाची चांदीची 'आदिवराह द्रम्म'नामक नाणी पाडली होती. तो कधी वारला, याबाबत इतिहासकारांमध्ये मतभिन्नता आहे. काही इतिहासकारांच्या मते तो इ.स. ८८५ च्या सुमारास, तर काही इतिहासकारांच्या मते ८९० च्या सुमारास वारला. प्रतिहारांवर सखोल संशोधन करणाऱ्या बैजनाथ पुरींच्या मते तो ८९० मध्ये वारला. मिहीरभोजनंतर त्याची राणी चंद्राभट्टारिकापासून झालेला त्याच्यासारखाच प्रतापी मुलगा महिंद्रपाल हा कनौजच्या प्रतिहार गादीवर पदारूढ झाला. त्याने बंगाल व मगधचा फार मोठा प्रदेश काबीज करून प्रतिहार साम्राज्यात समाविष्ट केला. त्याने संपूर्ण सौराष्ट्रही आपल्या अधिपत्याखाली आणले. अशा प्रकारे या पराक्रमी राजाने प्रतिहार साम्राज्य पूर्व समुद्रापासून (बंगालपासून) पश्चिम समुद्रापर्यंत (सौराष्ट्रपर्यंत) व हिमालय पर्वतापासून विंध्याच्या दक्षिणेपर्यंत पसरविले. तो इतिहासात महिंद्रपाल, महिंद्रमूद, महिंद्रपालदेव भाक, महेंद्रपालदेव राजा या नावाने प्रसिद्ध आहे. तोसुद्धा आपल्या पित्याप्रमाणे गुणिजन, कवी व साहित्यिकांची कदर करणारा होता. त्याच्या दरबारी सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक राजशेखर हा आश्रयास होता. राजशेखराने आपल्या वाङ्मयात त्याचा निर्भय राजा असा उल्लेख केला आहे. त्याचे व त्याचा उल्लेख असलेले इतर समकालीन राजांचे अनेक शिलालेख, ताम्रपट उत्तर भारतात काठेवाडपासून बंगालपर्यंत व पंजाबपासून नर्मदेपर्यंत उपलब्ध आहेत. महेंद्रपाल हा इ.स. ८९० ते ९१० पर्यंत सत्तेवर होता.

महेंद्रपालास देहनागादेवी व महिदेवी देवी नामक दोन राण्या होत्या. देहनागादेवीचा पुत्र भोज दुसरा व महिदेवी देवीचा पुत्र विनायक पाल हे होत. त्याशिवाय, महेंद्रपालास आणखीही राण्या होत्या. त्यातील एकीस भट्टीपालनामक पुत्र होता. आईचे नाव काही इतिहासकारांच्या मते महादेवी असे असावे. महेंद्रपालाच्या मृत्यूनंतर इ.स. ९१० च्या सुमारास त्याचा मुलगा भोज दुसरा हा जरी गादीवर

आला तरी त्याचा सावत्र भाऊ भट्टीपाल पहिला याने बंड करून भोज दुसरा यास पराभूत करून कनौजचे सिंहासन इ.स. ९११-१२च्या सुमारास बळकावले. भोज दुसरा यास फक्त चेदीराज कोक्कलचा पाठिंबा होता; तर संपूर्ण गुर्जर देशाने - चौहान, गोहील, परमार, चालुक्य यांनी महिपालास पाठिंबा दिल्याने व साहाय्य केल्याने महिपाल यशस्वी झाला व इ.स. ९१२ मध्ये सिंहासनारूढ झाला. इ.स. ९१५ मध्ये राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय) याने महिपालावर स्वारी करून कनौज घेतले. पण, महिपालाने ते परत मिळवले. पण, प्रतिहार साम्राज्य दुबळे झाले आणि पतनापासून तो वाचवू शकला नाही. प्रतिहारांच्या दरबारी आश्रयाला असलेले राजशेखरसारखे साहित्यिक व विद्वान कनौज सोडून इतर राजांच्या आश्रयास निघून गेले. इ.स. ९४३ मध्ये महिपाल मरण पावला. काही विद्वानांच्या मते त्याची महिपाल, क्षितीपाल, विनायक पाल आणि हेरंब पाल अशी नावे आहेत. मात्र, विनायक पाल हा अलग आहे.

महिपालानंतर कनौजच्या गादीवर प्रतिहारवंशीय दुर्बल शासक आल्यामुळे प्रतिहारांच्या गौरवशाली साम्राज्याचे तुकडे-तुकडे झाले. त्याच्यानंतर चंदेल, कलचुरी, चाहमान, परमार, गुहिल, चौलुक्य, तोमर (राजस्थान, बुंदेलखंड, त्रिपुरी, माळवा, सांबर वगैरे) इत्यादी सर्व राजे स्वतंत्र झाले. त्यांच्यातील बहुतेक सर्व राजे गुर्जरवंशी होते.

महिपालानंतर त्याचा मुलगा महेंद्रपाल दुसरा हा कनौजच्या गादीवर आला. तो अल्पकाळ म्हणजे इ.स. ९४८ पर्यंतच सत्तेवर होता. महेंद्रपाल दुसरा याच्यानंतर इ.स. ९४८ मध्ये क्षितीपालाचा दुसरा मुलगा देवपाल हा गादीवर आला. देवपालानंतर त्याचा पुतण्या व महेंद्रपाल दुसरा याचा मुलगा विनायकपालदेव दुसरा हा अल्पकाळ सत्तेवर आला. तो इ.स. ९५९ मध्येच काही दिवस गादीवर होता. त्याच्यानंतर महिपालदेवाचा दुसरा मुलगा विजयपालदेव इ.स. ९५९ मध्येच सत्तेवर आला. विजयपालदेवानंतर त्याचा भाऊ राज्यपाल हा इ.स. ९९० मध्ये सत्तेवर आला. याच्या कारकिर्दीत महमूद गजनीने भारतावर स्वारी केली. त्या वेळी राज्यपालाने भटिंडाच्या जयपालाला गजनीविरुद्ध (इ.स. १००१) मदत केली. महमूद गजनीने जयपालाचाही पराभव केला. गजनीने राज्यपालाचे कनौज अनेकदा लुटले. राज्यपालाचा इ.स. १०२७ मध्ये चंडेल राजाचा मांडलिक वा अधिकारी अर्जुन याने वध केला. राज्यपालानंतर त्याचा मुलगा त्रिलोचनपाल हा इ.स. १०२७ मध्ये सत्तेवर आला. त्याच्यानंतर यशपालदेव हा इ.स. १०३६ मध्ये सत्तेवर आला. गुर्जर प्रतिहार घराण्यातील हा शेवटचा राजा होता. त्यानंतर, गडवालवंशीय राजा चंद्रदेव याने इ.स. १०८५ मध्ये कनौजची गादी काबीज केली. प्रतिहार साम्राज्यातील मांडलिक राजे व स्थानिक अधिकारी स्वतंत्र झाले आणि चाहमान (चव्हाण तथा चौहान)

चालुक्य, परमार, चंदेल, चेदी यांनी आपले स्वातंत्र्य घोषित करून वेगळी राज्ये स्थापन केली. अशा प्रकारे प्रतिहार राजवंश घराण्याचा शेवट झाला.

नागभट द्वितीय या प्रतिहार राजाने कनौजच्या मौखरी (चक्रायुधाचे) घराण्यातील कनौजचे साम्राज्य जिंकून प्रतिहारांची राजधानी कनौजला हलविल्याने नंतरच्या प्रतिहारांच्या काळात अयोध्या शहर प्रतिहार साम्राज्यात आले. रामभूमीवर राज्य केल्याने त्याने स्वतःस सूर्यवंशी म्हणवून घेतले असावे व त्यातूनच काहींनी आपण रामपुत्र लवाचे तर काहींनी कुशाचे वंशज असल्याचे म्हणवून घेतले असावे. गुर्जर प्रतिहारांचे मूळ स्थान आधी दिलेलेच आहे. गुर्जरत्ता व माळव्यात त्यांनी सत्ता प्रस्थापित केली. गुर्जर टोळ्यांवरून त्यांना गुर्जर हे नाव पडले. प्रतिहार शब्दाचा अर्थ द्वाररक्षक असा होतो. यावरून प्रतिहार हे रामाचे द्वारपाल मानत असावे. रामाचा रक्षक म्हणून लक्ष्मणाचे नावही प्रतिहार आहे. या वंशाचा समज आहे की, प्रतिहार हे सूर्यवंशी क्षत्रिय असून रामाचा भाऊ लक्ष्मण याचे वंशज आहेत. लक्ष्मण हा रामाचा द्वारपाल (प्रतिहार) असल्याने लक्ष्मणाच्या वंशजास प्रतिहार हे नाव पडले व प्रतिहारांचा अपभ्रंश पुढे पाटीदार झाला असावा. या वंशांचे मुख्य स्थान व उल्लेख केलेले मंडोर किंवा मन्दौर (जोधपूर) हे होते. या वंशातील एका शाखेने गुजरातवर व दुसऱ्या शाखेने अवंती (उज्जैन) वर अधिपत्य स्थापन केले. त्याचा इतिहास वर आला आहेच. गुजरातमधील पाटीदारांचे रेवा चरोतर (नर्मदा नदीच्या वरील प्रदेश) व कडी जिल्हा यावरून अनुक्रमे रेवा तथा लेवा पाटीदार आणि कडवा पाटीदार असे दोन प्रादेशिक भेद पडले आहेत. याबाबतची माहिती अन्यत्र आलेलीच आहे.

मानववंशशास्त्रज्ञानुसार (Anthropologists) लेवा पाटीदारांचा ज्यांच्याशी संबंध जोडता येतो व ज्या प्रतिहारांना अतिशय उज्ज्वल इतिहास आहे, तो नाकारून पुराणकालीन व्यक्तीशी संबंध जोडणे अनैतिहासिक आहे. भाटांनी आणि तथाकथित इतिहासकारांनी लव या रामपुत्राशी लेवाचा बादरायण संबंध (Fur-fetched relation) जोडून संपूर्ण लेवा समाजास संभ्रमात टाकले असून हा गैरसमज काढणे आवश्यक असल्याने मी हा ग्रंथ लिहिण्याचा प्रपंच केला आहे. याचा अर्थ असा नाही की, मला लेवा पाटीदारांचा सूर्यवंश वा लववंश मान्य नाही.

गुप्त साम्राज्याप्रमाणेच प्रतिहारांनी सुमारे तीन शतके राज्यास वैभवावर नेऊन ठेवले. मुसलमानी आक्रमणाशी यशस्वी प्रतिकार केल्याने त्यांचा इतिहास उज्ज्वल झाला. अरब इतिहासकारांनी प्रतिहारांचे हे श्रेय मान्य केले असून त्यांच्या साम्राज्याची व वैभवाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे.

प्रतिहारांच्या राज्यात धर्म, विद्या व कला यांची उन्नती झाली. प्रतिहार राजे शिव, आदित्य, भगवती आणि विष्णू अशा विविध देवतांचे उपासक होते. त्यांनी

विध्वंसक मुसलमानांपासून आपल्या देशाचे व धर्माचे रक्षण केले. अरब यात्रेकरू अल् मसुदी याने म्हटले आहे की, हिंदुस्थानात राष्ट्रकूट हे मुसलमानांशी मित्रत्वाने तर प्रतिहार शत्रुत्वाने वागतात. सिंधकडून मुसलमानांचे आक्रमण होऊ नये म्हणून त्यांनी आपल्या राज्याच्या पश्चिम सीमेवर सात ते नऊ लाख सेना जय्यत ठेवली होती. कनोजचे वैभव पाहून तेथील स्त्रियांची वेशभूषा आदर्श मानली जाई, असे राजशेखरच्या **काव्यमीमांसे**वरून दिसते. त्यांनी अनेक देवालये बांधली, दानधर्म केला. प्रतिहारकालीन देवालये विशिष्ट स्थापत्यशैलीची आहेत. त्यांचा विद्वानांस आश्रय होता. राजशेखरची **बालरामायण** व **बालभारत** ही संस्कृत नाटके आणि **कर्पूरमंजरी** हे प्राकृत सट्टक तसेच आर्य क्षेमीश्वराचे **चण्डकौशिक** हे संस्कृत नाटक कनौज रंगभूमीवर आले. धर्म, संस्कृती, विद्या आणि कला यांचे उदार पुरस्कर्ते म्हणून प्रतिहारांची कीर्ती चिरंतर राहील.[५३] भारतातील पहिला **'बालकवी'** पुरस्कार पटकावण्याचा मान या राजशेखरला मिळाला होता. उपरोक्त ग्रंथांशिवाय त्याचे **विद्धशाल भंजिका** (प्रणयकथेवरील नाटिका) आणि **भुवनकोश** (भूगोल वर्णनात्मक ग्रंथ) आदी ग्रंथही प्रसिद्ध होते. इ.स. ९१८ नंतर तो पुन्हा त्रिपुरीच्या भुवराजदेव-१ या कलचुरीच्या आश्रयास गेला. प्रतिहारांच्या अखेरच्या म्हणजे महिपालापासून यशपालापर्यंतच्या काळात त्यांचे मांडलिक असलेल्या चंदेल राजांनी खजुराहोस जगप्रसिद्ध सुंदरे मंदिरे बांधली.

प्रतिहारांच्या अस्तानंतरचा इतिहास ः माळवा भागात प्रतिहारांनंतर परमारांचे वर्चस्व वाढले. परमारांचा मूळ उपेंद्र, त्यांच्या वंशात पुढे वैरिसिंह (दुसरा) याने धारला राजधानी स्थापली. त्याच्यानंतर सोयक गादीवर आला. सोयकाचा पुत्र मुंज हा विद्वान व शूर होता. त्याने युवराजदेव (दुसरा) कलचुरी, मेवाडचा गुहिलोत शक्तिकुमार यांच्या राजधान्या लुटून हूण, चाहमान व गुजरात चौलुक्य यावर विजय मिळविले. त्याने दक्षिणेत राष्ट्रकुटांचा उच्छेद केला व उत्तरेकडील चौलुक्यांची सहा आक्रमणे परतविली. तो दक्षिणेस तैलपावर स्वारी करावयास गेला व पकडला जाऊन तैलपाने त्याचा ९९३ मध्ये शिरच्छेद केला. मुंजानंतर त्याचा भाऊ सिंधुराज गादीवर आला. सिंधुराजानंतर त्याचा पुत्र सुविख्यात राजा भोज, ज्याची कीर्ती अजूनही गायिली जाते; तो इ.स. १००० च्या सुमारास गादीवर आला. याला युद्धात व राज्य वाढविण्यात यश आले नाही. परंतु, साहित्य व कलाक्षेत्रात तो अजरामर झाला. भोजानंतर त्याचा पुत्र जयसिंह गादीवर आला. त्यानंतर, त्याचा काका (भोजाचा बंधू) उदयादित्य गादीवर आला. त्याने मालवभूमीचा उद्धार केला. उदयादित्यानंतर गादीवर आलेला त्याचा पुत्र लक्ष्मदेवाने यशःकर्णाचा पराभव केला. अंग, गौड, कलिंगावर स्वाऱ्या केल्या. पंजाबचा गझनी अधिकारी महमूदची स्वारी परतावून लावली. त्यानंतर, बरेच परमार राजे झालेत. त्यांची यादी येथे देणे इष्ट नाही.

चौलुक्यांना मुसलमानी आक्रमणात मदत न करण्याचे फळ परमारांना भोगावे लागले. कारण, अल्तमशने आक्रमण करून उज्जैन लुटले (१२३५). यादव, वाघेल व मुसलमानांनी माळव्यावर आक्रमण केले. माळव्याला कष्टतर दिवस आलेत. राज्याची विभागणी झाली. १३०५ मध्ये अल्लाउद्दीन खलजीने माळव्यावर स्वारी केली. त्यात परमार नृपती महलकदेव याचा पराभव होऊन अल्लाउद्दीनच्या सेनापतीने त्यास मांडू किल्ल्यात ठार मारून माळवा खालसा केला.

इ.स.च्या सातव्या ते दहाव्या शतकात गुजरातवर अधूनमधून चालुक्य व राष्ट्रकुटांनीही प्रभुत्व प्रस्थापित केले होते. दहाव्या शतकात राष्ट्रकुटांनी ज्या दोन स्वाऱ्या केल्या (इ.स. ९१५ व ९४०) त्यामुळे गुर्जर साम्राज्याचे तुकडे झाले. राष्ट्रकूट राजा कृष्ण (तिसरा) ने गुजरात जिंकून परमार राजा शियाक (दुसरा) यास प्रतिनिधी नेमले. प्रतिहारांची सत्ता नष्ट झाल्यावर चौलुक्यवंशी मूळराज सोळंकी याने अनहिलवाड येथे स्वतंत्र राज्य स्थापले. तो विद्याकलांचा भोक्ता व दानशूर होता. त्यानेच सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा केली. सोळंकी वंशातील भीम राजाच्या कारकिर्दीत गझनीचा सुलतान महमूद याने सोमनाथावर स्वारी केली. सोळंकी वंशात सिद्धराज जयसिंह व कुमारपाल हे दोन थोर पुरुष होऊन गेले. त्यांनी प्रस्थापित केलेले साम्राज्य सध्याचे गुजरात होय. त्या वेळेपासून गुजरातची भाषा, संस्कृती व व्यक्तित्व ही वेगळी झाली. कुमारपालाच्या वेळी गुर्जरभूमीची दक्षिण सीमा दणमगंगा होती (इ.स. ११७४). पुढे मुसलमानांनी अनहिलवाड जिंकले, त्या वेळी त्या प्रदेशाला गुजरात नाव प्राप्त झाले.

इ.स. १२४१ मध्ये सोळंकी वंशातील भीमदेव मरण पावल्यावर गुजरातेत वाघेल घराण्याची सत्ता सुरू झाली. सोळंकी राजा कुमारपालाने मावसभाऊ अरुणराजाला वाघेलची जहागीर दिली. त्याचा पुत्र लवणप्रसाद जो भीमदेवाचा प्रधान होता, तोच अनहिलवाडचा राजा झाला. त्याच्या पुढील राजांनी तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत गुजरातचे संरक्षण केले. पण, कर्णदेवाच्या राजवटीत अल्लाउद्दीन खलजीने गुजरात जिंकले. तेव्हापासून गुजरातवर मुसलमानी अंमल सुरू झाला.

खानदेशात लेवा पाटीदारांच्या स्थलांतराचे मुख्य कारण म्हणजे गुजरात, माळवा व राजपुतान्यावरील मुसलमानी आक्रमण व अंमल तसेच राजपुतान्यावर आपली सत्ता टिकविण्यासाठी सततचा मुघलांबरोबर तसेच आपापसातील संघर्ष हे म्हणता येईल. मुसलमानी आक्रमणामुळे जीव वाचविणे व स्वधर्मरक्षण टिकवून ठेवण्यासाठी फक्त लेवा पाटीदारच नव्हे, तर गुर्जरांसमवेत अनेक हिंदू जाती-जमाती इतरत्र आस्थलांतरी झाल्यात. उदा. खानदेशात आलेले गुजर कुणबी वा त्यांच्यातील अनाळा, दाले, दोरे, गरी, कडवा, खापरा, लोंडारी किंवा बाड आणि रेवा किंवा लेवा गुजर या पशुपालन व कृषिकर्म करणाऱ्या उपजाती; दादर पवारवंशी तिडोले, आलित्याचा

रंग देणारे आलकरी, भावसार, कासार, गुर्जरवंशी राजपूत व त्यांच्या पोटजाती, गुजर वाणी, गुजर सुतार, गुजर कुंभार, काठी इत्यादी जातीजमाती या पावागडमार्गे अथवा नर्मदा नदी व नंतर सातपुडा ओलांडून किंवा बऱ्हाणपूरजवळील तापी नदीच्या जलौढ खोऱ्यातून दक्षिणेकडे खानदेशाचा पूर्व भाग आणि वऱ्हाडच्या पश्चिम भागात सरकले. ही स्थलांतराची प्रक्रिया बाराव्या शतकाच्या सुरुवातीपासून पुढे चार-पाच शतके सतत चालू राहिली. ही स्थलांतराची प्रक्रिया फक्त खानदेश-वऱ्हाडातच नव्हे, तर सुरक्षित वाटणाऱ्या सर्व ठिकाणीही झालेली दिसून येते.

दहाव्या शतकातील प्रतिहारांच्या मांडलिकांनी स्वतंत्र राज्ये स्थापन केली. म्हणूनच पुढे गुर्जरवंशी लहान-लहान राज्ये उदयास आलीत, हे वर पाहिलेच आहे. यातील राजस्थानात प्रतिहार व चाहमान (चौहान), माळव्यात परमार आणि गुजरातमध्ये सोळंकी ही घराणी विशेष प्रसिद्धीस आलीत, दक्षिणेत राष्ट्रकुटांना कदंब व गंगांशी सतत झगडावे लागले. यातूनच दहाव्या शतकात चालुक्यांचा वारसा सांगणाऱ्या मांडलिकाने स्वतंत्र राज्य स्थापन केले. याला उत्तर चालुक्य म्हणून ओळखण्यात येऊ लागले. एकीकडे ही प्रमुख घराणी व दुसरीकडे त्यांच्या उपशाखा आणि मांडलिक घराणी यांच्यात चालणारा संघर्ष हे या काळातील दख्खनच्या इतिहासाचे प्रमुख सूत्र होय. दक्षिणेत चोळांनी पल्लवांचा पराभव करून साम्राज्य भक्कम केले. या काळातील महत्त्वाचा सर्वसामान्य बदल झालेला जाणवतो; तो म्हणजे प्रशासनाचे विकेंद्रीकरण होऊन महसूल वसुलीची पद्धत बदलली. ज्या लोकांनी राजे लोकांकडून जमिनीच्या देणग्या (अग्रहार) स्वीकारल्या; त्यांना अनेक क्षेत्रात आर्थिक व न्यायविषयक अधिकार प्राप्त झाले. त्यांचे हक्क व कर्तव्य याविषयी विस्तृत वर्णने कोरीव लेखांत आली आहेत. यातून अनेक वेळा ग्रामसभांचा संदर्भ येतो. लेवा व कडवा पाटीदारांचे गोल्ल यातूनच निर्माण झाले असावेत. विविध वंशाचा उदय आणि अस्त जहागीरदारांतील परस्पर संबंधातून झाला. या पद्धतीत सामंतवर्गाचे प्राबल्य अवास्तव वाढले. त्यामुळे विशेषतः दूरवरच्या प्रदेशात अनेक लहान-लहान राज्ये वा जहागिरींची स्थापना झाली. स्थिर शेतीमुळेच त्यांचा उदय झाला हे साहजिकच आहे. डोंगरमाथ्यावरील, पठारांवरील व खोऱ्यांमधील राज्यात आणि सागरी भागात व्यापारवृद्धी हाच प्रामुख्याने राज्यांच्या नवनिर्मितीतील महत्त्वाचा घटक होता. या बदलांतूनच पुढे अनेक जाती-जमातींचा उदय झाला. त्या जाती मूलतः प्रशासकीय किंवा उद्योजकांचे गट या जाती-जमाती होत्या.[५४] यावरून हे स्पष्ट होते की, अनेक जाती-जमाती निर्माण होण्याआधी म्हणजेच दहाव्या, अकराव्या शतकापर्यंत लेवा आणि कडवा हे प्रादेशिक भेद निर्माण होण्याआधीचा प्रतिहारांचा इतिहास हा पाटीदार, लेवा पाटीदार, कडवा पाटीदार, पाठारे प्रभू आणि तत्सम जातींचा इतिहास ठरतो. त्यात गुजरांचाही समावेश करणे अपरिहार्य आहे आणि हा

इतिहास समृद्ध असून त्याला श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी पौराणिक कथांची जोड देण्याची तरी आवश्यकता भासत नाही.

मुसलमानी अंमल : गुजरातमध्ये मुसलमानी अमलाचे तीन भाग पडतात. १) दिल्लीच्या सुलतानांचा अंमल (इ.स. १२९९ - १३९६), २) स्वतंत्र मुसलमानांचा अंमल (१३९७ - १५७२) व ३) मोगल बादशहांचा अंमल (१५७३-१७५८). पहिल्या कालखंडात गुजरातवर दिल्लीची सत्ता पूर्णपणे प्रस्थापित झाली नव्हती.

गुजरातवर अकराव्या शतकात चौलुक्यांची सत्ता असताना महमूद गझनीने सोमनाथावर स्वारी केली. तेव्हा त्याने सौराष्ट्र, कच्छ व गुजरातच्या अनहिलवाड-पाटण भागात उच्छाद मांडला, हिंदूंची कत्तल करीत लुटालूट केली. हिंदू मंदिरांचा विध्वंस केला. इ.स. १०२५ मध्ये सोमनाथ मंदिराचा विध्वंस करून अगणित संपत्ती लुटून नेली. त्या वेळी त्याने एवढ्या क्रूरपणे मोठ्या प्रमाणावर केलेल्या नरसंहारामुळे या भागातील जिवंत राहिलेल्या कृषिकर्म करणाऱ्या व इतर समाजांमध्ये एवढी दहशत निर्माण झाली की, त्यातील बऱ्याच समूहांनी खानदेश-वऱ्हाड भाग सुरक्षित वाटल्याने इकडे स्थलांतर करून स्थायिक झालेत. या समूहातील एक भाग लेवा पाटीदारांचा होय. भाटांच्या नोंदीनुसार अकराव्या संवतमध्ये म्हणजे बाराव्या शतकात हे लोक या भागात आले आहेत, यास दुजोरा मिळतो. काही समूह चांपानेर - पावागडमध्ये तो भाग सुरक्षित वाटल्याने स्थायिक झालेत. तेथे त्यांच्या काही पिढ्या नांदल्या. सोमनाथ मंदिर ११६९ मध्ये अनहिलवाड - पाटणच्या कुमारपाल राजाने पुन्हा बांधले. तेराव्या शतकाच्या अखेरीस अल्लाउद्दीन खलजीने माळवा व गुजरातवर आक्रमण करून हिंदू मंदिरे उद्ध्वस्त केलीत. त्याने १२९७ मध्ये सोमनाथ मंदिरही उद्ध्वस्त केले व लुटले. या भागात लूटमार केली, हिंदूंची कत्तल केली. त्यामुळे हिंदूंमध्ये आणखीनच दहशत निर्माण झाली. त्यातच १३०६ मध्ये अल्लाउद्दीन खलजीच्या सैन्याने पुन्हा या भागावर आक्रमण करून वाघेल राजा कर्ण यास पायउतार केले व त्याची पत्नी कमला हिच्याशी अल्लाउद्दीनने विवाह केला. त्यामुळे कृषिकर्म करणारा व इतर समाजांचा समूह पुन्हा चांपानेर-पावागड व खानदेश-वऱ्हाडाकडे स्थलांतरित झाला. सौराष्ट्र, कच्छ, गुजरात व माळवा भागातील हिंदूंना आता वाईट दिवस आले होते. पंधराव्या शतकाच्या आरंभी अहमदाबादचा सुलतान अहमदशहा यानेही हिंदूंना त्रास दिला. सन १३२५ मध्ये जुनागडचा राजा चुडासमा याने सोमनाथ मंदिर पुन्हा बांधले होते. ते १४६९ मध्ये गुजरातचा सुलतान महमद बेगडा असताना पुन्हा फोडले. या वेळी संपत्ती लुटण्यापेक्षा बेगडाच्या मूर्तिभंजक प्रवृत्तीतून त्याने हे मंदिर उद्ध्वस्त केले व मूर्तिपूजकांचा अनन्वीत छळ केल्याने या भागातील बऱ्याच हिंदू जमातींनी स्थलांतर केले. चांपानेर-पावागड भागात त्या वेळी पाटाई रावळ राजा राज्य करीत होता. या पाटाईच्या नावावरून त्याच्या प्रजेस पाटाईदार किंवा

पाटीदार नाव पडले असावे, अशीही एक समजूत आहे. चांपानेर-पावागड भागातील आस्थलांतरी हिंदूंचे नष्टचर्य अजून संपलेले नव्हते. इ.स. १४८४ मध्ये महमद बेगडाने चांपानेर-पावागडवर स्वारी करून पाटाई राजास मुस्लिम होण्याबाबत आज्ञा केली. तथापि, ती न मानल्याने त्याचा शिरच्छेद करण्यात आला.[५५] त्याच्या मुलाने मात्र इस्लाम धर्म स्वीकारला. महमद बेगडाच्या येथील क्रूरपणामुळे पावागड अथवा पावाखंड अथवा पांजणा प्रदेश या भागातील लेवा पाटीदारांनी खानदेश-विदर्भात स्थलांतर केले. पांजणा भागातून आलेत म्हणून त्यांना पांजणा कुणबी असेही संबोधित असत, अशीही एक समजूत आहे.

येथे गुजरात लेवा पाटीदारांचा इतिहास देणे इष्ट ठरेल. खेडा जिल्ह्यात चरोतरमध्ये सोजित्रानामक प्रसिद्ध शहर आहे. चरोतर हे नाव मही नदीचे खोरे व वत्रक नदीच्या दक्षिणेकडे आणि रेवा नदीच्या उत्तरेस लागून असलेल्या खेडा भडोच परिसरास प्राप्त झाले आहे. या सोजित्रा भागाला ऐतिहासिक महत्त्व आहे. प्राचीनकाळी सोजित्राजवळील महीनगरी या मही नदीच्या मुखावर वसलेल्या शहरास व्यापारी महत्त्व होते. डॉ. भाईलाल डी. पटेल यांच्या मते टॉलेमी (इ.स. १३०) आणि **पेरिल्पस**चा लेखक हे दुसऱ्या शतकात ज्या मिननगराचा उल्लेख करतात तेच महीनगर आहे. या महीनगरवर (विक्रम संवत्सरकर्ता विक्रमादित्याचे नगर) आणि ते ओस पडल्यानंतर खंबायत (ज्यास पूर्वी स्तंभतीर्थ म्हणून ओळखत) येथून उत्तर भारतातील प्रमुख शहरांकडे जाणारे महत्त्वाचे जुने व्यापारी मार्ग होते. या व्यापारी मार्गांवरील सोजित्रा पहिले महत्त्वपूर्ण ठिकाण होते. येथूनच पुढे दोन व्यापारी मार्ग फुटत होते. टॉलेमी ज्यास सझान्शन असे संबोधतो; त्यास इतिहासकार सोजित्रा मानतात. तेथे काही पुरावशेषही प्राप्त झाले आहेत. डॉ. भाईलाल डी. पटेल यांना एका स्थानिक कुंडावर एक शिलालेख मिळाला. खंबायत बंदरातून निर्यात होणाऱ्या नीळ व सुंदर कापडाच्या निर्मितीचे सोजित्रा हे प्रमुख केंद्र होते. सोजित्राला तयार होणारी खंबाती कुलपेही प्रसिद्ध होती. येथे चार प्राचीन जैन मंदिरे असून अकराव्या शतकातील जैन साहित्य हस्तलिखितांचे ग्रंथालयही आहे. हे गाव चौदाव्या शतकात दिगंबर पंथी भट्टारकाच्या गादीचे ठिकाण होते. गुजरातीत म्हणतात - ''चारसे चरोतर, एम! शीश सोजित्रा'' म्हणजे चरोतरमध्ये ४०० खेडे असून सोजित्रा हे त्यांचे मुकुट (प्रमुख) आहे. अशा या शहराचा लेवा पाटीदारांच्या पूर्वजांशी संबंध जुळलेला आहे. येथे खोजाई अथवा क्षेमकल्याणीदेवीच्या मंदिरावर जहांगीर बादशहा (१६०५-१६२७) कालीन शिलालेखात पाटीदारांची वंशावळी दिली आहे. सोजित्र्याचे पाटीदार हे इतर पाटीदारांहून आपणास श्रेष्ठ समजतात. वल्लभीच्या मैत्रकांच्या काळापासून सोजित्रांचे स्वतंत्र छोटेसे राज्य अस्तित्वात होते. त्या वेळी चरोतर भागात पाटीदार होते. सोजित्रापासून दीड कि.मी. असलेल्या देवातज (पूर्वीचे देवपल्ली) गावी वीराभाई

पटेल हा वि.सं. ११७५ (इ.स. १०६०) मध्ये होता. त्या वेळी उत्तर गुजरात व सौराष्ट्रवर भीम पहिला (इ.स. १०२२-६४) आणि लाट (गुजरात) देशावर वत्सराजाचे राज्य होते. वीराभाई पटेलच्या वंशात बारावा वंशज जेसंग पटेल (जन्म वि.सं. १५१८, इ.स. १४६२) हा होऊन गेला. वीराभाईच्या वेळी सोजित्रा गाव थारसा जवळील सोनीपूर संस्थानात होते. डॉ. हरिप्रसाद जी. शास्त्रींच्या मते (**चरोतर सर्वसंग्रह**, व्हा १, नडियाद, १९१४, पृ. ९१९) सोजित्र्यात ७०० गावे होती. तेथे महीष वंशातील लोकांचे राज्य होते. देवातज या भागातील सुपीक जमिनीमुळे मोठ्या प्रमाणावर वस्ती वाढल्याने नवीन येण्याऱ्यांना जमीन मिळणे दुरापास्त झाले. वीराभाईच्या वंशातील आलणानामक एक वंशज कुमारपालच्या काळात इ.स. ११५५ (वि.सं १२१२) मध्ये देवातजहून सोजित्र्यास येऊन स्थायिक झाला. याच वंशात जेसंग पटेल १५१८ मध्ये जन्मला. त्याने महिष वंशातील गंगादास याच्याकडून सोजित्रा चरोतरची मालकी शांतपणे मिळविली. ती टिकवण्यासाठी पाटीदार कुटुंबांना पुढे महमूद बेगडास सालिना ३००० रुपये नजराणा द्यावा लागला. पुढे या पाटीदारांना मुघल अमलात अकबरावेळी या संस्थानातील मुलकी व गुन्हेगारी न्यायिक दावे सोडविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. जेसंग पटेल हा सरदार वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल व सरदार वल्लभभाई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ, भाईलाल डी. पटेल यांचा पूर्वज मानला जातो.[५६]

याच चरोतरमधून खानदेश-वऱ्हाडात काही लेवा पाटीदार स्थलांतरित झाले आहेत, हे आता सर्वमान्य झाले आहे. म्हणून वीराभाई पटेल हा खानदेश-वऱ्हाडातील बऱ्याच लेवा पाटीदारांचा पूर्वज ठरू शकतो. १९३६ मध्ये फैजपूर काँग्रेस अधिवेशनावेळी सरदार वल्लभभाई पटेलांसोबत त्या भागातील काही पाटीदारही आले होते. त्यांनी खानदेशातील लेवा पाटीदार पळून आल्याने अकुलिया ठरतात, असे विधान केल्यामुळे खानदेशास गौरव ठरलेल्या धनाजीनानांनी ताबडतोब उत्तर दिले. ''आम्ही जातपातीची श्रेष्ठता - हीनता मानत नाही. परंतु, गुजरात सुलतानी अमलात धर्म व शील रक्षणार्थ स्थलांतर केले असल्याने कुलिया ठरतो.'' (खुशालजी पाटील यांच्या आठवणींवरून). उपरोक्त इतिहासावरून हे स्पष्ट होते की, पावागडची महाकाली ही कुलदेवता स्वीकारण्याआधी लेवा पाटीदारांची मूळ कुलदेवता खोजाईदेवी तथा क्षेमकल्याणी होती.

लेवा पाटीदार बाराव्या शतकापासून खानदेश भागात येत गेले; त्या वेळी सुरुवातीस खानदेशावर यादवांचे मांडलिक राजे निकुंभ यांची सत्ता होती. हे राजे शिवभक्त होते. त्यांच्या काळात शांतता होती. स्थापत्य, कला व विद्या अध्ययन यांना या काळात खानदेशात प्राधान्य मिळाले. सोन्हदेव या निकुंभवंशी राजाच्या काळात या भागात जगप्रसिद्ध ज्योतिषी, बीजगणितज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य

यांच्या गुणास वाव मिळाला. या काळात पाटणे (ता. चाळीसगाव) येथे विद्यादान करण्यासाठी मठ बांधण्यात आला. महेश्वर मंदिर, भामेरच्या जैन गुहा, अंकाईच्या जैन गुहा, पाटणेची हिंदू लेणी, चांगदेव मंदिर, मेहूण, कोथळीचे मुक्ताई मंदिर ही याच काळातील! इ.स. १२१६ मध्ये निकुंभाची सत्ता नष्ट पावली. परंतु, या भागात गुजरात-माळव्यातून आलेले पाटीदार विसावले. त्यांनी ही भूमी आपली भूमी समजली. या भूमातेची कष्ट करून सेवा करू लागले. तेराव्या शतकात काही काळ चौहानांची सत्ता खानदेशावर होती. इ.स. १२९५ मध्ये अल्लाउद्दीन खलजीने देवगिरीवर स्वारी केली व खंडणी घेऊन परत जाताना त्याने खानदेश लुटला. चौहान घराण्यातील बहुतेक सर्वांचा त्याने अशिरगड घेऊन नाश केला. म्हणजे ज्या महमूद गझनीच्या आक्रमणामुळे पाटीदार लोक खानदेश-वऱ्हाडात आले; त्यांना अल्लाउद्दीन खलजीच्या आक्रमणांचा त्रास येथेही सहन करावा लागला. कारण, अल्लाउद्दीन अशिरगडकडे परत जाताना बऱ्हाणपूरच्या खिंडीच्या मार्गातून गेला व याच भागात पाटीदारांनी आपली वसाहत केलेली होती. तरीही, त्यांनी मोठ्या धैर्याने या संकटास तोंड दिलेले दिसते. येथून ते दुसरीकडे गेलेले नाहीत.

यानंतरच्या काळातही राजकीय धुमश्चक्री चालूच राहिली. सत्तेसाठी संघर्ष होत राहिले. खानदेशावरील शासकांनी सत्तेच्या संघर्षात प्रजेला छळलेले दिसत नाही. गुजरातचे सुलतान मात्र हिंदूंना छळत असत. क्रूरकर्मा महमूद बेगडाच्या पावागड आक्रमणामुळे १४८४ नंतर चांपानेर-पावागड भागातून गुजर व लेवा पाटीदार तसेच अन्य समूहांच्या झुंडीच्या झुंडी खानदेश-वऱ्हाडात तसेच इतर इलाख्यात स्थलांतरित झाल्या. त्याचे मुख्य कारण म्हणजे आपला धर्म व शील वाचविणे. त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला असता तर त्यांना स्थलांतराची गरज नव्हती.

लेवा पाटीदार समाजातील लोक पावागडला जात नसले तरी जुने जाणकार सांगतात की, पावागडला असलेली महाकालीदेवी ही त्यांची मूळ कुलदेवता आहे. अर्थातच ते जेव्हा चांपानेर-पावागड भागात बाराव्या, तेराव्या, चौदाव्या व पंधराव्या शतकात स्थायिक झाले होते; तेव्हा त्यांनी या कुलदेवतेस स्वीकारलेले दिसते. जुने जाणकार व भाट सांगतात की, पावागड भागात लेवा पाटीदार लोकांच्या सुमारे १२ पिढ्या नांदल्या होत्या. एका शतकात तीन-चार पिढ्या गृहीत धरल्या तर त्यांच्या विधानात सत्यता असल्याचे जाणवते. **जळगाव गॅझेटिअर**मध्येही हे लोक काही पिढ्या पावागड-चांपानेर भागात राहिले असल्याची नोंद आहे.[५७]

हा पावागड किल्ला बडोद्याच्या पूर्वेस सुमारे ४० कि.मी. असून प्राचीन माळव्यास जाणाऱ्या नर्मदा नदीच्या जलौढाच्या खोऱ्यातील एक महत्त्वाचे ठिकाण होते. गडाखालील चांपानेर भाग तर अतिशय सुपीक आहे. त्यामुळे कृषिकर्म करणाऱ्या पाटीदारांना वसाहतीसाठी हा भाग आवडला नाही तरच नवल. मारुती द्रोणागिरी

उचलून घेऊन जात असता त्या पर्वताचा जो एक तुकडा पडला; तो हा पावागड होय, अशी दंतकथा आहे. याची उंची सुमारे २,८०० फूट (९३५ मी.) आहे. गडावर महाकाली व भद्रकाली या दोन देवतांची मंदिरे आहेत. त्या दोन्ही बहिणी आहेत, असे सांगत असले तरी भवानीची दोन रूपे आहेत व भवानी ही बहुतेक लेवा पाटीदारांची कुलदेवता आहे. त्यातली भद्रकाली ही मोठी व महाकाली ही धाकटी होय. गुजरात माळव्यातील लोक या देवीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने जात असतात. गडावर दुधिया या नावाचा तलाव आहे. या तलावात स्नान करून देवीदर्शन करण्याचा शिरस्ता आहे. तलावापासून मंदिरापर्यंत २२५ पायऱ्या चढून जाव्या लागतात. ही देवी प्रकृतीने सौम्य असल्याने तिला पशुबळी देत नाही. हे एक जागृत देवस्थान मानले जाते. लेवा पाटीदारांची ही मूळ कुलदेवता असल्याने तिला पशुबळी निषिद्ध असल्याने समाजातही पशुबळी देण्याची पद्धत नाही. या गडावर खापरानामक लुटारूंच्या भव्य वाड्याचे अवशेष पाहावयास मिळतात. येथील देवीची स्थापना विश्वामित्रानेच केल्याचे सांगतात. जशी येथील देवी बऱ्याच लेवांची कुलदेवता आहे, तसेच बऱ्याच लेवांचे गोत्र विशेषतः (फेगडे, झोपे, जावळे, किनगे, बोंबले, उन्हाळे, येवले, इंगळे आणि ब्राह्मंदे) इत्यादींनी विश्वामित्र गोत्र स्वीकारल्याचे दिसून येते. गडाखाली भक्कम तटबंदीचे सुंदर असे चंपानेर (चांपानेर) नामक गाव होते. तेथे ८४ मोहल्ले व ५२ बाजार होते, असे सांगतात. या सर्वांचे अवशेष आजही तेथे विखरून पडलेले दिसून येतात.

इ.स.च्या पंधराव्या शतकाच्या अखेरीस पावागड भागावर राज्य करीत असलेल्या पाटाई रावळचे राज्य समृद्ध व प्रगतिशील होते. महमूद बेगडाने त्याचा वध केला हे वर आलेच आहे. याबाबत बहुधा मुस्लिम हितचिंतकांनी खालील आख्यायिका रचल्याचे दिसते. येथील नवरात्राच्या उत्सवात महाकालीला वाटल्याने ती लेणीलुगडी लेऊन स्त्रियांच्या मेळाव्यात प्रकटली असता पाटाई रावळाची नजर देवीवर पडली. तो तिच्या रूपावर लुब्ध झाला. त्यामुळे महाकाली संतापली व तिने राजास शाप दिला की, ''तुझ्या राज्याची धूळधाण होईल' आणि लगेच चांपानेरनगरला आग लागली. प्रजेने देवीची प्रार्थना केल्याने 'मी आता आग शमवते; पण थोड्याच काळात या राज्यावर मुस्लिम राजांची धाड कोसळेल व पापी पाटाई रावळ राज्य भ्रष्ट होईल', आणि झालेही तसेच. थोड्याच दिवसात म्हणजे १४८४ मध्ये महमूद बेगडाने स्वारी करून पावागडसह पाटाई रावळाचे राज्य जिंकून घेतले. त्याचा सेनापती वैरीसिंह हा लेवा पाटीदार होता. त्याने महमूद बेगडाशी चांगली लढत दिली. त्याला पकडून बेगडाने मेहमुदाबाद येथे कारावासात डांबून ठार केले. राजा पाटाई मुस्लिम झाला नाही म्हणून प्रथम पाच महिने कारावास व नंतर ठार करण्यात आले. त्याचा मुलगा मात्र मुस्लिम झाला. त्याला इदारचा अमीर करण्यात आले.

तसेच 'निजाम उल-मुल्क' ही पदवी बहाल करण्यात आली.[५८] वरील कथा मेहमूद बेगडाच्या क्रौर्याचे उदात्तीकरण करण्यासाठी रचलेली दिसते. हा पाटाई रावळ व त्याची प्रजा मुस्लिम झाली असती तर ना पाटाईचा शिरच्छेद झाला असता, ना येथील स्वाभिमानी प्रजेस स्थलांतरण करावे लागले असते. छत्रपती संभाजी महाराजांनी मुस्लिम धर्म स्वीकारला नाही म्हणून औरंगजेबाने त्यांचा वध केला. तद्वतच या पाटाई रावळने मुस्लिम धर्म स्वीकारला नाही म्हणून महमूद बेगडाने त्याचा वध केला. यात त्याचाही धर्माभिमान व हिंदू धर्म प्रेम संभाजी महाराजांप्रमाणेच जाज्वल्य होते हे सिद्ध होते आणि त्याने जर आपल्या मातेसमान आपल्याच देवतेवर वाईट नजर ठेवली असती तर असा लंपट माणूस आपले प्राण वाचविण्यासाठी मुसलमानसुद्धा झाला असता. तो पाच महिने तुरुंगात खितपत पडूनही मुलसमान झाला नाही, यातच त्याचा धर्माभिमान दिसून येतो व आपल्या धर्मावर प्रेम करणारा कोणीही आपल्या देवतेची विटंबना करणार नाही. म्हणून ही कथा महमूद बेगडाचा क्रूरपणा लपविण्यासाठी त्याच्या स्वार्थप्रेरित हितचिंतकांनी रचली असावी किंवा नंतरच्या मुस्लिम राजवटीत रचणे भाग पडले असावे, असे प्रस्तुत लेखकाचे वैयक्तिक मत आहे.

पावागड क्षेत्राला सिद्धक्षेत्र मानतात. जैनांचेही ते पवित्र स्थळ आहे. तिथे पार्श्वनाथाचे मंदिर आणि रामपुत्र लव-कुशाची पदचिन्हे आहेत. बरेचसे हिंदू देव जैनांनीही स्वीकारले आहेत, हे यावरून दिसून येते. लव-कुश शेवटी जैन बनले आणि याच गडावरून निर्वाणाला गेले, अशी जैन परंपरा सांगते.

एवढे मात्र नक्की की, महमूद बेगडाने येथे आपली राजधानी स्थापन करून महमुदाबाद-चांपानेर असे नाव दिल्यावर येथे वाढलेल्या मुस्लिम वसाहतीत हे शहर खूप भरभराटीस आले. येथील तलवारी आणि तलम, रेशमी, रंगीत कापड भारतात व परदेशातही प्रसिद्धीस आले. व्यापारी व कारागिरांनी शहर गजबजलेले असे. आखीव बांधकाम, बागा, तलाव, भव्योदात्त व कलापूर्ण मशिदी, राजवाडे असलेल्या चांपानेरची वर्णने पोर्तुगीज प्रवांशानी लिहिलेली आहेत. इ.स. १५३५ मध्ये मुघल बादशहा हुमायुनाने चांपानेर नष्ट केले व गुजरातची राजधानी असलेले हे शहर धुळीस मिळाले. राजधानी पुन्हा अहमदाबादला गेली. माळव्याचा रस्ता बदलला आणि चांपानेर जंगलात गडप झाले. काळाने सूड उगवला. महमूद बेगडा या मुस्लिम राजाने हिंदू वैभव नष्ट केले व मुसलमानांचे वैभव मुसलमानी मुघल सम्राटानेच नष्ट केले.[५९]

पंधराव्या शतकात अहमदाबादचा (गुजरातचा) सुलतान अहमदशहा (इ.स. १३९१ ते १४४२) व त्याच्या नंतरच्या सुलतानांनी हिंदूंचे मुस्लिमात धर्मांतर करण्याची मोहीम राबवली; सक्तीही केली. त्या वेळी इ. स. १४४९ मध्ये इराणमधून

इमामशहानामक कृष्णभक्त साधू आला होता. 'हिंदू लोक त्याला शरण गेले तेव्हा माझे अनुयायी व्हा, हिंदूच राहा, मी तुम्हाला धर्मांतरापासून वाचवीन' असे इराणमधून आलेल्या इमामशहाने सांगितले. त्याने स्थापन केलेला पंथ सत्पंथ असून त्याने हिंदूंना धर्मांतरापासून वाचविले, असे सांगतात. या पंथाविषयी माहिती पुढे सविस्तर दिलेली आहे. बऱ्याच पाटीदारांनी हा पंथ स्वीकारला तरीही अहमदशहानंतर आलेल्या महमूद बेगडाने उच्छाद मांडल्याने या सत्पंथियांनीसुद्धा खानदेशात पलायन केलेले दिसते. म्हणजे फैजपूर पंचक्रोशीत आलेले सत्पंथी लेवा पाटीदार हे पंधराव्या शतकाच्या अखेरीस आलेले दिसतात. आधी आलेल्या लेवा पाटीदारांनी खानदेशात सत्पंथ स्वीकारणे अशक्य वाटते. ज्या मारवाड, अवध व गिरनार प्रदेशात पंधराव्या शतकात परिहारांनी वस्ती होती, त्यावर या अहमदशहाने स्वाऱ्या केल्या. त्यामुळे परिहारांना अन्यत्र स्थलांतर केल्याने त्या भागात त्यांची संख्या नगण्य राहिली. हे हिंदू लोक चांपानेर-पावागड भागात आले असावेत. गिरनारवर त्याने दोनदा स्वारी केली व तेथील हिंदू राजांकडून खंडणी घेतली. इ.स. १४१४ मध्ये त्याने गुजरातमधील सर्व हिंदू देवालये पाडण्याचा हुकूम दिला. सिद्धपूरच्या स्वारीत स्वतः हिंदू देवालय पाडून तेथे मशीद उभारली. त्याने माळव्याच्या सुलतानाविरुद्धही चार स्वाऱ्या केल्या. आशावलच्या ठिकाणी अहमदाबाद शहर वसविले.[६०]

लेवा पाटीदार खानदेश-वऱ्हाडात नंतर आले तेव्हा खानदेशावर इ.स. १३७० ते १५९९ पर्यंत फारुकीवंशी मुसलमानांचे राज्य होते. त्यांच्यातील मलिकराज (१३७० ते १३९९) याने शिल्पशास्त्राला उत्तेजन दिले व शेतीसुधारणा केली. त्यानंतर आलेल्या मलिक नसीर (इ.स. १३९९ ते १४३७) याने झैनाबाद व बऱ्हाणपूर शहर बांधले. त्याच्यानंतर आलेल्या मीरान मुबारक (इ.स. १४४१ ते १४५७) याने शांततेने राज्य केले. त्याच्यानंतर आलेल्या आदिलखान (इ.स. १४५७ ते १५०३) याने दीर्घकाळ राज्य केले. रहदारीचे रस्ते निर्धोक केले. त्याने आपल्या राज्यात बळकटी आणली. दाऊदखानने इ.स. १५०३ ते १५१० पर्यंत राज्य केले. त्यानंतर आलेल्या गझनीखानचा १५१० मध्ये खून झाला. दुसरा आदिलखान याने इ.स. १५१० ते १५२० पर्यंत राज्य केले. मीरान महमूदखानने इ.स. १५२० ते १५३५ पर्यंत राज्य केले. त्याच्यानंतर आलेल्या मुबारीकखानने इ.स. १५३५ ते १५६६ पर्यंत राज्य केले. याच्या कालावधीत १५६१ मध्ये पीर मुहमदखाननामक मुघल सरदार माळव्यातून परत जात असता खानदेशात घुसला आणि बऱ्हाणपूर शहर व जवळचा भाग लुटला असता मुबारीकखानने त्याच्यावर हल्ला करून पराभव केला व प्रजेला त्याच्या संकटातून वाचविले. दुसरा मीरान मुहम्मद याने १५६६ ते १५७६ पर्यंत राज्य केले. राजा अलीखानाने इ.स. १५७६ ते १५९६ पर्यंत राज्य केले. फारुकी राजांमधील बहादूरखान याने १५९६ ते १५९९ पर्यंत राज्य केले. बादशहा अकबराने अशिरगड घेऊन

फारुकींचे साम्राज्य नष्ट केले.

फारुकी काळात राजकीय घडामोडी बऱ्याच झाल्या तरी इतर राज्यांच्या मानाने येथील प्रजा शांततेने राहिली. या काळात येथे आलेल्या लेवा पाटीदारांना शांतता लाभल्याने ते येथे चांगलेच स्थिरावले. त्यांनी कष्टाने जमिनी केल्या. फारुकींना खानदेशचा विकास करायचा होता. लेवा पाटीदार या आस्थलांतरी उद्योगी व कष्टाळू समाजास जमिनी व वतने दिल्यास खानदेशचा विकास घडून येईल हे फारुकी राजांनी ओळखल्याने त्यांनी याच काळात त्यांना वतने दिली. ते जमिनीचे मालक बनल्याने खानदेश भूमी सोडून जाणे त्यांना आवडले नाही. पूर्वीचे क्षात्रकर्म करणारे तसेच गुजरात-माळव्यात राजे व सामंत तसेच पट्टीदार राहिलेले पाटीदार येथे गुण्यागोविंदाने कृषिकर्म करू लागले व आपले पूर्वीचे क्षात्रतेज विसरले.

फिच व न्यूवेरी नावाचे दोघे युरोपीय प्रवासी इ.स. १५८५ ते इ.स. १६०१ पर्यंत हिंदुस्थानात प्रवास करून गेले. त्यांनी आपल्या वर्णनात खानदेश अतिशय समृद्ध असल्याचे नमूद केले आहे. त्यात खानदेशात हिवाळा नेमस्त, हवा आल्हाददायक आणि नद्या व ओढे भरपूर, सुपीक जमीन, ज्वारीचे मुबलक पीक, पुष्कळ ठिकाणी वर्षातून तीनदा ज्वारीचा हंगाम, भाजीपाला मुबलक, खानदेशी तांदूळ उत्कृष्ट असल्याचे वर्णन केले आहे. येथील प्रजेत शेतकरी व कुणबी यांचा भरणा विशेष होता. अर्थातच यात लेवा पाटीदार शेतकऱ्यांचा समावेश करावा लागेल. त्यात आणखी म्हटले आहे की, खानदेश संपन्न असून तेथील लोकसंख्याही भरपूर होती. काही भागात धान्य, कपाशी, लोकर व साखर विपुल पैदा होई. काही बाजारपेठात सुकी फळे, सूत, जाजमे, खाकी, छापीव खादी, पांढरे कापड, झोरे, पितळी भांडी, हत्यारे व औषधे विक्रीस असत. खानदेशात अबस्ते नावाचे तलम कापड आणि सिरीसाफ व भिरान नावाचे साधारण कापड विकण्यात येई. खानदेशाचे त्या वेळी बऱ्हाणपूर हे मुख्य शहर होते. तेथे अरब देशांमधील लोकांचीही वस्ती होती. तेथे नाना तऱ्हेची कलाकुसरीची कामे हाताने करण्यात येत असत.[६१] त्यानंतर इ.स. १६०९ ते १६१८ दरम्यान हॉकिन्स केर व सर टॉमस रो हे इंग्रजी प्रवासी खानदेशात येऊन गेले. त्यानी खानदेशाच्या दुरवस्थेबाबत वर्णन केलेले आहे.

डॉ. विश्वास पाटील यांच्यानुसार (**संशोधक**, सप्टें. १९८४, पृ. १०) ''लेवा गुजर लोकांनी अकबर बादशहाच्या कारकिर्दीत अनेक अधिकाराच्या जागा भूषविल्या. याच दरम्यान ते खानदेशात आले असावेत. त्यापूर्वीही कर्णराजाच्या कारकिर्दीत गुजरातेत यवन राजाकडून त्रास झाल्यामुळे अस्ताव्यस्त होऊन उत्तर गुजरातेत गेले असावेत. या पुराणात लेवा पाटीदार ज्ञातीच्या संघाचे जेथे वर्णन केले आहे; त्यात गुजरातेतील संघाचा खानदेशातील नवापूर, सुलतानपूर येथे येऊ लागलेल्या लेवा गुजरांच्या संघात समावेश केलेला आहे. सुलतानपूर हे खानदेशाच्या राजधानीचे

शहर होते व तिथे औरंगजेबचा सुभा राहत होता. त्या शहराच्या जवळच्या प्रांतात लेवा पाटीदार, लेवा गुजरांची पुष्कळ वस्ती आहे. गुजरातेतील लेवा पाटीदारांच्या जत्थ्यात नवापूर, सुलतानपूर प्रांतातील लेवा गुजरांचा समावेश असून गुजरातेतून खानदेशात आलेला लेवा गुजर जाती संघ गुजरातेतील लेवा पाटीदारांशी संबद्ध आहे. यावरून लेवा गुजर हे लेवा पाटीदार जे गुजरातेत आहेत, त्यांचेच वंशज असून चरो-तर व चांपानेर प्रांतातील पुष्कळशा गावांतून निघून खानदेश आणि नेमाडात बादशहाकडून मिळालेल्या राजकीय अधिकारांवर आले असता, इकडेच आपल्या ज्ञाती बांधवांसह वसाहती करून राहिले आहेत. लेवा गुजरांची जितकी उपनावे आहेत, त्या नावांची बहुतेक गावे गुजरातेत आढळतात. यावरून गुजरातेतल्या त्या भागातून लेवा गुजर खानदेश व नेमाड प्रांतात आलेले आहेत, हे स्पष्टपणे सिद्ध होते.''

खानदेश मुघलांच्या ताब्यात असताना १६३४ मध्ये सुभा बनविण्यात आला. त्यात हल्लीचा खानदेश, वऱ्हाडचा काही भाग व गाळणा किल्ल्यापर्यंतचा भाग यांचा समावेश करण्यात आला. १६३४ ते १६७० पर्यंतचा काळ म्हणजे खानदेशाचा सर्वोत्कृष्ट भरभराटीचा होता. त्यानंतर मराठे-मुघल संघर्ष, निजामाची सत्ता, मराठ्यांची आपापसात भांडणे, शिंदे-होळकरांची खानदेशातील रस्सीखेच, खानदेशातील बंडाळी व १८१८ नंतरचा ब्रिटिश अंमल येतो. ब्रिटिश आमदानीत त्यामानाने पुन्हा शांतता लाभली. मात्र, तरीही या काळात या भागात स्थिर होऊ लागलेल्या लेवा पाटीदारांना या भागातील जहागीरदारांनी पाळलेल्या अरब पलटणीतील शिपाई तसेच उत्तरेकडील पेंढाऱ्यांचा त्रास झालाच.

लेवा पाटीदारांचे पूर्वज गुर्जर होते, असे मानल्यास त्यांची भाषा कोणती हे जाणण्याची उत्सुकता लागते. म्हणजे पर्थियातून येताना त्याची भाषा कोणती असावी, असा प्रश्न उभा राहतो. पर्थियन साम्राज्यात पूर्वी पर्थिया (आताचा जार्जिया - ज्यात गुर्जिस्ताननामक गुर्जरांचा मूळ प्रदेश होता.) इराक, इराण यांचा समावेश होता. या भागावर अरबांनी ६३३ मध्ये आक्रमण करून अंमल बसविला. त्याआधी तेथे सॅसॅमिडी किंवा सेसॅमियन किंवा सेसॅनियन वंशाचे राज्य होते. म्हणजे ते राजे मुस्लिम नव्हते एवढे निश्चित. त्या वेळी तेथे झरथ्रुष्टाच्या अनुयायांचा प्रभाव होता व ते आधी अवेस्ता व पेहलवी ही भाषा बोलत होते. अवेस्ता ही अगदी संस्कृतसदृश भाषा असल्याने संस्कृतचा उगम इराणमध्ये झाला आहे, असे मानण्यास वाव आहे. पेहलवी ही अवेस्ता आणि अरबी यांना जोडणारा दुवा आहे. पर्थियन साहित्य अवेस्ता व पहेलवीमध्ये आहे. ही पारशांची भाषा होती. येथील लोक पूर्वी एकेश्वरवादी होते. तरी ते सूर्य, चंद्र, जल, भू, वायू या पंचमहाभुतांची पूजा करीत होते. त्यांच्या देवतामूर्ती, मंदिरे नव्हती, तरी यज्ञयाग व बलिदान यास महत्त्वाचे स्थान असे.[६२]

क्षत्रप रुद्रदामनच्या गिरनार शिलालेखात पर्थियन अधिकाऱ्याला पहलव[६३] म्हणत असल्याचा उल्लेख आधी आलेलाच आहे.

सातवाहनांच्या अस्तानंतर पल्लव दक्षिणेत आलेले आहेत व त्यांनीच संस्कृत भाषा दक्षिणेत नेली, असे मानता येईल. या पहलवांच्या मागे इराण व सप्तसिंधूत राहिलेला वंश नंतर पुढे हुणांबरोबर भारतात आला असण्याची शक्यता दिसते. इस्लामच्या आक्रमणामुळे इराणी भाषेवर अरबींचा फार प्रभाव पडला. तरीही, इराणी भाषाच (अवेस्ता व पहलवीचा प्रभाव असलेली फार्सीसदृश इराणी भाषा) इराणने चालू ठेवली. आजची इराणी भाषा आणि फार्सी व प्राचीन इराणी (अवेस्ता) भाषा यामधील दुवा म्हणजे पेहलवी भाषा असून अर्वाचीन इराणीचे स्वरूप बाह्यतः कसेही दिसत असले तरी ती निश्चितपणे इंडो-युरोपियन कुटुंबातील एक महत्त्वाची भाषा आहे, ही गोष्ट भाषाशास्त्राने सिद्ध केली आहे.[६४]

खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार जर गुजरातमधून आलेले आहेत तर त्यांची मातृभाषा गुजराती का नाही, याचे उत्तरही असे की, गुजरातची भाषा, संस्कृती व व्यक्तिमत्त्व ही आपले वेगळे अस्तित्त्व दाखवू लागली ती सिद्धराज जयसिंह व त्यानंतरच्या कुमारपाल या चौलुक्यवंशी सोळंकीच्या काळात, म्हणजे तेराव्या शतकात आणि खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार तर महमद गझनीच्या क्रूर आक्रमणापासून दहशतीमुळे अकराव्या शतकातच गुजरातेतून स्थलांतराला लागला होता. कर्नल टॉडच्या मते दुसऱ्या ते पाचव्या शतकात हुणांबरोबर भारतात गुर्जर, अहिर, जाट इत्यादी टोळ्या आल्यात. त्यामुळे त्यांना आर्य म्हणण्यापेक्षा सिथियन वंशाचे म्हणणे अधिक सयुक्तिक राहील. डॉ. रा.गो. भांडारकर, विल्यम स्मिथ, विल्यम क्रूक इत्यादी शास्त्रज्ञांनी हे मत मान्य केले आहे.[६५] स्मिथ म्हणतो, हे बाहेरून आलेले लोक हिंदू धर्माच्या सर्वग्राही शक्तीला बळी पडून फारच लवकर पूर्ण हिंदू बनले. ज्यांना सरदारकीचा मान मिळाला, त्यांचा त्या वेळचा हिंदू वर्णव्यवस्थेत क्षत्रिय म्हणून समावेश केला गेला. इतर सामान्य लोकांना गुजर हे नाव मिळाले. विल्यम क्रूक याने याविषयी केलेले प्रतिपादन असे - ''वैदिक काळातले क्षत्रिय व मध्य युगातील राजपूत यांच्यामध्ये इतकी भिन्नता दिसून येते की, त्याचा कोणताही संबंध जोडणे शक्य नाही, हे आता पुराव्याने सिद्ध झाले आहे की, बऱ्याच राजपूत घराण्यातील उत्पत्ती शक किंवा कुशाण लोकांपासून किंवा श्वेत हुणांपासून झाली आहे. हुणांशी संबंध असलेल्या गुर्जरांनी हिंदू धर्म स्वीकारला आणि त्यांच्या प्रमुखांपासून उच्च राजपूत घराणी उदय पावली. त्या लोकांना जेव्हा राजवैभव प्राप्त झाले आणि त्यांनी जेव्हा हिंदूंचा धर्म आणि त्यांची समाजव्यवस्था यांचा स्वीकार केला, तेव्हा त्यांचा संबंध **महाभारत** व **रामायण** यातील प्रमुख वीरांशी जुळवण्याचा प्रयत्न ओघानेच करण्यात आला. त्यामुळे सूर्य व सोम यांच्यापासून राजपूत घराण्याची उत्पत्ती या

अद्भुत कल्पनेविषयीच्या आख्यायिकांचा समावेश त्यांच्या वृत्तान्तात आला. परकीयांचा स्वधर्मात करून घेतलेला हा समावेश सोयीस्कर अशा दंतकथांनी छपविणे आवश्यक होते. म्हणून आर्य ऋषींच्या नेतृत्वाखाली शुद्धिसमारंभपूर्वक अग्निकुले उत्पन्न करण्यात आली, या कथेचा उद्भव झाला. परमार, परिहार, चौलुक्य व चौहान या चारच घराण्यांची उत्पत्ती यज्ञकुंडातून झाली असल्याचे सांगण्यात येते.''

महामहोपाध्याय वा.वि. मिराशी यांच्यानुसार भारतात यवन, शक, पहलव (पल्लव), कुशाण, हूण (हुणांबरोबरच गुर्जर टोळ्या आलेल्या आहेत, हे वर पाहिलेच आहे.) इत्यादी अनेक परकी जमातींची आक्रमणे झालीत. कालांतराने त्यांनी भारतीय धर्म व संस्कृती स्वीकारली. भारतीय संस्कृती सर्वसमावेशक असल्याने त्यांचे परकीयत्व लोप पावले. विदिशेजवळ तक्षशिलेच्या यवनराजाचा दूत हेलिओडरस याने उभारलेला गरुडध्वज आहे. त्यावरील लेखात तो आपला भागवत (भागवत = विष्णूचा उपासक) असा निर्देश करतो. **मनुस्मृतीत** (१०, ४३, ४४) म्हटले आहे की, कांबोज, यवन, पल्हव, दरद, खश इत्यादी लोक पूर्वी क्षत्रिय होते. पण संस्कार न झाल्याने त्यांना वृषलत्व प्राप्त झाले. परकीय आक्रमकांमध्ये हूण हे प्रसिद्ध होते. भारतात आल्यावर त्यांनी व त्यांच्याबरोबर आलेल्या जमातींनी हिंदू धर्म स्वीकारला. हूण मिहीरकुल हा शिवोपासक होता. हुणांनी (मिराशी गुर्जरांनाही हूणच संबोधतात) भारतात राज्ये स्थापल्यावर ते हळूहळू भारतीयांत मिसळून गेले आणि पुढे त्यांची गणना राजपुतांच्या श्रेष्ठ कुळात होऊ लागली. त्यांचे शरीरसंबंध भारतातील उच्च कुळांशी झाले. उदा. कलचुरी आपणास चंद्रवंशी म्हणवत. त्या कुळातील महाप्रतापी कर्ण नृपतीचा विवाह हूण राजकन्या आवल्लदेवी हिच्याशी झाला होता आणि त्यांचा पुत्र यशःकर्ण हा पित्यानंतर गादीवर आला तेव्हा हूण भारतीय क्षत्रियात गणले जात होते.[६६]

सुप्रसिद्ध इतिहासकार एम.एस. कोम्मिस्सरीएट म्हणतो - 'But even more important, for the purpose of our narrative, than the Huns, were the associated tribes of foreign barbarians - the Gujars, Ahirs, Jats, etc (F.N.3 - **The Original home of the Gujars was in Gurjistan in Persia, the modern Georgia.** They were thus the Iranian origin. As for the Abhiras, it is interesting to note that, according to the Paikuli inscription, they were already. In India by the end of the 3rd century, A-D-E. Herrield, **Paikuli**, 126) that accompanied them into India. According to recent researches, there is a little doubt that the famous Rajput clans of mediaeval India - the Parmars, the Chauhans, the Parihars and the Chalukyas - were devoloped out of the foreign Huns and Gujar hordes

that poured into India during the fifth and sixth centuries A.D."[६७]

एवढेच नव्हे तर गुजरातमध्ये (सौराष्ट्रात) वलभी राजधानी असलेले मैत्रक म्हणजेच मैत्रक राजवंशाचा संस्थापक भट्टारक हा मिहीरकुलवंशी (हूण) किंवा परकीय गुर्जर जमातींपैकी होता.[६८]

मात्र, मानववंशशास्त्रज्ञ रिस्ले याने आणि पं. गौरीशंकर ओझा यांनी टॉड, भांडारकर, स्मिथ व क्रूक यांच्या मतांचे खंडन करून राजपूत आर्यवंशी क्षत्रिय असल्याचे प्रतिपादन केले आहे. असे असले तरी इतिहास संशोधकांनी आता हे मान्य केले आहे की, राजपुतांची परमार, परिहार, चौलुक्य व चौहान ही घराणी अग्निकुलोत्पन्न नसून सूर्य, सोम व यादववंशीय आहेत. पुराणांवरून असे दिसते की, यादव वंश हा सोमवंशाची एक शाखा आहे. चंद भाटाने राजपुतांच्या ज्या प्रसिद्ध ३६ राजघराण्यांची नावे दिली आहेत त्यांचा त्याने सूर्य, सोम व यादववंशीय म्हणूनच उल्लेख केला असून अग्निकुलाचा उल्लेखही केलेला नाही. अग्निकुले म्हणून मानलेल्या चारही घराण्यांचा त्याने सूर्य, सोम किंवा यादव वंशातच समावेश केलेला आहे. तसे पाहिले तर राजपूत ही जातवाचक संज्ञा इ.स.च्या सोळाव्या शतकापूर्वीच्या साहित्यात किंवा अभिलेखात आढळत नाही. अरबी व फार्सी भाषांमधील साहित्यातही राजपूत या संज्ञेचा प्रयोग त्यापूर्वी केलेला नाही. मूळ **राजतरंगिणी** ग्रंथातही त्याचा उल्लेख नाही.[६९] मात्र, **राजतरंगिणी**च्या शेवटच्या परिशिष्टात राजपूत जातीचे नाव प्रथमच आले आहे व हे परिशिष्ट अकबराच्या काळात लिहिले गेले असल्याने ते संभवनीय आहे.

चिं.वि. वैद्य यांनी म्हटले आहे की, अग्निकुलांची आख्यायिका कवीच्या कल्पनेची सृष्टी आहे; इतकेच नव्हे, तर तो कवीच्या उक्तीचा भ्रांत अर्थ समजून त्यावर उभारलेली आहे. चिं.वि. वैद्य यांनी तर याबाबत पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे.[७०] ''वसिष्ठाने अग्नीतून क्षत्रियांची चार कुले निर्माण केली, ही कथा पृथ्वीराजाचा भाट कवी चंद याने **पृथ्वीराजरासो** या महाकाव्यात प्रथम प्रसृत केली. राक्षसांनी किंवा म्लेंच्छांनी पृथ्वीला जेव्हा त्रस्त केले तेव्हा वसिष्ठाने आपल्या अग्निकुंडातून एकामागून एक असे चार पुरुष निर्माण केले. त्यांना परमार, चालुक्य, प्रतिहार व चाहमान ही नावे मिळाली. काव्याचा नायक पृथ्वीराज हा चाहमानांचा वंशज होता. रासोबरोबर ही कथा लोकप्रिय झाली आणि कालांतराने सर्व राजपुतांनी ती सत्य म्हणून मान्यही केली. या चारही कुलांतील वंशांनीही तिला मान्यता दिली. या चार घराण्यांना आपली वंशपरंपरा सूर्यसोमांशी नेऊन भिडविता येत नाही. ती कुळे केवळ अग्न्यूत्पन्नच आहेत, अशी लोकांची समजूत आहे आणि तीमुळे ही चारही कुळे बाहेर देशातून आली असून ब्राह्मणांनी अग्निशुद्धी-संस्काराच्या अगगुंठनाखाली त्यांचा क्षत्रियांत समावेश केला, या कल्पनेला निमित्त मिळाले.''

पण, सर्व राजपूत लोक आर्यवंशीय क्षत्रिय आहेत व सर्व राजपूत लोक सिथियन वंशाचे आहेत, ही दोन्ही मते एकांतिक वाटतात. कारण, वर्णसंस्कारामुळे कोणताही वंश शुद्ध राहिला नाही. शक, कुशाण, यवन, हूण हे सर्व परकीय लोक भारतीय समाजात मिसळून गेले आहेत. त्यांच्यातील शूर लोक हिंदूंच्या क्षत्रिय वर्णात सामील झाले असतील. त्यांच्यावर शुद्धिसंस्कार करण्यात आला आणि अबू पर्वतावरील यज्ञातून चार पुरुष निर्माण झाले, ही कथा रचली गेली, ही कल्पना संभवनीय वाटते. कारण, प्राचीन काळी अशा प्रकारे परकीय लोकांना आपल्या समाजात सामावून घेण्याची प्रवृत्ती होती. याव्यतिरिक्त काही आदिवासी लोकांच्या नेत्यांनीही स्वपराक्रमाने राज्ये स्थापन केली आणि ते स्वतःला क्षत्रिय म्हणवून घेऊ लागले. राजस्थानातील चारण व भाट आपल्या स्वामींची स्तवने गाऊन त्यांना उच्च कुलोत्पन्न ठरविण्यात कुशल होते. त्यांनी भिन्न-भिन्न राजांचा प्राचीन राजवंशांशी संबंध जुळवून दिला. अशा रीतीने प्राचीन क्षत्रियांचे वंशज, परकीय आक्रमक आणि आदिवासी राजे यांचे संमिश्रण होऊन मध्ययुगीन क्षत्रिय निर्माण झाले आहेत, असे विल्यम क्रुकने प्रतिपादले आहे.[७१] विल्यम क्रुकच्या या म्हणण्यात बरेच तथ्य वाटते. कारण, खानदेशातील नंदुरबार व चोपड्यास सहा-सातशे वर्षांपासून स्थायी झालेले भाट हे राजस्थानातील भाटांचेच वंशज आहेत आणि लेवा पाटीदार हे मूळ गुर्जरत्ता भागातील गुर्जर वंशी असल्याने आणि मुसलमानी आक्रमणांच्या काळात, या भाटांच्याच स्थलांतर काळात स्थलांतरित झालेले असल्याने त्यांनी लेवा पाटीदारांच्या वंशावळी लिहिताना उच्चकुलोत्पन्न क्षत्रियांशी (सूर्यवंशी रामपुत्र लवाशी) संबंध जोडलेला दिसून येतो. हे लोक स्तुतिप्रिय असून आपल्या केलेल्या स्तुतीमुळे ते भाटांना भरभरून देत राहिले. भाटांना या भागातही पूर्वी मांगटे म्हणत. लेवा पाटीदार लोक या भाटांची चांगली बडदास्त ठेवत असत. काही भाट तर यांना लुबाडत होते.

मानववंशशास्त्रज्ञ आर.इ. एन्थोवेन (**कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** खंड २, पृ. १३४), गॅझेटिअरकार जेम्स. एम. कॅम्पबेल (**गॅझेटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी, गुजरात पॉप्युलेशन,** व्हा. ९, पार्ट १ व २) तसेच नेल्सन (**बुलडाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९१०, पृ. १२४) यांनी प्रतिपादित केले आहे की, गुजरातमधील लेवा पाटीदार (कुणबी) हे गुर्जर वंशीय आहेत व त्यास समाजशास्त्रज्ञ श्री. देवीसिंह चौहान आणि **लोकसत्ता**चे माजी संपादक टी.व्ही. पर्वते यांनी दुजोरा दिला आहे.[७२] आर.ई. एन्थोवेन स्पष्टच म्हणतो. -"The term Kunbi (Patidar) indicates the occupation of a cultivator; but the majority of Gujrat Kunbis are propably Gujars in origin, and in this differ markedly from the Kunbi of the Deccan..."

यावरून, लेवा पाटीदार हे गुर्जरवंशी शाखांमधील म्हणजेच परकी वंशीय

आहेत हे अनुमान लावता येते. पुराणांशी संबंध लावल्यास सूर्य, सोम, यादव वा अग्निकुली आर्य असो किंवा परकी वंशाचे मानल्यास पर्थियन वा सिथियन असो, एवढे मात्र निश्चित की, सहाव्या-सातव्या शतकापासून अगदी सोळाव्या-सतराव्या शतकापर्यंत या गुर्जरवंशी स्थायी झालेल्यांमधून परमार, परिहार किंवा प्रतिहार, चाहमान किंवा चौहान, चौलुक्य किंवा चालुक्य, कलचुरी, गेहलोत, रावळ इत्यादी वंशांनी क्षात्रतेज दाखविल्याने प्रस्तुत लेखकाच्या मते यांचे पूर्वज निश्चितच क्षत्रिय ठरलेले आहेत.


गुर्जर कुलांचा सखोल अभ्यास केल्यास दिसून येईल की, पूर्वी मराठा, राजपूत, गुजर, पाटीदार यांचे पूर्वज हे पाचव्या, सहाव्या शतकात हिंदुस्थानात हुणांबरोबर आलेले गुर्जर होय. भारतात आल्यावर त्यांच्या शाखा, पोटशाखा पडत गेल्या व त्यावरूनच वंश, जाती, पोटजाती पडत गेल्या. लेवा पाटीदार ही त्यातील एक!

इरावती कर्वे यांच्या मते गुर्जर जमातीवरून ज्यांना नाव मिळाले असे तीन प्रदेश आज आढळतात. पंजाबमध्ये गुजरानवाला व गुजरात (गुर्जरत्ता) असे दोन जिल्हे आणि महाराष्ट्राच्या उत्तरेकडील गुजरात राज्य. गुजर नावाच्या अंतर्विवाह करणाऱ्या जाती आज पंजाबपासून महाराष्ट्रापर्यंत पसरल्या आहेत.[७३] हिमालयाच्या पायथ्याजवळच्या प्रदेशात मुसलमान गुजर आहेत. ते म्हशी पाळून दुभत्यांचा व्यवसाय करतात (मुळात गुर्जर टोळ्या चरवाह म्हणजे Pastoral असल्याने गायी-म्हशी पाळणे व दुभत्याचा व्यवसाय करणे हा त्यांचा मूळ धंदा होता.) दिल्लीजवळच्या प्रदेशात शेतकरी गुजर आहेत. शिवाय, याच भागात गुजर नावाची भटकी जमातही आहे. ही जमात अकबरापासून ज्ञात आहे. उत्तर महाराष्ट्रात (जळगाव व धुळे जिल्ह्यात) गुजरनामक शेतकरी (पाटीदार) आहेत. त्यांच्यात इरावती कर्वे यांना पढयार नावाचा एक गट आढळला. 'पढ्यार' हे कूळनाम प्रतिहारपासून बनले असले पाहिजे.[७४] एन्थोवेनच्या मते पाठारे प्रभूमधील पाठारे शब्द प्रतिहारपासून निघाला असावा. राजपुतांमध्ये गुजर नावाचा एक वंश आहे आणि महाराष्ट्रात गुजर ही एक जैन धर्मीय व व्यापार करणारी जात आहे. मराठ्यांमध्ये गुजर आडनावाचे घराणेही आहे.

रावबहादूर पी.बी. जोशी यांच्या मते पाठारे हा प्रतिहार या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. तद्वतच माझ्या मते पाटीदार हासुद्धा याच संस्कृत शब्द प्रतिहाराचाच अपभ्रंश असणे त्यांच्या Revenue officer म्हणून बजावलेल्या कामगिरीवरून खूपच संभवनीय आहे. पाठारे हे कनौज व राजस्थानच्या प्रतिहारांचे वंशज होते. तसेच पाटीदार हेसुद्धा कनौज व राजस्थानच्या प्रतिहाराचे वंशज असावेत. इ.स. १०१८ मध्ये गझनीच्या महमुदाने कनौजवर स्वारी केली व प्रतिहार घराण्यातील शेवटचा राजा राज्यपाल याचा पराभव केला. त्या आधी परमारांनी प्रतिहारांना पराभूत केले

होते. राज्यपालाच्या पराभवानंतर प्रतिहार प्रथम माळवा, गुजरात व नंतर पावागड असिरगडमार्गे देवगिरीच्या राजाच्या आश्रयासाठी दक्षिणापथाने खानदेशातून पैठणला गेले. त्यातील काही देवगिरीचे राज्य असलेल्या यादवांच्या खानदेशात राहिले असावे; तेही लेवा पाटीदार म्हणून गणले गेले असावे. गुजरातमधून आलेल्या लेवा पाटीदारामध्ये समाविष्ट झाले असावे. जे पैठणला गेले त्यांना पैठणवरून पाताने अथवा पाठारे असे नाव प्राप्त झाले.

भारतात चार वेगवेगळ्या भाषिक प्रदेशांवर गुर्जर जमात विखुरली; त्या-त्या प्रदेशात ती जमात एक स्वतंत्र गट म्हणून राहिली, निरनिराळे व्यवसाय करू लागली आणि जातिव्यवस्थेच्या निरनिराळ्या उच्चनीच स्थानांवर बसली. पुढील आकृतीवरून हे अधिक स्पष्ट होईल.



महाराष्ट्रातील गुजर शेतकऱ्यांबरोबर गुजरवंशीय लोक पाटीदार खानदेश-वऱ्हाडात आले असावे, असे एक मत आहे.

लेवा पाटीदारांची वंशावळी ठेवणारे भाट चोपड्याला स्थायिक झालेले आहेत. गुजरांचीही वंशावळी तेच ठेवतात. लेवा पाटीदारांच्या स्थलांतरणाचा क्रम ते थोड्याफार फरकाने रेवे गुजरांच्या क्रमाप्रमाणेच दाखवितात आणि १८८० मध्ये प्रकाशित **खानदेश गॅझेटिअर**मध्येही रेवे गुजरांचा क्रम मि.जे. पोलन (सी.एस.) याने तसाच दाखविला आहे. यावरून त्याने भाटांच्या मुलाखतींवरूनच माहिती संकलित केली असावी. चोपड्याच्या भाटांच्या मुलाखती **जळगाव गॅझेटिअर** (मराठी आवृत्ती) चे काम चालू असताना १९९१-९२ मध्ये घेतल्या असता एका भाटाने लेवा पाटीदार (लेवा कणबी) हेसुद्धा लहू राजाचे वंशज सांगितले, तर एका भाटाने ते रामपुत्र लवाचे वंशज सांगितले. जेव्हा मुलाखतींवर आधारित माहिती देण्यात येते तेव्हा ती तंतोतंत खरी मानता येत नाही. पोलनच्या बाबतीतही तेच झाले असल्याने त्याने **खानदेश**

गॅझेटिअरमध्ये दिलेली लेवा गुजरांची माहिती तंतोतंत खरी मानता येणार नाही.

लेवापुराणनामक ग्रंथानुसार (१९१८ मध्ये प्रकाशित) लेवा सोमवंशीय असल्याचे अनुमान काढले आहे.[७६] त्यानुसार, त्यांचे मूळ गोत्र कश्यप असून (येथे गोत्र म्हणण्यापेक्षा प्रवर म्हणणे अधिक सयुक्तिक राहील) सोमवंशीय (चंद्रवंशीय) राजा बळी याचा पुत्र लेहक यापासून लेवा किंवा बळीचा भाऊ भद्र यांचा मुलगा कँटभ याच्यापासून कडवा या शाखा उत्पन्न झाल्या आहेत. मथुरेच्या पश्चिमेस लेहकपूरनामक गाव असून तेथे लेवा वंशाची वसाहत होती. विक्रम संवताच्या सुमारे २०० वर्षे पूर्वी (इ.स.पू.च्या तिसऱ्या शतकात) सिकंदराने पंजाबवर स्वारी केली तेव्हा तेथील राजाच्या मदतीकरिता गेलेल्या मथुरेच्या सैन्यात लेहकपुरातील लेवावंशी सैनिकही होते. गुजरातमध्ये अजयनामक राजाने लेवावंश बसविला असेही या ग्रंथात नमूद केले आहे. चिनी प्रवासी युआनच्यांग हा इ.स. ६४० मध्ये लिहितो की, गुजरातमध्ये वृथनगर (वडनगर) या सुंदर भागात रेवा व कडवा लोकांची सुखी वस्ती होती.[७७] लेवा शाखेतून लेवा गुजर व लेवा पाटीदार आणि कडवा शाखेतून कडवा पाटीदार व कडवा गुजर अशा उपशाखा निर्माण झाल्या असाव्यात.

उपरोक्त परिच्छेदातील **लेवा पुराणा**नुसार माहिती सत्य मानल्यास याच प्रकरणातील तळटीप क्रमांक ३५ ला अनुसरून मालवगणाबाबत जी माहिती दिली आहे; त्याच्याशी लेवा पाटीदारांचा संबंध जोडता येईल. मात्र, यासाठी अधिक संशोधनाची आवश्यकता आहे. पंजाबात इ.स.पू.च्या पाचव्या, चौथ्या शतकापासून स्थित असलेले हे मालव कोण, याबाबत संशोधनाची दिशा ठरवावी लागेल. तूर्त उपलब्ध साधनसामग्रीनुसार लेवा पाटीदार हे गुर्जरवंशीय टोळ्यांपासून उत्पन्न झाले आहेत, असे मानूनच हा वास्तव इतिहास दिला आहे. नवीन पुरावे येतात तसा इतिहासही बदलत असतो.

लेवा गुजर स्वतःस लहू राजाचे वंशज मानतात. हा लहू राजा कोण, हे इतिहासात ज्ञात नाही. वास्तव इतिहासात लहू राजाविषयी आधार नाही. आपण रणथंभोर (रणथंभोर हे राजस्थानात असून रणथंभोरचा किल्ला दुर्गम आहे) येथून आल्याचे ते सांगतात.[७८] रणथंभोर येथून काही राजपूत टोळ्यांनीच ज्यांना जुनागडला हाकलून लावले. राजपूत जातवाचक संज्ञाच मुळी सोळाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात अस्तित्वात आलेली दिसते. **राजतरंगिणी** ग्रंथातही राजपुतांचा उल्लेख नाही. मात्र, **राजतरंगिणी**चे शेवटचे परिशिष्ट सोळाव्या शतकात अकबराच्या कालावधीत लिहिले असल्याने फक्त त्यात राजपूत जातवाचक संज्ञेचा उल्लेख आलेला आहे.[७९] त्यामुळे राजपुतांनी हाकलले असे म्हणणे उचित होणार नाही. एवढे मात्र नक्की की, रणथंभोर येथून त्यांना कोणीतरी हुसकले. मग, त्या गुर्जरांमधीलच दुसऱ्या टोळ्या असू शकतील. जुनागडहून ते अहमदाबादला आल्यावर त्यांच्या पाच पिढ्या तेथे

नांदल्या. तेथूनही त्यांना पावागड व चंपानेर भागात हुसकून लावण्यात आले. तेथे त्यांनी ३६ उपनगरांचे शहर वसविले. या बालेकिल्ल्यातूनही छप्पीराजाने त्यांना स्थानभ्रष्ट केल्यामुळे ते नर्मदेच्या खोऱ्यातील नीलगड गावात विखुरले. तेथे विभारसी भिलारो किंवा विभारसी तडवीचे राज्य होते. येथे तडवी म्हणणेही उचित ठरणार नाही, कारण तडवी जमातच मुळी भिल्लांपासून सतराव्या शतकात निर्माण झाली. औरंगजेबाने सातपुड्यातील भिल्लांना बाटविले. त्यांना तडवी (तरवी = वाटाड्या) हे नाव प्राप्त झाले. उपरोक्त छप्पीराजा कोण याला इतिहासात आधार नाही. नीलगडहून हे लोक नेमाडच्या (निमाडच्या) पूर्वेस आले आणि करगुंदच्या भोवताली ३२ ठिकाणी वस्ती करून राहू लागले. कालांतराने करगुंद येथून २००० बैलगाड्यांच्या तांड्याने निघून त्यांनी खानदेशात प्रवेश केला. त्यातील काही थाळनेर डोंगराच्या अलीकडे व काही असिरगडजवळील तापी खोऱ्यात आले. हे स्थलांतर अकराव्या शतकातील असावे. चोपड्याच्या भाटांच्या नोंदीनुसार गुजर नंदुरबारमार्गे १२३४ च्या सुमारास खानदेशात आले.[८०] मात्र, यात तफावत असू शकेल. इ.स. १२१९ मध्ये जामनेरच्या देशमुखीचे अधिकार गवळी कुटुंबाकडून लेवा गुजरांकडे (गरी गुजर) हस्तांतरित झाले होते. त्यावरून लेवा गुजर १२१९ च्या आधी खानदेशात आले हे सिद्ध होते.

येथून मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, लेवा गुजर ज्या निमाड (नेमाड) व करगुंदच्या भोवताली वस्ती करून राहिले, असा उल्लेख करतात त्या भागात आजही लेवा पाटीदारांची वस्ती बऱ्याच प्रमाणात आहे तर गुजर मात्र आढळत नाही. त्यावरून पोलनला भाटांनी लेवा गुजरांची माहिती दिली की लेवा पाटीदारांची, असा संभ्रम निर्माण होतो.

बहुधा, रणथंभोर येथून त्यांना हुसकण्याचा किंवा त्यांनी रणथंभोर सोडण्याचा क्रम वेगळा असू शकतो. कारण, लेवा पाटीदार अथवा लेवा गुजरांच्या स्थलांतरणास कारणीभूत ठरलेले आहे ते मुसलमानी आक्रमक आणि इ.स. १३०२-०३ च्या सुमारास दक्षिणेकडून यादवांची सत्ता नष्ट करून माळवा, लाट, आनर्त प्रदेश काबीज करीत हिंदूंच्या कत्तली व लुटालूट करीत अल्लाउद्दीन खलजी व त्याची सेना उत्तरेकडे परत आली. चितोडवर स्वारी करण्यापूर्वी त्याने रणथंभोर येथे हिंदूंच्या कत्तली करून त्याने हा किल्ला ताब्यात घेतला. त्याच वेळी व स्वधर्म व जीव वाचविण्यासाठी हे, लोक दक्षिणेस जुनागड, बडोदा, अहमदाबाद परिसरात स्थलांतरित झाले असावेत, हे अधिक सयुक्तिक वाटते. परंतु ते गृहीत धरले तर खानदेशात १२१९ च्या आधी किंवा १२३४ च्या सुमारास आले, या विधानास छेद बसतो.

खानदेशातील लेवा गुजर हे अहमदाबाद व बडोदा चरोतरमधील मानले जात असून ते प्रामुख्याने रावेर, जामनेर, एरंडोल, एदलाबाद व यावल (यावलमधील दोन-चार गावे) मधील तापी नदीच्या काठी असलेल्या गावात आढळतात.[८१] तापी

काठची गाळाची जमीन व मुबलक पाणी त्यामुळे वसाहतीसाठी हे ठिकाण त्यांना अगदी आदर्श वाटले. लेवा गुजर तापी काठी स्थायिक झाल्यावर लेवा पाटीदारांना तापीकाठची जागा उरली नाही म्हणून लेवा गुजरांना लागून असलेल्या भागात जंगल साफ करून त्यांनी वसाहती केल्या. म्हणूनच लेवा पाटीदारांचे जीवन लेवा गुजरांपेक्षा अधिक खडतर आहे. त्यांच्या वसाहतींच्या स्थानांवरून लेवा पाटीदार लेवा गुजरांच्या किंचित नंतर आलेले असावेत.

लेवा गुजर व लेवा पाटीदार निमाडातील करगुंद येथून खानदेशात आलेत. निमाडातील वसाहतींचा क्रम महादेवशास्त्री जोशींनुसार पुढीलप्रमाणे आहे - निमाडाला पूर्वी अनुप देश असे म्हणत. त्यात खांडवा व खरगोण जिल्ह्यांचा समावेश होता. येथे मूळचे रहिवासी कोरकू, भिल्ल व वंजारी हे आदिवासी होत. त्यानंतर तेथे राजपूत आलेत. राजपुतांनंतर नार्मदीय, नागर व उत्तर भारतीय ब्राह्मण आलेत. त्यानंतर परमार, लाड, जैन, अग्रवाल हे व्यापारी व त्यानंतर बडगुजर, रेवे (लेवा गुजर व लेवा पाटीदार), यादव, केकरे या पोटजाती आल्यात.[८२] म्हणजे याचाच अर्थ असा की, लेवा गुजर व लेवा पाटीदार हे खानदेशात एकाच वेळेस किंवा थोड्या अंतराने आलेले असावे. परंतु, लेवा पाटीदारांची स्थलांतरण प्रक्रिया अकराव्या शतकापासून पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत सतत चालू असावी, त्यामुळे १,००० वा १,४०० किंवा २,००० गाड्या भरून एकाच वेळी स्थलांतरित झाले हे विधान चूक ठरेल. एका गाडीत सरासरी ५ माणसे धरलीत तर फक्त ५,५०० ते ६,००० माणसेच आली, असे गृहीत धरावे लागेल व १९५१ पर्यंत वैद्यकीय सुविधा फारशा नसल्यामुळे त्या आधी झालेल्या जनगणनांनुसार लोकसंख्यावाढ प्रमाण (Decadal Variation) १९५१ पूर्वीच्या दशकामध्ये सरासरी ५ ते ६ राहिले. म्हणजे शतकात सरासरी ५५ टक्के लोकसंख्या वाढली असे गृहीत धरल्यास पंधराव्या शतकाअखेरची मानलेली लोकसंख्या विसाव्या शतकाअखेर ६०/६५ हजारांपर्यंतच जाते. परंतु, २००१ च्या जनगणनेनुसार या भागातील लेवा पाटीदार लोकसंख्या निश्चितच सहा लाखांच्या आसपास आहे.

एकंदरीत असे अनुमान काढता येते की, गुजर, राजपूत, मराठी, पाटीदार, कुर्मी इत्यादी तत्सम जाती, त्यांच्या शाखा व पोटजाती या सर्वांचे पूर्वज म्हणजे गुर्जर वा हूण, शक, कुशाण वंशीय आहेत व ते पहिल्या ते पाचव्या शतकांदरम्यान इराणमार्गे हिंदुस्थानात आले आहेत.

गुजरातमधील पाटीदारांचा दर्जा[८३] - गुजरातमधील लेवा पाटीदारांचा दर्जा पाहण्यासाठी सर्वच गुजराती कणब्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे. गुजराती कणब्यांना अहमदाबाद जिल्ह्यात पाटीदार नावाने संबोधले जाते. खेडा जिल्ह्यात चरोतरमध्ये राहणाऱ्या लेवा कणब्यांनाही पाटीदार या नावाने संबोधले जाते. कणब्यास

देसाई, अमिन आणि पटेल अशीही बहुमानवाचक नावे आहेत.

डॉ. बेचरभाई पटेल यांच्या **लेऊवा कणबीओ (गयीकाल अने आज)** या पुस्तकात लिहितात की, पटेल (पाटीदार) हे भूमिपुत्र (Sons of soil) असून त्यांची कृषिप्रधान संस्कृती आहे. त्यांना वेदांचे आणि धर्मग्रंथांचे ज्ञान नसले तरी खात्रीने प्रत्यक्ष जीवनशैलीचे त्यांचे ठाम मार्ग आहेत. गुजरातीत ''काचू सोनू पकावणार, ऐ छे गुजरातनो पाटीदार'' असे म्हटले जाते. म्हणजे जो धान्य पिकवितो तो गुजरातचा पाटीदार (पटेल) होय.[८४]

गुजराती कणब्यांचे आंजणा, डांगी, गुजर, कडवा, लेवा, मतिया, मोम्ना, पट्टणी आणि उदा असे नऊ पोटभेद आहेत. यापैकी लेवा व कडवा यांचा रोटी व्यवहार चालतो; परंतु बेटी व्यवहार होत नाही. उदा. कणबी कोणत्याही पोटभेदाबरोबर रोटी वा बेटी व्यवहार करीत नाहीत. पट्टणी कणबी हे लेवा व कडवांबरोबर रोटी व्यवहार करतात, परंतु बेटी व्यवहार करीत नाहीत. लेवा आणि कडवा हे मतिया, आंजणा, मोम्ना आणि डांगी यांच्याशी रोटी व्यवहार करीत नाहीत. आंजणा आणि डांगी यांचा परस्परांशी बेटी व्यवहार होतो.

लेवा, कडवा, आंजणा, डांगी, उदा आणि पट्टणी यांच्या रीतिरिवाजात व धर्मसमजुतीत फारसा फरक पडत नाही. मतिया आणि मोम्ना यांचे काही रीतिरिवाज मुसलमानांसारखे वाटतात.

सर्वच कणब्यांमध्ये एकाच कुळात स्त्री-पुरुषात शरीरसंबंध होत नाही. आतेबहिणीशी, मावसबहिणीशी व मामेबहिणीशी लग्न करता येत नाही. भावाभावास बहिणीबहिणीबरोबर म्हणजे सहोदर भावांना दुसऱ्या कुळातील सहोदर बहिणींशी लग्न लावता येते. यांच्यात सोडचिठ्ठी, विधवाविवाह व पुनर्विवाहास मोकळीक आहे.

कित्येक कणबी ब्राह्मण ज्याप्रमाणे जानवे घालतात; त्याप्रमाणे जानवे किंवा त्याप्रमाणे तुळशीच्या लाकडाच्या मण्यांची माळ घालतात. खेडा आणि भडोच जिल्ह्यांतील पाटीदार अलीकडे बरीच वर्षे आपणास द्विज म्हणवून घेऊन जानवी घालू लागले आहेत. मुलामुलींच्या ११ वर्षांच्या दरम्यान गुरूकडून माळ घालतात.

कणबी बिजमार्ग, दादूपंथ, कबीरपंथ, माध्वपंथ, पर्णामी, रामानंदी, शैव, स्वामिनारायण सत्पंथ आणि वल्लभाचार्य वगैरे अनेक पंथांचे अनुयायी आहेत. काही जैन आहेत.

आंजणाशिवाय कोणतेही कणबी मांस खात नाहीत व दारू पित नाहीत. बहुतेक कणबी शेती करतात. लेवा व कडवा कणबी शेतीच्या कामात वाकबगार असतात. शहरात राहणारे पुष्कळ कणबी रेशीम व सूत यांचे कापड विणण्यात कुशल असतात. कित्येक कपड्यांचा व धान्याचा व्यापार करतात. बरेच सरकारी अधिकारी आहेत, तर बरेच सावकारी करतात.

उत्तर गुजरातमध्ये आंजणा कणबी आढळतात. दिसण्यात त्यांचे कोळ्यांशी साम्य असून त्यांच्या काही नावांचा शेवट राजपुतांच्या नावाप्रमाणे सिंग या शब्दात होतो. त्यांच्यात २३ शाखा असून कच्छमधील काही आंजणा शाखीय जैन धर्मी आहेत.

महीकाठा भागात डांगी कणबी आढळतात. ते मूळचे आंजणाचे होत. यांची भाषा व पोशाख भिन्न असला तरी परस्परांशी रोटी-बेटी व्यवहार चालतो.

कडबा कणबी मुख्यत्वेकरून अहमदाबाद जिल्ह्यात व कडी या परगण्यात (विरमगाव, कलोल, कडी, कटोसन, मेहसाणा, विसनगर, हारिज, पाटण, सिद्धपूर, हिम्मतनगर, पालनपूर, तारगा, ककोशी आदी भागात) आढळतात. यांचा लेवांशी घनिष्ठ संबंध जोडण्यात येतो. ते स्वतःस रामपुत्र कुशाचे वंशज समजतात. काही दंतकथांनुसार शिवपत्नी उमेने मातीच्या मूर्ती करून शिवास त्या जिवंत करावयास लावल्या व अहमदाबादच्या उत्तरेस उंझा येथे खेड्याची निर्मिती करून तेथे त्यांची वसाहत केली. तेथे उमेचे मंदिर आहे. कडवा हे उंझा गाव मूलस्थान मानतात. कडवा व लेवा कणबी काबूलहून पंजाबमार्गे गुजरातमध्ये आले, असे कित्येक समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. त्यांच्या बहुतेक शाखांची नावे पंजाबातील खेड्यांवरून पडलेली असल्यामुळे या विधानास बळकटी येते. कडवा शब्दाचे अर्थ अनेक आहेत. कडू (कडवट); जहाल, रागीट, तापट; ज्यांच्या अंगी भांग, अफू इ. कैफ जिरून गेले आहेत असा; दुखणे, रोग इ. ज्यांच्या सरावाचा झाला आहे असा; नाजूक, कोमल राहिला नाही असा; शूर, निर्भय, धाडसी, घनचक्कर, घोर; रानटी, आडमुठा, व्यवहार करण्यास कठीण; क्रूर, निर्दय, पाषाणहृदयी, कठोर; अनौरस, अवैवाहिक इत्यादी (संस्कृत शब्द - कटू, प्राकृत - कटू व हिंदी-गुजराती कडवा) (दाते, कर्वे, **महाराष्ट्र ज्ञानकोश**, विभाग दुसरा १९८८, पृ. ५५८).

सुरत येथील कडवा कणब्यात लाल चुडावाला, काला चुडावाला व अहमदाबादी असे तीन उपभेद आहेत. शिवाय, कुलिया व अकुलिया असे पोटभेद आहेतच. त्यांचे परस्पर व्यवहार लेवा कणब्यांतील कुलिया - अकुलियासारखेच चालतात. पुरुष पत्नीस केव्हाही घटस्फोट देऊ शकतो; परंतु स्त्रीस नवऱ्याच्या संमतीशिवाय त्यास सोडचिठ्ठी देता येत नाही. मूल झाल्यानंतर घटस्फोट देता येत नाही. पूर्वी यांची लग्ने नऊ, दहा अगर अकरा वर्षांनी एकदा होत. आता ही प्रथा एक वर्षावर आली आहे. वर्षातून एकदाच विवाह होतात. त्या वेळी या वर्षी जमलेले सर्व विवाह उरकून घेतात. कडव्यांच्या मूळच्या ५२ शाखा आहेत. त्यातील बहुतेकांची नावे पंजाबमधील खेड्यांवरून पडली आहेत. सध्या कडवा ज्या खेड्यात राहत असतील त्या खेड्याचे नाव आपल्या शाखेस देतात. एकाच खेड्यात राहणारे लोक शरीरसंबंध करीत नाहीत. कडव्यांमध्ये अनेक सामाजिक दर्जा आहेत. त्यात अहमदाबाद

शहरातील कडवे सर्वात श्रेष्ठ गणले जातात. पूर्वी यांच्यात बालविवाहाची तसेच बेंबी पुजण्याची व लग्ने जमविण्याची प्रथा होती.

लेवा कणब्यांची संख्या गुजरातमध्ये जास्त आहे. ते गुजरातभर विखुरलेले असले तरी त्यांच्या वस्तीची मुख्य ठिकाणे खेडा जिल्ह्यातील आणंद, नडियाद, सोजित्रा आणि बोर्साद हे तालुके आहेत. ते कच्छमध्येही आढळतात. कच्छमध्ये यांचे हलाई आणि वाघडिया असे अंतर्विवाही भेद आहेत. गुजरातेतील लेवांमध्ये पाटीदार आणि कणबी असे दोन पोटभेद आहेत. पाटीदार आपल्या मुली कणब्यांना देत नाहीत. परंतु, कणब्यांच्या मुली मोठा हुंडा मिळाल्यास करतात. खेडा जिल्ह्यातील चरोतरमधील १३ खेड्यांतील (सोजित्रा भागातील) पाटीदारांना कुलिया असे म्हणतात आणि इतर खेड्यांमधील पाटीदारांना अकुलिया असे म्हणतात. कुलिया लोक अकुलियांना आपल्या मुली देत नाहीत. कुलियांमध्ये बायका पडद्यात राहतात व घरकामे नोकर करतात. पूर्वी यांच्यात विधवाविवाहास मान्यता नव्हती. वाण्यांप्रमाणे लेवा कणब्यांतही खेड्यांचे निरनिराळे संघ अथवा गोल केलेले असून एका गोलातील मुलामुलींची दुसऱ्या गोलातील मुलामुलींबरोबर लग्ने केली जात नाहीत. परंतु, या गोलांच्या मर्यादा निश्चित स्वरूपाच्या नसतात. यात वारंवार बदल केला जातो.

ब्रिटिश सत्ता स्थापन होण्यापूर्वी कुलिया लेवा पाटीदारांमध्ये शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करण्याचे काम असे. ते जुलूम जबरदस्ती करून भारी कर वसूल करीत असत. सर्व्हे सेटलमेंट झाल्यापासून त्यांच्या हातची सत्ता गेली आहे. तरीही, त्यांचे वजन मोठे असून साधारण शेतकऱ्यांपेक्षा त्यांचा दर्जा श्रेष्ठ समजला जातो.

मतिया कणबी फक्त सुरत जिल्ह्यातील जलालपूर आणि बार्डोली तालुक्यात आढळतात. त्यांचे काही रीतिरिवाज मुसलमानांसारखे आहेत. ते मूळचे लेवा कणबी. सुमारे ५०० वर्षांपूर्वी काही लेवा कणबी काशी यात्रेस निघाले. एके रात्री त्यांचा मुक्काम अहमदाबादपासून १० मैलांवरील गिरमथा गावी पडला. त्या वेळी तेथे इमामशहा नावाचा मुसलमान साधू राहत असे. त्याने या यात्रेकरूंना सांगितले की, जर तुम्ही माझे ऐकाल तर काशीला जाण्याचे श्रम न घेताच तुमचा हेतू येथल्यायेथेच तडीस जाईल. कित्येकांनी त्याच्या म्हणण्याकडे लक्ष न देता ते काशीस चालते झाले. दुसरे कित्येक त्याच्यावर विश्वास ठेवून तेथेच राहिले. त्यांस काशीचे दर्शन, गंगेत स्नान व ब्राह्मण भोजनाचे श्रेय तेथल्या तेथे लाभले. या चमत्काराचा त्यांच्यावर परिणाम होऊन त्यांनी इमामशहास आपला गुरू केले (अर्थात ही कथा रचलेली दिसते.). या संबंधाने दुसरी अशी हकीकत सांगतात की, त्यांच्यावर जबरीने मुसलमान होण्याचे संकट आले होते. ते टाळण्यासाठी त्यांनी इमामशहास आपला गुरू केले ही दुसरी हकिकत खरी वाटते. कारण, अहमदशहा व महमद बेगडा या क्रूरकर्मा

गुजरात सुलतानांनी हिंदूंना बाटवण्याचे व इस्लाम न झाल्यास मारण्याचे फर्मानच काढले होते. यावरून एक दिसून येते की, खानदेशातील सत्पंथी लेवा पाटीदार हे गुजरातमधील मतिया कणबी असावेत. अर्थात, हे मुळातच लेवा पाटीदारच होत. पूर्वी ज्यांना मतिया कणबी समजले जाई ते मतिया सत्पंथी झालेले होते. त्यांना पिराणा (पिरांना भजत म्हणून) मतिया असेही म्हणत.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस निर्मलदासनामक साधूने त्यांना वैष्णव बनवून रामानंदी वा दादूपंथाचे अनुयायी केले. या वैष्णव मतिया पिराणा मतियांत रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. मतियांत मृत पतीच्या धाकट्या भावाशी लग्न करण्याची चाल आहे (कदाचित या प्रथेवरूनच खानदेशात लेवा पाटीदारांमध्ये भावजयीस थट्टेने अर्धी बायको असे संबोधत असावेत.). प्रथमवरास विधवेशी अथवा घटस्फोटितेशी लग्न लावता येते. त्यासाठी वरास आधी शमीबरोबर लग्न करावे लागते. मतियांचे लग्नविधी लेवा कणब्यांच्या लग्नविधीसारखेच असतात. सत्पंथी आपणास सत्यास अनुसरणारे मानतात. पिराणा (गाव), अहमदाबाद, नवसारी व बऱ्हाणपूर येथील मुसलमान पिरांना ते भजतात. इमामशहाची धर्ममते ज्यात ग्रंथित केली आहेत, असा **शिक्षापत्री** नावाचा एक ग्रंथ आहे. तो त्यांचा पवित्र ग्रंथ होय. यांचे धर्मविधी चालविणारांना काका म्हणतात. ते विशिष्ट शाखेचे पुरुष असतात. पिराणा मतिया प्रत्येक महिन्यातील शुद्ध द्वितीयेस पवित्र मानतात व त्या दिवशी शुक्रवार आल्यास उपवास करतात. पूर्वी हे रमजानचे उपवास करीत. मृतांना पुरतात. उर्वरित अंत्येष्टिविधी लेवा पाटीदारांप्रमाणेच करतात. पिराणा मतिया हे शुद्ध शाकाहारी असून ते दारूस स्पर्शही करीत नाहीत. यातच त्यांचे हिंदुत्व शुद्ध असल्याचे सिद्ध होते.

कच्छमधील दोन तृतीयांश कणबी हे मोम्ना कणबी आहेत. यांचे काही रीतिरिवाजसुद्धा मुसलमानसदृश असले तरी त्यांना मुसलमान म्हटलेले आवडत नाही. ते स्वतःस लेवा पाटीदार अथवा लेवा कणबी म्हणवितात. पाटण येथे एका मुसलमान सय्यदाने यांच्या पूर्वजास बाटविले होते, असे सांगतात. यावरून त्यांना पट्टणी असेही संबोधतात. हा सय्यद मतिया कणब्यांना सत्पंथाची दीक्षा देणारा इमामशहाच असावा. काहींच्या मते पीर सदरउद्दीन याने त्यास बाटविले आणि मोम्ना अथवा मोमीन म्हणजे श्रद्धावंत असे त्यास नाव ठेवले. मोन्मा कणबी शेंड्या ठेवतात. अलीकडे बहुतांश मोम्ना कणब्यांनी स्वामिनारायण पंथाचा स्वीकार करून मुसलमान रीतिरिवाज सोडून दिले आहेत. मोम्ना कणब्यांमध्ये बहुले-होम न करता दुवानामक विधी करतात. काही मोम्ना सत्पंथी धर्मीय असल्याचे सांगतात. मृतास पुरतात. ते पक्के शाकाहारी असून दारूस शिवत नाहीत. ते मुसलमानांच्या हातचे अन्नोदक घेत नाहीत. राजपूत, दर्जी, लोहार, वालंद आदी जातीजमातींचे लोक यांच्याशी रोटी

व्यवहार करतात.

उदा नामक भगताचे अनुयायी असलेले लेवा कणबी स्वतःस उदा कणबी म्हणवितात. ते कबीरपंथी असून ब्राह्मणांना वर्ज्य मानतात. तांब्याच्या अगर पितळ्याच्या भांड्यास ब्राह्मणाचा जरी स्पर्श झाला तरी त्यातील पाणी ते पित नाहीत.

खानदेश वऱ्हाडातील लेवा पाटीदार, त्यांचे रीतिरिवाज, धर्मसमजुती इत्यादींचा बारकाईने अभ्यास केल्यास गुजरातमधील सर्वच शाखीय लेवा पाटीदार अथवा लेवा कणबी एवढेच नव्हे; तर कडवा, आंजणा, मतिया, मोम्ना सर्वच कणबी खानदेशात स्थलांतरित झालेले असावेत आणि त्यांनी अपरिहार्यता म्हणून एकत्र येऊन फक्त लेवा पाटीदार असेच संबोधन लावले असावे.

अंतर्विवाहीपणा (Endogamy) - एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत खानदेश-वऱ्हाडात गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या लेवा पाटीदारांमध्ये काही क्षुल्लक कारणांवरून भांडणतंटे झाल्याने मतभेद होऊन रेवे किंवा सावदेकर, नवघरे किंवा गाडेगावकर, कंडारकर आणि थोरगव्हाणे या अंतर्विवाही पोटशाखा निर्माण झाल्या, हे प्रकरण १ मध्ये पाहिलेच आहे. कॅम्बेल म्हणतो :-

" Pajnas (25535 - Census of 1872) are subdivided into four classes : Reva, Thorgavhana, Kandarkar and Navghari. The first is the main stock, the other three originated in feuds and disputes. All Pajnas eat together, but on account of disputes as to which division is the highest, they do not intermarry. One of the chief Pajna Kunbis is the Deshmukh of Yawal. He belong to the Thorgavhanis, who take their name from Thorgavhana in Savda, as the Kandarkars take their from Kandari on the Tapti in Bhusawal. The Navgharis would seem to be the descendants of nine families or houses who left the main stock and settled in different villages throughout the district." या पोटशाखांनी आपापसात बेटी व्यवहार करणे बंद केले. आता ३०-३५ वर्षांपासून सावदेकर, नवघरे व कंडारकर यांच्यातील हा अंतर्विवाही भेद नष्ट होत चालला आहे. थोरगव्हाण्यांशी मात्र अद्याप बेटी व्यवहार करीत नाहीत. पूर्वी संयुक्त खानदेशात रावेर व यावल तालुके नव्हते तर मुघल व मराठा काळात सावदे हे परगण्याचे (जिल्ह्याचे) ठिकाण होते. तद्वतच सध्याच्या जळगाव तालुक्याचे मुख्यालय नशिराबादला आणि भुसावळ तालुक्याचे मुख्यालय वरणगावला होते. त्या वेळी सावदे परगण्यावरून या भागातील लेवा पाटीदारांना सावदेकर अशी संज्ञा प्राप्त झाली होती. शं.वि. पाटील यांच्या मते सावद्याच्या आग्नेयेस सुमारे तीन-चार कि.मी.वर असलेल्या थोरगव्हाण नावाच्या लेवा पाटीदारांचे इ.स. १८४६ मध्ये पाण्याच्या क्षुल्लक कारणावरून भांडण झाल्याने

थोरगव्हाण लेवा पाटीदार सावदेकरांकडून फुटून निघाले व त्यांनी त्यांच्याशी बेटी व्यवहार तोडले.[८५] तथापि, काही जुन्या जाणकारांच्या मते हे कारण खरे नाही. त्यांच्या मते पूर्वी लेवा पाटीदार पूर्ण शाकाहारी होते व अभक्ष्य भक्षण करणाऱ्यांना तसेच अपेय (मद्यपान) प्राशन करणाऱ्यांना वाळीत टाकत. थोरगव्हाणे हे स्वतःस क्षत्रिय मराठे समजून मांसाहार करू लागल्याने ती अंतर्विवाही पोटशाखा निर्माण झाली. प्रस्तुत लेखकाच्या मते हेसुद्धा अर्धसत्य वाटते व याचा संबंध १८४६ च्या किरकोळ पाणीतंट्याऐवजी सर्व्हे सेटलमेंटला विरोध करण्यातून निर्माण झाली असावी. कारण, ब्रिटिश राज्य येण्यापूर्वी लेवा पाटीदारांमधील वतनदार (कुलिया) लोक शासन व शेतकऱ्यांमधील मध्यस्थांचे काम करून सारा गोळा करून शासकीय तिजोरीत भरत आणि बहुतांश प्रकरणांमध्ये ते कौशल्याने वागून सारा वसूल करीत. आर.ई. एन्थोवेननुसार - "Before the introduction of British rule, Kulia Patidars acted as farmers of revenue and as middlemen between Government and the husbandmen, and is most cases were found to have acted the most ingenious and crushing taxes. Though under the survey settlement, they have lost this uncontrolled power of exaction, they have still much influence and are admitted to have a higher social position than the common husbandmen."[८६] अशा प्रकारे सर्व्हे सेटलमेंटनुसार चालत आलेले अधिकार नष्ट होणार होते म्हणून सर्व्हे सेटलमेंटला विरोध करण्यासाठी बिटिशांविरुद्ध त्यांनी संघटितरीत्या बंड केले. सावदा, रावेर, यावल भागात ब्रिटिशांनी नवीन महसूल सर्वेक्षण अंमलबजावणी करण्याचे ठरविले व त्यात शेतकऱ्यांच्या परिसीमा खुणांनी निर्धारित करण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठे दगड व बैलगाड्या मोफत पुरविण्याबाबत १८४९ मध्ये महसूल आयुक्ताने निर्गमित केलेल्या आदेशाला स्थानिक शेतकऱ्यांनी (या भागात बहुसंख्येने असलेल्या लेवा पाटीदार तद्वतच त्यांच्याबरोबर गुजर, मराठे, कुणबी यांनी) तीव्र विरोध केला. आयुक्ताच्या आदेशानुसार सावदा, यावल, रावेर, चोपडा भागात महसूल सर्वेक्षणाच्या अंमलबजावणीचा प्रारंभ होताच शेतकऱ्यांनी १८५२ मध्ये संघटित निषेध केला. महसूल अधिकारी जे.एफ. डेव्हिडसन याचा मुक्काम यावलला तंबूत असताना दोन-तीन हजार शेतकऱ्यांनी तंबूला घेराव घातला. सरकारी आदेशानुसार परिसीमा आखण्यात व सर्वेक्षण करण्यासाठी सरकारला मजूर व साधनसामग्री पुरविण्यास त्यांनी नकार दिला. पुढच्या दिवशी जे.एफ. डेव्हिडसनवर मोठा जमाव चाल करून आला आणि त्यांनी सर्वेक्षण अधिकारी परत न गेल्यास त्यांचा तंबू पाडण्याची धमकी दिली. डेव्हिडसनने धुळ्याला कलेक्टर व धरणगावला भिल्ल पलटणीचा अधिकारी मेजर मॉरीस यास पलटणीसह पाचारण केले. कलेक्टर एल्फिन्स्टन याने पुणे घोडदळ व धरणगावचे प्रथम व द्वितीय दर्जाच्या सेनादलासह मुलकी अधिकारी हॅवलॉक व बोसवेल यांना यावलला पाठविले. मुलकी

अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण तहकूब करण्याचे आदेश दिल्यावर मोर्चा पांगला. त्यानंतर हॅवलॉक, मॉरीस व बोसवेल हे सर्वेक्षण चमूसह तापीपार गेले. काही दिवसांनंतर डेव्हिडसनने रणगाव (थोरगव्हाणजवळील तापीकाठचे शासकीय विश्रामगृह असलेले सुंदर गाव) येथे तंबू ठोकून असताना सिव्हिल इंजिनीयर मि. बेल व सर्वेक्षण अधिकारी मि. वॅडिंगटन आणि मि. बेकर या अधिकाऱ्यांची जमवाजमव केली. त्यामुळे सावदा-फैजपूरच्या शेतकऱ्यांनी संघटना उभी केली आणि त्यांच्या शिष्टमंडळाने सर्वेक्षण थांबविण्याचे मागितलेले लेखी आश्वासन डेव्हिडसनने न दिल्यामुळे सुमारे १५,००० आक्रमक शेतकऱ्यांनी ''हर हर'' आणि ''सर्वेक्षण नको'' अशा घोषणा करीत रणगावचा तंबू नष्ट केला. इंग्रज अधिकारी घोड्यावरून पळून गेले. मामलेदार व महालकरीही पळून गेले. त्या वेळी धरणगाव छावणीला मुक्कामी असलेला खानदेश कलेक्टर मॅन्सफिल्ड (एल्फिन्स्टननंतर आलेला) याने शासन आदेशाचे अनुपालन करण्यास्तव मालेगावचे सेनादल बोलावले व मे. मॉरीस यास भिल्ल फलटणीसह पाठविले. तथापि, सावदा-फैजपूरच्या शेतकऱ्यांचा असंतोष शमला नाही. त्यांनी मामलेदार व अधिकाऱ्यांचे आदेश धुडकावले, जमीन महसूल देण्यास नकार दिला व लोकपंचायत स्थापन करून समांतर शासन यंत्रणा संघटित केली व यंत्रणेची अवज्ञा करणाऱ्यांना शिक्षा ठोठावल्या.[८७] आंदोलन चिरडण्यासाठी कलेक्टर मॅन्सफिल्ड, कॅप्टन विंगेट व मेजर मॉरीस फैजपूरला दि. १६ डिसेंबर १८५२ ला मोठ्या पहाटे सेना घेऊन आले. फैजपूरच्या म्होरक्यांना मोठ्या पहाटेच पकडले, तसेच सावद्यास ५९ पुढाऱ्यांना पकडण्यात आले. त्यामुळे जनता गांगरली. शीघ्र कारवाईने जनआंदोलन बंद पडले. याच वेळी एरंडोलच्या शेतकऱ्यांनीसुद्धा बंड केले होते. तेथील धुमश्चक्रीही सेनादलाने चिरडून टाकली. मॅन्सफिल्डने सावद्याला दरबार भरवून शासकीय आदेशाच्या अनुपालनाची तजवीज केली.[८८] या भागात बहुसंख्येने लेवा पाटीदार शेतकरी आहेत व या भागातील सर्व जातींच्या उपरोक्त पंचायतप्रमुखांनी त्यात हिस्सा घेऊन समांतर शासन यंत्रणा स्थापन केली होती. लेवा पाटीदारांचा पंचायतप्रमुख मूळ थोरगव्हाणचा देशमुख यावलला स्थित होता. इ.स. १८८० च्या खानदेश गॅझेटिअरमध्ये जेम्स.एम. कॅम्बेल यांच्याबाबत म्हणतो[८९] " Truthful, orderly and frugal almost to nigardinessm they are the most hardworking industrious and simple-minded of the Khandesh agricultural population. Since the grate dispute which broke up their caste, they have been remarkable for apparent absence of jealousies and treacheries which distinguish the Gujar Kunbis." यामध्ये ब्रिटिशांनी जो लेवा पाटीदारांच्या फुटीमध्ये Great dispute चा शब्दप्रयोग केला आहे; तो वरील जनआंदोलनाशी संबंधित असणे खूपच संभवनीय आहे. म्हणजेच ब्रिटिशांच्या 'divide and rule' तत्त्वामुळे सावदेकर आणि थोरगव्हाणे हे अंतर्विवाही पोटभेद निर्माण झाले असावेत. कारण, तत्कालीन जातपंचायतींनी

ब्रिटिशांना जो मदत करेल त्यास बहिष्कृत केले जावे असे ठरावच केले होते आणि प्रस्तुत लेखकाच्या मते हेच कारण फुटीमधील असावे. त्यात ब्रिटिशांनी ज्यांना प्रलोभने दिलीत ते मुख्य प्रवाहापासून बाजूस केले गेलेत.

जामनेर तालुक्यात गाडेगावनामक गाव आहे. या गावाचे तसेच वरणगाव तालुक्यातील (भुसावळ तालुका) व सावदा तालुक्यातील (परगणा) काही गावाचे लोक १८५४ च्या सुमारास पंढरपूर यात्रेला गेले होते. गाडेगावच्या यात्रेकरूंबरोबर एक महिला यात्रेकरूही होती तसेच इतर समाजातील वारकरीही होते. आषाढी एकादशीनंतर शेतीची कामे असल्याने बहुसंख्य लेवा पाटीदार यात्रेकरू परत फिरले. आषाढी एकादशीनंतर येणाऱ्या व्यास तथा गुरुपौर्णिमेला चंद्रभागा स्नानाचे महत्त्व सांगितले जाते. गाडेगावची लेवा पाटीदार महिला यात्रेकरू व काही गावाचे लेवा पाटीदार यात्रेकरू या स्नानासाठी थांबल्याने व इतर समाजातील वारकऱ्यांबरोबर राहिल्याने वाद निर्माण झाला व त्यातून नवघरे (म्हणजे नऊ कुटुंबे) बाहेर काढली गेलीत आणि अशा प्रकारे बेटी व्यवहार तोडण्यात आला.[१०] अशा प्रकारे नवघरे हा अंतर्विवाही गट निर्माण झाला. गेल्या ३०-३५ वर्षांपासून नवघऱ्यांशी बेटी व्यवहार सुरू झाला आहे. अशाच काही किरकोळ कारणास्तव कंडारी येथील लेवा पाटीदारांशी बेटी व्यवहार तोडण्यात आले होते. त्यांना कंडारकर संबोधण्यात येई. कदाचित, भुसावळ भागात कंडारकरांनी गोल्ल स्थापन केला असावा. आमच्या मते १८६२ मध्ये जळगाव व १८६३ मध्ये भुसावळपर्यंत रेल्वे आली. १८६३ नंतर लगेच उत्तरेकडे व पूर्वेकडेही रेल्वे मार्ग टाकण्यात आले. भुसावळ हे रेल्वेचे मोठे केंद्र! येथे आजूबाजूच्या भागातून लोकांना रोजगार मिळाल्याने शेतमजूर रेल्वेकडे वळले. परिणामतः शेतीत शेतमजूर न मिळाल्याने शेती करणे कठीण झाले. त्यातूनच आपले नातेवाईक जवळ असावेत व शेती व्यवसायात उपयोगी पडावेत म्हणून भुसावळच्या कंडारी परिसरातील शेतकऱ्यांनी गोल करून या गोलमध्येच मुली देण्याचे वा गोलातीलच मुली स्वीकारण्याचे धोरण अवलंबिले असावे व त्यातूनच कंडारकर भेद निर्माण झाला असावा. रेल्वेत संपृक्तता (saturation) आल्यावर हा भेद आपोआपच गळून पडला. आता त्यांच्याशीही पुन्हा बेटी व्यवहार सुरू करण्यात आला आहे.

बदलत्या परिस्थितीत समाजोन्नती होण्यासाठी जुने बुरसटलेले विचार टाकून, पूर्वीचे सनातनी मतभेद विसरून लेवा पाटीदारांमधील थोरगव्हाण्यांनी एक होऊन लेवा पाटीदारांबरोबर बेटी व्यवहाराबाबतही चालणे ही काळाची गरज आहे. समाजसुधारकांनी त्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. हल्लीच्या राजकीय परिस्थितीत एखाद्या भागाचा विकास करून घ्यायचा असेल तर त्या भागातील समाज संघटित असणे आवश्यक असते. म्हणजे संघटित समाजाच्या मतदारांच्या सौदाशक्ती जोरावर (bargainijng power) त्या मतदारसंघाचा विकास घडवून आणता

येतो आणि याचसाठी सुमारे १५० वर्षांपूर्वी एकच असलेल्या सावदेकर लेवा पाटीदार व थोरगव्हाणे लेवा पाटीदार यांनी आपला अंतर्विवाहीपणा सोडून देऊन एक होणे ही काळाची गरज आहे. हल्ली शिक्षणप्रसाराबरोबर जातीपातीच्या भिंती कोसळत आहेत. शेतकरी मुलांना मुली मिळेनाशा झाल्या आहेत म्हणून नागपूर-भंडारा-चंद्रपूर भागातील मुली आणल्या जात आहेत. भ्रूणहत्येमुळे जळगाव जिल्ह्यातील महिलांचे दर हजारी प्रमाण बरेच खाली आले आहे, हेसुद्धा त्याला कारण असावे. शिवाय, नोकरदारांनाच मुली देण्याचा कल असल्याने शेतकरी मुलास मुली मिळेनाशा होत आहेत. म्हणून मागील पाच-सात वर्षांत पूर्वेकडील जिल्ह्यांमधून मुली आणल्या जातात. काही समाजधुरिणांच्या मते आतापर्यंत ४ ते ५ हजार मुली आणल्या गेल्या आहेत. या मुली कामसू व मेहनती असतात. काही १०-१५ प्रकरणे वगळता या भूमीशी, खानदेश मातीशी एकरूप झाल्या आहेत. हा त्यांचा गुण आहे. वेगळी संस्कृती, वेगळे संस्कार असूनही त्या या मातीशी एकरूप होत आहेत म्हणून त्यांना आपले म्हणा. गुजरातमधील लेवा व कडवा पाटीदार, माळव्यातील पाटीदार हे एकाच वांशिक गटातील असल्याने त्यांच्याशी बेटी व्यवहार सुरू करण्याचे समाजधुरिणांचे प्रयत्न आहेत. ते सफल होऊन प्रादेशिक भेदाच्या भिंतीही कोसळल्या तर फार चांगले होईल. त्याचप्रमाणे खानदेश संस्कृतीत वावरणाऱ्या अगदी मागाससुद्धा यांच्याशी बेटी व्यवहार सुरू झाल्यास खानदेश खऱ्या अर्थाने खाणदेश गणला जाईल. इतर समाजातून आपल्या समाजात आलेल्या मुलींना व त्यांच्या नातेवाइकांना व त्यांच्या समाजबांधवांना तसेच आपल्या समाजातून इतर समाजात गेलेल्या मुलींना व त्यांच्या नातेवाइकांना आदरपूर्वक सन्मान दिला जावा. आता तो तसा दिला जात असल्याचे जाणवते. यातून सरदार वल्लभभाई पटेलांची विचारधारा बाणवणारा हा क्षत्रिय लेवा पाटीदार समाज खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक असल्याचे जगास दिसून येत आहे. हल्ली आपल्या समाजातील काही मुलींनी मुस्लिम मुलांशी प्रेमविवाह केल्याची उदाहरणे आहेत. त्यांना सुरुवातीस विरोध होतो. पण पुढे त्यांचा सुखी संसार बघून व मनोमिलन झाल्यावर तो मावळतो. आंतरधर्मीय विवाह होणे ही गोष्ट जातीधर्माच्या भिंती कोसळविण्यासाठी चांगलीच आहे. असे असले तरी हिंदूंनी मुस्लिम मुली केल्याची उदाहरणे क्वचित आढळतात. याचीही कारणे शोधली पाहिजेत.

निष्कर्ष :-

१) पौराणिक कथांवर आधारित इतिहासाशी लेवा पाटीदारांचा संबंध जोडणे मोठे धाष्टर्याचे ठरेल.

२) लेवा पाटीदारांचे पूर्वज लवापासून वंशातील असो वा नसो ते 'गुर्जर टोळ्या'मधील

लोक होत.

३) गुर्जरांचे मूलस्थान पर्थिया (= पर्शिया) मधील गुर्जीस्तान (सध्याचे जॉर्जियामधील गुर्जानी (Gurjaani) हे होय.

४) पूर्वी ते रानटी टोळ्यांच्या स्वरूपात वावरत होते.

५) जरथ्रुष्टाच्या शिकवणीनुसार ज्या इराणामधील हिंदू रानटी टोळ्यांना चरवाह (Pastoral) बनविले; त्यात गुर्जर टोळ्यांचाही समावेश असावा. ते पुढे चरवाह स्वरूपात अर्धरानटी टोळ्या म्हणून वावरू लागले.

६) हिंदुस्थानात ते दुसऱ्या ते पाचव्या शतकापर्यंत हुणांबरोबर आलेत.

७) हिंदुस्थानात येण्यापूर्वी ते एकेश्वरवादी, सूर्योपासक, तद्वतच पंचमहाभुतांची पूजा करणारे असावेत. हिंदुस्थानात आल्यावर ते हिंदू झालेत.

८) गुजर, राजपूत, पाठारे प्रभू व लेवा पाटीदार यांचे पूर्वज गुर्जर हेच होत.

९) गुर्जरांमधील 'प्रतिहार'पासून पाटीदार झालेत.

१०) सहाव्या शतकाआधी प्रतिहार हे प्रथम प्रांताधिकारी किंवा मंत्री म्हणून कार्यभार सांभाळत.

११) हरिश्चंद्र या प्रतिहाराने सहाव्या शतकात प्रतिहारांचे राज्य स्थापन केले. नवव्या शतकाच्या पूर्वार्धात नागभट २ याने राजधानी अवंतीहून कनौजला हलविली. नवव्या शतकाच्या अखेरीस महापराक्रमी राजा भोज व त्यानंतर दहाव्या शतकाच्या पूर्वार्धात त्याचा पुत्र महिंद्रपाल यांच्या कारकिर्दीत प्रतिहारांचे साम्राज्य विंध्यापासून हिमाचलापर्यंत आणि पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत विस्तारले होते. या काळात गुर्जर हे सप्तसिंधू, पंजाब, गुर्जरत्ता (राजस्थान), गुजरात, माळवा या भागात विस्तारले. यातील राजस्थान, गुजरात व माळवा भागात पाटीदार मोठ्या संख्येने आहेत. गुजरातमधील पाटीदारांचे दोन प्रादेशिक भेद पडलेत. रेवा नदीच्या उत्तरेस असलेल्या चरोतर भागात रेवा पाटीदार व साबरमती नदीच्या पश्चिम भागात अहमदाबादच्या उत्तरेस विरमगाव ते मेहसाणा, पाटण भागात पूर्वी बडोदा संस्थानातील जो कडी परगणा होता त्यात कडवा पाटीदार, असे हे प्रादेशिक भेद होत. रेवा पाटीदारांची वस्ती चरोतर भागात अधिक आहे तर कडवा पाटीदारांची वस्ती विरमगाव-कडी-मेहसाणा भागात अधिक आहे. म्हणून लवाऐवजी रेवावरून रेवा पाटीदार आणि कुशाऐवजी कडीवरून कडवा पाटीदार झालेले आहेत. खानदेशातील लेवा पाटीदार रेवा चरोतरमधून आलेले पाटीदार आहेत.

१२) लवापासून लेवा पाटीदार व कुशापासून कडवा पाटीदार ही व्युत्पत्ती हे जरी खरे मानले तरी ही बाब म्हणजे केवळ भाटगिरीतील भंपकपणा असून गुजरात व गुजरातमधून स्थलांतरित खानदेश-नेमाड भागवगळता हिंदुस्थानात कोठेही

पाटीदारांचे व गुजरांचे लेवा व कडवा असे पोटभेद आढळत नाहीत. यावरून हे अगदी स्पष्ट आहे की, गुजरातमधील रेवा चरोतरमधील रेवे तथा लेवे आणि कडी भागातील कडवा असे हे निर्विवाद प्रादेशिक भेद आहेत. गुजरात-माळव्यातून जे लेवा पाटीदार खानदेश-वऱ्हाडात स्थलांतरित झालेत; त्यांच्या स्थलांतराची प्रमुख कारणे :

अ) अकराव्या शतकातील महमद गझनीच्या स्वाऱ्या, हिंदू देवळांची नासधूस व लुटालूट व हिंदूंची कत्तल.

ब) दिल्ली सुलतानांच्या अमदानीत अल्लाउद्दीन खलजीचे गुजरातवर आक्रमण, लुटालूट व हिंदूंची कत्तल.

क) पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजरात सुलतान अहमदशहा याची व नंतरच्या सुलतानांची जुलमी राजवट, हिंदूंचे सक्तीचे धर्मांतर, हिंदूंचा छळ. अहमदशहा व त्यांच्या नंतरच्या सुलतानांच्या काळात बरेच लेवा पाटीदार चांपानेर, पावागड भागात स्थलांतरित झाले होते.

ड) शेवटचे स्थलांतर पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात महमद बेगडा याने चांपानेर-पावागडवर स्वारी करून हिंदूंची कत्तल केली; त्या वेळी म्हणजे इ. स. १४८४ च्या सुमारास झाले.

१३) अहमदशहाच्या काळात काही लेवा पाटीदारांनी आपले जीव, धर्म व शील वाचविण्यासाठी कृष्णभक्त इमामशहा याचे अनुयायित्व पत्करून ते सत्पंथी झालेत. आमच्यातील काही सनातनी लेखक बांधवांनी सत्पंथी लोकांना धर्मबाह्य, वेदबाह्य संबोधणे म्हणजे त्यांना गुजरात सुलतानांचा व त्यांच्या क्रूरकर्मांच्या इतिहासाचे ज्ञान नाही, असे खेदाने म्हणावे लागेल.

१४) लेवा पाटीदार राजपिपला-सुरत-नंदुरबार-नांदेड असे न येता चांपानेर-पावागडहून नर्मदा खोऱ्यातून खरगोण-निमाड भागातून पूर्वेकडे सरकले व असिरखिंडीतून दक्षिणेकडे खानदेशात उतरले. खरगोण-निमाडातही पाटीदारांची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे.

१५) ते नर्मदा असलेल्या सोनगड किंवा हंडिआहून दक्षिणेकडे जाणाऱ्या व पूर्वी दक्षिणापथ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मार्गाने एदलाबादपर्यंत आले असावेत. एदलाबाद केंद्रस्थान मानल्यास सुमारे ६० कि.मी. पश्चिमेस गिरणा नदीच्या पूर्व काठापर्यंत पूर्वेकडे सुमारे ६० कि.मी. वरील नांदुऱ्यापर्यंत आणि आग्नेयेकडे सुमारे ६० कि.मी.वरील अजिंठ्याच्या पायथ्यापर्यंत म्हणजे रोहिनखेडपर्यंत विखुरले.

१६) खानदेशात फारुकी ही मुसनमानी राजवट असूनही फारुकी हे शांतताप्रिय असल्यामुळे या काळात व मुघल काळात ते येथे शांततेने राहू लागले.

१७) किरकोळ मतभेदांमुळे कंडारकर व नवघरे हे अंतर्विवाही गट निर्माण झाले.

१८) ब्रिटिशांच्या जमीन महसूल वाढविण्याच्या स्वार्थी हेतूमुळे सावदा परगण्याचे महसुली सर्वेक्षण (सर्व्हे सेटलमेंट) करण्याच्या वेळी ब्रिटिशांच्या 'divide and rule' या तत्त्वामुळे सावदेकर आणि थोरगव्हाणे हे अंतर्विवाही गट निर्माण झाले असावेत.

१९) **माझ्यावर टीका करणाऱ्या माझ्या सनातनी बांधवांनी प्रथम माझे पुस्तक पूर्ण वाचावे.** लेवा पाटीदार लवाचे वंशज मुळीच नाहीत, असे मी म्हटलेले नाही. तथापि, शब्दोत्पत्तीशास्त्रानुसार व प्रतिहारांचे राज्य दीर्घकाळ ज्या भागावर होते, या गोष्टीचा विचार केल्यास प्रतिहारांपासून पाटीदार शब्दाची उत्पत्ती झाली, या मताशी मी ठाम आहे. म्हणून सूर्यवंशाच्या इतिहासाशी (लवाच्या वंशजांच्या इतिहासाशी) प्रतिहारांच्या समृद्ध आणि गौरवशाली इतिहासाशी सांगड घालणे अधिक सयुक्तिक राहील. या प्रतिहारांचे पूर्वज जे पूर्वी पर्थियात होते ते लवाचे वंशज असू शकतात, असेही माझे एक मत आहे.

प्रकरण २ - तळटिपा

१. **महाराष्ट्र राज्य गॅझेटिअरः महाराष्ट्रः भूमी व लोक** (लेखकः त्रि. ना. कळुंजकर, संपा. डॉ. कि. का. चौधरी), १९९६, पृ. १०२, १०३ व १०४; डॉ. इरावती कर्वे, **मराठी लोकांची संस्कृती,** रा. ज. देशमुख, पुणे १९६२, पृ. १३३.

२. पं. महादेवशास्त्री जोशी (संपा.), **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ३२६.

३. श्री. शं. वि. पाटील, **लेवा पाटीदारांचा इतिहास,** पृ ३०.

४. म. म. वा. वि. मिराशी, ''महाजनपद'', **मराठी विश्वकोश,** खंड १२, १९८५, पृ. १३९२-९३ (**अंगुत्तरनिकाय** या बौद्ध ग्रंथानुसार).

५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ''मनू'', **मराठी विश्वकोश,** खंड १२, पृ. ११३४-३५.

६. वा. वि. मिराशी, ''पृथुवैन्य'', **मराठी विश्वकोश,** खंड ९, १९८०, पृ. १०४१-४२.

७. **हरिवंश,** चित्रशाळा प्रकाशन, पुणे.

८. भाट ज्या पृथूपर्यंत लेवा पाटीदारांचे मूळ नेतात, तो पृथू हाच असण्याची शक्यता अधिक आहे.

८अ. खुमाण ही उपाधी प्राचीन काळातील युवराजांना वापरली जात होती. अजूनही ही पदवी अस्तित्वात आहे. ही उपाधी बाप्पाच्या युवराजा (पुत्रा) पासून सुरू झाली. बाप्पा समुद्रापलीकडील (Transoxiana) देशावर राज्य करण्यासाठी गेला होता. तिकडेच त्याने राज्य केले व तो तिकडेच वारला. हा प्राचीन सिथीक खोमानीचा देश होता.

९. पंडित महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७.

१०. आर. ई. एन्थोवेन, **कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** खंड २, १९२२.

११. ब्र. भू. प. पू. मोरेदादा, ''प्रचलित असलेले पूर्वपरंपरेसह क्षात्रवंश'', **दिंडोरी प्रणीत श्री स्वामी**

समर्थ सेवा व आध्यात्मिक मार्ग विशेषांक, सन - १९९९, पृ. २४२.
१२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ''भारत'', **मराठी विश्वकोश,** खंड १२, पृ. १७८.
१३. शं. वि. पाटील, पूर्वोक्त, पृ. २.
१४. डॉ. रामसियासिंह, **कुर्मवंशी क्षत्रिय कीर्तिकथा,** समता प्रकाशन, सटना, पृ. ५४.
१५. पं. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड १०, पृ. ११४.
१६. डॉ. रामसियासिंह, पूर्वोक्त, पृ. ५४ व **इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम नेपाळ,** पृ. २९-३१.
१७. कित्ता. पृ. ६०.
१८. कित्ता पृ. ६१ आणि **गॅझेटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी: गुजरात पॉप्युलेशन,** व्हा. ९, पार्ट १ व २.
१९. विश्वास पाटील, ''लेवा पुराण: लेवा गुजर पाटीदार ज्ञातियांचा इतिहास,'' **संशोधक,** सप्टें. १९८४, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, पृ. १-१५.
२०. कित्ता, पृ. २.
२१. कित्ता, पृ. ४.
२१अ. **टाइम्स ऑफ इंडिया,** १६ जून २००६, पृ. १५.
२१ब. कित्ता.
२१क. कित्ता.
२१ड. कित्ता.
२२. इरावती कर्वे, **हिंदू समाज; एक अन्वयार्थ** (प्रकाशक-दि. धों. कर्वे, पुणे), मौज प्रकाशन, मुंबई, १९७५, पृ. १९-२०.
२३. **बुलडाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७६, पृ. २२७.
२४. म. श्री. माटे, ''इराणी कला,'' **मराठी विश्वकोश,** खंड २, १९५६, पृ. ५९०-९१.
२५. कित्ता, पृ. ५९५.
२६. कित्ता, पृ. ५९६.
२७. म. अ. मेहंदळे ''पारशी धर्म'', **मराठी विश्वकोश,** खंड ९, १९७६, पृ. ५८९.
२८. कित्ता, पृ. ५९२.
२९. विश्वास पाटील, पूर्वोक्त, पृ. १५.
३०. **जळगाव गॅझेटिअर,** १९९४, पृ. १८३.
३१. एम. एस. कोम्मिस्सरीएट, **ए हिस्टरी ऑफ गुजरात,** खंड १, लाँगमन ग्रीन अॅण्ड कं. लि., कलकत्ता, १९३८, पृ. xxxiii.
३२. कित्ता, पृ. xxxiv, xxxv.
३३. **हिस्टरी अॅण्ड कल्चर ऑफ दी इंडियन पीपल,** भारतीय विद्या भवन.
३४. आ. रे. डिसुझा, ''पंजाब राज्य'', **मराठी विश्वकोश,** खंड ८, १९८०, पृ. २२-२३ च्या आधारे पंजाबच्या इतिहासाचा आढावा घेतला आहे.
३५. पं. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ३४७-४८.
३६. श्री. व्यं. केतकर, **महाराष्ट्रीय ज्ञानकोश,** प्रस्तावना खंड, विभाग ४, **युद्धोत्तर जग,** प्रकाशक-श्री. व्यं. केतकर, महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ, सदाशिव पेठ, पुणे व नागपूर, १९२३, पृ. ५५४.
३७. कोम्मिस्सरीएट, पूर्वोक्त, पृ. xxxviii, xxxix.
३८. **एन्शंट हिस्टरी ऑफ सौराष्ट्र.**

३९. पं महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ५, पृ. ७०९.
४०. कित्ता, पृ. ७०९.
४१. वा. वि. मिराशी, ''प्रतिहार घराणे'', **मराठी विश्वकोश,** खंड १०, पृ. ३३३.
४१अ. शां. भा. देव, **महाराष्ट्र - गोवे शिलालेख - ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भसूची, १९८२, पृ. ३६-३८**
४२. मात्र मिराशींच्या मते दद्द आपला संबंध कर्णाशी जोडतात. कित्ता, पृ. ३३३.
४३. डॉ. वैजनाथ पुरी, **दि हिस्टरी ऑफ दी गुर्जर प्रतिहार्स,** प्रबंध, पृ. ३३ ते १०४.
४४. कित्ता, पृ. ३४ (**एपिग्राफिया इंडिका** व्हा. ९, पृ. २४८).
४५. कित्ता, पृ. ३७.
४६. कित्ता, पृ. ३९.
४७. कित्ता, पृ. ४३-४४.
४८. कित्ता, पृ. ५१ (**एपिग्राफिया इंडिका**, व्हा. ५), पृ. २१२, (L-15).
४९. कित्ता, पृ. ५१ (**एपिग्राफिया इंडिका,** व्हा. १), पृ. १५९ (L-2).
५०. कित्ता, पृ. ५१.
५१. कित्ता, पृ. ५०-६६.
५२. कित्ता.
५३. मिराशी, पूर्वोक्त, पृ. ३३४.
५४. रोमिला थापर, सु. र. देशपांडे, ''भारत'', **मराठी विश्वकोश,** खंड १२, पृ. १८१-८२.
५५. वुल्स्ली हेग, **केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया,** पूर्वोक्त, पृ. ३१०.
५६. अमृत व्ही. पंड्या, **न्यू डायनेस्टीज ऑफ मेडिव्हल गुजरात,** स्वस्तिक पब्लिकेशन्स, वल्लभ विद्यानगर, १९६९, पृ. २३, ३९ व ७६-७७.
५७. **जळगाव गॅझेटिअर,** १९९४, पृ. १८३.
५८. वुल्स्ली हेग, (लेखक व संपादक), **केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया,** पूर्वोक्त, पृ. ३१०.
५९. रु. र. शाह, ''चांपानेर'', **मराठी विश्वकोश,** खंड ५, १९७६, पृ. ७६५.
६०. एस. सी. मिश्रा, **दी राइज ऑफ मुस्लिम पॉवर इन गुजरात,** नवी दिल्ली, १९९३; कमल गोखले, ''अहमदशाह, गुजरातचा'', **मराठी विश्वकोश,** खंड १, पृ. ६८३.
६१. डी. एम. भनसाळी, **संयुक्त खानदेशाचा माहितगार,** जळगाव, १९५२.
६२. म. श्री. माटे, ''इराणी संस्कृती'', **मराठी विश्वकोश,** खंड २, पृ. ५९२.
६३. वा. वि. मिराशी, ''पल्लव वंश'', **मराठी विश्वकोश,** खंड ९, पृ. ३०५.
६४. ना. गो. कालेलकर, ''पेहलवी भाषा'', **मराठी विश्वकोश,** खंड ९, पृ. ११४२.
६५. प. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ७६६.
६६. कित्ता; वा. वि. मिराशी, ''राजपुतांचा इतिहास'', **मराठी विश्वकोश,** खंड १४, पृ. ७०६.
६७. एम. एस. कोम्मिस्सरीएट, **ए हिस्टरी ऑफ गुजरात,** व्हा. १, लाँगमन्स ग्रीन अॅण्ड कं. लि. १९३८, पृ. xxxvii, xxxviii.
६८. कित्ता, पृ. xxxix.
६९. पं. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ७६७ व पं. गौरीशंकर ओझा, **राजपुताने का इतिहास**
७०. चिं. वि. वैद्य, **मध्ययुगीन भारत.**

७१. पं. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ७६७-६८.
७२. **बुलडाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९७४, पृ. २२७ व **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. १८३.
७३. डॉ. इरावती कर्वे यांना अंतर्विवाही पोटभेद (Endogamous Groups) असे म्हणायचे असेल. असे पोटभेद एकमेकांमध्ये विवाह करीत नाहीत.
७४. डॉ. इरावती कर्वे, **हिंदू समाज : एक अन्वयार्थ,** १९७५, पृ. ५१. तथापि **जळगाव गॅझेटिअर** १९९४ ची मराठी आवृत्ती काढताना लोक प्रकरणाचे सहयोगकर्ता लेखक डॉ. न. ब. पाटील आणि त्यांच्याबरोबर प्रस्तुत ग्रंथाचे लेखक (नि. रा. पाटील) यांनी तपशीलवार सर्वेक्षण केले असता त्यांना पढ्यार गट आढळला नाही. बहुधा त्यांना पाटीदार म्हणायचे असेल.
७५. प्रस्तुत लेखकाच्या मते यात लेवा पाटीदारही समाविष्ट असावेत.
७६. **जळगाव गॅझेटिअर**, १९९४, पृ. १८७.
७७. कित्ता, पृ. १८७.
७८. कित्ता, पृ. १८७.
७९. पं. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ७६७.
८०. **खानदेश गॅझेटिअर,** १८८०, पृ. ६३.
८१. कित्ता, पृ. ६३-६४.
८२. पं. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ५, पृ. १०७.
८३. आर. ई. एन्थोवेन (मानववंशशास्त्रज्ञ) यांच्या **कास्टस अॅण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** १९२२ ग्रंथाच्या आधारे, पृ. १३४-१५७.
८४. **टाइम्स ऑफ इंडिया,** दि. १६ जून २००६ ची ''दी पटेल कम्युनिटी'' पुरवणी, पृ. १४.
८५. शं. वि. पाटील, पूर्वोक्त, पृ. २०४.
८६. आर. ई. एन्थोवेन, **कास्ट्स अॅण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** व्हा. २, पृ. १४०.
८७. **खानदेश गॅझेटिअर,** १८८०, पृ. २६१-६२, ४६९.
८८. अधिक माहितीस्तव कित्ता, पृ. २६१-६२ आणि **जळगाव गॅझेटिअर,** १९९४, पृ. १११-१२ आणि डॉ. कि. का. चौधरी यांचा जळगाव जिल्ह्याचा आधुनिक काळाचा इतिहास पाहावा.
८९. **खानदेश गॅझेटिअर,** १८८०, पृ. ६८.
९०. श्री जगन्नाथ हिरामण पाटील, माजी शिक्षक, लोक विद्यालय, पाडळसे यांच्या मुलाखतीवरून.

वरील मतास आधार नसून कपोलकल्पीत वाटल्याने लेखक त्यास सहमत नाही. हे मत सनातनी मनोवृत्तीतून आलेले दिसते.

प्रकरण ३

लेवा गणबोली व लेवा गणप्रदेश

खानदेश-वऱ्हाडाचे विशेषत: पूर्व जळगाव व पश्चिम बुलडाणा भागाचे लोभस आगळेपण जाणवते ते तेथील वऱ्हाडी-खानदेशी बोलीभाषेमुळे! खानदेश-वऱ्हाडातील मनमिळाऊपणा, मिलनसार, तडजोडी व सर्वसमावेशक वृत्ती येथील बोलीभाषेत सहज आढळते. या भागात बऱ्याच बोलीभाषा बोलल्या जात असल्या तरी खानदेशची प्रमुख वैशिष्ट्यांनी नटलेली व साऱ्या प्रदेशाला जोडणारी लोकभाषा जशी अहिराणी आहे, तशीच लेवा गणबोलीही आहे. या भाषांमध्ये मराठी, गुजराती, हिंदी व मुसलमानी भाषेतील शब्द वापरलेले दिसून येतात.[१] त्या भाषांच्या व्याकरण विशेषांचा परिणामदेखील लेवा बोली व अहिराणीवर आहे व त्यांचे स्वरूपच त्यांची समावेशक वृत्ती दर्शविते. मात्र, समावेशकता असूनही या बोलींचे स्वतंत्र असे अस्तित्व व व्यक्तिमत्त्व आहे. या भाषा व त्यांनी निर्माण केलेली अहिराणी संस्कृती पुरातन असल्याचा दावा संशोधक करतात.

लेवा पाटीदार जी भाषा बोलतात, ती अहिराणीही नाही आणि वऱ्हाडीही नाही, तर ती आहे अहिराणी आणि घाटोवी वऱ्हाडीचे मिश्रण! त्यामुळे लेवा पाटीदारांच्या बोलीभाषेचा आढावा घ्यायचाच झाला तर या दोन्ही भाषांचा आढावा घ्यावा लागेल. या भागातील लेवा पाटीदारांबरोबरच इतर बलुतेदार समाजही ही भाषा बोलतो.

अहिराणी[२] - आभीर हा अतिप्राचीन लोकसमूह असून भारतात आर्यपूर्व आभीरांची वस्ती होती. आर्यांच्या आगमनानंतरच आभीरांवर आर्यांची जीवनपद्धती

आणि आचारविचारांचा परिणाम झाला. काही संशोधक आभीरांना परकीय मानत असले तरी यदुनाथ सरकार, ज्ञानकोशकार केतकर आणि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यासारखे संशोधक त्यांना मूळ भारतीय मानतात. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांनी आभीरांना द्रविडवंशीय म्हटले आहे. प्राचीन ऐतिहासिक संदर्भ साहित्यात टॉलेमीने (इ. स. १५०) आभीरांना अबिरीय म्हटले आहे. **वायुपुराणात** त्यांना अभीर म्हटले आहे. यदुनाथ सरकारांच्या मते आभीर लोक मूळचे वायव्य प्रदेशातील हेरात आणि कंदाहार यांच्या दरम्यानच्या 'अबिरवन' येथून आलेले आहेत. टॉलेमी म्हणतो की, सिंधू नदीच्या पश्चिमेस वायव्य भारतात हे लोक राहतात. शक आक्रमकांनी भारतावर स्वाऱ्या केल्या; त्या वेळेला किंवा थोडे दिवस आधी आभीर भारतात आले आणि हिस्सार जिल्ह्यामध्ये त्यांनी आपली आद्य वसाहत स्थापन केली. तद्नंतरच्या काळामध्ये हे लोक उत्तर व पश्चिम भारत तसेच दक्षिणेकडील काही भागात वसाहती करून राहू लागले. इ.स.च्या तिसऱ्या शतकात आभीर लोक सध्याच्या खानदेशमध्ये येऊन स्थायिक झाले असावेत. अनहिलवाड येथील चालुक्य राजाने अवंती देश जिंकल्यावर रेवा नदी ओलांडून आभीरांचा प्रदेश जिंकून घेतला. त्यावरून त्याआधी खानदेशात आभीरांची राजवट असावी. चौदाव्या शतकातही आभीरांची तुकडी खानदेशात आल्याचे दिसते. खानदेशावर वाकाटक, बदामीचे चालुक्य, सैंद्रक, कलचुरी, राष्ट्रकूट व यादवांची सार्वभौम सत्ता असतानाही खानदेशचे प्रत्यक्ष अधिपती होते आभीर! आभीरपासून अहीर असा अपभ्रंश होऊन या लोकांना अहीर हे नाव प्राप्त झाले. व्यवसायांनुसार अहिरांमध्ये पोटजाती निर्माण झाल्या.

अहीर जनसमुहाची वाणी म्हणजेच अहिराणी! उगम काळापासून अलीकडील काळापर्यंत अहिराणी ही बोलीभाषेच्या स्वरूपात टिकून राहिली आहे. या बोलीभाषेत ग्रंथसंपदा नसल्याकारणाने तिचे स्वरूप कसेकसे बदलले, याबाबत निश्चित काही सांगता येत नाही. मात्र, महाराष्ट्रातील प्रमुख बोलीभाषांमध्ये अहिराणीचा समावेश आहे. अहीर लोक पशुपालन आणि ऋषीवर आधारित व्यवसाय करीत असल्याकारणाने ग्रामीण भागात ही बोली बऱ्याच प्रमाणात बोलली जाते.

अहिराणी बोलीभाषेत काळपरत्वे बदल होत जाऊन सांप्रत काळातील अहिराणीत अधिकाधिक मराठी शब्द आलेले दिसतात. इतिहासकार वि.का. राजवाडेंच्या मते शके १५० ते ४०० च्या काळात अहिराणीचा उगम झाला. डॉ. केतकर व चांदोरकर हेसुध्दा अहिराणीस मराठीपेक्षा वेगळी व प्राचीन मानतात. केतकरांनी **महाराष्ट्रीय ज्ञानकोशात** म्हटले आहे की, ''खानदेशी अथवा अहिराणी भाषा जरी गुजरातीसारखी किंवा मराठीसारखी भासते, तरी ती मागधी, सौराष्ट्री, शौरसेनी, महाराष्ट्री, पैशाची इ. प्राकृत भाषांपासूनच निघाली आहे.''

महानुभाव वाङ्मय व **ज्ञानेश्वरी**सारख्या ग्रंथांमध्ये बरेच अहिराणी शब्द

आढळतात. मात्र संस्कृत, प्राकृत व मराठीच्या प्रभावाने अहिराणीचे स्वरूप बदलत गेले. अहिराणीतील बहुसंख्य शब्दांचा संस्कृतमध्ये उगम झालेला आहे. मात्र, बऱ्याच शब्दांची व्युत्पत्ती कशी झाली, याबाबत निश्चित भाष्य करता येत नाही. कदाचित मूळ द्रविडीयन भाषांचा अहिराणीवर प्रभाव पडला असावा.

अहिराणीतील बरेच लोकसाहित्य मौखिक परंपरेने चालू राहिले आहे. अहिराणी लोकसाहित्यात पुष्कळ गाणी, म्हणी, उखाणे, कूटरचना, कथा, लोककथा, ओव्या व लग्नात म्हणायची गाणी यांचा समावेश आहे. **कानबाईच्या वह्या** हा तर खास अहिराणी अभिजात काव्याचा खजिना होय. अहिराणी ही भाषा मूळ अहिरांची असली तरी जळगाव जिल्ह्याचा पश्चिम भाग, धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील इतर समाजांनीही ती उचलली.

लेवा गणबोली

खानदेशी-वऱ्हाडी बोलीस म्हणजेच लेवा गणबोलीस बहिणाबाई चौधरी यांनी मराठी साहित्यात वरचे स्थान प्राप्त करून दिले आहे. लाक्षणिक अर्थाने संख्यात्मकदृष्ट्या हे साहित्य नगण्य असले तरीही महाराष्ट्राला त्याने मोठे ज्ञानपीठ उपलब्ध करून दिले आहे. लेवा समाजातील पद्मश्री डॉ. वि.भि. कोलते, डॉ. के. नारखेडे, प्रा. भानू चौधरी, प्रा. श.रा. राणे, पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे, डॉ. तो.ना. चोपडे व डॉ. नि.रा. पाटील यांसारख्या विद्याविभूषितांनीसुद्धा या मायबोलीस वरचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे आणि म्हणूनच शहरवासी खानदेशी बांधवांनी ही बोली आपापसांत बोलण्यासाठी कोणताही न्यूनगंड मनात बाळगू नये. कोकणी अथवा दाक्षिणात्य आपापसांत भेटल्यास कोकणी अथवा दक्षिणी भाषाच बोलतात. त्यांना न्यूनगंड वाटत नाही. मग, आपल्या मायबोलीबाबत आपणास न्यूनगंड का वाटावा? आपण खेड्यांमध्ये लहानपणी हीच मायबोली बोललो. आपल्या साऱ्या बाललीला या मायबोलीच्या माध्यमातून साकारल्या. मग, शिकून मोठे झाल्यावर तिची प्रतारणा का करावी?

तसे पाहिले तर ही बोलीही मराठीप्रमाणेच समृद्ध आहे; म्हणजे तिच्यातील शब्दांचे अर्थही मराठीतील शब्दांप्रमाणेच समृद्ध आहेत. मराठी ही संस्कृतोद्‌भवित भाषा आहे. लेवा गणबोली (वऱ्हाडी-खानदेशी) ही मराठीपासून उद्‌भवलेली बोली आहे. या बोलीतील बहुतांश शब्द हे मराठीतून आलेले आहेत. केवळ उच्चारविशेषामुळे ते वेगळे वाटतात. मराठी बोली आणि लेवा गणबोलीतील उच्चारभिन्नतेचे कारण म्हणजे आस्थलांतरी किंवा आप्रवासी (Immigrants) लेवा पाटीदार समाजाने या प्रदेशात आल्यावर आपल्या अंगभूत परिवर्तनशील गुणांमुळे येथील भाषेशी समरस होणे पसंत केले व आपली मूळ बोलीभाषा सोडून दिली. आपल्या परिवर्तनशीलतेमुळे या भागात आल्यावर वारकऱ्यांनी व महानुभावांनी समृद्ध केलेली मराठी बोली त्याने

आपली मानली व स्वीकृत केली. असे असले तरी पूर्वीची संस्कृती, संस्कार व बोली पूर्णतः कधीच सुटत नाहीत. लेवा पाटीदारांचेही असेच झाले. गुजरातीतून अहिराणीत आलेले प्रत्यय, काही शब्द व उच्चारविशेष यांच्या बोलीतही आलेत. असिरखिंडीमार्गे बऱ्हाणपूर भागातून आल्यामुळे त्या भागातील मराठी भाषिकांचा मेळघाटी-घाटोळी-वऱ्हाडीचा प्रभाव त्यांच्या बोलीभाषेवर पडला, असे म्हणण्यापेक्षा त्यांची घाटोळी-वऱ्हाडी हीच बोली या समाजाने मायबोली म्हणून स्वीकृत केली व खानदेशात आल्यावर खानदेशी-अहिराणीचा प्रभाव तिच्यावर पडला, असे म्हणणे योग्य ठरेल. बऱ्हाणपूर भागातील फारुकी व मुस्लिमांच्या सहवासाने उर्दू शब्दही या बोलीत शिरलेत.

हा उद्योगी व उद्योगप्रिय समाज खानदेश-वऱ्हाडात आल्यावर कृषिकर्मात आघाडीवर राहिला. त्यामुळे या भागातील त्यांच्यावर अवलंबून राहणाऱ्या व दैनंदिन संबंध येणाऱ्या अलुतेदार-बलुतेदारांच्या समाजांनीही लेवा गणबोली स्वतःची बोलीभाषा म्हणून स्वीकृत केली. त्यांना रोजच्या व्यवहारासाठी ती स्वीकृत करावी लागली. एवढेच नव्हे तर लेवा गणप्रदेशात म्हणजे आताच्या जळगाव, भुसावळ, यावल, रावेर, बोदवड, मुक्ताईनगर, मलकापूर, नांदुरा व मोताळा या तालुक्यांमध्ये लेवा पाटीदारांची संख्या अधिक असल्यामुळे त्यांच्या सहवासात असणाऱ्या मराठा व कुणबी समाजांनीही ही बोलीभाषा स्वीकृत केली.

लेवा पाटीदार समाज गुजरातमधून स्थलांतरित समाज आहे, हे सर्वमान्य झाले आहे. स्थलांतरण प्रक्रियेत स्थलांतरित समाज आपली पूर्वीची संस्कृती, भाषा, चालीरीती एकदम सोडून देत नाही. आपली भाषाही तो बरोबर घेऊन जातो. लेवा पाटीदार समाज जर गुजरातमधून स्थलांतरित समाज आहे तर त्याची मातृभाषा गुजराती का नाही, याचे उत्तरही असे की, गुजरातची भाषा, संस्कृती व व्यक्तिमत्त्व आपले वेगळे अस्तित्व दाखवू लागली ती सिद्धराज जयसिंह व त्यानंतरच्या कुमारपाल या चौलुक्यवंशी सोळंकींच्या काळात म्हणजे तेराव्या शतकात आणि खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार तर महमद गझनीच्या क्रूर आक्रमणापासूनच दहशतीमुळे अकराव्या शतकातच गुजरातमधून स्थलांतरणाला लागला होता. आतापर्यंतचा समज असा होता की, लेवा पाटीदार सुरत-नंदुरबारमार्गे खानदेशात आले; परंतु ते सुरत-नंदुरबारमार्गे खानदेशात आले असते तर त्यांची भाषा अहिराणी राहिली असती. परंतु यांची भाषा अहिराणी मुळीच नाही. ती आहे घाटोळी-वऱ्हाडी मराठीवर अहिराणीचा प्रभाव असलेली स्वतंत्र लेवा गणबोली भाषा! अनेक भाषाशास्त्रज्ञ मराठी व मराठौद्भवित भाषांची उत्तर सीमा नर्मदा नदी मानतात, हे पुढे आलेलेच आहे.

लेवा पाटीदार समाज हा अकराव्या ते पंधराव्या शतकांच्या दरम्यान खानदेश-वऱ्हाडात स्थलांतरित झाला. बहुतांश लेवा समाज खेडा, भडोच भागातून आला

आहे. त्याचे सर्वात शेवटचे स्थलांतर पंधराव्या शतकाच्या अखेरीस म्हणजे क्रूरकर्मा महमद बेगडा या गुजरात सुलतानाने १४८४ मध्ये चांपानेर-पावागडवर आक्रमण करून हिंदूंची जी प्रचंड प्रमाणावर कत्तल केली; त्या वेळेस झाले आहे. त्याआधीही मोठ्या संख्येने हा समाज खानदेशात आला होता. येतांना हा समाज असिरखिंडीमार्गे बऱ्हाणपूर भागातून आला आहे. लेवा पाटीदारांच्या काही वर्षे आधी गुजर समाज या भागात स्थलांतरित झाला आहे. बऱ्हाणपूर भागात हा समाज काही वर्षे राहिला असावा. त्यामुळेच तेथील मेळघाटी-घाटोळी वऱ्हाडी भाषा त्याने स्वीकृत केली असावी. पूर्वी या भागात घाटोळी-वऱ्हाडी बोलणाऱ्यांचे प्रमाण मोठे होते. अजूनही काही लोक घरात ती भाषा बोलतात. परंतु, रोजचे व शासकीय व्यवहार हिंदीत असल्यामुळे हिंदीचे प्रमाण वाढले आहे. काही भाषातज्ज्ञांच्या मते नर्मदा नदी गुजराती व निमाडी किंवा नेमाडी या भाषांपासून मराठीला विभिन्न करणारी रेषा होय. हीच सीमारेषा पुढे नर्मदेला पूर्वेस व पश्चिमेस स्पर्श करून असलेल्या सातपुडा पर्वताच्या वाटेने गेली आहे. गाविलगडाच्या आसपास ज्या ठिकाणी सातपुड्याच्या एका दुसऱ्या फाट्यास सुरुवात होते; तेथे ही सीमारेषा पूर्वेकडे बेतूल व शिवणीकडे जाण्यास प्रारंभ करून नागपूर व शिवणी यामधील घाटात संपते.[४] डॉ. जॉन विल्सन यांनी मोल्सवर्थच्या कोशात जोडलेल्या **प्रासंगिक निबंधात** (१८५७) (Incidental Compostion), **मुंबई इलाख्याच्या कारभाराचा अहवाल** (१८७२-७३) (Administrative Report of Bombay Presidency) व **इंडियन अँटिक्वरी** (१८७४) (Indian Antiquery) मध्ये नर्मदा ही मराठीची उत्तर सीमा दर्शविली आहे[५] आणि म्हणूनच येथील घाटोळी-वऱ्हाडी ही लेवा पाटीदारांची भाषा बनली. खानदेशात आल्यावर खानदेशी-अहिराणी भाषेचा प्रभाव तिच्यावर मोठ्या प्रमाणावर पडला व अहिराणीने प्रभावित घाटोळी-वऱ्हाडी ही या समाजाची गण बोलीभाषा निर्माण झाली.

वऱ्हाडीचे प्रामुख्याने डोंगरी भागातील घाटोळी-वऱ्हाडी व सपाट वऱ्हाड प्रदेशातील वऱ्हाडी असे प्रमुख दोन प्रांतिक भेद आहेत. त्याशिवाय नागपुरी, बालाघाटी, चांदा (चंद्रपुरी), इत्यादी देशनिष्ठ व झारपी, धनगरी, कतिया, कणबी, कुंभारी, महारी, गोवारी हे जातींवरून पडलेले उपभेद आहेत. त्याशिवाय केवटी, हलबी हेसुद्धा उपभेद आहेतच. खानदेश-वऱ्हाडात राहणाऱ्या लेवा पाटीदारांच्या बोलीभाषेवर घाटोळी-वऱ्हाडी आणि खानदेशी-अहिराणी या बोलीभाषांचा मोठा प्रभाव पडला आहे, हे वर नमूद केले आहेच. यापेक्षा या दोन्ही बोलीभाषांच्या संयुक्त मिश्रणातून वऱ्हाडी-खानदेशी वा लेवा गणबोली निर्माण झाली, असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. असे असले तरी या बोलीभाषेत दक्षिण बालाघाट जिल्ह्यातील काही मऱ्हेटी बोलीतील शब्द आलेले आहेत, तर काही शब्द वऱ्हाडी महारी,

झारपी (एलिचपुरी), गोवारी व वऱ्हाडी, कोष्टी भाषांमधूनही आलेले दिसतात. एवढेच नाही; तर उच्चारविशेषही या बोलींमधून आलेले दिसतात. आश्चर्याची गोष्ट ही की, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस राजापुरी व माणगावी कुणबाऊ बोलीभाषांमधील काही शब्दही या बोलीत रुढ झालेले दिसतात. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात खानदेशात पडलेल्या भीषण दुष्काळामुळे या भागातील लोक अन्यत्र स्थलांतरित झालेत. या ओस पडलेल्या सुपीक जमिनीच्या जामनेर-पाचोरा भागात ब्रिटिशांनी कोकणातील माणगाव-राजापूर भागातील कुणब्यांना प्रलोभने दाखवून स्थलांतरणास प्रवृत्त केले. त्यांच्या सहवासाने काही राजापुरी व माणगावी कुणबाऊ बोलीभाषांमधील शब्दही या बोलीत आलेत. यावरून या बोलीभाषेची सर्वसमावेशकता दिसून येते.

गणबोली व्याख्या -

ही बोली गणबोली किंवा जातीभाषा कशी ठरते, हे पाहणे आवश्यक आहे. दाते-कर्वेंनी गणबोली अथवा जातीभाषेसंबंधी पुढील व्याख्या दिली आहे. - ''ज्याप्रमाणे भौगोलिकदृष्ट्या पृथक अशा निरनिराळ्या भागात एकाच भाषेचे निरनिराळे प्रकार दृष्टीस पडतात; त्याचप्रमाणे निरनिराळे व्यवसाय अथवा धंदे करणाऱ्या लोकांमध्ये ज्या बोली रूढ असतात, त्यातही आपणास थोडाफार फरक असलेल्या बोली बारीक निरीक्षण केल्यास आढळून येतात. विशेषत: भरतखंडामध्ये अनेक धंदे आनुवंशिक पद्धतीने काही विशिष्ट संघांमध्ये चालू असण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून पडली असून या वहिवाटीमुळे काही धंद्यांवरून स्वतंत्र जातीही अस्तित्वात आल्या आहेत. अशा जाती अथवा गण जरी सामान्यत: मराठीच बोलत असले तरी त्यांच्या राहणी व सवयी यावरून काही शब्दांचे उच्चार करण्याची विशेष लकब त्यांच्यामध्ये उद्‌भूत होते. तसेच त्यांच्या व्यवसायासंबंधी अनेक शब्द त्यांच्यामध्ये तयार होतात. त्यापैकी काही शब्द इतके वैशिष्ट्यपूर्ण असतात की, ते त्यांच्या व्यवसायाशी संबद्ध असणाऱ्या लोकांसच परिचित असतात. अशा तऱ्हेचे अनेक शब्द निरनिराळ्या जातींत रूढ असून अत्यंत अन्वर्थकही असतात; परंतु त्यांचा वाङ्मयामध्ये क्वचितच समावेश होतो. कारण, वाङ्मयीन भाषा ही शिष्ट व सुशिक्षित लोकांचीच भाषा सामान्यत: असून तिला शिक्षणामुळे एक प्रकारचे ठरीव व एकसूत्री वळण येते व लेखकवर्गही सामान्यत: नागर राहणीशी विशेष परिचित असल्यामुळे व सामान्य जनतेशी त्या मानाने कमी परिचित असल्यामुळे यांच्या लेखनात या अनागर गणभाषेचा क्वचितच संबंध येतो व यामुळे या बोलीतील शब्द किंवा विशेष लकबी फक्त या जातींपुरत्या रूढ होऊन त्यांना सार्वत्रिक स्वरूप न येता विशिष्ट समाजनिबद्धता येते.''

या गणबोलींच्या यादीत दाते-कर्वेंनी कोळी, किरिस्ताव, कुणबाऊ, वऱ्हाडी-कुणबाऊ, परमी, आगरी, धनगरी, भंडारी, ठाकरी, दालदी, कातकरी किंवा काथोडी,

वारली, वाडवल, फुडगी, सामवेदी, महारी, वऱ्हाडी महारी, झारपी, गोवारी, कोष्टी, कुंभारी, नटकानी, कातिया, मुंजिया, नाहरी, कमारी, कारू इत्यादी बोलीभाषांचा समावेश केला आहे आणि हाच निकष लेवा पाटीदार बोलत असलेल्या वऱ्हाडी-खानदेशी या बोलीस थोड्याफार फरकाने लागू होतो. मात्र, लेवा पाटीदारांसाठी अशा व्यवसाय आनुवंशिक पद्धतीचा अपवाद आहे आणि अपवाद न मानला तरीही त्याची कृषिव्यवसाय पद्धती हीच आनुवंशिक पद्धती मानता येईल आणि तरीसुद्धा हे लोक बोलत असलेली वऱ्हाडी-खानदेशी भाषा ही गणभाषा ठरते.

दाते-कर्वेंनी गणभाषेसंबंधी वरील व्याख्या केली असली तरी खानदेशातील जळगाव, भुसावळ, बोदवड, यावल, रावेर, मुक्ताईनगर आणि बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर, मोताळा आणि नांदुरा तालुक्यांमध्ये वसाहत (Colonization) करून असलेल्या लेवा पाटीदार बोलत असलेल्या भाषेची म्हणजेच वऱ्हाडी-खानदेशी बोलीभाषेची दखल घेतलेली नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे सर्वसामान्य मराठी साहित्यिक ही भाषा खानदेशी-अहिराणी अशी मानत असून स्टेन क्रोनौ याने लिहिलेल्या व डॉ. ग्रिअरसन यांनी संपादिलेल्या **लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया** या ग्रंथात खानदेशीला मराठीची पोटभाषा न मानता गुजरातीची पोटभाषा म्हणून गणली आहे.[६] ग्रिअरसन यांनी या भाषेच्या (खानदेशी अहिराणीचे) क्षेत्राची व्याप्ती साधारणपणे पूर्व व पश्चिम खानदेश जिल्हे, दक्षिणेकडे नाशिक जिल्ह्याच्या उत्तर हद्दीपर्यंत व उत्तरेकडे बऱ्हाणपूरपर्यंत आणि खानदेशाच्या बाहेर नाशिक, नेमाड व बुलडाण्यापर्यंत दाखविली आहे. या भागात अहिरांची मोठ्या प्रमाणावर वसाहत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. तथापि, येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, नाशिक, धुळे हे दोन्ही जिल्हे व जळगाव जिल्ह्याचा पश्चिम भाग यात अहिरांची वसाहत असली तरी जळगाव, भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, बोदवड, मलकापूर, मोताळा व नांदुरा या तालुक्यांमध्ये अहिरांची वस्ती नगण्य असून मुख्य वसाहतीकरण (Colonization) लेवा पाटीदारांचे झालेले आहे व त्याखालोखाल गुजर, कोळी, मराठा, कुणबी, माळी, नवबौद्ध, भिल्ल, पावरा, वाणी, ब्राह्मण, राजपूत, तेली, वंजारी आदी जाती-जमातींची वस्ती आहे. त्यामुळे उपरोक्त आठ-नऊ तालुक्यांच्या भागाची अहिराणी ही बोलीभाषा नसून अहिराणीमिश्रित वऱ्हाडी म्हणजेच वऱ्हाडी-खानदेशी ही बोलीभाषा आहे आणि हीच बोलीभाषा प्रामुख्याने लेवा पाटीदारांची असल्यामुळे ती या भागाची गणबोली ठरते. आस्थलांतरणानंतर खानदेशी-वऱ्हाडी संस्कृतीत पूर्णपणे समरस झालेल्या लेवा पाटीदारांच्या या गणबोलीचा या भागात एवढा प्रभाव आहे की, अलुतेदार-बलुतेदारांनीही ती आपली बोली म्हणून स्वीकृत केलीच; तथापि आपापल्यात शुद्ध मराठी बोलणाऱ्या वाणी-ब्राह्मणांना तसेच अहिराणी बोलणाऱ्या गुजर, मराठा व अहिरांनाही आपल्या दैनंदिन व्यवहारांसाठी

घराबाहेर ही गणबोलीच बोलावी लागते. गुजरांची स्वतःची अहिराणी समान गुजरी भाषा असून ती वऱ्हाडी-खानदेशी अथवा खानदेशी-अहिराणीपेक्षा जरा वेगळीच आहे. आचार्य प्र. के. अत्र्यांनी 'बहिणाईची गाणी' या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत या बोलीभाषेला प्रथमच 'खानदेशी वऱ्हाडी' असे संबोधल्यानंतर प्रमाणभाषेतील बरेच साहित्यिक हिला खानदेशी-वऱ्हाडी असे मानू लागले. परंतु, आचार्य अत्रेंनी यात खानदेशी असे म्हटल्यामुळे अजूनही बरेच प्रथितयश साहित्यिक या बोलीभाषेस अहिराणीच संबोधतात. हे सर्वथा चूक आहे. या बोलीभाषेस खानदेशी वऱ्हाडी म्हणणे हे सुद्धा एक अर्धसत्यच आहे. तिला खानदेशी वऱ्हाडी म्हणणे म्हणजे ज्या समाजाने आपल्या स्थलांतरण प्रक्रियेत ही भाषा खानदेशात आणली; त्या समाजाचा स्थलांतरण इतिहास आणि तिची गणबोली ठरण्याची कारणे नाकारण्यासारखे आहे. म्हणून येथे मुद्दाम नमूद करण्यासारखी गोष्ट ही की, या बोलीभाषेस जरी जातीवाचक नाव असले तरी कृपया कुणीही या भाषेला जातीवाचक-संकुचित दृष्टिकोनातून बघू नये. लेवा पाटीदारांनी आणलेली, रुजविलेली व वाढविलेली बोलीभाषा एवढाच काय तो या जातीशी संबंध पोहोचतो. माझ्या मते महाराष्ट्रात मराठी बोलणारा तो मराठी किंवा मराठा असे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जाते; त्याचप्रमाणे लेवा गणबोली बोलणारा तो लेवा अशा व्यापक अर्थाने या भाषेकडे संपूर्ण साहित्यजगताने बघावयास हवे. सुमारे आठ-नऊ हजार चौरस कि.मी. एवढ्या मोठ्या खानदेश-वऱ्हाड भागातील, सर्व जातीधर्माच्या सुमारे १५ लाखांपेक्षा अधिक लोकांना सांस्कृतिकदृष्ट्या एकत्रित सांधून ठेवण्याचे महान कार्य ही बोलीभाषा करीत असल्याने कुणीही तिच्याकडे जातीवाचक द्वेषमूलक भावनेने पाहू नये. तद्वतच या भागातील लोकांनीही तिच्याबाबत न्यूनगंड बाळगू नये. या बोलीभाषेची अस्मिता जपणे, ही प्रत्येक लेवा गणबोली बोलणाऱ्याची जबाबदारी आहे.

बहिणाबाईची गाणी प्रकाशित झाल्यापासून पुणे-मुंबईचे साहित्यिकही मानू लागले आहेत की, ही वऱ्हाडी-खानदेशी (लेवा-गणबोली) बोली अहिराणीपेक्षा वेगळी असून या दोन्ही बोलींमध्ये अनेक दृष्टींनी फरक आहे. लेवा गणबोलीचे साम्य अहिराणीपेक्षा वऱ्हाडीशी जास्त आहे. तिचे मूळ शब्द मराठी भाषेतीलच, व्याकरणही मराठी भाषेचेच, परंतु लोकगंगेत पडलेले हे शब्द उच्चारासाठी अधिक सोपे, सुटसुटीत व त्यामुळे मृदू मुलायम झालेले दिसतात. त्यामुळेच ही गणबोली मोठी मुलायम, कर्णमधुर व लडिवाळ आहे. बहिणाबाईचे काव्यालंकार या लोकभाषेमुळे अधिकच उठावदार, रसाळ व प्रभावी वाटतात. अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठीपासूनच हिची व्युत्पत्ती झालेली असल्याने तर म्हणावेसे वाटते, 'भाषांसु मधुरा दिव्या वैदर्भी-कण्हदेशीम्.'

पर्शियाच्या गुर्जिस्तान अथवा गुर्जानी या भागातून हिंदुस्थानात येण्यापूर्वी

यांच्या पूर्वजांची (गुर्जर टोळ्यांची) भाषा संस्कृतसदृश अवेस्ती ही होती. हिंदुस्थानात आल्यावर इकडील भाषांचा प्रभाव त्यांच्या बोलीभाषेवर पडला. सप्तसिंधू प्रदेशात मालवगणांची पंजाबीसदृश असलेली भाषा, राजस्थान, मारवाड व गुर्जरत्ता भागात राजस्थानी व मारवाडी, गुजरातमध्ये गुजराती व तत्सम, माळव्यात मालवा, निमाड-बऱ्हाणपुरात निमाडी, घाटोळी-वऱ्हाडी व खानदेशात अहिराणीमिश्रित घाटोळी-वऱ्हाडी अशा भाषा प्रवासामुळे लेवा पाटीदारांची आजची गणबोली (वऱ्हाडी-खानदेशी) ही स्वतंत्र रूप धारण करती झाली आहे. उपरोक्त आठ-नऊ तालुक्यांमध्ये बोलली जाणारी ही बोलीभाषा एकूण लोकसंख्येच्या तुलनेत नगण्य असल्याने ग्रिअरसनला या भाषेची दखल घेणे शक्य झाले नसेल आणि या भागातील साहित्यिकांबाबत व साहित्याबाबत एकूणच उदासीन वृत्तीमुळे ही बोली पूर्वी प्रकाशझोतात आली नाही.

एकोणिसाव्या शतकातील महान भाषा वैज्ञानिक रेस्क यांच्या मते ग्रंथ नसले तरी एखादी जात किंवा प्रदेश यांचा इतिहास केवळ त्यांच्या भाषेवरून समजू शकतो. कालचक्राच्या फेऱ्यात धर्म व कला मोठ्या प्रमाणात बदलतात; पण त्या मानाने भाषा स्थिर असते. त्याच शतकातील भाषावैज्ञानिक ग्रिम याने प्रतिपादले आहे की, छोट्याछोट्या भाषाही ज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. लेवा गणबोलीतील गुजराती प्रत्यय व शब्द यांमुळे लेवा पाटीदारांचा इतिहास कळू शकतो आणि ज्ञानाबाबत म्हणाल तर बहिणाबाईने आपल्या लोकसाहित्याने (folklore) या गणबोलीतील उच्च प्रतीची ज्ञानपीठ परंपरा साऱ्या जगाला दाखवून दिली आहे. के. नारखेडे, भानुसर, श. रा. राणे, भालचंद्र नेमाडे, नि. रा. पाटील, बी. एल. चौधरी आणि कवयित्री डॉ. प्रमिला भिरूड व तो. ना. चोपडे यांसारख्या साहित्यिकांनी या गणबोलीस मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. हंबोल्ट या जर्मन भाषापंडिताच्या मते भाषा प्रवाहरूप असून तिचे लक्षण पूर्ववर्ती आणि परवर्ती अवस्थांच्या संबंधातच देता येते. प्रत्येक भाषेला एक स्वतंत्र व्यक्तित्व असते. भाषेतून ती बोलणाऱ्या जातीचे मनोभाव प्रकट होतात. नेमके हेच लेवा पाटीदार समाज व तो बोलत असलेल्या लेवा गणबोलीबाबत सांगता येईल. भारतात भाषाविज्ञानाचा पाया ग्रिअरसन याने घातला.

मराठी ही इंडो-युरोपियनच्या भारतीय आर्य शाखेची सर्वात दक्षिणेकडची भाषा मानली जाते. ग्रिअरसनच्या मते खानदेशात बोलली जाणारी भाषा गुजरातीमिश्रित मराठीची आंतरभाषा आहे. मराठीच्या पोटभाषांचा पद्धतशीर अभ्यास झालेला नाही. ग्रिअरसनने वेगवेगळ्या भागातील नमुने गोळा करून दिल्यामुळे पोटभाषांचे पुसट चित्र आपणास मिळते. पण, संबध प्रदेशाचा अभ्यास झाल्याशिवाय हे चित्र स्पष्ट होणार नाही.

भाषा ही अधिक व्यापक स्वरूपाची संज्ञा असून पोटभाषा या संज्ञेने एखाद्या

बोलीचे सूचन होते. लेवा गणबोली ही मराठीपासून उद्‌भवित भाषा असल्याने ती मराठीची पोटभाषा ठरते. हिच्यात जरी काही गुजराती प्रत्यय असले तरी मराठीतील वऱ्हाडी भाषेचा पगडा तिच्यावर मोठा आहे. पोटभाषेचा लेखनासाठी वापर होत नाही. त्यामुळे तिला मुख्य भाषेचा दर्जा मिळत नाही.

भाषाशास्त्रज्ञ ना. गो. कालेलकरांच्या मते पोटभाषा निर्माण होण्याची कारणे तीन असतात. १) एका विस्तीर्ण प्रदेशात बोलली जाणारी व बऱ्याच प्रमाणात एकरूप असणारी बोली कालांतराने त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागात कमीअधिक प्रमाणात बदलते. अशा स्वाभाविक परिवर्तनाने होणाऱ्या भाषेच्या वेगवेगळ्या रूपांना प्रादेशिक बोली किंवा पोटभाषा म्हणता येईल. या पोटभाषा एकमेकींपासून बऱ्याच दूर गेल्या किंवा त्यांच्यातले भेद विशेष तीव्र झाले, तर या पोटभाषांपासून संबंधित परंतु परस्पर भिन्न भाषा निर्माण होण्याची शक्यता असते. २) मुळात जवळजवळ सारख्या स्वरूपाची एखादी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या टोळ्या एखाद्या विस्तृत प्रदेशावर आक्रमण करतात (असे आक्रमण स्थलांतरणाने किंवा अन्य कारणानेही असू शकते) आणि त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागात स्थायिक होतात. पुष्कळदा मग त्यांचे परस्परांशी नीट दळणवळणही राहत नाही. त्यामुळे त्यांच्या बोली भिन्न मार्गाने परिवर्तन पावतात आणि अशा प्रकारे निर्माण झालेले भेद वैशिष्ट्यपूर्ण बनतात. त्या भागातील मूळ रहिवाशांचा संपर्क हाही त्या वैशिष्ट्याला कारणीभूत ठरतो आणि ३) पुष्कळदा काही कारणांमुळे एकमेकांच्या सान्निध्यात येऊन सहजीवनाच्या तत्त्वाचा स्वीकार कराव्या लागणाऱ्या दोन भिन्न भाषिक समाजांपैकी एक समाज स्वतःची भाषा टाकून आपल्या शेजारच्या समाजाची भाषा स्वीकारतो. स्वतःची मूळ भाषा आणि नंतर स्वीकारलेली नवीन भाषा अशा दोन भाषा सुरुवातीच्या संक्रमण काळात बोलाव्या लागतात (लेवा पाटीदारांचेही असेच झालेले दिसून येते). काही काळानंतर तो या नव्या भाषेचाच पूर्णपणे वापर करू लागतो. पुढील पिढीत तर ही नवी भाषाच मातृभाषा होते. पण, असा स्वभाषेचा त्याग होण्यापूर्वी जुन्या पिढीच्या काही भाषिक सवयी या नव्याने आत्मसात केलेल्या भाषेत प्रवेश करतात आणि तिचे रूप काही बाबतीत बदलून टाकतात. त्यामुळे ज्यांची ती परंपरागत भाषा आहे, अशा समाजाच्या तोंडी असणारे तिचे रूप आणि ज्याने ती नव्याने स्वीकृत केली आहे, त्या समाजात झालेले तिचे रूप या दोहोत एक ठळक अंतर निर्माण होते. या दुसऱ्या रूपाला मूळ रूपाची पोटभाषा म्हणता येईल. अशा रीतीने स्वभाषा टाकून परभाषा स्वीकारण्याची उदाहरणे इतिहासात पुष्कळ आहेत आणि खानदेश-वऱ्हाडातील लेवा गणबोली हे त्याचे एक उत्तम उदाहरण सांगता येईल.

या भाषेचे व्याकरण हे मूळ मराठी भाषेचेच असल्यामुळे येथे देण्याचे प्रयोजन नाही. परंतु, उच्चारविशेष बदलल्याची कारणे व ती बदलल्यामुळे या भाषेला आलेले

रूप पुढील उदाहरणांवरून देता येईल.

उच्चारविशेष (वर्णप्रक्रिया) -

उच्चारविशेषांमुळेच या बोलीने स्वत:चे असे वेगळे अस्तित्व निर्माण केलेले आहे.

१) **''ड'' चा ''ळ'' होणे** - या गणभाषेत घाटोळी-वऱ्हाडी, झारपी (एलिचपुरी), वऱ्हाडी कोष्टी, पुणेरी कुणबाऊ बोलींप्रमाणेच ''ड'' चा उच्चार ''ळ'' होतो. उदा. घोळा (घोडा), आखाळ (आखाड), आळोसा (आडोसा), आळमार्ग (आडमार्ग), कळक (कडक), कपळा (कपडा), कवळी (कवडी) इत्यादी. तथापि, चार अक्षरी शब्दात तिसरे अक्षर ''ड'' येत असेल तर आणि या ''ड'' च्या आधीचे दुसरे अक्षर ''र'' येत असेत तर ''ड'' चा ''ळ'' न होता ''ल'' होतो व ''र'' चा ''ळ'' होतो. उदा. कुळलई (कुरडई).

२) **''ळ'' चा ''य'' होणे** - एलिचपूरमधील कोष्टी आणि रंगारी यांच्या झारपी बोलीप्रमाणे या बोलीभाषेतही ''ळ'' चा उच्चार ''य'' असा करतात. उदा. गुय (गूळ), डोया (डोळा), पोया (पोळा), खोय (खोळ), बयद (बळद), मया (मळा), मुया (मुळा), ''ळ'' वर वेलांटी आल्यास ''ळी'' चा उच्चार ''यी'' किंवा ''ई'' असाही करतात. उदा. पायी (पाळी), पोई (पोळी), मोई (मोळी), गोई (गोळी), इत्यादी. तीन अक्षरी शब्दात शेवटचे अक्षर ''ळ'' असल्यास व त्या आधीचे ''व'' असल्यास (मधले अक्षर) हे मधले ''व'' हे अक्षर लोप पावते व शेवटच्या ''ळ'' चे ''य'' होते. उदा. भोय (भोवळ), जोय (जवळ) एवढेच नाही; तर या शब्दामधील पहिले ''अ'' कारी आद्याक्षर ''ओ'' कारी होते हे या उपरोक्त शब्दांवरून दिसून येते.

३) **''ण'' चा ''न'' होणे** - वऱ्हाडी, अहिराणी, कोकणातील ठाकरी, गोवारी आणि विजापुरी मराठी बोलींप्रमाणेच या बोलीतही ''ण'' चा उच्चार ''न'' असा होतो. उदा. पानी (पाणी), बहीन (बहीण), पन (पण), अनवानी (अनवाणी), आना (आणा), आथरून (अंथरूण), कन (कण), कांजन्या (कांजण्या), कोन (कोण), खुन (खुण), इत्यादी.

४) **''व'' चा ''य'' होणे** - अहिराणीप्रमाणेच या बोलीतही ''व'' बद्दल ''य'' येतो. उदा. येळ (वेळ), येळा (वेडा), येस (वेस), येल (वेल), येनी (वेणी), येचा (वेचा), येटोये (वेटोळे), येलदोळा (वेलदोडा), इत्यादी.

५) **आद्य ''वि'' किंवा ''वी'' चा उच्चार ''इ'' किंवा ''ई'' होणे** - विजापुरी मराठी, वऱ्हाडी, धनगरी, वऱ्हाडी, महारी या बोलींप्रमाणेच या बोलीतही शब्दातील आद्य ''वि'' किंवा ''वी'' चा उच्चार ''इ'' किंवा ''ई'' होतो. उदा. इजार (विजार), इस्तो (विस्तव), इय्या (विळा), ईस (वीस), इत्यादी आणि

मराठीतील आद्य 'वि' असलेल्या शब्दाच्या 'वि' व्यंजनावर जर अनुस्वार येत असेल तर त्या अनुस्वाराचाही लोप होतो. उदा. विंचरणेपासून इचरणे, विंचूपासून इचू, इत्यादी.

६) **अन्त्य दीर्घस्वराचा ऱ्हस्व उच्चार होणे** - वऱ्हाडातील सर्व उपभेदांप्रमाणेच या बोलीतही दीर्घस्वर विशेषतः अन्त्यदीर्घस्वर ऱ्हस्व उच्चारिले जातात. उदा. मी अथवा मि. माहि अथवा माही, माहा, माह्य, इत्यादी.

७) **"ए" कारान्त अन्त्य स्वर "अ" कारान्त होणे** - पुणेरी भाषेत जेथे "ए" अन्त्य स्वर येतो तेथे अहिराणी व वऱ्हाडी बोलींप्रमाणेच या बोलीतही "अ" घालतात. उदा. सांगलं (सांगितले), केलं (केले), देलं (दिले), मारलं (मारले), त्यानं (त्याने), भुकेनं (भुकेने), राहालं (राहिले) इत्यादी.

८) **आद्य "वे" किंवा "ए" चा उच्चार "ये" होणे** - उत्तर कोकणीप्रमाणेच या बोलीतही शब्दातील आद्य "वे" किंवा "ए" चा उच्चार "ये" असा होतो. उदा. येळ (वेळ), येक (एक), येऱ्ही (एरवी), येल (वेल), येळपट (वेळपट) इत्यादी.

९) **आद्य "वि" आणि "व्य" चा उच्चार "ए" होणे** - इतर कोणत्याही बोलीत न आढळणारा या बोलीत आद्य "वि" आणि "व्य" चा "ए" असा होतो. उदा. येहेर (विहीर), येवसाय (व्यवसाय), येवस्था (व्यवस्था) इत्यादी.

१०) **आद्य "ओ" चा उच्चार "व" होणे** - "ओ" बद्दल "व" येणे हा प्रकार कानडीच्या संसर्गाने जसा "ओ" चा "वो" मराठीत शिरला आहे तसाच "ओ" चा "वो" ऐवजी "व" या बोलीभाषेत शिरला आहे. उदा. वखट (ओकट), वझं (ओझे), वटा (ओटा), वटी (ओटी), वढाय (ओढाळ), वतणे (ओतणे), वरपणे (ओरपणे), वयख (ओळख), वयंबा (ओळंबा), वरखळा (ओरखडा) इत्यादी.

११) **"अव" आणि "अवि" चा स्वर "ओ" किंवा "ओय" असा होणे:** - वऱ्हाडीप्रमाणेच या बोलीतही "अव" आणि "अवि" या दोहोंबद्दल "ओ" किंवा "ओय" हा स्वर उच्चारतात. उदा. जोय (जवळ), उळोयला (उडविला), उगोयणे (उगवणे), डकोयणे (डकवणे), कमोयणे (कमविणे), गमोयणे (गमविणे), उतरोयणे (उतरविणे), इस्तो (विस्तव) इत्यादी.

येथे नमूद करण्यासारखी गोष्ट ही की "अव" आणि "अवि" हे स्वर या बोलीतही वऱ्हाडीप्रमाणे "ओ" असा उच्चारले जात असले तरी या बोलीत "ओ" च्या नंतर "य" लागतो म्हणजे "ओय" असा स्वर होतो हे वरील क्रियापदांच्या शब्दांवरून दिसून येते. ही स्थिती बहुधा इतर कोणत्याच बोलीत रूढ नसावी.

१२) **अनुनासिकांचा उच्चार अर्धवट न करता स्पष्ट करणे** - वऱ्हाडीप्रमाणेच या बोलीतही अनुनासिकांचा उच्चार स्पष्ट करतात. उदा. सर्वनाम तू

ची तृतीया विभक्ती ''तू'' चा ''तून'', ''तुम्ही'' चा ''तुम्हीन'', ''मी'' चा ''मीन''.

१३) **''आ'' अन्त्य स्वराठिकाणी ''ए'' होणे**- वऱ्हाडी व अहिराणी बोलींप्रमाणेच या बोलीतही बऱ्याचदा ''आ'' कारान्त स्वर ''ए'' कारान्त होतो. उदा. कशाले (कशाला), मले (मला), तुले (तुला), इत्यादी, सर्वनामांची द्वितीया आणि चतुर्थी विभक्ती या बोलीत सर्रास ''आ'' कारान्त ऐवजी ''ए'' कारान्त होते.

१४) **''ल'' आणि ''न'' वर्ण भविष्यकाळासाठी वापरताना एकमेकांबद्दल येणे** - वऱ्हाडी आणि अहिराणीप्रमाणेच या बोलीतही ''ल'' आणि ''न'' वर्ण भविष्यकाळासाठी एकमेकांबद्दल येत असतात. उदा. मी मारीन, मी मारील, तो मारीन, तो मारील, ते मारतीन, ते मारतील इत्यादी.

१५) **स्त्रीलिंगी ''इ'' चा उच्चार ''ए'' किंवा ''ये'' होणे** - कोणत्याही बोलीत आढळत नाही, असा स्त्रीलिंगी संबोधताना ''इ'' चा उच्चार ''ए'' किंवा ''ये'' होणे हे बोलीचे आणखी खास वैशिष्ट्य आहे. उदा. कोणत्याही स्त्रीला ''ती बाई'' असे म्हणण्याऐवजी ''त्ये बाई'' असे म्हणतात. पत्नीला ''ही'' असे संबोधण्याऐवजी ''हे'' किंवा ''ह्ये'' असे संबोधतात.

१६) **स्त्रीलिंगी ''ग'' उद्‌गारार्थी उच्चार ''व'' असा होणे** - वऱ्हाडी चंद्रपुरी व वऱ्हाडी महारी भाषेप्रमाणेच या बोलीतही स्त्रीलिंग ''ग'' चा उद्‌गारार्थी उच्चार ''व'' असा होत असतो. उदा. अव (अग), हाओ व (हो ग), नही व (नाही ग), व तू (अग तू).

अचंबावाचक ''आई ग'' शब्दांचे रूप ''माय व'' असे होते.

१७) **''मी'' सना. ची षष्ठी तसेच ''तू'' सना.ची षष्ठी विभक्तीत माझा, तुझा मधील झा चा ''ह्या'' उच्चार होणे** - वऱ्हाडी, खानदेशी अहिराणीप्रमाणेच ''झ'' चा उच्चार ''ह्य'' होतो. उदा. माह्या (माझा), माह्यी (माझी), माह्य (माझ), तुह्या (तुझ्या), तुह्यी (तुझी), तुह्य (तुझ), वऱ्हाडातील ह्य असे न होता फक्त ''ह'' होते. उदा. माह, माहा, माही, तुह, तुहा, तुही.

१८) **जेथे ''स्व'' (स+व) जोडवर्ण येत असेल तेथे त्याचा उच्चार ''सो'' किंवा ''स'' होणे** - या गणबोलीत कुणबाऊ भाषेप्रमाणेच ''स्व'' चा उच्चार ''सो'' किंवा ''स'' होतो. उदा. सोता (स्वत:), सरसोती (सरस्वती).

१९) कोणत्याही बोलीत न आढळणारा या बोलीतील एक विशेष म्हणजे **चार-पाच वर्णाक्षरांच्या शब्दात दुसरा वर्ण ''र'' येत असेल तर या बोलीत त्याचा ''ळ'' (अर्धा ळ होतो).** उदा. अळ्लावण (अरडाण), मुळ्लावण (मुरडाण), वळ्ल्हाणे (ओरडणे) इत्यादी.

२०) **नामे** - वऱ्हाडीप्रमाणेच या बोलीतही अन्त्य स्वर दीर्घ असेल तर ऱ्हस्व करण्याची लकब आहे. हे वर सांगितलेच आहे. तिचा परिणाम असा झाला

आहे की, नपुसकलिंगी अनेकवचनी जे ''ए'' कारान्त रूप असते ते बऱ्याच ठिकाणी ''अ'' कारान्त होते आणि असे ''अ'' कारान्त रूप झाले म्हणजे त्याचे विशेषण साहजिकच पुल्लिंगी अनेकवचनात राहते. उदा. चांगले मानसं. अशा रीतीने पुल्लिंग व नपुसकलिंग यांमध्ये घोटाळा केलेला आढळतो. हा फरक मराठी व गुजराती या दोन भाषांमध्ये प्रामुख्याने आढळतो. हिंदीत तो तसा फारसा नाही. तेव्हा या दोहोंमधील दुवा वऱ्हाडीप्रमाणेच ही बोलीही साधते. विभक्तिप्रत्यय मात्र मध्यवर्ती मराठी, वऱ्हाडी व अहिराणीपेक्षा वेगळे आहेत. ते पुढे दाखविले आहेतच. अनेकवचनांच्या प्रत्ययांपूर्वी ''ई'' हा एक आगम येत असतो. उदा. मानसाले (माणसांना), त्यांहीले (त्यांना) इत्यादी.

२१) **सर्वनामे** - सर्वनामांचे विभक्तिप्रत्यय पुढे दाखविले आहेत. त्यावरून असे दिसून येते की, नामे व सर्वनामांचे काही विभक्तीप्रत्यय मराठीप्रमाणेच, काही वऱ्हाडीप्रमाणेच, काही अहिराणीप्रमाणेच तर काही चमत्कारिक होतात.

तुलनात्मक सर्वनामे विभक्तिप्रत्यय -

	लेवा गणबोली		अहिराणी		वऱ्हाडी	
विभक्ती	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	मी	आम्ही, आम्हू	मी,	आम्हू आपू	मी	आम्ही
द्वितीया व चतुर्थी	मले	आम्हाले	मले, माले,	आम्हले, आमले मल्ये	मला	आम्हाला
तृतीया	मीन	आम्हीन, आम्हून	मिन मावरी आम्ही	आम्हनावरी आमुन	मी	आम्ही
पंचमी	माह्यावून	आमच्यावून	मनपान मनाधीन मानाधीन	आम्हनपान आम्हनधीन	माझ्याहून माझ्यावून	आमच्याहून आमच्यावून
षष्ठी	माह्या, माही, माह्या, माहे, माह्य	आमचा, आमची, आमचं	मन्ह, मना, मनी, माह्य	आम्हना, आम्हनी, आमन	माझा, माझी, माझे, माही, माहे	आमचा, आमची, आमचे
सप्तमी	माह्यात	आमच्यात	मनमा,	आम्हनामा	माझ्यात,	आमच्यात

			मनामा		माह्यात	
प्रथमा	तू	तुम्ही	तू	तुम्हू	तू	तुम्ही
द्वितीया व चतुर्थी	तुले	तुम्हाले	तुले	तुम्हले	तुला	तुम्हाला
तृतीया	तून	तुम्हीन	तु, तुवरी, तुनी	तुम्हू तुम्हनी, तुम्ही	तू	तुम्ही
पंचमी	तुझ्यावून	तुमच्याहून	तुनपान, तुनुथीन	तुमपान, तुमुनाथीन	तुझ्याहून	तुमच्याहून
षष्ठी	तुह्या, तुही, तुह्यी, तुहे, तुह्य	तुमचा, तुमची, तुमचं	तुम्हन, तुना, तुनी	तुमनी, तुमना	तुझा, तुझी, तुझे	तुमचा, तुमची, तुमचे
सप्तमी	तुह्यात	तुमच्यात	तुमा	तुमनामा	तुझ्यात	तुमच्यात
प्रथमा	तो,ती,ते	ते, त्ये	तो, ती, ते	ते, त्ये	तो, ती, ते	ते, त्ये
द्वितीया व चतुर्थी	त्याले, तिले, त्याले	त्याहिले	त्याले, त्यासे तिले, तिसे त्याले, तेसे	त्याहींसले	त्याले तिले तिले	त्यानले
तृतीया	त्यानं, तिनं त्यानं	त्याहीनं	त्यान्ही, त्यानी त्याकडतीन, तीकड त्याकड	त्यासन्ही ती/त्याकडसीन त्याकड	त्यान तिन तेन	त्याहीनं
पंचमी	त्याच्यावून तिच्यावून त्याच्यावून	त्याहिच्यावून	त्यानतिन तिसतिन तेसपान	त्याहीनतिन	त्याच्यातून तिच्यावून तेच्यावून	त्यांच्यातून
षष्ठी	त्याचा, त्याची, त्याचं, तिचा, तिचा, तिची, तिचं	त्याहीचा, त्याहीची त्याहीचं	त्यान्ह, त्यान्ही तिन, तिनी त्यानं, तेनी	त्यासन्ही, त्यासन्ह तिसन तेसनी	त्याचा तिचा तेचा	त्याहीचा

सप्तमी	त्याच्यात,	त्याहीच्यात	त्यामा, त्यामझार	त्यांसम त्यांसमा त्यांसमझार	त्याच्यात	त्याहीच्यात
	तिच्यात		तिमा, तेमझार		तिच्यात	
	तिच्यात		ते मझार			

वरील सर्वनाम विभक्तीवरून लक्षात येते की, मी आणि तू या सर्वनामांचे षष्ठी विभक्तीरूप 'माझा' किंवा 'तुझा' ऐवजी महादेव कोळी बोलीप्रमाणे 'झा' च्या ठिकाणी 'हा' किंवा 'ह्या' लागून होते व रूपे 'माह्या', 'तुह्या' अशी होतात. सर्व सनांची विभक्ती रूपे ठाकरी भाषेप्रमाणे 'हान' किंवा 'ह्यान' लागून होते. उदा. 'माहान' किंवा 'माह्यान' (माझ्यान किंवा माझ्याकडून), 'तुहान' किंवा 'तुह्यान' (तुझ्यान किंवा तुझ्याकडून) इ.

खानदेशातील लेवा पाटीदारांची वस्ती मोठ्या प्रमाणावर असलेल्या भागाचे तापी नदीमुळे दोन प्रादेशिक भेद निर्माण झालेले आहेत. उत्तरेकडील भागास आरपट्टी व दक्षिणेकडील भागास पारपट्टी असे म्हणतात. दोन्ही भागातील उच्चारविशेषांमध्ये थोडे फरक आहेत. जळगावकडील खेड्यांमध्ये 'आम्ही', 'तुम्ही' व 'ते' या सर्वनामांची अनेकवचनी द्वितीया व चतुर्थी विभक्ती करताना 'आम्हाले' ऐवजी 'आम्हाइनले', 'तुम्हाले' ऐवजी 'तुम्हाइनले' आणि 'त्याहीले' ऐवजी 'त्याहीनले' अशी रूपे होतात. असे असले तरी यावल, रावेर, भुसावळ, मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यांतील उच्चारविशेषे सारखीच आहेत.

बऱ्याचदा स्त्रीलिंगी प्रथमा एकवचन ''ती'' ऐवजी ''ते'' किंवा ''त्ये'' सुद्धा वापरतात. उदा. ''ते आली'' (ती आली).

अहिराणी व गुजरीमधील कन (कडून, पासून, मुळे) हा तृतीया विभक्तीचा प्रत्यय या बोलीतही सर्वनामाच्या तृतीया विभक्तीला लावण्याचीही पद्धत आहे. उदा. माह्याकन (माझ्याने), तुह्याकन (तुझ्याने), त्याच्याकन (त्याच्याने), त्याहिच्याकन (त्यांनी) इत्यादी.

प्रश्नार्थक सर्वनाम ''कोण'' चे विभक्तिप्रत्यय खालीलप्रमाणे होतात.

	लेवा गणबोली		अहिराणी		वऱ्हाडी	
	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	कोन	कोनकोन	कोन	कोनकोन	कोन	कोनकोन
द्वितीया व चतुर्थी	कोन्हाले	कोनकोन्हाले	कोन्हासे	कोनकोन्हासे	कोनाले	कोनकोनाले
तृतीया	कोन्हं	कोन्हकोन्ह	कोन्हासनी	कोन्हाकोन्हासनी	कोन	कोनकोन

पंचमी	कोन्हावून	कोनकोन्हावून	कोन्हानतीन	कोनकोन्हाइतीन	कोनावून	कोनकोनावून
षष्ठी	कोन्हाचा,	कोनकोन्हाचा	कोन्हान	कोनकोन्हान	कोनाचा	कोनकोनाचा
	कोन्हाची,	कोनकोन्हाची,	कोन्हानी	कोनकोन्हानी	कोनाची	कोनकोनाची
	कोन्हाचं	कोनकोन्हाचं	कोन्हान	कोनकोन्हान	कोनाच	कोनकोनाचं
सप्तमी	कोन्हात	कोनकोन्हात	कोन्हासमा	कोनकोन्हासमा	कोनात	कोनकोनात

प्रश्नार्थक सर्वनाम काय याची पंचमीची रूपे काहून, काव्हून, काम्हून किंवा काभरं (काबरं) अशी होतात.

२२) या बोलीभाषेची कोणत्याही बोलीभाषेत न आढळणारी आणखी एक विशेषता म्हणजे नामे व सर्वनामांचे अनेकवचन करताना अनेकवचनासाठी असणारा अनुस्वार लोप पावतो आणि द्वितीया ते सप्तमीपर्यंतच्या विभक्ती रूपात पुढे ''ई'' लागतो. उदा. मंदिरे-द्वितीय व चतुर्थी विभक्ती-मंदिरांना याचे रूप मंदिराईले, तृतीया विभक्ती-मंदिरांनी याचे रूप मंदिराईनं, पंचमी विभक्ती-मंदिराहून याचे रूप मंदिराईवून, षष्टी विभक्ती-मंदिरांचा याचे रूप मंदिराईचा आणि सप्तमी विभक्ती-मंदिरांमध्ये याचे रूप मंदिराईमंधी असे होते.

तसेच देव याचे अनेकवचनी देवाईले, देवाईनं, देवाईवून, देवाईचा, देवाईच्यात असे होते. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

क्रियापदे -

या बोलीत ''आहे'' या क्रियापदाचा उच्चार ''आय'' असाच करतात. उदा. ''मी आय'' (मी आहे), ''तो आय'' (तो आहे), ''तो गेलाय'' (तो गेला आहे) इत्यादी.

''नाही'' या क्रियापदाचा उच्चार नेहमी ''नी'' असा करतात. उदा. ''मी नी'' (मी नाही), ''तो नी'' (तो नाही), ''त्ये नी'' (ती नाही), ''ते नी'' (ते नाही) इत्यादी. नकार दर्शविताना ''नाही'' म्हणायचे असल्यास ''नही'' असे म्हणतात. उदा. ''नही रे बापा'' (नाही रे बाबा), ''नही व माय'' (नाही ग बाई) इत्यादी.

पुणेरी भाषेतील क्रियापदांची सामान्य रूपे शिष्टांच्या वापरात आहेतच, त्याशिवाय जी रूपे वऱ्हाडीप्रमाणेच या गणबोलीत प्रामुख्याने वापरात आहेत ती ही-मी म्हणीन, मी असीन, द्वितीय आणि तृतीय पुरुष यांची एकवचनी रूपे सारखीच होतात. तू आय, तो आय, तू गेलता, तो गेलता.

विनोदाची गोष्ट ही की, काही दोन क्रियापदांचे रूप लेवा गणबोलीत एकच होते. हे साधारणत: भूतकाळाच्या क्रियापदांबाबत घडते. उदा. गेलता (गेला होता), आलता (आला होता), तर काही एका क्रियापदाची दोन रूपेही होतात. उदा. जाई ईन (जाईन), ई जाईन (येईल). येथे वऱ्हाडातील ऊन ऐवजी ''ई'' कारान्त रूप होते. उदा. येऊन जाईन, ई जाईन.

द्वितीय पुरुषी चालू भूतकाळाची रूपे पुढीलप्रमाणे होतात - तो जाये (तो जात असे), तो पये (तो पळत असे), तो डोलये (तो डोलवित असे), तो धावें (तो धावत असे), लाकूळ जव्हा बये (लाकूड जेव्हा जळत होते), नदी जव्हा वाहे (नदी जेव्हा वाहत होती) इत्यादी.

भूतकाळातील द्वितीय पुरुष आणि तृतीय पुरुष यांच्या अनेकवचनांची रूपे सारखीच होतात. उदा. तुम्ही गेले, ते गेले, तुम्ही गेलते, ते गेलते.

वर्तमानकाळाची प्रथम पुरुषाच्या एकवचनाची असणे किंवा हो धातूची रूपे-मी आहे, मी आहो, मी आय अशी होतात.

मराठीमध्ये अनेकवचनी असणाऱ्या वाक्याच्या क्रियापदात शेवटी ''तात'' लावतात. उदा. माणसे चालतात, गुरे चरतात, मुले खातात इत्यादी. तर लेवा गणबोलीत उपरोक्त ''तात'' मधील शेवटचा ''त'' लोप पावतो. उदा. मानसं चालता, गुरं चरता, मुलं खाता इत्यादी.

प्रश्नार्थक, आज्ञार्थी आणि विनंतीदर्शक वाक्य करताना ''काय करतोस?'' किंवा ''काय करतो आहेस?'' ऐवजी या भाषेत करतोमधील अंत्याक्षरातील 'ओ' कार लोप पावून त्याऐवजी 'ऊ' कार लागतो. उदा. करतू-''काय करतू आय''. तद्वतच जाणेचे जातोसऐवजी ''जातू'', भरणेचे भरतोसऐवजी ''भरतू''; खाणेचे खातोसऐवजी ''खातू'', इत्यादी.

आज्ञार्थीची द्वितीय पुरुषी एकवचनाची रूपे य कारान्त होतात. उदा. जाय (जा), खाय (खा), पाहाय (पाहा) इत्यादी. बऱ्याचदा अशा आज्ञार्थी रूपामागे भविष्यकाळासाठी गुजराती आणि अहिराणीप्रमाणे ''जो'' प्रत्यय लावतात. उदा. जाय जो (जाशील), खाय जो (खाशील), पाहाय जो (पहाशील), कर जो (करशील).

क्रियापदांमध्ये गमतीशीर गोष्ट की, चार अक्षरी क्रियापदांमध्ये तिसरे अक्षर ''व'' आल्यास या ''व'' चा ''य'' किंवा ''ळ'' असे दोन्ही होतात. परंतु ''य'' झाल्यास त्या आधीचे अक्षर ''ओ'' कारी होते, तर ''ळ'' झाल्यास ''आ'' कारी होते. उदा.

विझवणे वरून ''इझोयणे'' किंवा ''इझाळणे''
बसवणे वरून ''बसोयणे'' किंवा ''बसाळणे''
कुदवणे वरून ''कुदोयणे'' किंवा ''कुदाळणे''
उठवणे वरून ''उठोयणे'' किंवा ''उठाळणे''
घुसवणे वरून ''घुसोयणे'' किंवा ''घुसाळणे''
पादवणे वरून ''पादोयणे'' किंवा ''पादाळणे''
पळवणे वरून ''पळोयणे'' किंवा ''पयाळणे'' इत्यादी.

तीन अक्षरी उ कारी क्रियापदाच्या आद्याक्षरावर अनुस्वार असल्यास हा अनुस्वार लोप पावतो. उदा. थुकणे (थुंकणे), भुकणे (भुंकणे), फुकणे (फुंकणे), डुबणे

(डुंबणे) इत्यादी.

भूतकाळाशी संबधित दोन क्रियापदे येतात तेव्हा नंतर येणारे ''होती'', ''होते'' किंवा ''होता'' हे दुय्यम क्रियापद मुख्य क्रियापदात विलीन होते. हे फक्त लेवा गणबोलीतच दिसते. उदा. आलता (आला होता), गेलता (गेला होता), मेलतं (मेल होतं), चावलतं (चावल होतं) इत्यादी. तसेच ''आहे'' हे दुय्यम क्रियापदसुद्धा विलीन होते. उदा. आलाय (आला आहे), मेलाय (मेला आहे), गेलाय (गेला आहे) इत्यादी. तसेच मी किंवा आम्ही या सर्वनामांच्या भूतकाळी क्रियापदात दुय्यम क्रियापदाचे शेवटचे व्यंजन उकारांती होते. उदा. मी गेलतू (मी गेलो होतो), आम्ही गेलतू (आम्ही गेलो होतो), बोललतू (बोललो होतो), आलतू (आलो होतो), चाललतू (चाललो होतो) इत्यादी. अनेकवचनी सनाचे गेलते (गेले होते), बोललते (बोलले होते) असे तर नपुसकलिंगी सनाचे गेलतं (गेल होतं), आलतं (आल होतं) असे रूप होते.

तद्वतच वर्तमानकाळाशी संबंधित दोन क्रियापदे येतात तेव्हा नंतर येणारे ''आहेस'', ''आहात'' किंवा ''आहे'' हे दुय्यम क्रियापदही मुख्य क्रियापदात विलीन होऊन क्रियापदात शेवटी ''य'' लागतो. उदा. जातोय (जात आहे) किंवा (जात आहेस), जाताय (जात आहात), जातय (जात आहे).

काही वेळा वऱ्हाडीतील किंवा वऱ्हाडीप्रमाणे लेवा गणबोलीत आलेली खाऊन घे, करून घे, पाहून घे अशी आज्ञार्थी रूपे खाई घेय जो, करी घेय जो, पाही घेय जो अशी गुजरातीप्रमाणे होतात. यावरून असे दिसते की, जेव्हा अ, आ, वा ए कारान्त क्रियापदे ''ई''-कारान्त बनतात, तेव्हा त्यांच्यापुढे घेणे, देणे, टाकणे, जाणे इत्यादी क्रियापदांची रूपे लागतात व त्याहीपुढे गुजरातीतील ''जो'' प्रत्यय लागतो. 'जो' हा प्रत्यय धनगरी भाषेतही लागतो. तद्वतच 'होणे' हे दुय्यम क्रियापद रूप लागणारे दोन शब्दांच्या क्रियापदांमध्ये वर्तमानकाळात वापरताना ''होय'' किंवा ''होईजाय'', भविष्यकाळात वापरताना ''होई जाय जो'' आणि भूतकाळात वापरताना ''होई गेला'' अशी रूपे लागतात. त्याची काही गमतीशीर उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

मराठी	**वऱ्हाडी**	**लेवा गणबोली**
दे	देऊन टाक	दी टाक, दी दे
देशील	देऊन टाकशील	दी टाकशीन, दी टाक जो, दी देय जो
दिलं	देऊन टाकलं	दी टाकलं
घे	घेऊन टाक	घी टाक, घी घे
घेशील	घेऊन टाकशील	घी टाकशीन, घी टाक जो, घी घेय जो
घेतलं	घेऊन टाकलं	घी टाकलं

पाहा	पाहून घे	पाही घे
पाहाशील	पाहून घेशील	पाही घेशीन, पाही घेय जो
पाहिलं	पाहून घेतलं	पाही घेतलं, पाहालं
ये	येऊन जा	इ जाय
येशील	येऊन जाशील	इ जाशीन, इ जाय जो
आला	येऊन गेला	इ गेला
टाक	टाकून दे	टाकी दे
टाकशील	टाकून देशील	टाकशीन, टाकी देशीन, टाकी देय जो
टाकलं	टाकून दिलं	टाकी देलं
बाजूला हो	बाजूला होऊन जा	बाजूले होई जाय
बाजूला होशील	बाजूला होऊन जाशील	बाजूले होय जो, बाजुले होई जाय जो
बाजूला झाला	बाजूला होऊन गेला	बाजूले होई गेला

पळणे (पडणे) हे क्रियापद जेव्हा दुय्यम म्हणून वापरले जाते तेव्हा त्याचा अर्थ ''लागणे'' (एखादी क्रिया करावी लागणे किंवा भाग पडणे) असा होतो. उदा. ''करनं पळीन'' (करावे लागेल), करनं पळलं (करावे लागले), ''खानं पळीन'' (खावे लागेल), ''खानं पळलं'' (खावे लागले), ''देनं पळीन'' (द्यावे लागेल), ''देन पळलं'' (द्यावे लागले) इत्यादी.

भविष्यकालीन क्रिया दर्शविण्यासाठी 'वावू' प्रत्यय लागणे - दोन अक्षरी क्रियापदाच्या शेवटच्या ''णे'' चा लोप होऊन त्याजागी 'वावू' प्रत्यय लागतो. उदा. देणे पासून देवावू - ''तो देवावू नी'' (बहुधा तो देणार नाही). यात बहुधा हा अर्थ ध्वनित असतो. अशी रूपे - घेणेपासून घेवावू, जाणेपासून जावावू, इत्यादी. मात्र तीन वा त्यापेक्षा जास्त अक्षरी क्रियापदांमधील शेवटचा 'णे' लोप होतो व त्याआधीचे 'अ' कारी व्यंजन 'आ' कारी होते व शेवटी 'वू' लागतो. उदा. करणेपासून करावू, भरणेपासून भरावू, बसणेपासून बसावू इत्यादी. त्याचप्रमाणे भविष्यकालीन क्रिया दर्शविण्यासाठी मराठीत जेव्हा ''ले जाईल'' हा प्रत्यय लागतो तेव्हा या बोलीत जाईल चा लोप होतो व ले च्या ठिकाणी 'ईन' हा प्रत्यय लागतो. उदा. केलं जाईलसाठी 'कराईन', बसलं जाईलसाठी 'बसाईन', इत्यादी. अशी अनेक उदाहरणे देता येतील आणि अशा चमत्कारिक क्रियापद प्रत्ययांमुळेही ही बोलीभाषा गणबोली ठरते.

बऱ्याचदा दोन अक्षरी शब्दात अन्त्याक्षर ''ढ'' असेल आणि आद्य अक्षर आकारी असेल तर ''ढ'' चा ''ळ'' होतो व ''ळ'' च्या आधी ''हा'' अतिरिक्त लागून तो आज्ञार्थी शब्द तीन अक्षरी होतो. उदा. काहाळ (काढ), वाहाळ (वाढ) इत्यादी.

एखाद्या क्रियापदाचे भूतकाळी रूप करताना किंवा विशेषण करताना एल हा आगम लागतो. उदा. बसणे क्रियापदावरून बशेल (बसलेला), निजणेवरून निजेल (निजलेला), बनणेवरून बनेल (बनलेला), जाणेवरून जायेल (गेलेला), झोपणेवरून जपेल (झोपलेला) इत्यादी.

रीती भूतकाळाचा उपयोग भूतकाळामध्ये होतो. ''ओ'' कारान्त रूपेही क्वचित आढळतात. उदा. मी निजलो, मी देखलो, मी पडलो इत्यादी.

अकरणरूपात ''इ'' च्या ऐवजी ''ये'' हे अक्षर येते. उदा. तो जायेना, तो देयेना, तो घेयेना इत्यादी.

कोकणी व वऱ्हाडीप्रमाणे अन लागूनही रूपे होतात. उदा. जेव्हा एखादी गोष्ट ठासून सांगण्यासाठी क्रियापदावर जोर दिला जातो तेव्हा क्रियापदाला नंतर ना या अर्थी नं लावता जातो. उदा. त्यानं मले घाळलनं (त्याने मला पाठविले ना), त्यानं सांगलनं (त्याने सांगितले ना) इत्यादी.

या बोलीतील भविष्यकाळातील रूपेही पाहण्यासारखी आहेत. उदा. मी मारील, मी मारीन, आम्ही मारू, तू मारसीन, तुम्ही मारसान, तो मारीन, ते मारतीन, तो मारीन.

धातुसाधित नामे पुणेरी मराठीप्रमाणे आहेत. परंतु, त्यांची रूपे निराळ्या तऱ्हेने होतात. या, आ, आय मूळ धातूला लागून सामान्य रूप होते व मग इतर प्रत्यय लागतात. उदा. चारायले किंवा चाऱ्याले, राखायले किंवा राख्याले, करायले, कराले किंवा कऱ्याले.

स्थल, वेळ, काळ दाखविणारी मोठी विचित्र क्रियाविशेषणे या बोलीत दिसून येतात ती पुढीलप्रमाणे.

अठी, अढी (इथे, येथे), तठी, तढी (तेथे), कुठी, कुढी (कोठे), तव्हा (तेव्हा), तही (त्यादिवशी), कव्हा (केव्हा, कधी), कही (कधी, कोणत्या दिवशी), जव्हा (जेव्हा), जही (ज्या दिवशी).

या क्रियाविशेषणांना पर्यंत, पावेतो, वर या अर्थाचे शब्दयोगी अव्यय लावण्यासाठी ''लोक'' हा एकच शब्दयोगी अव्यय त्या क्रियाविशेषणापुढे लावतात. उदा. अढलोक (येथपर्यंत), तढलोक (तेथपर्यंत), कुढलोक (कुठवर), तव्हालोक (तेव्हापर्यंत), तहीलोक (त्या दिवसापर्यंत), कव्हालोक (केव्हापर्यंत) कहीलोक (कोठपर्यंत, कोणत्या वेळे अथवा दिवसापर्यंत), जढलोक (जेथपर्यंत), जहीलोक (जेव्हापर्यंत) आणि या वैशिष्ट्यांमुळे ही बोली गणबोली ठरते.

पुणे-साताऱ्याच्या कुणबाऊ भाषेतल्या अन्त्यला पूर्वकालवाचक ज्याप्रमाणे शान जोडून, उदा. करूनशान असे शब्द होतात तसेच या बोलीत ''सन'' हा शब्द वापरण्याची वहिवाट आहे. उदा. करीसन (करूनशान=करून), घीसन (घेरूनशान=घेऊन), दीसन (देऊनशान=देऊन), घाळीसन (घाडूनशान=घाडून), मारीसन

(मारूनशान=मारून) इत्यादी.

एकाच अर्थासाठी दोनदोन शब्द योजण्याची प्रथा या बोलीभाषेत आहे. त्यासाठी पहिल्या शब्दातील शेवटचे अक्षर 'ई' कारी व त्याला जोडून येणाऱ्या दुसऱ्या शब्दातील पहिले अक्षर 'उ' कारी होते. उदा. खंसाई-खुंगाई, घाई-घुई, दाबी-दुबी, सांगी-सुंगी, इत्यादी.

या भाषेत काही घाटोळी भाषेतील शब्द आढळतात. उदा. भेटणे (मिळणे), वावर (शेत), पोऱ्या (मुलगा), पोरगी (मुलगी), फोतर (फोलपट), डावले (करंडा), पारीस (सहाण), घळली किंवा घडली (घडौली), पावशी (विळी), गोऱ्हा (वासरू), आकू (कुत्रा), राई (मोहरी), हाड्या वा हाळ्या (कावळा), अढाऊ (लुच्चा), चबरा (बडबड्या), धकणे (चालू होणे), वरपणे (भुरके मारणे, ओरपणे) इ. झारपी व वऱ्हाडी गोवारीप्रमाणे त्याने ला "त्यान" आणि दिल ला "देल" म्हणतात.

काही विशेष शब्द जे इतर बोलीभाषांमध्ये आढळत नाहीत - मंगन (मग), हाओ (होय), अढी किंवा अठी (येथे), तढी किंवा तठी (तेथे), कुढी, कुठी (कोठे), गेलता (गेला होता), आलता (आला होता), बारे (अजून), हेड रे (शिविवाचक हट रे), इत्यादी. या भाषेतसुद्धा ला बी म्हणतात. उदा. आम्ही बी (आम्हीसुद्धा).

काही अवजारांची नावे - इय्या (विळा, विळी, कोयता), पुऱ्हानं (पराणी), रूम्हनं (लहान वेळू), शिंगाळ (गाड्याला आडोशासाठी लावतात ते) इत्यादी.

महिलांच्या शिव्याही विचित्र असतात. उदा. हेला, मेला, पांढा, टेंपा, शिंगाळा, इत्यादी. त्यात पश्चिम महाराष्ट्रातील बहुजन समाजातील महिलांच्या बोलण्यात जो कडकपणा असतो तो नसतो. म्हणजेच लेवा पाटीदार महिलेच्या शिवीतसुद्धा मृदूपणा असतो.

वऱ्हाडी-खानदेशी या गणबोलीचा नमुना (ग्रामीण लेवा पाटीदार शेतकरी व बहुजन समाजातील एक शहरवासी यांचे संभाषण):-

शेतकरी - "या सायेब बसा गाळ्यावर. एस.टी. चुकली का?
पाय दुखतीन पायी चाल्लतं."
(या साहेब, बसा बैलगाड्यावर. एस.टी. चुकली वाटतं?
पायी चाललात तर पाय दुखतील.)

शहरवासी - "हो यायला जरा उशीर झाला. चुकली खरं. बरं, कसं
काय चालले आहे तुमचं?

शेतकरी - "काय इचारता? काही खरनी. दिवस काही चांगले नी."
(काही विचारू नका. दिवस फार वाईट आहेत.)

शहरवासी - "का हो?"

शेतकरी - "काय करव, काही कयत नी. पोर लग्नाची झाली

आय. वय वाहाळताय. बारे कुढी जमत नी.''

(काय कराव, काही कळत नाही, मुलगी लग्नाला आली आहे. वय वाढत आहे. अजून कुठे जमत नाही.)

शहरवासी - ''का, स्थळ आली नाहीत काय?''

शेतकरी - ''तस नी काही. दोन-चार स्थळबी आले. पसंतबी पळले पन काही जमलनी. दिशाले चांगली आहे नं हो पोर.''

(तस नाही काही. दोन-चार स्थळही आले होते आणि पसंतसुद्धा पडली होती. परंतु काही जमत नाही. मुलगी दिसायला चांगली आहे हो.)

शहरवासी - ''मग!''

शेतकरी - ''मंगन काय? अहो जरासी नौकरी असली की, भारी भरता पोऱ्हाईचे बाप. तोंड फाळीसन गह्यरा हुंडा मांगता.''

(मग काय? मुलाला लहानशी नोकरी असली तरी मुलाचे बाप भाव खातात अणि तोंड फाडून खूप मोठा हुंडा मागतात.)

शहरवासी - ''मग चांगले स्थळ असले तर काहीतरी तसवीज करून जमवून टाका.''

शेतकरी - ''आता तं तुम्ही पाहाताचाय की, दोन वर्स पानी बी पळलं नी, अन हंगामबी झाला नी. इहीर आटली, उस बयाला, अन बाग सोळी देना पळला. आमचीच खायाची मारामार. कुठून आन्याचा येवढा हुंडा. कोन्ही उभं बी करत नी.''

(तुम्ही पाहतच आहात की, दोन वर्षे पाऊसच पडला नाही आणि हंगामही झाला नाही. विहीर आटली, ऊस जळून गेला आणि केळीची बाग सोडून द्यावी लागली. आमचीच ओढाताण आहे. कोठून आणायचा एवढा हुंडा. कोणी उसनवारीही करीत नाही.)

शहरवासी - ''मुलं काय करतात?''

शेतकरी - ''मोठा झालाय एमए फैजपूरऊन, पन घरीच आय. आन लहाना खिरोद्याले बीएडले आय. पोऱ्ह कुठी लागतीन तं बर होई जाईन. सायबानं इखडे कालेज काहाळलेत म्हनून शिकले तरी पोऱ्हं. नाही त झाले असते ढोरकी.''

(मोठा फैजपूरहून एम.ए. झाला आहे. परंतु अद्याप

नोकरी नाही; लहान खिरोद्याला बी.एड. करतो आहे. मुलं नोकरीला लागतील तर बरं होईल. साहेबांनी या भागात कॉलेज काढलीत म्हणून मुलं शिकलीत तरी! नाही तर गुरं चारायला लागली असती.)

शहरवासी - "उद्या साखर कारखान्याचं इलेक्शन आहे ना?"

शेतकरी - "हाओ हो! कोन्हाले मत देयाचं? दोन्ही बी आपलेच. मारवाळ्यानं चांगली लाई देली दोन्हीत. सायबाले अन दादासायबाले बी कोन सांगीन?"
(होय हो! कोणाला मत द्यावे हा पेच आहे. दोन्हीही आपलेच! मारवाड्याने दोघांमध्ये चांगली जुंपवली. साहेबांना आणि दादासाहेबांना कोण सांगेल?)

शहरवासी - "तरीही मत तर द्यावंच लागेल."

शेतकरी - "देऊ इकडच्याइले अर्धे अन तिकडच्याइले अर्धे. कोन्हीबी येवो मंगन. कोन्हीबी आल त आपलं काम काही करनार नी."
(देऊ या पार्टीच्या पॅनलला अर्धे आणि त्या पार्टीच्या पॅनलला अर्धे. मग कोणीही निवडून येवो. कुणीही आले तरी आपली कामे काही करणार नाहीत.)

शहरवासी - "मग जाणार ना?"

शेतकरी - "जाऊ काल्दी फैजपूरला. मत बी दिवू, अन बजार बी करू. ते म्हनत होती, लुगड घी या नावावर."
(जाऊ उद्या फैजपूरला. मतही देऊ आणि बाजारही करू. सौ म्हणत होती की, लुगड घेऊन या उधारीवर.)

शहरवासी - "जा बाबा मजा आहे तुमची."

शेतकरी - "नाही हो! आपल्याले काय? देवाच नाव घेवव अन गूपचूप बसव. आपून भले की आपल काम भल. बराय राम राम."
(नाही हो! आपल्याला काय करायचं आहे. देवाचे नाव घेऊन गप बसावं. आपलं भलं व आपलं काम भलं. बरं आहे. राम राम.)

शहरवासी - "राम राम."

लेवा गणबोलीतील काही प्रचलित शब्द -

वास्तुविषयक -सरा (तुळई), खंबा (खांब), उमरट (उंबरठा), वटा (ओटा),

वसरी (ओसरी), दरजा (दरवाजा), न्हानी (न्हाणीघर, मोरी), फळताळ (फडताळ, बाल्कनी), आसारी (गज), गोखला (कोनाडा), फाटूक (फाटक), धाबं (गच्ची), सांग (शिडी), इ.

कृषीविषयक - इय्या (विळा), खुरपी (खुरपे), कुन्हाळ (कुन्हाड), कोयपं (कोळपे), तिफन (पाभर), लढं किंवा गाळं (बैलगाडा), दमनी (बैलगाडी), जूपन (जोखड), रूम्हनं (वखर दाबण्याचे अवजार), इतानी (वखराच्या पासाची माती काढण्याचे अवजार), वाळगं (गुरे बांधण्याची व चारा ठेवण्याची जागा, प्लॉट), वळांग (काटेरी कुंपण), झोपाटा (वाळग्याचे काट्यांचे फाटक), शिंगाडं (गाड्याचा अडसर), गोन्हा (वासरू), वगार (रेडकू), टेंपं (दांडका), इ.

घरसंसारविषयक - चुल्हा (चूल), बघूनं (पातेले), बळगी (लाकडी भांडे), मुसयली (मुसळ), ठेसणी (लाकडी मुसळ), पावशी (विळी), बटलोई (लहान निमुळते तोंडाचे तांब्याचे पाणी तापवण्याचे भांडे), संशा (पाणी तापवण्याचा तांब्याचा बंब), खोबरी (कढी किंवा वरण करण्याचे मातीचे भांडे), चाटू (डाव - हा लाकडीही असतो व लोखंडीही), सांडस (पकड), घळली (घडोली), पोयपाट (पोळपाट), तावा (तवा), झिलप्या (लाकडाच्या छिलक्या, सरपण) पयखाट्या (कपाशीच्या वाळलेल्या झाडांचे सरपण), पोथरणी (पथुरणी, अंथरूण), झावर (वाकळ), दुळली (दुरळी), इ.

आहार - भाकर (भाकरी), पोयी (पोळी), दाय किंवा वरन (डाळ किंवा वरण), संबार (चटणी), ठेसा (ठेचा), लोसन (लसूण), लोळगा (रोडगा, रोटक), कन्होळे (कडबोळे), कैरी (लोणचे), इ.

उपरोक्त लेवा गणबोलीतील व्याकरण-नियम, शब्द व संभाषण इ. सर्व प्रतीकात्मक आहे. खरे तर साहित्य म्हणून संशोधनाची आवश्यकता आहे. या भाषेवर डोंबिवलीस्थित डॉ. नि. रा. पाटील व सौ. ऊर्मिला पाटील (लेवा बोली कोशकार), पाडळसे येथील वैद्य देवराम बऱ्हाटे आणि भुसावळचे प्राचार्य तो. ना. चोपडे यांनी बरेच संशोधन केले आहे. महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषांचा तुलनात्मक अभ्यास करून पाटील दाम्पत्याने लेवागण बोलीकोश हा महाराष्ट्रातील पहिला बोलीभाषाकोश तयार केला आहे.

लेवा गणप्रदेश

ज्या भागात लेवा पाटीदार लोक राहतात अथवा ज्या भागात लेवा गणबोली बोलली जाते; त्या भागास लेवा गणप्रदेश म्हणावयास हरकत नाही. पूर्वी सप्तसिंधू प्रदेशात मालवगण म्हणजे मालव लोक राहत. त्यावरून त्या प्रदेशास मालवा म्हणत. हेच लोक मध्य प्रदेशातील पश्चिम भागात येऊन स्थायिक झाल्यावर त्या प्रदेशास माळवा हे नाव पडले आहे. त्याचप्रमाणे या प्रदेशास लेवा गणप्रदेश संबोधण्यास हरकत नाही. हा गणप्रदेश स्थूलमानाने उत्तरेस २१°२०' उ. अक्षांश, दक्षिणेस २०°१०' उ. अक्षांश, पूर्वेस ७६°३०' पू. रेखांश व पश्चिमेस ७५°००' पू. रेखांशाच्या दरम्यान मोडतो.

स्थूलमानाने त्याच्या चतु:सीमा उत्तरेकडे यावल व चोपडा तालुक्यांची सातपुड्याच्या पायथ्यापर्यंतची सीमा, उत्तरेकडे यावल व रावेर तालुक्यात खानापूरपर्यंतच्या सातपुड्याचा पायथा, खानापूरपासून पूर्वेकडे रावेर व मुक्ताईनगर तालुक्यांच्या मध्य प्रदेशास लागून असलेली सीमा, मुक्ताईनगर व जळगाव जामोद तालुक्यांची पूर्णा नदीपर्यंतची सीमा, मलकापूर व नांदुरा तालुक्यांच्या उत्तरेस पूर्णा नदी, नांदुरा व मोताळा तालुक्यांच्या पूर्व सीमा, मोताळा तालुक्याची दक्षिणेची म्हणजे अजिंठा पायथ्यापर्यंतची सीमा, मोताळा तालुक्यातील रोहिनखेड ते बोदवड, बोदवड ते जामनेर तालुक्यातील नेरीपर्यंत, नेरी ते जळगाव तालुक्यातील गिरणेकाठील धानोरेपर्यंत व धानोऱ्याच्या उत्तरेस गिरणा नदी तापी संगमापर्यंत व पुढे सातपुडा पायथ्यापर्यंत. याच्या बाहेरही पाल, रावेर, ता. अमळनेर तालुक्यातील नांदेड, एरंडोल तालुक्यातील साळवे, निशान बु ।।, टहाकळी आणि चाळीसगाव तालुक्यातील हातले व वाघळी ही गावेही आहेत. या प्रदेशात तापी, पूर्णा व गिरणा या मुख्य नद्या असून भोकर, सुकी, मोर, हरकी, वाघुरा, काग आणि विश्वगंगा या त्यांच्या महत्त्वाच्या उपनद्या आहेत. हा बहुतांश भाग तापीच्या खोऱ्याचा असून तापीचा गाळ व लाव्हापासून बनलेल्या काळ्या सुपीक मातीचा आहे. पुढील तक्त्यात लेवा गणप्रदेशातील लेवा पाटीदार आणि त्यांच्याबरोबर राहणाऱ्या इतर जातीजमातींची गावे, त्यांचे अक्षांश-रेखांश, व १९८१ नुसार क्षेत्रफळ दिले आहे.

तक्ता :
लेवा गणप्रदेशातील गावे, अक्षांश-रेखांश, क्षेत्रफळ इत्यादी

तहसील	गाव	अक्षांश-रेखांश	क्षेत्रफळ(हेक्टर)	लोकसंख्या (१९९१)
जळगाव	१. जळगाव शहर (a) (b)	२०°५५' उ, ७५°३०' पू.,	६,२२९.००	२,४२,१९३
(STD	२. आसोदे (a)	२०°५५' उ, ७५°३०' पू.,	३,००१.००	१२,४४५
code	३. भादली बु. (a)	२०°५५' उ, ७५°३०' पू.,	१,१५४.००	६,६०४
0257)	४. शेळगाव	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	१,०.८५.००	१,२१५
	५. कडगाव (a)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	२,२५१.००	३,१७४
	६. तरसोद	२०°५५' उ, ७५°३०' पू.,	८४६.००	१,९९३
	७. नशिराबाद (a)	२०°००' उ, ७५°४०' पू.,	४,६९२.००	२२,४७६
	८. निमगाव (a)	२०°१०' उ, ७५°४१' पू.,	७००.००	४८३
	९. बेळी	२०°५५' उ, ७५°४०' पू.,	८०३.००	९७१
	१०. खिर्डी	२०°५५' उ, ७५°४०' पू.,	३६५.००	१५२
	११. कानळदे	२१°१०' उ, ७५°३०' पू.,	२,०८१.००	६,४६४
	१२. ममुराबाद (a)	२०°००' उ, ७५°५०' पू.,	२,७२३.००	६,३०९
	१३. विडगाव	२१°०५' उ, ७५°३०' पू.,	६८३.००	१,९१६

	१४. आवार	२१°०५' उ, ७५°३०' पू.,	२९४.००	६३८
	१५. तुरखेडा	२१°०५' उ, ७५°३०' पू.,	२८०.००	४६४
	१६. जळगाव खु.	२१°००' उ, ७५°३०' पू.,	६४८.००	१,८१६
धरणगाव	१७. साळवे	२१°००' उ, ७५°१५' पू.,	९२०.४२	५,९५०
(STD	१८. निशान बु.	२१°००' उ, ७५°१५' पू.,	५७६.००	७७५
code	१९. टहाकळी	२१°००' उ, ७५°२५' पू.,	५१४.००	१,२९५
02588)	२०. नांदेड	२१°००' उ, ७५°१५' पू.,	२,३११.००	५,८१६
चाळीसगाव	२१. हातले	२०°३५' उ, ७५°००' पू.,	९४२.००	१,५६०
(STD code 02589)	२२. वाघळी	२१°३०' उ, ७५°०५' पू.,	२,३३०.००	६,७२३
जामनेर	२३. आंबिलहोळ (a)	२०°५०' उ, ७५°४५' पू.,	३४४.००	५२०
(STD	२४. गाडेगाव (a)	२०°४०' उ, ७५°३५' पू.,	१,२७८.००	१,३०७
code	२५. नेरी बु. (a)	२०°३०' उ, ७५°४०' पू.,	१,३७५.१२	३,८८७
02577)	२६. नेरी दिगार (a)	२०°३०' उ, ७५°४०' पू.,	५९२.००	३,७१५
भुसावळ	२७. भुसावळ (a) (b) (c)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	३४४.००	१,४५,१४३
(STD code	२८. भुसावळ नगरीय समूह (a) (b) (c)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	१,२७८.००	१,५९,७९९
02582)	२९. कंडारी (c)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	१,१४२.००	१४,६५६
	३०. साकेगाव (b)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	१,८६१.००	५,८७९
	३१. फेकरी (a)	२१°०५' उ, ७५°४५' पू.,	३४२.००	४,५३१
	३२. साकरी (a)	२१°०५' उ, ७५°४५' पू.,	९२६.००	३,८५५
	३३. खडके (a)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	६२६.००	४,८५१
	३४. किन्ही (a)	२१°५५' उ, ७५°४५' पू.,	७२७.००	३,२०२
	३५. कन्हाळे बु.	२०°५५' उ, ७५°४५' पू.,	३२१.००	१,५६२
	३६. शिंधी	२०°५०' उ, ७५°४५' पू.,	८५५.००	१,६९८
	३७. गोजोरे	२०°५५' उ, ७५°४०' पू.,	८५१.००	१,९०८
	३८. वराडसीम	२०°४५' उ, ७५°४०' पू.,	२,०६८.००	५,८४३
	३९. सुनसगाव (a) (b)	२०°४५' उ, ७५°३५' पू.,	१,१५३.००	२,१९९
	४०. बेलव्हाळ (a)	२०°५५' उ, ७५°४०' पू.,	२५४.००	९३९
	४१. खेडी	२१°००' उ, ७५°३५' पू.,	३२३.००	५२३

	४२. विल्हाळे (a)	२०°५५' उ, ७५°५०' पू.,	२,५९३.००	१,८८५
	४३. वरणगाव (a) (b)	२१°००' उ, ७५°५५' पू.,	२,३३०.००	३३,६४४
	४४. जाटगाव	२१°००' उ, ७५°५०' पू.,	३५५.००	७६३
	४५. मन्यारखेडे	२१°००' उ, ७५°५०' पू.,	२२०.००	६९६
	४६. हातनूर	२१°००' उ, ७५°५५' पू.,	७३७.००	१,२३१
	४७. तपत कठोरे बु.	२१°००' उ, ७५°५०' पू.,	२४४.००	८४८
	४८. तपत कठोरे खु.	२१°००' उ, ७५°५०' पू.,	१२९.००	७३७
	४९. अंजनसोंडे (a)	२१°००' उ, ७५°५५' पू.,	५२६.००	१,२४९
	५०. फुलगाव (b)	२१°००' उ, ७५°५०' पू.,	८६१.००	३,१२२
	५१. सुसरी (a)	२१°००' उ, ७५°५५' पू.,	८०५.००	१,५५१
	५२. आचेगाव	२०°५५' उ, ७५°५५' पू.,	४४९.००	१,४२५
	५३. गोळेगाव बु.	२०°५५' उ, ७५°४०' पू.,	२८५.००	२४६
	५४. गोळेगाव खु.	२०°५५' उ, ७५°४०' पू.,	१६८.००	७९१
	५५. पिंपळगाव बु.	२०°५५' उ, ७५°५०' पू.,	७६०.००	१,९८७
	५६. पिंपळगाव खु. (b)	२०°५५' उ, ७५°५०' पू.,	९७६.००	१,७२१
	५७. तळवेल	२१°००' उ, ७५°५५' पू.,	१,३६४.००	१,३६७
	५८. दर्यापूर	२१°००' उ, ७५°५५' पू.,	३०६.००	५१९
	५९. काहूर खेडे	२१°००' उ, ७५°५५' पू.,	४६८.००	१,०५४
	६०. कन्हाळे खु.	२०°५५' उ, ७५°४५' पू.,	३०७.००	६६८
	६१. वझरखेडे (a)	२०°५५' उ, ७५°५५' पू.,	८७४.००	१,९३१
बोदवड (STD code 02582)	६२. बोदवड	२०°५५' उ, ७६°००' पू.,	२,२२३.००	१७,४७१
	६३. हरणखेडे	२०°५०' उ, ७६°१०' पू.,	५८८.००	१,४४९
	६४. घाणखेडे	२०°१०' उ, ७६°०५' पू.,	४५६.००	१,१६०
	६५. कोल्हाडी	२०°५५' उ, ७६°०५' पू.,	१,०२१.००	१,९६०
	६६. आमदगाव	२०°५५' उ, ७६°००' पू.,	७७३.००	१,१५३
	६७. नाडगाव	२०°५५' उ, ७६°००' पू.,	६६८.००	२,८७६
	६८. येणगाव	२०°५५' उ, ७६°००' पू.,	९९१.००	२,४८४
	६९. जामठी (b)	२०°५५' उ, ७६°००' पू.,	२८८.००	२,०२६
यावल (STD code 02585)	७०. यावल (a) (b)	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	३१३.००	२८,७४१
	७१. न्हावी (a)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	८५५.५४	११,५०३
	७२. बोरखेडे बु.	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	५६६.००	८०५
	७३. बोरखेडे खु. (b)	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	३०९.१९	१,०७०
	७४. फैजपूर (a)	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	४२५.००	२१,३२२

७५. पिंपरूड	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	१८८.१९	१,३७५
७६. आमोदे (a)	२१°०५' उ, ७५°४५' पू.,	५१७.२१	६,८१७
७७. बामणोद (a)	२१°०० उ, ७५°४५' पू.,	६८६.७८	७,११७
७८. विरोदे (a)	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	१४५.२९	१,९२०
७९. चितोडे (a)	२१°०५' उ, ७५°४०' पू.,	८४.१८	१,७३८
८०. वढोदे प्र. सावदे (b)	२१°०५' उ, ७५°४५' पू.,	२३५.९४	२९५
८१. पाडळसे (a)	२१°०५' उ, ७५°१०' पू.,	५२४.०९	६,१७६
८२. पिळोदे बु. (b)	२१°०५' उ, ७५°१०' पू.,	३६७.४७	१,३९३
८३. कोसगाव	२१°०५' उ, ७५°१०' पू.,	१६८.३६	१,१४६
८४. अंजाळे	२१°०५' उ, ७५°०५' पू.,	४८९.२८	२,८२४
८५. राजोरे	२१°०५' उ, ७५°०५' पू.,	९३.०८	१,२९५
८६. चिखली बु.	२१°०५' उ, ७५°०५' पू.,	१९१.०२	१,३७०
८७. चिखली खु.	२१°०५' उ, ७५°०५' पू.,	१०४.४१	१,१०५
८८. सांगवी बु. (a)	२१°१०' उ, ७५°३५' पू.,	४२८.१७	४,६१३
८९. अट्रावल (b)	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	३१४.०५	३,९९३
९०. भालोद (a) (b)	२१°१०' उ, ७५°४५' पू.,	५२९.३५	७,८३१
९१. हिंगोणे (a) (b)	२१°१०' उ, ७५°४५' पू.,	१,०८०.५५	५,८८६
९२. डोंगरकठोरे (a) (b)	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	१,२५४.५७	४,४७४
९३. हंबर्डी (a)	२१°१०' उ, ७५°५०' पू.,	१५८.२४	२,२०५
९४. सातोद (a)	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	३८.०४	१,७५५
९५. कोळवद	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	३५६.५४	३,१८८
९६. वड्री	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	३२७.४०	१,६६९
९७. कोपरवली	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	३३१.०४	२,८३१
९८. महेल खेडी	२१°१०' उ, ७५°३०' पू.,	५६.२५	१,२०३
९९. दहिगाव	२१°१५' उ, ७५°३५' पू.,	४६७.४३	५,०२७
१००. सावखेडेसीम	२१°१५' उ, ७५°३५' पू.,	१,११७.७८	३,३११
१०१. साकळी (a)	२१°१०' उ, ७५°३०' पू.,	९५६.३१	७,६४५
१०२. शिरसाड	२१°१०' उ, ७५°३०' पू.,	६७६.६६	२,८४३
१०३. किनगाव बु.	२१°१५' उ, ७५°२५' पू.,	१७८.०७	६,४२०
१०४. किनगाव खु.	२१°१५' उ, ७५°२५' पू.,	१८९.८०	२,८३८
१०५. मालोद	२१°१५' उ, ७५°२५' पू.,	२५३.३४	१,५३७
१०६. डांभुर्णी (b)	२१°०५' उ, ७५°३०' पू.,	८८२.६५	५,४२०
१०७. चुंचाळे	२१°१५' उ, ७५°१५' पू.,	४४३.९६	२,०३५
१०८. नायगाव (b)	२१°१५' उ, ७५°२०' पू.,	३५७.७५	४,७२९
१०९. मोहराळे	२१°१०' उ, ७५°४०' पू.,	६८९.६१	२,१६९

रावेर	११०. विवरे बु.	२१°१०' उ, ७५°५५' पू.,	१,६०८.००	५,८०२
(STD	१११. विवरे खु.	२१°१०' उ, ७५°५५' पू.,	१,२८४.००	३,५८५
code	११२. कुसुंबे बु.	२१°१५' उ, ७५°५५' पू.,	५२७.६६	१,७५८
02584)	११३. कुसुंबे खु. (a)	२१°१५' उ, ७५°५५' पू.,	३८८.२७	१,६२७
	११४. उटखेडा	२१°१०' उ, ७५°५५' पू.,	६४०.००	२,४४१
	११५. खानापूर	२१°१५' उ, ७६°०५' पू.,	७९२.६१	३,७६६
	११६. कर्जोद	२१°१५' उ, ७६°०५' पू.,	८३७.२९	२,५४१
	११७. अहिरवाडी	२१°१५' उ, ७६°१५' पू.,	७३३.३४	३,५५५
	११८. सावदे (a)	२१°००' उ, ७५°५०' पू.,	२०७.००	१७,६७४
	११९. चिनावल	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	१,३६८.५२	९,६३४
	१२०. कुंभारखेडा	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	५४९.९५	२,७५०
	१२१. वाघोदे बु.	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	१,०५९.००	६,७२५
	१२२. वाघोदे खु. (b)	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	४४३.१०	१,५९०
	१२३. खिरोदे प्र. यावल	२१°१०' उ, ७५°५०' पू.,	१,७८१.६८	५,७८८
	१२४. रोझोदे	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	६२७.२१	४,३३८
	१२५. कळमोदे	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	५०१.०२	१,९७९
	१२६. सावखेडे बु.	२१°१५' उ, ७५°५०' पू.,	९१८.५०	२,११०
	१२७. पाल	२१°२०' उ, ७५°५०' पू.,	२,४९५.८९	५,६५२
	१२८. निंभोरे बु.	२१°१०' उ, ७५°५५' पू.,	१,३११.००	८,८३२
	१२९. खिर्डी बु.	२१°१०' उ, ७५°५५' पू.,	३१४.००	३,७८४
	१३०. खिर्डी खु.	२१°१०' उ, ७५°५५' पू.,	२७९.००	३,२८८
	१३१. थोरगव्हाण (b)	२१°००' उ, ७५°५०' पू.,	१,०८९.००	४,०५६
	१३२. मांगी (b)	२१°००' उ, ७५°५०' पू.,	२३२.००	४३२
	१३३. सुदगाव (b)	२१°००' उ, ७५°५०' पू.,	३२९.९३	५१५
	१३४. मस्कावद बु. (a)	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	३८८.९७	२,३६९
	१३५. मस्कावद खु. (a)	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	२०३.५९	८१६
	१३६. उधळी बु.	२१°००' उ, ७५°५५' पू.,	५२६.०८	१,२२३
	१३७. उधळी खु.	२१°००' उ, ७५°५५' पू.,	४५६.३३	१,३५९
	१३८. सुनोद	२१°०५' उ, ७५°५५' पू.,	४५६.३३	१,२८४
	१३९. रावेर	२१°१०' उ, ७६°००' पू.,	२२३.००	२३,९२०
	१४०. गाते (b)	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	२६८.०५	२,३०७
	१४१. चुनवाडे (b)	२१°०५' उ, ७५°५०' पू.,	१७३.६३	१,३६४
मुक्ताईनगर	१४२. मुक्ताईनगर (a) (b)	२१°००' उ, ७६°००' पू.,	२,११७.१८	१४,०४४
(STD	१४३. कोथळी (a)	२१°००' उ, ७६°००' पू.,	७०२.१४	२,११५

code	१४४. सालबर्डी	२१°००' उ, ७६°००' पू.,	३७४.८७	१,४४८
02583)	१४५. चांगदेव	२१°००' उ, ७६°००' पू.,	१,३०७.३७	३,९३२
	१४६. मेहूण	२१°०५' उ, ७५°५५' पू.,	३७२.४५	६९४
	१४७. निमखेडी बु.	२१°४०' उ, ७५°५५' पू.,	४७२.५९	२,३४३
	१४८. निमखेडी खु.	२१°४०' उ, ७५°५०' पू.,	४७२.५४	१,९८१
	१४९. चारठाणे (a)	२१°००' उ, ७६°१०' पू.,	३,८५८.६८	२,०३२
	१५०. रुईखेडे	२१°५५' उ, ७६°०५' पू.,	१,६४२.७९	२,९३९
	१५१. हिवरे	२१°२५' उ, ७६°१०' पू.,	३४१.००	५७३
मलकापूर	१५२. दुधलगाव बु.	२०°४५' उ, ७६°१५' पू.,	१,०००.००	१,७९९
(STD	१५३. दुधलगाव खु.	२१°१५' उ, ७६°०५' पू.,	४०३.००	७४०
code	१५४. नरवेल	२०°५५' उ, ७६°१०' पू.,	१,७५२.००	३,८८०
07267)	१५५. झोडगा	२०°५५' उ, ७६°१५' पू.,	९८५.००	२,५०६
	१५६. तांदूळवाडी प्र. मलकापूर	२०°५५' उ, ७६°१५' पू.,	१८८.००	१,३४३
	१५७. तालसवाडा (a)	२०°५५' उ, ७६°१५' पू.,	७७९.००	१,२८१
	१५८. म्हैसवाडी (a)	२१°००' उ, ७६°१५' पू.,	६३९.००	१,७३५
	१५९. दसरखेड	२१°००' उ, ७६°१५' पू.,	८१९.००	१,२४९
	१६०. विवरा	२०°२५' उ, ७६°५०' पू.,	९११.००	१,४३४
	१६१. धरणगाव	२०°५५' उ, ७६°१५' पू.,	८७७.००	३,४०७
	१६२. अनुराबाद	२०°५५' उ, ७६°१५' पू.,	५९९.००	१,२७४
	१६३. कुंड बु.	२०°५०' उ, ७६°१०' पू.,	४६५.००	१,२४५
	१६४. कुंड खु.	२०°५०' उ, ७६°१०' पू.,	४६७.००	१,२०७
	१६५. निंबारी	२०°४५' उ, ७६°१५' पू.,	८३४.००	९२७
	१६६. माळेगाव प्र. मलकापूर	२०°४५' उ, ७६°००' पू.,	५७९.००	१,४५६
	१६७. जांभूळधाबा	२०°४५' उ, ७६°१०' पू.,	१,०३६.००	२,०१४
	१६८. लोणवाडी प्र. मलकापूर	२०°५०' उ, ७६°०५' पू.,	७२४.००	१,३८७
	१६९. आळंद (a)	२०°५०' उ, ७६°०५' पू.,	७४९.००	१,०८८
	१७०. हरणखेड (a)	२०°५०' उ, ७६°००' पू.,	२८१.००	१,४५६
	१७१. वडजी	२०°४५' उ, ७६°००' पू.,	८३७.००	१,५०८
	१७२. दाताळा	२०°४५' उ, ७६°१५' पू.,	१,६०९.००	६,२१५
	१७३. सिराढोण	२०°४५' उ, ७६°१५' पू.,	३३१.००	१,१७४
	१७४. मोरखेड खु.	२०°४५' उ, ७६°१५' पू.,	३६४.००	२९७
	१७५. वरखेड	२०°४५' उ, ७६°२०' पू.,	१,२५८.००	२,३५८
	१७६. निमखेड	२०°४०' उ, ७६°२०' पू.,	८२७.००	१,११७
	१७७. मलकापूर	२०°४५' उ, ७६°१५' पू.,	५१२.००	५१,३११

मोताळा	१७८. मोताळा	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	१,००७.००	६,०७७
(STD	१७९. बोराखेडी	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	४८३.००	२,६८६
code	१८०. पुन्हई	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	६९०.००	९९१
07262)	१८१. तरोडा	२०°३०' उ, ७६°२०' पू.,	९९३.००	३,१२०
	१८२. आडविहीर	२०°४०' उ, ७६°१५' पू.,	८६७.००	१,९३१
	१८३. खरबडी (a)	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	६३७.००	२,४६३
	१८४. वाडी	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	५८५.००	४८८
	१८५. पिंपरीगवळी	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	७२९.००	२,९००
	१८६. माकोडी	२०°४५' उ, ७६°०५' पू.,	४७१.००	२,५३५
	१८७. जहागीरपूर	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	४०१.००	१,२१७
	१८८. टेंभी	२०°४५' उ, ७६°०५' पू.,	३५६.००	३४८
	१८९. दाभाडी (a)	२०°४५' उ, ७६°१०' पू.,	७६८.००	१,७९३
	१९०. तळणी (a)	२०°४५ उ, ७६°१०' पू.,	१,०९३.००	२,५२९
	१९१. शेलापूर खु.	२०°४५' उ, ७६°१०' पू.,	७९२.००	२,४३४
	१९२. शेलापूर बु.	२०°४५' उ, ७६°१०' पू.,	३४६.००	१,८५९
	१९३. शेलगाव बाजार	२०°४५' उ, ७६°०५' पू.,	३६१.००	१,८२०
	१९४. सावरगाव जहागीर	२०°४५' उ, ७६°०५' पू.,	७०२.००	१,२६७
	१९५. निपाणा (a)	२०°४५' उ, ७६°०५' पू.,	८८५.००	१,२३३
	१९६. माळेगाव	२०°४५' उ, ७६°२५' पू.,	१,१९३.००	१,४५६
	१९७. चिंचखेड खु.	२०°४५' उ, ७६°००' पू.,	५३१.००	३१८
	१९८. तालखेड	२०°४०' उ, ७६°१०' पू.,	१,१५८.००	२,३७३
	१९९. चिंचपूर	२०°२५' उ, ७६°३०' पू.,	३७९.००	९०७
	२००. वरूड (a)	२०°४०' उ, ७६°१५' पू.,	७६७.००	८२६
नांदुरा	२०१. नांदुरा शहर	२०°५०' उ, ७६°३०' पू.,	३४४.००	३१,८३५
(STD	२०२. नांदुरा बु.	२०°५०' उ, ७६°३०' पू.,	१,१४२.००	११७
code	२०३. नांदुरा खु.	२०°५०' उ, ७६°३०' पू.,	४३५.००	३७
07279)	२०४. चांदुरा बिसवा	२०°५०' उ, ७६°१०' पू.,	१,२४२.००	५,६७२
	२०५. दिधी	२०°४५' उ, ७६°३०' पू.,	७८६.००	२,०१८
	२०६. फुली	२०°४५' उ, ७६°३०' पू.,	६४७.००	१,४५२
	२०७. मेंढळी	२०°४०' उ, ७६°२५' पू.,	७०७.००	१,१८९
	२०८. शेंबा बु.	२०°४०' उ, ७६°१५' पू.,	३७६.००	२,३२५
	२०९. सिरसोडी	२०°४५' उ, ७६°२०' पू.,	५४१.००	१,०५९
	२१०. टाकरखेड	२०°४५' उ, ७६°१५' पू.,	७८६.००	२,७३७

टिप :-

१) अ) अशी खूण असलेल्या गावांमध्ये नवघरे अथवा गाडेगावकरांचीही वस्ती आहे.

ब) अशी खूण असलेल्या गावांमध्ये थोरगव्हाणे यांचीही वस्ती आहे.

क) अशी खूण असलेल्या गावांमध्ये कंडारकर यांचीही वस्ती आहे.

२) जळगाव शहरात मेहरूणचा समावेश आहे.

३) खेड्यांचे क्षेत्रफळ १९८१ च्या जनगणनेनुसार आहे.

४) शहरांचे क्षेत्रफळ १९९१ च्या जनगणनेनुसार आहे.

५) उपरोक्त गावांमध्ये लेवा पाटीदारांशिवाय इतर जाती-जमातीचीही आकडेवारी समाविष्ट असून सरासरी ५० टक्के आकडेवारी लेवा पाटीदारांची मानण्यास हरकत नसावी (लेखकाच्या मते).

६) १९९१ नंतर भुसावळ तहसीलचे विभाजन करण्यात आले. लेवा पाटीदार असलेल्या उपरोक्त तक्त्यातील क्र. ६२ ते क्र. ६९ गावे नव्याने स्थापण्यात आलेल्या बोदवड तहसीलमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

७) १९९१ नंतर एरंडोल तहसीलचे विभाजन करण्यात आले. नव्याने स्थापण्यात आलेल्या धरणगाव तहतहसीलमध्ये लेवा पाटीदारांची वस्ती असलेले अमळनेर तहसीलमधील नांदेड आणि एरंडोल तहसीलमधील निशान व साळवे ही गावे समाविष्ट करण्यात आली आहेत.

८) १९९१ मध्ये मलकापूर तहसीलचे विभाजन करण्यात आले आणि मोताळा व नांदुरा हे दोन नवीन तहसील निर्माण करण्यात आले. उपरोक्त तक्त्यातील क्र. १५२ ते क्र. १७७ पर्यंतची लेवा पाटीदारांची गावे मलकापूर तहसीलमध्ये; क्र. १७८ ते क्र. २०० पर्यंतची लेवा पाटीदारांची गावे मोताळा तहसीलमध्ये आणि २०१ ते २१० पर्यंतची गावे नांदुरा तहसीलमध्ये समाविष्ट आहेत.

९) गाव क्र. २७ (भुसावळ शहर) ची आकडेवारी गाव क्र. २८ (भुसावळ नगरीय समूह) मध्ये समाविष्ट आहे.

लेवा पाटीदारांची १९११ नंतर स्वतंत्र गणना केलेली नसल्याने लेवा पाटीदारांची वस्ती असलेल्या गावांमध्ये सरासरी ५० टक्के लोक लेवा पाटीदार आहेत, असे गृहीत धरल्यास १९९१ च्या जनगणनेनुसार जळगाव जिल्ह्यात सुमारे ४,९१,२२८ व बुलडाणा जिल्ह्यात सुमारे ५८,५२२ लोक लेवा पाटीदार असावेत असे अनुमान काढता येईल. म्हणजे जळगाव जिल्ह्यात जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या १५.४१% आणि बुलडाणा जिल्ह्यात जिल्ह्यातील एकूण ३.१०% लोक लेवा पाटीदार असावेत आणि दोन्ही जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येची टक्केवारी केल्यास दोन्ही जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येच्या १०.८३% लोक लेवा पाटीदार असावेत. मात्र, लेखकाने जो लेवा गणप्रदेश दाखविला आहे; त्या लेवा गणप्रदेशातील एकूण लोकसंख्येच्या किमान ५० टक्के लोक लेवा पाटीदार आहेत.

निष्कर्ष

१) खानदेशी बोलीभाषा म्हणजे अहिराणी बोलीभाषा असे जे समीकरण महाराष्ट्रात सर्वत्र झालेले आहे; ते अर्धसत्य असून लेवा पाटीदार महाराष्ट्रातील खानदेश - वऱ्हाडाच्या ज्या भागात वस्ती करून आहेत; त्या लेवा गणप्रदेशातील बोलीभाषा ही स्वतंत्र बोलीभाषा आहे.

२) या बोलीभाषेवर अहिराणी व वऱ्हाडी या बोलीभाषांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला आहे. त्याशिवाय, तिच्यात घाटोळी-वऱ्हाडी, झारपी, गोवारी-वऱ्हाडी आणि कोष्टी-वऱ्हाडी या बोलीभाषांचाही थोड्या प्रमाणावर प्रभाव पडला आहे.

३) या भागात लेवा पाटीदार राहत असल्याने त्यास लेवा गणप्रदेश व या भागात बोलली जाणारी वऱ्हाडी-खानदेशी ही बोलीभाषा लेवा पाटीदारांची बोलीभाषा असल्याने तिला लेवा गणबोली म्हणणे सयुक्तिक ठरेल.

४) लेवा पाटीदार या शेतकरी समाजावर अवलंबून असलेल्या या लेवा गणप्रदेशातील बलुतेदारांचीही हीच लेवा गणबोली आपली बोलीभाषा झालेली आहे.

प्रकरण ३ - तळटिपा

१. श्री. मधुकरराव चौधरी, ''प्रिय अमुचा खानदेश हा'', **सोन्याचा पिंपळ,** दी जळगाव पीपल को-ऑप. बँक लि., सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, १९८४, पृ. ८७.

२. डॉ. कि. का. चौधरी, ''संस्कृती'', **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. ७३८-३९ च्या आधारे.

३. डॉ. नि.रा. पाटील, **खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाजः एक अन्वयार्थ** (प्रथमावृत्ती). २००३, पृ. ४१.

४. य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, **महाराष्ट्र शब्दकोश,** भाग ३, पृ. ५ (प्रस्तावना).

५. कित्ता, पृ. ५.

६. कित्ता, खंड ५, पृ. ४५.

✧✦✧

प्रकरण ४

कुळे, कुलदेवता व गोत्रे

प्रस्तावना

लेवा पाटीदार समाजातील लोकांना आपली गोत्रे सांगता येत नसत. गोत्रांची प्रथा या दोन-तीन दशकांत रूढ झाल्याचे दिसते. पूर्वी त्यांची गोत्रे त्यांचे पुरोहित ब्राह्मण सांगत असत. लेवा गुजरांप्रमाणेच यांची अंबिक, अत्री, भारद्वाज, गर्ग्य, गौतम, जामदग्न्य, काश्यप, कौशिक, कौशल्य, प्रयाग आणि वसिष्ठ ही ११ गोत्रे असावीत, असे **जळगाव गॅझेटिअरमध्ये** केलेले विधान अर्धसत्य वाटते. इंदूरस्थित तळवेलचे श्री. वासुदेव एच. पाटील यांनी लेवा पाटीदारांच्या बहुतेक कुळांची गोत्रे शोधून काढली आहेत. ती शं. वि. पाटील यांच्या पुस्तकात सविस्तर दिलेली आहेत.

गोत्र : गोत्राचे अनेक अर्थ आहेत जसे - गायीचा गोठा, गार्यीचा कळप, मेघ, पर्वतश्रेणी, पर्वतशिखर, किल्ला, समूह, इत्यादी. **छांदोग्योपनिषदात** कुटुंब याअर्थी गोत्र शब्द आलेला आहे. यावरून व त्याचा पुढे एकाच वंशातले लोक असा अर्थ केला गेला. गो=भूमी व त्र=संरक्षक, यावरून भूमिसंरक्षक वर्ग असाही कोणी गोत्र शब्दाचा अर्थ करतात. यावरून आपल्या भूमीच्या बाहेरची म्हणजे दुसऱ्या गोत्रातील मुलगी करणे किंवा पळवून आणणे, हाच पुरुषार्थ होय, अशा कल्पनेमुळे गोत्राबाहेर लग्न करण्याची प्रथा रूढ झाली असावी. **बोधायनानुसार** विश्वामित्र, जमदग्नी, भारद्वाज, गौतम, अत्री, वसिष्ठ व कश्यप हे सात व आठवा अगस्त्य या ऋषींच्या अपत्यांना गोत्र असे नाव असून ती असंख्य आहेत.

या आठ ऋषींना गोत्रकृत, गोत्रकार, वृद्ध, स्थवीर किंवा वंश्य असे म्हटलेले

आहे. प्रत्येक वंशातील कर्तबगार पुरुषापासून स्वतंत्र गोत्र निर्माण झाले. सूत्रकाळात गोत्राला अनेक बाबतीत महत्त्व प्राप्त झाले. सगोत्र विवाह निषिद्ध मानले जाऊ लागले, प्रेताला उदक देताना गोत्राचा उच्चार करू लागले. चौलकर्मात गोत्राच्या रुढीप्रमाणे शेंडी ठेवू लागले. संध्यादीमध्ये गोत्रोच्चार करणे, श्रौतकर्मात यजमानाने गोत्राचा उच्चार करणे याला महत्त्व आले.

धर्मशास्त्र व पुराणे यांच्या गोत्रकल्पनेत फरक दिसतो. धर्मशास्त्रात ऋर्षीची अपत्ये गोत्रे होत असे सांगितले आहे, तर पुराणात क्षत्रिय राजे गोत्रकार होते व त्या क्षत्रिय गोत्रकार राजांच्या वंशात पुढे ब्राह्मणही समाविष्ट झालेत. श्रीकृष्ण व पांडव ज्या सोमवंशात जन्मले त्यात पुढे मधू, यदू, वृष्णी वीर झालेत. वृष्णीवरून स्वतंत्र गोत्र झाले. ज्या वेळी स्वतःच्या गोत्राचा विसर होतो त्या वेळी पुरोहिताचे गोत्रप्रवर स्वीकारले जाते किंवा कश्यप हे मूळ गोत्र लावले जाते.

पूर्वी गुरुगोत्रे स्वीकारून 'मी अमुक गुरूंचा शिष्य आहे' असे सांगत. सांप्रत एका गोत्रातील लोक म्हणजे एका वंशातील लोक अशी समजूत आहे, ती खरी नाही.

लेवा पाटीदारांना प्रतिहारांच्या शद्धीकरणानंतर लावण्यात आलेल्या गोत्रांची व प्रवरांची यादी प्रकरणाच्या शेवटी परिशिष्टात दिली आहे.

पिंड : पिंड म्हणजे भाताची मूद, सपिंड म्हणजे जवळचे नातेवाईक! हे जवळचे नातेवाईक मृत व्यक्तीला पिंडदान करतात म्हणून ते सपिंड मानले जातात. समान रक्तगटात विवाह केल्याने वंशात गुणवत्ता घटते, संतती सदोष असू शकते, म्हणून सपिंड विवाह वर्ज्य होय.[१] तथापि लेवा पाटीदारांमध्ये मामेबहिणीशी सहसा विवाह करीत नसले तरी असा विवाह करणे निषिद्ध मानत नाहीत. जसे आतेबहीण व मावसबहिणीशी विवाह निषिद्ध मानतात. लेवा पाटीदारांमध्ये गोत्र-प्रवरांपेक्षा कुळाला अधिक महत्त्व दिले जाते. गुर्जरांपासून निर्माण झालेली ही अंतर्विवाही (Endogamous) शाखा असल्यामुळेच कुळांना महत्त्व दिले जाते. म्हणजेच सकूळ विवाह कोणत्याही परिस्थितीत करीत नाहीत आणि मामेबहीण ही सकुळात मोडत नाही. त्यांचे गोत्र व प्रवर एक येत नाही. म्हणजेच सकुळ, सगोत्र व सप्रवर ठरत नाही. म्हणून मामेबहिणीशी विवाह करणे निषिद्ध मानत नसावेत, मात्र मराठ्यांप्रमाणे मामेबहिणीला अग्रक्रमही देत नाहीत.

कुल : लेवा पाटीदारांमध्ये विवाह जुळविताना गोत्र, प्रवर व पिंडीपेक्षा कुलाला महत्त्व दिले जाते. हे लोक अंतर्विवाही असल्याने सकूळ विवाह मुळीच करीत नाहीत.

कुल=गोळा करणे, एकत्र येणे, या धातूवरून कुल शब्द बनलेला आहे. आप्तसंबंधाने एकत्र आलेले, एका रक्ताचे व संबंधी असे जेवढे लोक असतील, त्या सर्वांचे मिळून कुल बनते. मराठीत कुल शब्दाला घराणे असा प्रतिशब्द आहे. कुलीन, कुलस्त्री, कुलवधू, इत्यादी शब्दांवरून कुल शब्दाचा मूळ अर्थ शुद्धवंश असा असल्याने विवाहसंस्था

दृढमूल झाल्यावर कुल शब्द अस्तित्वात आला. **ऋग्वेदात** कुलुपाचा अर्थ गृहरक्षक अथवा गृहपती असा होतो (१०-१७९-२). लेवा पाटीदार समाजाने क्षत्रियांची पितापुत्र परंपरा स्वीकारली आहे. कुल अतिशय प्रिय असल्याने कुलाच्या प्रतिष्ठेकडे विशेष लक्ष असते. कुलात उत्पन्न झालेल्यांना कुलीन, महाकुलातील वंशास महाकुलीन कुळे म्हणतात. लेवा पाटीदार हे स्वतःच सूर्यवंशातील म्हणजे सूर्यकुलातील मानतात. अग्निकुलोत्पन्न प्रतिहारांनी उत्तर भारतावर राज्य केल्यावर स्वतःस अग्निकुलीन म्हणजे सूर्यवंशीय असे गृहीत धरून सूर्यकुलातील असल्याचे जाहीर केल्याने प्रतिहारांपासून जेवढ्या काही शाखा, जाती, पोटजाती पुढे निर्माण झाल्या, त्या सर्व स्वतःस सूर्यकुलीन समजू लागल्या.

कुळे : जसजसा वंशविस्तार होत राहिला तसे प्रत्येक व्यक्तीचा नामनिर्देश वंश, गोत्र, प्रवर यांनी करणे अपुरे वाटू लागले म्हणून प्रवर ऋषींनी गावावरून, देशावरून, कर्मावरून; प्राणी, पक्षी व वस्तूंवरून, विशिष्ट गुणधर्मावरून, व्यंग वा सवयींवरून कुळे निर्माण केली. आडनावे म्हणजे कुलनामे असे असले तरी सर्वच आडनावे कुलनामे किंवा कुळे नसतात. उदा. पाटील, महाजन, चौधरी, देशमुख, ही लेवा पाटीदारांमधील आडनावे कुळे नाहीत. या आडनावांचीही स्वतंत्र कुळे असतात. पूर्वी लेवा पाटीदारांची कुळे हीच आडनावे असत. परंतु, कालांतराने काहींना वतने, हुद्दे, पदव्या मिळाल्याने त्यांची आडनावे बदललीत, कुळे मात्र तीच राहिलीत. यांची कुळे बहुतेक एकारान्ती असून काही अपवाद वगळता तीन अक्षरी आहेत. लेवा पाटीदारांची आडनावे (कुळे) खाली दिली आहेत.

१) **पदवी, हुद्दा किंवा वतनांवरून पडलेली :** देशमुख, पाटील, महाजन, चौधरी, (ही फक्त आडनावे आहेत. कुळे नाहीत. यांची स्वतंत्र कुळे आहेत).
२) **धंद्यावरून पडलेली :** वाणी, अत्तरदे, नाले, कोळंबे (कुळंबिकी=शेती करणारे), जावळे (जावळ काढणारे), सराफ.
३) **गावांवरून व स्थळांवरून :** सावदेकर (मात्र हे असोदे, भादलीस आहेत), भोरटक्के (भोरटेकवरून पण हे सावद्यास आढळतात), वाघोदे (वाघोडावरून - हे भुसावळ भागात आढळतात), चोपडे, धाबकर, येवले (नाशिक जिल्ह्यातील येवले नाव कसे चिकटले हा संशोधनाचा विषय), टेकाडे (टेकडीवरून), बोरावले (बोरावलवरून), वराडे, नेमाडे (नेमाडवरून), वारके (वारखेडवरून), भालोदे, वाघुळदे, असोदेकर, चिनावलकर, अट्रावलकर, नायगावकर, चिनावले, पेठकर, हिंगोणेकर, खडके, इ.
४) **रंगावरून :** काळे.
५) **संख्येवरून :** पाचपांडे, परतने (परिमाणावरून).
६) **प्राणिवाचक :** कोल्हे, होले, कावळे.
७) **वृक्ष आणि वनस्पतीवरून :** गाजरे, धांडे (ज्वारीच्या ताटास खानदेशात धांडा

किंवा तोटा म्हणतात), जंगले, बोरोले, बोरले, बोंडे, कवटे, पिंपळे.

८) **वस्तू व पदार्थावरून :** लोखंडे, सुपे, गुळे, गुळवे, रोटे, लढे (खानदेशात बैलगाड्यास लढं किंवा लढे म्हणतात), करांडे, फिरके.

९) **व्यंगात्मक :** नकले, फिरके, उन्हाळे, फेगडे, रोठे, रडे, बोंबले, टोके, धंडारे, बेंडाळे, बोंडे, लोंढे, कुरकुरे, फाल्गुने (फाल्गुन मासावरून), टोंगळे, ठोबरे.

१०) **गुणवाचक :** जयताडे, भोळे, ब्राह्मंदे, झोपे, भोगे, टोके, भोगे

११) **इतर :** सरोदे, तळेले, ठोंबरे, झांबरे, नेहते, नाफडे, फालक, भंगाळे, बढे, किनगे, किरंगे, नारखेडे, कोलते, भारंबे, वाळके, भिरूड, खाचणे, रिघोरे, इंगळे, पाचपांडे, खडसे, खर्चे, बऱ्हाटे, बोरोले, ढाके, डहाके, वायकोळे, खडके, बराटे, आटाळे, चिरमाडे, बर्डे, पिंपरकर, भोरटक्के, राणे, कोलते, वारके, चोपडे, गारसे, कोळंबे, लोमटे, परतने.

श्री. वासुदेव हरी पाटील यांच्या मते लेवा पाटीदारांमधील काही आडनावे/कुळे खालीलप्रमाणे निर्माण झाली असावीत.

भोळे - या परिवारातील मूळ पुरुष भोळा असेल.

राणे - या परिवारातील मूळ पुरुष राजन्य (राणा) परिवाराशी संबंधित असेल किंवा भाऊबंद असेल.

नेहते - या परिवारातील मूळ पुरुष न होते म्हणजे गावात आहे किंवा नाही अशा प्रकारे राहत असतील.

खर्चे - या परिवारातील लोक खर्चिक असतील.

कुरकुरे - या परिवारातील लोक पैसा देण्या/घेण्यात कुरकुर करीत असतील.

खडके - या परिवारातील लोक खडके गावातील असतील.

वाघोदे - आडनाव वाघोडे गावावरून पडले असेल.

वाघुळदे - आडनाव वाघुळदे गावावरून पडले असेल.

नाले - नाल्याच्या तीरावर राहत असतील.

वाणे/वाणी - वाण्याचा व्यवसाय केला असेल.

रडे- देणे, घेणे आदी व्यवहारांत बरोबर नसतील (रडत असतील).

परतणे- जमिनीचे निश्चित माप (परतन यावरून).

लोखंडे- लोखंड विकण्याचा व्यवसाय केला असेल.

श्री. वासुदेव हरी पाटील यांच्या मते उपरोक्त कुळांमधील खालील कुळे गुजरातमधून आलेली असून त्या कुळांच्या पुढे त्यांचे गुजरातमधील मूलग्राम दिले आहे. राणे-रेलवाड, लोखंडे-मणिपूर, वारके-वैजलपूर, वाणे (वाणी)-बालवाडे, कोलते-बारडोली, धंडारे-धुंडके, बोरोले-पावागड, फेगडे-अनकवाडू, वराडे-अहमदाबाद, गाजरे-अनकवाडू, रोठे-अहमदाबाद, पाटील (पाडळसे)-सुरत, कोल्हे-भडोच, फालक-हिरापूर, खर्चे-आनंदपूर,

रिघोरे-खोडबारा, सरोदे-अनकवाडू, भारंबे-चांपानेर, नेहते-मणिपूर, बेंडाळे-आनंदपूर, पाटील (भादली)-नांदोद; ढाके, डहाके-डोलपूर, नेमाडे-अनकवाडू, झांबरे-सागबारा, वारके (इदगाव)-मणिपूर, खाचणे-नवसारी, भंगाळे-चांपानेर, फिरके-पावागड, भोळे-अनकवाडू, ठोंबरे-मेहसाणा, सुपे-आनंदपूर, सरोदे-अनकवाडू, बऱ्हाटे-मणिपूर, तळेले-पावागड, पाचपांडे-पावागड, धांडे-मणिपूर, झोपे-कडवीर, येवले-आनंदपूर, इंगळे-अनकवाडू, फेगडे-अनकवाडू, होले-मणिपूर, भिरूड-अहमदाबाद, जंगले-रिझोदा, वाघोदे-पालनपूर, बोंडे-वेळदे, नाले-बडोदे, अत्तरदे-नवसारी, चोपडे-पावागड आणि कोळंबे-पावागड. अर्थात, आडनावे ठेवण्याची प्रथाच मुळात पंधराव्या, सोळाव्या शतकात सुरू झाली. त्यामुळे ही सर्वच माहिती गोत्रांवरून जुळलेली दिसते.

मिलिटरी गॅझेटिअर-टाऊन ॲण्ड व्हिलेज डिरेक्टरीचा अभ्यास केला असता यातील बरीच स्थाने संशयास्पद वाटतात. कारण, सदर डिरेक्टरीनुसार गुजरातमध्ये रिझोदा, रेलवाड, बालवाडे, धुंडके, मणिपूर, नांदोद, अनकवाडू, आनंदपूर अशी गावे आढळत नाहीत. मिलिटरी गॅझेटिअरमध्ये जी गावे आज नाहीत; परंतु पाच-सहाशे वर्षांपूर्वी अस्तित्वात होती, त्यांचीही दखल घेतली असून त्यांना ओसाड गावांच्या यादीत टाकलेले आहे. अशा ओसाड (deserted) गावांच्या यादीतही उपरोक्त ग्रामनामे नाहीत. उपरोक्त गावांमध्ये रेलवाडऐवजी रैला अथवा रेलवा या दोन्हीपैकी एक असावे. बालवाडेऐवजी बालवारा, धुंडकेऐवजी धुंडेसा किंवा धुंडी असावे. मणिपूरऐवजी सोजित्राजवळील महीनगर अथवा मिननगर असावे. मेहसाणा भागात लेवा पाटीदारांची वस्ती नसून कडवा पाटीदारांची आहे. सागबारा व खोडबारा भागातही लेवा पाटीदारांची वस्ती नसून कडवा पाटीदारांची आहे. सुरत-नवसारी भागात आंजणा कुणब्यांची वस्ती आहे. अनकवाडू गावाऐवजी अनहिलवाड हे गाव असावे. आनंदपूरऐवजी आणंद असावे. आनंदपूर गाव पंजाबमध्येही आहे. त्याचा लेवा पाटीदारांच्या स्थलांतरणाशी काही संबंध पोहोचत असेल असे वाटत नाही. पालनपूर भागातही लेवा पाटीदारांची वस्ती नसून कडवा पाटीदारांची आहे. खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार हे प्रामुख्याने रेवा चरोतर (आणंद, बोर्साद, नडियाद, सोजित्रा, भडोच हा भाग) व पावागड-चांपानेर येथून आले आहेत असे मानले जाते; आणि श्री. शं. वि. पाटील आणि श्री. वा. ह. पाटील यांच्या म्हणण्यानुसार लेवा पाटीदार पालनपूर, कडी, मेहसाणा, सुरत, सागबारा व खोडबारा भागातूनसुद्धा आले आहेत. हे मान्य केले तर या लोकांत केवळ पाटीदार अथवा लेवा कणबीच नसून त्यांच्यात कडवा, आंजणा, मतिया व मोम्ना या पाटीदार व कणब्यांचाही समावेश असणे शक्य आहे आणि इकडे आल्यावर विवाहसोयरीक, कूळधर्म व कुळाचार आदी संस्कार पार पाडण्यासाठी त्यांनी आपल्या सोयीस्तव गुजरातमधील जुन्या पोटजाती, गोल व भेदांचा परित्याग करून फक्त लेवा पाटीदार संज्ञेचा एकच आंतरविवाही भेद स्वीकृत केला असावा. यातच समाजात भिनलेली

सर्वसमावेशकता दिसून येते. याबाबतचे विवेचन पुढे आणखी गोत्र सदरात आले आहे.

कुलदेवता

धर्मशास्त्रानुसार सर्व हिंदू धर्मीयांचे मूळ कुलदैवत काशी विश्वेश्वर आणि मूळ कुलदेवता वैष्णवीदेवी अगर कालीमाता आहे. वंश, गोत्र, प्रवर, वर्ण, जाती-पोटजाती यांच्या वाढीमुळे मूळ कुलदैवत आणि मूळ कुलदेवता यांचा विसर पडला, असे म्हणण्याऐवजी सोयीनुसार स्थानिक प्रचलित देव-देवतांना महत्त्व प्राप्त झाले आणि कूळधर्म व कुळाचारासाठी सोयीनुसार प्रचलित लोकदेवदेवतांना (folk-deities) शंकर व पार्वतीची रूपे मानून त्यांनाच कुलदैवत व कुलदेवता म्हणून स्वीकृत करण्यात आले. लेवा पाटीदारांबाबतही काहीसे असेच सांगता येईल. तसे पाहिले तर गुजरातमधील लेवा पाटीदारांची मूळ कुलदेवता सोजित्रा येथील खोजाईदेवी (क्षेमकल्याणी) व त्यानंतर पावागडची पावादेवी तथा महाकाली सांगितली जाते. खानदेशातील स्थलांतरणानंतर येथील पार्वतीची जी स्थानिक रूपे सांगितली जातात; तीच या लोकांनी आपल्या सोयीनुसार स्वीकृत केल्यामुळे यांच्या कुलदेवता भिन्नभिन्न आढळतात. तद्वतच काशी विश्वेश्वराऐवजी महादेवाचे महाराष्ट्रातील प्रचलित लोकदैवत जे खंडोबा आहे, तेच बहुसंख्य लेवा पाटीदारांनी आपले कुलदैवत म्हणून स्वीकृत केले आहे आणि म्हणून प्रत्येक कौटुंबिक व धार्मिक कार्यात खंडोबाची पूजा केली जाते.

ग्रामदेवतेप्रमाणेच प्रत्येक कुळाची विशिष्ट अशी उपास्यदेवता असते, तिला कुलदेवता असे म्हणतात. ही कुलदेवता कुळाचे रक्षण करते, अशी धारणा असते. कुटुंबातल्या प्रत्येक मंगलप्रसंगी कुलदेवतेचे स्मरण किंवा पूजन करतात. वर्षातल्या ठरावीक दिवशी कुलदेवतेला महानैवेद्य करण्याची प्रथा आहे. तो दिवस म्हणजे त्या कुलदेवतेचे काम्यव्रत करण्याचा दिवस! लेवा पाटीदारांमधील रोटाचा सण, देवाचा दिवस किंवा कानबाई पूजा हा त्यातलाच प्रकार होय.

लेवा पाटीदारांमधील बहुतेकांचे कुलदैवत हे खंडोबा सांगितले जाते; तथापि कुलदेवता पार्वती वा उमेच्या रूपातील विविध देवता सांगितल्या जातात. त्यातील काही प्रमुख देवतांची थोडक्यात माहिती देत आहे. श्री. वासुदेव एच. पाटील यांची संकलित कुलदेवता यादी खालीलप्रमाणे -

कुलदेवता	कुळे
१) खंडेराव-म्हाळसा	सरोदे, राणे, धंडारे, बेंडाळे, कोल्हे, भारंबे, येवले, लिघोरे, पाचपांडे, खडसे, बोरोले, बोरले.
२) मनुदेवी	वाघोदे, फेगडे, फालक, वारके, झोपे (बोंबले, जावळे), किनगे (उन्हाळे), जंगले, रोटे, होले, इंगळे, अत्तरदे, भोगे.
३) महालक्ष्मी	तळेले, चोपडे (कोळंबे), कोलते.

४) कालका-भवानी	नेहते, बढे, नारखेडे (नकले, टेकाडे), भोळे, फिरके, किरंगे, वाणी, ठोंबरे.
५) कालंका-आशापुरी	सुपे, नाले.
६) रेणुकादेवी	झांबरे, नाफडे, भिरूड, लढे, बऱ्हाटे (करांडे), कुरांडे, नेमाडे.
७) निंबादेवी (निमजाय)	नेमाडे, वऱ्हाडे, धांडे, डहाके.
८) जोगेश्वरी (योगेश्वरी)	बोंडे.
९) दुर्गामाता	भंगाळे, वायकोळे (वानकुले), खाचणे.
१०) अंबिका-एकवीरा	लोखंडे.
११) भवानी	गाजरे.
१२) गौतमादेवी	राणे.

खंडोबा-म्हाळसा - बहुसंख्य जनतेचे कुलदैवत! याला मल्हारी, मल्हारीमार्तंड, म्हाळसाकांत, मैलार, मैराळ अशी नावे आहेत. यांच्याइतके लोकप्रिय दैवत महाराष्ट्रात दुसरे नाही. याची १२ स्थाने : १) जेजुरी, २) निमगाव, ३) पाली (सातारा), ४) नळदुर्ग (धाराशिव), ५) शेगुड (नगर), ६) सातारे (औरंगाबाद), ७) माळेगाव (नांदेड), ८) मैलारपूर (बिदर), ९) मंगसुळी (बेळगाव), १०) मैलारलिंग (धारवाड), ११) देवरगुड्ड (धारवाड) व १२) मंणमैलार (बेल्लारी) ही आहेत. औरंगजेबाने जेजुरीच्या खंडोबास अजमतखान (=पवित्र पुरुष) असे नाव दिले होते. याबाबत अशी आख्यायिका सांगितली जाते की, एकदा औरंगजेबाने जेजुरीचा खंडोबा फोडण्याचा प्रयत्न केला; त्या वेळी असंख्य भुंगे त्याच्या पाठीस लागले. तेव्हा त्याने एक रत्नजडित भुंगा करून खंडोबास वाहिला व खंडोबाचे अजमतखान (पवित्र किंवा श्रेष्ठ पुरुष) असे नाव ठेवले. तो भुंगा पुढे उमाजी नाइकाने नेला.[२] मुसलमानही मल्लखान म्हणून त्यास भजतात. धनगर-रामोशांपासून ब्राह्मणांपर्यंत समाजाच्या सर्व स्तरांत त्याची उपासना होते. कृतयुगात मणिचल पर्वतावर धर्मपुत्र सप्तर्षींच्या तपात मणी व मल्ल राक्षस विघ्ने आणत. त्यांच्या विनाशासाठी शिवाने मार्तंडभैरवाचे रूप घेतले. त्या दोघांचाही वध केला. त्यांच्या विनंतीवरून शिवाने मल्हारीमार्तंड नाव धारण केले. तद्वतच मणीच्या शिरास आपल्या पायाजवळ जागा दिली व मल्लाच्या अश्वारूढ रूपास आपल्या समोर जागा दिली. मार्तंडभैरवाची स्वयंभू लिंगे पालीपेंबर (सातारा) व मैलारपूर पेंबर (बिदर) येथे आहेत. खंडोबाला म्हाळसा व बाणाई अशा दोन भार्या आहेत. म्हाळसेवरून त्याला म्हाळसाकांत असेही म्हणतात. पुष्कळशा लेवा पाटीदारांची कुलदेवता ही म्हाळसा असल्याने ते लोक येथे येत असतात. म्हाळसेला मोहिनीचा अवतार समजतात. तिला काही लोक मायमाउली असेही म्हणतात. खानदेशात बऱ्याच लेवा पाटीदारांची कुलदेवता मायमाउली सांगितली जाते. ही म्हाळसा म्हणजे पार्वतीचे दुसरे रूप!

खंडोबाच्या परिवारात कुत्र्याला स्थान आहे. खंडोबाच्या आयुधांपैकी खड्ग हे विशेष महत्त्वाचे आहे. वाघ्या व मुरळी खंडोबाचे सेवेकरी असून वाघ्या स्वत:स खंडोबाचे कुत्रे व मुरळी स्वत:स खंडोबाच्या उपासनेतीत देवदासी समजतात. खंडोबाच्या उपासनेत हळदीच्या चुर्णाच्या भंडाराला फार महत्त्व आहे.

चौदाव्या शतकाच्या आधीपासून खंडोबाच्या मूर्ती अस्तित्वात असाव्या, असे दिसते. मध्ययुगाच्या सुरुवातीस खंडोबाचे साऱ्या महाराष्ट्रात कुलदैवत स्वीकारण्याचे प्रस्थ वाढले. नेमका त्याच काळात पाटीदार समाज खानदेश-वऱ्हाडात स्थिरावू लागला होता. तेव्हापासून कौटुंबिक कुळाचार पाळण्यासाठी प्रचलित दैवत म्हणून इतर समाजांबरोबरच लेवा पाटीदार समाजानेही खंडोबाचा कुलदैवत म्हणून अंगीकार केलेला दिसतो.

खंडोबाचा कुळधर्म : ज्याचे कुलदैवत खंडोबा, त्याच्या देव्हाऱ्यात त्याचा टाक असतो. त्यांच्या घरात चंपाषष्ठीच्या निमित्ताने खंडोबाचे पंचरात्र सुरू होते. षष्ठीच्या दिवशी कुलधर्म होतो. त्या दिवशी खंडोबाला महानैवेद्य दाखवितात. त्यात ठोंबरा (जोंधळे शिजवून दही-मीठ घातलेला पदार्थ), कणिकेचा रोडगा, वांग्याचे भरीत, पातीचा कांदा व लसूण हे पदार्थ असतात. गव्हाच्या ओंब्या, हुरडा, तीळ व गूळ एकत्र कांडून त्यांचा दिवा करतात. त्यात फुलवात लावतात. महानैवेद्य दाखविण्यापूर्वी तळी भरतात. एका ताम्हनात नागवेल पाने, पैसा व सुपारी, भंडार व खोबरे हे पदार्थ ठेवून येळकोटचा उद्‌घोष करीत ताम्हन तीनदा उचलण्यास तळी भरणे म्हणतात. ताम्हन उचलताना प्रत्येक वेळी भंडार भरलेली खोबऱ्याची वाटी मोडतात. मग दिवटी-बुधली घेऊन आरती करतात. जेजुरीच्या दिशेने चार पावले जाऊन देवाला ओवाळतात. भंडार उचलून पुनश्च जागेवर येतात. लाक्षणिक अर्थाने याला ''जेजुरीला जाऊन येणे'' म्हणायचे. दिवटी दुधाने विझवतात. ही दिवटी-बुधली नवे जोडपे जेजुरीला देवदर्शनास जाई तेव्हा बदलत. लग्नमुंजीसारखे मंगलकार्य झाल्यानंतर देवदर्शनाला जाणे, वाघ्या-मुरळीचे जागरण करणे या गोष्टी काही कुटुंबांत कुळधर्म म्हणून पाळत. (ही माहिती रा. चिं. ढेरे यांचे **खंडोबा,** ग. ह. खरे यांचे **महाराष्ट्राची चार दैवते** (१९५८) व पं. महादेवशास्त्री जोशी यांचे **तीर्थरूप महाराष्ट्र** (१९७५) यावर आधारित आहे).[३] लेवा पाटीदारांमध्ये खंडोबाचा देव्हारा भरणे हा एक अनिवार्य लौकिक कुळाचार (folk-ritual) समजला जातो. कुळाकुळांमध्ये हा लौकिक कुळाचार करण्याच्या विधीत गावागावांमध्ये काही तफावत आढळते. चंपाष्टमी (माघ शुद्ध अष्टमी) हासुद्धा खंडोबाचा दिवस असल्याने त्या दिवशीही रोडगे करून खातात.

वरील तक्त्यात आपण पाहिलेच आहे की, सरोदे, राणे, धंडारे, बेंडाळे, कोल्हे, भारंबे, येवले, लिघोरे, पाचपांडे, खडसे, बोरोले कुळांची कुलदेवता खंडेराव-म्हाळसा म्हणजे खंडोबाची म्हाळसा आहे. तथापि, लोक म्हाळसा वगळून टाकतात व फक्त खंडोबा असेच म्हणतात. जळगाव जिल्ह्यात खंडोबाची १७ स्थाने आहेत. त्यातील

फैजपूरचे स्थान प्रमुख मानले जाते. चाळीसगावजवळ म्हाळसादेवी मंदिर आहे.

उपरोक्त म्हाळसेला भवानी मानून आपली कुलदेवता तुळजापूरची भवानीसुद्धा सांगतात. म्हाळसादेवीचा कुळाचार इतर देवतांप्रमाणेच करतात.

मनुदेवी - हेसुद्धा पार्वती अथवा उमेचेच रूप असावे. मनुदेवी, मानाबाई तथा मनुबाई ही खानदेश भागात असलेल्या बहुजन तसेच भिल्ल व तडवी समाजाचीही कुलदेवता आहे. भिल्लरूपी शंकरास भिल्लिणीच्या रूपात मनवणारी पार्वती तीच मनुदेवी असे सांगितले जाते. मनुदेवीचे मनापुरी हे ठिकाण (२०°१०' उ. ७५°२४' पू.) यावलच्या वायव्येस २२ कि.मी., शिरपूर-रावेर-बऱ्हाणपूर महामार्गावरील किनगाव पासून १० कि. मी. उत्तरेस आहे. येथे अडगाहून जाता येते. मनापुरीपर्यंत सातपुड्याच्या डोंगराचे एक टोक आलेले असून या रमणीय खंदराच्या (gorge) एका लहान नदीच्या पावसाळी धबधब्याखाली जवळच मनुदेवीचे मंदिर आहे. या मंदिराच्या अगदी वरील बाजूस असलेल्या डोंगराच्या कड्यावर आभीर राजवटीतील किल्लावजा वास्तूचे अवशेष म्हणून मोठमोठ्या विटा आहेत. यावरून हे स्थान प्राचीन आहे हे सिद्ध होते. जवळच मूळ हेमाडपंती शैलीच्या मंदिराचे अवशेष दिसून येतात. या देवीचा कूळधर्म कसा करावा, हे लोकांना माहिती नसले तरी मोठ्या संख्येने लोक येथे जायला लागले आहेत. दात्यांच्या पैशातून हल्ली येथे आधुनिक मंदिर बांधण्यात आले आहे. हे उत्तम पर्यटन केंद्र ठरू शकेल. पूर्वी लेवा पाटीदार लोक हिला मनभाय असे म्हणत. ज्यांची कुलदेवता मनुदेवी आहे, असे लेवा पाटीदार मनुदेवीचा देव्हारा भरतात. भवानीप्रमाणेच हिला रोडगे वाहतात. गुजरातमधील मनसादेवीचेच मनुदेवी रूप असावे.

महालक्ष्मी - हे पार्वतीचे रूप आहे. ही करवीरक्षेत्री असली तरी पती काशीविश्वेश्वर काशीस असतो. प्रचंड असुरसैन्य असलेल्या कोल्हासुराच्या उच्छादामुळे करवीर भागातील महिलांच्या विनंतीवरून पार्वतीने अंबा ऊर्फ महालक्ष्मीचे रूप धारण करून कोल्हासुराचा वध केला म्हणून करवीरनगरीस कोल्हापूर हे नाव प्राप्त झाले. ऋषी-मुनी व भाविकजनांच्या विनंतीवरून ती करवीरनिवासिनी झाली. दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार देव-दानव युद्धात देवांचा पराभव होत असता ते ब्रह्मदेवासमवेत विष्णू व शिवाकडे आले असता ब्रह्मा, विष्णू, महेश, इंद्र यांच्या मुखातून तेजोवलये बाहेर पडली व त्यातून महालक्ष्मी निर्माण झाली. तिने महिषासुरास ठार मारून दानवांचा पराभव केला. भाद्रपदात गणपती उत्सवाबरोबर या महालक्ष्मीचाही सण करतात. महाराष्ट्रात करवीर, मुंबई, बिबळेवेढे, केळशी, आडिवरे, कुडाळ, वाई तसेच गोमंतकात बांदिवडे, मांद्रे येथे महालक्ष्मीची क्षेत्रे आहेत. ही अनेक जणांची कुलस्वामिनी आहे. ही सौभाग्यदेवता असल्यामुळे ज्यांची कुलदेवता आहे; त्या घरातील स्त्रिया मंगळवारी अथवा शुक्रवारी उपवास करतात. नवरात्रात अष्टमीला तिच्या नावाने जोगवा मागून त्या तांदळाचा भात करून सवाष्ण ब्राह्मणांना बोलावून कूळधर्म पाळतात. ही प्रथा लेवा पाटीदारांमध्ये नाही. अश्विन वद्य

अष्टमीलाही कोकणात हिचा कूळधर्म पाळतात. गुजरातमधील पावागड येथील महाकालीदेवीसही हे लोक महालक्ष्मी मानतात. लेवा पाटीदार पावागडहून आलेले असल्याने बरेच लोक पावागडच्या महालक्ष्मीस आपली कुलदेवता मानतात.

कालंकाभवानी - हे पार्वतीचेच रूप आहे. पंजाबमधील अंबाला जिल्ह्यातील अंबाल्यापासून ६४ कि.मी.वरील कालीदेवीचे प्राचीन स्थान! कालिका या नावाचे अपभ्रष्ट रूप आहे. हे हिमालय पर्वतरांगेच्या पायथ्याशी सुमारे ७३० मी. उंचीवर दिल्ली-अंबाला रेल्वे मार्गावर वसले आहे. येथून कालका-सिमला रेल्वे फाटा सुरू होतो. पार्वतीच्या शरीरातून कौशिकी देवी निघाल्यामुळे पार्वतीचे कृष्णवर्णीय शरीर येथे कालिकादेवीच्या रूपाने स्थिरावले आहे, अशी स्थानिक समजूत आहे.[४] (**विश्वकोश,** खंड ३, पृ. ७८०).

हिलाच काली असेही म्हणतात. हिंदू पुराणातील शिवपत्नी आदिशक्ति पार्वतीचा एक उग्र अवतार वा रूप काली! या नावाबाबत तसेच तिने शुंभ-निशुंभ, शंखचूड, दारकासुर, महिषासूर, इ. अनेक दैत्यांना मारल्याबाबतच्या विविध कथा पुराणांतून आहेत. काल म्हणजे शंकर, त्याची पत्नी म्हणून काली, शंकराच्या कंठातील विषापासून तिची उत्पत्ती झाली म्हणून काळी. पार्वतीने स्वत:च्या शरीरापासून कोश टाकल्यामुळे काली कोशिकी, इत्यादी तिचे रूप वर्णिले आहे. तिला नरबळी व पशुबळी देण्याची प्रथा होती. पावागडच्या महाकालीसही कालंकाभवानी असे संबोधतात. लेवा पाटीदारांमध्ये अनेक कुळांची कुलस्वामिनी तथा कुलदेवता ही कालिका तथा कालंका तथा भवानी सांगितली जाते. **द्वादशदेवी विग्रहा**नुसार कालिकादेवीचे मूल स्थान माळव्यात उज्जैन येथे आहे. प्रतिहारांनी उज्जैन येथेच आपली पहिली राजधानी स्थापन केली होती. म्हणूनच प्रतिहारांचा एक उपभेद (off shoot) असलेल्या पाटीदारांचीही ती कुलस्वामिनी राहिली. म्हणजेच प्रतिहार हे पाटीदारांचे पूर्वज होते, या माझ्या संशोधनास बळकटी मिळते.

खानदेश निवासिनी पाटणादेवी (चाळीसगावजवळ) ही कालीचेच रूप असल्याने व हे भास्कराचार्यांचे स्थान, विद्यापीठस्थान तसेच शक्तिपीठ असल्याने ज्यांची कुलस्वामिनी कालंकाभवानी, काली आहे; त्यांनी पाटणे येथे कुळाचार व कूळधर्म करण्यास काहीच हरकत नसावी.

निंबादेवी (निमजायदेवी) - हीसुद्धा पार्वतीचेच रूप असावे. प्रस्तुत कुलदेवतेची पुराणकथा व आख्यायिका लेखकास ज्ञात नसल्यामुळे येथे देता आली नाही. काही नेमाडे कुळांची कुलदेवता निंबादेवी असल्याचे सांगितले जाते. अपभ्रंशाने तिला निमजाय असे म्हणतात. निमजाय अथवा निंबादेवीचे खानदेशातील स्थान सावदा-मस्कावद मार्गावर सावद्याहून तीन कि. मी. वर व यावल तालुक्यामधील दुसखेडा या तापी नदीकाठी वसलेल्या गावात आहे. सावद्याजवळील निमजायदेवी सावद्याच्या नेमाडे कुळाच्या मुरलीधर

नारायण चौधरी यांचे मळ्यात आहे. चैत्र शुद्ध अष्टमी हा या देवीचा दिवस पाळतात. त्या दिवशी देवीला तांदळाची खीर-पोळीचा नैवेद्य दाखवितात. मार्गशीर्षच्या कृष्ण पक्षातील पहिला शुक्रवार हा देवीचा दिवस पाळून उपवास करतात. त्या दिवशी गूळभात व बिनाफोडणीचे, बिनामिरचीचे भरीत नैवेद्य दाखवून हेच पदार्थ कुलदेवता असलेले लोक खातात. या दिवशी इतर अन्न शिजवित नाही. दुसखेडा गावात बहुतांश वस्ती लेवे गुजरांची आहे. गुजर आधी येऊन तापीकाठी वसले व त्यानंतर आलेले लेवे पाटीदार गुजरांच्या गावांजवळ तापीपासून थोड्या अंतरावर वसले. लेवा पाटीदार व लेवा गुजरांची निंबादेवी कुलस्वामिनी राहिली. ज्यांची ही देवी कुलदेवता आहे, ते कडूलिंबाची पूजा करतात व कडूलिंबाचे झाड जाळत नाहीत.

आशापुरी - हीसुद्धा उमा वा पार्वतीचेच रूप आहे. गुजरातमधील अनेकांची विशेषकरून कडवा पाटीदार व लेवा पाटीदारांची ती कुलस्वामिनी आहे. हिची वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावाने पूजा करतात. माघ महिन्यात यात्रेकरूंचे संघ आशापुरी देवतेच्या देवालयात भवाईनामक नृत्य करतात. मुलांसाठी केलेले नवस फेडतात. भाद्रपद शुद्ध अष्टमीला आशापुरीची मोठी यात्रा भरवितात. हिचे स्थान कच्छपुरीमध्ये आहे. खानदेशात काही लोक हिला कालंका-आशापुरी असे संबोधतात.

रेणुकादेवी - रेणुकादेवीची महाराष्ट्रात तीन स्थाने आहेत. एक यवतमाळजवळ माहूरगडावर, दुसरे परभणी जिल्ह्यात गंगाखेड तालुक्यात राणी सावरगाव येथे व तिसरे नाशिक जिल्ह्यात चांदवड येथे, तद्वतच गुजरातमध्ये मातृगया येथेही रेणुकादेवीचे स्थान आहे. काशीचा राजा रेणू यास भोगवती राणीपासून झालेली मुलगी रेणुका! हिचा विवाह जमदग्नीशी झाला. त्यांचा पुत्र परशुराम! जमदग्नी-रेणुकेच्या अनेक कथा पुराणात आहेत. कार्तवीर्य क्षत्रिय राजाने जमदग्नीजवळील कामधेनूच्या अभिलाषेने त्याच्याशी युद्ध करून त्यास ठार मारले व कामधेनू घेऊन गेला. तपश्चर्या आटोपल्यावर परशुरामाला ही गोष्ट कळल्यावर संपूर्ण पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केली. तत्पूर्वी पित्याच्या देहावर अंत्यसंस्कार करणे आवश्यक असल्याने कोरी भूमी शोध, असे रेणुकेने सांगितले व सती जाण्याची इच्छा प्रकट केली. परशुरामाने एका दुरडीत जमदग्नीची काया व दुसऱ्या दुरडीत रेणुकेस घेऊन कृष्णामलकी या ठिकाणी (सध्याचे माहूर) येथे जमदग्नीचे अंत्यसंस्कार केले. तेथून पावनगंगा म्हणजे पैनगंगा तिन्ही बाजूंनी वाहते. या क्षेत्रास कृतयुगात आमलीग्राम, त्रेतायुगात सिद्धपूर, द्वापारयुगात देवनगर व कलियुगात मातापूर, अपभ्रंशाने माहूर हे नाव पडले. हे दत्तात्रेयांचे क्षेत्र आहे. जमदग्नीच्या अंत्यसंस्काराचे पौरोहित्य दत्तगुरूंनी केले. अंत्यसंस्कारासाठी परशुरामाने येथे मातृतीर्थ (मोवाळे) निर्माण केले. जमदग्नीच्या चितेस अग्नी दिल्यावर सती जाताना परशुरामास 'तू मागे वळून पाहू नकोस' असे रेणुकेने सांगितले. तथापि, दुःखाने न राहवल्याने परशुरामाने ज्वालांकडे पाहिले. रेणुका पूर्ण बाहेर येणार होती. परंतु, परशुरामाने पाहिले तेव्हा तिचा चेहरा व अर्धा भागच

वर आला व म्हणून येथे रेणुका मातेचा तांदळा आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदा, चैत्री पौर्णिमा, दत्तजयंती, पौष वद्य एकादशी आणि चंद्र-सूर्य ग्रहणाच्या वेळी माहूरगडावर मोठा उत्सव असतो. रेणुकेची एकवीरा, यल्लमा, भगवती, मरीआई ही सगळी स्वरूपे आहेत. रेणुका कुलस्वामिनी असलेल्यांकडे नवरात्र बसविण्यात येते व चैत्री, पौषी किंवा श्रावणी पौर्णिमेस कूळधर्म करण्यात येतो. मंगलकार्य झाल्यावर दर्शनासाठी जाण्याच्या यात्रेस ओहर यात्रा म्हणतात. रेणुकादेवी कुलदेवता असलेले लेवा पाटीदार आपले कुळाचार व कूळधर्म संस्कार पाळण्यासाठी भडगाव तालुक्यातील आमळदे या गावी जातात. तेथे रेणुकादेवीचा तांदळा असलेले लहानसे मंदिर आहे. वाघळीच्या मुधाईदेवीचे रूप हे रेणुकेचेच असावे.

जोगेश्वरी तथा योगेश्वरी - हिचे स्थान बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे आहे. येथील हेमाडपंती मंदिरात योगेश्वरीची मूर्ती नसून तांदळा आहे. तिची त्रिकाळ पूजा होते. पहिली पूजा गुरवांची, दुपारी पूजेनंतर महानैवेद्य व सायंकाळी प्रदोषपूजा व शेजारती असा नित्यक्रम असतो. नवरात्रात मोठा उत्सव होतो व अखेरच्या दिवशी होमहवन असते. दसऱ्याला देवी सीमोल्लंघन करते. मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीपासून पौर्णिमेपर्यंत दुसरा उत्सव असतो. पौर्णिमेला होम व देवीची पालखी निघते. देवीची उपासना कुमारीच्या स्वरूपात करतात. याबाबत पुराणकथा अशी-देवीचे माहेर कोकणात! परळी वैजनाथाचा योगेश्वरीबरोबर विवाह ठरविला. माहेरचे वऱ्हाड लग्नासाठी परळीला निघाले असता मुक्काम जयंती नदीकाठी अंबाजोगाईस पडला. देवीच्या मनात वैजनाथाबरोबर विवाह करावयाचे नव्हते. म्हणून या मुक्कामाहून ती पुढे जायला तयार नव्हती. लग्नाचा मुहूर्त टळून गेला. देवीस आनंद झाला व येथेच तिचे वास्तव्य झाले. योगेश्वरी ही देशस्थ व कोकणस्थ घराण्यांची कुलस्वामिनी आहे. खिरोद्याच्या बोंड्यांचीही ती कुलस्वामिनी आहे. अंबाजोगाईचे योगेश्वरी मंदिर यादव सेनापती खोलेश्वराने बांधले आहे. या मंदिरातील मोराच्या ओसरीवर कृष्णदयार्णवांचा निवास होता. **योगेश्वरीमाहात्म्य** ग्रंथात देवीबाबत विस्तृत महिती आहे. अंबाजोगाईशी मुकुंदराज, दासोपंत, जयरामस्वामी वडगावकर, शिवरामस्वामी कल्याणीकर, समर्थ रामदास, चक्रधरस्वामी आदी मराठी सारस्वतांचा घनिष्ठ संबंध आलेला आहे.

अंबाजोगाईप्रमाणेच पैठणजवळ ५ कि.मी.वर गोदावरी, बेलगंगा व वर्धा नद्यांच्या त्रिवेणी संगमावरही हिचे स्थान आहे. खिरोद्यास योगेश्वरीचे लहान मंदिर कूळधर्म पाळण्यासाठी बांधण्यात आले आहे.

योगेश्वरी ही सप्तमातृकांपैकी एक असून ती चतुर्भुज व त्रिनेत्र आहे. तिचा एक हात अभय मुद्रेत व दुसरा वरदमुद्रेत असतो. वृषभ वाहन असून बेलाच्या झाडाखाली निवास असतो. गौरवर्ण देवीच्या मुकुटात चंद्रकोर असते. **मत्स्यपुराणानुसार** मात्र लोंबती जीभ, डोक्यावर जटाजूट व गळ्यात कवड्यांची माळ असा पेहराव असतो. अजिंठ्याच्या १८

कि.मी. पश्चिमेस राष्ट्रकूटकालीन जोगेश्वरीदेवी लेणे आहे.

दुर्गामाता - दुर्गेची उमा, गौरी, पार्वती, चंडी, चामुंडा, काली, कपालिनी, भवानी, विजया, इत्यादी अनेक नावे व रूपे आहेत. भिन्नभिन्न देवींना पुराणकारांनी एकरूप केले व दुर्गेला शिवाच्या पत्नीपदावर बसविले.

दुर्गासप्तशतीत दुर्गेची महाकाली, महालक्ष्मी व सरस्वती ही तीन प्रमुख रूपे आढळतात. लेवा पाटीदारांमधील भंगाळे, वायकोळे व खाचणे कुळांची स्वामिनी दुर्गादेवी सांगितली जाते.

अंबिका एकवीरा - हिंदू संहितेतील अंबिका ही रुद्राची बहीण असे **वाजसेनीय संहितेत** (३.५७) सांगितले आहे. याज्ञवल्क्याने हिला विनायकाची माता मानली असून पुराणातही हिला रुद्रपत्नी म्हटले आहे. (**भागवत** पु. ३-१२-१३). पूर्वजन्मी ती दक्षकन्या सती असून पुढच्या जन्मी हिमाचल पत्नी मेना हिच्या उदरी अवतार घेतला, अशी कथा आहे. तलाव खोदण्यापूर्वी हिची पूजा करतात. महाराष्ट्रात कार्ला लेण्यांठिकाणी एकवीरा देवीचे मंदिर आहे.

तुळजाभवानी - स्कंदपुराणात महिषासुरमर्दिनीच्या अवतारांची कथा आहे. कृतयुगातील कर्दम ऋषी व त्याची पत्नी अनुभूतीचे वास्तव्य तुळजापूर येथे आहे. येथे मंदाकिनीच्या काठी आश्रम बांधून अनुभूती तापसी जीवन जगू लागली. तिने उग्र तपश्चर्येस प्रारंभ केला. कुकूर नामक दैत्य तेथे आला असता अनुभूतीच्या सौंदर्याने तो दुष्ट मोहित झाला व त्याने अनुभूतीला स्पर्श केला. अनुभूतीने ध्यानभंग होऊन भगवतीची प्रार्थना केली. भगवती आदिशक्तीने प्रकट होऊन महिषासुररूपी कुकुराचा वध केला. येथील पर्वताचे जुने नाव यमुनाचल! तुळजापूरचे दुसरे नाव चिंचपूर! तुळजापूर हे महाराष्ट्रातील शक्तिपीठांपैकी एक आहे.

ही तुळजाभवानी महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या भोसले कुलाचीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी मानली जाते. ही तुळजाभवानी म्हणजे महाराष्ट्राचे क्षात्रतेज! येथील पुजारी आणि भोपे कदम आडनावाचे पाटील आहेत.

तुळजाभवानीचे अकराव्या-बाराव्या शतकातील हेमाडपंती मंदिर पाहण्यासारखे आहे. येथे कल्लोळ, गायमुख, मेकावती, पापनाशी, नागझरी ही तीर्थे आहेत. त्याशिवाय भारतीबुवा मठ, गरीबनाथबुवा मठ, बाकोजीबुवा मठ, हमरोजीबुवा मठ, अरुणबुवा मठ, मातंगीदेवी स्थान व रामवरदायिनी ही स्थाने आहेत.

लेवा पाटीदारांमधील गाजरे कुळाची कुलस्वामिनी भवानी आहे. तथापि, बहुसंख्य लेवा पाटीदार आपली कुलदेवता अलगअलग असली तरी कुलस्वामिनी तुळजापूरची भवानी आणि वणीची सप्तशृंगी सांगतात.

सप्तशृंगी - महाराष्ट्रातील शक्तिपीठांपैकी एक! हे स्थान चांदवड डोंगररांगेत सप्तशृंगनामक डोंगरावर असल्याने हे नाव प्राप्त झाले. **देवी सप्तशती** या देवीमाहात्म्य

वर्णन करणाऱ्या ग्रंथात हिच्या अवतरणाची कथा साद्यंत निवेदन केली आहे. या दुर्गावर निवास करणाऱ्या दुर्गेस १८ हस्त असल्याने ते शक्तिपीठ मानले जाते. वाहन सिंह असून ती महिषासुराचा वध करीत आहे. पुष्कळसे खानदेशातील लेवा पाटीदार सप्तशृंगीला येतात. खानदेशातील पाटणे येथील भवानी तथा भगवतीदेवीसही १८ हात आहेत.

महाकाली तथा पावादेवी - पावागड हे ठिकाण देवीक्षेत्र म्हणून मानले जाते. खानदेश-वऱ्हाडात आलेले लेवा पाटीदार हे आपली मूळ कुलदेवता ही पावागडची पावादेवी तथा महाकालीदेवी असल्याचे सांगतात. पावागडावर महाकाली व भद्रकाली या दोन देवतांची मंदिरे आहेत. या दोन्ही बहिणी आहेत, असे समजतात. त्यातली भद्रकाली ही थोरली व महाकाली धाकटी होय. पावागडावर लोक जातात ते विशेषकरून महाकालीच्या दर्शनासाठी! गडावर दुधियानामक तलावात स्नान करून २२५ पायऱ्या चढून मंदिरात जातात. या देवीला पशुबळी देत नसल्याने ती सौम्य आहे. हिलाच भवानी, कालंका भवानी असेही संबोधतात. या देवीची व पावागडची माहिती याच ग्रंथाच्या प्रकरण २ - इतिहास यात दिली आहे.

पार्वतीची कुलदेवतेच्या रूपातील १२ रूपे - (द्वादशदेवी विग्रह)

''कांचीपुरे तु कामाक्षी वलये भ्रामरी तथा ।
केरले तु कुमारी सा अम्बाऽऽनर्तेषु संस्थिता ।।
करवीरे महालक्ष्मी कालिका मालवेषु सा।
प्रयागे ललितादेवी विन्ध्ये विन्ध्यनिवासिनी ।।
वाराणस्यां विशालाक्षी गयायां मङ्गलावती ।
वङ्गेषु सुन्दरीदेवी नेपाले गुह्यकेश्वरी ।।
इति द्वादश रूपेण संस्थिता भारते शिवा ।
एतासां दर्शनादेव सर्व पापैः प्रमुच्यते ।।
अशक्तो दर्शने नित्यं स्मरेत् प्रातः समाहितः ।
तथाप्युपासकः सर्वेरपराधैर्विमुच्यते ।।

भगवती महाशक्ती ही कांचीपुरात कामाक्षी, मलयागिरीत भ्रामरी (भ्रमराम्बा), केरळात कुमारी (कन्याकुमारी), आनर्त देशात (गुजरात) अंबा, करवीरात (कोल्हापुरात) महालक्ष्मी, माळव्यात (उज्जैन) कालिका, प्रयागात ललिता (अलोपी), विंध्यगिरीवर विंध्यनिवासिनी, वाराणसीत विशालाक्षी, गयेत मंगलावती, बंगालमध्ये सुंदरी आणि नेपाळात गुह्यकेश्वरी या नावाने निवास करते.

लेवा पाटीदार समाज ज्या आनर्त (गुजरात) व मालव (माळवा-उज्जैन) भागातून आला आहे, तेथील पार्वतीची रूपे अंबा, कालिका व विंध्यवासिनी असल्याने तीच लेवा पाटीदारांची कुलदेवता आहे. महाराष्ट्रातील तुळजाभवानी, महालक्ष्मी, सप्तशृंगी, योगेश्वरी (जोगेश्वरी) आणि इतर स्थानिक कुलदेवता लेवा पाटीदार इकडे स्थलांतरित झाल्यानंतरच

स्वीकृत केलेल्या आहेत, असे दिसून येते. या कुलदेवतासुद्धा पार्वतीचीच रूपे आहेत. यावरून शक्तिरूपी पार्वती हीच लेवा पाटीदारांची मूळ कुलदेवता मानावयास पाहिजे.

मुंजोबा - मुंजोबा हे लेवा पाटीदारांचे प्रमुख दैवत आहे. मुंज झाल्यावर पुढे विवाहापूर्वी सोडमुंज करण्यात येते. परंतु, या दरम्यानच्या काळात तो जर मरण पावला तर त्याला मुंजोबा म्हणतात. लेवा पाटीदारांमध्ये मुलाचे कर्णविध हा मुंजसारखा प्रकार आहे व कर्णविधानंतर आणि लग्नाआधी म्हणजे कुमार मरणाऱ्यास मुंजोबा म्हणतात. त्याच्या आत्म्याच्या सांत्वनाप्रीत्यर्थ त्याची देव मानून पूजा करतात.

अट्रावल (ता. यावल) येथे मुंजोबाचे स्थान प्रसिद्ध असून तेथे यात्राही भरते. या मुंजोबाच्या ठिकाणी मान (नवस) देऊन कर्णविध कार्यक्रम करतात.

ज्याच्या घरचा मुंजोबा असेल अशांच्या घरी कूळधर्म म्हणून पाच घागऱ्यांची पूजा करतात; तर काहींच्याकडे मुंजोबाचा टाक असतो. त्याचे ठाणे पिंपळावर असते. श्रावणी शनिवारी कुमारास जेवण देऊन कूळधर्म करतात. घरात मंगलकार्य असेल तर सांत्वनप्रीत्यर्थ मुंजोबाच्या ठिकाणी नागवेलीच्या पानांचे विडे ठेवण्याची प्रथा लेवा पाटीदारांमध्ये आहे. मुंजोबाच्या पिंपळाला पार बांधून त्यावर गोट्यास शेंदूर लावून मुंजोबाची स्थापना करतात. अट्रावलशिवाय बऱ्याच गावी मुंजोबाची ठिकाणे आहेत. वाघोड (ता. रावेर) येथेही मुंजोबाचे प्रसिद्ध स्थान आहे.

जाईचा देव - मोताळा तालुक्यात मलकापूर-बुलडाणा राज्य महामार्गावर रोहिनखेड घाट पायथ्याशी राजूरजवळील डोंगरातील स्थान! हे दत्तगुरूंचे स्थान मानले जाते व महानुभाव पंथी लोक आपला कुळाचार व कूळधर्म पार पाडण्यासाठी येथे येतात.

मानकेसर - अंजाळ्याजवळ तापी नदीच्या काठी असलेल्या या स्थानी काही लेवा पाटीदार लोक नवस फेडण्यास्तव जातात. येथे महादेवाचे लहानसे मंदिर आहे. यालाही रोडगे वाहण्याची प्रथा आहे. मान (नवस) मानतात, तो ईश्वर म्हणून याचे नाव मानकेश्वर तथा मानकेसर पडले असावे.

श्री. शंकर विठोबा पाटील आणि श्री. वासुदेव एच. पाटील यांनी भाटांकडून संकलित केलेली लेवा पाटीदारांची कुळे तथा आडनाव, गोत्रे, कुलदेवता आणि गुजरातेतील मूळगाव -

क्र.	कूळ तथा आडनाव	गोत्र	कुलदेवता	गुजरातेतील मूळगाव
१	राणे	गौतम	खंडेराव म्हाळसा	बोरसाद व रेळूवाडू
२	सरोदे	भार्गव	खंडेराव म्हाळसा	अनकवाडू
३	धंडारे अथवा कंडारे	गौतम	खंडेराव म्हाळसा	घुणके
४	वाघोदे	पाराशर	मनसादेवी	पालनपूर

५	अत्तरदे	अंगिरा	महालक्ष्मी	नवसारी
६	बेंडाळे	वसष्ठि	खंडेराव म्हाळसा	आनंदपूर
७	तळेले	गौतम	महालक्ष्मी	पावागड
८	ठोंबरे	वसिष्ठ	कालकाभवानी	मेहसाणा
९	फेगडे	शांडिल्य	मनसादेवी	अनकवाड
१०	नाले	अंगिरा	आशापुरी देवी	बडोदे
११	वाणे (वाणी)	गोकर्ण	कालकाभवानी	वायवाडे
१२	झांबरे	शृंगी	रेणुकाभवानी	सागवारा
१३	कोल्हे	कौंडिण्य, लोकाक्ष	खंडेराव म्हाळसा	सुरत
१४	नेहते	वसिष्ठ	कालकाभवानी	मणिपूर
१५	नाफडे	लोकाक्ष	रेणुकाभवानी	भडोच
१६	वराडे	शांडिल्य	निंबादेवी	अहमदाबाद
१७	बोंडे	कश्यप	जोगेश्वरी	वेळदे
१८	फालक	वसिष्ठ	मनसादेवी	हिरापूर
१९	वारके	भार्गव	मनसादेवी	वैजलपूर
२०	भंगाळे	वसिष्ठ	दुर्गाभवानी	चांपानेर
२१	झोपे, लोंबळे, जावळे	भारद्वाज	मनसादेवी	कडवीर
२२	चोपडे, कोळंबे	मारिच	महालक्ष्मी	पावागड
२३	बढे	अंगिरा	कालकाभवानी	निझर
२४	किनगे, उन्हाळे	विश्वामित्र	मनसादेवी	अनकवाडू
२५	नारखेडे, नकले, टेकाडे	कपिल	कालकाभवानी	नांदोदकरनाळे
२६	कोलते	गौतम	महालक्ष्मी	बारडोली
२७	डहाके, ढाके	शृंगी	निंबादेवी	डोळपूर
२८	जंगले	पाराशर	मनसादेवी	रिझोदा
२९	लोखंडे	पौलत्स्य	अंबादेवी	मणिपूर
३०	रोटे	भारद्वाज	मनसादेवी	अहमदाबाद
३१	भारंबे	बकदालभ्य	खंडेराव म्हाळसा	चांपानेर
३२	भोळे	भारद्वाज	कालकाभवानी	अनकवाडू
३३	वाळके (वायकुळे)	भार्गव	दुर्गादेवी	पालनपूर
३४	होले	पाराशर	मनुदेवी	मणिपूर
३५	भिरूड	पाराशर	रेणुकाभवानी	अहमदाबाद

३६ येवले	वसिष्ठ	खंडेराव म्हाळसा	आनंदपूर
३७ खाचणे	वसिष्ठ	दुर्गादेवी	नवसारी
३८ रिधोरे	वसिष्ठ	खंडेराव म्हाळसा	खोडवारा
३९ इंगळे	कौंडिण्य	मनसादेवी	अनकवाडू
४० धांडे	शौनक	निंबादेवी	मणिपूर
४१ लढे	शृंगी	रेणुकाभवानी	नांदोद
४२ पाचपांडे	अगस्ती	खंडेराव म्हाळसा	पावागड
४३ खडसे, खर्चे	वसिष्ठ	खंडेराव म्हाळसा	आनंदपूर
४४ फिरके	विश्वामित्र	कालकाभवानी	पावागड
४५ बराटे (करांडे)	कौंडिण्य	रेणुकाभवानी	मणिपूर
४६ सुपे	कौंडिण्य	कालका-आशापुरी	आनंदपूर
४७ बोरोले	शांडिल्य	खंडेराव म्हाळसा	पावागड
४८ नेमाडे	शृंगी	निंबाआई	अनकवाडू
४९ गाजरे	अंगिरा	भवानी	
५० लोंढे	गौतम	भवानी	
५१ किरंगे	मार्कंडेय	भवानी	
५२ बाकसे	विभंडिक	भवानी	
५३ भोगे	देवमुनी	खंडेराव म्हाळसा	

याशिवाय उपरोक्त पाटीलद्वयी लेखकांनी बोरोले (दुर्वास) भोरटक्के (कश्यप), चिरमाडे (वसिष्ठ, भारद्वाज), कुरकुरे (कौंडिण्य), भालोदे (भारद्वाज), काळे (कालंकी), कावळे (कालंकी), रडे (लोमेश), चिनावले-भारंबे (बकदालभ्य), वाघुळदे (अत्री), खडके-भारंबे (बकदालभ्य), बराटे (कौंडिण्य), करांडे (कौंडिण्य), कवठे (कौंडिण्य), गारसे (कौंडिण्य), गुळवे (देवल), टोके (गौतम), टेकाडे (वसिष्ठ), भोगे (देवल), लिघुरे (कौंडिण्य), लोमटे (शृंगी), सावदेकर (शृंगी) अशीही कुळे व गोत्रे सांगितली आहेत. **मिलिटरी गॅझेटिअर ऑफ इंडिया ॲण्ड पाकिस्तान**मधील ग्रामसूचीचा अभ्यास केल्यास उपरोक्त ग्रामनामांपैकी बरीच ग्रामनामे संशयास्पद वाटतात. रेलवाड असे गाव नसून त्याऐवजी रैला किंवा रेलवा हे गाव असावे. बालवाडेऐवजी बालवारा, धुणकेऐवजी धुंडेसा किंवा धुंडी असावे. मणिपूर असे गाव नसून ते खंबायतजवळील मही नदीच्या मुखजवळील मिननगर (प्राचीन महिपूर) असावे. कडवीर असे गाव नसून ते कडी या जिल्हा मुख्यालयाचे नाव असावे. अनकवाडू असेही गाव नसून ते अनहिलवाड पाटण असावे. आनंदपूरऐवजी आणंद हे गाव असावे. वेळदेऐवजी वेरावल असावे. रिझोदा असे गाव तरी मिलिटरी गॅझेटिअरनुसार गुजरातमध्ये आढळले नाही.

उपरोक्त गावे असलेल्या भागांमधील जाती-जमातींचा अभ्यास केल्यास या सर्वच

भागात लेवा पाटीदारांची वस्ती होती किंवा आहे, असे निश्चितपणे सांगता येणार नाही. कारण, अनहिलवाड-पाटण, पालनपूर, मेहसाणा, कडी, अहमदाबाद या उत्तर गुजरातच्या भागात लेवा पाटीदारांची वस्ती नसून कडवा पाटीदारांची व आंजणा कणब्यांची आहे. तद्वतच सुरत, नवसारी, बारडोली या दक्षिण गुजरातच्या भागातही लेवा पाटीदारांची वस्ती नसून आंजणा व मतिया कणब्यांची आहे. सागवारा आणि खोडबारा भागात तर आदिवासी व डांगी कणब्यांची वस्ती आहे. कदाचित, खोडबाराऐवजी खाराघोड हे गाव असावे. तेथे कडवा पाटीदारांची वस्ती आहे.

ब्र. भू.प.पू. मोरेदादा यांनी दिंडोरीप्रणीत श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग विशेषांक १९९९- मध्ये पृ. २४३ ते २६२ वर महाराष्ट्रातील क्षत्रियांच्या (ज्यात त्यांनी लेवा क्षत्रियांचाही समावेश केला आहे.) मुख्य कुलाचे नाव, पोटकुळे, वंश, गोत्र आणि कुलदैवत-कुलदेवता व लग्नातील देवकांची यादी दिली आहे. त्यातील लेवा पाटीदारांशी संबंधित कुले, पोटकुळे, वंश, गोत्रे व कुलदैवत-कुलदेवतांची यादी प्रकरणाच्या शेवटी **परिशिष्टात** दिली आहे -

खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदारांची गुजरातमधील मूळगावे खरी मानलीत तर लेवा पाटीदारांबरोबर कडवा पाटीदार, मतिया, मोम्ना व आंजणा कणबीसुद्धा आले असले पाहिजेत आणि पुढे लेवा पाटीदारांच्या सहवासात समश्रेष्ठत्व दाखविण्यासाठी त्यांनीही इकडे आल्यावर आपण लेवा पाटीदारच असल्याचे सांगितले असावे किंवा एकतर अज्ञानाने किंवा सोयरीकसंबंधांसाठी सर्वांनी लेवा पाटीदारच मानले असावे. कदाचित, भाटांनीच उपरोक्त ग्रामे व गोत्रे त्यात्या कुळाला चिकटविली असावी. दुधलगावचे श्री. शं. वि. पाटील आणि इंदूरचे श्री. वासुदेव एच. पाटील यांनी लेवा पाटीदारांच्या बहुतेक कुळांची गोत्रे शोधून काढली आहेत. त्यातील संकलित केलेल्या गोत्रांपैकी बरीच गोत्रे मागील सहा वर्षांतील वधूवर सूचींमधील देण्यात आलेल्या गोत्रांशी जुळत नसल्यामुळे मी या सर्व सूचींच्या आधारे बहुतेक गोत्रांची माहिती संकलित केली आहे. गोत्र सांगणाऱ्यांचे अज्ञान व दोष यामुळेही या संकलित माहितीत दोष असू शकतात. ती परिपूर्ण असल्याचा माझा दावा नाही आणि लेवा पाटीदार हा गुर्जरवंशी समाज हिंदुस्थानात आल्यावर हिंदू झाला व क्षत्रियत्व गाजविल्यावर या गुर्जरांचे शुद्धीकरण करताना त्यांना गोत्र चिकटविण्यात आलेत. चिं.वि. वैद्यांच्या मते गुर्जरांमधील चौहान, परिहार (प्रतिहार), परमार व चौलुक्य ही मूल चार कुले असून त्यातील प्रतिहार हेच लेवा पाटीदारांचे पूर्वज होत, या मताशी मी ठाम सहमत असून ब्राह्मणांशी अग्निशुध्दिकरणाच्या अवगुंठनाखाली त्यांचा क्षत्रियात प्रवेश झाला वा समावेश केला गेला व अशा प्रकारे त्यांना गोत्र चिकटविण्यात आलीत. पुढे प्रतिहारांनी रामभूमीवर राज्य केल्याने ते स्वतःस सूर्यवंशी व त्यातूनच रामपुत्र लवाचे वंशज समजू लागले. म्हणून गोत्रांना अधिक महत्त्व देऊ नये. विवाहसंबंधासाठी सकुल विवाह न करणे, ही लेवा पाटीदारांची पूर्वीपासून चालत आलेली आदर्श प्रथाच यापुढे चालू

ठेवावी. तरीही, धार्मिक विधींसाठी आपली गोत्रे माहीत असावीत म्हणून गोत्रांची यादी देत आहे. विवाहसंबंधासाठी गोत्र पाहायचेच झाल्यास आधी कूळ पाहावे. सकुल विवाह होता कामा नये.

गोत्र (१)	कूळ/आडनाव (२)	गावे (३)
१) अगस्ती	चौधरी, गाजरे, जंगले, महाजन, पाटील (जंगले)	आमोदे, कोळवद, हिंगोणे, बेलव्हाळ, वराडसीम, नांदेड, भादली, वाघळी, पिंपरूड, दहिगाव.
२) अंगिरा/ अंगिरस	बढे, बोंडे, चौधरी, गाजरे, पाटील, महाजन, सराफ	वरणगाव, नांदुरा, भालोद, मुक्ताईनगर, सालबर्डी, पिंपळगाव, सावदा, रुईखेडा, माकोडी, एनगाव, भुसावळ, तळवेल, सांगवी, कोथळी, हिंगोणे, डोंगरकठोरे, चिनावल, किन्ही, फैजपूर.
३) अत्री/अत्रेय	भोरटक्के, चौधरी, धांडे, पाचपांडे, महाजन, पांगळे, पाटील, वाघुळदे	सावदा, कोळवद, आमोदे, नायगाव, भुसावळ, खडके, न्हावी, नाडगाव, नशिराबाद. भादली, वरखेड, फैजपूर, बामणोद.
४) अनंत	अत्तरदे, पिंपरकर	साळवे, नांदेड, तरसोद.
५) उदालक	कुरकुरे.	हिंगोणे.
६) कण्व	चौधरी, खाचणे, पाटील	पाल, मस्कावद, निंभोरा, भालोद, तुरखेडे.
७) कपिल	असोदेकर, महाजन, चौधरी, पाटील, नारखेडे.	नांदेड, कोरपावली, नशिराबाद, आसोदे, जळगाव, भुसावळ, वड्री, सुनसगाव, राजोरे, न्हावी, हंबर्डी, फैजपूर, साळवा, भादली, ममुराबाद, बामणोद, चिनावल, सावदा.
८) कलकी/ कल्की/ कालंकी/ कालम	कावळे, काळे, महाजन, चौधरी, पाटील, सरोदे, इंगळे.	नशिराबाद, तरसोद, तुरखेडे, टाकळी, खिरोदे, वड्री, डोंगरकठोरे, कोळवद, चिनावल, सांगवी, डांभुर्णी, आसोदा, न्हावी, सावदा, रोझोदा, फैजपूर, खिरोदे, टहाकळी.
९) कार्तिक	चौधरी	खिरोदे, टहाकळी.
१०) कश्यप/ काश्यप	बढे, भंगाळे, भोगे, चौधरी, बोंडे, भोरटक्के, धांडे चिनावलकर, ढाके, फालक, राणे, कोलते, नेमाडे, महाजन, पाटील, जंगले, सरोदे, वारके,	फैजपूर, ममुराबाद, सावदा, न्हावी, विरोदे, खिरोदा, खिर्डी, साकरी, रोझोदा, नशिराबाद, हिंगोणे, कळमोदे, किन्ही, भुसावळ, साळवे, भालोद, विवरे, कोरपावली, पाल, पिंपळगाव, मस्कावद,

	होले.	सातोद, जळगाव.
११) कैवल्य	चौधरी, काळे, कावळे, सरोदे.	जळगाव, भादली, असोदे.
१२) कौंडिण्य	बऱ्हाटे, चौधरी, इंगळे, कुरकुरे, करांडे, महाजन, नेहते, नेमाडे, पाटील, सरोदे, कोल्हे.	भुसावळ, फेकरी, नांदुरा, तपतकठोरे, चांगदेव, ममुराबाद, नांदेड, पिंपरूड, डांभुर्णी, जळगाव, फैजपूर, भालोद, दहिगाव, न्हावी, खिरोदा, निंभोरा, साळवा, भादली, बामणोद, चिनावल, हिंगोणे, बेळी, सावदा, हिंगोणे, घाणखेड, चिखली, उटखेडा, मेहरुण, कडगाव, मस्कावद, डोंगरकठोरे, खिर्डी, तळवेल, यावल, आमोदे, तळणी, सुसरी, घुई (मुक्ताईनगर), एनगाव, असोदे.
१३) कौशिक	अट्रावलकर, चौधरी, पाटील, नेमाडे, सावदेकर.	अट्रावल, अंजाळे, जळगाव, नांदेड, साळवे, यावल, फैजपूर, भुसावळ, असोदे.
१४) गंधर्व	चौधरी, रोटे.	नशिराबाद, जळगाव.
१५) गर्ग/गर्गाचार्य	चौधरी, महाजन, नेहते, नायगावकर, पाचपांडे, पाटील.	भुसावळ, भालोद, आवार, डोंगरकठोरे, सुनसगाव, न्हावी, नशिराबाद, यावल, वराडसीम, कोरपावली, सावदा, खिरोदे, असोदे, बामणोद, हिंगोणे, अंजाळे, सावखेडा.
१६) गोकर्ण	चौधरी, चिनावले, पाटील, वाणी.	भादली, ममुराबाद, वराडसीम, साळवे सावदा, साकेगाव, जळगाव.
१७) गौतम	चौधरी, चोपडे, फेगडे, इंगळे, बोरोले, ढाके, कोलते, लोखंडे, महाजन, पाचपांडे, पाटील, राणे, सावदेकर, तळेले, टोके, वारके, वाणी.	भालोद, आमोदे, डोंगरकठोरे, किऱ्ही, पाडळसे, चांगदेव, मलकापूर, नरवेल, सातोद, खिरोदे, चिनावल, विवरे, कोळवद, बामणोद, तळवेल, चिखली, दर्यापूर, कानळदा, वरणगाव, तुरखेडे, लोणवाडी, रोझोदे, हरणखेडे, निंभोरा, हिंगोणे, फैजपूर, डांभुर्णी, किनगाव, गोळगाव, कुंभारखेडे, सातोद, सुनसगाव, मुक्ताईनगर, न्हावी, नशिराबाद, पुन्हई, जळगाव, दहिगाव, हंबर्डी, सांगवी, बोरखेडा, मस्कावद, खडके, साकरी,

		भडगाव, आचेगाव, साळवे, भुसावळ, सावदा.
१८) गौलव/ गहिलव/ गालव	बढे, महाजन, चौधरी, चोपडे, सराफ, सरोदे, तळेले.	न्हावी, भालोद, बामणोद, डोंगरकठोरे, चिनावल, फैजपूर , विरोदे, मस्कावद, विवरे, मुक्ताईनगर, चिखली.
१९) दुर्वास	बोरोले, किनगे, किरंगे, पाटील, महाजन.	न्हावी, कानळदे, चिनावल, यावल, राजोरे, पिळोदे, आमोदे, फैजपूर, भालोद, साकरी, फेकरी, सांगवी, बामणोद, भादली, विवरे, साळवा, खिरोदे, नशिराबाद, भुसावळ, हंबर्डी, सावखेडे, खिर्डी, असोदे.
२०) देवमुनी/ देवल.	भोगे, चौधरी, गुळवे, गारसे.	न्हावी, सावदा, निंभोरा, बामणोद, हिंगोणे, चिनावल.
२१) पाराशर	बऱ्हाडे, भिरूड, चौधरी, फालक, जंगले, करांडे, महाजन, पाचपांडे, पाटील, पेठकर, वाघुळदे, वाघोदे.	तरसोद, भुसावळ, किन्ही, फेकरी, नशिराबाद, चिनावल, मस्कावद, कंडारी, यावल, खिर्डी, साकेगाव, साकरी, नेपानगर, दुधलगाव, पाडळसे, आचेगाव, बेलव्हाळ, भादली, बामणोद, फैजपूर.
२२) पौलस्य	लोखंडे, महाजन, पाटील.	राजोरे, भादली, डोंगरकठोरे, आमोदे, अट्रावल, भालोद, सांगवी.
२३) बगदालभ्य	बढे, भंगाळे, चोपडे, बऱ्हाटे, बेंडाळे, भारंबे, चौधरी, फेगडे, खडके, कुरकुरे, महाजन, पाटील.	मस्कावद, खिर्डी, न्हावी, पाडळसे, निंभोरा, उधळी, नांदेड, साळवे, डोगरकठोरे, भुसावळ, जळगाव खु., तपतकठोरे, सावदा, वराडसीम, सातोद, कडगाव, पिंपरूड, अंजाळे, बोरखेडे, हंबर्डी. हिंगोणे, सायरखेडा, सांगवी.
२४) बलव/बालव/ बाल्ब/बाल/ वल्लभ/वत्स	भिरूड, चोपडे, कोळंबे, पाटील, वारके, होले.	चिनावल, भालोद, यावल, न्हावी, नांदेड, सांगवी, साळवे, निंभोरा, मस्कावद, भालोद, आसोदे, सुनसगाव, फैजपूर, भादली, भुसावळ, जळगाव.
२५) ब्रह्मचारी/ ब्रह्मर्षी/ भ्रमाचार्य/	भगत, भोळे, चौधरी, चिरमाडे.	भालोद, आसोदे, सुसगाव, फैजपूर, भादली, भुसावळ, जळगाव.

	ब्रह्माणी / भर्माचार्य.		
२६)	भारद्वाज	अत्तरदे, बेंडाळे, भंगाळे, नारखेडे, भारंबे, चौधरी, फेगडे, खडके, कुरकुरे महाजन, पाटील.	पाळडसे, कानळदे, शिरसाड, नांदेड, साळवे, सांगवी, भादली, जळगाव, फैजपूर, विवरे, कंडारी, वरणगाव, कन्हाळे, शेलगाव बाजार, सावदा, तपतकठोरे, वराडसीम, सातोद, डोंगरकठोरे, कडगाव, पिंपरूड, अंजाळे, बोरखेडे, हंबर्डी, हिंगोणे, उधळी, खिर्डी, सावखेडा.
२७)	भृगू/भार्गव	बेंडाळे, भंगाळे, धांडे, भोळे, चौधरी, ढाके, खाचणे, महाजन, पाचपांडे, पाटील, सरोदे, बारके, झांबरे, झोपे.	सावदा, माळेगाव, असोदे, सुनसगाव, पाडळसे, खिरोदे, खिर्डी, भादली, ओझरखेडे, कोथळी, हरणखेडे, तांदलवाडी, विरोदे, उटखेडा, पिंपळगाव, डोंगरकठोरे, कोरपावली, बामणोद, कळमोदा, उधळी, तपतकठोरे, कडगाव, कोरपावली, जळगाव, सांगवी, साकरी, राजोरे, मुक्ताईनगर, खिरोदे, तळवेल, भुसावळ, हिंगोणे, मस्कावद, भालोद, विदगाव, अट्रावल, चिनावल, फैजपूर, आचेगाव, पाल, थोरगव्हाण, वरणगाव, नांदेड, साळवे, वराडसीम, ममुराबाद, बोरखेडा, न्हावी.
२८)	भृशुंडी	चौधरी, ढाके, महाजन, पाटील.	यावल, भादली, सावदा, नांदेड, जळगाव, साळवे, आसोदे, भुसावळ, वराडसीम, ममुराबाद, खिर्डी, बोरखेडा, न्हावी, पाडळसे, डांभुर्णी, कानळदे, सांगवी, अट्रावल.
२९)	भृपाचार्य	भोळे	मस्कावद.
३०)	मध्यम	महाजन (टेकाडे), चौधरी, पाटील.	भालोद, नशिराबाद, पाडळसे, निंभोरा.
३१)	मार्कंड/ मार्कंडी	भिरूड, भोळे, चौधरी (बोंडे), फिरके, महाजन,	वाघळी, झोडगे, सावरगाव, खडके, असोदे, नांदेड, खिरोदे, नशिराबाद,

	नेहते, नेमाडे, पाटील.	फैजपूर, हरणखेडे, हंबर्डी, सावखेडा, चिनावल, निंभोरा, पाडळसे, किन्ही, हातले, डोंगरकठोरे, कोळवद, भुसावळ, जळगाव, बामणोद.
३२) मांडव्य	भिरूड, भोळे, बोंडे, चौधरी, कोलते, महाजन, पाटील.	सावदा, खिर्डी, विवरे, बामणोद, झोडगे, चिनावल, उधळी, खानापूर, निंभोरा, खिरोदे, रोझोदे, यावल, न्हावी, कोरपावली, कोसगाव, किन्ही.
३३) मातंग	भिरूड वाघळी.	बामणोद, निंभोरा, खिर्डी, फैजपूर,
३४) मारीच	चोपडे, महाजन, पाटील.	माकोडी, तळणी, किनगाव, दाभाडी.
३५) लोकाक्ष	चौधरी, कोल्हे, लढे, नाफडे, नेहते, ढाके पाटील.	पाडळसे, हिंगोणे, पिंपळगाव, नांदुरा, तळवेल, तळणी, बुलडाणा, खिर्डी, साळवे, बामणोद, राजोरे, डांभुर्णी, खिर्डी, जळगाव, चिनावल.
३६) लोमश/लोमेश	महाजन, रडे.	भादली, जळगाव, नांदेड.
३७) लोहीत/ लवलंबन	लढे	खिर्डी.
३८) वसिष्ठ	भंगाळे, बेंडाळे, भारंबे, चौधरी, फालक, खाचणे, खडसे, खर्चे, कुरकुरे, महाजन, नेहते, पाटील, ठोंबरे.	निंभोरा, सांगवी, खिर्डी, सातोद, फैजपूर, बेलव्हाळ, कोथळी, चिनावल, बेळी, कानळदा, सावदा, निंभोरा, नशिराबाद, नांदेड, डांभुर्णी, सुनसगाव, रोझोदा, बामणोद, भुसावळ, जळगाव, हिंगोणे, वाघळी, असोदे, पिंपळगाव, न्हावी, नाडगाव, सालबर्डी, माळेगाव, किनगाव, मस्कावद, आमोदे, धरणगाव, साकेगाव, वराडसीम, अट्रावल, कोल्हाडी, तळणी, शेलगाव बाजार, दाभाडी, आडविहीर, मलकापूर, चिनावल, वड्री, तळवेल, साकरी, पाडळसे, दुधलगाव, हंबर्डी, तुरखेडे, कर्जोद, उटखेडा, खेडी, डोंगरकठोरे, गोजोरे, हिंगोणे.

३९) वामदेव/ वामन	पाटील, येवले.	सातोद, कानळदा, नांदेड, नशिराबाद, आसोदे, सावदा.
४०) वाल्मीकी/ वाल्यम	चौधरी किनगे, पाटील, वारके.	पाडळसे, कोथळी, मस्कावद, सावदा.
४१) विश्वामित्र	फेगडे, फिरके, इंगळे, हिंगोणेकर, कवटे, किनगे, महाजन, पाटील, येवले, सुपे, झोपे.	पाडळसे, नशिराबाद, तळवेल, न्हावी, राजोरे, सांगवी, खिरोदे, बामणोद, पिंपळगाव, भालोद, सावदा, निपाणा, भुसावळ, खडके, नांदुरा, हिंगोणे, फेकरी, वराडसीम, घाणखेडा, एनगाव, खरबर्डी, वाघोदा, फैजपूर, निंभोरा, विल्हाळे, आचेगाव, किनगाव, भुसावळ, तळणी, माळेगाव, वरणगाव, सालबर्डी, बेळी.
४२) विभांडक	पाटील (बावशे).	शेळगाव.
४३) शुकमुनी	वायकोळे.	सांगवी, हिंगोणे, रोझोदा, वराडसीम.
४४) शांडिल्य	बोरोले, चौधरी, देशमुख, फेगडे, पाटील, महाजन, तळेले, सरोदे, वराडे.	एनगाव, सालबर्डी, सावदा, साळवे, सांगवी, जळगाव, दाताळा, कोरपावली, सातोद, यावल. दहिगाव, न्हावी, मस्कावद, बामणोद, महेलखेडी, रोझोदा, हिंगोणे, सुसरी, मुक्ताईनगर, वरणगाव, दुधलगाव, पिंपरूड, नांदुरा, नरवेल, कोथळी, टाकरखेडी, निंबारी.
४५) शौनक	भोरटक्के, धांडे, महाजन, पाटील, प्रियदास (पाटील).	सावदा, सांगवी, पाल, रोझोदा, निंभोरा, सातोद, शेळगाव, जळगाव, खानापूर, हातनूर, सुनसगाव, भालोद, किनगाव, राजोरे, भुसावळ, फैजपूर.
४६) शृंग/शृंगव	चौधरी, ढाके, लोमटे, लढे, पाटील, महाजन, सावदेकर.	सावदा, आसोदे, ओझरखेडे, भुसावळ, जळगाव, नाडगाव, फेकरी, मस्कावद, खिर्डी, रोझोदा, चिनावल, बामणोद, अट्रावल, कन्हाळे, सांगवी, नांदुरा, तालसखेडा, तळवेल.
४७) सनकादिस/ सनकादिक/ संकादी.	फालक, महाजन	यावल, जळगाव, न्हावी, नशिराबाद, डांभुर्णी, पिळोदे बु.

खाली गोत्रांची माहिती दिली आहे.

१. **अगस्ती** - वैदिक ऋषी. व्याख्या - 'अगं (विध्यं) रस्त्यायति इति' विंध्य पर्वताच्या वृद्धीस प्रतिबंध करणारा. याची पैतृक नावे मान्य व मांदार्य अशी दोन आहेत. हा मित्रावरुणाचा पुत्र व वसिष्ठाचा भाऊ. अगस्ती **ऋग्वेदातल्या** २६ सूक्तांचा द्रष्टा आहे. तो खेल राजाचा राजपुरोहित झाला. इंद्र व मरुतमधील संघर्ष टाळून त्याने आर्यांचे ऐक्य राखले. विदर्भ देशाची राजकन्या लोपामुद्रा ही याची भार्या! याच्यांपासून लोपामुद्रेला झालेला दृढास्यूनामक पुत्र पुढे इष्मवाह नावाने प्रसिद्ध झाला. इंद्राने अगस्तीला **गायत्र्युपनिषद** उपदेशिले. त्याने पुढे ते इषाला शिकवून परंपरा चालू ठेवली. पुराण वाङ्मयात याला अग्नीचा अवतार मानले आहे. हा पराक्रमी ऋषी दक्षिणेस निघाला असता मेरू पर्वताशी विंध्य पर्वत स्पर्धा करू लागल्याने अगस्त्याने त्यास नमविले. कालकेयनामक दैत्य समुद्रात वास्तव्य करून जगाला पिडा देत होते. त्यांचा नाश करण्यासाठी त्याने एकाच आचमनात समुद्र आटवून टाकला. याने द्वादशवार्षिक सत्र करून पशुहिंसा न करताही इंद्रास पर्जन्यवृष्टी करण्यास भाग पाडले. प्रजेच्या हितासाठी याने सर्व मृगांचे देवतोद्देशाने प्रोक्षण केले. त्यामुळे देवपितृकार्यास मृगमांस अर्पण करण्यास प्रत्यवाय उरला नाही.

अगस्त्यगीता, अगस्त्यसंहिता, शिवसंहिता, द्वैधनिर्णयतंत्र, इ. ग्रंथ त्याच्या नावावर आहेत. सूक्तकाल अगस्त्य आणि आश्रमऋषी अगस्त्य भिन्न असावेत. अगस्ती-अगस्त हे गोत्र आपस्तंब, माध्यंदिन व देशस्थांमध्येही आढळते. पुराणातील माहितीवरून अगस्त्यवंशाचा पौलस्त्य, पोलह आणि ऋतू अशा तीन शाखा असल्याचे दिसते.

रामायण-महाभारतावरून अगस्तीचे १. दुर्जया नदीकाठी (बदामी), २. पुष्करनजीक, ३. प्रयागक्षेत्र, ४. गोकर्ण, ५. प्रवराकाठी, ६. पंचवटी, ७. पांड्य देशी व ८. मलय पर्वतावर आश्रम आहेत. याशिवाय, याची अनेक तीर्थक्षेत्रे आहेत.

२. **अंगिरा/अंगिरस** - बहुधा अंगिरा व अंगिरस हे एकच गोत्र असावे. रैवत मन्वंतरातल्या अत्री कुळातील अंगिरस हा एक ऋषी (**ब्रह्मांडपुराण** २, ३६,६२) असून विधात्याने अग्नीत दिलेल्या आहुतीतून हा जन्मला. याला अग्नीने आपला पुत्र मानले म्हणून त्याला आग्नेय असे नाव पडले. (व्ही. आर. रामचंद्र दीक्षित, **पुराण इंडेक्स,** १९७५; **भारतीय संस्कृतिकोश** भाग १) कश्यप ऋषीची बहीण सुरूपा ही अंगिराची पत्नी होय.

३. **अत्री/अत्रेय** - हे दोन्ही वेगळे असून अत्री हे अत्रेयाचे गोत्र आहे. म्हणजे अत्रेय गोत्र सांगणाऱ्यांचे अत्री हे प्रवर ठरेल. अत्री हा एक सूक्तद्रष्टा आहेत. **ऋग्वेदाच्या** पाचव्या मंडलातील ३७-४३; ७६ व ७७ ही सूक्ते याच्या नावावर असून या मंडलाची इतर सूक्ते याच्या गोत्रज ऋषींनी द्रष्ट आहेत. प्रजापतीच्या त्रिसंवत्सरनामक सत्रात

प्रकट झालेल्या वाग्देवीस भृगू आणि अंगिरासारखा प्रतिसूर्य समजला जाणारा अत्री प्रजापतीच्या आशीर्वादाने प्राप्त झाला (बृ. दे. ९.१०१.). दुसऱ्या एका कथेनुसार स्वायंभुव मन्वंतरात ब्रह्मदेवाच्या नेत्रापासून झालेला हा पुत्र होय. हा ब्रह्मदेवाच्या १० मानसपुत्रांपैकी एक! सूर्यग्रहणासंबंधीचे प्रथम ज्ञान याला झाले. अत्रिकुळातील पुरुष कवी आणि लढवय्येही होते. अत्री हा सप्तर्षींपैकी एक असून मोठा कर्मनिष्ठ व तेजस्वी होता. एकोणिसाव्या द्वापारयुगात हा व्यास आहे. याला अनसूयेपासून दत्त, दुर्वास, सोम व अर्यमा हे चार मुलगे व अमला ही मुलगी झाली. राम-लक्ष्मणांस वनवासातील मार्ग अत्री-अनसूयाने दाखविला. याच्या नावावर **अत्रिसंहिता व अत्रिस्मृती** हे दोन ग्रंथ आहेत. अत्रिसंहितेत नऊ अध्याय असून त्यात योग, जप, कर्मविपाक, प्रायश्चित्त, इ. विषयांचा विचार केलेला आहे. हा सूक्तकारही आहे. अत्रिकुलात अत्री, अर्चनानस, श्वावाश्व, गविष्ठिर, आविहोत्र व पूर्वतिथी हे पंचद्रष्टे ऋषी आहेत.

४. **अनंत-अनंत** म्हणजे विष्णूची तापसी कला असून शाश्वत तंत्राचे अनुयायी याला संकर्षण म्हणतात. तो आपल्या सहस्र फणांपैकी एका फणेवर पृथ्वी धारण करतो. याच्या कपाळातून रुद्र ११ रूपांनी प्रकट झाला. बलराम आणि अनंत हे एकच होत. जलप्रलयाच्या वेळी अनंत विश्वाला आपल्याकडे खेचून घेतो. त्याला शेष असेही म्हणतात. श्रीकृष्णाने 'अनन्तश्चास्मि नागानाम्' म्हणून त्याला आपली विभूती मानले आहे. (गीता १०.२९)

दुसरा एक पुराणकालीन अनंत कात्यायन श्रौतसुत्राचा टीकाकार असून **प्रज्ञापरिशिष्टभाष्य** ग्रंथाचा कर्ता आहे.

५. **उदालक -** याच्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. हा विश्वामित्र कुळातील सामद्रष्टा ऋषी होता. वाराणसीच्या उद्दालकेश्वर तीर्थावर याला परमसिद्धी प्राप्त झाली. हा लेवा पाटीदारांमधील हिंगोणेस्थित कुरकुरे कुळाचा गोत्र कसा झाला, हे सांगता येणे कठीण असले तरी बहुधा या कुळाच्या उपाध्यायांनी हे गोत्र त्यांना लावले असावे. हिंगोण्याच्या काही कुरकुरे कुळांनी गोत्र कौंडिण्य व काहींनी भारद्वाज सांगितल्याने नीट तपासून घेणे आवश्यक.

६. **कण्व -** एक वैदिक ऋषी! हा गोत्रप्रवर्तकही आहे. अंगिरस कुलोत्पन्न थोर ऋषीचा पुत्र! याचा भाऊ प्रगाथ आणि हा वनात आश्रमात राहत असताना प्रगाथ कण्वपत्नीच्या मांडीवर मस्तक ठेवून झोपला असताना कण्व तेथे आला. ते दृश्य पाहून कण्वाला क्रोध आला. त्यावर प्रगाथाने त्याला हात जोडून म्हटले, ''हे बंधो, तुमची पत्नी ही माझी माता असून तुम्ही माझे वडील आहात.'' या वक्तव्याने कण्वाचा संशय फिटून राग शांत झाला (बृ. दे. ६.३५-३८). कण्व पूर्वी आंधळा होता. त्याला अश्विनीने डोळे व कान दिले, असा उल्लेख आहे. कण्व **ऋग्वेदाच्या** पहिल्या मंडलातील ३६ ते ४३ या सूक्तांचा द्रष्टा आहे. तो यदू-तुर्वशांचा पुरोहित होता.

या वैदिक ऋषीचे पुढे स्वतंत्र कुलच निर्माण झाले. कारण, बरेच सूक्तकार आपणास कण्व म्हणवितात. या कुळातील सूक्तद्रष्टे ऋषी पुढीलप्रमाणे - वत्स, प्रस्कण्व, कुसादी, गोषूप्ती, अश्वसूप्ती, प्रगाथ, भर्ग, कली, हर्यत, नीपातिथी, सोभरी, पर्वत, नारद, त्रिशोक, इरिंबिठी, ब्रह्मतिथी, सद्ध्वंस, शशकर्ण, कुरुस्तुती व सोभरिपुत्र कुशिक (म. ज्ञा.को.)

या कण्व ऋषीचा आश्रम लेवा गणप्रदेशातील (म्हणजे लेवा पाटीदारांची वस्ती असलेल्या खानदेश-वऱ्हाडातील प्रदेशातील) भुसावळ-सुरत रेल्वेमार्गावरील पाळधी स्थानकाच्या ८ कि.मी. उत्तरेस गिरणा नदीकाठी टेकडीवर वसलेल्या कानळदे (जळगाव ता. २१.१० उ. अक्षांश व ७५३० पू. रेखांश) या गावी आहे. गावाच्या पायथ्याशी गिरणेच्या काठी दगडातून भूगर्भात कोरलेले विचित्र मंदिर व विचित्र चार खोल्यांची गुंफा असून त्यात कण्व ऋषीचे वास्तव्य होते. कण्व ऋषी येथे तपश्चर्या करीत, अशी आख्यायिका आहे. येथे गोसाव्याच्या घराच्या गाभाऱ्यातून गुंफेच्या दरवाजाकडे जाणारा पायऱ्यांचा दगडी जिना आहे. दरवाजाच्या आतही काही पायऱ्या आहेत. पुढे एका मोठ्या भोकाच्या आकाराचे प्रवेशद्वार असून त्यापुढे एकास एक लागून असलेल्या उपरोक्त चार खोल्या आहेत.

७. **कपिल** - सांख्यदर्शनाचा मूळ प्रणेता! स्वायंभुव मन्वंतरात झालेला! विष्णूचा पाचवा पुत्र! जन्म सिद्धपूर येथे बिंदू सरोवरावर झाला. तिथेच त्याने आपल्या मातेस सांख्य तत्त्वज्ञान उपदेशिले (**भागवत** पु. ३.२५.५.).

नारदपुराणात दोन कपिलांचा उल्लेख आहे. (ना.पु. ४.४९) त्यातला एक ब्रह्मदेवाचा व दुसरा विष्णूचा अवतार आहे. त्याशिवाय, आणखीही एक वेदान्ती कपिल आढळतो (**श्वेता** ५.२; ब्र. सू. २.१.१ वरील शांकरभाष्य)

या सांख्यशास्त्राच्या प्रवर्तकाने तत्त्वज्ञानाद्वारे मोक्ष मिळविणे, हे सांख्यशास्त्राचे उद्दिष्ट सांगितले आहे. कर्मकांडापेक्षा ज्ञानकांडाला महत्त्व देणे, हे सांख्यदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. उपनिषदातही ज्ञानाला कर्माहून श्रेष्ठ मानले आहे. **श्वेताश्वतर** उपनिषदात, सांख्यसिद्धांताचे प्रतिपादन आढळते. या उपनिषदात गुणत्रयं (५.६) प्रकृती (४.१०), निर्गुण, सर्वज्ञ व विश्वकर्मा देवज्ञ (२.१६, ४.१७, ६.७), क्षेत्रज्ञ, कर्मकर्ता व फलभोक्ता (५.७, ६.१६), व्यक्त व अव्यक्त (१.८), योग (२.८-१४) इत्यादी सांख्य व योग या दर्शनातील विचार व परिभाषा सांगितली आहे. जे सेश्वर सांख्यदर्शनाचे सिद्धांत उपनिषत्कालानंतरच्या **पातंजल योगसूत्रात** सांगितले आहे, तेच या उपनिषदात संक्षेपाने वर्णिले आहे. भास्कर, इत्यादी ब्रह्मसूत्रभाष्यकार आचार्य या उपनिषदातील 'कपिल' शब्दाचा हिरण्यगर्भ असा पर्याय देतात. 'कपिल' म्हणजे 'अग्नीसारखा लाल तेजस्वी रंग असलेला' असा मूळचा अर्थ आहे.

कपिलमुनीच्या नावावर पुढील ग्रंथ उपलब्ध आहेत - **सांख्यसूत्र, तत्त्वसमास,**

व्यासप्रभाकर, कपिलगीता (वेदान्तविषयक), **कपिलपंचरात्र, कपिलसंहिता, कपिलस्तोत्र व कपिलस्मृती** (हि. वि. को.)

८. **कलंकी/कल्की/कालंकी/कालम** - हा नेमका कोणता गोत्रकार आहे, हे समजू शकत नाही. काही विद्वानांच्या मते तो विष्णूचा दहावा किंवा एकविसावा अवतार असेल. तो दुष्ट, अधर्मी म्लेंच्छांचा नाश करील. काही विद्वानांच्या मते मंदसोर प्रशस्तीवरून इ. स. ५३२ कल्की हा मालवराज यशोधर्मा होता. त्याचे नाव विष्णुवर्धन असे होते. काही विद्वानांच्या मते हूण मिहिरकुल याचा पिता तोरमण हाच कल्की होता. **प्रभावकचरित**नामक जैन ग्रंथात कल्काचार्य हा इ.स.पू.च्या दुसऱ्या शतकात धारानगरी येथे होऊन गेला.

विष्णुपुराण (४.२४.९८), **भागवत** (१.३.२५), **महाभारत** - वनपर्व (३.१९०.९६-९७) इ. ग्रंथांतही कल्कीपुराणाप्रमाणेच भविष्य वर्तविले आहे. त्यानुसार, तो म्लेंच्छ व कलियुगाचा अंत करील व तो वैदिक धर्माचा संस्थापक व सत्ययुगाचा प्रवर्तक होईल, असे म्हटले आहे.

हयशीर्ष **पंचरात्र** व **अग्निपुराणात**ही कल्कीचे वर्णन आहे. तो शूद्रांचे शुद्धीकरण करील, असे **मत्स्यपुराणात** सांगितले आहे.

काहींच्या मते हा काल अथवा महाकालही असू शकतो.

कालाग्निरुद्र या पुराणकाळातील ऋषीने सनत्कुमाराला आपल्या नावाचे उपनिषद व भुशुंडाला **बृहज्जावाल व रुद्राक्षजावाल** ही उपनिषदे शिकविली.

या गोत्राच्या सूक्तकाराबाबत प्रस्तुत लेखकास माहिती प्राप्त होऊ शकली नाही. असोदे येथील लेवा पाटीदारांमधील काळे कुळाचे गोत्र काळंबी सांगितले जाते. कदाचित, हे गोत्र स्वीकारण्यावरून त्यांचे काळे हे कुलनाम पडले असावे.

९. **कार्तिक/कार्तिकेय** - शिवपार्वतीचा पुत्र! हा सूक्तकार व गोत्रकार होता किंवा नाही हे ज्ञात नाही, तरी खिरोद्याच्या काही व टहाकळीच्या काही चौधरी आडनावाच्या कुळांनी त्याचा गोत्र म्हणून स्वीकार केला असल्याने थोडक्यात माहिती देत आहे. कृत्तिका या त्याच्या माता ठरल्या म्हणून त्याचे कार्तिकेय नाव पडले. त्यास शखणभव, सेनानी, षडानन, विशाख, शिखिवाहन, षाष्मातूर, कुमार, स्कंद इत्यादी नावे आहेत. कार्तिकेय हा गंगा आणि अत्री यांचा पुत्र होय, असे **वाल्मीकीरामायणात** म्हटले आहे. तो तारकासुराचा वध करतो, अशीही एक कथा आहे. **बृहत्संहितेत** मयूर हे त्याचे प्रमुख चिन्ह सांगितले आहे. **महाभारतात** इंद्र-स्कंद संघर्षाचीही कथा आहे.

१०. **कश्यप/काश्यप** - एक सूक्तद्रष्टा. याला आद्यगोत्रही समजले जाते. **ऋग्वेदातील** १.९९;८.२९;९.६४;१०.१३ आदी सूक्ते याच्या नावावर आहेत. हा अग्नीचा शिष्य व विभांडकाचा गुरू होय. याचा वसिष्ठाशी घनिष्ठ संबंध होता. तो मरीची ऋषी व कर्दमकन्या कला यांचा पुत्र व विधात्याचा मानसपुत्र (**भागवत**पुराण

४.१) आहे. त्याची सप्तर्षी आणि प्रजापतीतही गणना आहे.

वायुपुराणाच्या मते याला पूर्णिमानामक सख्खा भाऊ होता. सहा सावत्र बंधू होते. याच्या सावत्र मातेचे नाव उर्णा होते. अग्निष्वात्तनामक पितर हेसुद्धा याचेच बंधू मानलेले आहेत. याला सुरूपा नामक बहीण होती. ती ब्रह्माच्या अंगिरानामक मानसपुत्राला दिली होती (**वायुपुराण** २.४.५)

विवस्वान हा कश्यपाचा पुत्र, दिती व अदिती या कश्यपाच्या भार्या! दैत्य ही दितीची संतती असून देव हे अदितीचे पुत्र होय. विनता व कद्रू याही कश्यपाच्याच भार्या होत. याला विनतेपासून गरुड व अरुण आणि कद्रूपासून नाग हे पुत्र झाले. दक्ष प्रजापतीने याला आपल्या १३ कन्या दिल्या. शिवाय, ब्रह्माच्या सांगण्यावरून त्याने पुलामा व कालका या वैश्वानगर कन्यांशीही विवाह केला. **भागवतात** याच्या अरिष्टानामक अन्य चार भार्या सांगितल्या आहेत. मनुष्य, पशू, पक्षी, नाग, जलचर इत्यादी सृष्टी ही कश्यपाची संतती असून तिच्यामुळेच पृथ्वी प्राणिसृष्टीने भरलेली आहे. परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय करून सरस्वतीतीरी रामतीर्थावर अश्वमेध केला. त्याचा कश्यप हा अध्वर्यू होता. (**भागवतपुराण** ९.१६.२२)

कश्यपाने अर्बुद पर्वतावर तपस्या करून शिवकृपेने गंगा अवतरविली. ते स्थान कश्यपतीर्थ म्हणून प्रसिद्ध झाले (**पद्मपुराण**-३.१६४) ती गंगा घेऊन तो स्वस्थानी गेला. तेथे केशरंध्रतीर्थ निर्माण झाले. कश्यपावरून गंगेस काश्यपी नाव पडले. याने गरुडाला **नारायणमाहात्म्य** सांगितले. पृथ्वी दुष्टांच्या भाराने बुडू लागली असता कश्यपाने मांडीचा आधार दिल्याने पृथ्वीलाही काश्यपी व उर्वी ही नावे प्राप्त झाली आहेत. बटू वामन हा काश्यपाचाच पुत्र! विष्णू वामनरूपाने अदितीच्या पोटी जन्मला होता.

कश्यपाच्या नावावर **कश्यपसंहिता** (वैद्यकीय), **कश्यपोत्तर संहिता, कश्यपस्मृती** व **कश्यपसिद्धान्त** असे चार ग्रंथ आढळतात. विज्ञानेश्वर व माधवाचार्य हे **कश्यपस्मृतीचा** उल्लेख करतात.

कश्यपकुलात एकूण सहा ऋषी झाले आहेत. कश्यप, वस्तार, नैधृत्व, रैभ्य, असित व देवल अशी त्यांची नावे आहेत. कश्यपाचे गोत्र काश्यप होय. त्याचे व शांडिल्य गोत्राचे पटत नाही. म्हणून त्या दोन गोत्रांत परस्पर विवाहसंबंध करीत नाहीत. परंतु, अज्ञानामुळे लेवा पाटीदार हा नियम पाळत नाहीत. ज्यांना गोत्राचे स्मरण नाही, त्यांना काश्यप गोत्री समजतात. परंतु, हेसुद्धा विवाहसंबंधांसाठी योग्य नाही.

११. कैवल्य - गोत्राचे नाव कैवल्य कसे, हा संशोधनाचा विषय आहे. एकाचा भाव तो कैवल्य! आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा दुःखत्रयांचा आत्यंतिक वियोग म्हणजे कैवल्य! आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर कर्तृत्ववादी अभिमान गळून पडून कर्माची निवृत्ती होते. नंतर, विवेकज्ञानाचा उदय होऊन आत्मा चित्स्वरूपात

अवस्थित होतो. 'अद्वितीय ब्रह्मभावपतिः' एकमेव अशा ब्रह्मभावाची प्राप्ती म्हणजे कैवल्य! 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' = ज्ञानामुळेच कैवल्याची प्राप्ती होते. ब्रह्मदेवाने आश्वलायनाला **कैवल्योपनिषदात** शिवाची स्तुती केली आहे. त्यावरून ब्रह्मदेव म्हणजेच कैवल्य गोत्र मानले गेले असावे.

१२. कौंडिण्य - कौंडिण्य या गोत्राविषयी प्रस्तुत लेखकास फारशी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. तरी हा एक वृत्तिकार आचार्य होता. हिरण्यकेशी शाखेच्या पितृतर्पणात याचे नाव आहे. **बृहदारण्यकात** याला शांडिल्याचा शिष्य म्हटले आहे. म्हणूनच पुढे तो सूक्तकार व गोत्रकार म्हणून स्वीकृत झाला असावा म्हणजे शांडिल्य याचा प्रवर ठरू शकतो. एक प्रवर व गोत्र यांचा विवाहसंबंध सहसा करीत नसत. परंतु, हा नियम आता पाळताना कोणी दिसत नाही. विदर्भात कौंडिण्यपूर, (कुंडिनपूर) या प्राचीन नगराशी याचा काहीतरी संबंध असावा. बऱ्याच लेवा पाटीदारांमधील कुळांचे गोत्र कौंडिण्य सांगितले जाते.

१३. कौशिक - हा गोत्रऋषी कौंडिण्याचा शिष्य व गोपवन आणि शांडिल्य यांचा गुरू (**बृहदा** ३-२-६-१, ४-६-१). पाणिनीच्या मते हा शाखा प्रवर्तक होता. याच्या नावावर **कौशिकसूत्र, कौशिकस्मृती, कौशिकशिक्षा व कौशिकपुराण** हे ग्रंथ आहेत. कुशिक हा विश्वामित्राचा पूर्वज होता. तो भरताचे पौरोहित्य करीत होता. कुशिकचा पुत्र गाधी व गाधीचा पुत्र विश्वामित्र आहे. कुशिकाच्या कुलाला कौशिक नाव पडले असून त्या कुलात कुशिक, गाधी, विश्वामित्र, देवराज, उद्गल (बल), मधुच्छंदा, अधमर्षण, अष्टक, लोहित, कत, कील, देवश्रवा, रेणू, पूरण व धनंजय हे ऋषी झालेत. **मत्स्यपुराणाने** शिशिर आणि शालकायन असे दोन ऋषी आणखी दिले आहेत. विश्वामित्राचा पिता व गाधी याला कौशिक नाव असल्याने विश्वामित्र गोत्राचे प्रवर कोशिक ठरू शकते. हा काही ऋषींचा (क्र. ३-१९-२२) द्रष्टा होता.

१४. गंधर्व - पुराणात गंधर्व सूक्तकर्ता दिसत नाही. तथापि, गंधर्वाच्या शक्ती व गुणामुळे गोत्रांमध्ये त्यांचा समावेश झाला असावा. गंधर्व एक नसून अनेक आहेत. नेमका कोणता गंधर्व गोत्र सांगितला जातो, हेसुद्धा ज्ञात नाही. नशिराबादचे रोटे व रोटे कूळ असलेले चौधरी यांनी गंधर्वास आपले गोत्र स्वीकृत केले आहे.

१५. गर्ग/गर्गाचार्य - पुराणांमध्ये सुमारे सहा गर्ग होऊन गेले. त्यातील **ऋग्वेदाच्या** सहाव्या मंडलातले ४७ वे सूक्त नावावर आहे तो सूक्तद्रष्टा व गोत्रकार समजला जातो. याला गर्ग भारद्वाज असेही संबोधतात. उपरोक्त सूक्तात सोमाचे स्तवन आहे. इंद्राने शबर (अनार्य) यांना हाकून देणे, मारणे हे तो सांगतो. त्याने सूक्तात रणदुंदुभिचे वर्णन केले आहे.

गर्गाला श्रोतसंस्थेत विशिष्ट स्थान असल्याने दिसते. गर्ग त्रिरात्र नावाचा एक सोमयाण **श्रोतग्रंथात** वर्णित आहे. याज्ञवल्क्याबरोबर अध्यात्मावर वादविवाद करणारी

गार्गी ही विदुषी बहुधा वैदिक गर्गाची किंवा त्याच्या कुलातली मुलगी असावी (म.ज्ञा.को.).

हरिवंशात हा बृहस्पतीच्या वंशातला एक शिष्य व बितथाचा पुत्र असल्याचे सांगितले आहे. गर्ग आणि गार्ग्य यांच्यात फरक वाटत असून गार्ग्य हा ऋषी सामवेद्यांच्या उपकर्मांगतर्पणाचे आहे. शांत्युदक घेताना कोणता मंत्र घ्यावा, याबद्दल **कौशिकसूत्रात** (९-१०) याच्या मताचा उल्लेख आहे. **भागवतपुराणानुसार** (९-२१-२९) हा कुळाने क्षत्रिय असून तपाने ब्राह्मण झाला. मात्र **अपरार्क, स्मृतिचंद्रिका, मिताक्षरा** ग्रंथांत धर्मशास्त्रकाराचे उतारे आहेत (प्रा.च.को.).

मत्स्यपुराण, महाभारत व भागवत ग्रंथांत याचा ज्येतिषी म्हणूनही उल्लेख आलेला आहे. याच्या नावावर गर्गाचार्य मुहूर्त असून या मुहूर्तावर प्रवास करणे शुभ मानले आहे.

भागवतामध्ये (१०.८) तो यदुवंशाचा पुरोहित असल्याचा उल्लेख आहे. काही पुराणांमध्ये तो आयुर्वेदाचा आचार्य, अश्वशास्त्रज्ञ व वास्तुविशारदही गणला गेला आहे.

१६. गोकर्ण - वैवस्वत मन्वंतराच्या सातव्या वाराह कल्पातील हा एक अवतार असून काश्यप, उशना, च्यवन व बृहस्पती हे त्याचे चार पुत्र होत **(प्राचीन चरित्र-कोश)**.

गोकर्णक्षेत्र कारवार आणि अंकोला या दोन बंदरांच्या मध्ये तडदी बंदराच्या उत्तरेस सहा मैलांवर (१० कि.मी.) समुद्राच्या काठी आहे. येथे गोकर्ण महाबळेश्वर मंदिर आहे, तर गोकर्णेश्वराचे स्थान ओरिसातील कटक जिल्ह्यातील जजपूर विभागात आहे. तेथे गोकर्णेश्वराचे मंदिर आहे.

१७. गौतम - सप्तर्षींपैंकी एक! दीर्घतमा व प्रद्वेषी यांचा पुत्र! याचा बाप अंगिरस कुलातील असून बृहस्पतीच्या शापाने जन्मतःच अंध होता (**ऋग्वेद** १.१४७) काही ठिकाणी दीर्घतमा यानेच गौतम नाव धारण केलेले दिसते. गौतमाला औशीनरीनामक शूद्र स्त्रीपासून कक्षीवानादी पुत्र झाले. सनत्कुमाराकडून हा ब्रह्मविद्या शिकला. त्याने गौतमाला हंस व परमहंस यांचे ध्यान कसे करावे, हे शिकविले. याला ब्रह्मर्षी म्हटले आहे. ब्रह्मदेवाची मानसकन्या अहल्या ही याची भार्या होय. तिच्यापासून याला शतानंद नावाचा पुत्र झाला. याच्या नावावरूनच गोदावरील गौतमी असे नाव पडले आहे. (**देवी भागवत** ११.९)

गौतमाचा आश्रम पारियात्र (विंध्य) पर्वताजवळ होता. त्याने तिथे साठ हजार वर्षे तप केले. त्यानंतर यम तेथे येऊन त्याला भेटला. गौतमाने यमाकडून पितृऋण कसे फेडावे, याची शिकवण घेतली. गौतमाने १२ वर्षांच्या दुष्काळात ऋषींना भोजन देऊन वाचविले (**नारद** पु. २.७३).

हा अंगिरस कुलातील एक ऋषी व प्रवर आहे. वैवस्वत मन्वंतरातला हा एक

व्यासही आहे. त्र्यंबकेश्वराचा अवतार याच्यासाठीच झाला.

याशिवाय, आणखी सात गौतम पुराणात आहेत. त्यातील एक न्यायसूत्रांचा कर्ता होता, एक योगी परिव्राजक होता, एक चौदाव्या द्वारातील भगवंताचा अवतार होता, एक सामवेदाच्या राणायनीय शाखेचा धर्मशास्त्रकार होता, एक एकत, द्वित आणि त्रित यांचा पिता होता, एक पूषा नामक सूर्याबरोबर फिरणारा ऋषी होता, एक अत्री कुलातील ब्रह्मर्षी होता आणि एक ब्रह्मदेवाचा पुत्र होता.

१८. **गौलव/गहिलव/गालव** - गौलव किंवा गहिलव ही गालवचीच अपभ्रंशित रूपे असावीत. गालव हा एक वैय्याकरण असून निरुक्त व **ऐतरेय आरण्यकां**मध्ये गालवाचे मत उद्धृत केले आहे. शैशिरिशाखेत गालवाला शौनकाचा शिष्य व शाखाप्रवर्तक म्हटले आहे. गालवाचा चरण हा देवमित्र शाकल्याच्या चरणाचा अवांतर विभाग होता. वाभ्रव्य पांचाल आचार्याचा रचलेला क्रमपाठ गालवाने व्यवस्थित केला. ऋकप्रातिशाख्यात याला पहिला क्रमप्रवक्ता म्हटले आहे. गालवाचे व्याकरणही आहे. एक अन्य गालव आयुर्वेदाचार्यही होता.

१९. **दुर्वास** - रामायण - महाभारतकालीन अतिशीघ्रकोपी व तितकाच लवकर शांत होणारा हा महान तपस्वी. उग्र तपश्चर्या करून प्राप्तिफल मिळविणारा व शीघ्रकोपात शाप देऊन तपोफल संपविणारा हा ऋषी. पुराणांमध्ये याची अनेक सूक्ते आहेत. राम-लक्ष्मणास दंडकारण्यात मार्ग दाखविणारे अत्री-अनसूया दाम्पत्याचा हा पुत्र! दत्त, सोम व अर्यमा हे याचे भाऊ व अमला ही याची बहीण. या शीघ्रकोपी तपस्व्यामुळे महाभारत घडले, असे म्हणता येईल. हा शीघ्रकोपी ऋषी लेवा पाटीदारांमधील काही कुळांचा गोत्र कसा झाला, हा संशोधनाचा विषय ठरेल. काही आख्यायिकांनुसार दुर्वास ऋषीचे निर्वाण अमलनेरला झाले असून तेथे त्यांची समाधी आहे. त्यांच्या स्मृत्यर्थ आषाढी शुद्ध द्वादशीस येथे यात्रा भरते. ज्यांचे गोत्र दुर्वास आहे, त्यांनी तेथे जाण्यास हरकत नाही.

२०. **देवमुनी/देवल** - देवमुनी म्हणजेच देवर्षी. स्वर्गात वास्तव्य करणारे ऋषी. हे संख्येने १० आहेत. त्यांना नारद, संत्री, मरिची, भारद्वाज, पुलस्य, पुलह, भृगू, वसिष्ठ, प्रचेता व शिव अशी नावे आहेत. **महाभारतात** शिवालाही देवमुनी म्हटले आहे. काही लेवा पाटीदार देवमुनीऐवजी देवल यास आपले गोत्र मानतात. परंतु, जर देवल म्हणून गोत्र स्वीकृत केले असेल तर तो सूर्यवंशातील ७६ वा वंशज असून तो परियात्रकाचा पुत्र आहे. म्हणून गोत्र नीट तपासून घ्यावे.

कश्यप कुलातही एकूण सहा ऋषी झाले आहेत. कश्यप, वत्सार, नधृत्व, रम्य, असित आणि देवल या सर्वांचे गोत्र व प्रवर काश्यप होय. जर हा देवल सूक्तकार असेल तर देवमुनी व देवल हे भिन्नभिन्न गोत्र समजले पाहिजेत आणि देवमुनींमध्येसुद्धा नारदवगळता इतर नऊ स्वतंत्र गोत्रे असल्यामुळे देवमुनी म्हणजेच नारद मानता येईल. नारद तर ब्रह्मचारी होता. तो गोत्रकार कसा ठरला, हा पुराणसंशोधनाचा विषय आहे.

२१. पराशर/पाराशर - एक सूक्तद्रष्टा, वसिष्ठाचा पौत्र, गोत्रप्रवर्तक व ग्रंथकार असून **ऋग्वेदाच्या** पहिल्या मंडलातील ६५ ते ७३ ही सूक्ते याच्या नावावर आहेत. ही सर्व सूक्ते अग्नीविषयक असून काव्यमय आहेत. पराशराला अग्नीचे दिव्यत्व व महनीयत्व प्रतीत झाले आहे. त्याप्रमाणे सनातन सत्य नियमांचे महत्त्वही कळले आहे. कात्यायनाच्या सर्वानुक्रमणीत पराशर हा शक्तीचा पुत्र होता, असे म्हटले आहे; तर निरुक्तातल्या व्युप्रत्तीवरून त्याला वसिष्ठपुत्र म्हटले गेले आहे. आपला पिता शक्ती यास राक्षसांनी ठार मारल्याने याने राक्षसवधसत्र आरंभले. निरपराध राक्षस मरू नये म्हणून पुलस्त्याने ते सत्र थांबवायला लावले व 'तू सकलशास्त्र पारंगत व पुराणवक्ता होशील' असा वर दिला (विष्णु पु. १-१). धीवरकन्या सत्यवती हीस याच्यापासून वेदव्यास नामक पुत्र झाला. पराशरापासून प्रवृत्त झालेल्या गोत्रात गौरपराशर, नीलपराशर, श्वेतपराशर, श्याम पराशर, धुम्र पराशर असे भेद आहेत.

पराशराने जनकास जे तत्त्वज्ञान उपदेशिले ते **पराशरगीता** ग्रंथात दिले आहे. याशिवाय, पराशराच्या नावावर **बृहत्पराशर होराशास्त्र, लघू पाराशरी, पाराशर धर्मसंहिता (स्मृती), पराशरोदितं वास्तुशास्त्रम्, पाराशरासंहिता (वैद्यकशास्त्र), पराशरोपपुराण, पराशरोदितं नीतिशास्त्रम्, पराशरोदितं केवलसारम्, कृषिसंग्रह, कृषिपराशर व पराशरतंत्र** आदी ग्रंथ आहेत.

तो आयुर्वेदाचाही एक कर्ता व चिकित्सक होता (**चरकसंहिता**) पराशराने **हस्त्यायुर्वेद** नावाचाही एक ग्रंथ लिहिला आहे.

२२. पौलस्य - यालाच पुलस्य असेही म्हणतात. हा एक सांख्याचार्य, स्मृतिकार व गोत्रकारही आहे. अगस्त्य वंशात पौलस्य, पोलह आणि ऋतू अशा तीन शाखा आहेत. म्हणजे अगस्ती या गोत्राचा प्रवर ठरतो. **महाभारतात** पौलस्याला ब्रह्मदेवाचा मानसपुत्र व **भागवतात** त्याला कपिलाचा मेहुणा म्हटले आहे. **मिताक्षरेत** याचे काही श्लोक दिले आहेत. **पुलस्यस्मृती** इ.स.पू च्या चौथ्या व सातव्या शतकाच्या दरम्यान केव्हातरी लिहिली गेली असावी.

२३. बगदालभ्य - बहुधा हे बृहदुक्य वामदेव याचे अपभ्रंश रूप असावे. बृहदुक्य हा वामदेवाचा पुत्र. **ऋग्वेदाच्या** दहाव्या मंडलातील ५४-५६ ही सूक्ते याच्या नावावर आहेत. याची सूक्ते इंद्रस्तुतीवर आहेत. याच्या मुलाचे नाव वाजी. तो मेला असता त्याच्या शरीरातील भाग घेऊन जाण्याविषयी त्याने देवांना प्रार्थना केली आहे. बृहदुक्याने पांचाल देशाच्या दुर्मुखनामक राजाचा राज्याभिषेक केला होता. सर्वानुक्रमगणतीत याला वाम्यदेव असे म्हटले आहे. बृहदुक्य नावाचा एक गोत्रकारही आहे. हिरण्यकेशी तर्पणातील एक ऋषीही याच नावाचा आहे. बृहदुक्य सत्यामुळे ऋषी झाला, असे **वायुपुराणात** म्हटले आहे.

पुराणानुसार बक ऋषी दालभ्य ऋषींचा वंशज असून त्यावरून बकदालभ्य हे

नाव पडले. परंतु, हा जर बृहदुक्य नसेल तर दालभ्य ऋषीसुद्धा असू शकतो. दालभ्य ऋषीबाबत फारशी माहिती उपलब्ध नाही, परंतु महाराष्ट्रात हा काही मराठा कुळांचा गोत्र सांगितला जातो.

राजस्थानी लोककाव्यानुसार प्राचीन काळी मेवाडमध्ये बगडावत नावाचे २४ वीर पुरुष मेवाडमध्ये होऊन गेलेत. बगडावतांचे काव्य भाटांनी अतिरंजित बनवले आहे. एवढे मात्र खरे की, मारवाड व उज्जैन भागातील गुजर यांना खूप मानतात. लेवा पाटीदार हे गुर्जरांपासून निर्माण झालेली प्रशाखा असल्याने या वीर पुरुषांनाच लेवा पाटीदारांमधील काही कुळांनी गोत्र म्हणून स्वीकृत केले असावे. परंतु, हे खरे वाटत नाही म्हणून यावर संशोधन होणे आवश्यक आहे. या बगडावतवरून बगदालभ्य होणे शक्य आहे.

२४. बलव/बालव/बाल्व/बाल/वल्लभ/वत्स - असा कोणीही सूक्तकार अथवा गोत्रकार पुराणांमध्ये नाही. तथापि, अपभ्रंशाने ही नावे सांगितली जात असावीत. बऱ्याच लेवा पाटीदारांची गोत्राची अशी नावे सांगितली असल्याने त्याविषयी थोडक्यात खालीलप्रमाणे -

सतराव्या शतकातील आचार्य बालकृष्णनामक तथा बल अली नाम थोर रामभक्त असून राजस्थानचा रहिवासी होता. प्रथम त्याने रामानुज संप्रदायाचा स्वीकार केला. नंतर तो चरणदासाचा शिष्य झाला. त्याचे **ध्यानमंजिरी, सिद्धान्त-तत्त्वदीपिका, नेहप्रकाश** आदी ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यात रामभक्तीचे सिद्धान्त दिलेले आहेत. त्यावरून बलव, बाल्व, बालव, बाल अपभ्रंश होणे शक्य आहे. तथापि, हा गोत्रकार ठरू शकत नाही.

नाथपंथातील सननाथ, रामनाथ, धरमनाथ, दरियानाथ, गंगानाथ, बैराग, रावल अथवा नागनाथ, जालंधरिया, आई, कपिलानी व धजनाथ या १२ नावांवरून अपभ्रंशाने बालव संज्ञा प्राप्त झाली असावी किंवा निर्गुणोपासक बावरी पंथावरूनही बालव अपभ्रंश होणे शक्य वाटते. या पंथाच्या तत्त्वज्ञानावर वेदान्त आणि सूफीमत या दोहोंचाही प्रभाव आहे. तथापि, हे सर्व गोत्र म्हणून अशक्य वाटत असल्याने संशोधनातून नेमके गोत्र काढणे आवश्यक वाटते. वल्लभ असे गोत्र नाही व वत्स हे कदाचित श्रीवत्सनामक गोत्र असावे. नीट तपासणे आवश्यक.

२५. ब्रह्माचारी/ब्रह्मर्षी/भ्रमाचार्य/ब्रह्माणी/भर्माचार्य - बहुधा हे सारे ब्रह्मर्षीचे अपभ्रंशित रूप असावे. ऋषींचे ब्रह्मर्षी, देवर्षी व राजर्षी असे प्रकार असून ब्रह्मर्षी हे ब्राह्मणकुलोत्पन्न असून ते वेदज्ञाते, ब्रह्मज्ञानी, तपोमूर्ती व अलौकिक शक्तिसंपन्न असतात. देवर्षी व राजर्षीच्या तुलनेने ब्रह्मर्षीचे स्थान उच्च मानले जात असे. ब्रह्मा, वसिष्ठ, भृगू, अत्री, दक्ष, कश्यप व अंगिरस हे सात ब्रह्मर्षी आहेत. विश्वामित्रालाही ब्रह्मर्षीचा मान प्राप्त झाला आहे. **मनुस्मृतीमध्ये** मध्य भारताला ब्रह्मर्षीची भूमी म्हटले

आहे. त्यात कुरुक्षेत्र, मत्स्य, पांचाल व शूरसेन या प्रदेशांचा समावेश असून तो ब्रह्मवर्ताखालोखाल पवित्र मानला जातो.

२६. भारद्वाज - हा वैदिक ऋषी बृहस्पती व ममता यांचा पुत्र! त्यांनी सोडून दिल्याने मरुताने दुष्यंतपुत्र भरताकडे ठेवले. भरताने पुत्र मानले. तो दीर्घायुषी, तपस्वी व विद्वान होता. त्याच्या ज्ञाननिष्ठेने संतुष्ट होऊन इंद्राने त्याला सावित्राग्निविद्या शिकविली. तद्नुसार सावित्राग्निच्चयन करून भारद्वाज हा वेदज्ञाता झाला. तो सूक्तद्रष्टा व गोत्रकारही होता.

ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलात याच्या अनेक ऋचा आहेत. त्याचा दिवोदास व चायमान (चाहमान) सम्राटांच्या पौरोहित्याबाबत संबंध येतो. गोसंरक्षण व संवर्धनाबाबत याने वैचारिक क्रांती घडविली.

रामायणकाळात तो वाल्मीकीचा शिष्य होता. हा अंगिरस कुलोत्पन्न ऋषी गंगाद्वारी राहत असताना धृताची नावाच्या अतिसुंदर अप्सरेस पाहून वीर्यस्खलन झाल्याने त्यापासून द्रोण जन्माला आला. हा एक सूत्रकार असून त्याने **श्रौतसूत्र व गुह्यसूत्र (श्रौतसूक्त व गुह्यसूक्त)** लिहिले आहे. त्याने **धर्मसूत्रही** लिहिले असावे. **भारद्वाजस्मृती** ग्रंथाचाही पुराणात उल्लेख आहे. कौटिल्याने अर्थशास्त्रकार म्हणून भारद्वाजाचा अनेक वेळा उल्लेख केला आहे. राजनीती विषयावर भारद्वाजाचा गद्यपद्यमय ग्रंथ होता. भारद्वाजाचा आश्रम प्रयाग क्षेत्राजवळ होता. रामायणकाळी तेथे धनुर्विद्येचे मोठे विद्यालय होते.

२७. भृगू/भार्गव - एक महान सूक्तद्रष्टा व महान गोत्रकार, **ऋग्वेदाच्या** नवव्या मंडलातील ६५ वे सूक्त भृगू आणि जमदग्नी या दोघांनी व दहाव्या मंडलातील एकोणिसावे सूक्त भृगू, मथित व च्यवन यांनी रचले आहे. भृगू हा वरुणाचा पुत्र आहे. वेदरचनेत भृगूकुलाने मोठा हातभार लावला आहे. भृगूच्या जन्माविषयी भिन्न मते आहेत. **ऐतरेय ब्राह्मणानुसार** (३.३४) त्याची उत्पत्ती प्रजापतीच्या वीर्यापासून, **गोपथ ब्राह्मणा**नुसार ब्रह्मदेवाच्या घर्मबिंदूपासून, **तैतिरिय ब्राह्मणानुसार** इंद्राच्या रेतापासून, **भागवतानुसार** (४-५, १७:१९) ब्रह्माच्या त्वचेपासून झाली आहे. भृगूचा अग्नीशी संबंध असून भृगूने मानवासाठी अग्नी शोधून काढला, असे **ऋग्वेद** सांगतो. भृगूकुळातील भृगू हे अग्निचयन व हविर्भाग करण्यात तरबेज होते.

ऋग्वेदात भृगूचा अंगिरस, नवम्ब आणि अथर्वण यांच्याशी संबंध जोडला आहे. श्री. पद्नामय्या यांच्या मते भृगू द्रविड असून कार्यक्षेत्र कुशाद्वीप, शाल्यलिद्वीप व क्रौंचद्वीप होते. भृगूकुलात भृगू, कवी, च्यवन, शुक्र, और्व, प्रमती, ऋचीक, हरू, जमदग्नी, परशुराम, शुनक, शौनक इत्यादी प्रसिद्ध व्यक्ती म्हणजे भृगू/भार्गव होऊन गेल्या. त्या सर्वांना भार्गव म्हटले आहे. यांचा क्षत्रियांशी अधिक संबंध आलेला आहे. भृगू हे शीघ्रकोपी होते. महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात गोमाशी

येथे भृगू मंदिर आहे. भृगू तीर्थ उत्तर प्रदेशात गंगा-शरयू संगमावर वालिया येथे आहे. भृगूकच्छ भडोच हे भृगूचे तपोस्थान मानले जाते.

भृगूसंहिता हा भृगू/भार्गवाचा ज्योतिषविषयक ग्रंथ २००० वर्षांपूर्वी लिहिला गेला असला तरी आजही तो सर्वांना अचंब्यात टाकतो. आजही ज्योतिषशास्त्रात या ग्रंथाचा विश्वसनीय ग्रंथ म्हणून वापर करतात.

२८. **भृशुंडी** - पुराणात हा सूक्तकार व गोत्रकार दिसत नाही. तथापि, काही लेवा पाटीदार कुळांनी आपले गोत्र भृशुंडी सांगितले आहे. हा गजाननस्वरूप, जातीने कोळी व मृद्‌गल ऋषीचा शिष्य होता. आपल्या वाईट आचरणामुळे घराबाहेर काढले गेल्यामुळे दंडकारण्यात वाटमारी करू लागला. मुदगलाचा स्पर्श होताच त्याची बुद्धी पालटली. मुद्‌गलाने त्याला गणेशमंत्राचा उपदेश केला. तिथेच राहून भृशुंडीने कित्येक वर्षे तप केले. कालांतराने त्याच्या भुवयांमध्ये सोंड फुटून तो गजाननस्वरूप झाला. त्यामुळे मुद्‌गलाने त्याचे नाव भृशुंडी ठेवले. भृशुंडीने तिथेच आश्रम स्थापन केला. एकदा साक्षात इंद्र याच्या दर्शनाला आल्याचे **गणेशपुराणात** म्हटले आहे. भृशुंडीची ही कथा म्हणजे अनार्यांनी आर्यांमध्ये प्रवेश व मानमान्यता मिळविण्याची द्योतक असावी, असे जाणकारांचे मत आहे (प्रा.च.को.). गणेशभक्तीने प्रेरित होऊन गाणपत्य झालेल्या लेवा पाटीदारांच्या पूर्वजांनी भृशुंडीलाच आपले गोत्र स्वीकारले असावे व त्यांच्या कुळांचे ते पुढे कायम राहिले असावे.

२९. **भृपाचार्य** - प्रस्तुत लेखकास भृपाचार्याची माहिती उपलब्ध झाली नाही. पुराणग्रंथांमध्येही भृपाचार्य गोत्रकार व सूक्तकार असल्याचा उल्लेख नाही. असे असले तरी मस्कावद (ता. रावेर) येथे असलेल्या काही भोळे कुळांनी आपले गोत्र भपाचार्य सांगितले आहे. कदाचित, ते भ्रमाचार्यही असू शकेल म्हणून विवाहसंबंध जोडतांना गोत्र नीट तपासून पाहाणे आवश्यक आहे.

३०. **मध्यम** - या गोत्रकारासंबंधीसुद्धा प्रस्तुत लेखकास माहिती प्राप्त होऊ शकली नाही. पुराणांमध्येही असा गोत्रकार वा सूक्तकार नाही. कोणत्या तरी गोत्राचे हे अपभ्रंशित रूप सांगण्यात येत असावे. म्हणून विवाहसंबंध जोडताना गोत्र नीट तपासून पाहणे आवश्यक आहे. भालोद व नशिराबादचे महाजन, पाडळशाचे चौधरी व निंभोऱ्याचे पाटील या आडनावाच्या लेवा पाटीदारांनी आपले गोत्र मध्यम सांगितले आहे.

३१. **मार्कंड/मार्कंडेय/मार्तंड** - भृगू वंशातील एक प्रसिद्ध गोत्रकार ऋषी हा दहाव्या त्रेतायुगात झाला. याला धुमोर्णा नावाची पत्नी होती. सप्तर्षींच्या आशीर्वादाने दीर्घायुषी झाला. ब्रह्मदेव व शंकरानेही त्यास कल्पांतापर्यंत आयुष्य दिले. (महाभारतात) याचा पांडवांच्या वनवास काळात संबंध येतो. याच्या नावावर **मार्कंडेय स्मृती, मार्कंडेय संहिता, मार्कंडेय पुराण, वराह पुराण** हे ग्रंथ आढळतात. वयाला साठ

वर्षे पूर्ण झाल्यानंतर दीर्घायुष्याच्या प्राप्तीसाठी जी उग्ररथशांती करतात; तिच्यातली प्रमुख देवता मार्कंडेय असते.

पंजाबात विलासपुराकडे ब्रह्मपुराजवळ मार्कंडेय आश्रम आहे. तद्वतच महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात वैनगंगा जेथे उत्तरवाहिनी होते तेथे पवित्र स्थानी मार्कंडेय ऋषींचे मंदिर संकुल असून त्यात अतिशय सुंदररीत्या कोरीव दगडांनी व शिल्पांनी बांधलेली सहा चालुक्यकालीन मंदिरे आहेत. या गोत्रकुळातील जाणकारांनी हा मंदिर समूह एकदा तरी पाहावा.

मार्कंडेयाचे स्थान मुक्ताईनगर तालुक्यातील मेहूण या गावीही आहे. येथे ज्या टेकडीवर मुक्ताबाईचे मंदिर आहे; त्या टेकडीला खाली भुयार असून ते महर्षी मार्कंडेयाचे भुयार मानले जाते.

३२. मांडव्य - पुराणकाळातील एक सूक्तकार व गोत्रकार ऋषी, संहितेचा तात्त्विक अर्थ लावणारा आचार्य (**ऐत.आर** ३.११). याने **शुक्ल यजुर्वेदी शिक्षा** रचली आहे. पितृतर्पणात याचा समावेश आहे. मांडव्य या नावावर एक ज्योतिषीही आढळतो. याच्या नावावर **मांडव्यसंहिता**नामक ग्रंथ उपलब्ध आहे. हा भृगू कुलोत्पन्न गोत्रकार आहे. (**प्राचीन चरित्र कोश, महाराष्ट्र ज्ञानकोश**).

मांडव्यतीर्थ पंढरपूरच्या ईशान्येला भटुंबरे गावाजवळ आहे. त्याला मांडवखडकी म्हणतात. इथे स्नान करून कोणत्याही पुण्यकृत्याचा प्रारंभ केला की, ते सिद्धीला जाते अशी श्रद्धा आहे. पंढरपुरात गयावर्जन करणारे लोक प्रथम येथे स्नान करतात व मग गयावर्जनाला प्रारंभ करतात.

३३. मातंग - हा कदाचित रामायणकालीन मतंग ऋषी असावा. परंतु, तो गोत्रकार आहे किंवा नाही, हे समजू शकले नाही. लेवा पाटीदारांमधील भिरूड कुळाच्या काही लेवा पाटीदारांनी आपले गोत्र मातंग सांगितले आहे.

जैन दैवतसमूहातही मातंगनामक यक्ष आहे. हा सुपार्श्वनाथाचा सेवक आहे.

३४. मारीच - या रामायणकालीन राक्षसवर्गातील थोर विचारवंताने ऋषीत्व प्राप्त केले होते. रावणास सीताहरणापासून परावृत्त करण्याचा याचा प्रयत्न फसल्याने रावणाहातून मरण्यापेक्षा रामाच्या हातून मरण आलेले चांगले म्हणून हरणाचा वेश घेतला हे सर्वश्रुत आहे. लेवा पाटीदारांमधील काही कुळांनी याचा गोत्र म्हणून स्वीकार केलेला दिसतो. याच्या नावावरील सूक्ते लेखकास प्राप्त होऊ शकली नाहीत.

३५. लोकाक्ष - लोकाक्षनामक सूक्तकर्ता, गोत्रकार व ऋषी पुराणग्रंथांमध्ये आढळत नाही. प्रस्तुत लेखकास लोकाक्ष गोत्रांची माहिती प्राप्त होऊ शकली नाही. तथापि, कोणत्या तरी गोत्राचे अपभ्रंशाने हे नाव दिले गेले असावे. कदाचित, लोकाक्ष हे लोकेश्वराचे अपभ्रंश रूप असावे. हिंदू समाजात कर्तृत्ववान पुरुषांची गोत्र म्हणून स्वीकार करण्यात आल्याची अनेक उदाहरणे आहेत. हिंदू देवता शिव, विष्णू व सूर्य

यांच्या संयोगाने शिल्पकारांनी शिवलोकेश्वर, लोकेश्वर विष्णू व सूर्यलोकेश्वर अशा संयुक्त देवता निर्माण केल्या आहेत. आपले गोत्र न सांगता आल्याने कदाचित लोकेश्वर व अपभ्रंशाने लोकाक्ष सांगण्यात आले असावे.

लोमश ऋषीबाबत अपभ्रंशाने लोकाक्ष नाव सांगण्यात आले असावे. विवाहसंबंध जोडताना आपले गोत्र नीट तपासून पाहावे.

३६. लोमश/लोमेश - हे नाव लोमेश असे नसून लोमश असे आहे. या दीर्घजीवी ऋषीच्या अंगावर केस भरपूर असल्याने हे नाव पडले. प्रत्येक कल्पात त्याचा एकेक केस गळत होता. (**स्कंद पु.** १.२.१३) महाभारतात त्याचा पांडवांशी जवळचा संबंध आला आहे. काम्यक वनात लोमशाने युधिष्ठिराला अगस्त्य, भगिरथ, ऋष्यशृंग, सुकन्या व मांधाता चरित्रे कथन केली. त्याने दुर्दम्य राजाला **देवी भागवत** ऐकवून त्याला रैवतनामक मन्वंतराधिपती पुत्र प्राप्त करून दिला.

लोमशसंहिता व लोमशशिक्षा या नावाचे दोन ग्रंथ त्याच्या नावावर आहेत. **लोमशसंहिता** हा रसिक संप्रदायाचा मान्य ग्रंथ आहे. **लोमशशिक्षा** हा सामदेवाचा शिक्षाग्रंथ आहे. **कश्यपसंहितेत** लोमशाला ज्योतिषशास्त्रज्ञ मानले आहे. याच्या नावावर **लोमशनारायण** नामक ग्रंथ आहे.

राजस्थानात बुंदी शहराजवळ तिमाणा, पंजाबात रिवालसर येथे आणि बिहारमध्ये बराबर टेकड्यांमध्ये लोमशाचे आश्रम दाखवितात.

३७. लोहित/लवलंबन - या नावाचे गोत्रही लेखकास मिळू शकले नाही. तथापि, खिर्डीच्या लेवा पाटीदारांमधील लढे कुळातील काहींनी आपले गोत्र लोहित वा लवलंबन असे सांगितले आहे. तळवेलच्या लढे कुळाने आपले गोत्र लोकाक्ष सांगितले आहे आणि कदाचित लोकाक्ष हे गोत्रच अपभ्रंशाने लोहित वा लवलंबन असे सांगण्यात आले असावे, म्हणून या गोत्राच्या लोकांनीही विवाहसंबंधावेळी आपले व दुसऱ्या पक्षांचे गोत्र नीट तपासून पाहावे.

३८. वसिष्ठ - एक वैदिक ऋषी, मित्रा-वरुणाचा पुत्र. वसिष्ठ हा शब्द वसू वा वत्स या श्रेष्ठत्वसूचक धातूपासून बनला आहे. हा **ऋग्वेदाच्या** सातव्या मंडलाचा (१०४ सूक्ते) द्रष्टा आहे. याच्या सूक्तांमध्ये भूगोल व इतिहासावर अधिक प्रकाश पडतो. 'यूयं पात स्वास्तिभिः सदा नः' तू स्वस्तींसह आमचे सदैव रक्षण कर. हे याचे घोषवाक्य आहे.

तो मंत्रविद्या व यज्ञकर्म दोहोंतही सारखाच निष्णात होता. त्याच्याजवळ सहस्रावधी संख्येचे गोधन होते. हा राजपुरोहित असता त्यानेच यज्ञकर्म करण्याची प्रथा सुरू केली. वसिष्ठ व त्याचे पुत्र यांना तूःसू अशी दुसरी संज्ञा होती. पुराण वाङ्मयात वसिष्ठ आणि अगस्त्य दोघे भाऊ मानलेले आहेत. वसिष्ठाच्या जीवनाची कृतार्थता म्हणजे त्याने दाक्षराज्ञ युद्धात सुदासाला हरप्रयत्नांनी विजय मिळवून दिला, ही होय.

विखुरलेल्या आर्यांना संघटित करण्याचे श्रेय वसिष्ठाकडे जाते.

वसिष्ठ व विश्वामित्र या दोन श्रेष्ठ ऋषींच्या खाजगी वैमनस्याचे बीज **ऋग्वेदात** सापडते. सुदास राजाचे पौरोहित्य कोणी करावे, यासंबंधी या दोन ऋषींत काही विवाद झाला असावा.

तिसऱ्या मंडलात जमदग्नीने विश्वामित्राला ससर्परिविद्या दिल्याचा उल्लेख आहे. वसिष्ठचा मुलगा शक्ती याने वादविवादात प्रथम विश्वमित्राचा पराभव केला होता. त्यांच्या कटुतेतील तेही कारण असावे. वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या ध्येयदृष्टीत फरक असावा. म्हणजे विश्वामित्र हा अर्थर्वडिगरस विद्येत तर वसिष्ठ हा कल्याणकारी मंत्रात निपुण असावा. यज्ञातील ब्रह्मा वसिष्ठगोत्रीच असावा **(तैति, संहिता).** यावरून त्या काळी वसिष्ठ कुळातील लोक यज्ञकर्मात आदर्श मानले जात असावेत. विश्वामित्राला ब्रह्मर्षिपद मिळविण्याचा अट्टहास होता. यज्ञसंस्थेचा उत्कर्ष घडविण्याच्या कामी या दोन्ही ऋषींचा मोठा वाटा आहे.

इंद्र, वरुण, उषा, विश्वेदेव यांनाच मुख्यत्वे उद्देशून वसिष्ठाची सूक्ते आहेत. काळदृष्ट्या ती हृद्य असून भाषा जिव्हाळ्याची आहे. इंद्रप्रधान दैवतशास्त्र निर्माण होण्यापूर्वी वैदिक आर्यांचे दैवतशास्त्र वरुणप्रधान होते. वसिष्ठ वरुणपंथी असल्याने त्याने दोघात समेट घडविला व म्हणून इंद्र जेता असला तरी सत्ता चालविणारा वरुण होय, असे त्याने ठामपणे सांगितले आहे.

वसिष्ठाजवळ कामधेनू होती. **ऋग्वेदात** तसा उल्लेख नाही. **अथर्ववेदात** ब्रह्मगवी नावाची जी सूक्ते आहेत, त्यावरून पाहता वसिष्ठाची कामधेनू म्हणजे त्याच्य मंत्रसामर्थ्याचे प्रतीक असावे.

वसिष्ठसूक्तात आढळणाऱ्या नद्यांच्या उल्लेखावरून परुष्णी ते यमुना एवढ्या प्रदेशात विशेषतः सरस्वतीच्या तीरावर वसिष्ठकुळाचे वास्तव्य असावे. याच सप्तसिंधू प्रदेशात प्रथम आर्य व नंतर लेवा पाटीदारांचे पूर्वज आलेले असावेत. इंद्राच्या कृपेने वसिष्ठ सर्व लोकांचा पुरोहित झाला. विपाशा नदीत वसिष्ठाशिला व कृष्णाशिला अशी दोन स्थाने आहेत. त्या ठिकाणी त्याने तप केले. 'एकोनपंचाद्रात्र' भाग त्याच्या नावे प्रसिद्ध आहे. **(तैति.** सं. ७.४.७.) स्तोमभाग मंत्राचा हा प्रवर्तक आहे. **(तैति** सं. ३.५.२.)-

वसिष्ठ हा ब्रह्माच्या १० मानसपुत्रांपैकी एक. ईक्ष्वाकू वंशातील राजाचे पौरोहित्य अनेक शतके वसिष्ठ कुळाकडे होते. ऊर्जा व अरुंधती या त्याच्या भार्या. शतरूपा अयोनिसंभव हीसुद्धा त्याची पत्नी. ऊर्जेला पुंडलिका नावाची कन्या व दक्ष, गर्त, ऊर्ध्वबाहू इ. सप्तर्षिसंज्ञन सात पुत्र झाले. याव्यतिरिक्त आणखी सात पुत्र झाले. सुक्रातीदी पितरही हिचेच पुत्र मानलेले. अरुंधतीला शक्तीनामक पुत्र झाला. त्याच्यापासून वंशपरंपरा चालू झाली. ती अशी - पराशर - कृष्णद्वैपायन - शुक्र - भूरिश्रवा - प्रभू,

शंभू, कृष्णा, गौर व कीर्तिमती कन्या.

शतरूपेला वीरनामक पुत्र झाला. त्याने कर्दमप्रजापतीच्या काम्या नावाच्या कन्येशी विवाह केला. तिच्यापासून त्याला प्रियव्रत व उत्तानपाद नावाचे दोन पुत्र प्राप्त झाले. उत्तानपादाला अत्री ऋषीने दत्तक घेतले.

वसिष्ठकुळात वसिष्ठ अथर्वविधी, वसिष्ठ आपब, वसिष्ठ चैकितानेय, वसिष्ठ देवराज, वसिष्ठ ऋषी, वसिष्ठ ब्रह्मर्षी, वसिष्ठ श्रेष्ठभाज, वसिष्ठ सुवर्चस, वसिष्ठ हिरण्यनाभ कौशल्य हे महान कृत्ये केलेले मोठे लोक होऊन गेले.

वसिष्ठकुळातील गोत्रकारात एकप्रवरात्मक व त्रिप्रवरात्मक असे दोन प्रकार आहेत. अलभ्य, आपस्यूण, उपावृद्धी, औपगव ही एक प्रवर गोत्रे आहेत तर इंद्रपमदी, भगीव-सु व वसिष्ठ असे तीन प्रवर असून उद्‌गाह, उपसद, औपमन्यव, काण्व, कालशिख इ. गोत्रे त्रिप्रवरात्मक आहेत.

वसिष्ठगोत्रीय लोकांमध्ये जातूकर्ण्यनामक पैतृक नाव धारण करणारे लोक प्रमुख होते. अशाच एका जातूकर्ण्याने व्यास महर्षींना वेद व पुराणे शिकविली. **महाभारत** व **पद्मपुराणात** आणखी काही वसिष्ठांचे उल्लेख आहेत.

अनेक विद्वान **वसिष्ठ धर्मसूत्र** हे **ऋग्वेदाचे** धर्मसूत्र मानतात. या धर्मसूत्राचे ३० अध्याय आहेत. त्यांत अनेक विषयांवर ऊहापोह केलेला आहे.

३९. वामदेव/वामन - हे गोत्रनाम वामन नसून वामदेव असे आहे. वामदेव हा वैदिक ऋषी गौतम व ममता यांचा पुत्र. **ऋग्वेदाच्या** चौथ्या मंडलातही ४२.४४ ही दोन सूक्ते वगळता सर्व मंडल वामदेवाने द्रष्ट आहे. याला गर्भातच आत्मज्ञान प्राप्त झाले होते. 'गर्भे नु सन्' (क्र. ४.२७.१) ही ऋचा याने गर्भातच रचली. निसर्गसिद्ध मार्गाने त्याला गर्भाबाहेर येणे न जमल्याने आपल्या योगसामर्थ्याने श्येनरूप घेऊन तो आईचे पोट फाडून म्हणजे वाममार्गाने बाहेर आल्यामुळे त्याला वामदेव हे नाव पडले. त्याला गोधा नामक भाऊ आणि मूर्धन्वा, बृहाद्दिव व बृहदुक्थ असे तीन पुत्र होते. विश्वामित्राच्या पुढील पिढीतील असल्याने विश्वामित्राच्या सूक्तांचा त्याने प्रचार केला.

वामदेव हा रसिक ऋषी होता. त्याला निसर्गाचे तसेच मानवी सौंदर्याचे आकर्षण होते. उषा आणि सूर्योदय यांचे एखादे दृश्य त्याला जाणवले तसे त्याने ऋचेत वर्णिले. त्याने सुंदर रमणीवरही काव्यमय ऋचा लिहिल्या आहेत. त्याच्या सूक्तात कृषिकर्माचेही सुंदर वर्णन आहे. तो संगीतप्रिय तसेच मूर्तिकारही होता. वामदेवाने पुनर्जन्माविषयी विचार करताना प्रत्येक मनुष्याचे तीन जन्म सांगितले आहेत. १. पित्याचे शुक्रतंतू मातेच्या शोणित द्रव्याशी संगत होतात, तो; २. मातेच्या उदरातून मूल जन्माला येते तो, आणि ३. मृत्यूनंतर मिळतो तो नवा जन्म.

गायत्री मंत्राच्या २४ ऋषींपैकी वामदेव हा पाचवा आहे.

४०. वाल्मीक/वाल्यम - वाल्मीकी हा गोत्रकार असून वाल्यम अपभ्रंशाने म्हटले

जात असावे. वाल्या कोळ्याचा वाल्मीकी झाला ही कथा सर्वश्रुतच आहे. एका शूद्रकुलोत्पन्न वाल्याने आपल्या अंगभूत गुणांनी ब्रह्मर्षी व राजर्षीपद पटकावले. जन्मावर गोत्र व कुळाचे श्रेष्ठत्व अवलंबून नसून ते आपल्या कर्मावर असते, हे वाल्याने साऱ्या जगाला दाखवून दिले. रामायणकालीन हा प्रमुख ऋषी असून जगातील सर्वश्रेष्ठ ठरले गेलेले महाकाव्य **रामायण** याने रचले असल्याने त्याचे श्रेष्ठत्व आपोआपच सिद्ध झाले. याची अनेक सूक्ते वेद-पुराणांत आहेत. वाल्मीकीचा आश्रम चाळीसगावच्या दक्षिणेस चार कि.मी.वर पाटणे रस्त्यावरील गायमुखी नदीकाठी असून तो वाल्झीरी नावाने प्रसिद्ध आहे. हे गोत्र सांगणाऱ्यांनी एकदा तरी तेथे जावे.

४१. **विश्वामित्र** - सूक्तद्रष्टा वैदिक ऋषी. **ऋग्वेदातील** तिसरे मंडल याच्या नावावर आहे. वसिष्ठ व भारद्वाज यांच्या तोडीचा हा ऋषी. याचे चरित्र अद्‌भुत आहे. वर्षानुवर्षे खडतर तपश्चर्या करणारा, तपश्चर्येद्वारे क्षत्रियाचा ब्राह्मण होणारा, वसिष्ठाच्या नंदिनी कामधेनूची अभिलाषा बाळगणारा, त्रिशंकूला सदेह स्वर्गाला पाठविण्याची जिद्द बाळगणारा, प्रतिसृष्टी निर्माण करणारा, बळी देण्यासाठी यूपाला बांधलेल्या शुनःशेपाला सोडवून मांडीवर घेणारा, दक्षिणेसाठी हरिश्चंद्र-तारामतीला छळणारा, शकुंतला पिता विश्वामित्र, इ. अनेकविध स्वरूपात तो वैदिक ग्रंथात व पुराणात दिसून येतो.

विश्वामित्राचा जन्म कान्यकुब्ज (कनौज) देशात झाला. तो अभावसू वंशातल्या कुशिक राजाचा नातू व गाधीचा पुत्र. त्याचे जन्मनाव विश्वरथ होते. पाणिनीनुसार विश्व शब्दाच्या मागे मित्र आल्यास त्याचा अर्थ ऋषी होतो, म्हणून याचे नाव विश्वामित्र. आठव्या ते दहाव्या शतकात कनौजवर पाटीदारांचे पूर्वज प्रतिहार यांची सत्ता असताना प्रतिहारांमधील काहींनी विश्वामित्र गोत्राचा स्वीकार केला असावा.

विश्वामित्राला रेणू, शालावती, संस्कृती, माधवी आणि दूपद्धती अशा भार्या होत्या. विश्वामित्राने आपल्या ५० पुत्रांना शाप दिल्याने १. कुशिकशाखा (कृपा पुत्रांची) आणि २. विश्वामित्र शाखा (शापित पुत्रांची) निर्माण झाल्या. विश्वामित्राच्या कुलात उदुंबर, कारूजक, कौशिक, मालव इ. २८ गोत्रे निर्माण झाली आहेत. त्यातील काही गोत्रे द्विप्रवरी तर काही त्रिप्रवरी आहेत.

४२. **विभांडक** - हा कश्यपाचा पुत्र व शृंग ऋषीचा पिता व एक तपस्वी ऋषी. त्याने शृंगेरी भागात तपश्चर्या केली होती. त्याच्या आश्रमाची भूमी शृंगेरीच्या पश्चिमेस ६ मैलांवर (१० कि.मी.) दाखवितात. याच्या नावावरील सूक्ते लेखकास मिळू शकली नाहीत, मात्र हा निर्विवाद गोत्रकार होता.

४३. **शुकमुनी** - यास शुक योगींद्र असेही म्हणतात. **स्कंदपुराणानुसार** व्यासाच्या बटिकानामक भार्येपासून शुक जन्मला. शुकाने बृहस्पतीकडून वेद, उपनिषदे व इतिहासाचे ज्ञान मिळविले. मोक्षधर्म त्यास व्यासांनी शिकविले. शुकाने जनक राजास ब्रह्मज्ञान उपदेशिले. व्यासांनी त्यास ब्रह्मविद्या शिकविली. शुकाने ब्रह्मसूत्रांची व्यवस्थित मांडणी

करून त्यांची संहिता केली. परशुराम, व्यास व नंतर शुकाने **भागवताचा** सर्वत्र प्रसार केला. परमज्ञान व नैष्ठिक ब्रह्मचर्य यामुळे शुकमुनी प्रातःस्मरणीय ठरला आहे.

४४. शांडिल्य - या गोत्रावर दुधलगावचे श्री. शंकर विठोबा पाटील यांनी **शांडिल्य** गोत्र ग्रंथ लिहिला असून ज्यांना या गोत्राचा सखोल अभ्यास करायचा असेल, त्यांनी हे पुस्तक जरूर पाहावे. हा एक प्राचीन आचार्य असून शांडिलाचा वंशज आहे. **बृहदारण्यक उपनिषदात** याला वत्साचा शिष्य म्हटले आहे. शांडिल्य यज्ञविधीत कुशल होता. **शतपथ** ब्राह्मणाच्या सहा ते दहा कांडांमध्ये शांडिल्याच्या मतानुसार वेदीचा विचार केलेला आहे. याचे नाव गोत्रांच्या यादीत असून शांडिल्य, असित व देवस हे शांडिल्य गोत्राचे प्रवर आहेत. **शांडिल्यविद्या** नावाचा एक तत्त्वज्ञानात्मक विचार याच्या नावावर आहे. मृत्यूनंतर आत्म्यात विलीन होणे, हे आयुष्याचे साध्य आहे, असे हा सांगतो. **शांडिल्यस्मृती, शांडिल्यधर्मसूत्र, शांडिल्यतत्त्व** व भक्तिमार्गावरील **शांडिल्यसूत्रे** हे प्रमुख ग्रंथ याच्या नावावर आहेत. इतरही काही ग्रंथ त्याच्या नावावर आहेत.

शेलगांव बाजार, ता. मोताळा येथे मोहगंगा नदीच्या काठी शांडिल्य निर्झर संगम स्थळावर शांडिल्याचा आश्रम आहे. आता तेथे एक मंदिर बांधण्यात आले आहे.

४५. शौनक - अनेकांचे कुलनाम. **ऋग्वेदातील** दुसऱ्या मंडलाचा कर्ता गुत्समद हा शौनक आहे. **शतपथ ब्राह्मणा**तील इंद्रात व स्वैदायन हेही शौनकच आहेत. **बृहदारण्यकात** हा रोहिणायनाचा गुरू आहे. तो भृगू कुलातला मंत्रकार, कुलपती आणि वेदार्यशास्त्रज्ञ होता. त्याने **ऋग्वेद अनुक्रमणिका, ऋक प्रातिशाख्य, बृहदेवता, शौनकस्मृती, चरणव्यूह, ऋग्विधान, ऋग्वेदकथानुक्रमणी** हे ग्रंथ लिहिलेत. शल्यतंत्र शाखेचा हा जनक होय. याशिवाय याने **शौनकगृह्यसूत्र, शौनकगृह्यपरिशिष्ट** आणि **वास्तुशास्त्र** हेही ग्रंथ लिहिलेत. आश्वलायन हा शौनकाचा प्रमुख शिष्य होता. महाभारतानुसार शौनक कुलपती असून त्याचा आश्रम मोठे गुरुकुल होते. त्याच्या आश्रमातच अथर्ववेदाच्या शौनकशाखेचा विस्तार झाला. परीक्षिताचा पुत्र शतानीक आणि युधिष्ठिरास शौनकाने तत्त्वज्ञान आणि धर्मोपदेश केला होता.

४६. शृंग/शृंगव (भृंगव) - याला शृंगी असेही संबोधतात. हा विभांगक ऋषीचा पुत्र. विभांगकाने शृंगेरी भागात तपश्चर्या केली. त्याच्या आश्रमाची भूमी शृंगेरीच्या १० कि.मी. वर दाखवितात. दशरथाने पुत्रकामेष्टीसाठी शृंगाला अयोध्येस नेले होते. शृंगेरीचा मठ तुंगा नदीकाठी असून तेथेच आद्य शंकराचार्यांचा व सध्याच्या शंकराचार्यांचा मठ आहे. शृंगेरीजवळच वराहगिरीनामक पर्वतातून तुंगा, भद्रा, देववती व बाराही या चार नद्या उगम पावतात. हा शृंग सूक्तकार तसेच गोत्रकारही मानला जातो. तो लेवा पाटीदारांमधील बऱ्याच कुळांचा गोत्र आहे. रावेर तालुक्यात शिंगत या गावी शृंग ऋषींचे मंदिर आहे.

४७. सनकादिक/सनकादिस/शंकादी - याचे नाव सनकादिक असे असून काही त्याला अपभ्रंशाने सनकादिस किंवा शंकादी असेही संबोधतात. खरे तर यास सनत्कुमार असे संबोधावयास पाहिजे. कारण सनक, सनंदन, सनत्सुजात व सनत्कुमार हे ब्रह्मदेवाचे चार मानसपुत्र असून त्यांना चौघांना सनकादिक म्हणून ओळखले जाते व यांच्यातील सनत्कुमार हाच सूक्तकर्ता होऊन गेला. पहिले तीन सूक्तकर्ते असल्याचा पुराणांत पुरावा नाही. सूक्तकर्ता सनत्कुमार हा नारदाचाही गुरु होता. **छांदोग्य उपनिषदात** याने एक प्रकारचा आध्यात्मिक सुखवाद प्रतिपादला आहे. तो सांगतो की, सर्व कर्माचे मूळ कारण सुख होय. कर्म हे विश्वासाचे व विश्वास हे श्रद्धेचे कारण आहे. आपल्या श्रद्धेप्रमाणे मनुष्य विचार करू लागतो, विचाराने त्याला समज येते व समजू लागले म्हणजे सत्यज्ञान प्राप्त होते. त्याच्या मते सुख, कर्म, विश्वास, विचार, ज्ञान व सत्य ही स्वानुभावाची नैतिक सोपानपंक्ती आहे (**छां. उप. उप.** ७.१७.२२) याच्या तत्त्वज्ञानातील दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भूम्याची मीमांसा. सर्वत्र परमेश्वर दिसू लागल्यावर जो अपरिमित आनंद होतो तोच भूमा होय. तदितर सर्व अल्प समजावे. आत्मा हा सर्व शक्तीचे, सर्व ज्ञानाचे व सर्व आनंदाचे आगर आहे. (**छां. उप.** ३५.७.२५.). वृत्तासुराला **विष्णुमाहात्म्य** व रुद्राला तत्त्वसृष्टी याने ऐकविली. याला शापामुळे उंटाचा देह प्राप्त झाला होता. तो टाकून याने नंदीपासून शिवव्रत श्रवण केले (**लिंग पु.** २.९.) याच्या नावावर **वास्तुशास्त्र, सनत्कुमारसंहिता, सनत्कुमारतंत्र** आणि **सनत्कुमारकल्प** हे ग्रंथ आहेत. (प्रा.च.को.)

महत्त्वपूर्ण सूचना - लेवा पाटीदारांमधील पूर्वापार चालत आलेली आदर्श पद्धत म्हणजे सकूळ विवाह न करणे ही होय. पूर्वी यांच्यामध्ये विवाहसंबंधासाठी गोत्र न बघता फक्त कुळे बघत. तीच पद्धत योग्य आहे. गोत्रांचे खूळ अलीकडे निघाले आहे. सगोत्र विवाह करू नये हे खरे आहे तरी बऱ्याच लेवा पाटीदारांना आपली स्वतःची गोत्रे माहीत नसतात. गोत्र माहीत नसल्यास बऱ्याचदा गावातील उपाध्यायाचे/पुजाऱ्याचे गोत्र चिकटविले गेले. आज जी गोत्रे सांगण्यात येतात ती अस्सल असण्याबाबत छातीठोकपणे कोणी सांगू शकत नाही. बऱ्याचदा ज्यांना गोत्र माहीत नाही; त्यांनी आपले गोत्र कश्यप लावावे, असा धर्मशास्त्रानुसार रिवाज आहे. अशा परिस्थितीत अनवधानाने सगोत्र विवाह जुळू शकतो. उदा. गोत्र माहीत नसणाऱ्याने कश्यप गोत्र सांगितले असेल व त्याचे खरे गोत्र भृगू असेल तर असा वरपक्ष आणि भृगू गोत्राचा वधूपक्ष यांच्यात अनवधानाने सगोत्र विवाह जुळू शकतो. म्हणून विवाह करू नये. आपल्या समाधानासाठी गोत्र जरूर पाहावे. सकूळ विवाह न करण्याचा लेवा पाटीदारांमधील पूर्वापार चालत आलेला रिवाज योग्य तर आहेच, परंतु अतिशय आदर्श आहे. बऱ्याचदा एकाच कुळाची अलग अलग गोत्रे सांगितली जातात व अशी एकाच कुळातील अलग अलग गोत्रांची सगोत्र नसला तरी सकूळ विवाह झाल्याची काही उदाहरणे आहेत. हे चूक आहे.

म्हणून गोत्रापेक्षा कुळाला महत्त्व देणे योग्य. एका रक्तगटात विवाह करू नये, असे शास्त्र सांगते. म्हणून लेवा पाटीदार हे मामेकूळ पाहत म्हणजे मामाच्या मुलीशी लग्न केल्यास समान रक्तगट होऊ शकतो. परंतु हे फक्त सख्ख्या मामेबहिणीपुरते शक्य असते. याचा अर्थ असा नव्हे की, मामाच्या कुळातील इतर कोणत्याही मुलीशी लग्न केल्यास रक्तगट समान असेल. म्हणून सख्ख्या मामेबहिणीशी/मामाच्या मुलीशी लग्ने करणे योग्य नसले तरी मामेकुळातील इतर मुलींशी लग्न करू नये असे नाही. त्यास शास्त्राचाही आधार नाही. बरीच म्हणण्यापेक्षा बहुसंख्य कुळे अशी आहेत की, त्यांना एकापेक्षा अधिक गोत्रे सांगितली जातात. उदा. कुरकुरे कुळाला गावागावानुसार उदालक, कौंडिण्य, बगदालभ्य, वसिष्ठ व भारद्वाज ही गोत्रे सांगितली जातात. ढाके कुळास गौतम, भृगू-भार्गव, भृशुंडी, लोकदक्ष, शृंग, कश्यप इत्यादी गोत्रे सांगितली जातात. नेमाडे कुळास कश्यप, कौंडिण्य, कौशिक, मार्कंड, शृंग आदी गोत्रे सांगितली जातात. बोंडे कुळास अंगिरा, कश्यप, मांडव्य, भारद्वाज आदी गोत्रे सांगितली जातात. फेगडे कुळास गौतम, बगदालभ्य, भारद्वाज, शांडिल्य, विश्वमित्र आदी गोत्रे सांगितले जातात. सरोदे कुळास कण्व, कलंकी, कश्यप, कैवल्य, भृगू-भार्गव, शांडिल्य, कौंडिण्व आदी गोत्रे सांगितली जातात. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. गोत्रे माहीत नसल्याने अनेक वेळा गोत्रे बदलली आहेत मग सोयरीक संबंधासाठी गोत्र बघण्याचा हव्यास का? कुळे ही कधीच बदलली नाहीत म्हणून सकूळ विवाह न करणे हीच पद्धत योग्य आहे. विवाहासाठी गोत्रांऐवजी कुळे विचारात घ्यावीत, अशी समाजातील विचारवंतांची मते योग्य आहेत.

प्रवर - लेवा पाटीदारांमध्ये प्रवर अजिबात पाहत नाहीत. केवळ ज्ञान असावे म्हणून थोडी माहिती देत आहे. प्रवर म्हणजे गोत्रांचे पूर्वज. ते एक, दोन, तीन व पाच असतात. एखाद्या गोत्राचे तीन प्रवर असले तर ते प्रपितामह, पितामह व पिता असे असतात. प्रवर हा शब्द संप्रदाय - प्रवर्तक ऋषींच्या नावाचा वाचक असून ते संप्रदाय श्रौतकर्मासंबंधीचे होते हे उघड आहे. गोत्र हा जसा विद्यावाचक शब्द आहे, तसा प्रवर कर्मसंप्रदायवाचक आहे.

सूत्रकारांनी विशिष्ट गोत्रांचे विशिष्ट प्रवरऋषी सांगितले आहेत. पराशर गोत्राचे वसिष्ठ, शाक्त्य व पाराशर्य. वैशांचे भालंदन, वात्सप्र व मांक्तिल हे तीन प्रवर आहेत. प्रवरांचा संबंध गृहकृत्यांशी जोडलेला असला, तरी मुख्यतः त्यांचा संबंध दर्श व पूर्णमास या इष्टींशी येतो.

प्रवर म्हणजे त्या कुळातील पूर्वज ही कल्पना चूक असावी. प्रवर हे पिता, पुत्र व नातू यांची नामे दर्शवितात हा समज बरोबर नाही. उदा. कुंडिन गोत्राचे प्रवर वसिष्ठ, मित्रावरण व कुंडित असे आहेत. यांच्यापैकी मित्रावरण हा वसिष्ठांच्याही पूर्वकाळचा आहे. तेव्हा तो त्याचा मुलगा होऊ शकत नाही. अशी अनेक उदाहरणे आहेत.

यावरून गोत्र व प्रवर यांनी रक्तसंबंध दर्शविला जातो हे खरे नसल्याचे कळून येईल. प्रवर हे कुलातील पूर्वज नसून, निरनिराळ्या वैदिक शाखांचे अध्वर्यू असावे. लेवा पाटीदारांमध्ये प्रवरांना विशेष महत्त्व दिले जात नाही. आवश्यकता भासल्यास गुरूच्या किंवा पुरोहिताच्या प्रवरांची नावे घेतली जातात.

इंदूरचे श्री. वासुदेव हरी पाटील यांनी परिश्रमपूर्वक लेवा पाटीदारांच्या काही गोत्रांचे प्रवर शोधून काढले आहेत. काही प्रवरांची यादी पुढीलप्रमाणे -

गोत्र	प्रवर संख्या /प्रवर प्रकार	प्रवर
अत्री	त्रिप्रवर	अत्री, आत्रे, शतातय
आत्रेय	-,,-	आत्रेय, शतात्रय, सांख्य
अगस्य	-,,-	अगस्य, दधिची, जैमिनी
अंगिरस	-,,-	अंगिरस, वसिष्ठ, बार्हस्पत्य
काश्यप	-,,-	काश्यप, आप्सकार, नैधृव
कौशिक	-,,-	कौशिक, अत्री, जमदग्नी
कौंडिण्य	-,,-	कौंडिण्य, अस्तिमिक, कौलव
कुशिक	-,,-	कुशिक, कौशिक, विश्वामित्र
कण्व	-,,-	कण्व, अश्वत्थ, देवल
गौतम	-,,-	गौतम, वसिष्ठ, बार्हस्पत्य
गौतम	पंचप्रवर	गौतम, अंगिरस, आप्यसार, बार्हस्पत्य नैधृव
गर्ग	त्रिप्रवर	गार्ग्य, कौस्तुभ, मांडव्य
धृत कौशिक	-,,-	धृतकौशिक, कौशिक, कुशिक
भारद्वाज	-,,-	भारद्वाज, बार्हस्पत्य, अंगिरस
पराशर	-,,-	पराशर, शक्ती, वसिष्ठ
वसिष्ठ	-,,-	वसिष्ठ, अत्री, सांस्कृती
विश्वामित्र	-,,-	विश्वामित्र, मारिची, कौशिक
वात्स्य	पंचप्रवर	भार्गव, च्यवन, आप्यवान, और्व, जमदग्नी
शांडिल्य	त्रिप्रवर	शांडिल्य, असित, देवल
शुनक (शौनक)	-,,-	भार्गव, शौनक, गुत्समद
भार्गव	पंचप्रवर	भार्गव, च्वयन, आप्यवान, और्व, जमदग्नी
मार्कंडेय	-,,-	भार्गव, च्वयन, आप्यवान, और्व, जमदग्नी
लोकाक्ष	एकप्रवर	-

वामदेव	त्रिप्रवर	अंगिरस, वामदेव, गौतम
मारिच	त्रिप्रवर	मारिची, कौशिक
लोहित	-,,-	विश्वामित्र, अष्टक, लोहित

लेवा पाटीदारांचे कुळाचार हे त्यांचे सण व उत्सव आणि विधी व संस्कार यांपासून वेगळे दाखविता येणार नाहीत. त्यांचे कुळाचार प्रकरण ५ व प्रकरण ६ मध्ये आलेले आहेत.

परिशिष्ट
कुळे, कुलदेवता व गोत्रेचे परिशिष्ट (सदगुरू प. पू. मोरेदादा यांच्या माहितीनुसार)

क्र.	मुख्य कूळ	पोटकुळे	वंश	गोत्र	कुलदैवत, कुलदेवता व लग्न देवके
१	अहिरराव	जंगले	सूर्य	भारद्वाज	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
२	आंग्रे	करांडे	चंद्र	गार्ग्य	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
३	आंगण	किनगे	चंद्र	दुर्वास	तुळजाभवानी सोने, हळद, केतकी, कळंब
४	इंगळे	खडसे, चौधरी जंगले	चंद्र	भारद्वाज	कोल्हापूर लक्ष्मी, देवकमळ
५	कर्दप, कदम	कावळे, कोल्हे घांटे, वराडे	सूर्य	भारद्वाज	तुळजाभवानी सोने, हळद, केतकी, कळंब
६	काळे	रोठे	सूर्य	भारद्वाज	तुळजाभवानी सोने, हळद, केतकी, कळंब
७.	कोकाटे	बोंदे	सूर्य	काश्यप	ज्वालामुखी तुळजाभवानी महादेव, वासव, वेल सोने, हळद,

					रुई, कळंब
८	खजगळे	चोपडे, ठोंबरे	सूर्य	वसिष्ठ	महादेव, तुळजाभवानी कळंब
९	खडतरे	ढाके, नमाळे नेमाडे	चंद्र	लोभश	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
१०	खैर	नाफडे	चंद्र	मार्कंडेय	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
११	गव्हाणे	टेकाडे	चंद्र	कौशिक	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
१२	चव्हाण	करकरे - कुरकुरे फालक	सूर्य	काश्यप	ज्वालामुखी तुळजाभवानी महादेव, वासन वेल हळद, सोने, रुई, कळंब
१३	घाटगे	करकरे - कुरकुरे	सूर्य	काश्यप	प्रभाकर व प्रभावती देवी, तुळजाभवानी, साळंखी पंख व पंचपल्ल
१४	चालुक्य	बेंडाळे	चंद्र	मांडव्य	तुळजाभवानी महेश्वर कळंब, उंबर, शंख
१५	जगताप	बऱ्हाटे, येवले	चंद्र	मांडव्य	तुळजाभवानी, कळंब, उंबर पिंपळ
१६	जगदाळे	नारखेडे	चंद्र	कपिल	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
१७	जगघने	गांजरे-गाजरे कोलतकार-कोलते	चंद्र	कपिल	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
१८	यादव/जाधव	बऱ्हाटे	चंद्र	अत्री, कौंडिण्य	शंकरपार्वती, तुळजा जोगेश्वरी, कळंब, आंबा उंबर, पंचपल्लव
१९	तावडे	जावळ-जावळे	सूर्य	विश्ववसू	जोगेश्वरी कळंब/हळद
२०	तेजे	कुरकुरे	सूर्य	कौंडिण्य	शिवपार्वती जेजुरी खंडोबा तुळजाभवानी

					कळंब, रुई, मोरचेल
२१	थोटे	गुडवे -गुळवे	सूर्य	वसिष्ठ	महादेव, तुळजाभवानी कळंब
२२	दळवी	घांदे -घांडे भंगाले-भंगाळे	चंद्र	वसिष्ठ	महादेव, तुळजाभवानी
२३	दाभाडे	खाचणे फेंगडे-फेगडे	सूर्य	शौनल्य	जगदंबा, भवानी कळंब
२४	धर्मराज	फिरंके-फिरके	सूर्य	विश्वामित्र	सूर्य, जगदंबा तुळजा, पंचपल्लव
२५	देवकांते	कोलते- कोलते	चंद्र	कौशिक	उमामहेश्वर तुळजा, पंचपल्लव
२६	धुमाळ	बोरावले-बोरीले	चंद्र	दुर्वास	भवानी, हळद
२७	पाठारे	खडके	सूर्य	काश्यप	ज्वालामुखी, उमामहेश्वर तुळजाभवानी महादेव, वासनवेल हळद, सोने, रुई कळंब
२८	पलांड	भाळे-भोळे	सूर्य	शौनल्य	महाकाली, माहूर रेणुका, महाकाळेंश्वर
२९	फालके	तळोले-तळेले फलके/फाळके फालक	चंद्र	कौशिक	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
३०	फाकडे	वायखळे-कायकोळे शिंगोकार-सिंगनुरकर	सूर्य	विश्वामित्र	सूर्य, जगदंबा तुळजाभवानी पंचपल्लव
३१	फाटक	राडके-रडे सरोदी-सरोदे	सूर्य	भारद्वाज	कोल्हापूर लक्ष्मी, देवकमळ
३२	बागराव	गजरे-गाजरे पाटलीचे-पाटील वागुळदे-वाघुळदे	चंद्र	भारद्वाज	उमामहेश्वर तुळजाभवानी उंबर, शंख
३३	बांडे	पिंपळे	सूर्य	भारद्वाज	तुळजाभवानी सोने, कळंब हळद, केतकी
३४	भागवत	होलगे-होले	सूर्य	काश्यप	कात्यायनी तुळजाभवानी हळद, कळंब
३५	भोसले-सिसोदे	बढे, महाजन लोखंडे	सूर्य	वैजवाप ऊर्फ	सूर्य, जगदंबा, तुळजाभवानी

				कौशिक	पंचपल्लव
३६	भोवारे	होले	सूर्य	कौशिक	उमामहेश्वर तुळजाभवानी पंचपल्लव
३७	भोईटे	बंगळे-भंगाळे येवले	सूर्य	शौनक	महादेव, तुळजाभवानी पंचपल्लव
३८	मुळीक	टोगळे-टोंगळे दाइके-ढाके,डहाके वाघुळ-वाघुळदे	सूर्य	गौतम	उमामहेश्वर पंचपल्लव
३९	लाड	गिरजे-गाजरे पाटील, पाटीदार	चंद्र	वसिष्ठ	जगदंबा वासनवेल
४०	वाघ	वऱ्हाडे	सूर्य	वत्स विश्वास	जोगेश्वरी, कळंब, हळद
४१	शिलाहार	पाचपांडे	सूर्य	भारद्वाज/ विश्वामित्र	जगदंबा ब्रह्मनाथ पंचपल्लव/कमळ
४२	शिंदे	कोल्हे	सूर्य	कौंडिण्य शेष	शिवपार्वती कोल्हापूर लक्ष्मी
४३	सावंत	भोंगे-भोगे सुपले-सुपे	चंद्र	दुर्वास	जगदंबा, कमळ
४४	साळुंखे	अत्तरदे, इंगवले दांडे धोरे	सूर्य	भारद्वाज	महादेव पार्वती तुळजाभवानी पंचपल्लव
४५	सांबारे	चौधरी	सूर्य	मानव्य	जोगेश्वरी
४६	सिसोदे	चौधरी भोंगाडे-भंगाळे	सूर्य	कौशिक वाजपेयी	सूर्य, जगदंबा तुळजाभवानी
४७	क्षीरसागर	लोखंडे	सूर्य	वसिष्ठ	महादेव तुळजाभवानी कळंब

उपरोक्त कुळे ही ९६ कुळांमधील असून ब्र. भू प. पू. मोरेदादांनी लेवा पाटीदारांनाही (लेवा क्षत्रियांना) ९६ कुळांमध्ये समाविष्ट केलेले दिसते. म्हणजे ९६ कुळांमधील ४७ कुळांमध्ये लेवा पाटीदार आढळून येतात. मात्र, लेवा पाटीदार हे फक्त सूर्यवंशी मानले जातात. आदरणीय मोरेदादांनी सूर्य व चंद्र (सोम व यादव) दोन्ही कुळांमध्ये लेवा क्षत्रिय असल्याने नमूद केले आहे. त्यांची गोत्रेही शंकास्पद वाटतात.

प्रकरण ४ - तळटिपा

१. शं. वि. पाटील **लेवा पाटीदारांचा इतिहास,** पृ. ५३.

२. दाते, कर्वे, **महाराष्ट्र शब्दकोश,** विभाग पहिला, पृ. २१.

३. रा. चिं. ढेरे, **खंडोबा;** ग. ह. खरे, **महाराष्ट्राची चार दैवते,** १९५८ व पं. महादेवशास्त्री जोशी, **तीर्थरूप महाराष्ट्र,** १९७५.

४. **विश्वकोश,** खंड ३, पृ. ७८०.

✧✦✧

प्रकरण ५

सण व उत्सव

लेवा पाटीदार हासुद्धा हिंदू घटक असल्याने उत्सवप्रिय आहे. त्यामुळे हिंदूंचे सर्व म्हणजे गुढीपाडवा, रामनवमी, हनुमान जयंती, अक्षयतृतीया, आषाढी व कार्तिकी एकादशी, नागपंचमी, पोळा, हरतालिका, गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी, संक्रांत, महाशिवरात्री, होळी इत्यादी सर्व सण साजरे करतो; तर शेतकरी समाज असल्याने पोळा, दसरा, संक्रांत, होळी, अक्षयतृतीया हे सण व उत्सव विशेषकरून साजरे करतो. आखाळ (आषाढ) व रोटाचा उत्सव हे यांचे लौकिक उत्सव, तर भुलाबाईचा व गौरीचा उत्सव यांच्या मुलींचा लौकिक उत्सव! त्यांची सर्वांची थोडक्यात माहिती खाली देत आहे.

मुंजे - कान टोचण्यापूर्वी कुमाराचा मृत्यू झाल्यास त्यास मुंजा समजून देव मानतात व त्याची पूजा करतात. हे लौकिक व्रत लेवा पाटीदारांमध्ये आहे. त्यासाठी ज्यांच्या घरात कुमाराचा मृत्यू झाला असेल, त्याची श्रावणातील पहिल्या सोमवारी पूजा करण्यास्तव व त्याच्या सांत्वनास्तव त्या घरात मुंजे बसवून त्यांना जेवू घालतात. म्हणजे कुमारांना बोलावून जेवू घालतात. यात बहुधा चार कुमारांना खीर-पोळीचे जेवण देतात. त्यांची पूजा करतात. देव्हाऱ्यातील देवांची पूजा करतात. रोटांच्या दिवसांनुसार मुंजांचे दिवसही बदलत असतात. काही माघ वद्य पक्षातील दुसऱ्या शनिवारी मुंजे जेवू घालतात.

रोटाचा सण - कानबाईचा देश तो कानदेश व त्यावरून अपभ्रंशाने खानदेश असे एकमत इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनीही मांडले असून सर्वसामान्य मनाला चटकन पटणारी ही एक व्युत्पत्ती आहे. खानदेशभर जवळजवळ सर्व जातीजमातींमध्ये

पुजली जाणारी ही एक प्रमुख ग्रामदेवता आहे. खानदेशात त्यातल्या त्यात लेवा पाटीदार समाजात रोटाच्या सणास विशेष महत्त्व असते. रोटाचा सण म्हणजे काय, हे या लोकांना सांगता येत नसले तरी सणाचे व्रत अगदी काटेकोरपणे पाळतात. लेवा पाटीदारांचा हा कुळाचार आहे. हा सण श्रावण महिन्यात येतो. हा सण उत्तरेकडून आला असावा. ब्राह्मणांमध्ये त्याला रोटक असेही म्हणतात. हे एक काम्य व्रत असून याला बिल्व रोटक असेही नाव आहे. खरे तर श्रावण मासातील शुद्ध पक्षातील पहिल्या सोमवारी किंवा श्रावणी शुद्ध प्रतिपदा सोमवारी आल्यास त्या तिथीला या व्रताचा आरंभ करतात. लेवा पाटीदारांमध्ये मात्र श्रावणाच्या कृष्ण पक्षातील दुसऱ्या रविवारी रोटाचा उत्सव साजरा करतात. हा शिवाचा सण आहे. व्रत कार्तिक शुद्ध त्रयोदशीपर्यंत करण्याची प्रथा आता कोणी पाळत नाही. चतुर्दशीला उपवास करावा, घटस्थापना करून पंचरत्ने घालावीत, घटाला पांढरे वस्त्र लपेटावे, अष्टदल व उमेसह शिवाची प्रतिमा काढावी. रात्री पंचामृताने पूजा करावी, लोखंडी तव्यावरचे पाच रोटके (रोडगे) नैवेद्य दाखवावा. त्यातील दोन ब्राह्मणास दान, एक नैवेद्यासाठी आणि दोन स्वतःसाठी ठेवावे, अशी प्रथा होती. त्याऐवजी आता खानदेशात नागपंचमीनंतर येणाऱ्या पहिल्या रविवारीच रोटपूजा करतात. खानदेशात मात्र रोटपूजेचा समज वेगळा असून त्याला ग्रामदेवतेच्या उत्सवाचे स्वरूप दिले जाते. प्रत्येक गावाची एक ग्रामदेवता असते. ही ग्रामदेवता प्रत्येक शेताची रक्षणकर्ती मानली जाते. रोटपूजेलाच काही जण चक्रपूजा असे म्हणतात. नाशिक जिल्ह्यातील खानदेश भागात तिला कानबाई म्हणतात. या सणात नारळ धुऊन त्याची कलशावर स्थापना करतात. कलशाच्या गळ्यात ऐपतीप्रमाणे दागिने टाकतात. त्यावर नथ अडकवून वर खण पांघरवितात. त्याच दिवशी सवाई मापाने गहू दळून त्याचे रोट करतात. एका वर्षी सण टळला तर दुसऱ्या वर्षी हे रोट दुप्पट करतात. कानबाईला दाखविलेला नैवेद्य कुटुंबातले लोकच खातात. नागपंचमीनंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी म्हणजे या सणाच्या दिवशी घरातील सर्वच जण उपवास करतात. त्या दिवशी उपवास सोडल्यावर अन्न अजिबात वाया जाऊ देत नाहीत किंवा थोडेतरी शिल्लकही ठेवता येत नाहीत. देवी बसते त्या घरी (देव्हारा) रात्री महिला रोटाची गाणी म्हणतात. त्यात आयुरारोग्य व भरभराटीसाठी प्रार्थना केलेली असते. उदा. ''रोटदेवा भाकर दे, आयुक्ष दे । माह्य वावर फुलू दे ।।'' ही गाणी म्हणताना पूर्वी महिला पिंगा व फुगड्या खेळत असत. रोटाचे अन्न वाया जाऊ नये म्हणून काळजी घेतातच. त्यासाठी सासरवाशिणी भीती व्यक्त करणारी गाणी गातात. उदा. ''कुत्र्यानं रोट खाल्ले व माय, खाल्ले व माय। नवरा मले मारीन व माय, मारीन व माय।।''

दुसऱ्या दिवशी जलाशयात, नदीत बोळवण करतात व लाह्या, खोबरे, काकडीचा प्रसाद वाटतात. कानबाईच्या मिरवणुकीत महिला भाग घेतात. क्वचित पुरुषही भाग घेतात. कानबाईपुढे टिपऱ्या घेऊन नाचतात. विसर्जनानंतर पूजेचा नारळ धुऊन घरी

आणतात. हा नारळ पिढ्यान्‌पिढ्या या सणासाठी वापरतात. (आता ही प्रथा आढळत नाही).

रोट हे कुळाचे स्नेहमिलन! खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदारांची लोक संस्कृती व कृषी संस्कृती या परस्परांशी निगडित आहेत. खरे तर कानबाई ही शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची देवता आहे. श्रमभक्ती व ईश्वरभक्तीच्या प्रेरणांचा संगम कानबाईच्या व रोटांच्या गीतांत पाहावयास मिळतो. शेतात मोती पेरणाऱ्या व एका मोत्यापासून पसापसा मोती काढणाऱ्या स्त्रीकडे खानदेशी लोकांचा दृष्टिकोन कानबाईच्या भूमिकेतून पाहताना दिसतो. या रोटाचा 'उगत भान्या' नावाचा आणखी एक प्रकार आहे. नवस केलेला असेल तरच तो करतात. याचा गहू शनिवारी दळतात व रविवारी सूर्य उगवण्यापूर्वीच त्याचे रोट बनवून देवीला नैवेद्य दाखवितात व खाऊन संपवितात. कानबाईला कानूबाई-राणूबाई असेही म्हणतात.

रोटपूजेसारखीच रंबाई पूजा असते. रंबाई ही खानदेशातील एक प्रमुख देवता आहे. तिचा पूजासोहळा सात दिवस चालतो. बहुधा, हे रंभातृतीयाचे काम्य व्रत असावे. प्राचीनकाळी रंभेने सौभाग्यप्राप्तीसाठी हे व्रत केले म्हणून याला हे नाव मिळाले. मार्गशीर्ष शुद्ध तृतीयेला व्रताचा आरंभ करतात. दर महिन्याच्या तृतीयेला व्रत करतात, असे वर्षभर करतात.

तसे पाहिले तर कानबाई वा रोटपूजा हा खानदेशाचे मूळ रहिवासी असलेल्या अहिरांचा मुख्य उत्सव आहे. या भूमीवर आभीरांचे आगमन नेमके कधी झाले? यदुवंशीय कृष्णाचे वंशज मानणाऱ्या आभीरांचा सत्ताकालखंड कोणता? कृष्णाच्या कान्हा नावावरूनच या आभीरांनी, गवळ्यांनी या प्रदेशाचे नाव कण्हदेश कधी ठेवले? आणि फारुकी राजवटीचा प्रदीर्घ काळ अंमल असूनही येथील सांस्कृतिक परंपरांचा गाभा अबाधित राहण्याचे, एवढेच नव्हे आभीरांनंतर आलेल्या गुजर, लेवा पाटीदार, मराठा, ब्राह्मण व इतर अलुतेदार-बलुतेदार समाजांनाही हे संस्कार स्वीकृत करण्याचे रहस्य कोणते? या अंगाने खानदेशचा इतिहास जाणून घेण्यासाठी कानबाई उत्सव हे प्रभावी साधन आहे. खानदेशाच्या पश्चिम भागात कानबाई व रोटपूजेची गाणी अहिराणीत असली तरी लेवा पाटीदार समाजाने ती लेवा गणबोलीत रचली यामागचे कारण काय असावे? लोक संस्कृतीची उकल करण्यासाठी या मौखिक खजिन्याचा उपयोग होऊ शकतो.

पोळा - बळीराजाचा म्हणून लेवा पाटीदार शेतकऱ्यांचा मुख्य सण! या दिवशी बहुतेक सर्व शेतकरी कुटुंबे उपवास करतात. सकाळी बैलांना स्वच्छ धुऊन म्हणजे त्यांना अंघोळ घालून शिगांना हिंगूळ, रंग लावून व बाशिंग बांधून सजवितात. ऐपतीनुसार झुलही चढवितात. बैलजोडीस पोळा फोडल्यानंतर स्वतःच्या दारी (लेवा पाटीदारांना दारी म्हटलेले आवडत नाही, ते घरी म्हणतात) पुरणपोळीचा नैवेद्य

भरवतात. त्यास बैल जेवले, असे म्हणतात. पोळा फोडणे म्हणजे मानकऱ्यांच्या बैलजोडीने (मालकाने) सर्व प्रथम राहून मंदिराजवळील मानाचा नारळ स्वीकारणे होय. नंतर दुसऱ्यांच्या घरी बैलांना जेवू घालतात. बैल जेवल्यानंतर शेतकरी कुटुंब उपवास सोडते. बैल जेवतेवेळी घरधनीण बैलांची यथासांग पूजा करते. घरातही त्याआधी कुंभाराने आणलेल्या पाच मातीच्या बैलांच्या प्रतिमांची (वाढे बैल व राखोई) देव्हाऱ्याखाली मांडणी करून पूजा करतात. कुंभाराला मोठा मोबदला देतात. या प्रतिमांना शिवाचे प्रतिनिधी संबोधतात. या प्रतिमा नीट राखून ठेवतात व दिवाळीच्या दिवशी शेतात दिवा लावतात, त्याच्याजवळ किंवा खोपडीबारस (कार्तिक शुद्ध द्वादशी) च्या दिवशी खोपडीत ठेवतात. काही गावांत पोळ्याच्या दिवशी बैलांच्या शर्यती खेळतात. या दिवशी महिला पिठोरी अमावस्येची पूजा करतात.

भुलाबाई - लेवा पाटीदारांच्या मुर्लीमध्ये भुलाबाईचा उत्सव प्रसिद्ध आहे. भुलाबाई म्हणजे भिल्लिणीच्या रूपात भिल्लरूपी शंकरास भुलवायला निघालेली पार्वती होय. ती भुलाबाई झाली म्हणून शंकराला भुलोबा म्हणू लागले. खानदेशात व विदर्भातील लेवा पाटीदार राहत असलेल्या भागात भुलाबाईचा विशेष प्रचार आहे. हा उत्सव भाद्रपद पौर्णिमेपासून कोजागरी पौर्णिमेपर्यंत चालतो. भाद्रपद पौर्णिमेला घरोघरी भुलाबाई व भुलोबा या दोघांच्या मातीच्या मूर्ती सजवलेल्या मखरात किंवा कोनाड्यात बसवितात आणि कोजागरी पौणिमेला रात्रभर जागवून वद्य प्रतिपदेला त्यांचे पाण्यात विसर्जन करतात. दररोज संध्याकाळी मुली भुलाबाईपुढे फेर धरून गाणी म्हणतात व कसलीतरी खिरापत करून तिचा तिला नैवेद्य दाखवितात. यांच्या पूजेला शिव-शक्तीची पूजा म्हटले जाते. भुलाबाईचा हा सोहळा भोंडल्याप्रमाणे असतो व हदग्याच्या गाण्यांप्रमाणेच त्याची गाणी असतात. हा लोकोत्सव असल्याने त्याचा संबंध पर्जन्य व अन्नधान्याची समृद्धी याच्याशी असतो. पर्जन्य व अन्नधान्याच्या समृद्धीसाठी त्यात भुलाबाई-भुलोबाची आराधना असते. घटस्थापनेनंतर वाढत्या दिवसाप्रमाणे गाण्यांचा व खिरापतीचा वाढता क्रम असतो. भुलाबाईच्या गाण्याचा एक नमुना -

पहिली गं भुलाबाई, देवा देवा साजे
घातिला मंडपा, खेळ खेळ खंडोबा
खंडोबाच्या नारी बाई, वणी वणी अवसनं
अवसनेचं पाणी तसं, गंगेच पाणी
गंगेच्या पाण्यानं वैरिला भात
जेविला कंथ, लोकिला रांध
हनुमंत बाळाचे, लांब लांब झोके
भुलाबाई झोके, अवस्नर फुगे
भाऊ भाऊ केकती, माथा फुले झळकती

झळकतीचं एकच पान, दुरून भुलाबाई नमस्कार.

हा सण वऱ्हाडातून खानदेशाकडे आलेला असल्यामुळे भुलाबाईची ही गाणी वऱ्हाडी किंवा घाटोळी बोलीत दिसून येतात. ५०-६० वर्षांपूर्वी घरोघरी असणारा हा मुलींचा लोकोत्सव आता बंद पडला असून आताच्या मुलींना भुलाबाई म्हणजे काय, हेसुद्धा सांगता येत नाही. भुलाबाईच्या उत्सवात मुलींच्या चेहऱ्यावरील ओसंडणारा आनंद आता पुन्हा कधी पाहावयास मिळेल काय?

भालदेव - खानदेशातील गवळी आणि लेवा पाटीदार लोकांमधील हे एक लौकिक व्रत आहे. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपूर्वी सर्व घर साफ करतात, केर फेकून न देता अंगणात एखाद्या कोपऱ्यात साठवतात (पुंजा). त्यावर शेणसडा टाकतात. शुद्ध प्रतिपदेपासून व्रत सप्तमीपर्यंत कोणत्याही प्रकारचे दुभते घराबाहेरील माणसाला देत नाहीत, तर इष्टमित्रांना, बालगोपालांना आपल्या घरी बोलावून खायला देतात. इतके करूनही दुभते शिल्लक राहिले तर नदीत नेऊन टाकतात. या दिवसाला भिक्षेकऱ्यालाही भिक्षा देत नाहीत. उद्यापनाच्या दिवशी नदीतली थोडी वाळू, सात खडे व्हालकोथेडे (अवशिष्ट, गाळण) आणतात. घुसळखांबाजवळ हे सात खडे ठेवतात. तिथेच ती वाळूही पसरतात. पसरलेल्या वाळूवर शेणाची एक बाहुली ठेवतात. या बाहुलीभोवती लव्हाळे उभे करतात. मग त्या बाहुलीची पूजा करतात. सायंकाळी ती बाहुली, खडे, वाळू, लव्हाळे एकत्र करून नदीत विसर्जित करतात व अंगणातील केर उकिरड्यात (उखळल्यात) टाकून देतात. या लौकिक व्रतावरून हे स्पष्ट होते की, पूर्वी लेवा पाटीदार चरवाह=पशुपालक (Pastoral) होते. पूर्वी एकेका कुटुंबाकडे पाच-सात दुभत्या म्हशी असायच्या; त्या वेळी हा विधी हमखास करीत. आता हा उत्सवही बंद पडला आहे.

देवाचा दिवस - हा रोटपूजेसारखाच कुळाचार असतो. लेवा पाटीदारांच्या कुळाचारामधील हा प्रमुख भाग होय. प्रत्येक घराण्याचे स्वतंत्र कुलदैवत असते. त्या घराण्यातील सर्व कुटुंबे वर्षातून एकदा ठरावीक दिवशी एकत्र येऊन सामूहिकरीत्या हा कुलदैवत पूजनाचा विधी पार पाडतात. घराण्यातील कुटुंबांपैकी एका कुटुंबाच्या घरात या दैवताची स्थापना केलेली असते. या दिवशी घराण्यातील सर्व कुटुंबे एकत्रित कुलदैवत पूजा करून एकत्रित भोजन करतात. प्रत्येक देवतेचे अन्न ठरलेले असते. तेच पदार्थ त्या दिवशी करतात. त्यांना सांकेतिक नावे दिलेली असतात. विधींनाही सांकेतिक नावे दिलेली असतात. लेवा पाटीदारांमधील 'देवाचा दिवस' या कुळाचार विधीबाबत संशोधन होणे जरूर आहे.

शिलांगण (दसरा) - हा सण सर्वत्र साजरा करीत असले तरी लेवा पाटीदारांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण रीतीने साजरा करतात. अश्विन शुद्ध दशमीला येणाऱ्या विजयादशमीच्या सणास हे लोक शिलांगण (सीमोल्लंघन) असे म्हणतात. हा नवरात्राच्या समाप्तीचा

दिवस! या दिवशी सीमोल्लंघन, शमीपूजन, अपराजितापूजा व शस्त्रपूजा ही कृत्ये करावयाची असतात.

कृषिकर्म करणारा लेवा पाटीदार शेतकरी वेळात वेळ काढून संध्याकाळी नवीन कपडे करून आपल्या मुलांसह दक्षिण दिशेची वेस ओलांडून म्हणजे सीमोल्लंघन करून थोडी आपट्याची पाने तोडून व पाच न निसवलेल्या ज्वारीच्या ताटांची (ज्वारीच्या ताटास खानदेशात ज्वारीचे तोटे किंवा धांडे असे म्हणतात) समूळ उपटलेली मोळी घरी घेऊन येतो. घरी आल्यावर गृहप्रवेश करण्याआधी सौभाग्यवती किंवा सवाष्ण महिला पंचारतीने त्यास आणि त्याने आणलेल्या शमीच्या पानांना आणि ज्वारीच्या ताटांना ओवाळते, पूजा करते. ही ज्वारीची ताटे व आपटे (शमी) यास हे लोक 'सोनं चोरून आणले' असे म्हणतात. पूर्वी क्षत्रिय सीमोल्लंघनाच्या दिवशी लढाईवर जात आणि वैऱ्याची संपत्ती लुटून आणत. त्याचेच हे प्रतीक मानता येईल. हे लोक सीमोल्लंघन करून म्हणजे गावाची दक्षिणेकडील वेस ओलांडून सोने चोरून आणतात. आर्य लोक उत्तरेकडून आले व त्यांनी दक्षिणेकडील द्रविडांचा मुलुख जिंकला, लुटला याचे हे पूर्वापार चालत आलेल्या रूढीचे प्रतीक आहे. यावरून लेवा पाटीदारांचे पूर्वज आर्य क्षत्रिय होते व ही क्षात्रपरंपरा त्यांच्या सणात जाणवते. रावण दक्षिणेकडे होता म्हणून हे लोक दक्षिणेकडील वेस म्हणजे सीमा ओलांडून सोने चोरून आणत असतात, असा अन्वयार्थ काढता येईल. हल्ली सर्वत्र शमीची पाने वाटण्याची प्रथा आहे. परंतु, लेवा पाटीदारांमध्ये लहानाने (वय व मानाने) मोठ्या घरी जाऊन रामराम करण्याची पूर्वापार प्रथा आहे.

दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजा करतात. या दिवशी लेवा पाटीदार शेतकरी आपल्या सर्व अवजारांची पूजा करतो; विशेषतः नांगराची पूजा करतोच करतो. हे अवजार बलरामाचे शस्त्र असल्याने व लेवा पाटीदार पूर्वीचे क्षत्रिय असल्याने ते या शस्त्रांची पूजा करतात.

हा दिवस सर्व शुभकार्यांना प्रशस्त मानतात. दशमी श्रवण नक्षत्राने युक्त असेल तर अतिशुभ मानतात. दसऱ्याला साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानले जाते. या दिवशी लेवा पाटीदार शेतकरी शेती खरेदी, ट्रॅक्टर व बैलखरेदी यांना वास्तुनिर्मिती वा सोने खरेदीपेक्षा अधिक महत्त्व देत असतो.

इतर समाजांमध्ये रेड्याला दैत्य मानून त्याचा या दिवशी बळी देण्याची प्रथा होती. कदाचित, फार पूर्वी लेवा पाटीदारांमध्येही ती असावी; परंतु नंतर कोहळ्याला दैत्य समजून दक्षिण वेशीवर कापून ठेवण्याची प्रथा पडली. ही प्रथाही गेल्या तीन-चार दशकांपासून बंद पडली आहे.

तसे पाहिले तर हा सण फार प्राचीन काळापासून चालत आलेला दिसतो. रामचंद्राने रावणावर याच दिवशी विजय मिळवून वध केला व याच दिवशी अर्जुनाने अज्ञातवासातून

बाहेर येऊन शमीच्या झाडावर लपवलेले गांडीव धनुष्य व शस्त्रास्त्रे धारण केलीत.

प्रारंभी दसरा हा एक कृषीविषयक लोकोत्सव होता. पावसाळ्यात पेरलेल्या शेतातले पहिले पीक घरात आल्यावेळी शेतकरी हा उत्सव करीत. नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखालच्या रोपांना उपटून देवाला वाहतात. या गोष्टी या उत्सवाचे मूळ कृषिस्वरूप व्यक्त करणाऱ्या आहेत. कित्येक ठिकाणी शेतातल्या धान्याच्या लोंब्या तोडून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. लेवा पाटीदार शेतकरी 'चोरून आणलेलं सोनं' म्हणजे ज्वारीच्या ताटांची मोळी दरवाजासमोर ओसरीत वर टांगून ठेवतात किंवा ओसरी नसल्यास धाब्यावर किंवा गच्चीवर व्यवस्थित ठेवतात. ही प्रथादेखील त्यांचे या सणाचे कृषीविषयक स्वरूपच व्यक्त करते. पुढे या सणाला धार्मिक स्वरूप दिले गेले आणि इतिहासकाळात तो राजकीय स्वरूपाचा सण ठरला. ही जतन केलेली ज्वारीच्या ताटांची मोळी भाऊबीज व खोपडी बारसच्या दिवशी खोपडी बनविण्यासाठी उपयोगात आणतात. याच खोपडीत भाऊबीजेच्या दिवशी बहीण भावाला ओवाळते. त्या दृष्टीने या सोन्यास अनन्यसाधारण महत्त्व असून लेवा पाटीदारांचे ते वैशिष्ट्य आहे.

कराठव (कराष्टमी) - अश्विन वद्य अष्टमी, या दिवसापासून पावसाळ्यानंतर कुंभार प्रथमच कोरी मडकी शेतकऱ्याला देतो. लेवा पाटीदार महिला या दिवशी पाटावर पाच मातीचे लोटे ठेवतात. ते चार कोपऱ्यांना चार व मध्यभागी एक असे ठेवून त्याभोवती सुताचे पाच फेरे गुंडाळतात. या मडक्यांमध्ये हुरडा, कच्ची बोरे व झेंडूची फुले ठेवून त्यांची पूजा करतात. बहुधा, नुकतीच हंगामास सुरुवात होत असल्याने धान्यादी समृद्धीचे प्रतीक म्हणून हुरडा, फळांचे प्रतीक म्हणून कच्ची बोरे व फुलांचे प्रतीक म्हणून झेंडूची फुले टाकत असावे. नवीन धान्यास व हंगामास या वेळेपासून सुरुवात होत असल्याने हंगाम चांगला यावा, यासाठी ही पूजा असावी.

उत्तर भारतात कुमारिका या दिवशी गंगोदकाने भरलेला करा घेऊन त्यावर देवीची (बहुधा गौरीची) पूजा करतात. या दिवशी सुगंधी जलाने व पुष्पमालांनी भरलेले नऊ पात्रांचे दान करीत व नऊ कुमारिकांना भोजन घालीत. ही चाल काशीच्या आसपास दिसते. प्रतिहारांच्या साम्राज्याची राजधानी कनौज असताना पाटीदारांनी ही प्रथा उचलली असावी व अपभ्रंशित होऊन पुढे कुमारिकांऐवजी महिलांनी सुरू केली असावी आणि गंगोदकाच्या कराऐवजी धान्याचे लोटे आले असावे. करा=मंगलकलश! या दिवसापासून लेवा पाटीदारांच्या दिवाळीस प्रारंभ होत असे. पूर्वी नूतन सासुरवाशिणींना पहिल्या दिवाळीला कराठवच्या दिवशीच आणत. दिवाळीचे आकाशदिवे कराठवपासून टांगले जात. दिवाळीच्या फराळांची सुरुवात कराठवपासूनच करीत.

गोवस बारस (गोवत्सबारस) - अश्विन वद्य द्वादशीचा हा सण! याला गोवत्स द्वादशी किंवा वसूबारस असेही म्हणतात. या दिवशी जे व्रत करतात, त्यात

सौभाग्यवती स्त्रिया एकभुक्त राहून सकाळ-सायंकाळी सवत्स गायीची पूजा करतात. गायीस नंदिनीमाता मानून ''सर्व देव ठायी असलेल्या नंदिनी माते माझे मनोरथ फल कर'' अशी मनोभावे पूजा करतात. (ही बहुधा - 'ततःसर्वमये दैवैरलङ्कृते। मातर्ममाभिलाषितं सकलं कुरू नन्दिनी।' या श्लोकावरून असावी). या दिवशी तेलतुपात तळलेले पदार्थ आणि गायीचे दूध, तूप, ताक खात नाहीत. उडदाचे वडे, भात व गोडधोडाचे पदार्थ करून ते गायीला खाऊ घालतात. उत्तर प्रदेशात या व्रताला बछवांछ असे म्हणतात. तिकडूनच हा सण लेवा पाटीदारांमध्ये आला असावा. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्यात. नंदिनी त्यातीलच एक! बहुतांश लोक दिवाळी धनत्रयोदशीपासून साजरी करतात. परंतु, मुळात चरवाह व पशुपालक आणि नंतर शेतकरी झालेला लेवा पाटीदार समाज गोवसबारसपासून दिवाळी मानतात. या दिवशी ते नंदिनीचे प्रतीक म्हणून गोमाता व वासरांची पूजा करतात व घरात गोमूत्र शिंपडून घर पवित्र करतात.

खोपडी बारस - लेवा पाटीदारांमध्ये केला जाणारा एक पूजाविधी! कार्तिक शुद्ध द्वादशीला **तुळशीचे लग्न** असे संबोधतात. म्हणजे तुळशीचे या दिवशी लग्न झाल्यानंतर या समाजात विवाहतिथी धरता येतात. ज्यांच्या घरी कुलदेवांचे टाक (देव्हारा), गणपती इ. देव असतात, असे शेतकरी या दिवशी ही पूजा करतात. त्यासाठी सायंकाळी दारापुढे सडासंमार्जन करून रांगोळ्या काढतात. नंतर त्या ठिकाणी चौरंग मांडून त्यावर बाळकृष्ण (खानदेशात विशेषकरून लेवा पाटीदार त्यास लंगडा देव असे म्हणतात) ठेवतात. त्यावर पाच उसाचे किंवा पाच नुकत्याच उपटून आणलेल्या पाच धांड्यांचे (ज्वारीच्या तोट्यांचे) एक खोपडे उभारतात. त्याला खोपडी म्हणजे घरकुल असे म्हणतात. त्यावर नवे धोतर किंवा उपरणे गुंडाळतात. ब्राह्मणाकरवी पूजा करवून तुळशीचे लंगड्या देवाबरोबर लग्न लावतात. रब्बी हंगामातील नवीन उगवलेल्या हरभऱ्याच्या झाडांची अग्रे खुडून पूजेत नैवेद्यासाठी त्याची भाजी करतात. बोरे व आवळेसुद्धा नैवेद्यात असतात. त्याशिवाय, मुलांना पिण्यासाठी साखरमिश्रित दुधाचे भांडेही ठेवतात. पूजा व आरती आटोपल्यावर ब्राह्मण हाताने खोपडे हलवितो. या वेळी घरातील मुले व यजमान हातात घंटा, काशाचे ताट, ताम्हन, इ. वाजवित खोपडीभोवती प्रदक्षिणा घालतात व तोंडाने ''ऊठ देव सावळा; बोर, भाजी, आवळा'' असे गाणे म्हणतात. हे झाल्यावर ब्राह्मण बालगोपालांना प्रतीकात्मक धान्य व कृषिमालाचे भाव विचारण्याचा व मुले उत्तर देण्याचा लुटूपुटूचा खेळ खेळून मुलांना साखरमिश्रित दूध प्यावयास देतात. बऱ्याचदा यानंतर यजमान शेतकरी चौरंगच उचलून घरात नेतो. हा प्रबोधोत्सवाचाच एक प्रकार होय. खोपडी बारस साजरी करण्याचा लेवा पाटीदारांमधील हा एक चांगला विधी आता लोप पावण्याच्या मार्गावर आहे.

चंपाषष्ठी - लेवा पाटीदारांचे कुलदैवत खंडोबा असल्याने हा कूळधर्म व

कुळाचाराचा दिवस! मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी या दिवशी खंडोबाने मणिमल्लासुरांचा वध केला; त्याप्रीत्यर्थ हा कुळाचाराचा दिवस सण म्हणून साजरा करीत असावे. चंपा म्हणजे दोन शेर धान्याचे माप. दोन शेर गहू दळून त्याचे रोडगे करून डाळ व भाजीबरोबर खातात. याला रास भरणे असे म्हणतात. चंपाष्टमी म्हणजे मार्गशीर्ष शद्ध अष्टमी! हासुद्धा खंडोबाचा कुळधर्म करावयाचा दिवस असल्याने चंपाषष्ठीला अडथळा आल्यास व तो करू न शकल्यास चंपाष्टमीला साजरा करतात. काही चंपाषष्ठी व चंपाष्टमी दोन्ही दिवस साजरे करतात. चंपाष्टमीलाही रोडगे करून खातात.

संक्रांत (मकरसंक्रांत) - सूर्य ज्या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो; त्या दिवसाला हे नाव आहे. ही संक्रांती पौष मासात येते. जुन्या ग्रहलाघवी पंचांगाप्रमाणे मकरसंक्रांती १४ जानेवारीला येते. एक सण व एक पुण्यपर्व या दोन्ही दृष्टींनी या दिवसाला महत्त्व आहे. हा उत्तरायणाचा आरंभदिन असतो. म्हणून या संक्रांतीला अयनसंक्रांती असेही म्हणतात. लेवा पाटीदारांत तिला 'उतरन' असे म्हणतात.

या संक्रांतीचा पुण्यकाळ, ती दिवसा असेल तर पुढील ४० घटका व रात्री असेल तर दुसऱ्या दिवशी असतो. त्या काळात नद्यांचे स्नान व दान विशेष पुण्यप्रद असल्याने तापी परिसरातील लेवा पाटीदार तापी नदीवर स्नानास जातात. पूर्वी बैलगाड्यांनी तापीवर जात असत. हैमाद्रीनुसार ''धनु तिलमयी राजन् दद्याद्यश्चोत्तरायणे। सर्वान्कामानवाप्नोति विन्दते परमं सुखम्'' (जो मनुष्य उत्तरायणात (मकरसंक्रांतीला) तिलमय धेनूचे दान करतो, त्याला सर्व इच्छित गोष्टी प्राप्त होतात व तो परम सुख पावतो). म्हणून तीळगूळ वाटतात. तीळगुळास लेवा पाटीदार लोक 'तीलह्यनं' असे म्हणतात.

पुराणानुसार या दिवशी पितृश्राद्ध करावे, असे सांगितले असल्याने सर्वच लेवा पाटीदारांच्या घरी पितृश्राद्ध करतात (तूपभाताची आग्यारी टाकतात).

मकरसंक्रांती हा सण सर्व लेवा पाटीदार साजरा करतात. या दिवशी मुली माहेरी येतात. पूर्वी मुलीला माहेरी आणत असत. स्त्रिया ब्राह्मणाला उसाच्या गंडेऱ्या, हळकुंडे, कापूर, द्रव्य, इ. वस्तू दान देतात. हा सुगडाचाच प्रकार म्हणता येईल. नववधूकडून बहुधा माहेरी तेल, जिरे, कापूस व मीठ हे जिन्नस सुवासिनींना वाटण्याची प्रथा आहे. त्या दिवशी तिला हलव्याचे दागिने घालून सजवितात. जावयाला तीळगूळ व अहेर पाठवितात. गोड पोळ्या करणे, नटून हळदीकुंकू करून वस्तू लुटणे हे प्रकार महिला करतात. पुरुष एकमेकांना तीळगूळ देऊन ''तीळगूळ घ्या, गोड गोड बोला'' असे म्हणतात.

संक्रांतीचा सण अत्यंत प्राचीन आहे. आर्य लोक ध्रुवप्रदेशात वास्तव्य करीत होते तेव्हापासून हा सण प्रचारात असावा. त्या प्रदेशात सहा महिने दिवस व सहा महिने रात्र अशी वर्षाची विभागणी असे. ती सहा महिन्यांची प्रदीर्घ रात्र संपून उत्तरायणाच्या

प्रारंभ दिवशी जेव्हा सूर्याचे किरण पृथ्वीवर पडत, तेव्हा त्यांना आनंदाचे व उत्साहाचे भरते येत असे. मग त्याप्रीत्यर्थ तो दिवस सण म्हणून साजरा करीत. तेव्हापासून हा सण प्रचारात आहे. लेवा पाटीदार हे सण पूर्वापार मोठ्या उत्साहाने साजरे करीत असल्याने ते आर्यवंशी आहेत, हे निर्विवाद होय.

काही विद्वानांच्या मते उत्तरायणाचा आरंभ हाच पूर्वकालीन वर्षारंभाचा दिवस असावा. कारण, याच दिवसांत शिशिर ऋतूचा प्रारंभ होतो.

संक्रांतीला देवता मानून तिचे चित्र प्रत्येक पंचांगात दिलेले असते. प्रत्येक वर्षी तिचे वाहन, आयुध, तिलक, ज्योती, वय, अवस्था, भूषण, भक्षण, भोजनपात्र व नाव वेगवेगळे असते. ती कोणत्याही दिशेने येते व कोणत्याही दिशेला जाते. संक्रांती ज्या वस्तूंचा स्वीकार करते त्या वस्तूंचा नाश होतो किंवा त्या महाग तरी होतात, असे सांगितलेले असते. ज्या दिशेकडून येते, तिकडे समृद्धी व ज्या दिशेला जाते तिकडे उत्पात करते, असे सांगितले जाते.

संक्रांतीने संकरासुर या दैत्याचा वध केला आहे. हा सण म्हणजे स्नेहवर्धनाचा सण. ''तीळगूळ घ्या, गोड बोला'' हा मंत्रही लेवा पाटीदारांमधील सामाजिक स्नेहवृत्तीची इच्छाच सुचवितो.

होळी (शिमगा) - हा एक लोकोत्सव! लौकिक पातळीवरील सण आहे. होळीचे प्रांतपरत्वे विविध आविष्कार होतात. पुराणातील होलिकादहन कथा सांगण्याचे येथे प्रयोजन नाही. होळीत आंबा, माड, पोफळ, एरंडासारख्या वृक्षांचे व वृक्षशाखांचे दहन करण्याची प्रथा आहे. प्रत्येक गावाची होळीची जागा ठरलेली असते. मुले उपरोक्त वृक्षशाखांबरोबरच कपाशी व तुरीच्या वाळलेल्या झाडांच्या मोळ्या वाळग्यांमधून (वाळगे म्हणजे गुरेढोरे, चाराबोरा, सरपणाची जागा) चोरून आणतात. सर्व लेवा पाटीदार होळीच्या दिवशी पुरणपोळ्या करतात. होळीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवितात. महिला होळीची पूजा करताना होळीच्या निखाऱ्यावर हरभरे भाजून प्रसाद म्हणून वाटतात. होळीत तमाशाचे फड गाजविण्याची; भांग, अफू, मद्य यासारखी उत्तेजके घेऊन अश्लील व अर्वाच्य गाणे गाण्याची किंवा शिवीगाळ करण्याची तसेच होळीशेजारी गंजीफा, पत्ते, सोंगट्या खेळण्याची चाल सर्वत्र असली तरी लेवा पाटीदार मद्यसेवन करीत नाहीत. लेवा पाटीदार मुले होळीहून परतताना ''होई रे होई, पुरनाची पोई, सायबाच्या ढुंगनात बंदुकची गोई'' असे जे अर्वाच्य बोलतात, ते बहुधा स्वातंत्र्यसंग्रामात इंग्रजांना उद्देशून पूर्वी म्हणत असावे. तेव्हापासून ही प्रथा पडली असावी. खंडेराय-म्हाळसा हे बऱ्याच लेवा पाटीदारांचे कुलदैवत! फैजपूरला खंडेराव-म्हाळसा मंदिर आहे. होळीच्या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. ती पंचक्रोशीत प्रसिद्ध असून तीन-चार दिवस चालते. या यात्रेत व गावात होळीच्या व दुसऱ्या दिवशी २०/२५ तमाशांचे फड लागतात. होळीच्या एक महिना आधी म्हणजे माघ पौर्णिमेला ज्या ठिकाणी होळी

केली जाते; त्या ठिकाणी होळीचा दांडा रोवतात. त्या दिवसाला 'दांडापुनीव' असे म्हणतात.

चैत - चैत्र पौर्णिमेला खानदेशात चैत असे म्हणतात. ज्या लेवा पाटीदारांच्या घरात त्या कुटुंबाच्या कुलदेवता/कुलदैवताची स्थापना केलेली असते; त्यांच्याकडे त्या कुलदेवता/कुलदैवताचा देव्हारा भरतात. या दिवशी वडे, पुऱ्या, १० आरत्या व दहीभाताच्या नैवेद्याने इराची (वीराची) पूजा करतात व नंतर हा नैवेद्य पुरुष खातात. कुलदेवतेच्या नैवेद्यात केळीच्या पानावर विड्याची पाने अंथरून त्यावर १० वडे, १० पुऱ्या, १० लिंबे, १० केळी व १० आरत्या ठेवतात. तेलवात घालून आरत्या पेटवितात. सर्व पदार्थ तयार करून जेथे इराचे देऊळ अथवा स्थान असते तेथे नेतात. कुटुंबातील ज्याच्या नावाने मुहूर्त निघतो तो हे सर्व करतो. या केळीच्या पानावरील मांडणीला 'पान भरणे' असे म्हणतात. पान भरणारा माणूस घरी येऊन खीर-पोळीवर उपवास सोडतो. उपरोक्त नैवेद्य कुटुंबातील सर्व जण प्रसाद म्हणून खातात.

अखजी (अक्षयतृतीया) - लेवा पाटीदारांचा हा महत्त्वाचा सण अखजी म्हणून ओळखला जातो. वैशाख शुद्धतृतीयेला येणारा हा सण ग्रामीण कृषी जीवनाशी निगडित आहे. बहिणाबाईने लेवा गणबोलीत रचलेल्या कवनांत अखजीचे महत्त्व सांगितले आहे. या दिवशी बहुतेक लेवा पाटीदारांमधील नूतन सासुरवाशिणी माहेरी येतात. कुंभाराच्या घरून नवीन मातीची घागर आणून ती पाण्याने भरून पितरांचे श्राद्ध करण्याची प्रथा या लोकांत आहे. त्यास 'घागर भरणे' असे म्हणतात. यात पितरांना जास्तीतजास्त पदार्थ करून खाऊ खालतात.

पितरांचे श्राद्ध करताना श्राद्धात उडदाचे वडे, बासुंदी, पुऱ्या, गव्हाची खीर, भेंडी, गवार, गंगाफळ, कारली, गिलके (घोसाळे) या भाज्या, वरण-भात, गव्हाच्या पापड-कुरडया, आंब्याचा रस हे पदार्थ करतात. ज्याच्या नावे श्राद्ध करावयाचे असते, त्याचे नाव नवीन मातीच्या घागरीवर लिहितात. आजूबाजूस चुन्याचे ठिबके व स्वस्तिक काढतात. या घागरीवर धान (सात दिवस आधी एका टोपलीत खतमाती घालून त्यात गहू, बाजरी व मका पेरून रोज पाणी घालतात. उगवलेल्या रोपांना धान म्हणतात.) व फुलांचा गजरा घालतात. घागरीच्या तोंडावर आंबा किंवा खरबूज (खानदेशात यास डांगर म्हणतात) ठेवतात. दुपारी १२ वाजेला गायीच्या शेणाची गोवरी एका लहान ताट किंवा धातूच्या भांड्यात ठेवून पेटवितात. त्यावर साजूक तूप व तीळ, अद्रक, पिकलेले केळे, जव, मध आदी टाकतात व अशा धगधगत्या गोवरीवर उपरोक्त जेवणासाठी केलेल्या पदार्थांचे मिश्रण करून पाच घास घालतात, चंदन लावून पूजा करतात. आग्यारीस पाणी फिरवतात व पानाचा विडा टाकतात. नमस्कार केल्यावर पितर म्हणून आलेला माणूस प्रथम घास घेऊनच मग सर्व जेवावयास बसतात. पितर म्हणून आलेल्यास जेवणाने तृप्त केल्यावर ऐपतीनुसार सव्वा रुपया, नारळ, लाल सुताचा करगोटा देतात.

स्वर्गातील पितरे तृप्त व्हावीत म्हणून लेवा पाटीदार हे सर्व विधी कटाक्षाने पाळतात.

बहुतेक लेवा पाटीदार शेतकरी आपल्या कृषिकामासाठी वर्षाच्या मोबदल्यात (ज्यास 'साल' असे म्हणतात) दिवसाला दोन्ही वेळचे जेवण, न्याहारी व चहा, एखादा जोड कपडे व जोडा (बूट) देऊन सालदार ठेवत असतात. या दिवशी सालदाराचे जुने साल संपते व नवीन सुरू होते. जुने साल संपताना शेवटचे म्हणजे अखजीचे जेवण घेऊन सालदार दोन-चार दिवस विश्रांती घेतो.

अक्षयतृतीयेबद्दल श्रीकृष्ण युधिष्ठिरास सांगतो -

अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्तं
तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया।
उद्दिश्य दैवतपितृंक्रित मनुष्यै
स्तच्चाक्षयं भवति भारत सर्वमेव।।

अर्थ - या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही. म्हणून हिला मुनींनी अक्षय्यतृतीया असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते; ते सर्व अक्षय होते. त्यावरून या तृतीयेचे नाव अक्षयतृतीया पडले.

या तिथीस महत्त्व येण्याचे कारण म्हणजे हा कृतयुगाचा प्रारंभदिन आहे. कालविभागाचा कोणताही प्रारंभदिवस भारतीयांना नेहमीच पवित्र वाटतो. लेवा पाटीदार शेतकरी शेतकामाची सुरुवात याच दिवसापासून करीत असल्यामुळे या लोकांत या सणास विशेष महत्त्व आहे.

या तिथीस स्नानदानादी महत्त्व सांगितले गेले असल्याने तापी परिसरात राहणारे लेवा पाटीदार बैलगाड्यांनी तापी स्नानास जात असत व ब्राह्मणांना विपुल शिधादान करीत असत.

या दिवशी बहुतेक सर्वमान्य लेवा पाटीदारांच्या घरी ऐपतीनुसार शेव, सांजोऱ्या; तीळ, डाळी व सोजीचे लाडू, करंजी हे फराळाचे गोड-धोड पदार्थ करीत असतात. काही श्रीमंताघरी दराबा (त्याला दल असेही म्हणतात) नामक पदार्थही करतात. हा गव्हाची सोजी व रवा, साजूक तूप व पिठी साखर मळून तयार केलेला पदार्थ अतिशय चवदार असून तो बहुतकरून लेवा पाटीदारांमध्येच करत असतात.

लेवा पाटीदार मुली चैत्रमासातही गौरीची पूजा करीत व त्यानिमित्त हळदीकुंकवाचा कार्यक्रम करीत. या गौरीला मखरात न बसवता दोल्हाऱ्यात बसवत. चैत्र वद्य प्रतिपदेपासून अक्षयतृतीयेपर्यंत तिची गाणी म्हणून पूजा करीत. गौरी ही शिवाची चित्शक्ती असून आध्यात्मिक दृष्टीने तिला शिवरूप आत्म्याची ब्रह्माकार वृत्ती मानले आहे. त्याचेच हे द्योतक! या चैत्रगौरीचे अक्षयतृतीयेच्या दिवशी नदीत वा पाण्यात विसर्जन करीत असत.

मुली गौरीची गाणी म्हणत. नमुनादाखल एक गाणे खाली देत आहे.

''गौरमाय लेकी व तुले दिव कोन्हाच्या घरी व
महाराच्या घरी व, नही व माय, तो शेन भऱ्याले लाईन,
चंभाराच्या घरी व, नही व माय, तो वहाना शियाले लाईन.
कुंभाराच्या घरी व, नही व माय, तो माती खुंदल्याले लाईन.
हजामाच्या घरी व, नही व माय, तो भाकर घेयाले पाठोईन.
सुताराच्या घरी व, नही व माय, तो लाकळं आन्याले लाईन.
लव्हाराच्या घरी व, नही व माय, तो भाता फुक्याले बसोईन.
ब्राह्मनाच्या घरी व, नही व माय, शिध्यासाठी तो भाईरच ऱ्हाईन.
कुंब्याच्या घरी व, हाव्ह व माय, तो समद्याईले वाचोईन.

आखजीचे बहिणाबाईचे गाणे सर्वश्रुत आहे. ते खाली उद्‌धृत करीत आहे -

आखजीचा आखणीचा, मोलाचा सन देखाजी
निंबावरी निंबावरी, बांधला छान झोका जी
माझा झोका माझा झोका, चालला भिरभिरी जी
माझा झोका माझा झोका, खेळतो वाऱ्यावरी जी
गेला झोका गेला झोका, चालला माहेराले जी
आला झोका आला झोका, पलट सासरले जी
झाला सुरू झाला सुरू, पहिला माझा पिंगा जी
फुगड्यांचा फुगड्यांचा, चालला धांगडधिंगा जी
दारोदारी दारोदारी, खेयाची एक छाई जी
घरोघरी घरोघरी, मांडल्या गवराई जी
सन सरे आस उरे, आखजी गेली व्हयी जी
सांग सई सांग सई, आखजी आता कही जी

माहेरी यायला व राहायला सासुरवाशीण किती अधीर असते, हे खालील मुलींच्या गाण्यांवरून दिसून येईल -

''आखजीचा सण आला, मुऱ्हाई घरी आला।।धृ।।
किती दिस राहासील सांग सये माहेराला।।
पंचमीला झोका खाऊ, पोळ्याची मौज पाहू।।
गाडी जुंपून येईन ग दसऱ्याला।।
होळी बाईला निवद दावू, पाडव्याच्या गुढीवर तांब्या ठेवू।।
जगदंबेच्या यात्रा पाहू पुनवेला, मग जाऊ आपल्या सासरला।।

या दिवशी किंवा आखजीच्या दिवसांमध्ये मुले पूर्वी लगोऱ्या, विटीदांडू, सुरपारंब्या हे मैदानी खेळ खेळत. त्याशिवाय मंदिराचा कोपरा, चावडीची आडोशाची बाजू,

पारावरची जागा किंवा मुलांची एकत्र बसण्याची जागा येथे करमणुकीसाठी गंजीपत्ता खेळत, मुली सागरगोटे खेळीत. लेवा पाटीदारांमधील मुली व महिलांचे पूर्वापार चालत आलेले चांगले संस्कार विधी आता लोप पावत चालले आहेत.

आखाळ - हा लेवा पाटीदारांमधील खास उत्सव! आखाळ म्हणजे आषाढ अमावस्या! या दिवशी किंवा आषाढाच्या शेवटच्या आठवड्यात खानदेशी उडदाचे वडे, भजी, गुलगुले (भुमके), तळलेले पापड, ताक, कढी व खानदेशी शेंगदाण्याची चटणी असे झणझणीत जेवण करतात. त्या दिवशी पूर्वी महिला आखाडाची गाणी म्हणत. आता ही प्रथा राहिली नाही. लेवा लोक चातुर्मास पाळतात. चातुर्मासात ते कांदा-लसूण खात नसल्याने त्याआधी साजरा करावयाचा हा उत्सव एवढेच याचे महत्त्व सांगता येईल.

✧✦✧

प्रकरण ६

विधी आणि संस्कार

संस्कार

भरतभूमीमधील महाराष्ट्रातील हिंदू धर्मीयांप्रमाणे थोड्याफार फरकाने खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदारांचे धार्मिक जीवन संस्कारनामक विविध धार्मिक विधी आणि परंपरांच्या भोवती गुंफलेले आहे.[१] संस्कार म्हणजे यज्ञयागादी विधिद्वारे केलेली शद्धिक्रिया! स्त्रिया आणि पुरुष यांच्यामधील सुप्तशक्तींना मूर्त स्वरूप देण्यास्तव त्याचप्रमाणे त्यांच्या आंतरिक परिवर्तनाचे बाह्य प्रतीक म्हणून संस्कार आवश्यक मानले जातात. उपनयनासारख्या काही संस्कारांनी आध्यात्मिक तद्वतच सामाजिक हेतू साध्य होतात. त्यामुळे वेदाभ्यासाची द्वारे खुली होतात आणि संस्कार करून घेणाऱ्या व्यक्तीस विशिष्ट सामाजिक अधिकार प्राप्त होऊन तीवर कर्तव्यपूर्तीचे बंधन घातले जाते. गुजरातमधून खानदेशात आल्यावर लेवा पाटीदारांनी उपनयन संस्कार विधी टाकून दिलेले दिसतात. येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, खेडा आणि भडोचमधील लेवा पाटीदार हे स्वतःस द्विज समजत असून ते उपनयन संस्कार करून जानवे परिधान करीत असतात.[२] त्यामुळे खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदारांनी कसलाही न्यूनगंड मनात न ठेवता उपनयन संस्कार करून जानवे परिधान करण्यास कोणतीही हरकत नसावी आणि खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार हे सोजित्रा, आणंद, बोर्साद, नडियाद या खेडा जिल्ह्यातील चरोतरमधून इकडे आलेले आहेत, हे आता सर्वमान्य झालेले आहे. शिवाय, लेवा पाटीदारांचे पूर्वज हे गुर्जरच होते व गुर्जरांच्या चौलुक्य, परमार, परिहार (प्रतिहार) चाहमान व यापुढे राजपूत म्हणून गणल्या गेलेल्या शाखांनी क्षात्रतेज जागविले असल्याने

आणि आताही ब्रह्मभूषण परमपूज्य मोरेदादा महाराज यांनी दिंडोरीप्रणीत **श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग,** विशेषांक, १९९९ यात पृ. २४२ वर लेवा पाटीदारांची गणना भारतातील आज प्रचलित असलेले क्षत्रिय यात केलेली आहे (क्रमांक २४). ते क्षत्रिय ठरत असल्याने क्षत्रियांच्या अधिकारानुसार उपनयन करण्यास काहीच हरकत नसावी (हे प्रस्तुत लेखकाचे मत आहे).

मनोवैज्ञानिकदृष्ट्यादेखील संस्कारांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवनात आपणास नवीन भूमिका वठवायची आहे, तसेच धर्माचरणविषयक पालन आपणास करावयाचे आहे, असे त्या व्यक्तींच्या मनावर बिंबविले जाते. त्याद्वारे आत्मोन्नतीचा मार्ग खुला होतो. नामकरण, अन्नप्राशन आणि निष्क्रमण यांसारखे विधी व संस्कार प्राय: सामाजिक समारंभ स्वरूपाचे होत. त्यामुळे प्रेम आणि वात्सल्याची अभिव्यक्ती तसेच आनंदोत्सव साजरे करण्याची संधी प्राप्त होते. गर्भाधान, पुंसवन आणि सीमांतोन्नयन यांसारख्या संस्कारांना पौराणिक आणि प्रतीकात्मक महत्त्व आहे. धर्मशास्त्रानुसार विवाह हा संस्कार असून त्याद्वारे दोन भिन्न व्यक्तिमत्त्वांचे मिलन होते. या मिलनातून वंशवृद्धी साध्य करून आत्मसंचय, आत्मत्याग आणि परस्पर साहचर्यामधून दोघांचा आत्मोद्धार करणे, हा विवाह संस्काराचा मूळ हेतू असतो.

संस्कार व ते साजरे करावयाचा क्रम याबद्दल **वेद** आणि **गृह्यसूत्रांमध्ये** नियम घालून दिलेले आहेत. तथापि, विविध स्मृतिकारांमध्ये संस्कारांच्या संख्येबद्दल एकवाक्यता नाही. धर्मशास्त्रानुसार खालील १६ संस्कार मात्र अनिवार्य मानलेले असले तरी कालक्रमानुसार बरेच संस्कार अस्तंगत झाले असून स्मृतिग्रंथांनी विहित केलेल्या पद्धतींनुसार हे सगळेच संस्कार अगदी ब्राह्मणवर्गीयदेखील करीत नाहीत. **गौतम धर्मसूत्रानुसार** ४८ संस्कार सांगितले आहेत. खाली नमूद केलेल्या महाराष्ट्रात परंपरा असलेल्या १६ संस्कारांपैकी लेवा पाटीदारांमध्ये अस्तित्वात असलेल्या संस्कारांची माहिती या प्रकरणात विस्ताराने देत आहे. तरीही मर्यादा आहेतच.

१) ऋतू - संगपन (प्रथम ऋतुप्राप्तीची शुद्धी)
२) गर्भाधान (पुंबीज-रोपण विधी)
३) पुंसवन (पुत्रप्राप्तीस्तव गर्भारपणात केलेला विधी)
४) सीमांतोन्नयन (गर्भारपणात केलेला विधी)
५) जातकर्म (नवजात अर्भकाच्या कानात शुभ मंत्रोपचार)
६) पाचवी आणि सटवाई (अर्भकाचे रक्षण व त्याच्या ललाटाची रेषा शुभ व्हावी म्हणून केलेली पूजा)
७) नामकरण (बारसे)
८) कर्णविध (कान टोचणे)
९) अन्नप्राशन (मुलाचे प्रथम भोजन, उष्टावण)

१०) चौल, चुडाकर्म, जावळ (प्रथम केशकर्तन)
११) विद्यारंभ (अध्ययनाचा प्रारंभ)
१२) उपनयन, मुंज (व्रतबंध)
१३) समावर्तन, सोडमुंज
१४) विवाह
१५) चतुर्थीकर्म
१६) अंत्येष्टी.

या संस्कारांपैकी आता थोडेच संस्कार उरले आहेत. उदा. विवाह होण्याचे वय मुलांच्या आणि मुलींच्या बाबतीत पुष्कळच वाढल्याने तसेच बालविवाहास कायद्यानेही बंधन असल्यामुळे गर्भाधानसारखा प्रथम रजोदर्शनानिमित्त एकेकाळी समारंभाने होणारा संस्कार आता कोणी करीत नाही. पुंसवनाचा विधी तसेच गर्भवतीच्या व गर्भाच्या स्वास्थ्यासाठी सीमान्तोन्नयन विधीसुद्धा आता कोणी करीत नाही. पण, गर्भवतीला डोहाळे लागल्यावर तिच्या इच्छा पूर्ण करण्यात सहसा कसूर होत नाही. नामकरण आणि चौल मात्र वेदमंत्राविना स्नेहसंमेलनाच्या स्वरूपात साजरे केले जातात. बऱ्याच वेळा दोन अथवा अधिक संस्कार एकत्रच साजरे करतात. उदा. चौल, उपनयन व सोडमुंज त्याच दिवशी उरकून घेतात.

प्रत्येक शुभ संस्काराचा प्रारंभ गणपतीपूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन आणि नांदिश्राद्ध या विधींनी केला जातो. गणपतीपूजन म्हणजे मूठभर तांदळाच्या ढिगावर एक सुपारी गणपतीचे प्रतीक म्हणून ठेवून आपल्या आगमनाने संकल्पित संस्काराची सिद्धी शुभदायक व निर्विघ्न करण्यास्तव केलेले आवाहन होय. संस्कार करणारी व्यक्ती हात जोडून गणपतीला नमस्कार करून 'ओम् महागणपतये नमो नम:। निर्विघ्नम कुरु।।' असा मंत्रोच्चार करते.

पुंसवन विधी केल्याने पुत्रप्राप्ती होते, अशी श्रद्धा असल्याकारणाने त्यास पुंसवन असे म्हणतात. हा विधी बाईच्या गरोदरपणात तिसऱ्या महिन्यात करीत असत. या विधीमुळे गर्भलिंग ठरविणाऱ्या देवता प्रसन्न होऊन पुत्रप्राप्तीचा योग संभवतो, अशी धारणा होती.

पहिल्या बाळंतपणासाठी शक्यतो गर्भवती राहिल्यास बाळंतपणाच्या त्रासाचा तिच्या बालमनावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून मातापित्याचा मानसिक आधार प्राप्त व्हावा म्हणून ही प्रथा होती. त्या वेळी आईवडिलांकडून समारंभपूर्वक माहेरी आणले जाई. तिला आणण्यासाठी खानदेशात व विशेषकरून लेवा पाटीदार समाजात बैलगाडी पडदा घालून सासरी पाठवीत. माहेरी आणण्यासाठी मुऱ्हाई जात असे. आता मुऱ्हाई जाण्याची प्रथा बंद झाली आहे. आता गर्भारणीस माहेरी पाठवतात, ते तिला मानसिक आधार मिळावा म्हणून नाही तर होणारा बाळंतपणाचा, प्रसूतिगृहाचा व इतर

सर्व खर्च माहेरच्यांवर लोटण्यासाठी! हा एक व्यवहार झाला आहे. ते काही असो; परंतु त्यानिमित्ताने तरी बाळंतिणीस मायेचा आधार मिळतो. आता डोहाळे जेवणाची प्रथा शहरात रूढ होत आहे. पूर्वी बाळंतपण घरी केले जात असे व सुईणीचे काम बहुधा न्हाव्याची पत्नी करीत असे. तिला एक सामाजिक स्थान होते. आता प्रसूतिगृहाच्या सोयी उपलब्ध असल्यामुळे दवाखान्यात बाळंतपण करण्याचा कल वाढला असला तरी ज्यांची अगदीच ऐपत नाही, ते घरीच बाळंतपण करतात.

मुलगा झाल्यास त्याची नाळ छेदण्यापूर्वी त्याच्या बापाने मुखावलोकन करून 'तू वेद आहेस, तू दीर्घायुषी हो' असे म्हणून मेघाजनन (वृद्धी) होण्यास व्याहर्तीचा उच्चार करणे व गृह्य नाद ठेवणे, यासाठी जातकर्म किंवा पुत्रावलोकन विधी आता करीत नाहीत. मात्र, लेवा पाटीदारांमध्ये नवजात अर्भकाचे दर्शन घेण्याच्या प्रथेस 'रूपदर्शन' असे संबोधतात. या वेळी त्यांच्या अंथरुणाखाली ऐपतीनुसार पैसे ठेवण्याची प्रथा आहे. प्रथम रूपदर्शन बापाने घ्यावे, असा रिवाज आहे.

पाचवी व सटवाई - हा वैदिक संस्कार नसला तरी सर्व हिंदूंप्रमाणे शिशू जन्मल्यानंतर पाचव्या व सहाव्या दिवशी पाचवी व सटवाईची पूजा करतात. बालकाच्या जीवनातील हा पहिला लौकिक विधी! पाचव्या व सहाव्या दिवशी अर्भकाच्या ललाटीची रेषा आखली जाते, असा समज असून इडापिडा व भूतबाधा टाळण्यास्तव हा विधी करतात. प्रसूतीच्या पाचव्या दिवशी षष्ठी देवीची पूजा करतात. त्यालाच पाचवीपूजन म्हणतात. षष्ठी (सती) ही ब्रह्मदेवाची मानसकन्या व स्कंदपत्नी असून ती मूळ प्रकृतीच्या सहाव्या अंगाने प्रकट झाली म्हणून षष्ठी म्हणत असून ती बालसंरक्षक लोकदेवता मानली जाते; म्हणून तिची पूजा करतात. आणखीही एका समजानुसार १६ मातृकांपैकी षष्ठी ही बालघातक मातृका असून तिने आपले बालघातक स्वरूप सोडून बालसंगोपन करून बाळबाळंतिणीस दीर्घायुष्य व आरोग्य द्यावे म्हणून ही पूजा करतात. षष्ठी शब्दाचा अपभ्रंश होऊन सटवी हा शब्द अस्तित्वात आला आहे. पाचवी पूजेच्या वेळी बाळंतिणीच्या खोलीत बाळाच्या मनगटावर काळ्या दोऱ्यात बांधण्यासाठी सोन्याची अथवा चांदीची सटवीची प्रतिमा, कोरा कागद, लेखणी, पाट, पूजेचे व बाळघुटीचे साहित्य, नैवेद्य इ. वस्तू ठेवतात. कुळाचारानुसार साहित्यात बदल होऊ शकतो. एक दिवा अखंड तेवत ठेवतात. कणिकेचे पाच दिवे, पाच पंचपक्वान्नांचे घास (ज्यास मुटके म्हणतात) व पाच मधुर फळे, पाच खारका, पाच सुपाऱ्या, पाच हळकुंडे सुपात ठेवून त्यांनी देवीची पूजा करतात. काही पाटीवर सरस्वतीची प्रतिमा काढून तिचीही पूजा करतात. सटवाईस हळदकुंकू लावल्यावर बाळास थोडा वेळ तिच्यासमोर ठेवतात. यात पंचक्रोशीनुसार थोडाफार बदल असतो. पाचवीच्या दिवशी बरेच लेवा पाटीदार भजन-कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करतात. त्या दिवशी प्रथमच पेढे वाटतात. काही ऐपतीनुसार आप्तेष्ट-मित्र व भाऊबंदांना जेवण देतात. काही चहापान देतात.

बाराव्या दिवशी बारसे करतात. त्या दिवशी नाव ठेवतात. या दिवशी घुगऱ्या शिजवून त्या सवाष्णींना वाटतात. बारशाच्या दिवशी सकाळी बाळ-बाळंतिणीला न्हाऊ घालतात व न्हाणीपूजन करतात. न्हाणीपूजन केले म्हणजे सुहेर फिटले. लेवा पाटीदार सुहेरला 'इर्दी' ('वृद्धी'चा अपभ्रंश) असे म्हणतात. ज्या कुटुंबांना 'इर्दी' झाली असेल; त्यांच्यात सहसा काही कौटुंबिक प्रथा पाळतात.

जावळ काढणे (चौल अथवा चुडाकर्म) - शिशूच्या डोक्यावरील केस प्रथम काढण्याच्या क्रियेला जावळ काढणे म्हणतात. चुडा म्हणजे शेंडी! चुडा ठेवण्याचा विधी म्हणून चौल असे म्हणतात. या दिवशी नापितास योग्य मोबदल्याबरोबरच जेवण व वस्त्र देण्याची प्रथा होती. गोत्र प्रवरांचे स्मरण करून जावळ काढताना चुडा (शेंडी) ठेवावी. बरेच लेवा पाटीदार जावळ काढण्यासाठी बालकास सव्वा वर्षानंतर खंडोबास नेतात.

जातकर्मापासून चौलकर्मापर्यंतचे संस्कार मुलींच्या बाबतीतही परंतु मंत्राशिवाय करावेत, असे **आश्वलायन गृहसूत्रात** तसेच **मनुयाज्ञवल्क्य स्मृतीत** सांगितले आहे. मुलींचे पहिले केस अपवित्र समजून अगदी लहानपणीच एकदा कापून टाकण्याची प्रथा आहे. मुलींचे जावळ काढल्याने तिच्या केसांना वाढ लागते, अशी समजूत आहे.

काहींचे जावळ मानलेले (नवसाने मुलगा झाल्यास) असते. अशांचे जावळ मानलेल्या ठिकाणी अट्रावलचा मुंजा, तापीवरील अंजाळ्याखालील माणकेश्वर, जेजुरीचा खंडोबा, बुलडाण्यातील जाळीचा देव वा इतर ठिकाणी काढतात. त्या वेळी बालकाची आत्या जावळ झेलते. तिला साडीचोळीचा आहेर करतात. आप्तेष्टांना जेवण देतात.

कान टोचणे (कर्णवेध) - लेवा पाटीदारांमध्ये कान टोचण्याच्या विधीस अनन्यसाधारण महत्त्व असते. उपनयन संस्कारासारखाच हा विधी करतात. काही कारणास्तव मुलाचे कान टोचावयाचे राहून गेले असल्यास लग्नाच्या आधी कर्णवेध संस्कार करावाच लागतो.

प्राचीन **सूत्रग्रंथात** या शिशुसंस्काराचा उल्लेख **बोधागुह्यसूत्रात** सापडतो. त्यानुसार, मूल जन्मल्यापासून सातव्या किंवा आठव्या महिन्यांत मुलाचे कान टोचावे, असे सांगितले आहे. बृहस्पतीच्या मते १०, १२ किंवा सोळाव्या दिवशी किंवा सातव्या अथवा दहाव्या महिन्यात टोचावे, असे आहे. लेवा पाटीदारांमध्ये लहानपणी मुलाला समजू लागल्यावर कान टोचतात. यासाठी वयाचे बंधन नाही. मात्र, कान टोचण्याचा विधी कुळाचारानुसार या लोकांच्या कुलदेवतांचा जो ठरावीक दिवस असतो, त्या दिवशी करतात. साधारणतः बऱ्याच लोकांच्या कुलदैवताचा हा दिवस होळीनंतरच्या पहिल्या शुक्रवारी असतो. कानाचा (कान टोचण्याचा) दिवस ठरविताना मुलाचा गुरू पाहतात. बाराव्या, आठव्या व चौथ्या गुरूत कान टोचत नाहीत. लग्नाप्रमाणेच कर्णवेधाचा मुहूर्त पाहतात. कान टोचण्याचा विधी मोठा असल्यास काक्या, मावशा, माम्या, आत्या यांना आहेर म्हणून

साड्या व कपडे देतात. मुलाचा कर्णवेध करण्याच्या ठरावीक दिवसांच्या आधी त्याच कुटुंबात म्हणजे मुलास भाऊ झाला असल्यास किंवा मुलाच्या वडिलांच्या भावास मुलगा झाला असल्यास तो भाऊ व चुलतभाऊ ठरावीक वयाचा झाल्यावर दोघातिघांचा कर्णविध विधी मुहूर्तावर एकाच दिवशी करतात. या दिवशी मुलांना नवीन कपडे परिधान करून वाजतगाजत कुलदैवताकडे नेतात. कुलदैवताजवळ तेलाचा दिवा लावून पूजा-आरती करतात व कापसाचा बोळा त्या दिव्यातील तेलाने भिजवून ज्याचे कान टोचायचे आहेत, त्याच्या कानांना लावून सोनार कान टोचतो. कान टोचताना मुहूर्त काढतात. जर मुलाला कुलदैवताजवळ नेणे जमत नसेल तर भाऊबंद किंवा आप्तेष्ट कुलदैवताजवळील तेलाचा बोळा मुलाकडे घेऊन जातात व मुहूर्त बघून सोनाराकडून कान टोचून घेतात. पूर्वी काहींचा कर्णवेध विधी मोठा असे. ते मोठ्या प्रमाणावर भाऊबंद व आप्तेष्टांना बोलावत. काहींचे कर्णवेध विधी नवराताचे असत. हे नवराताचे विधी चैत्राच्या रामनवमीपर्यंत नऊ दिवसांत पार पाडत. तेव्हा वाजतगाजत छत्रचामर, अब्दागिर मुलाच्या डोक्यावर ढाळून कुलदैवताकडे नेत. नवराताचे मोठे कान (मोठा कर्णवेध समारंभ) दर तिसऱ्या पिढीत येत, आता नवराताचे कानविधी बंद पडत आहेत. कर्णवेध विधी पुढीलप्रमाणे करावा.

दिवसाच्या पूर्वार्धात पूर्वेस तोंड करून बसावे व मुलाच्या उजव्या व डाव्या कानाला स्पर्श करून ''भद्रं कर्णेभिः शृणुयाम.'' हा मंत्र म्हटल्यावर कुशल माणूस वा सोनाराने कान टोचावेत. टोचताना मूल रडल्यास त्याच्या तोंडाला मध लावावा. संस्कार सांगतेसाठी आप्तेष्टांना भोजन घालावे. मुलांच्या बाबतीत हा विधी धार्मिक झाला आहे. मुसलमान पुरुषात कान टोचण्याची पद्धत नसल्यामुळे त्यांना 'अविंध' म्हणतात. हिंदूंमध्ये या संस्काराने धार्मिक स्वरूप ग्रहण केल्यामुळे तो अपरिहार्य ठरला असून त्याची अवज्ञा करणे पाप मानले जाऊ लागले. देवल आपल्या स्मृतीत लिहितो की, ज्या ब्राह्मणाच्या कर्णरंध्रात सूर्याची छाया प्रवेश करीत नाही, त्या ब्राह्मणाच्या केवळ दर्शनानेही पुण्यक्षय होतो. अशा ब्राह्मणास श्राद्धासाठी बोलावू नये, बोलावल्यास ते आसुरश्राद्ध ठरते.

मुलींचे कर्णवेध धार्मिक नसून कर्णभूषणे व मोठेपणी सौभाग्य लेणे परिधान करण्यासाठी करतात. मुलाचा कर्णवेध केल्यानंतर त्याच्या दोन्ही कानांत सोन्याच्या व चांदीच्या बाळ्या घालण्याची प्रथा लेवा पाटीदारांमध्ये आहे. काही दिवसांनंतर या बाळ्या काढून टाकतात.

खेडा जिल्ह्यातील लेवा पाटीदार आपल्या मुलांची मुंज करीत असल्यामुळे व खानदेशातील लेवा पाटीदार खेडा, भडोच जिल्ह्यांतून आलेले असल्यामुळे यांचा कान टोचण्याचा हा विधी (संस्कार) म्हणजे खेडा जिल्ह्यातील लेवा पाटीदारांच्या मुंज संस्काराचा अपभ्रंशित संस्कार असावा. म्हणून लेवा पाटीदारांनी कान टोचण्याच्या

दिवशीच मुंज आटोपून यज्ञोपवित परिधान करण्यास हरकत नाही.

उपनयन (मुंज) - हा अत्यंत शद्धिसंस्कार आहे. पारशी धर्मग्रंथातही याचे महत्त्व कथन केले असल्याने पारशांमध्येही हा विधीसंस्कार केला जातो व म्हणून या संस्काराचा उगम इंडो-इराणीयन संस्कृतीमध्ये झाला असावा.[३] पारशी हे पर्शियामधून इराणमार्गे भारतात आले आहेत. अरबांनी इराणवर इ.स. ६३३ मध्ये कब्जा केल्यावर सातव्या, आठव्या शतकांनंतर पारशी भारतात आले आहेत. त्याआधीच याच देशाच्या गुर्जिस्ताननामक भागातून लेवा पाटीदारांचे पूर्वज गुर्जर हे आलेले आहेत (चौथ्या शतकात). गुर्जरांपासून पुढे क्षत्रिय राजपूत झालेल्यांमध्ये तसेच खेडा-भडोच भागातील लेवा पाटीदारांमध्ये मुंज संस्काराची प्रथा असल्याने व ते स्वतःस द्विज मानत असल्याने खानदेश-वऱ्हाडातील आस्थलांतरी लेवा पाटीदारांनीही हा संस्कार करावयास काहीच हरकत नाही. खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार मोठ्या अभिमानाने सांगतात की, ते सरदार वल्लभभाई पटेल ज्या वंशाचे आहेत; त्याच वंशाचे आहेत आणि ते (लेवा पाटीदार) जर रेवा चरोतरमधून खानदेश-वऱ्हाडात आले आहेत तर रेवा चरोतरमध्ये रूढ असलेले चांगले विधी, यांतील काही सोडून दिलेले असले तरी पुन्हा सुरू करावे. हे प्रस्तुत लेखकाचे मत आधीच नमूद केले असल्याने उपनयन संस्काराची माहिती येथे देत आहे. खेडा जिल्ह्यातील लेवा पाटीदार यज्ञोपवित (जानवे) परिधान करतात. त्यामागील कारण असेही सांगता येईल की, गुर्जर लोकांपैकी हरिश्चंद्रनामक ब्राह्मण पुरुषाने गुर्जरत्ता (राजपुताना) भागात इ.स. सहाव्या शतकात लहानसे राज्य स्थापन केले[४]. त्याची भद्रानामक राणी क्षत्रिय कुळातील होती. त्यांची मुले स्वतःस गुर्जर प्रतिहार म्हणवित. या हरिश्चंद्र ब्राह्मणापासून उत्पन्न झालेल्या या क्षत्रिय वंशातील खेडा जिल्ह्यातील लेवा पाटीदार स्वतःस द्विज समजून यज्ञोपवित परिधान करीत असावेत.

मुंज आठव्या, अकराव्या किंवा बाराव्या वर्षी करतात. प्रारंभी घाणा, गणपतीपूजन, मातृकापूजन आणि पुण्याहवाचन हे उपचार यथास्थित केले जातात. बटूचे शेंडीव्यतिरिक्त सर्व केस न्हाव्याकडून कापून घेतात. बटूचे उटण्याने स्नान घातल्यावर नवीन कपडे परिधान करतात. बटूस आई मांडीवर घेऊन भरविते, नंतर त्याच थाळीत स्वतः अन्नग्रहण करते (लेवा पाटीदार माता आपल्या मुलाच्या थाळीत बऱ्याचदा जेवतात. कदाचित यांच्यात पूर्वी कधीकाळी उपनयन प्रथा असावी व त्यातूनच ही प्रथा रूढ झाली असावी). मुहूर्तावेळी बटू आणि त्याचे वडील यांच्यात दोन पुरोहित अंतरपाट धरतात. या अंतरपाटावर कुंकुमाने स्वस्तिक चिन्ह काढलेले असते. पुरोहित मंगलाष्टके म्हणतो; त्या वेळी आमंत्रित आप्तेष्ट व इतर मंडळी बटू व वडिलांवर अक्षता टाकतात. मुहूर्तसमयी अंतरपाट काढून बटू वडिलांच्या पाया पडतो. मंगलवाद्ये वाजतात. पानसुपारीने आमंत्रितांचे स्वागत करतात. उपनयन संस्काराचा आता प्रारंभ होतो. होमाग्नी प्रज्वलित करून त्यात तूप, तीळ आणि सात प्रकारच्या समिधा अर्पण करतात. बटू लंगोट व पंचा

नेसून ब्रह्मचर्याश्रमाची दीक्षा देण्यास्तव पुरोहितास विनंती करतो. पुरोहित विनंती मान्य करतो. त्यास यज्ञोपवित परिधान करतो आणि पलाश वृक्षाचा दंडा देऊन ज्ञानार्जनास्तव उपदेश करतो. सूर्याची प्रार्थना करून बटू ही समिधा अर्पण करतो. पुरोहित यज्ञाची सांगता करतो. बटू गायत्रीमंत्र म्हणतो. तद्नंतर गणेश मंदिरात जाऊन गणेशस्तोत्र म्हणतात. कार्यस्थळी परतल्यावर 'ओम भवति, भिक्षाम् देही' अशा शब्दात बटू आईचे आर्जव करतो. आई आशीर्वादासह मिठाई व सोनेचांदीचे नाणे भिक्षेत घालते. याला भिक्षावळ असे म्हणतात. मेघाजनन या अंतिम विधीमुळे बटूची बुद्धी अध्ययन व वेदाभ्यास करण्यास समर्थ बनते, अशी श्रद्धा असल्याने ज्ञान व वैभव प्राप्तिस्तव बटू बुद्धिदेवतेची प्रार्थना करतो. गणपती व वरुणास आवाहन व नमस्कार करून उपनयन सांगता करतात. बटूने आता ब्रह्मचर्याश्रमात पदार्पण केलेले असते. त्याने १२ वर्षे अध्ययन करायचे असते. पूर्वी अध्ययनानंतर समावर्तन विधी करीत. पण, आता त्याच दिवशी उरकून घेतात. समावर्तनास सोडमुंज म्हणतात. समावर्तन हा गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याआधीचा विधी असतो. सोडमुंज विधीत मामा बटूस मुलगी देण्याचे नाटक करून हा विधी संपवितात. आज हा विधी केला जात नाही.

विवाह संस्कार

हा एक महत्त्वाचा संस्कार असून ज्यामुळे विवाहेच्छुक तरुण आणि उपवर कन्या हे दोघे ब्राह्मण, इष्टमित्र आणि अग्नी यांच्या साक्षीने पती-पत्नी म्हणून संबद्ध होतात, त्या संस्काराला विवाह असे म्हणतात. विवाहाला पाणिग्रहण, उपयम, उद्वाह असेही म्हणतात. मानवी समाजातील सर्व संस्थांमधील विवाहसंस्था मुख्य असून १६ संस्कारांमध्ये ती केंद्रस्थानी आहे. विवाहामुळे स्त्री-पुरुषांमधील संबंधांचे नियमन होते. तद्वतच अपत्यांचा सामाजिक संबंध, दर्जा ठरतो. कुटुंबसंस्था विवाहसंस्थेवर अवलंबून असल्याने विवाहसंस्कारावर सामाजिक नीतीचा प्रभाव पडला आहे. विवाहसंस्कारांसाठी जेवढ्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात; तेवढ्या अन्य कोणत्याही संस्कारात घ्याव्या लागत नाहीत. या संबंधात वधू-वर चारित्र्याबरोबर कुळाचे पावित्र्य व दर्जा विचारात घेतला जातो. त्यावरच दोघांचा संसार श्रेयस्कर व्हायचा असतो. विवाहसंस्कारातील मंत्र पावित्र्यनिदर्शकच आहेत. याव्यतिरिक्त विवाही भेद (अंतर्विवाही=endogamous व बहिर्विवाही=exogamous), सामाजिक दर्जा, अर्थोत्पादनाची क्षमता, निरोगीत्व, आनुवंशिकता इत्यादी गोष्टी विवाह जुळविताना निरखूनपारखून घेतात.

विवाहसंस्था कुटुंबसंस्थेपुरतीच मर्यादित नसून तिला सामाजिक अनुबंध असतो. गुणी, नीतिमान, चारित्र्यसंपन्न, परोपकारी दाम्पत्ये समाजोत्कर्षाला उपयोगी पडतात. अनीतिमान दाम्पत्यांमुळे समाजाचे विघटन होते. विवाहामुळे स्त्री-पुरुषांचा समाजविघातक उच्छृंखलपणा संयत होतो. विवाहसंबंधाने माणसे समाजाशी एकजीव होतात. नातीगोती संबंध वाढून जीवनव्यापकता येते. कर्तव्य निश्चित झाल्याने आत्मौपम्य वृद्धीमुळे पुरुष

संयमी, नीतिमान, उपकारक आणि अहिंसक बनतो आणि अलौपम्य वृद्धीचा धडा त्यास पत्नी व अपत्यरूपाने मिळतो. विवाहाचा उद्देश धर्मप्रजासम्पत्तिः प्रयोजन दारसङ्ग्रहस्य' म्हणजे धर्म आणि प्रजा, संपत्ती हे विवाहाचे प्रयोजन असल्याचे **मिताक्षरी**काराने **(याज्ञ., स्मृ.** १.७८ वरील टीका) म्हटले असून आपस्तंबाचेही तेच मत आहे. अक्षतारोपणाच्या मंत्रात वधू-वर एकमेकांकडे ज्या कामना व्यक्त करतात; त्या जितक्या व्यावहारिक आहेत, तितक्याच धार्मिक व नैतिकही आहेत. विवाहेच्छूंनी धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ परस्पर सहकार्याने संपादित करायचे असतात. त्यांच्यात पती-पत्नीचे लैंगिक संबंध निष्ठेचे पाहिजेत, असा वेद व धर्मशास्त्रांचा आग्रह आहे. म्हणूनच अन्य धर्मांमध्ये त्यास कराराचे स्वरूप असले तरी हिंदूंमध्ये एक पवित्र संस्कार मानला जातो. करारांच्या अटींचा भंग झाल्यावर करार संपुष्टात येऊन दम्पत्ती विभक्त होतात. संसाराने बद्ध झालेले वधू-वर दुर्दैवाने दूर झाले तरीही वियोगाची कारणे निरुक्त झाल्यावर एकत्र येऊन पुन्हा नांदतात. विवाह संस्था अतिप्राचीन असून **ऋग्वेदातील** विवाहसंस्थेचे स्वरूप अतिशय मंगल व उदात्त आहे.

सगोत्र व सपिंड विवाह निषिद्ध असला तरी सपिंड विवाह मान्यता पावलेले आहेत. आतेभावाने मामेबहिणीशी लग्न करणे, हा त्यातलाच प्रकार मानता येईल. यात सकूळ येत नसल्यामुळे कुळांना प्राधान्य देणाऱ्यांमध्ये ही प्रथा निषिद्ध मानता येत नाही. लेवा पाटीदारांमध्ये मामाच्या मुलीस मामेबहीण मानून तिच्याशी विवाह-संबंध जोडत नाहीत. म्हणजे सपिंड विवाह करीत नाहीत. परंतु, महाराष्ट्रातील बहुतांश जातींमध्ये मामाच्या मुलीस प्राधान्य दिले जाते. लेवा पाटीदारांमध्ये कदाचित पुढील पिढीत आनुवंशिक रक्तदोष उतरू नये म्हणून मामाच्या मुलीशी लग्न करीत नसावेत. परंतु, याचा अर्थ असा नव्हे की, मामकुळातील इतर मुलींशी विवाह करणे निषिद्ध आहे. लेवा पाटीदारांमध्ये मामकूळ का बघतात, हे समजू शकत नाही. मामकुळातील मुलीशी लग्न करू नये, यास कुठेही शास्त्राधार नाही. तरी कृपया समाजात हा जो गैरसमज पसरला आहे, तो कृपया काढून टाकावा. मामकुळातील मुलीशी लग्न करण्यास काहीच हरकत नाही. त्यामुळे वधू व वर निवडीसाठी अधिक वाव मिळेल.

लेवा पाटीदारांची कुळे हीच बहिर्विवाही गट (Exogamous Groups) आहेत. इ. स. १८५२ पूर्वी खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाज एकसंध होता व त्यांच्यामध्ये अंतर्विवाही (Endogamous) भेद नव्हते. दुर्दैवाने काही किरकोळ मतभेदांमुळे या समाजामध्ये सावदेकर किंवा अस्सल लेवा पाटीदार, गाडेगावकर किंवा नवघरे, कंडारकर आणि थोरगव्हाणे असे चार अंतर्विवाही गट निर्माण झालेत. म्हणजे या गटांनी आपापसात बेटी व्यवहार करण्याचेच बंद केले. त्यांचे रोटी-व्यवहार मात्र चालू राहिले. श्री. शं. वि. पाटील यांच्या मुलाखतीत त्यांच्या मते थोरगव्हाणे, नवघरे, कंदारकर व लेवा पाटीदार हे चार पोटभेद म्हणजे गुजरातमधील लेवा कुणब्यांमध्ये असलेले खेड्यांचे गोल[५] (निरनिराळे

संघ) केलेले असून एका गोलातील मुलामुलींची दुसऱ्या गोलातील मुलामुलींबरोबर लग्ने केली जात नाहीत. या गोलांच्या मर्यादा निश्चित स्वरूपाच्या नसतात व त्यात वारंवार बदल होतात असे जे स्वरूप आहे, त्यातलाच प्रकार असावा. परंतु, खानदेश वऱ्हाडासाठी हा निकष खरा वाटत नाही. अलीकडे २०-२५ वर्षांत लेवा पाटीदार, नवघरे व कंडारकर यांच्यातील अंतर्विवाही भेद नष्ट झाले असून त्यांचा एक व थोरगव्हाण्यांचा दुसरा असे दोनच अंतर्विवाही गट शिल्लक राहिले आहेत. काळाच्या प्रवाहात या दोन गटांमधील अंतर्विवाही भेद नष्ट होणे आवश्यक आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे लेवा पाटीदारांची कुळे ही बहिर्विवाही गट असल्यामुळे मराठे, राजपुतांप्रमाणेच एकच कुळात म्हणजे सकूळ विवाह करीत नाहीत. महाराष्ट्रातील उच्चवर्णीयांमध्ये सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाह करीत नाहीत. लेवा पाटीदारांमध्ये गोत्रांचा विचार जरूर करतात. प्रवर पाहत नाहीत. पूर्वी अडाणीपणामुळे बहुतेक लोकांना गोत्र व प्रवरांची माहिती नसे. आता या समाजात शिक्षणाचे प्रमाण खूपच वाढल्याने कुळे, गोत्रांचा सखोल विचार करू लागले आहेत. लेवा पाटीदारांमध्ये सकूळ विवाह न करणे, ही अतिशय आदर्श प्रथा पूर्वापार चालू आहे आणि तेच योग्य आहे. आता गोत्रांना महत्त्व दिले जाते. इ.स. च्या दुसऱ्या ते चौथ्या शतकांत भारतात आलेल्या ह्यांच्या पूर्वजांना भाटांनी आणि पुरोहितांनी गोत्रे चिटकविली आहेत. ६०-७० वर्षांपूर्वीसुद्धा बहुतेकांना गोत्रे ठाऊक नव्हती. उपाध्ये जे सांगतील ती गोत्रे अशी स्थिती होती. त्यामुळे छातीठोकपणे 'अमुकच गोत्र आमचे आहे' असे कोणी सांगू शकत नाही. गोत्रांच्या अतिरेकाने काही सकूळ विवाहसुद्धा झाले आहेत. हे चूक आहे. उदा. खानदेशातील बोरोले कुळाचे गोत्र दुर्वास सांगितले जाते, तर वऱ्हाडातील बोरोले कुळाचे गोत्र शांडिल्य सांगितले जाते. त्यामुळे खानदेशातील बोरोले व वऱ्हाडातील बोरोले हे बहिर्विवाही गट असूनही विवाह झालेले आहेत. अशी बरीच उदाहरणे देता येतील. यांच्यात एकपत्नीत्वाची (monogamy) प्रथा असून पूर्वीच्या काळी क्वचित बहुपत्नीत्व (polygamy) आढळत असे. यांच्यातील पूर्वीची बालविवाहाची (infant marriage) प्रथा बंद पडली असून परिपक्व वयमान गटात (matured age group) विवाह करण्याची प्रथा रूढ झाली आहे.

उच्च कुळातील मुलाने खालच्या कुळातील मुलगी घरात आणणे यास 'अनुलोम' विवाह (descending marriage) संबोधण्यास हरकत नाही आणि खालच्या कुळातील मुलाने उच्च कुळातील मुलगी घरात आणणे यास 'प्रतिलोम' विवाह (inverted marriage) संबोधण्यास हरकत नाही. आता उच्चनीच भेद नष्ट झाले असले तरी हुंडा घेऊन मुलगी घरात आणण्याच्या प्रथेस प्रतिलोम विवाह म्हणण्यास हरकत नाही आणि अतिशय दुःखाची गोष्ट ही की, हल्ली हा समाज हुंडा घेण्यासाठी अगदी खालच्या स्तरावर जाऊन असे प्रतिलोम विवाह करण्यास उद्युक्त झाला आहे. तसे मानल्यास आता

बहुतांश लेवा पाटीदारांची लग्ने प्रतिलोम विवाह पद्धतीने होत आहेत, याचा समाजसुधारकांनी विचार करावा.

लेवा पाटीदार समाजात निर्वंशाच्या मुलीकडे (जिला भाऊ नाही अशा मुलीकडे) पाहण्याचा दृष्टिकोन निराशाजनक आहे. आताच्या प्रगत युगात अजूनही असे बुरसटलेले विचार काही वरपालक कवटाळून आहेत, याचा खेद वाटतो. शिक्षणप्रसार, कुटुंबनियोजनाची तसेच पाल्यांना उचित शिक्षण व पालनपोषणाच्या जाणिवेतून एक किंवा दोन अपत्यांनंतर कुटुंबनियोजन करण्याकडे कल वाढला असल्याने बऱ्याच जणांना फक्त एक वा दोन मुलीच असतात, तर काहींना फक्त मुलेच असतात. अशा स्थितीत निर्वंशाच्या मुली नाकारणे उचित नाही. निर्वंशाच्या मुली करू नये, असे पुराणातही नाही आणि त्यास शास्त्राधारही नाही. आपण ज्या प्रभू रामचंद्राचे वंशज समजतो त्या प्रभूने व त्याचा भाऊ लक्ष्मणानेसुद्धा निर्वंशाच्या मुलींशी (अनुक्रमे सीता व ऊर्मिला) लग्ने केली होती. हा आदर्श हा समाज विसरला काय? तरी कृपया हा बुरसटलेला विचार मनातून काढून टाकावा. निर्वंशाच्या मुलींशी लग्ने करीत नाही, असेही नाही. श्रीमंत निर्वंश असलेल्या बापाचे घबाड हाती लागेल, या स्वार्थी हेतूने निर्वंशाच्या मुली करतातही. मग, गरीब निर्वंशाच्या बापाच्या बाबतीत असे का घडू नये?

हल्ली पत्रिका बघण्याचाही अतिरेक झाला आहे. कोणताच ग्रह वा देवता वाईट करीत नाही. मग, मंगळाच्या सुमंगलेला का नाकारावे? पूर्वी हे असे कोणी पाहत नव्हते म्हणून आमचे आई-वडील, पूर्वज यांचे संसार सुखाचे झाले नाहीत काय? नाडीदोष पाहण्याचाही अतिरेक होत आहे. खरे तर सुखाचा संसार हा वर व वधू या दोघांच्याही भावना समजून घेणे, जुळवून घेणे, तडजोड करणे व एकमेकांची मने जोपासणे यावर अवलंबून असतो. तुमची मने जुळलीत तर ग्रहदोष, नाडीदोष इ. बाधा आणू शकत नाहीत. हल्ली लेवा पाटीदारांमध्ये घटस्फोटाचे प्रमाण खूप वाढले आहे. त्याला उपरोक्त गोष्टी कारणीभूत नसून उच्च शिक्षणामुळे दोघा उभयतांत निर्माण होणारा स्वाहंकार (ego) कारणीभूत ठरतो. शिक्षणामुळे जशा वराच्या अपेक्षा वाढलेल्या असतात; तशाच वधूच्याही अपेक्षा वाढलेल्या असतात म्हणून दोघांनी तडजोड करणेच योग्य राहील.

आंतरजातीय विवाहसंबंधातून निपजलेल्या संततीसही लेवा पाटीदार मानून आपल्यात सामावून घ्या. त्यांच्याशी बेटीव्यवहार करताना कसलाही संकोच बाळगू नका अथवा त्यांना दोष देऊ नका.

लालगंध (सोयरीक) - विवाहापूर्वीचा महत्त्वाचा विधी म्हणजे वाङ्‌निश्चय करणे, यालाच लेवा पाटीदार लालगंध, सोयरीक किंवा साखरपुडा असेही म्हणतात. मुलामुलीने पसंती कळविल्यावर व पत्रिकेनुसार गुण जुळून आल्यावर म्हणजे ३६ गुणांपैकी किमान १८ च्या वर गुण जुळल्यास पसंती कळवून विवाह पक्का करण्यासाठी वाङ्‌निश्चयाचा दिवस ठरवितात. लालगंध किंवा साखरपुड्याचा कार्यक्रम वाग्दत्त

वधूपित्याकडे होतो. पुरोहिताद्वारे होम, घाणा, गणपतीपूजन, मातृकापूजन व पुण्याहवाचन विधी थोडक्यात आटोपल्यावर वरपक्षाकडून वाग्दत्त वधूस नवीन साडी नेसवून कुलदेवतांची पूजा करवितात. तद्वतच वराकडूनही पूजा करवितात. यानंतर वराने वधूस व वधूने वरास अंगठ्या घातल्या म्हणजे वाङ्‌निश्चय पक्का झाल्याचे घोषित करतात. या विधीची सांगता आमंत्रितांना मिष्टान्न भोजन देऊन करतात. पूर्वी वर उपस्थित राहणे आवश्यक मानले जात नसे.

लेवा पाटीदारांमध्ये परिस्थितीनुरूप लालगंध मोठा करतात. काही ठिकाणी तर ३००-४०० आमंत्रित असतात. त्याशिवाय, वधूपक्षाकडील लोक व भाऊबंद वेगळे असतात. हा सगळा खर्च वधूपित्याने करावयाचा असतो. हे योग्य आहे काय, याचा विचार वरपक्षाने करावयास पाहिजे. यावर आवर घालण्याची आवश्यकता आहे. साखरपुड्याच्या दिवशी लग्नतिथी निश्चित करण्याची प्रथा आहे. या दिवशी काही वरपक्षाकडील मंडळी वराच्या बहिणीसाठी अंगठी व साडीही मागून घेतात. हेही योग्य नाही.

बस्ता - लेवा पाटीदारांमध्ये सोयरिकीनंतरचा लौकिक विधी म्हणजे बस्ता काढणे किंवा लग्नाचे कपडे काढणे. एखादा दिवस मुक्रर करून १०-१५ आमंत्रित वधूपक्षाकडचे व १०-१५ आमंत्रित वर पक्षाकडचे बस्ता काढण्याच्या कापड दुकानात एकत्र येतात. त्यात वधूच्या पसंतीनुसार शालू, पैठणी व अन्य भारी साड्या व मुलाचे कोट वा सफारीचे कापड व अन्य कपडे खरेदी करतात. वरमाय-वधूमायच्या साड्यांबरोबरच वधूवरांना आजी-आजा असल्यास आजलसाड्यात त्यांच्यासाठी साड्या (पातळ), धोतर, कापडी बस्त्यात काढतात. पूर्वी बस्त्याचा खर्च समसमान वाटून घेत, नंतर दोनतृतीयांश मुलीकडून व एकतृतीयांश मुलाकडून केला जाई. आता मुलीकडच्यांचा खर्च मुलीकडच्यांनी व मुलाकडचा मुलाकडच्यांनी करावा, अशी प्रथा सुरू झाली आहे.

दागिने - पूर्वी वर-वधूच्या दागिन्यांचा खर्चही निम्मा निम्मा करण्याची अगदी आदर्श पद्धत होती. परंतु, या ३०-३५ वर्षांत मुलीकडच्यांना जास्त खर्च येऊ लागला आहे. इतर समाजांप्रमाणेच या समाजातही हुंड्याचे प्रमाण वाढले आहे. अलीकडचे मुलींचे बहुतांश दागिने मुलीच्या बापाने ऐपतीनुसार १०-१५ तोळ्यांपासून मुलगा उच्च शिक्षित व चांगला पगारदार असल्यास ४०-४५ तोळे किंवा त्यापेक्षाही जास्त करण्याची प्रथा रूढ होत आहे. मुलगी उच्च शिक्षित असली तरी हुंडा व दागिने घेत नाही, असे नाही. मुलाचा बाप वधूसाठी फक्त मंगळसूत्र, एखादी चेन, सौभाग्य लेणे म्हणून कानातले दागिने व शक्य झाल्यास (घरची परिस्थिती चांगली असल्यास इभ्रत म्हणून) १०-१५ तोळ्यांपर्यंत दागिने करतो. हे सर्व दागिने त्याच्याच घरात येत असले आणि सर्व खर्च घेतलेल्या हुंड्यातून भागविता येत असला तरीसुद्धा वरपिता वधूसाठी फार दागिने करीत नाही. हुंडा न घेणारांचे प्रमाण अत्यल्प आहे, म्हणजे पाच टक्केही नाही. आता

हुंड्याची कीड इतकी भिनली आहे की, विवाह या पवित्र संस्कारास या समाजाने व्यवहार करून टाकला आहे. लिलावात बोली बोलावी, तसे वरांचे भाव (किमती) ठरत आहेत. हुंडा घेऊन आणलेल्या मुली सासू-सासऱ्यांना म्हातारपणी कशी वागणूक देतात, हे सर्वत्र जाणवू लागले आहे. सारी समाजव्यवस्थाच या किडीने पोखरून काढली आहे.

वधुपिता ऐपतीनुसार मुलीच्या नवीन संसारासाठी लागणाऱ्या वस्तू, भांडीकुंडी यांचे आंदण देत असतो. त्यात स्वयंपाकासाठी लागणारी सर्व भांडी, स्वयंपाकघरातील भांडी व वस्तू, मिक्सर, ताट, तांब्या, पेले इत्यादींबरोबर ऐपतीनुसार पाच चांदीचे देव किंवा तांब्याचे देव आंदणात देतात. पूर्वी बंब (संशा), पलंग व गाय आंदणात देत.

वानं - लग्न जमल्यानंतर नवऱ्या मुलास व नवऱ्या मुलीस आप्तेष्टांकडे वानं धरण्याची (गडगनेर वा केळवणासाठी बोलावण्याची) प्रथा या समाजात मोठ्या प्रमाणावर असून केळवणाच्या जेवणात मुलाचे वा मुलीचे आखने (पूजा) करून त्यांच्या आवडीचे पदार्थ खाऊ घालतात. यजमानाच्या ऐपतीनुसार मुलीची ओटी भरतात व मुलास नजराणाही करतात.

सटवाईच्या भाकरी - तापी नदीच्या दक्षिणेकडील भागातील लेवा पाटीदारांमधील हा एक अनिवार्य लौकिक कुळाचार विधी! हा विधी वर व वधू या दोन्ही पक्षांकडे केला जातो. लग्नाच्या आधी येणाऱ्या मंगळवार किंवा शुक्रवारी कळण्याच्या भाकरी, त्यावर अंबाडीची भाजी व नुसत्याची लाल मिरच्यांची चिंच घातलेली चटणी करून कुलदेवतेला पूजा करून नैवेद्य दाखवितात. नारळ फोडतात आणि भाऊबंद व जमलेल्या सर्व आप्तेष्टांना हेच जेवण देतात. सटवाईच्या भाकरीबरोबर आता ताकाची कढीसुद्धा करतात. हे जेवण वाया जाऊ देत नाहीत. सटवाईच्या भाकरी हा विधी कृषिप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. वधू व वराने सव्वाशेर फुटाणे वाटायचे असतात.

मांडव - वधुपित्याच्या घरासमोर मंडप (मांडव) घातला जाई. आता कंत्राट पद्धतीने भाड्याचा मंडप घालतात. हा तयार मंडप एक दिवसात घालून लग्नानंतर लगेच काढून घेतात. परंतु, पूर्वी जेव्हा भाड्याचे मंडप मिळत नसत त्या वेळी मांडव सवारण्यासाठी सहा/सात दिवस आधीपासून तयारी करीत. गावातील व भाऊबंदांमधील उमदी मुले दिवसरात्र मेहनत घेऊन मांडव सवारत असत. त्यासाठी बल्ल्या (खांब) आणणे, त्या उभारणे, वर ताट्या अथवा घरावरील पत्र्यांचे छत बांधणे, त्याखाली पांढऱ्याशुभ्र सयन (मांजरपाट) चे कापड शिवून सारखे ताणून लावणे, या कापडी छताला खालून रंगीबेरंगी कागद व बेगडी झुंबर, फुले-वेलपत्त्या यांनी सजविणे, चहुबाजूंनी रंगीत फेट्यांच्या अर्ध्या घड्या करून कनातीसारख्या किनारी धावटाक्यांनी शिवून लावणे, तद्वतच अशा फेट्यांच्या कनातींनी शुभ्र कापडावर चौरसाकृती खण करणे, पेट्रोमॅक्स बत्त्यांसाठी लोंबकळणाऱ्या कड्या ठेवणे, बल्ल्यांना व लग्नघरच्या दरवाजांना रंगीत बेगडी चिकटविणे, मांडवाचे प्रवेशद्वार सजविणे, बहुल्याच्या खुर्च्या सजविणे, इ. अशी अनेक कामे ही मुले करीत.

लग्नघरी त्यांच्यासाठी पिठले पोळी, चटणी-भाकरी इ. च्या पंक्ती बसवीत. गावातील विशेषतः भाऊबंदांमधील सर्व लहानथोर या कामी साहाय्य करीत व हसत खेळत, थट्टामस्करी करीत खऱ्या अर्थाने लग्नाचा आनंद लुटीत. मांडवासाठी लागणारे बहुतांश सामान व चीजवस्तू तसेच बिछाईतसाठी लागणारे जाजम असे ते स्वखुशीने पुरवीत असत. यात समाजात रुजलेल्या सहकार्याची जाणीव दिसून येते. परंतु, आता कामाच्या घबडग्यात सहकार्याची जाणीव एकूणच समाजातून निघून जात असल्याने ज्यांनी हा आनंद पूर्वी कधीकाळी अनुभवला, त्यांना आता ''अहा, ते सुंदर दिन हरपले'' म्हणण्याची वेळ आली आहे.

तोरणताटी - लग्नाच्या आधीच्या दिवशी संध्याकाळी वरपक्षाच्या आणि त्याचप्रमाणे वधुपक्षाच्या लग्नघरी तोरणताट्या बांधतात. हा लौकिक विधी लेवा पाटीदार समाजात अत्यावश्यक आहे. लग्नघराच्या अगदी समोरच्या मुख्य दरवाजाला आंब्याचे तोरण व दरवाजासमोर तोरणताटी बांधतात. ही तोरणताटी तुरीच्या झाडांना (खानदेशात यास तुरखाट्या म्हणतात) तीन-चार दिवस पाण्यात भिजवून ठेवतात व विणता येतील एवढे लवचीक झाल्यावर ताट्या विणतात. त्यांच्यामध्ये आंब्याची पाने गुंफतात. अशाच तोरणताट्या व आंब्याचे तोरण गावातील खंडेराव-म्हाळसा या कुलदैवतांच्या देवळासमोर, उपास्यदेवतेचे मंदिर, मारुतीच्या देवळासमोर बांधतात, तोरणताट्या बांधतात त्या वेळी भाऊबंदांना बोलवतात. आमंत्रण देण्याचे काम यजमानाच्या वतीने न्हाव्याकडे असते. उपस्थितांना चहापाणी देतात. तोरणताट्या बांधतात त्या वेळी किंवा आधी कुटुंबातील पाच सवाष्णी कुटुंबदेवता, गृहदेवता, कुलदेवता, ग्रामदेवता, गावातील मंदिर, मारुती, वेस इ. ठिकाणी नागवेलीच्या पानाचे विडे ठेवून या देवतांना संतुष्ट करतात. तोरणताट्यानंतर आंबोला भात शिजविण्याचा विधी असतो. आंबोला भात म्हणजे ज्वारी कांडून शिजविलेला भात. तोरणताटी सव्वा महिना काढायची नसते. त्यांचे विधिवत विसर्जन करतात.

बेमाथन - लेवा पाटीदार देवकवादी (theocratic) व चेतनवादी (sentimentalist) असल्याने देवकांची तथा गायीची पूजा अनिवार्य मानतात. देवक बसविण्याच्या प्रथेस 'बेमाथन' बसविणे असे म्हणतात. बेमाथन बसविण्याच्या क्रियेत कुंभारास महत्त्वाचे स्थान आहे. कुंभाराकडून एक मोठी काळी मातीची घागर (माठ) आणि २८ किंवा २० मातीचे लोटे आणतात. घागरीत पाच सवाष्णी पंचधारांनी पाणी ओतून ती भरतात. त्यात पाच महानद्यांचे पाणी भरल्याचे मानतात. माजघरात बेमाथनजवळ चार कोपऱ्यांवर प्रत्येकी सात किंवा पाच मातीच्या लोट्यांची उतरंड, अशा चार उतरंडी करतात व त्याभोवती सुताचे सात फेरे गुंडाळतात. या चार उतरंडींना व गुंडाळलेल्या सुतास 'गौरघर' असे म्हणतात. बेमाथन बसविल्यानंतरच वरास हळद लावतात. उतरंडीच्या मध्यभागी लामणदिवा तेवत ठेवतात. बेमाथन बसविण्याचा विधी वरपक्ष व वधूपक्ष या दोहोंकडे करणे अनिवार्य असते. बेमाथन बसविताना राशीनुसार ज्या जोडप्याचा आहेर

निघत असेल त्या जोडप्याच्या हस्ते बेमाथनची पूजा करतात. पांढऱ्या कापडाचा पटका हळदीने पिवळा करून त्यात नागवेलीचे पान, शेवया, हळद लावलेली ज्वारी, सुपारी इ. बांधतात व ते माठाच्या गळ्याला बांधतात. माठाखाली आंब्याच्या झाडाखालील मातीचे आळे करून त्यावर माठ ठेवतात. यांच्यातील बेमाथन विधीमुळे हे देवकवादी आहेत, हे स्पष्ट होते.

सांप्रतकालीन हिंदू विवाह रुढींचे १) वेदमंत्रोच्चाराचा समावेश असलेली गृह्यसूत्रांनी निर्धारित केलेली वैदिक पद्धती, २) वेदमंत्रविरहित पौराणिक पद्धती आणि ३) लोणावळा धर्मनिर्णय मंडळाने सुचविलेली पुनर्रचित वैदिक पद्धती असे तीन प्रकारांत वर्गीकरण करण्यात येत असून लेवा पाटीदार पहिल्या रुढीचा अंगीकार करीत असून पुरोहिताद्वारे विधी करून घेतात.

हळद - वरास वरपक्षाकडे हळद लावण्याआधी गणपतीपूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, इ. आराधनात्मक विधी थोडक्यात आटोपून विवाहसंस्काराचा प्रारंभ मुलास हळद लावण्याने होतो. त्याची आई, बहीण व नात्यातील बायका त्याला सुगंधी तेलात भिजविलेली हळद लावतात. या रंगतदार समारंभात हळदीची गाणी व वाजंत्री यासह मुलास समारंभपूर्वक अंघोळ घालतात. मुलास (वरास) हळद लावून झाल्यावर शिल्लक राहिलेली हळद म्हणजे उष्टी हळद, ही उष्टी हळदच मुलीस लावतात.

पंगती - लेवा पाटीदार समाजात अन्नदानाची प्रवृत्ती अधिक, त्यामुळे लहान गाव असल्यास गावपंगत देतात किंवा ऐपतीनुसार भाऊबंद व आप्तेष्ट-मित्रपरिवारांना जेवण देतात. हे जेवण साधेच पण रुचकर असते. वरण-पोळी, वांग्याची किंवा लाल भोपळ्याची भाजी, भात व भातावर तूप-गूळ किंवा कढी असे जेवण असते. पोळ्या भाऊबंदांमधील स्त्रिया करीत असत व उर्वरित स्वयंपाक गावातील स्वयंपाकी करीत असत. आता स्वयंपाकाचे कॉन्ट्रॅक्ट देतात. लग्नाआधी दोन्ही पक्षांकडे पंगती झडतात-हजारोंनी लोक जेवतात. स्वयंपाकासाठी व जेवणासाठी आमंत्रण देण्याचे कार्य न्हाव्याचे असते.

लग्नचिठ्ठी - मुलाकडचे चारपाच जण मुलास हळद लावल्यानंतर त्याची उष्टी हळद व सोबत वधूसाठी साडी, पूजेचे साहित्य, मंगळसूत्र, थोडा सुका मेवा, नारळ, खोबऱ्याच्या वाट्या, तांदूळ, पानसुपारीचे सामान, शृंगारसाहित्य इत्यादी वस्तू वधूपक्षाकडे घेऊन येतात. यास लग्नचिठ्ठीचे सामान असे म्हणतात. तापी नदीच्या दक्षिणेकडील लेवा गणप्रदेशात यास **सायकवाटी** असे म्हणतात. न्हावी वधूपक्षाकडील भाऊबंदांना लग्नचिठ्ठी सोडण्यासाठी बोलवतो. लग्नचिठ्ठी सोडताना पुरोहित वधूस बोलावून मुलाच्या काकाकरवी समंत्रक पूजा करून लग्नचिठ्ठीचे साहित्य व उष्टी हळद वधूपक्षाकडे सुपूर्द करतो. वरपक्षाकडे हळदीचा कार्यक्रम असतो; त्याचीच पुनरावृत्ती वधूकडे करतात. वधूला हळद लावताना नारळ व पाच मूठभर तांदळांनी तिची समारंभपूर्वक ओटी भरतात. हळद

लावल्यावर मुलामुलीस नवरदेव-नवरी असे संबोधतात.

लग्नचिठ्ठी सोडण्याच्या विधीनंतर वधूपक्षाकडे पहिले कुवतीनुसार ग्रामभोजन किंवा आप्तेष्ट भोजन दिले जाते. त्याआधी लग्नचिठ्ठी घेऊन येणाऱ्या पाहुण्यांसमवेत पाच तेलोते (माणसे) व पाच गौरन्या (महिला) यांना जेवण देतात. तेलोते व गौरन्या त्याआधी उपवास करतात. तेलोते व गौरन्यांनी घास घेतल्याशिवाय ग्रामस्थ व आप्तेष्ट भोजनास प्रारंभ करीत नाहीत. भोजनास प्रारंभ करण्याआधी ''बोला श्री पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम'' असा घोष करूनच पहिला घास मुखी घेतात. जेवणात काही लोक संतवचनेही म्हणत असतात.

लेवा पाटीदारांच्या लग्नांमध्ये मंगलवाद्ये ही गुरव वाजंत्रींनीच वाजवावीत, अशी प्रथा होती. आता बॅण्ड वाजवितात. गुरवांच्या वाद्यांत दोन संबळवाले, दोन सनईवाले (ज्यास पिपाण्यावाले असे म्हणत), एक किंवा दोन भोंग्यावाले व एक किंवा दोन भेरीवाले असा ताफा असे. भेर ही पूर्वीच्या रणभेरीसारखीच असे. यावरून हे पूर्वी क्षत्रिय होते हे सिद्ध होते. वरात निघताना ओवाळणीचे पैसे एकतर न्हाव्याच्या हाती देत किंवा भेरीत टाकत.

वरपक्षाकडील भोजन पंगती उठल्यावर नवरदेव कुलदेवता व गावातील उपास्यदेवतांना नमस्कार करून वधूपक्षाकडे यावयास निघतो. त्या वेळी 'नवरदेव काढण्या'च्या कार्यक्रमात ग्रामस्थ त्यास वेशीपर्यंत सामोरे जातात. वेशीवरील ग्रामदेवतेस संतुष्ट करण्यास्तव पाणी घालतात व वाजतगाजत वऱ्हाड वधूपक्षाकडे निघते. आता भाड्याच्या बस वा मालट्रकने वधूपक्षाकडे वऱ्हाड नेतात. पूर्वी घरोघरच्या बैलगाड्या (दमन्या सजवून) काढत. जास्तीतजास्त बैलगाड्या काढण्याचा प्रघात होता. वधूपक्षाच्या गावी वऱ्हाड आल्यावर ते प्रथम एकतर जानवस घरी उतरतात किंवा एखाद्या जवळच्या मंदिरात उतरतात.

शेवंती (शेवटी) - वरपक्षाकडील वऱ्हाडाने वधूपक्षांकडील गावाच्या सीमेत प्रवेश केल्यावर सीमांतपूजन करण्याची पूर्वापार चालत आलेली प्रथा असून तिला लेवा पाटीदार शेवंती असे म्हणतात. सीमांतपूजन आता मंदिरात करतात. वधूचे आई-बाप व नातलग वरपक्षाचे स्वागत करण्यास्तव देवळात असलेल्या वराकडे जातात. गणपती आणि वरुण देवतांचे प्रतीक असलेली सुपारी व कलशाची पूजा करतात. विष्णूस्वरूप नवरदेवास आपली लक्ष्मीसारखी कन्या द्यावयाची असते म्हणून वधूचे आई-बाप वराची पूजा करतात, त्यास नवीन पोशाख अर्पण करतात, वराच्या बोटात अंगठी घालतात. वधूची आई वरमातेच्या पायावर पाणी घालते आणि वरमातेचे तसेच वराकडील इतर आप्तेष्ट महिलांचा यथास्थित ओटीभरण विधी करते. या वेळी नवरदेवास कपडे चढवून बाशिंग बांधतात. या विधीत मुलाचा मामा पानसुपारी देतो.

वरप्रस्थान - यास नवरदेव आणणे असे म्हणतात. नवरदेवास वधूपक्षाकडे

मांडवात आणण्यासाठी न्हावी वधूपक्षाकडील मंडळीस आमंत्रित करतो. वरपक्ष वाजतगाजत वधूगृही जातो. प्रवेशद्वारावर पंचारती ओवाळून सुवासिनी त्याचे स्वागत करतात. वधूचे आईवडील नवरदेवास मंडपात समारंभपूर्वक नेऊन चौरंग वा बहुल्याच्या (बोहला) खुर्चीवर बसवतात. शुभमुहूर्ताच्या वेळी पुरोहित मंगलाष्टके म्हणतो.

मंगलाष्टके - मंगलाष्टके म्हणण्याच्या आधी वधूस बाशिंग बांधतात. लग्न लागण्याच्या प्रारंभी नवरदेव पूर्वाभिमुख उभा राहतो. त्याचे समोर आता स्वस्तिक चिन्ह रेखांकित केलेला आंतरपाट धरण्याची प्रथा सुरू झाली आहे. वराच्या पुढ्यात आंतरपाटाच्या दुसऱ्या बाजूस नवऱ्या मुलीस उभे करतात. पुरोहित मंगलाष्टके पठण करीत असताना वधू-वरांच्या हातात पुष्पहार असतात. शुभमुहूर्ताचा क्षण येताच मंगलाष्टक पठण बंद होते. पुरोहित आंतरपाट उत्तरेकडे ओढून घेतात. मंगलवाद्ये वाजविली जातात आणि आमंत्रित पाहुणे वधू-वरांवर अक्षता टाकतात. प्रथम वधू वरास वरमाला घालते. नंतर वर वधूस पुष्पमाला घालतो. यानंतर वधूवरांनी एकमेकांचे हात हातात घेण्यास 'हातोळी' किंवा 'हातोई' असे म्हणतात. हा पाणिग्रहण विधी होय.

कन्यादान - होमाग्नी प्रज्वलित केल्यावर लाजाहोम विधी होतो. या विधीच्या वेळी पुरोहित वधूच्या पदराची गाठ वराच्या उपरण्यास बांधतो, त्यास 'गाठजुळा' असे संबोधतात. लाजाहोमाच्या वेळी मंत्रोच्चार करीत असताना वधू होमाग्नीला भाताच्या लाह्या त्रिवार अर्पण करते. लाह्यांचे चौथे आणि अंतिम अर्घ्यदान वधू नवरदेवाचा मंत्रोच्चार थांबल्यावर स्तब्धपणे करते. त्यानंतर ते जोडपे होमाग्नी, भूमाता आणि देवाब्राह्मणांना साक्षी ठेवून अशी शपथ घेते की, आयुष्याच्या अंतापर्यंत सर्व सुखदु:खांमध्ये ते एकमेकांचे साथीदार राहतील. त्यानंतर अग्निपरिणयन आणि अश्मारोहण विधी पार करतात.

चवरीभवरी (सप्तपदी) - लेवा पाटीदार सप्तपदीस 'चवरीभवरी' असे म्हणतात. सप्तपदीनंतर विवाह संस्कार पक्का व अप्रत्यावर्ती (nonrelapsing) होतो. हा विधी करताना यज्ञवेदीच्या सभोवती सात पाटांवर प्रत्येकी एक अशा तांदळाच्या लहान लहान सात राशी मांडलेल्या असतात. प्रत्येक राशीवर सुपारी ठेवलेली असते. होमाग्नी अर्घ्यदानाने प्रज्वलित केला जातो. पुरोहिताचा सतत मंत्रोच्चार चालू असताना वधू-वर यज्ञवेदीभोवती प्रदक्षिणा घालतात. तसे करताना वर वधूचा हात धरून पुढे चालतो. वधू तांदळाच्या राशीवर प्रथम उजवे पाऊल ठेवून पुढे त्याच प्रकारे सर्व पावले ठेवून चालते. प्रत्येक पदाचा स्वतंत्र मंत्र उच्चारला जातो. त्यानंतर ते दोघे होमाग्नीस तूप व लाह्या अर्पण करतात.

सप्तपदीनंतर वधू-वर अचल अशा ध्रुवताऱ्याचे दर्शन घेऊन हात जोडून नमस्कार करतात. विवाह बंधनाचे चिरंतन पालन करण्याच्या या प्रतिज्ञेचे हे प्रतीक होय.

सप्तपदीनंतर फावल्या वेळेत वधू व वर पक्षांकडील मंडळी वधू-वरास नाव व

उखाणे घेण्यासाठी अडवितात. नवरदेवाचे बूट लपवितात. कानपिळणीचा कार्यक्रमही करतात.

यानंतर वऱ्हाडी मंडळीस जेवण देतात. जेवणात मान राखला जातो. वधूवरांना जवळजवळ जेवायला बसवितात. व्याहीव्याही जवळ जेवायला बसतात. (हा व्याहीभोजनाचा लौकिक प्रकार असावा. कारण, मुलीला अपत्य होईपर्यंत वधुपित्याने आपल्या मुलीच्या घरी जेवण घेऊ नये, असा दंडक होता). वरास घास घेण्याआधी यथास्थित दागिने वगैरे देऊन सत्कार करतात. तद्वतच नवरदेवाच्या ताटाखाली 'टेकण' म्हणून काही रक्कम ठेवतात. नवरदेव लग्नात रुसू नये म्हणून बहुधा ही प्रथा पडली असावी. या वेळी बऱ्याचदा वर रुसून आपल्याला हवे ते मागून घेतो. वरमाता किंवा वरपक्षाकडील मंडळी त्यास उद्युक्त करतात. पूर्वी घड्याळ अथवा सायकलीसाठी वर रुसत असे. त्यानंतरच्या काळात ही मागणी वाढत गेली व अंगठी, चेन व लोखंडी कपाट, मोटारसायकल, मोटारकारपर्यंत ती वाढली. आता लग्नाआधीच सौदा केला जात असल्याने या जेवणात वराचे रुसण्याचे प्रकार बंद पडले आहेत. लेवा पाटीदारांच्या लग्नातील आणखी एक विशेषता म्हणजे या जेवणात आंबोला भात, त्यावर थोडे तेल व ताकाची कढी वाढण्याची प्रथा आहे. कांडलेल्या ज्वारीचा हा भात चविष्ट असतो.

यानंतर ब्राह्मणास टोपलीत धान्य देण्याचा म्हणजे 'झाल पुजण्याचा', बलुतेदारांना' अहेर चुकविण्याचा व वधुबंधूस 'सुक्या चुकविण्याचा' विधी होतो. या सर्वास 'मांडव चुकविणे' असे म्हणतात. झालमध्ये ब्राह्मणास शिधा व दक्षिणा असते. सुक्यामध्ये वधूच्या भावास कपडे व वधूस जेवढे दागिने घातले असतील; त्या प्रमाणात एक तोळ्यास दीडशे ते दोनशे रुपये या प्रमाणाच्या हिशेबाने सुक्याचे पैसे वधूच्या भावास देतात. बलुतेदारांना त्यांचा मान म्हणून अहेर देतात. न्हाव्यास लग्नात विशेष मान असतो. सर्वांना आमंत्रण देणे, पंगतीत सर्वांच्या कपाळांना गंध लावणे, वरातीत वधू-वरांवर चवरी ढाळणे, इ. अनेक कार्ये न्हावी पार पाडत असल्याने त्यास मानाचा अहेर देण्यात येतो. तोलामोलाचे सोयरे दाखविण्यासाठी सुक्या देण्याची प्रथा पूर्वापार चालू आहे. वधू पक्षाकडून वरपक्षास रुखवत दिले जाते. याच विधीत वरपक्ष वधूपक्षाकडील गावाच्या सामाजिक कार्यासाठी ठरावीक रक्कम दान करी.

लग्न बिदा होण्याआधी वधुपित्याकडील गौरघरातील लामणदिव्यावर वधूवर गव्हाची धार सोडून तो विझवितात.

यानंतर लग्न बिदा करतात. लग्न बिदा करताना वेशीपर्यंत वाजतगाजत वरात काढून वेशीजवळ व्याही एकमेकांच्या तोंडात गूळ भरवितात. आंदण व रुखवत वऱ्हाडाबरोबर देतात.

वऱ्हाड वराकडे परत आल्यावर वधूवरांना प्रथम जानवस घरी बसवितात. तेथून वाजतगाजत वरातीने ग्रामउपास्य दैवताचे मंदिर, कुलदैवत मंदिरात जाऊन पाया पडून

स्वगृही येऊन गृहप्रवेश करतात. यात वधू गृहलक्ष्मी म्हणून उजव्या पायाने धान्याचे मापटे उलटे करते. घरात आल्यावर वराच्या घराच्या गौरघरातील लामणदिवा वधूवर त्यावर गव्हाची धार टाकून विझवितात.

वधूपक्षाकडे व वरपक्षाकडे लामणदिव्यावर वर-वधू ज्या गव्हाची धार सोडून लामणदिवा विझवतात त्या गव्हाची कांडून दुसऱ्या दिवशी दोन्ही पक्षाकडे गूळ, हळद व तूप घालून आंबिल करतात व दोन्ही पक्षांकडील जवळच्या भाऊबंदामधील महिला जेवणात ही आंबिल ओरपतात.

पूर्वी लेवा पाटीदारांमध्ये वरमाता लग्नात वधूगृही जात नसे. वधूचा गृहप्रवेश झाल्यावर सूनमुखदर्शन विधी होई. त्या वेळी वधूची ओटी भरत. आता वरमाता लग्नाला जात असल्याने सूनमुखदर्शन मंडपातच होते.

सूनमुखदर्शनानंतर लक्ष्मीपूजन, देवकोत्थापन विधी होतात. वधूपक्षाकडे मंडपोद्‌वासन या विधीनंतर विवाह संस्कारांची सांगता होते.

विवाह संस्कार आटोपल्यावर वरपक्षाकडे वधूवरांनी कुलदैवतांकडे जाण्याआधी सत्यनारायणाची पूजा आयोजित करतात. त्या वेळी वधूपक्षाकडील मंडळीस आमंत्रित करतात. या वेळीही वधूपित्यास ऐपतीनुसार आहेर करावा लागतो. त्यानंतर, वधूवर कुलदैवताकडे जातात व त्यानंतर ऐपतीनुसार मधुचंद्र साजरा करण्यासाठी जातात.

पूर्वी सत्यनारायणाची पूजा झाल्यावर एक-दोन दिवसांनी माहेरची मंडळी मुलीस माहेरी आणण्यासाठी जात. मुऱ्हायांना पाहुणचार करून मुलीची ओटी भरून सासरी पाठवत.

अळ्लावन - मुळ्लावन (वायने) - कृषिप्रधान संस्कृतीच्या लेवा पाटीदारांनी शेतीच्या मशागतीतील नावेच एका लग्नविधीस द्यावीत त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे अळ्लावन-मुळ्लावन विधी. यालाच वायने असेही म्हणतात. अळ्लावन म्हणजे अरडाण. शेताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत औत नेणे; नांगर, पेरणी, कोळपे किंवा वखराचे एक चास आणि मुळ्लावन म्हणजे मुडून, मुरडाण; शेताच्या एका टोकापासून निघून पुन्हा त्याच ठिकाणी औत आणणे; नांगराची पेरणीची किंवा कोळण्याची किंवा वखराची एक परतखेप. अरडाण म्हणजे एकेरी फेरी व मुरडाण म्हणजे दुहेरी फेरी. लग्न झाल्यानंतर वधू सासरी म्हणजे स्वगृही जाते. सासरहून लग्नाच्या दुसऱ्या दिवशी तिला माहेरी नेतात. त्यासाठी माहेरचे मुऱ्हाई तिला नेण्यास येतात. त्यास अळ्लावन असे म्हणतात. तेथे माहेरच्या कुलदेवतेला नमस्कार करून जेवण वगैरे करून तिला माहरेहून तिची ओटी भरून सासरी नेतात त्यास मुळ्लावन म्हणतात. यासाठी दोन्ही संस्कारांना अळ्लावन-मुळ्लावन असे म्हणतात. यात दोन्ही पक्षाकडील पाहुणे (मुऱ्हाई) एकमेकांकडे जात असल्याने ओळख परिचय व्हावा, हा हेतू होता. त्यातून मनोमिलन होत होते. आता या प्रथा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे लग्नादी कार्यातून स्नेहसंस्कृती

जपण्याचे पूर्वापार चालत आलेले संस्कार आता बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

हा झाला लेवा पाटीदारांचा प्रचलित विवाह संस्कार! पूर्वी हेच संस्कार तीन प्रकारच्या लग्न प्रकारात म्हणजे १) न्हायाचं (न्हाण्याचे)=दोन किंवा तीन दिवसांचे लग्न, २) वरमायचे किंवा मानाचे=दोन किंवा एक दिवसाचे लग्न व ३) साधे किंवा खळखांबे=आतासारखे प्रचलित एक दिवसाचे लग्न यांमध्ये होत असत. न्हाण्याचे लग्नात वरमाता, वराच्या चुलत्या, आत्या, मावशा, माम्या यांना वधूपक्षाकडील महिला उटण्याने उष्णोदकाने अंघोळ घालीत. सर्वांना साडी, चोळी देत. दुसऱ्या प्रकारच्या लग्नात वराकडील उपरोक्त महिलांच्या पायावर वधूपक्षाकडील महिला पाणी घालीत. दोन्ही प्रकारच्या लग्नांमध्ये वरपक्षाकडील महिलांच्या पत्रावळी रांगोळ्या-अगरबत्त्यांनी सजवित. जेवणात पंगतीमधील जेवणाबरोबरच कुरडया, पापड वगैरे वाढत, पानाचे नक्षीदार विडे देत आणि लग्न बिदा होते वेळी वरमाता व वरपक्षाकडील महिलांची वरामागोमाग वरात काढत. त्या वेळी परीट वेशीपर्यंत त्यांच्यासाठी पायघड्या घालत असे. आता या पहिल्या दोन्ही प्रकारच्या पद्धती बंद पडल्या आहेत.

ईर प्रथा - ही प्रथा आता लोप पावली असली तरी पूर्वी अस्तित्वात होती. ''ईर'' शब्द अहिराणी व वऱ्हाडी-खानदेशी भाषेतील असून त्याचा अर्थ 'वीर' असा आहे. 'ईर' बसविणे म्हणजे घराण्यातील मृत व्यक्तीचे (वीराचे) स्मारक उभारणे, तसेच 'ईर' काढणे म्हणजे मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ स्मारक समारंभ आयोजित करणे या अर्थी खानदेशात ''ईर'' ची प्रथा प्रचलित आहे.[६] वर्षातील ठरावीक दिवशी भगत त्याची पूजा करतात. ''ईर'' म्हणजे लहानसे स्मारकवजा देऊळ. हा भगत डफ व बासरीच्या वाद्यात घुमतो. लग्नकार्य असल्यास या ईर स्मारकाठिकाणी सन्मानार्थ ५ विडे व सुपाऱ्या ठेवतात. घराण्यातील पाच सवाष्णी पाया पडून विडे व सुपाऱ्या ठेवतात. पिळोदे बु.।। चा खुशाल बोवा, पाडळसेचा भिल्लडबोवा हे ''ईर'' चेच प्रकार होत. असे अनेक गावी ईर असतील.

देव्हारे - गावातील मूळ पूर्वजाचे (clan) वंशवृद्धीने जे खटले (= घराणी = families लेवा पाटीदार त्यास थळगे असे संबोधतात. हा शब्द बहुधा तट = शाखा याअर्थी वापरण्यात येतो.) पडतात. या खटल्यातील मूळ पुरुषाच्या नावे त्यास अमुक अमुक खटले असे संबोधले जाते. या खटल्याच्या घराण्याच्या मूळ व्यक्तीच्या नावे त्या घराण्यातील एका कुटुंबाच्या घरी त्या घराण्याचा देव्हारा असतो. त्यास 'देव' म्हणजे घराण्याचा देव असेही म्हणतात. हा 'ईर'चाच प्रकार मानता येईल. वर्षातून ठरावीक दिवशी या देव्हाऱ्याची कुळाचारानुसार विधिवत पूजा करतात. त्यास 'देव्हारा भरणे' असेही म्हणतात. खटल्यातील प्रत्येक मंगलकार्य, विवाहादी कार्य, कूळधर्म व कुळाचार पाळताना या देवाची प्रथम पूजा करण्याची प्रथा आहे.

अंत्यक्रिया (अंत्यविधी)[७] -

अंत्येष्टी - देहावसानसुद्धा एक शुद्धिसंस्कार आहे. अंत्य म्हणजे शेवटचा आणि

इष्टी म्हणजे यज्ञ! या यज्ञामध्ये हविर्धव्य म्हणजे स्वत: मृत यजमानच असतो. यजमानाच्या मुलाने किंवा बांधवांनी त्यांची आहुती देण्याचा विधी म्हणजेच अंत्येष्टी होय. यालाच पितृमेध असेही नाव आहे.

अंत्यक्रियेला संस्कृतात और्ध्वदेहिक म्हणतात. मृतास स्वर्ग मिळावा, यासाठी मरणोन्मुख व्यक्तीचे नातेवाईक **गीता** व धर्मग्रंथाचे पठन करतात. मनणोन्मुख व्यक्तीस जमिनीवर कांबळ अंथरून त्यावर निजवतात. मरणोन्मुखाच्या तोंडात गंगोदक व तुळशीपत्र घालतात. यास 'मांडी देणे' असे म्हणतात. सर्व नातेवाइकांना बोलवून घेतात. रात्री मृत्यू आल्यास दुसऱ्या दिवशी सकाळी अग्नी देतात. हिंदू धर्मशास्त्रात प्रेत स्मशानात नेण्याआधी मृताचे स्नान करणे अनिवार्य असते. **कात्यायनस्मृतीनुसार**

घृतेनाभ्यक्तमाप्लाव्य सवस्त्रमुपवितिनम्।
चन्दनोक्षितसर्वाङ्ग सुमनोभिर्विभूषितम्।।

(तूप लावून प्रेताला स्नान घालावे. वस्त्र व यज्ञोपवित द्यावे. सर्वांगी चंदन लावावे आणि फुलांनी सजवावे) असे सांगितले आहे.

प्रेत घरातून बाहेर काढण्यापासून या क्रियेचा प्रारंभ होतो. प्रेतवाहनासाठी प्रयोगकार शिबिका सांगतात. शिबिका म्हणजे पालखी होय. सध्या प्रेत पालखीऐवजी तिरडीवरून नेतात. प्रेताची गरम पाण्याने अंघोळ घातल्यावर त्यास नवीन कपडे परिधान करून ते तिरडीवर उताणे निजवितात. सुवासिनी मरण पावल्यास तिला हळद व कुंकू वाहतात. मृताचे तोंड उघडे ठेवून बाकीचे शरीर शुभ्रवस्त्राने गुंडाळतात. मृताच्या तोंडात मोती, तुळशीपत्र आणि मृत व्यक्ती पुरुष असेल व त्याची पत्नी जिवंत असेल तर तिचे मंगळसूत्र तोडून त्या मंगळसूत्रातील एक सोन्याचा, पोवळ्याचा मणी अन्यथा सोन्याचा तुकडा घालतात. नूतन विधवेच्या बांगड्या फोडतात, कुंकू पुसतात. प्रेतास पुष्पमाला व पुष्पांजली अर्पण करून नमस्कार करतात व प्रेत स्मशानाकडे नेण्यासाठी उचलतात. प्रेताचे डोके समोरच्या बाजूस करून 'राम नाम सत्य आहे' च्या उद्घोषात स्मशानात नेतात. तिरडीच्या चार वाहकांना 'खांदे' असे म्हणतात. (मृताला खांदा देतात म्हणून त्यांना खांदे असे म्हणतात). हे खांदे मृताचे जवळचे भाऊबंद व जावई असतात. तिरडीसमोर प्रेतदहनासाठी गोवरीचा विस्तव मातीच्या कलशातून तिकाटण्यावर ठेवून ज्येष्ठ पुत्र अथवा उत्तराधिकारी प्रेतयात्रेपुढे चालतो. स्मशानात प्रवेश करण्याआधी तिरडी खाली ठेवतात, खांदे पालट करतात व मृताचे पाय पुढे करून स्मशानात प्रवेश करतात. शमीच्या डहाळ्याने चितेसाठी जागा स्वच्छ करून, दर्भाने उदक शिंपडून भूमिप्रार्थना व स्थळशुद्धी करतात. त्रिकोणाकृती मातीचा स्पंडिल म्हणजे ओटा करून विधिपूर्वक क्रव्याद गृहयाग्नी सिद्ध करतात. दर्भमुलाने चितास्थानाच्या उत्तर, दक्षिण व मध्यभागी अनुक्रमे यम, काळ व मृत्यू नावाच्या तिघा दहनपतींकरिता प्रत्येकी एक अशा तीन रेषा ओढून त्यावर पैसे व तीळ ठेवतात. यानंतर लाकडांची चिता रचून तिच्यावर प्रेत

दक्षिणेकडे तोंड करून ठेवतात. घरून शिजवून आणलेल्या भाताची शिते मृताच्या ओठावर ठेवतात. यानंतर तोंडात व दोन्ही नाकपुड्यांत, डोळ्यांत व कानांत तुपाचे थेंब टाकतात. मृताच्या अंगास तूप चोपडतात. आलेली सर्व माणसे उजव्या हाताच्या अंगठ्याने मृताच्या तोंडात उदक धार (जलांजली) सोडतात. मोघे मिळाल्यास समंत्रक दहन करताना दोन समिधा घेऊन त्यांनी अग्नी, काम, लोक व अनुमती या चार मुख्य देवता आणि प्रेत या सर्वांना (सर्वांच्यासाठी वा नावे) प्रेताच्या छातीवर तुपाची आहुती देतात. यानंतर सातूच्या पिठाचे पाच घारगे करून त्यास दहीमिश्रित तूप लावून प्रेताच्या तोंडावर, मस्तकावर, छातीवर व दोन बाहूंवर प्रत्येकी एक ठेवून ज्येष्ठ मुलगा वा उत्तराधिकारी मंत्राग्नी देतो. प्रयोगकारांनुसार ''पुसः शिरोदेशे स्त्रियाः पाददेशऽग्निं प्रज्वाल्य'' असे म्हटले असल्याने पुरुषाच्या प्रेतास मस्तकाकडून व स्त्रीच्या प्रेतास पायाकडून अग्नी देतात. ज्वालाग्नी भडकल्यावर उत्तराधिकारी स्नान करतो व ओल्या अधोवस्त्रानिशी प्रेताच्या पायाशी उभा राहून पाण्याने भरलेले मडके स्वतःच्या खांद्यावर घेतो, वकऱ्या (शोककर्ता) 'अश्मा' ने त्या मडक्यास भोक पाडतो व उत्तराधिकारी मागे न पाहता मडक्यातील पाणी सांडत चितेभोवती डावीकडून उजवीकडे अशा तीन प्रदक्षिणा पूर्ण केल्यावर प्रेताच्या पायाच्या बाजूकडे मडके मागच्या मागे टाकून फोडतो व तोंडावर तळहात मारून शंखध्वनी (बोंबा) करतो. मृताच्या आवडीच्या व वापराच्या वस्तू, काठी, चष्मा, वहाणा, व्यसन असल्यास ती वस्तू हे सर्व चितेत टाकतात. प्रेताचे डोके (कवटी) फुटल्यावर अंत्येष्टीची क्रिया करणाऱ्यांसह उपस्थित सर्व जण स्नान करतात. दर्भावर अश्मा ठेवून त्यास अपसव्याने तिलांजली देतात. हा अश्मा मृताचा प्रतिनिधी म्हणून सर्व अंत्यसंस्कार होईपर्यंत काळजीपूर्वक सांभाळण्यात येतो. घरात ज्या ठिकाणी मृत्यू झाला असेल; त्या ठिकाणी दिवा लावून ठेवतात. अश्मा सांभाळण्याऱ्या शोककर्त्यास वकऱ्या असे म्हणतात.

दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी मृताचा मुलगा व काही आप्तेष्ट स्मशानात जाऊन रक्षा व अस्थी गोळा करून आणतात व कोणाचा हात लागणार नाही, अशी ठिकाणी बांधून ठेवतात.

लेवा पाटीदार हे वैदिक व पौराणिक असे दोन्ही विधी करणारे असल्याने बहुधा मृतदेहाचे दहन करतात. तथापि, यांच्यातील सत्पंथीय व महानुभाव पंथीय लोक पंथाचरणानुसार दफनविधी करत असत. आता दहनविधीही करू लागले आहेत. लहान मूल वारल्यास मात्र दफनविधीच करतात. कान टोचण्याआधी मुलगा वारल्यास त्यास मुंजा म्हणतात.

तिसऱ्या दिवशी खांदे उतरविण्याचा लौकिक विधी करतात. तेव्हा ज्यांनी प्रेताला खांदा दिला असेल त्यांच्यासाठी हा विधी असून त्यात कडूलिंबाच्या झुपकेदार डहाळीवर गोमूत्र शिंपडून त्या डहाळीचे तीन-तीन फटकारे खांदे देणाऱ्यांच्या डोक्यावर मारतात. त्या वेळी बुजूर्ग काहीतरी पुटपुटतात. बहुधा, स्मशानातील इडा-पिडा, भूत, बाधा, इ.

होऊ नये म्हणून असे करत असावे. त्या दिवशी खांदे व जवळच्या उपस्थित भाऊबंदांसाठी स्वयंपाक करतात. तिसऱ्या दिवसापासून नवव्या दिवसापर्यंत नातेवाईक, मित्रपरिवार व संबंधी लोक 'दारावर' येतात. म्हणजे मृताचा उत्तराधिकारी व कुटुंबीयांचे सांत्वन (condolence) करण्यासाठी येत असतात. पहिल्या दिवसापासून नवव्या दिवसापर्यंत भाऊबंद आळीपाळीने मृताच्या कुटुंबीयांचा स्वयंपाक करून आणतात, हे लेवा पाटीदारांचे खास वैशिष्ट्य सांगता येईल.

दहाव्या दिवशी तीर्थक्षेत्री, नदीकाठी किंवा मंदिरामागे समंत्रक पिंडदान व क्षौर करतात. पिंडाला कावळा शिवला म्हणजे मृताची काहीही इच्छा अपुरी राहिली नाही, असे समजण्ययात येते. कावळा शिवला नाही तरी मृताच्या अपूर्ण इच्छांबाबत संकल्प करतात. या दिवसांनंतर केव्हाही अस्थी व रक्षा विसर्जन करतात. अश्मासही नदीत टाकून येतात. अकराव्या दिवशी मृताच्या घरी सुतकातील सर्व कपडे, भांडी इ. धुऊन घरातील सर्व जण पंचगव्य घेतात व शांती करतात. या दिवशी एकोद्दिष्ट श्राद्ध करतात. मृताला उद्देशून एका पिंडाने हे श्राद्ध करतात. सुतक फिटल्यानंतर करावयाची १६ मासिक श्राद्धेही अकराव्या किंवा बाराव्या दिवशी करतात. मृताला पितृलोक प्राप्त होण्यासाठी बाराव्या दिवशी सपिंड श्राद्ध करतात. वास्तविक, हे श्राद्ध वर्षअखेरीस करावयाचे असते. परंतु, घरात मंगलकार्ये करण्यास अडथळा येऊ नये म्हणून ते बाराव्या दिवशीच करतात. अकराव्या-बाराव्या दिवसांच्या श्राद्धानंतर पुरोहिताद्वारे समंत्रक गंध मोकळा करतात. म्हणजे सुतक फिटले, असे मानतात. तेराव्या दिवशी मुख्य शोककर्ता घरातील सर्वांचे क्षेम राहावे, याकरिता पुरोहिताकरवी शांती करून मृताचे श्राद्ध करतो. त्यात ११ पितरांना व वकऱ्यास शांतिस्तव जेवू घालतात आणि ज्ञातीबांधव व इष्टमित्रांना उत्तरक्रियेच्या जेवणास बोलावतात.

आजकालच्या धावत्या जगात १३ दिवस अंत्येष्टी विधीसाठी घालवणे जड जात असल्यामुळे अडचणी उद्‌भवत असल्यास पाच दिवसांत अंत्येष्टी विधी आटोपण्याकडे कल दिसून येतो आणि त्यात काही गैर नाही, असे अंत्येष्टीवर अभ्यास करणारे प्राचार्य वाय. जी. पाटील यांचे मत त्यांनी आपल्या पुस्तकात प्रकट केले आहे.

लेवा पाटीदार वर्षातून किमान साडेतीन वर्षश्राद्धे करतात. पितृपक्षातील महालय एक, तिथीनुसार येणारे वार्षिक श्राद्ध दुसरे (त्यास लेवा पाटीदार पळ्ली तिथ असे संबोधतात). अक्षयतृतीयेला घागर भरण्याच्या विधीत तिसरे! या तिन्ही वेळी पितरांस बोलावून शांतिप्रीत्यर्थ जेवू घालतात. तद्वतच मकरसंक्रांतीच्या दिवशी अर्धे श्राद्ध म्हणजे त्या दिवशी फक्त तूपभात आग्यारीवर टाकतात. या दिवशी पितरांस जेवणास बोलावत नाही.

सवाष्ण महिलेस मृत्यू आल्यास अविधवा नवमीस सवाष्ण महिलेस पितरीण म्हणून बोलावून श्राद्ध करतात. तिला गोड जेवणाने तृप्त करतात व खणा-नारळाने ओटी

भरतात. या विधीमागे मृत सधवेला सद्‌गती मिळावी, हाच हेतू असतो. हे व्रत त्या सधवेचा पती जिवंत असेपर्यंत करतात. याशिवाय, घरातील कुमार अथवा कुमारिका विशेषकरून कुमारिका बालपणीच मृत्यू पावली असल्यास भाद्रपद वद्य पंचमीला 'कारी पचव' नामक श्राद्धविधी करतात. त्यात मृत झालेल्या कुमारिकेस सद्‌गती व शांती मिळावी म्हणून पाच कुमारिकांना गोडधोड जेवण देतात. त्याआधी मृत कुमारिकेस आवाहन करून गौघास काढतात. हा गौघास गायीस खाऊ घालतात. हा भरणीश्राद्धाचाच प्रकार असावा.

शिक्षण प्रसाराबरोबर विधी व संस्कार पार पाडताना आपण काही बाबतीत अतिरेक तर करीत नाही ना? याचे भान ठेवणे गरजेचे आहे. जिवंतपणी वृद्ध मात्यापित्यांना घराबाहेर हाकलणारे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणारे या समाजात कमी नाहीत. हेच महाभाग आईवडील वारल्यानंतर पितृदोष घालविण्यासाठी वेगवेगळ्या शांती, पूजा, त्रिपिंडी, नारायण नागबली, काळसर्पपूजा, इ. साठी हजारो रुपये खर्च करतात. आपण सुशिक्षित आहोत, याचेही भान ठेवावे. एका पाहणीत असे आढळून आले आहे की, अशा कर्मकांडांवर लेवा पाटीदार खूप पैसे उधळतो. आपण ग्रॅज्युएट, पोस्टग्रॅज्युएट, डॉक्टर, इंजिनीअर इ. असे उच्चशिक्षित होऊनही पुरोहितांसारख्या अर्धवट शिकलेल्यांद्वारे लुटले जातो, याचे वैषम्य वाटते. जो एसएससी नापास झाल्याने व त्यामुळे पुढील शिक्षणाच्या वाटा बंद झाल्याने काही श्लोक, मंत्र पठण करून पौरोहित्य पत्करतो तो आपल्याला अक्षरशः लुटतो. तो काही साधू वा ऋषी नसतो. काही वर्षांत तो डॉक्टर-इंजिनीअरपेक्षाही मोठा होतो. यात त्याचा दोष नाही. तो त्याचा व्यवसाय आहे. परंतु, आपण त्याच्या किती आहारी जावे, हे आपण ठरवावे. त्यापेक्षा आईवडील जिवंत असताना त्यांना सुखासमाधानात मरू द्या म्हणजे त्यांचे शाप तुम्हास लागणार नाहीत. लग्नाआधीही अमूकअमूक ग्रहशांती करावी लागेल, त्यासाठी इतका इतका खर्च येईल, असे सांगणारे भट खानदेशात कमी नाहीत. तेच आपणास लुटून पुन्हा वर आपल्या बावळटपणाला हसतात. कोणताच ग्रह, देवता या वाईट करीत नाहीत. त्यांना वेठीस धरून कर्मकांड करणे योग्य नाही. बरे हे कर्मकांड करवून घेणारे ब्राह्मण तरी शुद्ध असतात काय? बऱ्याच पुरोहित व मोघ्यांना शुद्ध मंत्र, स्तोत्रे व त्यांचे नीट उच्चारही जमत नाहीत. अशा स्थितीत कार्य करणारा व करवून घेणाऱ्यासही पातक लागते. पण, लक्षात कोण घेतो?

प्रकरण ६ - तळटिपा

१. विधी आणि संस्कारांबाबतची यादी डॉ. कि. का. चौधरी यांच्या ''विधी आणि संस्कार'' **महाराष्ट्र**, मार्ग पब्लिकेशन्स, १९८५, पृ. ७९-८२ यातून घेतली आहे.

२. आर. ई. एन्थोवेन, **कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट** (पुनर्मुद्रित), खंड २, १९७५,

पृ. १३७.

३. डॉ. कि. का. चौधरी, ''विधी आणि संस्कार'' **महाराष्ट्र,** मार्ग पब्लिकेशन्स, पूर्वोक्त, पृ. ८०.

४. महादेवशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ३, पृ. ८३.

५. गुजरातेत विवाहनिर्बंधाची मजल जात अथवा पोटजातीपर्यंतच थांबलेली नाही. अजूनही ही फूट चालूच आहे. प्रत्येक पोटजातीत खेड्यांचे अथवा शहरांचे विवाहसंघ स्थापन झाले आहेत. त्यास 'एकदा' किंवा 'गोल' असे म्हणतात. प्रत्येक गोलातील मुलीचे त्याच गोलातील मुलाबरोबर लग्न केले पाहिजे, असा निर्बंध आहे. शहरातील लोक खेड्यात मुली द्यावयास तयार नसत; परंतु खेड्यातील मुली करण्यास हरकत नसे आणि खेड्यातील लोकही मुलीस सुख लाभावे म्हणून शहरात देत. याचा परिणाम असा झाला की, खेड्यातील मुलास मुली मिळेनाशा झाल्या. या गोष्टीस आळा घालण्यासाठी 'गोल' निर्माण करण्यात आले. पण, हे गोलही स्थिर स्वरूपाचे नाहीत. खेड्यांच्या संख्येत बदल होत राहतो. एखाद्या मुलास त्याच्या गोलात मुलगी न मिळाल्यास दुसऱ्या गोलातील पंचांच्या परवानगीने त्या दुसऱ्या गोलातील मुलीशी लग्न करता येते. असे झाल्यास गोलातील खेड्यांची संख्या बदलते. यातूनच पंच दंड वसूल करू लागले.

६. डी. जी. पाटील, ''खानदेशातील ईर प्रथा'' **संशोधक,** मार्च-जून १९९९, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, पृ. ३१.

७. अधिक माहितीस्तव डॉ. वाय. जी. पाटील यांचे **लेवा पाटीदार समाज : अंत्येष्टीविधी संस्करण** हे पुस्तक पाहावे.

✧✦✧

प्रकरण ७

उपासना पंथ

लेवा पाटीदार समाजात प्रामुख्याने वारकरी, महानुभाव, सत्पंथ व स्वामिनारायण हे चार पंथ आढळून येतात. या पंथांवरूनसुद्धा लेवा पाटीदारांच्या स्थलांतरणाचा ढोबळमानाने क्रम लावता येतो. लेवा पाटीदार समाज खानदेश-वऱ्हाडात आला त्या वेळी सुरुवातीच्या आस्थलांतरींचा गुजरातेतील वैष्णव संप्रदाय असावा. खानदेश-वऱ्हाडातील सुरुवातीच्या स्थलांतराच्या वेळेस किंवा त्यानंतरच्या कालावधीत संत नामदेव (इ. स. १२७० ते १३५०) व संत ज्ञानेश्वर (इ. स. १२७५ ते १२९६) या वारकरी संप्रदायाच्या संतांमुळे सारा महाराष्ट्र वारकरीमय झालेला होता. प्रत्येक समाजास भक्तिमार्गासाठी पंथ लागतोच. महाराष्ट्रातील बहुजन समाजाने वारकरी संप्रदायाचा स्वीकार केलेला होताच. काळाच्या ओघाबरोबर चालायचे तर बहुजन समाजाचा संप्रदाय स्वीकारणे लेवा पाटीदारांना अपरिहार्य होते. म्हणून इकडे आल्यावर बहुतांश लेवा पाटीदारांनी वारकरी संप्रदायाचा स्वीकार केला. या संतद्वयींच्या किंचित आधी चक्रधर स्वामींनी (इ. स. ११९४ ते १२७४) महानुभाव पंथाचा या भागात जोरदार प्रचार व प्रसार केलेला असल्यामुळे काही लेवा पाटीदारांनीही महानुभाव पंथाचा स्वीकार केलेला आहे. सत्पंथाचा प्रसार इकडचा नसून सत्पंथी लोक सत्पंथ स्थापनेच्या नंतर खानदेश-वऱ्हाडात आलेले असावेत म्हणजेच ते पंधराव्या शतकाच्या शेवटी खानदेश-वऱ्हाडात आले असावेत. स्वामिनारायण पंथाचा उगमच मुळी २००-२२५ वर्षांपूर्वी झालेला असल्याने लेवा पाटीदारांमधील इकडे स्थायिक झालेल्यांपैकी काही वारकरी वा वैष्णव पंथियांनी एकोणिसाव्या शतकात या पंथाचा स्वीकार केलेला दिसतो.

वारकरी संप्रदाय[१]

महाराष्ट्रातील सर्व धार्मिक भक्तिसंप्रदायांमध्ये या वैष्णव वारकरी संप्रदायाला मध्यवर्ती स्थान आहे. याचे पंढरपूरचा विठोबा हे उपास्यदैवत. तेराव्या शतकात महाराष्ट्रात प्रसार पावलेल्या या संप्रदायाची सुरुवात इ.स.च्या सहाव्या शतकापासून झाली असावी, असे तज्ज्ञांचे मत आहे.[२] पुंडलिक, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, गोरा कुंभार, नरहरी सोनार, कान्होपात्रा, जनाबाई इ. सारख्या समाजातील सर्व स्तरांमधील संतश्रेष्ठींनी आपल्या वाङ्मयाच्या रूपाने महाराष्ट्राला गौरव प्राप्त करून देण्याबरोबर मोठे संतपीठ व ज्ञानपीठ उपलब्ध करून दिले आहे. अशा या सर्वसमावेशक पंथाच्या प्रवाहाबरोबर नव्याने आलेला व भक्तिमार्ग पंथ शोधणारा लेवा पाटीदार समाज न आला तरच नवल! वारी करणारा तो वारकरी व हे लोक आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या पंढरपूरच्या वाऱ्या करतात. गळ्यात तुळशीची माळ घालतात म्हणून त्यांना 'वारकरी', 'माळकरी' असेही म्हणतात. जो पंढरपूरला जातो तो पंढरपूरचा वारकरी व त्याच्या उपासनेचा मार्ग तो वारकरी पंथ! लेवा पाटीदार समाजास या गंगेच्या प्रवाहात आणले ते ज्ञानेश्वर भगिनी नाथपंथी मुक्ताबाई व तिचा हटयोगी शिष्य चांगदेव यांनी! या दोन्ही गुरुशिष्याचे वास्तव्य तर लेवा गणप्रदेशाच्या केंद्रस्थानी-मेहूण, कोथळी व चांगदेव येथे.

संप्रदायाच्या परंपरेप्रमाणे वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानदेवाने घातला, असे मानले जात असले तरी त्याचा अर्थ या संप्रदायाचा प्रवर्तक ज्ञानदेव नव्हता, तर त्याने संप्रदायास वैचारिक अधिष्ठान देऊन व्यवस्थित स्वरूप दिले. ज्ञानदेवाच्या आधीदेखील हा संप्रदाय अस्तित्वात होता. पुंडलिकास संप्रदायाचा प्रवर्तक मानले जाते. पुंडलिकाचा काळ इ.स. ५०० च्या पुढे असावा, असे अभ्यासकांचे मत आहे. वारकऱ्यांचे नामदेव महाराजांनी पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

आजी महासुखे सृष्टी भरली भाग्यवंती। जाळीसे विकृती पापतापा।।
चालिले देखोनी वैष्णव जगजेठी। उभविती वैकुंठी गुढीया देव।।
आले आले रे हरीचे डिंगर। वीर वारीकर पंढरीचे।।
ज्यांची चरणधुळी उधळे गगनपंथे। ब्रह्मादिकां तेथे जाली दाटी।।
एकमेका पुढे लवविती माथे। म्हणती आम्हां ते लागो रज।।
भक्तिप्रेम भाव भरलें ज्यांच्या अंगी। नाचती हरिरंगी नेणती लाजू।।

तुकाराम महाराजांनी या भक्तिसंप्रदायाचे मंदिर कसे उभारले गेले, याचे अतिशय सुंदर वर्णन संत बहिणाबाईच्या अभंगात आहे.

संतकृपा झाली। इमारत फळा आली।।
ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिले देवालयां।।
नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार।।

जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।
यात ज्ञानदेवे रचिला पायाचा अर्थ तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दिले असा आहे.
संप्रदायाच्या इतिहासाचे स्थूलमानाने खालीलप्रमाणे विभाग पाडता येतील.

१) पुंडलिक ते ज्ञानदेवापर्यंतचा काळ,
२) ज्ञानदेव ते नामदेव यांचा काळ,
३) भानुदास व एकनाथ यांचा काळ,
४) तुकारामाचा काळ आणि
५) तुकारामानंतरचा काळ.

यापैकी पुंडलिकाच्या काळासंबंधी फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. पुंडलिक हा मातृपितृभक्त, तद्वतच विठ्ठलाचा भक्तश्रेष्ठ होता व त्याच्या भावार्थासाठी पांडुरंग त्याच्याकडे येऊन विटेवर उभा राहिला, ही परंपरेने चालत आलेली कथा ज्ञानदेवादी सर्व संतांनी वर्णिली आहे. तुकोबा म्हणतात -

''पुंडलीक भक्तराजा। तेणे साधियले काज। वैकुंठीचे निज। परब्रह्म आणिले।।''

पुंडलिकाची कथा **पद्मपुराण** व **स्कंदपुराणात** आहे.

ज्ञानेश्वरपूर्वकालात विठोबाचे असंख्य भक्त होते, मंदिर होते, विठ्ठलाची पूजाअर्चाही व्यवस्थित चालू होती. वारीची पद्धती कोणी घालून दिली, हे ज्ञात नाही. तरी ज्ञानेश्वरपूर्वकाळीही अव्याहत सुरू होती. इ.स.च्या सहाव्या शतकात विठ्ठलाची प्रसिद्धी झाली होती. त्याआधी दोनतीनशे वर्षे देवस्थान असावे व पुंडलिकाचा काळ त्याच्याही आधीचा असावा. पंढरपुराबाबत दोन शिलालेख व एक ताम्रपट उपलब्ध आहे. ताम्रपट अविधेय या राष्ट्रकूट नृपतीच्या काळातील असून अविधेयाचा काळ इ. स. ४४० ते ४५५ असा आहे. ताम्रपटात अविधेयाच्या पंधराव्या शासन वर्षाचा उल्लेख असल्याने ताम्रपट ४५५ चा आहे, हे सिद्ध होते. त्यानुसार, पांडरंग पल्ली (काही संशोधक यास पंढरपूर मानतात) गावाजवळच्या काम्यक व जाऊली (यास संशोधक सातार्‍याजवळील जावळी मानतात) भार्गवगोत्री शंभूनामक ब्राह्मणास वैश्वदेव व अग्निहोत्र अनुष्ठानाकरिता दान देण्याचा उद्देश आहे. यात जाऊली म्हणजे जावळी गृहीत धरल्यास पांडरंग पल्ली म्हणजे पंढरपूर मानता येणार नाही. पंढरपूर देवळातील दोन शिलालेखांमधील एक शिलालेख शके ११११ (इ. स. ११८९) व दुसरा बाराव्या, तेराव्या शतकातील आहे. यातील पहिल्या शिलालेखानुसार विठ्ठल मंदिर विठ्ठलाने शके ११११ म्हणजे इ. स. ११८९ मध्ये बांधले, असा उल्लेख आहे.[३] म्हणजे पूर्वीच्या ठिकाणीच सध्याचे मंदिर उभारले गेले आहे, असा अर्थ लावता येईल. दुसर्‍या बाराव्या, तेराव्या शतकातील शिलालेखात देणगीदारांची नावे व स्थळे नमूद केली आहेत.

ज्ञानदेव व नामदेव यांचा काळ - तेराव्या शतकाचा उत्तरार्ध व चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध हा यांचा काळ वारकरी संप्रदायाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. त्या वेळी वारकऱ्यांचे स्फूर्तिस्थान असलेल्या ज्ञानदेवाच्या प्रभावळीत गोरोबा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत, जनाबाई, चोखामेळा इत्यादी संत मंडळी होती. या सर्व अठरापगड जातींच्या संतांनी आपल्या अभंगवाणीने विठ्ठलमहिमा गाजविला.

ज्ञानदेवांचे स्फूर्तिस्थान मात्र नाथसंप्रदाय होते. आपली सांप्रदायिक परंपरा त्यांनी **ज्ञानेश्वरी**च्या शेवटी दिली आहे (१८-१७५२-५९). नाथसंप्रदाय योगमार्गाचाच पुरस्कर्ता असून त्यात भक्तिमार्गाला स्थान नव्हते. निवृत्तीनाथ हे नाथसंप्रदायी व ज्ञानदेवांचे गरू! या दोघांनी योगसाधनेबरोबर भक्तिसाधनेलाही महत्त्व दिले. ज्ञानदेवांची सांप्रदायिक कामगिरी चतुर्विध होती, १) सुसंगत व तर्कशुद्ध तत्त्वज्ञान दिले. २) सूक्ष्म नीतिमीमांसा केली. ३) धार्मिक अनुभवांचे मूल्यमापन केले आणि ४) लोकजागृती करून संप्रदायाची प्रवाही व अकृत्रिम संघटना बांधली.

ज्ञानदेव व नामदेव हे एकमेकांचे जिवलग सखे होते. दोघांचा संगम ज्ञानभक्तीचा ठरला. नामदेवाने कीर्तनभक्ती करून महाराष्ट्रात विठ्ठलभक्तीचा खूप प्रसार केला व पुढे गुजरात, राजस्थान व पंजाब या प्रदेशालाही तो केला. देवाच्या दरबारात कोणी उच्च नाही, कोणी नीच नाही; तर हृदयात भक्तिप्रेम करणारे सर्वच सारखे व देवाचे लाडके, असे निःसंदिग्ध शब्दांत त्यांनी सांगितले. त्यामुळे पंढरपूर हे सार्वजनिक क्षेत्र ठरले. **ज्ञानेश्वरी** ही आधुनिक गीता ठरली.

भानुदास व एकनाथ यांचा काळ - ज्ञानदेव निर्वाणानंतर सुमारे १०० वर्षांनी भानुदास (एकनाथांचे पणजे) पैठण येथे जन्मले. ते सूर्योपासक असले तरी घराण्यात विठ्ठलभक्त परंपरा होती. विजयनगर सम्राटाने हलविलेली पांडुरंगाची मूर्ती भानुदासांनी भक्तिसाधनेने ती पंढरपूरला परत आणल्याची कथा आहे. पुढे एकनाथ महाराजांनी भागवत धर्माच्या मंदिराला **भागवताच्या** रूपाने भक्कम आधार दिला. एकनाथाच्या काळी (शके १४५५ ते १५२१=इ. स. १५३३ ते १५९९) महाराष्ट्रात स्वराज्याचा लोप झाला होता. महाराष्ट्र मुसलमानी सत्तेच्या टाचेखाली गेला होता. हिंदू धर्मसंस्कृतीची दैना उडाली. नाथांचे पैठण निजामशहाच्या अमलाखाली होते. तीर्थस्थानांचा विध्वंस करणे, मंदिरे पाडून त्या जागी मशिदी उभारणे, यात्रोत्सवांवर प्रतिबंध यात मुस्लिम सत्ताधिकाऱ्यांना आनंद वाटे. हिंदू समाजाची अंतर्गत परिस्थिती ही पार बिघडली होती. लोक धर्मतत्त्व विसरून क्षुद्र देवतांच्या नादी लागले होते. धार्मिक पुढारी ब्राह्मणवर्गही कमालीचा स्वार्थी व पोटार्थी बनला होता. अशा बिकट परिस्थितीला तोंड देऊन एकनाथांनी वारकरी संप्रदायाच्या पुनरुज्जीवनाचे कार्य केले. हे शैथिल्य व दैन्य एकनाथांनी नाहीसे केले, देवधर्म अभिमानाचा उल्हास संचरविला आणि त्यातूनच पुढे ५० वर्षांनी स्वराज्यस्थापनेच्या

प्रयत्नांचे फळ येऊन त्याचा परिपाक महाराष्ट्रातील जनतेस भोगावयास मिळाला.

लेवा पाटीदारांचे शेवटचे मोठे स्थलांतर झाले ते क्रूरकर्मा महमद बेगडाच्या कारकिर्दीत! त्यानंतर लगेच ४०/५० वर्षांनंतरच्या काळात एकनाथांचे धर्मसंप्रदाय जागृतीचे म्हणजे वारकरी संप्रदायातून विठ्ठल भक्तिमार्ग प्रसार व संप्रदायबांधणीचे कार्य जोमात सुरू होते आणि याच काळात लेवा पाटीदार समाजाने अनिवार्यतेने इकडे आल्यावर मोठ्या प्रमाणावर वारकरी संप्रदायाचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला.

एकनाथांचा वाङ्मयसंभार प्रचंड आहे. **एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणीस्वयंवर, हस्तामलक, शुकाष्टक, स्वात्मसुख, आनंद-लहरी, गीतासार, चतुःश्लोकी भागवत,** इ. ग्रंथांशिवाय त्यांनी भारुडे व अभंगे रचिली. या सर्व ग्रंथांतून नाथांनी भागवत धर्माचे सुबोध स्पष्टीकरण निरनिराळ्या पद्धतीने केले आहे.

मराठी भाषेला तत्कालीन परिस्थिती अतिशय प्रतिकूल होती. राजभाषा फार्सी आणि ग्रंथभाषा संस्कृत होती. पंडित मराठी भाषेचा उपहास करीत. या सर्व परिस्थितीत नाथांनी मोठ्या धैर्याने मराठीचाच पुरस्कार केला. लोकजागृतीच्या कार्यासाठी कीर्तन हे अत्यंत प्रभावी साधन, हे जाणून नाथांनी कीर्तनाच्या मर्यादा घालून दिल्या. त्यांनी स्वतःही कीर्तनांद्वारे भक्तिमार्गाचा व पंढरीच्या वारीचा जोरदार प्रचार केला. पंढरीच्या वाटेबाबत ते सांगतात - ''करा करा लागपाठ। धरा पंढरीची वाट।। पुंडलिकाची पेठ। सोपी आहे सर्वांशी।।'' आणि फलस्वरूप लेवा पाटीदार समाजास आयता उपासना संप्रदाय मिळाला. कीर्तनातून मनःशांतीबरोबर करमणूक आणि मराठी भाषाही लोकसंपर्कासाठी हाती लागली. यातूनच प्रस्तुत लेखकाच्या मते लेवा पाटीदारांची अपभ्रंश मराठी बोलीभाषा तथा वऱ्हाडी-खानदेशी बोलीभाषा किंवा लेवा गणबोली निर्माण झाली असावी.

तुकारामाचा काळ (१६०८-१६४९) - एकनाथांच्या कैलासवासानंतर नऊ वर्षांनीच तुकाराममहाराज देहूस जन्मले, असे श्री. बहिरट-भालेराव म्हणतात.[४] - भागवत धर्म मंदिराची इमारत श्री तुकोबारूपी कळस चढल्यामुळे पूर्ण झाली. श्री तुकोबानंतर त्यांच्याइतका उंचीचा संत थोर पुरुष वारकरी संप्रदायात झाला नाही. म्हणून त्यांना कळसाची उपमा यथार्थतेने साजते. ''तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।'' असे तुकोबांचेच पुरेपूर आत्मप्रत्ययाचे उद्गार आहेत. त्यात गर्व नसून स्वाभिमान व स्वानंदाची परिसीमा आहे. ती त्यांच्या इतर अभंगवाणीतूनही दृगोचर होते.

तुकोबांनी परमार्थाच्या शिकवणीबरोबर व्यवहारधर्मही सांगितला. त्यांनी आपले सर्व सामर्थ्य धर्मक्षेत्रात भक्तिधर्माचे साम्राज्य रूढ करण्यासाठी खर्च केले. भक्तिप्रेमाच्या आड येणाऱ्या सर्व वेडगळ व भ्रामक समजुतींचे उच्चाटन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांना अधोगतीला जाणाऱ्या जनांचा कळवळा होता. हे सारे लोक विठ्ठलाच्या साम्राज्यात येतील, तरच स्वानंदाचे धनी होतील, अशी त्यांची धारणा होती. विठ्ठल, पंढरपूर,

नाममाहात्म्य, कीर्तनरंग, वारी, भक्तिरहस्य, आत्मसुख, इ. विषयांवर तुकोबांचे विपुल अभंग आहेत. हे अभंग स्पष्ट, निःसंदिग्ध व रोकड्या प्रचीतीचे आहेत. वारकरी संप्रदाय मंदिराच्या कळसावर तुकोबाची गाथा विराजमान आहे.

तुकारामोत्तर काळ - तुकोबांच्या निर्वाणानंतर संप्रदाय चालविण्याच्या योग्यतेचे जे काही पुरुष निर्माण झाले; त्यामध्ये निळोबांचे नाव अग्रगण्य आहे. निळोबा हेसुद्धा साक्षात्कारी संत होते. ते स्वतःला तुकोबांचे अनुग्रहीत म्हणवीत. त्यांची अभंगवाणी प्रौढ व रसाळ आहे. त्यांनी वारकरी संप्रदायाची धुरा समर्थपणे वाहिली. निळोबांनंतरच्या ३०० वर्षांत वारकरी संप्रदायामध्ये शंकरस्वामी शिरूरकर, मल्लापा वासकर, हैबतराव बाबा, सखाराममहाराज अमळनेरकर, वासुदेव देहूकर, चातुर्भास्येमहाराज, साखरेमहाराज, विष्णुबुवा जोग, दादामहाराज सातारकर, केशवराव देशमुख, व्यंकट स्वामी, लोहिया महाराज, प्रा. शं. वा. दांडेकर, इ. अनेक कर्तबगार संत व कीर्तनकार मंडळी होऊन गेली. त्या सर्वांनी कीर्तन, प्रवचन, संघटना यांच्याद्वारे व शिष्यपरंपरा निर्माण करून तिच्याद्वारे संप्रदायाच्या कार्याचा प्रवाह आजतागायत चालू ठेवला.

लेवा गणप्रदेशातील वारकरी संप्रदाय[५] - सर्वच संतांनी ज्या तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्रतिपादन केले आहे; ते महाराष्ट्रातील भाविक जनतेचे, सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व लाभलेले पवित्र तीर्थयात्रा व तीर्थक्षेत्रे अवलोकन करून तीर्थयात्रेनंतर ते पंढरपुरात आले तेव्हा ज्ञानेश्वरांनी पंढरपूरचे वर्णन केले-बाप तीर्थ हे पंढरी। भूवैकुंठ महिवरी। भक्त पुंडलिकाचे द्वारी। कर कटावरी राहिला।। तर संत नामदेव म्हणतात-धन्य धन्य पांडुरंग। सकळ दोषा होय भंग। पूर्वज उद्धरती सांग। पंढरपूर देखलिया-सर्व संत पंढरपूरला जा, तेथे चंद्रभागेचे स्नान करा, विठ्ठलाचे दर्शन घ्या व हरिकथा ऐका. मानवजीवनाचा त्यामुळे उद्धार होतो, असे वर्णन करतात. आषाढ शुद्ध एकादशीला पंढरपूरची यात्रा भरते. सर्व भाविक वारकरी पंढरपूरला जाण्याची तयारी करतात. खुद्द ज्ञानेश्वरमहाराजांच्या पालखीचे प्रस्थान आळंदीहून पंढरपूरकडे ज्येष्ठ अष्टमीला होते. असंख्य वारकरी ज्ञानोबांच्या पालखीबरोबर असतात. पुण्याहून ते थेट पंढरपूर येईपर्यंत ज्ञानोबा-तुकोबाच्या गजरात दिंडीचा आनंद लुटतात. खुद्द ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''माझे मनीची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।।''.

आमच्याकडे (लेवा गणप्रदेशात) सुद्धा विठोबा वासकरांचा अनुग्रह लाभलेले श्री. ह. भ. प. गुरुवर्य झेंडूजी महाराज बेळीकर (खानदेश) यांना वारकरी पंथ-दिंडीची गादी परंपरा प्राप्त झाली. यात खानदेशातील (लेवा गणप्रदेशातील बहुतकरून) जवळजवळ १५० गावे व खानदेश-वऱ्हाड सीमेवरील आणि वऱ्हाडातील ७२ गावे यांचा समावेश होतो. झेंडूजी महाराजांनी आषाढी-कार्तिकी, पैठण, निवृत्तीनाथ (त्र्यंबकेश्वर) यांच्या पायी पायी दिंडीच्या माध्यमातून तीर्थयात्रा केल्या व भक्तिमार्गाचे प्रबोधन केले. त्यांच्यानंतर गु. धनजी महाराज, गु. नागोजी महाराज, तोताराम महाराज, झेंडूजी महाराज आसोदेकर

व त्यांच्या नंतर राजाराम महाराज शास्त्री त्या गादीवर विराजमान आहेत. ते आषाढी-कार्तिकी पैठण-त्र्यंबकेश्वर वारीचा वसा चालवून दिंडी माध्यमातून भक्तिमार्गाचा प्रचार करीत आहेत, तसेच खानदेश दिंडीचे महान वारकरी ह. भ. प. वै. जगन्नाथ महाराज, अंजाळेकर हे वयोवृद्ध, तपस्वी पायी यात्रा करणारे एकमेव वारकरी! याच शाखेतील झेंडूजी महाराज बेळीकरांचा अनुग्रह संपादन केलेले वऱ्हाड भागातील वै. मुकुंद महाराज एणगावकर होत. झेंडूजी महाराज बेळीकरांनी वऱ्हाडची जी ७२ गावे या गादीत समाविष्ट आहेत त्यातील वारकरी दिंडी संप्रदाय प्रचार कार्याचा भार मुकुंद महाराज एणगावकर यांच्यावर दिंडी अधिष्ठान या रूपाने सोपविला. मुकुंद महाराजांनी प्रचार कार्याला सुरुवात १८८५ मध्ये केली. ते १९१५ मध्ये वैकुंठवासी झाल्यानंतर मोतीराम महाराजांचे चुलतभाऊ मोतीराम महाराज एणगावकरांनी हा भार १९४७ पर्यंत स्वीकारला. मोतीराम महाराजांचे स्मारक शेलापूर येथे आहे. त्यानंतर, निवडणूक पद्धतीने हा वारसा ह. भ. प. वै. काशिराम महाराज आडविहीरकर यांच्याकडे दिला. त्यान्वये आला. तो त्यांनी १९९७ पर्यंत सांभाळला. त्या वर्षी त्यांनी समाधी घेतल्यानंतर या गादीवर ह. भ. प. यादव महाराज विराजमान आहेत.

वारकरी संप्रदायाची कास धरून चालणारा पापभीरू लेवा पाटीदार तग धरून राहिला. या समाजात कीर्तनकारांची वाण नाही. त्यातील मागील काही वर्षांतील काही लेवा पाटीदार कीर्तनकारांची प्रतीकात्मक यादी खालीलप्रमाणे सांगता येईल.[६] - श्री. जगन्नाथ महाराज अंजाळेकर यांनी पुढीलप्रमाणे यादी सांगितली. - झेंडूजी महाराज बेळीकर, नानामहाराज वरणगावकर, दत्तुबुवा रावेरकर, भानुदासबुवा चांगदेवकर, मुकुंदाबुवा एणगावकर, धनाजी महाराज भुसावळकर, नागोजी महाराज तळवेलकर, तोतारामबुवा गाडेगावकर (मुख्य गादीचे मालक), झेंडूजी बुवा आसोदेकर (मालक-खानदेशवाडा), लक्ष्मणबुवा कुंडगावकर, पंढरीबुवा सांगवीकर, डिगंबरबुवा चिनावलकर, विठ्ठलबुवा हंबर्डीकर, जगन्नाथबुवा अंजाळेकर, श्रीधरबुवा शेळगावकर, राजाबुवा शेळगावकर, सोनुबुवा न्हावीकर, नारायणबुवा फैजपूरकर, मुकुंदबुवा असोदेकर, अरुणबुवा बोरखेडेकर, रामचंद्रबुवा सांगवीकर, मोतीराम बुवा पिळोदेकर, नारायणबुवा न्हावीकर, सोनूबुवा पाडळसेकर, बारसुबुवा तळवेलकर, सोनुबुवा तपतकठोरेकर, प्रभाकरबुवा मस्कावदकर, काशिरामबुवा मस्कावदकर, नारायणबुवा डोंगरकठोरेकर, उखर्डूबुवा थोरगव्हाणकर, तुकडूमास्तर विरोदेकर, धनाबुवा बामणोदकर, तोतारामबुवा खिरोदेकर, तुकारामबुवा गाडेगावकर, हरीबुवा एदलाबादकर, हरीबुवा आचेगावकर, बारसुबुवा सुसरीकर, संजयबुवा सुसरीकर, किशोर महाराज तळवेलकर, सुरेशबुवा पिंपळगावकर, सुरेश महाराज तळवेलकर, माधवबुवा पिळोदेकर, नामदेवबुवा पिळोदेकर, बाबुरावबुवा भालोदकर, लक्ष्मणबुवा गाडेगावकर, सुखदेवबुवा गाळेकर, चितोडेकर महाराज, वासुदेवशास्त्री एणगावकर, नंदकिशोरबुवा एणगावकर, शरद महाराज शेलापूरकर, पुरुषोत्तमबुवा शेलापूरकर,

यादवमहाराज आडविहीरकर, सोपानमहाराज खरबडीकर, मुकुंदमहाराज एणगावकर, तोतारामहाराज गाडेगावकर, मोतीराममहाराज एणगावकर, काशिराममहाराज आडविहीरकर, निवृत्तीमहाराज शेलगावकर, खुशालबुवा दुधलगावकर, शंकरबुवा डिघीकर, निवृत्तीबुवा एणगावकर, गोविंदबुवा एणगावकर, कोल्हे महाराज फैजपूरकर, विठ्ठल महाराज मस्कावदकर (ह. मु. उल्हासनगर) इत्यादी. झेंडूजीमहाराज बेळीकर (इ. स. १८३३-१८७८) यांनी इ. स. १८५७-५८ च्या सुमारास या गणप्रदेशासाठी म्हणजे या भागातून पैठण, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, देहू, आळंदी येथे वाऱ्या करण्यासाठी खानदेश गादीची स्थापना केली. खानदेश गादीत त्या वेळी खानदेशातील गिरणेच्या पूर्वेकडील भागातील लेवा पाटीदारांची १५० गावे व त्याला लागून असलेल्या वऱ्हाडातील लेवा पाटीदारांची ७२ गावे अशी एकूण २२२ गावे समाविष्ट होती. झेंडूजीमहाराजांनी पंढरपूर व पैठणला वारकऱ्यांची राहण्याची व जेवणाची सोय व्हावी म्हणून दोन्ही ठिकाणी खानदेश वाडे बांधले. झेंडूजी महाराज इ. स. १८७८ च्या मार्गशीर्ष वद्य द्वितीयेस ब्रह्मस्वरूपी लीन झाले. त्याआधी त्यांनी खानदेश गादीची धुरा धनजी महाराज भुसावळकरांकडे सोपविली. खानदेश गादीतील दिंडीच्या कार्यक्षेत्राचा व्याप खूपच वाढल्याने आणि वारकरी संप्रदायाचा प्रसार सुलभ व्हावा म्हणून खानदेश गादी दिंडीचे विभाजन करण्यात आले व धनजी महाराजांनी मलकापूरकडील भागासाठी मुकुंदमहाराज एणगावकर यांची नेमणूक केली. इ.स. १९०२ मध्ये धनजीमहाराज भुसावळकरांनी नागोजीमहाराज तळवेलकरांना आपला उत्तराधिकारी नेमून ते ब्रह्मस्वरूपी लीन झाले. १९०५ मध्ये तोतारामहाराज गाडेगावकर हे गादीप्रमुख झाले. १९३३ मध्ये झेंडूजीमहाराज असोदेकर हे खानदेश गादीवर आले. १९७२ मध्ये ते ब्रह्मस्वरूपी लीन झाल्यावर राजाराम महाराज शेळगावकर हे खानदेश गादीवर आले. हे काम भरतमहाराज नाशिराबादकर हे पाहतात. या वारकरी संप्रदायातील पंढरीच्या श्री विठ्ठल उपासकांनी लेवा पाटीदार समाजास विठ्ठलभक्तिमार्गात कीर्तन, भजनांद्वारे मार्गदर्शन, मदत व सहकार्य केले. विठ्ठलमहाराज मस्कावदकर मुंबईसारख्या शहरांतून विठ्ठलभक्ती प्रसारकार्य करीत आहेत. ते दरवर्षी मुंबई परिसरातील हजारो भाविकांना सेवाभावी वृत्तीने पंढरपूर आणि महाराष्ट्रातील व बाहेरील तीर्थस्थानांना नेत असतात. तुकारामबीजेच्या दिवशी देहू येथे लाखो वारकरी जनसमुदायासमोर दरवर्षीचा कीर्तनाच्या मान विठ्ठलमहाराजांना मिळाला आहे.

तत्त्वज्ञान - ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकोबाची अभंगगाथा ही वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी होय. ज्ञानेश्वर अग्रणी असल्याने इतर सर्व संतांनी त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून ग्रंथरचना केली आहे. त्यांनी ज्ञानदेवांचेच तात्त्विक विचार आपापल्या भाषेत निरनिराळ्या स्वरूपात सांगितले आहे. शुद्ध भक्तिमार्गी पंथ असल्याने भक्ती हा मूळ सिद्धांत म्हणून स्वीकारून या संप्रदायाने आपल्या तत्त्वज्ञानाची

उभारणी केली आहे.

वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात परमात्मा, जीव, मानवी जीवन, जगत आदींबाबतचे सखोल तत्त्वज्ञान ओतप्रोत भरलेले आहे. त्याचे हे पीठ नसल्यामुळे येथे देता येणे शक्य नाही.

सांप्रदायिक आचार - अधिष्ठात्री देवता विठ्ठल असून ती विश्वालाच गवसणी घालणारी परम प्रेमदेवता आहे. मातापिता, बंधुभगिनी, ही सर्व प्रेमाची, जिव्हाळ्याची नाती तिच्या ठिकाणी एकवटली आहेत. असा विठ्ठल युगे अठ्ठावीस विटेवरी उभा आहे. तो भक्तांची वाट पाहत असतो. त्यांच्या आलिंगनासाठी उतावीळ असतो. 'रामकृष्णहरी' हा संप्रदायाचा मंत्र आहे. हृदय रमविणारा राम, आकर्षित करणारा कृष्ण व विठ्ठलरूप परमात्मा म्हणजे हरी. या मंत्राला सोवळे-ओवळे, स्थळ-काळ, जाती-वित्त-कुळ, यांचा प्रतिबंध नाही. तुळशीची माळ, गोपीचंदनाच्या मुद्रा व बुक्का आणि खांद्यावर पताका ही वारकऱ्याची बोधचिन्हे होत. तुळशीमाळ ज्येष्ठ वारकऱ्याकडून घ्यायची असते. विधी साधाच. गुरू माळ देताना शिष्याकडून पुढील नियम पाळण्याची शपथ घेतो. (१) सत्यवचन, (२) परस्त्री मातेसमान मानणे, (३) अपराधाबाबत भगवंताने क्षमा करण्याबाबत कळकळीची प्रार्थना करणे, (४) निरामिष आहार सेवन करणे, (५) वर्षातून एकदा तरी पंढरी, आळंदी वारी करणे, एकादशी व्रत करणे, (६) रोज नेमाने रामकृष्णहरीचा १०८ वेळा माळजप करणे, (७) **ज्ञानेश्वरीच्या** ओव्यांचे वाचन करणे व **हरिपाठाचे** अभंग म्हणणे आणि (८) प्रपंचातील वाट्यास आलेली नित्यकर्मे श्री विठ्ठलस्मरणात प्रामाणिकपणे पार पाडणे.

आषाढी-कार्तिकी एकादशीस पंढरपूर व आळंदीस वाऱ्या येतात. दोन वाऱ्या वारकरी संप्रदायात चालतात. पंढरीची सर्वात महत्त्वाची वारी म्हणजे आषाढ शुद्ध एकादशी होय. आळंदीच्या वारीचा दिवस कार्तिक वद्य एकादशी हा आहे. आषाढी वारीत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीहून पंढरीस येते. आषाढी-कार्तिकी या वाऱ्यांना प्रत्येक फडावर दशमी ते पौर्णिमा भजने व कीर्तने होतात. रात्री हरिजागर असतो. पौर्णिमेस सर्व दिंड्या पंढरपुरापासून जवळ असणाऱ्या गोपाळपुरी येथे जातात. तेथे काल्याच्या लाह्या एकमेका मुखी घालून वारीची सांगता करतात. या वेळी स्पृश्यास्पृश्य भेद मानला जात नाही. आळंदीच्या वारीस पंढरीहून नामदेव, पुंडलिक इ. संतांच्या पालख्या व दिंड्या जातात. भजन, कीर्तन, हरिजागर सोहळे होतात. कार्तिक वद्य त्रयोदशी ज्ञानेश्वराचा समाधिदिन. तेथे अभंग म्हणतात. काला होतो. देहू, पैठण, त्र्यंबकेश्वर, सासवड इ. संतक्षेत्री त्या त्या संतांच्या पुण्यतिथींना नियमाने जाणारे वारकरी आहेत. पंढरपूर आणि त्र्यंबकेश्वर येथे लेवा पाटीदार वारकऱ्यांनी बांधलेल्या धर्मशाळा असून त्यास वाडे असे म्हणतात.

वारकरी संप्रदायाचे उपसंप्रदाय -

(१) चैतन्य संप्रदाय : यात रामकृष्णहरी षडाक्षरी मंत्र असून दुसऱ्याचा 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा द्वादशाक्षरी मंत्र आहे.
(२) स्वरूप संप्रदाय : याचा 'श्रीराम जय राम जय जय राम' हा त्रयोदशाक्षरी मंत्र आहे.
(३) आनंद संप्रदाय : याचा 'श्रीराम' हा त्र्यक्षरी किंवा 'राम' हा द्वक्षरी मंत्र आहे.
(४) प्रकाश संप्रदाय : याचा 'ॐ नमो नारायणाय' हा मंत्र आहे.

वारकरी संप्रदाय हा मानवी जीवनात ईश्वरी प्रेमाची अनुभूती घेऊन जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध करण्याचा भक्ती हा सुलभ मार्ग सांगणारा संप्रदाय आहे. हिंदू धर्माच्या निरनिराळ्या अवस्थांतून परिणाम होत होत तो प्रस्तुत अवस्थेला आला आहे. भागवत धर्माला आलेले ते एक मधुर व परिपक्व फळ आहे.

लेवा पाटीदारांची वस्ती असलेले एकही गाव असे नसेल की, तेथे वारकरी संप्रदायाची परंपरा नाही. सकाळी मोठ्या पहाटे उठल्यावर प्रातर्विधी-स्नान आटोपून शेतात जाण्याआधी हा शेतकरीवर्ग मंदिरात जाऊन दोन-चार भजने म्हणतोच. रात्री झोपण्याआधीही तो भजन-कीर्तनास जात असतो. टाळमृदंगाच्या सुरात संध्याकाळी अभंग कानावर पडले नाहीत तर ते गाव लेवा पाटीदारांचे नाही, असे समजावे. 'तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा. सर्व सुखाचे आगर, बाप रखुमा देवीवर' म्हटल्याशिवाय लेवा शेतकऱ्यास झोपच येणार नाही.

महानुभाव संप्रदाय[७]

महाराष्ट्रात महानुभाव संप्रदायाचा उदय तेराव्या शतकात झाला. या पंथाचा संस्थापक चक्रधर स्वामी होय. तो भडोचच्या विशाल देवनामक गुजराती ब्राह्मण प्रधानाचा पुत्र होय. महाराष्ट्रात मुसलमानी आक्रमणांनी निर्माण केलेली सामाजिक, राजकीय व धार्मिक दुरवस्था, त्याचप्रमाणे वैदिक कर्मकांड व चातुर्वर्ण्य व्यवस्थांविरुद्ध सर्वत्र उफाळून येत असलेला सामाजिक व धार्मिक असंतोष या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महानुभाव पंथाचा उदय व प्रसार झाला. वारकरी संप्रदाय जसा वैष्णव आहे, तसाच हाही आहे. मात्र, दोन्ही संप्रदायांचे तत्त्वज्ञान, उपास्यदैवत व उपासनामार्ग भिन्नभिन्न आहेत.

गोविंदप्रभूंकडून चक्रधराने शक्तिस्वीकार करून शिष्यत्व पत्करले. सालबर्डीला १२ वर्षे राहिल्यानंतर भारतभ्रमण केले. या संचारात त्यांस अनेक शिष्य-शिष्यिणी मिळाल्या. त्यांना त्याने स्वतःच्या चिंतनातून मिळालेले तत्त्वज्ञान उपदेशिले व विशिष्ट आचारधर्मही सांगितला. तेथूनच या पंथाचा आरंभ झाला. डॉ. वि. भि. कोलते म्हणतात "परमेश्वराच्या वास्तव स्वरूपाची ओळख करून देऊन जनतेला मुक्तीचा खरा मार्ग दाखविणे, हे चक्रधरांचे अवतारकार्य म्हणून थोडक्यात सांगता येईल."

शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञान विवर्तवादावर व रामानुजाचे विशिष्टाद्वैत परिणामवादावर आधारलेले होते. चक्रधराच्या तत्त्वज्ञानाची पायरी याच्या पुढची आहे. तो ईश्वराला पूर्णपणे

स्वतंत्र मानतो आणि अद्वैत किंवा विशिष्टाद्वैत खोटे ठरवून द्वैताचा पूर्ण स्वीकार करतो.

चक्रधराचा परमगुरू चांगदेव राऊळ. याला प्रत्यक्ष दत्तात्रेयाने वाघाच्या रूपाने एक पंजा मस्तकावर ठेवून पर आणि अवर शक्ती प्रदान करून बोध दिला, अशी संप्रदायात कथा आहे. त्यामुळे दत्तात्रेयाला महानुभाव पंथाचे आदिकारण मानतात. चांगदेव राऊळाचा परमशिष्य ऋद्धिपूरचा गुंडम राऊळ अथवा गोविंदप्रभू आणि गुंडम राऊळचा शिष्य चक्रधर अशी परंपरा आहे. चक्रधर हा चांगदेव राऊळचा अवतार आहे, असे संप्रदायात मानले जाते. संप्रदायाबद्दल ''या मार्गासी श्री दत्तात्रय प्रभू आदिकारण'' असे चक्रधर म्हणतो.

महानुभाव लोक द्वैती तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते आहेत, हे वर आलेच आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश या गौण देवता मानल्या आहेत. त्यांच्या कल्पनेनुसार दत्तात्रेय, श्रीकृष्ण, चक्रपाणी (चांगदेव राऊळ), गोविंद प्रभू (गुंडम राऊळ) आणि चक्रधर हे ईश्वराचे पाच अवतार होत. यांनाच संप्रदायात पंचकृष्ण असे मानतात. श्रीकृष्ण हे या पंथाचे आदिदैवत, परब्रह्माचा साक्षात अवतार! महानुभाव संप्रदायाचे जीवन तत्त्वज्ञान थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे -

तत्त्वज्ञान - चक्रधराने जीव, प्रपंच, देवता व परमेश्वर हे पदार्थ स्वतंत्र व अनादीअनंत मानले आहेत. यापैकी प्रत्येक पदार्थ इतरांपासून स्वतंत्र असून त्या दोहोंचे ऐक्य कधीच होत नाही. या चक्रधराच्या भूमिकेमुळे त्याला पूर्ण द्वैत असे म्हणणे योग्य ठरेल.

जीव - जीव हा बद्धमुक्त आहे. तो अनादिकालापासून अविद्येने बद्ध असला तरी मुक्त होऊ शकतो व ईश्वराचा आनंद उपभोगू शकतो. ईश्वराच्या ठिकाणी विरुद्ध धार्मित्व आहे, म्हणून तो अविक्रीय असून सर्वकर्ता आहे. निर्गुण असून माया संबंधाने सगुण होतो. जीवाचे ध्येय अच्युतपदप्राप्ती हे आहे. ती प्राप्ती म्हणजे ईश्वर सान्निध्यात जीवाने अखंड आनंद उपभोगीत चिरकाल राहणे.

प्रपंच - याचे कारणप्रपंच व कार्यप्रपंच असे भेद असून पहिला अव्यक्त आणि नित्य व दुसरा व्यक्त आणि अनित्य असतो.

देवता - जीवाप्रमाणे देवताही जातिस्वरूपाने एक, पण वास्तवात अनेक आहेत. विविध देवतांच्या उपासना, तीर्थयात्रा, स्पृश्यास्पृश्यता, हिंसा, स्त्रियांचा विटाळशीपणातील विटाळ मानणे या गोष्टी संप्रदायाने निषिद्ध मानल्या आहेत. महानुभावांच्या मंदिरात मूर्तीच्या ऐवजी चौरस ओट्यांना पवित्र मानून त्याची पूजा करतात. त्याचप्रमाणे साधक भगवी वस्त्रे टाकून 'शाह पोष' म्हणून काळ्या रंगाचा पोशाख करतात. प्रेताचे दहन न करता पुरतात. या सर्व पद्धतीमुळे इस्लामी राजवटीत महानुभाव पंथियांचा धार्मिक छळ होत नसे.

परमेश्वर - महानुभावांनुसार ईश्वर मुख्य व ब्रह्म गौण आहे. ब्रह्म ईश्वराच्या

अंतर्गत असणारा भाग आहे. ईश्वर हा अनादी, नित्य, अव्यक्त, स्वयंप्रकाशी, सर्वव्यापक, ज्ञानमय, आनंदमय, सर्वसाक्षी व सर्वकर्ता आहे. जीवाच्या उद्धारासाठी तो (१) अवरदृश्यावतार, (२) परदृश्यावतार व (३) अभयदृश्यावतार घेतो. दत्तात्रय, श्रीकृष्ण व चक्रधर हे अभयदृश्यावतार आहेत.

चक्रधरस्वामीच्या वचनांचा संग्रह असलेला केसोवासकृत **सिद्धान्त पाठ सूत्र** हा या पंथाचा प्रमाण ग्रंथ आहे. याखेरीज **भगवद्‌गीता** आणि **भागवत** यांनाही प्रमाण ग्रंथ म्हणून पंथात मानले जाते. याखेरीज चक्रधरांचे चरित्र असलेला **लीळाचरित्र** (म्हइंभट), **दृष्टान्त पाठ** (केशीराज वास), **शिशुपालवध** (भास्कर भट्ट बोरीकर), **एकादश स्कंध, ज्ञान प्रबोध** आणि श्रीकृष्ण लीलेचे वर्णन असलेला **ढवळे** (महादंबा) हे या पंथाचे धार्मिक ग्रंथ आहेत. त्याशिवाय **उद्धवगीता** (भास्कर भट्ट बोरीकर), **वच्छाहरण** (दामोदर पंडित), **रुक्मिणी स्वयंवर** (नरेंद्र), **सैह्याद्र वर्णन** (राघोवा पाध्ये तथा रवळोव्यास), **ऋद्धिपूरवर्णन** (नारायण बास), **चक्रधर सिद्ध** (गोपाळ पंडित, अनरज बास) व **स्मृतिस्थळ** (नागदेवाचार्य) हेसुद्धा धार्मिक ग्रंथ अनेक शतके अंधारातच होते आणि याचे कारण म्हणजे हे सर्व धार्मिक वाङ्मय महानुभाव पंथाच्या आचार्यांनी परकीय आक्रमणापासून सुरक्षित राहावे म्हणून गुप्त लिपीत लिहून ठेवले होते. परंतु, अलीकडील काळात डॉ. वि. भि. कोलते, नेने, य. खु. देशपांडे या महानुभाव पंथाच्या अभ्यासकांनी केलेल्या अपार प्रयत्नांमुळे हे वाङ्मय मराठी वाचकांना उपलब्ध झाले आहे.

महानुभाव संप्रदायाच्या प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये फलटण, माहूर आणि ऋद्धिपूर यांचा समावेश होतो. सातारा जिल्ह्यातील फलटण हे चांगदेव राऊळचे जन्मस्थान, माहूर वास्तव्यस्थान व ऋद्धिपूर ही कर्मभूमी म्हणून ही तिन्ही ठिकाणे संप्रदायाची प्रमुख क्षेत्रे मानली जातात. याखेरीज पैठण, डोंबेगाव आणि बेलापूर या गावांचाही चक्रधराच्या जीवनाशी संबंध आला होता म्हणून याही स्थानांची पंथांच्या प्रमुख तीर्थक्षेत्रांत गणना होते.

महानुभावांच्या साती ग्रंथमालिकेतील शेवटचा व महत्त्वाचा प्रख्यात काव्य ग्रंथ **ऋद्धिपूरवर्णन** (रचना शके १४१८=इ. स. १४९६) याचा कर्ता पंडित नारायण व्यास बहाळिये हा बहाळचा होता. बहाळ गाव चाळीसगाव तालुक्यात आहे. आध्यात्मिक ज्ञानप्रसारासाठी भ्रमण करताना चक्रधरस्वामी या भागातील भडगाव, वाघळी, वडजी, कनाशी, सोयगाव, पाचोरा, चांगदेव व जाळीचा देव या ठिकाणी राहिले.

भालोद, सांगवी, फैजपूर, सावदा, बामणोद, वाघळी, कनाशी या लेवा पाटीदार राहत असलेल्या गावांमध्ये महानुभाव मठ आहेत. भालोद मठ व ओटा पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे.

श्रीक्षेत्र जाळीचा देव, पोस्ट मढ, ता. चिखली, जि. बुलडाणा येथे महानुभावांचे तीर्थक्षेत्र असून बहुतेक महानुभाव पंथीय लेवा पाटीदार आपला कूळधर्म आचरणासाठी

येथे जात असतात. काही विधी हरताळे (ता. मुक्ताईनगर) येथेही पार पाडतात.

स्वामिनारायण संप्रदाय -

हा वैष्णव भक्तिपंथ उद्धव संप्रदाय नावानेही ओळखला जातो. याची स्थापना सहजानंद यांनी केली. त्यांचे जन्मनाव हरिकृष्ण असे होते. त्यांचा जन्म इ. स. १७८१ मध्ये अयोध्येजवळील छवैया येथे झाला. वडिलांचे नाव धर्मदेव व आईचे नाव भक्तिदेवी होते. लहानपणीच गृहत्याग करून ते परमार्थाकडे वळले. भारतभ्रमणात त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रात तपस्या केली व एका योग्याकडून योगसाधना पूर्ण करून (शिकून) घेतली. सात वर्षे भ्रमंती केल्यावर हरिकृष्ण सौराष्ट्रातील लोज गावी आला. तेथे रामानंदी संप्रदायाचे मठपती रामानंद स्वामींनी त्याचे नाव सहजानंद असे ठेवून आपल्या शिष्यवर्गाचे प्राचार्यपद दिले. गुरूंच्या निर्वाणसमयी सहजानंदानी त्यांच्याकडून दोन आशीर्वाद मागितले - (१) मला माझी सर्व जबाबदारी परमेश्वरावर लक्ष केंद्रित करून पार पाडता यावी व (२) आश्रमातले किंवा मठातले सेवक व साधक यांची सुखदुःखे मग ती प्रारब्धाने आलेली असोत किंवा अकस्मात आलेली असोत, ती मी सोसावी म्हणजे त्यांच्या जीवनाशी मला समरस होता येईल. रामानंदांच्या मृत्यूनंतर सहजानंद रामानंदी संप्रदायाच्या गादीवर बसले.

त्या वेळी रामानंदी संप्रदाय शिथिल व विस्कळीत झाला होता. संप्रदायाच्या मठांमध्ये सर्वत्र बजबजपुरी माजली होती. साधू बेदरकार व मुजोर बनले होते. विषयभोगांना चटावले होते. अन्नसत्रात जेवायचे, सुस्त पडून राहायचे व एकमेकांचे हेवेदावे करायचे. सहजानंदांनी संप्रदायाला नवे वळण द्यायचे ठरवले. शिष्यांना पंथात सामील करून घेताना कठोर नियम घातले. दीक्षा घेणाऱ्या शिष्याला दीक्षित होण्यापूर्वी पाच प्रतिज्ञा घ्याव्या लागत - (१) चोरी करणार नाही, (२) व्यभिचार करणार नाही, (३) मांसाहार करणार नाही, (४) दारू पिणार नाही, (५) निचाकडून भिक्षा घेणार नाही.

पंथातील साधूंनाही नियम घालण्यात आले. गटाने राहावे, मुक्काम स्थळी भागवत कथा निरूपण करावे, हिवाळ्यात निरनिराळ्या दिशांना संचारावे, अनवाणी चालावे, पाने, फुले, फळे, तोडू नयेत. विना अंथरुणाने जमिनीवर झोपावे, अध्यात्मचिंतनात निमग्न असावे.

स्वामिनारायण हा या पंथाचा आराध्यदेव! सहजानंदांनी कच्छ, गुजरात व काठेवाडात संप्रदाय वाढवून त्यास शिस्त लावली. सहजानंदांचे व्यक्तिमत्त्व तेजस्वी असल्याने लोक त्यांना उद्धवाचा अवतारही मानतात व या पंथास उद्धव संप्रदाय असेही म्हणतात. सहजानंदांच्या नावावर अनेक चमत्कार प्रसिद्ध आहेत. सहजानंदांनी दाखविलेल्या चमत्कारामुळे जोगन बागीनामक कुख्यात दरोडेखोराने दरोडेखोरी सोडून तो सहजानंद स्वामींचा एकनिष्ठ सेवक बनला.

इ. स. १८३० मध्ये गदरा येथे सहजानंदांचा मृत्यू झाला. मिळालेल्या अपार

धनातून त्यांनी मठ व मंदिरे निर्माण केलीत. या पंथाचे कित्येक लाख अनुयायी झाले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे खोजा जातीच्या बहुसंख्य लोकांनी स्वामिनारायण पंथ स्वीकारून पंथास अपार धन दिले. मोम्ना कणबी, गवंडी, मोची हे बहुसंख्येने पंथाचे अनुयायी झालेले आहेत.

सुमारे १७५/२०० वर्षांपूर्वी सहजानंदांचा स्वामिनारायण संप्रदाय खानदेशात आला. न्हावी, सावदा, सातोद, कोळवद, सांगवी, कठोरा, हिंगोणे इ. ठिकाणी स्वामिनारायण पंथाचा प्रसार झाला असून तेथे स्वामिनारायण मंदिरे बांधण्यात आली आहेत. सावद्याचे स्वामिनारायण मंदिर १००/१२५ वर्षांपूर्वीचे असून मोठे आहे. या मंदिरात पापपुण्य दर्शविणारी सुंदर तैलचित्रे चितारली आहेत.

स्वामिनारायण पंथातल्या मठ, मंदिरांतली उपासना पुष्टीमार्गी पद्धतीने चालते. मात्र, संयमावर विशेष भर दिलेला असल्यामुळे पंथियांनी पुष्टीमार्गातला शृंगार वगळला आहे.

तत्त्वज्ञान - सर्वाविर्भावकारण अक्षराधिपती पुरुषोत्तम म्हणजेच स्वामिनारायण हा उपास्य होय. परब्रह्म श्रीकृष्ण हा क्षराक्षराहून पलीकडे आहे. अभीष्ट सिद्धीसाठी देवनिंदा, हिंसा यांचा बहिष्कार करून पुरुषोत्तमाला शरण जाणे हेच जीवाचे परम कर्तव्य होय. भगवंत उपासना हेच भक्तीचे सर्वश्रेष्ठ साधन होय. परमात्म्याशी समिपता हीच मुक्ती होय. निरातिशय परमानंदस्वरूप बनून देशकालातीत झाल्याशिवाय मुक्ती शक्य नाही. त्यासाठी भगवंताच्या स्वरूपात अखंड चित्तवृत्ती ठेवावी लागते. अनेक जन्मांचे सुकृत उदित झाले तरच जीवाची चित्तवृत्ती भगवंताच्या ठिकाणी स्थिर होऊ शकते.

उपास्य पुरुषोत्तम हा कारुण्य, सौशिल्य, वात्सल्य व औदार्य या गुणांचा पुतळा आहे. या पंथाचा संबंध विशिष्टाद्वैत मताशी आहे. म्हणून त्या मताचा या पंथाच्या तत्त्वज्ञानावर प्रभाव आहे. पुष्टीमार्गातील विलासीपणा कमी करून आणि इंद्रिय मनोनिग्रहावर भर देऊन सहजानंदांनी भक्तीचे निर्मळ स्वरूप प्रतिपादिले.

सहजानंदपूर्वकाळात सौराष्ट्रातील बेदिलीचा फायदा कोळी, वाघरी व काही लोक लुटमारीकरिता करीत. ते व्यसनाधीन झालेले होते. राजपूत लोकांमध्ये लहानपणीच मुलींना दुधाच्या भांड्यात बुडवून मारून टाकण्याचा रिवाज होता. त्यास मुलीला दूध पाजणे म्हणत. हे सर्व प्रकार बंद करावयास लावून सहजानंदांनी फार मोठी सामाजिक सेवा केली. स्वामिनारायण संप्रदायात समाजातील दलित, शोषित, पीडित, तिरस्कृत व बहिष्कृत लोकांचा भरणा मोठा असून पाटीदार व तत्सम बहुजनसमाजातील लोकांची संख्या जास्त आहे.

पंथाचे वाङ्मय - सहजानंद व त्यांच्या शिष्यपरंपरेतील नित्यानंद, मुक्तानंद, ब्रह्मानंद, निष्कुलानंद, प्रेमानंद व देवानंद या कवींचे ग्रंथ व हजारो पदे या पंथाचे वाङ्मय होय. **वचनामृत** हा या पंथाचा वेदतुल्य ग्रंथ. त्यात सहजानंदांची वचने आहेत. **शिक्षापत्री**

या ग्रंथात संप्रदायाची मार्गदर्शक सूत्रे आहेत. त्यामुळे अनुयायी याचे नित्यपाठ करतात. सहजानंदांच्या व्यक्तिमत्त्वाचे, चारित्र्याचे आणि उपदेशाचे सांरसवैस्य यात आहे.

प्रस्तुत पंथाचे साधू व ब्रह्मचारी असे दोन प्रकार आहेत. ते सफेद व लाल टिळा लावतात. भिक्षेत मिळालेले सर्व पदार्थ एकत्र करून खातात. शिखा-यज्ञोपवित धारण करतात. कमंडलू बाळगतात. गळ्यात तुळशीमाळा घालतात. स्त्रीसंभाषण व स्त्री-पुरुष यांना मंदिरात एकत्र येणे यास मनाई आहे. मृत्यूनंतर मृतास न्यायला खुद्द सहजानंद गोलोकातून येतात, अशी सांप्रदायिकांची श्रद्धा आहे. सहजानंद, बलराम व पुरुषोत्तम या तीन आचार्यांमुळे पंथाच्या तीन शाखा झाल्या आहेत. खानदेशात सहजानंद शाखेचे अनुयायी आहेत.

मंदिरे - ज्या गावात संप्रदायाचे लोक राहतात; तेथे स्वामिनारायणाचे एखादे मंदिर असतेच. गदरा, वडताल व अहमदाबाद येथील मंदिरे विशाल व उत्तुंग आहेत. या मंदिरांमध्ये लक्ष्मी-नारायण, राधा-कृष्ण, नर-नारायण, कृष्ण-बलदेव, सहजानंद, त्यांचे आईबाप आणि याशिवाय शिव, गणेश, सूर्य, हनुमान इ. देवतांच्या मूर्ती असतात. जळगाव जिल्ह्यात स्वामिनारायण पंथियांची सावदा, सातोद, कोळवद, सांगवी, डोंगरकठोरे, न्हावी इत्यादी ठिकाणी मंदिरे आहेत. त्यांचे मुख्य ठिकाण ते वडताल मानतात.

सत्पंथ संप्रदाय

हा गुजरातमधील प्रमुख उपासना पंथ महाराष्ट्रातील काही भागात आढळतो. इ. स. १४४९ मध्ये इमामशहानामक साधू इराणमधून गुजरातेत आला. हा या पंथाचा प्रवर्तक होय. शं वि. पाटील यांच्या मते इमामशहाचा जन्म सन १४५२ मध्ये (पण हे खरे वाटत नाही. काहींच्या मते त्याचा जन्म ८४४ हिजरी म्हणजे इ. स. १४३४ मध्ये झाला हे खरे वाटते). पंजाबात उंच मुलतान गावी झाला व त्याचे मूळ नाव सय्यद अब्दुल रहिम असे होते.८ गुजरातमध्ये मतियांमधील वैष्णव मतिया व पिराणा मतिया तद्वतच मोम्ना कणबी जे स्वत:स लेवा पाटीदार अथवा लेवा कणबी म्हणवून घेतात, सत्पंथी संप्रदायाचे अनुयायी आहेत.

पंथनिर्मितीबाबत अशी आख्यायिका सांगितली जाते की, सुमारे ५००-६०० वर्षांपूर्वी (बहुधा पंधराव्या शतकाच्या मध्यात) गुजरातमधून नियमित काशीस जाणाऱ्या लेवा कणब्यांचा मुक्काम एके दिवशी अहमदाबादच्या दक्षिणेस सुमारे १५-१६ कि. मी. वर असलेल्या गीरमथा गावी पडला. त्या वेळी इराणमधून आलेल्या इमामशहा या अवलियाचे वास्तव्य गीरमथा गावाजवळील एका टेकडीवर होते. या यात्रेकरूंच्या जत्थ्यास इमामशहाने सांगितले की, जर तुम्ही माझे ऐकले तर काशीला जाण्याचे श्रम न घेताच तुमचा हेतू येथल्या येथेच तडीला जाईल. कित्येकांनी त्याच्या म्हणण्याकडे लक्ष न देता काशीस चालते झाले. दुसरे कित्येक त्याच्यावर विश्वास ठेवून तेथेच राहिले. त्यांना काशीचे दर्शन, गंगेत स्नान व ब्राह्मणभोजनाचे श्रेय तेथल्या तेथे मिळाले. या चमत्काराचा

परिणाम होऊन त्यांनी इमामशहास आपला गुरू मानले. या संबंधाने दुसरी हकीकत सांगतात की, त्यांच्यावर जबरीने मुसलमान होण्याचे संकट आले होते, ते टाळण्यासाठी त्यांनी इमामशहाला आपला गुरू केले.[९] हे विधान सयुक्तिक व सत्य वाटते. कारण, इमामशहा येण्याआधी १४४२ मध्ये अहमदशहा सुलतान वारला. परंतु त्याने व त्याच्या नंतर येणाऱ्या सुलतानांनी विशेषकरून महमद बेगडा (क्रूरकर्मा सुलतान) याने हिंदूंच्या मनात मोठी दहशत निर्माण केली होती. सक्तीच्या धर्मांतरासाठी अनेकांना जीवे मारले, मंदिरे फोडली, मूर्तिभंजन केले, मालमत्ता लुटली, महिलांची अब्रू लुटली. त्यामुळे स्वधर्म वाचविणे, जीव वाचविणे तद्वतच मालमत्ता व महिला शीलधर्म वाचविण्यासाठी काही जणांनी इमामशहाचे अनुयायीत्व स्वीकारून हिंदू धर्म न सोडता धर्मांतराच्या कचाट्यातून सुटका करून घेतली. त्यांनी हिंदू राहून सत्पंथाचा स्वीकार केला व काही मुस्लिमसदृश रूढींचे पालन करू लागले. तथापि, हे लोक संपूर्ण शाकाहारी राहून कटाक्षाने मद्यपान टाळतात. अहमदाबाद व कच्छ भागात बहुतांश लोक लेवा कणबी असल्याने त्यांना सत्पंथाचा स्वीकार करावा लागला, असे दिसते. तथापि, त्यांनी केवळ धर्म वाचविला. तरीही क्रूरकर्मा महमद बेगडाच्या दहशतीमुळे त्यांनी आपले जीव वाचविण्यासाठी पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात खानदेश भागात स्थलांतर केलेच. त्यांना जर सुरक्षितता वाटली असती तर त्यांनी स्थलांतर केलेच नसते.

इमामशहाचे पाच मुख्य शिष्य होते. त्यांनीच पंथाचा प्रसार केला. त्यांची नावे अशी - (१) हजर बेग, (२) भाभाराम, (३) नागाकाका, (४) साराकाका, (५) जिजाबाई अथवा चिचीबाई (भाभारामाची बहीण).

इमामशाही पंथाची मुख्य गादी इराण येथे आहे. तिथे प्रतिवर्षी मोठा उरूस भरतो. इमामशहाचे शिष्य मुख्यत्वे ब्राह्मण, वाणी, लेवा कणबी, राजपूत हेच आहेत. इमामशाही शाखेच्या गादीवरील महंत ब्रह्मचारी असतो व तो लेवा पाटीदार असतो. सांप्रत खानदेशात लेवा पाटीदारांची वस्ती असून त्यातील काही सत्पंथाचे अनुयायी आहेत. फैजपूर (ता. यावल) येथे सत्पंथी लोकांचे मंदिर आहे. **भगवद्गीता, भागवत, रामायण** इ. ग्रंथ सत्पंथी लोक पवित्र मानतात. सत्पंथीय लोकांचा गुरुमंत्र शिवोऽहम (मी शंकर आहे) असा आहे व ते त्या मंत्राचा जप करतात. शंकराचार्यांनाही ते मानतात. मौजीबंधन, शिखासूत्र, चार वर्ण, चार आश्रम हे या पंथाला मान्य आहे. या पंथाचे बहुतेक सर्व अनुयायी हिंदूच आहेत. या संप्रदायाचे **सतवचन, ब्रह्मप्रकाश** इ. अनेक ग्रंथ आहेत.[१०] हे लोक **अथर्ववेदास** अनुसरत असून त्यावरून सत्य बोलणारे म्हणून सत्पंथी म्हणवितात.[११] ते पिराणा
अहमदाबाद, नवसारी व बऱ्हाणपूरच्या पिरांना भजत व तेथील यात्रा करीत. इमामशहाची धर्ममते ज्यात ग्रंथित केली आहेत, असा **शिक्षापत्री**नामक ग्रंथ त्यांचा पवित्र ग्रंथ होय. तो मुखोद्गत करणाऱ्यांना काका असे म्हणतात. विशिष्ट शाखेचे काका धर्मविधी

चालवितात. आता ब्राह्मण धर्मविधी चालवितात. पूर्वी ते प्रत्येक महिन्याचा शुद्ध द्वितीयेचा दिवस पवित्र मानत व हा दिवस शुक्रवारी आल्यास उपवास करत. पूर्वी ते मृतांना पुरत. आता बरेच सत्पंथी दहन करू लागले आहेत. इ. स. १८८० मध्ये गुजरातमधील निर्मलदासनामक साधूने सत्पंथियांना (मतिया व मोम्ना कणबींना) ते लेवा कणबी-पाटीदार असल्याचे बिंबवून त्यांचे काही मुसलमानसदृश विधी बंद करवून रामानंद तथा दादू पंथाचे अनुयायी बनविले आहे. खानदेशातही १९२२ मध्ये भोरगाव पंचायतने ११ कुटुंबांना जातिबहिष्कृत केले.[१२] तथापि, भोरगाव पंचायत सभेत अल्पसा दंड करून या पद्धती बंद करण्याचे सांगून जातीत सामावले.[१३]

चांगदेव-मुक्ताबाई मार्ग (नाथ संप्रदाय) - लेवा पाटीदारांचा उपरोक्त चार उपासना पंथांबरोबरच आणखी एक उपासना मार्ग दाखविता येईल आणि तो म्हणजे चांगदेव-मुक्ताबाईचा नाथ संप्रदायी उपासना मार्ग. या गुरुशिष्याच्या जोडीस अलग करता येणार नाही. दोघांची समाधीस्थानेही जवळजवळ एक कि.मी. अंतरावर. चांगदेवाचे स्थान चांगदेव गावी, तर मुक्ताबाईचे स्थान मेहूणला. म्हणून स्थाने चांगदेव मुक्ताबाई नावानेच प्रसिद्ध आहेत. बहुतेक वारकरी लेवा पाटीदार लोक पंढरपूर, पैठण, त्र्यंबकेश्वर, नेवासा, देहू, आळंदी येथे वारी करणे जमत नसल्यास चांगदेव-मुक्ताबाईस जातातच (वारी करतात.) हटयोगी चांगदेव व आत्मज्ञानी मुक्ताबाई या संतांची तपशीलवार माहिती याच ग्रंथातील **लेवा पाटीदारांचे तीर्थस्थान व पर्यटन केंद्र : चांगदेव-मुक्ताबाई**नामक प्रकरणात दिली आहे.

प्रकरण ७ - तळटिपा

१. वारकरी संप्रदायाच्या अधिक माहितीस्तव शं. वि. पाटील यांचे (१) **वारकरी पंथाची चैतन्य संप्रदाय परंपरा,** १९९२ व (२) **वारकरी पंथाचा इतिहास (कालसूचीसह)**, १९९५ (३) श्री. अ. कृ. नारखेडे यांचे **तपस्वी श्री. क्षेत्र कुंडलेश्वरचा वै. सदगुरू ह. भ. प. झेंडूजी महाराज वेळीकर यांचे चरित्र** २०१० ही पुस्तके पाहावीत.

२. डॉ. त्रिं. ना. वाळुंजकर, "धर्म", **महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर; महाराष्ट्र भूमी व लोक,** १९९६, पृ. २८०.

३. डॉ. शं. गो. तुळपुळे, **प्राचीन मराठी कोरीव लेख,** पुणे, १९६३, पृ. ८५-९२, लेख क्र. १७ आणि डॉ. शां. भा. देव, **महाराष्ट्र-गोवे शिलालेख ताम्रपट,** १९८२, पृ. २३६-३९, लेख क्र. ४९५-९६; पृ. २४२-४३, लेख क्र. ५०२.

४. भा. पं. बहिरट व प. ज्ञा. भालेराव, **वारकरी संप्रदाय; उदय व विकास.**

५. वासुदेवशास्त्री एणगावकर, **ह. भ. प. श्री. वासुदेवशास्त्री महाराज एकसष्टीपूर्ती गौरवग्रंथ व स्मरणिका,** २००२, एणगाव.

६. जगन्नाथ महाराज अंजाळेकर यांनी दिलेल्या यादीनुसार; श्री. शं. वि. पाटील, पूर्वोक्त, पृ. १९४.

७. अधिक माहितीस्तव डॉ. वि. भि. कोलते यांचे महानुभाव पंथावरील संशोधन ग्रंथ पाहावेत.

८. शं. वि. पाटील, **लेवा पाटीदारांचा इतिहास,** पृ. १४०. अधिक माहितीसाठी या ग्रंथातील पृ. १४०, १४३ पाहावीत. तद्वतच पंथाविषयी सविस्तर मराठीतून माहिती सौ. ज्योती सुरेश पाटील यांचा **श्री. सत्पंथ संप्रदाय : स्वरूप सत्पंथ विजय,** १९२६ हा ग्रंथही पाहावा.

९. आर. ई. एन्थोवेन, **कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** पृ. १५०.

१०. य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, **सुलभ विश्वकोश.**

११. आर. ई. एन्थोवेन, पूर्वोक्त, पृ. १५१.

१२. शं. वि. पाटील, पूर्वोक्त, १४२.

१३. **जळगाव गॅझेटिअर,** १९९४, पृ. १८४.

✧✦✧

प्रकरण ८

सामाजिक संघटन व हुंडा समस्या

भोरगाव पंचायत

पंचायत ही एक प्राचीन संस्था असून या संस्थेचे किमान पाच सदस्य असतात. म्हणून तिला हे नाव मिळाले आहे. भारताच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनात पंचायतीला फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कोणतेही सार्वजनिक कार्य पार पाडण्यासाठी पंचायत स्थापण्याची प्रथा होती. ग्रामपंचायत व जातपंचायत हे पंचायतीचे प्रमुख प्रकार होत. भोरगाव पंचायत ही लेवा पाटीदारांची जातपंचायत आहे.

पूर्वी प्रत्येक जातीची एक पंचायत असे व ती त्या जातीच्या सामाजिक जीवनाचे नियमन करीत असे. अशा पंचायतीत १० ते १५ सदस्य आणि त्यातील एकाला सरपंच मानले जाई. त्यास कुटुंबनायक, पंचायतप्रमुख अथवा देशमुख असेही म्हणत. लग्नसंबंध, काडीमोड, इत्यादीबाबतीत पंचायतीची अनुमती घ्यावी लागे. प्रत्येक जातीचे काही नियम असत व त्या नियमांचे पालन न करणाऱ्या व्यक्तीला जातपंचायत शिक्षा करीत असे. अशा मनुष्याला बहुधा जातीबाह्य ठरविले जाई व त्याच्याशी कोणीही कसलाही संबंध ठेवत नसे. जातीबाह्य व्यक्तींच्या सेवेस बलुतेदारसुध्दा जात नसत. अशा मनुष्याला गावात व समाजात जगणेच कठीण होई. मग, प्रायश्चित्त म्हणून पंचायतीसमोर माफी मागून, दंड भरून वा समाजभोजन देऊन तो या शिक्षेतून सुटका करून घेई. त्याला तीर्थयात्रा करायला भाग पाडत. आदिवासी समाजजीवनातही पंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व असते.

जुन्या काळी पारशांमध्येही पंचायत व्यवस्था होती. पंचायत हेच त्यांचे सामाजिक

न्यायालय असे. ज्या भागातून पारशी भारतात आलेत; त्याच भागातून त्यांच्या पूर्वी लेवा पाटीदारांचे पूर्वज म्हणजे गुर्जर आलेले असल्याने इकडे आल्यावरही त्यांनी पंचायतीचे महत्त्व कायम ठेवले.

लेवा गुजर व लेवा पाटीदार यांच्या पहिल्या स्थलांतरणाच्या वेळी खानदेशावर यादव व त्यांचे मांडलिक निकुंभवंशी राजे राज्य करीत होते. लेवा लोक इकडे आल्यावर व स्थिरस्थावर झाल्यावर त्यांचे पंचायतप्रमुख नेमण्यात आलेत. म्हणजे तत्कालीन राज्यकर्त्यांनी जातप्रमुखास देशमुखी दिली. यामागील हेतू हा असावा की, सामाजिक तंटे व भाऊबंदकीचे संपत्तीविषयक तंटे उद्‌भवल्यास पंचायतप्रमुखाने म्हणजे देशमुखाने पंचांच्या मदतीने ते सोडवून राज्यात शांतता कायम ठेवावी. देशमुखी हे एक वतन आहे. देश म्हणजे परगणा व त्याचा मुख्य तो देशमुख. त्यास समाज व दरबारात मान असे. गावसभेत पाटील व परगणा सभेत देशमुखांना पहिला मान मिळत असे. शेतीच्या उत्पन्नात वाढ व्हावी, नवीन जमिनी लागवडीखाली आणाव्यात, उत्तेजनार्थ खंड माफ करावा हे अधिकार देशमुखांस असत. पीक-आणेवारी ठरविणे, सरकारी व सावकारी जुलूम न होऊ देणे, इनाम व मिरासी हक्क देणे, इत्यादी कामे देशमुख आपल्या अधिकारात करीत असे. देशमुख वतनदारास शाश्वत अधिकारी म्हणत. देशमुखांच्या स्वतःच्या अधिकारदर्शक मुद्रा (बव्हंशी नांगर) असत. ते राजसत्तेच्या आश्रयाने काम करणारे असले तरी राज्याचे सेवक नसत.

इ. स. १२१९ मध्ये जामनेरच्या देशमुखीचे राजसत्तेकडून गवळी कुटुंबाकडे असलेले अधिकार काढून ते लेवा गुजरांकडे हस्तांतरित करण्यात आले होते.[१] याच सुमारास किंवा त्यानंतरच्या काळात यावलची देशमुखी थोरगव्हाणच्या देशमुखाकडे आली असावी. हा देशमुख लेवा पाटीदार होय व त्याच्याकडेच लेवा पाटीदार जातपंचायत प्रमुखपद देण्यात आले असावे. तेव्हापासूनच लेवा पाटीदार जात पंचायतीचे प्रमुखपद वंशपरंपरागत पद्धतीने या देशमुख घराण्याकडे चालत आले असावे. हा देशमुख भोरगाव पंचक्रोशीतील पंच नेमून त्यांच्या मदतीने सामाजिक तंटे, भाऊबंदकीचे संपत्तीविषयक तंटे, घटस्फोटबाबतचे तंटे मिटवित असे. काही वृद्ध जाणकारांच्या तोंडी माहितीवरून साधारणतः १२ गावांमधून एक पंच नेमला जाई व असे एकूण १५ ते २० पंच नेमले जात म्हणून या पंचायतीला भोरगाव पंचायत असे नाव प्राप्त झाले होते. केवढा मोठा हा मान? परंतु १८५०-५२ च्या सुमारास ब्रिटिशांनी तो धुळीस मिळविला. ब्रिटिशांचे Divide and Rule हे तंत्र व १८५२ च्या ब्रिटिशांनी म्हटलेल्या Great Dispute नंतर मात्र हा देशमुख फक्त थोरगव्हाणे या नव्याने निर्माण झालेल्या अंतर्विवाही पोटभेदाचा पंचायतप्रमुख राहिला आणि बहुतांश लेवा पाटीदारांचा पंचायतप्रमुख भोरटेकचा पाटील झाला. म्हणूनही या पंचायतीला भोरगाव पंचायत असे नाव पडले असावे. भोरटेक येथील लेवा पाटीदारांना तेथील कोळ्यांनी हुसकून लावल्यामुळे तो पाडळशास येऊन येथील पोलीस पाटील

झाल्याने भोरटेकचे लेवा पाटीदार पंचायत प्रमुखपद पाडळसे येथील पोलीस पाटलाकडे आले व नंतर याच पोलीस पाटील वंशाकडे वंशपरंपरागत भोरगाव पंचायत प्रमुखपद म्हणजे कुटुंबनायकाचे पद चालत आले. त्याच्या कार्यक्षेत्रात सध्या अस्तित्वात असलेले जळगाव जिल्ह्यातील यावल, रावेर, जळगाव, भुसावळ, मुक्ताईनगर आणि बोदवड तालुक्यांमधील लेवा गणप्रदेशातील तसेच धरणगाव, चाळीसगाव व जामनेर तालुक्यांमधील लेवा वस्तीची गावे आणि बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर, नांदुरा व मोताळा तालुक्यांमधील लेवा गणप्रदेशातील गावे मोडतात. पाडळसे गाव लेवा पाटीदारांचा मुख्य ठाया आहे. येथील ठायाप्रमुखास कुटुंबनायक ही संज्ञा प्राप्त झाली व क्रमाने धोंडू बापू पाटील, भिकू संवदू पाटील, चिठू गणू पाटील व रमेश विठू पाटील असे कुटुंबनायक झालेले आहेत.[२]

पाडळसे गाव वऱ्हाडातील मलकापूर, मोताळा व नांदुरा तालुक्यांमधील लेवा पाटीदारांना तसे गैरसोयीचे असल्यामुळे दाताळा येथे उपठाया स्थापन करण्यात आला. त्यानंतरचे नरवेलचे कै. भिकाजी कोलते यांचे समाजसुधारणा कार्य मोलाचे आहे. श्री. शं.वि. पाटील यांनी या विधानास आक्षेप घेतला असून तळटीप क्र. ३ मध्ये जसेच्या तसे उद्धृत करीत आहे. भोरगाव पंचायतीने पूर्वी भरीव कार्य केलेले असून त्यासंबंधी अधिक तपशील श्री. शं. वि. पाटील यांनी लेवा पाटीदारांचा इतिहास ग्रंथात दिलेला असल्यामुळे येथे देत नाही.

इ. स. १९८४ मध्ये भोरगाव पंचायतचे पुनरुज्जीवन करण्यात आल्यानंतर कुसुमताई चौधरी हयात असेपर्यंत त्यांनी कित्येक लेवा पाटीदार सासुरवाशिणींना, घटस्फोटितांना, परित्यक्तांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. कुसुमताई स्वर्गवासी झाल्यानंतर पुन्हा मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शहरातील काही मंडळेसुद्धा यात लक्ष घालीत आहेत. बरीच मंडळे वधू-वर मेळावे भरवून समाजसेवा करीत आहेत. काही सांस्कृतिक कार्येही करीत आहेत. परंतु मार खाणाऱ्या सासुरवाशिणी, घटस्फोटिता व परित्यक्तांना न्याय मिळवून देण्यात ही मंडळी फारशी उत्सुक नसतात. अशी काही प्रकरणे मंडळाकडे जातातही. काही मंडळे तडजोड करण्यासाठी प्रयत्नही करतात. तथापि, काही मंडळांचे पदाधिकारी अशी तडजोड करताना नवऱ्याने बायकोस मारणे यात काही वावगे समजत नाहीत आणि काही पंचांची भूमिका बजावणारे सामोपचारासाठी बोलावण्यात आलेल्या बैठकीत पत्नीने जुळवून घ्यावे, असे सल्लेही देत असतात. बहुतांश तंटे हुंडा, देणेघेणे, मानपान यासारख्या बाबींमधून उद्भवतात. मुलींचा दोष नसतो असेही नाही. परंतु बऱ्याचदा मुलींबाबत पराचा कावळा करण्यात येतो. काही प्रकरणांत मुलीच्या माहेरची मंडळीही तिला उकसवतात. या पदाधिकाऱ्यांना विनंती करावीशी वाटते की, अशा गांजलेल्या व शोषित मुलींच्या समस्या सामोपचार वा वैधानिकरीत्या त्यांना सोडविणे जमत नसेल तर कृपया असले अनाहूत सल्ले देणे तरी त्यांनी थांबवावे.

मधुकरराव चौधरींनी १९८४ मध्ये भोरगाव पंचायतचे पुनरुज्जीवन झाले त्या वेळी प्रबोधन कार्य केले. त्यांनी आपले विचार स्पष्टपणे मांडले. समाजाला भेडसावणाऱ्या साऱ्याच प्रश्नांचे मार्मिक विवेचन त्यांनी १८-३-१९८४ च्या भोरगाव पंचायतच्या प्रचंड सभेत केले. पंचायतीच्या सामर्थ्याविषयी व समाजाच्या भवितव्यासंबंधी मूलगामी स्वरूपाचे प्रेरणादायी विचार त्यांनी प्रभावी शैलीने समर्थपणे मांडले. त्यांच्या भाषणातून त्यांनी आत्मसात केलेल्या गांधीजीप्रणीत विचारांचा, मानवी मूल्यांवरील त्यांचा अढळ निष्ठेचा, जातीपातीची क्षितिजे ओलांडणाऱ्या त्यांच्या विशाल जीवन-दृष्टीचा व माणुसकीने ओथंबलेल्या त्यांच्या ऋजू अंत:करणाचा प्रत्यय येत होता. अत्याचारांमुळे स्थलांतरित होऊन पोटासाठी भटकत येऊन लेवा समाज कसा संघटित व बलशाली झाला, हे विशद करून त्यांनी भोरगाव लेवा पंचायतीच्या थोर परंपरेचे भावस्पर्शी शब्दात विवेचन केले. पंचायतीमार्फत समाजाचे नियमन व नियंत्रण करणाऱ्या समाजधुरिणांचा, त्यांच्या द्रष्टेपणाचा त्यांनी गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला. एकेकाळी निरक्षर व अडाणी असलेल्या या समाजास शिक्षणाची गोडी लागल्यानंतर त्याने शिक्षणाच्या सर्वच क्षेत्रात कसा लौकिक संपादन केला हे त्यांनी सोदाहरण विशद केले. शिक्षण घराघरात आले, काळ बदलला, पण मने बदलली नाहीत. पूर्वी अडाणी परंतु सुसंस्कृत असलेला हा समाज उच्च शिक्षित झाला परंतु सुशिक्षित झाला नाही व त्याचा सुसंस्कृतपणाही कमी होत चालला या उणेपणाबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. समाजात वाढलेल्या अपप्रवृत्तीचा रोग मुळाशी कसा घर करून बसला आहे, यावर त्यांनी नेमके बोट ठेवले. स्त्री-पुरुषातील विषमता ही आजच्या सामाजिक अवकळेला कारणीभूत आहे हे सांगून विवाह संबंधीच्या अनिष्ट व घातक प्रथांवर त्यांनी चांगलेच कोरडे ओढून उपस्थितांच्या व समाजाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. हे चित्र बदलायचे असेल तर मने बदलली पाहिजेत हे सांगून त्यांनी ही चळवळ आत्मोद्धाराची चळवळ असल्याचे विवेचन केले. जाती-पातीचे कवच फोडून मानवतेवर आधारलेल्या जातीविहीन समाजाकडे वाटचाल करायची आहे, याची कल्पना त्यांनी समुदायास दिली.

जातीविहीन समाज हे स्वतंत्र भारतातील गांधीजींचे स्वप्न. ते साकारावयाचे तर आधी किमान आपल्या जातीमधील अंतर्विवाही गटांचे विलीनीकरण-मनोमिलन होऊन लेवा पाटीदार समाज एकसंध व्हावा म्हणून जात-पात न मानणाऱ्या या थोर नेत्याने भोरगाव पंचायत सभेचे नेतृत्व स्वीकारले. सुरुवात आपल्या समाजापासून केली तर इतर समाजांशी मनोमिलन होण्यास अडचण पडणार नाही. भोरगाव पंचायतच्या १९८४ च्या पुनरुज्जीवनाचा आणि मधुकररावांच्या उपदेशाचा एवढा परिणाम झाला की, अनेक तरुण-तरुणी पुढे आलेत. त्यांनी समाजाचे कुजके जोखड झुगारून लग्नाकडे व्यवहार म्हणून न पाहता संस्कार म्हणून पाहिले. काहींनी आपल्या कुटुंबाचाही विरोध त्यासाठी पत्करला. अनेकांनी तर जातीची बंधने झुगारून आंतरजातीय व काहींनी आंतरधर्मीय

जोडीदार निवडले. हे शहरांत शक्य झालेले आहे. हे लोण खेड्यात जाणेही आवश्यक आहे. समाजधुरिणांना विनंती करावीशी वाटते की, आपण जर जातीची बंधने झुगारू शकतो, झुगारू लागलो आहोत तर आपल्यातीलच एका अंतर्विवाही गटास, थोरगव्हाणे समाजास, जो लेवा पाटीदारच आहे त्यास आपल्यात का सामावू शकत नाही? त्यांनाही आपल्यात सामावण्यासाठी पुन्हा आणखी एकदा १९८४ सारखी मोहीम सुरू करून ती पूर्णत्वास न्यावी म्हणजे आपला समाज आणखी अधिक एकसंध होईल. कूपमंडूक वृत्ती जाईल व बाह्य सागर समाजात उडी घेण्यास आपला समाजही सिद्ध होईल. यासाठी भोरगाव पंचायत प्रमुख सदस्यांनी थोगव्हाण्यांशी संपर्क साधून समाजबांधणीबाबत चाचपणी करून पाहावी. त्यासाठी हवे तर देवाण-घेवाण तत्त्वानुसार (Give and take policy) १८५२ पूर्वीची स्थिती आणण्याचा प्रयत्न करावा. पंचायत प्रमुखपद देशमुखाच्या वंशजास देऊन पाहावे. समाजबांधणीच्या दोन पावले पुढे जाण्यासाठी एक पाऊल मागे घेण्याचे पाहावे. हा माझा सल्ला नसून वैयक्तिक मत आहे. त्यामुळे समाज एकसंध झाल्यास लेवा गणप्रदेशाचा सर्वार्थाने विकास होऊ शकतो. आता काही समाजधुरीण माळव्यातील पाटीदार समाज व खानदेशातील लेवा पाटीदार समाजाने बेटीव्यवहार सुरू करावेत, यासाठी संघटनाचे प्रयत्न करीत आहे. ही स्तुत्य बाब आहे. मागील पाचसहा वर्षांत दोन-चार विवाहही जुळविण्यात आले. पण ही अगदीच नगण्य उदाहरणे आहेत. असे संबंध जुळविण्यासाठी मुख्य अडचणी आहेत त्या भाषा, आहार, संस्कार व संस्कृतीच्या. या बाबी अगदीच भिन्न आहेत. त्याशिवाय प्रादेशिक अंतरही आहेच. त्यामुळे सर्रास बेटीव्यवहार होऊ शकणार नाहीत तरीही प्रयत्न करावयास हरकत नाही. शिवाय बऱ्याच सामाजिक कारणांमुळे खानदेशातील शेतकरी, अल्पभूधारक व भूमिहीन शेतकरी शेतमजुरांना मुली मिळत नाहीत. त्यांना माळव्यातील समाज मुली देतील असे वाटत नाही आणि अशाच शेतकरी-शेतमजुरांना खानदेशातील समाज मुली देणे सुतराम शक्य वाटत नाही. तरीही समाजधुरिणांनी या भिंती तोडण्याचे प्रयत्न जरूर करावेत. खानदेशातील सावदेकर व थोरगव्हाणे या दोन्ही शाखांमध्ये शेतकरी अल्पभूधारक व भूमिहीन शेतकरी शेतमजुरांचे प्रमाण काही कमी नाही. म्हणून समान संस्कृती, आहार, भाषा असलेल्या या दोन्ही शाखांमधील अंतर्विवाहीपणा नाहीसा करून त्यांच्यात बेटीव्यवहार सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जावेत. यांच्यातच बेटीव्यवहार सुरू झाले तर खानदेशातील मुलांना मुलींसाठी विदर्भातील झाडी प्रदेशात जावे लागणार नाही. एका अनधिकृत सर्वेक्षणानुसार खानदेशात मागील चारपाच वर्षांत सुमारे ४००० मुली झाडी प्रदेशात वधू म्हणून आणल्या गेल्या. या मुली चांगल्या मेहनती असतात. त्यांना आपले म्हणा.

वर उल्लेख केल्याप्रमाणे अनेक शहरांमध्ये वेगवेगळ्या नावांनी समाजमंडळे स्थापन झालेली आहेत. त्यात प्रामुख्याने नागपूर, मुंबई, भोपाळ, पुणे, अहमदाबाद,

जबलपूर, सुरत, यवतमाळ येथील भ्रातृमंडळे, जळगाव, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, दहिसर येथील लेवा मंडळे, मुलुंडचे विकास मंडळ इत्यादी अनेक मंडळे व त्यांचे सभासद त्यांच्या त्यांच्या परीने समाजकार्य करीत आहेत. आता कार्य करण्याबाबत विशेषकरून दरवर्षी वधू-वर मेळावे भरविणे, वधूवरांच्या याद्या छापणे व वर्षातून एकदोनदा स्नेहसंमेलन भरवून सामाजिक व सांस्कृतिक कार्ये करणे याबाबत जणू स्पर्धाच चालू झाली आहे. मंडळे त्यांची कार्ये करीत आहेत ही स्तुत्य गोष्ट असली तरी मंडळांचे जणू पेवच फुटले आहे. वधू-वर मेळाव्यांबाबत तर आता स्पष्टच म्हणावेसे वाटते की, ''बंद करा हे बाजार!'' गुरांच्या बाजारात गुरे पारखून तरी घेता येतात, पण ह्या अतिगर्दी होणाऱ्या मेळाव्यांमध्ये उपवरांच्या परिचयासाठी फक्त एकच मिनिट वेळ आणि मेळावा आयोजित करणारे व पुढाऱ्यांच्या भाषण व सत्कार समारंभासाठी मात्र दोन तास वेळ! एक-दीड मिनिटांत उपवर स्वतःचा काय परिचय करून देणार? हे योग्य नाही. मध्यम व कमी शिक्षितांकडे ह्या मेळाव्यात बघण्याचा दृष्टिकोन काय असतो? मोठमोठ्या डॉक्टर, इंजिनीअर व डिग्रिटरी उपवरांच्या मेळाव्यात हे मध्यम व कमी शिक्षित उपवर स्टेजवर येण्यासही दचकतात. एकाच गावात दोन-दोन मेळावे भरविले जातात. का? कार्यकर्त्यांमधील अहमहमिका आणि प्रसिद्धिलोलुपता यामुळे असे घडत असल्याचे दिसून येते. वास्तविकतः हे मेळावे भरवून या समाजातील हुंड्यांची 'बाय बाय' ची अनिष्ट प्रथा बंद करण्याबाबत प्रयत्न केले जात नाहीत. तद्वतच खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदारांमध्ये सुमारे १६० वर्षांपूर्वी निर्माण झालेले थोरगव्हाणे व सावदेकर (लेवा) हे अंतर्विवाही भेद नाहीसे होण्यासाठीही काही प्रयत्न होत असल्याचे दिसत नाही. मग मेळावे भरवून कसले समाजप्रबोधन होते? मेळावे भरविण्यापेक्षा फक्त याद्या प्रसारित कराव्या म्हणजे उद्दिष्टही साध्य होईल, मंडळांचाही अनावश्यक खर्च होणार नाही आणि उपवर पक्षांचीही लूट होणार नाही. महागड्या एका यादीत असलेली अर्धेअधिक नावे दुसऱ्या, तिसऱ्या यादीत असतात. तीन-चार याद्या विकत घेण्यासाठी किती खर्च येत असेल याबाबत आणि तीन-चार ठिकाणी पालक आणि विवाहेच्छू उमेदवारांच्या जाण्यायेण्याचा खर्च व गैरसौय याबाबतही विचार व्हावयास पाहिजे. याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा व संपूर्ण मंडळांसाठी एक मुलींची व एक मुलांची अशा दोनच याद्या प्रकाशित कराव्यात व मध्यवर्ती ठिकाणी तीन-चार दिवसांचा मेळावा भरवावा. हा खर्च सर्व मंडळे व महासंघाने करावा. मंडळांच्याबाबतीत कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. म्हणून आता काही समाजधुरिणांनी एकत्र येऊन महाराष्ट्र राज्य लेवा पाटीदार महासंघ स्थापन केला आहे. त्यास नियंत्रक संघाचे स्वरूप प्राप्त व्हावयाचे आहे. या संघाद्वारे स्वतःच्या मोठ्या जागेत वधू-वर मेळावे, जात दाखले मिळण्यासाठी मदत, तरुणांना मार्गदर्शन, मुलांची वसतिगृहांची व्यवस्था इत्यादी कार्ये पार पाडता येतीलच. त्याचशिवाय भोरगाव पंचायतच्या मूळ उद्दिष्टानुसार जाततंटे विशेषकरून सासुरवाशिणींची

मारहाण प्रकरणे, घटस्फोटिता व परित्यक्तांचे प्रश्न सोडवणूक व वैद्यकीय सुविधा पुरविणे, इत्यादी कार्ये सुसंघटितरीत्या पार पाडता येतील.

हुंडापद्धती व समस्या -

लेवा पाटीदारांमध्ये हुंडा पद्धती गुजरातमधून आलेली दिसते. तथापि खानदेश वऱ्हाडात आल्यावर या लोकांनी हुंडा पद्धती संपूर्ण नष्ट केलेली होती व लग्नातील वधू-वरांचे दागिने व बस्त्याचा खर्च समसमान विभागून घेण्याची एक आदर्श प्रथा निर्माण केली होती. गुजरातमध्ये खेडा जिल्ह्यातील चरोतरमधील पाटीदार स्वत:स कुलिया असे संबोधतात व त्या व्यतिरिक्तच्या पाटीदारांना अकुलिया असे संबोधतात. तद्वतच गुजरातमधील लेवा म्हणविणाऱ्यांमध्ये पाटीदार व कणबी असे पोटभेद आहेतच. पाटीदार आपल्या मुली कणब्यांना देत नाहीत. मात्र कणब्यांच्या मुली आपल्या घरात आणतात. तद्वतच कुलिया आपल्या मुली अकुलियांना देत नाहीत. मात्र अकुलियांच्या मुली आपल्या घरात आणतात. प्रत्येक मुलीच्या वडिलांना वाटते की, आपली मुलगी श्रेष्ठ कुळात जावी. त्यातूनच कणब्यांनी हुंडा दिल्यास पाटीदार त्यांच्या मुली सून म्हणून स्वीकारतात.[४] गुजरातमध्ये लग्नाचा खर्च मोठा करावाच लागतो. तो एवढा की, मुलीच्या वडिलांचे कुटुंबही उद्ध्वस्त होते. या उधळपट्टीस आळा घालण्यासाठी १८७० च्या सुमारास अहमदाबादचा मॅजिस्ट्रेट मि. फॉसेट याने लेवा व कडवा कुणबी व पाटीदारांमधील प्रमुख व्यक्तींची सभा घेऊन लग्नातील उधळपट्टी थांबविण्यासाठी आणि खेडा चरोतरात मुली देण्याची चढाओढ न करण्याबाबत या प्रमुखांना प्रवृत्त केले होते.[५] ही मर्यादा सुमारे २० वर्षे चालली. परंतु नंतर ती पुन्हा बोकाळल्याने मुलींची हत्या (बालहत्या) होऊ लागल्याने मुंबई सरकारने बालहत्या प्रतिबंधक कायदा (Act VIII of 1870) संमत करून जारी केला होता.[६] ज्या लेवा पाटीदार व लेवा कुणबी समाजातील या क्रूर व अनिष्ट प्रथांमुळे ब्रिटिशांसारख्या सरकारलासुद्धा त्यात हस्तक्षेप करावा लागला, ही गोष्ट समाजास नक्कीच भूषणावह नाही.

कन्येचा विवाह होण्यापूर्वी भावी जावयाला किंवा त्याच्या पित्याला, त्याने आपली मुलगी स्वीकारावी म्हणून जे द्रव्य देतात, त्याला हुंडा असे नाव आहे. भारतीय लोकांनी विवाह हे एक दान मानलेले आहे. विवाहात कन्येचे वराला दान करायचे असते आणि दान म्हटले की, त्याबरोबर रोख रकमेत किंवा सोन्याच्या स्वरूपात दक्षिणा द्यावीच लागे. कारण दक्षिणेवाचून दान पूर्ण होत नाही. त्यामुळे विवाहाच्या वेळी कन्येचे दान केल्यावर तिच्यासाठी काही रोख रक्कम किंवा एखादा दागिना देण्याची प्राचीन पद्धत होती. पण याला प्रचलित अर्थाने हुंडा असे म्हणता येणार नाही. कारण हे सर्व देणे मुलीच्या पित्याच्या इच्छेवर अवलंबून असे. त्या काळातील लोकांना हुंड्याची पद्धतच माहिती नव्हती. श्रीमंत घराण्यात आणि राजघराण्यात लग्नाच्या वेळी वराला काही वस्तू भेट म्हणून देत असत. **अथर्ववेदात** वधूंनी आपल्याबरोबर गायी भेट म्हणून आणल्याचा

उल्लेख आहे. वधूपित्याची ऐपत असेल तर त्याने आपल्या नवविवाहित मुलीस गाय आंदण देणे ही एक आदर्श वरदक्षिणा होती आणि ही प्रथा लेवा पाटीदार समाजात रूढ होती. त्यामागे हेतू उदात्त होता. आपल्या मुलीस व मुलीच्या घरच्यांना, जावयास तद्वतच मुलीच्या अपत्यांना म्हणजे नातवंडांना दूधदुभते मिळावे, त्यांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून किमान १०-१५ वर्षे साथ देणारी गोमाता, माहेरची एक आठवण, माहेरचा एक प्रतिनिधी व नववधूस सहवासी आणि गोदान म्हणून आंदण देत असत. अजूनही या प्राचीन प्रथेनुसार लेवा पाटीदार मुलीचा बाप ऐपत असल्यास गाय मुलीच्या घरी पाठवितो. परंतु अलीकडे शहरात नोकरी-व्यवसाय करणारा जावई करण्याकडे कल वाढल्याने आणि शहरात जावयाची गाय पोसण्याची कुवत नसणे किंवा सोय नसणे यातून हुंडा घेण्याची प्रथा रूढ झाली.

द्रौपदी, सुभद्रा व उत्तरा या कन्यांनी सासरी जाताना आपल्याबरोबर घोडे, हत्ती व दागिने आंदण म्हणून नेले होते. धनवान श्रेष्ठी मुलीला सासरी पाठवताना तिच्याबरोबर जावयासाठी मौल्यवान भेटवस्तू देत असत. असे उल्लेख जातकग्रंथात आढळतात. याही वस्तूंना हुंडा हे नाव देणे योग्य होणार नाही. कारण वधूपित्याने त्या स्वेच्छेने व मुलींवरील मायेच्या पोटी दिलेल्या असत.

कुटुंबवत्सल लेवा पाटीदार वधूपिताही पूर्वी मुलीसोबत मुलीच्या संसारासाठी आवश्यक असे मोजके पितळी पातेले, परात, तांब्याची घागर (कळशी), घरडी, तांबे, तांब्याचा बंब, लोखंडी पलंग व शक्य झाल्यास तांब्याचा हंडा या वस्तू आंदण म्हणून देत असे. सोबत तांब्याचा किंवा पितळेचा तुळशीवृंदावनात किंवा देव्हाऱ्यात ठेवण्यासाठी लंगडा देव (बाळकृष्ण) व गणपतीही देत असे. जावई रुसलाच तर मनगटी घड्याळ, सायकल देण्याची प्रथा रूढ झाली. येथवर दिल्या जाणाऱ्या वस्तूंना हुंडा म्हणता येणार नाही. या साऱ्या वस्तू वधूपिता मोठ्या आनंदाने देत असे. या वस्तूंत वाढ होऊन संसारासाठी लागणाऱ्या बारीक सारीक वस्तूही मायेपोटी देऊ लागला. येथवर ठीक होते. परंतु आता उपरोक्त सर्व आंदणासोबत काही तोळे दागिने, मोठी रक्कम, फ्रीज, वॉशिंग मशीन, लोखंडी कपाट, मोटारसायकल इत्यादी वस्तूंची यादीच वधूपित्याकडे पोहोचू लागली व स्थळ हातचे जाऊ नये व लग्न पक्के झाल्यावर मोडल्याची नामुष्की होऊ नये म्हणून वधूपिता त्यास अनिच्छेने मान्यता देऊ लागला, यास हुंडा म्हणणेच योग्य राहील.

स्मृतीत व काव्यनाटकादी प्राचीन ग्रंथांतही हुंड्याचा मुळीच उल्लेख नाही. फक्त वधूला लग्नाचे वेळी अलंकार द्यावे असे स्मृतीत सांगितले आहे, पण त्यांची संख्या किंवा किंमत वधूपित्याच्या सहज ऐपतीवर ठेवलेली होती. त्याबाबतीत कसलाच आग्रह नव्हता.

वैदिक वाङ्मयात स्त्रीच्या पतिगृहातल्या मालमत्तेवर हक्काविषयी काही सांगितलेले नाही. पण **ऋग्वेदातील विवाहसूक्तात** (१०-८५) व **तैति. संहितेत** परिणाह्य

म्हणजे लग्नाच्या वेळी पित्याने वधूला व जावयाला दिलेल्या अलंकारांवर वधूची मालकी असे, असे म्हटले आहे. स्मृतिकारांनी त्याला स्त्रीधन असे नाव दिले आहे. या स्त्रीधनावर जगणे म्हणजे नामर्दपणाचे लक्षण मानले जाई.

विष्णुस्मृतीत स्त्रीधनाचे पुढील प्रकार दिले आहेत. १) माता, पिता, पुत्र व भाऊ (आप्तेष्टांनी) यांनी दिलेल्या वस्तू, २) अध्यग्नी=विवाहहोमाच्या वेळी दिलेल्या वस्तू, ३) उपागत=लग्नानंतर मिळालेले द्रव्य, ४) बांधवांनी दिलेल्या वस्तू, ५) कन्याशुल्क, ६) अनुवधेयक=लग्नानंतर दिलेल्या वस्तू व ७) अधिवेदक=पतीने आपल्या दुसऱ्या लग्नाच्या वेळी पहिल्या पत्नीला दिलेले धन.

मनूने स्त्रीधनाचे सहा प्रकार सांगितले आहेत. नारदानेही तेवढेच दिलेले आहेत. ते असे - १) अध्यग्नी, २) अत्र्यवहनिक, ३) भर्तृदान, ४) भर्तृदत्त, ५) पितृदत्त व ६) मातृदत्त.

प्राचीन काळी स्त्रियांना पैतृक संपत्तीत वारसाहक्क नव्हता. नंतरच्या काळात तो मिळाला. आता तर कायद्याने तो हक्क प्राप्त झाला आहे. तथापि लेवा पाटीदार समाजातील महिला आपल्या भावंडांवरील प्रेमापोटी हा हक्क नाकारत असतात व कसलेही आढेवेढे न घेता आपला हक्क नाकारत असल्याबद्दल स्वाक्षरी करतात. मुलीस भाऊ नसेल तर गोष्ट वेगळी.

विष्णू, नारद व मनू या स्मृतिकारांनी पुत्राबरोबरच कन्येलाही पैतृक संपत्तीत काही भाग मिळावा, असे सांगितले आहे. अर्थात विवाहप्रसंगी द्यायच्या दक्षिणेशी याचा काही संबंध नाही.

मध्ययुगापर्यंतच्या विवाहसंस्थेचा इतिहास पाहिला तर त्यात हुंडा घेण्याची पद्धती नव्हती, असेच दिसते. मध्ययुगात ती प्रथमतः राजस्थानातल्या राजपूत लोकात सुरू झाली. त्या लोकांना आपल्या कुळाविषयी वाटणारा जाज्वल्य अभिमान या प्रथेच्या बुडाशी होता. तथापि, ती पद्धती राजेलोकांत व अमीर-उमरावांत तेवढी होती. सामान्य लोकांत तिचा प्रघात नव्हता.

भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकार जाऊन त्याऐवजी ब्रिटिश सरकारचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाल्यापासून हुंडा-पद्धतीचा प्रसार जास्त प्रमाणावर सुरू झाला. आपला राज्यशकट व्यवस्थित चालविण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ इथेच मिळावे, यासाठी शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य इंग्रजांनी हाती घेतले. ब्रिटिशांच्या अमलापूर्वी भारतात शेतकरीवर्गाचाच भरणा फार मोठा होता आणि नोकरदार नावाचा नवा वर्ग तेव्हा निर्माण झालेला नव्हता. ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यावर ती परिस्थिती पालटली. शिक्षणाचा दर्जा असेल तर त्या मानाने तरुणांना मोठमोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळू लागल्या. नोकरवर्गाला समाजामध्ये विशेष मान मिळू लागला. धनोत्पादक व्यवसाय वाढून त्याकडे सुशिक्षितांचे लक्ष लागले. आपल्या कन्येला सुशिक्षित, मोठ्या पगाराची

नोकरी असलेला पती मिळावा, अशी मुलीच्या पालकांची प्रवृत्ती वाढीस लागल्यामुळे हुंडा पद्धतीला विशेष जोर चढला. कालांतराने हुंड्याविषयीच्या आकांक्षा इतक्या वाढल्या की, आपल्या पित्याला संकटात घालू नये म्हणून सुजाण कन्यांनी आत्महत्याही केल्याची उदाहरणे आहेत. सध्या तर या पद्धतीला घृणास्पद स्वरूप आलेले आहे. लेवा पाटीदार समाजातील हुंडा पद्धतीने या सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. उच्चशिक्षित समजल्या जाणाऱ्या या समाजाला लागलेली ही कीड कशी नष्ट करता येईल, हाच खरा प्रश्न आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात मध्यवर्ती सरकारने हुंडाविरोधी कायदा केला आहे. परंतु यातूनही हा व्यवहार करणाऱ्यांनी पळवाटा काढल्या आहेत व लग्न पक्के करण्याआधीच हा व्यवहार गुपचूप केला जातो. वरपिता व वधूपिता हे दोघेच हा व्यवहार गुपचूप करीत असल्यामुळे कोणास कळत नाही. वधूपिता गरजेपोटी निमूटपणे वरपित्याचे ऐकतो. ही प्रथा वाढविण्यास वधूपिताही तेवढाच जबाबदार असतो.

सुजाण व विचारवंत नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व समाजसुधारक यांनी वेळोवेळी हुंडा आणि कन्याशुल्क घ्यायला व द्यायला विरोध दर्शविला आहे. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. दिवसेंदिवस समाजातील वरिष्ठ व पांढरपेशावर्गात हुंडा घेण्याची चाल वाढतच आहे. त्यामुळे गरीब पालकांना आपल्या मुलीचे लग्न ही काळजीची बाब वाटू लागली आहे. हुंडा देण्याची ऐपत नसल्यामुळे कित्येक मुली अविवाहित राहू लागल्या आहेत. या सर्व सामाजिक अरिष्टांना आळा घालण्यासाठी सरकारने १९६१ मध्ये हुंडाबंदीचा कायदा केला. लेवा पाटीदार समाजबांधवहो! हे लक्षात घ्या की, कधीतरी याचा उद्रेक होईलच. हुंडा मागणाऱ्याला, देणाऱ्याला व घेणाऱ्याला, तद्वतच या व्यवहाराला जर कोणी मध्यस्थ असेलच तर त्यालाही या कायद्यान्वये किमान सहा महिने कारावास व पाच हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त दंडाची शिक्षा ठेवलेली आहे. लेवा मंडळांनी हे समाजकार्य करून पाहावे.

सहसा कोर्टकचेरीच्या भानगडीत कोणी पडत नाही आणि याचाच गैरफायदा घेऊन हुंड्याचा व्यवहार होऊ लागल्याने ही प्रथा कायद्यानेही बंद होऊ शकलेली नाही. याउलट हुंड्यांच्या रकमेचे प्रमाण वाढतच आहे. याला कारणीभूत वरपित्याएवढाच वधूपिताही आहे. उदासीन नेतृत्वही आहे आणि वाढते उत्पन्नही आहे. सांप्रत हुंडा सोन्याच्या दागिन्यात आणि त्याचबरोबर रोख रकमेत म्हणजे लेवा पाटीदारांच्या शब्दात सांगायचे झाल्यास बाय बायच्या स्वरूपात असतो. उदा. २० तोळे दागिने व १५ हजार रुपये रोख म्हणजे २० बाय १५ असे घृणास्पद स्वरूप आलेले आहे. गुजरातमधील लेवा पाटीदारांमध्ये ही प्रथा परंपरागत असली तरी खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाजात १९६८ पर्यंत ही अनिष्ट प्रथा अस्तित्वात नव्हती. इतर जातींमधील ही परंपरागत पद्धती पाहून ती सुरू झाली. मुलाचे शिक्षण, त्याचा व्यवसाय व घरची संपन्न परिस्थिती यांवर हुंड्याचे प्रमाण अवलंबून असते. या समाजात शिक्षणाचे प्रमाण खूपच वाढले आहे. पूर्वी

म्हणजे पाच/सात वर्षांपूर्वी डॉक्टरही दवाखाना काढण्यासाठी भला मोठा हुंडा घेत असत. परंतु आता डॉक्टरांमध्ये एकाच व्यवसायातील म्हणजे डॉक्टरच पत्नी करण्याची प्रथा सुरू होऊनही त्यांच्यातील हुंड्याचे प्रमाण नष्ट झाले नाही. उलट ते वाढलेच आहे. काही महाभाग डॉक्टर तर दवाखाना उभारणीसाठी २५ ते ५० लाखपर्यंत हुंडा घेऊ लागले आहेत आणि ते देणारेही महाभाग कमी नाहीत. पत्नी डॉक्टर नसेल तर खूपच हुंडा घेतला जातो. इंजिनीअरच्या बाबतीतही तेच सांगता येईल. वैद्यकीय शिक्षण न परवडल्यामुळे मुली इंजिनीअरींगकडे जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे डॉक्टरांसारखी यांची स्थिती नाही म्हणून इंजिनीअर क्षेत्रातील मुलगाही खूप मोठा हुंडा मागतो. म्हणजे दागिने व हुंड्याची रक्कम दोन लाख रुपयांच्या वरही जाऊ शकते. त्याशिवाय लग्नाचा दीड-दोन लाख रुपये खर्च वधूपित्यास सोसावा लागतो. मोठ्या पगाराची नोकरी हेसुद्धा भरपूर हुंडा मिळण्याचे एक साधन असते. हल्ली डॉक्टरी शिक्षणाकडे जाण्याचा मुलींचा कल कमी झाला असल्याने डॉक्टर वधू मिळेनाशा झाल्या आहेत. कारण या शिक्षणाला खूप खर्च येतो. त्यात पित्याचे कंबरडे मोडते. शिवाय डॉक्टर झाल्यावरही मोठा हुंडा द्यावाच लागतो. हल्ली संगणकशास्त्रात शिक्षण घेऊन चटकन नोकरी लागते म्हणून मुली संगणकशास्त्राकडे वळल्या आहेत. लेक्चरर, हायस्कूल टीचर, प्रायमरी टीचर यांचे भाव ठरलेले असतात. शासकीय नोकरी व तिचा प्रकार यावरही भाव ठरलेले असतात. शेतकरी मुलास मात्र हुंडा मिळत नाही.

दागिने व रोख रक्कम या हुंड्याशिवाय चांदी, स्टेनलेस स्टील व पितळी भांडी, फर्निचर, फ्रीज, वॉशिंग मशीन, स्कूटर, मोटार, काही वेळा घरासाठी प्लॉट किंवा तयार घर याचीही मागणी होत असते. परदेशी जाऊन उच्च शिक्षणासाठी येणारा खर्चही मागितला जातो. श्रीमंतांना लग्न ही हौस परवडणारी असली तरी मध्यमवर्गाची ससेहोलपट होते. हे पाहून इतर समाज तर उपरोधाने ''लेवा पाटीदारांमध्ये नवऱ्या मुलाच्या आईच्या बाळंतपणापासूनचा खर्च वसूल करण्याची प्रवृत्ती आहे'' असे म्हणून हिणवू लागला आहे. हे समाजास शोभणारे आहे काय? बरेच वधूपालकही हुंड्याचा आकडा वाढविण्यास जबाबदार आहेत. ह्या समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने बरेच वधूपालक चांगल्या हुद्याच्या वा चांगल्या खात्यात नोकरीवर आहेत. भ्रष्टाचाराने कमाविलेली माया ते हुंड्यासाठी वापरतात. बऱ्याचदा वरपक्ष मागत नसतानाही ''आम्हाला एवढे आमच्या मुलीसाठी द्यायचेच आहे'' असे सांगून ३५ बाय ३५ ते ५० बाय ५० चा फॉर्म्युला वापरतात. केवळ आपली ''मोठायकी'' दाखवण्यासाठी वा ''मी माझ्या नोकरीत भ्रष्टाचाराने कमावलेली माया'' दाखवण्यासाठी हे सर्व चालते. डॉक्टर, इंजिनीअर मुलींनी तरी सामाजिक बांधिलकी म्हणून अशा पालकांना परावृत्त करावे. अशा पालकांना विनंती करावीशी वाटते की, त्यांनी लग्न झाल्यानंतर काही कालावधीने आपल्या सोयऱ्यांकडे आपली ''मोठायकी'' दाखवून काय द्यायचे असेल ते द्यावे. समाजाला तरी आपली

भ्रष्टाचाराने बरबटलेली मोठायकी दाखवू नये.

काही ''आम्हाला हुंडा नको'' असे सांगणारे वरपालक ''तुम्हाला जे द्यायचे असेल ते द्या, शेवटी तुमच्याच मुलीला मिळणार आहे''. असे ''मानभावी'' पणे सांगून 'ताकाला जाऊन लोटा लपवण्याचे सोंग करून अप्रत्यक्षरीत्या 'तुम्ही जेवढे जास्त द्याल तेवढे आम्ही घेऊ' असेच सूचित करतात. ही प्रवृत्ती नष्ट झाली पाहिजे.

अर्थात आपल्या मुलाच्या लग्नात हुंडा न घेणारेही लोक समाजात आहेत. एवढेच नव्हे; तर वधू पक्षाची लग्नाची कुवत नसेल तर दोन्हीकडचा खर्च करणारे किंवा देवळात चहापानावर लग्न करणारेही काही जण समाजात आहेत. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे.

इ.स. १९६९-७० पासून लेवा पाटीदार समाजात हुंड्याची कीड पुन्हा लागली व १९८३-८४ पर्यंत या समस्येने रौद्ररूप धारण केले. सारा समाज त्यामुळे होरपळला जात होता. त्यातून जागे होऊन काही समाजधुरिणांनी मनावर घेऊन ही कीड मारण्याचा प्रयत्न केला. लोकसेवक बाळासाहेब ऊर्फ मधुकरराव चौधरींनी युवा पिढीस जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यास कुसुमताई चौधरींनी साथ दिली. मृतावस्थेत असलेल्या भोरगाव पंचायतला संजीवनी दिली. १९६७ मध्ये २४ जानेवारीला भोरगाव पंचायत भरली होती. त्यानंतर १७ वर्षांनी १८ व १९ मार्च १९८४ रोजी भोरगाव लेवा पंचायतचे पाडळसे येथे भव्य अधिवेशन भरविण्यात आले. मुख्य विषय होता अर्थातच हुंडा समस्या व ती सोडविण्यासाठी, निर्मूलनासाठी करावयाचे उपाय. या अधिवेशनात सर्वश्री बाळासाहेब चौधरी, कुटुंबनायक रमेश विठू पाटील, भाईसाहेब या. शि. महाजन, जे. टी. महाजन, हि. के. कोल्हे, डॉ. जी. डी. बेंडाळे, प्रकाश चौधरी, डॉ. रु. गो. चौधरी, डॉ. के. एम. पाटील, सौ. कुसुमताई चौधरी, कु. साधना नारखेडे, कु. उषा पाटील, इत्यादी मान्यवरांनी या चर्चासत्रात भाग घेतला. त्यानुसार हुंडा घेणाऱ्या व देणाऱ्यांचा निषेध करावा, त्यांच्या लग्नकार्यात धरणे धरावे इ. उपाय सुचविण्यात आले. परिणामी १९८४ आणि १९८५ मध्ये हुंड्याचे, निदान उघड हुंड्याचे प्रमाण कमी झाले होते. परंतु नंतर एक-दोन वर्षात या कायद्याचे बंधन नसल्याने आणि नियम करणाऱ्यांपैकी बऱ्याच जणांनी नियम मोडल्याने यंत्रणेस लोक न जुमानेसे झालेत व त्यानंतर ही समस्या पुन्हा बोकाळली. मलकापूरलाही २९-७-१९८४ रोजी लेवा पाटीदार समाजाचे अधिवेशन झाले होते. त्यातही सर्वश्री मधुकरराव चौधरी, निवृत्ती एकनाथ पाटील, जी. डी. बेंडाळे, सौ. श्यामलाताई सरोदे, सौ. कुसुमताई चौधरी, रा. वा. पाटील, भागवतराव चौधरी, ना. गो. खडसे आणि इतर मान्यवरांनी भाग घेतला होता.

अलीकडे ५/७ वर्षांत सुशिक्षित वराइतकीच शिकलेल्या मुलीशी लग्न करण्याकडे कल जाऊ लागला आहे. शिकलेली मुलगी पाहिजे, तिने अर्थार्जनही करावे, तिच्या वडिलांकडून हुंडाही पाहिजे आणि या मुलीने घरातील स्वयंपाक, भांडी-कुंडी, घरसफाई

इ. कामेही केली पाहिजेत, वरून नवऱ्याच्या आई-वडील, भाऊ-बहिणी व आप्तेष्टांची मनेही सांभाळली पाहिजेत आणि नवरोजींनी कामावरून आल्यावर लोळावे, जेवण झाल्यावर पानटपरीवर किंवा नाक्यावर मित्रांबरोबर चकाट्या पिटाव्यात असे सुरू झाले असल्याने मानसिक ताण सहन न होऊन बऱ्याच मुली माहेरी निघून आल्या आहेत व घटस्फोटासाठीची प्रकरणे पडून आहेत. अशी कितीतरी उदाहरणे आहेत.

गेल्या २०-२५ वर्षांत या भागात हातनूर धरण सुरू झाले. रावेर तालुक्यातील गारबर्डी धरणही सुरू झाले. बरेच लोक या धरणाचे पाणी घेत नसले तरी पाटातून पाणी जमिनीत मुरत असल्याने विहिरींना पाणी राहते. त्यामुळे केळीखालील क्षेत्रात वाढ झाली. फैजपूर (न्हावी) आणि मुक्ताईनगर येथे मोठे साखर कारखाने सुरू झाल्याने यावल, रावेर, मुक्ताईनगर तालुक्यांत उसाखाली मोठे क्षेत्र आले. केळी, ऊस, भुईमूग, कपाशी या नगदी पिकांमुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला. हा पैसा सत्कारणी लागण्यापेक्षा हुंडा देण्यात त्याचा उपयोग होऊ लागला. तद्वतच जळगाव-भुसावळच्या जागेचे भाव वाढविण्यात झाला.

पूर्वी सामाजिक बांधिलकीमुळे कमीतकमी बायको व सुनेस जीवे मारत नव्हते. परंतु आता काही जण तर इतके धीट झाले आहेत की, सुनेस वा बायकोस लोटून देणे, स्वयंपाक करीत असताना गॅसवर लोटणे, जाळणे, शारीरिक छळ करणे असे घृणास्पद प्रकारही वाढले आहेत. अशा बाबतीत काही कोर्टकचेऱ्याही चालू आहेत. जेव्हा एखादी फिर्याद होते तेव्हाच हे कळते. परंतु शंभरातून एखादाच मुलीचा बाप व मुलीकडचे कोर्ट-कचेरीच्या भानगडीत पडतात, आणि बहुतांश मुलगी तर गेली, आता काय उपयोग या भावनेने म्हणा अथवा कोर्ट-कचेरीच्या भानगडीत पडू नये म्हणून म्हणा, उदासीनतेमुळे आपले दुःख चूपचाप सहन करीत असतात.

उपाय - हुंड्याविषयी सामाजिक समस्या सोडविण्यासाठी १९८४ मध्ये भोरगाव पंचायतचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. ही गोष्ट स्वागतार्ह आहे. यात पुढाकार कै. कुसुमताई चौधरी व श्री. मधुकरराव चौधरी यांचा होता. अजूनही या संस्थेचे कार्य चालू आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून थोडेफार या संस्थेकडे पाहत असले तरी कायद्याचा आधार नसल्याने या संस्थेला लोक जुमानेनासे झाले आहेत. म्हणून खालील उपाय सुचवावेसे वाटतात.

१) भोरगाव पंचायतचे पुनरुज्जीवन करणे - पुनरुज्जीवन करताना पंचायतला स्वतंत्र अस्तित्व राहण्यासाठी स्वतंत्र कार्यालय, सभागृह असावे. लोकवर्गणीतून हे करता येईल. तद्वतच या पुनरुज्जीवित पंचायतला अधिक कार्यक्षम बनविणे. त्यासाठी कुटुंबनायक हा वंशपरंपरागत असता कामा नये. लोकशाही पद्धतीने कुटुंबनायक व पंच ठरविण्यात यावे व या पंचायत मंडळाचीही चार पाच वर्षांचीच मुदत ठेवणे. यातून समाजास कार्यक्षम कुटुंबनायक व पंच निवडता येतील. मध्यवर्ती लेवा पाटील महासंघाशी

भोरगाव पंचायतशी सांगड घालावी.

२) कायदेशीर सल्ला देण्यासाठी वकिलांचे मंडळ नेमणे - हुंडा, घटस्फोट, समेट आणि इतर सामाजिक समस्यांवर कायदेविषयक सल्ला देण्यासाठी समाजातील वकिलांचे मंडळ नेमल्यास फिर्याद अथवा तक्रार करणारांना त्याचा फायदा होईल. अशा मंडळात किमान तीन-चार वकील असावेत.

३) समाजात ज्याचा वचक आहे अशा व्यक्तीस कुटुंबनायक अथवा पंचायत प्रमुखपदावर बसविल्यास त्याचे लोक ऐकतील.

४) प्रत्येक गावाचा प्रतिनिधी या मंडळास मदतीसाठी नेमल्यास गावातील समस्या वा तक्रारी या प्रतिनिधीकडे दाखल करता येतील.

५) हुंडा, घटस्फोटसारख्या बार्बीमध्ये ज्यांनी अत्याचार केले आहेत, हे सिद्ध झाल्यास अशा कुटुंबांशी सामाजिक बांधिलकी तोडणे. अर्थात हे कायद्यास धरून नसले तरी किमान केलेल्या कृत्याची जाणीव होईपर्यंत काही बाबतीत हा प्रयोग करावयास काही हरकत नसावी.

६) अत्याचार करणाऱ्यांना मानहानी म्हणून पूर्वीसारखे कवडी, दिडकीसारखा नवा पैशाचा दंड करावा व त्यास भरपूर प्रसिद्धी द्यावी.

७) हुंडा देणारे व घेणारे समजल्यास त्यांच्या कार्यात शांततामय मार्गाने धरणे धरण्याचा व निदर्शने करण्याचा कार्यक्रम आयोजित करावा.

८) गावोगावी सभा आयोजित करून हुंडाविरुद्ध प्रचार करावा.

९) नागपूर, मुंबई, पुण्यासह अनेक शहरांमध्ये भ्रातृमंडळे वा लेवा मंडळे स्थापन झाली आहेत. मुंबई परिसरात तर मुंबई, डोंबिवली, उल्हासनगर, दहिसर, अंबरनाथ, मुलुंड (विकास मंडळ), ठाणे, इत्यादी मंडळे समाजकार्यासाठी स्थापन झालेली आहेत. ही मंडळे त्यांच्या कुवतीनुसार समाजसेवा करीत असली तरी सामाजिक प्रश्न सोडविण्यात त्यांनी पुढाकार घ्यावा. त्यांच्यावरील नियंत्रक संघ कार्यक्षम असावा.

१०) विभक्त कुटुंबपद्धतीमुळे आधारहीन वृद्धांची संख्या वाढत असल्याने सामाजिक संघटन कार्य करताना नियंत्रक संघाद्वारे अशा वृद्धांसाठी वृद्धाश्रम स्थापणे गरजेचे आहे. शेती व मजुरीत प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन, आपल्या इच्छा मारून शिकवून मोठे करणाऱ्या वृद्ध मातापित्यांना कमावत्या मुलाकडून आधार मिळू नये, याइतकी वाईट गोष्ट नाही. मुलांसाठी आयुष्यभर खस्ता खाऊन उतारवयात हेळसांड व अवहेलना यावी, याइतके दुःख नाही. मुलांसाठी आयुष्याचा होम करणाऱ्या वृद्ध मातापित्यांना अंतिम काळात पोटच्या मुलाकडे दोन घास मिळावे म्हणून मुलांकडे रहावयास गेले असता त्याने घराबाहेर हाकलून द्यावे? काय वाटत असेल त्या परित्यक्त वृद्धांना? अशा अनिष्ट प्रथा माझ्या काही शिक्षित बांधवांमध्ये बोकाळत आहेत. खानदेशात झपाट्याने वाढणाऱ्या शहरांची जणू ती संस्कृतीच बनली आहे. अशा परित्यक्त वृद्धांसाठी,

तसेच थाटामाटात मुलींची लग्ने करून देणाऱ्या निर्वंश वृद्ध मातापित्यांसाठी तसेच अपत्यहीन वृद्धांसाठी वृद्धाश्रम स्थापल्यास आपलेच लोक, आपलीच भाषा, आपलाच आहार व आपलीच संस्कृती यामुळे ते त्यात विसावतील. समाजाने पुढाकार घेणाऱ्यांना सढळ हस्ते मदत करावी. अंधश्रद्धेने, दांभिक, तांत्रिक, धार्मिक कार्यात पैसे उधळण्यापेक्षा या कारणावर केलेला खर्च सत्कारणी तरी लागेल. त्यानेच खरा पुण्यसंचय होईल.

वृद्ध मातापित्यास घराबाहेर काढणाऱ्यास त्याच्या अन्य भगिनी-नातेवाइकांनी स्वार्थासाठी गळ्यात गळा न घालता चार गोष्टी सुनावल्या तरी हे प्रमाण बरेच कमी होईल. म्हणून वृद्धांच्या मुलींनी त्रयस्थाची भूमिका घेऊ नये.

प्रकरण ८ - तळटिपा

१. **खानदेश गॅझेटिअर,** १८८०, पृ. ६३.

२. शं वि. पाटील, **लेवा पाटीदारांचा इतिहास,** पृ १७८.

३. श्री. शंकर विठोबा पाटील ह्यांनी **मुलुंडच्या लेवा दर्पण,** ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २००३, पृ. २२ आणि **लेवा पाटीदार मित्रमंडळ, सांगवी, पुणे चा वार्षिकांक**-२००३, पृ. २८ वर जे मत व्यक्त केले आहे ते खाली जसेच्या तसे उद्धृत करीत आहे. " . . . . कै. भिकाजी कोलतेंनी दाताळा उपठाया स्थापन केला नाही. उलट त्यांच्याशी वैर केले. कारण, त्यांच्या सत्यशोधकी पुरोगामित्वावरून दाताळा ठायाने त्यांना जातीबहिष्कृत केल्याचा इतिहास आहे. तरीही प्रस्तावना पृ. ३ मध्ये आद. श्री मधुकरराव चौधरींनी कै. भिकाजी कोलते स्थापित दाताळा ठाया असा शब्दप्रयोग करून लेखकाचा पाठपुरावा केला हे मनाला खटकते. कै. भिकू एकोबा कोलते नरवेलकर हे लेवाकुलभूषण पद्मश्री विष्णू भिकाजी कोलते यांचे जन्मदाते वडील होत. आद. मधुकरराव चौधरी खिरोदेकरांचे चुलते श्री. सीताराम नाना चौधरींचे कै. भिकाजी एकोजी कोलते नरवेलकर हे जिवलग मित्र होते. त्यांचा घनिष्ठ परिचय होता. ते दोघेही महात्मा फुलेवादी विचारांचे व पुरोगामी वृत्तीचे होते. त्यापैकी कै. भिकू एकोबा कोलते नरवेलकर हे कट्टर पुरोगामी होते. बुलडाणा जिल्हा हरिजन सेवक संघाचे ते अध्यक्ष होते. शिवाय दुधलगाव बुद्रुक येथील लेवा पाटीदार विरुद्ध अस्पृश्य (महार) ह्या दोन जमातीत सुमारे १९२५ साली जी मोठी जातीय दंगल झाली त्या वेळी परंपरावादी लेवा समाजाच्या विरोधात अस्पृश्यांच्या बाजूने श्री. भिकू एकोबा कोलते नरवेलकर खंबीरपणे उभे राहिले. पुढे तर श्री. सीताराम नाना चौधरी खिरोदेकर (आद. मधुकररावांचे चुलते) यांचे सहकार्याने त्यांनी हरिजनांसाठी वसतिगृह चालविले असे **अजुनि चालतोची वाट,** लेखक पद्मश्री डॉ. विष्णू भिकाजी कोलते नरवेलकर, पृ. ३५५, परि. २ वरून कळते." याचा परिणाम म्हणून समाजातील लोकांनी आमच्या (डॉ. वि. भि. कोलतें च्या) घरावर बहिष्कार घातला. तो १३ वर्षे चालू होता". असे डॉ. वि. भि. कोलते, पृ. ३५५ वर त्यांच्या आत्मवृत्तात लिहितात. तसेच या **अजुनी चालतोची वाट** या डॉ. वि. भि. कोलत्यांच्या आत्मवृत्तात, पृ. ४६४ वर या विषयाची सविस्तर माहिती डॉ. भाऊसाहेब वि. भि.

कोलते लिहितात. ती कृपया पाहा. सन १९३६ साली डॉ. वि. भि. कोलते यांनी आंतरजातीय विवाह केला. यानंतर १९३६ साली श्री. भिकू एकोबा कोलतेंनी हरिजन सुधारक कार्य केले. या कारणांनी बॅ. तुकाराम शंकर पाटील दाभाडीकरांचे वडील श्री. शंकर पाटलांच्या पाठिंब्यावरून श्री. भिकू एकोबा पाटील जातिबहिष्कृत झाले. तरीही श्री. नि. रा. पाटील यांच्या ग्रंथात पान १३० वर आणि आद. मधुकरराव चौधरींची प्रस्तावना, पृ. ३ वरील परि. ३ मध्ये भिकू कोलतेंना दाताळा ठायाचे संस्थापक ठरविणे म्हणजे इतिहासाशी विसंगत वाटते."

श्री. शंकर विठोबा पाटील ह्यांच्या मताशी मी सहमत असून कै. भिकू एकोबा कोलतेंनी केलेले दाताळा ठायाचे स्थापनेनंतरचे समाजसुधारणा कार्य मोलाचे आहे असे वाचावे. कृपया श्री. वि. भि. कोलतेंचे उपरोक्त पुस्तक जरूर पाहावे. श्री. शं. वि. पाटील ह्यांनी माझ्या विधानाचा चुकीचा अर्थ काढला आहे.

४. गो. मं. कालेलकर, **मुंबई इलाख्यातील जाती,** पृ. ३८.

५. **बॉम्बे गॅझेटिअर**, व्हा. ९, भाग १, पृ. १६७.

६. कित्ता, पृ. १६७.

✧✦✧

प्रकरण - ९

समाजरत्ने

खानदेशाच्या व वऱ्हाडाच्या खाणीत अनेक लेवा रत्ने उपजली आहेत. त्या सर्वांची माहिती देणे येथे शक्य नसले तरी शक्य होईल तेवढ्यांची माहिती या प्रकरणात देण्याचा प्रयत्न केला आहे. काहींची साहित्य, वाङ्मय क्षेत्रातील सेवा, काहींची सामाजिक व शैक्षणिक कार्यातील सेवा, तर काहींची राजकीय क्षेत्रातील सेवा मोलाची आहे. प्रकरणाअखेर लेवा पाटीदार स्वातंत्र्यसैनिकांची यादी दिली आहे. ती अर्थात प्रतीकात्मक असून परिपूर्ण नाही.

आडनाव वर्णानुक्रमानुसार काही निवडक लेवा समाजरत्नांची माहिती खालील प्रमाणे -

१) प्रा. डॉ. श्रीराम अत्तरदे (जन्म : ३० जानेवारी १९१९, मृत्यू : २७ डिसेंबर १९९४) - प्रकाशित साहित्य संपदा - **सावलीच्या उन्हात, बंद दाराआड** ह्या कादंबऱ्या, **पार्वतीचे मोव्हतीर** व इतर कविता, **चितेच्या प्रकाशात** - दीर्घप्रेमकथा, **मानिनी, मालटेकडीवरून, श्री संत गाडगेबाबा यांचा महिमा** - दीर्घ काव्य, **हरीचे लाल** - बृहत् काव्य, **संगीत चालढकल - नाटक, वऱ्हाडी मराठीतील स्त्रीगीते** - मराठी, इंग्रजी जोड आवृत्ती, **छंदोमयी मऱ्हाटी** - छंद शास्त्रावरील ग्रंथ, **प्रतिभा प्रकर्ष** - साहित्यशास्त्र, **वऱ्हाडी व अहिराणी बोलींचे व्याकरण**; लोकछंद; **फट्‌ म्हणता ब्रह्महत्या** - नाट्यछटा संग्रह, **अथा तो धर्म जिज्ञासा** - धर्मविषयक शोध प्रबंध, **शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख आणि श्री शिवाजी शिक्षणसंस्था** - डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यावरील लेखसंग्रह शिवाय **व्हिम्स ॲण्ड ॲगोनिज्** - पोएम्स; **प्राब्लेमस् ऑफ मास एज्युकेशन, सायन्स ॲण्ड रिलिजन** ही इंग्रजी

भाषेतील पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत.

२) इंगळे, हरिभाऊ नारायण (जन्म : १९ नोव्हेंबर १९२०) - मूळगांव धरणगाव (ता. मलकापूर). यांचा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. गरिबीतून कसे तरी शिक्षण झाले. मेहनती व हुशार असल्याने व कामात प्रामाणिक असल्याने नोकरीत एकेक पायरी चढत ते असिस्टंट डायरेक्टर, जनरल ऑफ पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ या हुद्यांपर्यंत पोचले व दिल्लीहून ३० नोव्हेंबर १९७८ रोजी या पदावरून सेवानिवृत्त झाले.

त्यांची बदली नागपूरला झाली असताना १९६१ मध्ये वि. भि. कोलतेंच्या अथक प्रयत्नांनी नागपूर येथे भ्रातृमंडळाची स्थापना झाली. नागपूरच्या भ्रातृमंडळ स्थापनेत वि. भि. कोलते यांचेबरोबर भाऊसाहेब चौधरी (एम्प्रेस मिलचे जनरल मॅनेजर), आबा इंगळे, डॉ. पी. एम. कोलते, हरिभाऊ इंगळे, पांडुरंग बढे, व्ही. एम. नारखेडे या मान्यवरांचाही सिंहाचा वाटा होता. भ्रातृमंडळाचे पहिले अध्यक्ष वि. भि. कोलते व सचिव हरिभाऊ इंगळे होते. हरिभाऊंनी मुंबई येथेही १९९० मध्ये भ्रातृमंडळ स्थापन केले. त्यांचे **मुक्काम पोस्ट मुंबई** नामक आत्मचरित्र १९९४ मध्ये प्रकाशित करण्यात आले.

३) कुरकुरे, भादूभाऊ अवसू (जन्म : ७ मार्च १८८८, मृत्यू : ४ ऑगस्ट १९३३) - मूळगाव सावदा (ता. रावेर) असून जळगावचे फकीरा हरी लेवा बोर्डिंग उभारण्यात सिंहाचा वाटा असल्याने प्रस्तुत लेखकाचे मते लेवा समाजरत्न ठरले आहेत. गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाला. लहानपणीच वडील वारल्यामुळे संगोपन मोठ्या भावाने केले. फैजपूरहून सातवी व्हर्नाकूलर परीक्षा उत्तीर्ण झाले. अमळनेरला प्रताप शेठशी घनिष्ठ संबंध आल्याने प्रताप मिलचे सल्लागार बनले. अमळनेरला येणाऱ्या लेवा पाटीदार विद्यार्थ्यांवर यांचे लक्ष असे. कडक, करारी, तेवढाच मृदू स्वभाव म्हणून विद्यार्थ्यांना त्यांचा आदर वाटे. आजारी लेवा पाटीदार विद्यार्थ्यांची ते सुश्रूषाही करीत. त्यांचे पुत्र डॉ. पुंडलिक कुरकुरे म्हणून प्रसिद्धीस आले. जळगाव येथे राहत असतांना बहिणाबाई चौधरी व सोपानदेव चौधरींशी संबंध प्रस्थापित झाले व भादूभाऊंनी सोपानदेवांचे पालकत्व पत्करले. आपल्या सेवेत भादूभाऊ निष्ठावंत तर होतेच परंतु कुशाग्र बुद्धिमत्तेचे, धीट व प्रामाणिक अधिकारी होते. जळगावला सर्कल इन्स्पेक्टर असताना गोऱ्या कलेक्टरांना त्यांनी वेळोवेळी धीटपणे योग्य सल्ले दिलेत. जळगावचे वामन तोताराम शिंपीशेट यांना मार्गदर्शन करून सरकारने जी. एस. हायस्कूल निर्मितीनंतर त्याच हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधावे म्हणून राखून ठेवलेले वामनशेट यांचे शेत सरकारकडून सोडवून दिले. त्यातील अर्धी जमीन वामनशेट यांनी भादूभाऊंना या कामगिरीबाबत बक्षीस देऊ केली. इतर समाजधुरिणांनीही तसाच आग्रह केला. परंतु निःस्पृह, निःस्वार्थ व समाजप्रेमी भादूभाऊंनी ही सूचना अमान्य करून फेटाळली व वामनशेट यांना विनंती केली की ''ही जमीन द्यायची असेल तर माझ्या समाजाच्या

विद्यार्थ्यांना वसतिगृह बांधण्यासाठी नाममात्र किंमतीत खरेदी करून द्यावी", वामनशेट यांनी ही सूचना मान्य केली. ही जमीन भालोदचे तोताराम तापीराम चौधरी यांची होती. त्यांनी ती लेवा बार्डिंसाठी दान केली. जमीन मिळविल्यावर नोकरीचा व्याप सांभाळून लेवा बोर्डिंगची इमारत बांधण्यासाठी देणग्या मिळविण्याची मोहीम काढली. ह्या कामात त्यांना मोलाचे सहकार्य लाभले ते भुसावळच्या रामदास लहानू पाटलांचे, फैजपूरच्या खुशाल हरी चौधरींचे आणि भालोदच्या तोताराम तापीराम चौधरी आणि मुरारीरामांचे. त्या वेळी सावद्याचे विष्णू हरी पाटील यांनी सर्वाधिक म्हणजे रु. ७,००० ची देणगी दिल्याने त्यांचे इच्छेनुसार त्यांचे दिवंगत बंधू फकीरा हरी पाटील यांचे नाव ह्या वसतिगृहास देण्यात आले.

४) कोलते, प्राध्या. डॉ. रमाकांत काशिनाथ (जन्म : २७ नोव्हेंबर १९४०)- यांचे मूळगाव नरवेल (ता. मलकापूर, जि. बुलडाणा) असून ते तेथील शेतकरी दांपत्य काशिनाथ सखाराम पाटील (कोलते) व नर्मदाबाई काशिनाथ पाटील कोलते यांच्या शेतकरी कुटुंबात जन्मास आले. कॉलेजमध्ये शिकत असताना विवरा (ता. मलकापूर) येथे जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत शिक्षकी पेशा पत्करला. ते १९६४ पर्यंत तेथे शिक्षक होते. शिक्षक असताना ते नागपूर विद्यापीठातून बी. ए. झाले. त्यानंतर औरंगाबादला जाऊन त्यांनी १९६७ मध्ये एम. ए. केले. एम. ए. ला त्यांना दक्षिणा फेलोशीप प्राप्त झाली होती. ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. १९६७ पासून ते १९८६ पर्यंत ते यवतमाळ येथील अमोलकचंद्र महाविद्यालयात मराठीचे व्याख्याता व पुढे २००० पर्यंत प्रपाठक व विभाग प्रमुख होते. १९८६ मध्ये डॉ. विष्णू भिकाजी कोलते यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास या विषयात आचार्य (डॉक्टर) पदवी मिळविली.

त्यांनी १९७८ मध्ये विदर्भाची बहिणाबाई मानल्या गेलेल्या रुक्मिणीबाई पाटील यांच्या **'रुक्मिणी गान'** काव्यसंग्रहाचे प्रकाशन केले आहे. तसेच **'नलगे वैकुंठ'** हा संतांच्या अभंगावरील लेखांचा संग्रह १९८१ मध्ये लिहून प्रकाशित केला आहे. इ. स. १९९७ मध्ये पद्मश्री डॉ. वि. भि. कोलते यांच्या प्रदीर्घ मुलाखतीचे शब्दांकन असलेला **'नलगंगेच्या तीरावरून'** ग्रंथ प्रकाशित केला आहे. अमरावती विद्यापीठाच्या विज्ञान स्नातक भाग १ च्या पाठ्यपुस्तकाचे **पूर्णामाय** भाग १,२ व ३ आणि अमरावती विद्यापीठाच्या वाङ्मय शाखेतील तीनही स्नातक वर्गाच्या पाठ्यपुस्तकांचे सहसंपादन केले आहे.

त्यांनी विद्यार्थ्यांच्या आणि विद्यापीठीय तसेच शासकीय आणि निमशासकीय अनेक संस्था व समित्यांवर वेळोवेळी पदे समर्थपणे भूषविली आहेत. ते पीएच. डी. चे गाईड असून बरेच विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. झाले आहेत व होत आहेत. बऱ्याच नियतकालिकांमध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध झालेले आहेत. आकाशवाणी व

दूरदर्शनवर त्यांची ५० पेक्षा अधिक भाषणे झाली आहेत. अनेक सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांशी त्यांची बांधिलकी असून सामाजिक व ज्ञातिबांधव संस्थांमध्ये त्यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. यवतमाळच्या मंडळ संस्था व सभागृह बांधणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

५) कोलते, पद्मश्री डॉ. विष्णूजी भिकाजी[१] (जन्म : २२ जून १९०८- मृत्यू: ८ एप्रिल १९९८) - लेवा पाटीदार समाजातील एक उत्तुंग साहित्यिक व्यक्तिमत्त्व, एक अतिशय प्रतिभावान व मान्यवर मराठी ग्रंथकार आणि महानुभाव साहित्याचे संशोधक व संपादक. या महान व्यक्तिमत्त्वाचा जन्म बुलडाणा जिल्ह्यात असलेल्या मलकापूर तालुक्यातील नरवेल या खेड्यात झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मलकापूर आणि खामगाव येथे झाले. ते नागपूर विद्यापीठात मराठीत सर्वप्रथम आल्याबद्दल त्यांना बेहरे पारितोषिक तसेच सर्व विषयांतील प्रथम क्रमांकाबद्दल मलक सुवर्णपदक मिळाले. इ. स. १९३१ मध्ये त्यांनी एल. एल. बी. पदवी मिळविली. तथापि वकिलीत तेवढा रस नसल्याने १९३१ पासून १९६६ मध्ये निवृत्त होईपर्यंत त्यांनी सरकारी महाविद्यालयातून मराठीचे प्राध्यापक राहणे पसंत केले. इ. स. १९४८ मध्ये महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानासंबंधी लिहिलेल्या गाढ संशोधनपर व अतिशय मौलिक प्रबंधावर त्यांना डॉक्टरेट मिळाली. इ. स. १९५६ ते १९६६ या काळात त्यांनी प्राचार्य पदाची धुरा वाहिली. त्यानंतर नागपूर विद्यापीठाचे १९६६ ते १९७२ एवढ्या प्रदीर्घ कालावधीसाठी कुलगुरूपद भूषविले. दरम्यानच्या काळात ते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे दीर्घकाळ सदस्य राहिले. ते गॅझेटिअर संपादक मंडळाचेही सदस्य होते. महाराष्ट्रातील अनेक मंडळांवरील अध्यक्षपदे वा सदस्यपदे त्यांनी भूषविली आहेत. वि. भि. कोलते समाजात प्रसिद्धी पावले ते भाऊसाहेब कोलते या नावाने.

भाऊसाहेबांनी मराठी साहित्यक्षेत्रात प्रथम कवी म्हणून प्रवेश केला. **लव्हाळी** हा त्यांचा काव्यसंग्रह १९३३ मध्ये प्रकाशित झाला. तथापि त्यांचा खरा पिंड संशोधकाचा असून महानुभावीय साहित्य हे त्यांच्या संशोधनाचे खास क्षेत्र व त्यातच त्यांनी आपले सारे आयुष्य वाहून घेतले.

भाऊसाहेबांच्या साहित्याबाबत त्यांची निवडक साहित्य निर्मिती देत आहे - **भास्करभट्ट बोरीकर: चरित्र व काव्यविवेचन** (१९३५), **महानुभाव तत्त्वज्ञान** (१९४५), **महानुभावांचा आचारधर्म** (१९४८), **श्री चक्रधर चरित्र** (१९५२) व **महानुभाव संशोधन** (१९६२) हे त्यांचे महानुभाव पंथाविषयीचे ग्रंथ त्यांच्या गाढ संशोधन व्यासंगाचे व विवेचकतेचे निदर्शक आहेत. महानुभाव साहित्यातील केशवराज सूरिकृत **मूर्तिप्रकाश** (१९६२), दामोदर पंडित विरचित **वच्छाहरण** (१९५३), नरेंद्रविरचित **रुक्मिणीस्वयंवर** (१९४०), भास्करभट्ट बोरीकरकृत **उद्धवगीता** (१९३५) आणि **शिशुपालवध** (१९६०), मुनिव्यासकृत **स्थानपोथी** (१९५०), महिंद्रभट्ट किंवा

म्हाइंभट्टकृत **गोविंदप्रभुचरित्र** (१९४४) आणि यथामूल पद्धतीने मुद्रित झालेले खळो व्यासाचे **सह्याद्रिवर्णन** (१९६४) ही त्यांची सापेक्षी संपादने पाठचिकित्सा पद्धतीने तयार केलेली आहेत. **''चक्रधर आणि ज्ञानेश्वर''** (१९५०), **''महानुभावांचे अवैदिकत्व''** यासारखे त्यांचे स्फूटलेखनही लक्षणीय आहे. **साहित्यसंचार** (१९६५) आणि **प्राचीन मराठी साहित्य संशोधन** (१९६८) ह्या ग्रंथांतून अनुक्रमे अर्वाचीन आणि प्राचीन साहित्यासंबंधीचे स्फूटलेखनही संकलित झालेले आहे. शिलालेख, ताम्रपटांच्या वाचनातही त्यांना गती होती. त्यांच्या **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख** (१९८७) या ग्रंथात महाराष्ट्रातील काही प्रमुख शिलालेख-ताम्रपटांचे सखोल विवेचन केलेले आहे. इ. स. १९९४ मध्ये **अजुनि चालतोची वाट** हे ७०० पानी आत्मचरित्र लिहिले.

भाऊसाहेब कोलतेंनी विदर्भ साहित्य संमेलनाच्या गोंदिया येथील अधिवेशनाचे (१९४८) आणि महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या भोपाळ येथील अधिवेशनाचे (१९६७) अध्यक्षपद भूषविले आहे. भाऊसाहेबांना १९५५ मध्ये मुंबईस भरलेल्या महानुभाव परिषदेने 'विद्यारत्न' हा किताब अर्पण केला व त्यांच्या महानुभाव संशोधनावर महानुभाव महंतांच्या मान्यतेचा शिक्कामोर्तब झाला. भाऊसाहेब नागपूरच्या भातृमंडळाचे संस्थापक सदस्य होते. या मंडळाबाबत त्यांची सामाजिक बांधिलकी व दातृत्व उल्लेखनीय आहे. १९९७ मध्ये मराठी साहित्य फाउंडेशनकडून त्यांना दोन लाख रू. चा पुरस्कार प्राप्त झाला. यावर्षी त्यांना अमरावती व नागपूर विद्यापीठाचे ''वाङ्मय पंडित'' (डी. लिट.) देऊन प्रोफे. यशपाल कपूरसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या विद्वानाच्या हस्ते गौरविण्यात आले. भाऊसाहेबांना भारत सरकारद्वारा १९९१ मध्ये पद्मश्री हा किताब प्रदान करण्यात आला आहे.

६) कोल्हे, जितेंद्र डिगंबर (जन्म : १५ डिसेंबर १९७०, मृत्यू : ३० ऑक्टो. २००२) - मूळगाव रोझोदे (ता. रावेर) असून गरीब शेतकरी कुटुंबात जन्मले. रोझोद्यास १० वी पर्यंतचे शिक्षण झाल्यावर शेतीच्या कामास लागले. घरच्या गरिबीमुळे १९९२ मध्ये सी. आर. पी. एफ. मध्ये दाखल होऊन मणीपूर (ईशान्य भारताच्या अशांत भागात) येथे रुजू झाले. मणीपूरला तीन वर्षे राहिल्यानंतर आसाम येथे आले. तेथे तीस उल्फा अतिरेक्यांशी लढता लढता आणखी दोघा सहकार्यासह हौतात्म्य प्राप्त झाले. यांच्या सन्मानस्मृत्यर्थ रोझोद्यास चिनावल रस्ता नाक्याजवळ स्मारक उभारण्यात आले आहे.

७) खडसे, एकनाथराव गणपतराव तथा नाथाभाऊ (जन्म : १ जून १९५२) - मूळगाव कोथळी (ता. मुक्ताईनगर) असून मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात जन्म झाला. शालेय शिक्षण कोथळी व मुक्ताईनगर येथे झाले व बी.कॉम. मुंबईहून झाले. आधीपासूनच समाजकार्याकडे ओढा असल्याने नोकरी न करता समाजकारण व राजकारणात पडले. ते भाजपचे क्रियाशील नेते आहेत. श्री. मधुकररावजी चौधरी व

श्री. जि. तु. महाजन यांच्यानंतर या तडफदार नेत्याने लेवा पाटीदार समाजातील नेतेपदाची पोकळी भरून काढली. आपल्या मतदारसंघातील इतर सर्व समाजांच्या लोकांना सांभाळून घेऊन व्यासपीठावरून लेवा पाटीदार असल्याचा अभिमान असल्याचे ठणकावून सांगणारे हे नेते एकूणच लेवा पाटीदार जनमानसाची व त्यातील नेतृत्वाच्या सर्वसमावेशक गुणांची ओळख साऱ्या महाराष्ट्रास करून देते झाले आहेत.

नाथाभाऊ हे एदलाबाद (मुक्ताईनगर) तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव आहेत. ते मुक्ताईनगर तालुका सहकारी खरेदी -विक्री संघ, बोदवड कृषी-उत्पन्न बाजार समिती, मुक्ताई क्रेडिट सहकारी संस्था, जयकिसान पीक संरक्षण सहकारी संस्था, मुक्ताई औद्योगिक व तेलबिया उत्पादक सहकारी संस्था, स्वामी विवेकानंद गृहतारण सहकारी संस्था, कोथळी दूध उत्पादक सहकारी संस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था आदी संस्थांचे अध्यक्ष आहेत. ते भुसावळ पीपल्स सहकारी बँकेचे संचालकही आहेत. आमदार होण्याआधी ते बरीच वर्षे कोथळी ग्रामपंचायत व एदलाबाद पंचायत समितीचे सदस्य होते. इ.स. १९९० मध्ये ते विधानसभेवर निवडून आले. १९९५ ते १९९९ पर्यंत त्यांनी महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री, वित्त आणि नियोजन ख्यात्याचे मंत्री आणि पाटबंधारे, लाभक्षेत्र विकास खात्याचे मंत्री म्हणून यशस्वीपणे धुरा वाहिली आहे. इ.स. १९९९ नंतर ऑगस्ट २००३ पर्यंत ते महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस होते, तर ऑगस्ट २००३ मध्ये त्यांची भाजप विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाली आहे. १९९९ नंतर विरोधी पक्षात राहूनही या झुंजार नेत्याने अनेक प्रश्न धसास लावले आहेत. नाथाभाऊंकडून लेवा पाटीदार समाजास फार मोठ्या अपेक्षा आहेत. नाथाभाऊंनी आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली असून लेवा पाटीदारांचे असो वा इतर कोणत्याही समाजाचे समाजकार्य; ते पक्षीय राजकारणाच्या सीमा ओलांडून करीत असतात. समाजकार्यात त्यांनी कधीच पक्षीय राजकारण गोवले नाही. विधिमंडळातील भाजपचे गटनेते असताना २००३ डिसेंबरमध्ये नाथाभाऊंना माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या हस्ते विधिमंडळातील उत्कृष्ट संसदपटू म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला व यथोचित सत्कार करण्यात आला. २००९ तसेच २०१४ मध्ये मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघातून पुन्हा भाजपाचे आमदार म्हणून निवडून आले आहेत. २०१४ मध्ये ते महाराष्ट्राचे महसूलमंत्री झाले. त्याबरोबर कृषी व अन्य महत्त्वाची १२ खाती सांभाळत आहेत.

८) खडसे, खासदार श्रीमती रक्षा निखिल (जन्म : १३ मे १९८७)- महाराष्ट्राचे महसूलमंत्री श्री. एकनाथराव खडसे यांच्या स्नुषा, तांदूळवाडी (ता. रावेर) येथील श्री. जगदीश पाटील यांच्या समाजसेवी घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण नाशिक व आणंद (गुजरात) येथे झाले. नाथाभाऊंचे पुत्र निखिल खडसेंशी विवाह झाला. त्या मुक्ताईनगरच्या श्रीमती जी.जी. खडसे महाविद्यालयातून बी.एस्सी.

कॉम्प्युटर सायन्स झाल्या. ग्रॅज्युएट झाल्यावर आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात त्यांनी कोथळी येथील ग्रामपंचायतीत निवडून येऊन सरपंचपदाने केली. १४-९-२०१० ते २९-३-२०१२ पर्यंत सरपंचपदावर असताना त्यांनी अनेक ग्रामसुधार कार्यांनी कोथळीचा कायापालट केला.

शिक्षण व आरोग्य सभापती, जि.प. जळगाव म्हणून केलेले कार्य:-

जिल्हा पातळीवर यशस्वीरीत्या सेमी इंग्रजी माध्यम जि.प. मराठी शाळांमध्ये सुरू केले.

जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य केंद्रात गरोदर स्त्रियांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा मिळण्यासाठी पाऊल उचलले.

जिल्ह्यात पाच नवीन ग्रामीण आरोग्य केंद्रे उघडली.

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देऊन हातभार लावला.

जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सक्रिय सहभाग घेतला.

जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये ई-शिक्षण देण्यासाठी पावले उचलली.

जळगाव जिल्ह्यातील दुरस्थ गावांमधील पाणीपुरवठ्याची समस्या सोडवली.

सामाजिक कार्ये :-

२०१०-२०१३ या कालखंडात गुरुनाथ फाऊंडेशनच्या सचिव म्हणून वेगवेगळी सामाजिक कार्ये सुरू केली व यशस्वीरीत्या पूर्ण केली. सध्या त्या गुरुनाथ फाऊंडेशनच्या अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

जिल्ह्यातील होतकरू व गरीब विद्यार्थ्यांसाठी गुरुनाथ फाऊंडेशनच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा शिक्षण व प्रशिक्षण वर्ग चालवले.

२०१२ मध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन केले. त्यांच्या लोकप्रियतेमुळे जवळपास ५,००० रुग्णांनी फायदा घेतला तसेच त्यांना चष्मे सुद्धा दिले गेले. ५५७ रुग्णांना फाऊंडेशनच्या माध्यमातून मोठ्या शस्त्रक्रियेसाठी मुंबईला पाठवून शस्त्रक्रिया केल्या.

२०१३ ला मुक्ताईनगरला पोलीस पूर्व भरती सराव शिबीर आयोजित केले.

आरोग्य संवर्धन व तपासणी आयोजन. नेत्र संवर्धन व तपासणी शिबिरांचे आयोजन.

जळगावला मुलींचे वसतिगृह बांधण्यासाठी पावले उचलली.

त्यानंतर त्या जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्या. त्यात स्त्रीशिक्षण तसेच शिक्षण व आरोग्यविषयक सुधारणा कार्य केले. त्यांचा सामाजिक व शैक्षणिक सुधारणाकार्यात सिंहाचा वाटा आहे. इ.स. २०१४ मध्ये श्री. नरेंद्र मोदी लाटेत त्या भाजपच्या खासदार म्हणून निवडून आल्या. संसदेत त्या जिल्ह्यातील समस्यांना वाचा फोडत असतात.

९) खडसे, सोपान ओंकार (जन्म : १ जुलै १९२७) - मूळगाव हरणखेड (ता. मलकापूर, जि. बुलडाणा). अतिशय गरीब मजूर शेतकरी कुटुंबात जन्म झाला. गरिबीमुळे शिक्षण फक्त पाचवीपर्यंत झाले. तेही दाताळ्यास आजोळी आपले मामा पुंजाजी गानू महाजन यांचेकडे. मामांनी त्यास माळेगावला आणले व गोविंद नारखेडे यांचेकडे शेतकामास ठेवले. याच वेळेस दाताळ्याचे मुंबईस्थित शंकरराव देशमुखांच्या नजरेस सोपानची कामसू वृत्ती आल्याने ते १९४६ मध्ये एकोणिसाव्या वर्षी मुंबईला घेऊन आले व सोपानला आश्रय दिला. सोपान त्यांच्याकडेच जेवायचा व ते राहत असलेल्या माहीमच्या इमारतीत खोलीसमोरील पॅसेजमध्ये झोपायचा. सोपानने काही दिवस शिंप्याकडे काज-बटनाचे काम केले. त्यानंतर बॉम्बे फिल्म लॅबमध्ये ते हमाली करू लागले. हमाली करतानाच वायरमनचा कोर्स पूर्ण करून याच लॅबमध्ये ते वायरमन म्हणून काम करू लागले. सोपानची कामसू वृत्ती व जिद्द पाहून अँग्लो इंडियन साहेबाने त्यास बॉम्बे साउंड सर्व्हिस या कंपनीत असिस्टंट साउंड रेकॉर्डिस्ट म्हणून लावले. १९५० मध्ये त्यांचा सावरगावच्या (ता. मलकापूर) अनसूयाबाईशी विवाह झाला. लग्नानंतर वर्षभर ते कल्याण येथे एका झोपडीवजा खोलीत राहिले. १९५१ मध्ये जनार्दन निनू खडसेंनी त्यांना माहीमला आपली खोली राहावयास दिली. तेव्हापासून अर्थार्जन करायचे तर मेहनत करायला पाहिजे म्हणून दिवसाचे १६ ते १८ तास ते झपाटल्यासारखे काम करू लागले. पुढे याच कंपनीत ते रेकॉर्डिस्ट झाले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी हजारो नावाजलेली चित्रपटगीते, भावगीते व इतर गाण्यांचे रेकॉर्डिंग केले आहे. अतिकामामुळे पॅरालिसीससारख्या आजाराने त्यांना ३१ जुलै १९८७ पासून सेवानिवृत्त व्हावे लागले.

गरीब, होतकरू लेवा पाटीदार मुलांसाठी या कर्मतपस्व्याचे जीवन एक आदर्श ठरावे. एवढेच नाही तर समस्त लेवा पाटीदार समाजास भूषण वाटावे, असे सोपान खडसे कर्मतपस्वी आहेत.

१०) खर्चे, प्राचार्य रामचंद्र नामदेव (जन्म : ८ नोव्हेंबर १९२३, मृत्यू : १ ऑक्टोबर १९९३) - यांचे मूळगाव शेलगाव बाजार (ता. मोताळा, जि. बुलडाणा), अतिशय गरीब शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. कुशाग्र बुद्धीच्या रामचंद्र खर्चेंचे प्राथमिक शिक्षण शेलगाव बाजारला झाले. पुढे माध्यमिक शाळेची फी भरायलाही पैसे नसल्याने १९४१ मध्ये खामगाव एसएससी सेंटरवरून बाहेरून परीक्षा देऊन ते गणितात प्रावीण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्या वेळी ते एसएससीला महाराष्टातून १७ वे आले होते. पुढे हिस्लॉप कॉलेजमध्ये नागपूरला त्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला व किंग एडवर्ड स्कॉलरशिप (दरमहा ३६ रुपये) व मलकापूरचे बॅरिस्टर टी. एस. पाटील यांच्या आर्थिक मदतीवर पुढील शिक्षण घेतले. १९४५ मध्ये तीन गोल्ड व दोन सिल्व्हर मेडल मिळवून बी. ए. ला नागपूर विद्यापीठातून पहिले आले. १९४७ मध्ये नागपूर विद्यापीठातून गोपाळदास मेहता सुवर्णपदक मिळवून एम. ए. अर्थशास्त्रात पहिले

आले. एम. ए. झाल्यावर १९४७-४८ मध्ये एक वर्ष हिस्लॉप कॉलेज व पुढे १९४८-४९ ते १९५५-५६ पर्यंत अमरावतीच्या शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्य केले. पुढे १९५६ पासून १९८३ मध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत बुलडाण्याच्या जिजामाता महाविद्यालयात प्राध्यापक-प्राचार्य म्हणून कार्यरत होते. रामचंद्र खर्चे प्राचार्य झाले तेव्हा बुलडाण्याचे जिजामाता महाविद्यालय अंकुरावस्थेत होते. त्यांना त्याचे रूपांतर एका मोठ्या शानदार अद्ययावत महाविद्यालयात होण्यास या कामात साथ दिली. त्यांच्या पत्नी विमलाबाईंनी. ते विद्यार्थ्यांचे अत्यंत आवडते प्राध्यापक होते. ते चिकित्सक संशोधक होते. १९७३ मध्ये त्यांना राज्य पुरस्कृत उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला. त्यांच्या विद्वत्तेमुळे त्यांच्या वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये अनेक संस्था-समित्या, शासकीय व निमशासकीय समित्यांवर सभासद ते अध्यक्ष अशा पदांवर नियुक्त्या झाल्या होत्या. महाराष्ट्र शिक्षण प्रसार मंडळावरही त्यांनी काही वर्षे कार्य केले. १९८४-८५ ते १९९१-९२ च्या कालावधीत अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या अनुपस्थित त्यांनी कुलगुरुपदाची धुरा सांभाळली. सिनेट मेंबर म्हणून काम पाहिले. प्रा. खर्चे हे निःस्वार्थी कर्मयोगी होते. त्यांनी गरीब गरजू विद्यार्थ्यांना कसलीही अपेक्षा न ठेवता सर्वतोपरी मदत केली.

११) खर्चे, डॉ. राम मांगो (जन्म : १९४८) - मूळगाव तळणी (ता. मोताळा, जि. बुलडाणा) असून एका शेतकरी कुटुंबात जन्म झाला. शालेय शिक्षण मलकापूर येथे व पुढील शिक्षण नागपूर येथे झाले. लहानपणापासून बुद्धिमान म्हणून गणले जात. ते एम.एस्सी., पीएच.डी., एम.ए., एल.एल.बी. झाले. सहकार खात्यात अधिकारीपदावर लागल्यावर आपल्या कर्तृत्वाने व अंगभूत गुणांनी अप्पर आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य या उच्च पदापर्यंत पोहोचले होते. त्यांनी **स्ट्रॉबेरी उत्पादन तंत्र व विक्री व्यवस्था, विकसनशील अर्थव्यवस्थेतील सहकारी साखर कारखानदारी** आणि **ऊस व्यवस्थापन** हे अत्यंत अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्राच्या युती शासनाने आता त्यांची महाराष्ट्र राज्य कृषी विकास व संशोधन संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली असून त्यांना राज्य मंत्रीपदाचा दर्जा दिला आहे.

लेवा समाजावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्यांमध्ये यांना वरचा क्रमांक द्यावा लागेल. सन १९८९ पासून ते भ्रातृ मंडळ, पुण्याचे अध्यक्ष होते. पुणे भातृ मंडळाने १९९५ मध्ये ग्रामीण भागातून येणाऱ्या ६५ लेवा पाटीदार विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतिगृहाची निर्मिती केली आहे. सौ. शशिकला खर्चे ह्या डॉ. राम खर्चेंच्या सुविद्य पत्नी असून चित्रकार आहेत. त्यांनी **वेरूळचे वैभव**नामक पुस्तकही लिहिले आहे. त्यांनी ग्रामीण भागातील कलावंतांसाठी दुधलगाव (ता. मलकापूर) सारख्या खेड्यात आर्ट गॅलरी स्थापन केली आहे.

१२) खाचणे, डॉ. वसंत भोजराज - मूळगाव यावल. यांचे वडील कै. डॉ.

बी. व्ही. खाचणे भुसावळला स्थायी झाले. त्यांचे वडील लेवा पाटीदार समाजातील पहिले एम. बी. बी. एस. होते. डॉ. वसंत खाचणे कोलकाताहून एम. बी. बी. एस. झाल्यावर दिल्लीस उच्च शिक्षण घेतले. १९६६ मध्ये ते अमेरिकेला गेले. तेथे एम. एस. ओपन हार्ट सर्जरीत पदवी संपादित केली. काही दिवस अनुभवासाठी नोकरी केल्यावर अमेरिकेतच स्वतःचे हॉस्पिटल काढले. तेथे एका अमेरिकन वृद्धेची ब्लडलेस हार्ट सर्जरी ऑपरेशन केल्यावर त्यांना जगभर प्रसिद्धी मिळाली. समाजास दान देण्यातही डॉ. वसंत खाचणे आघाडीवर आहेत. त्यांनी भुसावळला खाचणे हॉल बांधण्यासाठी मोठी रक्कम दिली. डॉ. खाचणे हे जरी अमेरिकेत राहत असले तरी मातृभूमीशी नाळ कायम ठेवून ते वर्षातून दोन-चार वेळा खानदेशात येत असतात व समाजकार्यासाठी भरीव देणग्या देत असतात.

१३) चोपडे, प्राचार्य डॉ. तोताराम नामदेव (जन्म : १० जून १९३२) - यांचे मूळ गाव चिनावल (ता. रावेर, जि. जळगाव) असून एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण चिनावल येथे. १९५० मध्ये एस.एस.सी झाल्यावर खिरोद्याहून १९५२ मध्ये डीएड प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले व शिक्षकी पेशा पत्करला. १९६१ मध्ये बहिस्थ विद्यार्थी म्हणून पुणे विद्यापीठातून बी. ए. झाले. १९६२ मध्ये गारगोटी येथून बी. एड. बेसिक प्रथम क्रमांकात उत्तीर्ण. गारगोटीच्या जीके इन्स्टिट्यूटमध्ये केंद्र सरकारची रिसर्च स्कॉलरशिप मिळाली. त्या संस्थेत एकशिक्षकी शाळा अभ्यासक्रम व अध्यापन पद्धती यावर संशोधन करून केंद्र सरकारच्या एनसीईआरटी संस्थेत सादर केलेला अहवाल संपूर्ण भारतभर लागू करण्यात आला. १९६४ मध्ये ते नागपूर विद्यापीठातून एम. ए. झाले. १९५२ ते १९६४ पर्यंत त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून शिक्षण सेवा केली. १९६४ ते १९६६ दोन वर्षे जळगाव बीएड कॉलेजमध्ये प्राध्यापिकी करीत असताना लिहिलेले **'ग्रामीण शिक्षणाची मूलतत्त्वे'** हे पुस्तक पुणे विद्यापीठाने बी. एड. च्या अभ्यासक्रमासाठी मंजूर केले.

त्यांनी केलेल्या लेवा गणबोलीच्या संशोधनाला दत्तो वामन पोतदार व ग. ह. खरेंचे मार्गदर्शन लाभले. १९७२ ते १९९२ पर्यंत भुसावळ आर्ट्स, सायन्स व पु.ओं. नाहटा वाणिज्य महाविद्यालयात भाषाशास्त्र व शिक्षणशास्त्राचे अध्यापन केले. त्यांनी पुणे विद्यापीठातून भाषाशास्त्रज्ञ ना. गो. कालेलकरांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. मिळविली. पुणे विद्यापीठाच्या भाषाशास्त्र अभ्यास मंडळाचे डॉ. चोपडे २० वर्षे सदस्य होते.

लेवा बोलीवरील डॉ. चोपडे यांचा प्रबंध आंतरराष्ट्रीय ध्वनात्मक लिपीत लिहिलेला असून त्यात मराठी भाषाशास्त्रानुसार व्याकरण तयार केले आहे. त्यामुळे या बोलीभाषेवर संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना या प्रबंधाचा खूप फायदा झाला आहे.

भुसावळच्या पीपल्स कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १९९२ मध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत प्राचार्य म्हणून धुरा वाहिली. पीपल चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

१४) चौधरी, डॉ. अशोक रामू (जन्म : ९ ऑक्टोबर १९४४) - मूळगाव किनगाव (ता. यावल) असून गरीब शेतकरी कुटुंबात जन्मले. ते लहानपणापासूनच हुशार असून १९६२ मध्ये ११ वी एस.एस.सी. ला जळगाव जिल्ह्यात सर्वप्रथम आले. १९७२ मध्ये ते पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस. विशेष प्रावीण्य मिळवून उत्तीर्ण झाले. १९७७ मध्ये मुंबई विद्यापीठातून एम.एस. (जनरल सर्जरी) ही ते विशेष प्रावीण्याने उत्तीर्ण झाले. १९८० पर्यंत छाया म्युनिसिपल हॉस्पिटल, अंबरनाथ येथे चीफ मेडिकल ऑफिसर म्हणून कार्य केले. १९८० मध्ये स्वतःचे चौधरी हॉस्पिटल काढले. नंतर आनंद हॉस्पिटल काढले. संपूर्ण कुटुंबाने वैद्यकीय सेवेचे व्रत घेतले आहे. त्यांच्या पत्नी डॉ. सौ. सुरेखा चौधरी या डोळ्यांच्या निष्णात डॉक्टर आहेत. एक मुलगा राहुल हा एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. झाला असून स्नुषा एम.डी. (गायनाकॉलॉजी) आहे. धाकटा मुलगा कुणाल शिकत आहे. लहानपणापासून जनसेवेचे व्रत घेतले असून महाविद्यालयातही त्यांना चाचा चौधरी नावानेच वर्गमित्र ओळखत. सामाजिक कार्याकडे ओढ असून भाजपच्या राजकारणात सक्रिय आहेत. अंबरनाथ व उल्हासनगर येथील लेवा पाटीदार मंडळांना ते सढळ हस्ते आर्थिक मदत करतात. या परिसरातील हुशार व गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आर्थिक व इतर सर्वतोपरी मदत करतात.

१५) चौधरी, अच्युत धनाजी तथा दादासाहेब चौधरी (१८९९-१९८५) - मूळगाव डोंगरकठोरे (ता. यावल) येथील गरीब शेतकरी कुटुंबातील दादासाहेब शिक्षणाची पार्श्वभूमी नाही, कारखानदारीची परंपरा नाही, आर्थिक स्थिती जेमतेम, अशा प्रतिकूल परिस्थितीतूनही दादासाहेबांनी साहसी जिद्दीने जर्मनी व अमेरिकेत पेपर टेक्नॉलॉजीचे शिक्षण पूर्ण केले. भारतात आल्यावर कर्नाटक राज्यातील दांडेली येथील भव्य कागद कारखाना उभारण्यात यशस्वी झालेले, असे हे विलक्षण व्यक्तिमत्त्व.

कर्नाटकातील दांडेलीच्या वेस्ट कोस्ट पेपर मिलचे ते शिल्पकार राहिले. कर्तृत्वाने शून्यातून ब्रह्मांड निर्माण करणारे हे महर्षी कागद निर्मिती क्षेत्रात अमर झाले. डोंगरकठोरे या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी त्या काळी स्वतः २५,००० रु. ची देणगी देऊन व वेस्ट कोस्ट मिलकडूनही १५,००० रु. ची देणगी मिळवून 'अच्युत धनाजी विद्यालय' ही माध्यमिक शाळा काढली.

१६) चौधरी, गणेश सुपडू (जन्म : २ डिसेंबर १९०५, मृत्यू : १० फेब्रुवारी १९९१) - मूळगाव आमोदे (ता. यावल) असून मध्यम सुसंस्कृत शेतकरी कुटुंबात जन्मले. गणेश चौधरी लहानपणापासूनच हुशार असल्याने इंजिनीअरिंगला पुण्यास गेले. तेथे १९२९ मध्ये ते बी.ई. सिव्हिल झालेत. त्या वेळी महाराष्ट्रात तीन इंजिनीअर

झालेल्या मुलांमध्ये गणेश चौधरी हे लेवा पाटीदार समाजातील पहिले इंजिनीअर होत. त्यांनी नोकरीची सुरुवात अहमदनगर डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डात केली. तेथून ते मुंबई शासनात, बांधकाम विभागात सचिवपदी नेमणूक होऊनही राजकारणी व भ्रष्टाचारापासून दूर राहिले. १९६० मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर सरळ आमोद्याला शेती करण्यास आले व साध्या मातीच्या धाब्याच्या घरात राहू लागले.

आमोदे गावातील माध्यमिक शाळेची भव्य इमारत, आमोद्यातील सुंदर भवानी मंदिराची वास्तू, फैजपूर येथील कै. धनाजी नाना चौधरी महाविद्यालयाची मनाला भुरळ पाडणारी भव्य वास्तू, खिरोदा येथील साने गुरुजी विद्याप्रबोधिनीची इमारत आदी इमारती व वास्तूंचे आराखडे कै. गणेश चौधरींनी केले असून या वास्तू पूर्ण होईपर्यंत नि:स्वार्थ भावनेने पदरमोड करून ते सतत देखरेख करीत असत.

१७) चौधरी, गणेश श्रावण (जन्म : १ नोव्हेंबर १९३८, मृत्यू : २१ एप्रिल १९८२)- मूळ गाव डांभुर्णी (ता. यावल). एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात जन्म झाला. त्यांचे शिक्षण बीएससी, बीएड झाल्यावर डांभुर्णीलाच हायस्कूलमध्ये शिक्षकी पेशा पत्करला. लहानपणापासूनच संवेदनशील कवीमन. त्यांचे साहित्य चांगलेच गाजले. त्यांचा सुशील पत्नी शारदा व मुले तुषार, राजेंद्र व गीतांजली असा परिवार होता. त्यांना स्किझोफेनिया झाल्याने त्या धक्क्यात त्यांनी पत्नी व मुलांना ३० जून १९६८ रोजी देवाघरी पाठविले. कोर्टाने दोषी ठरवून ७ डिसेंबर १९६८ रोजी फाशीची शिक्षा जाहीर केली. परंतु, स्किझोफेनिया झाला असल्याने त्यांची रवानगी नागपूरच्या वेड्यांच्या इस्पितळात करण्यात आली. तेथेही त्यांनी कविता व साहित्यनिर्मिती केली. त्यांच्या साहित्यात **तृषार्त** - कवितासंग्रह, १९८४, **सूर्य मध्यरात्रीचा** आणि **दोन एकांकिका** - १९८४, **नागवा** - १९८७, **काचेचं मन** , **पत्रसंग्रह** - १९९० आणि **तृषार्तनंतरची कविता** - १९९४ यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. डॉ. वि. भि. कोलते, सुरेश भट, म. वा. धोंड, डॉ. अडवे यासारख्या मान्यवरांनी त्यांच्या साहित्याची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झाले. त्यात महाराष्ट्र शासनाचा केशवसुत पुरस्काराचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. उपरोक्त साहित्याशिवायही त्यांच्या बऱ्याच कविता, कथा व साहित्य प्रकाशित झाले आहे.

१८) चौधरी, डॉ. कि. का. (जन्म : १९३५) - मूळ गाव खिरोदे (ता. रावेर). गॅझेटिअर विभागाचे संपादक असताना चिकित्सक अभ्यासू वृत्तीचे **हिस्टरी ऑफ बॉम्बे: मॉडर्न पिरिएड** आणि **महाराष्ट्र अ‍ॅण्ड इंडियन फ्रिडम स्ट्रगल** हे ग्रंथ गाजलेत. त्यांनी **ग्रेटर बॉम्बे डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** (तीन खंड), **ठाणे डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर** हे इंग्रजी डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर तसेच **परभणी, कोल्हापूर, वर्धा, रायगड व जळगाव** जिल्ह्यांचे मराठीतील **गॅझेटिअर** ग्रंथ, **बॉटनी अ‍ॅण्ड फ्लोरा ऑफ महाराष्ट्र** (इंग्रजीतील स्टेट गॅझेटिअर); **महाराष्ट्र: भूमी व लोक** (मराठी राज्य

गॅझेटिअर) आणि **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रिडम मुव्हमेंट (तीन खंड)** संपादित व प्रकाशित केले आहेत. छोडो भारत विषयावरील सूक्ष्म अभ्यास असलेले डॉ. चौधरी यांचे **क्वीट इंडिया रिव्होल्यूशन्सःदी इर्वोल्स ऑफ इटस् सेंट्रल डायरेक्शन** (पृ. ४५५), १९९६; हा ग्रंथ खूप गाजला आहे. त्यांच्या **क्रांतिपर्व : महाराष्ट्राचे योगदान** (२०१३) ग्रंथास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांचे **झुंजार पुणे : वसाहतवाद व सामाजिक विषमतेशी लढा** (२००८) हे पुस्तक विद्यापीठांनी अभ्यासक्रमात लावले आहे. डॉ. चौधरी यांनी महाराष्ट्राच्या इतिहास व संस्कृती यावर इंग्रजी तसेच मराठी भाषेतून प्रचंड लेखन केलेले आहे. आधुनिक महाराष्ट्र व स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास या ज्ञानशाखेवर त्यांचे प्रभुत्व असण्याचे कारण म्हणजे त्यांची विवेचक आणि चिकित्सक बुद्धी, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि त्यांनी मिळवून ठेवलेले पोलीस गुप्तचरांचे अस्सल अहवाल व ब्रिटिश सरकारची गोपनीय कागदपत्रे, संशोधनपत्रिका आणि वृत्तपत्रांमध्ये त्यांचे ६० च्या वर लेख आलेले आहेत. स्वातंत्र्य आंदोलनावर त्यांचे लेखन चालू असते. ऑगस्ट २००४ मध्ये कॅनडात भरलेल्या युनेस्कोच्या संमेलनात ते भारताचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. तेथे त्यांचा शोध प्रबंध चांगलाच गाजला.

१९) चौधरी, खुशाल हरी (जन्म : १ ऑगस्ट १८७९) - मूळगाव फैजपूर असून पिढीजात जमीनदार श्रीमंत घराण्यात यांचा जन्म झाला. शालेय शिक्षणानंतर विसाव्या वर्षीच ते भुईमुगाच्या शेंगा व कपाशीच्या व्यापारात पडले. त्यांचे सार्वजनिक कार्य भरीव आहे. व्हिलेज मुनसफ, म्युनिसिपल कौन्सिलर, नगराध्यक्ष, ऑनररी मॅजिस्ट्रेट वगैरे बहुमानाच्या जागा त्यांनी भूषविल्या आहेत. फैजपूर नगरपालिकेवर सतत २४ वर्षे नगराध्यक्ष होते. त्यांनी धों. शा. महाजन, सो. ग. कुलकर्णी व फडके गुरुजींच्या मदतीने १९१७ मध्ये फैजपूर एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व शाळा नगरपालिकेच्या स्वाधीन केली. वामन धोंडू महाजन (तत्कालीन स्कूल बोर्ड चेअरमन) यांच्या मदतीने १९३८ मध्ये या शाळेचे रूपांतर हायस्कूलमध्ये केले. ह्या शाळेत केशवसुत शिक्षक होते, तर बा. सी. मर्ढेकर ह्या शाळेचे विद्यार्थी होते. जळगावचे लेवा बोर्डिंग स्थापण्यात भालोदचे तोताराम चौधरी, धानोऱ्याचे रामदास लहानू पाटील, सावद्याचे भादूभाऊ कुरकुरे आणि विष्णू हरी पाटील यांच्याबरोबर खुशाल हरी चौधरींचाही सिंहाचा वाटा आहे. ते कित्येक वर्षे फकिरा हरी लेवा बोर्डिंग संस्थेचे प्रेसिडेंट होते. अशा ह्या आध्यात्मिक प्रवृत्तीच्या सद्गृहस्थाने शुचिर्भूतपणा, उद्योगशीलता, मनमिळाऊ स्वभाव ह्या गुणांनी अमाप लोकप्रियता मिळविली.

२०) चौधरी, जनार्दन धनू तथा भानुसर (जन्म : ७ जुलै १९२५, मृत्यू : १८ फेब्रुवारी २००८) - मूळगाव खिरोदे (ता. रावेर). एका सुसंस्कृत शेतकरी कुटुंबात यांचा जन्म झाला. वडील धनू एको चौधरी हे धनाजी नानांचे स्नेही व गांधीवादी विचारसरणीचे

असून खिरोद्याचे सरपंच होते. आई यमुनाबाई ह्या लेवा समाजातील पहिल्या फायनल. भानुसरांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण खिरोदे, भालोद व फैजपूर येथे झाले. माध्यमिक शाळेत शिकत असताना १९४२ मध्ये शाळा सोडून चले जाव चळवळीत भाग घेतला. त्यामुळे सतराव्या वर्षीच सहा महिने नाशिक जेलमध्ये कारावास भोगावा लागला. शासनाकडून ताम्रपट मिळाला आहे. अकरावी मॅट्रिक झाल्यावर बी.ए. फर्ग्युसन कॉलेज, पुणे व एम. जे. कॉलेज, जळगाव येथून केले. पुण्याच्या टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनमधून १९५१ मध्ये बी.टी. झालेत. बोर्डी येथून डी.बी.एड. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेत. १९५० ते १९६१ च्या दरम्यान म्युनिसिपल हायस्कूल, फैजपूर, न्यू इंग्लिश स्कूल, भालोद व अध्यापक विद्यालय, खिरोदे येथे अध्यापक राहिले. अध्यापक विद्यालय, खिरोदे येथे मुलोद्योगी शिक्षणाचे विविध प्रयोग करून सर्वोदयी कार्यक्रम राबविला. १९६१ मध्ये ते अमरावतीच्या शिवाजी महाविद्यालयातून एम.ए. (मराठी) झालेत. १९६१ ते १९८५ या दरम्यान धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर येथे मराठी विभागप्रमुख, उपप्राचार्य व प्राचार्य ही पदे भूषविलीत. १९८५ मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर तेव्हापासून सप्तपुट ललित कला भवन, खिरोदे येथे सौंदर्यशास्त्राचे अध्यापन केले. धनाजी नानांच्या प्रेरणेने खिरोद्यास कलाभिरूची नाट्यमंडळ काढून मित्रमंडळींच्या साहाय्याने गावोगाव संगीत-नाटके सादर केली. त्यात भानुसरांनी स्त्रीभूमिका वठवल्या. १९४४ पासूनच त्यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली. त्यावर्षी 'सत्यकथेतून' ही कविता प्रसिद्ध झाल्यावर मराठीतून व लेवा गणबोलीतून त्यांनी अनेक कविता केल्यात. ते उत्तम लेखकही होते. त्यांच्या काव्यसंग्रहांमध्ये **अंधारयोगी** (प्रकाशन १९७९, ह्यात भावगीते व गझला आहेत); **तीन संगीतिका** (१९८८, ह्यात **एकलव्य, सती सावित्री** व **सुकीची सुखाई** या तीन संगीतिका आहेत), **प्रकृती आणि पुरुष** (१९९९,स्त्री-पुरुषावर आधारित); **गावाकडली गाणी** (२०००, लेवा गणबोलीतील कवितासंग्रह) आणि **निमित्त** (२०००, ह्यात नैमित्तिक कविता, संस्थागीते, अभंग, आरत्या, नाट्यगीते, स्वागतगीते, सत्कारगीते आहेत.) यांचा समावेश आहे. **गावाकडली गाणी** हा कवितासंग्रह लेवा गणबोलीतील बहिणाबाईनंतरचा दुसरा काव्यसंग्रह ठरेल. गद्यलेखनात **कर्मयोगी** (१९५७-धनाजी चौधरींचे चरित्र), **समिधा** (१९७७, खिरोदे परिसरात संकल्प म्हणून केलेल्या विकासकामांचा आढावा) आणि **अनुबंध** (२००१, व्यक्तिचित्र, शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक लेख) यांचा समावेश आहे. त्यांनी बऱ्याच ग्रंथांचे संपादनही केले आहे. त्यात प्रामुख्याने भाऊसाहेब बोंडे गौरवग्रंथ **आश्वासन,** (१९६८), **नेहरू विद्यानगर स्मरणिका** (१९६१ व १९७०), **मराठी विज्ञान परिषद, खिरोदे अधिवेशन स्मरणिका** (१९७७), **फैजपूर कॉंग्रेस सुवर्ण महोत्सव गौरव ग्रंथ,** १९८८ (सह संपा. मान. मधुकररावजी चौधरी व प्रा. रमेश पानसे), **एकविसाव्या शतकातील शिक्षण**-जनता शिक्षण मंडळ हीरक महोत्सव गौरव ग्रंथ (२००१) आणि **आमचा गाव**

खिरोदा (१९६९-गांधी जन्म-शताब्दीनिमित्त) यांचा समावेश करता येईल. त्यांच्या **निमित्त** या काव्यसंग्रहाला 'तुका म्हणे' पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी लेवा बोलीत **मनाच्या राउळीचे अभंग** रचले आहेत.

सामाजिक कार्यातही भानुसर हिरिरीने भाग घेतात. त्यांनी विवाहविधी मराठीत पण सुगम केला व त्यानुसार शेकडो विवाहांचे पौरोहित्यही केले. ते उत्तम शिक्षक म्हणून लोकप्रिय झालेत. शास्त्रोक्त गायक, सतार वादक व प्रवचनकार म्हणूनही ते ख्यातनाम होते. ते मार्मिक-विनोदी वक्ता म्हणूनही प्रसिद्ध होते. ते खिरोद्याच्या जनता शिक्षण मंडळाचे कार्यकारी सदस्य असून माजी उपाध्यक्ष व माजी सचिव होते. फैजपूरच्या तापी परिसर विद्यामंडळाची कार्यकारिणी व नियामक मंडळाचे सदस्य होते. तसेच पालच्या सातपुडा विकास मंडळ या संस्थेचे पहिले अध्यक्ष व विश्वस्त होते. १९७७ मध्ये खिरोद्याला संपन्न झालेल्या मराठी विज्ञान परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते. भानुसर पुणे व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रम समितीचे सदस्य होते. ते खिरोद्याच्या ग्रामस्वराज्य भवन ट्रस्टचे सदस्य, ग्रामोत्सवचे संयोजक होते. मधुकर सहकारी साखर कारखाना, फैजपूर; धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर व कलाभवन, खिरोदे यांच्या निर्मितीत भानुसरांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी वृत्तपत्रे, नियतकालिके व गौरवग्रंथांमधून विपुल स्तंभलेखन व काव्यलेखन केले आहे. भोरगाव पंचायत कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असे. फैजपूर-खिरोदा परिसरात मान. मधुकररावजी चौधरी व मान. जे. टी. महाजन यांच्या समवेत शैक्षणिक व सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असे. त्यांच्या प्रेरणेने त्यांच्या एकत्र कुटुंबातून 'यमुनातीर' हे कौटुंबिक वार्षिक काढण्यात येते.

२१) चौधरी, टी. के. (जन्म : १९४५) - मूळ गाव फैजपूर असून सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मले. टी. के. मॅट्रिक झाले तेव्हा चीनने भारतावर आक्रमण केले (१९६२). टी. के. केवळ १७ वर्षांचे असताना देशप्रेमाने प्रेरित होऊन त्यांनी पुढचामागचा कसलाही विचार न करता वायुसेना सैनिक म्हणून नोकरी पत्करली. चीन-भारत युद्धात मोठ्या जिकिरीने त्यांच्यावर सोपविलेली कामगिरी चोख बजावली.

त्यानंतर सैन्यात राहूनच त्यांनी पुढील चार वर्षांत पदवी संपादन करून भूदलात कमिशन मिळवून ते कॅप्टनपदापर्यंत पदोन्नती मिळविण्यात यशस्वी झालेत. १९६५ आणि १९७१ च्या दोन्ही युद्धात तोफखान्यात बजावलेल्या अतुलनीय शौर्याबद्दल त्यांना पाच शौर्यपदके प्राप्त झाली. १९७३ मध्ये आय.पी.एस. होऊन त्यांनी भारतीय पोलीस सेवेत प्रवेश मिळविला आणि त्यांची सर्वप्रथम रवानगी महाराष्ट्रात करण्यात आली. तेव्हापासून २००४ पर्यंत ते महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत व शेवटी मुंबईत कार्यरत होते. पुढे त्यांची मुंबईला अमली पदार्थविरोधी शाखेचे उपआयुक्तपदावर पदोन्नती झाली. या पदावरील तस्करीविरोधातील त्यांची कामगिरी फारच परिणामकारक ठरली. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून पदोन्नती देऊन त्यांना

नक्षलग्रस्त नागपूर विभागाचे प्रमुखपद देण्यात आले. नक्षलवादींना आळा घालण्यात त्यांना स्पृहणीय यश मिळाले. त्यानंतर ठाण्याच्या अतिरिक्त पोलीस आयुक्तपदी त्यांची नेमणूक झाली. पोलीस महानिरीक्षकपदी पदोन्नती मिळून त्यांना नागरी हक्क संरक्षण विभागाचे प्रमुख करण्यात आले. पुढे मुंबई शहर सहपोलीस आयुक्त (प्रशासन) पदावर ते खूपच लोकप्रिय झाले.

उत्कृष्ट कामगिरीमुळे १९९७ साली त्यांना राष्ट्रपतीद्वारे यथोचित गौरविण्यात आले व त्यांना अप्पर पोलीस महासंचालकपदी पदोन्नती देण्यात आली. ऑगस्ट २००० पासून सप्टेंबर २००३ पर्यंत ते अप्पर पोलीस महासंचालक (आस्थापना) या पदावर पोलीस मुख्यालयात कार्यरत होते. सप्टें. २००३ पासून ते पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभागात कार्यरत होते. एवढ्या मोठ्या पदापर्यंत जाऊन स्वच्छ चारित्र्य, प्रामाणिक, निःस्वार्थी, कर्माशी प्रामाणिक व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यात टी. कें चे नाव प्रथम क्रमांकावर नोंदवावे लागेल.

आपल्या वैयक्तिक जीवनात ते कलाप्रिय व विद्याव्यासंगी जीवन जगतात. त्यांना संगीतही खूप आवडते; एवढेच नाही तर ते उत्तम गातातही.

२२) चौधरी, तुकाराम गणेश ऊर्फ टी. जी. भाऊसाहेब (जन्म : ११ एप्रिल, १९००, मृत्यू : ३० जानेवारी १९८५) - मूळ गाव भालोद (ता. यावल). भूमिहीन शेतमजूर कुटुंबात जन्म झाला. प्राथमिक शिक्षण भालोद येथेच झाले. भालोदला अजून माध्यमिक शाळा नव्हती म्हणून टीजी भाऊसाहेब बालपणी पाचवीपासून यावलला रोज पायी जाऊ लागले. त्या वेळी रस्तेही चांगले नव्हते. फायनल सातवीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून त्यांनी स्कॉलरशिपवर पुढील शिक्षण केले. मॅट्रिकनंतर गणुबुवांनी पुण्यास कृषी विज्ञान शिकायला पाठविले. तेथे ते इंटर झाले.

पहिल्या महायुद्धा (१९१३-१७) नंतर जर्मन मार्कची किंमत कमी झाली. त्याचा फायदा घेऊन जर्मनीस शिक्षण घेण्यास जायचे असे टी. जी. भाऊसाहेब व त्यांच्या तीन मित्रांनी ठरविले. महत्प्रयासाने त्यांनी पासपोर्ट व व्हिसा मिळविला व बोटीने पॅरीसमार्गे बर्लिनला पोहोचले. तेथे फ्राऊयूंग व युंगबाबा ह्या निर्मळ, प्रेमळ व मदत करणाऱ्या दाम्पत्याच्या स्पिनिंग मिलमध्ये ट्रेनिंगसाठी जागा मिळविली. तिथे काही काळ राहिल्यावर रायशेनबर्थ च्या टेक्सटाईल स्कूलमध्ये प्रवेश घेतला. १९२६ मध्ये टेक्सटाईलचे शिक्षण पूर्ण करून भारतात परतले. सुरुवातीस ठाण्याच्या रेमंड मिलमध्ये स्पिनिंग खात्यात नोकरी केली. नंतर वोलकार्ट ब्रदर्स या स्विस कंपनीत नोकरी मिळाली. या कंपनीतर्फे भारतात निरनिराळ्या ठिकाणी त्या कंपनीची मशिनरी इन्स्टाल करण्याचे काम केले. १९३५ मध्ये सुशीलाबाईशी विवाह झाला. पुढील २५ वर्षांत मुंबई, अहमदाबाद, कानपूर, मोरवी, नागपूर, बंगलोर इत्यादी शहरांत वस्त्रोद्योगात शिखरापर्यंत जागा भूषविल्या. इ.स. १९६० मध्ये त्यांचे परममित्र शं. अ. खेर यांनी

डबघाईत आलेल्या मिल सरकारी छत्राखाली चालवायल्या १ तल्या तेव्हा टी. जी. भाऊसाहेबांनी टाटांची एम्प्रेस मिल सोडून इंडिया युनायटेड ह्या सरकारी मिलची जबाबदारी घेतली. पुढे तीही सोडून कानपूर मिलचे मॅनेजर झाले. १९६३ मध्ये अमळनेरची प्रताप मिलची जबाबदारी स्वीकारून कष्टाने व प्रेमाने प्रताप मिलच्या ८ वर्षांच्या ऑथोराईज्ड कंट्रोलरच्या कारकिर्दीत कामगार व कष्टकऱ्यांचे हित सांभाळले व त्यांचे अतोनात प्रेमही संपादन केले. १९७१ पासून त्यांनी व्यवसायापासून अलिप्त राहून शांततामय जीवन जाण्याचे ठरविले व जळगावला शाहूनगरात आई बंगला बांधून राहू लागले.

२३) चौधरी, तुषार व्ही - मूळ गाव चांगदेव (ता. मुक्ताईनगर). डॉ. तुषार चौधरी हे शास्त्रज्ञ व पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे संचालक डॉ. व्ही. आर. चौधरी यांचे सुपुत्र होत. डॉ. तुषार चौधरी यांनी आय.आय.टी., पवई (मुंबई) येथे एम.एस्सी., फिजिकल केमेस्ट्रीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. अमेरिकेतील टेक्सास ए. ॲण्ड एम. युनिव्हर्सिटीत पीएच.डी. पूर्ण केली. त्यात त्यांना अनन्यसाधारण संशोधनार्थीसाठीची दोन पारितोषिके बहाल करण्यात आली असून ही पारितोषिके मिळविणारे ते पहिले भारतीय विद्यार्थी आहेत. पीएच.डी. करीत असताना त्यांनी २३ आंतरराष्ट्रीय सिम्पोजियम अटेंड केले. सध्या त्यांची अमेरिकेतील फिलिप्स पेट्रोलियम रिसर्च सेंटरमध्ये निवड झाली आहे. ते डिझेलपासून सल्फर काढून टाकण्याच्या प्रोसेसवर संशोधन करीत आहेत.

२४) चौधरी, तोताराम तापीराम (जन्म : ५ सप्टेंबर १८८६, मृत्यू : २६ डिसेंबर १९७१) - मूळ गाव भालोद (ता. यावल) - १९२१ च्या असहकारिता आंदोलनात यांनी भाग घेतला होता. मुळात श्रीमंत व जमीनदार कुटुंबात जन्मलेल्या तोतारामांना गरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून तळमळ होती. म्हणून भालोदला १९२२ मध्ये मुरारी रामजी चौधरी आणि तोताराम गणू झोपे यांना बरोबर घेऊन सेकंडरी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून न्यू इंग्लिश स्कूल, भालोद ही शाळा सुरू केली. ते या संस्थेचे अध्यक्ष होते. ह्या शाळेसाठी त्यांनी सढळ हस्ते आर्थिक मदत केली. भालोद पंचक्रोशीतील मुलांच्या राहण्यासाठी या शाळेला विद्यार्थ्यांचे वसतिगृहही बांधून दिले. जळगावसारख्या शहरात ग्रामीण लेवा पाटीदार विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून यांनी आपली जमीन सावद्याचे भादूभाऊ कुरकुरे यांचेकडे लेवा बोर्डिंग बांधण्यासाठी सुपूर्द केली. सन १९१८ ते १९३० या दरम्यान तोताराम शेठनी अनेक गरीब लेवा पाटीदार विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य केले.

२५) चौधरी, दिवाकर श्रावण (जन्म : ८ जून १९४९) - दिवाकर चौधरींचे मूळगाव डांभुर्णी (ता. यावल, जि. जळगाव) असून एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण यावल येथे, मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण

जळगावला ला. ना. हायस्कूलमध्ये झाले. एम. जे. कॉलेजमधून बी. ए. झाल्यावर पुण्याला एल. एल. बी. झाले. १९६६ ते १९६८ पर्यंत त्यांनी डांभुर्णीच्या कीर्ती विद्यालयात शिक्षक म्हणून नोकरी केली. ते विद्यार्थीप्रिय, मनमिळाऊ, सेवाभावी व कोमल अंतःकरणाचे शिक्षक होते. वडीलबंधू गणेश चौधरी यांच्या जीवनात झालेल्या हादशामुळे त्यांनी राजीनामा दिला. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आली. त्यांनी शेतीत लक्ष घातले. जनसेवेचा उत्तम मार्ग म्हणजे राजकारण म्हणून ते १९७३-७७ व १९८३-८७ काळात डांभुर्णीचे सरपंच झाले. गणेश चौधरी संवेदनशील तत्त्वज्ञ कवी होते.

आपली समाजसेवा व कृषिव्यवसाय सांभाळून त्यांनी **स्किझोफ्रेनिया** आणि **बुरड्वागमन** या ग्रामीण जीवन चरित्रावरील प्रमाण व बोलीभाषेतील कादंबऱ्या लिहिल्या. त्यात त्यांनी मध्यमवर्गीय शेतकऱ्याच्या व्यथा, त्याची होणारी गांजणूक यांना वाचा फोडली. त्यांच्या या कादंबरीवर लवकरच सिनेमा निघत आहे. त्याशिवाय त्यांची **सरपंचाची डायरी** हे पुस्तक ग्रामीण समस्या व त्या सोडविण्यासाठी ग्रामीण नेतृत्वाद्वारे प्रयत्न, अडथळे, यशापयश, व्यक्तिचित्रण याविषयी बरेच काही सांगून जाते.

२६) चौधरी, देवराम नामदेव (जन्म : १९३०) - भालोद येथील एका शेतकरी कुटुंबात यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी १९५० मध्ये मुंबई राज्य इलेक्ट्रीसिटी बोर्डामध्ये कारकुनी पत्करली. अर्थपूर्ण जीवनासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे जाणून मेहनती दे. नां. नी नोकरीतून मिळणाऱ्या स्वकष्टार्जित उत्पन्नातून शिक्षण घेऊन १९५४ मध्ये नडियाद कॉलेजमधून बी.ए. ची पदवी उच्च गुणवत्ता मिळवून संपादन केली. लगेच दोन वर्षांत म्हणजे १९५६ मध्ये त्यांनी एल. एल. बी. पदवी प्राप्त केली. नोकरीचा राजीनामा देऊन जळगाव कोर्टात वकिली व्यवसाय सुरू केला. १९७० मध्ये ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून अकोल्याचे असिस्टंट चॅरिटी कमिशनर झाले. १९७२ मध्ये आपल्या असाधारण कार्यक्षमता व गुणांमुळे त्यांना डेप्युटी चॅरिटी कमिशनर म्हणून बढती मिळाली. १९७५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे त्यांची महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाचे सचिव म्हणून पदोन्नती झाली. १९८६ मध्ये ह्याच विभागाचे प्रधान सचिव म्हणून त्यांची नियुक्ती झाली. सन १९८८ मध्ये सेवानिवृत्त झाल्यावरही शासनाने त्यांची प्रधान सचिव म्हणून संसदीय कार्य विभागात फेरनियुक्ती केली. या पदावर अत्यंत कुशलतेने, कर्तबगारीने आणि कर्तव्यदक्षतेने कारभार करीत असताना १९९४ मध्ये त्यांची महाराष्ट्र राज्याचे पहिले निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. या पदावरील कार्यकाळ त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केला. त्यांनी महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाचे अध्यक्षस्थान भूषविले आहे.

थोरामोठ्यांचे कृपाछत्र नसतानाही अंगभूत गुणांनी प्रगतीच्या पायऱ्या वर चढत जाणारा हा लेवा पाटीदार लेवा समाजातील युवकांसाठी एक आदर्श ठरावा.

२७) चौधरी, धनाजी नाना (१८९१-१९५२) - जन्म खिरोदे (ता. रावेर) येथे झाला. इंटरपर्यंत शिक्षण झाल्यावर पोलीस खात्यात फौजदार झाले. गांधीजींच्या सविनय कायदेभंग चळवळीने प्रभावित होऊन १६ जून १९३० रोजी फौजदारकीचा राजीनामा देऊन राष्ट्रीय कार्यात उतरले. सत्याग्रहाचे शास्त्रशुद्ध तंत्र आणि खादी निर्मितीचे शिक्षण घेण्यासाठी ते विलेपार्ले सत्याग्रह छावणीत दाखल झाले. मुंबईत बॅ. जमनादास मेहता, वामन काबाडी, नरभेराम नरसी पोपट, आचार्य यांच्यासह प्रचारकार्य करीत. सरदार पटेल व जयरामदास दौलतराम यांच्या आशीर्वादाने १९३१ च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर साबरमतीच्या धर्तीवर खिरोद्याला आश्रम काढला. विनोबा भावेंच्या एकादश सूत्रीचे आचरण करून अस्पृश्यता निवारण, ग्रामसफाई, खादी-ग्रामोद्योग, राष्ट्रीय जागृती, हरिजन सेवा, गिरीजन उत्थापन, हिंदू-मुस्लिम ऐक्य, स्वदेशी वापर, मद्यपान निषेध, मातृभाषा प्रचार, स्त्री शिक्षण व आत्मनिर्भरता याबाबत लोकांना शिकवण दिली. धनाजी नानांमुळे खिरोद्याला पाच देशसेविकांसह ७५ सत्याग्रही तुरुंगात गेल्यामुळे दि. १० जाने. १९३२ रोजी सरकारने खिरोदा आश्रम जप्त केला व १४ जाने. १९३२ रोजी त्यांना अटक केली. त्यांना १५ महिन्यांची शिक्षा झाली. त्यांच्या अथक प्रयत्नांना यश येऊन काँग्रेसचे १९३६ चे ग्रामीण अधिवेशन फैजपूरला दादासाहेब (धनाजी नाना) व त्यांच्या लेवा पाटीदार कार्यकर्त्यांच्या मोहोळाने यशस्वी करून दाखविले. १९३५ मध्ये ते मुंबई विधानसभेवर निवडून आले. १९४२ च्या चळवळीत अटक होऊन १ वर्ष स्थानबद्ध होते. दादासाहेबांनी खिरोदा आश्रमाचे रूपांतर १९३८ मध्ये जनता शिक्षण मंडळात केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांनी शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन मानून गांधीजीप्रणीत मूलोद्योगांवर आधारित वर्धा शिक्षण योजनेच्या धर्तीवर सर्वोदय केंद्र स्थापन केले व त्याद्वारे हरिजनसेवा तसेच पाल भागातील गिरीजन उत्थापनाच्या कार्यावर भर दिला. १९५२ मध्ये मारेकऱ्याने त्यांचा खून केला.

२८) चौधरी, प्राचार्य डॉ. प्रभाकर श्रावण (जन्म : ५ डिसेंबर १९४०) - मूळ गाव सांगवी (ता. यावल), डॉ. प्रभाकर चौधरींचे शिक्षण एम. ए., एम. एड., पीएच. डी., असे झाले. त्यांनी 'लोकमान्य टिळक यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य' या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविली. शिक्षण व साहित्य क्षेत्रात त्यांचा नावलौकिक आहे. त्यांना ३६ वर्षे अध्यापनाचा अनुभव असून ते एम. फिल. आणि पीएच. डी. चे रिसर्च गाईड आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थ्यांना एम. फिल. व नऊ विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदव्या प्राप्त झाल्या आहेत. प्रा. प्र. श्रा. चौधरी सरांची आजवर एकूण ३४ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यातील **चंद्रास्त** मराठी खंडकाव्य, **शिक्षण, समाज आणि शिक्षक - शै**क्षणिक लेखसंग्रह, **उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षण, आशयासहित अध्यापन पद्धती - मराठी, कथापुष्प भाग १ ते ४, विचारपुष्प, महात्मा गांधी कथामाला भाग १ ते ५, प्रकाशकिरणे,**

प्रार्थना आणि प्रार्थनाविचार, सानेगुरुजींचे विचारवैभव, Teaching of English (Communicative Approach); डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन - व्यक्तित्व आणि विचार, मुखी अमृताची वाणी, सुबोध व रंजक गोष्टी - भाग १ ते १०, प्रकाशयात्रा; संत आणि सुधारक, प्रकाशकण, बहिणाबाई चौधरींची कहाणी ही पुस्तके उल्लेखनीय होत. डॉ. प्र. श्रा. चौधरी हे पुणे आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध संस्थांवर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. ते १९९९ ते २००७ पर्यंत पुणे विद्यापीठाच्या पीएच. डी. शिक्षण समितीवर सदस्य म्हणून काम पाहत होते. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमिक शाळांच्या इंग्रजी व मराठी विषयाच्या पाठ्यक्रम समितीचे सदस्य आहेत. ते विविध समाज संस्था, ग्रंथालये, सहकारी, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थांमध्येही सेवा करीत आहेत. डॉ. चौधरी १९९५ ते २००७ पर्यंत जळगावच्या वल्लभदास वालजी जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष होते. त्याच कालावधीत ते जिल्हा ग्रंथालय संघाचेही अध्यक्ष होते. डॉ. चौधरी यांना साहित्यसेवेबाबत १९८८ मध्ये महाराष्ट्र शासनाचा उच्च शिक्षण क्षेत्रातील आदर्श शिक्षक पुरस्कार, २००८ मध्ये **'बहिणाबाई चौधरींची कहाणी'** पुस्तकास महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाचा उत्कृष्ट साहित्य निर्मिती म्हणून विनायक कोंडखे ओक पुरस्कार, तर २००९ मध्ये **'दूर देशीच्या लोककथा'** या पुस्तकासही उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा वि. वि. बोकील पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याशिवाय त्यांना बरेच लहानमोठे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

२९) चौधरी, बहिणाबाई नथू[२] (जन्म : १८८०-३ डिसेंबर मृत्यू : १९५१)- व्हाडी-खानदेशी ऊर्फ लेवा पाटीदारांच्या लेवा गणबोलीत अगदी सहज कविता रचणाऱ्या या कवयित्रीने मराठी साहित्यिकांमध्ये मानाचे स्थान पटकावले आहे. आधुनिक काळात क्रांतिकारक ठरलेले बालकवी व केशवसुत यांच्याप्रमाणे बहिणाबाई चौधरी या कवयित्रीचा प्रभाव मराठीत फार मोठा आहे. जळगावला सासर आणि नजीकच्या असोद्याचे माहेर असलेली निसर्गकन्या बहिणाबाई नथूजी चौधरी लौकिकदृष्ट्या शिक्षित नसली, तरी आपल्या काव्यातून मानवी जीवनाचे महान तत्त्वज्ञान सांगून गेली. सन १८८० च्या नागपंचमीला जन्माला आलेली बहिणा तिशीच्या आत विधवा झाली. केशवसुत, बालकवी यांच्या पिढीच्या ह्या कवयित्रीची मौखिक रचना बऱ्याच उशिरा प्रकाशित झाली. बहिणाबाईच्या मृत्यूनंतर आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या विस्तृत प्रस्तावनेसह **बहिणाबाईची गाणी** १९५२ मध्ये (दुसरी आवृत्ती १९६९ मध्ये) प्रसिद्ध झाली आणि या महान कवयित्रीचा महाराष्ट्राला लळा लागला. ही गाणी त्यांचे सुपुत्र व महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध कवी सोपानदेव चौधरी व त्यांच्या आतेभावाने लिहून काढली होती. शेतीची कामे हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. कोमल पण कणखर व्यक्तिमत्त्वाच्या बहिणाने जळगावच्या मातीकडे सोन्याची खाण म्हणून पाहिले आणि जीवन-मरण व

सृष्टी आणि मानवाचे नाते समर्थपणे जोडले. नारी मनोविश्वाचे, अन् खास खानदेशी लेवा पाटीदार नारी मनाचे तिने घडविलेले दर्शन म्हणजे तिच्या निरीक्षण क्षमतेची व मार्मिक विनोद बुद्धीची साक्ष देते. सहज रचलेली तिची कविता लेवा गणबोलीतीलच नव्हे तर मराठी काव्याच्या कंठातील तन्मणी होऊन बसली. आधुनिक काव्य, नव-काव्य, पाश्चात्य किंवा पौर्वात्य काव्यातील विचार प्रवाह, शैली अथवा अलंकार यांचे कसलेही ज्ञान नसलेल्या या निरक्षर शेतकरी कवयित्रीला निसर्ग कविताच काय, पण जानपद गीतांचेही ज्ञान नव्हते; तथापि तिने रचलेली कवने श्रेष्ठ दर्जाची जानपद गीते आहेत. ''संसार'' या शीर्षकाच्या लहानशा कवितेतून तिने मानवी जीवनाचे जे मर्म वर्म सांगितले आहे, त्याला जगातील कोणत्याही भाषेतील काव्यसृष्टीत तोड नसेल.

''अरे संसार संसार। जसा तवा चुल्ह्यावर।
आधी हाताला चटके। तव्हा मियते भाकर।''

संसाराचे रहस्य, वास्तव स्वरूप, जीवनात क्षणोक्षणी जाणवणारे आणि अनुभवकक्षेत प्रत्यही येणारे संसाराचे चित्र इतक्या रसाळ, पण परखड शब्दात दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीने मांडलेले नाही. कविता रचण्यासाठी साक्षरच असावे लागत नाही. काव्यक्षमता काहींमध्ये जन्मतःच असते हे बहिणाबाईंनी दाखवून दिले. त्यांना जगाकडे पाहण्याची दृष्टी लाभली होती, जीवनाचे तत्त्वज्ञान अवगत झाले होते. माणसाने माणुसकीने राहावे, असे त्यांना वाटत असल्याने त्याच्या स्वार्थी व कृतघ्न मनोवृत्तीची त्यांना चीड येते.

''मानसा मानसा तुही नियत बेकार
तुह्याहूनी बरं गोठ्यातलं जनावर''

हे कवन **ज्ञानेश्वरीतील** माणसापेक्षा मेंढर बरी या वचनाची आठवण करून देते.

''मानसा मानसा कव्हा व्हशील मानूस
लोभासाठी झाला मानसाचा रे कानूस''

ह्यात मानवी मनोवृत्तीची चीड दिसून येते. मानवी मन हे त्यांच्या चिंतनाचा आवडता विषय. 'वढाय वढाय,' मोकाट मोकाट, लहरी लहरी अशा प्रतिमांनी त्यांनी घडविलेले मनाचे दर्शन चिरकालिक ठरायला हरकत नसावी. मानवाच्या विषारी मनापेक्षा विंचू-सापाचे विष बरे, कारण मंतराने त्याला उतारा मिळतो असे महान सत्य त्यांनी लिहून ठेवले आहे. गावातील माणसे, त्यांचा परस्पर संबंध, शेती, अक्षयतृतीया, पोळा, पाडव्यासारखे रीतिरिवाज, श्रद्धा, देव, माहेर, सासर, संसार, कृषिजीवनातील विविध प्रसंग हे सर्व बहिणाबाईच्या लेवा गणबोलीत रचित काव्यात मूर्त स्वरूप धारण करतात. त्यांची रचना जाणिवेपेक्षा आंतरिक प्रेरणेतून अधिक वाटते. उत्कट भाव, प्रगत अनुभूती आणि अभिजात कवित्वामुळे त्यांच्या काव्यमय मनातून बोलबोलता या रसाळ कविता बाहेर पडत. म्हणूनच त्यांची कविता थेट अंतरंगापर्यंत घुसते आणि अस्वस्थही करते.

बहिणाबाईची कविता लोकसाहित्यात किंवा दलित किंवा स्त्रीवादी किंवा ग्रामीण साहित्यात वर्ग करण्याचे प्रयत्न त्या त्या संप्रदायांनी केले आहेत. तथापि बहिणाईचे काव्य या सर्वांचे असूनही वैश्विक आशयसूत्रांनी मोठे परिमाण धारण करणारे आहे. तिच्या काव्याची प्रत व भाव, भाववाहीपणा व तत्त्वचिंतनशीलता, प्रगल्भता व बोधप्रदता अशा अनेक कारणांमुळे हे काव्य अभिजात दर्जाचे ठरले आहे. त्यात शेतावरची गाणी, माहेरची ओढ व्यक्त करणारी कवने, माता-पित्यांविषयी अतीव माया व कौतुक, सासरबद्दलची कर्तव्यबुद्धी, कारुण्य आणि शोकविव्हलता, पतिभक्ती, सृष्टीच्या लीला, निसर्गाची ओढ इत्यादी काव्यविषय आहेत. माहेरची ओढ पण सासरविषयीची कर्तव्यबुद्धी बहिणाबाईने पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे. - ''माझ्या माहेराची वाट। मले वाटे मखमल।। लेकीच्या माहेरासाठी। माय सासरी नांदते।।''

खरे तर काव्यगुण, तत्त्वबोधक्षमता आणि प्रगल्भतेमुळे बहिणाबाईची कविता अनेक काव्य प्रकारांच्या परिसीमा ओलांडून अस्सल भावकवितेच्या दर्जाची होऊन बसली आहे. चांगली कविता अस्वस्थ करते, केवळ क्षणिक भावनानुभव देऊन थांबत नाही, तर विचार प्रवृत्त करते. बहिणाबाईंची कविता अशीच वाचकांच्या मनात आवर्तने करीत रुतून बसते.

अनेक लहान-मोठे संगीतकार, गायक-गायिका यांनी स्वरबद्ध केलेली बहिणाबाईंची गाणी ही लेवा गणभाषेत असली तरी मराठी संस्कृतीचा अविभाज्य घटक होऊन बसली आहेत. बहिणाबाईच्या ओळी, अनेक कादंबऱ्या, कथा, नाटके यांची शीर्षके आणि अवतरणे म्हणून प्रतिष्ठा पावल्या. लेवा गणबोलीला राष्ट्रीय स्वरूपाची मान्यता बहिणाबाईमुळेच प्रथम प्राप्त झाली. हेही या कवितांचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

साहित्य समीक्षकांनी बहिणाबाईला निसर्गकन्या, भूमिकन्या म्हटले, पण या अभिधानांमध्येही तिची खासियत पूर्णपणे व्यक्त होत नाही. तिच्या कवितेत उत्कट संवेदना आणि जीवनाचे महान तत्त्वज्ञान आहे. आशयाची अर्थघनता, नादमाधुर्य व अपूर्व स्वादाची अभिव्यक्ती कवितेतून सहजतेने होताना दिसते. रसभावफुलांनी बहरलेली ही कविता काव्यशास्त्राच्या कसोटीलाही उतरते. म्हणूनच लेवा गणबोलीतील बहिणाबाईची कविता आधुनिक मराठी काव्यातील एक अद्‌भुत चमत्कार ठरली आहे.

असा हा खानदेश-वऱ्हाडाच्या खाणीतील हिरा जळगाव येथे ३ डिसेंबर १९५१ रोजी हरवला. तिच्या मृत्यूनंतर धरणीच्या आरशामधी सरग (स्वर्ग) पाहणाऱ्या ह्या कवयित्रीचा महाराष्ट्रात बोलबाला झाला. बहिणाबाईच्या काव्यसंग्रहात अवघ्या ५० कविताच आहेत. परंतु त्यांनी महाराष्ट्राला मोठे ज्ञानपीठ उपलब्ध करून दिले आहे.

३०) चौधरी, भास्कर दिगंबर (जन्म : १२ नोव्हेंबर १९१५) - मूळगाव अट्रावल (ता. यावल). एका सुसंस्कृत शेतकरी कुटुंबात यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण अट्रावललाच झाले. माध्यमिक शिक्षण भालोदला झाले. चौथी ते सातवीपर्यंत ते भालोदला

रोज चार कि.मी. पायी जात व येत. आठवी ते मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण प्रताप विद्यालय, अमळनेर येथे झाले. मॅट्रिकला चांगले मार्क्स मिळाल्याने पुढे पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमधून इंटरसायन्स झाल्यावर इंजिनीअरिंगकडे ओढा असल्याने १९३८ मध्ये मुंबई विद्यापीठातून बी.ई. (इलेक्ट्रिकल), १९३९ मध्ये बी.ई. (मेकॅनिकल) झाले. १९४१ ते १९४७ पर्यंत त्यांनी पुण्यास इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये अध्यापकी केली. १९४७ मध्ये ते अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेले. तेथे १९४८ मध्ये ते मिचिगन विद्यापीठातून एम.एस.ई-ई.ई. (मास्टर ऑफ सायन्स इन इंजिनीअरिंग-इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग) झाले. १९४९ ते १९५६ या काळात त्यांनी हैदराबाद शासकीय इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये सिनीअर लेक्चरर, व्हाइस प्रिन्सिपाल व प्रोफेसर इन इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग ही पदे भूषविली. १९५६ मध्ये ते पुण्यास आलेत व १९६० पर्यंत प्रोफेसर इन इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग म्हणून राहिले. १९६० ते १९६२ दरम्यान ते पूना पॉलिटेक्निकचे प्रिन्सिपाल झाले. १९६२ ला ते कराड इंजिनीअरिंग कॉलेजला प्रिन्सिपाल म्हणून गेले. १९६८ च्या कोयना भूकंपानंतर १९६९ मध्ये त्यांनी कराड कॉलेजच्या विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन कोयना परिसर नवनिर्मितीसाठी बांधकाम क्षेत्रात भरीव कार्य केले. यशवंतराव चव्हाणांनी त्यांना कॅम्प कमांडंट ऑफ नवनिर्माण प्रोजेक्ट ऑफ गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र म्हणून नेमले होते. १९७० ते १९७२ या दरम्यान ते औरंगाबादच्या शासकीय इंजिनीअरिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल राहिले. १९७२-७३ मध्ये त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण विभागाचे जॉईंट डायरेक्टर व १९७३-७४ मध्ये डायरेक्टर म्हणून पद सांभाळले. त्यांनी उपरोक्त कामगिरीशिवाय बी.ई.एस.टी., मुंबई; पी.ई.एस.कं.लि., पुणे; गव्हर्नमेंट सेंट्रल वर्कशॉप, दापोडी, पुणे आणि टी.व्ही.ए. (यु.एस.ए.) येथेही काही काळ व्यावसायिक अनुभव घेतला. अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या दांडग्या अनुभवामुळे त्यांना तंत्र शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखले जाई. बी.डी. चौधरी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअर्स, इंडियाचे सदस्य होते. पुणे, नागपूर, शिवाजी, मराठवाडा व उस्मानिया विद्यापीठांशी त्यांचा २४ वर्षांपेक्षा जास्त तंत्रशिक्षण संबंध होता. या विद्यापीठांमध्ये त्यांनी १५ वर्षे परीक्षक म्हणूनही काम पाहिले. ते शिवाजी व मराठवाडा विद्यापीठांच्या इंजिनीअरिंग शाखांचे चार वर्षांपेक्षा अधिक काळपर्यंत डीन राहिले. मराठवाडा विद्यापीठाच्या सेनेट व एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे ते चार वर्षांपेक्षा अधिक काळ सदस्य होते. १९९३ मध्ये त्यांना त्यांच्या तंत्रशिक्षण कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मानपत्रही मिळाले आहे.

३१) चौधरी, भास्कर लोटू (जन्म : १ जून १९४२) - असोद्याचे श्री. भास्कर लोटू ऊर्फ बी. एल. चौधरी यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. एम. जे. कॉलेजमधून ते बी. ए. झाले. लहानपणापासूनच त्यांना नाटकांची आवड. बहिणाबाई चौधरींच्या गाण्यांची बी. एल. चौधरींवर चांगलीच छाप पडली होती. ते महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागात सेवेस लागून सेवानिवृत्तीच्या वेळी उपसंचालक होते. मनाजोगे

खाते मिळाल्याने हरहुन्नरी, गुणी व कलाप्रेमी बी. एल. चौधरींसारख्या कलावंताने त्याचा पुरेपूर फायदा न उचलला तरच नवल! लेवा गणबोलीसारख्या प्रादेशिक बोलीत व्यावसायिक नाट्यनिर्मिती करणे त्यांच्या मनात धाटत असताना एकदा बहिणाबाई चौधरींच्या जन्मशताब्दी निमित्ताने बी. एल. ची सोपानदेवांकडे मुलाखत झाली तेव्हा बहिणाबाईंच्या जन्मशताब्दी वर्षात लेवा बोलीत नाटक लिहून ते रंगमंचावर आणावे, अशी सोपानदेवांनी बी. एल. कडे गळ घातली. सोपानदेवांच्या आशीर्वादाने प्रोत्साहित झालेल्या बी. एल. नी खानदेशात त्या वेळी बोकाळलेल्या हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथेवरील ज्वलंत समस्येवर **मरी जाय जो** हे लेवा बोलीतील पहिले नाटक लिहिले व त्यात बहिणाबाईंच्या गाण्यांचा खुबीने वापर केला. या नाटकाचा पहिला प्रयोग रवींद्र नाट्य मंदिरात झाला. या नाटकाचे एकूण ७२ प्रयोग मुंबई, ठाणे, डोंबिवली, ओझर, नाशिक, जळगाव इत्यादी ठिकाणी झाले. या नाटकाशिवाय त्यांच्या साहित्यनिर्मितीत **उद्ध्वस्त कुंपण, याला नाटक म्हणतात राजा** या एकांकिका, **शहाबानो आम्ही षंढ आहोत** हे आगामी नाटक, **जलेश** ही हिंदी कादंबरी, **मंत्रशास्त्र एक वरदान** ही मंत्रशास्त्रावर आधारित पुस्तिका यांचा समावेश करता येईल. मे २००० मध्ये ते सेवानिवृत्त झाले. सांस्कृतिक कार्य खात्यात त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध नाट्य स्पर्धा, कला महोत्सव, शिबिरे व सत्रे यशस्वीपणे आयोजित केली. प्रजासत्ताक दिनी दिल्लीस चित्ररथ करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा असे. त्यांच्या चित्ररथास सलग तीन वर्षे प्रथम पुरस्कार मिळाला. त्यांनी नाट्य परीक्षक म्हणूनही काम पाहिले आहे. ते खानदेश उत्कर्ष मंडळ मुंबई व ठाणे परिसर या संस्थेचे अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, डोंबिवली शाखेचे अध्यक्ष, डोंबिवली नाट्यरसिक नागरिक समितीचे कार्याध्यक्ष तसेच डोंबिवलीला नवोदित साहित्यिकांना उत्तेजन व प्रोत्साहन देणे आणि प्रथितयश साहित्यिकांचा गौरव करण्यास्तव स्थापन झालेल्या बहिणाबाई साहित्य संस्थेचे ते उपाध्यक्ष आहेत. ते ठाण्याच्या लेवा पाटीदार समाज मंडळाचे तसेच डोंबिवलीच्या लेवा भवनाचे संस्थापक सदस्य आहेत. ते सभा संमेलने, खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम, कलावंतांना मदत कार्यक्रम, रक्तदान व वैद्यकीय शिबिरे यात हिरिरीने भाग घेतात.

३२) चौधरी, डॉ. भास्कर सुनाटू (जन्म : १९३६) - मूळगाव फैजपूर, एका मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण फैजपूरलाच झाले. अकरावी मॅट्रिक विशेष प्रावीण्याने उत्तीर्ण झाले. पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून १९५७ मध्ये ते बी.ई. (सिव्हिल) विशेष प्रावीण्याने उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. तेथे मिचिगन विद्यापीठातून १९६१ मध्ये एम.एस. (सिव्हिल) झाले. त्यानंतरही त्यांनी आपले संशोधन सुरू ठेवले व १९६९ मध्य पेनसिल्व्हानिया विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. (सिव्हिल) प्रदान केली. अमेरिकेतच स्थायी होऊन एरोस्पेस (जनरल इलेक्ट्रिक) व नासामध्ये ९ वर्षे अनुभव घेतला. त्यानंतर ३७ वर्षे दीर्घकाल फ्लोरिडा

विद्यापीठात सिव्हिल इंजिनीअरिंगचे प्राध्यापक राहिले. आपल्या प्राध्यापकी व्यवसायात त्यांनी ४५ चे वर शोधनिबंध प्रकाशित केले. त्याशिवाय अमेरिकेतील विविध नामांकित संस्थांमध्ये विशेषकरून सिव्हिल इंजिनीअरिंग क्षेत्रात त्यांनी अनेक उच्चपदे भूषविली आहेत. आपल्या सेवाभावी वृत्तीमुळे मियामी केन्डाल (Miami Kendall) रोटरी क्लबचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. आपल्या सेवाकालावधीमध्ये त्यांना अनेक पारितोषिके व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यात ग्रेटर ह्युमन अंडरस्टँडिंग; अनएंडिंग इफोर्टस् टू इम्प्रुव्ह ह्युमॅनिटी, अनेक स्मरणार्थ (Plaques) पुरस्कार; उत्कृष्ट अध्यापन व सेवाविषयक दाखले इत्यादींचा समावेश आहे. आपल्या मातृभूमीच्या ओढीमुळे त्यांचे भारतातही सहकार्य सुरू असून आता त्यासाठी ते भारतात दरवर्षी येत असतात. भारत व अमेरिकेच्या विद्यमाने स्थापन झालेल्या रोटरी फाऊंडेशन रिसर्च ऑन हाऊसिंग इन इंडिया ॲण्ड युएसए संस्थेच्या माध्यमातून भारतातील शाळा, संस्था आणि दवाखान्यांना मदत म्हणून भरीव अनुदान प्राप्त करून दिले आहे. अल्प उत्पन्न असणाऱ्या गोरगरिबांना परवडेल अशा किमतीत घरे बांधण्यात मदत व मार्गदर्शन करण्यासाठीही ते भारतात येत असतात. सध्या ते भारतातील ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी विश्वभारतीच्या विज्ञान केंद्राला भरीव अनुदान मिळवून देत आहेत. लेवा पाटीदार समाज मंडळांनाही ते सक्रिय मदत करीत असतात.

३३) चौधरी, मधुकरराव धनाजी (जन्म : १६ जून १९२८, मृत्यू ८ जुलै २०१०) - खिरोदे येथील धनाजी नाना चौधरींचे सुपुत्र बाळासाहेब नावाने परिचित. यांचे शिक्षण एम.कॉम; व कोविद (राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा) वर्ध्याहून झाले. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत सभा, मिरवणुकीत हिरिरीने भाग घेऊन व गुप्त वाङ्मय प्रसार करून लोकजागृतीचे कार्य केले. त्याबद्दल अटक व भुसावळ न्यायालयात २५ रुपये दंड झाला. दादासाहेबांच्या हत्येनंतर त्यांच्यावर सर्वोदय केंद्राची आणि कार्याची जबाबदारी आल्याने १९५२ मध्ये खिरोदे सर्वोदय केंद्राचे संचालक झाले. १९५७ मध्ये बाळासाहेब विधानसभेचे सभासद झाले. स्व. यशवंतराव चव्हाणांनी त्यांची कुशाग्र बुद्धी व गुणग्राहक वृत्ती पाहून त्यांचा मंत्रिमंडळात १९५७ मध्येच समावेश केला. १९५७-६२ दरम्यान ते मुंबई राज्याचे उपमंत्री होते. १९६२ ते १९७८ पर्यंत २१ वर्षांच्या कालावधीत त्यांनी महाराष्ट्राचे नगरविकास, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, अर्थ व अल्पबचत, नियोजन, महसूल, पाटबंधारे व ऊर्जा, सांस्कृतिक कार्य विभाग, वनविभाग, पुनर्वसन इ. १३ खाती यशस्वीपणे सांभाळली. तरी ते लोकांच्या लक्षात राहिले ते शिक्षणमंत्री व अर्थमंत्री म्हणून. सन १९९१ ते १९९६ पर्यंत ते महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष होते. रचनात्मक आणि मूल्याधिष्ठित प्रवृत्तीमुळे सामाजिक क्षेत्रात महाराष्ट्र सामाजिक परिषद, महाराष्ट्र सामाजिक समता परिषद, समाज सुधार आणि हुंडाबंदी चळवळ, महाराष्ट्र राज्य ग्रामीण विकास संस्था परिषद आणि आदिम जाती जमातीविषयक सेवा कार्याच्या हेतूने स्थापित

सातपुडा विकास मंडळ, पाल इ. संस्थांतील कार्य मधुकररावांच्या दूरगामी आणि समतावादी तसेच उपेक्षितांचे अश्रू पुसणाऱ्या गांधीवादी आदर्शाचे प्रतीक आहे.

प्रयोगशील बाळासाहेबांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य मौलिक आहे. जनता शिक्षण मंडळ, खिरोदा या ग्रामीण क्षेत्रातील आदर्श संस्थेचे बाळासाहेब संस्थापक होते. मुंबईतील चेतना शिक्षण संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. मलबार हिल सारख्या अति उच्चभ्रूंच्या घरी काम करणाऱ्या तळागाळातील गरीब वर्गासाठी त्यांनी बालकल्याणी संस्था स्थापली. ते पुणे-नाशिकच्या सिम्बाईसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. ते टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगाव संस्थेचे अध्यक्ष, जळगावच्या महिला महाविद्यालय चालविणाऱ्या अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष; सद्गुरू शिक्षण मंडळ, जळगाव या संस्थेचे पूर्व अध्यक्ष, आंतर भारती, मुंबईचे अध्यक्ष, खानदेश-विदर्भ शिक्षण संस्था, नागपूरचे संस्थापक अध्यक्ष, चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय व पूर्व खानदेश जिल्हा कुष्ठ सेवा मंडळ, भुसावळ या संस्थेचे अध्यक्ष, साने गुरुजी साहित्य संस्कृती मंडळ, जळगाव चे संस्थापक अध्यक्ष; महाराष्ट्र युवक बिरादरीचे संस्थापक अध्यक्ष, धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी, जळगाव चे संस्थापक अध्यक्ष; अखिल भारतीय राष्ट्र भाषा प्रचार समिती, वर्धा या संस्थेचे १९७० पासून अध्यक्ष; अ. भा. सानेगुरुजी कथामाला, मुंबईचे पूर्व अध्यक्ष; महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ, पुणेचे पूर्व अध्यक्ष; महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्था परिषद, पुणेचे संस्थापक अध्यक्ष होते.

बाळासाहेबांना सामाजिक अणि शैक्षणिक कार्याबद्दल खालील पुरस्कार मिळाले आहेत. सामाजिक न्याय स्थापना कार्याबाबत रामशास्त्री प्रभुणे पुरस्कार, निष्कलंक चारित्र्यासाठी लालबहादूर शास्त्री पुरस्कार, उत्कृष्ट राजनैतिक व सामाजिक कार्याप्रीत्यर्थ नेहरु एक्सलेन्स पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता कार्याबाबत छत्रपती शिवाजी पुरस्कार, साक्षरता प्रसारासाठी यशवंतराव चव्हाण पुरस्कार, बँकाक विश्व हिंदी सम्मेलन प्रीत्यर्थ आर्च ऑफ एशिया पुरस्कार, हिंदी प्रचार व प्रसारासाठी हिंदी साहित्य सम्मेलन, प्रयागचा विद्या वाचस्पती पुरस्कार, केंद्रीय हिंदी अकादमी पुरस्कार, फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचचा परिवर्तन पुरस्कार, कै. पु. य. देशपांडे स्मृत्यर्थ चंद्रभागातीर पुरस्कार, आदिवासी क्षेत्रात संगणक शिक्षण प्रसारासाठी राजीव गांधी एक्सलंसी पुरस्कार, लोकश्री व विजयश्री पुरस्कार, मुंबई एकता फोरमद्वारे एकता पुरस्कार; १९९९ च्या सहावे विश्व हिंदी संमेलन, लंडन ला विश्व हिंदी पुरस्कार. बाळासाहेबांनी **"गांधी मार्ग-मानवतेची आशा"**, **"शिक्षण विचार"** आणि **"महाकाल (एक खेडे) : आर्थिक, सामाजिक नियोजन प्रबंध"** हे ग्रंथलेखन केलेले आहे.

१९८४ मध्ये त्यांनी लेवा पाटीदारांमधील हुंडा पद्धती नष्ट करण्यासाठी जनजागृती केली व भोरगाव पंचायतचे पुनरुत्थान केले. बाळासाहेबांमुळे जळगाव जिल्ह्यात तापी नदीवरील भुसावळजवळील उत्तर जळगाव जिल्हा व दक्षिण जळगाव जिल्हा जोडणारा

भव्य पूल झाला.

३४) चौधरी, मनोहर महारू तथा मनोहर गुरूजी (जन्म : १९२५, मृत्यू-२००९) - मूळ गाव खिरोदे (ता. रावेर)-१९४२ च्या छोडो भारत आंदोलनात ३ महिने सक्तमजुरीची शिक्षा येरवडा जेलमध्ये भोगली. शिक्षण-जी. डी. आर्ट, ए. एम. मनोहर गुरुजी भारतीय कलाशैलीचे श्रेष्ठ चित्रकार व मूर्तिकार आहेत. ते कलातपस्वी पंधे गुरुजींचे शिष्य होत. जनता शिक्षण मंडळ, खिरोदा या संस्थेच्या सप्तपुट ललितकला भवनाचे (कला महाविद्यालय) संस्थापक, प्राचार्य आणि प्रमुख आधारस्तंभ, शैक्षणिक संस्था, ग्रामसुशोभन आणि प्रदर्शने यात मोलाचे कार्य. मूर्तिकलेत विशेष प्रवीण्य. त्यांचे गांधीजी, दादासाहेब (कै. धनाजी नाना चौधरी), सानेगुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. जोतिबा फुले, शिवाजी महाराज, इत्यादी पुतळे वाखाणण्यासारखे आहेत. साकेगाव (ता. भुसावळ) चा धन्वंतरी चा पुतळा अतिभव्य (१५ फुटांचा) आहे. त्यांचे समाजपुरुष, तापी, झेप, सरस्वती, सप्तपुट स्तंभ, स्वप्नसुंदरी (वरणगाव फॅक्टरी), यक्ष (पितळखोरे) इत्यादी पुतळे प्रसिद्ध आहेत.

ग्रामीण भागातील कलावंतांना प्रेरणा देणारा सर्वस्पर्शी कलावंत, गायक, नट व कलाशिक्षक म्हणून ख्याती. त्यांनी **देवमाणूस, ते आपले घर, घराबाहेर, लग्नाची बेडी, वंदे मातरम्, संशय कल्लोळ** आदी नाटकांत प्रमुख भूमिका केल्या आहेत. त्यांची अभिजात कलाशैलीतील शेकडो शिल्पे व चित्रे महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेत. अभिजात कलेस त्यांनी आधुनिक वास्तवतेचा स्पर्श केला आहे.

गुरुजी एक उत्तम कवीही आहेत. चित्र आणि शिल्प यातून जसा देखणा लय आणि ताल साधला तसा वेदनेच्या भावपूर्ण शब्दांतून अलगद कवितेचा सूरही त्यांना गवसला. त्यांचे **मम, वरदायिनी, उत्तरायण** आणि **अनामिका** हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

३५) चौधरी, मुरारी रामजी ऊर्फ मुरारीराम (जन्म : ७ ऑगस्ट १८९९) - मूळ गाव भालोद, शिक्षण मॅट्रिक. यांनी १९२२ मध्ये तोताराम तापीराम चौधरी आणि मुरारीरामांनी सेकंडरी एज्युकेशन सोसायटी, भालोद ह्या संस्थेची स्थापना करून या संस्थेची न्यू इंग्लिश स्कूल, भालोद ही शाळा सुरू केली. या माध्यमिक शाळेस त्यांनी विद्यार्थी वसतिगृहाचीसुद्धा सुविधा उपलब्ध करून दिली. हे हायस्कूल पूर्वी पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. मुरारीराम हे जळगावच्या फकिरा हरी लेवा बोर्डिंग या संस्थेचे सतत १३ वर्षे सुपरिंटेंडेंट होते. १९२१ मध्ये असहकारीता चळवळीतही त्यांनी भाग घेतला होता. जळगाव येथील मुळजी जेठा हे कॉलेज स्थापन करण्यात मुरारीमामांनीही पुष्कळ श्रम घेतले आहेत. ते काही काळ जळगावच्या **आत्मोद्धार** ह्या वर्तमानपत्राचे सहसंपादक होते. नागपूरच्या **उद्यमच्या** संपादकांनी त्यांचे **कृषिप्रक्रिया** नावाचे पुस्तक प्रकाशित केले आहे. सन १९३६ मध्ये त्यांनी **विजय** साप्ताहिक सुरू केले.

३६) चौधरी, लक्ष्मण गणपत (जन्म : १९१९)- मूळगाव किनगाव (ता. यावल), शिक्षण इंटरपर्यंत. इ.स.१९४२ च्या चलेजाव चळवळीत उज्जैन येथे रेल्वेचे रूळ काढून रेल्वे गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला. भुसावळ येथील रेल्वे पुलाला सुरुंग लावण्यात ते सहभागी झाले होते. त्यानंतर वाघोड येथे रेल्वेचे रूळ उखडून पंजाब मेल रोखण्याचा प्रयत्न केला. या तीनही प्रकरणात निरनिराळ्या आरोपांखाली प्रमुख आरोपी म्हणून एकूण २४ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली, ती धुळे व येरवडा मध्यवर्ती कारागृहात भोगली. शासनाकडून सन्मानपत्र, ताम्रपट व पेन्शन मिळाले.

३७) चौधरी, विनायक श्रावण (जन्म ३ फेब्रुवारी १९२५) - मूळ गाव सांगवी. शिक्षण इंटर आर्ट्स, हिंदी साहित्यरत्न, महाराष्ट्र साहित्य विशारद आणि डी.टी.सी. असे झाले. त्यामुळे आचार्य ही पदवी प्राप्त झाली. हे हिंदी प्रचार, लेखनकार्य व प्रामुख्याने शिक्षणविषयक कार्य करीत. हे पूर्व खानदेश जिल्हा वाचनालय संघ, जळगाव, महाराष्ट्र चित्रकार मंडळ, पुणे व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थांचे सभासद असून महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणेचे प्रचारक कार्यकर्ते होते. ते सांगवी येथील राष्ट्रभाषा प्रचार मंडळाचे संस्थापक, हिंदी शिक्षा विद्यालयाचे संचालक व चर्चा मंडळाचे कार्यवाहक होते. त्यांनी तीन हिंदी व एक मराठी पुस्तक प्रकाशित केले आहे.

३८) चौधरी, शिरीष मधुकरराव (जन्म : २३ मे १९५९) - मूळ गाव खिरोदे असून समाजसेवेचा वारसा चालविणाऱ्या कै. धनाजी नाना चौधरीच्या कुटुंबात यांचा जन्म झाला. फैजपूर काँग्रेसचे सेनानी व अध्वर्यु धनाजी नाना चौधरी हे शिरीषदादांचे आजोबा, तर सुप्रसिद्ध लोकसेवक कै. मधुकरराव चौधरी हे त्यांचे पिता आणि समाजसेविका कै. स्नेहलता चौधरी ह्या त्यांच्या माता. मधुकररावांनंतर शिरीषदादांनीही आपले समाजसेवेचे व्रत सुरू ठेवले. शिरीषदादांनी एम. एससी (कृषी) व कृषी अर्थशास्त्र पदवी धारण केली. मधुकररावांच्या राजकीय निवृत्तीनंतर शिरीषदादांनी राजकीय क्षेत्रात उडी घेऊन २००९ मध्ये काँग्रेसचे तिकीट न मिळाल्याने काँग्रेस विचारसरणी असूनही अपक्ष म्हणून निवडणूक लढविली व रावेर मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने विधानसभेवर निवडून आले. आमदारकीच्या काळात त्यांनी अनेक समाजोपयोगी कामे केली. त्यातच जुलै २०१० मध्ये मधुकररावांचे निधन झाल्याने त्यांच्या समाजसेवेची पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न केला. २०१४ मधील मोदी लाटेतही शिरीषदादा किरकोळ फरकाने पराभूत झाले तरी त्यांचे समाजसेवेचे कार्य कमी झाले नाही.

शिरीषदादा पुढीलप्रमाणे कार्यधुरा सांभाळत आहेत - पालच्या सातपुडा विकास मंडळ या स्वयंसेवी संस्थेचे सचिव, खिरोद्याच्या धनंजय सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष, फैजपूरच्या बहिणाबाई शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, जळगावच्या प्रज्ञावर्धिनी पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष, जळगावच्या सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, पालच्या कृषी प्रबोधन संस्थेचे संचालक, भुसावळच्या कुष्ठसेवा व वैद्यकीय शिक्षण कार्य करणाऱ्या पूर्व

खानदेश कुष्ठसेवा मंडळाचे सचिव; मुंबईतील वाणिज्य, व्यवस्थापन व संगणक शाखेच्या शिक्षणातील अग्रगण्य असलेल्या चेतना शिक्षण संस्था, वान्द्रेचे उपाध्यक्ष; उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन मंडळावरील माजी सदस्य, फैजपूरच्या मधुकर सह. साखर कारखान्याचे संचालक, खिरोद्याच्या ज्ञानवर्धिनीचे अध्यक्ष; खिरोद्याच्या शिक्षण व शिक्षक प्रशिक्षणाचे पायाभूत काम करणाऱ्या जनता शिक्षण मंडळाचे सचिव; पालच्या कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे सदस्य; मुंबईच्या नियतकालिक समर्पित अभियान सल्लागार समितीचे सदस्य; पुण्याच्या महाराष्ट्र ग्रामीण विकास परिषदेचे कार्यकारिणी सदस्य; मुंबईच्या नवभारत अभियानचे सदस्य; जळगावच्या रसिक फिल्म सोसायटीचे सदस्य; जळगावच्या संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य संस्था - धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनीचे संचालक सदस्य; मुंबईच्या युवक बिरादरीचे सदस्य; फैजपूरच्या १९९२ चे किसान कामगार परिषद व कृषी प्रदर्शनाचे संयोजक; रावेर तालुका सामाजिक सुरक्षा समितीवर माजी अशासकीय सदस्य; जळगाव जिल्हा नियोजन मंडळाचे माजी अशासकीय सदस्य; महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे माजी सदस्य; मुंबईच्या बाल विकास परिषदेचे आजीवन सदस्य इत्यादी अनेक संस्थांवर काम करीत आहेत. त्याशिवाय त्यांचे सामाजिक व शैक्षणिक उपक्रम चालू असतात.

श्री. शिरीषदादांनी गोल्डा मायर माउंट कॅरेमेल प्रशिक्षण संस्था, हैफा (इस्त्रायल) येथे रोजगारनिर्मिती कार्यक्रम आयोजन व व्यवस्थापनासाठी इस्त्रायलला प्रशिक्षण पूर्ण केले; इस्त्रायलमध्ये ॲग्रीटेक (१९९३) मध्ये सक्रिय सहभाग घेतला, त्यांनी १९८३ मध्ये दिल्लीच्या तृतीय विश्व हिंदी संमेलनात व १९९३ च्या मॉरीशसमधील विश्व हिंदी संमेलनात सक्रिय सहभाग घेतला.

त्यांनी आदिवासी उपयोजनेतील जळगाव जिल्ह्यातील आदिवासींची कौटुंबिक व कृषी अर्थव्यवस्था हा पदव्युत्तर संशोधन प्रबंध सादर केला. त्याच्याशिवाय त्यांचे आदिवासी अर्थव्यवस्थेवर व तालुका विकास नियोजनावरही लेख प्रकाशित झाले आहेत.

श्री. शिरीषदादांना मुंबईच्या शांताई फाउंडेशनद्वारे २००६ मध्ये शिक्षण क्षेत्रातील लक्षणीय कार्याबद्दल कै. माधवराव महाराज सिंधिया या प्रतिष्ठाप्राप्त पुरस्काराबरोबरच इतरही अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

३९) चौधरी, सोपानदेव[३] - सोपानदेव हे मूळ जळगावचेच. लेवा गणबोलीत सहज काव्य रचणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरींचे ते सुपुत्र. बहिणाबाईच्या काव्यविशेषांचा प्रभाव सोपानदेव चौधरींवर पडणे साहजिकच. आईचा काव्यभाव आणि जीवनाचे सूक्ष्म अवलोकन यातून सोपानदेवांच्या कविमनाची जडणघडण होणेही स्वाभाविकच. स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी सरकारी शाळा सोडून जळगावच्या राष्ट्रीय विद्यालयात प्रवेश केल्यावर

राष्ट्रीय विचारसरणीचे बीजारोपण होणेही क्रमप्राप्तच होते. विनोबा भावे व साने गुरुजींच्या विचारांचा ठसा मनावर उमटल्याने त्यांनी देशभक्तीपर गीते लिहिली. **"पुण्यश्लोक महात्मा"** आणि **"प्रतापी प्रतापसिंह"** हे पोवाडे त्यांनी याच काळात रचले. विविध विषयांमध्ये रस घेणाऱ्या सोपानदेवांनी ग्राम गीते, जानपद गीते, प्रेम कविता, देशभक्तीपर गीते, महाराष्ट्र गीते, ओव्या, अभंग व विडंबनपर कविता लिहून मराठी काव्यसृष्टीत मोलाची भर घातली. जानपद जीवनाचे चित्र रेखाटताना त्यांनी लेवा गणबोली (वऱ्हाडी-खानदेशी बोलीभाषा) या संमिश्र बोलीभाषेचा सहज उपयोग केला. मराठीच्या दरबारात या गणबोलीभाषेला मानाचे स्थान प्राप्त करून दिले या माय-लेकांनी. त्यांनी जानपद जीवनाचे अंतरंग जसे रंगविले तसेच बहिणामायच्या ममतेचे वर्णनही केले. त्यांची ग्राम गीते विलक्षण बोलकी आहेत. त्यांची प्रेम कविता शहरी चाळ्यांवर लुब्ध नसून जानपद जीवन गोंजारणारी आहे. खरे तर त्यांच्या प्रेम कवितेने या काव्य प्रकाराचा एक आदर्श घालून ठेवला. जुन्या काळातील काही कल्पना त्यांच्या प्रेमकाव्यात आलेल्या दिसतात. सोपानदेवांचे "जय जय महाराष्ट्र" हे महाराष्ट्र गीत अनेक परीने सुंदर आहे. खरे तर सोपानदेवांना स्वातंत्र्य, पवित्रता व मांगल्याचे उपासक मानावे लागेल. नव्याचा ते उपहास करतात, तरी त्याला विरोधही करीत नाहीत. नवकविता, नवकथा, नवचित्रकला तसेच मानवी मनातील वैगुण्यावर त्यांनी बऱ्याच विडंबनपर कविता रचल्या. त्यांना विडंबनाचा सोस असल्याने त्यांनी मराठी कवितेत प्रथमच विनोद आणला. वास्तववादाच्या नावाखाली निर्माण झालेल्या नवकवितेवर सोपानदेवांसारखे घणाघात क्वचितच कोणी केलेले आढळतील. त्यांचे मित्र मर्ढेकरही त्यातून सुटले नाहीत. अभंगातील कल्पना सोपानदेव आपल्या भक्तीपर गीतांमध्ये सहज वापरत. **सोपानदेवी** हा त्यांचा विशेष गाजलेला कविता संग्रह. मात्र त्यांचे **काव्यकेतकी, अनुपमा** व इतर संग्रहदेखील प्रकाशित झालेले आहेत. मराठी काव्यावर सोपानदेवांचे सर्वात मोठे उपकार म्हणजे बहिणाबाई चौधरींचे लेवा गणबोलीभाषेतील काव्य त्यांनी महाराष्ट्राच्या निदर्शनास आणले. सोपानदेव बृहन्महाराष्ट्रात अधिक लोकप्रिय झाले ते त्यांच्या काव्यगायन शैलीने. पुण्याला १९३२ मध्ये भरलेल्या कविसंमेलनात रंजक गायन करून त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. मधुर, पल्लेदार आवाज व शास्त्रीय संगीताची जाण यामुळे त्यांच्या काव्यगायनात विशेष आनंद भरत असे. रविकिरण मंडळाने आणि खासकरून कवी यशवंत व गिरीशांच्या काव्यगायनाचे कार्यक्रम करून कविता रसिकांपर्यंत पोहोचविण्याची परंपरा सोपानदेवांनी चालू ठेवून रसिकांकडून दाद मिळविली. अनेक वर्षे सोपानदेवांशिवाय कुठलेही कवी संमेलन रंगत नसे इतके ते कविता गायनाच्या परंपरेचे वारसदार ठरले होते.

४०) चौधरी, कै. स्नेहलता तथा कुसुमताई (जन्म : १७ जानेवारी १९४०, मृत्यू : २६ जून १९९३) - कै. मधुकरराव चौधरींच्या पत्नी. मुंबई हायकोर्टचे ॲड. कै. दत्तात्रेय महादेव राणे (मूळ गाव - बामणोद) यांच्या कन्या. सुसंस्कृत व न्यायाची कास

धरणाऱ्या वडिलांचे संस्कार त्यांना लाभले होते. बालपण व शालेय शिक्षण अनुक्रमे यावल, बामणोद व जळगाव येथे झाले. बालपणापासून कुसुमताई हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असून शाळा कॉलेजांमधून त्यांनी नाटके, खो-खो, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेतला. इंटरला असताना जनसेवेचे व्रत स्वीकारलेल्या मधुकररावांशी ७-५-१९५६ रोजी त्यांचा विवाह झाला. विवाहानंतरही शिक्षण सुरू ठेवून त्या एम ए झाल्या. एप्रिल मे १९९३ मध्ये त्यांनी बहिणाबाईच्या **'भूमिकन्या बहिणाई चौधरी एक चिंतन'** पीएच.डी. प्रबंधही सादर केला.

कुसुमताई हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असून सत्ता हे सेवेचे साधन मानणाऱ्या लोकसेवक मान. बाळासाहेब चौधरी यांची सहधर्मचारिणी ही भूमिका त्यांनी चोख बजावली. प्रपंचास अर्थार्जनाचा हातभार लावावा म्हणून त्यांनी शिक्षिका व नंतर प्राध्यापिका म्हणून नोकरीही केली. मंत्र्यांची पत्नी असूनही त्या बसने प्रवास करीत ह्याचे लोकांना साश्चर्य कौतुक वाटे.

कुसुमताई भावूक, तरल मनोवृतीच्या कवयित्री होत्या. त्यांना साहित्य, कला व संगीतात आवड होती. अनेकदा सहजतेने त्यांनी प्रसंगोपात भावनांना शब्दात गुंफून काव्यरूप दिले. लौकिक सुख दुःखाना अध्यात्माचा स्पर्श दिला. त्या स्वतःच्या कवितांबरोबर बहिणाई, भा. रा. तांबे, शांता शेळके आदींच्या कविता सुरेल ताल-स्वरात सादर करीत. ज्ञानेश्वरांच्या पसायदानाला त्यांनी दिलेली चाल स्मरणीय ठरली. त्यांची बहिणाबाईशी भावनिक एकात्मता निर्माण झालेली होती.

जे जे मंगल , उदात्त ते ते आपलेसे करण्याकडे त्यांचा कल होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सहजसुंदर परिपक्वतेमुळे त्यांनी राजकारणी, तत्त्ववेत्ते, कलाकार, अध्यापक, डॉक्टर, इंजिनीअर, वकील ह्या स्तरांतील लोकांपासून थेट घरकाम करणाऱ्या श्रमजीवी वर्गातील लोकांशी जवळीक निर्माण करून माणसे जोडताना श्रेष्ठ-कनिष्ठ असा दुजाभाव केला नाही. सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत कोणतेही विशेष सायास न करता कुसुमताई मधुकररावांच्या सहजीवनाचे अंग बनून राहिल्या होत्या.

पीएच. डी. प्रबंधाशिवाय त्यांचा **कमलगंध** (१९७५) हा चिंतनपर ललितलेखसंग्रह, **मधुगंध** (१९८४) काव्यसंग्रह ह्या साहित्यकृती निर्माण झाल्या. विविध नियतकालिकांमधून स्त्रियांच्या सुख-दुःखाविषयी स्फूटलेखनही केले. त्यांचे लेखन संवेदनशील होते. स्त्रीमुक्तीच्या अवास्तव कल्पना न करता, स्त्री-पुरुष सहजीवनावर त्यांची श्रद्धा होती. त्याचबरोबर स्त्रियांना त्यांचे स्वतःचे अवकाश मिळावे ह्यासाठी त्या आग्रही होत्या. हुंडा, स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार, हिंसाचार विरोधात त्यांनी परखड भूमिका घेतली. पंचायतीच्या माध्यमातून कौटुंबिक समस्या निवारणाचे कार्य पार पाडताना मातेची वत्सलता आणि कर्तव्य कठोरता यांचा अनोखा मिलाप त्यांच्यात अनुभवास मिळे. महिलांकडून पुरुषांवर अन्याय होत असेल तर महिलांनाही खडसावण्यात त्या

मागेपुढे पाहत नसत. त्यांच्या साहित्यकृतीबाबत त्यांना अनेक पुरस्कार व प्रमाणपत्रे प्राप्त झाली होती. त्या 'स्त्री हितकारिणी संस्थेच्या' संस्थापक सदस्या होत्या. त्याशिवाय 'लेवा भोर पंचायत' न्यायमंडळाच्या पंच, तापी-परिसर विद्या मंडळाच्या सदस्या, पांडुरंगशास्त्री आठवलेंच्या स्वाध्याय चळवळीच्या सक्रिय कार्यकर्त्याही होत्या.

४१) चौधरी, व्ही. के. तथा रँगलर चौधरी - मूळ गाव अट्रावल (ता. यावल). लेवा पाटीदार समाजातील एकमेव रँगलर. ते पुणे विद्यापीठातून एम.ए. (कँटाव) झालेत. १९४५ मध्ये मुळजी जेठा महाविद्यालय सुरू झाले. व्ही. के. चौधरी हे या महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य होत. दानशूर शेठ चत्रभूज गोवर्धनदास यांच्या आर्थिक मदतीने त्यांनी त्यांच्या प्राचार्यपदाच्या कारकिर्दीत दीर्घ परिश्रमाने महाविद्यालयाच्या इमारतीचे काम पूर्ण केले, या महाविद्यालयाच्या स्थापनेत व निधी जमा करण्यात यांचा मोठा वाटा होता. विद्यार्थ्यांची संख्या वाढविली, महाविद्यालयाला सुसज्ज प्रयोगशाळा व पहिल्यांदाच ६,५०० पुस्तकांचे ग्रंथालय उपलब्ध करून दिले. तीन वर्षे ते महाविद्यालयाचे प्राचार्य राहिले. त्यानंतर ते मुंबई शासनाच्या शिक्षण खात्यात उपसचिवपदी नियुक्त झालेत. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्यात त्यांनी सचिव, प्रधान सचिव, सल्लागार आदी पदे भूषविलीत. महाराष्ट्रात ते शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध होते.

४२) चौधरी, डॉ. व्ही. आर. - मूळ गाव चांगदेव (ता. मुक्ताईनगर), डॉ. व्ही. आर. चौधरी हे पुण्याच्या नॅशनल केमिकल लेबोरेटरीचे शास्त्रज्ञ असून त्यांनी इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी (इन्सा फेलोशिप मिळाली आहे) उत्प्रेरक प्रक्रिया या क्षेत्रात उल्लेखनीय संशोधन केले आहे. नैसर्गिक वायूचे मूल्यवर्धन करण्यासाठी त्यांनी उत्प्रेरक प्रक्रिया विकसित केली आहे. त्याचबरोबर प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांतही त्यांचे संशोधन आहे. त्यांचे २९० चे वर संशोधन निबंध प्रसिद्ध झाले आहेत, तसेच सुमारे २५ अमेरिकी व युरोपीय पेटंट त्यांच्याकडे आहेत. अमेरिकेतील **आयएसआय** संस्थेने त्यांची सन्माननीय रसायनशास्त्रज्ञ म्हणून नोंद घेतली आहे. 'इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' यांचे ते फेलो आहेत. 'देशदूत' च्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या ३० गुणपतींच्या गौरव समारंभात डॉ. व्ही. आर. चौधरी यांचा २४ डिसेंबर २००२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. विलासराव देशमुख यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

४३) जावळे, पद्मावती भास्कर (जन्म १९३९) - मूळ गाव भालोद (ता. यावल) असून माहेर सांगवी (ता. यावल) हे होय. शिक्षण एम.ए., हिंदी (स्पेशल), एम.ए., मराठी (स्पेशल), एम.फील. (मराठी), बी.एड., एस.टी.सी., हिंदी साहित्याचार्य (बनारस), पंडित, पुणे; हिंदी शिक्षक सनद, अमळनेरला अध्यापकी केली. सौ. पद्मावती जावळे यांचे साहित्यातील स्थान बरेच वरचे आहे. त्यांनी विपुल लेखन केले असून त्यात **मृदुली** (कवितासंग्रह), **अश्विनी गंध** (कादंबरी), चंद्रकोर (कादंबरी), **हरवलेले घरकुल** (कादंबरी), **धुक्यात हरवली वाट** (कादंबरी), **इंद्रमणी** (बालकथा), **शोध**

(कथासंग्रह), **मायेची सावली** (कथासंग्रह), **दिव्य वनस्पती** (बाल नाटिका), **छोटा शिलेदार** (बाल नाटिका), **अद्‌भुत कमळ** (बाल कथा), **मिनाली व वनपरी** (बाल कथा) आणि **नभ रंग बावरे** (कविता संग्रह) यांचा समावेश आहे. याशिवाय **पुनरुत्थान** (कादंबरी), **तळ्यात मळ्यात** (कथा संग्रह), **जिद्द** (बाल कथा), **पृथूगीत** (कथा गीत), **बंध जे जुळले** (तीन अंकी नाटक) हे प्रकाशन मार्गावर आहेत. **वसंत, कथाश्री, तारका, अस्मितादर्श** आदी अंकांमधून त्यांच्या कथा, कविता, लेख प्रसिद्ध झाले आहेत. आकाशवाणी व दूरदर्शनवरून त्यांचे कथावाचन व श्रुतिका सादर झालेल्या आहेत. त्यांच्या **मृदुली** या कविता संग्रहास प्राप्त झालेला ''महानुभाव विश्वभारती पुरस्कार'', **चंद्रकोर** कादंबरीस दैनिक **सकाळचा** ''नानासाहेब परुळेकर'' प्रथम पुरस्कार, **चंद्रकोर** याच कादंबरीस कामगार साहित्यसम्मेलनाचा ''अण्णाभाऊ साठे'' प्रथम पुरस्कार, **नभ रंग बावरे** कविता संग्रहास खानदेश साहित्य सम्मेलनाचा २००३ चा ''बहिणाबाई चौधरी पुरस्कार'' व जळगावचा **''काव्यरत्नावली''** पुरस्कार यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. याशिवाय त्यांच्या काही कथा-कवितांना महिला दक्षता, नवयुग कविता स्पर्धांचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

त्या सध्या डोंबिवली येथे राहत असून अजूनही त्यांचे लेखन सुरू असून लवकरच त्यांची **पुनरुत्थान** कादंबरी प्रकाशन मार्गावर आहे.

४४) जावळे, एम. आर. - मूळ गाव भालोद (ता. यावल). गरिबीच्या परिस्थितीतून जिद्दीने व्ही.जे.टी.आय. येथून एल.एम.ई. ही पदवी प्राप्त केली. ॲटोमेटिक एनर्जीमध्ये नोकरीला सुरुवात करून नंतर फिलिप्स इंडियामधून जनरल मॅनेजरच्या पदावरून कळवा लायटिंग फॅक्टरी येथून निवृत्त झाले. पी.एस.लॅम्प (एनर्जी सेव्हिंग लॅम्प) या उत्पादनासाठी त्यांनी हॉलंड येथे बिझनेस टूर केली आहे. सध्या ते पी.एस. लॅम्प आणि त्यांची मशिनरी उत्पादकांचे सल्लागारही आहेत. सी.एन.जी. साठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीचेही ते उत्पादक आहेत. पेट्रोल गाड्यांचे सी.एन.जी. मध्ये रूपांतर करण्याचा त्यांचा व्यवसाय आहे. कार व रिक्षांचे एलपीजी रूपांतर करण्याचे काम सुरू आहे. जावळे पती-पत्नीस समाजाबद्दल आपुलकी असून सढळ हस्ते मदत करतात.

४५) जावळे, हरिभाऊ माधव (जन्म : ३ ऑक्टोबर १९५३) - मूळ गाव भालोद (ता. यावल) असून एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात हरीभाऊंचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण भालोदच्याच न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले; तर महाविद्यालयीन शिक्षण जळगावच्या एम. जे. कॉलेजमध्ये झाले. बी. एस्सी. झाल्यावर सुरुवातीस त्यांनी एम. एस. कॅटालिस्ट या रासायनिक उद्योगात नोकरी केली. त्यानंतर १९८० च्या सुमारास त्यांनी नोकरी सोडून कृषी उद्योगावर आधारित अमोल ट्रेडर्स नावाने व्यवसाय सुरू केला. तेव्हापासूनच त्यांच्या सामाजिक संस्काराची नाळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जुळली. नंतर त्यांचा संबंध मान. एकनाथराव खडसेंशी आला.

नाथाभाऊंकडे अजोड संघटन कौशल्य असल्याने त्यांनी हरिभाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील गुण अचूक हेरले व त्यांना भाजपात ओढले. १९९५ च्या सुमारास हरिभाऊ भाजपात सक्रिय झाले. २००४ मध्ये ते यावल विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. वाय. जी. महाजनसरांना खासदारकीचा राजीनामा द्यावा लागल्याने जळगाव लोकसभा मतदारसंघातून हरिभाऊ २००७ मध्ये भाजपाचे खासदार म्हणून निवडून आले. त्यांच्या कार्यशैलीमुळे २००९ च्या निवडणुकीत ते नवनिर्मित रावेर मतदारसंघातून पुन्हा खासदार म्हणून निवडून आले. त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा, खानदेशात तसेच दिल्लीतही उमटविला. ते मधुकर सह. साखर कारखान्याचे अध्यक्ष आहेत. २०१४ मध्ये ते रावेर मतदारसंघात आमदार म्हणून निवडून आले.

४६) झोपे, अनिलदादा, त्र्यंबकराव (जन्म : २३ सप्टेंबर १९६२)- मलकापूरचे असून शिक्षण बी.ए. पर्यंत झाले आहे. विदर्भातील लेवा पाटीदार समाजातील एक तडफदार नेतृत्व. अनिलदादा भोरगाव लेवा पंचायतच्या (मलकापूर विभाग) युवक युवती मंडळाचे विभागीय अध्यक्षपद भूषवित आहेत. त्यांनी मलकापूरला लेवा पाटीदार समाज बहुउद्देशीय विकास मंडळ स्थापन केले आहे व त्याच्या माध्यमातून सामूहिक विवाह सोहळा समिती स्थापन केली आहे. याद्वारे वर्षातून एका दिवशी सामूहिक विवाह सोहळा मोठ्या थाटात पार पाडतात. ह्या सोहळ्यात प्रत्येक जोडप्यातील वधूपक्ष व वरपक्षाकडून प्रत्येकी फक्त २,५०० रु. आकारून थाटात लग्न लावून दिले जाते. त्यात दोन्ही पक्षांकडील प्रत्येकी २५० जणांना निमंत्रणपत्रिका देण्याचीही मुभा आहे. वधूवरांचे कपडेलत्ते, जेवण व लग्नविधीसाठी लागणारा सर्व खर्च ही समिती करते. शिवाय जोडप्यास आवश्यक भांडीही दिली जातात. ही प्रथा आदर्श रूप घेत आहे. लेवा पाटीदार समाज बहुउद्देशीय विकास मंडळ वधूवर परिचय पुस्तिकाही छापते.

हे मंडळ सरदार वल्लभभाई पटेल जयंती समारोह समितीद्वारे गुणी लोक, मान्यवर विद्यार्थ्यांचा सरदार पटेलांच्या जन्मदिनी भव्य सत्कार करते.

अनिलदादांनी लेवा पाटीदार समाज कृषक मित्रमंडळ (मार्गदर्शन चमू) स्थापले असून त्याद्वारे कृषिविषयक मार्गदर्शन करून विधायक कार्यही करतात.

मलकापूर येथे गणेशनगर (चाळीस बिघा) भागात २१ हजार चौरस फूट जागेवर भव्य बहुउद्देशीय संकुलाची निर्मितीचे कार्य सुरू आहे.

४७) झोपे, कै. तोताराम गणू - मूळ गाव भालोद, इ. स. १८८२ मध्ये व्ह. फायनल पास झालेत. त्यावेळच्या मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक होते. अतिशय धार्मिक प्रवृत्तीचे, अध्यात्म-पोथीपाठ नित्यनेमाने करणारे हरिभक्तपरायण असून निरोगी व दीर्घायुषी होते. ते १०७ वर्षे जगले. शेवटपर्यंत पोथीपाठ सुरू होते. गावात शाळा असावी अशी तीव्र इच्छा. भालोदला न्यू इंग्लिश स्कूलच्या बांधकामात त्यांनी आपले सारे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य झोकून दिले. त्यांची जिद्द व तळमळ वाखाणण्याजोगी होती.

४८) धांडे, धोंडो भागवत (जन्म : १८ मार्च १९०५, मृत्यू : २९ नोव्हेंबर १९९३)-मूळ गाव सावदा (ता. रावेर). घरच्या गरिबीमुळे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण स्वकष्टाने पैसे मिळवून केले. फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए. झाल्यावर पोलीस खात्यात नोकरी मिळाली.

नाशिक येथील पोलीस ट्रेनिंग स्कूल प्रशिक्षणानंतर धुळे जिल्ह्यात फौजदार झाले. तेथे भोंदुगिरी व अंधश्रद्धेची अनेक प्रकरणे उघडकीस आणली.

उत्साह, कर्तव्यतत्परता व असाधारण कामगिरीमुळे ते जनतेत व पोलीस खात्यात प्रिय ठरले. त्यांनी धुळे, पुणे, अहमदाबाद, अकोला, भडोच व दिल्ली येथे निरनिराळ्या पदोन्नतीच्या पदावर काम केले. पुणे वास्तव्यात अफरातफरीच्या प्रकरणांत, अकोल्यातील लक्ष्मी बँक गैरव्यवहार प्रकरणात न्यायाधीशांनीही त्याच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांच्या अतुलनीय कामगिरीबाबत १९५८ चे मुख्यमंत्र्यांचे हस्ते सुवर्णपदक प्राप्त झाले. त्याच वर्षी केंद्र सरकारनेही भारतीय पोलीस पदक देऊन त्यांचा गौरव केला. ते अतिशय शिस्तप्रिय होते. गुन्हेगार अचूक शोधून काढण्याच्या त्यांच्या चातुर्य वैशिष्ट्यामुळे शासनाने त्यांची सी.आय.डी. खात्यात उच्चपदी नियुक्ती केली.

डी. बी. धांडे हे वरिष्ठ पोलीस अधिकारी असताना जातीप्रेमामुळे अनेक लेवा पाटीदार मुलांना पोलीस खात्यात लावले.

४९) नारखेडे, डॉ. अरविंद कृष्णा तथा ए. के. सर (जन्म : ६ जुलै १९४१) - मूळ गाव भादली. शिक्षण एम. ए., बी. एड. पर्यंत. ए. के. नारखेडे सर महात्मा गांधी विद्यालय, भादली येथे शिक्षक व नंतर मुख्याध्यापक होते. त्यांचा शैक्षणिक व सामाजिक कार्यात सदैव सहभाग असतो. अनेक सहकारी संस्थांचे ते पदाधिकारी आहेत. सातत्याने जळगावातून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रातून नैमित्तिक प्रश्नावर लेखन सुरू असते.

त्यांची महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे आणि नाशिक या दोन्ही विभागीय मंडळावर सदस्य म्हणून राज्यपालांद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना जळगाव जिल्हा परिषद तसेच महाराष्ट्र शासनाद्वारे आदर्श शिक्षक म्हणून दोनदा गौरविण्यात आले आहे. श्री. ए. के. सर सानेगुरुजी कथामालाचे कथानिवेदक, साने गुरुजी बालभवनाचे मानद निदेशक, जळगाव जिल्हा साहित्य संघाचे सदस्य; सर जळगावला भरलेल्या ५८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सहचिटणीस होते. चौथे बालकुमार साहित्य संमेलन जळगावचे सदस्य होते तसेच जळगाव पीपल बँक संचलित कै. रा. ल. पाटील स्मृतिसेवा ट्रस्टचे विश्वस्त आहेत; नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड, जळगाव जिल्हा शाखेचे ते संचालक समिती सदस्य; जळगाव जिल्हा पूर्व विभाग शिक्षक आणि पतपेढी, भुसावळचे संस्थापक उपाध्यक्ष; जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतपेढीचे उपाध्यक्ष होते.

'कन्यारत्न जन्म सन्मान' योजनेचे ते जनक आहेत. भादली ज्येष्ठ नागरिक संघाद्वारे ही योजना महाराष्ट्र व भारतभर राबविल्याने महाराष्ट्र फेस्कॉम आणि भारत फेस्कॉमचा पुरस्कार भादली ज्येष्ठ नागरिक संघास मिळाला आहे. त्यांच्या प्रेरणेने अंध, अपंग, घटस्फोटित, अल्प उत्पन्नधारक, वंचित घटक वरवधूंचा पहिला मेळावा भादली येथे आयोजित केला गेला. भारतीय राज्यघटनेच्या २९ व्या कलमानुसार भाषेच्या आधारे लेवा बोली बोलणारे लेवा पाटीदार अल्पसंख्य म्हणून घोषित केले. या संकल्पनेचा त्यांनी पाठपुरावा केला.

ए.के. सरांच्या '**खमंग नाट्यछटा**', '**खानदेशी खुडा**' हे लेवा बोलीतील पहिले नाट्यछटा संग्रह आहेत. याशिवाय त्यांचे **'सात गोष्टी पर्यावरण संस्काराच्या', तपस्वी श्री क्षेत्र कुंडलेश्वरच्या झेंडूजी महाराज बेळीकर 'खराटा'** - काव्यसंग्रह या साहित्यकृतीही प्रकाशित झाल्या आहेत. नाट्यछटा हा अवघड साहित्यप्रकार त्यांनी समर्थपणे हाताळल्याने त्यांना खानदेशचा दिवाकर म्हटले जाते. नाट्यछटांद्वारे त्यांनी अनेक अनिष्ट सामाजिक प्रथांविरुद्ध आवाज उठविला आहे.

त्यांनी आजपर्यंत **मोहोर** (प्रातिनिधिक काव्यसंग्रह), **लेवा गणबोलीचे मानकरी (स्मरणिका), सुवर्णकण, लक्ष्यवेध, लेवा बोलीतील बहिणाबाईची गाणी-रसास्वाद** (लेखक - नि. रा. पाटील), **लेवा गणबोली कोश** (लेखक नि. रा. पाटील, सौ. ऊर्मिला पाटील दुसरी आवृत्ती) **माझा भंडाराडोंगर** - (लेखक तुकाराम भोळे) या ग्रंथांचे संपादनही केले आहे.

आगामी सहित्यात त्यांचा **कुचुमरा, लेवा बोलीतील लेख मिसळ**, **मिस्कील कथा, धडपडणाऱ्या मुलांच्या नजरेत सानेगुरुजी, माझी मुशाफिरी-** प्रवास वर्णन, **वेदनांचे जाहले वेद** - कादंबरी, साहित्याकृती प्रतीक्षेत आहेत.

त्यांना लेवा गणबोली साहित्य-रत्न, डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा-रत्न, सूर्योदय साहित्य सेवा-रत्न, सामाजिक कृतज्ञता पुरस्कार आणि डॉक्टरेट इन लिटरेचर (डी. लिट्) हे जीवन-गौरव पुरस्कार मिळालेले आहेत.

५०) नारखेडे, अरुण श्रीपत (जन्म : १५ नोव्हेंबर १९३६) - मूळ गाव साळवे (ता. धरणगाव, जि. जळगाव) हे पुणे विद्यापीठातून बी. एससी व डिप्लोमा इन नॅचरोपथी झाले. श्री अरुण नारखेडेंचे औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. त्यांनी बऱ्याच औद्योगिक संस्थांची पदे भूषविली आहेत. जळगाव एम. आय. डी. सी. त त्यांचा फिनाईल व फॅब्रिकेशनचा व्यवसाय होता. शैक्षणिक क्षेत्रातही ते बऱ्याच संस्थांचे पदाधिकारी होते. राजकीय क्षेत्रातही त्यांचे भरीव कार्य असून त्यांची पुढील १० पुस्तके प्रकाशित आहेत. **वकिलाची उलट तपासणी, न्यायमूर्ती रामानंद** - कादंबरी, **सगाई**-कादंबरी, **संस्कार**-कथासंग्रह, **पुरस्कार**-कथासंग्रह, **प्रीतमणी**-रहस्यकथा, **सूनबाई चुकलेय मी**-नाटक, **पणती**-काव्यसंग्रह,

पराग-काव्यसंग्रह, **चारफुले**-काव्यसंग्रह, त्यांच्या सर्व कार्याबद्दल त्यांना ८-१० पुरस्कारही मिळाले आहेत.

५१) नारखेडे, अशोक रामचंद्र (जन्म : १ सप्टेंबर १९४३) - मूळगाव झोडगा (ता. मलकापूर) असून ते यवतमाळ येथे स्थायी झाले आहेत. शिक्षण : स्थापत्य अभियात्रिकी पदविका झाले असून ते सेवानिवृत्त होताना पाटबंधारे खात्यात शाखा अभियंता म्हणून कार्यरत होते. यवतमाळचे लेवा पाटीदारांचे भ्रातृमंडळ एक आदर्श संस्था असून १९९६ मध्ये श्री. अशोक नारखेडे या मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या कारकिर्दीत यवतमाळ भ्रातृमंडळाचे मुलांचे वसतिगृह व सभागृह उभे राहिले. झोडग्यासही त्यांनी आरोग्यसेवा, नेत्रचिकित्सा शिबिरे आयोजित केली. त्यांनी मलकापूर, झोडगा येथे पांथस्थांसाठी पाणपोया उभारल्या. जीगाव टाकळी धरणाचे पाणी मलकापूर तालुक्यातील १० गावांतील १५,००० एकर क्षेत्रास मिळवून देण्यात सिंहाचा वाटा. झोडग्यास विठ्ठल मंदिर व हनुमान मंदिर जीर्णोद्धार केला. हनुमान मंदिरासाठी स्वतःची दोन एकर जागा दान केली. शिक्षण क्षेत्रातही त्यांचे कार्य मोलाचे असून नरवेल शैक्षणिक संस्थेचे ते नियामक मंडळ सदस्य होते. पाटबंधारे खात्यातही त्यांचे कार्य गौरवपूर्ण राहिले आहे. बोरगाव धरण क्षेत्रात त्यांनी १५००० झाडांची नियोजनबद्ध लागवड व जोपासना केली. या धरणक्षेत्रात सुंदर बगिच्याची निर्मिती, विश्रामगृहाची निर्मिती इत्यादी बोरगाव धरण क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय असून त्यांना त्यांच्या सर्व क्षेत्रातील सेवांमुळे विविध पुरस्कार प्राप्त झाले असून डी.लिटने सन्मानित झाले आहेत.

५२) कै. नारखेडे, दिगंबर विठू ऊर्फ दिगंबरशेठ (जन्म : १५ सप्टेंबर १९२१) - मूळगाव चिनावल (ता. रावेर) असून शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या दिगंबर नारखेडे यांचे शिक्षण अवघे सातवी (इंग्रजी चौथी) एवढेच झाले असले तरी त्यांनी राजकारण, कृषी, सहकार, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्तुंग भरारी मारली. ते चिनावलच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे १९५७-८१ पर्यंत संस्थापक सेक्रेटरी व १९८४ पर्यंत संस्थापक चेअरमन होते. त्यांनीच स्थापलेल्या दिगंबरशेठ सहकारी फ्रूटसेल सोसायटीचे १९६६ पासून चेअरमन; जळगाव व जिल्हा फ्रूटसेल संस्था सह फेडरेशनचे १९७५-१९८३ चेअरमन, फैजपूरच्या मधुकर सहकारी साखर कारखान्याचे १९७२ पासून आजपर्यंत संस्थापक संचालक व १९८३-८४ मध्ये चेअरमन होते. चिनावल ग्रामपंचायतीचे ते १९६८-१९७५ पर्यंत सदस्य होते. चिनावल इंजीन युनियन असो. चे संचालक होते. वसंत सह. दूध उत्पादक संस्थेचे १९६९ ते १९७५ पर्यंत संस्थापक चेअरमन होते. चिनावल सह. ग्राहक वस्तू भांडार लि. चे १९७७ पासून आजपर्यंत संचालक सदस्य आहेत. जळगाव जिल्हा परिषद व पंचायत समितीचे १९७९ ते १९९२ पर्यंत सभासद होते. जळगावच्या लेवा एज्युकेशन युनियनचे १९९४ पासून संचालक आहेत. ते दिगंबरशेठ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. चे १९८८ पासून आजतागायत संस्थापक

चेअरमन आहेत. चिनावलच्या तेलबिया सहकारी सोसा चे संस्थापक चेअरमन; जळगाव जिल्हा मध्यवर्ती सह बँक लि. चे १९८२ ते १९९२ पर्यंत संचालक, रावेर ता. कृषी उत्पन्न बाजार समितीचे १९८१ ते १९८५ व १९८६ ते १९९१ पर्यंत सभापती; भारत कृषक समाजाचे १९८५ पासून कौन्सिल व १९८९ ते १९९७ गव्हर्निंग सदस्य होते. ते महाराष्ट्र स्टेट कृषक समाजाचे १९८३-१९९७ पर्यंत संचालक व १९९४ ते १९९७ पर्यंत चेअरमन होते. दिगंबरशेठ, फैजपूरच्या धनाजी नाना महाविद्यालयाचे १९८० ते २००६ पर्यंत नियामक मंडळ सदस्य, १९८३ ते १९८७ पर्यंत व्हाईस प्रेसिडेंट व १९९२ ते १९९५ पर्यंत नियुक्त सदस्य होते. ते फैजपूरच्या तंत्र व वैद्यकीय शिक्षण संस्था तसेच पॉलिटेक्निक इंजिनीअरिंग व आयटीआयचे १९८३ पासून २००६ पर्यंत व्हाईस प्रेसिडेंट आहेत. जिल्हा विकास व नियोजन मंडळाचे १९८६ ते १९९१ पर्यंत सदस्य; जिल्हा काँग्रेस कमिटीचे १९४७ पासून आजतागायत क्रियाशील सदस्य, चिनावलच्या वै. दिगंबर महाराज सांप्रदायिक वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आहेत. ते सुकी परिसर सह. पाणी वापर संस्था, चिनावलचे संस्थापक अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र केळी उत्पादक महासंघाचे अध्यक्ष व दिल्लीच्या बनाना ग्रोअर्स ऑल इंडिया फेडरेशनचे २००२ पासून सदस्य, २००३ ते २००८ पर्यंत मधुकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष होते.

दिगंबरशेठ यांना जैन इरिगेशन व भवरलाल आणि कांताबाई जैन मल्टिपर्पज संस्थेद्वारे जैन केळी जीवन ध्येय पूर्ती पुरस्कार २००९ मध्ये प्राप्त झाला आहे. त्यांना त्यांच्या अनमोल सेवेबाबत २०११ मध्ये पुण्याच्या पद्मश्री मणिभाई देसाई प्रतिष्ठानचा राष्ट्र सेवा पुरस्कार व २०११ मध्येच दिल्लीच्या सिरीजन्स इंटिग्रेशन पीस प्रतिष्ठानचा प्रतिष्ठेचा इंदिरा गांधी सद्‌भावना पुरस्कार व गोल्ड मेडल प्राप्त झाले आहे.

एवढ्या पदांवर असूनही ते सालस, निगर्वी व नम्र होते. आता वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांचा कार्य करण्याचा उत्साह तरुणांना लाजविणारा होता.

५३) नारखेडे, डॉ. देवराम श्रीपत तथा देवरामभाऊ नारखेडे (जन्म : २५ जुलै १९२१)-मूळ गाव साळवे (ता. धरणगाव, जि. जळगाव) असून शेतकरी कुटुंबात जन्म झाला. त्यांचे विद्यार्थी जीवन तसेच त्यानंतरचे जीवनही अतिशय खडतर गेले. जबरदस्त चिकाटी, जिद्द आणि आत्मविश्वासामुळे अडचणींवर मात करून ते एम.एस्सी. (अॅग्री) व पीएच.डी. झालेत. गुणवत्ता असूनही पुण्याच्या कृषी महाविद्यालयात प्रवेश नाकारला गेल्याने झगडून प्रवेश मिळविला. पारधी खून खटल्यात नाहक गोवले गेल्याने तीनदा फाशी, पाच जन्मठेप, २९ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुप्रीम कोर्टात कायम झाल्यावरही आत्मविश्वासाने न डगमगता गुन्हाच केला नाही तर दयेचा अर्ज का करू? असे ठणकावून सांगणाऱ्या देवरामभाऊची सत्य व ईश्वरावर नितांत श्रद्धा दिसून येते. मृत्युदंडाची टांगती तलवार असूनही फाशी कोठडीतून एम.एस्सी. प्रबंध सादर केला तर पीएच.डी. प्रबंध वयाच्या ८० व्या वर्षी सादर केला. ह्यात त्यांचा कट्टर ध्येयवाद, चिकाटी,

आत्मविश्वास आणि संकटांवर मात करून धैर्याने काम करण्याची वृत्ती हीच त्यांची खरी ओळख.

जात-धर्म भेदभाव न मानता सर्वधर्मसमभाव वृत्तीने मानवधर्म मानणारे देवरामभाऊ वृथा देशाभिमान न बाळगता वसुधैव कुटुम्बकम्, विश्वचि माझे घर व विश्वमानव धर्म मानणारे व त्याचप्रमाणे वागणारे आहेत. दुसऱ्यासाठी जगावे हे त्यांचे ब्रीद व त्यासाठी १७ दिवस उपोषणही केले.

अनेक भारतीय व परदेशी मान्यवरांनी भाऊंबद्दल अतिशय उत्कृष्ट अभिप्राय पाठविले आहेत. युनेस्को ॲडव्हायसरी कमिटी (ऑस्ट्रेलिया) चे चेअरमन प्रा. ऑस्कर ओझर यांनी पं. जवाहरलाल नेहरूंना पत्र लिहून देवरामभाऊंची योग्यता कळविली. तसेच १५-२० ऑस्ट्रेलियन नागरिकांनीही पं. नेहरूंना भाऊंच्या गुणांनी ते प्रभावित झाल्याची पत्रे धाडली आहेत - त्यात त्यांचा प्रामाणिकपणा, हुशारी, चैतन्य, आत्यंतिक शहाणपण, सभ्यता व सहनशीलतेने पाडलेली छाप, गांधीयन मूल्ये ह्याबाबत बरेच लिहिले आहे. पंजाबचे माजी राज्यपाल काकासाहेब न. वि. गाडगीळ यांनी देवरामभाऊंच्या सर्वच आदर्शांबाबत स्तुती व कौतुक केले आहे. पंजाबराव देशमुखांनीही त्यांच्याबद्दल वाटणारी आस्था व कृतज्ञता व्यक्त केली आहे. माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त सेनवर्मांनीही त्यांची दलित व शेतकऱ्यांबाबतची तळमळ व समाजसेवेसाठी समर्पित जीवनाबाबत गौरवोद्‌गार काढले आहेत. आशिया बुक, नॅशनल बायोग्राफी ग्रंथामध्येही त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पुरी यांनी दीक्षांत समारंभात ८० व्या वर्षी डॉक्टरेट मिळविणाऱ्या तपोमहर्षींचा गौरव केला.

आपल्या जीवनात त्यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक व कृषी संस्थांवर महत्वाची पदे भूषविली असून त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. देवरामभाऊंचे लेखनही विपुल असून युनेस्को कॉन्फरन्समध्ये ऑस्ट्रेलियाच्या शेतकऱ्यांनी नवतंत्र स्वीकारण्याच्या पद्धती व नेतृत्व प्रबंधात सहभाग होता; **केळी इतिहास व उत्पादन अर्थशास्त्र प्रबंध** (एम.एस्सी. कृषी) व **जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादकांच्या आर्थिक विकासात केळी उत्पादनाचा परिणाम** (पीएच.डी. प्रबंध, २०००), **बंडखोर सुगृहिणी** (अनुवाद - **दि रिबेलियस होम मेकर्स**-इंदिरा महिंद्र) हे अप्रकाशित असून **काँग्रेस शताब्दी स्मरणिका** (१९७५) मध्ये ''स्वातंत्र्य लढ्यातील जळगाव'' त्याशिवाय प्रमुख वर्तमानपत्रांमध्येही स्तंभलेखन केलेले असून पारितोषिकेही प्राप्त झाली आहेत. ते **राष्ट्रसेवक** साप्ताहिकाचे १९७८-७९ मध्ये कार्य. संपादक होते. त्याशिवाय **फाशी कोठीतील माझी चार वर्षे, माझी जन्मठेप, Danger to Democracy** आणि **अंधारातून प्रकाशाकडे** ही पुस्तके प्रकाशन मार्गावर आहेत. विविध अभ्यास गटांचे नेतृत्व करून ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, सिंगापूर, थायलंड, ब्रह्मदेश दौरे केलेत. अस्पृश्यता निवारण, हुंडाबळी व आंतरजातीय विवाहासाठी त्यांनी हिरिरीने प्रयत्न केले आहेत.

५४) नारखेडे, कौतिक गरबड ऊर्फ के. नारखेडे (जन्म : २६ ऑक्टो. १९००, मृत्यू : २१ सप्टेंबर १९८०)- मूळ गाव डोंगरकठोरे, घरची स्थिती बऱ्यापैकी. तथापि वडिलांच्या अशिक्षितपणामुळे इतरांनी फायदा उचलून गरिबीची परिस्थिती आली. सातवी फायनल झाल्यावर कौतिक नारखेडेंनी घर सोडून १९१८ ते १९२१ चे दरम्यान प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण घेतले. येथेच त्यांच्या साहित्याची वाटचाल सुरू झाली. त्यांनी किनगाव, नांदेड, पाडळसे येथे शिक्षकी केली. १९२७ मध्ये ते न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिकसाठी बसले व या शाळेत सर्वप्रथम आले. १९२८ मध्ये डी. एस. हायस्कूल, भुसावळ येथे शिक्षकाची नोकरी पत्करली. १९३५ मध्ये ते कलकत्ता विद्यापीठाची इंटर परीक्षा पास झालेत. १९४० मध्ये पुण्याची महाराष्ट्र साहित्य प्रज्ञा ही परीक्षा प्रथम क्रमांकाने पास झाले. भुसावळ परिसरातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून १९६० मध्ये त्यांनी श्री. शिवाजी प्रसारक मंडळाची स्थापना करून या संस्थेची "आपली शाळा" नावाची प्राथमिक शाळा सुरू केली. पुढे या शाळेचे नामाभिधान ' तु. स. झोपे गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर" असे करण्यात आले. पुढे १९६७-६८ मध्ये त्यांनी तापीनगर, भुसावळ येथे "आपले विद्यालय" नावाचे हायस्कूल सुरू केले. भुसावळच्या नहाटा कॉलेज स्थापनेतही के. नारखेडे यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांची तळमळ, प्रेमाने कार्य करण्याची प्रवृत्ती व आपलेपणा ह्या गुणांमुळे लोकांनी त्यांना बाबासाहेब अशी उपाधी बहाल केली. पुढे आपले विद्यालयचे नामाभिमान "के. नारखेडे विद्यालय" असे करण्यात आले. तेथे कनिष्ठ महाविद्यालयही सुरू करण्यात आले आहे.

बाबासाहेब शिक्षण क्षेत्रातील महर्षी तर होतेच, परंतु साहित्य क्षेत्रातही तपस्वी होते. १९३० मध्ये त्यांनी दोन **बालगीत संग्रह** प्रसिद्ध केले. त्यांची **चिव चिव** ही बालगीतमाला व त्यानंतर **माझी गोड गाणी** हे काव्यसंग्रह त्यांच्या कवीमनाची साक्ष देतात. लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या **मोत्यांच्या माळा, तारकापुराण, मधुराणी** या पुस्तकांना लोकप्रियता मिळाली. त्यांनी **जगाचा राजा, सूर्यदेवाची मुलगी, चांदण्याची गोष्ट, समुद्राची मुले** या भौगोलिक सत्यावरील गोष्टी लिहिल्यात. **काळे सोने**मध्ये लोखंडाचे महत्त्व पटविले आहे. **सोनेरी पान** कथासंग्रहही लोकप्रिय झाला.

बालगीते, बालकथा, बालकादंबरीकार, नाट्यप्रवेश अशा तऱ्हेचे बालवाङ्मय, बालमनाचे मानसशास्त्र लक्षात घेऊन निर्माण केले. त्यांनी लिहिलेल्या **मधुराणी, जलवंती, तारकापुष्प** व **आनंदवन** या कादंबऱ्या अतिशय गाजल्या. **जलवंती** व **आनंदवन** या कादंबऱ्यांना राज्य सरकारने पारितोषिके देऊन गौरविले आहे. त्यांची हिंदी व कन्नड भाषेतही रूपांतरे झाली आहेत.

त्यांचे किशोरांसाठी लिहिलेले **राधेय** (नऊ प्रवेशात्मक) विशेष रूपाने गाजले. **ऋतूरंग** हे खंडकाव्यही नावाजले. **शिवार** मध्ये त्यांनी ग्रामीण व्यक्तिरेखांची स्वभावचित्रे प्रतिबिंबीत केली आहेत. त्यांच्या **अंजनी** कादंबरीत समाजाच्या विविध स्तरांवरील

व्यक्तिरेखांचे दर्शन घडते. **खानदेशची माती** पुस्तकातही खानदेशी समाजातील स्वभावचित्रे नजरेस येतात. त्यांचा **काव्यकलेचे अंतरंग** हा प्रबंध त्यांच्या मुद्देसूद विचारांचे व दांडग्या आत्मविश्वासाचे दर्शन घडवितो. रवींद्रनाथ टागोरांनी लिहिलेल्या **गीतांजली**तील काही कवितांचा भावानुवाद पण त्यांनी संग्रहित केला आहे.

५५) नेमाडे, नामदेवराव माधवराव (जन्म : १८९८) - शिक्षण मॅट्रिक. ३ वर्षे रेल्वेत नोकरी, अध्यात्मवादी असल्याने नोकरी सोडून शेतीकडे लक्ष घातले. १९२५ मध्ये जळगाव प्रिंटिंग प्रेस घेऊन **'विजय'** साप्ताहिक काढले. भुसावळला माधव छापखाना सुरू केला. आध्यात्मिक विषयांवर लेखन केलेले आहे. ते धार्मिक प्रवृत्तीचे, प्रामाणिक व प्रेमळ होते. माधव छापखाना शेवटपर्यंत व्यवस्थापक पिळोद्याचे नागो महाजन यांनी व्यवस्थित चालविला.

५६) नेमाडे, पद्मश्री डॉ. भालचंद्र (जन्म : १९३८) - लेवा पाटीदारांमधील एक थोर साहित्यिक. मूळगाव सांगवी बु. (ता. यावल) येथले असून त्यांना डी. लिट. ही सन्माननीय पदवी मिळाली आहे. त्यांची कारकीर्द औरंगाबाद, लंडन, पणजी, मुंबई येथे झाली आहे. त्यांच्या **मेलडी** (१९७०) व **देखणी** (१९९१) या कविता संग्रहांना समीक्षकांचा फार मोठा प्रतिसाद लाभला. त्यांच्या **कोसला** (१९६३) या पहिल्याच कादंबरीने साहित्य क्षेत्रात क्रांती घडवून आणली आणि साहित्य क्षेत्रात त्यांना खूपच वर नेऊन ठेवले. अस्तित्ववादी कादंबरीचे प्रथमच दर्शन घडविणारी ही कादंबरी खूपच गाजली. खानदेशी विशेषत: लेवागणातील माणसाच्या सर्व गुणांसह साकार झालेली, त्यातील एक व्यक्तिरेखा एवढी प्रभावी ठरली की, या कादंबरीमुळे ते **'कोसला'** कार भालचंद्र नेमाडे म्हणून प्रसिद्ध पावले. त्यांच्या **बिढार** (१९७५), **जरिला** (१९७७), **हूल** (१९७५) व **झूल** (१९७९) या कादंबऱ्याही चांगल्या गाजल्या. निर्भय समीक्षक व विचारवंत आणि इंग्रजीचे प्राध्यापक म्हणूनही भालचंद्र नेमाडे देशभर परिचित आहेत. त्यांच्या मराठी समीक्षात्मक ग्रंथात **साहित्याची भाषा** (१९८७, १९९८), **टीका स्वयंवर** (१९९०, २०००), **तुकाराम** (१९९४, १९९७) यांचा समावेश असून **शैली विचार** हा समीक्षात्मक ग्रंथ प्रकाशन मार्गावर आहे. त्यांच्या इंग्रजी साहित्यात **तुकाराम** (१९८०), **दि इन्फ्लूअन्स ऑफ इंग्लिश ऑन मराठी सोश्यो-लिंग्विस्टिक ॲण्ड स्टायलिस्टिक स्टडी** (१९९०), **मराठी रीडिंग कोर्स** (१९९१), **इंडो-आंग्लियन रायटिंग्जः टू लेक्चर्स** (१९९१) यांचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यांची **हिंदू** (२०१०) ही कादंबरी जगभर गाजली. त्याशिवाय त्यांनी कितीतरी संशोधनात्मक आणि समीक्षात्मक लेख लिहिले आहेत. त्यांनी कितीतरी गुणविवेचनात्मक अभ्यासविषयक ग्रंथांचे संपादन केलेले आहे. भालचंद्र नेमाडे हे सुटसुटीत लघुग्रंथ चळवळीच्या आद्य संस्थापकांपैकी एक असून एतद्देशीय साहित्यनिर्मितीचे क्रियाशील पुरस्कर्ते आहेत. त्यांनी कितीतरी मराठी कविता संग्रह संपादित व प्रकाशित केले आहेत. त्यांना अनेक

साहित्य पुरस्कार मिळाले असून त्यातील **बिढारला** मिळालेला ह. ना. आपटे पुरस्कार (१९७६), **झूल**ला मिळालेला कराड (यशवंतराव चव्हाण) पुरस्कार (१९८४); **साहित्याची भाषा**ला मिळालेले कुरुंदकर पुरस्कार (१९८७) आणि मराठी अभ्यास परिषद महाबँक पुरस्कार (१९८८); **टीका स्वयंवरला** मिळालेले रा. श्री. जोग पुरस्कार (१९९०), ह. श्री. शेणोलीकर पुरस्कार (१९९०) आणि साहित्य अकादमी पुरस्कार (१९९१); **देखणीला** मिळालेले कुसुमाग्रज पुरस्कार (१९९१) आणि ना. धों. महानोर पुरस्कार (१९९२) हे प्रमुख होत. डॉ. नेमाडे यांना केशव गोरे स्मारक ट्रस्ट (पुणे) द्वारे आयोजित २००१ चा महाराष्ट्र फाउंडेशन गौरव पुरस्कार सुप्रसिद्ध समाजवादी विचारवंत प्राध्या. ग. प्र. प्रधान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. दि. १८ जानेवारी २००४ रोजी त्यांना गंगाधर गाडगीळ यांच्या हस्ते मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात डॉ. अनंत व लता लाभसेटवार प्रन्यासचा मराठी ललित साहित्यासाठीचा पुरस्कार प्राप्त झाला असून ह्या पुरस्कारात एक लाख रुपये, मानचिन्ह व मानपत्राचा समावेश आहे. इ. स. २०१३ मध्ये त्यांना नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे जनस्थान पुरस्कार प्राप्त झाला आणि नुकताच फेब्रुवारी २०१५ मध्ये त्यांना भारताचा साहित्यक्षेत्रात गणला जाणारा सर्वोच्च **ज्ञानपीठ पुरस्कार** प्राप्त झाला आहे. या पुरस्कारामुळे ते सर्व जगभर प्रसिद्ध पावले असून लेवा समाजासाठी ही फार मोठी भूषणावह गोष्ट आहे. हा पुरस्कार मिळविणारे ते चौथे महाराष्ट्रीयन आहेत. मराठी साहित्य क्षेत्रात डॉ. नेमाडे यांनी नवनवीन वाटा चोखाळल्यामुळे तत्सम साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकास नेमाडपंथी साहित्यिक संबोधले जाते. ते मुंबई विद्यापीठात गुरुदेव टागोर तौलनिक साहित्याच्या अध्यासनावर १९९३ ते १९९८ पर्यंत प्राध्यापक होते.

५७) नेमाडे, भालचंद्र नामदेवराव (जन्म : ५ जुलै १९३६)- पत्रकारमहर्षी श्री. भालचंद्र नेमाडेंचे मूळ गाव जळगावच असून गेली ५२-५३ वर्षे ते वृत्तपत्रसृष्टीची सेवा करीत आहेत. १९५३ मध्ये मॅट्रीक झाल्यावर पुण्याच्या चित्रशाळा प्रेसच्या वासुकाका जोशी ट्रस्टच्या तीन वर्ष शिष्यवृत्तीवर पुण्याच्या अनाथ विद्यार्थीगृहाच्या मुद्रण शाळेतून टायपोग्राफी कोर्स पूर्ण केला. त्यानंतर त्यांनी पुणे, मुंबई, नागपूर येथील १० वर्षे नोकरी काळात पुढील शिक्षणही घेतले. १९५७ मध्ये ते गिरगाव-मुंबईला एका प्रेसमध्ये असिस्टंट मॅनेजर लागले. १९५८ मध्ये पुणे विद्यापीठाच्या छापखान्यात लागले. १९५९ ते १९६२ मध्ये त्यांनी नागपूरच्या शासकीय मुद्रणालयात प्लॅनिंग सुपरवायझर म्हणून सेवा केली. १९६३ मध्ये नोकरी सोडून जळगावला स्वतःचे श्रीकृष्ण मुद्रणालय काढले ते १९७४ पर्यंत चालविले. त्यात तोटा आल्याने १९७४ पासून २००० पर्यंत जळगावच्या दैनिक **जनशक्ती** मध्ये २६ वर्षे उपसंपादक व मुख्य उपसंपादक म्हणून सेवा केली. दरम्यानच्या काळात १९७८ पासून दैनिक **लोकमत,** जळगाव व १९८९ पासून दैनिक **लोकसत्ता**, मुंबई या वर्तमानपत्रांचे जिल्हा वार्ताहर म्हणूनही सेवा केली. १९७८ ते

१९८२ या कालावधीत त्यांनी जळगावच्या **बालशक्ती** मासिकात कार्यकारी संपादक म्हणून सेवा केली. २००० ते २००२ पर्यंत जळगावच्या दैनिक **देशोन्नती** चे उपसंपादक होते.

नागपूरला शासकीय मुद्रणालयात असताना ते **''बोलका टाइप''** चे संपादक मंडळ सदस्य होते. १९६१-६२ मध्ये **सिनेन्यूज** पाक्षिक, नागपूरचे ते उपसंपादक होते. १९६३-६६ कालवधीत ते जळगाव समाचार वृत्तपत्रातील 'कलातरंग' चे स्तंभलेखक होते. १९६३-६४ मध्ये ते पुण्याच्या **'विशाल सह्याद्री'** दैनिकाचे जिल्हा वार्ताहर होते. १९६४-६५ मध्ये ते दैनिक **मातृभूमी**, जळगावचे उपसंपादक होते. त्यांनी १९६८ मध्ये स्वतःचे **खानदेश साप्ताहिक** सुरू केले. त्याचे ते संपादक होते.

पत्रकार क्षेत्रात त्यांचे संघटनात्मक कार्य असून १९७८-७९ मध्ये जळगाव जिल्हा पत्रकार संघाचे ते अध्यक्ष झाले. त्याआधी चार वेळा ते या संघटनेचे सरचिटणीस होते. महाराष्ट्रातील पहिले पत्रकार भवन जळगाव येथे निर्माण करण्यात आले. त्याच्या उभारणीत भालचंद्र नेमाडेंचे योगदान होते. जळगाव पत्रकार सह. गृहनिर्माण संस्थेत ते ४ वर्षे चेअरमन होते.

उपेक्षित तमाशा कलावंतांचे विविध प्रश्न हाताळण्यासाठी मराठी तमाशा परिषद या संस्थेत त्यांनी विविध पदे हाताळली. नागपूरला कामगार कल्याण व संघटन कार्याचे त्यांनी प्रशिक्षण वर्ग चालविले. ते जळगाव शहर व जिल्हा मुद्रक संघाचे काही काळ अध्यक्ष, महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे काही काळ चिटणीस होते.

५८) नेमाडे, प्रा. राम सोनाजी (भाषाप्रभू) (जन्म : १९४०) - मूळगाव नाडगाव (महामहिम माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांचे जन्मगाव)ता. बोदवड, जि. जळगाव येथे सोनाजी तुकाराम नेमाडे व सगुणा सोनाजी नेमाडे या गरीब शेतकरी दाम्पत्याच्या घरात जन्म झाला. बालपण अठराविश्वे दारिद्र्यात. प्राथमिक शिक्षण गावीच सातवी पर्यंत. बोदवड येथे ८ वी ते १० वी व ११वी अंबरनाथ येथील महात्मा गांधी विद्यालयात. हिंदी प्रवीण परीक्षेच्या आधारावर एदलाबाद (मुक्ताईनगर) येथे हिंदी शिक्षक म्हणून कार्य. त्याच वर्षी रा. भा. पंडित परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढील वर्षी सांगलीला सी. हिं. शि. सनद प्रशिक्षण पदवी पूर्ण केली. एक वर्ष सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये नोकरी केली. बी.ए. बाहेरून, एम.ए. रात्र महाविद्यालय व बी.एड. नियमित कॉलेजातून पूर्ण केले. अनेक गावी भ्रमंती केल्यावर डोंबिवलीत स्थायिक. दादरच्या छबिलदास हायस्कूलमध्ये सहायक शिक्षक म्हणून नोकरी. वांद्रे (मुंबई) येथील चेतना कॉलेजमध्ये अर्धवेळ लेक्चरर म्हणून काम केले. याच काळात **मॅट्रिक मॅगेझिन**मधून लेखन. **जीवनदीप प्रकाशनातून** मराठी व हिंदी या विषयात व्यवसाय पुस्तके, व्याकरण व लेखनाची पुस्तके असे विपुल लेखन केले. जे. ई. इन्स्टिट्यूटच्या शिक्षक संघाचे अध्यक्ष म्हणून ५ वर्षे काम पाहिले. **लेवा प्रबोध पत्रिकेचे** संपादनही केले. पुढे

लेवायन नावाचे त्रैमासिक स्वखर्चात चालविले. ते स्वतः कवी व लेखक असून अनेक नवोदित साहित्यिकांच्या साहित्यकृतींना प्रस्तावना/अभिप्राय देऊन प्रोत्साहित केले आहे. शाळा-कॉलेजातून अध्यापन करीत असताना स्वेच्छानिवृत्ती घेऊन 'राजेश स्टडी सेंटर' नावाने शैक्षणिक वर्ग सुरू करून सतत २५ वर्षे शहराला गुणवत्ताधारक विद्यार्थी बहाल केले. सुमारे ३० वर्षांपूर्वी डोंबिवलीत 'लेवाभवन' उभे राहावे म्हणून रु. १,११,१११ रु. ची भरघोस देणगी देऊन 'मातोश्री सगुणा सोनाजी नेमाडे' या सभागृहाच्या निर्मितीला हातभार लावला. पुढे त्याचेच रूपांतर 'लेवाभवन' या भव्य वास्तूत झाले. भ्रातृमंडळ, यवतमाळ (रु. ५१,०००), भ्रातृमंडळ पुणे (रु. ५१,०००), **डोंबिवली शहराचा इतिहास** (रु. ११,०००), रक्तपेढी, डोंबिवली (रु. ११,०००), पिंपळेश्वर मंदिर देवस्थान, डोंबिवली (रु. २५,०००), आगरी समाजभवन (रु. ११,०००), स्व. सुधीर फडके यांच्या सावरकर चित्रपटाला देणगी (रु. ११,०००), चित्रपट अभिनेते श्री. रमेश देव यांच्या 'वासुदेव बळवंत फडके' या चित्रपटासाठी (रु. २५,०००) अशा प्रकारे अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांना जात-पात असा भेद न करता यथाशक्ती आर्थिक मदत केली. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्तीही दिल्या. प्रा. राम नेमाडेज लोक प्रबोधिनी प्रतिष्ठान संचालित 'कुसुमकुंज बालक मंदिर' चालविले. पुढे तांत्रिक अडचणीमुळे बंद करावे लागले. सुमारे ५० वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रा. नेमाडे यांना राणी लक्ष्मीबाई जयंती निमित्ताने 'शिक्षणमहर्षी' या पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या यशात त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. कुसुम ऊर्फ माई नेमाडे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे वडील बंधू श्री. नारायण नेमाडे हे शेतकरी असून त्यांचा **'नारायणी'** हा काव्यसंग्रह (वही, गवळण व प्रबोधनात्मक गीते) प्रसिद्ध आहे. जळगाव आकाशवाणीवर त्यांची मुलाखत घेण्यात आली आहे. मुळात विज्ञानशिक्षक असलेले त्यांचे चिरंजीव सत्यजित नेमाडे यांची हिंदी भाषेत **'सखी'** व **'सफर'** ही कविता व गजलांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. मरणोपरांत सत्यजितची **'सत्यज्योती'** (मराठी) व '**अलविदा**' (हिंदी) ही दोन पुस्तके ५ सप्टेंबर २०१५ रोजी प्रकाशित झाली. प्रा. राम नेमाडे हे लेवासमाजप्रेमी गृहस्थ असून त्यांच्या प्रेरणेतून अनेक ठिकाणी लेवा मंडळांची स्थापना झाली आहे. अशा लेवाभूषणाचा हा त्रोटक परिचय.

५९) नेमाडे, वि. गो. (जन्म : १६ जून १९१४, मृत्यू : ४ नोव्हेंबर १९७१)- मूळ गाव नांदुरा खु. (ता. नांदुरा, जि. बुलडाणा) असून पूर्ण नाव विश्वनाथ गोपाळ नेमाडे आहे. गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाला. शालेय शिक्षण नांदुरा येथे झाल्यावर नागपूरला बी.कॉम व कानपूरला एल.एल.बी. झाले. काही काळ नागपूरजवळ कामठी येथे नोकरी केली. त्यानंतर नागपूरच्या एका थिएटरमध्ये मॅनेजर म्हणून रुजू झाले. अशा रीतीने त्यांचा चित्रपटसृष्टीशी संबंध आला. श्री बाबुराव पईंनी त्यांना बिझनेस सेक्रेटरी म्हणून पुण्याच्या प्रभात फिल्म कंपनीत पाठविले. तेथे त्यांनी अनेक वर्षे काम केले.

बाबुराव पईंनी दादर (मुंबई) येथे फेमस स्टुडिओ नामक एक स्टुडिओ काढला व त्यासाठी नेमाडेंना येथे बोलावून घेतले. या फेमस स्टुडिओत अनेक यशस्वी व ज्युबिली चित्रपट निघाले. प्रभात कंपनी लिक्विडेशनमध्ये गेली. त्या वेळी कंपनीचे काम वि. गो. नेमाडेंकडे सोपविण्यात आले. ही कंपनी एस. एच. केळकर यांनी विकत घेऊन तिची संपूर्ण व्यवस्था वि. गो. नेमाडेंकडे सोपविली. प्रभात फिल्म कंपनीचे सर्व चित्रपट केळकरांनी मद्रासच्या (चेन्नई) मुदलियार यांना विकले. केळकरांना चित्रपटनिर्मितीत रस नव्हता. ते फक्त फायनान्स करीत. या कंपनीचा **"सांगत्ये ऐका"** चित्रपट १३३ आठवडे यशस्वीपणे चालला. पुढे केळकरांनी प्रभात फिल्म कंपनी शासनास विकली. दामले यांनी नेमाडे यांना घेऊन मद्रासच्या मुदलियारकडून प्रभातचे सर्व चित्रपट परत मिळविले आणि ते सर्व चित्रपट नेमाडे यांनी स्थापन केलेल्या उल्का फिल्म डिस्ट्रिब्युशनकडे वितरणासाठी दिले. येथेच वि. गो. नेमाडेंनी चित्रपट निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले. प्रसिद्ध दिग्दर्शक अनंत माने यांच्या सहकार्याने अनेक लावणीप्रधान यशस्वी चित्रपट त्यांनी काढले. ते खूप चालले. त्यातील **एक गाव बारा भानगडी, गणानं घुंगरू हरवलं** इ. सांगता येतील.

१९७१ मध्ये कलावंतांसह मॉरिशस व युरोप दौरा केला. त्याच वर्षी ते कॅन्सरने वारले.

६०) नेमाडे, विनायक भावडू (जन्म : १८ डिसेंबर १९२०) - मूळ गाव सांगवी (ता. यावल) असून वास्तव्य जळगाव येथे. खानदेशाच्या मातीतील प्रतिभाशाली साहित्यिकांपैकी अग्रणी नाव असलेले लेखक व कवी म्हणजे वि. भा. नेमाडे. वि. भा. म्हणजे एक तपस्वी कवी, कवितेशी तन्मय पावलेले एक सालस व्यक्तिमत्त्व! त्यांची कविता ही सौंदर्यवादी, विशुद्ध प्रणयी, संवेदनशील, निरागस अन् सुजाण अशा ठळक वैशिष्ट्यांनी अलंकारलेली आहे. आजपर्यंत त्यांच्या नावावर **'स्वप्नगंधा'**, **'चिनगारी'**, **'आकाशतंद्री'**, **'पावसाची अक्षरे'**, **'बासनातील कविता'**, **'विभावना'**, **'शब्दगंधा'** असे एकूण सात भावगर्भ काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. कवितेबरोबरच त्यांनी ललित कथा, बालवाङ्मय, नाटिका, इ. साहित्यप्रकार असून ते यशस्वीपणे हाताळले आहेत. आजमितीस त्यांच्या नावावर एकूण १९ ग्रंथसंपदा प्रकाशित असून त्यांची लेखणी अजूनही थकलेली नाही.

थोर कवी यशवंत यांच्या **'यशोधन'** काव्यसंग्रहाने वि. भा. नेमाडेंना झपाटून सोडले. कवी यशवंतप्रमाणेच परमपूज्य साने गुरुजी, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, ना.सी.फडके, पु. भा. भावे, कुसुमानिल इंदिरा संत, गदिमा, बा. भ. बोरकर, के. नारखेडे, बहिणाबाई चौधरी, सोपानदेव चौधरी, विं. दा. करंदीकर, बालकवी, मंगेश पाडगावकर या दिग्गज लेखकांचा विभांच्या काव्य, गद्य लिखाणावर प्रभाव पडला. वि. भा. नेमाडेंच्या कवितेची भाषा साधीच, पण काव्यमय आहे. त्यात कृत्रिमपणा वाटत

नाही. त्यांच्या काव्यात एक ओघ आहे, एक छंद आहे अन् एक ठेकाही आहे. या ज्येष्ठ कवीच्या उत्तरार्धातील आयुष्याची पाने गळू लागलेली असतानाही त्यांच्या प्रतिभेची भरारी मारणारे पंख भरभरतच आहेत.

माझी अक्षरे मागती, प्रभो द्यावे वरदान।
कवितेच्या कुशीमध्ये यावे सुंदर मरण।।

ही या कवीची आंतरिक इच्छा आहे (श्री. सतीश जैन, जळगाव, यांच्या लेखाच्या आधारे)

६१) नेहते, उमाकांत - मूळ गाव असोदे (ता. जळगाव) येथील श्री. उमाकांत नेहते यांनी १९९० पासून जळगावला बांधकाम व्यवसायात पदार्पण केले. त्यांनी २००० मध्ये हरी इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीची स्थापना केली असून ही कंपनी बीओटी तत्त्वावर बांधकाम करणारी राज्यातील आघाडीची कंपनी आहे. आपल्या उद्योग व्यवसायासाठी त्यांनी २००५-०६ मध्ये चंद्रकांत हरी बढेसर पतपेढीकडून मोठे कर्ज उचलले होते. २००६ मध्ये ही पतपेढी डबघाईस आल्याने ठेवीदारांच्या रकमा परत करणे शक्य झाले नाही. ह्या पतपेढीत बहुतांश लेवा पाटीदार विशेषकरून पेन्शनर ठेवीदार आहेत. त्यांना त्यांच्या ठेवीच्या रकमा परत मिळाव्यात या उदात्त हेतूने श्री. उमाकांत नेहते यांच्या हरी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने आपले सर्व म्हणजे २४.७५ कोटी रुपयांचे एकरकमी कर्ज सप्टेंबर २००८ मध्ये परत केले. म्हणून या एवढ्या कारणाने ते लेवा समाजरत्न ठरले आहेत. श्री. नेहतेंचे अनुकरण जर इतर मोठ्या कर्जदारांनी केले तर गरीब ठेवीदारांवर त्यांचे उपकारच होतील.

६२) नेहते, वि. चा. (जन्म : ५ सप्टें. १९०२, मृत्यू : ८ जानेवारी १९८३) - मूळ गाव भालोद असून लहानपणापासून पत्रकारितेची आवड असल्याने शिक्षणानंतर ते पत्रकारितेत वळले. त्यांनी **बातमीदार** साप्ताहिक १९३५ मध्ये सुरू केले. १९५३-५४ मध्ये त्याचे दैनिकात रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. पण त्या वेळी तो अयशस्वी ठरला. त्यापूर्वी ह्या पत्रातही प्रबोधनकार ठाकरे यांनी स्तंभलेखन केले होते. १९६० पासून बातमीदारचा दिवाळी अंकही काढण्यात येऊ लागला. पुढे १९ एप्रिल १९६९ पासून **बातमीदार** दैनिक स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागला. **बातमीदार** हे पत्र स्वावलंबी तत्त्वावर चालले. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी झटणारे आहे अशी ग्वाही दैनिकाच्या नव्या अवताराच्या पहिल्या अंकात देण्यात आली होती. वि. चा. नेहते हे झुंजार पत्रकार होते व बऱ्याच सामाजिक संस्था स्थापण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या मृत्यूनंतर मात्र हे वर्तमानपत्र बंद पडले.

६३) पाटील, अनिल तुकाराम (जन्म : ९ मे १९५८) - मूळ गाव पिळोदे (ता. यावल). गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाला. शिक्षण बी. ई. मेकॅनिकल. नोकरी न करता उद्योगक्षेत्रात नाव कमवावे, काही तरी नवीन करून दाखवावे, या ऊर्मीतून

१९८५ मध्ये एम. एच. मोहमद यांच्यासमवेत त्यांनी मेक्लेल्लॅण्ड प्रा. कंपनीची स्थापना केली.

हॅलोजीनेटक वेस्ट ऑफ फ्युम्स, हायट्रोकार्बन वेस्ट जैविक कचरा, घन, द्रव, वायू, उत्सर्जनातून निर्माण झालेले वेस्ट, रंगनिर्मितीतील टाकाऊ घटकद्रव्य, महापालिकेचा घनकचरा, रॅनबॅक्सी, वॉकार्ड, रिलायन्स, टाटा, कॅडबरी ते एशियन पेन्टसूसारख्या कॉर्पोरेट वर्ल्डमधील बड्या कंपन्यांतही मेक्लेल्लॅण्ड वेस्ट हॅण्डलिंग कंपनीने प्रदूषण मुक्ततेची यंत्रणा उभी करून व्यवसायात संलग्नता मिळविली आहे. ग्लोबत वॉर्मिंगमुळे प्रदूषण वाढून पर्यावरणाचा ऱ्हास होतो. नेमक्या अशा विविध इंडस्ट्रिजमधून होणारा प्रदूषित टाकाऊ घटकद्रव्यांचे निर्मूलन करणारी यंत्रणा अनिल पाटील यांच्या मॅक्लेल्लॅण्ड कंपनीद्वारे उभारण्यात येते. भारतीय व आंतरराष्ट्रीय इमिशन निकषाप्रमाणे या कंपनीच्या माध्यमातून घातक रासायनिक टाकाऊ द्रव्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा उभारण्यात येते. या कंपनीचे डिझाइन केलेले विविध प्रोजेक्ट प्लॅण्ट, साऊथ आफ्रिका, सौदी अरेबिया, दुबई, केनिया, ओमान अशा मध्य पूर्वेस व युरोपीय देशातही निर्मात करण्यात आलेले आहेत. कंपनीच्या माध्यमातून स्टेशनरी, रोटरी कीन, रिक्युप्रेटीव्ह इन बेल्ड वेस्ट रिकव्हरी सिस्टीम अशा स्वरूपातील यंत्रणांच्या प्लॅण्टचा पुरवठा करण्यात येतो. कंपनीने प्रथितयश विविध कन्सल्टन्सीबरोबरही काम करून कॉर्पोरेट जगतात स्वतःच्या गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. मेकॉन, दलाल, एच अॅण्ड जी जेकब, डीएई, आरएजे असोसिएशन अशा बड्या कन्सल्टींग कंपन्यांमध्ये विश्वासार्हता प्राप्त केली आहे. डीएमटी एक्सोप्लोसिव्ह रसायन व अन्य घटकात काम करून स्वतःचा मार्क निर्माण केला आहे. विशेषतः स्विस टेक्नॉलॉजी वेस्ट टू पॉवर जनरेशन प्लॉन्ट डिझाइन करून कंपनीने ठाणे, मुंबईसह उपनगरातील महापालिकांशी संपर्क साधला आहे. या यंत्रणेद्वारे घनकचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रक्रिया होणार आहे. कंपनीची वार्षिक उलाढाल ५०० कोटी रुपयांच्या वर असते. अनिल पाटील सामाजिकं क्षेत्रातही मागे नाहीत. ते समाजकार्यास सढळ हस्ते मदत करतात.

६४) पाटील, डॉ. उल्हास वासुदेव (जन्म : २३ फेब्रुवारी १९६०)- मूळगाव हंबर्डी (ता. यावल, जि. जळगाव) असून जन्म विवरे बु. येथे झाला. शालेय शिक्षण रावेर येथे झाले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही उल्हास पाटलांनी विवऱ्यास राहून रावेरला रोज बारा कि. मी. जाऊन एच.एस.सी. पर्यंतचे शिक्षण केले. पुढील शिक्षण पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये घेतले. तेथून ते एम.बी.बी.एस., एम.डी. (गायनाकॉलॉजी अॅण्ड अब्स्टेट्रीक्स) आणि डी.जी.ओ. झालेत. जळगावला सुसज्ज असे गोदावरी हॉस्पिटल सुरू केले. लहानपणापासूनच समाजसेवेचा पिंड असल्याने त्यांनी अल्पावधीतच शिक्षण, राजकारण, सांस्कृतिक क्षेत्र, संगीत, कॉम्प्युटर, कृषी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आदी क्षेत्रांत फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी मारली. चिकित्सक व जिज्ञासू वृत्तीचे असल्याने

वरील सर्वच क्षेत्रांत त्यांचा दांडगा अभ्यास व अनुभव आहे. मातृऋण फेडण्यासाठी त्यांनी आपल्या आईच्या नावाने गोदावरी फाउंडेशन सुरू केले. गोदावरी फाउंडेशनच्या अंतर्गत वरील सर्व विषयांवरील शिक्षण देणाऱ्या संस्था आज जळगावात कार्यरत आहेत. डॉ. उल्हास पाटील यांनी अनेक उच्चपदे विभूषित केली आहेत. केंद्र सरकारच्या अंतर्गत असलेल्या फॅमिली वेल्फेअर अंतर्गत चालणाऱ्या प्रोग्राम इन अब्स्टेट्रीक्स गायनाकॉलॉजीचे ते व्याख्याते आहेत. मेडिकल एज्युकेशन कमिटी, भारत सरकारचे ते सदस्य आहेत. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे ते सदृस्य आहेत. महाराष्ट्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ हेल्थचे ते सल्लागार आहेत. यासारखी अनेक पदे त्यांनी भूषविली आहेत व भूषवित आहेत.

गोदावरी फाउंडेशनने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकीय क्षेत्रात अनेक उपक्रम राबविले आहेत. सहकाराच्या क्षेत्रातही डॉ. उल्हास पाटील मागे नाहीत. त्यांनी लक्ष्मी को. ऑप. बँकेची स्थापना केली. अवघ्या काही दिवसांतच या बँकेचे चार कोटींचे शेअर्स जमविले.

गोदावरी फाउंडेशनच्या अंतर्गत शिक्षण क्षेत्रात आज सुमारे ३६ संस्था कार्यरत आहेत. जळगाव जिल्ह्यात मेडिकल कॅालेज नव्हते. त्यामुळे या भागातील विद्यार्थ्यांना इतरत्र जावे लागे. डॉ. उल्हास पाटील यांच्या अथक प्रयत्नांनी गोदावरी हॉस्पिटलशी संलग्न मेडिकल कॉलेज सुरू केले आहे.

डॉ. उल्हास पाटील यांनी अर्थार्जनापेक्षा समाजसेवेस जास्त महत्त्व दिल्याने ते बाराव्या लोकसभेचे खासदार म्हणून निवडून आले होते. त्यामुळे सत्ता वा पद असो वा नसो ते सतत सर्वसामान्यांच्या बरोबर असतात. सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी, त्यांची दु:खे दूर करण्यासाठी सतत तत्पर असतात. सर्वसामान्यांमधून वर आलेले हे सर्वसामान्यांचे हसतमुख, प्रेमळ व गरिबांप्रति कणव असलेले नेतृत्व, द्रष्टा नेता लेवा पाटीदार समाजासाठी भूषण ठरला आहे.

६५) पाटील, डॉ. डोंगर कृष्णा (जन्म : ६ मार्च १९१७, मृत्यू - २६ फेब्रुवारी १९९४) - हे मूळचे सातोद (ता. यावल, जि. जळगाव) चे असून शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. यावलहून मॅट्रिक झाल्यावर पुढील शिक्षणासाठी पैसे नसल्याने आपली थोडी जमीन विकून त्यांनी पुढील शिक्षण घेतले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून ते एलसीपीएस डॉक्टर झाले. आर्थिक अडचणींमुळे पुढील शिक्षण घेऊ शकले नाहीत. एलसीपीएस झाल्यावर जळगावच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये अनुभव घेतला. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी म्हणून मुक्ताईनगर व बोदवड येथे सरकारी रुग्णालयात काम केले. त्यांना स्वत:चे रुग्णालय काढून रुग्ण सेवा करायची असल्याने त्यांनी भुसावळला मध्यवर्ती ठिकाणी दवाखाना काढून रुग्णसेवा सुरू केली. गरजू व गरीब रुग्णांकडे यांचे विशेष लक्ष असे. त्यांची अत्यल्प शुल्कात व मोफत सेवा ते करीत

असत. खेडोपाडी जाऊन रुग्णांची रात्रीबेरात्री सुद्धा त्यांनी सेवा केली.

१९५३ मध्ये ते रोटरी कल्बचे सदस्य व पुढे अध्यक्ष झाले. रोटरी क्लबबरोबरच रुग्णसेवेचे कामही अखंड चालूच होते. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी वेळोवेळी कॅम्प आयोजित केले. या कॅम्पमध्ये दुर्मीळ इंजेक्शने, औषधे, व्हिटॅमिन गोळ्या, अत्यल्प किमतीत उपलब्ध करून दिल्या. लहान मुलांसाठी दूध पावडर वाटप केले.

१९६४ मध्ये भुसावळला प्रथमच एक्सरे मशीन आणून परिसरातील लोकांची सोय केली. त्यांच्या अथक प्रयत्नांनी व आर्थिक मदतीने त्यांनी सातोद येथे शिवाजी शिक्षण प्रसार मंडळ स्थापून विकास विद्यालय स्थापन केले. विश्व हिंदू परिषदेतर्फे चालविल्या जाणाऱ्या चोपड्याच्या गरीब मुलांच्या शाळेतील काही मुले त्यांनी दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलला. वयाच्या ६४ व्या वर्षी ॲक्युप्रेशर व ॲक्युपंक्चर थेरपीचे शिक्षण घेऊन पोलिओ, दमा, अर्धांगवायूच्या रुग्णांवर उपचार केले. त्यांनी आपले आयुष्य रुग्णसेवेसाठी वाहून घेतले होते.

मुक्ताईनगर ज्युनिअर कॉलेज त्यांच्या आर्थिक देणगीतून उभे राहिल्याने त्या कॉलेजला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

६६) पाटील, तुकाराम हरी (जन्म : १ जून १९१६, मृत्यू : ६ जुलै १९९०) - मूळ गाव दाताळा (ता. मलकापूर, जि. बुलडाणा) असून शेतकरी कुटुंबात जन्म झाला. शालेय शिक्षणानंतर ग्रामसुधार व सामाजिक कार्यात लक्ष घातले. पापभीरू तुकाराम पाटील हे निःसीम विठ्ठलभक्त होते. ते काही वर्षे दाताळा गावाचे सरपंचही होते. नवनवीन प्रयोग करून शेती करण्याकडे कल होता. त्यांना मलकापूर तालुक्यात प्रथम द्राक्षबागायती यशस्वी करून दाखविल्याने कृषिपंडित हा किताब प्राप्त झाला. मान. यशवंतराव चव्हाण हेसुद्धा तुकाराम हरींच्या द्राक्षबाग निरीक्षणासाठी येऊन गेले. त्या वेळी त्यांनी तुकाराम हरींचे खूप कौतुकही केले. कृषिविषयक अभ्यासासाठी तुकाराम हरींनी अमेरिकेचाही दौरा केला होता. दाताळा ठाया भोरगाव लेवा पंचायतीच्या तीन सदस्यांपैकी तुकाराम हरी एक होते. त्यांनी भोरगाव लेवा पंचायतीमध्ये १३६ वाद सोडविले. ते वऱ्हाड भागातील भोरगाव लेवा पंचायतीच्या कार्यकक्षेत असलेल्या ७२ गावांचे धुरिण मानले जात. या ७२ गावांच्या वारकरी दिंडीमध्ये व भोरगाव लेवा पंचायत पदयात्रेत ते हिरिरीने भाग घेत. मलकापूरला त्यांच्याच प्रेरणेने लेवा युवक मंडळाची स्थापना झाली. तसेच ते मलकापूर सह. सूतगिरणीचे आद्य संस्थापक होते. बुलडाणा जिल्ह्यात पहिल्या पेपरमिलची त्यांनी स्थापना केली.

६७) पाटील, तुकाराम शंकर (जन्म : १९ डिसें. १९००) - हे दाभाडी, ता. मलकापूरच्या सधन कुटुंबात जन्मले. ते दाभाडीच्या प्रसिद्ध वतनदार पाटील श्री. शंकर तोताराम पाटील यांचे सुपुत्र. त्यांचे शिक्षण अनुक्रमे दाभाडी, मलकापूर, अमरावती, पुणे आणि इंग्लंड येथे झाले. वकिलीचे (एल.एल.बी.) शिक्षण पुण्याहून घेतल्यावर दादासाहेब

ऊर्फ तुकाराम शंकर पाटील १९२२ मध्ये बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठी लंडन येथे गेले. उच्च शिक्षणासाठी विलायतला गेलेले ते विदर्भातील पहिले लेवा पाटीदार होय. डिसेंबर १९२६ मध्ये बॅरिस्टरची पदवी घेऊन परत आल्यावर ते नागपूर हायकोर्टात बॅरिस्टर म्हणून काम करू लागले. ते मध्य प्रांत वऱ्हाडच्या विधानसभेत सतत १० वर्षे आमदार होते. इ.स. १९६० च्या अकोला मतदारसंघातून झालेल्या पोटनिवडणुकीत ते काँग्रेसच्या तिकिटावर निवडून येऊन सुमारे दीड वर्ष दिल्लीला खासदार म्हणून राहिले. लेवा पाटीदार संस्थांशी यांचा निकटचा संबंध होता. अमरावती विद्यापीठात एल.एल.बी. मध्ये प्रथम येणारास बॅ. टी. एस. पाटील सुवर्णपदक प्रदान करण्यात येते.

६८) पाटील, प्रा. देवबा शिवाजी (जन्म : १९ सप्टेंबर १९५९) - हे दाताळा (ता. मलकापूर) येथील शेतकरी कुटुंबात जन्मले. माध्यमिक शिक्षण दाताळ्यास झाले. अमरावतीहून एम. एस्सी व एम. फिल होऊन खामगावच्या जी. एस. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरीस लागले. ते अतिशय मेहनती, शिस्तप्रिय व विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करीत असतात. ते विज्ञाननिष्ठ असूनही कविमनाचे आहेत. मानवी संस्कारांचे वास्तव चित्रण त्यांच्या कवितांमध्ये प्रतिबिंबीत झालेले दिसते. त्यांचे आजपर्यंत **कल्पनाकाली, वीजयामिनी**- काव्यसंग्रह, **रोपवाटिका**- बालकाव्यसंग्रह, **स्फूर्तिकण**-कुमार काव्यसंग्रह, **अटकमटक**-बालकाव्यसंग्रह, **चंद्ररेखा** - काव्यसंग्रह, **फुलबगिचा**-बालकाव्यसंग्रह, **प्रेरणापुष्प**-बालकाव्यसंग्रह, **उमलती फुले** - बालकाव्यसंग्रह, **जीवनदायी पहाट** - कुमारकथासंग्रह, **आभाळाचे रंग** - कुमारकथासंग्रह, **बालबाग** - बालकाव्यसंग्रह, **सुबोध पाढे** - बालकाव्यसंग्रह ह्या साहित्याकृती प्रकाशित झाल्या आहेत. त्याशिवाय त्यांची भौतिकशास्त्राची बरीच अभ्यासक्रमिक पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. त्यांना महानुभाव विश्वभारती तर्फे 'साहित्यालंकार' पुरस्कार **रोपवाटिका** या बालकाव्यसंग्रहासाठी प्राप्त झाला आहे. त्याशिवाय पुण्याच्या डॉ. मणिभाई देसाई प्रतिष्ठातचा 'राष्ट्रसेवा' व अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अनेक साहित्यसंस्थांच्या क्षेत्रातील सेवाकार्यात त्यांनी स्वतःस झोकून दिले आहे. त्यांच्या कविता जळगाव व नागपूर आकाशवाणी केंद्रांवरून प्रसारित होत असतात. त्याशिवाय बहुविध वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक व नियतकालिकांमध्ये त्यांच्या कविता, लेख व कथा प्रकाशित होत असतात.

समाजकार्यातही देवबा पाटील मागे नाहीत. भोरगाव लेवा पंचायत, मलकापूर येथे ते समाजजागृती व संघटनकार्यात सक्रिय भाग घेत असतात. बरीच सांस्कृतिक मंडळे स्थापून त्याद्वारे ते व्याख्यानमाला आयोजित करीत असतात.

६९) पाटील, डॉ. निळकंठ रामदास (जन्म : १ डिसेंबर १९४६) - मूळ गाव पिळोदे (ता. यावल), गरीब कुटुंबात जन्म झाला. जन्मापासून अधांध, प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण. अंध असूनही ते खऱ्या अर्थाने डोळस जीवन जगले. एम. कॉम

झाल्यावर, महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटिअर विभागात नोकरी केली. गॅझेटिअर सर्वेक्षणाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्राचे दौरे व अभ्यास केला. जातीजमाती व किल्ले, मंदिरांचे सर्वेक्षण व अभ्यास यातून १. **खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाज, एक अन्वयार्थ** (हा वास्तव इतिहास व मानववंशशास्त्राचा आधार घेऊन ग्रंथ लिहिला. त्याच्या दोन आवृत्त्या संपल्या) २. **लेवा पाटीदारांची कुळे-गोत्रे, कुलदेवता, कूळधर्म व कुळाचार,** ३. **लेवा गणबोली कोश** (महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषांमधील पहिला कोश-त्यास शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीतील भाषाशास्त्र व व्याकरणमधील प्रतिष्ठाप्राप्त दादोबा पांडुरंग तर्खडकर पुरस्कार प्राप्त झाला. हा कोश व वरील दोन्ही ग्रंथांत त्यांच्या पत्नी सौ. ऊर्मिला पाटील यांचाही सहयोग आहे, ४. **लेवा गणबोलीचे मानकरी-स्मरणिका**, ५. **लेवा बोलीतील बहिणाईची गाणी-रसास्वाद**, ६. **जळगाव जिल्ह्यातील किल्ले व गढ्या,** ७. **हिंदवी स्वराज्याची दुर्गतीर्थे** - भाग १, ८. **हिंदवी स्वराज्याची दुर्गतीर्थे** - भाग २, ९. **जळगाव जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे,** १०. **महाराष्ट्र किल्ले**-कोकण विभाग, ११. **महाराष्ट्र किल्ले** - दख्खन पठार व मावळ विभाग, १२. **महाराष्ट्र किल्ले** - खानदेश व उत्तर महाराष्ट्र विभाग, १३. **महाराष्ट्र किल्ले** - वऱ्हाड विदर्भ विभाग, १४. **महाराष्ट्र किल्ले** - दख्खन सुभा - मराठवाडा विभाग, १५. **हिंदवी स्वराज्याची दुर्गतीर्थे** - भाग ३ , १६. **बुलडाणा जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे** १७. **प्रतिहार** (लक्ष्मणावर आधारित कादंबरी) हे ग्रंथ प्रकाशित वा प्रकाशन मार्गावर आहेत. किल्ल्यांच्या समग्र अभ्यासामुळे सुप्रसिद्ध लेखक श्री. विठ्ठल राय भट (१५० च्या वर ग्रंथसंपदा असलेले इंग्रजी, कोकणी व कानडी लेखक) यांनी त्यांना **गडकरी** उपाधी दिली आहे. उपरोक्त ग्रंथांशिवाय चार-पाच ग्रंथांचे लेखन सुरू आहे.

खानदेशाचा पूर्व भाग व बुलडाण्याचा पश्चिम भाग यात बोलली जाणारी बोलीभाषा लेवा गणबोलीच असल्याचे श्री. पाटील यांनी सप्रमाण सिद्ध केले असून तिचे नामाभिधान ''लेवा गणबोली'' असे केले व ते आता साहित्यजगतात सर्वमान्य झाले आहे. बहिणाबाईंची गाणी ही अहिराणी वा खानदेशी यातील नसून ती लेवा गणबोलीतीलच आहेत. हे श्री. पाटील यांनी पटवून दिले आहे. या भाषेचे व्याकरण, हेल, लकब व नादमाधुर्यामुळे ती कशी गोड, रसाळ व कर्णमधुर आहे हे श्री. पाटील यांनी विशद केले आहे. लेवा पाटीदारांच्या स्थलांतरणाशी संबंध असूनही ही भाषा या भागातील सर्व म्हणजे अठरापगड जाती-जमातींची बोलीभाषा असून या सर्वांना सांस्कृतिकदृष्ट्या एकत्रित सांधून ठेवण्याचे महान कार्य ती कशी करते, हेही श्री. पाटील यांनी पटवून दिले आहे. तिच्या लवचीकतेमुळे इतर बोलीभाषांमधीलच नव्हे तर इंग्रजीसारख्या परकी भाषेतील शब्दही तिच्यात चटकन सामावले गेल्याने ती कशी सर्वसमावेशक आहे, हे सुद्धा श्री. पाटील यांनी दाखविले आहे. त्यांच्या पत्नी सौ. ऊर्मिला पाटील यांचेही या

कोशात योगदान असल्याने श्री. पाटीलसमवेत त्यांनाही दादोबा पांडुरंग तर्खडकर पुरस्कार प्राप्त झाला आहे. लेवा बोलीतील बहिणाईची गाणी व लेवा गणबोलीकोश यावर त्यांच्या मुंबई दूरदर्शन व नाशिक आकाशवाणीवर मुलाखती झाल्या आहेत.

श्री. पाटील सध्या बहिणाबाई साहित्य परिषदेचे अध्यक्षपद भूषवित आहेत. त्याशिवाय, महाराष्ट्र शासनाच्या मराठी शब्दकोशात त्यांनी लेवा गणबोलीतील अर्थपूर्ण शब्द समाविष्ट करण्याचे कामही केले आहे. ते गॅझेटियर्सचे सहयोगी लेखक आहेत.

ज्या समाजात ते जन्मास आले त्या समाजाचे ते काहीतरी देणेकरी लागतात, या उदात्त भावनेने समाजऋणातून उतराई होण्यासाठी त्यांनी लेवा पाटीदार समाज व त्यांच्या भाषेसंबंधीचे त्यांचे साहित्य विविध लेवा पाटीदार मंडळे व पंचायत संस्थेस दान करून मोठे मौलिक कार्य केले आहे. श्री. पाटील यांना त्यांच्या साहित्यसेवेबद्दल विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. लेवा बोली साहित्याबद्दल त्यांना डी. लिट. पदवीने गौरविण्यात आले आहे. ते शासनाच्या गडसंवर्धन समितीवर नियुक्त आहेत.

७०) पाटील, निळकंठराव श्रीपाद (जन्म : १९०८) - मूळ गाव हिंगोणे, सतराव्या वर्षापासूनच **सत्यशोधक** वृत्तपत्रातून लेख लिहिलेत. त्यांनी **वारकरी सत्यशोधक संवाद, ब्राह्मणनिर्मूलन म्हणजेच भारतोत्कर्ष, खड्गप्रहार,** इ. पुस्तके लिहिली असून सत्यशोधक चळवळीत नागपूर ते कोल्हापूरपर्यंत प्रचाराचे काम स्वीकारून हजारो व्याख्याने दिलीत. **'विजयी मराठा'** या सत्यशोधक चळवळीच्या पत्राचे उपसंपादकाचे कामही केले. नंतर काही दिवस प्रबोधनकार ठाकरे यांच्या नाट्यसंस्थेत एक प्रमुख नट व प्रबोधनकारांचे खाजगी चिटणीस म्हणूनही काम केले. पुढे काही वर्षे मुंबईला कामगार संघटनेचे कार्य केले. १९३६ मध्ये जळगावला 'शिवाजी प्रेस' चे मॅनेजर झाले. त्यानंतर स्वतःचा छापखाना काढून **जनसेवक** नावाचे लोकप्रिय साप्ताहिक सुरू केले. जळगाव येथील एम. जे. कॉलेजच्या संस्थापकांपैकी एक असून इतर सामाजिक कार्य केले. जळगाव जिल्ह्यातील समाजवादी पक्षाचे एक प्रमुख कार्यकर्ते.

७१) पाटील, पंकज रूपचंद (जन्म : ८ मार्च १९७४) - पुणेस्थित रूपचंद पाटील व रोहिणी पाटील यांचे सुपुत्र पुण्याच्या सांगवी भागात राहतात. लेवा पाटीदार समाज व सरदार वल्लभभाई पटेलांविषयी नितांत आदर. त्यांचे आजोबा, वडील, लहान व मोठे चुलते, लहान भाऊ सर्वच पोलीस खात्यातून देशसेवा करीत आहेत. पंकज पाटलांनाही पोलीस खात्यात जायचे होते. परंतु शारीरिकदृष्ट्या फिट न होऊ शकल्याने त्यांचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. तरीही समाजसेवा करीत राहायचे व्रत त्यांनी घेतले. बालपणापासून गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, वृक्षारोपण, प्रदूषणमुक्ती, एड्स् जनजागरण रॅली, लोकसंख्या नियंत्रण, संतती नियमन, रक्तदान, मोफत नेत्रचिकित्सा शिबिरे व चष्मेवाटप, समाजप्रबोधन लेख, झोपडपट्टी सुधार; अनाथाश्रम, अंध व मूक शाळा व संस्थांना मदत, रुग्णालयात औषधवाटप, पंढरपूर वारीत फराळ-अन्नदान,

बालविवाहाबाबत जागृती, स्त्रीभ्रूणहत्या, व्यसनमुक्ती यासारख्या विषयांचे प्रबोधन करीत असतात. ९ ऑगस्ट क्रांतिदिन, १५ ऑगस्ट - स्वातंत्र्यदिन , २६ जानेवारी - प्रजासत्ताकदिन यासारखे राष्ट्रीय उत्सव; गांधीजी, लो. टिळक, पं. नेहरू, सरदार पटेल, शिवाजी महाराज यांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या करणे, कारगिल विजयानिमित्त दीपोत्सव, एक गाव एक गणपती उपक्रम, काव्य संमेलने, मंदिर उभारणी, आदिवासी सेवा, ब्लड बँक आदी सेवा करतात. सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, धार्मिक, राजकीय, सार्वजनिक, सहकार, कामगार, कला व क्रीडा क्षेत्रातही हिरिरीने कार्य करतात. त्यांचा सरदार पटेलांवरील संशोधनपर ग्रंथ मैलाचा दगड ठरावा.

अनेक संस्थांमधील वेगवेगळ्या क्षेत्रातील त्यांचे अनमोल यशस्वी कार्य पाहून त्यांना भारत सरकार युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या नेहरू युवा केंद्र, पुणे विभागाच्या वतीने जिल्हा युवा पुरस्कार, २००७ ने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा कर्तबगार कामगार पुरस्कार, तसेच अनेक शासकीय व राष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांनी सांगवी, पुणे येथे भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल प्रतिष्ठानची स्थापना केली व अनेक उपक्रम राबविले. यासाठी दरवर्षी त्यांच्या संस्थेमार्फत लाखो रुपयांची मदत व खर्च होत असतात.

७२) पाटील (हंबर्डीकर), पांडुरंग रामचंद्र ऊर्फ अण्णासाहेब (जन्मः १ जानेवारी १९३६) - मूळ गाव हंबर्डी असून भुसावळस्थित आहेत. भुसावळ शहराच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा असलेले सुप्रसिद्ध रामभाऊ हंबर्डीकर (१८-१-१९०८ ते १७-४-१९८०) यांचे अण्णासाहेब द्वितीय पुत्र. महाविद्यालयीन शिक्षण एस. पी. कॉलेज, पुणे व जी. एम. टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट, इंदूर येथे झाले. १९६० मध्ये अमेरिकेत जाऊन मिशीगन स्टेट युनिव्हर्सिटी ईस्ट लान्सिंग, मिशीगन यूएसए सिव्हिल इंजिनीअरींगची एम. एससी. ही पदवी मिळविली. शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९६३ मध्ये न्यूयॉर्क या अमेरिकेतील सर्वात मोठ्या शहराच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये ज्यु. इंजिनीअर म्हणून नोकरीस सुरुवात केली. पीआर अण्णा मायदेशात मातृभूमीची सेवा करण्यास १९६६ मध्ये परत आले. वडिलांच्या समाजकार्याचा वसा घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या कामाबरोबर समाजकार्यालाही सुरुवात केली. ते भुसावळ न.पा. चे सदस्य, न. पा. शिक्षण मंडळाचे सदस्य, रोटरी क्लब ऑफ भुसावळचे सचिव, लॉज एक्सलशीअर इन खानदेश या संस्थेचे मास्टर मेसन, भुसावळ पीपल बँकेचे अनेक वर्षे संचालक व नंतर अध्यक्ष, सहकारी औद्योगिक वसाहत, भुसावळ या संस्थेचे गेल्या ३० वर्षांपासून संचालक व त्यात दोन वेळा चेअरमनही राहिले. भुसावळ शैक्षणिक जीवनात कला, विज्ञान व पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयाचे शिक्षणतज्ज्ञ असून गेल्या २८ वर्षांत कॉलेजमध्ये संगीत, इलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर, बिझनेस मॅनेजमेंट, किमान कौशल्य, विविध विषयांचे एम. ए. व एम. एस्सीचे कोर्सेस, पीएच. डी. गाइडन्स

अशा प्रकारचे विविध कोर्सेस सुरू करून भुसावळ शहरात सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. ते पुणे विद्यापीठाचे सिनेट मेंबर तसेच पुणे विद्यापीठाच्या फॅकल्टी ऑफ इंजिनीअरिंगमध्येही मेंबर होते. आजही ते औद्योगिक शिक्षण मंडळाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, चिंचवड, पुणे या संस्थेचे मेंबर आहेत. ते ग्राहक पंचायत भुसावळ या संघटनेचे कार्याध्यक्षही आहेत.

त्यांच्या शैक्षणिक कार्याची जिद्द पाहून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे कै. बाबासाहेब नारखेडे व संस्थेचे अध्यक्ष कै. के. जी. पाटील यांनी त्यांना या संस्थेत सामावून घेतले. ते १९८६ मध्ये या संस्थेचे चेअरमन झाले.

याशिवाय ते तु. स. झोपे गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर, के. नारखेडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय त्याचप्रमाणे के. नारखेडे कॉलेज ऑफ सायन्सच्या शालेय समितीचे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत.

७३) पाटील, पुरुषोत्तम निनू तथा अण्णासाहेब पाटील (जन्म : १९ डिसें. १९३५) - मूळ गाव तांदूळवाडी, प्र. मलकापूर (ता. मलकापूर, जि. बुलडाणा) असून डी.एम.ई. झाल्यावर वडीलबंधू सोपान निनू पाटलांच्या खांद्यास खांदा लावून व्ही.की. मोपेडच्या एजन्सीच्या व्यवसायात स्वतः मेकॅनिकचे काम केले. पुढे एस्कॉर्ट, फोर्ड, राजदूत, डीसीएमच्या डिलरशिपमध्ये धंदा प्रगतिपथात नेण्यासाठी समाजबांधवांना काम देऊन रोजगारास लावले. फॅब्रिकेशनमध्येही समाजबांधवांना रोजगारास लावले. पुरुषोत्तम निनूंनी शेती अवजारे, पंखे, शेगड्या आदी उत्पादनातही उडी घेतली. ते मलकापूरच्या भ्रातृमंडळाच्या कार्यकारिणीचे मानद सभासद आहेत. जिद्दीने समाज संघटनाचे कार्य करीत आहेत. कृषी मंडळाची स्थापना करून त्यांनी शेतकऱ्यांना पुनर्भरणात सहकार्य करून स्थानिक विकास साधला. मलकापूर भागात बगिचे (केळी) लागवडीस प्रोत्साहन. 'सदविचार सेवा समिती' द्वारे सार्वजनिक भागवत सप्ताहाचे भव्य प्रमाणात आयोजन केले. सामूहिक विवाहासाठी त्यांनी सर्वतोपरी साहाय्य केले. ते अखिल भारतीय पाटीदार समाज शिक्षा महासंघाचे सदस्य आहेत.

७४) पाटील, पुरुषोत्तम यादव (जन्म : ५ ऑक्टोबर १९०७, मृत्यू : १४ सप्टेंबर १९८२) - मूळ गाव दाभाडी, ता. मोताळा, जि. बुलडाणा असून जुन्या पिढीतील व्यापारी होते. धार्मिक प्रवृत्तीचे असून दरवर्षी पंढरपूरला अन्नदानात सहभाग असे. ते गोरक्षण संस्थेचेही सदस्य होते. दाताळा येथील प्रसिद्ध महादेव मंदिराची स्थापना व अन्नदान पुरुषोत्तम पाटलांनी केले. मलकापूर अर्बन को. ऑप. बँकेच्या आद्य संस्थापकांपैकी ते एक होते. दातृत्वशील व्यक्तिमत्त्व असलेल्या पुरुषोत्तम पाटलांनी मलकापूरच्या नूतन विद्यालयासाठी भूमिदान केले. मलकापूरच्या नूतन विद्यालयाच्या आद्य संस्थापकांपैकी ते एक अग्रगण्य होते.

७५) पाटील, भालचंद्र प्रभाकर उर्फ भैरूशेठ (जन्म : ४ नोव्हेंबर

१९५९) - जळगावच्या प्रसिद्ध सुसंस्कृत व सधन कुटुंबात जन्म झाला असला तरी भालचंद्र पाटील म्हणजे अतिशय सालस, निगर्वी, प्रसन्न, हसतमुख व विजिगीषू व्यक्तिमत्त्व होय. भालचंद्र पाटील हे जात्याच हुशार. शाळेत त्यांना स्कॉलरशिप मिळत असे. त्यांचे शिक्षण बी. ई. केमिकल झाले. नोकरी न करता उद्योगात चमकावे ही महत्त्वाकांक्षा त्यांच्या वेगा केमिकल्स प्रा. लि. जळगाव आणि सिंथेटिक आयर्न ऑक्साईड पिगमेंट्सने पूर्ण झाली. ते या कंपन्यांचे उत्पादक तसेच निर्यातदारही झाले. संपूर्ण कारखाना, त्यातील उत्पादन प्रक्रिया, विक्री भांडवल, बाजारपेठेत जम या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी स्वहिमतीवर पेलल्या. त्यांची सिंथेटिक आयर्न ऑक्साईड पिगमेंट्स कंपनी भारतात कलर पिगमेंट्स उत्पादनात आयएसओ : २००१ चे प्रथम मानांकन मिळालेली कंपनी आहे. केमिकल इंजिनीअर असूनही बँकिंग क्षेत्रातील त्यांची भरारी व अभ्यास एखाद्या नामांकित अर्थशास्त्रज्ञालाही लाजविणारा आहे. त्यांचे आजोबा व वडील यांचेकडून बँकिंग क्षेत्रातील सेवेचा वसा त्यांनीही उचलला व **दी जळगाव पीपल्स को. ऑप. बँक लि.** ला शेड्यूल बँकेइतपत त्यांनी नेऊन ठेवले. या बँकेला उत्कृष्ट व्यवस्थापनाबद्दल कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी बँक पुरस्कार सलग सातव्यांदा मिळण्याचा रेकॉर्ड झाला आहे. ते या बँकेच्या चेअरमनपदी विराजमान आहेत. बँकिंग क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठाप्राप्त पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

ते समाजकार्यातही मागे नाहीत. जळगाव पीपल को. ऑप. बँकेच्या माध्यमातून ते गरजू व गरिबांची सेवा करीतच असतात. अंध व अपंगांनाही ते सर्वतोपरी मदत करीत असतात. भैरूशेठ नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड्स, जळगाव शाखेचे चेअरमन आहेत. शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक संस्थामध्येही त्यांचा सेवा सहभाग असतोच. ते जळगाव जिल्हा विज्ञान परिषदेचे चेअरमन, दी जळगाव पीपल बँक संचालित कै. रामदास लहानू पाटील स्मृतिसेवा ट्रस्टचे उपाध्यक्ष, जळगावच्या श्रीराम रथोत्सव समितीचे विश्वस्त, वल्लभदास वालजी जिल्हा वाचनालयाचे कार्यकारिणी सदस्य, रोटरी क्लब - मिड टाऊन जळगावचे रोटरीशन इ. अशी अनेक पदे भूषवित आहेत.

भैरूशेठ अंध आणि अपंग आंतरजातीय आणि आंतरधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात विवाह करणाऱ्या जोडप्यांना संसारोपयोगी आंदण घेऊन देत असतात.

चतुरस्र बुद्धिमत्ता, स्वच्छ कार्य व वर्तन, शिस्तबद्धता, वेळेचे भान, विनम्र वृत्ती, हसतमुख प्रसन्नतेचा प्राजक्त म्हणजे श्री. भालचंद्र पाटील असे आर्जवाने म्हणावेसे वाटते.

७६) पाटील, वाय. जी. (जन्म : ५ जानेवारी १९२४, मृत्यू : २००३) - मूळगाव सांगवी (ता. यावल). गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाला. चौथी नंतरच्या शिक्षणात खंड, १९४१ मध्ये सातवी, १९३२ ते १९४३ पर्यंत मोलमजुरी करून दिवस काढले. १९४३ मध्ये पुण्यास येऊन कृषी महाविद्यालयातून पशुसंवर्धन व दुग्धशाळा

कोर्स केला. १९४९ पर्यंत मिलिटरी डेअरी फार्मवर डिलिव्हरी बॉयची नोकरी केली. १९५६ मध्ये एस.एस.सी. झाले. १९४९ ते १९७० पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या कृषी खात्यात पुण्यात शेतकरी मदतनीस, कृषी अधिकारी म्हणून काम केले. शेतकी मदतनीस लागल्यावर बी.एस्सी. (कृषी) ऑनर्स, एम.एस्सी (कृषी) डेअरी सायन्स (पुणे विद्यापीठात प्रथम) होऊन लेक्चरर म्हणून नोकरीस लागले. पुढे पीएच. डी. सुद्धा झाले. कोल्हापूर व पुणे कृषी महाविद्यालयात प्रोफेसर, असोसिएटेड डीन व प्रिन्सिपॉल राहिले. १९७८ मध्ये सेवानिवृत्त झाले. २००३ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी ॲण्ड पॅरामेडिकल सायन्सेस (मणिभाई देसाई) या संस्थेतून नॅचरोपॅथीचा डिप्लोमा केला. यांनी **अंत्येष्टी विधी** या आपल्या पुस्तकातून लेवा पाटीदार समाजातील प्रचलित रूढीनुसार अंत्यविधीचे क्रमशः टिपण ठेवण्याचा बहुमोल प्रयत्न केला आहे. या प्रकारच्या आगळ्यावेगळ्या स्वरूपातील लिखाणाचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे.

७७) पाटील, रामचंद्र गोपाळ (जन्म : १८९८) - मूळ गाव नांदुरा (जि. बुलडाणा) हे असून एक गरीब, निष्कलंक, पापभीरू, वारकरी घराण्यात यांचा जन्म झाला. नांदुऱ्यास आठवी झाल्यावर मुंबईस काकांकडे येऊन मॅट्रिक झाले. मॅट्रिक झाल्यावर गोदावरीबाईंशी विवाह झाला. शिक्षणप्रेमी असल्याने संसार न करता अर्धनादारीवर दोघांनी शिक्षण चालू ठेवले. स्वावलंबी रा. गों. नी बडोदा स्टेट प्रेसमध्ये मशीनवर बॉलरचे काम केले. गोदावरीबाईनीही मलकापूर, मुंबई, बडोदा, पुणे येथे बी.ए.,बी.टी. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. याच कालावधीत रा. गों. नी बॉलर, कारकून ते शिक्षकापर्यंत मजल मारली. बडोद्यास टीचर्स डिप्लोमा मिळवून पुढे काशीस साहित्यरत्न, साहित्यअलंकार व मानस केसरी ह्या पदव्या मिळविल्या. शिक्षकी पेशामुळे मास्तर नावाने प्रसिद्ध झाले. अयोध्येस जाऊन **रामचरित मानस** चे अध्ययन केले. अयोध्येच्या महात्मा अंजनीनंदन शरणजींच्या आर्थिक मदतीने आणि प्रोत्साहनाने बडोद्यास **पीयूष** मासिक सुरू करून त्याचे संपादक झाले. त्याच वेळी १९४२ च्या चळवळीतही त्यांनी भाग घेतला. १९४६ साली प्रो. माणिकराव यांच्या सहकार्याने बडोद्यास तीन वर्षांत राष्ट्रीय शिक्षण देणारी राष्ट्र शिशु विद्यालय ही संस्था काढली.

१९४८ मध्ये महाराष्ट्र - गुजरात कलुषित वातावरणामुळे गुजरात सोडून पुण्यास यावे लागले व नूतन मराठा विद्यालयात १२ वर्षे हिंदी शिक्षकाचे काम करून सिनीअर हिंदी शिक्षक ही सनद मिळविली. त्यांनी ज्ञानेश्वरी प्रेस स्थापन करून त्यात वारकरी सांप्रदायिक **"सचित्र कै. ह.भ.प. जोगमहाराज भजनी मालिका"** चे संपादन, मुद्रण व प्रकाशन करण्याचा सुयोग त्यांना लाभला. त्यांनी पू. हैबतराव बाबांचे **भजनी मासिक,** गुरुवर्य ह.भ.प. शंना तथा सोनोपंत दांडेकर यांचा **वारकरी भजन संग्रह,** कै.ह.भ.प. लोहियामहाराज संपादित **भजनमालिका** अशा अनेक भजन मालिका भाविकांना उपलब्ध करून दिल्या. त्यांनी सर्वच प्रकारचे अभंग, मंगलचरण, काकडआरत्या,

भूपाळ्या, गौळणीगीते, वासुदेवगीते, आंधळेपांगळे भाविक गीते, श्री ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ, श्री एकनाथ महाराजांचा हरिपाठ, वारांचे अभंग व आरत्या इ. ची छपाई करून किमान किमतीत भाविकांना उपलब्ध करून दिलेत. त्यांच्या प्रकाशनांमधील **सटीप ज्ञानेश्वरी** हा ग्रंथशिरोमणी शोभावा इतका सुबक व सुंदर ग्रंथ छापला म्हणून ते ज्ञानेश्वरीकार रा. गो. पाटील नावाने ओळखले जाऊ लागले.

मास्तरांची प्रा. सोनोपंत दांडेकरांवर अपार श्रद्धा. त्यांनी प्राचार्य दांडेकर धार्मिक वाङ्मय प्रकाश मंडळ स्थापून **दांडेकरांचा हरिपाठ** हा ग्रंथही प्रकाशित केला.

७८) पाटील, प्रभाकर आनंदा (जन्म : १९३२) - मूळगाव तळवेल (ता. भुसावळ) असून १९५१ मध्य एस.एस.सी. (मॅट्रिक) झालेत. शालेय शिक्षणापासून म्हणजे वयाच्या तेराव्या वर्षापासूनच पत्रकारितेकडे ओढ. ७ वी-८ वीत असतानाच त्यांनी जळगावच्या **बातमीदार** व **जनसेवक** साप्ताहिकांमध्ये लेखन केले आहे. त्यानंतर लगेच मुंबईच्या दैनिक **नवशक्ती** आणि जळगावच्या सर्व साप्ताहिकांमध्ये ते लेखन करीत राहिले. मुंबई, नाशिक, अजमेर, जयपूर, दिल्ली, रतलाम, उदयपूर, पुणे या ठिकाणांहून प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांत व दैनिकांत त्यांनी विपुल हिंदी व मराठीतून नित्याने लेखन केले आहे. जळगावला असताना ते राष्ट्र सेवा दलाचे सदस्य (सैनिक) झालेत व अल्पावधीतच जळगावचे शाखानायक झालेत. राष्ट्र सेवा दलात असताना अनेक सामाजिक, राष्ट्रीय शिबिरांना ते हिरिरीने उपस्थित राहत असत. प्रभाकर पाटलांनी रेल्वेत अजमेर येथे लिपीक म्हणून नोकरी पत्करली. नंतर साबरमती (गुजरात) येथे ते अधीक्षक झाले. अजमेरला त्यांनी मराठी भषिकांसाठी मित्र मंडळ स्थापन केले. त्यानंतर त्यांनी अजमेरलाच ''आंतरभारती मित्र मंडळ'' स्थापन केले. अजमेर येथे भजन, संकीर्तन मंडळींचे संघटन करून त्यांनी ''चैतन्य प्रेम भक्ती संघ'' स्थापन केला. या संघाचे ते सरचिटणीस राहिले. या संघाद्वारे त्यांनी धार्मिक सोहळे, शोभा यात्रा व प्रवचनादी कार्यक्रम आयोजित केले. अजमेरच्या शाळा-महाविद्यालयांमधून त्यांनी सातत्याने प्रबोधनाचे कार्य केले. गेल्या ४५ वर्षांपासून ते **लोकसत्ता व महाराष्ट्र टाइम्सचे** वार्ताहर असून बृहन्महाराष्ट्र सदरातून स्तंभलेखन करीत असतात. त्यांचा पत्रकार म्हणून पं. जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, हरिभाऊ उपाध्याय (राजस्थानचे माजी मुख्यमंत्री), विनोबा भावे इत्यादी व्यक्तींशी जवळचा संबंध आला तसेच सहवासही लाभला आहे. प्रभाकर पाटील हे गेल्या २० वर्षांपासून नवी दिल्ली येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे गुजरात राज्य प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १९७२ मध्ये साबरमतीला अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला मंडळ स्थापून कथामाला सातत्याने चालविली. १९६६ मध्ये अखिल भारतीय रेल्वे हिंदी निबंध व वक्तृत्व, १९६४ मध्ये साबरमती येथे महाराष्ट्र समाजाची स्थापना केली. या संघटनेचे ते प्रथम सचिव होते. १९६५ मध्ये त्यांनी साबरमती येथे मराठी भाषिक मुलांसाठी प्राथमिक मराठी शाळा सुरू

केली. १९६४ ते १९६६ या तीन वर्षांत त्यांनी अहमदाबादला लेवा पाटीदार समाजाचे संघटन केले व या संघटनेचे ते सचिव राहिले. या अवधीत त्यांनी अहमदाबाद येथे समाजासाठी भव्य जागा खरेदी केली.

७९) पाटील, रावसाहेब प्रेमचंद इच्छाराम (जन्म : २० ऑक्टोबर १८९७, मृत्यू ३० मे १९५९) - सावद्याचे (ता. रावेर) प्रसिद्ध श्रीमंत सावकार रामू लहू पाटील यांचे प्रेमचंदशेठ नातू होत, तर त्यांची सावकारी चालू ठेवणारे इच्छाराम रामू पाटील यांचे पुत्र. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. त्यांनी आपला पिढीपरंपरागत सावकारीचा व्यवसाय सोडून जिद्दीने आणि धडाडीने इन्शुरन्स, बँकिंग व औद्योगिक उत्पादन क्षेत्रात भरारी मारली.

१९३४ मध्ये त्यांनी ग्रेट इन्शुरन्स कंपनी काढली. या भविष्य व जीवननिधी कंपनीच्या बोर्डावर लोकनायक बापूजी अणे, बॅ. व्ही. एन. पाटील, नानासाहेब विष्णू हरी पाटीलसारख्या नामांकित व्यक्ती होत्या. ते या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर होते. या योजनेस प्रचंड प्रतिसाद मिळाल्याने त्यांनी मुंबई फ्लोरा फाउंटन भागात सर फिरोजशहा मेहता रोडवर मर्कंटाईल बँक इमारत बांधून तिच्यात जीआयसीचे ऑफिस नेले. त्या वेळेस त्यांचे वास्तव्य मलबार हिलवर होते. तरी त्यांनी भविष्यासाठीही आज दिमाखात व डौलात चर्चगेट भागात उठून दिसणारी 'प्रेमकोर्ट' इमारत बांधली. इन्शुरन्स आणि संलग्न बँकिंग व्यवसायात असतानाच त्यांनी 'ब्रिलियंट पिक्चर्स' नावाची कंपनी काढून ते फिल्म प्रोड्युसर बनले. एखाददुसरा सिनेमा काढल्यावर हे क्षेत्र न मानवल्याने त्यांनी 'ब्रिलियंट डिस्ट्रीब्युटर्स' अशी सिनेमा वितरण कंपनी काढली. पुढे सौराष्ट्रमधील मोरवीच्या संस्थानिकांशी ओळख व दोस्ती झाल्यावर त्यांनी गुजरातमध्ये 'मोरवी टेक्स्टाईल्स' ही मोठी कापडगिरणी स्थापन केली. तिच्यात आपल्याकडील सहा-सातशे कुशल तंत्रज्ञ व कामगारांना रोजीरोटीस लावले. सुरुवातीस टी. जी. भाऊसाहेब व नंतर मोतीरामजी बेंडाळे यांना मॅनेजर नेमले.

याच काळात त्यांनी एक अलाईड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या उद्योगसमूहाची कॉर्पोरेट बॉडी स्थापन केली व या कंपनीतर्फे मध्य प्रदेशातील 'डोंगरगड' विभागात इमारतीसाठी टिंबर निर्यात उद्योग सुरू केले.

त्यांच्या अनेक उद्योगसमूहांमुळे व उद्योगपतींशी संबंध आल्याने ते प्रथम महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सभासद व पुढे व्हाईस प्रेसिडेंट म्हणून निवडून आले. इ. स. १९४० साली दिल्लीत भरलेल्या इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्समध्ये अधिवेशनात त्यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे महत्त्वाची कामगिरी बजावली.

पुढे त्यांची ओळख कर्नाटक-आंध्र सीमेवर असलेल्या पूर्वीच्या हैदराबाद स्टेटमध्ये असलेल्या सांडूर संस्थानिकांशी झाली. त्यांनी तेथे 'सांडूर टोबॅको' व 'सांडूर प्लँटेशन' या जुळ्या उद्योगाची स्थापना केली. तेथे ७०० एकर जागा विकत घेऊन तंबाखूची लागवड

केली. तेथे यशवंतनगर हे गाव वसविले. एक मोठी सिगारेट फॅक्टरी सुरू केली. या फॅक्टरीत हजारो लोकांना रोजगार मिळाले. या फॅक्टरीतून 'नेल्सन नेव्हीकट' व 'कोरोनेशन' सिगारेट उत्पादनास सुरुवात झाली आणि लगेच १९४८ च्या रझाकारांच्या पुंडाईत रझाकारांनी ही फॅक्टरी तोडून मोडून टाकली. त्यात झालेला तोटा सहन न झाल्याने रावसाहेबांचे सारे उद्योग बंद पडले.

रावसाहेब खूप शिकले नव्हते तरी ते शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना, परदेशात उच्च शिक्षणास जाऊ इच्छिणाऱ्यांना सढळ हस्ते आर्थिक मदत करीत. त्यांच्याकडे फार मोठी ग्रंथसंपदाही होती. त्यात दुर्मीळ संस्कृत, मराठी, गुजराती, हिंदी, कानडी व इंग्रजी ग्रंथांचा भरणा होता, धार्मिक तसेच ऐतिहासिक व टीकात्मक निबंध, कवितासंग्रह आदी ग्रंथांचाही समावेश होता. ते साहित्यिक, कवी यांना सढळ हस्ते मदत करीत. दु. आ. तिवारींच्या तीन-चार कवितासंग्रह प्रकाशनासाठी त्यांनी मदत केली.

समाजात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ब्रिटिश सरकारने त्यांना रावसाहेब हा किताब बहाल करून तशी सनदही दिली होती.

धार्मिक संस्थांना मदत करण्यातही ते पुढे असत. सावद्याच्या स्वामिनारायण मंदिरास त्यांनी भरघोस मदत केली आहे.

८०) पाटील कै. काकासाहेब रामदास लहानू (जन्म : १६ सप्टेंबर १८९५, मृत्यू : ४ ऑक्टोबर १९७७) - सधन शेतकरी कुटुंबातील जन्म, पाहताक्षणीच छाप पडावी असे धीरगंभीर, करारी व्यक्तिमत्त्व. समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीच्या विकासासाठी अविरत मेहनत, व्यापार, शेती व कौटुंबिक जबाबदारी सांभाळून समाजाच्या उन्नतीसाठी नेहमीच औदार्यपूर्ण वागणूक, नगरपालिका, सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था, व्यापारी मंडळी यांचे माध्यमातून समाजोन्नतीसाठी भरीव योगदान, लेवा एज्युकेशनल युनियन सुरू करण्यामध्ये स्वतः पुढाकार.

शिक्षण संपल्यावर शेतीचा व्यवसाय. सन १९२५ ते १९३१. प्रेसिडेंट - ता. लोकल बोर्ड, जळगाव, सन १९३२ ते ३४; व्हा. प्रेसिडेंट - जळगाव नगरपालिका - सन १९३० मध्ये मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिल; सन १९२८ ते १९३२ चेअरमन - म्युनिसिपल स्टँडिंग कमिटी या आणि अशा अनेक सामाजिक संस्थांमध्ये विविध पातळींवर सहभाग.

कै. काकासाहेबांच्या या लोकप्रियतेमुळे सन १९४७ साली दी जळगाव पीपल्स बँकेच्या चेअरमनपदी त्यांची निवड झाली आणि अल्पावधीतच तत्कालीन संचालक मंडळास त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा अभिमान वाटावा, अशी देदीप्यमान वाटचाल बँकेने सुरू केली. त्यांचे कार्य त्यांच्या उदात्त व्यक्तिमत्त्वाचे व त्यांच्याजवळ असलेल्या दूरदृष्टीचे द्योतक होय. कै. काकासाहेबांच्या रूपाने बँकेला एक कर्तव्यदक्ष व जिद्दी व्यक्तिमत्त्व लाभले. बँकेच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्ये केलीत.

ही बँक त्यांनी नावारूपास आणली. बँकेच्या वाढत्या व्यापामुळे जागा अपुरी पडू

लागली. बँकेची स्वतःची वास्तू असल्याशिवाय बँकेस स्थिरता येणार नाही, असे त्यांच्या मनात ठसल्यामुळे मोठ्या जिद्दीने शहराच्या मध्यवर्ती भागात जागा घेऊन ही भव्य वास्तू उभी केली.

कै. काकासाहेबांनी त्यांच्या कार्यकाळात जनतेत बँकेविषयी प्रेम व विश्वास निर्माण केला. कुठलाही वाद आणि राजकारण यापासून बँकेस अलिप्त ठेवले. गरीब, होतकरू व्यक्तींना मदतीचा हात दिला. त्यांच्या कार्यकाळात सर्व निर्णय एकमताने घेण्यात येत होते. यावरून त्यांच्या व्यक्तिमत्वाची उंची लक्षात येते. सन १९४७ पासून ते सन १९६९ पावेतो जनतेने त्यांना चेअरमन म्हणून बिनविरोध निवडून दिले. तरीदेखील सन १९६९ मध्ये ते स्वतः निवृत्त झाले.

बँकेच्या इतिहासात कै. काकासाहेबांनी केलेले कार्य, बजावलेली भूमिका, दिलेले योगदान जनता कधीच विसरू शकणार नाही.

८१) पाटील, रुक्मिणीबाई तुकाराम (जन्म : २३ सप्टेंबर १९०३, मृत्यू : १८ सप्टेंबर १९९१) - ह्या झोडग्याचे सधन शेतकरी कै. नारायण एकोबा पाटील यांच्या कन्या होत. त्यांचा विवाह दाभाडी (ता. मोताळा) येथील माजी खासदार बॅ. तुकाराम शंकर पाटील यांच्याशी झाल्यावर निरक्षर रुक्मिणीबाईंनी चिकाटीने व जिज्ञासू वृत्तीने अक्षरज्ञान करून घेतले आणि त्या मोडकेतोडके लिहायला वाचायला शिकल्या. एवढेच नव्हे तर अशा या अशिक्षित महिलेने आपल्या जीवनातीलच नाही तर समाजातीलसुद्धा विविध प्रश्नांवर साध्या सरळ व सोप्या अशा वैदर्भी लेवा बोलीभाषेत सहजसुंदर व रसाळ काव्यरचना केल्या. त्यांचे काव्यालंकार यवतमाळचे प्रा. रमाकांत कोलते यांनी **रुक्मिणी गान** नावाने प्रकाशित करून साहित्य जगतात एक वादळ उठविले. बॅ. पाटील यांचे वास्तव्य बुलडाणा येथे होते. ते उच्चशिक्षणासाठी लंडन येथे पाच वर्षे असताना रुक्मिणीबाई दाभाडी या लहानशा खेड्यात राहिल्या. बॅ. पाटील लंडनहून आल्यावर ते बुलडाणा नगरपालिकेचे अध्यक्ष, विधानसभा सदस्य आणि खासदार अशा विविध बहुमानाच्या आणि जबाबदारीच्या पदावर राहिल्याने घराशी राजकारणाचा संबंध अधिक दृढ झाला आणि राजकीय घाईगर्दीच्या धबडग्यातही आदर्श पत्नीच्या साऱ्या जबाबदाऱ्या सांभाळून रुक्मिणीबाईंनी काव्यनिर्मिती केली. बहिणाबाई चौधरींप्रमाणेच त्यासुद्धा उपजतच कवयित्री होत्या. रुक्मिणीबाई आपल्या कविता कागदावर लिहून ठेवीत. घरअंगणापलीकडे फारसे जीवन नसलेल्या व त्यामुळेच काव्यातील अनुभवविश्व मर्यादित असूनही आणि विस्कळीतपणा राहूनही त्यांनी आपली काव्यप्रतिभा सिद्ध केली आहे. त्यांची ४४ गाणी विविध विषय, विशिष्ट घटनाप्रसंग, व्यक्तिचित्रण, बोधपर कथा, भक्तिभाव व उपदेश, समाजजीवन, स्त्रीजीवन, सणवार, पातिव्रत्य आदींवर रुक्मिणीगानमध्ये साकारली आहेत. त्यांची गाणी बोधपर आहेत.

'अरे संसार संसार' गाण्यात जीवनाचे तत्त्वज्ञान सांगून सुख-दुःख व कष्टाने

यथार्थ वर्णन करून बोध केला आहे.

सुखाच्या वेळी सारे गणगोत, दुःखाच्या वेळी नाही फुरसत असे सांगून पोटतिडिकेने त्या उपदेशतात -

अंथरुणाच्या बाहेरी, नका पाय पसरा
कामी पडेला रे बाबा, श्रीमंताचाही आसरा

दिवाळसणाला माहेरी जातानाचा आनंद माहेरची गाणीमध्ये व्यक्त करतात. यमाच्या दरबारात, द्यावा लागेल जबाब खरा, शेतकरी, पतिव्रता, पोळा, ही गाणीही रसाळ व बोधपद आहेत. भक्त प्रल्हाद, पं. नेहरू, तुकाराम, गांधीजी आदी महान व्यक्तिमत्त्वाचे चित्रणही त्यांच्या गाण्यांमधून दिसून येते.

'सूर्य-चंद्र', 'स्त्री जन्मा तुझी कहाणी', 'मोट बारी', 'साक्षात्कार' इत्यादी कथात्मक कवनेही त्यांनी रचली आहेत.

त्यांची सारी गाणी सरळ साध्या रचनेची असून मंगेश पाडगावकरांनी प्रस्तावना दिली आहे. प्रा. वसंत बापट, प्रा. राम शेवाळकर, पद्मश्री डॉ. वि. भि. कोलतेंसारख्या साहित्यिकांनी त्यांच्या गाण्यांची मुक्तकंठाने स्तुती केली आहे.

८२) पाटील, वासुदेव हरिभाऊ (जन्म : १६ सप्टेंबर १९२८) - मूळगाव तळवेल, परंतु त्यांचे सहा पिढ्यांआधीचे पूर्वज बहुधा पेशवाईत वतनदारीवर तळवेलहून गोळेगाव खुर्द (ता. भुसावळ) येथे राहावयास आले. श्री. वासुदेव पाटील यांचे आजोबा गोळेगावचे पोलीस पाटील होते. श्री. वा. ह. पाटील यांनी आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर (बहुधा मॅट्रिक वा इंटर) अल्प शेती म्हणून मुंबईस १९४६ मध्ये पोलीस खात्यात नोकरीस सुरुवात केली. पुढे १९४९ मध्ये ते इंदूर येथे पोलीस खात्यात रुजू झाले. तेथे १३ वर्षे एक्झिक्युटिव्ह शाखेत चांगल्या प्रकारे नोकरी केल्यानंतर २७ वर्षे इंटिलिजन्स शाखेमध्ये कार्य केले. त्यांच्या इमानदारी व परिश्रमी स्वभावामुळे ते पोलीस कॉन्स्टेबलपासून सिनिअर इन्स्पेक्टरपर्यंत बढती मिळवित गेले. या पदावर त्यांनी इंदूर, ग्वाल्हेर व भोपाळ येथे सेवा केली. या अवधीमध्ये त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण कार्ये केलीत. अनेक अपराधी व्यक्तींना कोठडीत टाकले. त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे ८५ पाकिस्तानी नागरिक व जासुसांना पकडले. त्यांच्या सेवाकाळात त्यांना १५० च्या वर पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या उत्कृष्ट सेवेमुळे मध्य प्रदेश शासनाने त्यांना सिनिअर इन्स्पेक्टर पदावर दोन वर्षे सेवावाढ दिली. त्यांच्या कामावर वरिष्ठ पोलीस अधिकारी खूश होते म्हणून सेवानिवृत्तीनंतरही विशेष इन्क्वायरीचे काम त्यांच्याकडे देण्यात येई. त्यांनी अनेक बेरोजगार मुलांना पोलीस खाते तसेच अन्य उद्योग व्यवसायात नोकरीस लावले. लहानपणापासून धार्मिक व आध्यात्मिक प्रवृत्ती असल्यामुळे त्यांनी चारही वेद, १८ पुराणे, १०८ उपनिषदे, एक लाख श्लोकी महाभारत, रामायण, स्मृतिग्रंथ इत्यादी धर्मशास्त्रविषयक ग्रंथांचे अध्ययन केले. 'ज्योतिष' हा त्यांचा आवडता विषय. ऋग्वेदाच्या

दहाव्या मंडळाच्या १९१ व्या सूक्ताचे अध्ययन केल्यानंतर इंदूरला समाज संघटन करायचे ठरविले. या कामात इंदूरस्थित डी. पी. देशमुख दाताळेकर, बळवंतराव सरोदे, लीलाधर चौधरी, वासुदेव खडसे यांचा सहयोग मिळाला. १९९० मध्ये इंदूरला लेवा भ्रातृमंडळाची स्थापना झाली. या संस्थेचे ते सहसचिव होते. मुंबईच्या एम. ओ. राणेंच्या **'आपला लेवा पाटीदार'** या सामाजिक समाचार पत्रिकेत सहसंपादक असताना समाजसंघटनाबाबत बरेच लेख लिहिले. अहमदाबादहून प्रकाशित होणाऱ्या **'उमिया दर्शन'** मध्येही श्री. पाटील यांचे बरेच लेख प्रकाशित झाले आहेत. पिलीभीतचे दिलावरसिंह पटेल यांना श्री. पाटील यांचे लेख आवडल्याने त्यांनी लिहिलेल्या 'सरदार वल्लभभाई पटेल' यांच्या जीवनाविषयीच्या ग्रंथात श्री. वा. ह. पाटलांना महत्त्वाचे स्थान दिले. हैदराबाद ॲक्शनमध्ये भाग घेणारे श्री. बाबुराव चांदे, डी. आय. जी. पोलीस, नागपूर यांच्या प्रोत्साहनामुळे श्री. वा. ह. पाटील यांनी लेवा पाटीदारांचा इतिहास असलेला **'लेवा पाटीदार दर्पण'** नामक ग्रंथ लिहिला. ह्यात सूर्यवंश व लवापासूनची वंशावळ दिलेली आहे. हा ग्रंथ त्यांनी पुराण, वेद, स्मृतिग्रंथ, महाभारत, रामायण व विद्वानांचे इतिहास ग्रंथ ह्यातील अधिकृत संदर्भ घेऊन लिहिला आहे. त्याविषयी बरीच माहिती त्यांच्या आधीच्या लेखांमधूनसुद्धा आलेली असल्याने श्री. शं. वि. पाटील व श्री. नि. रा. पाटील सारख्या लेखकांना त्यांची चांगली मदत झाली आहे. लेवा पाटीदार संघाने 'लेवा समाजरत्न' ही उपाधी देण्याचे सुरू केल्यास श्री. वा. ह. पाटील त्याचे पहिले मानकरी ठरले पाहिजेत.

८३) पाटील, विलास भागवत - यांचे मूळ गाव खिर्डी खु. (ता. रावेर) असून एका साधारण शेतकरी कुटुंबात जन्म (२५ जुलै १९४६) झाला. अकरावीपर्यंतचे शिक्षण सावदा येथे झाल्यावर जळगाव व पुण्यास बी.ए. व एल.एल.बी. झालेत. सन १९७२ ते १९८२ पर्यंत जळगावच्या डिस्ट्रिक्ट आणि सेशन्स कोर्टात वकिली केली. या काळातील कायदेविषयक ज्ञानाच्या अनुभवामुळे १९८२ मध्ये ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीने महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय खात्याचे अवर सचिव झालेत. १९८२ ते २००० च्या दरम्यान त्यांनी विधी व न्याय खात्याचे अवर सचिव, उपसचिव, सहसचिवपदांवर काम केले. दरम्यान १९९५ ते २००० पर्यंत ते ग्रेटर मुंबईचे स्पेशल मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट या पदावरही काम करीत होते. इ.स. २००० मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव झालेत आणि जानेवारी २००३ मध्ये महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे प्रधान सचिव झाले. हे पद म्हणजे सुळावरची पोळीच. विधानसभा व परिषदेच्या सर्वच आमदारांशी जुळवून घेणे तसे कठीणच. परंतु श्री. विलास पाटील यांच्या सर्वसमावेशक वृत्तीने त्यांना ते सहजसाध्य झाले आहे. त्यांचे कायदेविषयक ज्ञान मिळविणे सतत चालूच असते. त्यांनी विधिमंडळ कामकाजाबाबतची चर्चासत्रेही गाजविली आहेत. मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी त्यांनी कायदेविषयक व्याख्यानेही दिली आहेत.

८४) पाटील, शंकर विठोबा (जन्म : ९ नोव्हेंबर १९२६) - मूळ गाव दुधलगाव बु. (ता. मलकापूर) असून शेतकरी कुटुंबात जन्मले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अनुक्रमे दुधलगाव बु. व शेलगाव बाजार येथे झाले. पुढे नागपूरच्या मॉरीस कॉलेजमधून बी.ए. व नागपूर विद्यापीठ प्रशिक्षण महाविद्यालयातून बी.टी. झालेत. दरम्यान राष्ट्रभाषा कोविद झालेत. मलकापूर तालुक्यात दाताळा येथे अध्यापकी व्यवसायात मुख्याध्यापक असताना संशोधनाचे वेड लागले. लेवा पाटीदार इतिहासाबाबत विशेषकरून पौराणिक इतिहासाबाबत सखोल संशोधन केले. त्यांच्या लेखनात प्रामुख्याने **तीर्थरूप भारत दर्शन** (१९९०), **वारकरी पंथाची चैतन्य संप्रदाय परंपरा** (१९९२), **वारकरी पंथाचा इतिहास** (१९९५), **लेवा पाटीदारांचा इतिहास** (१९९९), **शांडिल्य गोत्र ग्रंथ** (२०००), यांचा उल्लेख करावा लागेल. त्याशिवाय त्यांनी विविध लेख, काव्य, मंगलाष्टके प्रकाशित केली आहेत. उत्कृष्ट वक्तृत्त्वाबाबत त्यांना अनेक पारितोषिके प्राप्त झाली आहेत. त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्याने, प्रवचने व कीर्तने केली आहेत. दुधलगाव या छोट्याशा गावी त्यांनी स्वतःचे खाजगी ग्रंथालय स्थापन केले आहे. या खेडेगावात त्यांनी इतिहास संशोधन केंद्र (१९८६) व चैतन्य प्रकाशन संस्था (१९९२) यांचीही स्थापना केली आहे. **लेवा पाटीदारांच्या इतिहास** लेखनामुळे त्यांचे अनेक संस्थांनी सत्कार केले आहेत. असा इतिहास लिहिणारे ते पहिलेच आहेत. लेवा पाटीदारांविषयी एवढे प्रेम असणारा विरळाच. आपल्या स्पष्ट व परखड विचारांबाबत श्री. शंकर विठोबा पाटील यांची ख्याती आहे.

८५) पाटील, डॉ. सुभानराव तोताराम (आयुर्वेदतीर्थ) (जन्म : १९१४) - मूळगाव भादली, १९३० मध्ये चिंचवड राष्ट्रीय शाळेत प्रवेश, पुढे नगरला अनाथ वसतिगृहात राहून फ्रीशिप मिळवून आयुर्वेद कॉलेजमधून आयुर्वेदतीर्थ झाले. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतल्याने फटक्यांची शिक्षा व ३ महिने कैद झाली. १९३२ च्या चळवळीत २ वेळा ६-६ महिने सक्तमजुरीची शिक्षा. १९३७ ते १९४२ पर्यंत डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड व एस.एम.पी. दवाखान्यात काम केले. १९४२ मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन राष्ट्रीय चळवळीत भूमिगत राहून खानदेशातील लढा चालविण्याचे कार्य केले. पकडले गेल्यावर पुन्हा २७ महिन्यांची शिक्षा भोगावी लागली. राष्ट्रहिताच्या धडाडीमुळे लोकादरास पात्र. भादलीच्या रूरल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन होते. शेती व वैद्यकीय व्यवसाय होता. ते जिल्हा दारूबंदी स्वयंसेवकांचे प्रमुख व प्रचारक होते. जळगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्षही होते. डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे व्हाईस प्रेसिडेंट होते व ह्या बोर्डाच्या पब्लिक हेल्थ कमिटीचे अध्यक्षही होते.

८६) पाटील, श्यामसुंदर लीलाधर (जन्म, १४ मार्च, १९६२) - मूळगाव-पिंपळगाव खु. (ता. भुसावळ). प्राथमिक शिक्षण पिंपळगाव व माध्यमिक शिक्षण जामनेर येथे. सैनिकी सेवा पूर्वप्रशिक्षण संस्था औरंगाबाद येथे निवड झाल्याने तेथील

शासकीय महाविद्यालयातून बी.एससी. झाले. येथे उत्कृष्ट विद्यार्थी पारितोषिक व विद्यार्थी संसद अध्यक्षपदाचा मान मिळाला. जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व मेहनतीने विविध क्षेत्रात यश मिळविले. १९८३ मध्ये रिझर्व्ह बँकेत 'कॉईन, नोट एक्झॉमिनर' या पदावर मुंबई येथे रुजू झाले. विविध प्रशासकीय सेवा स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून प्रशासकीय सेवेतील प्रवास पुढीलप्रमाणे:- १९८५-९२ पोलीस सब इन्स्पेक्टर; १९९२-९५ वर्ग १ सेल्स टॅक्स ऑफिसर; १९९५ मध्ये एमपीएससीत सातवा क्रमांक मिळवून उपजिल्हाधिकारी म्हणून निवड; पुढे जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदुर्ग, प्रांत अधिकारी, कणकवली; उपजिल्हाधिकारी (अपिले), मुंबई उपनगर व ठाणे जिल्हा; डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन, मुंबई विभाग; अतिरिक्त जिल्हाधिकारी, मुंबई-ठाणे; अपर मुख्य सचिव महसूल यांचे विशेष कार्य अधिकारी; अतिरिक्त आयुक्त, ठाणे महानगरपालिका, इ. दरम्यान काही कालावधीसाठी ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांच्या आयुक्तपदाचाही कार्यभार पाहिला. सध्या ते मंत्री, महसूल यांचे विशेष कार्य अधिकारी तसेच उपसचिव, नोंदणी व मुद्रांक; सरदार सरोवर प्रकल्प; मुख्य जमाबंदी आयुक्त (संचित मालमत्ता नुकसानभरपाई) तथा निर्वासित मालमत्तेचे परिरक्षक (म.रा.) या जबाबदारींच्या पदावर कार्यरत आहेत. २०१४ मध्ये त्यांना मुंबई विद्यापीठाच्या ॲडव्हान्स्ड पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन अर्बन मॅनेजमेंटमध्ये सिल्व्हर मेडल प्राप्त झाले आहे. ते लेवा पाटीदार युवकांना शिबिरांतून व वैयक्तिक मार्गदर्शन करीत असतात. समाज बांधवांना आपल्या प्रशासकीय अनुभव व ज्ञानातून समस्या सोडविण्यासाठी मदत करीत असतात. शासकीय सेवेतून समाजकार्यात सक्रिय सहभाग घेणारे, स्वकर्तृत्वावर यशाचे टप्पे पार करणारे, विविध जबाबदाऱ्यांच्या पदांवर कार्यकुशलता, कर्तव्यदक्षता व कर्तबगारीचे काम करणारे श्यामसुंदर पाटील लेवा युवकांचे प्रेरणास्थान बनले आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मेघमाला या उत्तम गृहिणीबरोबर त्यांना समाजकार्यात मदत करीत असतात.

८७) बोंडे डॉ. ज्ञानदेव हरी - मूळ गाव एणगाव हल्ली मुक्काम नागपूर येथे. जन्म १९३५. आधी शासकीय सेवेत तहसीलदार म्हणून काम केले. पण शिक्षणाची आवड असल्याने अध्यापनाकडे वळले. सुरुवातीच्या काळात असोदा येथे सहशिक्षक व खिर्डी येथे मुख्याध्यापक म्हणून सेवा केली. राज्यशास्त्र विषयात एम. ए. करून मराठी विषयातही एम. ए. केले. लिंग्विस्टिक रघवी बोली या विषयावर प्रबंध लिहून पीएच. डी.ची उपाधी प्राप्त केली. १९७१ पासून १९९५ पर्यंत नरखेड जि. नागपूर येथे प्राचार्य म्हणून कार्यभार सांभाळला. वर्तमानपत्रातून सामाजिक विषयावर लेखन केले. शैक्षणिक विषयांवर पुस्तके प्रसिद्ध केली. योग असा की त्यांच्या सौभाग्यवती डॉ. लीला बोंडे याही शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहिल्या. त्यांनी मराठीतून एम. ए. केल्यावर 'जोतिबा फुले वाङ्मयाचे वाङ्मयीन मूल्यमापन' या विषयावर पीएच. डी. ही उपाधी मिळविली.

१९७१ वर्धा येथे मराठीच्या प्राध्यापिका. २००८ मध्ये सेवानिवृत्तीनंतर गृहस्थाश्रमात रमल्या असून जमेल तशी समाजसेवा करीत आहेत. त्यांचे एक जावई श्री. ज्ञानेश चोपडे यांचे नाशिक येथे मोठे हॉस्पिटल व लॅब आहे. ते तेथील लेवा मंडळाचे अध्यक्षही आहेत. दुसरे जावई डॉ. रवींद्र खडसे गव्ह. मेडिकल कॉलेजात प्राध्यापक तर तिसरे जावई श्री. आकाश मिश्रा हे बांधकाम व्यवसायात कार्यरत आहेत. सरांचे व्याही श्री. ए. पी. भंगाळे हे हायकोर्ट जज्ज असून लेवा समाजाचे भूषण आहेत. श्री. बोंडे सर ८० व्या वर्षातही हिरिरीने समाजकार्य करीत असून ते तरुणांना आदर्शवत आहे.

८८) फेगडे, लोढू भाऊ (१८९८-१९५६) - लोढू भाऊ नावाने प्रसिद्धी पावलेले हे थोर स्वातंत्र्यसेनानी रावेर तालुक्यातील रोझोदे गावचे. त्यांचा जन्मही तेथलाच. बालपण दारिद्र्यातच गेले. शिक्षणही त्यामुळे बेताबेताचेच, पण त्यांच्या जीवनात क्रांतीचा क्षण आला तो १९३० साली राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी देशभर कायदेभंगाची चळवळ सुरू केली त्या वेळेपासून. सतत १९४८ पर्यंत साथी लोढू भाऊंनी काँग्रेसची निःसीम सेवा केली. अनेक वेळा कारागृहवास पत्करला. इ.स. १९३२ मध्ये लोढूभाऊ विनोबाजी, जमनालाल बजाज, गुलझारीलाल नंदा, बाबुभाई मेहता, खंडूभाई देसाई, मणिलाल कोठारी, दास्ताने, आपटे गुरुजी, साने गुरुजी, धनाजी नाना, शंकरभाऊ काबरे इत्यादी मान्यवर नेत्यांसमवेत धुळे मध्यवर्ती कारागृहात बंदिस्त होते.[४] १९३६ च्या फैजपूर काँग्रेस अधिवेशनात धनाजी नानांची आज्ञा शिरोधार्ह मानून त्यांनी कार्यकर्ता म्हणून वाहून घेतले होते.[५] खानदेशातील खेडीची खेडी त्यांनी आपल्या प्रभावी भाषणांनी जागृत केली. ते आपल्या ग्रामीण भाषणांनी श्रोत्यांना अगदी तल्लीन करून ठेवत. साने गुरुजींची त्यांच्यावर फार माया जडली होती. हे त्यांच्या देशसेवेचे वैशिष्ट्य सांगता येईल. ते साने गुरुजींचे एक निष्ठावान अनुयायी बनले व म्हणूनच समाजवादी पक्षाने त्यांना जवळ केले. काँग्रेसचा त्याग केल्यावर लोढूभाऊही साथी बनले.

८९) बेंडाळे, डॉ. जी. डी. ऊर्फ अण्णासाहेब (जन्म : १८ सप्टेंबर १९१८) - मूळ गाव सावदा (ता. रावेर). एका शेतकरी कुटुंबात यांचा जन्म झाला. डॉक्टरकीचे शिक्षण एलसीपीएस झाल्यावर जळगावात दवाखाना उभारून वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. त्यांना इंग्लंड येथे जाऊन एफ.आर.सी.एस. ही वैद्यकीय शिक्षणातील पदवी मिळवायची होती, पण आर्थिक अडचणींमुळे ते शक्य झाले नव्हते आणि दवाखाना सुरू केला. नंतर त्यांची प्रॅक्टीस एवढी वाढली की, ते त्यांना व्यवसाय बंद करून जाणे जमले नाही. तरी समाजातील इतर मुलांना एफ.आर.सी.एस. घेण्यासाठी त्यांनी आर्थिक मदत केली. त्यांच्या प्रेरणेमुळे व व्यवसायातील यशामुळे जळगाव व धुळे परिसरात लेवा पाटीदार समाजात अनेक जण सर्जन झाल्याचे डॉ. एन. बी. कुरकुरे यांनी डॉ. जी. डी. बेंडाळे यांच्यावरील अमृत महोत्सवी गौरवग्रंथ **'आनंदयात्री'** मध्ये नमूद केले आहे. डॉ. बेंडाळे यांच्यापूर्वी जळगावात डॉ. नानासाहेब दावलभक्त हेच

एकमेव सर्जन होते. त्या वेळीही डॉ. जी. डी. बेंडाळे यांनी दुःखी, गोरगरिबांची सेवा केली. जळगावात १९४५ पर्यंत महाविद्यालय नव्हते. डॉ. जी. डी. बेंडाळे, वाय.एस. महाजन, रँगलर व्ही. के. चौधरी इत्यादी मान्यवरांच्या प्रयत्नांतून व शेठ चत्रभूज गोवर्धनदास यांच्या देणगीतून खानदेश एज्युकेशन सोसायटीचे एम. जे. कॉलेज स्थापन केले. ते काही वर्षे खानदेश एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष होते. १९५० मध्ये जळगावात स्थापन झालेल्या रोटरी क्लबचे ते संस्थापक सदस्य होते. १९६५ मध्ये ते रोटरी क्लबचे अध्यक्ष झाले. ''टॉन्सिल्स शस्त्रक्रियेचा खर्च करू न शकणाऱ्या कुठल्याही रुग्णाला माझ्याकडे पाठवा, मी मोफत शस्त्रक्रिया करीन'' असे सर्व सदस्यांना त्यांनी सुचविले. फकिरा हरी लेवा बोर्डिंग हाऊस, नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शांताबाई लक्ष्मणराव खडके विद्यामंदिर, बालविकास मंदिर, डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, कला विभाग, प्रेरणा महिला मंडळ या संस्थांमध्ये त्यांनी नेतृत्व केले. तसेच मुळजी जेठा महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बीएड कॉलेज), औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, मेडिकल रिसर्च सेंटर या संस्थांच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांनी आपल्या हयातीत लाखो रोग्यांवर उपचार केलेत तर हजारो रोग्यांवर शस्त्रक्रिया केल्यात. ते काही वर्षे जळगाव नगरपालिकेचे नगराध्यक्षही होते. जळगाव नगराध्यक्ष असताना शहर सुधारणेचे कार्य केले.

९०) बेंडाळे, तुकाराम बारसू (जन्म : ५-७-१९०३) - मूळ गांव सांगवी बु., (ता. यावल). मॅट्रिकनंतर मुंबईहून १९२० मध्ये स्कूल ऑफ आर्ट्समधून डी.टी.सी., मराठी वाङ्मय विशारद, हिंदीभाषा कोविद, शिक्षक सनद परीक्षा उत्तीर्ण. १९२० नंतर १९ वर्षे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये चित्रकला शिक्षक म्हणून लौकिक मिळविला. १९४२ मध्ये नोकरी सोडून 'शिक्षण मंदिर' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेद्वारे ट्रेनिंग फॉर वुईमेन ही संस्था स्थापून प्रशिक्षित शिक्षकांची उणीव भरून काढली. १९४४ मध्ये मॉडर्न गर्ल्स स्कूलची स्थापना केली. शासनाने शिक्षण मंदिर, ट्रेनिंग फॉर वुईमेन, मॉडर्न गर्ल्स स्कूल व वसतिगृहासाठी विस्तीर्ण जागा दिली. यांचे स्त्रीशिक्षणातील कार्य भरीव मोलाचे आहे. त्यांचे **काव्य संजीवनी** व **निसर्गाचे नवल** असे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी 'ट्रेनिंग फॉर वुईमेन' या संस्थेत मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्य केले.

९१) बेंडाळे, मोतीराम गंगाराम (जन्म : १८९८) - मूळ गाव सावदा. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाल्यावर बदोद्याच्या कलाभुवन कॅालेजमधून १९२६ साली टेक्सटाईल इंजिनीअरिंगचा कोर्स पूर्ण केला. त्यानंतर चार वर्षे नोकरी केल्यावर उद्योग व कलाकौशल्याकडे मनाचा कल असल्यामुळे १९३२ मध्ये मुंबईस येऊन पेट्रोमॅक्स बत्तीला लागणाऱ्या मेंटल्सचा कारखाना काढला. यांच्या कारखान्याचा माल 'रेडिओ मेंटल्स' या नावाने प्रसिद्ध होता. यांचे वडील बंधू रूपाजी बेंडाळे हे खानदेशातील पहिले इलेक्ट्रिकल

इंजिनीयर असून त्यांच्या मदतीने यांनी १९४४ मध्ये सावदा-फैजपूर इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी व १९४९ मध्ये पाचोरा इलेक्ट्रिक कंपनी स्थापन करून ग्रामीण भागात वीजनिर्मिती सुरू केली. त्यानंतर हे दोघे बंधू स्पिनिंग उद्योगाकडे वळले. वरील दोन्ही इलेक्ट्रिक सप्लाय कंपन्या एम.एस.ई.बी. चे जाळे वाढेपर्यंत म्हणजे १९६४ पर्यंत व्यवस्थितरीत्या कार्य करीत होत्या.

९२) बोंडे, धनाजी मह्हारू ऊर्फ भाऊसाहेब (जन्म : १९१२, मृत्यू : २००१) - या सर्वोदयी कार्यकर्त्याचा जन्म खिरोदे, ता. रावेर येथे झाला. प्राथमिक शिक्षण खिरोदे येथे तर माध्यमिक शिक्षण फैजपूर येथे झाले. विश्वविद्यालयीन शिक्षण पुणे येथे फर्ग्युसन कॅालेजमध्ये झाले. बी.ए. ची पदवी घेण्यापूर्वीच त्यांनी देशभक्त धनाजी नाना ऊर्फ दादासाहेब चौधरी यांच्यासमवेत विधायक कार्यात भाग घेण्यास सुरुवात केली होती. १९३६ चे काँग्रेसचे पहिले अधिवेशन धनाजी नानांच्या अथक प्रयत्नांनी फैजपूर येथे संपन्न झाले. त्यात भाऊसाहेब विद्यार्थी असतानाच त्यांनी विद्यार्थी कार्यकर्त्यांची मोठी फळी उभारून धनाजी नानांना मोठी मदत केली. इ.स. १९३९ मध्ये बी.ए. झाल्यावर खिरोदे येथे दादासाहेबांनी काढलेला आश्रम चालविणाऱ्या आश्रमवासियांत कायम काम करण्याच्या दृष्टीने सामील झाले. आश्रमाचे रूपांतर 'जनता शिक्षण मंडळ' ह्या संस्थेत झाल्यावर ते मंडळाचे संचालक झाले. १९४२ च्या छोडो भारत आंदोलनात भाऊसाहेबांना दीड वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. मूलोद्योग शिक्षण पद्धतीनुसार जनता शिक्षण मंडळात कार्य करावयाचे ठरविल्यामुळे ते हिंदुस्थानी तालिमी संघ, सेवाग्राम येथून शिक्षण घेऊन आले व ती योजना अमलात आणली. या योजनेनुसार 'प्राथमिक मूलोद्योग अध्यापक विद्यालय' या रोपट्याचे आता साने गुरुजी विद्या प्रबोधिनी या भव्य डेरेदार वृक्षात रूपांतर झालेले असून येथे बी.एड., एम.एड. पर्यंतचे शिक्षण दिले जाते. १९५२ मध्ये ते मुंबई प्रांतिक विधानसभेवर निवडून आले. गांधीजींच्या ग्रामीण पुनर्रचनेच्या तत्त्वज्ञानापासून स्फूर्ती घेऊन दादासाहेब चौधरींनी पाल परिसरात आदिवासी विकासासाठी कार्य सुरू केले. सन १९४९ मध्ये मुंबई शासनाने सुरू केलेल्या सर्वोदय योजनेच्या संचालनाची जबाबदारी दादासाहेबांवर सोपविली. दादासाहेबांच्या मृत्यूनंतर मधुकररावांच्या प्रेरणेने गौरखेडा पंचक्रोशी रचनात्मक सहकारी मंडळी ही संस्था उभी राहिली व पुढे सातपुडा विकास मंडळ, पाल या नावाने लौकिकास आली. १९५७ मध्ये संस्थेच्या संचालनाची जबाबदारी भाऊसाहेब बोंडे व त्यांच्यानंतर त्यांचे सुपुत्र कै. सुनीत बोंडे यांच्याकडे आली. भाऊसाहेबांनी प्रथम खिरोदा सर्वोदय केंद्राचे उपसंचालक व नंतर संचालकपदी काम केले आहे.

९३) बोंडे, सुनीत धनाजी तथा सुनीतभाई (जन्म : ६ ऑगस्ट १९४२, मृत्यू : १९ नोव्हेंबर १९९१) - खिरोद्याचे गांधीवादी व धनाजी नानांचे निष्ठावान अनुयायी, देश सेवेने प्रेरित स्वातंत्र्यलढ्यात झोकून त्यागमय जीवन जगणाऱ्या भाऊसाहेब

बोंडेंच्या राष्ट्रवादी कुटुंबात यांचा जन्म झाला. लहानपणी जरा हूड, परंतु नंतर सालस, निरागस, लोभस, नम्र, विनयशील, मृदू व मितभाषी, लहान-थोर सर्वांचाच आदर करणारे. त्यांना सुनीतभाई ही उपाधी लागली. खिरोद्याहून एस.एस.सी. झाल्यावर आदिवासी व ग्रामीण विकास हेच ध्येय ठरवून अमरावतीच्या शिवाजी कृषी महाविद्यालयातून १९६७ मध्ये कृषी पदवी धारण करते झाले. ध्येयासाठी अनुभव संचय असावा म्हणून कोसबाड येथे कृषी पदवी धारण करते वेळी तेथे त्यांना स्वामी आनंद, डॉ. हरिश्चंद्र पाटील व डॉ. जयंतराव पाटील यासारख्या थोरांचा सहवास व मार्गदर्शन लाभले. १९६९ मध्ये इस्रायलला जाऊन रुफिन इन्स्टिट्यूटमध्ये विस्तार पद्धती व खतांचा उपयोग हा आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम पूर्ण केला, तेथील कृषी सिंचन नियोजनाचाही जवळून अभ्यास केला.

कोसबाड वास्तव्य जीवनध्येयासाठी उपयुक्त वाटल्यावर १९७१ मध्ये पालच्या सातपुडा विकास मंडळाचे स्वयंस्फूर्तीने सेक्रेटरीपद धारण केले. मा. बाळासाहेबांचे पाठबळ होतेच. सुनीतभाईंनी येथील आदिवासी आश्रमशाळेच्या १०० एकर जमिनीवर आदिवासी शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतील असे प्रयोग व प्रात्यक्षिके सुरू केली. त्यांचे कार्यधोरण ठरविणे, योजना आखून राबविणे; आदिवासी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, सार्वजनिक कामे, कुटुंब कल्याण, दूध, तेलबिया, गुरेचराई, पशुपालन व संवर्धन आदी संस्था उभ्या करणे इत्यादी प्रकल्प कृषीविषयक नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी जिद्दीने राबविले. महाराष्ट्र शासनाने शासकीय सर्वोदय योजनेचे काम बंद केल्यावरही सुनीतभाई व कार्यकर्त्यांनी संस्थेचे कार्य न डगमगता सुरू ठेवले. बाळासाहेब व सुनीतभाईंच्या अथक प्रयत्नांनी भारतीय कृषी अनुसंधान मंडळाद्वारे आदिवासींसाठी पाल येथे या संस्थेमार्फत कृषी विज्ञान केंद्र सुरू करण्यात आले. सुनीतभाई व संस्थेस मिळालेला १९८० चा इंडियन मर्चंट चेंबर्सचा ग्रामीण विकास योगदान पुरस्कार; पीपल ॲक्शन फॉर डेव्हलपमेंट संस्थेचा मिळालेला पुरस्कार; १९८७ मध्ये जमनालाल बजाज पुरस्कार; १९८९ चा वसंतराव नाईक प्रतिष्ठान पुरस्कार; महाराष्ट्र शासनाचा १९९०-९१ चा आदिवासी सेवक संस्था पुरस्कार उल्लेखनीय आहेत.

धनाजी नाना व बाळासाहेबांनंतरची नेतृत्व पोकळी हा उमदा तरुण भरून काढणार असे वाटत असतानाच हा डाव अर्ध्यावरच मांडून सोडून गेले.

९४) बोरोले, श्री. अनिल श्रीधर - (जन्म : २६-७-१९५३) मूळगाव-चिनावल, ता. रावेर असून त्यांनी डी.ई.ई., बी.ई. (प्रॉडक्शन), एम.ई. (प्रॉडक्शन) असे उच्च शिक्षण प्राप्त केलेले आहे. व्यवसायाने श्री. बोरोले हे उद्योजक असून त्यांचा ट्रान्सफॉर्मर व पॅनल बोर्ड निर्मितीचा द्वारका इंडस्ट्रीज, जळगाव हा कारखाना आहे.

श्री. बोरोले सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्काराने (२००४) सन्मानित आहेत.

श्री. बोरोले हे अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांमध्ये मोलाची कामगिरी पार पाडत आहेत. त्याविषयी थोडक्यात-श्री बोरोले हे रोटरी क्लब, जळगाव वेस्टचे १९९५-९६ या कालावधीत मानद सचिव तर १९९९-२००० या कालावधीत अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीमध्ये रोटरी क्लब, जळगाव वेस्ट सेवा प्रतिष्ठानची स्थापना झाली आणि याच कालावधीत मायादेवीनगर मधील रोटरी भवन निर्मितीला प्रारंभसुद्धा झाला; त्याचप्रमाणे स्मॉल स्केल इंजिनीअरिंग इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, जळगावचे अध्यक्ष; मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगाव आणि शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव या ठिकाणी सल्लागार समिती सदस्य; उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कॉमर्स आणि बिझनेस लॉ अभ्यास गटातील एक उद्योजक प्रतिनिधी आणि जळगाव जिल्हा लेवा पाटीदार मंडळ, जळगावचे संस्थापक-संचालक व मंडळाचे प्रथम अध्यक्ष असून ते समर्थपणे कार्यभार सांभाळत आहेत.

या मंडळाद्वारे आजतागायत अत्यंत महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात आलेत. त्यात प्रामुख्याने-श्री. बोरोले यांचे वडील श्री. श्रीधर भगवान बोरोले यांनी मुलांच्या वसतिगृहासाठी जागा देऊन अमोल दातृत्व दाखविले आणि त्या जागेवर एक अत्यंत सुरेख अशी मंडळाच्या माध्यमातून उभी राहिलेली इमारत. तसेच भाडे तत्त्वावर इमारत घेऊन मुलींचे वसतिगृह सुरू केले. विशेष गुणवत्ता प्राप्त, अत्यंत गरीब, कष्टाळू, गरजू मुलांना उच्चशिक्षणासाठी आर्थिक मदतीचा हात देण्यास सुरुवात. 'साप्ताहिक लोकहित दर्पण' ची स्तुत्य सुरुवात व प्रचंड प्रतिसाद.

९५) भिरूड, दत्तात्रेय शेनू (जन्म : १ नोव्हेंबर १९०६) - मूळगाव खिर्डी (ता. रावेर) असून ते अतिशय हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात. बी.ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यावर १९३१ मध्ये ते एल.एल.बी. झाले आणि जळगाव येथे वकिली करू लागले. जात्याच बुद्धिमान असल्याने त्यांची गणना नामवंत व कायदेनिपुण वकिलांमध्ये झाली.

यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्यही प्रशंसनीय आहे. खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या चेअरमनपदी त्यांनी १९४६ ते १९५१ पर्यंत काम पाहिले. बरीच वर्षे ते या मॅनेजिंग कौन्सिलचे सभासद राहिले. खिर्डी या आपल्या मूळगावी त्यांनी १९४३ मध्ये रूरल एज्युकेशन सोसायटी स्थापून सुरुवातीस सातवीपर्यंत ए.व्ही. स्कूलची स्थापना केली. पुढे ह्या शाळेला माध्यमिक शाळेचे वर्ग जोडण्यात आले. दत्तात्रेय शेनू भिरूड हे या संस्थेचे अध्यक्ष होते. ते रोटरी क्लब, जळगाव या संस्थेचेही सदस्य होते.

९६) भिरूड, डॉ. प्रमिला घनश्याम (जन्म : १६ जुलै १९३८) - त्यांचे सासरचे मूळ गाव कठोरे असून पती घनःशाम भिरूड जळगावला स्थायी झालेले. वडील फैजपूरचे. बळिराम हिरामण चौधरी यांच्या शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. १९५६ मध्ये त्या मॅट्रिक झाल्या. १९६८ मध्ये गृहिणी असताना बाहेरून परीक्षा देऊन बीए

झाल्या. एमजे कॉलेजमधून १९७० मध्ये एम. ए. - मराठी झाल्या. १९७३-७४ मध्ये एरंडोल कला वाणिज्य महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका म्हणून लागल्या. त्यानंतर १९७४ ते १९९८ पर्यंत एम.जे. कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून कार्यरत राहिल्या. १९८२ मध्ये म. ना. अदवंत यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठी कादंबरीत स्त्री लेखिकांनी घातलेली भर १८५७-१९५७' या विषयावर प्रबंध सादर करून पुणे विद्यापीठातून पीएच. डी. मिळविली. १९८४-८५ मध्ये खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या शारदा महाविद्यालयात त्यांनी प्राचार्य म्हणून काम पाहिले. १९९३ मध्ये त्या पीएच.डी. व एम. फिल. च्या गाइड झाल्या.

त्यांच्या साहित्यनिर्मितीत प्रामुख्याने **राजस** - कवितासंग्रह, **रेशीमबंध**-कथासंग्रह, **बहिणाईची गाणी - एक अभ्यास** -समीक्षात्मक ग्रंथ, **मराठी कादंबरी - स्त्रियांचे योगदान** - त्यांच्या प्रबंधावर आधारित ग्रंथ, **मी बहिणाई** यांचा समावेश करता येईल. त्याशिवाय **बहिणाईकी कविता - एक अध्ययन** हिंदी अनुवाद व The poems of Bahinai इंग्रजी ग्रंथ प्रकाशन मार्गावर आहेत. याशिवाय त्यांनी **बहिणाईची गाणी अमृतवाणी** ऑडियो कॅसेट सहा सीडी संच स्वतः गाऊन तयार केले आहे. त्यांच्या साहित्यावर अनेक प्रथितयश साहित्यकांनी समीक्षा केलेल्या आहेत. त्यांच्या साहित्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

डॉ. प्रमिला भिरूड या महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, वल्लभदास वालजी वाचनालय, जळगाव व भारत कृषक समाज जळगावच्या आजीव सदस्या आहेत. जळगाव आकाशवाणी केंद्रावरही सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती झाली आहे. आकाशवाणीवर त्यांची अनेक व्याख्याने झाली आहेत. त्याशिवाय शारदीय व्याख्यानमालेत विविध संस्थांमध्ये त्यांची व्याख्याने झाली आहेत.

प्रमिलाताई महिला रोजगारासाठी महिला हस्तकला, महिला लघुउद्योग व व्यवसाय ह्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन देत असतात. त्या प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या आहेत.

प्रमिलाताईंनी वाचन, लेखन, शिवणकाम, भरतकाम, विणकाम व गृहोद्योग आदी छंद मोठ्या हिरिरीने सांभाळले असून त्यात त्या सदैव व्यस्त असतात.

९७) भारंबे, श्री. मिलिंद रामभाऊ (जन्म : १५ नोव्हेंबर १९७१)- मूळ गाव-तळणी (ता. मोताळा, जि. बुलडाणा) असून डॉ. रामभाऊ सुपडा भारंबे (एम.एस्सी., पीएच.डी.) व डॉ. सौ. मंदाकिनी रामभाऊ भारंबे (एम.ए., पीएच.डी.) यांचे ते सुपुत्र होत. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण नागपूर येथे झाले. १९९३ मध्ये ते बी.टेक् (केमिकल इंजिनीअरिंग) झाले. १९९७ मध्ये आय.पी.एस. होऊन पोलीस दलात पोलीस अधीक्षक म्हणून सामील झाले. त्यांनी अहमदनगर, कोल्हापूर, गोंदिया, सांगली, मुंबई, नाशिक ग्रामीण व ठाणे येथे पोलीस अधिकारी पदांवर कामाचा ठसा उमटविला.

गोंदियास असताना नक्षलवादी कारवायांना परिणामकारक आळा घातल्याने त्यांना म.शा. कडून आंतरिक सुरक्षापदकाने सन्मानित करण्यात झाले. सांगलीस असताना संगणकीकृत सुधारणा घडवून तेथील कार्यालयास आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त झाले. म. शा. पोलीस महासंचालकांनी त्यांची प्रशंसा करून सांगली मॉडेल संपूर्ण महाराष्ट्र पोलीस दलासाठी स्वीकारले.

मुंबईत पोलीस उपआयुक्तपदावर असताना २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात क्यूआरटी, मुंबई स्थापण्यात महत्त्वपूर्ण सहभाग होता.

एनएसजी, दिल्ली येथे कमांडो कोर्स पूर्ण केला असून कराटेत ते ब्लॅक बेल्ट आहेत. महाराष्ट्र पोलीस खात्यात गेली १० वर्षे सतत शूटिंगमध्ये सुवर्णपदक मिळवीत आहेत. पोलीस दलातील त्यांची प्रशंसनीय कामगिरी, धैर्यशील नेतृत्व, खंबीरपणा, अंगी बाणवलेले न्यायतत्त्वशास्त्र व प्रामाणिकपणा या गुणांमुळे ते लोकांच्या मनातील विश्वास व श्रद्धा दृढ करते झाले आहेत. दि. २६ जानेवारी, २०१३ रोजी त्यांच्या सेवेबद्दल राष्ट्रपती-पोलीसपदक प्रदान करून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. तसेच त्यांना दि. १ मे २०१३ रोजी महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकांद्वारे सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले आहे. नुकतीच श्री. भारंबे यांची सहाय्यक पोलीस कमिशनर, मुंबई (वाहतूक) या पदावर नियुक्ती झाली आहे.

९८) भिरूड, श्रीधर दत्तात्रेय (जन्म : १९२८, मृत्यू : २००२) - मूळ गाव खिर्डी (ता. रावेर) असून हे दत्तात्रेय शेनू भिरूड या नामांकित वकिलाचे सुपुत्र होत. शिक्षण जळगाव येथे. १९४५ मध्ये मॅट्रिक झालेत. १९४९ मध्ये फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथून बी.एस्सी. विशेष प्रावीण्याने उत्तीर्ण. त्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या टेक्निकल शाखेत औषधी विभागात प्रवेश घेऊन १९५१ मध्ये बी.एस्सी. टेक. झालेत. १९५४ मध्ये एम.एस्सी. टेक. झालेत.

शिक्षणानंतर रिसर्च केमिस्ट म्हणून नोकरी केली. १९५५ मध्ये मुंबई शासनाच्या औषधी विभागात औषध निरीक्षक म्हणून नियुक्ती. पुढे ३० वर्षांत आपल्या गुणांनी १९८१ मध्ये महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषधी विभागाचे आयुक्त झाले. शासन व केंद्र शासनाच्या निरनिराळ्या समित्यांमध्ये सहभाग राहिला. १९८५ मध्ये निवृत्त झाले. भिरूडसाहेब आयुक्तपदी असताना बऱ्याच लेवा पाटीदार बी.फॉर्म. झालेल्या मुलांना औषधी निरीक्षक म्हणून नोकरीस लावले.

९९) भोगे, नामदेव भीमसेन ऊर्फ भोगे गुरूजी (जन्म : २३ जुलै १९२३, मृत्यू : २२ फेब्रुवारी १९९९) - मूळ गाव न्हावी (ता. यावल) येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाला. दुर्धर आजारात बालपणातच दृष्टी गेली. काका गणपतरावांनी १९३५ मध्ये मुंबईच्या अंध विद्यालय व वसतिगृहात ठेवले. अंधशाळेत प्राथमिक शिक्षण घेत असताना त्यांनी शास्त्रीय संगीताचेही शिक्षण चालू ठेवले. सातवीबरोबर संगीतातील

मध्यम ही परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे पुण्याच्या अंधशाळेत शास्त्रीय संगीताच्या शिक्षणाबरोबर त्यांनी संगीत शिक्षकाची विनावेतन नोकरी करीत असतानाच संगीत विशारद झाले.

संगीतातील पुढील शिक्षण घेण्याचा ध्यास असल्याने त्यांनी संगीत सम्राट विनायकराव पटवर्धन यांच्या तालमीत 'संगीत अलंकार' ही पदवी मिळविली. त्यांचा विवाह खानापूरच्या लक्ष्मण धांडे यांची पायाने अधू असलेल्या अल्पशिक्षित मुलगी मालती (पूर्वीची वत्सला) हिच्याशी झाला. त्यांनी गुरुजींना साथ देऊन आदर्श गृहिणीसारखा संसार केला.

१९५५ मध्ये अहमदाबादच्या संगीत विद्यालयात त्यांची संगीत अलंकार शिक्षक म्हणून नेमणूक झाली. त्यांचे बोलणे एखाद्या तत्त्ववेत्त्यासारखे होते. मित्र जमविण्याच्या छंदात एम. टी. तळेले व एस. पी. पाटील यांसारखे इन्कम टॅक्स कमिशनरही त्यांचे मित्र झाले. त्यांच्या कार्याची, गायनाची व संगीताची डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. राधाकृष्णन, पं. जवाहरलाल नेहरू, मोरारजी देसाई, मेहेंदीबाबू जंग, श्रीमती शारदाबेन मुखर्जी इ. सारख्या मान्यवरांनीही मुक्तकंठाने स्तुती केली. विनायकराव पटवर्धनांनी त्यांचा जाहीर सत्कार केला होता. अ. भा. गांधर्व महाविद्यालयाचे परीक्षक, गायन-संगीताचे जाहीर कार्यक्रम, नवरात्री, गणेशोत्सवाचे मेळे असे हिरिरीने कार्यक्रम करीत. दि. २५ डिसेंबर १९८० ला प्रख्यात संगीतकार रवींद्र जैन यांनी त्यांचा अहमदाबाद टाऊन हॉलमध्ये लायन्स क्लबतर्फे सत्कार केला. त्यानंतर विविध संगीत क्षेत्रातील संस्थांनी त्यांचा सन्मान करून पुरस्कारांनी गौरविले.

१००) भोळे, चावदस दुला (जन्म : १ मार्च १९०२, मृत्यू : १८ ऑगस्ट १९७३) - मूळ गाव असोदा (ता. जळगाव) येथे एका शेतकरी कुटुंबात जन्म झाला. वडील लहानपणीच वारले. शिक्षण जेमतेम माध्यमिक शाळेपर्यंत झाले. वयाच्या २८ व्या वर्षी म्हणजे १९३० मध्ये महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या आंदोलनात भाग म्हणून शिरोडे येथे मिठाचा सत्याग्रह झाला. त्यात चावदस भाऊंनी सक्रिय सहभाग घेतला. जनजागृती केली. विलायती कपड्यांच्या दुकानावर पिकेटिंग केले. त्यामुळे ब्रिटिशांनी त्यांच्यावर पकड वारंट बजावून अटक केली व धुळ्याच्या मध्यवर्ती कारागृहात त्यांची रवानगी केली. तेथे चावदस दुलांना सानेगुरुजींचा सहवास मिळाला. तेव्हापासून ते सानेगुरुजींचे शिष्य झाले. याच तुरुंगात विनोबा भावेही होते. त्यांची गीताप्रवचने चावदसभाऊ न चुकता ऐकत. विनोबा भावे व सानेगुरुजींच्या दिनक्रम आणि वागण्याचा चावदस दुलांवर विलक्षण प्रभाव पडला. अडीच वर्षे कारावास भोगल्यावर त्यांची सुटका करण्यात आली. पुन्हा १९३५ मध्ये विदेशी कपड्यांची होळी केल्याने त्यांना आणखी एक महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठवण्यात आली. १९३६ चे फैजपूर काँग्रेस अधिवेशन यशस्वी होण्यासाठी चावदस भोळे साने गुरुजी व धनाजी नानांबरोबर एक महिनाभर जिवापाड मेहनत करीत होते. १९४२ च्या गांधीजींच्या 'चलेजाव' चळवळीत

चावदस दुला व त्यांच्याबरोबर गावातील श्यामराव चांगो सावदेकर, राजाराम खुशाल महाजन, राधाबाई सखाराम चौधरी, नामदेव माधव चिरमाडे, श्रीपाद सदू चौधरी, सीमा रामचंद्र ढाके, डालू नारखेडे, पंडित दगडू पाटील, रामदास सोना पाटील, गणपत भावडू पाटील, सीताराम अर्जुन पाटील, यादव गोविंद भोळे, दगडू ओंकार भोळे, नथू कृष्णा भोळे, गोविंदा सोना महाजन, पंडित गणा महाजन इ. लेवा पाटीदार स्वातंत्र्यसैनिकांचे नेतृत्व करून चलेजाव चळवळीचा प्रसार केला. असोदा येथील चावडी जाळल्यामुळे त्यांना पुन्हा अटक करण्यात आली. त्यांना धुळे व नंतर विसापूर तुरुंगात ठेवण्यात आले. दोन्ही ठिकाणी २।। वर्षे तुरुंगवास भोगला. १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपल्यावर त्यांची सुटका करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर काळात सानेगुरुजींचे पट्टशिष्य म्हणून प्रत्येक कार्यक्रमात भाग घेतला. पंढरपूर मंदिरात हरिजन प्रवेशासाठी सानेगुरुजींच्या उपोषणात चावदस भोळेंनीही उपोषण केले.

१०१) भोळे, डॉ. भास्कर लक्ष्मण (जन्म : ३० सप्टेंबर १९४२, मृत्यू : २०११) - मूळ गाव तळवेल (ता. भुसावळ), वरणगावहून मॅट्रिक झाल्यावर औरंगाबादच्या शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालयातून ते एम.ए. झाले. मॅट्रिकनंतरच्या सर्व परीक्षा प्रथम श्रेणीत विशेष गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेत. अध्ययन काळात अनेक शिष्यवृत्त्या मिळाल्या. **शेतकरी कामगार पक्ष** विषयावर प्रबंध लिहून त्यांनी नागपूर विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळविली. सुरुवातीची सहा वर्षे औरंगाबाद येथे प्राध्यापकी केल्यानंतर १९७० ते २००२ या कालावधीत नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात प्राध्यापक, प्रपाठक व विभागप्रमुख ही पदे भूषविलीत. भोळेसर विद्यार्थी जीवनापासूनच फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित असल्याचे त्यांच्या लेखनांमधून व भाषणांमधून जाणवते. काही काळ त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ, गॅझेटिअर संपादक मंडळ, बालभारती, इतिहास व नागरिकशास्त्र समिती या विविध मंडळांवर काम केले. महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या विविध मंडळांवरही त्यांनी सल्लागाराची भूमिका बजावली. त्यांनी **समाजप्रबोधन पत्रिका, विचारशलाका, आजचा सुधारक** या वैचारिक नियतकालिकांचे संपादक/सल्लागार मंडळाचे सदस्य म्हणूनही भूमिका बजावली.

एक परखड विचारवंत म्हणून त्यांची महाराष्ट्रातच नव्हे; तर संपूर्ण भारतभर ख्याती आहे. त्यांची ग्रंथसंपदाही विपुल असून त्यांतील **दुसरे स्वातंत्र्य** (१९७७), **राजकीय भारत** (१९७८), **यशवंतराव चव्हाण:राजकारण आणि साहित्य** (१९८६), **भारतीय संविधान:सिद्धांत आणि व्यवहार** (१९८७), **महात्मा जोतिराव फुले : वारसा आणि वसा,** दुसरी आवृत्ती, (२००१), **भारताचे स्वातंत्र्य:पन्नास वर्षांचा मागोवा** (१९९८), **डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा** (१९९८), **विसावे शतक आणि भारतातील समताविचार** (१९९९), **विठ्ठल रामजी शिंदे**

यांचे बहुजनवादी राजकारण (२००१), **साहित्यप्रत्यय** (२००१) हे महत्त्वाचे ग्रंथ सांगता येतील. वरील ग्रंथलेखनाशिवाय भोळेसरांनी राज्यशास्त्रविषयक अनेक क्रमिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यात **आधुनिक भारतातील राजकीय विचार** (दुसरी आवृत्ती, २००३) आणि **भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण** (२००३) यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. भोळेसरांचे **महादेव गोविंद रानडे** (१९८८), **इस्लामसंबंधी आधुनिक दृष्टिकोन** (१९९१), **डॉ. बाबासाहेब आंबेडकर:अनुभव आणि आठवणी** (१९९८) हे भाषांतरित ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यांशिवाय **भोळेसरांनी संशोधनाची क्षितिजे: डॉ. वि. मि. कोलते अमृतमहोत्सव ग्रंथ** (१९८५), **जमातवाद, वसंत पळसीकर यांचे निबंध** (१९९७) आणि **बदलता महाराष्ट्र** (एन. डी. पाटील अमृतमहोत्सव ग्रंथ, २००३) हे प्रशंसीत ग्रंथही संपादित केले आहेत. उपरोक्त लेखन/संपादनाशिवाय भोळेसरांनी महाराष्ट्रातील सर्व दर्जेदार नियत-कालिकांमधून विविध विषयांवर परखड व विपुल लेखन केले आहे. महाराष्ट्रातील आघाडीच्या वृत्तपत्रांमधून त्यांनी बरेच स्तंभलेखन केले आहे. भोळेसरांचे भाषण म्हणजे श्रोत्यांना पर्वणीच. त्यांनी सर्व प्रमुख व्यासपीठांवरून भाषणे देऊन आपले परखड विचार मांडले आहेत. त्यांचे समतावादी परंतु रामशास्त्री बाण्याचे विचार श्रोत्यांच्या व वाचकांच्या मनात घर करून राहतात.

महाराष्ट्रातील निवडक मोठ्या विद्वजनांत गणना होणाऱ्या भोळेसरांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून त्यातील **जोतिराव फुले वारसा आणि वसा** या ग्रंथास प्राप्त झालेला "महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार", १९९१-९२; **डॉ. बाबासाहेब आंबेडकर:अनुभव आणि आठवणी** या ग्रंथाला प्राप्त झालेला "महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट भाषांतर पुरस्कार", १९९८-९९; याच ग्रंथास प्राप्त झालेला "साहित्य अकादमी उत्कृष्ट भाषांतर पुरस्कार", २००१; **डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा** या ग्रंथाला प्राप्त झालेला "महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सत्यशोधक विचार पुरस्कार" व "जिजामाता सावित्री ट्रस्टचा फुले-शाहू-आंबेडकर पुरस्कार", २०००; त्यांच्या परखड विचारधारेबाबत नाशिकच्या युगांतर प्रतिष्ठानचा "युगांतर पुरस्कार", २००१; **साहित्य प्रत्यय** ग्रंथाला प्राप्त झालेला महाराष्ट्र फाउंडेशन केशव गोरे स्मारक ट्रस्टचा "महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट समीक्षा ग्रंथ पुरस्कार", २००३ आणि "महाराष्ट्र फाउंडेशन ग्रंथ पुरस्कार", २००३ या पुरस्कारांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांना मराठवाडा, नागपूर व कोल्हापूर विद्यापीठांनी डी. लिट. पदवी देऊन गौरविले आहे.

वाचन, लेखन, चिंतन, संपादन, समीक्षण, दौरे, भाषणे आदी धबडग्यातूनही वेळ काढून भोळेसर सामाजिक कार्यातही तेवढ्याच हिरिरीने भाग घेत हे उल्लेखनीय आहे. समाजाविषयी त्यांना अतीव आस्था होती. असे डॉ. भा. ल. भोळे हे एकूणच संपूर्ण महाराष्ट्राला भूषण ठरणारे व्यक्तिमत्त्व होते.

१०२) भोळे, डॉ. रवींद्र दिनकर (जन्म : ४ मे १९६२) - **मूळ गाव** सावरगाव जहागीर (ता. मोताळा), जि. बुलडाणा असून हल्ली कार्यक्षेत्र पुणे जिल्ह्यातील उरळीकांचन येथे आहे. लहानपणापासून हुशार व भावनाप्रधान असलेल्या डॉ. रवींद्र भोळेंना गोरगरीब व पीडितांचे दु:ख व कष्ट पाहून खूप यातना होत असत. पीडितांचे दु:ख कमी करायचे तर त्यासाठी डॉक्टर होणे जरूर असल्याचे ठरवून ते १९८६ मध्ये बी.एस.एल., बी.एच.एम.एस., एनडी. झाले. पुढील शिक्षणात अधिक काळ वाया न घालविता पदवी नंतर लगेच पीडित व रुग्ण तसेच समाजसेवेत वाहून घेतले. याच सुमारास हुंडाविरोधी चळवळीतही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. १९९८ पर्यंत त्यांनी भोरगाव लेवा पंचायतीमध्येही कार्य केले.

डॉ. भोळे व्यवसायाने वैद्य असले तरी हाडाने कट्टर समाजसेवक असल्याने त्यांनी जीवनात पैशापेक्षा सेवेस अधिक महत्त्व दिले, रक्तदान, एड्सग्रस्तांना मार्गदर्शन, गरिबांना मोफत औषधोपचार, शांतिसेनेची उभारणी असे बहुमोल कार्य डॉक्टर भोळे करीत आहेत. गुजरातमधून येऊन उरळीकांचनसारख्या आदिवासी परिसरातील खेड्यात येणारे महान गांधीवादी पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई यांचे डॉ. रवींद्र भोळे खास अनुयायी. गांधीवादी तत्त्व जोपासून तळागाळातल्या जनतेची निःस्वार्थपणे सेवा करणारे असून त्यांनी सामाजिक कार्याबरोबर धार्मिक, वैद्यकीय, निराधार सेवा, भूकंपग्रस्तांना सेवा, अंधांना सेवा, संत सेवा, वृद्ध सेवा, अशा बहुव्यापी कार्यात स्वत:ला झोकून देऊन गांधीवादी तत्त्वे अंगीकारून व आचरणात आणून गांधीवादी रचनात्मक कार्यात प्रत्यक्ष भाग घेऊन आदिवासी पददलितांची सेवा करून स्वत:ची वेगळी अशी प्रतिमा तयार केली व पंचक्रोशीत ते लोकांचे लाडके बनले. मणीभाई येथून जाताना अनुयायी डॉ. रवींद्र भोळे यांच्या खांद्यावर ते करीत असलेल्या समाजसेवेचा वारसा व धुरा सोपवून गेले. जेवढ्या विश्वासाने हा वारसा मणीभाईंनी डॉ. रवींद्र भोळेंवर सोपविला तो किती सार्थ होता हे भोळेंनी अल्पावधीतच दाखवून दिले. वयाच्या तिशीतच वर्तमानपत्रांतून त्यांच्या कार्यास प्रसिद्धी मिळाली. या संस्थेत कार्य सुरू करताना सुरुवातीचा होणारा विरोध न डगमगता सहन करून खंबीरपणे आपले कार्य सुरू ठेवले. पुढे त्यांना दादासाहेब जाधवराव व प्रा. के. डी. कांचन यांची खंबीर साथ लाभली. तसेच डॉ. पतंगराव कदम यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई राष्ट्रसेवा प्रतिष्ठानचे डॉ. भोळे अध्यक्ष आहेत. निरनिराळ्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरचे पुरस्कार मणीभाईंच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ. रवींद्र भोळे हे दरवर्षी २७ एप्रिल रोजी समारंभपूर्वक वितरीत करतात. याशिवाय महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी या डॉ. मणीभाई देसाई प्रतिष्ठान संचालित संस्थेचे ते संचालक आहेत.

पुरस्कार वितरणासाठी आयोजित केलेल्या निरनिराळ्या कार्यक्रमांना अटलबिहारी

वाजपेयी, मधुकरकराव चौधरी, राहुल बजाजसारख्या असंख्य मान्यवरांच्या शुभेच्छा प्राप्त झाल्या आहेत.

डॉ. भोळे यांनी बोगस डॉक्टर शोध मोहिमेत भाग घेतला. लग्ने जुळविणे, मोडलेली लग्ने प्रतिष्ठाप्राप्त समझोत्यासह पुन्हा जुळविणे, रुग्णबिल समस्या सोडविणे, पी.एम.टी. समस्या निराकरण व सेवा, परिसरातील व पंचक्रोशीतील पाणीपुरवठा समस्या सोडविणे, अन्यायाविरुद्ध झगडून न्याय्य बाजूकडे खंबीरपणे उभे राहणे इ. कामांमुळे डॉ. रवींद्र भोळे उरळीकांचन पंचक्रोशीतच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रात परिचित झाले आहेत. झगडे, तंटेबखेडे, मारपीट, आतंकवाद, दहशतवाद, हिंसाचार, भ्रष्टाचार, बलात्कार या विरुद्ध ते नेहमी आवाज उठवितात व आपद्ग्रस्तांना न्याय मिळविण्यासाठी सर्वते साहाय्य करतात. डॉ. भोळे हे सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्ष, परधर्मआदर, विश्वबंधुभाव व एकता जोपासत आहेत. त्याशिवाय अनेक मुकबधिर संस्था, शैक्षणिक संस्था, शाळा, व्यसनमुक्ती संस्था इ. मधून ते कार्य करीत असतात.

निरनिराळ्या क्षेत्रातील त्यांच्या सेवेसाठी त्यांना अनेक पुरस्कार व पारितोषिके मिळाली आहेत. नव्या पिढीतील तडफदार समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे जीवनपट दर्शविणारा चरित्रग्रंथ सुप्रसिद्ध आदिवासी लेखक श्री. भास्कर ज्ञानदेव भोसले यांनी **वाळवंटातील समाजसेवी सरोवर-डॉ. रवींद्र भोळे** ह्या नावाने प्रसिद्ध केला आहे. या भागातील आदिवासी लोक त्यांना देवतुल्य मानतात. भारत सरकारतर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या पद्म पुरस्कारांतील पद्मश्री पुरस्कारासाठी नुकतेच त्यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. असे हे लेवा समाजरत्न युवा लेवा पिढीस एक आदर्श ठरले आहे.

१०३) महाजन, गणपत भावडू (जन्म : १९२४) - मूळ गाव पिळोदे बु., (ता. यावल). शिक्षण बी.ए. (ऑनर्स), एल.एल.बी. १९४२ मधील सप्टेंबर महिन्यात मधू लिमयेंच्या नेतृत्वाखाली वाघोड येथे पंजाब मेल घातपाताचा प्रयत्न केला. उज्जैनी येथील जंगल सत्याग्रहात भाग घेतला. त्यानंतर भुसावळ-जळगावच्या दरम्यान असलेल्या पुलाला सुरुंग लावण्याच्या प्रयत्नात अटक झाली व निरनिराळ्या कलमांखाली एकूण १३ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. ती एकत्रित अशी सहा वर्षे भोगायची होती. ही शिक्षा त्यांनी धुळे, येरवडा व नाशिक मध्यवर्ती तुरुंगांमध्ये भोगली. शासनाकडून सन्मानपत्र व पेन्शन प्राप्त झाले आहे. त्यांनी वकिली पेशा पत्करला तेव्हा गरिबांसाठी अत्यल्प शुल्क व मोफतही केसेस चालविल्या.

१०४) महाजन, जीवराम तुकाराम ऊर्फ जे. टी. सर (जन्म : १३ ऑगस्ट १९२४, मृत्यू : १० नोव्हेंबर २००५)- मूळ गाव न्हावी. यांना दादासाहेब असेही म्हणत. न्यू इंग्लिश स्कूल, भालोद येथे त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. १९४६ मध्ये मुंबई विद्यापीठातून बी. ए. व १९४९ मध्ये पुणे विद्यापीठातून एम. ए. झाले. १९४६ ते १९५६ पर्यंत त्यांनी फैजपूरच्या म्युनिसिपल हायस्कूलमध्ये अध्यापनाचे कार्य केले.

न्हावी (ता. यावल) सारख्या खेडेगावातून त्यांनी शिक्षण व सहकारी चळवळ यशस्वीपणे रुजविली व प्रसार केला. राजकारणाची सुरुवात न्हावी गावाच्या सरपंचपदापासून केली. त्यांच्या लोकप्रियतेमुळे १९६२ ते १९६७ पर्यंत यावल तालुका पंचायत समितीचे सभापती व १९६७ ते १९७७ पर्यंत ते विधानसभा सदस्य असताना आपल्या कार्याची चुणूक दाखविली. पुढील काळात त्यांनी जळगाव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ व फैजपूरला मधुकर सहकारी साखर कारखान्यांची स्थापना केली. उत्तम प्रशासन व कारखान्याच्या कार्यक्षमतेचा पुरेपूर वापर यासाठी त्यांना सुवर्णपदकही मिळाले. १९७९-८० मध्ये यावल येथे त्यांनी सहकारी सूत गिरणी काढली. १९८१ मध्ये ते पुन्हा विधानसभेवर निवडून आले. १९९२ पर्यंत ते सतत विधानसभेवर निवडून आले. १९८१-८२ मध्ये ते महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री होते. इ. स. १९८३-८४ मध्ये त्यांनी आय.टी. आय; पॉलिटेक्निक व इंजिनीअरींग कॉलेजची स्थापना केली. या सर्व प्रयत्नांमुळे रावेर व यावल तालुक्यांत रोजगारनिर्मिती झाली. १९८५ पासून त्यांनी काही काळ महाराष्ट्र राज्याचे सामान्य प्रशासन, उद्योग, दारूबंदी शुल्क, विधानकार्य व गृहखात्याचे राज्यमंत्री म्हणून काम केले. मा. शंकरराव चव्हाण यांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ख्याती होती. जळगाव येथे त्यांनी एक माध्यमिक विद्यालयही स्थापन केले. यावल येथील मोठे व्यापारी संकुल त्यांनीच उभारले आहे. १९८१ पर्यंत ते मधुकरराव चौधरींचे उजवे हात म्हणून ओळखले जात होते. सहकारक्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे त्यांना सहकारमहर्षी म्हणूनही गौरविण्यात आले होते.

१०५) महाजन, तोताराम बंधू (जन्म : २४ सप्टेंबर १८८४)- मूळगाव फैजपूर, ता. यावल असून जमीनदार शेतकरी घराण्यात जन्म झाला. शिक्षण पुण्यात झाले. शिक्षणानंतर फैजपूर येथे मोठ्या धडाडीने कपाशी, सराफी, शेती, कापड व्यापार वगैरे व्यवसाय सुरू केले. वडील निवर्तल्यावर महाजन कुटुंब यांच्या प्रयत्नांनी खूपच पुढे आले. यांनी स्वतःच्या मालकीची जिनिंग फॅक्टरी १५ वर्षे व्यवस्थित चालविली. चाळीसगावच्या लक्ष्मीनारायण मिलचे ते काही वर्षे संचालक होते. फैजपूर नगरपालिकेचे ते सतत २२ वर्षे व्हाईस प्रेसिडेंट व ४ वर्षे प्रेसिडेंट होते. ते प्रेसिडेंट असतानाच फैजपूरचे काँग्रेस अधिवेशन संपन्न झाले. ते पूर्व खानदेश व्हिलेज अपलिफ्टचे पेट्रन व यावल तालुका अॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट असोसिएशनचे आजीव सभासद होते. फैजपूरचे सात आठ वर्षे ते गावमुन्सफही होते. गुजरातमधील अखिल भारतीय सत्पंथी कॉन्फरन्सचे पाच वर्षे उपाध्यक्ष होते व पूर्व खानदेश सत्पंथी महामंडळाचे १२ वर्षे अध्यक्ष होते. बिहार भूकंप, महारोगी हॉस्पिटल व इतर शैक्षणिक आणि धार्मिक संस्थांना त्यांनी सढळ हाताने देणग्या दिल्या आहेत. तसेच पूर्व खानदेशातील तापी नदीच्या उत्तरेकडील हायस्कूलमधील मुलांकरिता व्हॉलिबॉल टूर्नामेंटसाठी त्यांच्या नावाने एक चांदीचे शिल्ड बक्षीस दिले आहे. तोताराम बंधू महाजन यांना कायदेकानूनबाबत सर्वांगीण माहिती

असल्याने त्याचा गोरगरिबांना फार उपयोग झाला.

१०६) महाजन, नाटू देवराम (जन्म : २३ जून १९०३)- मूळ गाव फैजपूर (ता. यावल) असून मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण जळगाव येथे झाले. त्यांना गुजराती भाषाही अवगत होती. त्यांना वाङ्‌मय व गायनाचीही आवड होती. एकत्र कुटुंबपद्धतीचा पुरस्कार करणारे यांचे कुटुंब वाखाणण्यासारखे होते. त्यांनी कपाशीचा व्यापार व शेतीकडे लक्ष दिले. 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेत त्यांनी या भागात सर्वात जास्त लेव्ही भरल्याने सरकारकडून त्यांना बक्षिसे मिळाली आहेत. याशिवाय शेतकी खात्याकडून 'उत्तम शेतकरी' म्हणूनही त्यांचा गौरव झाला. सन १९४५-४६ पासून फैजपूर नगरपालिकेत चार वर्षेपर्यंत त्यांनी म्युनिसिपल हायस्कूलचे चेअरमन व म्युनिसिपालिटीचे प्रेसिडेंट म्हणूनही कार्य केले. फैजपूरच्या किसान ऑईल मिलचे ते डायरेक्टर होते. ते शांतताप्रिय, नि:स्वार्थी, ऐक्यासाठी धडपडणारे निरपेक्ष समाजसेवक होते. अंगावर येणाऱ्या जबाबदाऱ्या आनंदाने स्वीकारून यशस्वी करण्यात त्यांची हातोटी होती. १९२६ मध्ये त्यांनी **सत्पंथ विजय** हा ग्रंथ प्रकाशित केला.

१०७) महाजन, भास्कर गंगाधर (जन्म : १९ मे १९३७) - मूळ गाव भालोद असून हल्ली वास्तव्य खिरोदा येथे आहे. कै. गंगाधर महाजन (उप जिल्हाधिकारी) यांच्या सुशिक्षित व सुसंस्कृत कुटुंबात भास्कर महाजनांचा जन्म झाला. त्यांना चार भाऊ असून ते सर्व इंजिनीअर होते. भास्कर महाजनांचा कल चित्रकलेकडे असल्याने १९६० मध्ये डी.टी.सी. झाले. एक वर्ष उमराणीला नोकरी केल्यानंतर १९६१ मध्ये खिरोद्याला चित्रकला शिक्षक म्हणून रुजू झाले. सेवाकाळात ते जी. डी. आर्ट व ए. एम. झाले आणि १९९५ मध्ये सेवानिवृत्त झाले.

सेवाकाळात ते खेळ, नाटके, नृत्ये बसविणे, त्यांचे आयोजन, दिग्दर्शन व सादरीकरण करीत. स्टेज उभारणे, मेकअप करणे, प्रॉम्पटिंग करणे ह्यातही भाग घेत.

१९६८ मध्ये **सौंदर्यकृती** हे पुस्तक लिहिले. वर्तमानपत्रे व नियतकालिकांमधूनही त्यांचे लेख अजूनही येत असतात. ते जरी चित्रकला शिक्षक होते तरी मराठी, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र हे विषयही शिकवित. उत्कृष्ट सेवेमुळे त्यांना शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला. १९८१ मध्ये त्यांनी **मला जगू द्या, मला क्षमा कर** आणि **भंगलेले स्वप्न** या तीन कादंबऱ्या प्रकाशित केल्या. सेवानिवृतीनंतरही त्यांनी चार कादंबऱ्या व १६ बालवाङ्‌मयीन पुस्तके एकाच वेळी प्रकाशित करून हॅटट्रिक केली.

आजपर्यंत त्यांची ७० हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी बालवाङ्‌मय, कथा, चरित्रे, अद्‌भुत कथा, ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यांमध्ये रहस्य, रोमांच, प्रेम, प्रणय, भय इ. अनाकलनीय विषय हाताळले. ऐतिहासिक पुस्तकांमध्ये **झाशीची राणी, मेवाडचा सिंह महाराणा प्रताप, मेवाडचा सिंह महाराणा सांगा**

ह्या कादंबऱ्या, पौराणिक पुस्तकांमध्ये **युद्ध १८ दिवसांचे, गंगापुत्र भीष्म, केवळ भीमवधासाठी, धृतराष्ट्र, महासती गांधारी** आणि **दुर्योधन** या प्रकाशित झाल्या आहेत. याशिवाय त्यांची सामाजिक, रहस्य, दलित, मंत्रतंत्र, बालवाङ्मय व चरित्रवाद इत्यादी अनेक पुस्तके व नियतकालिकांमध्ये लेख प्रकाशित झाले आहेत.

त्यांना आजपर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून त्यात प्रामुख्याने साहित्य अकादमीचा म. जोतिबा फुले फेलोशिप २००३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप २००४, जळगाव पृथ्वी सेवा संस्थेचा साहित्य रत्न पुरस्कार २००४, राधानगरी संस्कृती मंचचा उत्कृष्ट साहित्यनिर्मिती पुरस्कार २००४, औरंगाबाद सद्भावना मित्र मंडळाचा लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे पुरस्कार २००४, मुंबई मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीचा साहित्यरत्न पुरस्कार २००६, जळगाव राष्ट्रचेतना गौरव मूर्ती पुरस्कार २००६, मुंबई अखिल महाराष्ट्र पत्रकार व पत्रलेखक संघाचा राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप २००६, धाराशीव लोक जनशक्ती विश्वकल्याण लोकसेवा अकादमीचा साहित्यरत्न पुरस्कार २००६, मुंबई आत्मोन्नती व विश्वशांती साधक संस्थेचा श्रीसंत एकनाथ महाराज स्मृती गौरव पुरस्कार २००६, चेंबूर इन्फोटेक फिचर्स प्राईड ऑफ नेशन पुरस्कार २००७, पुण्याच्या पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई प्रतिष्ठानचा राष्ट्रसेवा पुरस्कार २०११ यांचा समावेश करता येईल.

जळगाव आकाशवाणीवरील नभोनाट्यातही त्यांच्या भूमिका असून आकाशवाणीवर एक बालनाटकही सादर केले आहे.

१०८) महाजन, मिलिंद भगवानदास (जन्म : ३ एप्रिल, १९७०) - मूळ गाव नरवेल (ता. मलकापूर, जि. बुलडाणा), असून त्यांचे वडील डॉ. भगवानदास सुपडा महाजन परभणीस्थित आहेत. ते कृषी विद्यापीठात होते. डॉ. मिलिंद महाजन यांनी पदवी परीक्षेनंतर बनारस हिंदू विद्यापीठातून आय.आय.टी.च्या इलेक्ट्रॉनिक्स विषयात पदव्युतर मायक्रोवेव्ह इंजिनीअरिंगमध्ये विशेष प्रावीण्य मिळविले. ते भारताच्या अवकाश संशोधन (इस्रो) संस्थेत १९९३ पासून इनसॅट उपग्रह मालिकेत व जी सॅट कार्यक्रमांमध्ये प्रोजेक्ट डायरेक्टर पदावर कार्यरत आहेत. येथेच त्यांनी पीएच. डी. ही मिळविली आहे. या उपग्रह कार्यक्रमांतर्गत तांत्रिक विकास कार्यक्रमात अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. उपग्रहात वापरल्या जाणाऱ्या अतिशय गुंतागुंतीच्या सर्वच उपग्रहांमध्ये बॅक मल्टीपल बीम अँटेना या अतिशय गुंतागुंतीच्या स्वदेशी रचना, काही उपग्रहांकरिता ड्यूएलडिग्रेड रिप्लेक्टर अँटेना तसेच केयू बँड मल्टीपल बीम अँटेना या स्वदेशी बनावटीच्या रचना आहेत. अत्युच्च्य दर्जाच्या अँटेना अत्यंत कडक नियंत्रणाच्या कसोटीवर उतरलेल्या आहेत. डॉ. महाजन यांची अत्यंत श्रेष्ठ दर्जाची व्यावसायिक गुणवत्ता आहे व तंत्रज्ञानाच्या स्वदेशी निर्मिती प्रक्रियेवर त्यांचा गाढा विश्वास आहे. त्यांनी आतापर्यंत बरेच निबंध प्रकाशित केले आहेत. स्वदेशीनिर्मित जास्त भारक्षमतेच्या अँटेना निर्मितीत गुणवत्तापूर्ण

योगदान दिल्याबद्दल त्यांना ''स्पेस गोल्ड मेडल, २००४'' पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहे. बहुधा असा पुरस्कार मिळविणारे ते पहिलेच महाराष्ट्रीयन आहेत.

१०९) महाजन, वाय. एस. तथा भाईसाहेब (जन्म : १९११, मृत्यू २७ ऑगस्ट २००१ - मूळ गाव हिंगोणे (ता. यावल) असून तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. पुढे जळगावच्या न्यू इंग्लिश स्कूल (आताचे आर. आर. विद्यालय) मधून ते मॅट्रिकला जिल्ह्यातून सर्वप्रथम आले. उच्च शिक्षणासाठी ते लंडन येथे गेले. १९३५ मध्ये ते बी.एस्सी. (अर्थशास्त्र) व १९३६ मध्ये बॅरिस्टर (बार ॲट लॉ) या पदव्या संपादन करून भारतात परत आले. इंग्लंडमध्येच पं जवाहरलाल नेहरू यांच्याशी परिचय झाल्याने साहजिकच ते त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन काँग्रेसकडे ओढले गेले.

भारतात आल्यावर वकिली पेशा न पत्करता ते शिक्षण क्षेत्राच्या पवित्र कार्याकडे वळले. १९३६ ते १९४९ पर्यंत त्यांनी कर्नाटक व गुजरातमधील निरनिराळ्या महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकाचे काम केले. जळगावला येण्यापूर्वी ते हुबळी येथील कॉमर्स कॉलेजमध्ये प्राचार्य होते. अर्थशास्त्राचे प्राध्यापक असल्याने अर्थतज्ज्ञ म्हणून प्रसिद्धीस आले. बरीच वर्षे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविले. आपल्या विद्याव्यासंगाने त्यांनी अनेकांना आपलेसे केले. ते महाराष्ट्र-गोवा कौन्सिलचे पहिले सदस्य होते. काकासाहेब राणेंच्या निधनानंतर त्यांना काँग्रेसतर्फे खासदार म्हणून निवडून आणले गेले. राजकारणात उच्च पदापर्यंत पोहोचूनही साधी राहणी व उच्च विचारसरणी हा मंत्र त्यांनी कायम ठेवला. पं. नेहरू, श्रीमती इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्याशी त्यांचा जवळचा संबंध होता. १९७०-७१, १९७१-७७, १९८०-८४ आणि १९८४-८९ असे चार वेळा ते खासदार म्हणून निवडून आले. खरे तर त्यांना यशवंतराव चव्हाणांनी राजकारणात आणले. त्यांनी अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्था उभ्या केल्या. आपल्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी संसदेत वेगळी छाप पाडली. आपल्या खासदारकीच्या काळात संसदेच्या अर्थसंकल्प समितीचे सदस्य, खासदारांच्या लोकलेखा समितीचे सदस्य, यू.पी.एस.सी. चे सदस्य, बोफोर्स तोफा खरेदी प्रकरण चौकशी समितीचे सदस्य आदी समित्यांवर त्यांनी काम केले. खासदार होण्याआधी पुणे विद्यापीठाचे तीन वेळा हंगामी कुलगुरू म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

आपल्या खासदारकीच्या कालावधीत त्यांनी रशिया, अफगाणिस्तान, झेकोस्लोव्हाकिया, अमेरिका आदी देशांचे अभ्यास दौरे केलेत. आपली संसदीय कारकीर्द त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण गाजवली. शिक्षणतज्ज्ञ व अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांचे कार्य मोलाचे असून ते संस्मरणीय राहील.

११०) राणे, गोविंद यशवंत तथा गो. य. राणे (जन्म : १ जानेवारी १९१३) - मूळ गाव हिंगोणे (ता. यावल). गरीब कुटुंबात जन्म झाला. सातवी व्ह.

फायनल झाल्यावर अमरावतीस छापखान्यात अक्षरजुळणी ज्ञान घेतले. नंतर **पुण्यास डेली दिनबंधू** मध्ये घरगड्यापासून मॅनेजरपर्यंत काही काळ नोकरी केली. **पुण्यात दिनबंधू** मध्ये मॅनेजर असताना गो. य. राणे प्रकाशन ही संस्था स्थापून टी. पी. अत्तरदे यांचे बाल पाठ्यपुस्तक प्रकाशित केले. १९४५ मध्ये पुण्यास स्वत:च्या व्यवसायाबरोबर मुंबई महापौर नगिनदास मास्तरांच्या चिरंजीवांच्या कंपनीत रोज पुण्याहून मुंबईस येऊन खते (bonds), न्यूज प्रिंटर्स आणि खरेदी-विक्रीच्या व्यवसायास सुरुवात केली. नंतर कसबा (पुणे) येथे कायमस्वरूपी प्रकाशन व्यवसाय सुरू केला व प्राथमिक शिक्षण पुस्तके व आदर्श चित्रकला या सरकारी पाठ्यपुस्तक प्रकाशनास सुरुवात केली. पाठ्यपुस्तक प्रकाशनास प्रदीर्घ कालावधी मिळाल्याने गो. य. राणे प्रकाशनाची चांगलीच उन्नती झाली. टी. पी. अत्तरदे हे यांच्या व्यवसायात भागीदार होते. पुढे भागीदारी तुटली.

१९६१ मध्ये कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर), गो. य. राणे व अमर शिरवाडकरांनी सहकार प्रकाशन स्थापून १२ ते १५ वयोगटाच्या मुलांसाठी सुरू केलेले पहिले मराठी मासिक सुरू केले. त्यास पारितोषिके प्राप्त झालीत. बीजगणिताचेही प्रकाशन केले. त्यांच्या प्रमुख प्रकाशनांत **गडकरी वाङ्मय, शिवाजी घराण्याच्या अद्ययावत इतिहासाची माहिती,** स. मा. गर्गेकृत **कर्वे रियासत, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, खंदारकर महाराज ग्रंथ, देवडीकर महाराज व तुकाराम महाराज, सटीप ज्ञानेश्वरी** (रा. गो. पाटील गाथा), इ. असे एक ना अनेक प्रकाशने श्री. गो. य. राणे यांनी केलीत. धार्मिक ग्रंथ प्रकाशनाबाबतचा त्यांचा सहभाग सर्वश्रुत आहे. **सुगम मराठी शुद्धलेखन, शुद्धलेखन परिचय, शुद्धलेखन नियमावली** अल्प किमतीत उपलब्ध करून दिलेत. नंतर **मराठी शुद्धलेखन प्रदीप** प्रकाशित केले. पुणे विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार एफ.वाय. ते टी.वाय. पर्यंतची पुस्तके प्रकाशित केलीत. पुढे मात्र गो. य. राणे प्रकाशन लयास गेले.

गो. य. राणे हे हिंगोण्याच्या प्रभात विद्यालयाचे संस्थापक होते. तसेच ते मराठी क्रमिक पाठ्यपुस्तक मंडळाचे व खाजगी प्रकाशक संघटनेचे अखेरपर्यंत सचिव होते. ते पुणे मुद्रक संस्था संघटनेचे १० वर्षे अध्यक्ष होते. तर महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर या संस्थेचे कायम प्रकाशक सदस्य होते.

सामाजिक-धार्मिक कार्यात ते सढळ हस्ते मदत करीत. त्यांचे ठायी जातपात वगैरे कसलाही भेदभाव नव्हता. नि:स्वार्थीपणा, प्रामाणिकपणा, परोपकारी वृत्ती, सुस्वभाव आदी गुणांमुळे सर्वांना आदरास प्राप्त होते. जुन्या काळातील बहुजनसमाजातील आदर्शवादी प्रकाशक म्हणून त्यांची ख्याती होती. महाराष्ट्रातील अव्वल दर्जाच्या प्रकाशकांमध्ये त्यांचा दुसरा क्रमांक लागत होता.

१११) राणे, डॉ. श. रा. (जन्म : ११-११-१९३३)- मूळ भालोदचे. फैजपूरच्या धनाजी नाना महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यांची **वा. गो. आपटे**

यांची आनंदयात्रा (चरित्र), **बेगड** (बालकादंबरी), **पाचमुखी पांडू** (बाल-कादंबरी), **कोरांटीची फुलं** (बालकादंबरी), **आंब्याचं झाड** (बालकथा), **भुताची ज्योत** (बालकथा), **जरीची टोपी** (बालकथा), **डोंगरावरची माणसं** (ललितलेख), **चुंबळ** (ललितलेख), **रुची-अभिरुची** (समीक्षात्मक लेखसंग्रह), **न संपणारा शोध** (समीक्षात्मक लेखसंग्रह), **मृगजळ** (नाटक), **घर आणि दोन एकांकिका** (एकांकिका), **रथ जगन्नाथाचा** (चरित्र), **माझी कविता** (काव्यसंग्रह), **कंदील** (कादंबरी) हे साहित्य प्रकाशित झाले आहे. डॉ. श. रा. राणे यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त **मराठी साहित्य संशोधन:स्वरूप आणि दिशा** ग्रंथ प्रकाशित झाला आहे. अजूनही त्यांचे लेखन सुरू आहे. त्यांनी डाकू सुपड्यावरही लेखन केले आहे.

११२) राणे, मधुसूदन ओंकार तथा **दादासाहेब** (जन्म : १० मार्च १९३८, मृत्यू : २८ सप्टें. २०१५)- जळगाव येथे एका शेतकरी कुटुंबात जन्म झाला. त्यांचे शालेय शिक्षण जळगाव तसेच सुरत येथे झाले. गांधी इंजिनीअरिंग कॉलेज, सुरत; येथून डिप्लोमा इन इलेक्ट्रील्स इंजिनीअरिंगची पदविका सुवर्णपदकासह संपादन करून त्यांनी जळगाव येथील अमलगमेटेड इलेक्ट्रिसिटी कंपनीमध्ये नोकरीस सुरुवात केली व प्रत्यक्ष अनुभव संपादन करून नंतर ॲटोमॅटिक इलेक्ट्रिकल कंपनी, मुंबई येथे नऊ वर्षे नोकरी केली. नोकरी करीत असतानाच सन १९६४ मध्ये सोल्डरिंग गन नावाचे पहिले प्रॉडक्ट विकसित केले. त्यानंतर श्री. यू.के. पटवर्धन यांच्या प्रयोग इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. येथे डेव्हलपमेंट इंजिनीअर म्हणून नोकरी करीत असताना व्होल्टेज स्टॅबिलायझर व रोलर हे प्रॉडक्ट डेव्हलप केले नंतर श्री. पटवर्धन यांनी श्री. राणे यांना ५,००० रुपये दिले म्हणून सन १९६६ मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन मुलुंड, मुंबई येथे एक छोटासा गाळा खरेदी केला व तेथे प्रयोग इलेक्ट्रिकल्सचे कॉईल बनविण्याचे काम सुरू केले. इ.स. १९७० मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री बाळासाहेब मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते छवी इलेक्ट्रिकल्सची स्थापना केली. छवी इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. ही देशातील डीसी सिस्टीमच्या निर्मित क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून ते बॅटरी चार्जर, एसीडीबी, डीसीडीव्ही, डी.सी. पॉवर सिस्टीम, एसएमपीएस बॅटरी चार्जर, एसी टू डी सी कनव्हर्टर, रेक्टीफायर्स तसेच व्होल्टेज स्टॅबिलायझर यांचे उत्पादन करते. छवी इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. ही आय.एस.ओ. ९००१ : २००० गुणवत्ता प्राप्त कंपनी असून देशाच्या एकूण डी.सी. सिस्टीमच्या एकूण गरजेपैकी ३०% गरज छवी इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. पूर्ण करते. यावरून त्यांनी आपल्या क्षेत्रात प्रगतीचे किती उंच शिखर गाठले आहे, याची कल्पना येते. श्री. मधुसूदन राणे यांच्या संयमी व कुशल, मेहनती आणि अत्यंत मनमिळाऊ मार्गदर्शनाखाली छवी इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. आपली सुवर्ण महोत्सवी यशस्वी वाटचाल करीत आहे.

श्री. राणे यांना त्यांनी आतापर्यंत विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबाबत उद्योगश्री, ऑर्डर ऑफ मेरीट, समाजश्री, जेम ऑफ इंडिया, विजयश्री, आर्चे ऑफ

इंडिया गोल्ड मेडल व एक्सलन्स अवॉर्ड, महाराष्ट्र शासनाचा जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार, अवॉर्ड ऑफ एक्सलन्स, ग्लोबल आर्च ऑफ एक्सलन्स, ''धरतीरत्न पुरस्कार'' व ''गोल्डपदक'' असे नानाविध पुरस्कार मिळालेले आहेत.

११३) राणे, प्राचार्य डॉ. सुभाष सदाशिव (जन्म : ७ एप्रिल, १९५८) - मूळ गाव पिंपरूड (ता. यावल), असून प्राथमिक शिक्षण पिंपरूड येथे व माध्यमिक शिक्षण फैजपूर येथे झाले. १९७९ मध्ये पुणे विद्यापीठातून सायकॉलॉजीत बीए. १९८१ मध्ये पुणे विद्यापीठातून एम. ए. सायकॉलॉजी झाले. पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांमध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. एम. फिल. १९८९ आणि पीएच. डी. १९९४ मध्ये गुजरातमधील सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर येथून झाले.

प्राचार्य डॉ. सुभाष राणे आधीपासून मेहनती असून गरिबीमुळे शिकत असताना त्यांनी हॉटेलमधून काम केले. विद्यार्थी दशेत शेतात ऊस तोडणे, बारे धरणे, कंद खोदणे, उसाची खोडे काढणे, कपाशी वेचणे अशी कामेही त्यांना अर्थार्जनासाठी करावी लागली. पुणे विद्यापीठातही 'कमवा-शिका' योजनेत ते सहभागी होते.

मु. जे. महाविद्यालयात त्यांनी व्याख्याता, प्राध्यापक, रेक्टर व उपप्राचार्य ही पदे भूषविली. ते एम. फिल. आणि पीएच. डी. चेही मार्गदर्शक आहेत. विद्यार्थी सहायक समितीचे ते अध्यक्ष आहेत. या समितीतर्फे चालविले जाणारे वसतिगृह व खाणावळ हे त्यांचे स्वप्न त्यांनी प्रयत्नांनी प्रत्यक्षात आणले. 'एक रुपया लाख मोलाचा' ही योजना राबविली व त्यातून विद्यार्थी सहायक समितीचा वटवृक्ष उभा केला जो गरीब विद्यार्थ्यांना मदतीची सावली देत आहे. मनात कसलाही संकोच न धरता ते पेटी घेऊन मदत घेत असतात. सहायक समितीला धान्य, भाजी, गॅस, पैसा, घर, जमीन जुमला इ. गोष्टी दान म्हणून समाजाच्या सर्व स्तरातील लोकांकडून मिळत असतात. त्यासाठी व्याख्याने देतात व व्याख्यानांचे मानधनही विद्यार्थी सहायक समितीच्या निधीत जमा करतात. प्रवास खर्च स्वतः सोसतात. हे काम निःस्पृह भावनेने करीत असतात.

प्रा. सुभाष राणे अतिशय शिस्तप्रिय, मितभाषी आणि कोमल हृदयी आहेत. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या चरित्र कार्याचा विशेष प्रभाव पडला आहे. जगातील बहुसंख्य आदरणीय व्यक्तींचे साहित्य त्यांनी अध्ययन केले आहे. सध्या ते डॉ. जी. डी. बेंडाळे महाविद्यालय येथे प्राचार्यपदावर कार्यरत आहेत.

११४) राणे, शिवराम रंगो ऊर्फ काकासाहेब राणे (जन्म : १९०६, मृत्यू १९७०) - मूळ गाव विवरे, ता. रावेर, शिक्षण एम.ए., एल.एल.बी., १९२७ मध्ये बी.ए., १९२९ मध्ये एम.ए. व १९३० मध्ये एल.एल.बी. झाले. १९२० च्या असहकारितेपासून कॉलेजमध्ये राजकारणात उत्साहाने भाग घेत होते. सन १९४३ मध्ये पू. खा. जिल्ह्यातील पंजाब मेल, पेशावर एक्स्प्रेस गाड्या रुळावरून घसरविण्यात

आल्या त्याबद्दल भरलेल्या खटल्याच्या केसेस काकासाहेबांनी विनामूल्य लढविल्या व शासनाने अपराधी ठरविलेल्यांचा बचाव केला. खानदेश एज्युकेशन सोसायटीचे बरेच वर्ष काम केले. वुईमेन्स ट्रेनिंग कॉलेज, जळगावचे संस्थापक सभासद. मुंबई विधिमंडळाचे विद्यापीठ प्रतिनिधी होते. १९४६ ला मुंबई प्रांत विधानसभेत काँग्रेसचे प्रतोद म्हणून काम केले. अनेक शासकीय कमिट्यांवर त्यांनी काम केले. शेतकरी संघटना प्रतिनिधी म्हणूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य. १९५९ पासून १९७१ पर्यंत काँग्रेसचे खासदार होते.

११५) डॉ. लोखंडे राम सदाशिव - (जन्म : ५ मे १९५०) - मूळ गाव नशिराबाद असून गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाला. आई शेवंताबाई शेतातील भाजीपाला बाजारात नेऊन विकत असे. स्वतः न खाता मुलांसाठी खाऊ आणत असे. श्री. लोखंडे दुसरीत असतानाच वडिलांचे छत्र गेले. चौथीपर्यंत गावी शिक्षण झाले. मोठे भाऊ डोंबिवलीत होते. त्यांच्याकडे येऊन पाचवीपासून अकरावीपर्यंतचे शिक्षण महाराष्ट्र विद्यालयात झाले. विज्ञानात आवड असल्याने रसायनशास्त्र विषयात बी. एससी. व पदार्थविज्ञान-रसायनशास्त्र या विषयांत एम. एससी. या पदव्या प्राप्त केल्या. पीएच. डी. करण्याची जिद्द असल्याने मुंबई-पुणे येथे प्रयत्न केले. शेवटी पुणे विद्यापीठात प्रा. देडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली रेडिएशन केमिस्ट्री या विषयांतर्गत पीएच. डी पदवी प्राप्त केली. १६ मे १९८२ ला वर्षा केशव कुरकुरे या उच्चशिक्षित मुलीशी ते विवाहबद्ध झाले. सौ. वर्षा लोखंडे या एस. एन. डी. टी. कॉलेजमध्ये हिंदी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. इंडस्ट्रीजमध्ये मोठ्या पगाराच्या नोकऱ्या उपलब्ध असतानाही शिक्षणाची व संशोधनाची आवड असल्यामुळे त्यांनी प्राध्यापिकीला प्राधान्य दिले. १३ डिसेंबर १९८२ ला मुंबई विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात त्यांनी अधिव्याख्याता म्हणून काम सुरू केले. तोपर्यंत त्यांचे १६ संशोधनपर लेख भारतात व भारताबाहेर वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले होते. तेव्हापासून ते पी. जी. टीचर आणि रिसर्च गाईड म्हणून काम पाहू लागले. एप्रिल १९९४ मध्ये ते रीडर पदावर नियुक्त झाले आणि १३ डिसेंबर २००३ मध्ये त्यांची प्रोफेसर पदावर नियुक्ती झाली. डॉ. लोखंडे रजा न घेणारे व १२ ते १५ तास कार्यालयात व प्रयोगशाळेत कार्यमग्न राहणारे प्राध्यापक म्हणून त्यांची ख्याती आहे. विद्यार्थ्यांशी अत्यंत प्रेमाने, वडीलकीच्या नात्याने वागून त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी कष्टणारे असे विद्यार्थिप्रिय व्यक्तिमत्त्व आहे. साधी राहणी व उच्च विचारसरणी हे त्यांचे खास वैशिष्ट्य होय. मुंबई विद्यापीठातून सेवानिवृत्त झाले तेव्हा त्यांच्या एम.एससी, पीएच. डी. च्या आजी माजी विद्यार्थ्यांनी डोंबिवली येथील लेवाभवनाच्या 'मातोश्री सगुना सोनाजी नेमाडे' या सभागृहात २ ऑगस्ट २०१० रोजी थाटामाटात 'भुतो न भविष्यती' असा सत्कार सोहळा आयोजित केला होता. या वेळी त्यांचे विद्यार्थी व चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या या षष्ठीपूर्ती सोहळ्यानिमित्ताने

'नंदादीप' नावाने गौरव ग्रंथही प्रकाशित करण्यात आला. डॉ. लोखंडे यांनी आतापर्यंत एम. एससी. रिसर्च चे २४ विद्यार्थी व पीएच. डी. चे ८५ विद्यार्थी घडविले. त्यांचे हे कार्य प्रचंड मोठे असून समाजबांधवांना प्रेरणा देणारे व अभिमान वाटावा असे आहे. सेवानिवृत्तीनंतर १६ ऑगस्ट २०१० पासून ते जयपूर नॅशनल युनिव्हर्सिटी जयपूर येथे डायरेक्टर, स्कूल ऑफ बेसिक सायन्सेस व हेड ऑफ डिपार्टमेंट ऑफ केमिस्ट्री या पदावर रुजू झाले. तेथे अद्ययावत प्रयोगशाळा त्यांनी उभ्या केल्या. तेथे एम. एससी केमिस्ट्री, फिजिक्स व मॅथेमॅटिक्स सुरू करून विद्यार्थ्यांना शिक्षणसंधी उपलब्ध करून दिल्या. या विद्यापीठात पीएच.डी केमिस्ट्री सुरू करून आतापर्यंत २४ विद्यार्थ्यांनी पीएच. डी पूर्ण केली आहे.

डॉ. लोखंडे यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून ३२० आर्टिकल्स प्रसिद्ध झाले आहेत. तसेच त्यांनी ३०० वेगवेगळ्या चर्चासत्रांतून भाग घेतले आहेत. ते अनेक शास्त्रीय व शैक्षणिक संघटना आणि संस्थांचे सभासद आहेत. त्यांच्या पाच विद्यार्थ्यांना यंग सायंटिस्ट अवॉर्ड प्राप्त झाले आहेत.

डॉ. लोखंडे यांची सामाजिक बांधिलकीही वाखाणण्याजोगी आहे. ते आश्रम ट्रस्ट या मेडिकल फाउंडेशनचे लाईफ मेंबर आहेत. या संस्थेमार्फत चालणाऱ्या मधुमेह, दमा, अपंगसेवा, आदिवासी मित्र, हास्य क्लब अशा विविध कार्यक्रमांत ते सवडीनुसार सहभागी होतात. असा संशोधन कार्याला वाहून घेतलेला चैतन्याचा झरा आमचा समाज बांधव आम्हाला अभिमानास्पद वाटतो. त्यांच्या या त्यागाच्या पाठीमागे त्यांची पत्नी प्रा. वर्षाताईचाही सिंहाचा वाटा आहे हे सांगणे न लगे.

इंडिया पब्लिशिंग हाउस दिल्ली या संस्थेने २०१३ मध्ये बेस्ट सिटिझन ऑफ इंडिया अवॉर्ड बहाल केला आहे. लोकप्रिय विद्यालय विद्याप्रसारक मंडळाचे ते संस्थापक सदस्य आहेत.

११६) वराडे, डॉ. किसन नामदेव (जन्म : ५ जानेवारी १९५०)- मूळ गाव आडविहीर (ता. मोताळा, जि. बुलडाणा) असून बेताची आर्थिक परिस्थिती असलेल्या वारकरी परंपरेतील शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. कीर्तनकारांच्या वारकरी परंपरेमुळे लहानपणापासूनच त्यांना विठ्ठलभक्तीमार्गाचे व सेवावृत्तीचे संस्कार लाभलेत. गावात माध्यमिक शाळा नसल्याने शेंबा येथे रोज तीन मैल पायी चालत जाऊन त्यांनी एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण घेतले. मुळातच हुशार असल्याने ग्रामीण भागातही त्या वेळी त्यांना एस.एस.सी. ला ८०% गुण प्राप्त झाले. पुढील शिक्षण नागपूरला मोठ्या भावाकडे झाले. बारावीनंतर नागपूरच्या मेडिकल कॉलेजमधून १९७३ मध्ये एम.बी.बी.एस. झाले. डॉक्टर झाल्यावर वर्धा जिल्ह्यात समुद्रपूर व कारंजा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवेत राहिले. तेथील लोकांमध्ये मिसळून त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित केले. १९८० मध्ये सर जे. जे. हॉस्पिटलमध्ये बदली झाली. १९८६ मध्ये त्यांची

सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये बदली झाली. १९८८ मध्ये ते एम.डी. झाले व सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये त्यांना उपअधीक्षकपदावर पदोन्नती मिळाली. मुळातच सेवाभावी व पापभीरू वृत्तीचे आणि मनमिळाऊ स्वभावाचे असल्याने त्यांच्याकडे रुग्णांची सारखी वर्दळ असे. रुग्णांमध्ये त्यांनी कधी भेदभाव केला नाही. गरीब-श्रीमंत, कनिष्ठ-वरिष्ठ, रयत-मंत्री वगैरे सर्वच थरातील रुग्णांना भेदभाव न करता एकाच मापातून उपचार केला. त्यामुळे तळागाळाच्या रुग्णांना त्यांचा मोठा आधार वाटला. तर उच्चस्तरातील रुग्णांना डॉ. वराडे हे मित्रांपेक्षा जवळ वाटतात. त्यांच्या अत्युत्कृष्ट सेवेबाबत त्यांना अग्रीम वेतनवाढी देऊन त्यांच्या वरिष्ठांनी त्यांच्यावर विश्वास दाखवून त्यांचा गौरवच केला आहे. मध्यंतरीच्या काळात उपअधीक्षक असताना अधीक्षकपदाचा कार्यभारही त्यांच्यावर सोपविण्यात आल्यामुळे कामाच्या वाढत्या कार्यबाहुल्यातही त्यांनी रुग्णसेवेत अंतर पडू दिले नाही. रुग्णाठायी ईश्वर मानून ते रुग्णसेवा करीत. डॉ. वराडे यांना ऑगस्ट २००३ मध्ये अधीक्षकपदी पदोन्नती मिळाली. ते २०१० मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर अध्यात्माकडे वळले.

डॉ. वराडे यांचा विवाह १२ फेब्रु. १९७९ ला जळगावच्या खानदेश फार्मसीचे पी. जी. पाटील यांची सुकन्या अलका हिच्याशी झाला. सुस्वभावी पत्नी लाभल्यामुळे त्यांच्या समाजसेवेला प्रोत्साहन मिळाले. त्यांच्या दोन्ही मुली डॉक्टर असून मुलगा शिकत आहे.

शेकडो मैलांवरून उपचारार्थ मुंबईस येणाऱ्या रंजलेल्या, गांजलेल्या लेवा पाटीदार व त्यांच्याकडे येणाऱ्या इतर सर्वच रुग्णांना आपले म्हणणारे, त्यांचे निदान व उपचार जवळजवळ मोफत किंवा किमान शासकीय आकार घेऊन करणारे, त्यांच्या दुःखाश्रूंचे सुखाश्रूत रूपांतर करणारे डॉ. वराडे यांच्या ठायी साधू ओळखावा, देव (कृष्ण) तेथेच जाणावा. परपीडा आपली स्वतःची मानून ती निवारणारे डॉ. वराडे हेच खरे वैष्णवजन होत. गीता अनुभवावी ती डॉ. वराडेंच्या आचरणातून. असा हा रंजल्या-गांजल्या रुग्णांचा आधारस्तंभ समस्त लेवा पाटीदारांसाठीही भूषण होय.

११७) वराडे, दिनकर रामचंद्र व वराडे काशिनाथ रामचंद्र - मूळ गाव घाणखेड (ता. बोदवड) आहे. श्री. दिनकर वराडे नागपूर विद्यापीठाचे वास्तुविशारद आहेत. त्यांनी पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र इत्यादी राज्यांतील अनेक विद्यापीठांचे आराखडे केले आहेत. १२ वर्षे पश्चिम आफ्रिकेत एका ब्रिटिश फर्ममध्ये काम केल्यानंतर त्यामध्ये भागीदारही झाले. लहान भाऊ श्री. काशिनाथ वराडे यांच्याबरोबर डिझाइन ग्रुप इंडिया ही कंपनी स्थापन केली. ह्या कंपनीद्वारे ते कोट्यवधी रुपयांच्या वर प्रकल्प हाताळत आहेत. श्री काशिनाथ वराडे हे सुद्धा आर्किटेक्ट असून त्यांनी फ्रेंच व ब्रिटिश आर्किटेक्ट कंपन्यांमध्ये सुमारे १४ वर्षे काम केले असून डिझाइन ग्रुप इंडियाचे प्रमुख भागीदार आहेत. दोन्ही भावांना लेवा पाटीदार समाजाबद्दल अति आदर असून ते समाजाबद्दल आपुलकीने समाजकार्यात प्रत्यक्ष भाग घेऊन वेळोवेळी आर्थिक मदतही करीत असतात. आर्किटेक्ट क्षेत्रात नोकरी शोधणाऱ्या सुशिक्षित लेवा पाटीदार मुलांना

ते आपल्या कंपनीत रोजगार मिळवून देतात. त्याचबरोबर अनुभवही देतात.

११८) वराडे, ह.भ.प. मुकुंदमहाराज एणगावकर (जन्म : १८७० चे सुमारास, मृत्यू : १९१५) - मूळ गाव एणगाव (ता. बोदवड, जि. जळगाव) असून जन्मही ह्याच गावी झाला. विठ्ठलभक्तीने ते बालपणापासूनच अवतारी दिव्य पुरुष गणले गेले. ते खानदेश-वऱ्हाड दिंडी गादीचे आद्य प्रवर्तक वै. ह.भ.प. झेंडूजी महाराज बेळीकर यांच्याशी संपर्कात आले व झेंडूजी महाराजांचे जे तीन प्रमुख शिष्य झालेत त्यांच्यात मुकुंद महाराजांची गणना झाली. झेंडूजी महाराजांचे अन्य दोन शिष्य धनजी महाराज भुसावळकर आणि नागोजी महाराज तळवेलकर हे होत.

वैकुंठवासी झेंडूजी महाराज बेळीकरांनी वारकरी संप्रदायाची पताका खानदेश-वऱ्हाडात आणली. आपल्या संप्रदायाचे प्रचार माध्यम (मुक्काम, सप्ताह व पायी तीर्थयात्रा) यामध्ये लेवा गणप्रदेशातील खानदेशची जवळजवळ १५० गावे व वऱ्हाडातील ७२ गावे एवढा मोठा पसारा एका दिंडीकडून सांभाळला जाणार नाही. म्हणून खानदेश-वऱ्हाड भागाचे दोन उपविभाग पाडून गुरुवर्य झेंडूजी महाराजांनी खानदेशाला लागून असलेल्या वऱ्हाड भागातील व खानदेश-वऱ्हाड सीमेवरील ७२ गावांचा वारकरी संप्रदाय प्रचार कार्य व दिंडीचा भार मुकुंद महाराज एणगावकर यांच्यावर दिंडी अधिष्ठान या रूपाने सोपविला. महाराजांच्या या कार्याचा शुभारंभ १८८५ साली झाला. नंतर महाराजांचा प्रयाणकाळ पौष वद्य चतुर्थी शके १८३६ (सन १९१५) ला झाला. मुकुंदमहाराजांनी वैकुंठवासी जोग महाराजांच्या संगतीने त्र्यंबकेश्वरची निवृत्तीनाथांची वारी सुरू केली आणि त्र्यंबकेश्वरच्या वारीहून येत असतानाच त्यांचे निर्वाण झाले. एणगावी त्यांचे दहन संस्कार करण्यात आले. त्या वेळी खुद्द जोग महाराज कीर्तनासाठी एणगावी हजर राहिले. पुढे ही परंपरा वैकुंठवासी गुरुवर्य मोतीराम महाराज एणगावकर यांनी निःस्पृह वृत्तीने सांभाळली.

मुकुंद महाराजांचे पारमार्थिक कार्य पाहून ह.भ.प. गुरुवर्य नथुसिंग महाराज आळंदीकरांनी सतत आपल्या एणगावात झालेल्या प्रवचन-कीर्तनातून एणगावकरांना व परिसरातील लोकांना प्रेरणा दिली की, मुकुंद महाराजांचे स्मारक मंदिर एणगावी होण्यासाठी गुरुवर्य यादव महाराजांनी दिलेल्या एकरकमी रु २५,०००/- देणगीमुळे व लोकांच्या सहकारातून रामकृष्णा भाऊ वराडे यांच्या १० गुंठे जमिनीत मुकुंद महाराजांचे स्मारक - समाधिमंदिर बांधण्यात आले आहे. स्मारकमंदिरावर मुकुंद महाराज पुण्यतिथीनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण, वार्षिक नाम सप्ताह, संस्कार शिबिर व लग्नविधी पार पाडतात. वऱ्हाड उपविभाग दिंडीद्वारे येथूनच पैठण, आळंदी, त्र्यंबकेश्वर व आषाढी पंढरपूर वारीचे प्रस्थान होते. दर एकादशीला स्मारक मंदिरावर वारी भरते. त्यात ९ ते ११ पर्यंत कीर्तने होतात.

११९) वराडे, डॉ. एस. बी. (जन्म : ५ डिसेंबर १९३६) - मूळ गाव नरवेल (ता. मलकापूर). ह्यांचा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. शालान्त परीक्षेत

१९५५ मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. त्यानंतर खरगपूर, प. बंगालमधील आय.आय.टी. या नामांकित संस्थेतून पीएच.डी. झालेत. फोर्ड फाउंडेशनची शिष्यवृत्ती मिळताच १९६८ मध्ये कॅलिफोर्निया पिद्यापीठात प्रवेश घेतला. तेथे वर्षभर 'पाणथळ जमिनीत निचरा कसा व किती करावा?' या विषयावर संशोधन केले. भात पिकास वातावरणातील प्राणवायू पाने व खोडातून पोहोचविण्याची नैसर्गिक क्षमता असते असे डॉ. वराडेंनी सप्रमाण सिद्ध केले.

सुविद्य पत्नी सौ. शकुंतलाबाईसह अमेरिकेतील अध्ययनामुळे डॉ. वराडे मृदा वैज्ञानिकाच्या पातळीपर्यंत पोहोचले.

ऑगस्ट १९६३ ला खरगपूर आयआयटीत प्राध्यापक म्हणून लागले. पुढे तेथेच व्याख्याता झाले. १९७० मध्ये संशोधन मृदा भौतिकशास्त्रज्ञ झाले. १९६९ मध्ये पीएच.डी. चे मार्गदर्शक झाले. १९७४ पर्यंत २२ जणांना पीएच.डी. मार्गदर्शन केले. त्याशिवाय बऱ्याच विद्यार्थ्यांना एम.एस.टी. मार्गदर्शन केले. डॉ. वराडेंनी खूप संशोधन करून सुमारे ५० शोध प्रबंध लिहिले. त्यातील ३५ परदेशांमधील नामवंत जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. ते ब्रिटन, अमेरिका, जर्मनी, इटाली, नेदरलँड येथील पुस्तकांमधूनही प्रसिद्ध झाले.

१९७२ मध्ये मराठवाडा कृषी विद्यापीठ स्थापन झाल्यावर डिसेंबर १९७४ मध्ये डॉ. वराडे खरगपूरहून परभणीस विभागप्रमुख म्हणून कार्यरत झाले. येथे संशोधनासाठी त्यांनी सर्वकाही केले. १९७८ मध्ये जागतिक बँक प्रकल्पासाठी सिंचन विभागामार्फत प्रयत्न केला. या काळात ते कृषी रसायानशास्त्र व मृदा विज्ञानाचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र पातळीवर मृदा व हवामान या विषयाचे ६ वर्षे संयोजक म्हणून कार्य केले. तसेच भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या मृदा व कृषिविद्या पॅनलवर शास्त्रज्ञ म्हणून कार्य केले. राष्ट्रीय पातळीवर मृदा भौतिकशास्त्रज्ञ म्हणून त्यांची गणना करण्यात आली. तिमिरितझव प्रबोधिनी, रशिया येथे निमंत्रित प्राध्यापक म्हणून त्यांना पाचारण करण्यात आले. १ ऑगस्ट १९८० ला स्थापन झालेल्या सिंचन पीक संशोधन संस्था म्हणजे वाल्मी (औरंगाबाद) चे ते १९८० ते १९८४ पर्यंत प्रथम विभागप्रमुख व १९८४ ते १९९४ अखेरपर्यंत सहसंचालक होते. त्यांच्याच प्रयत्नांनी इंटरॲक्टीव्ह व्हिडीओ डिस्क भारतात प्रथमच वाल्मी संस्थेने तयार केली. वाल्मीद्वारे त्यांनी विविध देशांतून कृषी संशोधन दौरे, लेखन व प्रकाशन केले. त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. **त्यांनी इंडियन फार्मिंग, इंडियन हॉर्टिकल्चरीस्ट, जर्नल ऑफ मराठवाडा ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटी, जर्नल ऑफ इंडियन सोसायटी ऑफ सॉईल सायन्स** या नियतकालिकाच्या संपादनाचे कामही केले आहे.

गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मदत व मार्गदर्शन, विवाहेच्छू वधूवरांना मदत व पुढाकार, महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेसाठी परभणीस मोफत वर्ग

चालविण्यात पुढाकार अशी अनेक सामाजिक कार्येही केली आहेत. अशा या विद्वान व प्रतिभासंपन्न कृषिशास्त्रज्ञास सॉईल कॉन्झर्वेशन सोसायटी ऑफ इंडिया, दिल्ली या संस्थेने केंद्रीय ग्रामविकास मंत्री माननीय एम. के. पाटील यांच्या हस्ते चेन्नईत २००२ मध्ये सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. या सुवर्णपदकाचे ते महाराष्ट्रातील एकमेव मानकरी आहेत. त्यानंतर त्यांचे अनेक नामवंत संस्थांनी सत्कार केले आहेत.

१२०) वराडे, वासुदेवशास्त्री पांडुरंग तथा ह.भ.प. वासुदेवशास्त्री एणगावकर (जन्म : २४ जून १९४०, मृत्यू : २००८) - मूळ गाव एणगाव (ता. बोदवड, जि. जळगाव) असून जन्म एका साधारण आर्थिक परिस्थिती असलेल्या परंतु पूर्वापार महान वारकरी परंपरा चालत आलेल्या घराण्यात झाला. झेंडूजी महाराज बेळीकर यांच्या अनुग्रहाने वऱ्हाड भागातील दिंडीच्या प्रथम गुरुपदी विराजमान झालेले मुकुंद महाराज एणगावकर, द्वितीय गुरू मोतीराम महाराज एणगावकर, तृतीय गुरू काशिराम महाराज आडविहीरकर व चतुर्थ गुरू यादव महाराज आडविहीरकर अशा गुरू परंपरेतील प्रथम गुरू मुकुंद महाराजांच्या तिसऱ्या पिढीत जन्मलेले वासुदेवशास्त्रींना लहानपणापासूनच हरिभक्ती संस्कारांचे बाळकडू लाभले. वडील पांडुरंग बोवा वराडेंना बालपणीच अकाली अंधत्व आले पण प्रज्ञाचक्षुपात्र अंध असूनही **तुकारामाची अभंगगाथा** पाठ असलेले, उत्तम कीर्तनकार, मृदंगवादक व सुरज्ञ गायक होते. अशा हरिभक्तीच्या संक्रमणात वासुदेवशास्त्रींचा जन्म झाला. १९५२ मध्ये एणगावला लक्ष्मीनारायण मंदिरातील लक्ष्मीनारायण मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा निमित्ताने महाराष्ट्र कीर्तनकार परंपरेतील थोर कीर्तनकार गुरुवर्य सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर यांचे कीर्तन झाले व त्याचा मोठा प्रभाव वासुदेवशास्त्रींवर पडला आणि त्यांचा जीवनक्रमच बदलला. १९५७ मध्ये सातवी पास होऊन वासुदेवशास्त्री आळंदीच्या वारकरी शिक्षण संस्थेत दाखल झाले. त्यांच्याबरोबर निवृत्तीबोवा देशमुख व काशिनाथ महाराजसुद्धा गेले होते. दांडेकरांचा पांडुरंगबोवांशी परिचय होताच, गुरुवर्य जोगमहाराज व मुकुंदमहाराजांची पुण्याईसुद्धा त्यांच्या मागे संचित होती. इंद्रायणीकाठी पुण्यपावन श्रीक्षेत्र आळंदीला रोज सकाळी इंद्रायणीस्नान, ज्ञानेश्वर महाराज समाधी दर्शन व आळंदीप्रदक्षिणेनंतर नित्याने दिवसभर आध्यात्मिक हरिभक्तिमालिका ग्रंथपारायण असा त्यांचा दिनक्रम, उदरनिर्वाह माधुकरीवर.

वारकरी शिक्षण संस्थेत शिकविणारे शिक्षक, नैष्ठिक ब्रह्मचारी, त्यागी, निःस्पृह, विद्यासंपन्न विठ्ठलबोवा चौधरी, शांतारामबोवा गुरुजी, नथुसिंग महाराज, कदम माउली, गुरुवर्य भाऊसाहेब, गुरुवर्य मामासाहेब दांडेकर आदींसारख्या महान संतांच्या सान्निध्यात राहून त्यांनी संस्कृत भाषा, **भगवद्गीता, विष्णुसहस्रनाम, विचार सागर, पंचदशी-ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, उपनिषदे, एकनाथी भागवत** आदी अध्यात्म ग्रंथांचा अभ्यास केला व वारकरी शिक्षणसंस्थेत चार वर्षांत कीर्तनात प्रावीण्य मिळवून कीर्तन परीक्षेत पारितोषिकही मिळविले. सोबत मृदंगवादन, गायन आदी कलांमध्येही प्रावीण्य

मिळवून कीर्तन-प्रवचने करू लागले.

नंतर हरिद्वार, हृषिकेश, काशी येथे गुरुकुलात राहून त्यांनी **पाणिनीचे व्याकरण, सिद्धान्तकौमुदी, लघुसिद्धान्तकौमुदी, वेदान्त न्याय व साहित्य** या संस्कृत ग्रंथांचा अभ्यास केला. तेथे ''गीता मध्यमा'' ही परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. पुण्यात संस्कृत शिक्षणासाठी श्रीसंत खंडूजी महाराज देवस्थानात राहून तेथील सर्व कामे करून अकरावी एस.एस.सी. उत्तीर्ण झाले. सोबत संस्कृतचा अभ्यासही केला. त्यांनी पुण्याच्या मीमांसा विद्यालयातून **संस्कृत छंदोमंजरी, साहित्यदर्पण, कुमार संभव, रघुवंश, उत्तर रामचरित्र, मृच्छकटिक, मुद्राराक्षस, स्वप्नवासवदत्त, दशकुमारचरित, मेघदूत, अभिज्ञानशाकुंतल, कादंबरी** (बाणभट्ट) आदी ग्रंथांचा अभ्यास करून संस्कृत शिक्षा परिषद, कलकत्ता या संस्थेची ''काव्यतीर्थ'' पदवी १९७० मध्ये विशेष प्रावीण्याने संपादन केली. उपरोक्त संस्थेद्वारे त्यांना केंद्रीय संस्कृत विद्यालय, तिरुपती (आंध्र प्रदेश), (राष्ट्रीय संस्थान, दिल्ली द्वारे संचालित) या विद्यालयात एक वर्ष प्रशिक्षणाचा योग आला व विद्वान प्रभृतींशीही संपर्क झाला. तेथे त्यांनी **शिक्षा-सिद्धान्त, भारतीय शिक्षण समस्या, शिक्षा मनोविज्ञान, भाषा विज्ञान, संस्कृत शिक्षणविधी, हिंदी भाषा शिक्षण** आदी ग्रंथांचा सखोल अभ्यास करून ''शिक्षाशास्त्री'' (एम.ए.) ही पदवी १९७२ मध्ये प्राप्त केली. पुढे पुण्याची ''राष्ट्रभाषा पंडित'' ही पदवीही मिळविली. यानंतर मात्र गृहस्थाश्रम स्वीकारून सार्वजनिक विद्यालय, चिंचोली, ता. यावल व महाराष्ट्र विद्यालय, एणगाव येथे शिक्षकी पेशा पत्करून विद्यादानाच्या कार्याबरोबरच नित्याने कीर्तनाचीही निष्काम सेवा करीत राहिले. फेब्रुवारी १९९९ मध्ये सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी पूर्णपणे कीर्तनांसाठी वाहून घेतले आहे.

साधी राहणी, उच्च विचारसरणी, निःस्वार्थ वृत्ती, विद्यादान प्रवृत्ती आणि कीर्तनाला कुणीही बोलवावे तेथे कीर्तन असे शास्त्रीजींचे जीवन. एककाष्टी धोतर, अंगात शुभ्र नेहरू सदरा, कुरळे केस, स्वच्छ दंतपंक्ती, हसरा चेहरा, निरोगी शरीरयष्टी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व, मोठ्या सकाळी स्नानानंतर नित्याने प्रसन्न निर्लोभमुद्रा, गीता पठण, हरिपाठ, विष्णुसहस्रनाम, मारुती स्तोत्र, हनुमानचालिसा पठण हा त्यांचा नित्यक्रम. वासुदेवशास्त्री मनाने पवित्र, शांत व प्रेमळ स्वभावाचे आणि तपोसाधनेत प्राप्त शिक्षा संपदेने युक्त होते. त्यांच्या निष्काम कीर्तनभक्तीचा ठसा संपूर्ण खानदेशी-वऱ्हाडी जनमानसात कायम स्वरूपी उमटवून आहे. अशा या थोर संताचा लेवा पाटीदारांना अभिमान आहे.

१२१) वारके, डॉ. चिंधू सोना (जन्म : १९३२) - मूळ गाव हिंगोणे (ता. यावल) एम.जे. कॉलेज, जळगाव येथून बी.एस्सी. पदवी संपादन केली. १९५४ मध्ये एम.एस्सी. झालेत. १९६४ मध्ये युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियामधून पीएच.डी. झालेत. एम.एस्सी. नंतर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई या जगप्रसिद्ध संस्थेमध्ये रिसर्च स्कॉलरपासून प्रोफेसर पर्यंत १९५६ ते १९९२ पर्यंत कार्यरत राहिले. त्यांना

नॅशनल मेरीट स्कॉलरशिप (१९५२-५६, जी. के. गाडगीळ), प्राईझ फॉर डिस्टिंगवुईश सायंटिस्ट फ्रॉम डेव्हलपिंग कंट्रीज इ. अवॉर्ड मिळाले. त्यांनी रिसर्च फेलो युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सॅनडियागो १९६५-६६; व्हिजिटिंग सायंटिस्ट निल्सबोअर इन्स्टिट्यूट, कोपनहेगन, डेन्मार्क १९६९-७०; व्हिजिटिंग प्रोफेसर, मॅकमास्टर युनिव्हर्सिटी, कॅनडा (१९७६-७७), फ्रॅन्कफर्ट युनिव्हर्सिटी, जर्मनी (१९८०-८२, १९८९-९०) इ. ठिकाणी कार्य केले आहे. तसेच सी.एस.आय.आर. प्रोफेसरशिप आयआयटी, पवई, मुंबई येथे (१९९२-९४) केली. इंडियन ॲकॅडमी ऑफ लायसेन्स, महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ लायसेन्स (फाउंडर मेंबर), सोसायटी फॉर सायंटिफिक व्हॅल्यूचे फाउंडर मेंबर आहेत. नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्स व वर्कशॉपमध्ये भाग घेऊन सुमारे ११४ पेपर्स सादर केले आहेत.

१२२) वारके, डॉ. गंगाधर मोतीराम (जन्म : १६ सप्टेंबर १९४१) - मूळ गाव पिळोदे बु., (ता. यावल), वडील वारकरी संप्रदायाचे कीर्तनकार व शेतकरी असून घरातील वातावरण आध्यात्मिक होते. शिक्षण चौथीपर्यंत पिळोद्यास, सातवीपर्यंत सांगवीस, अकरावीपर्यंत भालोद, बी.एस्सी व एम.एस्सी, मुंबईला (१९६६). त्यांनी बॅक्टिरिऑलॉजी ॲण्ड फर्मेन्टेशन मायक्रोबायॉलॉजीत १९७० मध्ये मुंबई विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केली. आपल्या दोन्ही बंधूंना बरोबर घेऊन कल्चर मेडिया उत्पादन करणाऱ्या वारकेम व हायमेडिया या कंपन्या स्थापन केल्या. त्यांनी आपल्या कंपन्यांमध्ये शेकडो लेवा पाटीदार मुलांना रोजगार दिला आहे. डॉ. जी. एम. वारके यांचा भारत सरकारतर्फे यंग सायंटिस्ट म्हणून गौरव करण्यात आला आहे. त्यांनी विकसित केलेला कल्चर मेडिया औषधे, प्रसाधने, रोगनिदानासाठी आवश्यक असलेल्या रोगजंतूंची निर्मिती, पर्यावरणशुद्धता तपासणी, वस्त्रोद्योग, पशुवैद्यकशास्त्र, लसीकरण, कृषिक्षेत्र तसेच निरनिराळ्या दवाखान्यांमध्ये व वैद्यकीय प्रयोगशाळांमध्ये वापरला जातो. त्यांचे कल्चर मेडिया हे उत्पादन म्हणजे या क्षेत्रातील एकाधिकार असून त्यांची उत्पादने परदेशातही मोठ्या प्रमाणावर जातात. वारकेम व हायमेडिया पुढे आणण्यात त्यांचे ज्येष्ठ बंधू श्री. टी. एम. वारके यांचा निःसीम त्याग व कनिष्ठ बंधू श्री. व्ही. एम. वारके यांची व्यवस्थापन साथ लाभली आहे. आता दिंडोरी (जि. नाशिक) येथे नवीन शाखा उघडून त्यातही शेकडो लेवा पाटीदार मुलांना वारके बंधूंनी रोजीरोटी दिली आहे. सुमारे ५० देशांमध्ये त्यांची उत्पादने निर्यात होत असतात. डॉ. जी. एम. वारके यांना अनेक पारितोषिकेही प्राप्त झाली आहेत. त्यातील प्रमुख उद्योगपत्र पारितोषिक (१९८२), असोसिएशन ऑफ मायक्रो-बॉयालॉजिस्ट्स ऑफ इंडियाचे पारितोषिक (१९८८), एक्सपोर्ट्स प्रमोशन सेंटर, स्पेनचे आंतरराष्ट्रीय पारितोषिक (१९८८) आणि इंडियन कौन्सिल फॉर स्मॉल स्केल ॲण्ड मिडियम एक्सपोर्ट्सचे निर्यात रतन पारितोषिक (१९९३) ही होत. त्यांना त्यांच्या कौटुंबिक जीवनात त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सरोजताई या कॉम्प्युटर इंजिनीअर

व योग शिक्षिकेची उत्तम साथ लाभली आहे.

१२३) वारके, डॉ. सुहास मधुकर - (जन्म : - १० नोव्हेंबर, १९७१) मूळ गाव - विदगाव (ता. जळगाव) असून जळगावचे ॲड. मधुकर अभिमान वारके यांचे सुपुत्र. एच.एस.सी. पर्यंतचे शिक्षण जळगाव येते झाल्यावर प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणी (जि. अहमदनगर) येथून एम.बी.बी.एस. झाले. त्याचबरोबर ते मास्टर इन पोलीस मॅनेजमेंट; एल.एल.बी., डिप्लोमा इन सायबर लॉसुद्धा झाले आहेत. सुरुवातीला औरंगाबाद जिल्ह्यात मेडिकल ऑफिसर म्हणून रुजू झाले. २००० मध्ये आयपीएस निवड झाल्यावर लालबहादूर शास्त्री अकादमी, मसुरी; सरदार वल्लभभाई पटेल नॅशनल पोलीस अकादमी हैदराबाद व कोल्हापूर येथे प्रशिक्षण घेतले. त्यानंतर नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे नक्षल भागात असिस्टंट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस (ए.एस.पी.) पदावर रुजू झाले. त्यांच्या प्रयत्नांनी २००४ मधील सार्वजनिक निवडणुका शांततेत पार पडल्या. ते दि. ६-५-२००४ ते २७-७-२००४ पर्यंत मालेगावला ॲडिशनल एस.पी. झाले. या जातीय तेढीच्या अतिसंवेदनशील भागात त्यांनी खून, बलात्कार, लूटमार यासारख्या भयंकर फौजदारी गुन्ह्यांमध्ये कठोर कारवाई करून समाजविरोधी कारवायांवर आळा घातला. दि. २८-७-२००४ ते १४-६-२००६ पर्यंत ते लातूरचे एस.पी. होते. लातूरला काही जमातींच्या दुर्गम व लपून राहण्याच्या लहान गावांमध्ये यशस्वी छापे घालून चोऱ्या, लूटमार व दरोड्यांवर नियंत्रण मिळविले. दि. २०-६-२००६ ते जुलै २००७ पर्यंत ते सोलापूर शहराचे पोलीस उपायुक्त होते. हे शहर जातीय दंगलींमुळे अतिसंवेदनशील ओळखले जाते. जुलै २००७ ते फेब्रुवारी, २००९ पर्यंत ते बीडचे एस.पी. होते. येथेसुद्धा खून, दरोडे, बलात्कार यासारख्या मोठे फौजदारी गुन्हे व जातीय दंगलीवर यशस्वीपणे नियंत्रण मिळविले. दि. २-३-२००९ ते १०-६-२०११ पर्यंत तीन वर्षे ते मुंबई झोन-३ चे पोलीस उपायुक्त (डी.सी.पी.) होते, तर ११-६-२०१२ ते १२-११-२०१४ पर्यंत ते एस.पी.,एन.आय.ए. पदावर कार्यरत होते. दि. १३-११-२०१४ पासून ते पोलीस उपमहानिरीक्षक एन.आय.ए. (Dy. J.G.P., NIA) पदावर कार्यरत आहेत. मुंबईतील सेवा कार्यकाळात २६।११ च्या दहशतवादी मुंबई हल्ल्यातील ऑर्थर रोड जेलमध्ये चौकशी कामकाज चालू असताना हल्ला होण्याची भीती असतानाही न्यायचौकशी यंत्रणेस यशस्वीपणे सुरक्षा पुरविली. त्यांनी मुंबईतील मोठ्या खून प्रकरणांमध्येही चौकशी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे नेतृत्व केले.

डॉ. सुहास वारके पोलीस आणि जनतेमध्येही संपर्क व समन्वय साधत असतात. त्यांनी लष्करे तैयबाचा अबू जुंदालसारख्या अनेक अतिरेक्यांच्या प्रकरणात; २००६ च्या मालेगाव बॉम्ब स्फोट प्रकरणात यशस्वीपणे तपास केला आहे.

तसेच इंडियन मुजाहदीन; आयएसआयएस इत्यादीसारख्या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनांच्या देशविरोधी कारवाया करणाऱ्यांच्या गुप्त चौकशींचे संचलन

नेतृत्व डॉ. वारकेंनी केले आहे. बनावट नोटा प्रसारित करणाऱ्या टोळ्या शोधून गुन्हेगारांना पकडून देण्याच्या अतिशय महत्त्वाच्या कार्यात लक्ष घातले आहे. तसेच महाराष्ट्र, गुजरात व गोव्यातील दहशतवादी प्रकरणांमध्ये ते लक्ष घालून आहेत.

त्यांच्या या असामान्य कार्याबाबत त्यांना २०१५ च्या स्वातंत्र्यदिनी प्रतिष्ठाप्राप्त राष्ट्रपती पोलीसपदक प्रदान करण्यात येऊन गौरवण्यात आले आहे.

१२४) चौधरी, माधव सीताराम - (जन्म : १२ मे १९३६) मूळगाव-सावदा, जि. जळगाव. अर्थशास्त्राचे पदवीधर. मंत्रालयात शिक्षण, समाजकल्याण व आदिवासी विकास विभागात विविध पदे भूषविली. वर्ग २ व वर्ग १ पदावर उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र व वेतनवृद्धी मिळाली. निवृत्तीनंतर म.रा. महिला आयोगाचे विशेष अधिकारी म्हणून नेमणूक. श्रीराम पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये रजिस्ट्रार म्हणून काम केले. मुंबई परिसर लेवा मंडळाचे १९७३ ते २००३ पर्यंत विनामानधन सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. वधू-वर मेळाव्यांचे आयोजन व वधू-वरांच्या माहिती पुस्तकांचे प्रकाशन. १९८० पासून लेवा प्रबोधनपत्रिकेच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व नोकरी करणाऱ्यांसाठी घाटकोपर येथे वसतिगृह सुरू करून आजपावेतो व्यवस्थित चालविले. होतकरू तरुणांना शैक्षणिक प्रवेशासाठी व नोकरी मिळवून देण्यासाठी सक्रिय साहाय्य. सन २००० मध्ये सावदा रहिवासी संघाची स्थापना करून गावपातळीवर शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले. अमरावती जिल्ह्यातील 'नांदगाव पेठ' या गावातील आश्रमशाळेस वारंवार भेट देऊन मोलाचे मार्गदर्शन व वैयक्तिक १ लाख रुपयांचे योगदान. सावली सिनिअर सिटीझन, ठाणे या संस्थेचे ६ वर्षे सचिव व आजतागायत अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळत आहे. या संस्थेद्वारे आरोग्य तपासणी शिबिरे, मेळावे आयोजित करून तज्ज्ञांचे मार्गदर्शन, गरीब-होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, ज्येष्ठ नागरिक मध्यवर्ती समिती, ठाणे या संस्थेचे क्रियाशील सदस्य, ठाणे येथील व्यास क्रिएशन संस्थेतर्फे ६ मार्च २०१२ रोजी 'ज्येष्ठ रत्न' पुरस्काराने सन्मानित. ठाणे महानगरपालिकेनेही 'ज्येष्ठ नागरिक पुरस्कार' देऊन सन्मानित केले. डॉ. मणिभाई प्रतिष्ठानने 'राष्ट्रसेवा' पुरस्कार देऊन प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले. लेवा पाटीदार समाजाला ओ.बी.सी.त आणण्यासाठी माधवरावांचे फार मोठे योगदान आहे. मुंबई व परिसर लेवा मंडळाच्या वतीने त्यांच्या सहकार्यातून श्री. नि.रा. पाटील यांच्या खानदेश-वऱ्हाडातील लेवा पाटीदार समाज : एक अन्वयार्थ या ग्रंथाच्या पहिल्या व तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन.

१२५) चौधरी, शालिनी माधव - श्री. माधवराव चौधरींच्या पत्नी. जन्म १ मार्च १९४५. बी.ए. (मराठी), डी.एड. झाल्यावर २८ वर्षे प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करून १ मार्च २००३ ला सेवानिवृत्त होऊन समाजकार्याला वाहून घेतले आहे. ५ सप्टेंबर २००२ रोजी रोटरी क्लब ऑफ बॉम्बे (मुलुंड) तर्फे 'बेस्ट टीचर अवॉर्ड' प्राप्त,

व्यास क्रिएशनतर्फे 'ज्येष्ठ रत्न' पुरस्कार मार्च २०१४ मध्ये प्रदान करण्यात आला. ठाणे महानगरपालिकेकडून डिसेंबर २०१४ मध्ये 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त' ज्येष्ठ नागरिक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. मुंबई परिसर लेवा मंडळाच्या क्रियाशील सदस्या असून सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी समाज प्रबोधनाचे कार्य; जुन्या रूढी व परंपरा, हुंडा पद्धती निर्मूलनासाठी समाजप्रबोधनाचे भरीव कार्य; घटस्फोटाच्या प्रकरणांत समन्वयाचा पवित्रा घेऊन सकारात्मक समुपदेशन; घटस्फोट थांबवून सुखी समाधानी जीवन जगण्याचा अनेकांना मार्ग दाखविला. मनू-मुक्ताई महिला मंडळ, ठाणे या संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या ३०० सदस्या असून शालिनीताईंनी १२ वर्षे सचिव म्हणून कार्य केले. महिलांवर होणारे अत्याचार, स्त्रीभ्रूणहत्या याविषयी जागरण; महिलांच्या विविध कलागुणांना उत्तेजन; आदिवासी कुटुंबास आर्थिक मदत, अनाथाश्रमांना भेटी देऊन यथाशक्ती आर्थिक मदत करतात; 'सावली सिनिअर सिटीझन' या संस्थेच्या त्या सदस्या असून ७-७ दिवसांचे प्राणायाम व योगासने यांच्या शिबिरांचे आयोजन केले जाते. त्यात सुमारे शंभरेक सदस्य भाग घेतात.

१२६) भंगाळे, न्यायमूर्ती अशोक पितांबर (जन्म : १९ सप्टेंबर १९५३) - यांचे मूळगाव कानळदे असून शिक्षण बी.ए., एल.एल.बी., एल.एल.एम. असे झाले आहे. एल.एल.बी.ला असताना त्यांना बी.टी. काळे व डॉ. एन.एस. लोकूर हिंदू लॉ स्कॉलरशिप प्राप्त झाली होती. आपल्या वकिलीची सुरुवात त्यांनी १९७७ पासून जळगाव जिल्हा न्यायालयापासून केली. जळगावला वकिली करीत असतानाच ते ऑगस्ट १९८० ते १९८९ पर्यंत जळगावच्या एम.जे. कॉलेजमध्ये मर्कंटाइल लॉ व इंडस्ट्रियल लॉ या विषयांचे व्याख्यातेही होते. इ.स. १९८९ मध्ये त्यांची बॉम्बे सिटी सिव्हिल सेशन कोर्टचे न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्यांनी महाराष्ट्र कंट्रोल ऑफ ऑरगॅनाईज्ड क्राईम कायद्याअंतर्गत फर्स्ट स्पेशल जज्ज म्हणून तसेच पोटा कायद्यांर्गत स्पेशल जज्ज म्हणून काम केले. ते २००५-०६ मध्ये मोटार ॲक्सिडेंट क्लेम्स ट्रीब्युनल तसेच महाराष्ट्र राज्य ट्रान्स्पोर्ट ॲपेलेट ट्रीब्युनलचे चेअरमन होते. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र मंत्रालयात विधी व न्याय विभागात प्रिन्सिपल सेक्रेटरी म्हणून काम केले. ते मुंबई सिटी सिव्हिल ॲण्ड सेशन कोर्टाचे प्रिन्सिपल न्यायाधीश असताना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून त्यांना २००८ मध्ये पदोन्नती मिळाली. ते २०१५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर ते नागपूर येथे पत्नी सौ. कल्पना व दोन मुली - नम्रता व श्वेता यांच्याबरोबर आनंदाने सेवानिवृत्त जीवन जगत आहेत. त्यांचे पुत्र श्री. प्रसन्न व स्नुषा सौ. मोनिता दोघेही मुंबईस स्थायिक असून मुंबई उच्च न्यायालयात वकिलीचा व्यवसाय करीत असतात.

१२७) पद्मश्री महाजन-राणे शीतल (जन्म : १९ सप्टेंबर १९८२, पुणे) - संपूर्ण भारताला भूषण ठरलेल्या शीतल महाजन यांनी फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथून

बी.एस्सी. केले. दि. १८ एप्रिल २००४ रोजी उणे ३७ डिग्री सेल्सीयस तापमानात उत्तर ध्रुवावर २४०० फुटांवरून हेलीकॉप्टरमधून पॅराजंपींग करून पहिला विक्रम स्थापन केला. अशी पॅराजंपींग करणाऱ्या त्या जगातील पहिल्या भारतीय महिला ठरल्या. आपले विक्रम त्या स्वतःच मोडत गेल्या. त्यानंतर १६ डिसेंबर २००६ रोजी उणे ३५ डिग्री तापमानात दक्षिण ध्रुवावर ११,६०० फुटांवरून पॅराजंपींग केले. असाच तिसराही विक्रम त्यांनी केला. त्यांचा चौथा विक्रम म्हणजे १९ एप्रिल २००८ रोजी सातशे फूट उंचीवर एअर बलूनमध्ये फिनलँडस्थित सॉफ्टवेअर इंजिनीअर श्री. वैभव शालीग्राम राणे यांच्याशी केलेला विवाह. श्री. वैभव राणेंचे वडील भोपाळ येथे स्थित असून मूळगाव सातोद, ता. यावल आहे. लग्नानंतर त्या पतीसमवेत फिनलँड येथे स्थायिक झालेल्या आहेत. त्यांना दोन जुळी मुले झाल्यानंतरसुद्धा दि. १९ सप्टेंबर २०१० रोजी त्यांनी स्पेनच्या आकाशात १३,००० फूट उंचीवरून बर्डमॅन सूट परिधान करून उडी घेतली व पुन्हा आपल्या विक्रमांना गवसणी घातली. तेरा हजार फुटांवरून बर्डमॅन सूट जम्प घेणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या. या त्यांच्या विक्रमांमुळे त्यांना अनेक नामांकित पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यातील सर्वोच्च पुरस्कार म्हणजे जानेवारी २०११ मध्ये त्यांना भारत सरकारतर्फे मिळालेला पद्मश्री पुरस्कार होय. त्याशिवाय त्यांना १२ सप्टेंबर २००५ रोजी तत्कालीन राष्ट्रपती अे.पी.जे. कलाम यांचे हस्ते राष्ट्रपती भवनात सत्कार करण्यात आला. त्यांना महाराष्ट्र शासनाचा २००४-०५ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

✧✦✧

लेवा पाटीदार स्वातंत्र्यसैनिकांची प्रतीकात्मक यादी

१) अत्तरदे, तुळशीराम रावजी (जन्म १९१९), साळवे, ता. एरंडोल.
२) अत्तरदे, नारायण रामचंद्र (जन्म १९१३), भादली, ता. जळगाव.
३) अत्तरदे, पुरुषोत्तम बाळू (जन्म १९१६), साळवे, ता. एरंडोल.
४) अत्तरदे, शंकर दगडू (जन्म १९२०), साळवे, ता. एरंडोल.
५) इंगळे, तोताराम पाव्हनू, न्हावी, ता. यावल.
६) इंगळे, नारायण गणपत (मृत्यू १९४५), खिरोदे, ता. रावेर.
७) इंगळे, काशिनाथ बुधो (जन्म १९२३), न्हावी, ता. यावल.
८) इंगळे, खंडेराव आसाराम (जन्म १९१३), खिरोदे, ता रावेर.
९) इंगळे, चिंधू कासू (जन्म १९०५), नांदेड, ता. अमळनेर.
१०) इंगळे, माधव जयराम, खिरोदे, ता. रावेर.
११) इंगळे, रामदास वना (जन्म १९२३), न्हावी, ता. यावल.
१२) काळे, बाबुराव, जळगाव, ता जळगाव.
१३) किरंगे, निवृत्ती नामदेव, हंबर्डी, ता. यावल.
१४) कुरकुरे, गोविंद चावदस, सावदे, ता. रावेर.
१५) कुरकुरे, तुकाराम बापू, सावदे, ता. रावेर.
१६) कुरकुरे, दत्तात्रेय मंगा, डोंगरकठोरे, ता. यावल.
१७) कोल्हे, वना रामचंद्र (जन्म १९०२), फुलगाव, ता. भुसावळ.
१८) कोल्हे, शंकर नारायण (जन्म १९२९), साळवे, ता. एरंडोल.
१९) कोल्हे, हिरामण केशव, चिनावल, ता. रावेर.
२०) कोळंबे बुधो एको (जन्म १९०५), साळवे, ता. एरंडोल.
२१) कोळंबे, संपत दगडू (जन्म १९०१), नांदेड, ता. अमळनेर.
२२) खडके, जनार्दन सुका (जन्म १९१९), जळगाव, ता. जळगाव.
२३) खडके, माधव आवसू (जन्म १९११, मृत्यू १९६२), भादली, ता. जळगाव.
२४) गारसे, जयराम पावजी (मृत्यू १९५२), चिनावल, ता. रावेर.
२५) गुळवे, देवराम दौलत (मृत्यू १९७३), हिंगोणे, ता. यावल.
२६) चिरमाडे, नामदेव माधव, आसोदे, ता. जळगाव.
२७) चोपडे, गेंदू नामू (जन्म १९२२, मृत्यू १९५०), चिनावल, ता. रावेर.
२८) चोपडे, भगवान बुधो (मृत्यू १९४०), न्हावी, ता. यावल.
२९) चौधरी, अमृत नारायण (जन्म १९०७), फुलगाव, ता. भुसावळ.
३०) चौधरी, अमृत भावडू (जन्म १९१६), फुलगाव, ता. भुसावळ.
३१) चौधरी, इच्छाराम गंगाराम (जन्म १९०१), फैजपूर, ता. यावल.
३२) चौधरी, ओंकार खंडू, फैजपूर, ता. यावल.
३३) चौधरी, कृष्णा उखर्डू (जन्म १९००), असोदे, ता. जळगाव.
३४) चौधरी, कृष्णा नारायण, नांदेड, ता. अमळनेर.
३५) चौधरी, काशिनाथ दयाराम (जन्म १९१९), भालोद, ता. यावल.
३६) चौधरी, गोदावरीबाई पांडुरंग (जन्म १९१०), नांदेड, ता. अमळनेर.
३७) चौधरी, गोविंद त्र्यंबक (जन्म १९११), ममुराबाद, ता. जळगाव.

३८) चौधरी, घनश्याम काशिराम, खिरोदे, ता. रावेर.
३९) चौधरी, चंद्रकांत मुरहरी (जन्म १९१७), फुलगाव, ता. भुसावळ.
४०) चौधरी, चांगदेव गणपत (जन्म १९१८), खिर्डी, ता. रावेर.
४१) चौधरी, चिमण विठू (जन्म १९०७), खिरोदे, ता. रावेर.
४२) चौधरी, चिमाबाई अवसू (जन्म १८९५), पाडळसे, ता. यावल.
४३) चौधरी, जयराम गरबड (जन्म १९०३), भालोद, ता. यावल.
४४) चौधरी, जयवंता सुका (मृत्यू १९४०), फुलगाव, ता. भुसावळ.
४५) चौधरी, झेंडू लहानू (जन्म १९२६), खिर्डी, ता. रावेर.
४६) चौधरी, डोंगर जयराम (जन्म १९०८), आमोदे, ता. यावल.
४७) चौधरी, तुकाराम गणपत (जन्म १९२२), खिरोदे, ता. रावेर.
४८) चौधरी, तुळसाबाई कृष्णा (जन्म १९०५), कानळदे, ता. जळगाव.
४९) चौधरी, दगडू देवाजी (मृत्यू १९६०), पिळोदे, ता. यावल.
५०) चौधरी, दत्तात्रेय विठू ऊर्फ मॅनेजर (जन्म १९१७), सावदे, ता. रावेर.
५१) चौधरी, दयाराम काळू (मृत्यू २०००), खिरोदे, ता. रावेर.
५२) चौधरी, दयाराम रेवा, फैजपूर, ता. यावल.
५३) चौधरी, दामू आवसू (जन्म १९२१), आमोदे, ता. जळगाव.
५४) चौधरी, देवचंद्र गणपत (जन्म १९१८), खिरोदे, ता. रावेर.
५५) चौधरी, धनू एको (जन्म १९०१, मृत्यू १९७०), खिरोदे, ता. रावेर.
५६) चौधरी, धोंडू अवसू, आमोदे, ता. यावल.
५७) चौधरी, नथू तोताराम (जन्म १९२०), फुलगाव, ता. भुसावळ.
५८) चौधरी, नथू मंगू (जन्म १९०९, मृत्यू १९७२), पाडळसे, ता. यावल.
५९) चौधरी, नथू शंकर (जन्म १९२०, मृत्यू १९४८), खिरोदे, ता. रावेर.
६०) चौधरी, नामदेव पांडू, खिरोदे, ता. रावेर.
६१) चौधरी, नामदेव भोना (जन्म १९१०, मृत्यू ३ जाने. १९८२), आसोदे, ता. जळगाव.
६२) चौधरी, नामदेवराव माधवराव (जन्म १९१२), यावल, ता. यावल.
६३) चौधरी, नामदेव लोटू (जन्म १९०६), खिरोदे, ता. रावेर.
६४) चौधरी, नारायण अवसू (जन्म १९१०, मृत्यू १९६४), फुलगाव, ता. भुसावळ.
६५) चौधरी, नारायण कृष्णा, न्हावी, ता. यावल.
६६) चौधरी, निनू कान्हू (जन्म १९२०), कोथळी, ता. एदलाबाद.
६७) चौधरी, परशुराम भाऊ (१९१२), फैजपूर, ता. यावल.
६८) चौधरी, पंडित कृष्णा, खिरोदे, ता. रावेर.
६९) चौधरी, पंडित काळू , खिरोदे, ता. रावेर.
७०) चौधरी, प्रल्हाद अवसू, फुलगाव, ता. भुसावळ.
७१) चौधरी, पांडुरंग मंगू (जन्म १९०८), पाडळसे, ता. यावल.
७२) चौधरी, पांडुरंग माधव, यावल, ता. यावल.
७३) चौधरी, पितांबर अवसू, (जन्म १९२०, मृत्यू १९९८), पाडळसे, ता. यावल.
७४) चौधरी, पितांबर ओंकार, कोळवद, ता. यावल.
७५) चौधरी, पितांबर शेनफडू, आमोदे, ता. यावल.
७६) चौधरी, पुंडलिक सुपडू, किनगाव, ता. यावल.
७७) चौधरी, पुंडलिक सोना (जन्म १९१२), आमोदे, ता. जळगाव.

७८) चौधरी, पोपट महादू (जन्म १९२२), पाडळसे, ता. यावल.
७९) चौधरी, बळीराम नामदेव (जन्म १९२५), सावदे, ता. रावेर.
८०) चौधरी, बळीराम नारायण तथा चंद्रकांत मुरहर (जन्म १९१७), फुलगाव, ता. भुसावळ.
८१) चौधरी, बाबुराव पुंजो, अडावद, ता. यावल.
८२) चौधरी, बुधो दशरथ, ममुराबाद, ता. जळगाव.
८३) चौधरी, बुधो शेनफडू, असोदे, ता. जळगाव.
८४) चौधरी, भगवान मोतीराम (जन्म १९०५), खिरोदा, ता. रावेर.
८५) चौधरी, भगवान शिवराम (जन्म १९१४), सावदे, ता. रावेर.
८६) चौधरी, भुरा आवसू (जन्म १९१४), आमोदे, ता. यावल.
८७) चौधरी, मधुकर अमृता, फुलगाव, ता. भुसावळ.
८८) चौधरी, मनोहर महारू, खिरोदे, ता. रावेर.
८९) चौधरी, माधव विष्णू (जन्म १९२३), साळवे, ता. एरंडोल.
९०) चौधरी, मारुती लोटू, खिरोदे, ता. रावेर.
९१) चौधरी, मुरलीधर इच्छाराम, खिरोदे, ता. रावेर.
९२) चौधरी, मुरलीधर व्यंकट, थोरगव्हाण, ता. रावेर.
९३) चौधरी, मुरारी रामजी ऊर्फ तात्या ऊर्फ मुरारीराम (जन्म १८९९), भालोद, ता. यावल.
९४) चौधरी, मोतीराम ओंकार (जन्म १९०४), खिरोदे, ता. रावेर.
९५) चौधरी, मोतीराम रूपा, खिरोदे, ता. रावेर.
९६) चौधरी, यशोदाबाई चिमणाजी (जन्म १९१२, मृत्यू १९४३), खिरोदे, ता. रावेर.
९७) चौधरी, यादवराव हिरामण (मृत्यू १९९०), खिरोदे, ता. रावेर.
९८) चौधरी, राघो नथू, खिरोदे, ता. रावेर.
९९) चौधरी, राघो नागो (जन्म १९०८), खिरोदे, ता. रावेर.
१००) चौधरी, रामकृष्ण जयराम (जन्म १९०४), ममुराबाद, ता. जळगाव.
१०१) चौधरी रामचंद्र तोताराम (जन्म १९२२), फुलगाव, ता. भुसावळ.
१०२) चौधरी, रामदास पुरुषोत्तम, भालोद, ता. यावल.
१०३) चौधरी, रामदास सोमा (जन्म १९१४), पाडळसे, ता. यावल.
१०४) चौधरी, रामजी श्यामजी (जन्म १९०१, मृत्यू १९६०), चिनावल, ता. रावेर.
१०५) चौधरी, रूपचंद गोविंद, पाडळसे, ता. यावल.
१०६) चौधरी, लक्ष्मण गणपत (जन्म १९१९), किनगाव, ता. यावल.
१०७) चौधरी, लीलाधर श्रावण (जन्म १९०६, मृत्यू १९७२), भालोद, ता. यावल.
१०८) चौधरी, वसंत देवराम, खिरोदे, ता. रावेर.
१०९) चौधरी, विठ्ठल इच्छाराम (जन्म १९२१), खिरोदे, ता. रावेर.
११०) चौधरी, विनायक श्रावण (आचार्य, जन्म ३ फेब्रु. १९२५), सांगवी, ता. यावल.
१११) चौधरी, विमलाताई धनाजी तथा खाचणे विमलाताई केदार, बामणोद, ता. यावल.
११२) चौधरी, शंकरभाऊ (जन्म १९२३), खिरोदे, ता. रावेर.
११३) चौधरी, शंकर भादू (जन्म १९२३), आमोदे, ता. रावेर.
११४) चौधरी, शंकर रामचंद्र (जन्म १८९८), वाघोड, ता. रावेर.
११५) चौधरी, श्रीधर तुकाराम (जन्म १९२५), किनगाव, ता. यावल.
११६) चौधरी, श्रीपाद सदू (जन्म १९०४), असोदे, ता. जळगाव.
११७) चौधरी, सरलाताई मोतीराम (जन्म १९०७), खिरोदे, ता. रावेर.

११८) चौधरी, सरस्वतीबाई धनाजी (जन्म १८९८, मृत्यू १९७५), खिरोदे, ता. रावेर.
११९) चौधरी, सीताराम हरी, खिरोदे, ता. रावेर.
१२०) चौधरी, सुका तोताराम, (मृत्यू १९४२), फुलगाव, ता. भुसावळ.
१२१) चौधरी, सुनाटू मुन्हा, खिरोदे, ता. रावेर.
१२२) चौधरी, सोना रावजी, खिरोदे, ता. रावेर.
१२३) चौधरी, सोपान काळू तथा पाचपांडे संपत केशव (ज. १९१०, मृ. १९६९), खिरोदे, ता. रावेर.
१२४) चौधरी, सोमा तोताराम (जन्म १९१२), खिरोदे, ता. रावेर.
१२५) चौधरी, हिरामण रूपा (जन्म १९२२), खिरोदे, ता. रावेर.
१२६) चौधरी, ज्ञानेश्वर रामजी (जन्म १९२३), पाडळसे, ता. यावल.
१२७) जंगले, दगडू हिरामण, खिरोदे, ता. रावेर.
१२८) जंगले, लीलाधर ओंकार (जन्म १९२३), न्हावी, ता. यावल.
१२९) जंगले, हरी कृष्णा (जन्म १९२१), खिर्डी, ता. रावेर.
१३०) जावळे, गंगाधर रघुनाथ, सावदे, ता. रावेर.
१३१) जावळे, राजाराम आसाराम (जन्म १९२३), कुसुंबे, ता. रावेर.
१३२) जावळे, रामचंद्र गणपत, कळमोदे, ता. रावेर.
१३३) झांबरे, काशिनाथ सोनजी (जन्म १९२१), खिर्डी, ता. रावेर.
१३४) झांबरे, शंकर तुकाराम (जन्म १९१२), बामणोद, ता. यावल.
१३५) झोपे, उखा पूना (जन्म १९२३), न्हावी, ता. यावल.
१३६) झोपे, काशिनाथ मिठाराम (जन्म १९१०, मृत्यू १९७०), तळवेल, ता. भुसावळ.
१३७) झोपे, चुडामन गोटू (जन्म १९१२), थोरगव्हाण, ता. रावेर.
१३८) झोपे, दयाराम भिकारी, खिरोदे, ता. रावेर.
१३९) झोपे, मनसाराम गोविंदा (जन्म १९२०), खिर्डी, ता. रावेर.
१४०) झोपे, रूपा नागो (जन्म १९२२), खिर्डी, ता. रावेर.
१४१) झोपे, वामन गणू, खिरोदे, ता. रावेर.
१४२) झोपे, शंकर मंगू (जन्म १९१८), खिर्डी, ता. रावेर.
१४३) झोपे, शंकर सोमा (जन्म १९११), तळवेल, ता. भुसावळ.
१४४) टोके, गुणा सदाशिव (जन्म १९१२), खिरोदे, ता. रावेर.
१४५) टोके, परशुराम विठू, रोझोदे, ता. रावेर.
१४६) टोके, वामन सदाशिव, खिरोदे, ता. रावेर.
१४७) टोंगे, जगन्नाथ विठू (जन्म १९२०), रोझोदे, ता. रावेर.
१४८) ठोंबरे, मोतीराम लक्ष्मण (जन्म १८९२, मृत्यू १९७०), चिनावल, ता. रावेर.
१४९) ढाके, जगन्नाथ भोजू (जन्म १९२३), साळवे, ता. एरंडोल.
१५०) ढाके, ताराचंद सोमा (जन्म १९२२, मृत्यू १९७०), एरंडोल, ता. एरंडोल.
१५१) ढाके, दगडू मोतीराम, वराडसीम, ता. भुसावळ.
१५२) ढाके, दयाराम सोनजी (जन्म १९२३), खिर्डी, ता. रावेर.
१५३) ढाके, नारायण नाटू (जन्म १९०७), वराडसीम, ता. भुसावळ.
१५४) ढाके, पुरुषोत्तम भोनाजी (जन्म १९०६), साळवे, ता. एरंडोल.
१५५) ढाके, रामकृष्ण श्रीपाद (जन्म १९२२), भादली बु., ता. जळगाव.
१५६) ढाके, लक्ष्मण काळू, भादली बु., ता. जळगाव.
१५७) ढाके, लक्ष्मण चिंधू (जन्म १९१७), साळवे, ता. एरंडोल.

१५८) ढाके, शंकर कानू (जन्म १९२०), भादली, ता. जळगाव.
१५९) ढाके, शंकर काळू (जन्म १९१७), भादली, ता. जळगाव.
१६०) ढाके, शंकर श्रीपत, भादली, ता. जळगाव.
१६१) ढाके, सोमा रामचंद्र, असोदे, ता. जळगाव.
१६२) तळेले, आनंदा महारू (जन्म १९०६), न्हावी, ता. यावल.
१६३) तळेले, तुळशीराम विठू, न्हावी, ता. यावल.
१६४) तळेले, दोधू तथा सीताराम हिरामण, न्हावी, ता. यावल.
१६५) तळेले, नामदेव रामचंद्र, हंबर्डी, ता. यावल.
१६६) देशमुख, यशवंत हरचंद (जन्म १९१३), यावल, ता. यावल.
१६७) धांडे, गणपत हिरामण (जन्म १९११, मृत्यू १९३४), रोझोदे, ता. रावेर.
१६८) धांडे, तुळशीराम लक्ष्मण, चिनावल, ता. रावेर.
१६९) धांडे, भावडू तोताराम, रोझोदे, ता. रावेर.
१७०) धांडे, रंगू दशरथ (जन्म १९१५), रोझोदे, ता. रावेर.
१७१) नारखेडे, एकनाथ मनसाराम (जन्म १९२३), साळवे, ता. एरंडोल.
१७२) नारखेडे, चुडामन डालू (जन्म १९२३), असोदे, ता. जळगाव.
१७३) नारखेडे, तुकाराम रामू (जन्म १९०६), साळवे, ता. एरंडोल.
१७४) नारखेडे, दगडू श्रावण (जन्म १९२३, मृत्यू १९४२), सुनसगाव, ता. भुसावळ.
१७५) नारखेडे, दीनानाथ सदाशिव, साळवे, ता. एरंडोल.
१७६) नारखेडे, देवचंद गणाजी (जन्म १९०६), साळवे, ता. एरंडोल.
१७७) नारखेडे, दौलत कृष्णा (जन्म १९२१), साळवे, ता. एरंडोल.
१७८) नारखेडे, निंबा विठू, चिनावल, ता. रावेर.
१७९) नारखेडे, भानुदास रामजी (जन्म १९१२), साळवे, ता. एरंडोल.
१८०) नारखेडे, सखाराम रामू (जन्म १९०६), साळवे, ता. एरंडोल.
१८१) नारखेडे, सदाशिव हरी, खिरोदे, ता. रावेर.
१८२) नेमाडे, केशव विठू (जन्म १९२०), चिनावल, ता. रावेर.
१८३) नेमाडे, जयराम रामू (जन्म १९२०, मृत्यू १९६७), रोझोदे, ता. रावेर.
१८४) नेमाडे, धोंडू भगवान, चिनावल, ता. रावेर.
१८५) नेमाडे, प्रल्हाद विठू, सावदे, ता. रावेर.
१८६) नेमाडे, बळीराम तुकाराम, सावदे, ता. रावेर.
१८७) नेहेते, रामचंद्र नारायण, पाडळसे, ता. यावल.
१८८) नेहेते, रावजी आसाराम, (जन्म १९११), खिरोदे, ता. रावेर.
१८९) नेहेते, सोनू केशव (जन्म १९११) साळवे, ता. एरंडोल.
१९०) पाचपांडे, चुडामन हरी (जन्म १९१७), आमोदे, ता. यावल.
१९१) पाटील, अं. रा. (जन्म १९१८), तळवेल, ता. भुसावळ.
१९२) पाटील, एकनाथ तुकाराम, यावल, ता. यावल.
१९३) पाटील, कृष्णा धोंडू (जन्म १९०८), नांदेड, ता. अमळनेर.
१९४) पाटील, कृष्णा पाहूजी (जन्म १९२०) पाडळसे, ता. यावल.
१९५) पाटील, काशिनाथ भगवान, चांगदेव, ता. एदलाबाद.
१९६) पाटील, काशिनाथ धना (जन्म १९१३), फुलगाव, ता. भुसावळ.
१९७) पाटील, खुशाल रामू (जन्म १९११), आमोदे, ता. यावल.

१९८) पाटील, गणेश तुकाराम (जन्म १९२०), आमोदे, ता. यावल.
१९९) पाटील, गंभीर अवचित (जन्म १९१०), कानळदे, ता. जळगाव.
२००) पाटील, गंभीर सखाराम (जन्म १९०५, मृत्यू १९३६), फुलगाव, ता. भुसावळ.
२०१) पाटील, गिरधर राजाराम (जन्म १९१५), कानळदे, ता. जळगाव.
२०२) पाटील, गोपाळ रामचंद्र, आमोदे, ता. यावल.
२०३) पाटील, गोविंदा सोना (जन्म १९०९), आमोदे, ता. यावल.
२०४) पाटील, घनश्याम काशिराम (जन्म १९०३), आमोदे, ता. यावल.
२०५) पाटील, चिंतामण कौतिक, सावदे, ता. रावेर.
२०६) पाटील, त्र्यंबक झेंडू, फुलगाव, ता. भुसावळ.
२०७) पाटील, त्र्यंबक पांडू, फुलगाव, ता. भुसावळ.
२०८) पाटील, दयाराम बापू, खिरोदे, ता. रावेर.
२०९) पाटील, दामू भगवान (मृत्यू १९७०), सुनसगाव, ता. भुसावळ.
२१०) पाटील, दिगंबर फकिरा (जन्म १९१५), सांगवी, ता. यावल.
२११) पाटील, देवचंद काळू (जन्म १९०३, मृत्यू १९३३), तळवेल, ता. भुसावळ.
२१२) पाटील, धनाजी यादव, नशिराबाद, ता. जळगाव.
२१३) पाटील, धनाजी सोमा, सुनसगाव, ता. भुसावळ.
२१४) पाटील, धोंडू सदाशिव (जन्म १९०४), किनगाव, ता. यावल.
२१५) पाटील, नामदेव राजाराम, साळवे, ता. एरंडोल.
२१६) पाटील, नामदेव रामचंद्र (मृत्यू १९६९), न्हावी, ता. यावल.
२१७) पाटील, पंडित दगडू (जन्म १९२४), असोदे, ता. जळगाव.
२१८) पाटील, पुंडलिक जयराम (जन्म १९१३), नांदेड, ता. अमळनेर.
२१९) पाटील, पुंडलिक रामा (जन्म १९१३), तळवेल, ता. भुसावळ.
२२०) पाटील, बाबुराव सखाराम, पाडळसे, ता. यावल.
२२१) पाटील, भगवान रावजी (जन्म १८९९, मृत्यू १९६३), न्हावी, ता. यावल.
२२२) पाटील, भागवत खंडू (जन्म १९१०), साळवे, ता. एरंडोल.
२२३) पाटील, भास्कर सोना, आमोदे, ता. यावल.
२२४) पाटील, भिका आनंदा (जन्म १९१३), तळवेल, ता. भुसावळ.
२२५) पाटील, महादेव हरी (जन्म १९१५), सुनसगाव, ता. भुसावळ.
२२६) पाटील, मुरलीधर सोना, आमोदे, ता. यावल.
२२७) पाटील, यशवंत सदाशिव (जन्म १९२३), चिनावल, ता. रावेर.
२२८) पाटील, यशवंत सुपडू, न्हावी, ता. यावल.
२२९) पाटील, रवींद्र किसन, आमोदे, ता. यावल.
२३०) पाटील, राघो धनाजी (जन्म १९०२), कानळदे, ता. जळगाव.
२३१) पाटील, रामकृष्ण वालजी (जन्म १९१९), पाडळसे, ता. यावल.
२३२) पाटील, रामदास ओंकार, न्हावी, ता. यावल.
२३३) पाटील, रामदास सोना (जन्म १९०८), असोदे, ता. जळगाव.
२३४) पाटील, लक्ष्मण धनाजी (जन्म १९१५), वाघोड, ता. रावेर.
२३५) पाटील, लक्ष्मण बुधो (जन्म १९०४), नांदेड, ता. अमळनेर.
२३६) पाटील, गणपात भावडू, असोदे, ता. जळगाव.
२३७) पाटील, वामन कौतिक (जन्म १९२३), चिनावल, ता. रावेर.

२३८) पाटील, वावधन तुकाराम (जन्म १८९८), फुलगाव, ता. भुसावळ.
२३९) पाटील, विठ्ठल तुकाराम, वाघोड, ता. रावेर.
२४०) पाटील, शंकर भादू (जन्म १९१५), आमोदे, ता. यावल.
२४१) पाटील, शालिग्राम शिवाजी (जन्म १९२२), फुलगाव, ता. भुसावळ.
२४२) पाटील, सखाराम मोहन (जन्म १८७९, मृत्यू १९५६), रोझोदे, ता. रावेर.
२४३) पाटील, सीताराम अर्जुन, असोदे, ता. जळगाव.
२४४) पाटील, सीताराम आसाराम, मस्कावद, ता. रावेर.
२४५) पाटील, सीताराम देवचंद, आमोदे, ता. यावल.
२४६) पाटील, सुभान तोताराम, भादली, ता. जळगाव.
२४७) पाटील, सोना कौतिक (जन्म १९०२, मृत्यू १९४४), आमोदे, ता. यावल.
२४८) पाटील, सोनू दिना, नशिराबाद, ता. जळगाव.
२४९) पाटील, सोपान कृष्णा (जन्म १९०८), तळवेल, ता. भुसावळ.
२५०) पाटील, सोमा सदू (जन्म १९१२), जळगाव, ता. जळगाव.
२५१) पाटील, हरी किसन (जन्म १९२०), खिर्डी, ता. रावेर.
२५२) फालक, नारायण जयराम (जन्म १९१०), पिळोदे बु., ता. यावल.
२५३) फालक, पंढरीनाथ महारू, हिंगोणे, ता. यावल.
२५४) फालक, रामदास सोमा, सावदे, ता. रावेर.
२५५) फालक, रखमाबाई नारायण, उधळी, ता. रावेर.
२५६) फालक, विश्वनाथ तोताराम (जन्म १९२३, मृत्यू १९६६).
२५७) फालक, शंकर तथा रामभाऊ काशिराम (जन्म १९०६), ता. रावेर.
२५८) फिरके, काशिनाथ निंबा (मृत्यू १९६७), न्हावी, ता. यावल.
२५९) फिरके, घमा रामचंद्र (जन्म १९२३), न्हावी, ता. यावल.
२६०) फिरके, चुडामण धावजी, न्हावी, ता. यावल.
२६१) फिरके, विष्णू देवजी (जन्म १९२४), न्हावी, ता. यावल.
२६२) फिरके, सेवकराम सुपडू (जन्म १९२२, मृत्यू १९६७), न्हावी, ता. यावल.
२६३) फेगडे, गोपाळ नारायण (जन्म १९२२), पाडळसे, ता. यावल.
२६४) फेगडे, झेंडू फकिरा (जन्म १९१६), मस्कावद, ता. रावेर.
२६५) फेगडे, भादू दुला (जन्म १९२०), रोझोदे, ता. रावेर.
२६६) फेगडे, लक्ष्मण कौतिक, न्हावी, ता. यावल.
२६७) फेगडे, लोढू इच्छाराम (जन्म १९०२), रोझोदे, ता. रावेर.
२६८) फेगडे, सीताराम श्रीपती (जन्म १९१७), मस्कावद, ता. रावेर.
२६९) फेगडे, तुळशीराम भगवान (जन्म १९१४), मस्कावद, ता. रावेर.
२७०) बऱ्हाटे, पंढरीनाथ तुकाराम, सावदे, ता. रावेर.
२७१) बेंडाळे, तुकाराम बारसू (जन्म १९०३), सांगवी, ता. यावल.
२७२) बोरोले, मनोहर तुकाराम, फैजपूर, ता. यावल.
२७३) बोंडे, पांडुरंग खुशाल, खिरोदे, ता. रावेर.
२७४) बोंडे, वामन गणपत (जन्म १९२४), नशिराबाद, ता. जळगाव.
२७५) बेंडाळे, नाटू बुधो, सावदे, ता. रावेर.
२७६) भंगाळे, अंकात ओंकार, कानळदे, ता. जळगाव.
२७७) भंगाळे, उखा गणा, कानळदे, ता. जळगाव.

२७८) भंगाळे, कौतिक दामा (जन्म १९१७), न्हावी, ता. यावल.
२७९) भंगाळे, खुशाल शिवराम (जन्म १९१२), खिर्डी, ता. रावेर.
२८०) भंगाळे, माधव नाटू (जन्म १९१६), खिर्डी, ता. रावेर.
२८१) भंगाळे, रामचंद्र आसाराम, खिर्डी, ता. रावेर.
२८२) भंगाळे, रामचंद्र शिवराम (जन्म १९२७), खिर्डी, ता. रावेर.
२८३) भंगाळे, रामू रघू (जन्म १८९६, मृत्यू १९४६), चिनावल, ता. रावेर.
२८४) भंगाळे, लक्ष्मण पुंजो (जन्म १९२४, मृत्यू १९४६), सावदे, ता. रावेर.
२८५) भंगाळे, विष्णू ओंकार (जन्म १९२४), खिर्डी, ता. रावेर.
२८६) भंगाळे, हरचंद शिवराम, खिर्डी, ता. रावेर.
२८७) भंगाळे, हरी झिपरू (जन्म १९२३), खिर्डी, ता. रावेर.
२८८) भंगाळे, हुना भिकारी (जन्म १९०५, मृत्यू १९४०), न्हावी, ता. यावल.
२८९) भारंबे, खेमा काशिराम (जन्म १९२३), रोझोदे, ता. रावेर.
२९०) भारंबे, गोबा हुना (जन्म १९११), रोझोदे, ता. रावेर.
२९१) भारंबे, मुरलीधर दगडू (जन्म १९२३), चिनावल, ता. रावेर.
२९२) भारंबे, रूपचंद पांडू, रोझोदे, ता. रावेर.
२९३) भारंबे, वामन विठू (जन्म १९११), फैजपूर, ता. यावल.
२९४) भारंबे, सुपडू तोताराम, सावदे, ता. रावेर.
२९५) भारंबे, हरी भादू, वराडसीम, ता. भुसावळ.
२९६) भोगे, रामभाऊ धोंडो (जन्म १९१२), सावदे, ता. रावेर.
२९७) भोगे, सोमा नथू (जन्म १९२३), मस्कावद, ता. रावेर.
२९८) भोळे, आनंदा भादू (जन्म १९०५), जळगाव, ता. जळगाव.
२९९) भोळे, कौसल्याबाई चावदस (जन्म १९२२), ममुराबाद, जळगाव.
३००) भोळे, गोविंद यादव, असोदे, ता. जळगाव.
३०१) भोळे, चावदस हुना (जन्म १९०२), असोदे, ता. जळगाव.
३०२) भोळे, चावदस वना, सुनसगाव, ता. भुसावळ.
३०३) भोळे, जगन्नाथ पूना, असोदे, ता. जळगाव.
३०४) भोळे, तुकाराम माधव, वराडसीम, ता. भुसावळ.
३०५) भोळे, दगडू ओंकार (जन्म १९१९), असोदे, ता. जळगाव.
३०६) भोळे, नथू कृष्णा (जन्म १९१४), असोदे, ता. जळगाव.
३०७) भोळे, नामदेव हिरामण (जन्म १९१९), आमोदे, ता. यावल.
३०८) भोळे, माधव शिवराम (जन्म १९०९), असोदे, ता. जळगाव.
३०९) भोळे, हरी भादू, नांदेड, ता. अमळनेर.
३१०) भोळे, हेमराज दगडू (जन्म १९०७), सुनसगाव, ता. भुसावळ.
३११) महाजन, उमाकांत पोपट, पिळोदे बु. ता. यावल.
३१२) महाजन, एकनाथ खुशाल (जन्म १९१९), असोदे, ता. जळगाव.
३१३) महाजन, केदार निंबा (मृत्यू १९४०), रोझोदे, ता. रावेर.
३१४) महाजन, गणपत भावडू, पिळोदे, बु., ता. यावल.
३१५) महाजन, गोविंदा सोना (मृत्यू १९६२), असोदे, ता. जळगाव.
३१६) महाजन, ठाकूर महादू (जन्म १९१८), खिर्डी, ता. रावेर.
३१७) महाजन, तुकाराम देवराम, खिरोदे, ता. रावेर

३१८) महाजन, देवराम दामू, पिळोदे बु., ता. यावल.
३१९) महाजन, डिगंबर श्रावण (जन्म १९१२), रोझोदे, ता. रावेर.
३२०) महाजन, नारायण जयराम (जन्म १९०९, मृत्यू १९६४), न्हावी, ता. यावल.
३२१) महाजन, नारायण सदाशिव (मृत्यू १९७३), न्हावी, ता. यावल.
३२२) महाजन, निळकंठ शंकर (जन्म १९२६), न्हावी, ता. यावल.
३२३) महाजन, पंडित गणा (जन्म १९२३), असोदे, ता. जळगाव.
३२४) महाजन, बाबुराव नामदेव (जन्म १९१९), दहिगाव, ता. यावल.
३२५) महाजन, भादू वना (जन्म १९०७), खिरोदे, ता. रावेर.
३२६) महाजन, मुरलीधर सुपडू, कोरपावली, ता. यावल.
३२७) महाजन, यशवंत जयराम (जन्म १९२४), खिरोदे, ता. रावेर.
३२८) महाजन, राघो श्यामराव (जन्म १९१६), वाघोड, ता. रावेर.
३२९) महाजन, राजाराम खुशाल (जन्म १८९८), असोदे, ता. जळगाव.
३३०) महाजन, लटकन रावजी (जन्म १९०६), आमोदे, ता. जळगाव.
३३१) महाजन, लक्ष्मण खुशाल, खिरोदे, ता. रावेर.
३३२) महाजन, लक्ष्मण झेंडू (जन्म १९२३), वाघोड, ता. रावेर.
३३३) महाजन, विष्णू हरी (जन्म १९१८), कोळवद, ता. यावल.
३३४) महाजन, शंकर खुशाल (जन्म १९१४), वाघोड, ता. रावेर.
३३५) महाजन, हरी केशव (जन्म १९१९), न्हावी, ता. यावल.
३३६) महाजन, ज्ञानदेव भिका तथा विष्णू (जन्म १९२४), सावदे, ता. रावेर.
३३७) येवले, किसन लालजी, सावदे, ता. रावेर.
३३८) राणे, कृष्णा आसाराम (मृत्यू १९४५), खिरोदे, ता. रावेर.
३३९) राणे, कौतिक तुकाराम (जन्म १९०५, मृत्यू १९५१), फुलगाव, ता. भुसावळ.
३४०) राणे, नामदेव चावदस, कानळदे, ता. जळगाव.
३४१) राणे, पांडुरंग सोमा, सावदे, ता. रावेर.
३४२) राणे, भादू आसाराम (जन्म १९०७), खिरोदे, ता. रावेर.
३४३) राणे, मनसाराम सखाराम (जन्म १९१९), खिरोदे, ता. रावेर.
३४४) राणे, रामचंद्र सखाराम (जन्म १९१४), खिरोदे, ता. रावेर.
३४५) राणे, सुपडू मलजी (जन्म १९०६, मृत्यू १९५०), बोरखेडे बु., ता. यावल.
३४६) वराडे, सखाराम तुकाराम (जन्म १९०३), निमखेडी, ता. एदलाबाद.
३४७) वराडे, सखारामभाऊ तोताराम, कोथळी, ता. एदलाबाद.
३४८) वाघुळदे, डिगंबर ओंकार, न्हावी, ता. यावल.
३४९) वाघोदे, लोटू पूना (जन्म १९१२), खिरोदे, ता. रावेर.
३५०) वाणी, उखाभाई हुना (जन्म १८८९), सावदे, ता. रावेर.
३५१) वाणी, दत्तात्रेय यादव, सावदे, ता. रावेर.
३५२) सरोदे, चिमण श्यामू, चिनावल, ता. रावेर.
३५३) सरोदे, झेंडू तुकाराम, चिनावल, ता. रावेर.
३५४) सावदेकर, श्यामराव चांगो, चिनावल, ता. रावेर.
३५५) सुपे, डोंगर सुपडू, मस्कावद, ता. रावेर.
३५६) सुपे, धनाजी सुपडू, मस्कावद, ता. रावेर.
३५७) हंबर्डीकर, झिपरू, खिरोदे, ता. रावेर.

३५८) इंगळे, विश्वनाथ दामोदर (जन्म १९१२), मलकापूर, ता. मलकापूर.
३५९) इंगळे, शंकर श्रावण (जन्म १९१०), तालसवाडा, ता. मलकापूर.
३६०) पाटील, यादवराव वामनराव (जन्म १९०१), मलकापूर, ता. मलकापूर.
३६१) महाजन, दिनू गोविंदा (जन्म १९११), दाताळा, मलकापूर.
३६२) पाटील, एकनाथ सदू, शेलगाव बाजार, ता. मोताळा.
३६३) पाटील, मुरलीधर चांगो, नरवेल, ता. मलकापूर.
३६४) चौधरी, धनाजी नाना, खिरोदे, ता. रावेर.
३६५) चौधरी, मधुकरराव धनाजी, खिरोदे, ता. रावेर.
३६६) चौधरी, सीताराम नाना, खिरोदे, ता. रावेर.
३६७) चौधरी, विमलाताई धनाजी, खिरोदे, ता. रावेर.
३६८) चौधरी, मालती धनाजी, खिरोदे, ता. रावेर.
३६९) बोंडे, धनाजी महारू, खिरोदे, ता. रावेर.
३७०) बोंडे, मनोहर महारू, खिरोदे, ता. रावेर.
३७१) चौधरी, जनार्दन धनू (भानुसर), खिरोदे, ता. रावेर.
३७२) भंगाळे, रामभाऊ पुंजो (मृत्यू २००२), सावदा, ता. रावेर.

प्रकरण ९ - तळटिपा

१. म. ना. अद्वंत यांच्या **मराठी विश्वकोश,** खंड ४, १९७१ मधील ''कोलते, विष्णू भिकाजी'' या लेखाच्या आधारे; संदर्भः मधुकर अष्टीकर, **डॉ. कोलते गौरव ग्रंथ**, अमरावती, १९६९.
२. डॉ. कि. का. चौधरी संपादित **जळगाव जिल्हा गॅझेटिअर** (१९९४) मधील ''संस्कृती'' लेखनावर आधारित.
३. कित्ता.
४. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. १३२.
५. कित्ता, पृ. १३५, १३६.
६. माननीय मधुकररावांच्या मते लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या अल्पसंख्याकांनी (ज्यात लेवा पाटीदारही आहेत) बहुजन समाजावर राज्य करू नये म्हणून हायकमांडचा होकार (Offer) असतानाही या निःस्वार्थी नेत्याने मुख्यमंत्रीपद नाकारले. मान. मधुकरराव चौधरींची मुलाखत.
७. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. ६४६.
८. ही प्रतीकात्मक यादी **स्वातंत्र्यसैनिक चारित्र**कोश या ग्रंथामध्ये १९६२ च्या आधी ज्यांची नोंद घेतली आहे, त्यातून निवडली आहे. यातील बहुतेक स्वातंत्र्यसैनिक आता देवाघरी गेले आहेत.

प्रकरण १०

लेवा जनजीवन

लेवा गणप्रदेशातील लेवा पाटीदार लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेतीचा. या लोकांना या प्रदेशात वतनदारी दिली ती फारुकी या मुसलमान राजांनी. गुजरातचे सुलतान हे जेवढे धर्मांध तेवढेच खानदेशातील फारुकी राजे मुसलमान असूनही धर्मनिरपेक्ष. याला अपवादही आहे. सर्वच धर्मनिरपेक्ष होते असेही नाही. परंतु त्यांनी या प्रदेशात शांतता टिकविण्यासाठी हिंदूंवर गुजरात सुलतानांसारखे अन्याय केले नाहीत. एवढेच नाही; तर गुजरातमधून देशोधडीला लागलेल्या लेवा पाटीदार, गुजर आदी जाती-जमातींना त्यांनी वतनदारी बहाल करून जमिनी नावावर करून दिल्या. मुळातच कष्टकरी पिंड असल्याने हे लोक शेतकरी म्हणून पुढे आलेत. खानदेशातील सुपीक जमीन यांच्या वाट्याला आली आणि त्यांनी त्याचे चीज केले.

इ.स. १३०० पूर्वी खानदेश संपन्न होता. उत्तर हिंदुस्थानातून दक्षिणेकडे येण्याचा (दक्षिणापथाचा) प्रमुख व्यापारी मार्ग असिरगड-बऱ्हाणपूरमार्गे खानदेशातून जात होता. आज त्याचा काही भाग सुरत-बऱ्हाणपूर राज्य महामार्गात समाविष्ट आहे. तद्वतच या मार्गाला दक्षिणेकडून येणारा असिरगड मार्ग फैजपूर-सावदा येथे मिळत असे. त्याला जुना आग्रा मार्ग असेही म्हणत. सुरत-बऱ्हाणपूर मार्गावर लेवा गणप्रदेशातील किनगाव, अडगाव, यावल, सांगवी, हिंगोणे, हंबर्डी, फैजपूर, सावदा, मस्कावद, निंभोरा, खानापूर, इ. तर असिरगड (औरंगाबाद-आसिरगड) मार्गावर, नशिराबाद, शेळगाव, साकळी, पिळोदे बु., बामणोद, आमोदे, फैजपूर व सावदा ही गावे वसली आहेत. अरबी समुद्रातील सुरत बंदराशी खानदेशातून व्यापारी वाहतूक चालत असे. इ.स. १३७० मध्ये तापी खोऱ्यातील या प्रदेशातील जमीन काळी कसदार, सुपीक व वर्षानुवर्षे उपजाऊ

असल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो[१]. त्यामुळे गुजरात सुलतान, माळवा सुलतान व मुघल सम्राटांची लोभी नजर या प्रदेशावर राहत असे. राजा अहमद मलिक राजा फारुकीच्या कारकिर्दीत (१३८२-१३९९) खानदेशात बरीच बागायती पिके घेतली जात. विहिरींद्वारे जलसिंचन होत असे. येथे उत्कृष्ट दर्जाचे मलमली कापड तयार होत असे. येथील मलमल मलिक राजाने फिरोज तुघलक या दिल्लीच्या सुलतानास भेट पाठविली होती.[२] खानदेशात मलिक राजा व त्यानंतर आलेला नसिरखान (१३९९-१४२७) यांच्या कारकिर्दीत १३९६-१४०७ दरम्यान भीषण दुष्काळ पडला होता. संपूर्ण दख्खन प्रदेशात त्याची तीव्रता होती. हा दुष्काळ पहिला दुगदिवीचा दुष्काळ म्हणून ज्ञात असून फारुकी राजा मलिक याच्या नवोदित राजवटीस एक आव्हानच ठरले होते. त्याने हे आव्हान स्वीकारून आपल्या प्रशासनिक कौशल्याचा उपयोग करून शेती उत्पादन वाढविण्याच्या निरनिराळ्या योजना राबविल्या. कापूस लागवडीकडे विशेष लक्ष देऊन त्याखालील क्षेत्र वाढविले. कल्पक व मेहनती लेवा पाटीदारांनी याचा फायदा घेतला नसता तरच नवल. त्यामुळे कापूस हे खानदेशातील नगदी पीक झाले. मलिक राजाने आपल्या हयातीतील बराच काळ संस्कृती, कलाकुसर व शेती विकास करण्यात घालविला. मलिक राजाचा मुलगा नसीरखान फारुकीने विद्वानांना खानदेशात पाचारण करून वाङ्मय विकासास उत्तेजन दिले.[३] (१४३७-१४४१). याच्याच कारकिर्दीत नसिराबाद गाव वसविले गेलेले दिसते. त्यानंतर आलेल्या आदिलखान फारुकी याच्या राज्यारोहणावेळी खानदेशातील व्यापार व शेतीची स्थिती विस्कळीत झाली होती. ती स्थिरस्थावर करण्याकडे त्याने लक्ष दिले. त्याने राज्यातील रहदारीचे सर्व रस्ते लुटारू, कोळी व भिल्ल यांच्या वाटमारीपासून निर्वेध केल्यामुळे आप्रवासी (Immigrants) लेवा पाटीदारांना स्थिर होण्यास मदत झाली. याच्या काळात एदलाबाद (मुक्ताईनगर) वसविले गेलेले दिसते. आदिलखानानंतर आलेल्या फारुकी सुलतानांनीसुद्धा खानदेशात शांतता टिकविण्यासाठी शेती व व्यापार वृद्धीसाठी प्रयत्न केलेत. त्यांच्यात मुबारकखान (१४४१-१४५७) आदिलखान दुसरा (१४५७-१५०३) याच्याच कारकिर्दीत लेवा पाटीदार समाज मोठ्या संख्येने खानदेशात आला. दाऊदखान (१५०३-१५०८), गझनीखान (१५०८), हसनखान (१५०८), आलमखान (१५०८), आदिलखान तिसरा (१५०८-१५२०), मिरान महमदशहा पहिला (१५२०-१५३५), अहमदशहा (१५३५), मुबारकशहा पहिला (१५३५-१५६६), महमदशहा दुसरा (१५६६-१५७६), हसनशहा (१५७६-७७) यांचा समावेश होतो. इ.स. १५७७ ते १५९७ या कालावधीत आलेला आदिलखान शहा चौथा ऊर्फ राजा अलीखान हा तर विलक्षण बुद्धिमान होता. राज्यकर्त्या पुरुषाच्या अंगी आवश्यक न्यायीपणा त्याच्या ठायी होता, असे फरिश्ताने लिहून ठेवले आहे.[४] तो मुत्सद्दी, विवेकी व शूर लढवय्या होता. त्याची प्रजा त्याला देवासमान माने. असिरगडच्या जागी मशिदीत इ.स. १५८४-१५८८ मधील याचा अरबी

शिलालेख असून खाली संस्कृत सारांश दिला आहे. या शिलालेखावरून लोकांचा फारुकी सुलतानांविषयी आदर व प्रेम स्पष्ट दिसते. या शिलालेखाचा संस्कृत सारांश खालीलप्रमाणे आहे.

चंद्रार्क तारांगणादि तिष्ठन्ति गगने भुवि।
तावत्फारुकिवंशोसौ विमलो भुवि तिष्ठतु।।

म्हणजे कमलाला जसा सूर्य तसा आदिलशहा जनतेला दयाळू वाटतो. शेतकऱ्याला जसा पौर्णिमेचा चंद्र आनंददायी असतो तसा हा राजा लोकांना वाटतो. हा राजा नेहमी (प्रजाहितासाठी) परमेश्वराच्या ध्यानधारणेत मग्न असतो.[५] अलीखानने आपल्या पूर्वजांविषयीही त्यात लिहून ठेवले आहे. इ.स. १५८७ मध्ये बऱ्हाणपूरला वास्तव्यास असलेल्या राल्फ फिच तसेच न्यूबेरी या दोन्ही युरोपियन प्रवाशांनी खानदेशचे वर्णन फार सुंदर लिहिले आहे. त्यातील काही भाग - ''खानदेशात हिवाळा नेमस्त, हवा आल्हाददायक आणि नद्या व ओढे भरपूर होते. खानदेशात ज्वारीचे पीक मुबलक पिकविण्यात येई. पुष्कळ ठिकाणी वर्षातून ज्वारीची तीन पिके काढत. खानदेशी तांदूळही उत्कृष्ट होता. भाजीपाला मुबलक व चांगला. शिवाय विड्याची पाने, फुले व फळे विपुल होती. तेथे उत्तम आंब्यांची लागवड केलेली होती. खानदेश बहुतेक सुपीक होता. तेथील प्रजेत शेतकरी-कुणबी (त्यात लेवा पाटीदार व गुजरांचाही समावेश होता), भिल्ल व गोंड यांचा भरणा होता. खानदेश संपन्न तसेच तेथील लोकसंख्याही भरपूर होती. काही काही भागात धान्य, कपाशी, लोकर व साखर (चांगला गूळ वा खांडसरी) विपुल पैदा होई. काही बाजारपेठांत सुकी फळे, सूत, जाजमे, खाखी, छापील व खादी, पांढरे कापड, झोरे, पितळी भांडी, हत्यारे व औषधे विक्रीस असत. खानदेशात अबस्ते नावाचे तलम कापड आणि सिरिसाफ व भिरौन नावाचे साधारण कापड विणण्यात येई. बऱ्हाणपूर हे मुख्य शहर होते. तेथे सर्व देशांतील लोकांची वस्ती होती. तेथे नाना तऱ्हेची कलाकुसरीची कामे हाताने करण्यात येत असत. असिरगडच्या पायथ्याशी असीर नावाचे मोठे शहर होते. चोपडे गाव मोठ्या लोकसंख्येचे होते. एदलाबाद हे चांगले शहर होते.[६]

इ.स. १६०१ मध्ये खानदेश संपूर्णतः मुघल साम्राज्याखाली आला. मुघलांच्या काळात खानदेशातील सर्वसाधारण आर्थिक स्थिती चांगली होती. धनसंपन्न खानदेश प्राप्तीमुळे अकबराला फार आनंद झाला होता. असिरगडच्या वेढ्याच्या वेळी भडगावच्या रामजी पंताने मदत केल्यामुळे अकबराने जामनेर, बहाळ व भडगावबरोबरच लेवा पाटीदारांची वस्ती असलेले नशिराबाद व एरंडोल ही गावेही त्यास जहागिरी म्हणून दिली. अबुल फझलच्या **ऐन-ई-अकबरी** नुसार अकबराने खानदेश काबीज केल्यावर राजा तोडरमलने जमिनीचे सर्वेक्षण करून जमिनीची प्रतवारी ठरवून शेतसारा आकारणी केली. **ऐन-ई-अकबरीनुसार** खानदेश सुभ्यात ३२ परगणे होते आणि त्यांचा एकूण महसूल १,२६,४७,०६२ वऱ्हाडी तनखा इतका होता. पैकी लेवा गणप्रदेशात १)

वरणगाव, पूर्व-दक्षिण (महसूल २,१५,५०४ तनखा), २) बोदवड, दक्षिण-पश्चिम (महसूल १,८३,५४० तनखा), ३) रावेर पश्चिम (महसूल ८,८३,६५५ तनखा), ४) सावदा दक्षिण (महसूल ४०,००८ तनखा), ५) बाहील, दक्षिण (यावलचा उल्लेख बाहील असा केलेला दिसतो, महसूल - २,९०,३११ तनखा), ६) अदिलाबाद (एदलाबाद) दक्षिण (महसूल ५,२७,२३३ तनखा), आणि ७) नशिराबाद दक्षिण (महसूल ८,२४,९२५ तनखा) हे परगणे होते. असिरगड (खानदेश) जिंकल्यामुळे अकबराच्या राजवटीत या सुभ्यांच्या महसुलात ५० टक्क्यांनी वाढ झाली. त्यामुळे अकबराचा एकूण महसूल ४५,५२,९४,२३२ अकबरी दाम (१,१३,८२,३५५ रुपये १२ आणे नऊ पैसे) होता.[७]

अकबराच्या काळात राजा तोडरमलने रूढ केलेल्या पद्धतीनुसार जमिनीची प्रत आणि उत्पादन क्षमता विचारात घेऊन निश्चित कालावधीसाठी महसूल निर्धारित करण्यात आला. जमीन महसुलाची आकारणी योग्य व न्यायावर आधरित होती. सर्व जमीन सरकारच्या मालकीची असल्याचे तत्त्व प्रचलित होते. जमिनीचे कायम संक्रमण होऊ शकत नव्हते आणि वेळोवेळी केलेल्या मूल्यनिर्धारणाच्या पुनरिक्षणामुळे (revision) कायमस्वरूपाचे कुळाधिकार अस्तित्वात येण्यास वाव मिळाला नाही. मुघलांची सत्ता आल्यावर पहिली ३० वर्षे खानदेशात अस्थिरता व अस्वास्थ्य होते. इ.स. १६१५ मध्ये सर थॅामस रो अडावद गावी आला असता सभोवतालच्या लेवा पाटीदारांची वस्ती असलेला भाग त्यास अस्थिर दिसून आला. चार दिवसांनंतर या भागातून तो बऱ्हाणपूरला गेला असता तोही भाग त्याला दैनावस्थेत असल्याचे आढळले. बहुतांश घरे मातीची असल्याचे तो नमूद करतो.[८] घरे दाटीदाटीने बांधलेली तसेच भिंतीसाठी ओल्या मातीत गवताचे मिश्रण करून बांधकाम करीत. म्हणून ती उन्हाळ्यात थंडगार आणि हिवाळ्यात ऊबदार राहत. बरीच घरे धाब्याची होती. ती पावसाळ्यात गळू नयेत म्हणून छपरांची व कुडाच्या भिंतींची असत. बांबू व तुरकाट्या बांधून त्यावर चिकट व चिकण माती लिंपून कुडाच्या भिंती तयार करीत. आठवड्यातून एकदा तरी या भिंती शेण-मातीमिश्रित पाण्याने पोथारत असत.

इ.स. १६१०-१६३० मध्ये खानदेशाच्या काही भागात अकबरकालीन तोडरमलच्या महसूल पद्धतीत मलिक अंबरने बदल केलेत. त्या वेळी महसूल आकारणीच्या प्रत्यक्ष दराची पद्धती अकबरकालीन पद्धतीवर आधारित होती. तथापि, मलिक अंबरने शेतकऱ्यांबरोबरच्या व्यवहारासाठी संपूर्णतः वेगळे तत्त्व स्वीकृत केले. त्यानुसार शासनाच्या बळकटीसाठी जमिनीची मालकी संपूर्णतः सरकारकडे न ठेवता जमीन कसणाऱ्यांना जमिनीबाबत निश्चित अधिकार दिले. जमिनीचा अधिकतम भाग खाजगी मालमत्ता म्हणून घोषित केला. संपूर्ण गावजमीन तेथील रहिवासी व सरकारची संयुक्त मालमत्ता म्हणून पडीक जमीन, गावकऱ्यांच्या गुरांसाठी चराई रान आणि लागवडीयोग्य जमीन, शेतकऱ्यांची अथवा कुळांची मालमत्ता असे वर्गीकरण केले. तद्वतच शेतकऱ्यांना जमिनीशी निगडित

करण्यासाठी लागवडीयोग्य जमीन वैयक्तिक मालकीची ठरविली तसेच जमीन कसणाऱ्या कुळांना उत्पादनात हिस्सा मिळण्याची पद्धती सुरू केली. हे त्याच्या चतुर प्रशासनाचे एक महत्त्वाचे अंग होते.[९] खानदेश-वऱ्हाडात नुकताच स्थिरावू लागलेला लेवा पाटीदार शेतकरी जमिनीचा मालक बनला तो या तोडरमल व त्यानंतरच्या मलिक अंबरच्या महसूल पद्धतीमुळे.

शहाजहानच्या प्रारंभीच्या काळातच १६३०-३२ मध्ये खानदेशात दुष्काळ आणि लढायांमुळे हलाखीची स्थिती निर्माण झाली. पीटर मंडीनामक विदेशी प्रवासी खानदेशातून १६३० मध्ये जाताना त्याला भयानक चित्र दिसले. दुरवस्थेत पिडलेले लोक व अनेक मृतदेह त्याला दिसले. अन्नाच्या शोधार्थ लोक इकडे-तिकडे फिरत.[१०] अब्दुल हमीद लाहोरीदेखील या दुष्काळाचे वर्णन पुढीलप्रमाणे करतो.

"The inhabitants of these territories offered for a loaf, but none would buy, rank was to be sold for a cake, but none care for it. For a long time dog's flesh was sold for a goat's flesh and pounded bones of the dead were mixed with flour and sold. Those lands which had been famous for their fertility and plenty, now retained no trace of productiveness".[११] डॉ. कि. का. चौधरी यांनी या दुष्काळी परिस्थितीचे अतिशय वास्तव वर्णन **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**मध्ये खालीलप्रमाणे केलेले आहे.

सस्यं सुदुर्लभमभूत्स्वर्ण तु सुलभं तदा।
प्रस्थमात्राणि रत्नानि विनिमय्य धनी जनः।।
कथंचन समाधत कुलन्प्रस्थसंमितान्।
आहाराभावतोत्यर्थ हाहाभूताः परस्परम् ।।
पशून्वै पशवोऽजन्नुर्मानुषा अपि मानषान्।। शि. भा. ८.५३.५५.

अर्थ - या दुष्काळात धान्य महाग होऊन सोने स्वस्त झाले. शेरभर रत्ने देऊन शेरभर कुळीथ मिळण्यास मुश्कील पडे. अन्नाच्या अभावाने विव्हळ होऊन माणसे माणसास व पशू पशूस खाऊ लागले.[१२] यात अतिशयोक्ती असली तरी दुष्काळाच्या भीषण स्थितीची कल्पना येते. शहाजहानचा मुक्काम दक्षिणेत असताना पडलेल्या भीषण दुष्काळाचे स्वतः पाहिलेले वर्णन सुरतच्या एका उच्च व्यापाऱ्याने बटेव्हियाच्या डच कौन्सिलास दि. २१ डिसेंबर १६३१ च्या पत्रात लिहून पाठविलेले होते.

शहाजहानच्या काळात बऱ्हाणपूर येथे अन्नगृहे उघडण्यात आली. रोज येथून रस्सा व भाकरी वाटण्यात येत. दर सोमवारी ५ हजार रुपये गरीब लोकांना वाटून देत असत. बादशहा व सरदार यांनी या भागातील लोकांना साऱ्यात सूट दिली होती.[१३]

इ.स. १६३४ मध्ये निर्माण करण्यात आलेल्या खानदेश सुभ्यामध्ये बागलाण कळवणपासून वऱ्हाडचा काही भाग म्हणजे मलकापूरपर्यंतचा भाग व गाळणा किल्ल्यापर्यंतचा

प्रदेश समाविष्ट करण्यात आला. म्हणजे या सुभ्याच्या पूर्व भागात लेवा गणप्रदेश समाविष्ट होता.

शहाजहानला लाभलेल्या शांततेच्या काळात तोडरमल पद्धतीनुसार शेतजमिनीची मोजणी करून प्रति बिघा (एक बिघा=०.८ एकर) जमिनीच्या उत्पन्नाचा अंदाज करण्यात आला आणि प्रत्येक शेतावर बसवायच्या महसुलाचा दर निर्धारित करण्यात आला. या महसूल आकारणीला खानदेशात 'तनखा' म्हणत. या काळी व सतराव्या शतकाच्या अंतापर्यंत खानदेशात सेनादलाच्या हालचाली, बादशहा व अमिरांचे वास्तव्य आणि बऱ्हाणपूर-सुरत व्यापारी मार्गास मिळालेले संरक्षण, या कारणांनी खानदेशाची भरभराट झाली. इ.स. १६६० मध्ये खानदेशाचा महसूल सुमारे पावणेतीन कोटी रुपये होता. गावांची सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आल्याने लोकसंख्या बरीच वाढली. सतराव्या शतकाचा मध्यान्ह म्हणजे खानदेशाच्या भरभराटीचा शिखरबिंदू होता. औरंगजेबाच्या दुसऱ्या सुभेदारीच्या काळात (१६५३-१६५८) मुर्शिद कुली खाननामक अधिकाऱ्याने येथील महसूल पद्धतीची पुनर्रचना केली. नासधूस झालेली गावे पुन्हा वसविण्यासाठी महसुलात सूट देऊन अल्प प्रमाणात का होईना, पण तगाई कर्जे दिली. बर्निअरनुसार या काळात वार्षिक महसूल घटला. मात्र, सतराव्या शतकाच्या अखेरीस व्यापार व शेतीची भरभराट पूर्वपदावर आली.[१४] बर्निअरचा समकालीन टॅव्हर्निअर (१६४०-१६६०) नवापूरहून नंदुरबार, थाळनेर, चोपडा, सांगवी व रावेर या मार्गे म्हणजे यावल ते रावेर या लेवा गणप्रदेशातून जाताना वाटेत त्याला सुबत्ता दिसली. येथील मलमलीचे कापड पर्सिया, तुर्कस्तान, अरबस्तान, कैरो व पोलंडपर्यंत निर्यात होई. महिलांचे बुरखे, दुपट्टे व वेलबुट्टी असलेले बरेच कापड येथून जात असे. त्याचप्रमाणे चादरी, हातरूमाल, जरीचे कापड, रेशमी वस्त्रे व उंची कापड येथून निर्यात होई. टॅव्हर्निअर तर म्हणतो की, हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही भागात इतकी कापसाची विपुलता नव्हती[१५] आणि हा कापूस पिकविणारा भाग म्हणजे लेवा पाटीदारांचा लेवा गणप्रदेश होय.

शिवाजी महाराजांच्या उदयानंतर मराठे व मुघल यांच्या संघर्षात खानदेशाला पुन्हा अवकळा आली. खानदेश ही मराठे व मुघलांची संघर्षभूमी बनली. त्यामुळे मराठ्यांनी अनेक वेळा शत्रूचा प्रदेश म्हणून या भागाची लूटमार केली. यात खानदेशातील सारेच शेतकरी आणि व्यावसायिक होरपळले. शिवाजी महाराजांच्या खानदेशातील मोहिमांना आळा घालण्यासाठी दख्खनचा मुघल सुभेदार बहादूरखान याने फर्दापूर, तोंडापूर, बोरारपुरी, राजदेर, लखनवाडा, देवगाव, राजुरा, दिलेरखान इत्यादी ठिकाणांबरोबर लेवा पाटीदार स्थित असलेल्या मलकापूरलाही खिंडींना दरवाजे घातले. प्रत्येक खिंडीजवळ तोफखान्यासह फौजदार नियुक्त केले.[१६] हा बहादूरखान जून १६७२ ते सप्टेंबर १६७७ आणि मे १६८० ते १६८२ या कालावधीत दख्खनचा मुघली सुभेदार होता. इ.स. १६७४ अखेरीस लेवा गणप्रदेशास अगदी लागून असलेले धरणगाव शिवाजी महाराजांनी लुटले.

त्यात इंग्रजांची वखारही लुटली. संभाजीच्या काळात मराठ्यांनी खानदेशातील अनेक ठिकाणे लुटून औरंगजेबास जेरीस आणले. यात खानदेशाचा सुभेदार खान-इ-जहानला आपले सर्व किताब, सन्मानचिन्हे, जहागिरी व मनसब गमवावे लागले.[१७] आणि औरंगजेबास स्वत: दक्षिणेस यावे लागले. औरंगजेबासही संभाजी व मराठा सरदारांनी जेरीस आणले. सतराव्या शतकाअखेर आणि अठराव्या शतकाच्या सुरुवातीस खानदेशातील ठिकाणांवर मराठ्यांच्या चढाया चालूच होत्या. तटबंदी नसलेल्या गावांवर मराठे वरचेवर हल्ला करीत व चौथाई वसूल करीत.[१८] रावेर परगण्यातील शेतकरी गढ्यांमध्ये आश्रय घेत व तेथे धनदौलत सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करीत. बहुधा याच काळात सावदा, रावेर व यावल परगण्यांमधील गावांमध्ये गढ्या बांधण्यात आल्या असाव्यात, जुन्या गढ्या मजबूत करण्यात आल्या असाव्यात. तटबंद्या बांधण्यात वा दुरुस्त करण्यात आल्या असाव्यात वा तटबंद्यांचे दरवाजे सुरक्षित करण्यात आले असावेत. लेवा गणप्रदेशातील गढ्या, तटभिंती, दरवाजे वा त्यांचे अवशेष आजही यावल, आमोदे, फैजपूर, सावदा, कळमोदे, कुंभारखेडा, चिनावल, खिर्डी, वाघोदे, खिरोदा, खानापूर, तळवेल इ. ठिकाणी पाहावयास मिळतात. यावरून मराठा-मुघल संघर्षाचे लेवा पाटीदारांच्या जनजीवनावर घडून येणारे परिणाम दिसून येतात. १७०७ नंतरच्या राजकीय संघर्षामुळे खानदेश प्रदेश फारच उद्ध्वस्त झाला. शके १६३० म्हणजे इ.स. १७०८ मध्ये लेवा पाटीदारांच्या दृष्टीने महत्त्वाची घटना म्हणजे सावदेकर देशमुखास गंभीर पट्टीबाबत अधिकार दिल्याचा दावा केला जातो.[१९] प्रस्तुत लेखकाच्या मते लेवा पाटीदारांना सावदे परगण्यामुळे सावदेकर म्हणत असल्याने सावदेकर देशमुखास गंभीर पट्टीचे अधिकार दिल्याचे स. ना. भालेराव म्हणतात. ते लेवा पाटीदार देशमुखास हे अधिकार दिले गेले असावेत व हा देशमुख बहुधा यावलला स्थित असावा. तोच लेवा पाटीदारांचा कुटुंब नायक होता.

मुघल किंवा नंतर आलेल्या मराठ्यांनी वेळोवेळी महसूलविषयक बदल केलेत. तथापि गाव किंवा प्रशासनात कोणतेही बदल केलेले दिसत नाहीत. पाटील गावप्रमुख होते तर कुलकर्णी गावाचा महसुली हिशेब ठेवीत. लेवा पाटीदारांची वस्ती असलेल्या भागातील बहुतांश गावांचे पाटील लेवा पाटीदार होते व आहेतही. गावाच्या इतर गरजांसाठी बलुतेदारी पद्धती अस्तित्वात येऊन बारा बलुतेदारांना धान्य स्वरूपात मोबदला देण्याची पद्धतीही रूढ झाली होती. ही बलुतेदारी पद्धती नष्ट होत असली तरी लेवा पाटीदार समाजाने आजतागायत टिकवून ठेवली आहे. लेवा पाटीदार शेतकरी हा ब्राह्मण पुजारी तसेच न्हावी, गुरव, चांभार, कुंभार, सोनार, धोबी, माळी, महार (नवबौद्धांनी आता बलुतेदारी नाकारली आहे) या बलुतेदारांना हंगामात खळ्यातच धान्याच्या राशीतून सढळ हस्ते धान्यरूपी मोबदला देत असतो.[२०]

मुघल काळात खानदेशाची जमीन अत्यंत सुपीक असल्याचे मानले जाई. खानदेशाचा पूर्व भाग हमखास पर्जन्य क्षेत्रात (Rainfall assured zone) येत असल्याने

मधूनमधून पडणारे दुष्काळ वगळता पुरेसा पाऊस पडत असे. टॅव्हर्निअरच्या काळापर्यंत सतराव्या शतकाचा मध्यान्ह म्हणजे खानदेशाच्या भरभराटीचा उच्चबिंदू होता. ज्वारी, कापूस व भात ही मुख्य पिके असल्याचे वर नमूद केले आहे. अबुल फझल, राल्फ फिच, थेवेनॉट आणि टॅव्हर्निअर या इतिहासकारांनी दिलेली माहिती वर नमूद केली आहे. यावल, फैजपूर, सावदा, बऱ्हाणपूरचा कापूस प्रसिद्ध होता. एरंडोल - जळगाव भागातील आंब्याची बाग इतकी प्रसिद्ध होती की, शहाजहान बादशहाने तेथील आंब्यास 'बादशहा पसंद' असे नाव दिले. एदलाबाद भागात द्राक्षे पिकवित असल्याची इतिहासात नोंद आहे.[२१]

इ.स. १७१३ मध्ये बादशहाने दक्षिण कारभारावर चिनकिलिच खानास नेमले. तथापि, या चिनकिलिच खान तथा निजामाने १७२० मध्ये लाचलुचपतीने असिरगड हस्तगत करून खानदेश-वऱ्हाडावर ताबा मिळविला. त्याने पेशव्यांशी मैत्रीचा तह केला. खानदेश चौथाई सरदेशमुखीचे हक्क ज्यास मुकासा म्हणत ते कान्होजी भोसलेस मिळाले होते.

सन १७५२ च्या सुमारास भालकीच्या तहानुसार मराठ्यांनी खानदेशाचा बराच भाग निजामाकडून हस्तगत केला व १७६० मध्ये संपूर्ण खानदेश मराठ्यांनी जिंकला. सन १७६३ मध्ये निजामाने माधवराव पेशव्यास दिलेल्या उर्वरित खानदेशमधील गावांमध्ये सावद्याचा समावेश होता. अल्पावधीत माधवराव पेशव्याने आपला मामा सरदार रास्ते यास सावदा जहागिरी दिली. १८१८ मध्ये इंग्रजांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत सावदा व तेथील गढी रास्ते घराण्याच्या मालकीची होती. माधवराव पेशव्यांच्या काळात व नंतर मात्र या भागात स्थिरस्थावर आल्याचे दिसते. इ.स. १७७९ मध्ये कर्नल गॉडर्ड हा खानदेशमार्गे गेला तेव्हा तो खानदेश संपन्न असल्याचा उल्लेख करतो. वाटेतील सर्व गावांनी त्याच्या चमूला अन्नसामग्री पुरवली. त्याला प्रजा उद्योगी, सुखी व परोपकारी वाटली. बऱ्हाणपूरच्या पश्चिमेस ८० मैलापर्यंतच्या प्रदेशात खेडीच खेडी होती. हा सर्व भाग (लेवा गणप्रदेश; सुपीक, संपन्न, लागवडीखाली होता. डी. एम. भनसाळी- **खानदेश डिरेक्टरी**, पृ. १७).

पेशव्याने १७५२ व १७६० मध्ये खानदेश हस्तगत केल्यावर बरेच देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे व देवरुखे ब्राह्मण खानदेशात आलेत.[२२] मराठेसुद्धा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर असले तरी येथील मूळ रहिवासी नसून दुसरा बाजीराव पेशव्याच्या कारकिर्दीत (१७९६-१८१८) नाशिक, पुणे, सातारा व अहमदनगर जिल्ह्यांमधून इकडे आलेले आहेत. ब्रिटिश काळात १८१८ नंतर सारस्वत, कनोजे, गोकर्ण व तेलंगी ब्राह्मण इकडे आलेत. खानदेशातील बरेच कुणबी दरखनच्या कुप्रसिद्ध दुष्काळाच्या वेळी (१८७५-१८७७) दक्षिण महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातून उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करून आलेले आहेत. शिवाय रेल्वे बांधणीच्या वेळी व नंतर (१८६१-१८६५) अहमदनगर,

पुणे, सातारा व सोलापूर भागातून मराठे तसेच इतर जाती-जमातींचे लोक खानदेशात येऊन स्थायिक झालेत.[२३] याचा परिणाम असा झाला की, लेवा गणप्रदेशातील बहुसंख्येने असलेल्या लेवा पाटीदारांचे व गुजरांचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण पहिल्यापेक्षा कमी झाले. इ.स. १८७२ पूर्वी अधिकृत जनगणना न झाल्यामुळे हे कोणाच्या लक्षात आले नाही.

मराठ्यांना खानदेशाचा काही भाग निजामापासून मिळाल्यानंतर तनखा महसूल पद्धती जशीच्या तशी पुढे चालू ठेवली. पेशवेकाळात या पद्धतीस "खानदेश तनखा झाडा" असे म्हटले जाई. या पद्धतीमध्ये साडेबारा टक्के दराने सरदेशमुखी वसूल केली जात असे. पेशवे दप्तरातील घडणी दप्तरामध्ये १७६४-६५ मध्ये खानदेशामधून ५७ लाख ४ हजार रुपये जमा झाल्याची नोंद आहे.

मराठेशाहीच्या अंतापूर्वी खानदेशचा बहुतांश भाग इंदूरच्या होळकरांकडे होता. होळकर व दोस्तांच्या फौजांच्या सर जॉन माल्कम व सर थॉमस हिस्लाप यांच्या सेनेशी झालेल्या लढाईत (२१ डिसेंबर १८१७) मराठ्यांचा पराभव झाल्याने तहानुसार होळकराने सातपुड्याच्या दक्षिणेकडील खानदेशचा भाग ब्रिटिशांना देण्याचे मान्य केले. १८१८ मध्ये दुसरा बाजीराव ब्रिटिशांना शरण आल्यावर संपूर्ण महाराष्ट्रावर ब्रिटिश अंमल आला. यावल, चोपडा, अमळनेर येथील किरकोळ उठाव ब्रिटिशांनी चिरडून टाकले.

खानदेश ब्रिटिशांनी घेण्याआधी येथील लोकांना पेंढाऱ्यांचा खूप उपद्रव झाला. पूर्व बाजूच्या टेकड्यांमधील भिल्लांच्या नेतृत्वाखाली पेंढारी तुकड्या असिरगड खिंडीतून येऊन लुटालूट करीत. सर्वत्र दहशत बसवित. प्राणहानी करून लोकांची धनदौलत लुटून नेत. १८१७ मध्ये वॉरन हेस्टिंगजने निजामाच्या घोडदळाच्या मदतीने पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले.

खानदेश मराठ्यांच्या ताब्यात आल्यावर स्थानिक जहागीरदारांकडून मराठे चौथाई, रयतेकडून उत्पन्नाच्या एकदशांश भाग आणि इतर सर्व कर मिळून एकूण ३५ टक्के कर वसूल करीत. तरीसुद्धा ही वसुली प्रत्यक्षात मुघल काळातील वसुलीच्या निम्मी होती. हा काळ शेतकऱ्यांसाठी अतिशय त्रासदायक होता.

मूळ महसुलाशिवाय (ऐन जमा) सरकारी उत्पन्नाचे दुसरे नियमित साधन म्हणजे शेतकरी व जनतेकडून गोळा केले जाणारे अतिरिक्त उपकर (शिवाय जमा) हे होते. ते प्रत्येक उपविभाग व गावात निरनिराळे असत. त्यापैकी प्रमुख म्हणजे विनिमय (बट्टा), गुऱ्हाळ गिरणी, महारांच्या सेवेऐवजीचे अधिदान (बाबनुक राबता महार), किरकोळ अधिकाऱ्यांसाठी धान्य मागणी (भिकी), अन्य संक्रमित जमिनीचे धारकांवरील कर (इनाम पट्टी), लपविलेल्या साधनसामग्रीवरील कर (चौकशी), विड्याच्या पानांवरील कर (पान टक्का), तुटीसाठीचा उपकर (कसर), तंबाखूवरील कर (जरील तंबाखू) आणि मिरास जमिनीवरील कर (मुडपट्टी) हे उपकर होते. ते पाटील वसूल करीत. उपरोक्त

उपकरांशिवाय सरकार दंड व समपहरण (कमाविस गुन्हेगारी), सरकारजमा (बैतनमाल), ठेवी व तात्पुरत्या जमा (अनामत), गुरे चराई शुल्क (वनचराई), गवत कापणी शुल्क (घास कतरणी), हवालदारी, जास्ती पट्टी (एकसाली) हे करसुद्धा वसूल करीत असे. त्यात शेतकरी चांगलाच भरडला जाई.

शेतकरी सारा भरण्यास असमर्थ ठरल्यास त्याला शिक्षा ठोठावीत. उपाशी ठेवणे, डोक्यावर मोठा दगड ठेवणे, कोठडीत डांबणे, उन्हात अनवाणी चालायला लावणे अशा जबर शिक्षा असत. शिक्षा देऊनही सारा भरला नाही तर मामलेदार त्याची गुरेढोरे जप्त करून त्यास तुरुंगात ठेवी. संपूर्ण गाव सारा भरण्यास असमर्थ ठरल्यास पाटलास जबर शिक्षेला तोंड द्यावे लागे. गावखर्च खात्यापोटी जनतेला मोठी रक्कम भरावी लागे.

ब्रिटिश कालावधीचा १८१८ ते १८३२-३३ पूर्वीचा काळ मंदीचा, तर त्यानंतरचा काळ खानदेशाच्या प्रगतीचा होता. सन १८१८ मध्ये खानदेशात सर्वत्र अरण्ये वाढली होती. शहरे व खेडी उद्‌ध्वस्त झाली होती. जमीन सुपीक असूनही प्रदेश ओसाड पडला होता. रस्ते नादुरुस्त झाले होते. सन १८२१ मध्ये एकूण क्षेत्रापैकी ४५ टक्के क्षेत्र कृषी अयोग्य, ४३ टक्के क्षेत्र कृषियोग्य परंतु पडीक आणि फक्त १२ टक्के क्षेत्र लागवडीखाली होते. बहुतेक गावांना लुटारूंपासून आणि हिंस्र श्वापदांपासून संरक्षणासाठी तटबंदी आणि गढ्या होत्या. निम्म्याहून अधिक गावे ओसाड तर काही गावे अंशत: लागवडीखाली होती. सन १८१९ मध्ये जिल्ह्याचा काही भाग मोठ्या प्रमाणावर लागवडीखाली आला. तेथील ओसाड गावांच्या अवशेषांवरून पूर्वीच्या भरभराटीच्या खुणा दिसत होत्या. अधिकतम जमीन सुपीक असली तरी झाडी वाढल्यामुळे ती नापीक झाली होती. तापीच्या उत्तरेकडील ज्या भागातून (यावल व रावेर तालुक्यांचा भाग) एकेकाळी भरपूर शेतसारा मिळत होता; तो भाग आता जंगलमय व ओसाड झाला होता. बहुतेक लोक जुलमाने पिळले जात होते. ते उद्योगप्रिय असले तरी संशयी बनले होते. जिल्हा व ग्राम अधिकाऱ्यांच्या साहाय्याने व्यापारी व जमीनदार अन्य वर्गावर जुलूम व जबरदस्ती करीत. त्यामुळे अल्पभूधारक, मजूर व अन्य लोकांना जगणे कठीण झाले होते. कॅप्टन ब्रिग्ज लिहितो की, या पीडित लोकांना धर्माचरण करण्यासही सवड नव्हती. सन १८१९-२० मध्ये शेतकऱ्यांना पैशाच्या स्वरूपात महसूल भरण्याची ब्रिटिशांनी सक्ती करताच खानदेशात धान्याच्या किमती भराभर उतरल्या व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते.[२५] सन १८२१ मध्ये जिल्ह्यातील १८ पैकी १७ मामलेदार देशस्थ दखनी ब्राह्मण होते. ते कार्यक्षम असले तरी त्यांच्यामध्ये न्यायालयीन कार्यक्षमतेचा अभाव होता.[२६] त्यांनी भोळ्याभाबड्या लेवा पाटीदार शेतकऱ्यांना लुबाडले नसले तरच नवल.

ब्रिटिशांच्या काळात पेशव्यांनी बहाल केलेले वंशपरंपरागत जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांचे अधिकार काढून घेण्यात आले. कॅप्टन ब्रिग्जची खात्री झाली होती की, वंशपरंपरागत जिल्हा अधिकाऱ्यांचा जनतेवरील प्रभाव हे जुलुमाचे मूळ होते.

त्यांचे अधिकार संपुष्टात आल्याने शेतकऱ्यांचा जाच बराच कमी झाला. ब्रिटिशांनी गाव अधिकाऱ्यांच्या वंशपरंपरागत सेवा कायम ठेवल्या व जिल्हा आणि तहसील अधिकारी शासन नियुक्त केले. गाव कर्मचाऱ्यांमध्ये पाटील, कुलकर्णी, महार, सुतार, चांभार, कुंभार, न्हावी, धोबी, मांग, जोशी, मुल्ला, सोनार, जागल्या आणि पाणक्या या १५ जणांचा समावेश होता. त्यांना ग्रामसेवेबाबत जमिनी इनाम म्हणून देण्यात आल्या.

पूर्वीच्या सरकारी व्यवस्थेत (मराठा काळ) 'औतबंदी' आणि 'टिकेबंदी' हे जमाबंदीचे दोन प्रकार होते. नवीन प्रशासन व्यवस्थेत जमाबंदी गावप्रमुखांशी न करता प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी करण्यात आली. गावप्रमुखाच्या मध्यस्थीने प्रत्येक शेतकऱ्याचे धारणक्षेत्र ठरविण्यात येऊन कलेक्टरने शेतसारा ठरविला. 'मुळबंदी' म्हणजे कोणत्याही अभिलेखाशिवाय जमिनीवर एकत्रितपणे ठरावीक सारा आकारणीची पद्धती. ती इतर राज्यांपेक्षा खानदेशात जास्त प्रचलित होती. मुसलमान व मराठा काळात दस्तऐवज अभावामुळे या पद्धतीचा स्वीकार केला होता. त्या वेळी जमिनीची स्थिती आणि क्षेत्र याबाबत निश्चित स्वरूपाची माहिती उपलब्ध नव्हती. जमीन मोजणीचे निश्चित तंत्र नव्हते. निर्धारित शेतसारा दर अस्तित्वात नव्हता. इ.स. १८१८-२० च्या दरम्यान गुजरात व वऱ्हाडातील लोक येथे स्थलांतरित झाल्याने १५५ च्या वर खेडी पुन्हा गजबजू लागली.

सन १८२१ मध्ये जिराईत, मोटस्थळ व पाटस्थळ अशा तीन प्रकारच्या जमिनीसाठी वेगवेगळे दर अस्तित्वात होते. लेवा पाटीदारांच्या क्षेत्रात अर्थातच पाटस्थळ नव्हतेच. सन १८२९ मध्ये कर्नल साईक्सने केलेल्या खानदेशातील चौकशीत असे आढळले की, या प्रदेशातून दख्खनमधील इतर भागांपेक्षा सर्वात जास्त महसूल मिळत असे.[२७]

इ.स. १८२७ व १८२८-२९ मध्ये मशागतीखालील क्षेत्रात घरे झाल्यामुळे सरकारने शेतसाऱ्यामध्ये सूट दिली. बागायती क्षेत्रात वाढ करण्यासाठी बागायत क्षेत्रातील करात सूट दिली आणि विहिरी खोदण्यासाठी अग्रीम रकमा मंजूर केल्या. कोरडवाहू जमीन साऱ्यातही सूट दिली. डनलॉपच्या मते खानदेशातील लोक इतर भागांपेक्षा सुखी होते. १८३१-३२ मध्ये असमाधानकारक पिकांमुळे लागवडीखालील क्षेत्रात घरे झाल्याने सरकारने साऱ्यात पुन्हा सूट दिली.

इ.स. १८३७ मध्ये रेव्हरंड मिचेल खानदेशातून गेला असता त्याला असे आढळले की, बराच भाग जंगलव्याप्त असून खेडी ओसाड पडली होती. या भागातील लोक गरीब, आज्ञाधारक व कष्टाळू असून त्यांच्या मदतीसाठी ठिकठिकाणी विहिरी व तलाव खोदून सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत होते. खानदेशामध्ये ब्रिटिश राजवटीबाबत जितके समाधान होते; तितके इतरत्र कोठेही नव्हते. सन १८४४-४५ च्या सुमारास मि. इनव्हेरॅरिटी यास सावदा-नशिराबाद भागातील सधन वर्गाचा ऱ्हास झालेला दिसला.

सावद्यातील गरीब लोक जमिनीवरील कराच्या ओझ्याखाली जगत असल्याचे दिसून आल्यामुळे लोक उदासीन दिसले.

सन १८५२ मध्ये खानदेशात महसूल सर्वेक्षणाची प्रथा प्रथम पाडण्यात आली. या सर्वेक्षणास विरोध करण्यासाठी त्या वेळी उद्‌भवलेल्या उद्रेकाची माहिती ह्याच ग्रंथातील **'पूर्वजांचा इतिहास'** या प्रकरणात सविस्तर दिली आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते ब्रिटिशांच्या Divide and Rule नीतीनुसार याच वेळी 'थोरगव्हाणे' हा लेवा पाटीदारांचा स्वतंत्र अंतर्विवाही गट (Endogamous Group) निर्माण झाला असावा. खानदेश हा मुंबई इलाख्यातील सर्वात मोठा महसुली भाग होता. नैसर्गिक साधनसामग्री विपुल असूनही हा भाग मागासलेला व बराच भूभाग पडीक होता. म्हणून सर्वेक्षण होणे आवश्यक वाटल्याने सरकारने सर जॉन (कॅ.) विंगेट यांची खानदेशमध्ये नियुक्ती करून सर्वेक्षण अहवाल तयार करण्याचे आदेश दिले. त्याच्या अहवालानुसार एक-चतुर्थांशपेक्षा अधिक खेडी ओसाड होती. महाराष्ट्रातील इतर भागांमधील जमिनीपेक्षा येथील जमीन सुपीक असूनही येथील लोकसंख्या घनता (दर चौ. मैलास फक्त ६३) कमी होती. क्षमतेच्या एक-चतुर्थांश लोकच येथे वास्तव्यास होते. शेतकरीवर्ग सधन होता. प्रत्येक शेतकऱ्याकडे बैलजोडी व बैलगाडी होती. पश्चिमेकडील बंदरांकडे माल नेण्याने त्यास नफा भरपूर होई.

ब्रिटिश काळात कॉलरा, दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, टोळधाड, महायुद्धे, मंदी इ. चा फटका इतर भागांप्रमाणे याही भागाला बसला. मात्र, या काळात सुधारणाविषयक व शैक्षणिक अनेक कायदे संमत झालेत. वऱ्हाडाखालोखाल खानदेशी कापूस मँचेस्टर व लँकेशायर मिलांमध्ये तद्वतच मुंबईच्या कापड गिरण्यांमध्ये जाऊ लागला. त्यामुळे कपाशी हे नगदी पीक झाले व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती पहिल्यापेक्षा सुधारली. लढाया, पेंढारी व भिल्लांची लूटमार यावर पायबंद बसला. त्यामुळे लोक बरेच निर्धोक झाले. भुईमुगासारखे नगदी पीकही वाढले. एकंदरीत ब्रिटिश कालावधीत मराठा कालापेक्षा सुबत्ता व शांतता होती. सावकारांच्या विळख्यातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी म्हणून इ.स. १८७९ मध्ये डेक्कन ॲग्रीकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट संमत केला. इ.स. १९३९ मध्ये मुंबई सरकारनेसुद्धा बॉम्बे ॲग्रीकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट संमत केला. लँड मॉर्टगेज बँक शेतकऱ्यांना कृषिकर्जे देऊ लागली. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली. जिल्हा मध्यवर्ती बँकही शेतकऱ्यांना तगाई कर्जे देऊ लागली.

पहिल्या महायुद्धानंतर बऱ्याच लेवा पाटीदारांच्या जिनिंग-प्रेसिंग फॅक्टरी सुरू झाल्या. काही लेवा पाटीदारांनी शेंगदाणा तेल काढणाऱ्या ऑईल मिल सुरू केल्या. जिनिंग-प्रेसिंग फॅक्टऱ्या फैजपूर, सावदा, भुसावळ, सांगवी, यावल, एदलाबाद, मलकापूर भागात काढण्यात आल्या. काही लेवा पाटीदार दुकानदारी व व्यापारातही पुढे आले. काही सावकारी करीत.

इ.स. १९९०-९१ च्या कृषिगणनेनुसार (Agricultural Census) जळगाव व बुलडाणा जिल्ह्यांतील वहितधारकांची संख्या व जमिनीचे क्षेत्र खाली दिले आहे.

जिल्हा	सिमांतिक (एक हेक्टर पर्यंत)	अल्प भूधारक (१ ते २ हेक्टर)	निम्न मध्यम भूधारक (२ ते ४ हेक्टर)	मध्यम भूधारक (४ ते १० हेक्टर)	मोठे भूधारक (१० हेक्टर पेक्षा जास्त)	एकूण	सरासरी वहितधारक जमिनीचे क्षेत्र
१	२	३	४	५	६	७	८
जळगाव							
संख्या	९६६००	१३११००	९३३००	४८१००	४७००	३७५८००	-
क्षेत्र (हेक्टर)	५८५००	१८९४००	२५७९००	२७७९००	७१५००	८५५२००	२.२८
बुलडाणा							
संख्या	६४०००	९५३००	७२६००	४३५००	६१००	२८१६००	-
क्षेत्र (हेक्टर)	४०९००	१३८६००	१९९९००	२५६६००	८४७००	७२०७००	२.५६

वरील तक्त्यावरून दिसून येईल की, जळगाव व बुलडाणा जिल्ह्यांत एक ते चार हेक्टरपर्यंत वहितधारकांची संख्या जास्त आहे. (८५% पेक्षा जास्त).

लेवा पाटीदार शेतकरी खूपच कष्टाळू व जिद्दी आहे. बागायती पिके घेणारा बहुतकरून केळी व उसाचे नगदी पीक घेतो. लेवा पाटीदार शेतकऱ्यांची जिद्द वाखाणण्यासारखी आहे. कारण, अत्यंत प्रतिकूल हवामान असतानासुद्धा केळीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतो. केळीस ३४ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त व १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान मानवत नाही. असे असतानाही खानदेशात केळीचे पीक विपुल येते. याचे श्रेय लेवा पाटीदार या कष्टाळू शेतकऱ्यास जाते. हा शेतकरी उन्हाळ्यात पिकास भरपूर पाणी देऊन शेत आर्द्र ठेवतो. सन १९८५-८६ मध्ये जिल्ह्यातील एकूण पिकाखालील क्षेत्राच्या १.८२ टक्के क्षेत्र केळीखाली होते. भारतातील एकूण केळी लागवडीखालील क्षेत्राच्या ७४.७३ टक्के क्षेत्र जळगाव जिल्ह्यात होते. त्यातही यावल व रावेर या दोन तालुक्यांत जळगाव जिल्ह्यातील एकूण केळी लागवडीखालील क्षेत्राच्या दोन तृतीयांशपेक्षा अधिक क्षेत्र असते. हा शेतकरी हेक्टरी सरासरी ५० ते ५५ मे. टन केळीचे उत्पादन काढतो. एवढे मोठे श्रम घेऊन व एवढे उत्पादन काढून मलिदा मात्र उत्तर भारतीय व सिंधी व्यापारी खातो. कष्टकऱ्याच्या हातात अगदीच अल्प मोबदला मिळतो. जळगाव जिल्ह्यातील विशेषकरून लेवा पाटीदार असलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत रेल्वे वॅगन उपलब्ध करून देणे याबाबत शासनाकडून फारसे प्रयत्न होत नाहीत. तद्वतच एवढे प्रचंड पीक घेणाऱ्या भागात मंदीच्या कालात भाव मिळत नसेल तर साठवणुकीसाठी शीतगृहेही शासनाने बांधलेली नाहीत. यामुळे अगदी पडेल भावातसुद्धा हा नाशवंत माल

शेतकऱ्यास मातीमोल भावाने विकावा लागतो.

महाराष्ट्राच्या मागास भागातील अनुशेष भरून काढण्यासाठी अहवाल तयार करणाऱ्या महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा (दांडेकर समिती) अहवाल, मुंबई, १९८४ यात १९७८-७९ मध्ये जळगाव जिल्ह्याचे कृषी उत्पन्न संपूर्ण महाराष्ट्रात सर्वाधिक असल्याचे नमूद केले आहे. म्हणजे महाराष्ट्रातील एकूण निव्वळ कृषी उत्पन्नाच्या ७.१५ टक्के उत्पन्न (एकूण २०१.५० कोटी रु. व निव्वळ १९८.१४ कोटी रु.) जळगाव जिल्ह्याचे होते. असे असतानाही जळगाव जिल्ह्यात कृषी विकासावर योजनेतर दरडोई होणारा खर्च महाराष्ट्रातील दरडोई कृषी विकासावर होणाऱ्या खर्चाच्या तुलनेने अत्यल्प आहे. असे असूनही जळगाव जिल्ह्याचे कृषी उत्पन्न इतर जिल्ह्यांपेक्षा अधिक आहे. इ.स. १९७८-७९ मध्ये महाराष्ट्रात कृषी विकासावर दरडोई २ रुपये खर्च झाला. जळगाव जिल्ह्यात कृषी विकासावरील दरडोई खर्च अवघा ०.९६ रु. (म्हणजे फक्त ९६ पैसे), पशुसंवर्धनावर ०.८५ रु. (८५ पैसे) व दुग्धविकासावर ३.५७ रु. होता. पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात हा कृषी विकासावरील खर्च दरडोई ४.०० रुपयांच्या वर होता. जळगाव जिल्ह्यातील सर्वाधिक उत्पादनाचे श्रेय शासनाद्वारे कृषी विकासावर होणारा खर्च नसून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विशेषकरून लेवा पाटीदार शेतकऱ्यांचा कष्टाळूपणा आहे. याच अहवालानुसार बुलडाणा जिल्ह्यात १९७८-७९ मध्ये कृषीविकासावरील योजनेवर दरडोई खर्च ३.४१, पशुसंवर्धनावर १.०१ रु. आणि दुग्धविकासावर ५.४७ रु. होता. त्या वर्षी बुलडाण्याचे एकूण निव्वळ कृषी उत्पन्न ८५.२७ कोटी रु. होते. या वर्षी दरडोई कृषी उत्पन्नसुद्धा जळगाव जिल्ह्याचे सर्वाधिक म्हणजे ८०२.५१ रु. होते. बुलडाणा जिल्ह्याचे ते ६०१.७६ रु. होते, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी ४६९.१२ रु. होते. हा अन्याय महाराष्ट्राचे महसूलमंत्री दूर करतील, अशी आशा आहे.

पोशाख- पूर्वी लेवा पाटीदार शेतकऱ्यांचा पोशाख हा काठेवाडी-गुजराती शेतकऱ्यांप्रमाणे असायचा. सौराष्ट्रातील शेतकरी सुरवार नेसत असे. लेवा पाटीदार शेतकरी त्याऐवजी धोतर नेसत असे व हे धोतर दुहेरी काष्ठ्याचे पोटऱ्यांपर्यंत असे. त्यानंतर महाराष्ट्रीयन-गुजराती शेतकऱ्यांसारखा धोतराप्रमाणे धोतर नेसू लागला. पूर्वी कंबरेपर्यंत पोहोचणारा झबल्यासारखा अंगरखा परिधान करीत असे. यास खानदेशात बाराबंदी किंवा बंडी असेही म्हणत. या अंगरख्यास बाराबंद असत. डोक्याला मोठे पागोटे असे. क्वचित जाकीटही परिधान करीत असे. हे कपडे खेडोपाडी विणलेल्या जाड्या-भरड्या खादीपासून व ब्रिटिशकाळात हरकसारख्या कापडापासून शिवत असत. खांद्यावर उपरणे असायचे. उपरणे बहुधा लाल वा हिरव्या कणांचे असे. पायात जे खेटर (बूट) घालीत असे; त्याचा आकार राजस्थानी वा सौराष्ट्री जुत्यासारखा असे. मात्र, हे खेटर मागून उघडे असे व ते संपूर्ण चामडी वादीने शिवलेले असे. या खेटराचे पुढचे टोक पसरट दोन टोकांसारखे व वाकडे व्यालमुलासारखे असे. हा शेतकरी पूर्वी मिशा व शेंडी

ठेवीत असे. ब्रिटिश कालावधीत बरेच लोक सदरा, पायजमा व टोपी आणि चपला असा वेश परिधान करू लागले. त्यानंतर पँट, शर्ट, बुश शर्ट, बूट असा पोशाख करू लागले.

महिला हातमागावर विणलेली लुगडी नेसत. खणाच्या कापडापासून शिवलेली कंचुकी ज्यास चोळी म्हणत ती परिधान करीत असत. पाटीदार महिला नेहमी पदर घेत असत. पायात चपला वा वहाणा घालीत असत. हल्ली नऊवारी पातळे व ब्लाऊज असा खेड्यांमध्ये तर पाचवारी साडी, ब्लाऊज असा मोठे खेडे व शहरात पोशाख करतात. नऊवारी पातळ नेसणाऱ्या महिलांची संख्या कमी होऊ लागली आहे. फैजपूरच्या हातमाग साड्या प्रसिद्ध होत्या. त्यांचा रंग पक्का असे.

लग्नामध्ये नवरा मुलगा सूट शिवतो. तद्वतच नवरी शालू, पैठणी व भारी साड्या नेसते.

दागिने - आयुर्वेदानुसार सोने, चांदी, तांबे व मोती यांना वैद्यकीय गुणधर्म असल्यामुळे त्यांचे दागिने करतात. सौभाग्यवती व सवाष्ण महिलांना मंगळसूत्र अत्यावश्यक असते. मंगळसूत्र हे सोन्याचे असते. ऐपतीनुसार लहानमोठे करतात. महिलांच्या डोक्यावरील दागिन्यांमध्ये पूर्वी मूद, अग्रफुल, राखाडी, केतकी-केवडा, गुलाबाचे फुल, बिंदी-बिजोरा, चंद्रसूर्य, गोंडेफुल, चांदीचे तोडे, वाक्या इत्यादी दागिने असत.

महिलांच्या गळ्यामध्ये घालण्याच्या दागिन्यांमध्ये, चक्रहार, चंद्रहार, चपलाहार, बकुळीहार, पुष्पहार, मोहनमाळ, पुतळ्यांची माळ, बोरमाळ, कोल्हापुरी साज, एकदाणी, सरी, वज्रटीक, ठुशी, पेट्या, तनमणी, लफ्फा, लॉकेट या सोन्याच्या दागिन्यांचा समावेश होता. लेवा पाटीदार महिला समारंभात हे दागिने घालतात. परंतु मंगळसूत्राबरोबर एकदाणी हा दागिनाही सदैव वापरत असत.

मोती व रत्नांचे दागिने क्वचित श्रीमंत घराण्यातील महिलाच वापरतात. हातातील दागिन्यांमध्ये सोन्याच्या बांगड्या, पाटल्या, गोठ, बाजुबंद (केयूर) आणि तोडे यांचा समावेश होता. ग्रामीण लेवा पाटीदारांमधील गरीब महिला नेहमी वापरण्यासाठी चांदीचे तोडे घालत असत. आता ही प्रथा रूढ नाही.

कानातील दागिन्यांमध्ये कुड्या, कानातील रिंग आणि कर्णफुल यांचा समावेश होतो. लेवा पाटीदार महिलांमधील पूर्वीची विशेषता म्हणजे लग्नानंतर सौभाग्यवती महिला एका कानात पाचतूरनामक दागिना परिधान करीत असत.[२८] असे विल्यम क्रुकने १९१० च्या बुलडाणा गॅझेटिअरमध्ये नमूद केले आहे. पाचतूर दागिना म्हणजे कानातील सोन्याच्या रिंगमध्ये पाच पोवळे व पाच सोन्याचे मणी असत. फार पूर्वी पोवळ्यांऐवजी पाचू वापरत असावे आणि दुसऱ्या कानात कर्णफुल घालत असत. कर्णफुल हे सोन्याचे व त्यात सात मोती गुंफलेले असत. लेवा पाटीदार महिला ओळखण्याचे ते एक चिन्ह होते. ही प्रथा फार पूर्वीपासून म्हणजे स्थलांतरापूर्वीची असावी. लेवा पाटीदारांचे पूर्वज जेव्हा भारतात नुकतेच स्थायिक होऊ पाहत होते; त्या वेळी चौथ्या शतकात कौशंबीचा

राजा उदयन याच्या कथेवर भासाने लिहिलेल्या **स्वप्नवासवदत्त** या नाटकातील नायिका; तसेच सातव्या शतकात ठाणेश्वर (पंजाब) राजधानी असलेल्या हर्षवर्धन (इ.स. ६०६ ते ६४७) या सम्राटाच्या दरबारात माखरी (गया) चा बाणभट्ट हा साहित्यिक असताना त्याने हर्षवर्धनावर **कादंबरी**नामक कादंबरी संस्कृतमध्ये लिहिली असून त्यातील नायिका ही एका कानात ताटक व दुसऱ्या कानात कुंडल अशी भिन्न कर्णभूषणे वापरत असे.[२१] ताटकाला राजस्थानात लाटकात असेही म्हणत. राजस्थानातील जयपूर भागात मोती, हिरे लावलेली किंवा जडावाचे काम असलेली कर्णभूषणे असत व ती कानाबरोबर सपाट असत. त्यांना 'बाले झाब्बेदार' म्हणत. त्यातील मोत्यांचे लोलक असलेल्या सोनेरी कर्णभूषणांना 'लटकात' म्हणत. यावरून लेवा पाटीदार महिलांनी प्रतिहार घराण्यातील पूर्वीची प्रथा चालू ठेवली असावी. ती आता लोप पावली असली तरी मागच्या शतकापर्यंत रूढ होती.

महिलांच्या नाकामधील नथ आणि चमकी हे दागिने असून नथ फक्त लग्न समारंभात वापरतात. चमकी सर्रास वापरतात. पायांमध्ये चांदीच्या तोरड्या घालतात व पायातील अंगठ्यांमध्ये जोडवे व अंगठ्यास लागून असलेल्या बोटात विरोल्या हे चांदीचे दागिने घालतात. ते सौभाग्याचे लक्षण समजतात. कमरेवरील दागिन्यात चांदीचा कमरबंद व चांदीचा छल्ला वापरतात.

मुलांच्या दागिन्यांत बिंदल्या, मनगट्या आणि कडीतोडे यांचा समावेश होतो. चांदीचे करगोटेही बांधतात. मुलांच्या गळ्यातील दागिन्यात प्रामुख्याने गोफ, हंसली, साखळी, वैती आणि लॉकेट हे सोन्याचे दागिने घालतात. पायात घुंगुरवाळे हा चांदीचा दागिना घालतात. त्याशिवाय कानात कान टोचल्यावर (मुलांच्या कर्णवेध समारंभानंतर) सोन्याच्या व चांदीच्या बाळ्या घालतात.

आहार - लेवा पाटीदारांचा आहार तसा साधाच, परंतु पौष्टिक. तसे लेवा पाटीदार हे मुळात शाकाहारी आहेत. पूर्वी तर मांसाहार करणाऱ्यास वाळीत टाकत असत. आता मांसाहार करणाराकडे दुर्लक्ष करतात एवढेच. आता काही लोक क्वचित मांसाहार करू लागले आहेत, परंतु ते घराबाहेर. घरालील चुलीवर अजूनही कोणी मांस शिजवित नाही. पौरोहित्य करणारा ब्राह्मण जर मांस खाऊ लागला व मद्यपान करू लागला तर साध्या भोळ्या पापभीरू माळकरी लेवा पाटीदारास दोष देण्यात काय अर्थ?

यांचे प्रमुख अन्न म्हणजे ज्वारीची भाकरी व पालेभाजी किंवा फळभाजी. शेंगदाण्याची व मिरच्यांची चटणी लावून केलेली भाजी असते. घरात भाजीपाला नसला तरी यांचे काही अडत नाही. उडीदमिश्रित ज्वारीची/कळण्याची भाकरी, वर शेंगदाणा टाकून केलेली मिरच्यांची लसूण-कोथिंबीर मिश्रित चटणी किंवा मिरच्यांचा लसूणमिश्रित ठेचा किंवा खर्डा, तोंडी लावायला कांदा, लोणचे, पापड, बिबळे असले तरी यांचे भागते. मुळात यांचे पूर्वज चरवाह (Pastoral) असल्यामुळे शेतीबरोबर दूधदुभत्याचा परंपरागत व्यवसाय

होता. अजूनही आहे. त्यामुळे लेवा पाटीदाराच्या घरात सकाळी लोणी घुसळण्याचा आवाज ऐकू येई. त्यामुळे प्रत्येक घरात ताक असेच. ताकामुळे यांच्या रोजच्या जेवणात ताकाची कढी आली. लेवा पाटीदारांकडे सालिना लागलेले सालदार कढीशिवाय जेवणच करीत नसत. कढी-भाकरीचा काला, तोंडी लावायला शेंगदाण्याची लसूणमिश्रित कोरडी चटणी किंवा ठेचा, एखादी भाजी, पापड असला म्हणजे पोट भरून जेवण होई.

शेतीव्यवसाय असल्याने व बरेच लेवा पाटीदार बागायतदार असल्याने यांच्या आहारात फळभाज्या व पालेभाज्या मुबलक असतात. त्यात प्रामुख्याने मेथी, गवार, वाल, वांगे, गिलके (घोसाळे), दोडके (शिराळे), गंगाफळ (लाल भोपळा), चकरी (पांढरा भोपळा), दुधी भोपळा, भेंडी, टमाटे, हरभऱ्याची उसळ, कार्ले, घेवडा, चवळी, पोथीची पाने (अळूची पाने), अंबाडी, आंबट चुका, चिबळ (चिब्बय), घोळ, शेपू, पालक, पोकळा, बटाटा, मिरची, कोथमीर, इ. या सर्वच भाज्या असतात. आता बागायतीमुळे या सर्वच भाज्या बाराही महिने मिळतात. पूर्वी जेव्हा बागायती पिके घेतली जात नसत तेव्हा हंगामातील अतिरिक्त भाज्या सुकवून त्या उन्हाळ्यात वापरत. उदा. वाजाच्या उसऱ्या (गवारच्या उसऱ्या), वांग्याच्या उसऱ्या, अंबाडी, कऱ्होडे (कडबोळे) इत्यादी.

वांग्याचे भरीत तर खानदेशी माणसांस अतिशय प्रिय. हे लोक वांग्याच्या भरिताच्या मेजवान्या झोडतात. बामणोद परिसरातील वांगी भरतासाठी प्रसिद्ध आहेत. तसेच वऱ्हाडात डाळगंडोरी (दायगंडोरी) प्रिय. डाळगंडोरीस मिरच्यांची भाजी असेही म्हणतात. यात दोनचार पालेभाज्या व फळभाज्या व हिरव्या मिरचीचे काही तुकडे असतात. भाज्या व मिरचीचे तुकडे तूरडाळ किंवा तूर, मूग, हरभरा या डाळींच्या मिश्रणात शिजवतात. त्यात आंबट चुका किंवा चिंचा घालतात. वरून सुक्या खोबऱ्याचे तुकडे भाजून घालतात. ही भाजी म्हणजे दाक्षिणात्य सांबारच होय. घरात अगदीच भाज्या नसल्या तर डाळींच्या कडबोळ्यांची किंवा मिश्रडाळीच्या वड्या (भेंडके) व कढी यावरही भागते.

प्रमुख अन्न ज्वारीची भाकरी असली तरी आता पोळीही करतात. वरण-पोळी, भात, भाजी असाही बेत असतो. क्वचित प्रसंगी डाळ-तांदळाची खिचडीही करतात. भात खाण्याचे प्रमाण तसे कमीच असते. हल्ली पातोळ्या, सेव व उडदाच्या डाळीची मसाल्याची भाजीही (घेंगा) करतात.

पूर्वी पाहुणचाराला शिरा-पुरी, भजी, गुलगुळे, वडे, भाजी, कढी, पापड असा बेत असे. काळाबरोबर हंगामानुसार पाहुणचाराच्या पदार्थांमध्येही बदल झाला आहे. उन्हाळ्यात आंब्याचा रस व पन्ह करण्याकडे कल असतो. खानदेशी माणसास गावराणी (साजूक) तूप अतिशय प्रिय. वरण-भातावर, पुरणपोळीवर किंवा आंब्याच्या रसावर गावराणी तूप लागतेच. त्याशिवाय जेवण नाही. पूर्वी खिरोद्याचे साजूक तूप पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. फैजपूरला साजूक तुपाचा बाजार भरत असे. त्यात रोज सकाळी आजूबाजूच्या खेड्यांमधून

शेतकरी तूप विकावयास आणत. पूर्वी म्हशींना सरकी खाऊ घालत. त्यामुळे कणीदार तूप येत असे. उपवास सोडताना वरण-भात, डाळ-बाटी असा बेत असतो. त्यावर साजूक तूप लागतेच.

यांचे बिबळ्यांचे व जोंधळ्याचे, चिकणीचे पापड, गव्हाच्या कुरडया, उडदाचे पापड वैशिष्ट्यपूर्ण असतात. प्रत्येक लेवा पाटीदाराच्या घरात १०-१५ किलो कैऱ्यांचे गूळ घातलेले लोणचे असतेच. त्याशिवाय लिंबू, मिरचीचेही लोणचे घालतात.

लेवा पाटीदार ताटात हात धुतात. ही गुर्जरत्ता म्हणजे राजस्थानातून चालत आलेली प्रथा असावी.

राहणीमान- लेवा पाटीदारांमध्ये श्रीमंत फारच थोडे आहेत. बहुसंख्य समाज मध्यमवर्गीयांमध्ये गणला जातो. तसेच गरीब वर्गही बराच मोठा आहे. यांची घरे आता चुना-विटांची, लोखंडी बिमच्या गर्डरची असतात. व्यवस्थित प्लॅस्टर केलेली असतात. आता पुष्कळ जण सिमेंट काँक्रीटची आर.सी.सी. घरे बांधतात. पूर्वी घरात बाथरूम असायचे. परंतु संडास नसे. आता घरोघरी संडास बांधू लागले आहेत. घरे बहुधा दोन मजली असतात. त्यात स्वतंत्र स्वयंपाकघर, बैठक खोली, झोपायची खोली व सामान ठेवण्याची खोली असते. घरात कुवतीनुसार बसण्यासाठी बाके किंवा सोफे, पलंग, खुर्च्याही कमीजास्त प्रमाणात असतात. एखादा रेडिओ, टेप रेकॉर्डर, टी व्ही. असतो. चुलीची जागा आता गॅसने घेतली आहे. आता बहुतेक जणांच्या मनगटावर घड्याळ दिसते. बऱ्याच जणांकडे मोटारसायकली दिसतात. क्वचित मोटारगाडीही दिसते. काही जणांकडे ट्रॅक्टर असतो. एकंदरीत या भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान तसे सुधारलेले दिसते.

पूर्वी मातीची जाड भिंतींची, धाब्याची घरे होती. ती रोज शेण-मातीने सारवावी लागत. अजूनही तशी घरे बरीच आढळतात. घरे तशी लहानच. घरात एक चौक (बाथरूम), समोर ढोरे बांधत. आता गुरेढोरे स्वतंत्र बांधतात. पूर्वी म्हणजे ६० वर्षांपूर्वी गावात दोन-चार सायकली दिसत. १९७० च्या सुमारास सायकलींचे प्रमाण खूपच वाढले. गावात दोन-चार मोटारसायकली दिसत. आता घरोघरी मोटारसायकली दिसतात. शिवाय, खेड्यात १५-२० मोटारकारही दिसतात.

प्रकरण १० - तळटिपा

१. एच. के. शेरवानी, पी. एम. जोशी (संपा.), **हिस्टरी ऑफ मेडिव्हल डेक्कन,** खंड १, पृ. ६.
२. **गुलशने इब्रा-हिमी,** फरिश्तालिखित **गुलशन-ई-इब्राहिमी** ग्रंथाचा डॉ. भ. ग. कुंटे यांनी केलेला अनुवाद, १९८२, पृ. ५१२.
३. कित्ता, पृ. ५१३-१४.
४. डॉ. कि. का. चौधरी, ''मध्ययुगीन काळ'', **जळगाव जिल्हा गॅझेटियर,** १९९४, पृ. ८८.

५. शेरवानी, जोशी, पूर्वोक्त, खंड १, पृ. ५१३; डॉ. कि. का. चौधरी, ''मध्ययुगीन काळ'', पूर्वोक्त, पृ. ७८.

६. शेरवानी, जोशी, पूर्वोक्त, पृ. ५०१; डी. एम. भनसाळी, **संयुक्त खानदेश डिरेक्टरी**, जळगाव, १९५८.

७. अबुल फझल, **ऐन-ई-अकबरी**, खंड २ (इंग्रजी भाषांतर), १९८९, पृ. २३२. यात एक तनखा=२४ अकबरी दाम किंवा एक रुपया=४० अकबरी दाम. (एन तनखा = १.६७ रुपये)

८. डॉ. कि. का. चौधरी, **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ९०.

९. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, १९९४, पृ. ६०३.

१०. डॉ. कि. का. चौधरी, **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ९१.

११. अब्दुल हमीद लाहोरी, **बादशाहनामा** (इंग्रजी अनुवाद), पृ. २४; डॉ. कि. का. चौधरी, **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, पूर्वोक्त, पृ. ९१.

१२. डॉ. कि. का. चौधरी, पूर्वोक्त, पृ. ९१.

१३. डी. एम. भनसाळी, पूर्वोक्त.

१४. **खानदेश डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर**, १८८०, पृ. २५०.

१५. **जळगाव डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर**, १९६२, पृ. ७४.

१६. गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत** (सुधारित आवृत्ती) खंड १, १९८८, पृ. २७७.

१७. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, १९९४, पृ. ९८.

१८. कित्ता, पृ. ६६.

१९. स. ना. भालेराव, ''प्राचीन भारत व अर्वाचीन जळगाव'', **गिरणाई**, जळगाव नगरपालिका शताब्दी ग्रंथ, १९६४.

२०. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, १९९४, पृ. १८६.

२१. कित्ता, पृ. १००.

२२. कित्ता, पृ. १०२.

२३. कित्ता, पृ. १०२-१०३.

२४. यापुढील महसूलविषयक माहिती **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, १९९४ वर आधारित आहे.

२५. डॉ. जी. बी. शहा, ''मराठी साम्राज्यातील खानदेशमधील महसूल व्यवस्था'', **भारतीय इतिहास व संस्कृती**, त्रैमासिक, जुलै-सप्टेंबर १९८९.

२६. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर**, १९९४, पृ. ६०८.

२७. कित्ता, पृ. ६११.

२८. **बुलडाणा डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर**, १९१०, पृ. १२४.

२९. **मराठी विश्वकोश**, खंड ३.

✧✦✧

प्रकरण ११

लेवा पाटीदारांचे तीर्थस्थान व पर्यटन केंद्रे

तीर्थस्थान-चांगदेव-मुक्ताबाई

चांगदेव आणि मुक्ताबाई ही लेवा गणप्रदेशातील दोन वेगवेगळी परंतु अगदी जवळजवळ असलेली स्थाने आहेत. त्यातील चांगदेव स्थानाचे नाव तेच असून मेहूण गावास मुक्ताबाई असे म्हणतात. सध्या एदलाबादचे नाव बदलून मुक्ताईनगर ठेवले आहे. खरे तर मेहूणचे नाव मुक्ताईनगर ठेवणे अधिक सयुक्तिक होते. ही नाथपंथीय तीर्थस्थाने असली तरी येथे येणारे बहुसंख्य भाविक वारकरी लेवा पाटीदार असल्यामुळे या स्थानांची माहिती लेवांचे तीर्थस्थान म्हणून देणे उचित वाटते.

चांगदेव - (मुक्ताईनगर तहसील, २१°००' उ. अक्षांश व ७६°००' पू. रेखांश) हे तापी व पूर्णा यांच्या संगमावर असलेले गाव सावदा रेल्वे स्थानकाच्या आग्नेयेस ९.६ कि.मी. वर तसेच मुक्ताईनगर (एदलाबाद) च्या वायव्येस ६.४ कि.मी. वर वसले आहे. चांगदेवपासून केवळ तीन कि.मी. अंतरावर असलेल्या मानेगाव येथे पुरातत्त्वज्ञ बी. पी. बोपर्डीकरांना आद्य-पुराश्म युगातील (इ.स. च्या दीड ते एक लाख वर्षे आधी) मानवनिर्मित वस्तूंच्या अवशेषांचे (artefacts) नमुने आढळले आहेत.[१] त्यावरून या स्थानाच्या प्राचीनतेची कल्पना येऊ शकते. पुरातत्त्वज्ञ डॉ. शंकर अण्णाजी साळींच्या मते सध्याचा तापीचा प्रवाह आद्य-पुराश्म युगाच्या (इ.स. पू. दीड लाख ते एक लाख वर्षे) शेवटच्या व मध्य-पुराश्म युगाच्या (इ.स. पू. एक लाख ते ३० हजार वर्षे) काळात अस्तित्वात आला आहे. चांगदेव व हातनूर गावांमधील बेसाल्ट तलशिला (Rock Bed Besalt) भागातील तापीचा सध्याचा प्रवाह आद्य-पुराश्म युगाच्या आधीच्या जलोढ निक्षेपातून

तयार झाला आहे.[२]

आषाढी वा कार्तिकी एकादशीला जसे वारकरी पंढरपुरी जातात, तसेच प्रत्येक एकादशीला लेवा पाटीदार चांगदेव-मुक्ताबाईच्या वारीला जातात. चांगदेव गावास पूर्वी सुंदरपूर, तापी नदीस बदरी आणि पूर्णा नदीस पयोष्णी असे म्हणत असत. चांगदेव नावाचे तीन महापुरुष इतिहासात होऊन गेलेत. त्यापैकी चांगदेव राऊळ हा फलटणचा व द्वारकेस राहिलेला. म्हणून त्यास द्वारावतीचा चांगदेव असे नाव पडले. महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधर हा या चांगदेवाचाच अवतार होता असे मानतात. म्हणून त्यास चांगा चक्रपाणी असेही म्हणतात.[३] दुसरा चांगदेव नावाचा महापुरुष चांगा मुघेश हा नारायणडोह (अहमदनगर जिल्हा) येथील. त्याचे वास्तव्य पुणतांबे (अहमदनगर जिल्हा) येथे झाले. तेथेच त्याची समाधी आहे[४] आणि तिसरा चांगदेवनामक महापुरुष हा जळगाव जिल्ह्यातील त्याच्याच नावाचे गाव असलेल्या चांगदेव येथील चांगा वटेश्वर होय. हा हटयोगी व मराठी रचनाकार चांगा वटेश्वर किंवा वटेश चांगा या नावानेही ओळखला जातो. हा चांगदेव बदरी-पयोष्णी संगमावरील वटेश्वराच्या (उपास्यदैवताच्या) सन्निध समाधिस्थ झाला. याची समाधी चांगदेव येथेच आहे. पुणतांब्यास नाही. या चांगदेवाचे जन्मस्थळ ज्ञात नसले तरी वटेश्वर तथा सुंदरपूर (सध्याचे चांगदेव गाव) येथे तो तपस्वी म्हणून राहिला. वटेश्वर हे त्याच्या उपास्यदैवताचे गाव असावे. थोर संशोधक रा. द. रानडे म्हणतात त्याप्रमाणे ''ज्या वटेश्वराचा उल्लेख **चांगदेव पासष्टी** ग्रंथातही आहे (''स्वस्तिश्री वटेशु'' **चांगदेव पासष्टी**-१) व चांगदेवाच्या अभंगातही आहे, तो चांगदेव म्हणजे चांगदेवाचे उपास्यदैवत असले पाहिजे असे दिसते.''[५] मुक्ताबाईने उपदेश दिला तरी चांगदेवाने उपास्यदैवत वटेश्वरच ठेवले होते.[६] काही जण वटेश्वराला चांगदेवाचा पहिला गुरू मानतात; तर काही वटेश्वर हे त्याचे उपास्यदैवत सांगतात. आपल्या **तत्वसार** या ग्रंथाच्या उपसंहारात चांगदेव म्हणतो :

इति गुरुशिष्यसंवादे। तत्त्वसारप्रबंधे।
कथिलें वटेश्वरप्रसादे। योगरहस्य हे।। (**तत्त्वसार,** ओवी क्र. ८६३-६४)[७].

याशिवाय त्याने आपल्या अभंगातही वटेश्वरसुत चांगा अवधूत अशी आपली मुद्रा वापरली आहे. यावरून वटेश्वर हा चांगदेवाचा गुरू ठरतो. नामदेवाने सोपानदेवाच्या नमनाचे अभंग लिहिताना वटेश्वराला स्वतंत्र नमन केले आहे. यावरूनही चांगदेव व वटेश्वर या दोन भिन्न भिन्न व्यक्ती आहेत हेच सूचित होते.[८] तापीकाठावरील वटेश्वराची त्याने रचलेली एक आरती ज्ञात असून तीत 'तप्तीतीरी देव प्रगट झाला', असा उल्लेख आहे.[९]

भक्तिलीलामृत (अध्याय २) अनुसार इंद्राचा सेवक मरुद्गण याच्या हातून स्वामिकार्यात अनवधानाने काही प्रमाद घडला म्हणून इंद्राने त्याला शाप दिला. इंद्रशापामुळे मरुद्गण तप्ती-पयोष्णी (तापी-पूर्णा) नद्यांच्या रमणीय संगमावर 'स्वरूप लावण्य'

घेऊन जन्माला आले. त्यांच्या सौंदर्यामुळे भोवतालचे लोक त्यांना 'चांगा' म्हणजे सुंदर असे म्हणू लागले.[१०] त्यावरूनच गावास चांगदेव किंवा सुंदरपूर नाव पडले असावे. तापीतीरी त्यांनी दीर्घकाळ तपश्चर्या केली.

चांगदेव हा ज्ञानदेव व नामदेवाचा समकालीन असल्याचे उल्लेख हरिश्चंद्रगडावरील शिलालेखात मिळतात.[११] ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई ही त्याची गुरू होती. तिचे समाधिस्थान चांगदेव गावाजवळील मेहूण हे आहे.

चांगदेव हा मोठा हटयोगी होता. एकदा ज्ञानेश्वराची कीर्ती त्याच्या कानी आली. त्यावर ज्ञानेश्वराला पत्र लिहावे, असे त्याला वाटले; पण मायन्याच्या जागी तीर्थरूप लिहावे की चिरंजीव लिहावे, याचा त्याला निर्णय होईना. अखेर त्याने कोरेच पत्र पाठवून दिले. ते मुक्ताबाईच्या हाती आले. ती म्हणाली, "१४०० वर्षे जगूनही चांगदेव अजून कोराच." मग, ज्ञानेश्वरांनी त्या कोऱ्या पत्राला उत्तर म्हणून ६५ ओव्या लिहून त्याला पाठविल्या. हाच ग्रंथ **चांगदेवपासष्टी** या नावाने प्रसिद्ध आहे.

पुढे चांगदेव वाघावर बसून व हाती सापाचा आसूड घेऊन ज्ञानेश्वरांना भेटण्यासाठी आळंदीस आला. तिथे ज्ञानेश्वराच्या आज्ञेप्रमाणे भिंत चालविण्याचा चमत्कार त्याने पाहिला व तो हतगर्व होऊन ज्ञानेश्वरांना शरण गेला. मग ज्ञानेश्वरांनी त्याला मुक्ताबाईकडून उपदेश देवविला. येथून पुढे हा हटयोगी न राहता ज्ञानी भक्त म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याने **तत्त्वसार** हा वेदान्ताचे विवरण करणारा ओवीबद्ध ग्रंथ एदलाबादजवळ (बहुधा सुंदरपूर तथा चांगदेवलाच) लिहिला असून त्याच्या अभंगांमधून त्याची अधिकारवाणी व चमत्कृतीची आवड प्रत्ययास येते.[१२] हा ग्रंथ नाथपंथाचा एक महत्त्वाचा ग्रंथ ठरतो. हा ग्रंथ इ.स. १३१२ मध्ये लिहिला गेला असला तरी इ. स. १५३१ मधील प्रत उपलब्ध असून तीही अपूर्णावस्थेत आहे.[१३] **तत्त्वसार** मध्ये १०३६ ओव्या असल्याचे कळते; पण त्यापैकी फक्त ४०५ ओव्याच उपलब्ध आहेत.

चांगदेवाचे अभंग पाहता त्याचा ओढा रूपके योजून चमत्कृती निर्माण करण्याकडे आहे. शब्दकुसरीतही तो तरबेज आहे उदा.:

नोवरीचे पोटी नोवरा जन्मला।
सोहळा जाहला काय सांगो।
नोवऱ्याने नोवरी देखिलीच नाही।
सोहळा होतो सांगो काई।

अशी अनेक चमत्कृतीपूर्ण कुटे चांगदेवाने रचली आहेत.

चांगदेवाचे अभंग व **तत्त्वसार**मधील ओव्यांमध्ये त्याने पद, पिंड, रूप व रूपातीत यांच्याविषयी विवरण करून, नंतर निर्गुण भक्तीचे विवरण केले आहे. निर्गुण भक्तीचे लक्षण सांगताना चांगदेव म्हणतो :

जे पाप पुण्यापूर्वी। जन्ममरणाते हारवी।

महाबंधु चेदवी। आत्मस्वरूपे।।
जे दुसरेपणा हाणी। स्वर्ग संसारा धुणी।
जे सविता निर्वाणी। स्वयं शिव।।

निर्गुण भक्तीचे स्वरूप सांगताना मनपवन, षटचक्रे, कुंडलिनी, लयलक्षयोग, समाधी, पंचभुते, शून्य, वज्रासन, इ. हटयोग साधनांची माहिती त्याने दिली आहे. या विवेचनातला विशेष म्हणजे पुढील विचार होय :

जन्हि शरीरसाधना कीजैल। परि नाशिवंत जाईल।
वरी जन्माते सुचिल। दु:ख भूल।।

पुढे निर्वाण व सिद्धयोग यांचे प्रतिपादन करून ब्रह्मविवरण करताना त्याने 'तत्वमसि' ची फोड केली आहे.

चांगदेव दर १०० वर्षांनी योगसामर्थ्याने जुना देह टाकून नवा देह धारण करीत असल्याचे सांगतात. अशी त्यांची १४ समाधिस्थळे व १४ नावे आढळतात. चांगदेव राऊळ, चांगा चक्रपाणी, चांगा वटेश्वर ही त्यापैकीच काही आहेत. चांगदेवाचा पहिला गुरू वटेश्वर असला तरी त्याच्यानंतरच्या गुरू आणखी दोन झाल्यात. त्यापैकी ज्येष्ठ योगिनी मुक्ताबाई ही एक व ज्ञानेश्वर भगिनी मुक्ताबाई ही दुसरी. यांची माहिती यापुढे आली आहेच.

अकराव्या व बाराव्या शतकात कण्हदेशात (खानदेशात) मठांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. महामंडलनाथ सेउना किंवा सेनू दुसरा या यादव सम्राटाचा मांडलिक गोविंद राजा (मौर्य राजा) याने चांगदेव येथील मंदिर अकराव्या शतकात बांधले असावे. वाघळीचे सूर्यमंदिर व संगमेश्वराचे महादेव मंदिर ही चाळीसगाव-पाचोरा भागातील मंदिरेही या राजाच्या कारकिर्दीतच झाली असावीत. चांगदेव मंदिराच्या मूळ गाभाऱ्यात महादेवाचे लिंग असल्यामुळे या मूळ महादेव मंदिरात नंतर चांगदेवाची संगमरवरी प्रतिमा बसविण्यात आली असावी. येथेच जवळपास वटेश्वराची समाधी वा स्थान असावे.

अबुल फझलच्या **ऐन-इ-अकबरी**मध्येही या स्थानासंबंधी पुढीलप्रमाणे आख्यायिका दिली आहे.[१४] एका अंध भक्ताजवळ महादेवाची मूर्ती होती. तिची तो रोज मनोभावे पूजा करीत असे. ही मूर्ती या ठिकाणी हरवली. त्यामुळे खिन्न होऊन त्याने वाळूची तशीच मूर्ती तयार करून तिची तो नेहमीप्रमाणे पूजा करू लागला. दैवी चमत्काराने ही वाळूची मूर्ती दगडाची झाली. या देवालयाजवळच एक झरा आहे. त्यास लोक गंगा मानतात. या झऱ्याबाबत **ऐन-इ-अकबरी**मध्ये दुसरी ही आख्यायिका आहे. एक भक्त त्याला मिळालेल्या दैवी सामर्थ्याने रोज गंगेवर जाऊन स्नान करून येत असे. एके रात्री गंगा त्याच्या स्वप्नात येऊन म्हणाली की, "मी येथे तुझ्याजवळच प्रकट होईन". त्यानुसार दुसऱ्या दिवशी तेथे झरा प्रकट झाला. योगायोग असा की, अतिप्राचीन मानेगावजवळही गंगनामक नाला (झरा) आहे.

चांगदेव मंदिराची वास्तू - या हेमाडपंती शैलीच्या आधीच्या मंदिरातही चुन्याशिवाय दगडांचा वापर करण्यात आला आहे. दगड घोटून व घडवून एकावर एक बसवून भिंती उभारल्यामुळे वास्तू फार मजबूत बनली आहे. मंदिराची वास्तू ४० मी. लांब व ३२ मी. रुंद आहे. आतील सभागृह (त्यापेक्षा यास गर्भगृह म्हणणेच उचित राहील) १२.९० X १२.९० मी. असून त्याचे छत नाहीसे झाले आहे. सभागृहात १६ स्तंभ व १६ अर्धस्तंभ (Pillaster=भित्तिस्तंभ) असून १६ स्तंभ चार भागांत विभागल्याने आतील रचना गूढ वाटते. या स्तंभांवर दगडी कळसाची (शिखर) योजना असावी. परंतु परचक्रामुळे किंवा राजकीय परिस्थितीमुळे काम अर्धवट सोडावे लागले असावे व नंतर शिखराचा भाग विटांचा बांधला असावा. अंतराळावर अंडाकृती घुमटाकार उत्क्षिप्त पद्धतीचे नक्षीदार उतरते छत आहे. डॉ. हेन्री कझेन्सच्या मते अहमदनगर जिल्ह्यातील कोकमठाण मंदिराप्रमाणे या मंदिराचा वरचा भाग विटांचा बनवण्याचीच योजना असावी.[१५]

शंकरपाळ्याच्या आकाराची नक्षी, उथळ शिल्प, आडवे पट्टे, उभी शिल्पे सामावून घेणारी वेलपत्ती वगैरे खुबींचा वापर दर्शनी भागावर करण्यात आला आहे. खांबांचे आकार व कोरीव काम लक्षणीय आहे. या मंदिराची विशेषता म्हणजे एवढे मोठे अंतराळ व गर्भगृह महाराष्ट्रातील कोणत्याच मंदिरात नाही. सभागृहातील १६ स्तंभांची रचना वेरूळच्या कैलास मंदिराप्रमाणे चार वर्गांत आहे. अंतराळाचे छत उत्क्षिप्त प्रकारचे आहे. जंघाभागावरील शिल्प नाभिकाप्रविष्ट (empanelled) नाही किंवा त्याच्यासाठी देवकोष्ठांची योजना नाही. गर्भगृहातील प्रमुख भिंतींवरील शिल्पही तसेच आहे. जंघाभागावर भोवताली मोठ्या कोरीव शिल्पपट्टीवर उठावशिल्पे आहेत. शिल्पपट्टीतील प्रत्येक चौकटीत महिलांच्या प्रतिमा असून प्रमुख चौकटीत एकेक पुरुष प्रतिमा व त्याच्या दोन्ही अंगांस दोन महिलांच्या प्रतिमा आहेत, अशी शिल्पे उत्तर, पश्चिम व दक्षिण बाजूस मध्यभागी असलेल्या चौकटीत आहेत. कझेन्सच्या मते गर्भगृहाच्या प्रमुख भिंतींवरील हे शिल्प कृष्ण व त्याच्या गोपींचे आहे. जंघाभागावरील वैष्णव देवतांच्या वर्चस्वामुळे व गरुडांच्या प्रतिमांमुळे हे मंदिर निर्विवाद वैष्णव पंथियांचे आहे.[१६] मेहूण येथील शिलालेखातही हैहयवंशी शुभकंट याने येथे उग्रादित्य (सूर्य) मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे.

संगमेश्वर महादेव मंदिराप्रमाणेच (ता. पाचोरा) येथेही गर्भगृहाच्या अंतराळाला लहान लंबवर्तुळाकृती घुमटासारखे शिखर आहे. गर्भगृहातील प्रतिमा चांगदेवाची आहे. उत्तर बाजूने प्रक्षालनाचे पाणी बाहेर पडते. तेथे सिन्नरच्या गोंडेश्वर मंदिराप्रमाणेच सुंदर मकरप्रणाल आहे.

या मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंस देवनागरी लिपीतील शिलालेख आहेत. परंतु, ते झिजल्यामुळे वाचता येत नाहीत.

तापी-पूर्णा संगमावर महादेवाचे दुसरे हेमाडपंती मंदिर असून ते हातनूर धरणात बुडाले आहे. या मूळ मंदिराची लांबी १७ मी. व रुंदी ९ मी. आहे. या मंदिराचा

अहिल्याबाई होळकरांनी जीर्णोद्धार केला होता. सन १८३७ मध्ये तापीस आलेल्या महापुरामुळे मंदिराचा कळस ढासळून जवळच पडला होता.

दरसाल महाशिवरात्रीला चांगदेव येथे मोठी यात्रा भरते. ती जिल्ह्यातील एक मोठी यात्रा गणली जाते. यातील भाविक बहुतकरून लेवा पाटीदार असतात. याआधी मुक्ताबाईचे समाधिस्थान असलेल्या कोथळी (मुक्ताईनगरच्या १ कि. मी. पश्चिमेस) या गावी माघ वद्य एकादशीला म्हणजे विजया एकादशीला मुक्ताबाईची मोठी यात्रा असते. खरे तर ही यात्रा माघ वद्य द्वादशीला असते. या दिवशी मुक्ताबाईने आपली इहलोकीची यात्रा संपविली. कोथळीचे यात्रेकरू मेहूण या मुक्ताबाईच्या समाधिस्थानी ज्यास खानदेशात अजूनही मुक्ताबाई नावानेच ओळखले जाते तेथे आणि चांगदेवाला त्यानंतर येणाऱ्या महाशिवरात्रीच्या यात्रेस जातात.

मेहूण - (मुक्ताईनगर तहसील, २०°५' उ. अक्षांश व ७५°०५' पू. रेखांश) हे तापीतीरी असलेले गाव चांगदेवाच्या अगदी जवळ असून रावेर तहसीलमधील निंभोरे रेल्वे स्थानकापासून ८ कि.मी. आग्नयेस व मुक्ताईनगर (एदलाबाद) पासून ८ कि.मी. वायव्येस आहे. सध्याचे मेहूण हातनूर धरणामुळे पुनर्वसन झालेले गाव आहे. पूर्वीचे गाव सध्याच्या गावाच्या दोन कि.मी. वर एका टेकडीवर आहे. हातनूर धरणामुळे ते हलवावे लागले. याच टेकडीवर धरण बांधण्याच्या आधी संत मुक्ताबाईचे स्मृतिमंदिर बांधले आहे. पूर्वी तेथे जुने मुक्ताबाई मंदिर होते. या मंदिराच्या पूर्वेस २.४ मी. लांबी-रुंदीचे सुंदर कोरीव काम केलेले पुरातन अतिशय सुंदर सोमेश्वर महादेवाचे हेमाडपंती मंदिर आहे. माघ वद्य एकादशीपासून महाशिवरात्रीपर्यंत येथेही यात्रा भरत असे. आता फक्त एकादशी-द्वादशीलाच भरते. ही यात्रा म्हणजे कोथळी व चांगदेव यात्रांचाच एक भाग होय.

मेहूण गाव ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाईच्या मंदिरामुळे प्रसिद्ध असून तेथेच तिचे समाधिस्थान आहे. मुक्ताबाईचे समाधिस्थान मुक्ताईनगरजवळील (एदलाबाद) माणगाव (मानेगाव) आहे, असे **मराठी सारस्वत** लिहिणारे वि. ल. भावे म्हणतात. परंतु ते खरे नसून तापीतीरावरील मेहूण हेच तिचे समाधिस्थान होय, असे नामदेवाच्या अभंगावरून दिसते (**नामदेवगाथा** - अभंग क्र. ११७९).[१७] येथे सोमेश्वराचे मंदिर असून त्याचा उल्लेखही नामदेवाने आपल्या अभंगात केलेला आहे. मानेगाव किंवा मुक्ताईनगर येथे महादेव मंदिर नाही. सोमेश्वर महादेव मंदिर मेहूणलाच आहे. मुक्ताबाईचा शिष्य हटयोगी चांगदेव याची समाधी असलेले चांगदेव गाव मेहूणपासून एक कि.मी. दक्षिणेस आहे. ज्ञानदेवाने समाधी घेतल्यानंतर मुक्ताबाईने शके १२१९, वैशाख वद्य १२ ला (इ.स. १२९६) तापीतीरी मेहूण येथे आपली इहलोकीची यात्रा संपविली.[१८]

यादवकालीन सांस्कृतिक इतिहासात या आत्मज्ञानी मुक्ताबाईचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी दिसते. समाजास मरगळ लागण्याची चिन्हे सुस्पष्ट असताना निराश व वैफल्यग्रस्तांना आध्यात्मिक बोधामृत पाजण्याची किमया या संत कवयित्रीने करून

दाखविली. मुसलमानी आक्रमण व गुजरात सुलतानांच्या जुलुमांमुळे गुजरात सोडून खानदेश-वऱ्हाडात नुकत्याच स्थायिक व स्थिर होऊ घातलेल्या लेवा पाटीदार समाजास मुक्ताबाईच्या आध्यात्मिक बोधामृतामुळे जीवन जगण्याचा मार्ग सापडला आणि म्हणूनच हा समाज तापी नदीच्या खोऱ्यात स्थिरावला. हिने रचलेले अभंग समाजाला अंतर्मुख करून गेले व कालप्रवाहात अभंग अक्षर राहिले. मुक्ताईने शेकडो कवने रचली आणि त्याद्वारे भक्तांना बोधामृत पाजले. महाराष्ट्राचे दुर्दैव असे की, मुक्ताईचे आज केवळ ७५ अभंगच उपलब्ध आहेत.[१९] तरीही साहित्यिकांना मान्य करावे लागते की, मुक्ताईची अभंगरचना संख्येने अल्प असली तरी ती महान काव्यगुण व बोधामृताने समृद्ध आहे.

यातून अभिव्यक्त झालेली पारमार्थिकतेची भरारी वाचकांना स्तिमित करते, अंतर्मुख करते. प्रत्येक अभंग म्हणजे आध्यात्मिक गीताच होय. तिच्या अभंगात योगाच्या खुणा, अध्यात्माची उंची, साक्षात्काराचे पडसाद जसे आहेत; तसेच अंतःकरणाचे मार्दव व मनास मोहून टाकणारा भावनेचा हळुवारपणाही आहे. खिन्न झालेल्या ज्ञानेश्वराला निराशावस्थेतून मुक्त करण्यास्तव तिने केलेल्या विनवण्या **''ताटीचे अभंग''** यांत असून त्यातून धाकट्या बहिणीच्या लडिवाळपणाची तसेच परिपक्व प्रौढत्वाची अभिव्यक्ती होते. करुणरसाच्या सूत्रात सहजतेने गोवलेले धीरगंभीर विचार त्यात आहेत. ''ताटीच्या अभंगात'' मुक्ताईचे काव्यकर्तृत्व व व्यक्तिमत्त्व एकवटलेले आहे. इतकी वर्षे जगूनही 'कोरा तो कोराच' राहिलेल्या चांगदेवाला ज्ञानामृत पाजणारी मुक्ताई काव्य तसेच अध्यात्माच्या दृष्टिकोनातून विलक्षण प्रभावी वाटते.[२०] ब्रह्मवादिनी मुक्ताईच्या देहावर वीज पडून ती मरण पावली, असा शब्दशः अर्थ न लावता विद्युतपाताप्रमाणे अनाहत गर्जनेचा साक्षात्कार होऊन तिची प्राणज्योत विझली, असा करणे उचित वाटते.[२१] महाराष्ट्रातील संत मंडळी तिचा एक आत्मज्ञानी, कवयित्री व परब्रह्मीची चित्कला म्हणून गौरव करतात. हिचे चरित्र ज्ञानेश्वर मंडळाच्या व्यापक चरित्रातच गुंफलेले आहे. ती निःस्पृह आणि कोणतीही गोष्ट स्पष्ट बोलण्याइतकी धीट होती. तिच्या धीटपणाबाबत सांगायचे तर संत नामदेव आळंदीला आले असता निवृत्तीनाथ, ज्ञानदेव व सोपानदेव या तिघांनीही त्यांना आदरपूर्वक वंदन केले. नामदेवांनी त्यांना प्रतिनमस्कार केला नाही. ही गोष्ट मुक्ताबाईला खटकल्याने ती नामदेवांना नमस्कार करण्यासाठी पुढे आली नाही. नामदेव हे भक्तश्रेष्ठ आहेत आणि त्यांचे पाय धरणे उचित आहे, असे निवृत्तीनाथांनी समजावूनही तिने नामदेवांना नमस्कार केला नाही आणि ती नामदेवांना स्पष्टच म्हणाली -

झालासी हरिभक्त तरी आम्हां काय।
आंतली ती सोय न ठाऊकी।।
घेऊनी टाळ दिंडी हरिकथा करिसी।
हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणे।।
गुरूविण तुज नव्हेची गा मोक्ष।

होशील मुमुक्षू साधक तूं।।
आत्मतत्वी दृष्टी नाहीच पा केली।
तंववरी ब्रह्मबोली बोलूनी काय।।
तुझे रूप तुवा नाही ओळखिले।
अहंतेते धरिले कासयासी।।

नामदेव परमभक्त असले तरी अद्याप आत्मबोधाला पारखे असल्यामुळे त्यांच्या अंगी भक्तपणाचा अहंकार वसत होता. परमार्थातले त्यांचे हे न्यून मुक्ताबाईने सडेतोड शब्दांत त्यांना दाखवून दिले व हे कटू सत्य त्यांना मान्यच करावे लागल्याने ते विसोबा खेचरला शरण जाऊन आत्मबोध प्राप्त करून घेऊन कृतार्थ झालेत.

निवृत्तीनाथ हे थोरले बंधूच तिचे गुरू होत. त्यांच्याकडून तिने योगसाम्राज्य व सामर्थ्य प्राप्त करून घेतले. एक अलौकिक योगिनी म्हणून तिची तेजोमयी मूर्ती महाराष्ट्राच्या मन:पटावर कायमची विराजमान झालेली आहे. श्री सुशीला कुप्पस्वामी यांनी घडविलेल्या मुक्ताई काव्य **अंतरंगदर्शना**नुसार सगुण भक्तीपेक्षा निर्गुणाच्या प्रचीतीला तिच्या अभंगात विशेष स्थान आहे.[२२] ती म्हणते -

सर्वरूपी निर्गुण संपले पै सर्वदा । आकार संपदा नाही तया।।
आकारिती भक्त मायामय काम। सर्वत्र नि:सीम अंतरी आहे।।

मुक्ताईचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्र व स्वयंभू आहे. तिची ज्ञानावस्था इतक्या पराकोटीला गेली आहे की, त्या अवस्थेत ती आपले स्त्रीतत्त्वही विसरलेली आहे. तिच्या अभंगातून व्यक्त होत राहतो तो केवळ ज्ञानानुभव आणि या तिच्या ज्ञानानुभवाच्या संदर्भात तिची खरी योग्यता कळते, ती चांगदेवाशी झालेल्या संवादातून. सत्याचे निखळ स्वरूपातले ज्ञान त्या संवादातून प्रकट होत जाते.

स्वप्नीचा आत्मा केउता आहे। मागुता ये हे नवल बाई।।
चांगा म्हणे बाई सांग मुक्ताबाई। लटिके साच वर्तते देही।।
मुक्ताई म्हणे चांगया भ्रमिस्त देही। निर्धारी राही स्वप्न कैचे।।
बंधने नाही, बद्ध नाही। साच की लटिके वर्तते तेहि नाही।।
भेद नाही भेदसी काई। साच की लटिकें वर्तते देही।।
नाही सुख दु:ख। पाप पुण्य नाही।।
नाही कर्म धर्म। कल्पना नाही।।
नाही मोक्ष। ना भावबंधन नाही।।
म्हणे वटेश्वरा ब्रह्म नाही। सहजसिद्ध बोले मुक्ताई।।

मुक्ताबाईने चांगावटेश्वराला ज्ञानोपदेश केला, ही तिच्या चरित्रातली महत्त्वाची घटना. मुक्ताबाईची गुरुपरंपरा आदिनाथ-मत्स्येंद्रनाथ-गोरक्षनाथ-गहिनीनाथ- निवृत्तीनाथ-मुक्ताबाई अशी आहे. पण मुक्ताबाईच्या परंपरेत जे अनेक मराठी ग्रंथकार होऊन गेले,

त्या सर्वांनी एकमुखाने मुक्ताबाईला गोरक्षनाथाची शिष्या मानले आहे. तथापि, ज्ञानदेवांचेही गुरू असलेले निवृत्तीनाथ हे तिचे साक्षात वडील बंधू असता, त्यांना डावलून मुक्ताबाईने गोरक्षनाथाचे शिष्यत्व स्वीकारले असेल, हे खरे वाटत नाही. शिवाय, मुक्ताबाईच्या काळात गोरक्षनाथ विद्यमान असणे शक्य नाही. शिवाय, मुक्ताबाई नि:संदिग्ध शब्दांत सांगते की, आपले गुरू निवृत्तीनाथ आहेत.

गोरक्षनाथाची शिष्या असलेली मुक्ताबाई ही रा. चिं. ढेरेंच्या मते विदर्भातील अचलपूरच्या (अमरावती जिल्हा) राजाची कन्या व उज्जैनीच्या विक्रमादित्य राजाची पत्नी होय.[२३] तिचे नाव सत्यवती होते. तिचे योगी दीर भर्तृहरी यांच्यापासून परमार्थप्रेरणा मिळविली होती. ती नेमाने भर्तृहरीला भोजन दिल्याखेरीज स्वत: अन्नग्रहण करीत नसे. एके दिवशी तिला अभ्यंगस्नान करायचे होते. वाट पाहूनही भर्तृहरी लवकर न आल्याने तिने त्याचे ताट वाढून ठेवले व स्नानासाठी वस्त्रे उतरविली. एवढ्यात भर्तृहरी आला व राणी स्नान करीत आहे, असे समजताच तो माघारी वळला. अन्न न घेता त्याने परत जाणे, यात तिचा व्रतभंग होता. म्हणून भान न राहून ती विवस्त्रावस्थेत बाहेर येऊन ताट हाती घेऊन त्याच्या मागे धावली. सीमेजवळ गोरक्षनाथाने भर्तृहरीला छेडले असता तो म्हणाला, 'माता विवस्त्र असता मी तिच्या हातचे अन्न घ्यावे कसे?' त्यावर गोरक्षनाथ म्हणाला 'तू अज्ञान आहेस.' सत्यवतीची ती उन्मनी अवस्था पाहून गोरक्षनाथाने प्रसन्न होऊन कृतार्थ केले. गोरक्षनाथाने तिला घरी जाण्यास सांगितले असता ती म्हणाली 'ते आता शक्य नाही. स्मशानात आणलेले प्रेत परत घरी जात नसते.' ते ऐकून गोरक्षनाथ समजला की, ही स्त्री मुक्त आहे म्हणून त्याने तिचे नाव मुक्ताई ठेवले. गोरक्षनाथाकडून गुरुबोध मिळाल्यावर ती तप:साधना करण्यासाठी श्रीशैल पर्वतावर (आंध्र प्रदेश) गेली आणि तिथे योगिनी म्हणून प्रसिद्धी पावली. हीच ज्येष्ठ योगिनी मुक्ताबाई होय (ही ज्ञानेश्वर भगिनी मुक्ताबाई नव्हे).

तप पुरे झाल्यावर ती श्रीशैलहून महाराष्ट्रात आली. पुढे विदर्भात तिला चांगा वटेश्वर भेटला. त्याला तिने ज्ञानबोध देऊन कृतार्थ केले. पुढे अल्प काळातच तिने समाधी घेतली असावी. चांगा वटेश्वराला अल्प काळातच गुरुविरह झाला. ज्ञानेश्वरांच्या भेटीला आलेल्या चांगा वटेश्वराला ही धाकटी मुक्ताबाई भेटली. परमार्थातला तिचा अधिकारही कळून आला. चांगा वटेश्वराला वाटले की, आपली गुरू मुक्ताई योगिनीच पुनश्च या मुक्ताबाईच्या स्वरूपात जन्माला आली आहे. नावही तेच आणि अधिकारही तोच, म्हणून त्याने कसलाही संकोच न धरता बालयोगिनीचा गुरू म्हणून स्वीकार केला.

ज्ञानेश्वर-सोपानाच्या निर्वाणानंतर मुक्ताबाईला जग उदास झाले. तिलाही परब्रह्मात विलीन व्हावेसे वाटू लागले. ती सोमेश्वरनगरीस आली. तो दिवस वैशाख वद्य द्वादशीचा होता. त्या दिवशी मध्यान्ही एकाएकी वीज कडाडली आणि त्या प्रकाशझोतात मुक्ताबाई एकाएकी अदृष्य झाली. चित्कला विश्वचैतन्यात विलीन झाली. सोमेश्वरनगरी म्हणजेच

मेहूण होय. येथेच सोमेश्वर महादेव मंदिर आहे.

ज्येष्ठ योगिनी मुक्ताबाईची समाधी अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तहसीलमधील मोर्शीपासून ८ कि.मी.वरील सालबर्डी डोंगरावर आहे. त्या डोंगराला कुंजरगिरी असे नाव आहे. हा डोंगर माडू नदीच्या काठी आहे. 'तातोबाची मठी'नामक भग्न हेमाडपंती मंदिराच्या पुढे ज्येष्ठ योगिनी मुक्ताबाईचे शिल्पसुंदर मंदिर आहे. स्तंभांच्या रांगांच्या पलीकडे तिची समाधी व गर्भगृहात शिवलिंग आहे. येथील वातावरण शैव योगिनीच्या समाधीला पोषक आहे.[२४] योगायोग असा की, ज्ञानेश्वरभगिनीची समाधी असलेल्या कोथळी गावाजवळही सालबर्डीनामक गाव व डोंगर आहे.

या मेहूण गावी मार्च १९८४ मध्ये एका पडीक जागेत ९२ सें.मी. रुंद, ६१ सें.मी. उंच आणि १८ सें.मी. जाड ३२ ओळींचा सापडलेला शिलालेख मुक्ताबाई देवस्थानात आणून ठेवला आहे. तसा या शिलालेखाचा मुक्ताबाई मंडळीशी संबंध नाही, तरीही त्याची माहिती खाली देत आहे. शिलालेखाची शेवटची ओळ अर्ध्यातच पूर्ण झाली आहे. प्रत्येक ओळीत साधारणपणे ७९ ते ८९ अक्षरे असून प्रत्येक अक्षराची उंची एक ते दीड सें.मी. आहे. एकविसाव्या ओळीपर्यंत अक्षरे ठसठशीत, सुबक, वळणदार व सुंदर कोरली आहेत. पुढील ओळी जरी त्याच वळणाच्या असल्या तरी पहिल्या २१ ओळींइतक्या वळणदार नाहीत. लेख संस्कृत देवनागरी लिपीत आहे. पूर्वार्धातील भाषा निर्दोष संस्कृत असून उत्तरार्धात काही दोष निर्माण झाले आहेत.[२५] भाऊसाहेब कोलतेंच्या मते प्रस्तुत लेखात दोन कालोल्लेख आहेत. पहिला कालोल्लेख गतशतक ७२८, फाल्गुन शुद्ध ५, बुधवार (पिल्ले जंत्रीनुसार तारीख १६ फेब्रुवारी ८०७, मंगळवार) असा आहे. हा काळ शुभकंटाने सूर्यमंदिर बांधल्याचा आहे. दुसरा कालोल्लेख गतशक ७४७, भाद्रपद शुद्ध ९, रविवार (पिल्ले जंत्रीनुसार शनिवार) तारीख २६ ऑगस्ट ८२५ असा आहे. हा कालोल्लेख जुने सूर्यमंदिर पडून गेल्यावर त्या ठिकाणी नरसिंघदेवाने नवीन मंदिर बांधण्यास आरंभ केला तेव्हाचा काळ आहे. या शिलालेखात राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष (तृतीय गोविंदाचा पुत्र) याचाही उल्लेख आहे. शिलालेखाचा सारांश: - हैहय वंशातील प्रतिकंट राजाचा मुलगा दुसरा शुभकंट हा विक्रमादित्याच्या प्रसादाने साविलीनगरात (अमरावती जिल्ह्यातील गाव) राज्य करीत असताना त्याने बदरी नदीच्या (तापीच्या) काठावर उग्रादित्य मंदिर (सूर्यमंदिर) बांधले. त्याच वेळी सत्याश्रय नृपतीने त्या देवस्थानाला पक्कोडिगा नावाचे गाव दान दिले. कालांतराने हे मंदिर पडले तेव्हा त्या ठिकाणी सूर्यमंदिर बांधून मंदिरातील देवाला पूर्वीच दिलेल्या पक्कोडिगा गावाशिवाय तेथील उग्रादित्य भट्टारक व प्रभाकर महाजन यांनी मिळून मंगलपूरक नावाचे गाव नरसिंघदेवाने दिले, हे नमूद करणे हा प्रस्तुत शिलालेखाचा विषय आहे.

सदरहू लेखातील पक्कोडिगा या ग्रामनामाची ओळख पडत नाही. मंगलपूरक हे गाव मेहूणच्या पश्चिमेस विरुद्ध बाजूस तापीच्या उत्तर तीरावर असलेले रावेर तहसीलमधील

मंगलवाडी हे असावे. मंगलपूरच्या चतु:सीमांपैकी श्रीपूर आजचे मानपूर, व्याघ्रवाटक आजचे वाघुळद आणि अंधिलीनगर आजचे आंदलवाडी असावे. लेखाचा कवी कुसूमबाण हा असून लेखक ताविरयप्प हा आहे. ज्या टेकडीवर मुक्ताबाईचे मंदिर आहे; त्या टेकडीला खाली एक भुयार असून ते महर्षी मार्कंडेयाचे भुयार मानले जाते. हैहयवंशीय (कलचुरी) घराणे रत्नपूरच्या कलचुर्रीचे असून सूर्यवंशी होते. विशेष म्हणजे यातील प्रतिकंट या राजाचे महाराष्ट्र हे व्यक्तिनाम होय. संपूर्ण महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या एकाही राजाचे नाव महाराष्ट्र नव्हते, हे येथे लक्षात घेण्यासारखे आहे. एवढेच नव्हे तर प्रतिकंट, शुभकंट हे राजे जीत होते. अशी हैहय वंशाची ही शाखा महाराष्ट्रीय होती. या शिलालेखावरून हैह वंशियांचे राज्य इ.स. ८०७ मध्ये वा त्यापूर्वीपासून असले पाहिजे. याच शिलालेखात सेंद्रकवंशीय घराण्याची माहिती मिळते. सेंद्रक हे चालुक्यवंशीय होते. या घराण्यातील श्रीअत्रीय्यप्प, श्री मदप्प आणि श्री नरसिंघदेव तिघांनाही ''समाधिगत पंचमहाशब्द'' ही बिरुदे होती. म्हणजे हे राजे महासामंताधिपती होते आणि राष्ट्रकुटांचा तृतीय गोविंद व त्याचा मुलगा अमोघवर्ष यांचे हे घराणे मांडलिक म्हणून नागद (कन्नड तहसीलमधील जिल्हा सीमेवरील नेगद) येथून राज्य करीत होते. त्या राज्यात भुक्ती, विषय असे राजकीय विभाग होते. विशेष म्हणजे हे राजे सूर्योपासक होते. सामान्यतः महाराष्ट्रात सूर्यमंदिर बांधणारे राजघराणे क्वचितच आढळते.[२६]

पर्यटन केंद्र - पाल

पाल (रावेर तहसील, २१°२-०' उ. अक्षांश, ७५°५०' पू. रेखांश, समुद्रसपाटीपासून उंची सुमारे ८०० मी.= सुमारे २,७०० फूट) हे गाव सातपुड्यातील एका पठारावर रावेरच्या पश्चिमेस २२.४ कि.मी.वर वसलेले असून हे पर्यटन केंद्र लेवा पाटीदार कार्यकर्त्यांनी फुलविले आहे. पाल गावाजवळील सुकी नदीकाठी असलेल्या एका टेकडीवर पालोवा नामक ऋषीचे स्मारक आहे. त्यावरून या गावास पाल हे नाव पडले असावे. काहींच्या मते पाल गावावरून येथे आलेल्या एका ऋषीस पालोबा हे नाव प्राप्त झाले. यावल व रावेर तालुक्यांच्या उत्तरेकडील सातपुडा रांगांमध्ये काही उंच शिखरे आहेत. त्यांत पंचपाड (पाच पांडव) शिखरांचा समावेश असून त्यात पालचा समावेश होतो. पालजवळ उत्तरेस असलेल्या मध्य प्रदेशातील सातपुड्याच्या एका शिखरावर सुकी नदीचा उगम होतो. ही नदी पाल, गारबर्डी, लोहारामार्गे वाहत जाते आणि रावेर तहसीलमधील तांदलवाडीजवळ तापीस मिळते. या नदीवर गारबर्डी येथे धरण बांधण्यात आले आहे. पाल येथून वायव्येस मध्य प्रदेश सीमेवर १५.२० कि.मी. अंतरावर वैशाखगडनामक प्राचीन किल्ला आहे. त्यास सुमारे १,८०० पायऱ्या आहेत. तसेच पश्चिमेकडे काही कि.मी. अंतरावर एका दरीत अश्वत्थाम्याचे भग्नावस्थेतील मंदिर आहे. पंचपाड व अश्वत्थामा मंदिरांमुळे या स्थानाचा महाभारतकाळाशी संबंध जोडता येतो. पूर्वी पालहून हिंदलबारी

घाटातून उत्तरेस होळकरांच्या राज्यात जाणाऱ्या मार्गावरून आदिवासी लाकूडफाटा आणत असत. आज या मार्गाचे रूपांतर आमोदे-सावदे-पाल-भिकनगाव (मध्य प्रदेश) असे राज्य महामार्गात झाले आहे. पाल पठारास ऐतिहासिक काळात पाल टप्पा असे संबोधत असत. पालचे काळ्या मातीचे सुपीक खोरे सुमारे २२.५ कि.मी. विस्तारले असून ते मधूनमधून टेकड्यांनी खंडित आहे. त्यास सुकी व तिचे अनेक ओढे व झरे पाणी पुरवतात. सुमारे ३०० वर्षांपूर्वी येथे मोठी वस्ती होती. तेव्हा पाल खोऱ्यात सुमारे ७० आदिवासी खेडी होती व पाल हे त्यांचे मुख्य ठाणे होते.[२७]

पाल येथील जुन्या किल्ल्याचे बुरूज, तट, कोरीव दगडांत बांधलेली मशीद, हत्तीवाडा, काही दुमजली इमारती, १५ नागमुखांचा जलाशय, जुन्या मार्गाच्या (रस्त्याच्या) खुणा आणि बऱ्याच विहिरी, कारंजे, जुनी सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था इ. गोष्टी या स्थळाची प्राचीनता दर्शवितात. सुमारे ३०० वर्षांपूर्वी येथील रहिवाशांनी या भागाचा परित्याग केल्यावर हे संपूर्ण खोरे ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीस कनिया (कन्हया) भट या दरोडेखोरांच्या टोळ्यांचे आश्रयस्थान बनले.[२८]

आभीर अधिपतीचे राज्य असताना येथे त्यांचे स्थानिक मुख्यालय होते. पुढे राज्यावर आलेल्या फारुकींचेदेखील येथे ठाणे असावे. येथील हत्तीवाड्याचे अवशेष तर खचितच दर्शवितात की, पालला बरेच ऐतिहासिक महत्त्व असावे. काही अभ्यासकांच्या मते हत्तीवाडा म्हणजे सुरक्षित बाजारपेठ असावी. यासारखी बाजारपेठ रायगडावर आहे. परंतु, रायगडावरील बाजारपेठ एवढी बंदिस्त नाही. ही बंदिस्त असल्याने अत्यंत सुरक्षित बाजारपेठ ठरते. तथापि, पुरातत्त्वविषयक संशोधनाच्या अभावी पालच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहासावर पुरेसा प्रकाश पडू शकला नाही. ही मशिदीच्या अगदी मागे असल्याने मुस्लिम वास्तू असावी आणि मुस्लिम वास्तूंच्या संशोधनाबाबत महाराष्ट्रीयन इतिहास संशोधकांनी दुर्लक्ष केले असल्याने यावर संशोधन झालेले नाही. दिल्लीचा सुलतान मुहमद तुघलकाने आपली राजधानी दिल्लीहून दौलताबादला स्थलांतरित करताना पालच्या पठारावर विश्रांतीसाठी मुक्काम केला होता. सुलतानाचे अधिकारी व लवाजमा बराच थकल्यामुळे हा मुक्काम बऱ्याच दिवसांचा असावा. त्याच प्रसंगी पालची मशीद बांधण्यात आली असावी.[२९] या मशिदीचा नंतर जीर्णोद्धार करण्यात आला आहे. या मशिदीला चार पायऱ्या असल्यामुळे ती शाही मशीद आहे. मात्र, समकालीन कागदपत्रे, उपलब्ध न झाल्याने अथवा अवशेषांचे उत्खनन न झाल्याने पालचा इतिहास अपुराच राहिला आहे. पुरातत्त्व विभागाने या कामी काही केल्याचे दिसत नाही. अठराव्या शतकाच्या प्रारंभी येथील रहिवाशांनी त्याग केल्याने ते ओसाड बनले. बिटिश राजवट आली त्या वेळी पाल पूर्णत: निर्जन होते जंगली श्वापदांचा सुळसुळाट झाला. त्यातच हा भाग लुटारूंचे आश्रयस्थान झाल्याने वस्ती करण्यास कोणी आले नाही. सन १८२० मध्ये यावलचा सुभेदार निंबाळकर याचा भाऊ सुबहादर निंबाळकर याने २५,४०० रुपयांचा

गाव पुनर्वसनाचा प्रस्ताव शासनाकडे मांडला. परंतु, कॅ. ब्रिग्जने तो झिडकारला.[३०] सन १८२० नंतर पुनर्वसनाचे अनेक प्रयत्न झालेत. परंतु, प्रतिकूल हवामान व जंगली श्वापदांचा उपद्रव या सबबींमुळे यश आले नाही. वास्तविकत: येथील हवामान प्रतिकूल नाही. उन्हाळ्यात ते ४०° सेल्सिअसच्या वर कधीच जात नाही आणि हिवाळ्यात व पावसाळ्यात तर अतिशय आल्हाददायक असते. येथे पाऊसही ३० इंचाच्या वर होत नाही. कनिया भट या लुटारूंच्या टोळ्यांची या भागात दहशत बसल्यामुळे वस्ती करण्यास कोणी धजावले नाही. सन १८६७ मध्ये खानदेशचा जिल्हाधिकारी मि. ॲशबर्नर याने काही कुटुंबांना येथे वास्तव्य करण्यासाठी प्रवृत्त केले. सन १८६९-७० मध्ये मि. जेम्स यानेही काही शेतकऱ्यांना येथे स्थायिक होण्यासाठी प्रलोभित केले. येथे शिवचरण पाटील (परदेशी ब्राह्मण)[३१] याने वसाहत स्थापन केली. माझ्या मते तो ब्राह्मण नसून लेवा पाटीदार असावा. त्याने स्वत:साठी चांगले घर बांधले, काही जुन्या विहिरी दुरुस्त केल्या आणि सुमारे २८० हेक्टर (६०० एकर) जमीन लागवडीखाली आणली. अशा प्रकारे येथील वसाहत वाढून १८७२ मध्ये लोकसंख्या ६८३ व लागवडीखालील क्षेत्र सुमारे ८२५ हेक्टर (सुमारे २,००० एकर) झाले.

पालच्या जुन्या मशिदीच्या प्रवेशद्वारावर राजेशाही कमान आहे. मशीद ८.१ मी. लांब व तेवढीच रुंद असून काळ्या घडीव दगडात बांधली आहे. या मशिदीसाठी चुन्याचा वापर केलेला दिसत नाही. मशिदीसमोरील मिनार ढासळले असले तरी मूळ वास्तू सुस्थितीत आहे. मशिदीमागे ६० मी. लांब व तेवढ्याच रुंदीचा हत्तीवाडा आहे. चार बाजूंच्या भिंती व खोल्यांची रचना दाखविणारे जोते याशिवाय येथे अवशेष नाहीत. काही जण यास हत्ती बांधण्याची जागा संबोधत असले तरी वास्तूचा विन्यास लक्षात घेता ती बाजारहाटाची बंदिस्त सुरक्षित जागा असावी आणि खोल्यांचे जोते आहेत, ती दुकाने असावी. हत्ती किंवा घोड्यावर बसून येथील बाजारहाट करता येत असावी. मशिदीपासून किल्ल्याकडे फरसबंदी मार्ग दिसतो. तद्वतच किल्ल्यातून फरसबंदी मार्गाने सुकी नदीकाठच्या नागझरीजवळ उतरता येते. येथे दाट झाडी असून या झाडींमधील प्रवाहातून नागझरी जलाशयात गोड पाणी पडत असते. या ९ मी. रुंद व १५ मी. लांबीच्या जलाशयास किल्ल्यातील विहिरीतून झरे असल्याचे सांगतात. भूमिगत नळांनी ते सोडले असावे. या जलाशयाला १५ नागमुख (काहींच्या मते गोमुख) असून त्यातून पडणारे पाणी ५०/६० फूट वाहून सुकी नदीत जाते. येथील दगडांच्या जागोजागी असलेल्या राशी म्हणजे जुन्या घरांचे अवशेष आहेत.

इ.स. १९५६ मध्ये खोदकाम करताना पुरातन काळातील काही बांधकामांची सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था आढळली. महमद तुघलककालीन काही नाणीही सापडली असून ती रावेरच्या मामलेदार कचेरीत दाखल करण्यात आली होती. पुढे त्यांचे काय झाले, समजू शकले नाही. पाल येथे २५ वर्षांपूर्वी आभीरराजकालीन मोठ्या विटांत

बांधलेले पुरातन महादेव मंदिर आढळले आहे. तेथे बऱ्याच ठिकाणी गवळणींच्या मूर्तीही सापडल्या आहेत. त्यावरून या गावास आभीरांच्या (गवळी) राजवटीत महत्त्वाचे स्थान असावे. आभीरांची राजधानी असलेले असिरगड येथून फार लांब नाही.

या भागात प्रमुख वस्ती आदिवासी बंजारा, तडवी, भिल्ल, पावरा यांची आहे. हे पूर्वी शिकार, लाकूडतोड, डिंक काढणे, मध गोळा करणे, अंजनपाला विकणे व थोडी शेती यावर उपजीविका करीत. त्यांना डोंगराबाहेरील ग्रामस्थ अक्षरश: लुबाडत. या भागात शाळा, पाणीपुरवठा, दवाखाना वगैरे कसल्याच मूलभूत सुविधा नव्हत्या. लोकांत जंगली सवयी, अडाणीपणा, शिकारीचा नाद, दुर्व्यसने, जडी-बुटी-जादूटोणा यांचे प्राबल्य, परंपरागत समजुती असे वातावरण होते. यांना समाज प्रवाहात आणायचे तर प्रथम त्यांचा अडाणीपणा दूर करून शाळा काढणे आवश्यक होते. स्वातंत्र्यानंतर कै. धनाजी नाना चौधरी यांनी त्यादृष्टीने या भूमिपुत्रांचा उत्थापन कार्यक्रम हाती घेतला व तो यशस्वीपणे राबविलाही. या भागातील अतिमागास लोकांना समाजप्रवाहात आणण्याचा त्यांनी चंग बांधला. धनाजी नानांनी येथे प्रथम व्हालंटरी शाळा सुरू केली. तिचेच रूपांतर आश्रमशाळेत झाले. ही आश्रमशाळा गौरखेडा पंचक्रोशी रचनात्मक समिती चालवित असे. महात्मा गांधी, विनोबा भावे व साने गुरुजींच्या विचारप्रणालीनुसार धनाजी नानांद्वारे सर्वोदय केंद्राची स्थापना करण्यात आल्यावर जळगाव जिल्ह्यातील सर्वोदय केंद्रांसाठी पालची शासनाने निवड केली. आदिवासींच्या सर्वांगीण विकासास प्रारंभ झाला. सर्वोदय केंद्राचे मुख्य ठिकाण खिरोदे असले तरी पाल परिसरातील लहानलहान खेड्यांच्या विकासाचे पाल हे केंद्रस्थान बनले. हलाखीचे जीवन जगणाऱ्या आदिवासींना विकासकार्याचा लाभ दिला धनाजी नानांनी. त्यांच्या हत्येनंतर मधुकररावांनी ही धुरा सांभाळली. महाराष्ट्र शासनाच्या मदतीने मधुकररावांनी महात्मा गांधीप्रणीत जीवन शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या आदिवासी आश्रमशाळेची १९५४ मध्ये स्थापना केली व माध्यमिक शाळा (१९६९), कृषी प्रबोधन केंद्र (१९७२), कनिष्ठ महाविद्यालय (१९८३) व कृषिविज्ञान संशोधन केंद्र (१९८५) यांच्या रूपाने शैक्षणिक परिसर उदयास आला. या सर्व संस्थांमध्ये जैविक तंत्रज्ञानाचे प्रकल्प, औषधी व सुगंधी वनस्पती लागवड, गांडूळखत निर्मिती, सेंद्रिय शेती व इतर विकास उपक्रम सातपुडा विकास मंडळाच्या विद्यमाने चालू आहेत. धनाजी नानांनी लावलेल्या या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर केले मधुकररावांनी व ध. म. बोंडे, सुनीतभाई बोंडे, शिरीष चौधरी, सुधीर चौधरी, रामभाऊ चौधरी, प्रभात चौधरी, प्रल्हाद गुरुजी यांनी त्यास हातभार लावला. सुनीत बोंडे व शिरीष चौधरी यांनी तर इस्रायलमधील तंत्रज्ञान या आदिवासी भागात आणले. त्यांच्या काळात संस्थेस बजाज व जमनालाल बजाज फाउंडेशन व वसंतराव नाईक प्रतिष्ठानचे उच्च पुरस्कारही लाभले. कामसू पण अबोल सुधीरभाईंनी कृषिविज्ञान केंद्राची धुरा सांभाळली होती.

पूर्वीच्या ओसाड ठिकाणचा कायापालट होऊन पाल हे आता सुंदर पर्यटन स्थळ

झाले आहे. येथे अभयारण्यही उभारण्यात आले आहे. वन विभागाच्या विश्रामगृहाव्यतिरिक्त पर्यटकांसाठी कुटिरे उपलब्ध आहेत.

वाघळी

वाघळी (चाळीसगाव ता. २०°३०' उ., ७५°५०' पू.) गाव अतिप्राचीन असून चाळीसगावच्या पूर्वेस ११ कि.मी.वरील या गावी मुघईदेवीचे मंदिर व महानुभावांचे कृष्ण मंदिर असून ती दोन्ही हेमाडपंती शैलीतील आहेत. हे गाव लेवा गणप्रदेशात नसले तरी हातले आणि वाघळी येथे लेवा पाटीदारांची खूप मोठी वस्ती असल्याने माहिती देत आहे.

मुघई (भवानी) मंदिर ५.१ मी. उंच, १६.५ मी. लांब व ७.२ मी. रुंद असून सभोवताली तटबंदीचे अवशेष आहेत. मंदिराचे २४ स्तंभ व गर्भगृहाचे प्रवेशद्वार उत्कृष्ट शिल्पाने नटलेले आहे. गर्भगृहात मुघईदेवीचा तांदळा आहे. पूर्वी मंदिराच्या उजव्या बाजूस ३.३ X ३.३ मी. लांबी-रुंदीचे चौरसाकृती देऊळ होते. भग्न नंदीच्या अवशेषावरून ते महादेवाचे देऊळ असावे. मुघईदेवी मंदिराच्या गर्भगृहात समोरील मुख्य वेदीवर एकही मूर्ती नाही. बांधकामाचे शिल्प व शैलीवरून ते सूर्यमंदिर असावे. मुघईदेवीचा तांदळा नंतर बसविण्यात आलेला दिसतो. स्थापत्यशास्त्रानुसार ज्या देवतेचे मंदिर असते; त्या देवतेची प्रतिमा गर्भगृहात शेवटी मुख्य वेदीवर असते. याला अपवाद महादेव मंदिराचा असतो. महादेव मंदिरात लिंग गर्भगृहात मध्यभागी असते. गर्भगृहातील मुघईदेवीचा तांदळा असंबद्धपणे मांडलेला दिसतो. मंदिराचा विन्यास द्वारमंडपासह सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशा तीन भागांत केलेला आहे.[३२] या मंदिराची रचना जवळजवळ धुळे जिल्ह्यातील लिंपणगाव मंदिरासारखीच आहे. गर्भगृहात बाहेरून २८ कोनी गोलाकार चांदणीप्रमाणे असून आठ कोनांतून गर्भगृह व अंतराळातून मार्ग जातो. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या द्वारमाथ्यावर गणपतीची प्रतिमा आहे. गर्भगृहाचा आतला खालचा भाग चौरसाकृती असून त्यातील वेदीवर एका बाजूस नंदीवर आरूढ शिवपार्वतीची मूर्ती होती. छत वरील बाजूस वर्तुळाकार होत गेले आहे. गर्भगृहाच्या बहिस्थ भिंतींत (जंघाभागावर) तीन देवकोष्ठे (niches) आहेत. मागील पश्चिमेकडील देवकोष्ठात सूर्याची मूर्ती आहे. त्यावरून हे सूर्यमंदिर असावे, असे अनुमान काढता येते.[३३] उत्तरेकडील देवकोष्ठात महाकाली व दक्षिणेकडील देवकोष्ठात गणपतीची मूर्ती आहे.

मंदिराचा सभामंडप चौरसाकृती असून चार स्तंभ व सहा भित्तीस्तंभांवर सभामंडपाचे छत आधारले आहे. सभामंडपासमोर द्वारमंडप आहे. त्याच्या बाजूच्या भिंती पडल्या असून छत चार स्तंभांवर कसेबसे टिकून आहे. सभामंडपातील चारही स्तंभ साधेच असले तरी त्यावर पुष्पपात्र व पर्णसंभाराच्या धुप्रतिमा (motif) ठळकपणे दिसून येतात. हेन्री कझेन्सच्या मते छताचे काम पोकळ शंकूसारखे आहे.[३४] छताला वरपासून पाच पुष्पगुच्छांच्या सरी लोंबकळताना दिसतात. अंतराळ छताची रचनाही सभामंडप छतासारखीच आहे.

फक्त त्यात एकच पुष्पगुच्छाची सर लोंबकळत आहे. मंडपाच्या बाहेरील भिंती लिंपणगाव (धुळे जिल्हा) मंदिराप्रमाणे साध्या आहेत. सभामंडपाच्या कोपऱ्यात असलेल्या वेदीवर सूर्याच्या तीन सुंदर कलात्मक मूर्ती कोरल्या आहेत. त्या तिन्ही उभ्या (Standing position) आहेत. त्यांची उंची साधारणतः ३० सें.मी. आहे. येथे दुसऱ्या एका कोनाड्यात चौथऱ्यावर प्रलंब पादासनातील सूर्याची मूर्ती विराजमान असून पाय खाली सोडलेले आहेत. दोन्ही हात दोन्ही मांड्यांवर ठेवलेले आहेत. याशिवाय लहान सूर्यमूर्तीची रचना जंघाभागावर बाहेरच्या बाजूने सर्व कोपऱ्यांत केलेली आहे. या मंदिरात सूर्याच्या विविध प्रकारच्या प्रतिमा दिसतात. चौथ्या शतकाच्या प्रारंभी खानदेशात सूर्यभक्त हैहयवंशाचे राज्य होते. त्या काळातील मूळ मंदिर असावे. त्यानंतर, आलेले राजे शिवभक्त होते व या नंतरच्या प्रस्तुत मंदिराचे बहुतांश बांधकाम झाले असावे व सूर्याची पूजाही मागे पडली. याच काळात मंदिराचे मुघईदेवी (भवानी मंदिरात) रूपांतर झाले असावे.[३५]

महानुभाव कृष्ण मंदिरही हेमाडपंती असून ३.९ मी. उंच, ९.० मी. लांब व ८.६ मी. रुंद आहे. प्रवेशद्वार व स्तंभांवर उत्कृष्ट कोरीव काम आहे. गर्भगृहात पूर्वी शिवलिंग होते. अजूनही मंदिरात नंदीची मूर्ती आहे. पूर्वी या मंदिराचे नाव सिद्धेश्वरनाथ मंदिर होते. महानुभावांच्या ताब्यात आल्यानंतर त्यांनी येथे कृष्णाची मूर्ती स्थापन केली. तेव्हापासून मंदिरास कृष्ण मंदिर किंवा महानुभाव मंदिर असे म्हणतात.[३६] मंदिराच्या मोठमोठ्या दगडांवर दुर्वाच्य संस्कृत अक्षरे आहेत. मंदिराजवळ एक पुरातन विहीर आहे. मंदिर निःसंशय प्राचीन असून सुमारे ४०० वर्षांपासून महानुभावांच्या ताब्यात आहे. मंदिराच्या सभागृहात उजव्या बाजूला भिंतीत यादव नृपती सेऊणचंद्र (द्वितीय) याचा अकराव्या शतकातील देवनागरी लिपीतील संस्कृत शिलालेख आहे.[३७] त्याची तिथी सूर्यग्रहण, आषाढी अमावस्या, सौम्य संवत्सर, शके ९९१, मंगळवार (२१ जुलै १०६९) ही आहे. सारांश-गोविंदराजा मौर्य (यादव नृपती सेऊण याचा मांडलिक) याने हा लेख असलेले मंदिर बांधले व त्यास बऱ्याच देणग्या दिल्या. त्याशिवाय, यादव नृपती सेऊण याने सिद्धेश्वराच्या मंदिराला संगमी व मधुवाटिका ही गावे दान दिल्याचे नमूद केले आहे. हा लेख तीन दगडांवर तीन भागांत आहे. तथापि, तिन्ही भाग मिळून एकच लेख असल्याचे स्पष्ट आहे. या लेखात मांघाता (यादवांच्या मांडलिक मौर्यकुळाचा मूळ पुरुष), कीकट (मौर्य नृपती), तक्षक (मौर्य नृपती), भीम (मौर्य नृपती), सर्वशूर (मौर्य नृपती), गोविंद (मौर्य नृपती), साध्वसिक (मौर्य नृपती), झंझ (मौर्य नृपती), देवहस्ती (मौर्य नृपती, झंझाचा पुत्र), मुंज (मौर्य नृपती, देवहस्तीचा पुत्र), पद्माकर (मौर्य नृपती, मुंजाचा पुत्र), बप्पैय (मौर्य नृपती), बालपराज (मौर्य नृपती, बप्पेयाचा नातू), साध्यसिक (मौर्य नृपती), शांतिराज (मौर्य नृपती), प्रवरसुकर (मौर्य नृपती, शांतिराजाचा पुत्र), भैलेक (मौर्य नृपती, प्रवरसुकराचा पुत्र), भीमराज (मौर्य नृपती), गोविंदराज (शंकराचे मंदिर बांधणारा व दान देणारा मौर्य नृपती), नायकी (मंदिर बांधण्यास सहभागी झालेली

गोविंदराजाची राणी), सेऊण (दान देणारा देवगिरीचा यादव नृपती द्वितीय सेऊण) या व्यक्तिनामांचा आणि वलभी (सौराष्ट्रातील गाव), संगमी, मधुवाटिका आणि कारकग्राम या ग्रामनामांचा समावेश आहे.

सध्या हे मंदिर भग्नावस्थेत असल्यामुळे मूळ विन्यासाची कल्पना येत नाही. तीन बाजूस कक्षासन असलेला मंदिराचा मंडप मोकळा वाटतो. मंदिराची खास विशेषता म्हणजे येथील स्तंभांची दोन प्रकारची शीर्षे (Capital) होत.[३८] मंडपातील मध्यभागी असलेल्या चार स्तंभांचे सशीर्ष दोन आमलकात (Cushions) विभागले आहेत. वरच्या बाजूस चौरसाकृती पट्टिकांची योजना केली असून त्यांच्या चारी कोपऱ्यांवर वेलसरी (Pendants) आहेत. प्रत्येक आमलकात कीचकाकृती आहेत. अशा प्रकारचे स्तंभ निदान महाराष्ट्रात तरी इतरत्र नाहीत. त्यावर गोलाकृती नागफण्यांचे काठ असलेल्या स्तंभाधार सरी कोरलेल्या आहेत.

या मंदिराचे छत अतिशय नावीन्यपूर्ण व कलात्मक आहे. अशा प्रकारचे छत नाशिक जिल्ह्यातील देवळाली येथील मंदिराव्यतिरिक्त महाराष्ट्रात इतरत्र नसावे, असा दावा केला जातो. या गोलाकार छतामध्ये श्रीकृष्ण बासरी वाजवित असून त्याच्याभोवती गोलाकार नृत्यतल्लीन आठ गोपिका दाखविल्या आहेत. कृष्ण मंदिराला लागून एक भुयार आहे.

वाघळी गावात एका ओट्यावर गणेशाची मूर्ती असून कोठल्यातरी मंदिराच्या गर्भगृह प्रवेशद्वाराची एक दगडी महिरप या गणेशमूर्तीच्या वर बसविली आहे. ही महिरप म्हणजे गणेश मंदिराचाच अवशेष असावा, असे ग्रामस्थ सांगतात. गावाच्या दक्षिणेस सुमारे ३५० वर्षांपूर्वीचे राम मंदिर आहे. या मंदिरात सुमारे ९० वर्षांपूर्वी चित्रे काढली आहेत. पूर्वी त्यास नरसिंह मंदिर म्हणत. मंदिराच्या पश्चिमेस त्याच काळातील शनी मंदिर आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे देवालयाला लागून मागच्या बाजूस चौकोनी व वर घुमटाकार अशी साधना करण्याची बंदिस्त जागा आहे.

यावल येथील किल्लाही पाहण्यासारखा आहे. या किल्ल्याच्या पश्चिम बाजूस हडकाळी नदी असून पलीकडील बाजूस ब्रह्मर्षी व्यासांचे स्थान आहे. येथे पूर्वी व्यासांचा आश्रम होता, असे सांगतात. आता ब्रह्मर्षी व्यासांचे भव्य मंदिर बांधण्यात आले असून हा परिसर सुंदर आहे. लेवा पाटीदारांच्या तीर्थस्थानांमध्ये झेंडूजी महाराजांचे बेळीगाव, मुक्तानाल्याकाठचे कोथळी गाव (येथेही मुक्ताबाईची समाधी व मंदिर आहे). महानुभावांचा कूळधर्म व कुळाचारासाठी प्रसिद्ध असलेला मोताळा तालुक्यातील जाईचा देव, धुपेश्वर, कोटेश्वर (नरवेल), शेलगाव बाजाराचा शांडिल्य आश्रम, ह.भ.प. मुकुंद महाराजांचे एणगाव येथील स्मारक मंदिर यांचाही उल्लेख करणे अपरिहार्य आहे.

✧✦✧

प्रकरण ११ - तळटिपा

१. बी. पी. बोपर्डीकर, ''अर्लि स्टोन एज साईट ॲट मानेगाव ऑन दी पूर्णा रिव्हर, जलगॉन डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र'', **इंडियन ॲंटिक्वरी,** खंड ४, १९७०, पृ. ८-१२.

२. एस. ए. साळी, **स्टोन एज इंडिया,** शंकर पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९०, पृ. १८२.

३. रा. चिं. ढेरे, **श्री गुरू गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा,** १९५९; वि. भि. कोलते, **श्री चक्रधरचरित्र,** १९५२.

४. सि. वि. चित्राव, **मध्ययुगीन चरित्रकोश,** १९३७.

५. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. ७५९.

६. शं गो. तुळपुळे (संपा.), **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड १, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८४, पृ. ६२८.

७. ह. रा. दिवेकर (संपा.), **तत्त्वसार,** पुणे, १९७६.

८. महादेवशास्त्री जोशी (संपा.), **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ३, १९६५, पृ. ३५१.

९. डॉ. कि. का. चौधरी ''संस्कृती'', **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. ७१६.

१०. सरोजिनी शेंडे, ''ज्ञानदेव व चांगदेव'', **भारत इतिहास संशोधन मंडळ,** त्रैमासिक, पुणे, १९७६, अंक १-४, पृ. ४१.

११. शं. गो. तुळपुळे, पूर्वोक्त, पृ. १०५ व ६३०.

१२. कि. का. चौधरी, पूर्वोक्त, पृ. ७१६, तथापि **तत्त्वसार** हा ग्रंथ चांगदेवाने हरिश्चंद्रगडावर लिहिला असे रा. चिं. ढेरेंचे मत आहे.

१३. **तत्त्वसार** ग्रंथ, डॉ. ह. रा. दिवेकरांनी १९३६ मध्ये संपादित करून पुस्तकरूपाने प्रकाशित केला आहे.

१४. **खानदेश डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १८८०, पृ. ४३७.

१५. हेन्री कझेन्स, **मेडिव्हल टेंपल्स ऑफ दी दख्खन** (पुनर्मुद्रित), कॉस्मो पब्लिकेशन्स, दिल्ली, १९८५, पृ. २२.

१६. कित्ता, पृ. ३२; जी. बी. देगलूरकर, **टेंपल आर्किटेक्चर ॲण्ड स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र,** नागपूर युनिव्हर्सिटी, १९७४, पृ. ५९.

१७. शं. गो. तुळपुळे, पूर्वोक्त, ६२६.

१८. कित्ता, पृ. ६२६.

१९. डॉ. कि. का. चौधरी, पूर्वोक्त, पृ. ७१५.

२०. कित्ता, पृ. ७१५-१६.

२१. शं. गो. तुळपुळे, पूर्वोक्त, पृ. ६२४-२७.

२२. महादेशास्त्री जोशी, **भारतीय संस्कृतिकोश,** खंड ७, पृ. ४०७.

२३. रा. चिं. ढेरे, **महाराष्ट्र साहित्य पत्रिका,** जुलै-सप्टेंबर, १९७०.

२४. कित्ता.

२५. डॉ. वि. भि. कोलते, **महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख,** महाराष्ट्र राज्य साहित्य

संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२, पृ. २२२-५५. या शिलालेखाचे वाचनही भाऊसाहेब कोलते यांनीच केले आहे.

२६. गो. बं. देगलूरकर यांनी गॅझेटिअर कार्यालयास पाठविलेली माहिती.

२७. **खानदेश डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १८८०, पृ. ४०० ते ४०१ वरील तळटीप.

२८. कित्ता, पृ. ४४१ वरील तळटीप.

२९. **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ. ७८६.

३०. कित्ता, पृ. ७८६.

३१. **खानदेश गॅझेटिअर** १८८० मध्ये यास परदेशी ब्राह्मण म्हटले असले तरी ते खरे वाटत नाही व पाल येथे ब्राह्मणांची वस्तीही नाही, त्यामुळे प्रस्तुत लेखकाच्या मते तो लेवा पाटीदार असावा. कारण लेवा पाटीदारांची बरीच वस्ती पाल येथे आहे.

३२. ओ. पी. वर्मा, **हेमाडपंती टेंपल्स,** पृ. १५.

३३. कित्ता, पृ. १५.

३४. कझेन्स, **मेडिव्हल टेंपल्स ऑफ दी दख्खन,** १९३१, पृ. ३२.

३५. प्र. रा. अहिरराव, ''चाळीसगाव तालुक्यातील प्राचीन मंदिरे'', **रघुनंदन,** चाळीसगाव तालुका विशेषांक.

३६. देगलुरकर, जी. बी., **टेम्पल आर्किटेक्चर ऑफ महाराष्ट्र,** १९७४, पृ. २८.


३७. देव, शां. भा., **महाराष्ट्र व गोवे शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक सूची,** १९८२, पृ. ३२८-२९.

३८. देगलुरकर, पूर्वोक्त, पृ. २८.


✧✦✧


नकाशे


प्रतिहारांचे साम्राज्य





डॉ. बैजनाथ पुरी यांच्या ग्रंथाच्या आधारे


लेवा पाटीदारांच्या पूर्वजांचा हिंदुस्थानात येण्याचा मार्ग
उ.
रशिया
जॉर्जिया
काळा
समुद्र
(पार्शिया)
कास्पीयन
समुद्र
तुर्क
तुर्कमणिस्तान
इराक
इराण
अफगणिस्तान
खैबर खिंड
तिबेट
सप्तसिंधू प्रदेश
बोलनखिंड
मुल्लाखिंड
चितौड
रणथंभोर
श्रावस्ती
कनोज
अयोध्या
गंगा
यमुना
अहमदाबाद
अवंती (उज्जैन)
अनहिलवाड
नर्मदा
असीर
तापी
भडोच
१) इ. स. चे २ रे ते ५ वे शतक –
जॉर्जिया (पर्शिया) मधील गुर्जीस्तान (हल्लीचे
नाव गुर्जानी = Gurjaan) ते इराणमधून बोलन
खिंड व खैबरखिंडीमार्गे सप्तसिंधू (पंजाब) प्रदेश
२) इ. स. च्या ६ व्या शतकाच्या पुढे –
सप्तसिंधू ते गुर्जर रत्ता (राजस्थान), गुजरात,
सौराष्ट्र, कच्छ व माळवा. ९ व्या शतकाच्या सुरुवातीस
अवंतीहून कनोजकडे
३) इ. स. च्या ११व्या ते १५ व्या शतकाअखेरपर्यंत –
पायगडमार्गे आसिर (ब्रह्मणपूर) खिंडीतून
खानदेश - वऱ्हाडात स्थलांतर
[टिप : नकाशा प्रमाणा (Scale) नुसार नाही.]



महाराष्ट्र व
लेवा गण प्रदेश
उ
गोंदिया
गडचिरोली
भंडारा
नागपूर
चंद्रपूर
वर्धा
यवतमाळ
अमरावती
अकोला
वाशीम
हिंगोली
नांदेड
बुलढाणा
परभणी
लातूर
जालना
बीड
उस्मानाबाद
जळगांव
औरंगाबाद
सोलापूर
धुळे
अहमदनगर
नंदुरबार
नाशिक
पुणे
सातारा
सांगली
कोल्हापूर
ठाणे
रायगड
रत्नागिरी
सिंधुदुर्ग
मुंबई
[टिप : नकाशा प्रमाणा (Scale) नुसार नाही.]


जळगांव - बुलढाणा जिल्हे (१९८९) व
लेवा गण प्रदेश
उ.
मध्य प्रदेश
अमरावती जिल्हा
अकोला जिल्हा
जळगाव जामोद
जामगाव
बुलढाणा
चिखली
मेहकर
परभणी जिल्हा
जालना जिल्हा
जामनेर
चोपडा
एरंडोल
पाचोरा
अमळनेर
पारोळा
भडगाव
चाळीसगाव
औरंगाबाद जिल्हा
धुळे जिल्हा
नाशीक जिल्हा
[टिप : नकाशा प्रमाणा (Scale) नुसार नाही.]


उ.
सप्तसिंधु
प्रदेश
चितोड
रणथंभोर
माण्डव्यपूर
गंगा नदी
यमुना नदी
श्रावस्ती
अयोध्या
कनोज
अवंती
अनहिलवाड
नांदीपुरी
नर्मदा नदी
तापी नदी
भडोच
९व्या शतकाअखेर व १० शतकाच्या
सुरुवातीचे प्रतीहार साम्राज्य
= प्रतीहार नृपती प्रथम भोज व
त्याचा पुत्र प्रतीहार नृपती
महिंद्रपाल यांचे साम्राज्य (अनुमान)
[टिप : नकाशा प्रमाणा (Scale) नुसार नाही.]



लेवा पाटीदार समाज / ३९८


लेवा पाटीदारांच्या पूर्वजांच्या गुजरातमधून खानदेश-
मध्यप्रदेशात येण्याचा मार्ग (१४८४ च्या सुमारास)
पाटण
मेहसाणा
कडी
गांधीनगर
अहमदाबाद
आणंद
पेटलाद
सोजित्रा
खंभात
राजपिपला
सुरत
कच्छ
सौराष्ट्र

संदर्भ सूची (Bibliography)

अबुल फझल : **ऐन ए अकबरी** (इंग्रजी भाषांतर, कर्नल एच. एस. जॅरेट) तीन खंड, (पुनर्मुद्रित), अटलांटिक पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, नवी दिल्ली, १९८९.

अब्दुल हमीद लाहोरी : **बादशाहनामा.**

अलेक्झांडर, रॉजर्स : **दि लॅण्ड रेव्हेन्यू ऑफ बॉम्बे,** खंड १, १८९२ (पुनर्मुद्रित), बी. आर. पब्लिशिंग कॉर्पोरेशन, दिल्ली, १९८५.

अष्टीकर, मधुकर : **डॉ. वि. भि. कोलते गौरव ग्रंथ,** अमरावती, १९६९.

अत्रे, त्रि. ना. : **गावगाडा** (तिसरी आवृत्ती), वरदा बुक्स, पुणे, १९८९.

ईर्फान हबीब : **ॲन ॲटलास ऑफ दी मुघल एम्पायर,** ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली, १९८२.

एन्थोवेन, आर. ई. : **कास्ट्स ॲण्ड ट्राइब्ज ऑफ बॉम्बे स्टेट,** तीन खंड (पुनर्मुद्रित आवृत्ती), कॉस्मो पब्लिकेशन्स, दिल्ली, १९८५.

ओक, ज. वि. : **गीर्वाणलघुकोश,** द्वारकाबाई ओक तथा सरस्वतीबाई आपटे, जमशेटपूर, १९६०.

ओझा, गौरीशंकर, राजपुताने का इतिहास

कर्वे, इरावती : **महाराष्ट्र लॅण्ड ॲण्ड इट्स पीपल** (स्टेट गॅझेटिअर), महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६२.

कर्वे, इरावती : **हिंदू समाज-एक अन्वयार्थ,** दि. धों. कर्वे, मौज प्रकाशन, पुणे, १९७५.

कर्वे, इरावती : **मराठी लोकांची संस्कृती,** रा. ज. देशमुख, पुणे, १९६२.

काणे, पी. व्ही. : **हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र,** ४ खंड.

कालेलकर, गो. मं. : **मुंबई इलाख्यातील जाती,** श्री नारायण बुक सप्लाइंग कं., मुंबई,

१९२८.
केतकर, श्री. व्यं. : **महाराष्ट्र ज्ञानकोश,** संबंधित खंड.
कोम्मिस्सरिएट, एम. एस. : **ए हिस्टरी ऑफ गुजरात,** खंड १, लाँगमन ग्रीन ॲण्ड कं. लि., कलकत्ता, १९३८.
कुंटे, बी. जी. (संपा.) : **बुलडाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** गॅझेटिअर विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७६.
कुंटे, भ. ग. (संपा.) : **स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश** (संबधित खंड), गॅझेटिअर विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
कॅम्पबेल, जेम्स एम. (संपा.) : **गॅझेटिअर ऑफ गुजरात पॉप्युलेशन,** खंड ९, भाग १, मुंबई राज्य, मुंबई, १९०१.
कॅम्पबेल, जेम्स, एम. (संपा.): **खानदेश डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** मुंबई, १८८०.
खरे, ग. ह. (संपा.) : **भारत इतिहास संशोधन मंडळ,** पुणे, संबंधित त्रैमासिक अंक.
खरे, ग. ह. : **महाराष्ट्राची चार दैवते**
खोबरेकर, वि. गो. (संपा.) : **भारतीय इतिहास आणि संस्कृती** (त्रैमासिके-संबंधित अंक), मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
खोले, गजानन शंकर : **कूळधर्म-कुळाचार-कुलदैवते,** इंद्रायणी साहित्य, पुणे, १९९१.
ग्रीअरसन, जी. ए. : **लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया,** खंड ९ (भाग ३), दिल्ली, १९६८.
ग्रीन, ए. एम. : **गॅझेटिअर ऑफ रेवा कांठा, कॅम्बे ॲण्ड सुरत एजन्सी,** १९१४.
घुर्ये, जी. एस. : **कास्ट, क्लास ॲण्ड ऑक्युपेशन,** पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९६१.
चित्राव, सिद्धेश्वरशास्त्री : **प्राचीन चरित्रकोश,** १९६१.
चित्राव, सिद्धेश्वरशास्त्री : **प्राचीन भारतीय स्थलकोश.**
चौधरी, कि. का. (संपा.) : **जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९४.
चौधरी, कि. का. (संपा.) : **महाराष्ट्रः भूमी व लोक** (राज्य गॅझेटिअर), महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९६.
जोग, रा. श्री. (संपा.) : **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड ३, ४ व ५, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३.
जोशी, महादेवशास्त्री (संपा.): **भारतीय संस्कृतीकोश** (दहा खंड), भारतीय संस्कृती-कोश मंडळ, पुणे.
जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा.) : **मराठी विश्वकोश** (पंधरा खंड), महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
डावूसन, जॉन : **क्लासिकल डिक्शनरी ऑफ हिंदू मायथॉलॉजी,** १९५७.
तुळपुळे, शं. गो. : **प्राचीन मराठी कोरीव लेख,** पुणे, १९६३.
तुळपुळे, शं. गो. (संपा.) : **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड १, महाराष्ट्र साहित्य परिषद,

पुणे, १९८४.

दाते, य. रा., कर्वे, चिं. ग. संपा.) : **महाराष्ट्र ज्ञानकोश** (आठ खंड), वरदा बुक्स, पुणे,१९८८.

देशमुख, मा. म. : **प्राचीन भारताचा इतिहास,** विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९८.

देव, शां. भा. : **महाराष्ट्र व गोवे:शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक सूची,** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२.

दोसी, सरयू (संपा.) : **महाराष्ट्र,** मार्ग पब्लिकेशन्स, मुंबई, १९८५.

नेल्सन, ए. ई. (संपा.) : **बुलडाणा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** कलकत्ता, १९१०.

पगडी, सेतू माधवराव (संपा.): **जलगॉन डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६२.

पंड्या, अमृत व्ही. : **न्यू डायनेस्टीज ऑफ गुजरात,** स्वस्तिक पब्लिकेशन्स, वल्लभ विद्यानगर, १९६९.

पाटील, रा. वा. : **भोरगाव पंचायत,** पाडळसे, १९८४.

पाटील, वाय. जी. : **लेवा पाटीदार समाज अंत्येष्टीविधी संस्करण** (सुधारित आवृत्ती), भ्रातृमंडळ, पुणे, १९९९.

पाटील, शं. वि. : **लेवा पाटीदारांचा इतिहास,** चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बु., (ता. मलकापूर, जि. बुलडाणा), १९९९.

पाटील, शं. वि. : **वारकरी पंथाचा इतिहास,** चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बु., (ता. मलकापूर, जि. बुलडाणा), १९९५.

पाटील, शं. वि. : **शांडिल्यगोत्र ग्रंथ,** चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बु., २०००.

फरिश्ता : **गुलशने इब्राहिमी,** (डॉ. भ. ग. कुंटे यांनी केलेला अनुवाद), १९८२.

बर्निअर, फ्रॅन्कोस : **ट्रॅव्हल्स इन दी मुघल एम्पायर,** ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, १९७५.

बहिरट, भा. पं., भालेराव, पं. ज्ञा. : **वारकरी संप्रदाय:उदय व विकास.**

बाबर, सरोजिनी (संपा.) : **भोंडला-भुलाबाई,** महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प २२, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, मुंबई, १९७९.

भनसाळी, डी. एम. : **संयुक्त खानदेश डिरेक्टरी,** डी. एम. भनसाळी, जळगाव, १९५२.

भालेराव, स. ना. (संपा.) : **गिरणाई,** जळगाव नगरपालिका शताब्दी ग्रंथ, जळगाव, १९६४.

मालशे, स. ग. (संपा.) : **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद, पुणे, १९८२.

मिश्रा, एस. सी., : **दी राइज ऑफ मुस्लिम पॉवर इन गुजरात,** नवी दिल्ली, १९९३.

मुखर्जी, आर. के. : **एन्शंट इंडिया,** १९५६.

मोरेदादा, अण्णासाहेब : **दिंडोरीप्रणीत श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग विशेषांक,** १९९९.

रसेल, आर. व्ही., पं. हिरालाल : **ट्राइब्ज ॲण्ड कास्ट्स इन दी सेंट्रल प्रोव्हिन्सेस**

	ऑफ इंडिया (पुनर्मुद्रित), खंड ४, १९९३.
वुलस्ली, हेग	: **केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया** (संबधित खंड), एस. चांद ॲण्ड कं., दिल्ली, १९६५.
व्ही. आर. रामचंद्र दीक्षितार	: **पुराण इंडेक्स,** १९५५.
शर्मा, मनसाराम	: **पंजाब-जीवन और साहित्य,** १९६१.
शास्त्री, हरिप्रसाद जी.	: **चरोत्तर सर्वसंग्रह,** व्हा. १, नडियाद, १९९४.
शेरवानी, एच. के.,	: **हिस्टरी ऑफ मेडिव्हल डेक्कन** (१२९५-१७२४),
जोशी, पी. एम. (संपा.)	: खंड १, खंड २, आंध्र प्रदेश शासन, हैदराबाद, १९७३.
शेंदुर्णीकर, ग. स.,	: **सोन्याचा पिंपळ-दि जळगाव पीपल को-ऑप**-शेंदुर्णीकर,
प्रभा. स. (संपा.)	: **रेटिव्ह बँक लि. सुवर्णमहोत्सवी स्मृतिग्रंथ,** जळगाव, १९८४.
सरदेसाई, गो. स.	: **मराठी रियासत** (सुधारित आवृत्ती) खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८.
इतर.	: **जळगाव डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबुक,** १९६१, १९८१ व १९९१.
	बुलडाणा डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅण्डबुक, १९६१, १९८१ व १९९१.
	भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे त्रैमासिक (संबंधित अंक).
	संशोधक, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंदिर, धुळे (संबंधित अंक).
	महाराष्ट्र जिल्हे:जळगाव, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६२.
	महाराष्ट्र जिल्हे:बुलडाणा, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६८.
	मिलिटरी गॅझेटिअर ऑफ इंडिया ॲण्ड पाकिस्तान, डायरेक्टर ऑफ मिलिटरी सर्व्हे, १९५३ (२ खंड).
	सेन्सर्स रिपोर्ट: जनरल पॉप्युलेशन टेबल्स (संबंधित खंड), १९९१.
	कैरा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (ओल्ड), १८८२.
	कैरा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर (रिव्हाइज्ड), १९६२.

✧✦✧

सूची (Index)

✧✦✧

परिशिष्ट

या ग्रंथाच्या छपाईसाठी तसेच प्रकाशनासाठी होणाऱ्या खर्चाप्रीत्यर्थ मुंबई व परिसर लेवा मंडळास आर्थिक साहाय्य देणाऱ्या दानशूर समाजबांधवांची संक्षिप्त माहिती

१. श्री. माधवराव सीताराम चौधरी - कृपया या ग्रंथाच्या प्रकरण ९- समाजरत्ने मधील माहिती पाहावे.

२. सौ. शालिनी माधवराव चौधरी - कृपया या ग्रंथाच्या प्रकरण ९ समाजरत्ने मधील माहिती पाहावे.

३. सौ. विनिता विलास वारके - (जन्म-१९६५) - श्री. माधवराव चौधरी ह्यांची सुकन्या. व्यवसाय - निसर्गोपचार व ब्युटीशियन; सुजोग थेरपिस्ट, ॲक्युपंक्चर - ॲक्युप्रेशर थेरपिस्ट; स्माईल मेडिटेशन. अ.भा. मानवाधिकार परिषदेच्या सदस्या. फ्री सेमिनार फॉर ह्युमन हेल्थचे आयोजन. पती - श्री. विलास वारके (मूळगाव - मस्कावद) ह.मु.-बोरिवली, मुंबई महानगरपालिकेत सिव्हिल इंजिनीअर.

४. कै. श्री. मधुसूदन ओंकार राणे - कृपया समाजरत्ने प्रकरण ९ पाहावे.

५. श्री. किशोर ढाके - हल्ली मुक्काम पुणे, लेवा समाजातील एक दानशूर व्यक्तिमत्त्व- समाजकार्यात हिरिरीने भाग घेतात.

६. श्रीमती रत्नमाला अशोक सरोदे - मूळगाव मस्कावद, ह.मु. पुणे. कै. अशोक सरोदे ह्यांच्या सुविद्य पत्नी. कै. सरोदे पुण्याच्या टेल्को कं.त. होते. श्रीमती सरोदेंना दोन मुली असून मोठी पूनम बी.आर्च व लहान मुलगी एम.ई. करीत आहे. श्रीमती रत्नमाला सरोदे महा. शासनाच्या कृषी विभागात सेवेत आहेत.

प्रकाशक :
मुंबई व परिसर लेवा मंडळ, मुंबई (रजि.)
कार्यकारी मंडळ



अध्यक्ष :
श्री. अशोक सीताराम महाजन



उपाध्यक्ष :
श्री. गोविंद इंगळे



उपाध्यक्ष :
श्री. ज्ञानदेव सरोदे



सचिव :
श्री. सुहास बोरोले



कोषाध्यक्ष :
श्री. प्रकाश बेंडाळे



सल्लागार :
श्री. माधवराव चौधरी

या ग्रंथास देणगी देणाऱ्या लेवा समाजबांधवांची छायाचित्रे


श्री. माधवराव सी. चौधरी


सौ. शालिनी माधवराव चौधरी


सौ. विनिता विलास वारके


स्व. श्री. मधुसूदन ओंकार राणे


श्री. किशोर ढाके


श्रीमती रत्नमाला अशोक सरोदे


श्री. जतेश भास्कर चौधरी


डॉ. लिलाधर झटू पाटील


श्री. मनोहर मुरलीधर पाटील



श्रीमती कुसुम भालचंद्र चौधरी



श्री. अनिल तुकाराम पाटील


सौ. भूमिका पाटील


श्री. सदाशिव तुळशीराम चौधरी


सौ. ललिता सदाशिव चौधरी


श्री. दिलीप देविदास चौधरी


श्री. प्रभाकर दामू गाजरे


श्री. पंकज रुपचंद पाटील


श्री. सचिन ज्ञानदेव चौधरी


श्री. एन.पी. सुपे


श्री. प्रदीप गोविंद पाटील


श्री. प्रभाकर पुरुषोत्तम गुळ्वे


सौ. लता प्र. गुळ्वे


श्री. सुधाकर दोधू बोंडे


श्री. अशोक रामचंद्र भंगाळे


श्री. अशोक सीताराम महाजन


सौ. कुमुद अशोक महाजन


श्री. ज्ञानेदव तुकाराम सरोदे


सौ. मालती ज्ञा. सरोदे


श्री. शामसुंदर लिलाधर पाटील


सौ. मेघमाला शा. पाटील


श्री. सुहास मुरलीधर बोरोले


सौ. रेखा सु. बोरोले


श्री. मिलींद मधुकर चौधरी (पुणे)


श्री. लिलाधर लक्ष्मण पाटील


श्री. प्रभाकर यादव कोल्हे


सौ. उषा प्र. कोल्हे


डॉ. अविनाश लोखंडे


श्री. निळकंठ गोपाळ नेमाडे


श्री. प्रभाकर धनजी चौधरी


श्री. घनश्याम एस. गाजरे


श्री. विवेक सुधाकर चौधरी


श्रीमती नीना चंद्रकांत वेंडाळे


श्री. दिनकर प्रेमचंद पाटील


श्री. घन:श्याम पुरुषोत्तम सुपे


प्रा. राम सोनजी नेमाडे


सौ. कुसुम राम नेमाडे


श्री. नंदकुमार माधव पाटील


डॉ. श्री. अविनाश बळीराम चौधरी


श्री. हरेश्वर शंकर नेमाडे


डॉ. राम खर्चे



श्री. वसंत देविदास चौधरी


श्री. अनिल दयाराम जंगले


डॉ. जी.एम. वारके


सौ. सरोज जी. वारके


श्री. जयंत कमलाकर झांबरे


श्री. पांडुरंग दामोदर बोरोले


श्री. मनिष प्र. गुळवे


श्री. तुषार प्र. गुळवे


श्री. हरी शा. फिरके


श्री. प्रदिप सरोदे

७. श्री. जलेश भास्कर चौधरी - मूळगाव असोदे. नाटककार श्री बी.एल. चौधरींचे सुपुत्र. जन्म-१९७५. शिक्षण - डिप्लोमा इन इंजिनिअरिंग. स्वत:ची फॅक्टरी - प्लॅस्टिक मोल्डेड आर्टिकल्स. फार्मा व कॉस्मेटिक उद्योगांना माल पुरवितात. एम.आय.डी.सी., डोंबिवली येथे स्वत:चे युनिट आहे. फोन ९१-०२५१ २८७१६१३.

८. डॉ. लीलाधर झडू पाटील - मूळगाव न्हावी, ह.मु. पुणे. शिक्षण - बी.ए., डिप्लोमा इन सोशल वर्क्स; डिप्लोमा इन सोशल वर्क्स ॲडमिनिस्ट्रेशन; डॉक्टरेट इन सोशल वर्क्स. महिला व बालकल्याण विभागातून सहायक आयुक्त म्हणून सेवानिवृत्त; समाजसेवेबद्दल अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सुविद्य पत्नी सौ. प्रफुल्लता या एम.ए., बी.एड. असून सेवानिवृत्त शिक्षिका. विवाहित मुलगी सौ. दर्शना एम.एस.डब्ल्यू. झाली असून मुलगा चि. जयेश बी.ई. असून सून सौ. कृती एम.ई. आहे.

९. श्री. मनोहर मुरलीधर पाटील - मूळगाव आमोदे, ह.मु. ठाणे. शिक्षण - इलेक्ट्रीकल टेक्निशियन, नोकरी - वरिष्ठ निरीक्षक, रिलायन्स एनर्जी, मुंबई, ठाणे व परिसर लेवा मित्र मंडळाचे सहसचिव आहेत.

१०. श्रीमती कुसुम भालचंद्र चौधरी - मूळगाव - खिरोदे शिक्षण - एस.एस.सी., डी.एड. बी.एम.सी. मधून सेवानिवृत्त शिक्षिका. हल्ली वास्तव्य - श्रीनगर, ठाणे.

११. श्री. अनिल तुकाराम पाटील - कृपया समाजरत्न प्रकरण ९ पाहावे.

१२. सौ. भूमिका पाटील - बी.ए., श्री अनिल तुकाराम पाटील ह्यांच्या पत्नी घर सांभाळण्याबरोबर श्री. पाटील ह्यांना व्यवसायात मदत करतात. मुलगा - चिराग - केमिकल इंजिनिअर, एम.बी.ए.;आय.आय.टी. खरगपूर येथून एम.टेक. करीत आहे. मुलगी - वृषाली - बी.ई मेकॅनिकल, पी.जी.,पी.जी.पी.बी.ए.; जावई - एम.टेक., एम.एस्सी. एरोस्पेस इंजिनीअर (यूके) पीजीडी इन मरीन इंजिनीअर. नोकरी - इंडियन नेव्ही.

१३. श्री. सदाशिव तुळशीराम चौधरी - मूळगाव सावदा. कै. तुळशीराम गोविंद चौधरी ह्यांचे ज्येष्ठ सुपुत्र. वडिलांची जळगाव,नवी पेठ येथे आयुर्वेदिक फार्मसी होती. तुळशीराम चौधरींना ४ मुले व एक मुलगी असा परिवार होता. वडिलांचे आकस्मिक निधन झाल्यानंतर सर्व भावंडांची जबाबदारी. नाशिकला गव्हर्नमेंट सिक्युरिटी प्रेसमध्ये नोकरी. तेथे गव्हर्नमेंट क्वार्टरमध्ये सर्व भावंडांना नेऊन तुटपुंज्या पगारातही काटकसरीने संसार करून शिकवून मोठे केले. एका भावाची फॅक्टरी व दोन भाऊ नोकरीस. सुविद्य पत्नी ललिताबाईंनी शिक्षिकेची नोकरी करून कुटुंब सावरले. सदाशिव चौधरींना दोन मुली व एक मुलगा असून त्यांनाही उच्च शिक्षण दिले. म्हणूनच आकस्मिक संकटात सापडलेल्या कुटुंबासाठी सावरण्यास त्यांना बळ मिळाले. लेवा समाजात अशा व्यक्ती क्वचितच आढळतात.

१४. सौ. ललिता सदाशिव चौधरी - कृपया उपरोक्त क्र. १३ पाहावा.

१५. श्री. दिलीप देविदास चौधरी - (जन्म- १७ डिसेंबर, १९५८) - मूळगाव फैजपूर, शिक्षण - (M.Sc.) (Chemical) Ph.D. (UDCT) Post Doct (Zurich Sivic) विविध कंपन्यांमध्ये

काम केले. हार्डिलिया केमिकल्स (R and D) ; दीपक नायट्रेट, येरवडा (Corporate) ; (SQM) - युरोप व चिलीत (Country Manager) . सध्या Freelance Counsulancy Sourcing, trouble shooting, strategy Planning for foreign Companies हे काम करीत आहेत.

१६. श्री. प्रभाकर दामू गाजरे - मूळगाव हिंगोणे. साधारण शेतकरी कुटुंबात जन्म. आय.टी.आय. इलेक्ट्रिकल झाल्यावर एका खाजगी कंपनीत इलेक्ट्रिशियन म्हणून लागले. पुढे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात सुपरवायझर झाले. सामाजिक कार्यात हिरिरीने भाग घेतात. कामगार कल्याणासाठी झटले. मुलुंडच्या श्रेडर स्कोबील डंकन कंपनीतून २००२ मध्ये सेवानिवृत्त झाले.

१७. श्री. पंकज रूपचंद पाटील - कृपया समाजरत्ने प्रकरण ९ पाहावे.

१८. श्री. सचिन ज्ञानदेव चौधरी - (जन्म-२७ फेब्रुवारी, १९७४) मूळगाव खिरोदे ह.मु. पुणे. शिक्षण - डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी. प्रोपा - अमेय फ्लेक्सो प्रिंटर्स व यश एंटरप्रायझेस (सर्व प्रकारचे प्लॅस्टिक पॅकेजिंग); सर्व्हे नं. ३६/२ दांडेकर इंडस्ट्रियल इस्टेट, ऐश्वर्या हॉटेलमागे, कोंढवा पूल, पुणे-४११०४८, फोन : ०२०-२६९९३२६८५ / २७२०२०१०. मो. ९८२३१८३७८१/ ९९२२४११०९८. पत्नी - सौ. तृप्ती चौधरी - मो. ९८२३५६०५३१.

१९. श्री. एन.पी. सुपे - मूळगाव - वाघोदा (ता. रावेर) ह.मु. ठाणे. शिक्षण - (M. Pharm, DBM; L.L.B.) व्यवसाय - पुणे जिल्ह्यात सहायक आयुक्त, अन्न व औषधी, महाराष्ट्र राज्य या पदावर कार्यरत.

२०. श्री. प्रदीप गोविंद पाटील - मूळगाव - सावदा. मॅट्रिकनंतर १९६६ मध्ये बी.एम.सी.त लेखा परीक्षा विभागात नोकरी करून बी.कॉम. झाले. २००७ मध्ये उपमुख्य लेखापरीक्षकपदावरून सेवानिवृत्त. मुंबई व परिसर लेवा मंडळाच्या कार्यकारी समितीत खजिनदार म्हणूक काम केले. इ.स. १९९६ ते १९८९ पर्यंत म.शा. ने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती.

२१. श्री. प्रभाकर पुरुषोत्तम गुळवे - मूळगाव हिंगोणे, ह.मु. ठाणे. इ.स. १९८९ मध्ये रबाळे एमआयडीसीत कन्व्हेटेक इंजिनीअरिंग कं. सुरू केली असून कन्व्हेअर्स, स्टील वायरबेल्ट्स आणि मटेरियल हँडलिंग इक्विपमेंट्सचे उत्पादक आहेत. सध्या कं.चे भागीदार त्यांच्यासह त्यांची मुले श्री. मनीष आणि श्री तुषार हेसुद्धा आहेत. त्यांच्या पत्नी सौ. लता गुळवे गृहिणी आहेत. गुळवे कुटुंबीयांना समाजकार्याची आवड असून त्यासाठी सढळ हस्ते मदत करतात.

२२. श्री. सुधाकर दोधू बोंडे - मूळगाव हिंगोणे. शिक्षण M.Tech. (Met. Eng. I.I.T. Kanpur); डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट, सुबोध टेक्नॉलॉजिस्ट, ३७ वर्षे अनुभव. अनेक देशी-विदेशी संस्थांचे सदस्य व अधिकारीपदांवर कार्यरत. फॅक्टरी - सुबोध टेक्नॉलॉजिस्ट R-874, MIDC, Rabale फॅक्टरीत ३५ लोकांना रोजगार. चार्टर मेंबर आणि प्रेसिडेंट, लायन्स क्लब ऑफ ठाणे. सामाजिक कार्यात आर्थिक मदत करतात.

२३. श्री. लीलाधर लक्ष्मण पाटील - मूळगाव सावदा. एस.एस.सी.नंतर व्यावसायिक शिक्षण घेऊन क्रॉम्पटन ग्रीव्हजमध्ये १९६५-२००१ पर्यंत नोकरी. वास्तव्य - सूर्योदय सो. अंबरनाथ.

ठाण्याच्या कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये टर्नर/फिटर टीचर म्हणून कार्यरत. आशियात मोठी असलेल्या सूर्योदय सोसायटीत २००५ ते २०१० पर्यंत सदस्य व त्यानंतर आतापर्यंत सहसचिवपदावर आहेत.

२४. श्री. अशोक रामचंद्र भंगाळे - मूळगाव सावदा, एम.एस.सी., निवृत्त. रिझर्व्ह बँक अधिकारी (३२ वर्षे सेवा). माजी खजिनदार - मुंबई व परिसर लेवा मंडळ. संचालक - नॅशनल स्कूल ऑफ करिअर, डोंबिवली (बँक, MPSC व UPSC परीक्षा मार्गदर्शक). माजी खजिनदार - जळगाव, धुळे जिल्हा रहिवासी हितवर्धक मंडळ, मुंबई,. सुविद्य पत्नी - सौ. मंदाकिनी भंगाळे B.Sc.BEd., सेवानिवृत्त प्राचार्या विकास कॉलेज विक्रोळी. दोन मुली कॉम्प्युटर इंजिनीअर, मोठे जावई अमेरिकेत फ्रेंच बँकेत. लहान मुलगी व जावई अमेरिकेन ॲपल कंपनीत. मुलगा पुण्यास विप्रो कंपनीत कॉम्प्युटर इंजिनीअर.

२५. श्री. मिलिंद मधुकर चौधरी (पुणे) - B.Com; M.P.M' D.L.L & L.W. चेअरमन - एलएससी सिक्युरिटी फॉर्म प्रा. लि., एल.एल.सी प्रोजेक्ट ॲण्ड रिऑलिटी प्रा. लि., आयडियल फोर्स प्रा. लि. एल.एम.सी. प्रोजेक्ट ॲण्ड रिॲलिटी प्रा. लि.; आयडियल फॅसिलिटी मॅनेजमेंट; फॅबटेक (मॅन्यु. ऑफ प्रोसेस इक्विपमेंट); व्हाइस चेअरमन - असोसिएशन ऑफ फॅसिलिटी मॅनेजमेंट; महा. राज्य पोलीस मित्र संघटना संपर्कप्रमुख; सेक्रे. - रोटरी क्लब ऑफ मोरया चिंचवड; कार्याध्यक्ष - जळगाव जिल्हा लेवा समाज मंडळ, पुणे.

२६. श्री. अशोक सीताराम महाजन - मूळगाव - दहिगाव; B.E. Civil इ.स. १९६७ मध्ये बी.एम.सीत दुय्यम अभियंता म्हणून सुरुवात. १९९९ मध्ये उपमुख्य अभियंता म्हणून सेवानिवृत्त. छंद - समाजसेवा, प्रवास व वाचन. गेली १० वर्षे मुंबई व परिसर लेवा मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. वेळोवेळी समाजकार्यात आर्थिक मदत करतात.

२७. श्री. ज्ञानदेव तुकाराम सरोदे - मूळगाव-तळवेल, B.Sc. इ.स. १९६७ पासून केंद्र सरकारच्या टेलिफोन विभागात नोकरीस. सन २००४ मध्ये सतकर्ता अधिकारी (वर्ग १) पदावरून सेवानिवृत्त. पत्नी - सौ. मालती सरोदे. या म. शा.च्या पोलीस खात्यातून सेवानिवृत्त, श्री. सरोदे मुंबई व परिसर लेवा मंडळाचे उपाध्यक्षपदाची धुरा गेल्या आठ वर्षांपासून सांभाळत आहेत. त्यांना समाजकार्याची आवड आहे.

२८. श्री. श्यामसुंदर लीलाधर पाटील - कृपया समाजरत्न प्रकरण ९ पाहावे.

२९. श्री लीलाधर शंकर पाटील - मूळगाव - पिंपळगाव - श्री. श्यामसुंदर पाटील यांचे वडील.

३०. श्री. सुहास मुरलीधर बोरोले - मूळगाव - चिनावल. व्यवसायाने आर्किटेक्ट असून स्वतःची बोरिवली येथे एस.बी. असोसिएट्स (आर्किटेक्ट ॲण्ड प्लॅनर्स, डिझाइनर्स आणि कन्सल्टंट्स, इम्मूव्हेबल प्रॉपर्टीचे मान्यताप्राप्त व्हल्युअर्स) ही आर्किटेक्ट फर्म आहे. गेली १०-१२ वर्षे मुंबई व परिसर लेवा मंडळाच्या सचिवपदाची धुरा सांभाळत आहेत. पत्नी सौ. रेखा या गृहिणी आहेत.

३१. श्री. अनिल दयाराम जंगले - मूळगाव दहिगाव ह.मु. बोरिवली येथे बी.एम.सी.

हायस्कूल टीचर म्हणून सेवानिवृत्त. ते मुंबई व परिसर लेवा मंडळाच्या कार्यकारिणीचे सक्रिय सदस्य असून समाजकार्याची आवड आहे.

३२. श्री. प्रभाकर यादव कोल्हे - मूळगाव-चिनावल. म.शा.च्या सार्वजनिक बांधकाम विभागातून २००३ मध्ये स्थापत्य अभियंता म्हणून सेवानिवृत्त. समाजसेवेची आवड. ठाणे व परिसर लेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उषा कोल्हे यांनासुद्धा समाजकार्याची आवड असून मनू-मुक्ताई महिला मंडळाच्या त्या क्रियाशील सदस्या आहेत. ह्यांना दोन मुले असून मोठा डॉ. किरण कोल्हे (अॅनेस्थेशियन) व लहान मुलगा श्री. शीतल कोल्हे फॉर्मासिस्ट असून स्वतःचा व्यवसाय आहे.

३३. श्री. जयंत कमलाकर झांबरे - मूळगाव-बामणोद. ह.मु. ठाणे. स्वतःची ज्युपिटर इंजिनीअरिंग कं. आहे. ते समाजकार्यासाठी सदैव तयार असतात. ठाणे व परिसर लेवा मित्र मंडळाचे ते १८ वर्षे सचिवपद जबाबदारीने सांभाळत आहेत. ते Income tax कन्सल्टंट म्हणूनही काम करतात. त्यांचे वडील श्री. कमलाकर सुपडू झांबरे हे मुंबईच्या व्ही.जे.टी.आय.मधून एल.एम.ई. झाले असून त्यांनी ठाण्यास स्वतःची ज्युपिटर इंजिनीअरिंग कं. स्थापन केली. आजही वयाच्या ८० व्या वर्षी ते कंपनीत काम करतात. त्यांना समाजाविषयी आत्मीयता असून सर्व कुटुंब समाजकार्यात व समाजास आर्थिक मदत देण्यात पुढे असते.

३४. डॉ. अविनाश लोखंडे - हे प्रख्यात सर्जन असून त्यांचे घाटकोपर येथे 'अभिषेक नर्सिंग होम' हे हॉस्पिटल आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. लोखंडे ह्या बीडीएस असून त्यांचे स्वतःचे डेंटल क्लिनिक आहे. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असून दोघेही निष्णात डॉक्टर आहेत. सर्व कुटुंब समाजकार्यासाठी सदैव आर्थिक मदत करीत असते.

३५. श्री. अनिल भिरूड - ह. मु. ठाणे. ठाणे महानगरपालिकेत स्थापत्य अभियंतापदावर असताना दोन वर्षांपूर्वी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे. आता ते टॅक्स कन्सल्टंट म्हणून काम करतात. समाजकार्यात भाग घेऊन आर्थिक मदत करीत असतात.

३६. श्री. प्रभाकर धनजी चौधरी - मूळगाव फैजपूर. येथील दानशूर व प्रसिद्ध धनजी शेठ ऊर्फ धनजी हलवाई यांचे सुपुत्र. १९८० मध्ये नागपूरहून एम. फार्म झाल्यावर १९८४ मध्ये म.शा.च्या अन्न व औषध प्रशासन विभागात औषध निरीक्षक म्हणून लागले. २०१४ मध्ये ते सहायक आयुक्तपदावरून सेवानिवृत्त झाले. फैजपूरचे धनजी रेस्टॉरंट प्रसिद्ध असून १९२९ पासून दराबा, जाड मसाला गाठी व तूरखाटी शेव, भाजी शेव खानदेशातच नव्हे ता महाराष्ट्रात व बाहेरही प्रसिद्ध आहे. त्यांना सामाजिक कार्याची आवड असून पत्नी सौ. मंगला चौधरी यांच्याबरोबरीने सामाजिक कार्यात भाग घेत असतात.

३७. श्री. घनश्याम एस. गाजरे - (जन्म - ७ मे, १९६२) मूळगाव हिंगोणे शिक्षण DCE. १९८३ मध्ये म्हाडात सिझनल इंजिनीअर म्हणून लागले. २००९ मध्ये राजीनामा देऊन स्वतःची सारथी कन्स्ट्रक्शन कं. सुरू केली. ते मे. समृद्धी इन्फ्रास्ट्रक्चर अॅण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. चेही डायरेक्टर आहेत. पुण्याच्या मे. सुभाग्य प्रमोटर्स अॅण्ड बिल्डर्स प्रा. लि.चेही डायरेक्टर आहेत.

त्यांचे चिंचवड, वारजे व देहू येथे ८-१० प्रकल्प कार्यान्वित आहेत. सध्या ते बोरिवली येथे राहत आहेत. फोन-०२२-२८३३७९४५/९००४०२२६४५.

३८. श्री. सतीश मुरलीधर चौधरी - मूळगाव सावदा. ठाण्यास टाटा कन्सल्टन्सीमध्ये सोल्युशन आर्किटेक्ट, मॅन्युफॅक्चरिंग ॲण्ड सप्लाय चेन प्लॅनिंग एंटरप्राईज सोल्युशन या हुद्यावर आहेत. अध्यात्माकडे कल असून समाजकार्याची आवड आहे.

३९. श्रीमती नीना चंद्रकांत बेंडाळे - मूळगाव सावदा. कै. चंद्रकांत मोतीराम बेंडाळे यांच्या सुविद्य पत्नी. उदयनगर, ठाणे येथे वास्तव्य. दोन मुले असून ते इंजिनीअर्स आहेत. समाजाबद्दल आपुलकी व समाजकार्याची आवड आहे.

४०. श्री. दिगंबर प्रेमचंद पाटील - मूळगाव - जळगाव. ह.मु. ठाणे. शिक्षण B.Sc.,B.Ed. बी.एम.सी.त माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरी केली. २०११ मध्ये सेवानिवृत्त झाले. समाजकार्याबद्दल आवड आहे.

४१. श्री. घनश्याम पुरुषोत्तम सुपे - मूळगाव वाघोदे (ता. रावेर). ह.मु. ठाणे. शिक्षण - एम. फार्म हाफकिन बायोफार्मामध्ये मटेरियल मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. तसेच जळगाव अजिंठा हाफकिन फार्मा येथे जनरल मॅनेजर असून पिंप्रीच्या हाफकिन फार्माचाही कार्यभार सांभाळत आहेत. समाजकार्याबद्दल आपुलकी असून आर्थिक मदत करीत असतात.

४२. श्री. पांडुरंग दामोदर बोरोले - (जन्म-१ डिसेंबर, १९४१) मूळगाव न्हावी (ता. यावल). शिक्षण DCE (LC & SE, V.J.T.I.) महा. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात स्थापत्य अभियंता म्हणून नोकरी केली. इ.स. १९९९ मध्ये सेवानिवृत्त. समाजकार्याची आवड असल्याने आर्थिक मदत करत असतात.

४३. डॉ. राम खर्चे - पुणे. शिक्षण M.Sc. (Agri), M.A.; Ph.D. एल्.एल्.बी. माहिती - समाजरत्ने प्रकरण ९ पाहावे.

४४. श्री. वसंत देविदास चौधरी - (जन्म- १९-१२-१९३२) मूळगाव-फैजपूर. ह.मु. - घाटकोपर. फैजपूरहून एस.एस.सी. झाल्यावर प.रे. मध्ये मोटरमन म्हणून नोकरीस सुरुवात. १९९० मध्ये प.रे. मधून डिव्हिजनल इलेक्ट्रिकल इंजिनीअर म्हणून सेवानिवृत्त. इ.स. १९५४ ते १९६० पश्चिम रेल्वे उपनगरातील लेवा पाटीदार कुटुंबांची मोजणी करून मुंबई लेवा मंडळ अध्यक्षांकडे सुपूर्द केली. लेवा मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेतात. योग, अध्यात्म, प्राणायाम, मेडिटेशन, भगवद्गीता प्रवचन ह्यात विशेष रस.

४५. भ्रातृमंडळ, पुणे - द्वारे पुढील लेवा समाज प्रबोधन कार्ये आयोजित केली जातात- (१) १५ ऑगस्ट-स्नेहमेळावा व विद्यार्थी गुणगौरव, (२) रक्तदान शिबिर, (३) लेवा पाटीदार वधू-वर परिचय मेळावा, (४) २६ जानेवारी- स्नेहमेळावा व वार्षिक सर्वसाधारण सभा; (५) वारजेस लेवा पाटीदार गरजू विद्यार्थ्यांसाठी भव्य वसतिगृह बांधले आहे, (६) पुनर्विवाहेच्छू वधू-वर मेळावा.

याशिवाय पुढील विविध स्पर्धा कार्यक्रमांचे आयोजन- (अ) बहिणाबाई चौधरी काव्य स्पर्धा; (ब) निबंध स्पर्धा; (क) पद्मश्री वि.भि. कोलते साहित्य पुरस्कार; (ड) विद्यार्थी साहाय्य

योजना; (ई) वस्त्रदान योजना इत्यादी.

४६. डॉ. जी.एम. वारके - समाजरत्ने प्रकरण ९ पाहावे.

४७. श्री. निळकंठ गोपाळ नेमाडे - मूळगाव कोथळी ता. मुक्ताईनगर, जन्म-कोथडी येथे. जन्मतारीख १-६-१९५२. शिक्षण- इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नागपूर येथून बी.एस्सी. मुंबई विद्यापीठातून बी.एड. बी.एम.सी.च्या माध्यमिक शाळांतून गणित विषयाचे शिक्षक. एस्.एस्.सी. व्याख्यानमालांतून विद्यार्थ्यांना गणित विषयाचे मार्गदर्शन. आदर्श शिक्षक हा महापौरांतर्फे दिला जाणारा बहुमानाचा पुरस्कार प्राप्त. गणित विषयावर मार्गदर्शक पुस्तकांचे लेखन. सुविद्य पत्नी सौ. चारुलता ह्या (बी.एस.एन.एल. -टेलिफोन) खात्यात कार्यरत आहेत. मोठा मुलगा राहुल बी.ई. झाला असून लाइम लाइट कंपनीत उच्च पदावर काम करीत आहे. लहान मुलगा बी.ए.एल.एल.बी झाला असून तो बांधकाम व्यवसायात कार्यरत आहे.



४८. श्री. रमेश हरी खर्चे - मूळगाव-शेलगाव बाजार (ता. मोताळा). ह.मु. ठाणे, BSNL मधून सेवानिवृत्त. पत्नी-सुनीता खर्चे बी.एम.सी.मधून शिक्षिका म्हणून सेवानिवृत्त. मुलगा - गुणज्ञ B.E. (Computer Sc.) सॉफ्टवेअर इंजिनीअर पुढे UPSC त मेरीटमध्ये आल्यावर ऑगस्ट २००४ मध्ये कंबाईन डिफेन्स सर्व्हिसेस परीक्षेत उत्तीर्ण होऊन जाने. २००५ मध्ये एअरफोर्स ॲकॅडमी, हैदराबादला भारतीय वायुसेनेत वैमानिक प्रशिक्षणासाठी दाखल. प्रशिक्षणानंतर फ्लाईंग ऑफिसर एन एन ३२ विमानाचा पायलट म्हणून जोरहाट (आसाम) येथे नियुक्ती. २०११ मध्ये सुलूर (कोईम्बतूर) येथे फ्लाइट लेफ्टनंट म्हणून नियुक्ती. ६ फेब्रु. २०१२ रोजी एन एन ३२ हे हवाई दलाचे जायबंदी झालेले अजस्र विमान आपल्या असामान्य कौशल्याने धावपट्टीवर सुखरूप उतरविण्याचा विक्रम केला. विमानाचे डावे चाक खाली येत नव्हते. अशा स्थितीत मुख्य वैमानिक म्हणून सहवैमानिकाच्या मदतीने मोठ्या कौशल्याने विमान यशस्वीरीत्या उतरवून विमानातील पाच अधिकाऱ्यांचे प्राण वाचविले. विमानाचेही होणारे मोठे नुकसान टाळळे. याबद्दल भारत सरकारने त्यांना १५ ऑगस्ट २०१२ ला शौर्यचक्र घोषित केले. व २३ मार्च, २०१३ रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सध्या गुणज्ञ खर्चे हे स्क्वॉडन लीडर सुदान (द. आफ्रिका) येथे संयुक्त राष्ट्रातर्फे एक वर्षासाठी कार्यरत आहेत.

४९. श्री. विवेक सुधाकर चौधरी - (जन्म- २ मार्च १९६७) D Sc (Paints Tech.) मूळगाव खिरोदा. प्रोपा-मे. सारंग एंटरप्रायझेस (पार्टनर श्री. अनिल चौधरी). सर्व प्रकारचे रंग व इपॉक्सी कोटिंग उत्पादक, पावडर कोटिंग. पत्ता : H/2-6, M.I.D.C. अंबड नाशिक-४२२०१०, फोन ०५३-२३८०१८६/२३४४६५६ मो. ९८२२०००८६१. पत्नी-सौ. स्वाती चौधरी G.D. Arts; Dip. A.Ed. ह्या गृहिणी असून Oriflame च्या डायरेक्टर आहेत. मो. ९८२२७९२५४३

५०. प्रा. राम सोनाजी नेमाडे - यांची माहिती समाजरत्ने प्रकरण ९ मध्ये पाहावी.

५१. सौ. कुसुम राम नेमाडे - जन्म ९-६-१९४९, झोडगा, ता. मलकापूर येथे झाला. मलकापूरच्या नूतन विद्यालयात सातवीपर्यंत शिक्षण झाले. प्राध्यापक राम नेमाडे यांच्याशी १६ जून

१९६५ रोजी त्यांचा विवाह झाला. पतीच्या स्वाभिमानी वृत्तीमुळे नोकऱ्यांची धरसोड झाल्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतून भ्रमंती झाली. लग्नानंतर १८ वर्षांनी एस.एन.डी.टी.ची प्रदेश परीक्षा उत्तीर्ण करून पुढे बी.ए. (मराठी) व एम.ए. (पार्ट-१) पूर्ण केले. राजेश स्टडी सेंटर या शैक्षणिक संस्थेच्या संचालक म्हणून २५ वर्षे धुरा संभाळली. मोठी मुलगी सौ. शुभांगी नंदकुमार पाटील व लहान मुलगी सौ. हेमांग अविनाश चौधरी दोन्ही पुण्यात स्थायिक असतात. मुलगा सत्यजित हा हाडाचा शिक्षक, कवी, लेखक होता. त्याचे २ सप्टेंबर २०१४ रोजी निधन झाले. कुसुमताई (माई) म्हणून ओळखल्या जातात. पतीबरोबरच त्यांचेही समाजकार्यात मोलाचे योगदान आहे.

५२. श्री. नंदकुमार माधव पाटील - मूळगाव सांगवी, जि. जळगाव. जन्म २५ एप्रिल, १९६२ - (जन्मगाव - सावदा जि. जळगाव) प्राथमिक शिक्षण-भारत माध्यमिक शिक्षण इंग्लिश स्कूल पुणे. गरवारे महाविद्यालयातून एम.कॉम. प्रथम व्यंकटेश्वर हॅचरीज्मध्ये काही वर्षे नोकरी. आता पुष्कराज एंटरप्राइजेसमध्ये कार्यरत आहेत. सुविद्य पत्नी सौ. शुभांगी. शिक्षण - बी.कॉम. गृहिणी. चित्रकलेची व अध्यात्मात आवड आहे. मोठी मुलगी कुमारी मानसी बी.ए. करत असून इंडियन एक्स्प्रेसमध्ये नोकरी करीत आहे. लहान मुलगी कु. महिमा बी.कॉम करीत असून तिला सी.एस. करायचे आहे.

५३. डॉ. श्री. अविनाश बळीराम चौधरी - मूळगाव पिंपरूड जि. जळगाव जन्म - २६-०९-१९७१ पुणे. शिक्षण - एम.एस्सी, पीएच.डी., डॉ. राम लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई युनिव्हर्सिटीतून पीएच.डी.; केम. बायोटेक, कोलकाता, ज्युबिलियन नोएडा, जी.व्ही.के. हैदराबाद या कंपन्यांतून नोकरी केली. सध्या पुणे येथील साई लाईफ सायन्स या कंपनीत कार्यरत. वडील एअरफोर्समध्ये होते. त्यामुळे भारतभर भ्रमण. काही दिवस जर्मनीतही होते. सुविद्य पत्नी सौ. हेमांगी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून एम.ए. (अर्थशास्त्र) झाली असून सध्या गृहिणी म्हणून घर सांभाळत आहे. मोठा मुलगा अजिंक्य सी.बी.एस.सी. शाळेतून ९६% गुण मिळवून आता पुणे येथे आय.आय.टी.ची तयारी करीत आहे. लहान चिरंजीव जतीन पुण्याच्या सिंहगड स्कूलमध्ये सहाव्या इयत्तेत शिकत आहे.

५४. श्री. हरेश्वर शंकर नेमाडे - मूळगाव - नाडगाव ता. बोदवड, जि. जळगाव. जन्मगाव - नांदुरा. जन्म - १०-८-१९५८ बी.एस्सी., बी.एड्. गर्ल्स इंग्लिश स्कूल कल्याण येथे शिक्षक व नंतर नवजीवन विद्यामंदिर, कल्याण येथून मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त. सुविद्य पत्नी सौ. वनिता ही नवजीवन विद्यालय, कल्याण याच शाळेत गणित शिक्षिका म्हणून काम पाहत आहे. मुलगा बी.ई. (कॉम्प्युटर) व सून सौ. स्वप्नाली बी.ई. (इले.) पुणे येथे नोकरी करत आहे. हरेश्वरचे वडील कै. शंकर सोनाजी नेमाडे हे पी.एस.आय. असतानाच दिवंगत झाले. भाऊ अशोक व सुधाकर हे नांदुरा जि. बुलडाणा येथे वास्तव्य करून आहेत. त्यांनी प्रगत शेतकरी म्हणून नावलौकिक संपादन केला आहे. प्रा. राम नेमाडे यांचे हरेश्वर पुतणे असून त्यांनाही समाजकार्याची आवड आहे.

५५. फिरके शालिग्राम हरी - मूळगाव न्हावी, जन्म २६ जून १९५२. शिक्षण - बी.एस.सी., बी.एड्. शहा चंदुलाल स्वरूपचंद विद्यालय, किन्हवली येथे ३६ वर्षे गणित व विज्ञान या


विषयाचे अध्ययन केले. शालांत परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्याने दिलीत. एस.एस.सी. बोर्डात मॉडरेटर म्हणून काम केले. सेवानिवृत्तीनंतर 'विद्यादान सहायक मंडळाचे' सक्रिय कार्यकर्ते म्हणून कार्य करीत आहेत. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. प्रमोदिनी फिरके एम.ए. (मराठी) असून त्यांनी एम्ब्रायडरी, क्राफ्ट असे कोर्सेस करून आपला संपूर्ण वेळ आदिवासी महिलांना हस्तकला शिकविण्यात व त्यांच्याकडून तयार केलेल्या वस्तूंची प्रदर्शने भरवून त्यांना अर्थसहाय्य मिळवून देण्यात खर्च केला आहे. स्वयंरोजगाराचे शिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. शिलाई मशिनचे वाटपही केले. दिवाळीचे पदार्थ, मसालेही त्या तयार करून विकतात, यातून कितीतरी महिलांच्या हाताला काम मिळाले. आदिवासींना जातीची प्रमाणपत्रे मिळवून देण्याचे कार्यही त्यांनी केले आहे. सरांचे चिरंजीव मिथुन फिरके बी.ए.एम.एस., एम.एस्सी., एम.ए. (संस्कृत) असून फार्मासिटीकल मेडिसीन-क्लिनिकल रिसर्च यात निपुण आहेत. सूनबाई बी.ए.एम.एस. असून शहापूर येथे दवाखाना चालवीत आहेत. मुलगी सौ. मानसी ललित कोल्हे एम.टेक. (कॉम्प्युटर) असून जॉमेट्रिक सॉफ्टवेअर लि. ऐरोली येथे जॉब करीत आहे. लेवा पाटीदार मंडळाच्या माध्यमातून सरांचे सामाजिक कार्य सुरू आहे.



५६. श्री. एकनाथ रामभाऊ चौधरी - मूळगाव - किनगाव, जि. जळगाव, स.मु. अंबरनाथ येथे आहे. चौधरी हे एक उत्तम व्यवसायिक आहेत व लेवा पाटीदार समाज अंबरनाथ मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या धर्मपत्नी सौ. रजनी या गृहिणी असून सूर्योदय को-ऑप. हौ. सोसायटी, अंबरनाथच्या संचालिका आहेत; मुलगी डॉ.सौ. हर्षदा कुलकर्णी या डी.बी.एस. आहेत.

५७. श्री. प्रदीप रामदास सरोदे - मूळगाव - मस्कावद, शिक्षण - बी.ई. सिव्हिल, सध्या रिलायन्स इन्फास्ट्रक्चर लि. मुंबई येथे जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत.

✧✦✧



विद्यार्थी वसतिगृह, भ्रातृ मंडळ पुणे-वारजे

realpatidar.com



लेखकद्वयी

डॉ. निळकंठ रामदास पाटील

सहयोगी लेखिका
सौ. ऊर्मिला निळकंठ पाटील



जन्म : १ डिसेंबर १९४६

पत्ता : १०३, लता को.ऑ.हा.सो., ठाकुरवाडी, डोंबिवली (प) ४२१२०२
फोन : ०२५१-२४८७५९५; मोबाईल : ९३२४१७६८८०

शिक्षण : एम. कॉम

व्यवसाय : सेवानिवृत्त शासकीय अधिकारी

प्रकाशन : ◗ लेवा गणबोली कोश (सहयोगी लेखिका : सौ. उर्मिला नि. पाटील) ◗ लेवा पाटीदारांची कुळे, गोत्रे, कुलदेवता, कुळधर्म व कुळाचार (सहयोगी लेखिका : सौ. उर्मिला नि. पाटील) ◗ लेवा गणबोलीचे मानकरी (सहयोगी लेखिका : सौ. उर्मिला नि. पाटील) ◗ लेवा बोलीतील बहिणाबाईची गाणी–रसास्वाद ◗ हिंदवी स्वराज्याची दुर्गतीर्थे ◗ हिंदवी स्वराज्याची दुर्गतीर्थे (भाग २) ◗ जळगाव जिल्ह्यातील किल्ले – गढ्या ◗ महाराष्ट्र किल्ले (खंड १) – कोकण विभाग

प्रकाशन मार्गावर : ◗ महाराष्ट्र किल्ले (खंड २) – दख्खन पठार व मावळ विभाग
◗ महाराष्ट्र किल्ले (खंड ३) – खानदेश व उत्तर महाराष्ट्र विभाग
◗ महाराष्ट्र किल्ले (खंड ४) – वऱ्हाड विदर्भ विभाग
◗ महाराष्ट्र किल्ले (खंड ५) – दख्खन सुभा–मराठवाडा विभाग
◗ हिंदवी स्वराज्याची दुर्गतीर्थे (भाग ३)

आगामी : ◗ Lewa Patidars in Khandesh and Berar - a Drift
◗ प्रतीहार (लक्ष्मणावर आधारित कादंबरी) ◗ खानदेशी रॉबिनहूड – सुपड्या डाकू ◗ बुलडाणा जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे ◗ जळगाव जिल्ह्यातील हेमाडपंती मंदिरे ◗ मी पीहोद्या

◆◆◆

प्रकाशक : मुंबई व परिसर लेवा मंडळ, मुंबई (रजि.)